म. ग्रं. सं. ठाणे
विषय इतिहास
क्र. नं. ६६०२
REFBK-0006897



हिंदुस्थानाचें

# दुसरें स्वातंत्र्य युध्द

"स्वातंत्र्याचं मोल रक्त!
तुम्ही मला रक्त द्या, मी तुम्हांस स्वातंत्र्य देतों."

लेखक

**पुरुषोत्तम नागेश ओक**
एम्.ए., एल्एल्.बी.

J. B. DIKSHIT

मङ्गल साहित्य प्रकाशन

यशोदा–चिंतामणि निधि–पुरस्कृत ग्रंथमाला, क्रमांक १४ वा

# हिंदुस्थानाचें
# दुसरें स्वातंत्र्ययुद्ध

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 29332 दि: 3/11/61/27
क्रमांक ६...२ नों: दि: 20/9/५८.

पुरुषोत्तम नागेश ओक
एम्. ए., एल्‌एल्. बी.

REFBK-0006897

मुंबई एजंटस् :-
आपटे आणि कंपनी,
बुकसेलर्स, मुंबई नं. २.

मङ्गल साहित्य प्रकाशन, पुणें ४

**प्रौढांसाठीं इतिहासग्रंथ**
प्रकाशन ३६ वें : फेब्रुवारी १९४७
आवृत्ति पहिली : माघ सं. २००३
पृष्ठसंख्या ४२१ : मूल्य ७ रुपये

★

**मङ्गल साहित्य प्रकाशन**
**संचालक** : अमरेन्द्र गाडगीळ
**अनुशासक** : १ दि. वि. काळे, एम्. ए.
२ रा. त्र्यं. रानडे

**प्रकाशिका** :
सौ. मङ्गला अमरेन्द्र गाडगीळ
**मङ्गल साहित्य प्रकाशनाकरतां**
आनंदचेम्बर्स, आम्बराई, पुणें ४.

**मुद्रक** :
अमरेन्द्र लक्ष्मण गाडगीळ
**अग्रणी मुद्रणालय**
आनंदचेम्बर्स, आम्बराई, पुणें ४.

जनासो अग्निं दधिरे सहोवृधं विधेम ते ।
स त्वं नो अद्य सुमना इहा-विता वाजेषु सन्त्य ॥

—ऋग्वेद

दर्पदमन-सामर्थ्याची वृद्धि करणारा जो अग्नि त्याची भक्तजनांनीं वेदीवर संस्थापना केली आहे. त्यास हवि अर्पण करून आम्हीही त्याला प्रकट व्हावयास लावूं. हे संतप्रतिपालका अग्निदेवा, पराक्रमाच्या कृत्यांत आमचा तूं प्रसन्न अंतःकरणानें संरक्षणकर्ता हो.

“ स्वातंत्र्याचें मोल रक्त !

तुम्ही मला रक्त द्या;

मी तुम्हांस स्वातंत्र्य देतों.”

—नेताजी सुभाषचंद्र बोस.

यशोदा-चिंतामणि निधि

पुरस्कृत ग्रंथमाला

क्रमांक १४ वा

---

# हिंदुस्थानाचें
# दुसरें स्वातंत्र्य युद्ध



प्रो. नागेश कृष्ण ओक, एम्. ए.



सौ. जानकीबाई ओक

★

परमपूज्य तीर्थरूप
मातापितरांचे चरणीं
सादर समर्पण

हा स्वातंत्र्ययुद्धाचा इतिहास म्हणजे केवळ तेथें घडलेल्या चकमकींचीं मनोरंजनासाठीं दिलेलीं चटकदार वर्णनें नसून—

'हिंदुस्थानाचें स्वातंत्र्य' ह्या शब्दांतील वास्तविक अर्थाच्या प्राप्तीसाठीं राष्ट्राची दानत किती उच्च असावी लागेल, त्यासाठीं कोणत्या वृत्तींची जोपासना व कोणत्या वृत्तींचें निर्मूलन करावें लागेल ह्याचें दिग्दर्शन व्हावें हा हेतु !



तिबेट
भूतान
हिंदुस्थान
शिलाँग
दिमापूर
कोहिमा
मणिपूर
सिल्चर
भैरव बाजार
ढाका
अगरताला
कलकत्ता
चितगाँव
पालेटवा
कालाडान
पाकोक्कु
पगान
मंडाले
मेनिओ
सागाईंग
काथा
भामो
मिचीना
मिनबू
अक्याब
येमेथिन
पिनमिना
प्रोम
टांगू
पेगू
रंगून
मर्ताबान
मोलमिन
ये
टव्हॉय
बँकॉक
मग्युई
सयाम
व्हिक्टोरिया पॉईंट
सिंगोरा
पेनांग
कोलालंपूर
मलाक्का
सिंगापूर
शहीद बेटें
(अंदमान)
स्वराज्य बेटें
(निकोबार)
रेल्वे मार्गाने
पायीं प्रवास
आझाद हिंद सेनेच्या चढाईचा मार्ग

## पदन्यास

◆ स्वातंत्र्ययुद्धाची जन्मभूमि ... : १
◆ दूरपूर्वेत युद्ध पेटलें ... : २
◆ ' पळा ! पळा ! जपानी आले ! ' ... : ३
◆ दूरपूर्वेतील राजकारण ... : ४
◆ हिंदवी स्वातंत्र्य-चळवळीचें बीज ... : ५
◆ युद्धस्य कथा रम्याः ... : ६
◆ स्वातंत्र्यबीजास अंकुर फुटले ... : ७
◆ मोहनसिंगांचें कार्य ... : ८
◆ बंदी-छावणींतील महाराष्ट्रीयांचें कार्य ... : ९
◆ हिंदी स्वातंत्र्यसंघ ... : १०
◆ माझें सायगांवला प्रयाण ... : ११
◆ सुभाषचंद्र-निवास ... : १२
◆ ' नेताजी ' नामाभिधान रूढ झालें ... : १३
◆ सैन्याची उभारणी ... : १४

- नेताजींनीं सर्व जबाबदारी पत्करली ... : १५
- हिंदी युद्धबंद्यांची मनोवृत्ति ... ; १६
- हिंदी स्वातंत्र्य-सरकाराची स्थापना ... : १७
- हिंदी स्वातंत्र्य संघ ... : १८
- हिंदी स्वातंत्र्यसेना ... : १९
- नेताजी सुभाषचंद्र बोस ... : २०
- युद्धाची पूर्वतयारी ... : २१
- युद्धाला तोंड लागलें ... : २२
- विजयकालांतील इतर कार्य ... ; २३
- फांसा उलटा पडला ! ... : २४
- मागें पाऊल ... : २५
- आघात ! ... : २६
- हिकारी कीकान ... : २७
- उपसंहार ... : २८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनु. 21332 वि. इतिहास
क्रमांक ९५२ नों. दि. 27.7.54

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ६८८७
शाखा (स्थळ प्रत)

# पार्श्वभूमि

इसवी सन १८१८ मध्यें पेशव्यांचा पाडाव होऊन हिंदुस्थानाचें सार्वभौमत्व इंग्रजांच्या ताब्यांत गेल्यापासून आजपर्यंतच्या सुमारें सव्वाशें वर्षांत हिंदी फौजेनें स्वयंस्फूर्तीनें चालू केलेलें १८५७ चें युद्ध हें हिंदुस्थानाच्या पारतंत्र्याच्या इतिहासांत **पहिलें स्वातंत्र्ययुद्ध** गणलें जावें इतकें निकराचें, चिरस्थायी व मोठ्या प्रमाणांत लढलें गेलें. त्यानंतर इंग्रजांचें सिंहासन तितकेंच, किंबहुना त्याहून जास्त हादरवून सोडणारें असें दुसरें युद्ध परमपूज्य नेताजी सुभाषचंद्र बोस या एकमेव पुढाऱ्याच्या नेतृत्वाखालीं सन १९४३ ते १९४५ पर्यंत लढलें गेलें. हें सुद्धां १८५७ च्या लढ्याप्रमाणेंच अयशस्वी ठरलें असलें तरी पहिल्या लढ्यापेक्षांही कित्येक गोष्टींत श्रेष्ठ ठरलेल्या या युद्धास '**हिंदुस्थानाचें दुसरें स्वातंत्र्ययुद्ध**' हेंच नांव शोभेल. शें-सव्वाशें वर्षांच्या दास्यानें कित्येकांचीं मनें इतकीं दुर्बल झालेलीं असतात कीं त्यांस 'स्वातंत्र्ययुद्ध' हें नांव हास्यास्पद वाटतें. बरोबरच आहे, खाकी वस्त्रधारी व्यक्ती पाहून जे गर्भगळित होतात, बॅडमिंटनचे एक दोन डाव खेळणें म्हणजे पराकोटीचा व्यायाम करणें असें जे मानतात, 'न धरी शस्त्र करीं मी' हें व्रत ज्यांनीं अंगिकारिलें आहे व ज्यांच्या स्त्री-वर्गास पुण्याहून मुंबईस आगगाडीनें जावयाला

सोबतीची जरूर लागते अशा लोकांस, त्यांच्याच इतर बांधवांनीं नाना तऱ्हेच्या हालअपेष्टा सोसून राजसत्तेविरुद्ध युद्ध पुकारलें व त्यांत प्राणार्पणही केलें या केवळ वल्गना वाटल्या तर त्यांत नवल काय? कोणताही सुसंघटित, सशस्त्र, निकराचा, चिरस्थायी व मोठ्या प्रमाणावर केलेला लढा हा स्वातंत्र्ययुद्ध या संज्ञेस पात्र आहे; व म्हणूनच १९४३ पासून १९४५ पर्यंत नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या हिंदी स्वातंत्र्य सैन्यानें जो लढा लढविला त्यास 'हिंदुस्थानाचें दुसरें स्वातंत्र्ययुद्ध' म्हटलें पाहिजे. या दोन्ही युद्धांच्या दरम्यान जे इतर सशस्त्र किंवा निःशस्त्र प्रयत्न झाले त्यांचा कमीअधिक प्रमाणांत आपल्या अंतिम ध्येयाच्या दृष्टीनें व जागरूकता उत्पन्न करण्याच्या रूपानें फायदा झाला; परंतु त्यांस चळवळ-आंदोलन यापेक्षां व्यापक नांव देतां येणार नाहीं.

१८५७ पेक्षां १९४३ चा प्रयत्न हा सर्वच दृष्टींनीं सुसंघटित व सुव्यवस्थित होता. १८५७ च्या लढ्याचे अगोदर, सैनिकांत असंतोष बरेच दिवस धुमसत होता. त्याला अकल्पित रीतीनें तोंड फुटलें व तो वडवाग्नी पसरला. याचे उलट १९४३ मध्यें पूर्ण विचारांतीं व पूर्ण तयारीनंतर नेताजींनीं स्थापिलेल्या स्वतंत्र हिंदी सरकारानें औपचारिकरीत्या व आंतरराष्ट्रीय प्रघातास अनुसरून इंग्रज व अमेरिकन यांच्याविरुद्ध युद्ध पुकारलें. पहिल्या स्वातंत्र्ययुद्धांत हिंदु व मुसलमान यांनीं आपापले ध्वज फडकावून वेगवेगळ्या नेत्यांच्या नेतृत्वाखालीं स्वतंत्रपणें लढाया लढल्या तर या दुसऱ्या स्वातंत्र्ययुद्धांत हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांताच्या, धर्माच्या व पक्षोपपक्षाच्या लोकांनीं सुभाषचंद्र बोस या एकमेव व्यक्तीच्या नेतृत्वाखालीं आणि एका तिरंगी निशाणाखालींच युद्ध आरंभिलें. या दुसऱ्या खेपेस हिंदुस्थानी लोकांच्याकडे, कमी प्रमाणांत कां होईना परंतु इंग्रजांप्रमाणेंच आधुनिक युद्धसामुग्रीची सर्व तरतूद होती. पाश्चात्य देशांकडे ज्याप्रमाणें आरमार, हवाई दल, रणगाडे, चिलखती गाड्या, तोफा, बंदुका इत्यादि रणसाहित्य होतें त्याचप्रमाणें परंतु कमी प्रमाणांत नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या सैन्यासही या साहित्याचा पुरवठा होत होता. १८५७ च्या लढ्यास आंतरराष्ट्रीय अस्तित्व, महत्त्व व मदत नव्हती तर १९४३ च्या युद्धास ती पूर्णपणें होती.

ही झाली भौतिक दृष्टि; आतां मानसिक दृष्ट्या १९४३ चें स्वातंत्र्ययुद्ध हें जास्त जागृतिपूर्ण असें होतें. सर्व धन चोरीस गेल्यावर जाग्या झालेल्या मालकास ज्याप्रमाणें एकप्रकारची उदासीनता व त्वेष येतो ती वृत्ति कांहीं अंशीं

१८५७ मधील हिंदी जनतेची होती. आतां हा चोर कोण ? कुठला ? हा आपल्याच घरांत कायमचा राहिल्यानें काय काय प्रसंग ओढवतील ? याचे साथीदार कोणकोण आहेत ? आपल्याचसारखे इतर आणखी कोण नागविले गेले ? याला आपल्या घरांतून घालवावें कसें ? त्यांत आपल्याला कोणकोण साहाय्य करील ? याची जाणीव हिंदी जनतेस आतां कांहींशी झालेली असून या जाणीवेनें हें दुसरें स्वातंत्र्ययुद्ध शक्य त्या तयारीअंतीं पुकारलें गेलें.

या दुसऱ्या स्वातंत्र्ययुद्धांत मी थोडाफार भाग घेतलेला असल्यानें या युद्धाची पूर्वपीठिका, त्याचीं एकंदर हकीगत आणि आनुषंगिक गोष्टी इत्यादींचें माझ्या स्वतःच्या अनुभवावरून आणि इतर ऐकलेल्या व पाहिलेल्या माहितीवरून सर्वांगीण विवेचन करण्याचें मी या इतिहासग्रंथांत योजिलें आहे. लढाई पुकारण्यास कशा कशा प्रकारची तयारी असावी लागते ? धन-धान्य-औषधी इत्यादींचा सांठा कसा आणि किती असावा ? वाहतुकीचीं साधनें कार्यक्षम ठेवण्यांत कशा कशा अडचणी येतात व कां ? अंतिम जय मिळवावयास कोणकोणत्या गोष्टींची आवश्यकता असते ? आंतरराष्ट्रीय सलोखे व करार हे कशा प्रकारचे असतात ? नेताजी सुभाषचंद्र बोस हे दूरपूर्वेंत कसे आले ? त्यांनीं केलेली आझाद् हिंद् सरकाराची स्थापना; 'राणी ऑफ झांशी रेजिमेंट'चें उद्दिष्ट आणि कार्य; जपान, जर्मनी, इटली व इतर दोस्त राष्ट्रें यांच्याशीं नेताजी सुभाषचंद्र बोस यांनीं स्थापिलेल्या स्वतंत्र हिंद् सरकाराचे संबंध; निरनिराळ्या लोकांचे आचार विचार, त्यांचे स्वातंत्र्याचे प्रयत्न इत्यादि सर्व गोष्टींचें प्रसंगाप्रसंगानें यांत विवेचन येईलच. परंतु केवळ एक स्फूर्तिदायक इतिहासग्रंथ याच दृष्टीनें माहिती लिहिण्याचा माझा उद्देश नसून आपल्या मागील चुकांवरून आपणांस काय काय बोध घेण्यासारखा आहे व शेवटच्या स्वातंत्र्ययुद्धासाठीं आपल्याला कशा प्रकारची तयारी करावी लागेल हेंही दाखविण्याचा माझा हेतु आहे. अर्थात् त्या दृष्टीनें आपल्या हातून प्रत्यक्ष यशस्वी प्रयत्न झाला तरच मला श्रमसाफल्य झाल्यासारखें वाटेल, हें सांगणें नकोच.

प्रस्तुत ग्रंथ "सह्याद्री"तून बाहेर पडावा अशी मूळ कल्पना होती. "सह्याद्री"करतां हा इतिहास शक्य तितक्या तांतडीनें लिहून काढण्याची सूचना गुरुवर्य साहित्यसम्राट श्री. रा. तात्यासाहेब तथा नरसिंह चिंतामण केळकरांनीं मला प्रथम केल्यामुळेंच हा ग्रंथ मी इतके लवकर व नेटानें पूर्ण केला. दूरपूर्वेंतील स्वातंत्र्य-चळवळीचा सुसंगत व समग्र इतिहास आणि

तदनुषंगानें उद्भवणारे सर्व प्रश्न अशा दृष्टीनें हा ग्रंथ शक्यतोंवर परिपूर्ण असावा असा माझा पहिल्यापासूनच कटाक्ष होता. 'गंगावतरणां'त गंगेचा प्रचंड ओघ जटाधारी शंकरानें आपल्या शिरावर झेलावा अशी भगीरथानें प्रार्थना केली होती. परंतु प्रस्तुत प्रसंगीं प्रत्यक्ष शंकरानेंच मला भगीरथ प्रयत्न करावयास लावून या स्वातंत्र्येतिहास-गंगेचा ओघ सह्याद्रीच्या माथ्यावर निःशंकपणें पडूं देण्यास सांगितलें. या बाबतींत सर्वच उलटें झालें. या गंगेच्या ओघानें "सह्याद्रीं"त दुसऱ्या कोणत्याही विचारप्रवाहास जागा मिळणार नाहीं येवढेंच नव्हे तर सहा महिनेपर्यंत तरी "सह्याद्रि" यांत पूर्णपणें बुडेल असें जेव्हां दिसून आलें तेव्हां स्वतंत्र पुस्तकाच्या शिरावरच या गंगेची जबाबदारी पडली. अर्थात् या गंगेनें पावन होणारे वाचक व ग्रंथकर्ता 'भगीरथ' हे, मूळ प्रेरणा करणाऱ्या 'शंकरा'चे सदैव ऋणी राहतील.

या इतिहासांत नमूद केलेल्या व्यक्ती अथवा प्रसंग यांचे संबंधांत एखादा अधिकउणा शब्द आलेला असल्यास तो उभयपक्षीं, वैयक्तिक दृष्ट्या मुळींच लिहिलेला नसून केवळ भारतलक्ष्मी स्वतंत्र होण्याकरतां पुढच्यांस ठेंच लागली असतां मागल्यांस बोध व्हावा या हेतूनें लिहिलेला आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचेबद्दल लिहितांना अथवा त्यांच्याशीं इतर थोर व्यक्तींची तुलना करितांना क्वचित् अतिशयोक्ति अथवा तौलनिक दृष्ट्या अल्पसा उच्च-नीच भेद दाखविला गेला असल्यास त्यामुळें कोणाचाही अनादर करण्याचा ग्रंथकर्त्याचा यत्किंचितही हेतु नाहीं. मानव प्राणी म्हटला म्हणजे तो कधींच सर्वगुणसंपन्न नसतो. एका व्यक्तींतले गुण दुसऱ्यांत सांपडत नाहींत. म्हणून एखाद्या विशिष्ट व्यक्तीबद्दल बोलतांना या व्यक्तीचे अमुक अमुक गुण दुसऱ्या व्यक्तींत नाहींत असें म्हटलें म्हणजे दुसऱ्या व्यक्तींत कांहींच गुण नाहींत अथवा पहिली व्यक्ति सर्वगुणसंपन्न आहे असें म्हणण्याचा उद्देश नसतो. दुसऱ्या व्यक्तींचें गुणवर्णन हें त्या ग्रंथाच्या कक्षेंत बसत नाहीं एवढेंच. लव आणि कुश या दोघांचीं चरित्रें लिहितांना आपापल्यापरी दोघेही एक दुसऱ्यापेक्षां श्रेष्ठ होते, असें त्या त्या ग्रंथांत दाखवावें लागेल. शिवाय, थोर व्यक्तींचे परस्परांतील गुणावगुण दाखविणारा ग्रंथकार हा स्वतःस त्यांचेहून श्रेष्ठ समजतो असें समजणें म्हणजे अर्थाचा अनर्थ करणें होईल. वस्तुतः भारतांतीलच काय परंतु जगांतील सर्वच थोर व्यक्तींबद्दल प्रस्तुत ग्रंथकर्त्यास आदर आहे.

*पुरुषोत्तम नागेश ओक*

# हिंदुस्थानाचें

दा. क. ..........

१९४३ ते १९४५

# दुसरें स्वातंत्र्ययुद्ध

स्थळप्रत.
वि: ........
क्रमांक .................... नों: दि: ..............
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

## स्वातंत्र्ययुद्धाची जन्मभूमि : १

या स्वातंत्र्ययुद्धाची सिद्धता ज्या दूरपूर्वेच्या प्रदेशांत झाली त्या प्रदेशाची थोडीफार माहिती असणें हें त्या युद्धाची यथार्थ कल्पना येण्याच्या दृष्टीनें आवश्यक आहे. प्रशांत (पॅसिफिक) महासागराच्या विस्तीर्ण जलपृष्ठावर सहा हजार लहानलहान बेटें आहेत. यांपैकीं बरीचशीं डच लोकांच्या ताब्यांत आहेत तर इतर कांहीं थोडीं फार इंग्रज, अमेरिकन, पोर्तुगीज इत्यादि लोकांच्या ताब्यांत आहेत. या राष्ट्रांस इकडील बेटांवर ताबा मिळवून इतकीं वर्षें झालीं तरी क्वचित एखादें बेट असें सांपडतें कीं त्यावर कोणाचाच ताबा असलेला दिसून येत नाहीं किंवा प्रत्यक्ष कोणाचा ताबा आहे तें समजण्याचा मार्ग नसतो. तेथें काळे, खुजे, रानटी लोक राहतात. अर्थात् एवढ्या विस्तीर्ण आणि तुटक प्रदेशाचा राज्यकारभार चालविणें हें जागतिक शांततेच्या काळांत सुद्धां कठिण जातें तर मग युद्धकाळांत त्याचें संरक्षण जवळ जवळ अशक्य आहे हें कोणासही सहज समजून येण्यासारखें आहे. खालीं समांतर रेषेंत धनुष्याच्या दोरीप्रमाणें सुमात्रा,

जाव्हा, बाली व ऑस्ट्रेलिया इत्यादि प्रदेश व त्यांच्या वर धनुष्याकृती मलाया, सयाम, इंडोचायना, चीन,जपान, ॲल्युशियन बेटें, अलास्का, कॅनडा व अमेरिका हे देश आहेत. या धनुष्याच्या मधोमध फिलीपीन्स बेटें, बोर्निओ, न्यू गिनी, आणि हवाई हे प्रदेश आहेत. पूर्व आशियांत युद्धाचे ढग जमले तेव्हां मंगोलियन म्हणजे पिवळ्या जातीचे लोक राहात असलेल्या व अफाट निळ्या समुद्रानें व्याप्त अशा या प्रदेशास, रक्ताच्या चिळकांड्या उडून इंद्रधनुष्याचेंच स्वरूप आलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. आगगाडीच्या प्रवासांत जेवढी जागा मोकळी दिसेल त्यावर आपले हातपाय, सामान इत्यादि पसरून उतारू ज्याप्रमाणें शक्य तितकी जागा अडवितात त्याप्रमाणें पाश्चिमात्य खलाश्यांनीं पूर्वेकडील या विस्तीर्ण प्रदेशांत सांपडेल त्या जागेवर आपलें झेंडे रोविले. डच, पोर्तुगीज, इंग्रज, अमेरिकन, फ्रेंच इत्यादींस पुरून उरण्याइतकी जागा असल्यामुळें एकानें दुसऱ्यास वाटेल तितकी जागा अडविण्यास विरोध केला नाहीं. व त्या त्या प्रदेशांतील मागासलेले लोकही सुधारलेल्या शस्त्रास्त्रांच्या ( म्हणजे तोफा, बंदुका, पिस्तुलें इत्यादींच्या ) अभावीं विशेष प्रतिकार करूं शकले नाहींत. अशा रीतीनें पूर्व आशियांत पाश्चिमात्य साम्राज्यशाही सुरू झाली. यांपैकीं त्यांतल्यात्यांत विशेष जागरूक व सुधारलेलीं अशीं चीन व जपान हीं दोनच पौर्वात्य राष्ट्रें होतीं. पैकीं चीन हें एक जुनें व अफाट राष्ट्र अंतस्थ कलहांनीं बेजार झालें होतें. त्यामुळें आशियांत अग्रेसरत्व पत्करण्याची शक्ति चीनच्या ठिकाणीं मुळींच नव्हती; उलट तेंच इंग्रज, अमेरिकन, फ्रेंच व जर्मनी या पाश्चात्य राष्ट्रांच्या साम्राज्याकांक्षांना बळी पडून त्यास आपलें आर्थिक स्वातंत्र्य, बाजारपेठा, व्यापार वगैरे तर सर्वस्वीं गमवावें लागलेंच परंतु शिवाय मुख्य मुख्य ठिकाणें, आरमारी व हवाई तळ आणि इतर कित्येक सार्वभौमत्वाचे हक्क यांसही मुकावें लागलें. आशियाच्या मानगुटीस बसलेलें हें गोरें भूत पाहून जपान मात्र वेळींच जागा झाला. त्यावेळेस जपानमध्यें ख्रिश्चन मिशनरी शिरून बाटवेगिरीचा प्रकार सुरू करूं लागले होते. कर्मधर्मसंयोगानें या चंचुप्रवेशाचे घोर परिणाम जपान्यांच्या वेळींच लक्षांत येऊन त्यांनीं हें विषारी मूळ समूळ उपटून काढावयाचें ठरवून कांहीं पाताळयंत्री पाद्र्यांस फांशीं दिलें, कांहींना हुसकून लाविलें, त्यांच्या व्यासपीठांचा विध्वंस केला व त्यापुढें फक्त डच लोकांस एक दोन बंदरांत प्रवेश खेरीज करून इतर कोणाही परकीयास जपानच्या कोठल्याही भागांत कोणत्याही निमित्तानें येण्याची बंदी केली. परकीयांशीं दळणवळण ठेवणाऱ्या, जपानमधून बाहेर जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या व बरींच वर्षे इतर प्रदेशांत राहून परत येणाऱ्या कोणत्याही जपानी माणसास देखील देहान्त शिक्षा व्हावी अशी तरतूद करण्यांत आली. बरींच वर्षे जपाननें अशा रीतीनें एकान्तवास पत्करला; परंतु पुढें जपानचीं कवाडें आंतरराष्ट्रीय व्यवहारास खुलीं करण्याकरतां कमोडार पेरी हा अमेरिकन खलाशी सुसज्ज अशा

आरमारासहित आला आणि शक्य झाल्यास गोडीगुलाबीनें किंवा वेळ पडल्यास जबरदस्तीनें परंतु जपानला आंतरराष्ट्रीय संबंधांत खेचूंच खेचूं अशा निश्चयानें त्यानें जपानमध्यें प्रवेश करून घेतला. आतां मात्र संन्यस्त वृत्तीनें निभाव लागणार नाहीं असें पाहून जपाननें अमेरिकेशीं पहिला आंतरराष्ट्रीय मैत्रीचा करार केला. त्यानंतर एकामागून एक असे इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी यांनींही जपानशीं मैत्री-करार केले. या वेळेस जपानचा सम्राट हा नामधारीच होता व सर्व सत्ता शोगुनकडे म्हणजे पंतप्रधानाकडेच होती. परंतु अंतस्थ कारस्थानें, अंकित सरदार मंडळींची बंडाळी व कित्येक होतकरू लढाऊ वृत्तीच्या लोकांची अधिकारतृष्णा यांमुळें परचक्रापासून देशाचें रक्षण करणें हें त्यास अशक्यप्राय वाटलें म्हणून त्यानें अत्यंत दूरदृष्टीनें व मुत्सद्दीपणानें सर्व कारभार राजाचे हातीं सोंपवून तो स्वतः निवृत्त झाला. राजघराण्याबद्दल असलेल्या आदरामुळें सगळी सरदार मंडळी आपआपसांतील कलह सोडून देऊन राजाला मदत करण्यास सिद्ध झाली. सर्वांच्या सहकार्यानें व दूरदर्शी मुत्सद्यांच्या सल्ल्यानें असें ठरलें कीं जपाननें संन्यस्त वृत्ति आणि निवृत्तिमार्ग सोडून देऊन प्रगमनशील व्हावें. अशा रीतीनें १८६८ मध्यें मेजी टेन्नो हेका या सम्राटानें पुनश्च सर्व सूत्रें स्वतःच्या हातांत घेतलीं. तें वर्ष आधुनिक जपानचें जन्मवर्ष धरलें जातें. या वर्षीं जपानी सम्राटानें पुढचें धोरण स्पष्ट करणारा एक महत्त्वाचा जाहीरनामा काढून जपान कोणत्याही क्षेत्रांत मागें तर राहणार नाहींच परंतु इतर राष्ट्रांप्रमाणें सर्व तऱ्हेची म्हणजे शैक्षणिक, शारीरिक, मानसिक व युद्धसामुग्री, फौजफाटा, व्यापार इत्यादि सर्व बाबतींत त्या राष्ट्रांची हरतऱ्हेनें बरोबरी करील असें जाहीर केलें. या जाहीरनाम्याप्रमाणें लगेच अंमल सुरू झाला. कायदा, व्यापारी तत्त्वें, कामधंदे इत्यादि शिकण्याकरतां जपानांतील हुषार हुषार विद्यार्थी त्या त्या गोष्टींत नांवाजलेल्या देशांत सरकारी विद्यार्थी म्हणून पाठविण्यांत आले. उदाहरणार्थ, जर्मनीकडून फौजफाटा, शस्त्रास्त्रें, शारीरिक आणि मानसिक उन्नति व प्रत्येक नागरिकास शंभर टक्के देशभक्त कसें बनवावें, इत्यादि गोष्टी जपाननें उचलण्याचें ठरविलें; फ्रान्सपासून कायदा व पाश्चात्य कला; इंग्लंडपासून आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरी व सुनियंत्रित राज्यकारभार आणि अमेरिकेपासून आधुनिक यांत्रिक प्रगति करण्याची विद्या शिकावयाची अशी योजना आंखून त्याप्रमाणें प्रत्येक राष्ट्राचे गुण तेवढे आत्मसात् करण्याचें व अवगुण सोडून देण्याचें ठरविलें. आणि त्यांतही हें तत्त्व नुसतें लहान मुलांच्या पुस्तकांत राहूं न देतां तें राष्ट्रीय जीवनाच्या विकासाला जुंपलें.

याप्रमाणें त्या त्या शाखांत पारंगत असलेल्या राष्ट्रांत आपले शेंकडो-वारी कच पाठवून जपानी लोकांनीं आधुनिक प्रगतीच्या संजीवनीनें शिथिल पडत चाललेल्या राष्ट्रास पुनर्जीवित व सशक्त केलें. याशिवाय त्या त्या राष्ट्रांच्या तज्ज्ञांस जपानमध्यें आणवून त्यांच्याकडून स्वतःच्या लोकांस त्यांनीं

सर्व शास्त्रें, उद्योगधंदे, कला इत्यादींत तरबेज करवून घेतलें. अमुक एक गोष्ट जपानमध्यें तयार होत नाहीं अशा आक्षेपास त्यांनीं जागाच ठेविली नाहीं. उलट जपानचें हवामान किंवा इतर नैसर्गिक गोष्टी एखाद्या धंद्यास अनुकूल नसल्या तरी त्या कृत्रिम रीतीनें उत्पन्न करून त्यांनीं तो धंदाही भरभराटीस आणला आणि परदेशांतील बाजारपेठा काबीज केल्या. याचें उदाहरण म्हणजे – जपानमध्यें दूधदुभतें हें बहुधा दुर्मिळच असतें. सामान्य जपानी माणसाला, दही हा पदार्थ काय असतो ? तो कसा करितात ? कशाशीं खातात हें अगदीं अक्षरशः माहीत नसतें तरीपण राष्ट्रीय प्रगतीच्या परिपूर्णतेच्या दृष्टीनें जपाननें गाईच्या आटीव दुधाचे बंद डबे इंग्लंड-अमेरिकासारख्या देशांतही स्वस्त दरानें विकावयास कमी केलें नाहीं. आपल्यास सामान्य वाटणाऱ्या या गोष्टीचें प्रत्यंतर मला बँकॉकमध्यें लेफ्टनंट कुनीझगाशीं बोलतांना आलें. एकदां तो मला भेटावयास म्हणून आला असतांना मी जेवीत होतों. तो जेवून आला होता म्हणून " दही तरी घे " असा मी त्यास आग्रह केला. चमच्यानें दही चाखीत व मिटक्या मारीत तो म्हणाला " आँ ! कोरेवा नान् देस्का ? " (हें काय आहे ?)

मी म्हटलें "कोरेनो नामाएवा दही देस्. " (याचें नांव दही आहे.)

" सो देस्का ! ताईहेन योरोशि देस्ने." (असं का–फार छान आहे, नाहीं !) ले. कुनीझगा उद्गारला.

तेव्हां, रेशमी, सुती व गरम कापड, कांचेच्या वस्तू, चीनी मातीच्या वस्तू, दूध आणि लोण्याचे डबे, रंग, खेळणीं, वगैरे लहानमोठ्या सर्व बाबतींत इतर पाश्चात्य देशांशीं स्पर्धा करण्याचा जपाननें चंग बांधून तो तडीसही नेला. त्याबरोबरच तोफा, बंदुका, लढाऊ जहाजें, विमानें, रणगाडे, मोटारी वगैरे रणसाहित्यही उत्पादण्यास त्यांनीं सुरुवात केली. मात्र याबद्दल त्यांनीं या कानाचें त्या कानाला कळूं दिलें नाहीं ! हें गुपित त्यांनीं परकीयांना कळूं दिलें नाहीं एवढेंच नव्हे तर सर्वसामान्य स्वकीयांसही त्याचा थांगपत्ता लागूं दिला नाहीं. फौजी व इतर युद्धखात्यांच्या कांहीं शेलक्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसच फक्त हे कारखाने जपानमध्यें कोणकोणत्या ठिकाणीं आहेत तें माहीत होतें. पूर्व एशियांत जपान युद्ध सुरू करणार अशी जेव्हां दाट अफवा होती तेव्हां एका पढतमूर्ख गोऱ्या ब्रिटिश फौजी अधिकाऱ्यानें छाती ठोकून सांगितलें कीं ' जपान्यांजवळ १९११ सालचीं आमच्याकडून घेतलेलीं दोनचार जुनीं विमानें आहेत व त्यानंतर १९१४–१९१८ चे महायुद्धांत मोडतोड झालेलींही कांहीं विमानें आहेत. परंतु केवळ एका होतकरू व उद्योन्मुख अशा या लहान पौर्वात्य राष्ट्रास वाटणाऱ्या कुतूहलाचें शमन करण्यापलीकडे त्यास त्यांतून अधिक काय निष्पन्न होणार ! ' अशा तऱ्हेनें संपूर्ण गुप्तता राखून, पाश्चात्य राष्ट्रांच्या डोळ्यांत धूळ फेंकून जपाननें आपल्या राष्ट्रीय आकांक्षा पूर्ण करण्याच्या तयारीनें एकेक पाऊल पुढें टाकलें. द्रोणाचार्यांनीं शिक्षण देण्याचें नाकारतांच

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रमांक 21332 दि: 31/12/58
क्रमांक 6402 नों दि: 27/9/56



एकलव्यानें ज्याप्रमाणें त्यांची प्रतिमा करून निस्सीम भक्तीनें धनुर्विद्येंत प्राविण्य मिळविलें तद्वतच जपाननेंदेखील उघड रीतीनें जें शक्य नव्हतें तें निश्चयाच्या बळानें व परकीयांच्याच अप्रत्यक्ष मदतीनें आणि उदाहरणानें साध्य करून घेतलें. अर्थात्, पाश्चात्यांनीं जुनींपुराणीं म्हणून टाकून दिलेलीं विमानें व इतर यंत्रसामुग्री मिळेल तशी जपाननें आणवून त्याच्यांतील तत्त्व शिकून घेऊन त्यांत स्वतःच्या अक्कलहुषारीनें सुधारणा घडवून आणून एक जबरदस्त युद्धबल निर्माण केलें.

आपली तयारी कोठवर झाली आहे याचा पडताळा बघण्याकरतां म्हणून त्यांनीं १९०४ सालीं रशियाविरुद्ध युद्ध पुकारलें आणि १९०५ मध्यें रशियाचा पराभव केला. यांत जपानच्या फौजेनें व आरमारानें आपली कार्यक्षमता सिद्ध केली. या युद्धांत ॲडमिरल टोगोचें प्रसिद्धी पावलेलें जहाज आतां जपानमध्यें ऐतिहासिक वस्तूंच्या संग्रहालयांत एक प्रेक्षणीय वस्तू व राष्ट्रीय अभिमानाची स्मृति म्हणून कायमचें ठेवण्यांत आलेलें आहे.

यांत्रिक युगांतील शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज झालेल्या पाश्चात्य राष्ट्रांनीं शेंकडों वर्षांपासून एशियाई राष्ट्रांस गुलाम केलें होतें. त्यामुळें पारतंत्र्याच्या अंधकारापलीकडे कांहीं दिसत नसलेल्या एशियाई राष्ट्रांची वृत्ति हतबल व उदासीन बनलेली होती. जपानच्या या विजयामुळें, पाश्चिमात्य राष्ट्रांस चीत करणें अशक्य कोटींतील गोष्ट नाहीं व आपणासही पाश्चात्य राष्ट्रांच्या गुलामीचें जूं झुगारून स्वातंत्र्य परत मिळविणें शक्य आहे असा आशेचा किरण सर्व पौर्वात्य राष्ट्रांस दिसूं लागला. यानंतर १९३२ मध्यें जपाननें चीनशीं लढाई सुरू केली. ही लढाई, जपानचा गेल्या महायुद्धांत पाडाव होईपर्यंत म्हणजे दहाबारा वर्षें चालू होती. जपानी फौजेची प्रत्येक तुकडी चीनी आघाडीवर युद्धाचें प्रत्यक्ष शिक्षण घेऊन तयार झाली होती. अशा रीतीनें चीनी समरभूमि ही जपानी सैनिकाच्या शिक्षणक्रमांतील एक महत्त्वाची पायरी होती.

आतां, जपाननें गेल्या रणकुंडांत उडी घेण्याची तयारी कशी व कधीं केली हें आपण बघूं या. जपानी राष्ट्र हें एक कुटुंब असून सम्राट हा पिता आणि दहा कोटी प्रजा ही त्याचीं मुलें अशी प्रत्येक जपान्याची लहाणपणापासून मनोभूमिका तयार झालेली असते. या एका विशिष्ट मनोभूमिकेस अनुसरूनच प्रत्येक कचेरींतील पट्टेवाल्यापासून तों सरन्यायाधीश अथवा मंत्री येथपर्यंत निरनिराळे अधिकारी वा सामान्य कामकरी आठवड्यांतून एक किंवा आधिक दिवस राजवाड्यांतील गवत कापणें, साफसफाई करणें, सार्वजनिक रस्ता बांधण्यासाठीं मजुरी करणें इत्यादि कामें अगदीं आपुलकीनें, मुळींच कमीपणा न मानतां घरांतल्या कामासारखीं करितात. अगदीं प्राथमिक शाळांपासून तों उच्चतम विद्यालयांपर्यंत शिकणारीं मुलेंसुद्धां अशा प्रकारें सार्वजनिक बागांत

काम करण्यास जातात. सैनिक हे राष्ट्राकरतां आत्माहुति देणारे असल्यामुळें ते इतरांपेक्षां विशेष आदरास पात्र समजले जातात. सर्व राष्ट्र एक ही भावना असल्यामुळें व जगांतील इतर सर्व राष्ट्रांत अग्रेसरत्व मिळविण्याचा जपानचा निश्चय झाल्यामुळें सर्व नागरिकांनीं आत्यंतिक कष्ट सोसून जपानी राष्ट्र ऊर्जितावस्थेस आणलें पाहिजे ही मतप्रणालि रूढ झाली. जपानची भूमि अगदीं अरुंद, त्यांत अनेक बेटें आणि खाड्या, खडकाळ जमीन आणि लोकसंख्येचें प्रमाण तर झपाट्यानें वाढत होतें. सांपडेल तेथें, म्हणजे रस्त्यालगत, मोठ्या मैदानांत टेंकड्यांवर, कोठेंही दोन चार फूट जरी जागा दिसली तरी तेथें भात-भाजी इत्यादि लावणें हें प्रत्येक जपान्याचें कर्तव्य आहे अशी प्रत्येकास शिकवण दिली गेली व त्याप्रमाणें जारीनें सगळ्यांनीं होती नव्हती तेवढी जमीन पेरून टाकली. भात आणि मासे हा त्यांचा मुख्य आहार. आपल्यासारखे ऐषआराम आणि पौष्टिक खाद्यपदार्थ त्यांस मानवत नाहींत असें नाहीं; परंतु ते परवडतच नव्हते त्याला ते काय करणार ? स्वतःस लागणारें धान्य, लोखंड, टीन, रबर, कांतडीं इत्यादि महत्त्वाचा सर्व कच्चा माल भरमसाट किंमत देऊन इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, हॉलंडसारख्या पाश्चात्य राष्ट्रांनीं व्यापलेल्या आशिया खंडाच्या प्रदेशांतून त्यांस घ्यावा लागे. बरें, पगाराचें मान अगदीं कमी करून, नाना तऱ्हेचे काबाडकष्ट सहन करून, पोटास चिमटा घेऊन या कच्च्या मालापासून निरनिराळ्या वस्तू स्वस्त तयार करून जगाच्या बाजारपेठांतून विकावयास जावें तों तेथें पुन्हा पाश्चात्य राष्ट्रांच्या चौपट पांचपट जकातीचा खोडा. अशा रीतीनें जपानची अगदीं पूर्ण मुस्कटदाबी झालेली होती व याला उपाय एकच आणि तो म्हणजे ( साम्राज्य मिळालें तर उत्तमच, नाहींतर ) निदान पाश्चात्य राष्ट्रांना आशियांतून घालवून एशियाई राष्ट्रांबरोबर परस्पर हितकर असे करार करणें. म्हणजे केवळ साम्राज्यशाहीच्या गुर्मींत जे कच्चा मालही महाग विकणार व पक्क्या मालावरही बेसुमार जकात बसविणार अशांच्याकडून जपानची नागवणूक थांबली असती. भांडवलदार ज्याप्रमाणें शेअरबाजारांत अथवा अन्य ठिकाणीं एकमेकांस मदत करून आणि निरनिराळीं कारस्थानें करून एखाद्या बिनभांडवली उमेदवाराचा टिकाव लागूं देत नाहींत व त्याचा तेथें शिरकावही होऊं देत नाहींत त्याप्रमाणें इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका, हॉलंड इत्यादि देश चीनसारख्या अर्धगुलाम राष्ट्रांस जपान्यांस मदत करूं देत नसत. त्या दोघांचें परस्परांत नेहमीं भांडणच राहावें हा त्यांचा उद्देश त्यांनीं तडीस नेला. अशा तऱ्हेनें कोंडमारा होत असल्यामुळें युद्ध पुकारण्याशिवाय जपानला दुसरा तरणोपायच नव्हता. हा एकमेव मार्ग पाहून जनरल टोयामा व इतर वयोवृद्ध जपानी मुत्सद्दी यांनीं जपानी राष्ट्रांस युद्धक्षम करण्याचें ठरविलें. प्रत्येक जपानी स्त्री-पुरुषानें जास्तींत जास्त श्रम करून कमींत कमी वेतन स्वीकारावें असा पायंडा घालण्यांत आला. नव्हे, त्यांच्यांत स्वार्थत्यागाची चुरस लागली. अशा तऱ्हेनें राष्ट्राची उत्पादन

शक्ति जास्तींत जास्त वाढवून आणि राष्ट्राचा जीवनखर्च कमींत कमी करून बचत केलेल्या राष्ट्रसंपत्तींतून जपाननें अन्नधान्य, यंत्रसामुग्री आणि शस्त्रास्त्रें तयार करण्याकरतां लोखंड, कापूस, कातडीं इत्यादि युद्धास आवश्यक अशा वस्तूंचा सांठा बरीच वर्षें अत्यंत धीरगंभीरपणें व दूरदृष्टि ठेवून तयार केला. पतीच्या पश्चात् एखाद्या असाहाय्य विधवेनें नाना तऱ्हेचे हाल सोसून आपल्या मुलांस वाढवावें व त्यांच्या उर्जितकालाकडे डोळे लावून बसावें अशांतलाच प्रकार होता तो ! अशा तऱ्हेनें इ. स. १९३९ सालीं युरोपमध्यें युद्ध सुरू झालें त्या वेळेस जपानची, ५-६ वर्षें इंग्रज आणि अमेरिकन यांच्याशीं लढतां येईल इतकी युद्धसामुग्रीची बेगमी झालेली होती. युद्धांत पडावयास सबळ कारण आणि पुरेशी तयारी असा योग जुळून आल्यावर आतां फक्त योग्य संधीची आवश्यकता होती. युरोपमध्यें युद्ध सुरू होणें हीच आखाड्यांत उतरण्याची योग्य संधि अशी खूणगांठ जपान्यांनीं बांधून ठेविली व जगत्पटाच्या बदलत्या रंगाकडे ते डोळे लावून बसले.' इ. स. १९४० च्या जूनमध्यें फ्रान्सचा पाडाव झाल्याबरोबर जपाननें एक पाऊल पुढें टाकलें. पूर्वेंत इंडोचायना हा फ्रेंच सत्तेखालचा प्रदेश आहे. 'त्याच्या संरक्षणार्थ आपण इतरांबरोबर सहकार्य करावयास तयार आहों व शिवाय चीनसारख्या जपानच्या शत्रुराष्ट्रांस इंडो-चायनामधून यापुढें मदत मिळूं नये म्हणून आम्हांला काळजी घेतली पाहिजे ' अशा मिषानें इ. स १९४० च्या जुलै महिन्यांत जपाननें आपले कांहीं अधि-कारी इंडोचायनांत हॅनॉय, सायगॉन इत्यादि प्रमुख ठिकाणीं ठेविले. यामुळें चंचुप्रवेशहीं झाला; किती मऊ आहे, किती खणतां येईल हेंही कळलें व या अधिकाऱ्यांच्या तर्फे तेथील फ्रेंच सैन्याची तटबंदीची आणि त्याच्या एकंदर प्रतिकारक्षमतेबद्दलची बित्तंबातमीही मिळाली असा तिहेरी उद्देश साधला. लगेच पुढच्याच महिन्यांत म्हणजे ऑगस्टमध्यें त्यांनीं फॉर्मोसा ( जपानच्या अंमला-खालील त्यांच्या देशाच्या दक्षिणेस असलेलें बेट ) व हैनान ( चीनच्या भूमी-जवळील बेट ) येथें आपलें आरमार आणि सैन्य जमवून इंडोचायनाच्या रोखानें पाठवून दिलें. या सैन्यास मित्रत्वाच्या नात्यानें प्रवेश मिळूं देण्याचा अवघ्या बारा तास मुदतीचा एक निर्वाणीचा खलिता फ्रेंच गव्हर्नर जॉन डक्कू यांस जपानी अधिकाऱ्यांनीं सादर केला. पण तो मान्य करण्यांत तो फ्रेंच गव्हर्नर टोलवाटोलव करूं लागला तेव्हां जपानी सैन्य सरळ इंडोचायनांत उत-रून मार्ग क्रमूं लागलें व हॅनॉय या इंडोचायनाच्या राजधानीच्या शहरावर एक दोन तोफा डागण्यांत आल्या. ताबडतोब फ्रेंच गव्हर्नरानें प्रतिकार कर-ण्याचें सोडून देऊन ' स्वागतम् ' अशी घोषणा केली. त्यानंतर इंडोचायनांत सायगॉन व इतर महत्त्वाच्या ठिकाणीं जपाननें आपले आरमारी व हवाई तळ स्थापिले, सैन्याचीं शिबिरें तयार केलीं व मित्रत्वाचा करार करून युद्धसाहित्य जमविण्यास सुरुवात केली. अमेरिका व इंग्लंड यांच्याविरुद्ध जपानला जें युद्ध

पुकारावयाचें होतें त्यांत ही एक महत्त्वाची पायरी होती; कारण जपानपासून फिलीपीन्स, मलाया किंवा जाव्हा-सुमात्रादि बेटांवर आक्रमण करण्यास इंडोचायना अर्ध्या वाटेवर होता हा एक फायदा. येथून विमानानें बाँब-हल्ले करणें, बोटीनें रसद पोंचविणें, सैन्य उतरविणें हें अधिक सुकर होतें. परंतु दुसरी तितकीच महत्त्वाची गोष्ट म्हणजे फ्रेंच हेसुद्धां गोरेच व 'पाण्यापेक्षां रक्त घट्ट असतें' या न्यायानें जपाननें इंग्लंड-अमेरिकेविरुद्ध युद्ध पुकारल्यावर इंडोचायनांत जर फ्रेंच लोकांची सत्ता अनिर्बंध चालू राहिली असती तर त्यांनीं खात्रीनें तटस्थ राहण्याचें सोडून इंग्लंड-अमेरिकेस मदत केली असती अथवा त्यांस आश्रय दिला असता. इंग्लंड-अमेरिकेनेंही, त्यांची इच्छा असो वा नसो, जपानवर मारा करण्याकरतां जवळचें ठिकाण म्हणून इंडोचायनांत आपले स्थळ स्थापिले असते. हिटलरनें हॉलंड, बेल्जियम, फ्रान्स इत्यादींवर आक्रमण केलें तेंही केवळ साम्राज्यतृष्णेनें नव्हे तर, एकदां युद्धाला तोंड फुटलें म्हणजे शत्रूच्या व आपल्यामधील अंतर झपाट्यानें कापीत जाऊन थेट शत्रूच्या बालेकिल्ल्याला धडक द्यावीच लागते या सिद्धान्ताला अनुसरून! हें तंत्र आपण अवलंबिलें नाहीं आणि सत्य, न्याय, अहिंसा, मानवता, इत्यादि पोकळ कल्पनांच्या आहारीं जाऊन 'आ' वासून शत्रू येण्याची वाट बघत राहिलों तर आपण जें करावयाचें टाळलें तेंच, लहान राष्ट्रावरील आक्रमण शत्रु करितो; आपल्याजवळ येतो व थोड्याच दिवसांत आपलाही फन्ना पाडतो. एकूण जें होऊं नये असें आपल्यास वाटतें तें आपल्याकडून नाहीं झालें तर शत्रूकडून होतें. तेव्हां एखाद्या निर्दय, दुष्ट, कावेबाज आणि गोडबोल्या शत्रूच्या आक्रमणानें लहान देश चिरडून पुन्हा आपल्या न्याय्य बाजूसही धोका उत्पन्न करूं देण्यापेक्षां आपण तितकेच सारासारविचारी असलों किंवा 'सकलमानवजातिहितदक्ष' असलों तर आपणच आक्रमण करण्याची जबाबदारी सर्वस्वीं आपल्यावर घेऊन इतरांस शक्यतों कमी जांचक होईल अशी सर्व प्रकारची खबरदारी घेऊन स्वार्थ आणि परमार्थ दोन्ही साधावा हें उत्तम! एवढें साधें तत्त्व न समजतां आणि इंग्रज हे आपले, शकुनीच्या पंक्तींतील शत्रु आहेत असें इकडे तोंडानें म्हणत असतां देखील आपण त्यांचा प्रचार हें वेदवाक्य मानून प्रत्येक बाबतींत त्यांचीच री ओढावी हें खरोखर आपल्या रोमारोमांत भरलेल्या गुलामी वृत्तीचेंच द्योतक आहे असें दुर्दैवानें म्हणावें लागतें. केवळ इंग्रज एखादी गोष्ट प्रतिपादन करितात म्हणूनच ती साफ खोटी असली पाहिजे असें ज्या दिवशीं आपण म्हणावयास लागूं तो दिवस महद्भाग्याचा! कडव्या राष्ट्रीय वृत्तीचे जपानी आणि जर्मन यांसारखे लोक स्वकीयांशिवाय कोणावरच विश्वास ठेवीत नाहींत– मग तो बोलून चालून शत्रुच असला तर विचारावयासच नको. आपण मात्र नेपोलियन यास साम्राज्यतृष्णा होती म्हणून तो नालायक, हिटलर हा राक्षसी वृत्तीचा सैतान असे भराभर शेरे मारतों. कारण? कारण एकच–हे

इंग्रजांच्या प्रचारचरणांचे अमृतबिंदु म्हणून स्वतःचा मेंदू त्यांत आपण न्हाववून घेतों. इतरांबद्दल आम्हांस कांहींच ठाऊक नाहीं, इंग्रजांना मात्र आम्ही पूर्ण ओळखून आहोंत ही खरी वृत्ति असावयाला पाहिजे.

शेजारच्या शेजारीं एकापासून दुसऱ्याला अशी तोंडोतोंडीं बातमी पसरली तर जेथें राईचा पर्वत होतो तेथें प्रत्यक्ष शत्रु म्हणविणारे आणि स्वतः एक अत्यंत खोडसाळ व अजस्र असें कुटिल नीतीचें प्रचारतंत्र असलेलें राष्ट्र जीं विधानें करीत असेल त्यांत सत्याचा लवलेश तरी असेल का याचा हिंदुस्थानांतील जनतेनें स्वतःशीं विचार करावयास हवा होता. एकाकाळचे हिंदुस्थानच्या राष्ट्रसभेचे सर्वमान्य अध्यक्ष असलेले नेताजी सुभाषचंद्र बोस हे जपान्यांस जाऊन मिळाले असें इंग्रजांनीं म्हणतांच प्रत्यक्ष त्यांच्या सहकाऱ्यांनीं अप्रत्यक्षपणें इंग्रजांचे हस्तक बनून नेताजी सुभाषचंद्रांस सशस्त्र प्रतिकार करण्याची घोषणा करावी ही मानसिक गुलामगिरी नव्हे का ? निकटच्या अशा जहाल देशभक्ताविरुद्ध शत्रूनें कंड्या उठविल्या तर शत्रूवर विश्वास ठेवावा हें कोणत्या तर्कशास्त्रास धरून आहे ?

अर्थात् इंडोचायना जपाननें आपल्या ताब्यांत घेतला. यांत शुद्ध युद्धनीति होती. येथून जपानला समरभूमि जवळ होती एवढेंच नव्हे तर त्यास तेथून समरभूमीचें विहंगमावलोकनही करणें शक्य झालें. अशा रीतीनें तयारी झाल्यावर जपाननें ८ डिसेंबर १९४१ रोजीं अमेरिकेविरुद्ध युद्ध सुरू केलें. लगेच इंग्लंडनें जपानविरुद्ध युद्धाची घोषणा केली आणि त्यामुळें एका बाजूला जपान, जर्मनी आणि इटली व दुसरे बाजूला इंग्लंड, अमेरिका व रशिया असे गट पडले. मात्र ऑगस्ट १९४५ पर्यंत जपान व रशिया यांचे सलोख्याचे संबंध होते. हिंदुस्थानाच्या दुसऱ्या स्वातंत्र्ययुद्धाचा इतिहास सुरू करावयाचा सोडून हें पाल्हाळ कशाला लाविलें असें कित्येकांस वाटण्याचा संभव आहे. परंतु या स्वातंत्र्ययुद्धाचा ज्या दूरपूर्वेच्या युद्धांतून उगम झाला त्याची पूर्वपीठिका समजल्याशिवाय व जपान्यांच्या सहकार्याची भूमिका उमगल्याशिवाय आपल्या या स्वातंत्र्ययुद्धाची यथार्थ कल्पना येणें शक्य नाहीं. म्हणून जरा विस्तार झाला तरी हरकत नाहीं, परंतु प्रस्तुतचा विषय सुस्पष्ट करण्याच्या हेतूनें ती हकीगत येथें दिली आहे. एरवींसुद्धां हिऱ्याला चमकण्यासाठीं कोंदणाची व चित्र उठावदार दिसावयाला पार्श्वभूमीची जरूर असतेच हें ध्यानांत घेतलें पाहिजे.

## दूरपूर्वेंत युद्ध पेटलें : २

इ. स. १९४१ चा डिसेंबर महिना सुरू झाला. जर्मनीची सगळीकडे सरशी होत होती. जपानचे अमेरिकेंतील वकील आणि मुद्दाम वाटाघाटीसाठीं धाडलेले दूत अशा दोघांची म्हणजे कुरूसु आणि नोयामा यांची जोडगोळी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट यांच्याशीं सामोपचारानें तडजोडीचा मार्ग शक्य आहे का हें बघण्यांत गुंतले होते अमेरिकेनें जपानच्या या सामोपचारी वाटाघाटींमुळें जपानच्या युद्धसामर्थ्याबद्दल गैरसमज करून घेऊन ताठर वृत्ति धारण केली, एवढेंच नव्हे तर जपानविरुद्ध कडक उपाययोजना सुरू केली. डिसेंबर महिन्याच्या ५ व ६ तारखेस जपानच्या निरनिराळ्या हवाई, फौजी आणि आरमारी तळांवर कांहीं विशिष्ट निकडीच्या हालचाली सुरू झाल्या. शिपायांनीं भरलेलीं जहाजें दक्षिणेकडे निघालीं. कोणी हूं का चूं केलें नाहीं. परदेशी वार्ताहरांस यदाकदाचित या हालचालींची बातमी लागलीच आणि या हालचालीबद्दल त्यांनीं कोणा जपानी अधिकाऱ्यांस विचारिलें तर 'माहीत नाहीं' एवढेंच म्हणत. कोणत्याही गोष्टीबद्दल पूर्ण मौन धारण करण्यांत जपानी लोक फारच प्रसिद्ध आहेत. महत्त्वाच्या गुप्तता राखण्याचा गुण हा सर्व जपान्यांनीं व विशेषतः त्यांच्या सैनिकांनीं पूर्णत्वानें आत्मसात् केलेला आहे. ही साधना त्यांच्या राष्ट्रीय शिक्षणाच्या अत्युत्कर्षाचें द्योतक होय. एखाद्या अपरिचित माणसानें कोणत्याही जपानी अधिकाऱ्यास नुसतें त्याचें नांव जरी विचारिलें तरी तो जपानी अधिकारी त्या माणसाकडे कावऱ्याबावऱ्या आणि संशयी नजरेनें बघत असे. याच्या उलट हिंदुस्थानी लोक फारच उथळ व बोलके. उगीच भडाभड बोलत सुटतील. नेताजी सुभाषचंद्र बोस हे नेहमीं म्हणत कीं हिंदुस्थानी माणसाला एकादी गोष्ट गुप्त राखणें फार जड जातें. दुसऱ्याचें गुपित आपल्याला कळावें म्हणून ते चांभारचवकशा तरी करतील किंवा आपण फार मोठे आहोंत आणि आपल्याला इतरांस माहीत नसलेल्या कित्येक गुप्त गोष्टी माहीत आहेत असा आव आणून ते भराभर बोलूं नये त्या गोष्टी बोलतील. ('हिंदुस्थानी' या शब्दाचा अर्थ 'उत्तर हिंदुस्थानी' असा मी घेत नसून हिंदुस्थानाचा म्हणजे भारतवर्षाचा रहिवाशी तो हिंदुस्थानी अशा अर्थानेंच मी तो येथें वापरला आहे.) जपानी फौजेंत व इंग्रजी फौजेंत महत्त्वाच्या गुप्त बाबतींत असा एक महत्त्वाचा फरक आहे कीं इंग्रजी फौजेंत एकाद्या शिपायाकरवीं जर कांहीं गुप्त कामगिरी करावयाची असेल तर त्याच्या तुकडीच्या वरिष्ठ

कचेरीच्या मुख्य अधिकाऱ्यापासून तो थेट शिपायापर्यंतच्या श्रेणींतील यच्च-यावत उच्चनीच अधिकाऱ्यांतर्फे ती कामगिरी करण्याबाबतचा हुकूम शिपायास मिळेल. असें केलें नाहीं तर मधल्या अधिकाऱ्यांस आपला अपमान झाल्यासारखें वाटेल. ही 'प्रॉपर चॅनल' म्हणजे ठरीव चाकोरीची पद्धत एखादे वेळेस यदा-कदाचित् मधल्या उच्चनीच अधिकाऱ्यांची उपेक्षा करून एकाद्या स्वैरवर्तनी वरिष्ठानें नवीन प्रथा पाडून परस्पर शिपायालाच ती कामगिरी कळविली तर मधले अधिकारी त्यांत आपला भयंकर अपमान समजून त्या शिपायास धाक-दपटशा दाखवून त्याच्या कामगिरीची माहिती काढून घेतील. अर्थात् इंग्रजी तंत्रानें शिकलेल्या हिंदी फौजी अधिकाऱ्यांतही हा स्वभावविशेष हटकून सांपडतो. याच्या उलट जपानी फौजेंत गुप्त कामगिरीबद्दल हुकूम सोडणारा आणि ती कामगिरी पार पाडणारा याशिवाय तिसऱ्या कोणालाही ती गोष्ट प्रथम कळत नाहीं. ही प्रथाच पडल्यामुळें अर्थातच मधले अधिकारी ह्याबद्दल चौकसवृत्तिही दाखवीत नाहींत. आपल्या अत्यंत विश्वासू मित्राजवळ अथवा जन्मदात्या मातापितरांजवळसुद्धां जपानी कधींही आपल्या गुप्त कामगिरीचा गौप्यस्फोट करणार नाहीं.

★

इ. स. १९४१ डिसेंबर महिन्याच्या ८ तारखेची मोष्ट. पहांटे चार वाजण्याचा सुमार होता. सिंगापुरच्या छावणींत मी साखर झोंपेंत गुंग होतों. मांझ्या कांहीं मित्रांनीं माझ्या खोलीशीं येऊन जोरजोरानें कडी वाजवून मोठ-मोठ्यानें माझ्या नांवानें हांका मारावयास सुरुवात केली. मी उठलों. आज काय या सर्वांच्या अंगांत भूत आलें आहे असें मला क्षणभरच वाटलें, परंतु दुसऱ्याच क्षणीं मला जिकडे तिकडे आरडाओरडा, धांवपळ, दारें उघडून जोरानें लोटून दिल्याचे आवाज, जिन्यावरून पावलांचा झपझप आवाज इत्यादि गडबड ऐकूं येऊं लागली. मी झटकन् अंगांत सदरा घालून बाहेर आलों. माझ्या खोलीच्या बाहेर बरीच मंडळी जमून उत्तरेच्या दिशेला आकाशाकडे बघत होती. मीही त्या गर्दींत मिसळलों आणि त्या दिशेनें बघूं लागलों. दूर, म्हणजे आमच्या-पासून सुमारें पांच-सहा मैल अंतराच्या क्षितिजावर आठ दहा विमानें घारींसारखीं घिरट्या घालीत आणि घोंघावत आगीचे जळते गोळे खालीं टाकीत होतीं. हेच ते बॉम्ब ! आमच्या आयुष्यांत या अस्त्राचें तें पहिलेंच दर्शन आम्हांला घडलें व हेंच दूरपूर्वेतील पुढील साडेतीन वर्षांच्या रणकंदनाचें सूतोवाच ठरलें ! त्या बाजूचें क्षितिज तेजाळ झालेलें होतें. परंतु युद्ध असें अचानकपणें सुरू होईल हें आमच्या ध्यानींमनींही नसल्यामुळें आणि तीं विमानेंही आमच्यापासून दूर असल्यामुळें आम्ही आतषबाजी बघत असलेल्या बघ्या लोकांच्या कुतूहलानें त्या दृश्याकडे बघत होतों. ब्रिटिश हवाईदलाचें लुटुपटीच्या लढाईचें प्रात्य-

क्षिक चाललें असावें असा आमचा समज झाला. सुमारें अर्ध्यातासानें तीं विमानें अदृश्य झालीं. आम्हीही दिवाळींत किंवा वरातींत चांगलें दारूकाम बघावयास मिळावें तसें हें नवें दृश्य काय असावें अशा विस्मयित मनोवृत्तींत पुनश्च ५ वाजतां झोंपीं गेलों. चांगलें उजाडल्यावर आम्ही आपापल्या नेहमींच्या उद्योगास लागलों. या वेळीं आम्ही ' रीइन्फोर्समेंट कँप ' मध्यें होतों.

' रीइन्फोर्समेंट कँप ' ही जवळ जवळ सैन्यांतील धर्मशाळाच असल्या-मुळें त्यांत राहणाऱ्या लोकांस स्टेशनवरील वेटिंगरूममध्यें तात्पुरतें वास्तव्य करणाऱ्या प्रवाश्याप्रमाणें विशेष कांहीं उद्योग नसतो. बदली किंवा नवीन नेमणूक झालेला माणूस आपल्या कामावर रुजू होण्याच्या अगोदर किंवा सुट्टीवर जाणारा माणूस बोटीची किंवा आगगाडीची सोय होईपर्यंत त्यास राहतां यावें एवढ्याकरतां ' रीइन्फोर्समेंट ग्रूप ' हें खातें निर्माण केलेलें असतें. अर्थात् धर्मशाळेंत ज्याप्रमाणें चौकीदार, कारभारी, फडणीस, कोठारी, स्वयंपाकी, भंगी इत्यादि लोक, त्या धर्मशाळेंत येणाऱ्या उतारूंची सोय बघण्याकरतां कायमचे ठेवलेले असतात त्याप्रमाणें ' रीइन्फोर्समेंट ग्रूप ' या फौजेंतील ' यूनिट ' अथवा खात्यास एक कॅप्टन किंवा मेजर अशा हुद्याचा वरिष्ठ अधिकारी कँप कमांडर म्हणजे कारभारी या नात्यानें नेमलेला असतो. त्याच्या हाताखालीं निरनिराळ्या हुद्याचे फौजी लोकच स्टोअरकीपर्स ( कोठारी ), अकाऊंटन्टस् ( फडणवीस ), क्लार्क्स ( कारकून ), कुक्स ( स्वयंपाकी ), स्वीपर्स ( भंगी ) वगैरे नेमलेले असतात. अशा तऱ्हेचा 'रीइन्फोर्समेंट ग्रूप' सिंगापूरच्या बियाधारी भागांत होता. सिंगापुरास हिंदुस्थानांतून बोटीनें येणाऱ्या फौजी माणसांस मलायांत कोठेंही आपापल्या तुकड्यांतून अथवा रस्त्यांतून कामावर रुजू होण्याच्या अगोदर या बियाधारी ' रीइन्फोर्समेंट कँप ' मध्यें राहावयाची पाळी येई, त्याप्रमाणें ती आमच्यावरही आली होती. १९४१ सालच्या नोव्हेंबर ३० तारखेला आम्ही तेथें पोंचलों. हा कँप रबराच्या दाट झाडींत होता. सिंगापुरांत व मलायांत चोहोंकडे शहरें आणि गांवें यांचीं आवारें सोडून इतर ठिकाणीं रबराचीं झाडें ओळीनें सुमारें दहा दहा फुटाच्या अंतरानें लावलेलीं असतात. एकाद्या विस्तीर्ण सभामंडपाच्या खांबांप्रमाणें कोणत्याही बाजूनें बघितलें तरी या झाडांच्या समांतर रांगा दृष्टीच्या दूरतम टप्प्यापर्यंत निमुळत्या होत गेलेल्या दिसतात. रबराचीं झाडें म्हटलीं म्हणजे सर्वसाधारण माणसें रबर या पदार्थावरून त्याच्या झाडाची कल्पना करण्याचा प्रयत्न करितात; परंतु अशी कल्पना चुकीची ठरते. या झाडाची अस्पष्ट कल्पना द्यावयाची म्हणजे आपल्याकडील जांभळाच्या झाडाच्यासारखें हें झाड असतें. हीं झाडें अशीं समांतर आणि विपुल लाविलीं म्हणजे त्यांची छाया इतकी दाट होते कीं त्यांत सूर्यप्रकाशसुद्धां शिरूं शिकत नाहीं. अशा रबराच्या झाडांची

लागवड केलेल्या जमिनीसच 'रबर एस्टेट' म्हणतात. अशा 'रबर एस्टेटस्'-मध्यें मंडपांत बसल्याप्रमाणें नेहमीं संध्याकाळच असल्यासारखें वाटतें.

बिद्याधारी हें मूळ संस्कृत 'विद्याधारी' नांव आहे. जोहोरबारू या मलायांतील संस्थानिकाच्या राजकुलांतील एका स्त्रीचें तें नांव असून तिचा अंत्यविधी या ठिकाणीं झाला म्हणून त्या स्मशानभूमीस बिद्याधारी हें नांव पडलेलें आहे. अर्थात् सिंगापूर बेट पूर्वीं जोहोर संस्थानाधिपतीचेंच होतें. त्यांजकडून इंग्रजांनीं तें विकत घेतलें. या स्मशानभूमीच्या पिछाडीस रबराच्या घनदाट मळ्यांत बिद्याधारी फौजी बराकी होत्या. वर झोपडीवजा ताडपत्रांचें अथवा पानापाचोळ्याचें छप्पर व इतर सामान संपूर्णपणें लांकडाचें असून, सुमारें ४० फूट लांब व १० फूट रुंद अशा या बराकी, वेगवेगळ्या वीस पंचवीस फुटांवर हिंदी लोकांसाठीं उभारलेल्या असत. येथून सुमारें अर्ध्या मैलावर गोऱ्यांचा कँप असे.

येथें आलेल्यास व धर्मशाळेंतल्याप्रमाणें वास्तव्य करणाऱ्यांस काम नसतें असें मात्र कोणी समजूं नये. काम असो नसो हिंदुस्थानी सैनिकांना हलक्या कामांत गुलामांप्रमाणें राबवून घ्यावयाचें व इंग्रज अधिकाऱ्यांनीं नुसता ऐटबाज पोषाख करून मोठ्या दिमाखानें सकाळीं एकदां फेरफटका करावयाचा ही हिंदी सैन्यांत इंग्रजी अंमलांत प्रथाच पडून गेलेली आहे. साहेब फेरफटक्यास आले म्हणजे सर्व ठाकठीक आहे असें नजरेस आलें तरी तें तसें मनांत समजणें अथवा बोलून दाखविणें म्हणजे स्वतःला कांहींच काम नसल्याची कबुली देण्यासारखें होतें म्हणून त्यानें निष्कारण न्यूनें काढावयाचीं, आपल्याला जास्त कळत असल्याचा व फौजेंतील शिस्तीबद्दल आणि टापटिपीबद्दल एकंदरीनें आपल्याला जास्त कळकळ असल्याचा आव आणून निरनिराळे हुकूम सोडावयाचे, आपल्या तपासणीचा एक लांबलचक अहवाल तयार करून त्यांत आपण सुचविलेल्या बारीकसारीक अदलाबदलीबद्दल प्रौढी मिरवून कारकुनास पांचसहा प्रती टंकलेखनास द्यावयाच्या आणि दुपारीं त्यावर सह्या करावयाच्या. सायंकाळीं बियर प्राशन करीत कामाचे डोंगरच्या डोंगर पार केल्याचा आविर्भाव आणून आष्कळबाष्कळ गप्पा मारावयाच्या व हाताखालच्या सर्व लोकांवर 'ढ' म्हणून टीका करावयाची हा इंग्रजी अधिकाऱ्यांनीं गुलामांशीं वर्तन करण्याचा घालून दिलेला कित्ता आपले हिंदुस्थानी अधिकारीही अगदीं तंतोतंत गिरवितांना पाहिलें म्हणजे वाईट वाटतें.

स्वतंत्र फौजेंत दिवसांतून पंचवीस तास काम असलें व अधिकारीही केवळ दिमाख दाखविण्याकरतां नसून सैनिकांच्या बरोबरीनें तितक्याच कळकळीनें काम करणारे असले तर कोणत्या शिपायाला काम करावेंसें वाटणार नाहीं? परंतु हिंदी सैन्यांत मात्र गोऱ्या अधिकाऱ्यांच्या चैनीखातर, अथवा सर्वसामान्य गोऱ्या फौजेच्या सोईखातर, किंवा गोराछाप काळ्या अधिकाऱ्यांच्या

लहरीकरतां, वा केवळ स्वस्थ बसूं न देण्यासाठींच यांना ताबडावयाचें हा एकच उद्देश मनांत धरून जेथें हिंदी सैनिकांना दिवसभर हमालीचीं निकृष्ट कामें दिलीं जातात आणि इतर सर्व बाबतींत पशूंप्रमाणें वागविलें जातें अशा परिस्थितींत कोणत्या फौजेंत असंतोष पसरणार नाहीं ?

असो, बिद्याधारी ' रीइन्फोर्समेंट कँप 'मध्यें अशीच परिस्थिति होती. नोव्हेंबर महिन्याच्या ३० तारखेपासूनच युद्ध सुरू होणार असल्याची दाट वदंता असल्यामुळें कोणत्याही कारणाकरतां कँप सोडून सिंगापूर शहरांत वा इतरत्र जाण्याची बंदी करण्यांत आली होती.

कँपपासून आठदहा मैलांवर सिंगापूर बेटांतच अलेक्झांड्रा नांवाचा त्या बेटाचा भाग आहे. तेथें एका मोठ्या पहाडांत खालच्या बाजूस सभोंवार शेंकडों गुहा खोदून त्या दगड व सीमेंट यांनीं उत्तम प्रकारें बांधून काढल्या आहेत. त्यांत सिंगापूर बेट पांच सहा वर्षें सहज लढवितां येईल इतका दारूगोळ्याचा सांठा केलेला होता. सभोंवार चौक्या, पहारे, लोखंडी पट्ट्यांचीं कुंपणें वगैरे कडेकोट बंदोबस्त असे. या आवाराचे आंत आगगाडीचा एक फाटासुद्धां घेतलेला आहे. ' रीइन्फोर्समेंट कँप ' मधील सैनिकांच्या शंभर-दोनशेंच्या टोळ्या मोटार लॉऱ्यांत बसवून येथें आठ तासांच्या ' फटीग-ड्यूटी 'करतां, म्हणजे दारूगोळ्याच्या पेट्या कोठारांतून मालगाडींत भरणें व मालगाडींतून कोठारांत किंवा लॉरींत भरणें अशा हमालीकरतां घेऊन जात.

या कँपमध्यें असतांनाच दीनानाथ व कांतीचंद्र झादू या दोन सुशिक्षित काश्मीरी बंधूंची व माझी ओळख झाली व पुढें आमचा स्नेह वाढला. त्यांपैकीं दीनानाथ हा इंग्रजी विषय घेऊन एम्. ए. झाला होता व त्याचा धाकटा भाऊ कांतीचंद्र हा बी.एस्सी. झालेला होता. निरनिराळ्या गोड भुलथापा मारून व कित्येक खोटीं आमिषें दाखवून ब्रिटिशांनीं असे कित्येक सुशिक्षित व उच्च दर्जाचे लोक हिंदी सैन्याच्या हीन व निकृष्ट जीवनांत अडकविले होते.

★

डिसेंबर महिन्याच्या ८ तारखेच्या पहांटेचें तें दृश्य बघून आम्ही पुन्हा झोंपीं गेलों व उठल्याबरोबर आपापल्या उद्योगास लागलों. असेल इंग्रजांचीच लुटुपुटीची लढाई असें वाटून आम्ही तिकडे कानाडोळा केला. एक तर जपानसारखें कमकुवत एशियाई राष्ट्र इंग्रजांच्या विरुद्ध लढाई तें काय पुकारणार ? काय छाती आहे ? अशी आपली आमची समजूत ! व शिवाय त्यांनीं युद्धघोषणेची अथवा स्वतःच्या युद्धतयारीची जाहिरातवजा घोषणा कधींच केली नव्हती. यापूर्वींही दोन चार दिवस अधूनमधून इंग्रजी तोफखान्याचा आकाशांत काल्पनिक विमानांवर खरोखरच भडिमार चालत असे. त्याचीच उलट बाजू म्हणजे हा लुटुपुटीचा विमानहल्ला असेल असा आमचा

समज झाला. परंतु ८-९ वाजतां गांवांतील आमच्या कँपमध्यें रोजचे येणारे दूधवाले, कंत्राटदार इत्यादि माणसें जेव्हां आलीं तेव्हां त्यांनीं गांवांत पांच सहा ठिकाणीं बॉंब पडल्याचें व इमारती कोसळून त्यांखालीं प्राणहानि झाल्याचें वृत्त सांगितलें. दुपारीं युद्ध सुरू झाल्याची कुजबूज सर्व सैनिकांत चालू झाली. सायंकाळीं ७ वाजतां रोजच्या शिरस्त्याप्रमाणें हजेरीला आणि कांहीं नवीन हुकूम ऐकावयास म्हणून सर्व सैनिक जेव्हां एका रांगेंत उभे राहिले तेव्हां मलायाच्या उत्तरेच्या सरहद्दीवर जपानी व हिंदी सैन्यांत कांहीं चकमकी घडल्याचें वृत्तही सांगण्यांत आलें.

आंतरराष्ट्रीय वाटाघाटींचा अंतर्पाट निघून दूरपूर्वेच्या युद्धाची जेव्हां घटी भरली तेव्हां युद्ध सुरू केल्याची पहिली सलामी म्हणून डिसेंबर महिन्याच्या ८ तारखेस, पहांटेच्या हवाई हल्ल्यांत जपानी विमानांनीं अक्षतांप्रमाणें पडतील तेथें बॉंब टाकले. या दिवशीं याच वेळेस दूरपूर्वेच्या प्रदेशांत कित्येक ठिकाणीं जपानी विमानांनीं हल्ले केले. त्यांपैकीं हवाई बेटावरील पर्ल हार्बरवर केलेला हल्ला हा फार महत्त्वाचा होता. अमेरिका खंडापासून तो फिलीपीन्स टापूपर्यंतच्या मधल्या टप्प्यावर हवाई हें बेट आहे व हाच अमेरिकेच्या प्रशांत महासागरा-(पॅसिफिक) मधील आरमाराचा मुख्य तळ आहे. या भागांत लढाई सुरू करावयाची तर या तळावरील अमेरिकन आरमार गारद करणें ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट होती. ती जपाननें पहिल्याच क्षणीं साध्य करून टाकली. असा अचानक छापा घातल्याबद्दल जपानवर त्याच्या शत्रु-राष्ट्रांचा बराच रोष झाला.

डिसेंबर महिन्याच्या ९ तारखेस दुपारीं एका टेहेळणी करणाऱ्या जपानी विमानानें जाव्हा बेटावरून आपली कामगिरी संपवून येतां येतां सिंगापूरस्थ इंग्रजी आरमाराचीं **प्रिन्स ऑफ वेल्स** व **रिपल्स** हीं दोन जहाजें मलायाच्या पूर्व किनाऱ्यावर एका खाडींतून युद्धाच्या रंगीत तालिमीकरतां खुल्या समुद्रांत येतांना टेहेळलीं. त्यानें लगेच सायगॉन येथील मध्यवर्ती युद्धकचेरीस ही बातमी बिनतारीनें कळविली. तेथून त्या वैमानिकास त्या जहाजांच्या पाळतीवर राहण्यास सांगून थोड्या वेळानें त्याची सुटका व्हावी म्हणून दुसरें विमान पाठविण्यांत आलें. अशा रीतीनें दुसरे दिवशींच्या सकाळपर्यंत त्यांनीं ती पाळत कायम ठेवून दुसरें दिवशीं अवघीं तीन विमानें 'समुद्रस्वामिनी' म्हणून गाजलेल्या ब्रिटनचीं तीं दोन जंगी जहाजें बुडविण्याच्या कामगिरीवर पाठविलीं.

१० तारखेस सकाळीं १० वाजतां ही संस्मरणीय लढाई सुरू झाली. या दोन्ही जहाजांवरील पांच सहा जंगी तोफांनीं आणि मशिनगन्सनीं त्या तीन विमानांच्या रोखानें फूत्कार करण्यास सुरुवात केली. आकाशांत घारीबारख्या घिरट्या घालणाऱ्या त्या तीन विमानांच्या भोंवतीं तोफांचे गोळे फुटून मातीच्या ढेकळांच्या आकाराचे काळ्याकुट्ट धुराचे बुडबुडे एकदम फुटावे तसें दृश्य या

वेळीं दिसत होतें. यामुळें त्वेष येऊनच कीं काय तीं विमानें एकामागून एक इकडे तिकडे घिरट्या घालीत त्या जहाजांवर जोराची झेंप घेऊन अगदीं त्या तोफांजवळून घोंघावत बॉम्बसचा व मशीनगन्सच्या गोळ्यांचा मारा करीत व पुनः वर निघून जात. खालून तोफांचा गडगडाट व वरून विमानांची ती भीषण घरघर यांत 'धडाड् धुम्' असे तोफांचे आवाज, टट्...टट्...टट्...टट्—टट्...टट्...टट...टट्—ठक ठक ठक असे मशीनगन्सचे कर्णकर्कश सूर, झेंप घेताना सूं...असा विमानांचा शब्द, बॉंबच्या माऱ्याचे धडाम्धुप् इत्यादि आवाज आलटून पालटून किंवा संमिश्रितपणें ऐकूं येऊं लागले. कांहीं बॉम्बस जहाजांच्या अजस्र बाजूंना चाटून या किंवा त्या बाजूला पाण्यांत पडूं लागले. जहाजांनीं शक्य तितकीं नागमोडी वळणें घेऊन बॉंबचा मारा चुकविण्याचा यत्न केला. इतक्यांत **प्रिन्स ऑफ वेल्स** या ध्वज-नौकेवर (फ्लॅगशिप) बरोबर मधोमध एक...दोन...तीन बॉम्बस पडून तिची कंबरच खचली. स्प्रिंगच्या झपाट्यांत सांपडून उंदराची ज्याप्रमाणें कंबर चिमटली जाते व उघड्या आणि विस्फारित नेत्रांनीं हालचाल करितां येत नाहीं व शब्दही फुटत नाहीं अशा स्थितींत तो स्तब्ध पडलेला असतो तशीच त्या जहाजाची स्थिति झाली. खलाश्यांनीं व नौसैनिकांनीं त्या जलसमाधीच्या तयारीस लागलेल्या जहाजाच्या धडावरून भराभर समुद्रांत उड्या मारावयास सुरुवात केली. या गडबडींत आपल्याकडे विमानांचें दुर्लक्ष झालें असें वाटून दुसऱ्या म्हणजे **रिपल्स** जहाजानें तेथून पोबारा करण्याचा प्रयत्न केला. वैमानिकांजवळील बॉम्बस संपत आले होते. दूर पळत चाललेल्या जहाजाचा पाठलाग करितां करितां पेट्रोलही संपण्याचा संभव. पेट्रोल संपल्यावर सावज तर हातून निसटून जावयाचेंच व शिवाय वैमानिकाला विमानासकट समुद्रांत बुडावयाची पाळी येणार ती निराळीच. त्या तीन विमानांच्या टोळीच्या मुख्यानें निर्धार केला. 'लढाई चालू झाल्यावर मरणाला काय भ्यावयाचें. मरण प्रत्येकाला ठेवलेलेंच आहे. आज नाहीं उद्यां!' त्या जपानी वैमानिकाच्या मनांत विचार आला. 'मग रुग्णशय्येवर मरण्यापेक्षां शरशय्येवर मेलेलें काय वाईट. शत्रूच्या एका जंगी जहाजापुढें व अखिल राष्ट्राच्या जयापजयापुढें एका देहाची काय किंमत!'

—त्यानें आपल्या विमानाचा वेग भरमसाट वाढविला आणि एक जोराची व अखेरची झेंप घेऊन जहाजाच्या भिंतीच्या मधोमध टक्कर दिली. विमानाचा पंखा जहाजाच्या कंबरेशीं टकरून जहाजाचें कंबरडें मोडलें. जपानी वैमानिकाच्या देहाच्या चिंधड्या उडाल्या व त्या **रिपल्स** जहाजानेंही जलसमाधी घेतली.

सिंगापूरस्थ इंग्रजांचें दूरपूर्वेंतील आरमार या दोन मुख्य जहाजांच्या जलसमाधीमुळें नामशेष झालें. ही बातमी डिसेंबर महिन्याच्या १२ तारखेस

म्हणजे दोन दिवसांनीं जिकडे तिकडे पसरली. अजिंक्य व अभेद्य समजल्या जाणाऱ्या या आरमाराचा नायनाट युद्ध सुरू झाल्यापासून अवघ्या दोन दिवसांत व्हावा या एका गोष्टीमुळें इंग्रजी साम्राज्याचा झुकता डोलारा प्रचाराच्या पोकळ पायावर अधिष्ठित आहे हें जसें त्या वेळीं कित्येकांस उमगलें तद्वतच जपान म्हणजे खेळणीं तयार करणारें राष्ट्र लढाईसुद्धां खेळ समजतें हें इंग्रजी आरमाराच्या खेळखंडोबावरून तेव्हांच प्रत्ययास आलें. देशसेवा करावयास निघालेल्या लोकांनीं खरी क्षात्रवृत्ति अंगीं बाणविली पाहिजे. क्षात्रवृत्ति याचा अर्थ, उद्दिष्ट साधण्याकरतां आत्यंतिक हालअपेष्टा सोसून प्राणार्पण करण्यासही मागेपुढें न बघणें हें त्या जपानी वैमानिकानें आपल्या कृतीनें साऱ्या जगाला शिकविलें.

---

## ‘पळा ! पळा ! जपानी आले !’ : ३

कोटा बारू हें उत्तर मलायांत पूर्व किनाऱ्यावरील एक बंदर आहे. डिसेंबर महिन्याच्या ७ तारखेची मध्यरात्र उलटून गेल्यावरची म्हणजे ८ तारखेच्या मोठ्या पहांटेची गोष्ट. समुद्राच्या आंत सुमारें एका फर्लांगावर कांटेरी तारांचें कुंपण घातलेलें होतें. त्याच्या अलीकडे समुद्राचा वालुकामय किनारा. तेथें जवळच रबराच्या जंगलांत बराकी होत्या. इंग्रजांच्या हिंदी फौजेची एक तुकडी तेथें तळ देऊन होती. चोहोंबाजूस चौक्या-पहारे बसविले होते. दूरपूर्वेंत कदाचित् युद्ध पेटेल अशा अफवा शिपायांच्या कानांवर मधून मधून आलेल्या असल्या तरी ‘जपानी कसले युद्ध करणार’ हाच ज्याचा त्याचा समज इंग्रजांच्या प्रचारामुळें झालेला ! त्या तुकडीचा अजीतसिंग नांवाचा एक शिपाई समुद्रकिनाऱ्यावर येरझारा घालीत होता. रात्रीं १ चा सुमार असेल. समुद्रांत दूरवर त्याला एक मिणमिण करणारा दिवा दिसला. जवळ मासे मिळाले नाहींत म्हणून दूर गेलेल्या एखाद्या कोळ्याच्या होडक्यावरील दिवा असेल असें समजून त्यानें तिकडे दुर्लक्ष केलें. बराच वेळ येरझारा घातल्यावर पुन्हा सहजच त्याचें लक्ष त्या दिव्याकडे गेलें. आतां तो दिवा जरा जास्त जवळ आल्यासारखा त्यास वाटूं लागला. २ वाजतां त्याच्या पहाऱ्याची वेळ संपून त्यानें आपल्या साथीदाराला उठविलें आणि स्वतः झोंपीं जातां जातां सहज त्या दिव्याचा त्यानें उल्लेख केला. तासभरानें या दुसऱ्या पहारेकऱ्यास त्या दिव्याच्या आसपास एका भल्या मोठ्या काळ्या होडक्याच्या पुढच्या टोंकाची अस्पष्ट रूपरेषा दिसूं लागली. त्यानें मुख्य पहारेकऱ्याला वर्दी दिली. त्यानें जाऊन त्या रात्रीं पहाऱ्याची जबाबदारी ज्याच्या शिरावर होती त्या गौरकाय लेफ्टनंटच्या दाराची कडी वाजवून त्यास उठविलें. दारू पिऊन तो उशीराच झोंपीं गेला असल्यामुळें अर्धवट झोंपेंत कांहीं तरी बडबडला— “गेट आऊट...यू...चले जाव !” तरी आमच्या राजनिष्ठ हवालदारानें ‘साब—साब’ अशी गयावया करून त्यास जागें केलेंच. तो अर्धवट कांहीं कपडे चढवून हेलकावे खातच बाहेर आला. सर्व परिस्थिति समजून घेतल्यावर त्यानें तुकडीच्या मुख्य कचेरींतील दूरध्वनीनें सिंगापुराच्या मध्यवर्ती फौजी कचेरीस ‘युद्ध चालू झालें काय ?’ असें सांकेतिक भाषेंत विचारलें. तिकडून लगेच सांकेतिक भाषेंत उत्तर आलें ‘आम्हांला त्याबद्दल कांहींही माहिती नाहीं. लंडनहून किंवा दिल्लीहून त्या संबंधांत कांहींच बातमी नाहीं. तेव्हां नुसत्या

संशयावरून गोळीबारास सुरुवात करूं नका.' लगेच दुसऱ्या एका अधिकाऱ्याला उठवून टेलिफोनपाशींच बसविण्यांत आलें.

इकडे त्या भल्या मोठ्या होडक्यांतून शांतपणें लहान लहान होड्या खालीं पाण्यांत सोडण्यांत येऊं लागल्या. दोर, शिड्या इत्यादींच्या साहाय्यानें भराभर माणसें त्यांत बसलीं व लहान वल्हीं घेऊन त्यांनीं झपाझप होड्या किनाऱ्याच्या दिशेनें वल्हविण्यास सुरुवात केली. किनाऱ्यावरील हिंदी फौजेच्या तुकडींतही किंचित गोंधळ आणि गडबड दिसूं लागली. परंतु अजून सर्वांना जागे करण्याची जरूर नव्हती; कारण सरकाराचा हुकूम लंडनहून किंवा दिल्लीहून आलेला नव्हता ! काय बिशाद कोणा शत्रूची कीं तो सरकारी हुकुमाशिवाय लढाई सुरू करील ? हे लोक कोण ? ते या दिशेनें कां येत आहेत व आज ही गडबड काय आहे ? याचा किनाऱ्यावरील लोकांस कांहींच थांगपत्ता लागेना. एवढ्यांत होड्या किनाऱ्याच्या अगदीं लगत येऊन भिडल्या. त्यांतील सैनिकांपैकीं कांहींनीं हातांतील कोयतेवजा हत्यारानें भराभर कांटेरी तारांचें कुंपण एकेका घावासरशीं तोडून काढलें. आणि लगेच पाठीला संगिनी लावलेल्या बंदुका पुढें सरसावून त्यांनीं भराभर किनाऱ्यावर उड्या मारल्या. त्यांच्या मागोमाग त्यांच्याबरोबरच आलेले पण अगोदर जमिनीवर कांटेरी कुंपणामागें दबा धरून बसलेले त्यांचे इतर साथीदार सैनिकही त्या काळोखांतून, जमिनींतून एकदम राक्षस उत्पन्न व्हावेत त्याप्रमाणें उठून, तारेचें कुंपण तोडून धांवत या नावेंतून आलेल्या ताज्या तुकडीस मिळाले. त्या रबराच्या झाडांच्या दाट जंगलांतून ही मुकी आणि भयानक अशी धांवपळ सुरू होती. कोणी एक शब्द उच्चारला नाहीं. तोंच त्या हिंदी पहारेकऱ्यानें झाडलेल्या एका गोळीचा आवाज त्या काळोखी शांततेंत एकाएकीं कडाडला. आणि दुसऱ्याच क्षणीं त्या पहारेकऱ्यानें एक किंकाळी फोडली आणि त्याचा देह जमिनीवर निपचित पडला. त्या आक्रमक सैन्यानें एक सामुदायिक अशी कर्कश आणि गगनभेदी आरोळी ठोकली आणि तें त्या छावणीवर धांवून गेलें. ' जपानी आले ! जपानी आले, ' असा सगळीकडे एकच गोंधळ आणि आरडाओरडा सुरू झाला. कोणी झोंपेंतच मारले गेले, इतर कित्येक अर्धवट जागे होऊन प्राणास मुकले व कित्येकांनीं पळ काढला. बराकीमध्यें, मुदपाकखान्यांत वगैरे घुसून जपान्यांनीं उलथापालथ केली. संगिनी लावलेल्या बंदुकी सरसावून त्यांनीं सर्व बराकी धुंडाळल्या. गोरा दिसला कीं त्याला तरवारीनें कापावयाचा किंवा संगीनीनें भोसकावयाचा, हा क्रम त्यांनीं सुरू ठेविला. इंग्रजांचें गोरेपण व हिंदुस्थानी लोकांचें गोरेपण यांतील भेद ठाऊक नसल्यामुळें बिचारे गोरे हिंदी लोकसुद्धां या धुमश्चक्रींत प्राणास मुकले !

पहिला हल्ला करणारे जपानी सैनिक अत्यंत काळजीनें निवडलेले कडवे व आडदांड शिपाई असावेत अशी दक्षता घेण्याचें जपानी युद्धतंत्र आहे.

म्हणून मलायावरील या हल्ल्याच्या उद्‌घाटन समारंभाकरतां निवडलेले हे जपानी शिपाई क्रुद्ध मुद्रेचे, खदिरागारांसारखे लाल डोळे झालेले ( बहुतेक मुद्दाम मदिराप्राशन करविल्यामुळें ), आडदांड, उंच आणि सशक्त, काळे डगले घातलेले असे होते. कोणी कोणी दाढी वाढविलेली असल्यामुळें त्यांचा चेहरा जास्तच भेसूर दिसे. त्यांच्या पायांत, वरून कापडाचीं व खालून रबराचीं अशीं पादत्राणें होतीं. मात्र त्या पादत्राणांचे पुढचे बाजूस आंगठा आणि इतर बोटें यांच्यामध्यें एक बेचक असल्यासारखी होती. यामुळें त्यांस चटकन झाडांवर चढणें सुलभ जाई. फिलीपीन्स, जाव्हा, सुमात्रा, सिंगापूर इत्यादींवर त्यांनीं सुरुवातीस ज्या तुकड्या उतरविल्या त्या सर्व अशा प्रकारच्या होत्या. त्यांचीं शिरस्त्राणें म्हणजे खाकी रंगाच्या गरम कापडाच्या गोल टोप्या असत. सूर्याचीं किरणें डोळ्यांवर येऊं नयेत म्हणून त्या टोपीचीच पुढें आलेली अर्धवर्तुळाच्या आकाराची एक पट्टी त्यांच्या कपाळावर छाया करीत असे. अरब, सिद्दी किंवा मोगल लोकांच्या शिरस्त्राणांस जोडलेल्या कापडाच्या पडद्यावजा तीन लहान पट्ट्या ज्याप्रमाणें त्यांच्या शिरस्त्राणाचे आंतून निघून त्यांच्या दोन्ही कानांवर व मागें मानेवर लोंबत त्याप्रमाणें जपानी सैनिकांच्या या गरम टोपीसही तीन पट्ट्या आंतून जोडलेल्या असत. त्या पडद्याप्रमाणें त्यांच्या दोन्ही कानशिलांवरून व मानेच्या मागच्या बाजूस खालीं लोंबत राहात.

ज्या देशांत जे जे सैनिक हल्ला करण्याकरतां उतरावयाचे त्यांस त्या त्या देशांत जरूर त्या सर्व गोष्टींचें शिक्षण बऱ्याच वर्षांपासून दिलेलें असे. मलायांत उतरविलेल्या जपानी शिपायास आणि अधिकाऱ्यास मलाया देशाचा भूगोल, मलायी ( मलायाच्या लोकांची ) भाषा व ( इंग्रजी आणि हिंदी सैन्याशीं लढावें लागेल म्हणून ) मोडकीतोडकी इंग्रजी व हिंदुस्थानी भाषाही येत असे. अधिकाऱ्यांस इंग्रजी चांगलें येई. फिलीपीन्स बेटांत जें सैन्य उतरविलें त्यास टागालोग ( फिलीपीनो लोकांची भाषा ) व अमेरिकन भाषा चांगल्या येत. डच लोकांच्या प्रदेशांत म्हणजे जाव्हा, सुमात्रा वगैरे बेटांत उतरविण्याकरतां ज्या तुकड्या निवडल्या होत्या त्यांस डच लोकांचे आचार-विचार, त्यांची राजवट, मलायी ( जावा-सुमात्रामधील भाषासुद्धां मलायीच आहे ) व डच भाषा इत्यादि विषयांचें संपूर्ण शिक्षण बऱ्याच वर्षांपासून दिलें जात होतें.

जेव्हां मलायांतील त्या कोटा बारूच्या किनाऱ्यावर फटफटीत उजाडलें तेव्हां सर्व छावणी उध्वस्त होऊन तीस भीषण स्वरूप प्राप्त झालेलें दिसलें. आणखी जपानी जहाजें येऊन, लहान लहान होडग्यांतून सैन्य किनाऱ्यावर उतरत होते. जिकडे तिकडे जपान्यांच्या चौक्या-पहारे बसविले गेले होते. जपानी अधिकारी क्रुद्ध चेहऱ्यांनीं आपल्या सैन्याची व्यवस्था लावीत, जुळवाजुळव करीत आणि हुकूम देत घाईघाईनें इतस्ततः संचार करीत होते.

प्रत्येक सैनिकानें अंगावर आणि डोक्यावरील चिलखती शिरस्त्राणावर ठिकठिकाणीं हिरवीं पानें आणि गवत खोंवून घेतलें होतें. अशा रीतीनें सजल्यामुळें शत्रु-सैनिक विमानांतून पटकन ओळखूं येत नाहींत. हिरव्या वनश्रींत अशीं माणसें चटकन लपून, तद्रूप झाल्यामुळें टेहेळणी करावयास आलेल्या विरुद्ध पक्षाच्या विमानाला तेथें लष्करी छावणी आहे असें समजून न येतां निश्चल अरण्यच आहे असें वाटतें.

जंगलांत ठिकठिकाणीं खंदक खणून त्यांत बंदुकधारी शिपाई स्थानापन्न झाले. जहाजांतून तोफा आणि मोटारी उतरविण्यांत आल्या. त्यांसही हिरव्या पानांनीं सजविण्यांत आलें. शत्रूच्या पुढच्या तळावर मारा करितां येईल अशा ठिकाणीं तोफा नेऊन बसविल्या. दुपारीं १२ वाजले. जपानी शिपायांनीं वाळलेल्या अंजिराच्या सालीसारखे दिसणारे चपटे, खारे, वाळलेले मासे काढून विस्तवावर पापडाप्रमाणें भाजून, भात शिजवून त्याबरोबर खाल्ले.

सयाममध्यें असलेली जपानी फौजही सयाममधून मलायामध्यें पाडांगबसार या ठिकाणीं चालून आली. इंग्रजी आणि हिंदी फौजांनीं माघार घेतली.

वर्षभर उनाडक्या करणारा मुलगा ऐन परीक्षेच्या वेळीं गडबडून ज्याप्रमाणें पुस्तकें शोध, याच्याकडे जा, त्याच्याकडे जा, असा गोंधळून जातो त्याचप्रमाणें इंग्रजी अधिकारी ऐन लढाईच्या वेळीं तेथील प्रदेशाचे ( रस्ते, पाऊलवाटा इत्यादि दर्शविणारे ) नकाशे शोधूं लागले तों त्यांस असें आढळून आलें कीं, कोणाजवळही त्या प्रदेशाचे नकाशे नव्हते !

लढाईस तोंड लागल्याबरोबर प्रत्येक तुकडीच्या इंग्रज अधिकाऱ्यानें कुमक पाठवा, कुमक पाठवा अशा अर्थाचे निकडीचे निरोपावर निरोप दूरध्वनि, नभोवाणी, तारा, पत्रें, माणसें इत्यादींच्या साहाय्यानें सिंगापूरच्या मुख्य कचेरीस पाठविले. पावसाळ्यांतील किडयांमुंग्याप्रमाणें शेंकडोंवारी मरावयास तयार असणाऱ्या गुलाम हिंदी सैनिकांवर अधिकारी म्हणून पाठविलेल्या तरण्याबांड गोऱ्या बाळांस युद्धतंत्र म्हणजे कशाशीं खातात हें माहीतसुद्धां नव्हतें.

नेपोलियनच्या वेळेपासूनच इंग्रजांचें युद्धकौशल्य खरोखरी केव्हांच नाहींसें झालें, असें म्हणणें अतिशयोक्तीचें ठरणार नाहीं. शत्रूच्या शंभर शिपायांस तोंड म्हणून यांचेकडे तीनचार हजार शिपाई असले तर हे कदाचित् जिंकणार. शत्रूच्या विरुद्ध त्याच्या आठ दहा पट मनुष्यबळ आणि शस्त्रबळ जमवून वाटेल तितकी नासधूस आणि हानि सोसून कसातरी धसमुसळी धुमाकूळ घातला म्हणजे त्याला जय म्हणावयाचें ही इंग्रजांच्या जयाची आजकालची व्याख्या होऊन बसलेली आहे. मनुष्यहानि झालीच तर ती सोळा रुपयास एक याप्रमाणें शेळीच्या भावानें मिळणाऱ्या गरीब बिचाऱ्या हिंदुस्थानी लोकांची ! पैसे आणि

म्हणून मलायावरील या हल्ल्याच्या उद्‌घाटन समारंभाकरतां निवडलेले हे जपानी शिपाई क्रुद्ध मुद्रेचे, खदिरागारांसारखे लाल डोळे झालेले ( बहुतेक मुद्दाम मदिराप्राशन करविल्यामुळें ), आडदांड, उंच आणि सशक्त, काळे डगले घातलेले असे होते. कोणी कोणी दाढी वाढविलेली असल्यामुळें त्यांचा चेहरा जास्तच भेसूर दिसे. त्यांच्या पायांत, वरून कापडाचीं व खालून रबराचीं अशीं पादत्राणें होतीं. मात्र त्या पादत्राणांचे पुढचे बाजूस आंगठा आणि इतर बोटें यांच्यामध्यें एक बेचक असल्यासारखी होती. यामुळें त्यांस चटकन झाडांवर चढणें सुलभ जाई. फिलीपीन्स, जाव्हा, सुमात्रा, सिंगापूर इत्यादींवर त्यांनीं सुरुवातीस ज्या तुकड्या उतरविल्या त्या सर्व अशा प्रकारच्या होत्या. त्यांचीं शिरस्त्राणें म्हणजे खाकी रंगाच्या गरम कापडाच्या गोल टोप्या असत. सूर्याचीं किरणें डोळ्यांवर येऊं नयेत म्हणून त्या टोपीचीच पुढें आलेली अर्धवर्तुळाच्या आकाराची एक पट्टी त्यांच्या कपाळावर छाया करीत असे. अरब, सिद्दी किंवा मोगल लोकांच्या शिरस्त्राणांस जोडलेल्या कापडाच्या पड्याबजा तीन लहान पट्ट्या ज्याप्रमाणें त्यांच्या शिरस्त्राणाचे आंतून निघून त्यांच्या दोन्ही कानांवर व मागें मानेवर लोंबत त्याप्रमाणें जपानी सैनिकांच्या या गरम टोपीसही तीन पट्ट्या आंतून जोडलेल्या असत. त्या पड्याप्रमाणें त्यांच्या दोन्ही कानशिलांवरून व मानेच्या मागच्या बाजूस खालीं लोंबत राहात.

ज्या देशांत जे जे सैनिक हल्ला करण्याकरतां उतरवावयाचे त्यांस त्या त्या देशांत जरूर त्या सर्व गोष्टींचें शिक्षण बऱ्याच वर्षांपासून दिलेलें असे. मलायांत उतरविलेल्या जपानी शिपायास आणि अधिकाऱ्यास मलाया देशाचा भूगोल, मलायी ( मलायाच्या लोकांची ) भाषा व ( इंग्रजी आणि हिंदी सैन्याशीं लढावें लागेल म्हणून ) मोडकीतोडकी इंग्रजी व हिंदुस्थानी भाषाही येत असे. अधिकाऱ्यांस इंग्रजी चांगलें येई. फिलीपीन्स बेटांत जें सैन्य उतरविलें त्यास टागालोग ( फिलीपीनो लोकांची भाषा ) व अमेरिकन भाषा चांगल्या येत. डच लोकांच्या प्रदेशांत म्हणजे जाव्हा, सुमात्रा वगैरे बेटांत उतरविण्याकरतां ज्या तुकड्या निवडल्या होत्या त्यांस डच लोकांचे आचार-विचार, त्यांची राजवट, मलायी ( जावा-सुमात्रामधील भाषासुद्धां मलायीच आहे ) व डच भाषा इत्यादि विषयांचें संपूर्ण शिक्षण बऱ्याच वर्षांपासून दिलें जात होतें.

जेव्हां मलायांतील त्या कोटा बारूच्या किनाऱ्यावर फटफटीत उजाडलें तेव्हां सर्व छावणी उध्वस्त होऊन तीस भीषण स्वरूप प्राप्त झालेलें दिसलें. आणखी जपानी जहाजें येऊन, लहान लहान होड्यांतून सैन्य किनाऱ्यावर उतरत होते. जिकडे तिकडे जपान्यांच्या चौक्या-पहारे बसविले गेले होते. जपानी अधिकारी क्रुद्ध चेहऱ्यांनीं आपल्या सैन्याची व्यवस्था लावीत, जुळवाजुळव करीत आणि हुकूम देत घाईघाईनें इतस्ततः संचार करीत होते.

प्रत्येक सैनिकानें अंगावर आणि डोक्यावरील चिलखती शिरस्त्राणावर ठिकठिकाणीं हिरवीं पानें आणि गवत खोंवून घेतलें होतें. अशा रीतीनें सजल्यामुळें शत्रु-सैनिक विमानांतून पटकन ओळखूं येत नाहींत. हिरव्या वनश्रींत अशीं माणसें चटकन लपून, तद्रूप झाल्यामुळें टेहेळणी करावयास आलेल्या विरुद्ध पक्षाच्या विमानाला तेथें लष्करी छावणी आहे असें समजून न येतां निश्चल अरण्यच आहे असें वाटतें.

जंगलांत ठिकठिकाणीं खंदक खणून त्यांत बंदुकधारी शिपाई स्थानापन्न झाले. जहाजांतून तोफा आणि मोटारी उतरविण्यांत आल्या. त्यांसही हिरव्या पानांनीं सजविण्यांत आलें. शत्रूच्या पुढच्या तळावर मारा करितां येईल अशा ठिकाणीं तोफा नेऊन बसविल्या. दुपारीं १२ वाजले. जपानी शिपायांनीं वाळलेल्या अंजिराच्या सालीसारखे दिसणारे चपटे, खारे, वाळलेले मासे काढून विस्तवावर पापडाप्रमाणें भाजून, भात शिजवून त्याबरोबर खाल्ले.

सयाममध्यें असलेली जपानी फौजही सयाममधून मलायामध्यें पाडांगबसार या ठिकाणीं चालून आली. इंग्रजी आणि हिंदी फौजांनीं माघार घेतली.

वर्षभर उनाडक्या करणारा मुलगा ऐन परीक्षेच्या वेळीं गडबडून ज्याप्रमाणें पुस्तकें शोध, याच्याकडे जा, त्याच्याकडे जा, असा गोंधळून जातो त्याचप्रमाणें इंग्रजी अधिकारी ऐन लढाईच्या वेळीं तेथील प्रदेशाचे ( रस्ते, पाऊलवाटा इत्यादि दर्शविणारे ) नकाशे शोधूं लागले तों त्यांस असें आढळून आलें कीं, कोणाजवळही त्या प्रदेशाचे नकाशे नव्हते !

लढाईस तोंड लागल्याबरोबर प्रत्येक तुकडीच्या इंग्रज अधिकाऱ्यानें कुमक पाठवा, कुमक पाठवा अशा अर्थाचे निकडीचे निरोपावर निरोप दूरध्वनि, नभोवाणी, तारा, पत्रें, माणसें इत्यादींच्या साहाय्यानें सिंगापूरच्या मुख्य कचेरीस पाठविले. पावसाळ्यांतील किड्यांमुंग्याप्रमाणें शेंकडोंवारी मरावयास तयार असणाऱ्या गुलाम हिंदी सैनिकांवर अधिकारी म्हणून पाठविलेल्या तरण्याबांड गोऱ्या बाळांस युद्धतंत्र म्हणजे कशाशीं खातात हें माहीतसुद्धां नव्हतें.

नेपोलियनच्या वेळेपासूनच इंग्रजांचें युद्धकौशल्य खरोखरी केव्हांच नाहींसें झालें, असें म्हणणें अतिशयोक्तीचें ठरणार नाहीं. शत्रूच्या शंभर शिपायांस तोंड म्हणून यांचेकडे तीनचार हजार शिपाई असले तर हे कदाचित् जिंकणार. शत्रूच्या विरुद्ध त्याच्या आठ दहा पट मनुष्यबळ आणि शस्त्रबळ जमवून वाटेल तितकी नासधूस आणि हानि सोसून कसातरी धसमुसळी धुमाकूळ घातला म्हणजे त्याला जय म्हणावयाचें ही इंग्रजांच्या जयाची आजकालची व्याख्या होऊन बसलेली आहे. मनुष्यहानि झालीच तर ती सोळा रुपयास एक याप्रमाणें शेळीच्या भावानें मिळणाऱ्या गरीब बिचाऱ्या हिंदुस्थानी लोकांची ! पैसे आणि

मालमत्तासुद्धां चाळीस कोटी हिंदी लोकांचीच. मग आपल्या अर्ध्या कच्च्या गोऱ्या बाळांच्या हातीं ही फुकटची सामुग्री सोंपवून ( किती नासधूस केली याची पर्वा नाहीं—गुलामांचा आणि त्यांच्या वित्ताचा कितीही चुराडा झाला तरी जाब विचारतो कोण ! ) त्यांना चुका करून अडखळत, धडपडत शिकूं द्या ना ! अशी त्यांची कल्पना. अशा पुष्कळ ढोबळ चुका केल्या, टक्के टोणपे खाल्ले कीं झाला मेजर—कर्नल—जनरल—फील्ड-मार्शल ! असो.

—कुमकेचे संदेश तारेनें पाठवितां येतात परंतु कुमक कांहीं तारेनें पाठवितां येत नाहीं. तार पाठविल्यावर एकंदर परिस्थितींत कित्येक स्थित्यंतरें घडून येत. दिवसांतून तीन चार वेळां जपानी विमानें डोक्यावरून घोंघावून जात. विशेषतः सकाळीं ९ वाजतां, पुनः दुपारीं ११-३० किंवा १२ वाजतां व पुनः दुपारीं २ ते ३ च्या दरम्यान. जगांतील पहिल्या प्रतीचें राष्ट्र म्हणून मिरविणाऱ्या राष्ट्राचें एकही विमान या जपानी विमानांच्या प्रतिकारार्थ वर उडालें नाहीं ! हें पाहून इंग्रजी व हिंदुस्थानी सैन्यांचा धीर खचला. जो तो इंग्रजी लष्करी कचेरीला दोष देऊन पळ काढूं लागला. कसलाच धड बंदोबस्त नव्हता.

मलायांत ठिकठिकाणीं तीन चार जागीं समुद्रांतून व खुष्कीनें प्रवेश करून घेतल्यानंतर जपान्यांनीं आपल्या तोफा रोखून शत्रूच्या पुढच्या तळांवर भडि-मार सुरू केला. विमानेंही त्या छावण्यांवर जाऊन दिवसांतून तीन चार वेळां बॉम्बसचे व मशीनगन्सचे हल्ले करूं लागलीं. जपानी सैनिकांच्या लहान लहान तुकड्या—म्हणजे एकेका तुकडींत अवघे पांच किंवा तीन लोकही एक एक, एक एक इतस्ततः प्रसृत होऊन—रबराच्या झाडींमधून कधीं जमिनीवरून सर-पटत तर कधीं झाडाझुडुपांतून लपत छपत, खांचखळग्यांचा आडोसा घेत किंवा रबराच्या झाडावर चढून, तेथून बंदुका व मशीनगन्स यांच्या साहाय्यानें अचानक शत्रूंवर गोळ्यांचा वर्षाव करूं लागल्या. आपल्या शक्तीची व सामु-ग्रीची शक्य तेवढी बचत करण्याचें धोरण जपाननें प्रत्यक्ष युद्धाच्या धुमश्चक्रीं-तही दृष्टीआड होऊं दिलें नाहीं. तीन चार जणांनीं खरा गोळीबार करावयाचा व इतरांनीं, मेळ्यांत लहान मुलांना आपण घेऊन देतों तसें कर्...कर्...कर्... कर् असें वाजणारें हातांतील कामटीवर फिरणारें एक लोखंडाचें आणि पत्र्याचें खेळणें असतें, त्याचा आवाज करावा, असें चालत असे. या 'करकऱ्या'चा सामुदायिक आवाज मशीनगन्सच्या गोळीबारासारखा होतो. त्यामुळें शत्रूजवळ बऱ्याच बंदुका आणि मशीनगन्स असाव्यात, त्या चालविणारे लोकही संख्येनें पुष्कळ असावेत, असा विरुद्ध पक्षांतील सैनिकांचा समज होतो. यांत्रिक बळानें सज्ज अशा या प्रबळ शत्रूचा प्रतिकार करणें फोल आहे असें समजून इंग्रज,

ऑस्ट्रेलियन व हिंदी शिपाई "तोबा! तोबा! दुष्मन आया—भागो!" म्हणून पळ काढीत. सिंगापुरांत शरण गेलेल्या पंचाऐंशी हजार हिंदी, ऑस्ट्रेलियन आणि इंग्रज सैनिकांपैकीं शेंकडा दहा जणांनींसुद्धां युद्ध संपेपर्यंत, समोरासमोर प्रत्यक्ष रणांगणांत जपानी सैनिक पाहिला असेल नसेल! जपानी सैनिक झाडावर चढून किंवा झाडींत अन्यत्र लपलेले असावयाचे तीन, परंतु त्यांनीं अदृश्यपणें अचानक केलेला तो गोळीबार इंग्रजांच्या साम्राज्यसेनांना इतका भेदरवून टाकी कीं शत्रु कोठें आहे हें बघावयाला ते जाग्यावर राहतील तर शपथ!

———

## दूरपूर्वेतील राजकारण : ४

१९४० मध्यें इंडोचायना व्यापून जपानी जेव्हां सयाम देशाच्या पूर्व सरहद्दीवर येऊन ठेपले तेव्हां पुढेंमागें मलाया व ब्रह्मदेश या ब्रिटिश प्रदेशावर चढाई करण्यास आपल्याला सयाममध्यें प्रवेश करून घ्यावा लागेल हें चाणाक्ष जपान्यांच्या लक्षांत आलेलें होतें. तेव्हां सयाममध्यें पाय घुसवावयाचा हें ध्येय समोर ठेवून त्यांनीं स्वतःचें पुढचें धोरण आंखण्यास तेव्हांपासूनच सुरुवात केली होती. सयाममध्यें त्यांचा दरबारी वकील राहातच असे. त्याच्या तर्फे त्यांनीं सयाम दरबाराला एक खलिता पाठवून कळविलें कीं, 'तुम्ही आणि आम्ही पूर्व आशियामधील स्वतंत्र राष्ट्रें आहोंत. तेव्हां जगाच्या या भागांत शांतता आणि सुव्यवस्था राखण्याची आपली संयुक्त जबाबदारी आहे. ही जबाबदारी पूर्णपणें पार पाडतां यावी म्हणून मित्र या नात्यानें आपल्या प्रदेशांत आम्हांस खालील चार सवलती मिळाव्यात. ( १ ) आपल्या हवाई, आरमारी आणि फौजी तळांचा आम्हांस पूर्ण उपयोग करून घेतां यावा. ( २ ) आपल्या देशांतील आगगाडीचा आम्हांलाही आपल्याचइतका उपयोग करून घेतां यावा. ( ३ ) आमचें आरमार, फौज, विमानें इत्यादींच्या हालचाली जरूर तशा करण्यांत आपण आम्हांस संपूर्ण साहाय्य करावें. ( ४ ) इतर सर्व बाबतींत आपल्या अधिकाऱ्यांनीं आमच्याशीं संपूर्ण सहकार्य करावें.

इंडोचायना व्यापण्याच्या वेळीं जपाननें अशाच प्रकारच्या मागण्या इंडोचायनाचे गव्हर्नर जनरल जॉन डकू यांजपाशीं केल्या होत्या. फ्रान्सचा पाडाव होऊन इंडोचायना 'अनाथ' झाल्यामुळें या मागण्या जपाननें सरळ बारा तासांच्या मुदतीचा तांतडीचा खलिता पाठवून इंडोचायनाकडून शस्त्रास्त्रांच्या जोरावर मान्य करून घेतल्या. प्रत्यक्ष युद्ध सुरू करण्यापूर्वीं सयामशीं हा डाव खेळणें शक्य नव्हतें म्हणून त्यांनीं गोडीगुलाबीचें बोलणें सुरू केलें. सयामनेंही आंतरराष्ट्रीय आखाड्यांत दंड थोपटून उतरण्याची आपली तयारी नाहीं हें ओळखून सामोपचारानें वेळ मारून नेण्याचें ठरविलें; व अगदींच वेळ येऊन ठेपली म्हणजे जो बलवान दिसेल त्याला माळ घालावयाची असें ठरविलें. सयामचा नामधारी राजा आनंद महिदल हा लहानपणापासून शिक्षणाकरतां म्हणून स्वित्झर्लंडमध्येंच होता आणि सयाममध्यें त्या वेळीं अधिकारावर असलेलें प्रजामंडळ नांवापुरतेंच होतें. त्यामुळें खरी सत्ता पिबुल संग्राम ( पिबुल सोंखाम ) या महत्त्वाकांक्षी प्रधानाच्याच हातांत होती. तो आणि त्याच्या

पाठीशीं असलेले लष्करी व इतर अधिकारी हेच खरे राष्ट्राचे सत्ताधीश होते. त्यांनीं जपानला उभयपक्षांतील कराराचीं बोलणीं करण्याकरतां म्हणून एक सयामी शिष्टमंडळ पाठविण्याचें ठरविलें. तेव्हांपासून या दोन राष्ट्रांचीं खलबतें सुरू होऊन प्रत्येकानें दुसऱ्या पक्षाच्या मुत्सद्यांच्या हृदयाचा ठाव घेण्यास सुरुवात केली.

इ. स. १९४१ च्या डिसेंबर महिन्यांत दूरपूर्वेकडील लढाई सुरू होण्याचे दोन दिवस आधीं सयाममधील जपानी वकिलानें सयामच्या परराष्ट्र-मंत्र्याची व पंतप्रधानाची गांठ घेऊन त्यास स्पष्ट शब्दांत सर्व परिस्थिति समजावून दिली. आतां दुसरा कोणताही मार्ग उरला नाहीं व इंग्रज आणि अमेरिकन हे आपल्या मदतीस धांवून येण्यास सर्वतोपरी असमर्थ आहेत हें ओळखून सयामनें जपानशीं दूरपूर्वेतील प्रदेशाच्या बचावाकरतां परस्पर-सहकार्याचा एक करार केला. त्याच दिवशीं सयामच्या पूर्वसरहद्दीवर जय्यत तयार असलेली जपानी सेना सयाममध्यें भरधांव शिरली आणि तिनें हां हां म्हणतां सयामच्या दक्षिण सरहद्दीवर येऊन ठाणें दिलें; व अशा रीतीनें सयामचा सर्व प्रदेश व्यापला.

सयाम आणि इंडोचायना हे देश व्यापतांना जपाननें मोठी धूर्तता दाखविली. कोणत्याही देशांत शिरतांच जपाननें रेडिओ-केंद्रें, पोलिस-ठाणीं, हवाई, आरमारी आणि फौजी ठाणीं, दारूगोळा इत्यादींचीं कोठारें, रेल्वेस्टेशनें, रस्त्यावरील मुख्य मुख्य ठिकाणें अशीं केंद्रस्थानें आपल्या ताब्यांत घेतलीं. या प्रत्येक ठिकाणांवर लष्करी पोषाख घातलेले त्या त्या खात्याचे तज्ज्ञ अधिकारी व त्या त्या जागेच्या महत्त्वाप्रमाणें सैन्यबळ पाठविण्याचा त्यांचा क्रम असे. मैत्रीचा करार असला तर 'मित्र म्हणून संरक्षणाच्या कार्यांत सहकार्य करण्याचें आमचें कर्तव्यच ठरतें', अशा बहाण्यानें ते अशा तऱ्हेचें सैन्य पाठवीत. उघड उघड शत्रुत्वच असलें तर मग विरोधी पक्षांतील लोकांस कैद करून तेथें जपानची पूर्ण सत्ता प्रस्थापित होई. जपान्यांच्या हालचाली इतक्या झपाट्यानें होत आणि कोणी काय ताब्यांत घ्यावें याची रूपरेषा प्रथमपासूनच त्यांनीं इतकी उत्तम आंखलेली असे कीं वेळ येतांच कसल्याही प्रकारची गडबड, घाई, गोंधळ, भानगड, भांडण, घोटाळा, नासधूस, उपद्व्याप इत्यादि न होतां अवघ्या चोवीस तासांत दरएक महत्त्वाचे ठिकाणीं जपान्यांची पूर्ण सत्ता प्रस्थापित होई व त्याला अशा तऱ्हेचें स्वरूप येई कीं जणूं काय त्यांनीं तेथें बऱ्याच वर्षांपासून बस्तान बसविलें असावें.

करारांत अटी स्पष्ट नमूद केलेल्या असोत किंवा नसोत ' संपूर्ण सहकार्य ' या सदराखालीं सर्व गोष्टी अध्याहृत समजून जपानी लोक, जो देश मैत्रीच्या करारानें व्यापावयाचा असेल त्याच्या प्रत्येक मुख्य मुख्य अधिकाऱ्याच्या शेजारीं ( डोक्यावर ) आपला एक एक अधिकारी बसवीत. उदा० सयामच्या पंतप्रधानाशीं

वाटाघाटी (म्हणजे साम-दाम-दंड-भेद हे सर्व उपाय) करणारा आपला राज-प्रतिनिधी; त्यांच्या परराष्ट्रमंत्र्याशीं खलबतें करावयास आपला दरबारी वकील; सयामी पोलिसांच्या सर्वाधिकाऱ्यास त्याच्या कामांत मदत करण्याकरतां म्हणून आपला पोलीस-श्रेष्ठ; फौज, आरमार, हवाई दल इत्यादीबद्दल सयामला 'योग्य' सल्ला देण्याकरतां त्यांच्या त्या त्या खात्यांतील श्रेष्ठींस आपला एक एक तज्ज्ञ; अशी व्यवस्था असावयाची. जपानी प्रचार-तांत्रिकानें सयामी प्रचारमंत्र्याचें 'मार्ग-दर्शन' करावयाचें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे सावकार जसा आपल्यास हवे तसे कागद कर्जदाराकडून लिहून घेतो तशीं आंतरराष्ट्रीय राजकारणांत प्रबल राष्ट्रें आपल्यास पाहिजे तसें इतर दुर्बल राष्ट्रांकडून लिहून घेतात.

जपाननें इंग्लंड-अमेरिकेच्या विरुद्ध युद्ध पुकारण्याचे अगोदर सयाम पुनः पुनः जगाला ओरडून सांगत होतें कीं, 'जगांत कोठेंही कांहींही होवो; आम्ही लढाई-पासून पूर्णपणें अलिप्त राहून संपूर्णपणें तटस्थतेचें धोरण स्वीकारूं.' सयामच्या दरबारीं असलेले इंग्रज व अमेरिकन वकील या घोषणेनें फसले. पडद्यामागें जपाननें सयामचा आंगठा आपल्या करारावर लावून घेतला. इंग्लंड-अमेरिका त्याकडे बघतच राहिलीं! ८ तारीख उजाडतांच जपाननें सयाममधून मलायांत आपलें घोडें पुढें दामटलें. सिंगापूरपासून बँकॉक–(सयामची राजधानी)-पर्यंत जो लोहमार्ग (रेल्वे-लाईन) जातो त्याच्या जवळजवळ मध्यावर पाडांग बसार हें उभयतांच्या सरहद्दीवरील रेल्वे-स्टेशन आहे. या स्टेशनाच्या म्हणजे सयामकडील प्लॅटफॉर्मच्या टोंकावर सयामी स्टेशनमास्तराची कचेरी व दक्षिणेकडील टोंकास इंग्रजी स्टेशनमास्तराची झोंपडी (कचेरी) आहे. स्टेशन अगदीं लहान आहे. जवळच पंचवीस-तीस झोंपड्यांचें एक लहानसें खेडें आहे. दोन्हीकडच्या लष्करी अधिकाऱ्यांकरतां व त्यांच्या पांच-पन्नास शिपायांकरतां लहान लहान बराकीवजा विटांच्या इमारती आहेत. एक दोन वर्षांपूर्वी सयाम-मलायास जोडणारा एक मोटार-वाहतुकीचा रस्ताही इंग्रजांनीं तयार केलेला होता. त्या रस्त्यानें आणि या रेल्वे-लाइननें डिसेंबर ८ च्या पहांटेस जपानी सैन्य उत्तरेकडून मलायांत शिरलें.

—:०:—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 29332 दि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

## हिंदवी स्वातंत्र्य चळवळीचें बीज : ५

पूर्वेकडून समुद्रानें व उत्तरेकडून सयाम देशांतून खुष्कीनें, अशा दोन मुख्य मार्गांनीं जपानी सैन्य मलायांत चाल करून आलें हें आपण बघितलेंच आहे. प्रत्यक्ष लढाईस तोंड लागेपर्यंत शौर्याच्या, पराक्रमाच्या व आपल्या बळाच्या लांब लांब गप्पा मारणारे इंग्रज, प्रथमपासूनच माघार घेऊं लागले. पुरेसें सैन्य व शस्त्रास्त्रें नाहींत म्हणून इंग्रज अधिकाऱ्यांनीं आदळ आपट सुरू केली. नव्या सुनेस स्वयंपाक आला नाहीं म्हणजे, "काय बाई हा लाकूडवाला तरी– मेल्यानं सगळीं लाकडं कशीं ओलीं बघून दिलीएत अगदीं !" असें तिनें म्हणावें; अशापैकींच प्रकार होता हा !

जपान्यांचीं विमानें तीन, सहा, नऊ किंवा सत्तावीस अशा तांड्यांत जाऊन रणांगणापुढील पांच पन्नास मैलाच्या प्रदेशावरून उड्डाण घेऊन इंग्रजांच्या छावण्यांवर व आगगाडीच्या वाहतुकीवर बॉम्बसचा व मशीनगन्सच्या गोळ्यांचा मारा करून येत. इंग्रजांच्या हवाई मैदानावरील इतस्ततः पसरलेलीं कार्डबोर्डचीं आणि पत्र्याचीं नकली विमानें अर्थातच केवळ दिखाऊ असल्यामुळें उड्डाण करण्यास सर्वस्वीं असमर्थ होतीं. आपल्या विमानांचे नकली तांडे बघूनच शत्रूनें गार व्हावें आणि युद्ध करावयास धजूं नये हा इंग्रजांचा उद्देश ! जाहिरातबाजीच्या या युगांत शत्रूचा पाणउतारा व तेजोभंग करण्यास आणि स्वतःची बढाई मारण्यास अनेक साधनें अनुकूल आहेत. तथापि इंग्रजांच्या दिखाऊ शक्तींत व प्रत्यक्ष शक्तींत फार तफावत असते, हें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. या नकली सामानाची व स्वतःच्या नकली ( लढाऊ ) मनाची ओळख असणारे हे सैनिक रणांगण सोडून पळाल्याचींसुद्धां उदाहरणें आहेत. त्यांचेसमोर छाती ठोकून, बेडरपणें, नेटानें आणि संघटितपणें उभे राहणारे प्रतिस्पर्धी मात्र पाहिजेत.

मलायांत असलेल्या इंग्रजी साम्राज्य फौजेंत बहुसंख्य हिंदुस्थानी, त्याच्या खालोखाल ऑस्ट्रेलियन्स व थोडे ब्रिटिश सैनिक होते. त्यांचें प्रमाण साधारणतः ७५०००, २५०००, १०००० असें असे. इंग्रजांची अरेरावी हिंदी शिपायांस जास्त जाणवायची परंतु कित्येक बाबतींत ती ऑस्ट्रेलियन्सनांही जाणवत असे. ते दोघेही मनांतून इंग्रजांवर चरफडत. मलायांतील या इंग्रज पक्षाच्या सैन्यास हवाई दलाची मदत मुळींच नव्हती असें म्हटलें तरी चालेल; कारण हवाई दल नाममात्रच होतें. त्यांत कुशल वैमानिकांचा आणि पुरेशा विमानांचा अशा दोन्ही मुख्य गोष्टींचा अभाव होता. आणि अर्थातच विमानांतून

टाकावयाचे बॉम्ब जवळजवळ नव्हतेच असें म्हटलें तरी चालेल. या साम्राज्य-फौजांनीं भराभर माघार घेण्यास सुरुवात केली. त्याचीं मुख्य कारणें म्हणजे : (१) भाडोत्री फौजा पोटार्थी व दिखाऊ काम करणाऱ्या असतात. खऱ्या प्राणत्यागाची वेळ आली म्हणजे जो तो शिपाई शस्त्रास्त्रें फेंकून जीव बचावण्यासाठीं सहजासहजीं शत्रूचा कैदी तरी बनतो किंवा जंगलांत पळून जातो. (२) इंग्रजांची अरेरावी आणि वाईट वागणूक यामुळें त्यांच्या अहिताची इच्छा बाळगणारे सैनिक बहुसंख्य होते. (३) हवाई दलाचा अभाव. (४) अननुभवी तरुण गोऱ्या अधिकाऱ्यांचा गोंधळ. (५) शत्रूच्या सामर्थ्याविषयीं अज्ञान. (६) छानछोकी व पोषाखी ऐट यावर भर देणारें इंग्रजी क्षात्र-तंत्र.

यांपैकीं पहिलें कारण हें मुख्य आहे. भाडोत्री फौजा लाखोंगणती असल्या तरी त्यांच्याकडून जीव बचावून पळ काढण्याशिवाय इतर कोणत्याही तऱ्हेची अपेक्षा करणें म्हणजे पाणी चढावावरसुद्धां चढेल असें म्हणण्यासारखें आहे. खरा राष्ट्रीय वृत्तीचा शिपाई जितक्या आपुलकीनें, हिरीरीनें व चिवटपणानें लढेल तसा एखादा गुलाम केव्हांही लढणार नाहीं, हें कांहीं कोणाला सांगावयास नको !

कोटा बारू आणि पाडांग बसार या ठिकाणच्या गोंधळलेल्या आणि दाणादाण झालेल्या इंग्रजांच्या फौजांनीं सुमारें तीस मैल पिछाडीस असलेल्या साम्राज्य फौजांच्या छावणींत जाऊन तळ देण्याचा बेत केला. परंतु त्यांना धड पळ काढावयाससुद्धां अवसर मिळाला नाहीं. इतक्या विद्युद्वेगानें जपानी त्यांचा पाठलाग करीत होते. वाटेंतील रबराच्या मळ्यांत अचानक त्यांची व जपानी शिपायांची गांठ पडावयाची व नाइलाजानें त्यांस जपान्यांशीं दोन हात करावयाची पाळी येऊन धांवती लढाई द्यावी लागावयाची. मोगल साम्राज्याच्या ऱ्हासकाळीं गनिमी काव्यानें लढणारे मराठे हे एकदम अचानक कोठून येतील हा जसा नेम नसे त्याचप्रमाणें जपानीही दऱ्याखोरीं, डोंगर, दाट जंगलें इत्यादि पार करून अनपेक्षित ठिकाणीं एकदम प्रगट होत. पिछेहाट म्हणून करावयास जावें आणि ज्या जंगलांत तळ द्यावा तेथेंच रबराच्या झाडावरून जपान्यांचा अचानक गोळीबार सुरू होई.

जित्रा छावणीच्या पश्चिमेस पांच सहा मैलांवर एक खेडें आहे. येथून एक रस्ता सरळ समुद्रकिनाऱ्यावर जातो व दुसरा कांगार या पर्लिस संस्थानाच्या राजधानीकडे जातो. या ठिकाणीं अचानक चोहोंकडून जपानी फौज आल्यामुळें पिछेहाट करणाऱ्या कांहीं हिंदी तुकड्या व इंग्रज अधिकारी जपान्यांच्या वेढ्यांत अडकले. यांतच **कॅ. मोहनसिंग** हे पंजाब रेजिमेंटमधील एक अधिकारी होते. त्याच्याबरोबर लेफ्टनंट पट्टनाईक हे ओडिया जातीचे एक डॉक्टर आणि कांहीं गुरखे इत्यादि दोनशें हिंदी सैनिक जपान्यांच्या ताब्यांत सांपडले. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखालीं जो स्वातंत्र्यवृक्ष पुढें बहरला

आणि अक्याबपासून इंफालपर्यंतचा १५०००० चौरस मैलाच्या प्रदेशाच्या व अंदमान-निकोबार बेटांच्या स्वातंत्र्याचीं ज्याला फळें आलीं त्या वृक्षाचें बीज १२ डिसेंबर १९४१ रोजीं, जित्रा छावणीपासून पांच-सहा मैलांवर सांपडलें असें म्हणावयास हरकत नाहीं.

जपानी युद्धकचेरींत ' हिकारी कीकन ' या नांवाचें एक खातें आहे. यांत हिंदी भाषा जाणणारे व हिंदुस्थानविषयक इतर बाबतींतील तज्ज्ञ नेमलेले असतात. या खात्याचे अधिकारी जपानी सैन्याच्या आघाडीच्या तुकड्यांबरोबर असत. हिंदी सैनिकांना युद्धबंदी केल्यापासून तों पुढें शेवटपर्यंत त्यांच्या बाबतींत सर्व प्रकारचे निर्णय घेण्याचें काम जपानी युद्धकचेरीतर्फे याच खात्याच्या अधिकाऱ्याकडे दिलेलें असे. मेजर फूजीवारा हे जपानच्या एका प्रसिद्ध सरदार घराण्यांतील गृहस्थ या खात्याचे मुख्य होते; आणि लेफ्टनंट कुनीझगा हे इंग्रजी जाणणारे एक तरुण लंबोदर गृहस्थ त्यांचे दुभाषे व दुय्यम अधिकारी म्हणून काम करीत.

कॅप्टन मोहनसिंग व त्यांचेबरोबर इतर दोनशें सैनिक जपान्यांच्या हातांत युद्धबंदी म्हणून सांपडल्यानंतर वर उल्लेखिलेल्या दोन अधिकाऱ्यांचें आणि त्यांचें बोलणें झालें. मेजर फूजीवारा हे सशक्त आणि गंभीर चेहऱ्याचे चाळीशीच्या आंतबाहेर असलेले गृहस्थ होते. त्यांचा चेहरा काळजीनें किंवा अतिव्यग्रतेमुळें सुरकुतलेला दिसे. परंतु एक प्रकारचें सौम्य तेज त्यांच्या चेहऱ्यावर नेहमीं विलसे. लेफ्टनंट कुनीझगा हे तुंदिलतनु विनोदी जपानी गृहस्थ सव्वीस सत्तावीस वर्षांचे असावेत. गौरवर्णाचे, गुबगुबीत गालाचे, लठ्ठपोटे आणि जाडभिंगांचा चष्मा लावलेले असे हे गृहस्थ मोठे गंमतीदार दिसत.

जपान्यांनीं युद्धबंदी म्हणून घेतलेल्या साम्राज्य-फौजांतील गौरकाय युरोपीय अथवा ऑस्ट्रेलियन्स आणि श्यामवर्ण हिंदी अथवा इतर एशियाई सैनिकांस ते चटकन वेगवेगळे काढीत, व त्यानंतर युरोपीय सैनिकांचा एशियाई सैनिकांशीं पुढें कधींही संबंध येऊं देत नसत. या भिन्नवर्णी लोकांस नजरकैदेस्तव दोन भिन्नभिन्न छावण्यांतून ठेवण्यांत येई. बहुधा इंग्रज लोकांनीं एतद्देशीयांकरतां बांधलेल्या त्या त्या ठिकाणच्या बंदीखान्याच्या दगडाच्या भिंती, लोखंडी दारें, जड आणि जाड शृंखला, भलीं मोठीं कुलुपें हींच इंग्रजांच्या नशिबीं आलीं. युद्धबंदी झाल्याबरोबर त्यांची रवानगी याच उंच उंच भिंतींच्या कारागृहांत होई.

प्रत्यक्ष युद्धाच्या धुमश्चक्रींत गौरवर्णी लोकांस तर जपानी युद्धबंदी म्हणून घेण्याच्या अथवा तो शरण येत असल्यास त्याचे प्राण वांचवावे हें बघण्याच्या फंदांत कधींच पडत नसत. एखाददुसरा हिंदी सैनिकसुद्धां युद्धाच्या धुमश्चक्रींत त्यांच्या तावडींत सांपडला तर ते बहुधा त्याची गय (किंवा हयगय) न करितां युद्धाच्या मदानें धुंद होऊन त्यास ठार करीत. आणि खरें पाहिलें तर तशा स्थितींत प्रत्येक व्यक्तीच्या जीवनमरणाचा साधक बाधक दृष्टीनें

विचार करण्यास तें कांहीं न्यायालय नसतें. मला आठवतें, एका प्रसंगीं लाल डोळ्याचे आणि क्रुद्ध चेहऱ्याचे, काळे निळे डगले घातलेले, युद्धाच्या मदानें धुंद झालेले धष्टपुष्ट सैनिक इंग्रजी साम्राज्य-फौजांच्या एका छावणीवर तुटून पडले. शत्रूची दाणादाण केल्यावर ते पुढें सरकले. तों दोन रस्त्यांच्या नाक्यावर एक हिंदी पहारेकरी उभा होता. या शिपायांचे भेसूर चेहरे पाहून त्यानें बंदुक दोन्ही हातांत आडवी धरून दोन्ही हात वर केले. परंतु या पुढें सरसावलेल्या जपानी सैनिकांपैकीं एकानें रक्तानें माखलेली संगीन त्याच्या पोटांत खुपसली, दुसऱ्यानें मागून पाठींत खुपसली व अशा तऱ्हेनें एका निमिषांत त्याचा अंत करून ते पुढें निघाले!

मात्र सामुदायिक रीतीनें शरण आल्यास अथवा छावणीच्या जवळपास नसलेल्या एकटयादुकटयानें हात वर केल्यास जपानी त्यास, साशंकपणें कां होईना, युद्धबंदी म्हणून घेऊन त्याचे प्राण वांचवीत. एखाद्या जंगलांत ( रबराच्या मळ्यांत ) इंग्रज अधिकारी व हिंदी सैनिक दबून राहिलेले असावयाचे. त्यांवर एकाएकीं कोणत्यातरी दिशेनें गोळीबार सुरू व्हावयाचा. गोंधळलेल्या परिस्थितींत मागें जाऊं म्हणावें तर तिकडूनही एकदम गोळीबार सुरू होई. काय करावें, अशा मनःस्थितींत असावें तोंच सर्वांगावर पानें खोंवलेले क्रुद्ध मुद्रेचे खाकी वेषधारी जपानी सैनिक संगिनी रोखून एकदम दोन चार बाजूंनीं पुढें यावयाचे. झालें– आतां हात वर करण्याशिवाय गत्यंतर उरत नसे. मग ते आपल्या शत्रूच्या त्या तुकडीच्या मुख्य अधिकाऱ्यास दरडावून पुढें येण्यास सांगत. जपान्यांचें दरडावणें, रागावणें हें सगळें जपानींतच चाले, मग तें कोणास समजो अगर न समजो! शत्रुपक्षाचा मुख्य अधिकारी पुढें आला म्हणजे त्याच्यासमोर संगीनाग्री बंदूक रोखून दुसरा शिपाई त्याचें पिस्तूल काढून घेई. इतरांस ते जोरानें दरडावून बंदुकी, दारूगोळा, संगिनी, पिस्तुलें, इत्यादि शस्त्रास्त्रें तावडतोब एके ठिकाणीं टाकावयास सांगून दूर बाजूला उभे राहावयास सांगत. त्यानंतर गोऱ्या सैनिकांस वेगळें काढण्यांत येई. थोबाडींत मारणें, लाथा, बुक्क्या, डिंवचणें इत्यादींच्या साग्रसंगीतांत त्यांची झडती होऊन त्यांस लगेच पहाऱ्यांत घेऊन जात. हिंदी अधिकाऱ्यांपैकीं एखादा त्याच्या बोलण्याचालण्याच्या ढबीवरून किंवा पोषाख, हावभाव वा चेहरेपट्टी यांवरून यत्किंचितही इंग्रजांचा किंवा इतर पाश्चात्यांचा पक्षपाती आहे असें वाटल्यास त्यासही असा मार बसे व इतर अनेक प्रकारचा त्रास होई. कैदी झाल्यानंतरसुद्धां कित्येक हिंदी अधिकाऱ्यांवर जपान्यांचा रोष असे; कारण बोलण्या-चालण्यांत, वागण्यांत, इत्यादि सर्व गोष्टींत बहुतेक हिंदी अधिकारी इंग्रजांचेंच अनुकरण करीत. गुलामी त्यांच्या हाडींमाशींच खिळली होती त्याला ते तरी काय करणार!

विशेषतः दोन हिंदी अधिकारी ( किंग्ज कमिशन घेतलेले ) हटकून आपापसांत इंग्रजी बोलतात याचें त्यांना फार आश्चर्य वाटे.

हिंदी लोकांस देशाभिमान आणि भाषाभिमान हीं मुळीं नाहींतच कीं काय ? अशी त्यांस साहजिकच शंका येई. कांहीं एका कारणामुळें आपण एका काळीं इंग्रजांचे गुलाम झालों. पुढें त्यांनीं आपल्यास निःशस्त्र, निर्बल आणि निःसत्त्व केलें. यास आमचा कांहीं इलाज चालला नाहीं, असें म्हणण्यास लाजिरवाणें कां होईना परंतु आपणांस एक निमित्त आहे. परंतु ज्यास शत्रु म्हणून आपण संबोधितों त्याच्या सर्वस्वीं आहारीं जाऊन त्याच्या राहणीचें, आचारविचाराचें, भाषेचें, वागण्याचें, इत्यादि अनुकरण स्वखुषीनें करणें म्हणजे त्या शत्रूचें श्रेष्ठत्व, गुरुत्व, शहाणपण इत्यादि आनंदानें मान्य करण्यासारखें आहे. मग भारतीय संस्कृति उच्च असल्याच्या वृथा वल्गना कशाला ? उच्च असल्यास ती आचरण्यांत लाज कसली ? इंग्रजांचा कित्ता गिरविण्यासारखा असला तर त्यांस 'जा' म्हणून आपण कोणत्या तोंडानें म्हणूं शकतों ! या सर्व दृष्टीनें इंग्रजांचें सर्वतोपरी अनुकरण करणाऱ्या 'किंग्ज कमिशन्ड् ऑफिसर्स'ची जपानी लोक घृणा करीत, आणि म्हणून इंग्रजांशीं त्यांचें जें वर्तन असे तसेंच पुष्कळ वेळां यांच्याशींही असे.

युद्धकैदी झाल्यावर कांहीं जणांस अर्ध्या खणाच्या लहानशा खोलींत चार चार-पांच पांच दिवस बंद करून ठेवीत असत. आठ आठ जणांच्या मनगटास हातकड्या घालून त्यांस अशा लहानशा खोलींत ठेविल्यावर त्यांचे विधी तितके दिवस सर्व तेथेंच व्हावयाचे. थोडें पाणी व भात मिळाल्यास नशीब ! परंतु असले प्रकार लढाईच्या सुरुवातीच्या आठ दहा दिवसांतच झाले व तेसुद्धां शेंकडा एक दोन हिंदी सैनिकांस आणि त्यांतल्यात्यांत अधिकाऱ्यांच्या बाबतींत. गोऱ्या लोकांस मात्र जवळजवळ सर्वांसच सिंगापूर पडेपर्यंत असेंच वागविण्यांत आलें. तथापि फार थोड्या हिंदी लोकांवर असे प्रसंग आले. या बाबतींत बहुधा असें घडलेलें आढळून आलें कीं, ज्यांना ज्यांना म्हणून छळ किंवा अपमान सोसावा लागला त्यांतील बहुतेक सर्व लोक उद्धट, अरेराव, स्वार्थी, रागीट, छलप्रिय किंवा हाताखालच्या लोकांस तुच्छ लेखणारे, तिरसट वगैरे अशाच तऱ्हेचे असत. ज्याला ईश्वराघरचा न्याय म्हणतां येईल त्याचेंच अस्तित्व या बाबतींत चोहोंकडे मला बहुधा दिसून आलें.

हें विस्तृत वर्णन देण्याचा उद्देश एवढाच कीं, कॅप्टन मोहनसिंग आणि त्यांच्याबरोबरचे इतर शिपाई यांस अशा प्रकारचा त्रास किंवा अपमान सहन करावा लागला किंवा नाहीं याबद्दल दुमत आहे. परंतु त्रास झाला असल्यास तो कशा प्रकारचा असेल याची वाचकांना वर दिलेल्या वर्णनावरून कल्पना येईल. अर्थात् या गोष्टी केवळ ऐकीव आहेत, प्रत्यक्ष पाहिलेल्या नाहींत. तो वेळप्रसंग लक्षांत घेतां कॅप्टन मोहनसिंग यांस अशा तऱ्हेचा थोडाबहुत त्रास झाला असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. या मुद्याचें

महत्त्व एवढ्याचकरतां कीं कॅप्टन मोहनसिंग हे स्वयंप्रेरणेनें आणि स्वयंस्फूर्तीनें हिंद्वी स्वातंत्र्याचें निशाण घेऊन उभे राहिले कीं त्यांस मारूनमुटकून तसें उभें करण्यांत आलें ? जपानसारख्या एशियाई राष्ट्राचा विजय ही सर्व आशियाच्या स्वातंत्र्याकरतां आलेली सुवर्णसंधी; ही हातची दवडूं नये व वाहात्या गंगेंत, हिंद्वी स्वातंत्र्याची मुहूर्तमेढ रोवावयास, आपणही हात धुवून घ्यावेत या विचारानें ते जपानशीं सहकार्य करावयास उभे राहिले कीं स्वतःचा जीव बचावावा, त्रास आणि अपमान यांतून सुटावें अशाकरतां त्यांनीं जपान्यांच्या हाताला हात लाविला ? अर्थात् कोणाच्या मनाच्या ठाव घेणें ही सहसा शक्य कोटींतील गोष्ट नव्हे आाणि म्हणून त्यांस प्रथम जपान्यांनीं त्रास देऊन आपलें सहकार्य करण्यास भाग पाडलें असलें तरी ते अधिकारपदावर पोंचल्यावर त्यांच्या सहकाऱ्यांनीं किंवा अनुयायांनीं यावर रंगसफेती केली असेल किंवा त्यांच्या हितशत्रूंनीं राईचा पर्वत करून ते हिंद्वी स्वातंत्र्याच्या सदिच्छेनें प्रवृत्त झालेले नसून केवळ जपान्यांच्या आत्यंतिक छळामुळें तयार झाले असेंही खोटेंच उठविणें शक्य आहे. एवढें मात्र म्हणतां येईल कीं, सरसहा इंग्रजांच्या लष्करी दास्यांत लहानपणापासून वाढलेल्यांस व हिंदी नागरी जीवनाचा आणि इतर शिक्षणाचा ज्यांस संपर्कसुद्धां लागलेला नसतो अशांच्या मनांस हिंदी स्वातंत्र्याची किंवा त्याच्या शक्यतेची कल्पना क्वचितच शिवते.

तथापि कॅप्टन मोहनसिंग यांच्याबद्दल बोलावयाचें म्हणजे असें म्हणतां येईल कीं मूळ कारण कांहींही असलें तरी त्यांनीं जें कार्य हातीं घेतलें तें उज्ज्वल आणि पवित्र होतें. निदान शेवटीं आपलें उद्दिष्ट सफल होत नाहीं व जपान्यांचा आपल्यावर दाब पडत आहे असें पाहिल्यावर त्यांच्या आकांक्षा व सूचना धाब्यावर बसवून त्यांनीं राजीनामा देण्याचें धैर्य दाखविलें. त्यांच्याबद्दल त्यांचे हितशत्रू जें म्हणतात तें जरी खरें धरिलें तरी त्यामुळें त्यांच्या कार्याच्या थोरपणाला कांहीं बाध येत नाहीं. तुलसीदास हा आपल्या स्त्रैणपणामुळें बायकोच्या निर्भत्सनेस पात्र झालेला असला म्हणून त्याच्या पुढच्या संतपणांत त्यामुळें कांहीं वैगुण्य राहात नाहीं. माणसाच्या प्रवृत्तींत बदल करणारीं कारणें अनेक असूं शकतील. कारणांतील न्यून काढून कार्य दोषी ठरवावयाचें हें योग्य नाहीं. नदीचें मूळ व ऋषीचें कूळ मलिन असलें तरी त्यांच्या नंतरच्या पावित्र्यांत त्यामुळें उणेपणा राहात नाहीं. एवढ्याकरतां मत्सर-बुद्धि सोडून, किंवा छिद्रें बघण्याची दृष्टि टाकून आपण परिणामीं अमुक एक काय उपयुक्त ठरलें का निरुपयोगी ठरलें एवढेंच बघावें हें श्रेयस्कर; जन्मतःच स्वातंत्र्याचें कंकण बांधून कोणीच निघत नसतो. पक्ष आणि व्यक्ति यांच्या अतीत अशी दृष्टि आपण ठेविली पाहिजे. मत्सरबुद्धीनें कॅप्टन मोहनसिंग यांच्यावर टीका करणें किंवा जात, धर्म, अथवा इतर संबंध लावून त्यांच्या दोषांवर पांघरूण घालणें किंवा त्यांचे गोडवे गाणें यांपैकीं कोणतेंही चांगलें

नाहीं. कोणत्याही व्यक्तीच्या अथवा गोष्टीच्या गुणदोषांचें सोपपत्तिक विवेचन करून चांगलें असेल तें घ्यावें व वाईट वर्ज्य करून विसरून जावें, हें उत्तम. दुर्दैवानें हिंदी राजकारणांत ही व्यक्ति, पक्ष इत्यादि भेदातीत दृष्टि फारच कमी प्रमाणांत आढळून येते. पक्षभेदानें किंवा व्यक्तिद्वेष करून माणसानें माणुसकीला महाग होऊं नये. येथें एका इंग्रज पुढाऱ्याची गोष्ट मला आठवते. हा गृहस्थ पार्लमेंटचा सभासद असून एका पक्षाचा प्रमुख कार्यकर्ता होता. यानें एकदां एका गांवीं व्याख्यान दिलें. तेव्हां याच्या भाषणानें हुरळलेला एक तरुण त्यास व्याख्यानानंतर भेटून म्हणाला, " आपलें सर्व म्हणणें मला पटलें; आपल्या पक्षास मिळण्याचा माझा मानस आहे. " त्या पुढाऱ्यानें त्याला उत्तर दिलें, " अरे, असा उतावीळ होऊं नकोस. माझ्या पक्षास सभासद मिळविणें हाच माझ्या व्याख्यानाचा मतितार्थ तुला वाटला असला तर माझें व्याख्यान तुझ्यापुरतें तरी फुकट गेलें असेंच मी समजेन. अमुक एका पक्षाला मिळणें हा मुख्य उद्देश नाहीं. परंतु देशकार्य हें मुख्य. "

प्रथम बंदी झालेल्या या दोनशें लोकांपैकीं कॅप्टन मोहनसिंग यांनाच जपान्यांनीं मुख्य अधिकारी करण्याचें कारण हें होतें कीं ब्रिटिश हुद्याच्या दृष्टीनें तेच सर्वांत श्रेष्ठ होते. कारण कांहीं का असेना १९४२ च्या हिंदी स्वातंत्र्यचळवळीची दूरपूर्वेतील मुहूर्तमेढ त्यांच्याच हातून रोविली गेली.

प्रथम कोणतें कार्य जर या लोकांनीं हातीं घेतलें असेल तर तें हें कीं, जपान्यांशीं सहकार्य करून त्यांच्या पुढें चालून जाणाऱ्या सैन्याबरोबर गोळीबार चालला असेल अशा आघाडीवर जाऊन इंग्रजांतर्फे लढणाऱ्या हिंदी सैनिकांस ध्वनिक्षेपकांच्या ( लाऊडस्पीकर्सच्या ) साहाय्यानें अथवा त्यांची प्रत्यक्ष गांठ घेऊन इंग्रजांकरतां लढून विनाकारण प्राण न देण्याचा त्यांनीं त्यांस आग्रह सुरू केला. " इंग्रजांचे गुलाम होऊन सोळा रुपयांकरतां उगाच जीव कां देतां ? इथें मलायाच्या भूमीवर तुम्ही मरून इंग्रजांचें साम्राज्य टिकेल परंतु तुम्हांला त्यापासून काय फायदा ? मलाया जपान्यांच्या ताब्यांत असला काय किंवा इंग्रजांच्या अंमलाखालीं असला काय ! उलट इंग्रजांच्या अंमलाखालून एकेक प्रांत जाईल तितकी त्यांची सत्ता दुर्बल होऊन हिंदुस्थानावरील त्यांची पकड ढिली होईल. तुम्ही जिवानिशीं जाल ते जालच आणि शिवाय तुमच्या मुलाबाळांच्या पिढ्यान्‌पिढ्या गुलामगिरीची तरतूद करून जाल. जपानी प्रबल आहेत, त्यांचीच सरशी होणार. इंग्रजांनीं तुमच्या मदतीस हवाई दलही ठेविलेलें नाहीं. इंग्रज तुम्हांस ' काला आदमी ' म्हणून तुच्छतेनें वागवितात. जपानी तर सर्व एशियाटिक लोकांस चाहतात. भगवान् बुद्ध यांस तेही आपला धर्मगुरु या नात्यानें वंद्य मानीत असल्यामुळें हिंदुस्थान ही त्यांची पुण्यभूमि, हिंदी लोक हे त्यांचे धर्मबंधु असे ते मानितात. " अशा प्रकारचा प्रचार त्यांनीं इंग्रजांतर्फे लढणाऱ्या हिंदी सैन्यांत चालू केला. कोणाही

हिंदी माणसास चटकन् पटण्यासारख्याच या गोष्टी होत्या. त्यामुळें हा प्रचार हळूहळू मूळ धरूं लागला यांत नवल नाहीं.

मात्र हें प्रचाराचें काम जोखमीचें होतें. वेळप्रसंगीं कित्येकांस शत्रूच्या गोटांत जाऊन प्रचार करून परत यावें लागे. प्रत्यक्ष रणधुमाळींत जाऊन गोळ्यांचा वर्षाव चालू असतांना ओरडून ओरडून पलीकडील हिंदी बांधवांस प्रतिकार न करण्याचा उपदेश करणें हें तर नेहमींचेंच होतें.

कित्येक हिंदी सैनिक प्रतिकार करण्याचें सोडून जपान्यांच्या पक्षास जाऊन मिळाले कीं त्यांची सहानुभूतिपूर्वक विचारपूस करून त्यांस खावया-प्यावयाला देऊन प्रचार करण्याकरतां म्हणून त्यांस साम्राज्य फौजांच्या गोटांत परत पाठवीत. दोन तीन दिवस नीट खावयाला प्यावयाला न मिळालेला थकला भागलेला जीव– दाढी वाढलेला, कपडेलत्ते फाटलेला, क्वचित् जखमी झालेला, जीव बचावून जिंकणाऱ्या बाजूकडे आश्रयार्थ आलेला असा जीव तो–त्याला सहानुभूतीचे चार शब्द, अभय, खाद्य आणि कपडे इतकें मिळाल्या-वर आणखी काय पाहिजे ! त्याच्या या गरजा भागविणाऱ्याकरतां तो आनंदानें प्राणार्पणही करण्यास तयार होई. अशा रीतीनें स्वतःचा अनुभव सांगणारे पुष्कळ हिंदी सैनिक जपान्यांचा पाहुणचार भोगून परत इंग्रजांच्या गोटांत येत. त्यांचा हा अनुभव कर्णोपकर्णीं होऊन सर्वांस विदित होई. याचबरोबर, जपानी गोऱ्या लोकांस चांगले वागवीत नाहींत एवढेंच नव्हे तर जिवंतसुद्धां ठेवीत नाहींत अशा बातम्या प्रसृत झालेल्या होत्या. त्यामुळें गोऱ्या सैनिकांची पांचावर धारण बसत असे. ' जपानी विमानें आलीं ' किंवा ' जपानी आला ' असें म्हटलें कीं त्यांचा चेहरा फिक्का पडूं लागे. कित्येक गोरे अधिकारी या विचारानें रडकुंडीस येऊन आपल्या हिंदी कनिष्ठांस म्हणत, " तुमचें बरें आहे बाबांनो ! आमची तर कांहीं खैर नाहीं ! "

कॅप्टन मोहनसिंग आणि त्यांचे लोक यांच्या प्रचारानें पहिला फायदा हा झाला कीं, एवींतेवीं ब्रिटिश लोक हरणार हें स्पष्ट दिसत होतें. कारण त्यांचे-कडे त्वेषानें आणि देशाभिमानानें लढणाऱ्या शिपायांचा, हवाईदलाचा, आर-माराचा वगैरे सगळ्याच महत्त्वाच्या गोष्टींचा अभाव होता. उगीच लढाईची लांबण लावून गरीब बिचारे हिंदी लोक मात्र निष्कारण प्राणास मुकले असते. तेव्हां त्यांचा प्रतिकार कमी होऊन त्यांची प्राणहानि तरी वांचली. दुसरा महत्त्वाचा फायदा म्हणजे पूर्वींपेक्षां जपान्यांनीं हिंदी लोकांस त्यांतल्या त्यांत चांगलें वागविण्यास सुरुवात केली. त्यांची पूसतपास होऊं लागली. छळ कमी झाला. एकमेकांच्या स्वभावाचें एकमेकांस परीक्षण करितां आलें. व पुढील सह-कार्याचा पाया घातला गेला.

## युद्धस्य कथा रम्याः : ६

डिसेंबर महिन्याच्या ८ तारखेस पहांटे जपान्यांनीं हाँगकाँग, फिलीपीन्स, मलाया, सयाम, ग्वाम आणि वेक नांवाचीं प्रशान्त महासागरांतील बेटें इत्यादींवर एकदम एकाच वेळीं सैन्यें उतरवून चढाई सुरू केली. त्याचप्रमाणें वर उल्लेखिलेल्या महत्त्वाच्या ठिकाणीं व पर्ल हार्बर ( हवाई बेटावरील प्रशान्त महासागरांतील अमेरिकेचा मुख्य आरमारी तळ ) यावर महत्त्वाचे हवाई हल्लेही केले. सयामनें केवळ साडेपांच तासांच्या प्रतिकारानंतरच जपानशीं सलोखा करून त्यांच्या सर्व मागण्या मान्य करून त्यास मित्र म्हणून आपल्या देशांतून युद्धविषयक वाहतूक व इतर बाबती यांत सवलती दिल्या. सयामची लोकसंख्या अवघी एक कोटि साठ लक्ष. ह्या चिमकुल्या व मागासलेल्या राष्ट्राचा जपानसारख्या बलाढ्य आक्रमकाला प्रतिकार तो काय असणार !

पर्ल हार्बर या बंदरांत असलेलें प्रशान्त महासागरावरील अमेरिकेचें सबंध आरमार पहिल्याच हवाई हल्ल्यांत नेस्तनाबूत झालें याबद्दल अमेरिकन लोकांनीं बरेंच आकांडतांडव केलें.. परंतु ‘ लढाईंत वा प्रेमांत सर्व गुन्हे माफ असतात ’ अशी इंग्रजीच म्हण असल्यामुळें अमेरिकन लोकांस, युद्धाची औपचारिक घोषणा करण्याचे अगोदर जपान्यांनीं हल्ला करून त्यांचें आरमार गारद केलें याबद्दलचें शल्य इतकें बोचावयास नको !

दूरपूर्वेंतील मलाया, ब्रह्मदेश, जावा, सुमात्रा, बोर्निओ, फिलीपीन्स, हाँगकाँग इत्यादि प्रदेश जपान्यांनीं इतक्या झपाट्यानें काबीज केले कीं त्याचें इंग्रज, अमेरिकन व डच आदि साम्राज्यवादी लोकांस तर आश्चर्य वाटलेंच परंतु स्वतः जपान्यांसही आश्चर्य वाटलें. या साम्राज्यशाही व बलवान समजल्या जाणाऱ्या राष्ट्रांची सत्ता इतकी पोकळ नि कमकुवत असेल याची जपान्यांसही नीटशी कल्पना नव्हती. हाँगकाँग हें इंग्रजांचें आरमारी ठाण्याचें बेट डिसेंबर महिन्याच्या २५ तारखेस म्हणजे युद्ध सुरू झाल्या दिवसापासून अवघ्या सतरा दिवसांत पडलें, तेव्हां तर साऱ्या जगाला आश्चर्याचा धक्का बसला.

मलाया देशाचा पूर्वेकडील अर्धा भाग अजून दाट अरण्यानेंच व्यापिलेला आहे. यांत वाहतुकीचीं साधनें तर जवळजवळ नाहींतच. क्वचित् ठिकाणीं जेथें जस्ताच्या खाणी आहेत तेथें मोटारी जातात. इतरत्र सगळीकडे दाट अरण्य, लहान लहान ओढे, दलदल, पर्वतराशी व खोरीं आहेत. पश्चिम भागांतून मात्र बरीच वस्ती झालेली आहे. हासुद्धां भाग खरा डोंगराळच;

यांतही अधूनमधून पुरातन घनदाट अरण्य दिसतें. परंतु बऱ्याच ठिकाणीं पूर्वीचें रान कापून त्याचे जागीं रबराच्या झाडांची दाट लागवड करण्यांत आली आहे. मलायांत ऋतुपालट कधींच होत नाहीं. आपल्या इकडील चैत्र महिन्यांतल्यासारखा सतत बारा महिने उन्हाळा व अधूनमधून एक दोन दिवसांनीं, दोन तीन तास पावसाच्या जोरांत सरी. यामुळें येथें उंच व दाट झाडांची वनश्री नैसर्गिक रीत्याच तयार होते.

मलायाच्या या पश्चिम भागांतून दक्षिणोत्तर असा एक लोहमार्ग, मोटार-वाहतुकीचा एक डांबरी रस्ता असे दळणवळणाचे दोनच मार्ग असल्यामुळें व इतर ठिकाणीं दऱ्याखोरीं, पर्वतराशी आणि अरण्यें इत्यादि असल्यामुळें शत्रु येणार तो याच दोन मार्गांनीं. इतर ठिकाणांहून शत्रूचें पायदळ येणें शक्य नसतें. परंतु आजकालच्या यांत्रिक युद्धाच्या कालांत तोफा, रणगाडे, चिलखती मोटारी इत्यादि पायदळाच्या मदतीस आवश्यक अशी जड यंत्रसामुग्री दऱ्याखोऱ्यांतून आणणें जवळजवळ अशक्यच असतें. गनिमी कावा खेळणारा एकादा जबरदस्त शत्रु आपलें पायदळ अधूनमधून दऱ्याखोऱ्यांतून पाठवीत राहिलाच तर एखाद्या दुर्बल आणि रणशौर्यहीन शत्रूस भेदरवून टाकण्यापलीकडे त्याचा कांहीं उपयोग नसतो. तांत्रिक दृष्ट्या अशा देशाचा बचाव करणें सोपें असतें. कारण अशा देशाच्या बंदोबस्ताची व्यवस्था नैसर्गिक रीत्याच कडेकोट असते. अर्थात् मलायाच्या संरक्षणार्थ तो डांबरी रस्ता व लोहमार्ग या दोन्ही मार्गांचें संरक्षण केलें तरी पुरे होतें. म्हणून येथील लढाया बहुतेक या दोन मार्गांवरील मुख्य ठिकाणांच्या दोन्ही बाजूलाच होत. व या दोन मार्गांवरीलच प्रमुख स्टेशनांच्या व गांवांच्या दोन्ही बाजूंस चुराडा झालेले रणगाडे, मोटारी, चिलखती गाडे, बाँबचे खळगे इत्यादि दिसत.

हातघाईच्या लढाया मलायांत फारच कमी झाल्या. जपान्यांच्या तोफेचे गोळे येऊं लागले किंवा रबराच्या जंगलांतून त्यांचा प्रत्यक्ष गोळीबार किंवा तसले नकली आवाज होऊं लागले कीं साम्राज्य फौजा ' शत्रु आला रे आला ' म्हणून आपला तळ उठवून मागें पळत.

जपानी विमानांचे तांडे बहुधा दिवसांतून तीनदां इंग्रजांच्या निरनिराळ्या वाहतुकीच्या मार्गांवरील तळांवर, जंगलांतील छावण्यांवर, चालत्या आगगाड्यांवर, सामान वाहणाऱ्या मोटारींच्या तांड्यावर, अगदीं खालीं येऊन बाँम्सचे व मशीनगन्सच्या गोळ्यांचे हल्ले करीत. जपानी विमानांचा नेम सहसा कधीं चुकत नसे इतके ते या विद्येंत पारंगत झाले होते. मी डिसेंबर महिन्याच्या २७ तारखेस जेव्हां सिंगापूरहून कोलालंपूर या अडीचशें मैल दूर असलेल्या गांवीं आगगाडीनें जात होतों त्या वेळेस या रेल्वेवरील गार्ड, तिकिट तपासणारे वगैरे हिंदी अधिकारी ( बहुतेक अधिकारी सीलोनमध्यें स्थायिक झालेले तामिळ हिंदुच आहेत. यांस ' जाफना ' लोक म्हणतात. ) सहानुभूतिपूर्वक कुजबुजत सांगत असत, " हे

गोरे लोक मोठे वाईट आहेत. बॉंबहल्ले होत असतांनाही आम्हांला सुरक्षित ठिकाणीं जाऊं देत नाहींत ... ... परवां बॅटिंग या ठिकाणीं रेल्वे स्टेशन-वर बॉंब पडले तेव्हां तेथील स्टेशनमास्तर सहकुटुंब सहपरिवार गारद झाला... यदाकदाचित् या गाडीचा पाठलाग जपानी विमानांनीं सुरू केलाच तर तुम्ही या बाकावरून उठून डब्याच्या त्या टोंकास जाऊन दोन्ही बाजूंस शौचकूप असलेल्या या दोन डब्यांस जोडणाऱ्या लहानशा बोळांत उभे रहा म्हणजे वांचण्याची जास्त शक्यता...काय करणार, कठिण दिवस आले आहेत खरे. आमचे एंजिन-ड्रायव्हर्स बरेचसे कामावरच येत नाहींत युद्ध सुरू झाल्यापासून...जपानी लोक हिंदुस्थानी लोकांस चांगलें वागवितात म्हणे. परंतु हे गोरे लोक गेल्याशिवाय काय...हं...यांतून सुटूं तेव्हां खरें... अहो काय म्हणतात त्यांतलं!"

इकडे समुद्रमार्गेंसुद्धां पश्चिम किनाऱ्यावरून छोट्या छोट्या होड्यांच्या साहाय्यानें जपानी सैन्याच्या लहान लहान तुकड्या मलाया द्वीपकल्पांत ठिकठिकाणीं प्रवेश करूं लागल्या. अशा रीतीनें आपल्या पिछाडीससुद्धां जपानी आले आहेत हें हिंदी शिपायांना कळावयाचाच अवकाश कीं आपण पुढून व मागून दोहोंकडून घेऱ्यांत आलों आहोंत असें समजून व स्वतःच्या नशिबाला आणि इंग्रजी लष्करी शासनपद्धतीला दोष देत देत ते शस्त्रास्त्रें टाकून शरण जाण्याची तयारी करीत. शत्रूची संख्या किती आहे, त्याच्याजवळील शिधा व शस्त्रसामुग्री किती दिवस पुरण्यासारखी आहे, आपल्यास त्याचा प्रतिकार कसा करितां येईल या गोष्टींचा विचार न करितां समोर येईल त्या एकट्यादुकट्या जपान्यास ते पांढरा झेंडा दाखवीत किंवा जवळपास जपानी कोठें आहेत तें शोधून काढण्याकरतां व त्यांच्याशीं सलोखा करण्याकारतां एखाद्या हिंदी अधिकाऱ्यास शांतिदूत म्हणून पाठवीत.

कोणालाही युद्ध यशस्वी करावयाचें असेल तर लढणारा प्रत्येक शिपाई वैयक्तिक रीतीनें ध्येयप्रेरित झालेला असल्याची खबरदारी घ्यावी लागते. नेता जिवंत असेपर्यंतच लढण्याची पूर्वीची प्रथा मोठी घातक होती. आतां ती मागें पडली आहे. प्रत्यक्ष विजयश्री हातांत माळ घेऊन उभी असतांनाही या अनिष्ट प्रथेमुळें पानपतच्या युद्धाचा किती भयंकर शेवट झाला हें आपणांस माहितच आहे. बरें, उलट प्रत्येक लहानसहान अधिकारी अथवा त्याच्या तुकडींतील शिपाई जर जयापजयाची शक्यता आपल्या मनाशीं ठरवून त्याप्रमाणें स्वैर वर्तन करूं लागला तरीही बाजू कोलमडावयास मुळींच वेळ लागत नाहीं हें आपणांस मलाया, जाव्हा, सुमात्रा इत्यादि देशांच्या अल्प कालांत झालेल्या पाडावावरून पाहावयास सांपडतें. करितां या दोन्ही प्रथा त्याज्य ठरवून प्रत्येक शिपायाच्या मनाची व्यक्तिशः जय मिळेपर्यंत अथवा मृत्यु येईपर्यंत लढण्याची तयारी करणें हें प्रत्येक सेनानायकाचें आद्य कर्तव्य ठरतें. लढाईस तोंड लागल्यावर, नेता कोठें

आहे हें बघण्याच्या अथवा जय मिळेल किंवा नाहीं हें ठरविण्याच्या फिकिरींत पडणार नाहीं तोच खरा शिपाई !

मलाया द्वीपकल्पाच्या उत्तरेस पश्चिम किनाऱ्यावर पेनांग हें लहानसें बेट आहे. या बेटाच्या व मलाया द्वीपकल्पाच्या दरम्यान जी खाडी आहे ती बोटीनें ओलांडण्यास सुमारें अर्धा तास लागतो. या बेटांत हिंदी सैन्याची सुमारें साडे-तीनशें सैनिकांची एक तुकडी होती. जपान्यांची सरशी होत असून ते विद्युद्वेगानें पुढें सरकत आहेत हें ऐकून येथील इंग्रज अधिकाऱ्यांनीं जपा-न्यांच्या वेढ्यास घाबरून आपली सर्व फौज काढून मलाया द्वीपकल्पावर न्यावयाचें ठरविलें. दरम्यान जपानी विमानें लागोपाठ तीन दिवस सकाळीं ९ वाजतां टेहळणीसाठीं म्हणून पेनांग बेटावरून उडत जावयाचीं. लोकांना तो एक तमाशाच वाटून ते आकाशाकडे तोंड करून रस्त्यांत गर्दी करून उभे राहात. चवथ्या दिवशीं जपान्यांनीं जेव्हां प्रत्यक्ष बाँबहल्ला सुरू केला तेव्हां लोकांची एकच दाणादाण होऊन बरीच प्राणहानि झाली. आगाऊ ठरल्याप्रमाणें इंग्रज अधिकारी डिसेंबर महिन्याच्या १६ तारखेस सर्व फौजफाटा आणि सर्व गौर-वर्णी नागरिकांस घेऊन मलाया द्वीपकल्पांत निघून गेले. जातांना एका प्रति-ष्ठित तामिळ हिंदी नागरिकाच्या हातीं त्यांनीं सर्व सत्ता दिली. दोन तीन दिवस पेनांग शहरांत कोणीच शास्ता न राहिल्यामुळें घरफोड्या, चोऱ्या, लुटालूट इत्यादि प्रकार शहरांतून सर्रास होऊं लागले. बाँबनें उध्वस्त झालेल्या घरांचीं व दुकानांची लुटालूट झाली यांत कांहीं नवल नाहींच, परंतु इतरत्रही दिवसच असे असल्यामुळें कोणीही धाकदपटशा दाखवावा आणि वाटेल ती लूट करावी असें चाललें होतें.

इंग्रज निघून गेल्याबरोबर या हिंदी अधिकाऱ्यानें तेथील तुरुंगांत स्थान-बद्ध असलेल्या १०–१२ जपानी नागरिकांस बंधमुक्त करून त्यांस होड्या घेऊन जाऊन जपानी सैन्यास व अधिकाऱ्यांस पाचारण करण्यास सांगितलें. पेनांग बेटांतून इंग्रजांनीं सरसकट सर्व गोरे लोक आणि फौजफाटा काढून घेतला हें जपानी अधिकाऱ्यांस न कळल्यामुळें व हळूहळू त्यांची सेना पेनांगच्या जवळ जवळ येत चालल्यामुळें पेनांगवरील शेवटच्या हल्ल्याची नांदी म्हणून त्यांनीं पेनांगवरील हवाई हल्ले चालू ठेविले होते.

बंधमुक्त केलेले हे जपानी नागरिक होडीच्या साहाय्यानें मलायाच्या उत्तरेस किनाऱ्याकिनाऱ्यानें जाऊन जपानव्याप्त मलायाच्या प्रदेशांत उतरले व त्यांनीं तेथील जपानी लष्करी अधिकाऱ्यांस पेनांगमधील खरी परिस्थिति निवेदन करून फौजफाट्यासकट येऊन पेनांग बेटाचा ताबा घेण्यास त्यांस पाचारण केलें. त्यांनींही पेनांगवरील हवाई हल्ले ताबडतोब थांबवून २० तार-खेस फौजफाट्यासह पेनांग बेटावर उतरून तेथें आपली सत्ता प्रस्थापित केली.

मलायाच्या या धांवत्या लढ्यांत इंग्रज कसे गोंधळून गेले होते याचें

एक गमतीदार उदाहरण येथें देण्यासारखें आहे. उत्तरेकडून जपानी, मलाया द्वीपकल्पांत शिरून ' जितम्...जितम् ' करीत जेव्हां दक्षिणेकडे सरकूं लागले तेव्हां सुमारें दोनशें मैलाचा प्रदेश काबीज केल्यावर एके ठिकाणीं इंग्रजांच्या आघाडीच्या तळावर त्यांच्या तोफांचा भडिमार चालला होता. अचानक तोफेचे गोळे येऊन पडूं लागल्याबरोबर तेथील इंग्रज अधिकाऱ्यानें पीछेहाट करण्याचें ठरविलें. एकदम हजार दोन-हजार लोक रस्त्यानें नेल्यास जपानी विमानांस दिसून त्यांच्या हल्ल्यास बळी पडण्याचा संभव म्हणून त्यानें आपल्या सैन्याच्या दोन तुकड्या करून त्यांना मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूंनीं परंतु जंगलांतून मार्ग काढीत दक्षिणेकडे कूच करण्यास सांगितलें. एक दोन जपानी शिपाई जंगलांत कोठेंतरी लपलेले होते. त्यांनीं बंदुकीच्या कांहीं गोळ्या या माघार घेणाऱ्या सैनिकांवर झाडल्या. त्याबरोबर जपान्यांनीं आपल्याला गांठलें असल्याचा संशय येऊन त्यांतील एका तुकडीनें रस्त्याच्या पलीकडील बाजूस गोळीबार करण्यास सुरुवात केली. हा गोळीबार जपान्यांचा असावा असें समजून पलीकडे असलेल्या इंग्रज सैन्याचाच तुकडीनें या तुकडीवर उलट गोळीबार सुरू केला. अशा तऱ्हेनें दोन्ही तुकड्या धांवत पळत जंगलांतून मार्ग काढीत आपापसांतच नकळत गोळीबार करीत होत्या. यामुळें प्राणहानि मात्र फार झाली. व कलागती लावून आपण नुसती गंमत पाहात बसणाऱ्या जपानी नारदमुनीचें आयतेंच काम झालें !

एका प्रसंगीं साम्राज्य फौजांपैकीं एका हिंदी तुकडीनें जंगलांत एके ठिकाणीं तळ दिलेला होता. दुपारीं २ वाजण्याच्या सुमारास अचानक कांहीं अंतरावरून " अरे बचाओ–बचाओ...मुझे कोई बचाओ " अशी अस्सल हिंदुस्थानींत एक हृदयद्रावक किंकाळी ऐकूं आली. जवळ कांहींही शस्त्रास्त्रें वगैरे न घेतां केवळ कुतूहलानें या हिंदी तुकडींतील बरेचसे लोक आपापलीं कामें सोडून, होते तसेच तिकडे धांवले. " अहो वांचवा वांचवा " म्हणून धांवा करणारा कोणी माणूस अंगाभोवतीं एक कांबळें गुंडाळून त्यांत विव्हळत आणि गडबडां लोळत पडला होता. ते बरेचसे निःशस्त्र हिंदी सैनिक आपल्या रोखानें येत आहेत असें त्यानें हळूच किलकिल्या डोळ्यांनीं अंगावरील पांघरुणाच्या आडून बघितलें; आणि तो हातांतील लपविलेली मशीनगन त्यांच्यावर रोखून धरीत पांघरूण फेकून देऊन ताडकन् उठला. आलेल्या लोकांस हात वर करण्याशिवाय गत्यंतरच उरलें नाहीं ! तिकडे दहा बारा जपान्यांनीं उरलेल्या तुकडीवर हल्ला करून कित्येकांस अचानक निःशस्त्र स्थितींत गांठून कैद केलें तर इतरांस ठार मारिलें.

हवाई हल्ला करण्यासाठीं विमानें येऊन त्यांनीं इतस्ततः बॉम्ब्स् व मशीनगन्स्च्या गोळ्या यांचा मारा सुरू केला म्हणजे कांहीं धर्मभोळे मुसलमान कुराणाच्या पोथ्या गळ्यांत बांधून फिरत अथवा त्यांना घट्ट छातीशीं आवळून धरीत.

हिंदूपैकीं कांहीं मारुतिस्तोत्र म्हणत, कोणी रामरक्षा इत्यादींचा पाठ करीत. हवाई हल्लयांतील धूमधडाक्याचा व विमानांचा वेग वाढला म्हणजे त्यांच्या या स्तोत्रपठनाचाही वेग वाढत असे! कोणी श्रीकृष्णाचा फोटो सतत जवळ बाळगी तर कोणी एखाद्या देवीचा. कांहीं कांहीं नास्तिक लोकसुद्धां, देवाला श्रेय गेलें तरी हरकत नाहीं पण प्राण वांचले म्हणजे मिळविली अशा हेतूनें, रामनामाचा जप करूं लागले आणि ईश्वराचें अस्तित्व मानूं लागले. कोणी लढाईच्या काळांतील प्रक्षोभकारक दृश्यें पाहून 'ईश्वर नाहीं' असेंच म्हणूं लागले. युक्तप्रांतांतील सैन्यांत शिरलेला एक भय्या अशा विमानहल्ल्याच्या वेळीं सतत म्हणत असे, "बजरंगबली, इस हवाई जहाजों को दर्याके पार ले जा!"

एकदां विमानहल्ला चालला असतांना जंगलांत एका वृक्षाच्या आसऱ्याला, त्याच्या बुंध्याभोंवतीं पांच सहा मंडळी पाठी टेकून धडधडत्या हृदयानें बसलेली होती. सुमारें शंभर गजांच्या अंतरावर एक बॉंब पडला. सर्व जमीन हादरली. त्या बॉंबच्या कवचाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडून शिशाचे लाल जळजळीत जड तुकडे वांकडे तिकडे कापले गेल्यामुळें त्यांना तीक्ष्ण धार उत्पन्न होऊन इतस्ततः उडून पडले. त्याबरोबरच मातीचीं ढेकळें, दगड इत्यादिही उडाले. एक मातीचें ढेकूळ, झाडाच्या बुंध्यास टेकून बसलेल्या मंडळीपैकीं एका 'अमरसिंगा'च्या छातीवर जोरानें येऊन आदळलें. तत्क्षणीं बिचारा वज्राघात झाल्याप्रमाणें छाती दडपून मरणाच्या मार्गावर चालूं लागला!

पंधरा वीस मैलांच्या अंतरावर बॉंबहल्ला होत असला म्हणजे मेघांचा गडगडाट व्हावा तसा अथवा बऱ्याच उंचीवरून मोठमोठे फत्तर खालीं टीनच्या पत्र्यांवर टाकावे त्याप्रमाणें धीरगंभीर असा धडम्...धडम् धडधड धडधड आवाज होतो. सिंगापुराच्या उत्तरेस खाडीच्या पलीकडे असलेल्या जोहोर संस्थानाच्या राजधानीच्या जोहोर बारू या शहरांत इंग्रजांच्या बहुतेक सर्व तुकड्या पीछेहाट करून आलेल्या असतांना एके दिवशीं सायंकाळीं ७ वाजण्याच्या सुमारास तीन्हीसांजा असतांनाच सैन्यांतील नियमाप्रमाणें बहुतेक सर्वांचीं जेवणें झालेलीं होतीं. अजून झोंपीं जाण्याची वेळ झालेली नसल्यामुळें जो तो गप्पा मारीत व इतर फावल्या वेळचे उद्योग करीत बसला होता. एकाएकीं कांहीं कल्पना नसतांना असा जोराचा कडकडाट आणि 'फाड् फाड्' असा भयंकर आवाज झाला कीं ज्यानें त्यानें तो हवाई हल्लाच समजून खालच्या मजल्यावर जाण्याकरतां म्हणून जिन्याकडे धांव घेतली. हवाई हल्ल्याचा सूचनात्मक भोंगा झाला नसतांना विमानांनीं अचानक येऊन हा हल्ला केला कीं काय असा विचार क्षणमात्र सर्वांच्या मनांतून चमकून गेला. त्यानंतर मात्र कांहींच आवाज झाला नाहीं. थोड्या वेळानें धोका नाहीं अशी मनाची खात्री झाल्यावर जो तो आकाशाकडे बघूं लागला. सुमारें एका मैलाच्या अंतरावर आकाशांतून ढगांचा एक काळाभोर लोट निमूळता जमिनीला येऊन टेंकलेला

होता व त्या बाजूचें आकाश काळेंभोर झालेलें होतें. बहुतेक वीजच पडली होती कोठें तरी !

जोहोर बारू शहरांतील गोष्ट. जपानी सैन्यानें मलायम द्वीपकल्प बहुतेक सर्व जिंकीत आणलें होतें. फक्त हें शेवटलें टोकाचें जोहोर संस्थानच तेवढें पादाक्रांत करावयाचें राहिलें होतें. साम्राज्य फौजांच्या तुकड्या पीछेहाट करीत जोहोर बारू या शहरांत तळ देत होत्या. आकुंचित अशा या जागीं एकत्र झालेल्या या सेनेस चांगलाच हात दाखवावा या उद्देशानें १९४२ जानेवारी महिन्याच्या १२ तारखेस सकाळीं १० वाजतां जपान्यांनीं एकशेंबारा विमानें हवाई हल्ल्यासाठीं जोहोर बारू शहरावर पाठविलीं. एवढा मोठा तांडा येत असतांना आपल्या एकाही विमानानें त्यांच्या प्रतिकारार्थ हजर असूं नये हें दिसावयास फारच चमत्कारिक दिसेल म्हणून जनाची नाहीं तर मनाची तरी, या विचारानें इंग्रजांनीं नवसाचीं सहा विमानें जेमतेम वर पाठविलीं. जपानी विमानांचे बळी घ्यावयास खालून, वर तोंडें केलेल्या तोफांचे गोळे आकाशांत इतस्ततः फुटत होतेच. तोफेचा गोळा आकाशांत फुटतांना (दिवसा उजेडीं) एखाद्या ताऱ्या-प्रमाणें क्षणमात्र चमके आणि लगेच त्या ठिकाणीं धुराचा गोळा दिसे. आकाशांत सगळीकडे असे धुराचे गोळे फुटत असतांनाच त्यांमधून हीं एकशेंबारा विमानें धीरगंभीर यांत्रिक भुभुःकार करीत आपला मार्ग क्रमीत होतीं. संगीतास तबल्या-डग्याची साथ असावी त्याप्रमाणें एकशेंबारा विमानांच्या या यंत्र-संगीतास खालून तोफांच्या धडाम्...धुम्‌ची साथ मिळत होती. इंग्रजांचीं सहा विमानें वर पोंचतांच बाणाकृतींत पुढें सरकत असलेलीं हीं जपानी विमानें इकडेतिकडे पांगलीं. एक मोठें वर्तुळ करून त्यांनीं इंग्रजांचीं तीं सहा विमानें त्या कोंडींत पकडलीं. अशा रीतीनें कोंडींत सांपडल्यावर त्यांच्यावर सभोंवारच्या जपानी विमानांनीं मशीनगन्सच्या गोळ्यांचा नुसता पाऊस पाडण्यास सुरुवात केली. त्या सहा विमानांनींही थोडाबहुत उलट गोळीबार केला परंतु तो अगदींच लेचापेचा आणि कुचकामाचा ठरला. जपान्यांच्या कांहीं विमानांनीं त्या सहा विमानांच्या डोक्यावर उड्डाण करून वरून खालीं मशीनगन्स डागल्या, तर इतर कांहीं विमानांनीं खालीं जाऊन त्या सहा विमानांच्या रोखानें खालून वरच्या दिशेनें गोळीबार सुरू ठेविला. अशा रीतीनें त्या सहापैकीं दोन विमानांची चाळणी होऊन तीं कोसळून खालीं पडलीं. एकाचें पेट्रोलचें टाकें फुटून त्यास आग लागली. उरलेल्यांनीं पळ काढण्यास सुरुवात केली; परंतु तींही, विश्वा-मित्रानें केलेल्या यज्ञाच्या वेळीं रामलक्ष्मणांनीं मारलेल्या राक्षसांप्रमाणें लांब कोठेंतरी जाऊन आदळलीं. एक दोन वैमानिक व त्यांचे साथीदार हवाई छत्रीच्या साहाय्यानें खालीं उतरतांना दिसले. पैकीं एकतर बिचारा एका झाडावरच येऊन आदळला. त्यामुळें त्यास फार तीव्र स्वरूपाच्या जखमा झाल्या. एका

फांदीनें त्याच्या कमरेंत भोंक पाडलें. त्याच्या गुढघ्याचीं हाडें तुटलीं. मस्तका-सही मार बसला व तो लवकरच वेदनांनीं विव्हल होऊन मरण पावला.

दुसरे दिवशींच्या इंग्रजांच्या युद्धपत्रकांतून मात्र नेहमींप्रमाणें असें जाहीर झालें : " आमच्या सहा वैमानिकांचा पराक्रम! त्यांनीं शत्रूच्या एकशें-बारा विमानांचा पाठलाग केला व पैकीं सदतीस तरी हमखास खालीं पाडलीं; शिवाय आणखी तेवीस बहुतेक नक्कीच कोठेंतरी कोसळलीं असावींत; आणि चव्वेचाळीस विमानांस बरीच हानी पोंचविली. यांत आमच्या फक्त एका विमानाचें थोडें फार नुकसान झालें व एक वैमानिक बेपत्ता आहे."

१९४२ च्या फेब्रुवारी महिन्याच्या १ ल्या तारखेस जपान्यांनीं सर्व मलाया द्वीपकल्प पादाक्रांत केलें. सिंगापूर बेट तेवढें इंग्रजांच्या ताब्यांत असून मधोमध दोन फर्लांगाची खाडी व पलीकडे मलाया द्वीपकल्पांत जपानी सेना अशी त्या दिवशीं ( १ फेब्रुवारी रोजीं ) परिस्थिति होती. इंग्रजांनीं त्या खाडीवरील पुलावरून येतांना सबंध पूल उडविण्याच्या उद्देशानें त्याखालीं ठिकठिकाणीं स्फोटक पदार्थ रचून स्फोटाची तयारी करून ठेविली होती. परंतु प्रत्यक्ष मलाया सोडून पूल पार करून सिंगापूर बेटांत यावयाच्या वेळेस त्यांनीं जोहोर बारू शहरास लागलेलें पुलाचें टोंकच तेवढें दारूगोळ्यानें उडविलें. उरलेला सर्व पूल जसाच्या तसा शाबूत राहिला.

आतां सिंगापूर बेटाच्या लढाईस सुरुवात होणार होती. सबंध मलाया द्वीपकल्प जपान्यांच्या ताब्यांत गेलें होतें. खालीं दक्षिणेस समुद्रावर जपान्यां-च्या आरमाराचेंच राज्य होतें. तिकडील इंग्रजी आरमार तर केव्हांच नाश पावलेलें होतें. लहानसान होड्यांतून पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या इंग्रजां-कडील लोकांस जपानी आरमार व हवाई दल यांनीं चांगलाच हात दाखविला. कित्येक जण जलसमाधींतून वांचून असाहाय्य स्थितींत कसेतरी कोठल्यातरी बेटांवर पोंचून पुनश्च जपान्यांच्या ताब्यांत सांपडले.

मलाया द्वीपकल्प जिंकल्यावर त्याच्या दक्षिणेच्या टोंकावर थोडें थबकून खाडीच्या पलीकडे सिंगापूर बेटावर नजर ठेवून जपान्यांनीं आपल्या हल्ल्याची तयारी जोरांत चालू ठेविली. ता. १ फेब्रुवारी १९४२ पासून ८ फेब्रुवारी-पर्यंत सतत आठ दिवस जपान्यांनीं सिंगापुरावर व ब्रिटिशांनीं जोहोर बारूवर दिवसरात्र तोफांचा भडिमार चालविला होता. रात्रंदिवस दोन्हीकडील तोफांचे धडाड्...धुम् असे पोटांत धस्स् करविणारे आवाज अखंड चालू होते. उद्देश हा कीं मलायाच्या किनाऱ्यावर होड्या जमवून सिंगापूर बेटावर होड्यांच्या साहाय्यानें उतरण्याची तयारी करीत असलेल्या जपान्यांची पांगापांग व फाटाफूट व्हावी. उलट सिंगापूर बेटावर ज्या ठिकाणीं आपल्याला सैन्य उतरावयाचें त्या ठिकाणीं कोणीसुद्धां ब्रिटिश साम्राज्यसैनिक राहूं नये म्हणून जपानी आपल्या तोफा सिंगापुरावर डागीत होते. सिंगापुराला पाणी मलायांतून

पुरविलें जातें. त्या जलवाहिन्यांचा जपान्यांनीं निकाल लाविल्यामुळें सिंगापुरांतील इंग्रजांच्या हृदयाचें पाणी पाणी झालें असल्यास नवल नाहीं !

अखेर ८ तारखेस रात्रीं अंधार पडतांच जपान्यांनीं इतरत्र गुप्त स्थळीं जमविलेला होड्यांचा काफिला जोहोर बारूच्या दक्षिण टोंकास खाडीच्या तोंडाशीं आणून ठेवला. सिंगापूर बेटाच्या उजव्या किनाऱ्यावर बरीच दलदल आहे त्या दिशेनें त्यांनीं तोफांचा भडिमार बेसुमार वाढविला. त्या तोफांच्या गोळ्यांच्या आश्रयाखालीं तो काफिला झपाट्यानें सिंगापुराच्या रोखानें ती दोन फर्लांगाची खाडी ओलांडून आला. दरम्यान इंग्रजांनींही त्या दिशेनें कित्येक तोफा डागण्यास सुरुवात केली. त्या काफिल्यावर कांहीं गोळे पडून पुष्कळ प्राणहानि झाली. जोहोर बारूच्या ज्या किनाऱ्यावर सिंगापुराच्या स्वारीकरतां राखीव जपानी सैन्य कडेकोट तयारी करून चाल करून जाण्याच्या हुकुमाची वाट बघत बसलें होतें त्या ठिकाणीं सुद्धां इंग्रजी तोफांचे गोळे पडून मनुष्य-हानी झाली व जपान्यांची पांगापांग झाली. परंतु एवढें नुकसान सोसूनही जपानी सैन्याची पहिली तुकडी सिंगापुराच्या किनाऱ्यावर उतरलीच. या टोळींत कॅ. मोहनसिंग व त्यांचे दोनशें साथीदार होते. किनाऱ्यावर उतरतांच मागून येणाऱ्या तुकड्यांचा मार्ग सुलभ व्हावा म्हणून एकच गिल्ला करीत सिंगापूर बेटाच्या या उत्तर किनाऱ्यावर ते चोहोंबाजूस पांगले आणि त्यांनीं त्या किनाऱ्या-वर असलेल्या कित्येकांस कापून काढलें. कोणी जायबंदी झाले; कोणी नुस-तेच बंदी झाले. इतर पळून गेले. जपान्यांच्या हातीं दारूगोळा व तोफा असें बरेंच सामान पडलें. या त्यांच्या धांवत्या हल्ल्यानें ९ तारखेच्या प्रातःकाळ-पर्यंत त्यांनीं सर्व किनारा आपल्या ताब्यांत आणला. याच गोष्टीची मार्ग-प्रतीक्षा करीत असलेल्या जपानी सैन्याच्या जोहोर बारूच्या किनाऱ्यावरील तुकड्या भराभर होड्यांत, मोटरबोटींत व जहाजांत बसून सिंगापूर बेटावर ठिकठिकाणीं उतरूं लागल्या. सिंगापूर बेटाच्या आसपास इतके दिवस भुता-सारखें हिंडणारें त्यांचें आरमार आतां उघडपणें सिंगापूर बेटाच्या भोंवतीं गराडा घालून त्या बेटावर तोफा डागूं लागलें. आतां समुद्रमार्गें शत्रूला कसल्याही प्रकारची कुमक पोंचण्याची शक्यता उरली नाहीं. आंतील सैनिकही समुद्रमार्गें इतरत्र जाऊं शकत नव्हते. कांहींनीं लहान लहान होडग्यांतून निस-टून जाण्याचा प्रयत्न केला परंतु तें प्रत्यक्ष मृत्यूलाच आव्हान देण्यासारखें होतें. विमानांनींही आतां सिंगापूर बेटावर दिवसांतून तीन–चार वेळां नियमित-पणें येऊन हवाई हल्ला करण्याची प्रथा पाडली. हळूहळू जपानी सिंगापूर बेटा-वर उत्तरेकडून दक्षिणेकडे मार्ग क्रमीत चालले. इंग्रजी अधिकाऱ्यांचे व त्यांच्या गोऱ्या बायकांचे नाच होतच असत. रात्रीं विमानहल्ल्यामुळें दिवे लावण्याची परवानगी नसे. सिगरेटचें किंवा विडीचेंही जळतें टोंक बाहेर दिसूं नये अशी सर्व सैनिकांस सक्त ताकीद होती. तरी अंधारांतील नाचरंगास खंड

इत्यादींचे आवाज कमी कमी होऊन सात वाजेपर्यंत अजिबात बंद झाले. नंतर दहा वाजेपर्यंत एखाद दुसरा स्फोट अथवा गोळीबाराचा आवाज क्वचित् ऐकूं आला असेल तेवढाच. सगळीकडे शांत झालें.

त्या दिवशीं रात्रीं सर्व ठिकाणीं नेहमीप्रमाणें इंग्रजांचाच पहारा राहावा व ४–५ मैलांवर असलेल्या जपानी फौजांनीं दुसऱ्या दिवशीं सकाळीं गावांत येऊन इंग्रजांकडून शहराचा ताबा घ्यावा असें ठरलें होतें. दुसरे दिवशीं सिंगापुरांतील इतके दिवस कोठल्याकोठें लुप्तप्राय झालेले नागरीक हळूहळू बाहेर येऊं लागले. ओसाड आणि भयाण दिसणाऱ्या त्या शहराला नागरिकांच्या हालचालीमुळें जिवंत शहराचें स्वरूप येऊं लागलें. जो तो भयभीत मुद्रेनें सैनिकांस विचारीत होता कीं " कांहो, खरेंच सिंगापुरांतील युद्ध थांबलें, का ही तात्पुरती विश्रांति आहे ? " इंग्रजांच्या शरणागतीची बातमी जिकडे तिकडे वणव्याप्रमाणें पसरली. इंग्रजी व तत्सम अधिकाऱ्यांच्या चेहऱ्यावर दुःखाची झांक असली तरी " जिवानिशीं सुटलों " म्हणून आनंदही त्यांस होत होता. लग्नसमारंभानंतर सूप वाजल्यावर ज्याप्रमाणें प्रत्येकास एकप्रकारचा भार हलका झाल्यासारखा वाटतो, तद्वत ' नवरा कोणी का असेना ... ... आटोपला एकदाचा पसारा ' असेंच प्रत्येकास वाटत असावें असें प्रत्येकाच्या हालचालीवरून दिसत होतें. त्या दिवशीं सिंगापूर शहरांत एकच गर्दी. जपानी शिपायांच्या मोटारी भरभरून जपानी गांवांत येत होते. ज्यांनीं आजपर्यंत जपानी शिपाई कसा असतो तो त्याच्या नारसिंह रूपांत बघितला नव्हता, असे ' दुश्मन आया–भागो ' असें म्हणणारे शिपाई, आज त्याच्या ' सौम्य ' दर्शनास उत्सुक होत्साते ठिकठिकाणीं गर्द करून उभे राहिलेले दिसत होते. दाढी वाढलेले व श्रमलेले जपानी शिपाई, विजयोत्साहानें मोटारींतून उतरून इकडे तिकडे फिरत निरनिराळ्या वस्तूंचें व इमारतींचें निरीक्षण करीत फिरत होते. कोणी पुढील बंदोबस्त करण्यास लगबगीनें इकडून तिकडे जात होते. लढाईच्या गडबडींत आपापल्या तुकड्यांपासून, अधिकाऱ्यांपासून व मित्रांपासून दुरावलेले हिंदी शिपाई त्यांच्या शोधांत फिरत होते. इंग्रज, ऑस्ट्रेलियन व इतर गोरे शिपाई आणि अधिकारी आपापल्या सामानाची आवरा आवर करून त्याच्या याद्या व त्याची व्यवस्थित रचणी करीत होते. " आपण हरलों कसे " अशा प्रकारची प्रश्नार्थक विस्मयपूर्ण खिन्नता त्यांच्या तोंडावर दिसत होती. एशियाई लोकांचें कधींही न अनुभवलेलें वर्चस्व मान्य करून त्यांच्यापुढें मान तुकवावी लागणार हें शल्य त्यांस टोचीत होतें. इंग्रजी चौक्या पहाऱ्यावर जपानी शिपाई आपापले चौक्या पहारे बसवून त्यांस मोकळे करीत होते. बॉबनें लागलेल्या आगी कोठें धुमसत होत्या तर कोठें कोठें होमकुंडाप्रमाणें जळत होत्या. उध्वस्त झालेल्या दुकानांतून व घरांतून लुटालूट व झोंबाझोंबी चालली होती. यांत बहुतेक चिनी व मलाई लोक भाग घेत; क्वचित् हिंदुस्थानीही असत. त्या वेळेस

मारामाऱ्या व खून तर सहज होत. ही लुटालूट एखाद्या रागीट जपानी अधिकाऱ्याच्या दृष्टीस पडली तर तो लगेच आपली तरवार उपसून त्या गर्दीमध्यें जाऊन तिचे वार करीत सर्वांस बाजूला करीत असे. बरोबरच आहे. कारण अशा वेळेस सर्वांची वृत्ति इतकी खुनशी बनलेली असते; प्रत्येकाच्या डोळ्यावर लढाईची धुंदी चढलेली असते. अशा वेळेस अहिंसातत्त्वाचा अहिंसामार्गानें उपदेश करणें म्हणजे हिंसेस उत्तेजन देण्यासारखें आहे. वाटेल त्यानें वाटेल तें करावें असा तो दिवस होता. रस्त्यांतून इतस्ततः फिरणाऱ्या नागरिकांची व सैनिकांची नुसती रीघ लागलेली होती. कांहीं कांहीं सैनिक वेषांतर करून नागरिकांत जाऊन मिसळले आणि आप्तेष्टांजवळ राहिले. गल्ल्याकुच्यांतून मोटार लॉरीज, बसेस इत्यादि नाना प्रकारचीं वाहनें उभीं केलेलीं होतीं. मुंबईत सायंकाळीं "गेटवे ऑफ इंडिया" जवळ मोटारींचा मेळा भरतो तसा नागरिकांच्या गाड्यांचाही सिंगापूरच्या समुद्रकांठीं मेळा भरलेला दिसून येत होता. ठिकठिकाणीं बंदुका, दारूगोळा, संगिनी इत्यादींचे ढीग दृष्टीस पडत होते. कांहीं कांहीं हिकमती माणसांनीं, उभ्या असलेल्या मोटारींपैकीं कोणतीही मोटार ताबडावी, वाटेल त्या मोडक्या दिसणाऱ्या बंगल्यांत आडमार्गानें अथवा राजरोसपणानें कुलूप फोडून शिरावें, दिसतील त्या वस्तू उचलून, पुढें मागें दुकान उघडण्याच्या हेतूनें स्वतःच्या आप्तेष्टांच्या घरीं हें सामान नेऊन भरावें अथवा लगेच कोणत्यातरी अर्धवट उध्वस्त झालेल्या दुकानाच्या जागेंत आपलें दुकान थाटावें, असे कारभार आरंभिले. सैन्याबरोबर, उत्तर प्रदेशांतून आलेल्या नागरिक लोकांकरतां सिंगापुरांतील कांहीं शीख गुरुद्वारांतून व हिंदु देवळांतून अन्नछत्रें सुरू करण्यांत आलेलीं होतीं. त्या ठिकाणीं आज खूप गर्दी झालेली होती. कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं अशी परिस्थिति झालेली. सकाळीं जेवण मिळेल या आशेनें कित्येक लोक गेले. त्यांस "अजून उशीर आहे, दुपारीं ३ वाजतां होईल." असें उत्तर मिळालें. दुपारीं गेलेल्या कित्येक लोकांस सगळ्या अन्नाचा चट्टामट्टा झालेलाच दिसला.

जपान्यांनीं शहरांत येतांच प्रथम इंग्रजांतर्फे काम केलेल्या चिनी, मलाई, हिंदुस्थानी व इंग्रजी गुप्त पोलिसांची हजेरी घेतली. कित्येकांस गोळ्या घालून ठार मारलें. कांहींची कत्तल केली. त्याला कारणेंही तशींच घडलीं होतीं. पूर्वीं इंग्रजी अंमलांत लोकांनीं जपानी दुकानांवर सामुदायिक बहिष्कार घालावा, त्यावर मोठ्या जमावानें दगडफेक करावी इत्यादि प्रकारास सरकारकडून उत्तेजन असे. कित्येक जपान्यांस पोलीस स्टेशनवर रोज हजेरी द्यावी लागे अशी व अन्यप्रकारची अपमानास्पद वागणूक जपान्यांना सहन करावी लागत असे. जपानी-स्वभावास अनुसरून वेळ येईपर्यंत त्यांनीं हें सर्व निमूटपणें गिळलें. परंतु वेळ येतांच त्याचा पुरेपूर बदला घेण्याचें त्यांनीं ठरविलें. न्यायालयें, म्युनिसिपालिट्या, पोलीसखातें, शिक्षणखातें इत्यादि एकूण एक खात्यांचें काम जपान्यांनीं

दुसऱ्याच दिवसापासून इतकें बिनबोभाट, सुरळीतपणें, मुळींच न गोंधळतां, चालू केलें कीं या बाबतींत त्यांची खरोखरच तारीफ करावी तितकी थोडी आहे. गेल्या वर्षीं म्हणजे इसवी सन १९४५ सालीं, युद्ध संपल्यावर जेव्हां सिंगापुरावर इंग्रजांनीं पुन्हां ताबा मिळविला तेव्हां त्यांचीच खातीं पुन्हां सुरू करितांना त्यांनीं इतका गोंधळ केला कीं प्रत्यक्ष इंग्रजांचे पक्षपाती असे त्या त्या खात्यांत काम करणारे ख्रिश्चन व यूरेशियन लोकसुद्धां जपान्यांच्या कार्यक्षमतेची मुक्त-कंठानें स्तुति करूं लागले. तरी जपान्यांना इंग्रजी भाषा व इंग्रजी कार्यपद्धति अगदीं नवीन होती. ही कार्यक्षमता जपान्यांच्या अंगीं उत्तम व सर्वांगीण शिक्षणामुळेंच आली होती. या शिक्षणाची पद्धति त्यांनीं मुख्यत: जर्मनांच्याकडून घेतली हें आपण सुरुवातीच्या प्रकरणांत पाहिलेंच. हिंदुस्थानांत या बाबतींत जर्मनीकडून माहिती करून घेतलेले तज्ज्ञ असल्यास त्यांनीं जरूर त्या शिक्षण-पद्धतीचें सांगोपांग विवेचन प्रसिद्ध करावें म्हणजे आपल्यास रुचेल व पचेल तेवढें त्यांतून आपणांस घेतां येईल.

ठिकठिकाणीं, रस्त्यांत, गल्ल्यांत, दुकानांच्या पडव्यांतून व मोठमोठ्या इमारतींतून तळ देऊन राहिलेल्या सर्व गोऱ्या, म्हणजे इंग्रज, ऑस्ट्रेलियन इत्यादि, लोकांस ( नागरिकांस आणि सैनिकांस ) त्या त्या ठिकाणांहून हुसकून जपान्यांनीं घेरून सिंगापुरांतील "चांगी" नांवाच्या उंच भिंतीचा कोट असलेल्या अशा विस्तीर्ण जेलखान्यांत नेलें. दुसऱ्या दिवसापासून रस्ते झाडणें, उध्वस्त झालेल्या इमारतींचे ढीग साफ करणें, प्रेतें उचलणें, गटारें स्वच्छ करणें इत्यादि कामाकरतां त्यांस तुकड्या तुकड्यांनीं शहराच्या निरनिराळ्या भागांत सकाळपासून संध्याकाळपर्यंत आणण्यांत येत असे. सायंकाळीं काम आटोपल्यावर त्यांस पुन्हां दहा बारा मैल पायीं जेलखान्यांत घेऊन जात. टोळ्या टोळ्यांनीं काम करितांना त्यांच्यावर देखरेख करण्याकरतां त्यांचाच एक गौरकाय अधिकारी असे व शिवाय संगीन लावून बंदुका घेतलेले एक दोन जपानी शिपाई असत.

इंग्रज व त्यांच्या दोस्त राष्ट्रांच्या अधिकाऱ्यांस त्यांच्या त्यांच्या भव्य आणि सजवलेल्या इमारतींतून हुसकून लावून सहकुटुंब कैदेंत टाकल्यावर त्या त्या ठिकाणीं जपानी अधिकाऱ्यांनीं आपला संसार थाटला. संसार म्हणजे अर्थात्‌च प्रणयविरहित वीरांचा.

हिंदी सैनिकांच्या हिंदी अधिकाऱ्यांस मोहनसिंग आणि जपानी अधिकारी यांच्यातर्फे असे हुकूम सुटले कीं त्यांनीं आपापल्या तुकड्यांमधील मिळतील तितके सैनिक जमवून त्यांच्या याद्या कराव्या व रॅफल्स् स्क्वेअरमधील अमक्या इमारतींत अमक्या मजल्यावर रात्र काढावी. कित्येकांचे मनांत सैनिकाचा पोशाख टाकून देऊन वेषांतर करून अज्ञातपणें नागरीक म्हणून शहरांतील जनतेंत मिसळून स्वतंत्र कामधंदा सुरू करावा असें होतें. परंतु युद्धाचा अनुभव

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ... २१३३२ दि: २।६।२।५
क्रमांक ......६५८.२.... नों: हिंदी स्वातंत्र्ययुद्ध
२०११९८



नसलेल्या सैनिकांनीं गैरसमजुतीनें अशी हूल उठविली कीं जपानी आतां आपणां सर्वांस हिंदुस्थानांत पाठविणार आहेत. जणूं काय जपान्यांना दुसरा उद्योगच नव्हता ! परंतु ही अफवा प्रसृत झाल्यामुळेंच कित्येक लोक लालचावून आपापल्या तुकडींतच राहिले. कांहीं धोरणी आणि दूरदर्शी लोक युद्धधंद्याचें जीवन टाळून नागरीक बनले.

१६ तारखेस सायंकाळीं हजर असलेल्या सर्व सैनिकांच्या याद्या त्यांच्या त्यांच्या पूर्वीच्या अधिकाऱ्यांनीं केल्या. मात्र आतां गोऱ्या अधिकाऱ्यांचा प्रश्नच नव्हता, कारण ते सर्व कैदखान्यांत लोखंडी बेड्यांनीं जखडले गेले होते. १६ तारखेची रात्र हिंदी सैनिकांनीं रॅफल्स् स्क्वेअरच्या मोठमोठ्या इमारतींत राहून काढली. मुंबईच्या फोर्ट भागांत ज्याप्रमाणें ' व्हाईट वे लेड लॉ ' 'इव्हॅन्स फ्रेजर ' इत्यादि इंग्रजी पद्धतीचीं मोठमोठीं दुकानें, बँका, केशकर्तनालयें इत्यादि आहेत तद्वतच सिंगापूरच्या या भागांत आहेत. त्यांतील माल तर बहुतेक, कांचेचीं तावदानें फोडून लुटून फस्त झालेला होता. उरलासुरला आतां लुटला जात होता.

खाण्यापिण्याचा बंदोबस्त प्रत्येकानें बिस्किटें, पेपरमिंट, आटीव दुधाचे डब्यांतील दूध इत्यादि खाऊनच केला. दुसरा कांहीं इलाजच नव्हता. दुसरे दिवशीं म्हणजे ता. १७ फेब्रुवारी रोजीं सकाळीं सर्वांस रांगेनें उभे करून तुकड्या तुकड्यांनीं एकामागून एक सर्वांस, सुमारें मैलभर दूर असलेल्या फॅरर पार्क या मैदानाकडे कूच करण्यास सांगितलें. यानंतर पुढें, बहुतेक हिंदी स्वातंत्र्य-चळवळीचेंच मुख्य कथानक चालू राहाणार असल्यामुळें त्याची आपण पुढील प्रकरणीं सुरुवात करूं. परंतु हें प्रकरण संपविण्याचे पूर्वी एक दोन गोष्टी सांगितलेल्या बऱ्या.

मलाया व सिंगापूर येथील लढाईत इंग्रजांच्या नेहमींच्या चालीरीतीप्रमाणें दरवेळेस हिंदी सैन्यासच शत्रूच्या हल्ल्याचा प्रतिकार करावयास पाठवीत. हिंदी तुकड्या पुरेशा नसल्या तर मग त्यांच्याहून इंग्रज सरकाराच्या थोड्या जास्त लाडक्या अशा ऑस्ट्रेलियन तुकड्या आघाडीवर पाठवीत. आजार, व्याधी, लढाईत मृत्यु, जखमी अशा रीतीनें ऑस्ट्रेलियन सैनिकही पुरेसे नसल्यावर मग तरी आमचे शूर ब्रिटिश लोक लढावयास जात का ? छे...कारण आतां प्रतिकाराचा कांहीं उपयोग नसून शरण जाणेंच योग्य असा ठराव होत असे. नुसतेच ब्रिटिश लोक उरले म्हणजे लढावयाचें कोणी ? अर्थात् अशा वेळेस शरण जाणेंच योग्य असें सर्व गोऱ्या अधिकारी वर्गाचें एकमत होई !

कित्येक वेळां रणांगणावर जपान्यांचीं विमानें, रणगाडे इत्यादींच्या प्रतिकारार्थ इंग्रज अधिकारी केवळ बंदुकी देऊन हिंदी सैनिक पाठवीत, तेव्हां आपला योग्य यांत्रिक मदतीच्या अभावीं उगीच चुराडा होईल हें ओळखून हिंदी सैनिक पीछेहाट करूं लागत, तों मागून गोऱ्या पलटणी त्यांजवर गोळीबार

करीत. म्हणजे पुढून जपान्यांचा गोळीबार व मागून गोऱ्यांचा गोळीबार अशा कैचींत हिंदी शिपाई सांपडून आपल्या कर्माला दोष देण्याची पाळी त्यांजवर येत असे.

युद्ध म्हटलें कीं पुढचा मागचा कांहींएक विचार व करितां नासधूस करावयाच्या इंग्रजांच्या स्वभावामुळें सिंगापुराच्या पाडावानंतर सर्वसामान्य जनतेची व सैनिकांची फार प्राणहानी झाली. अन्नधान्य, औषधी, कपडालत्ता इत्यादि साधनाविना सिंगापुराच्या पाडावानंतर युद्ध-तहकुबीपर्यंत झालेल्या सर्व-सामान्य लोकांच्या दैनेस इंग्रजच सर्वस्वीं कारण झाले. सिंगापूर शहर पडावया-च्या दोन तीन दिवस आधीं इंग्रजांनीं अत्युपयोगी सामानाच्या विध्वंसनाचा नुसता हैदोस घातला होता. सिंगापुराच्या निरनिराळ्या बँकांतील सोनें समुद्रा-स्तुप्यंतु केलें; होड्याच्या होड्या भरभरून सतत दोन तीन दिवस उंची उंची कॅमेरे, फिल्मचे गठ्ठे, कापड, पेट्रोलचीं पिंपें, उंची दारूच्या बाटल्या, वैद्यकीय उपकरणीं, धान्यें इत्यादि समुद्रांत झोंकलें जात होतें. जणूं काय जपानी सिंगापुरांत आले म्हणजे सर्व नागरिकांनीं, इंग्रजांचें कनवाळू राज्यछत्र नष्ट झाल्याच्या दुःखांत उपाशी पोटीं प्राण द्यावेत. इंग्रजांचें राज्य गेल्यावर मग औषध-पाण्याची, धनधान्याची काय गरज ? पूर्वीं पति मेल्यावर, साध्वी स्त्रिया त्याच्या चितेवर देहार्पण करावयाच्या त्याचप्रमाणें इंग्रजांच्या प्रजाजनांनीं इंग्रजी राज्याच्या राखरांगोळी बरोबर स्वतःचा जोहार करावा असाच त्यांचा कटाक्ष असल्यास नकळे !

---

## स्वातंत्र्यबीजास अंकुर फुटले : ७

सुरुवातीपासून कॅप्टन मोहनसिंगांनीं जपान्यांच्या बरोबर सहकार्य केल्यामुळें निरर्थक प्रतिकारामुळें होणारी हिंदी लोकांची बरीच प्राणहानी वांचली, जपान्यांनीं पकडलेल्या हिंदी सैनिकांस व नागरिकांस एरवीं मिळाली असती त्यापेक्षां चांगली वागणूक मिळाली व हिंदी स्वातंत्र्य चळवळीचें बीजारोपण झालें. असा तिहेरी फायदा झाला. आतां सर्वत्र स्वस्थता झाल्यावर प्रत्यक्ष कार्याची वेळ येऊन ठेपली.

१७ फेब्रुवारी १९४२ रोजीं सकाळीं नऊच्या सुमारास सर्व हिंदी युद्धबंदी आपापलें सामान पाठीवर घेऊन फॅरर पार्क नांवाच्या सिंगापूर शहरांतील विस्तीर्ण चौकोनी मैदानावर आले. ते सुमारें साठ हजार हिंदी सैनिक होते. सबंध मैदानभर रांगेंत त्या सर्व लोकांस बसविण्यांत आलें. दुपारभर सर्व लोक उन्हांत तापले. प्रत्येक तुकडीनें आपापल्या मोटार लॉऱ्यांतून तांदूळ, कणिक, डाळ इत्यादि रोजचें धान्य बरोबर आणलें होतें. आपापल्या तुकडीच्या मागील बाजूस मैदानाच्या कडेला राहुटी ठोकून ज्या त्या तुकडीनें सायंकाळच्या स्वयंपाकास दुपारींच सुरुवात केली. त्या मैदानाचे एका बाजूस, लांब बाजूचे मधोमध एक दुमजली पिवळी इमारत आहे. त्या इमारतीचे दुसरे मजल्यावर पताका, दूरध्वनिक्षेपक इत्यादि लावून सभेची तयारी करण्यांत आल्याचें दिसत होतें. इमारतीचे चारी कोंपऱ्यास जपानी चौक्या पहारे लागले होते. त्या दिवशीं सकाळीं, डाव्या दंडावरील सदऱ्याचे बाहीवर **F** असें अक्षर इंग्रजींत व इतर चित्रविचित्र जपानी अक्षरें काढलेल्या पांढऱ्या कापडाच्या पट्ट्या लावलेले कॅ. मोहनसिंग व त्यांचे दोन चार सहकारी एकमेकांस खेटून रांगेंत बसलेल्या साठ हजार युद्धबांधवांच्या रांगांमधून स्मितवदनानें हिंडत आपल्या मित्रांशीं हस्तांदोलन करीत असलेले दिसून येत होते. **F** म्हणजे ‘ फूजीवारा ’. जपानी सैन्यांत मुख्याधिकाऱ्याच्या नांवानें तुकडीस संबोधावयाचें अशी चाल आहे. त्याप्रमाणें ‘ हिकारी किकान ’ खात्याचे त्या वेळचे मुख्याधिकारी फूजीवारा यांच्या नांवावरून ‘ फूजीवारा किकान ’ असेंही या खात्यास म्हणत. त्या तुकडीशीं संबंध असलेले व त्यांच्या विश्वासांतील असे हे हिंदी लोक आहेत अशी चटकन कोणत्याही जपानी अधिकाऱ्यास त्यांची ओळख पटावी म्हणून त्यांस **F** व इतर जपानी अक्षरें घातलेल्या पांढऱ्या पट्ट्या हातावर लावण्यास दिलेल्या होत्या. कॅ. मोहनसिंग व त्यांचे सहकारी स्मितवदनानें परिचितांशीं हस्तां-

ड्रोलन करीत हिंडत असतां मी तें दृश्य मोठ्या समाधानानें पाहात उभा होतों. इतक्यांत माझ्या पाठीमागें उभ्या असलेल्या एका शिखानें काढलेले उद्‌गार माझ्या मनाला एकदम जाऊन झोंबले. दूर उभ्या असलेल्या कॅप्टन मोहन-सिंगाकडे पाहात आपल्या ' गिराइच्या 'स ( साथीदारास ) उद्देशून तो उद्‌गारला " देखो, सारा खानदान बरबाद कर डाला इसने अपना ! " ( " पाहा यानें आपल्या सर्व कुलाचा नाश करून घेतला ! " ) माझ्या मनांत चटकन् विचार आला, ' आणि ज्यांनीं स्वकीयांच्या विरुद्ध फितुरी करून इंग्रजांना हिंदुस्थान जिंकण्यास मदत केली त्यांस काय म्हणावयाचें ? त्यांनीं आपल्या कुलाचा उद्धार केला कीं काय ? '

सायंकाळीं, मोटारींवर लहान लहान पिवळीं, लाल, निळीं अशीं रंगीबेरंगी निशाणें फडकावीत, जपानी अधिकारी आपल्या गरम हिरव्यागार कापडाच्या फौजी पोषाखांत कंबरेला तलवार लटकावून आपापल्या मोटारगाड्यांतून फेरर पार्कच्या इमारतीजवळ उतरले आणि गंभीर व किंचित् क्रुद्ध अशा मुद्रेनें झपाझप पावलें टाकीत वर गेले. मोहनसिंगही आपल्या दोन तीन सहकाऱ्यांसह मोटारींतून येऊन वर गेले. लेफ्टनंट कर्नल हंट या गोऱ्या अधिकाऱ्यासही जपानी सैनिकांच्या पहाऱ्यांत मोटारींतून तेथें आणण्यांत आलें. दुसऱ्या मजल्यावर लांबच लांब गॅलरी होती. तिला पुष्कळ कमानी होत्या. मधोमध असलेल्या कमानीशीं एक लाकडाचा चबुतरा ठेवलेला होता व त्याच्यावर ३–४ खुर्च्या रांगेनें ठेवलेल्या होत्या. त्यांचीं तोंडें युद्धबंदींच्या अफाट समुदायासमोर केलेलीं होतीं. दोन ध्वनिक्षेपकही ठेवण्यांत आलेले होते. सर्व जपानी अधिकारी व मोहनसिंग आपल्या सहकाऱ्यांसह स्थानापन्न झाल्यावर लेफ्टनंट कर्नल हंट हा एका ध्वनि-क्षेपकापाशीं उभा राहून सर्व हिंदी युद्धबंद्यांस उद्देशून अस्खलित इंग्रजी भाषेंत म्हणाला, " परवापर्यंत म्हणजे सिंगापुराच्या पाडावापर्यंत तुम्ही सर्वजण आमच्या अधिकाराखालीं होतां. परंतु त्या दिवसापासून तुम्ही सर्व जपान्यांचे युद्धबंदी झालेले आहांत. यापुढें आमचा तुमच्यावर कांहीं अधिकार नाहीं. इंग्रजांतर्फें मी आज तुम्हां सर्वांना युद्धबंदी म्हणून जपान्यांच्या हवालीं करितों. यापुढें तुम्हां सर्वांना जपान्यांच्या हुकुमाप्रमाणें वागणें भाग आहे. " अशा तऱ्हेची हिंदुस्थानींत व जपानी भाषेंत घोषणा झाल्यावर लेफ्टनंट कर्नल हंट यास पुन्हां मोटारीमध्यें बसवून पुन्हा कैदखान्यांत नेण्यांत आलें.

यानंतर एक अगदीं अनपेक्षित असा कार्यक्रम सुरू झाला. पुढील कार्याची रूपरेषा पहिल्या प्रथमच सर्व युद्धबंद्यांच्या समक्ष सामुदायिक रीत्या आंखण्यांत आली, ती याच दिवशीं.

हिकारी कीकान खात्याचे प्रमुख मेजर फूजीवारा हे भाषण करण्यास ध्वनिक्षेपकाजवळ येऊन उभे राहिले. त्यांचे दुभाषे लेफ्टनंट कुनीझका त्यांच्या भाषणाचें इंग्रजींत भाषांतर करावयास शेजारच्या ध्वनिक्षेपकाजवळ उभे राहिले.

मेजर फूजीवारा यांनीं चार पांच वाक्यें बोलावीत व ते थांबल्यावर लेफ्टनंट कुनीझकानें त्यांचें इंग्रजींत भाषांतर करावें असें चाललें होतें. एवढा मोठा जन-समुदाय; परंतु त्यांचें भाषण ऐकण्यास जिकडे तिकडे स्तब्ध आणि शांत वातावरण निर्माण झालें होतें. एक तर, सगळा समुदाय सैनिकांचा असल्यामुळें त्यांना साहजिकच एक प्रकारची शिस्त लागलेली होती व दुसरें, तो प्रसंगच इतका महत्त्वपूर्ण आणि अश्रुतपूर्व होता कीं त्या वेळेस गडबड करण्याचें कोणाच्या मनांत सुद्धां आलें नसतें. त्याच्या जोडीला 'आपली सत्ता जाऊन यापुढें आपण दुसऱ्याचे कैदी आहोंत ' ही किंचित् भीति निर्माण करणारी भावना प्रत्येकाच्या मनांत होतीच.

मेजर फूजीवारा आपल्या भाषणांत म्हणाले, "सिंगापूर पडलें त्या दिवसापासून इंग्रजांचें या भागांतील वर्चस्व नष्ट झालें आणि तुम्ही आमचे युद्धबंदी झालां आहांत. आमचा विजय म्हणजे एशियांतील प्रत्येक राष्ट्राचा विजय आहे. कारण इतके दिवस पाश्चात्यांच्या गुलामगिरींत सर्व एशियाई लोक खितपत होते, त्यांचा भविष्यकाल यापुढें फार उज्ज्वल आहे. एकमेकांशीं सहकार्य करून प्रत्येक एशियाई राष्ट्रास आपली राष्ट्रीय उन्नति करून घेतां येईल. दूरपूर्वेतील सर्व एशियाई राष्ट्रांची एक जोरदार संघटना निर्माण करण्याचें एकमेव ध्येय डोळ्यासमोर ठेऊनच आम्ही हें युद्ध सुरू केलें आहे. परस्परांशीं संपूर्ण सहकार्य करून प्रत्येकानें आपली उन्नति करून घेणें व सर्व बाजूंनीं आपली कार्यक्षमता आणि आपलें सामर्थ्य वाढविणें हेंच या संघटनेचें मुख्य तत्त्व आहे. हिंदी लोकही आपल्या स्वातंत्र्याकरतां इंग्रजांशीं बऱ्याच वर्षांपासून झगडत आहेत हें आम्हीं पाहात आहों. तेव्हां, आम्ही पाश्चात्य साम्राज्यशाहीविरुद्ध सुरू केलेल्या या लढ्याचा तुम्ही फायदा घ्यावा व तुमच्यापासून हिरावून घेतलेलें तुमचें स्वातंत्र्य परत मिळवून घेण्याची ही सुवर्णसंधि वांया जाऊं देऊं नये. या कार्यांत तुम्हाला मनमोकळेपणानें जरूर तें सर्व साहाय्य देण्याचें आम्ही वचन देतों. या आमच्या सूचनेशीं तुम्ही सहमत असाल आणि पाश्चात्य साम्राज्यशाहीविरुद्ध आमच्या लढ्यांत आमच्याशीं सहकार्य करून स्वतःचेंही स्वातंत्र्य परत मिळविण्याच्या संधीचा फायदा घ्यावा असें तुम्हास वाटत असेल तर तुम्ही तसें सांगावें म्हणजे आम्ही तुम्हांस युद्धबंदी न समजतां आमचे मित्र असें समजूं व बरोबरीच्या नात्यानें वागवूं."

अशा अर्थाचें मेजर फूजीवारा यांचें भाषण झाल्यावर कॅप्टन मोहनसिंग हे भाषण करावयास उठले. ते म्हणाले, "मित्रहो...तुम्ही इतके दिवस इंग्रजांचे गुलाम होतां. आतां त्यांचें या भागांतील साम्राज्य पार नष्ट होत आलें आहे. या संधीचा योग्य तो उपयोग करून घेऊन हिंदुस्थानांतूनही त्यांस घालवून देणें व आपलें स्वातंत्र्य परत मिळविणें हें आपलें कर्तव्य ठरतें. इतके दिवस मी जपान्यांचें वर्तन बघितलें आहे. त्यांस सर्व एशियाई लोकांबद्दल एकप्रकारची आपुलकी,

जिव्हाळा वाटतो. हिंदुस्थानाबद्दल तर त्यांस विशेष आदर आहे. आपलें गेलेलें स्वातंत्र्य परत मिळविण्याकरतां जरूर तें सर्व साहाय्य मिळवून देण्याचें त्यांनीं आपल्याला वचन दिलें आहे. कधींही न आलेली अशी ही संधी आज चालून येत आहे. त्या अर्थी आपण ती वांया जाऊं देऊं नये......" इत्यादि. कॅप्टन मोहनसिंगांचें भाषण संपल्यानंतर ग्यानी प्रीतमसिंग या पंजाबी गृहस्थांनींही पंजाबी भाषेंत अशाच प्रकारचें भाषण केलें. मग वंदेमातरम् इत्यादि राष्ट्रीय गीतें गाऊन झाल्यावर सार्वजनिक कार्यक्रम समाप्त झाला.

तदनंतर ध्वनिक्षेपकावरून अशी सुचना देण्यांत आली : "मेजर व त्याच्या वरच्या हुद्याच्या सर्व अधिकाऱ्यांनीं कॅप्टन मोहनसिंग व मेजर फूजीवारा यांच्याशीं विचारविनिमय करण्यास वर यावं." ही सूचना मिळतांच आतां-पर्यंत निश्चल अशा त्या वातावरणांत एकच चुळबुळ, कुजबुज आणि हालचाल दिसूं लागली. जितके मेजर व त्याच्यावरील हुद्याचे लोक होते ते छाती पुढें काढून त्या इमारतीच्या रोखानें जाऊं लागले. परीक्षेंत अगदीं एखाद दुसऱ्या गुणानें नापास होणाऱ्या विद्यार्थ्याच्या मनांत ज्याप्रमाणें त्वेष, खेद, आश्चर्य, वैषम्य सूडाची भावना, इत्यादि भावनांचें अस्पष्टपणें संमिश्रित वातावरण निर्माण होतें त्याचप्रमाणें कॅप्टनच्या हुद्याच्या लोकांस केवळ एका पायरीनें आपण कमी असलों तरी आपणांस कां वगळलें याचें सखेदाश्चर्य वाटूं लागलें. पदवीधर परंतु 'मेजर'चा हुद्या नसलेल्या लोकांचीही तीच स्थिति. ज्या लोकांच्या राजनिष्ठे-बद्दल आणि गौरकाय-धार्जिण्याबद्दल दरवेळेस अधिकाधिक खात्री झाल्यानंतरच ज्यांचा हुद्दा मेजरपर्यंत अथवा तदुपरी चढविला गेला, जे ब्रिटिश साम्राज्याचे आधारस्तंभ म्हणून ज्यांच्यावर ब्रिटिशांचा परिपूर्ण विश्वास, ज्यांना 'लेफ्ट राईट'च्या पलीकडे असलेल्या जगाची अजिबात कल्पना नाहीं, त्यांनाच स्वातंत्र्याची चळवळ कशी चालवावी या व अशाच गोष्टींवर विचारविनिमय करावयास बोलवावें याहून दैवदुर्विलास तो कोणता, असें सुविद्य लोकांस वाटलें. एक तर, राजकारण, स्वातंत्र्य, मुत्सद्देगिरी, देशाच्या उन्नतीचे मार्ग, इत्यादि विषयांबद्दलचें या लोकांचें अगाध ज्ञान व दुसरें म्हणजे देशाचे आजवरचे हितशत्रू एका क्षणांत देशभक्तीच्या वाटा कशा चोखाळूं शकतील? या दोन्ही दृष्टींनीं सर्वसाधारणपणें विचारविनिमयासाठीं बोलाविलेले हे लोक सर्वस्वीं अपात्रच होते. खांद्यावरील हुद्याचीं पितळीं निदर्शकें फारतर मनांतील राजनिष्ठा दाखवितील. या पलीकडे ते मेंदूंतील बुद्धीचे दाखले थोडेच होऊं शकतील? अर्थात् आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा विचार जे करूं शकतील व स्वदेशाच्या आजपर्यंतच्या इति-हासाचें संपूर्ण ज्ञान ज्यांना आहे अशा सुविद्य लोकांस या वाटाघाटींत भाग घ्यावयास, केवळ ब्रिटिशानीं त्यांना मोठा सरकारी हुद्दा दिला नव्हता, एवढ्याच एका कारणामुळें, बोलाविलें नाहीं याबद्दल पुष्कळांना वाईट वाटलें. ब्रिटिश राज्यव्यवस्थेचाच पायंडा यापुढेंही या स्वातंत्र्याच्या चळवळींत पडणार कीं

काय अशी भीति त्यांच्या मनांत उत्पन्न झाली व ती खरीही ठरली. कारण या दूरपूर्वेंतील हिंदी स्वातंत्र्य-चळवळींत ब्रिटिशांनीं आधीं वर चढवून ठेवलेले लोकच अधिकाधिक वर चढले. होतकरू, सुशिक्षित आणि सुविद्य माणसांस त्यांत वावच नव्हता. त्यांना कारकुनीच करावयाची पाळी आली. महत्त्वाच्या मसलती करणार अशिक्षित लोक आणि कारकुनी करणार सुक्षिक्षित लोक, अशी परिस्थिति होती. यामुळें या चळवळीचें अपरिमित नुकसान झालें. ब्रिटिश राजवटींत वर चढलेल्या अधिकाऱ्यांचे डोळे शेवटपर्यंत ब्रिटिश सत्तेनें व सामर्थ्यानें दिपलेलेच राहिले. अमुक एक गोष्ट अव्यवहार्य व वाईट कां ? तर ब्रिटिश राजवटींत ती कधींही कोणीही आचरली नव्हती म्हणून; हा त्यांचा दृष्टिकोन शेवटपर्यंत कायम होता. आपण एवढ्याशा तुटपुंज्या तयारीच्या जोरावर इंग्रजांसारख्या बलशाली साम्राज्यशाहीशीं टक्कर देणें म्हणजे भिंतीवर डोकें आपटून घेण्यासारखें आहे हा त्यांचा न्यूनगंड अखेरपर्यंत कायम होता. अरेरावी, दिखाऊ शिस्त, कनिष्ठांबद्दल कुत्सित भावना, रिकामी ऐट, मदिराप्राशन आणि इतर व्यसनें; डॉक्टर लोकांस पुष्कळ वरचा फौजी हुद्दा देऊन डॉक्टरशीं समतोल कॉलेजीय शिक्षण घेतलेल्या इसमास शिपायाच्या दर्जाचा कारकून बनवणें; हा पूर्वींचा, ' व्ही. सी. ओ. ' आणि हा ' के. सी. ओ. ' असले तिरस्कारयुक्त भेद दर बाबतींत कायम ठेवणें; उगीचच्या उगीच कागदी घोडे नाचवणाऱ्या अवाढव्य कचेऱ्या; वरिष्ठ अधिकारी म्हणजे केवळ सह्या करणारे; असल्या अस्सल ब्रिटिश पद्धतींतील घातक चाली त्याच अधिकाऱ्याच्या वर्चस्वामुळं हिंदी स्वातंत्र्यसेनेंतून शेवटपर्यंत नाहींशा झाल्या नाहींत. नेताजींच्या नजेरेतून हा प्रकार सुटणें शक्यच नव्हतें. परंतु वेळ इतका थोडा होता कीं या संघटनेंत आमूलाग्र बदल करून प्रत्येकाच्या लायकीप्रमाणें ( ब्रिटिश राजवटींतील हुद्दा विसरून ) जाऊन ज्यास त्यास हुद्दा देण्याचें कार्य त्यांनीं अजिबात हातीं घेण्याचें टाळलें व याच संघटनेनें शक्य तितकें कार्य करावयाचें ठरविलें. अर्थात् १७ फेब्रुवारी १९४२च्या या प्रसंगानंतर सुमारें दीड वर्षानें नेताजी सुभाषचंद्र बोस सिंगापुरांत आले. या दीड वर्षाच्या काळांत स्वैरवर्तनी अशा या वरिष्ठ अधिकारी गटानें आपलें स्थान अधिकच बळकट केलें.

वाटाघाटीस बोलाविलेले अधिकारी वर गेले आणि मैदानावरील लोक, खाण्यापिण्याच्या तयारीस लागले. वाटाघाटींत कॅ. मोहनसिंग व जपानी अधिकारी मेजर फूजीवारा यांनीं त्यांना सांगितलें कीं त्यांनीं आपापल्या तुकड्यांतील लोकांचीं मनें वळवून त्यांस इंग्रजांच्या विरुद्ध लढावयास आणि जपान्यांशीं सहकार करण्यास प्रवृत्त करावें. नंतर, प्रत्येक अधिकाऱ्यानें हाताखालच्या लोकांत उत्तम शिस्त ठेवावी, मैदानावरच झोंपून रात्र काढावी लागेल, दुसऱ्या दिवशीं सकाळीं आपापल्या सैनिकांस अमक्या अमक्या बंदीछावणींत न्यावें लागेल,

इत्यादि सूचना त्यांस दिल्यावर ती सभा बरखास्त झाली. जपानी अधिकारी आणि कॅ. मोहनसिंग हे आपापल्या बंगल्यावर निघून गेले. वाटाघाटींसाठीं वर गेलेले अधिकारी खालीं आपापल्या गोटांत आले आणि त्यांनीं आपल्या हाताखालच्या लोकांस वर झालेलीं बोलणीं थोडक्यांत सांगितलीं.

इकडे तिकडे, मैदानावरच्या बाहेरच्या बाजूस, आसपास कोठेंतरी नळ फुटलेले असतील तेथें, अगर लोकांच्या घरांत शिरून, याचना करून पाणी प्यावें; शाहाळू, डब्यांत बंद केलेले अननस इत्यादि जे खाद्य पदार्थ हातीं लागतील ते खावे आणि बसल्या जागीं इकडे तिकडे थोडी सरकासरकी करून मैदानांतच पाय पसरून द्यावे; अंगांवर कांहींतरी वस्त्र ओढून घ्यावें; असा तो अफाट सैनिकांचा समुदाय दिवसभर त्या उन्हांत तापल्यावर रात्रीं मैदानांत आडवा झाला. त्या समुदायांतच मी एक होतों. लोहार ज्याप्रमाणें बैलगाडीच्या चाकाचीं रिंगणें तापवून वांकवून पाण्यांत थंड करितो त्याप्रमाणें तो विश्वकर्माही या सैनिकांचीं दैनंदिन भाग्यचक्रें दिवसां तप्त करून रात्रीं झोंपेच्या निमित्तानें, तात्पुरतीं कां होईना, थंड करीत असे.

रात्रभर दंव पडत होतें. दिवसभराचें ऊन आणि रात्रीचें दंव यामुळें मला पडसें होऊन, कानशिलें तापून, माझें डोकें दुखूं लागलें होतें. गेला एक आठवडा जेवण असें कधीं झालेंच नव्हतें. थोडेंसें जें विकत किंवा फुकट मिळालें त्यावर निर्वाह केलेला होता. कसातरी प्रातर्विधि उरकल्यावर ८ वाजतां पुन्हा त्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर राष्ट्रगीतें, भाषणें इत्यादींचा कार्यक्रम सुरू झाला. हें असें या उघड्या मैदानांत किती दिवस राहावें लागणार याचा आम्हांला कांहीं पत्ता लागेना. खाकी कपडे टाकून नागरिक बनून गांवांत जावें तर गांवांतही आमचें कोणी ओळखीचें नव्हतें. मग गांवांत आश्रय देणार कोण ? शिवाय आम्हांला मलायी भाषा अवगत नव्हती. अर्थात् सिंगापुरांत हिंदी लोक पुष्कळ आहेत आणि इंग्रजी किंवा तामिळ यांपैकीं एखादी भाषा येत असती तरी थोडासा फायदा झाला असता. परंतु मलाया, सिंगापूर या भागांत येतांच एकदम युद्ध सुरू झालें. त्यामुळें गांवांत जाण्याची संधी एकदांही मिळाली नाहीं. आणि तें युद्ध सव्वादोन महिन्यांत संपलेंही. तेव्हां या अवांतर गोष्टींची चौकशी करण्यास किंवा एखाद्या घरंदाज माणसाची ओळख काढण्यास कधीं वेळही झाला नाहीं.

सुमारें ११ वाजतां तो कार्यक्रम संपला. ऊन कडक पडलें होतें. डोकेदुखीमुळें आणि योग्य खाण्यापिण्याच्या अभावीं अशक्ततेमुळें तें जास्तच जाणवत होतें. तरी आदल्या दिवशीं किंवा त्या दिवशीं पाऊस पडला नाहीं हें आमचें भाग्य ! कारण मलाया-सिंगापूर या भागांत पावसाळा, थंडी असे आपल्या इकडच्याप्रमाणें ऋतुपालट मुळींच नसतात. वर्षभर एकच एक ऋतु. नेहमीं जिकडे तिकडे हिरवेंगार गवत किंवा दाट उगवलेलीं रबराच्या झाडांचीं

वनें. चैत्रांतल्यासारखा उन्हाळा आणि एक-दोन दिवसाआड तास दोन तास जोराचा पाऊस कीं पुन्हा सगळीकडे चकचकाट. असें तेथील हवामान आहे.

११ वाजतां सर्व तुकड्यांना सांगण्यांत आलें कीं प्रत्येक तुकडीनें अमक्या अमक्या बंदीछावणींत जावें. प्रत्येक छावणी सरासरी १० ते १५ मैलांच्या अंतरावर होती. एवढें अंतर पायीं चालावयाचें. शिवाय डोक्यावर आपलें आंथरूण आणि खांद्यावर किटबॅग म्हणजे कोठीच्या आकाराची खाल-पासून वरपर्यंत सारखी गोल अशी सुमारें अडीच फूट उंचीची पिशवी. रखरखीत ऊन. खाण्यापिण्याची सोय कांहींच नाहीं. अगदीं निर्जळी एकादशीचाच माध्यान्ह मुहूर्त होता तो. प्रत्येक तुकडीला अन्नधान्याचीं पोतीं व त्यासारख्या जड सामानाकरतां आणि आजारी माणसाकरतांच तेवढी एक छोटी अथवा मोठी लॉरी दिलेली होती. परंतु या लॉरींत जागा मिळवावयास कोण मारामार ! सुस्थितींतील कोणीच त्यांत बसावयाचें नाहीं असें ठरलें, तरी ड्रायव्हरच्या व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या वशिल्याच्या किंवा मर्जीतल्या लोकांकरतां त्यांत जागा राखून ठेविलेलीच होती. इतरांपैकीं कित्येकांनीं आजारी या सदराखालीं तरी त्यांत प्रवेश मिळावा म्हणून कोणी डोळ्याला पट्टी बांधली, कोणी कपाळाला रुमाल आंवळला, कोणी लंगडत असल्याचा आविर्भाव केला. परंतु त्यामुळें शेवटीं खरोखरीच आजारी असलेल्या माणसांवरही पायीं जाण्याचा प्रसंग आला !

आमच्या तुकडीच्या मागोमाग आम्ही पांचसहा जणांचा एक कंपू करून वाट चालूं लागलों. सायंकाळपर्यंत कसे तरी पोंहोचलो म्हणजे झालें; घाई करून काय करावयाचें आहे ? अशा विचारानें आम्ही चालत होतों. सिंगापूर शहराच्या बाहेर ( परंतु सिंगापूर बेटांतच ) जात असल्यामुळें आम्हां सैनिकांच्या लांबच लांब रांगेशिवाय इतर कोणी पादचारी त्या रस्त्यावर बहुधा नव्हताच असें म्हटलें तरी चालेल. ऊन चांगलेंच पडलें होतें.

२–३ मैल चालून गेल्यावर रस्त्याच्या कडेला वाटेंत कोणी एक दोन खोकीं फोडलीं होतीं. त्यांतील वस्तू घेण्याकरतां झोंबाझोंबी चालली होती. अर्थात् प्रत्येक तुकडींतील सैनिक ‘ लेफ्ट राईट ’ करीत शिस्तींत चालले होते. लक्ष वेधण्यासारखी एखादी वस्तु रस्त्यांत दिसली म्हणजे रांगेंतून फुटून अथवा थांबून तिकडे कोणी जावयाचें नाहीं अशी अधिकाऱ्यांची ताकीद होती. तरी लघवीच्या अथवा पाणी पिण्याच्या निमित्तानें धडधाकड सैनिक किंवा अशक्त-पणामुळें रेंगाळणारे लोकही अशा ठिकाणीं झोंबाझोंबी करीतच. आम्हीही तेथें गेलों. त्या खोक्यांत साधारण मंगलोरी कौलांच्या आकाराच्या चॉकोलेटच्या जाड चौकोनी वड्या होत्या. ब्रिटिश सैनिकांना पुरविण्यांत येणारा पदार्थ होता तो. झोंबाझोंबींत मींही हात घातला तों भाकरीच्या चतकोर तुकड्याएवढा एक तुकडा माझ्या हातीं लागला. तोच वाटेनें बराच वेळ खाण्यास पुरला. नार-ळाचीं लहान लहान झाडें दिसलीं अथवा क्वचित् रस्त्याच्या कडेला झोंपडींत

जर एखादा खेडुत शहाळु विकत असला तर तो विकत घेऊन त्याचें पाणी प्यावें असा आम्ही क्रम चालविला होता. अधूनमधून प्रत्येक तुकडीच्या मोटार लॉऱ्या आमच्या मागून येऊन पुढें जात होत्या. दोन रस्ते फुटले, म्हणजे दुसऱ्या बंदीछावणींत जाण्याचा हुकूम मिळालेल्या तुकड्या सैनिकांच्या त्या प्रदीर्घ रांगेंतून फुटून दुसऱ्या रस्त्यास लागत. पांच सहा मैल चालून गेल्यावर आमच्या मागून एक लॉरी येऊन पुढें निघाली. त्या लॉरीहाक्यानें मागें वळून पाहिलें. आमच्यापैकीं एकानें हात उंच करून स्मितवदनानें त्यास हांक मारली. झालें, ओळख पटली. मित्रानें मित्रास बोलाविलें. त्याच्याबरोबर आम्हीही त्या लॉरींत मागच्या बाजूनें आंत उड्या मारल्या. आमच्यासारखे रेंगाळणार इतर सैनिकही ' अरे ठहरो ठहरो ' असें म्हणत आहेत तों आमची लॉरी निघालीसुद्धां.

१०–१५ मिनिटांतच आम्ही नीसुन कॅंपमध्यें येऊन पोहोंचलों. येथें भव्य अशा सीमेंट कॉंक्रीटच्या तिमजली विस्तीर्ण इमारती बांधलेल्या आहेत. चारी बाजूंना अशा विस्तीर्ण इमारती आणि मधोमध विस्तीर्ण पटांगण. या इमारतींच्या एकेका चौकास मीरत बॅरॅक्स्, पंजाब बॅरॅक्स्, अशीं नांवें ब्रिटिश राजवटींतच दिलेलीं होतीं. येथें पूर्वीं ' एच्. के. एस्. आर. ए. ' म्हणजे ' हॉंगकॉंग अँड सिंगापूर आर्टिलरी ' या तोफखान्याचे लोक राहात असत. त्यांच्या अधिकाऱ्यांकरतां आसपासच्या टेकड्यांवर अधूनमधून असेच सीमेंट कॉंक्रीटचे भरभक्कम बंगले बांधलेले होते. एका उंच टेकडीवर सीमेंट कॉंक्रीटच्या पाण्याच्या गोल टाक्या बांधून तेथूनच शुद्ध केलेलें पाणी एका यंत्राच्या साहाय्यानें त्या आवारास पुरविलें जात असे. परंतु युद्धाच्या धामधुमींत तें यंत्र नादुरुस्त होऊन पडलें होतें.

प्रत्येक मजल्यावर ४०।५० फूट लांबीचीं व २५।३० फूट रुंदीचीं मोठमोठीं दालनें होतीं. व त्याच्या मागील बाजूस त्या त्या मजल्यावर दोन दोन न्हाणीघरें, दोन दोन शौचकूप व स्वयंपाकगृह होतें. अर्थात् पाण्याच्या अभावीं यांपैकीं कशाचाच उपयोग नव्हता. या मोठमोठ्या दालनांतून सर्व सैनिकांनीं एकमेकांस चिकटूनच आपापल्या पथाऱ्या पसरल्या.

छोटे मोठे अधिकारी बाजूच्या लहानसान खोल्यांतून एक एक, दोन दोन असे राहिले. मोठे मोठे अधिकारी बंगल्यांत राहिले. यापुढील आमची व्यवस्था जपानच्या हातांत असली तरी इंग्रजी अंमलांतल्यासारखीच होती. तिचें वर्णन वाचून फौजेंतील राहणीची सामान्य वाचकास थोडी कल्पना येईल. मोठ्या मोठ्या अधिकाऱ्यांस त्यांच्या त्यांच्या हुद्याप्रमाणें त्यांच्याच तुकडींतील एक-एक, दोन-दोन शिपाई दिमतीला दिलेले असत. त्यांचे जोडे साफ करावे, जोड्यास व कमरपट्ट्यास पॉलीश करावें, कपडे धुवावयास द्यावे, न्यावे, आणावे, जामानिमा तयार करून अंगावर चढवून द्यावा, आंथरूण तयार करावें, निरोप पोंचवावे, इत्यादि सर्व कामें त्या शिपायांकडून करवून घेतलीं जात. त्यांना

मग इतर शिपायांप्रमाणें कवाईत इत्यादि कार्यक्रमांत भाग घ्यावा लागत नसे. वरचे ब्रिटिश अधिकारी गेल्यामुळें आधींचे हिंदी वरिष्ठ अधिकारी अधिक उंच चढले व इतर छोटे मोठे अधिकारीही त्या त्या प्रमाणांत वर चढले. त्यामुळें अर्थात् यांनींही आपापल्या तुकडींतील एकेक शिपाई आपल्या दिमतीला घेतला. शिपायांसही बरें झालें. दिवसभर कवाईत वगैरे करण्याचे शारीरिक कष्ट नाहींत; शिवाय साहेबाच्या मर्जीतला शिपाई म्हणून त्यांचा रुबाबही वाढला !

लांकडें तोडून आणणें, स्वयंपाक करणें, गवत काढणें, पाणी आणणें, शौचकूप खोदणें हें सर्व सुस्थितींत असलेल्या शिपायांसच करावें लागे. म्हणून कित्येक जण दर थोड्या दिवसांनीं कांहीं ना कांहीं आजार दर्शवून सैन्यांतील नियमांप्रमाणें रोज सकाळच्या आजाऱ्यांच्या यादींत आपलें नांव दाखल करून घेत.

एकूण चार पांच बंदीछावण्यांतून हे साठ हजार युद्धबंदी प्रत्येक छावणींत दहा दहा, बारा बारा, हजार असे वांटून दिलेले होते. त्या बंदी छावण्यांचीं नांवें :— सेलेतार छावणी, क्रांजी छावणी, बिदाधारी छावणी, बुलन छावणी, इत्यादि होतीं. नीसून छावणीचें वर्णन वर आलेंच आहे. इतर छावण्यांतून मात्र अशा तऱ्हेच्या भरभक्कम आणि भव्य इमारती नसून बिदा-धारी छावणी सारख्याच लाकडी बराकी होत्या. त्यावर झोपडीसारखें पाना-पाचोळ्याचें छप्पर असे. प्रत्येक छावणींत अर्थातच रबराच्या झाडांची दाट लागवड होती. प्रत्येक छावणीचें आवार सुमारें १५—२० बिघ्यांचें असे. या आवारास चोहोंकडून कांटेरीतारेचें कुंपण व फाटकावर प्रथम कांहीं महिने पांच सहा जपानी सशस्त्र शिपायांचा पहारा. परंतु नंतर युद्धबंद्यांपैकींच सैनिकांच्या निरनिराळ्या तुकड्यांपैकीं आळीपाळीनें पांच पांच, सहा सहा, शिपायांचा पहारा असे. छावणीवरील मुख्य सुद्धां हिंदी युद्धबंद्यांपैकीं सर्वांत वरच्या हुद्याचा अधिकारी असे. क्वचित् एखाद दुसऱ्या अधिकाऱ्यास शहरांत जाऊन ( कपडे धुण्याचा साबण, तंबाखु, सिगारेटस्, इत्यादि ) जरूरीच्या वस्तू पदरच्या पैशानें विकत आणण्याची परवानगी असे. सर्वसाधारण शिपाई अथवा इतर दुय्यम प्रतीचे हुद्देदार यांस कधींकधीं पांच पंचविसाच्या टोळ्या करून गांवांत अशा जरूरीच्या वस्तू विकत घेण्यास जातां येत असे. ज्यांना ज्यांना अशी परवानगी मिळे ते ते आपल्या मित्रांनाही जरूर तें सामान आणून देत. छावणींतल्या छावणींतही असें एक लहानसें दुकान उघडलेलें असे. छावणीला लागूनच कुंपणाच्या बाहेरील बाजूस गांवांतले फेरीवाले येऊन आपलें आसन ठोकीत. तेल, साबण, सिगारेटस्, तंबाखू, केळीं, अननस, आटीव दुधाचे डबे, इत्यादि वस्तूंचा खप जास्त असे. एखाद्या खेड्यांतील बाजाराप्रमाणेंच तो बाजार दिसे.

सिंगापूर शहरांत ठिकठिकाणीं मोहनसिंगांच्या मूळच्या साथीदारांपैकीं

कांहीं लोक ‘ मिलिटरी पोलीस ’ ( एम्. पी. ) अशी कापडी पट्टी दंडास बांधून उभे असलेले दिसत. खाकी वेषांत शहरांत फिरणाऱ्या सैनिकांस ते चटकन् ‘ परवाना आहे का ? ’ म्हणून विचारीत. परवाना असल्यास ठीक; नाहींतर तारेचें कुंपण असलेल्या खास कैदीछावणींत ते त्यांस घेऊन जात व तेथें सक्त कैद किंवा सक्त मजुरीचें काम अशी कांहीं शिक्षा त्यास देत. किंवा त्याचें नांव, नंबर, हुद्दा इत्यादींचा तपास करून त्याच्याबरोबर एक शिपाई आणि माणूस देऊन त्यास त्याच्या छावणीच्या मुख्य अधिकाऱ्याकडे पाठवून देत. तो अधिकारी मग त्याची चांगली कानउघाडणी करी किंवा जरूर वाटल्यास बंदीछावणींतील कैद्यांच्या आवारांत त्यास कसली तरी शिक्षा ठोठावून अडकवून ठेवी. नागरिकाच्या वेषांत क्वचित् एखादा सैनिक फिरत आहे असा त्यांस संशय आला तर ते त्यांस नागरिकी परवाना दाखवावयास सांगत. जपान्यांनीं सर्व नागरिकांजवळ असले परवाने देण्याची दक्षता घेतली होती. म्हणून युद्धबंदी गांवांत कामाकरतां आला तर त्याच्याजवळ बंदीछावणीच्या अधिकाऱ्याचा परवाना असे व सर्वसाधारण नागरिकाजवळ नागरिकाचा परवाना असे. एकूण कोणताही परवाना नसलेला माणूस संशयित म्हणून पकडला जाई.

दारू पिऊन गैरवर्तन, खाकीपेक्षां इतर कपडे परिधान करणें, खून, मारामारी, दंगा, दरवडा, चोरी, परवानगीशिवाय छावणीच्या बाहेर पडणें, इत्यादि निरनिराळे गुन्हे करणाऱ्या सैनिकांस निरनिराळ्या शिक्षा असत.

प्रत्येक छावणींत एक एक रुग्णालय असे. म्हणजे आजारी माणसांची झोपडी एवढाच त्याचा अर्थ. त्यांत पलंग, मच्छरदाण्या, उपकरणीं, नर्सेस् इत्यादि कांहीं नसे. इतर बराकींपैकीं एक दोन बराकी आजारी माणसांकरतां ठेवलेल्या असत. येथें त्या त्या छावणींतील व्याधिग्रस्त लोक आणि सर्व डॉक्टर सकाळीं आठ वाजतां जमत. डॉक्टरांनीं प्रत्येक रोग्याला तपासावें व ताप किंवा इतर कांहीं सांसर्गिक व्याधि असल्यास त्यास आंथरूण घेऊन येण्यास सांगून त्या रुग्णालयाच्या झोपडींतच निजवावें असें चाले. इतर डोकेंदुखी, पोटदुखी यांसारख्या किरकोळ प्रकारच्या रोग्यांस औषध देऊन “ यास दिवसभर ( अथवा २–३ दिवस ) कसल्याही प्रकारचें काम देऊं नये. ” असें लिहून पुन्हां त्यांच्या त्यांच्या तुकडीच्या बराकींत परत पाठवीत. अशा आजारीपणांतील सुट्टीस “ अटेंड सी ” ( Attend ‘ C ’ ) म्हणत. किंचित् अशक्त असलेल्या परंतु विशेष कांहीं पीडा नसलेल्यां इसमास ( Attend ‘ B ’ ) “ अटेंड बी ” शेरा मिळे. त्याचा अर्थ त्यानें देखरेखीचें अथवा बसल्या बसल्या करण्याचें काम केल्यास चालेल; परंतु श्रम करूं नयेत. किंवा त्याच्याकडून श्रमाचें काम घेऊं नये. कांहीं कांहीं कामचुकार लोक उगीच व्यथेचें सोंग करून जात, त्यांस ( Attend ‘ A ’ ) “ अटेंड ए ” शेरा मिळत असे. त्याचा

अर्थ, त्याला कांहीं त्रास नसून तो कोणत्याही प्रकारचें काम करण्यास लायक आहे, असा होई.

सकाळीं प्रत्येक सैनिकानें सहा वाजतां उठून सात वाजेपर्यंत प्रातर्विधि व चहा आटपावा व बराकींत आपापलें सामान व्यवस्थित गुंडाळून वा आटोपून रांगेंत ठेवावें. नंतर शारीरिक पीडा असलेल्या तुकडींतील सर्व सैनिकांनीं मिळून त्यांच्यांतीलच एखाद्या दुय्यम अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखालीं रांगांत शिस्तीनें चालत डॉक्टरकडे तपासणीसाठीं जावें. जपानी अधिकाऱ्यांच्यातर्फे आदल्या दिवशीं प्रत्येक छावणीच्या मुख्य अधिकाऱ्यास " उद्यां तुमच्या छावणींतून आम्हास इतके...तीन किंवा चार हजार असे...सैनिक दिवसभर कामासाठीं न्यावयाचे आहेत. तेव्हां त्यांस छावणीच्या फाटकापाशीं सकाळीं आठ वाजतां तयार ठेवावें." असा हुकूम येई. त्या दिवशीं रात्रींच छावणीचा मुख्य अधिकारी त्या छावणींतील प्रत्येक तुकडीच्या प्रमुखास त्याच्या तुकडीच्या संख्येच्या प्रमाणांत पांच, पन्नास किंवा पांचशें शिपाई कामासाठीं म्हणून दुसऱ्या दिवशीं सकाळीं ७–३० वाजतां फाटकापाशीं पाठविण्याचा हुकूम धाडीत असे. ठरल्याप्रमाणें दुसरे दिवशीं सकाळीं जपानी अधिकारी मोटार लाऱ्या घेऊन यावयाचे व या सर्वांस एकेका लॉरींत भरगच्च भरून बोटीच्या धक्क्यावर, धान्याच्या कोठारांत इत्यादि ठिकाणीं कामाकरतां म्हणून घेऊन जात. तेथें ९ ते १२ व दुपारीं १ ते सायंकाळचे ७ वाजेपर्यंत या सर्व लोकांस धान्याचीं पोतीं, पेट्रोलच्या कोठ्या, इत्यादि सामान बोटींतून अथवा मोटार लॉऱ्यांतून उतरविणें किंवा त्यांत चढविणें अशा प्रकारचीं कामें करावीं लागत. मध्यें दुपारीं १२ ते १ वाजेपर्यंत शिजवून बरोबर आणलेलें अन्न अथवा त्यांच्या छावणींतून त्यांच्याकरतां त्या वेळेस पाठविलेलें जेवण ते जेवीत. अशा रीतीनें युद्धबंद्यांस " फटीग ड्यूटी " म्हणजे श्रमकारक काम करावें लागावयाचें. अर्थात् यांत जपान्यांची विशेष छळणूक किंवा युद्धबंदी यांमुळेंच इतकें काम करावें लागे अशांतला कांहीं भाग नव्हता.

बिचाऱ्या हिंदी सैनिकाचें जीवनच असें असतें, कीं जरूर असो नसो, दिवसभर त्यास राबवून घ्यावयाचें. युद्धबंदी नसतांना जर त्याच्याकडून इतकें काम करवून घेतलें जात असे आणि वर त्यास इंग्रजांचे शिव्याशाप सहन करावे लागत तर युद्धबंदी झाल्यावरही तेवढेंच काम करावें लागणें यांत कांहींच गैर नव्हतें. शिवाय 'काला आदमी' अशी जी हीन लेखण्याची इंग्रज अधिकाऱ्यांची वृत्ति होती, तशी जपान्यांची नव्हती. छावणींत राहिलेल्या शिपायांपैकीं काहींजण लाकडें तोडणें, स्वयंपाक करणें, पाणी आणणें, शौचकूप खोदणें, छावणीच्या मध्यवर्ती कोठारांतून आठवड्याचें धान्य आणणें, इत्यादि कामावर नेमले जात. याउप्पर जे सैनिक उरतील त्यांस ड्रिल, कवाईत वगैरे करावी लागे.

प्रत्येक तुकडीचा एक कोठारी नेमलेला असतो. छावणींतील मुख्य कोठारांतून आपल्या तुकडींतील सैनिकांच्या शिरगणतीप्रमाणें दर माणशीं इतके तांदूळ, इतकी कणीक, इतकें तूप, गूळ, साखर; अशा हिशेबानें ठरलेल्या वारीं, आठवड्यांतूत एकदां, त्यानें त्या आठवड्याचा शिधा वजनावर आणावयाचा, रोज ठरीव प्रमाणांत दोन्ही वेळां स्वयंपाक्यांस शिधा काढून शिजविण्यास द्यावयाचा, जेवण चांगलें व स्वच्छ तयार होतें कीं नाहीं यावर देखरेख ठेवावयाची हें त्या कोठाऱ्याचें काम असतें.

छावणींतील साफसफाई ठेवण्याकरतां प्रत्येक तुकडींतून सर्वसाधारणपणें एकेक शिपाई व एकेक भंगी घेतलेला असे. ते मध्यवर्ती व्यवस्थेखालीं छावणीची साफ सफाई ठेवीत. प्रत्येक डॉक्टर आळीपाळीनें एकेका दिवशीं रुग्णालयाचा मुख्य डॉक्टर या नात्यानें रात्रभर कामावर असे. अकस्मात् अपरात्रीं व आडवेळेस कोणाला जर पीडा झाली तर त्या दिवशीं ज्या डॉक्टरची दिवसरात्र कामाची पाळी असेल त्याला बोलवावयास नर्सिंग शिपाई जात असे.

सिंगापूर पडल्यापासून सुमारें आठदहा महिने हरबऱ्याची डाळ, कणीक, तांदूळ, तूप, साखर, दूध (आटीव दुधाच्या डब्यांतील) इत्यादि शिधा दर महिन्यास कमी कमी प्रमाणांत का होईना परंतु हिंदी युद्धबंद्यांस मिळत असे. हें सामान जाळण्याइतका इंग्रजांस शेवटीं वेळच उरला नाहीं म्हणून; नाहींतर हेंही त्यांच्या तडाख्यांतून सुटलें नसतें. औषधपाण्याची तर फारच दैना होती. जुलाबाचें औषध म्हणजे (मॅग्नेशिया) सलाईन द्यावयाचें असलें म्हणजे तें बऱ्याच जणांस पुरावें म्हणून दूधवाल्याप्रमाणें त्यांत बरेंचसें पाणी मिसळून करून दिलें जाई. कॅल्शियम द्यावयाचें असलें तर अंड्याचीं टरफलें, हाडें इत्यादींचा चूर करून ती भुकटी कॅल्शियम म्हणून द्यावयाची. ऑपरेशन वगैरे करण्याची अर्धीमुर्धीं उपकरणें इकडून एक तिकडून एक अशीं जमवून एका कोणत्यातरी छावणींत ठेविलीं होतीं. एखाद्यावर शस्त्रक्रिया करण्याचीच जर जरूर भासली तर त्यास त्या बंदीछावणींत स्ट्रेचरवर घालून पाठवीत.

अशा वेळेस 'ॲलोपॅथी' म्हणजे इंग्रजी वैद्यकशास्त्र जवळजवळ निरुपयोगीच ठरतें असें म्हटलें तरी चालेल. पश्चिमेंतून बाटल्यांवर छाप लावून तयार होऊन आलेल्या दोनचार रसायनांचें मिश्रण कोणत्या वेळेस किती प्रमाणांत करावयाचें हें इंग्रजींतून पाठ केलेल्या कोष्टकांच्या मदतीनें शिकलेले लोक, तीं रसायनेंच उपलब्ध नाहींत अशा युद्धकालांत कुचकामाचे ठरतात. त्यांचे हातच चालत नाहींत. ते हतबुद्ध होतात. त्यांची मति कुंठित होते. हे लोक चार वर्षें शिकले कीं पडसें वगैरे झाल्यास ए., पी., आणि सी. या तीन तऱ्हेच्या भुकट्या मिसळून त्या "ए. पी. सी." अशा नांवानें रोग्यास द्याव्या. परंतु हा डॉक्टर काम करणार तो, "ए. पी." आणि "सी." या तीन तयार वस्तू परदेशांतून त्यास मिळाल्यावरच. त्या कोठें, कशा, केव्हां,

कधीं व कोणत्या यंत्रसामुग्रीनें तयार होतात हें त्यांस कधींच माहीत नसतें. त्या मिळाल्या तर द्यावयाच्या आणि नाहींतर–नाहीं. म्हणजे मेलें चार वर्षाचें शिक्षण फुकट ! अशा वेळीं मोठमोठ्या अमेरिकन, जर्मन आणि इंग्लिश अगदीं प्रख्यात औषधांचीं लांब लांब आणि कठीण नांवें लक्षांत असून कांहीं उपयोग नसतो. युद्धाच्या दिवसांत त्या औषधांचें उत्पादन, वाहतूक, निर्यात, वगैरे कांहींच होणें शक्य नसतें. देशाच्या स्वावलंबनाच्या दृष्टीनें व औषधांच्या प्रभावी गुणांच्या दृष्टीनेंही केव्हांही हिंदी वैद्यकशास्त्र हेंच योग्य, उपयुक्त आणि परिणामकारक ठरतें. प्रत्येक घरांत सतत विपुल आणि सर्वांस परिचित असलेल्या अशा हळद, आंवळकाठी, खडीसाखर, जायफळ, केशर, दालचिनी, इत्यादि वस्तूंपासून प्रभावी औषध तयार करावयास जो शिकेल तोच खरा वेळेस उपयोगी पडणारा धन्वंतरी. कांहीं भयंकर व्याधीस हिमालयांतील अथवा इतर जंगल प्रदेशांतील औषधी लागणें जरूर आहे परंतु त्यासुद्धां देशांतल्या देशांत विपुल मिळतात. म्हणून लंकेंत सोन्याच्या विटा असला अॅलोपॅथीचा प्रकार देशी वैद्यकशास्त्रांत होत नाहीं. जर्मनींतून किंवा मुंबईहून औषध मागवीपर्यंत खेड्डुताच्या व्याधीला कांहीं थोपवून धरतां येत नाहीं. अशा वेळेस हातीं असलेल्या साधनांचाच कुशलतेनें उपयोग करूं जाणणाराच खरा वैद्य. त्यास हवी असलेली औषधी वेळेला मिळाली नाहीं, तरी त्या औषधीइतकीच परिणामकारक दुसरी कोणती औषधी आपणांस मिळण्यासारखी आहे ? तिच्यापासून पहिल्याइतकेंच प्रभावी औषध तयार करण्यास कोणती क्रिया किंवा मिश्रणें केलीं पाहिजेत ? त्या दोघांचे गुणधर्म काय ? इत्यादि गोष्टींचा त्यास आपल्या मनांत चटकन् विचार करितां येतो. इंग्रजी वैद्यकशास्त्र शिकलेल्याचें तसें नाहीं. ' अॅटेब्रिन ' उपलब्ध नसल्यास ' मेपोक्रिन ' द्यावें हें फार तर त्यास माहीत. परंतु जेथें दोन्ही परदेशांतूनच येणार तेथें एकाला यावयाला वाट नसली तर ती दुसऱ्या औषधाला तरी कोठून असणार ? व शिवाय ' अॅटेब्रिन ' आणि ' मेपोक्रिन ' हीं कशापासून आणि कशीं तयार करितात हें तर त्यांस मुळींच माहीत नसतें. दुरून वाहात येणाऱ्या झऱ्याचा पाणीपुरवठा कायम राहिला तर त्यांतील मासे जिवंत राहातील आणि झराच आटला तर ?

१९४२ च्या मे आणि जून महिन्यांत नीसून व इतर बंदीछावण्यांतून आंवेची सांथ जोरांत सुरू झाली. कोंसळलेल्या कोठारांतील चुनामिश्रित तांदुळ, दूधदुभत्याच्या अभावामुळें सर्व सैनिकांच्या प्रकृतींत आलेली एक प्रकारची दुर्बलता, औषधींचा अभाव, छावण्यांच्या आसपासचे अव्यवस्थित शौचकूप, अशुद्ध पाणी, इत्यादि कारणें या आंवेच्या सांथीस पुरेशीं होतीं. दिवसांतून पांच, पंचवीस, पन्नास वेळां शौचास लागून शौचावाटे कफ किंवा रक्त पडणें सर्रास सुरू झालें. पौष्टिक आहाराच्या अभावीं दोन तीन

दिवसांतच सैनिक अत्यंत अशक्त होई आणि अंथरुणांतच त्याचे सर्व विधी घडत. जे शौचकूपापर्यंत जात ते, पुन्हा पुन्हा येण्याजाण्याची शक्ति नसल्यामुळें शेवटीं तेथेंच लोळत पडत, बेशुद्ध होत आणि मरून जात. या रोगामुळें येणारी घाण, एकमेकांबद्दल पुरेशा जिव्हाळ्याचा अभाव, संसर्ग व्हावयाची भीति व सर्वांनाच आलेली थोडीफार दुर्बलता या गोष्टींमुळें सर्वस्वीं असाहाय्य अशा परिस्थितींत सहसा कोणी कोणाला मदत करीत नसे. आणि अशा लोकांबद्दल, श्री. गोरे हे विनोदानें म्हणत त्याप्रमाणें ‘ लढावयाला आले आणि हगवणीनें मेले ’ अशी या लोकांची स्थिति झाली. या सांथींत सोळाशें ते अठराशें लोक केवळ हगवणीनें प्राणास मुकले. अशा वेळेस ॲलोपॅथीचा कांहीं उपयोग झाला नाहीं. मँगोस्टिन नांवाचें एक वांग्याच्या रंगाचें स्वादिष्ट फळ तिकडे मिळतें. त्याचा आकार मात्र खोबऱ्याच्या गोट्याएवढा असतो. त्याचीं शकलें वाळवून तीं उकळून त्यांचें पाणी औषधासारखें दिवसांतून दोन-तीन वेळां थोडें थोडें घेतलें असतां आंव बंद होते.

प्रथम माझी कोणाच महाराष्ट्रीयाशीं ओळख नव्हती असें म्हटलें तरी चालेल. नीसून छावणीमध्यें १८ फेब्रुवारी १९४२ रोजीं पोहोंचल्यावर दोन चार दिवसांनीं रा. गोरे हे माझा शोध करीत आले. त्यावेळच्या त्या कठीण परिस्थितींत अमक्या एका तुकडींत अमुक एक महाराष्ट्रीय गृहस्थ विशेषतः सुशिक्षित आहेत असें कळलें कीं ताबडतोब साहजिकच ते कोण, कोठले, इत्यादि जाणण्याची इच्छा होई व त्याप्रमाणें ज्यास अशी वार्ता प्रथम लागे तो आपण होऊनच त्या महाराष्ट्रीयास भेटावयास जाई. याप्रमाणें श्री. गोरे यांची व माझी प्रथम ओळख झाली व त्या भेटींत निर्माण झालेला रा. गोरे यांचा स्नेह प्रसंगाप्रसंगानें पुष्कळच वृद्धिंगत झाला. पुढें कांहींसे श्री. गोरे यांच्याचमुळें नीसून छावणीमधील इतर महाराष्ट्रीय म्हणजे वर्ध्याचे डॉ. शंकरराव नेने, डॉ. श्रीश कृष्ण जोशी इत्यादींचाही परिचय झाला. डॉ. जोशी व मी दोघांनीं मिळून पुढील दोन चार महिन्यांत बंदीछावणींत असतांना बऱ्याच गोष्टींत सहकार्य केलें. तें सहकार्य केवळ मी सायगांव ( इंडोचायना ) ला गेल्यामुळेंच वर्षभर स्थगित झालें एवढेंच. डॉ. नेने मात्र पुन्हां तीन वर्षांनंतर मला भेटले. परंतु रंगून इंग्रजांच्या ताब्यांत जाण्याच्या अगोदर १९४५ च्या मार्च–एप्रिल महिन्यांत मी तेथें असतांना त्यांचा व माझा स्नेह बराच वृद्धिंगत झाला.

फेब्रुवारी महिन्याच्या २८ तारखेस आमच्या तुकडीस सेलेतार छावणींत जाण्याचा हुकूम मिळाला. सामान व्यवस्थित बांधून व तें मोटार लॉरींत ठेवून आम्ही अडिचशें तीनशें माणसें रांगेनें पायीं निघालें. बारा–चौदा मैलाचें अंतर होतें तें. साडेतीन तास लागले आम्हांला, तेवढें अंतर तोडायला. वाटेंत दोन वेळां पावसाची सर येऊन आम्हीं ओले चिंब झालों. थकवा वाटूं लागला होता. कारण गेले पंधरा–वीस दिवस मैद्याची एक पोळी व भात, आमटी अथवा भाजी असा

आमचा आहार होता. यांत दूध, तूप, लोणी, कणीक इत्यादि सकस वस्तूंचा संपर्क सुद्धां नव्हता. युद्ध संपलें त्या वेळीं माझ्याजवळ दीड-दोनशें डॉलर्स शिल्लक होते. मलाया सिंगापूरचा एक डॉलर आपल्या पावणेदोन रुपयांबरोबर असतो. निकस अन्न, शारीरिक श्रम व मानासिक ताण यामुळें होणारे दुष्परिणाम टाळण्याकरतां मी त्यावेळेस आटीव दुधाचे डबे सुमारें आठ आण्यास ( २५ सेंटस् ) एक या दरानें विकत घेऊन त्यांतील बासुंदीवजा गोड आटीव दूध जेवणाबरोबर घेऊन दोन तीन दिवस एक डबा पुरवीत असें. परंतु माझी ही संवय पाहून मी माझ्या पिशवींत ठेविलेले दुधाचे डबे सर्वच्या सर्व चोरीस जाऊं लागले. माझी जेवणाची ताटलीही चोरीस गेली. दुधाचे डबे विकत आणणें हें तर मला ताबडतोब बंद करावें लागलेंच पण शिवाय हा चोरीचा प्रकार कोणत्या थरापर्यंत जाणार या काळजीनें मी अगदीं त्रासून गेलों होतों. ‘ कसल्या घाणेरड्या संगतींत आणि हीन समाजांत आपणांस दिवस काढावे लागत आहेत ’ हा विचार फारच तापदायक होई. श्री॰ गोरे यांच्या तुकडींतील पोस्टखात्याच्या माणसांनीं सिंगापूर पडावयाच्या वेळेला कोठल्याशा कोठारांतील दहा-बारा कथिलाच्या लहान ताटल्या बरोबर आणल्या होत्या; त्यांपैकीं एक, मी सहज त्यांच्याकडे दुपारीं गप्पा मारावयास गेलों असतांना आणली तींतच मी पुढें तीन-चार महिने जेवीत असें.

नीसूनमधून सेलेतार छावणींत आल्यावर थोडा बदल झाला. त्यामुळें जरा बरें वाटलें. परंतु नीसून छावणीप्रमाणें येथें पक्क्या इमारती व इतर साफ-सफाई नव्हती. पानापाचोळ्याचें छप्पर असलेल्या लांबलचक लांकडी बराकींत यापुढचे तीन-चार महिने काढावे लागले. सेलेतार छावणींत आलों तों आमची बराक कोणती ? जेवण्याखाण्याची व्यवस्था काय ? याचा कांहींच पत्ता लागेना. लॉरींत ठेविलेलें सामानही अजून आलें नव्हतें. वाटचालीच्या श्रमांमुळें आम्हीं थकून गेलों होतों. अंधार पडला. अंगावर पावसांत भिजलेले ओलेचिंब कपडे. त्यामुळें सगळें अंग गार लागत होतें. त्यांत आणखी रात्रींचा गारठा. सगळें अंगावर शहारून कांटा उभा राहिला. आम्हीं कुडकुडूं लागलों. त्या छावणींतील स्वयंपाकी आपापल्या स्वयंपाकाच्या झोंपडींत स्वयंपाक करीत होते. आमच्यापैकीं कित्येकजण तेथें गेले आणि त्यांनीं खावयाला मागितलें. पोटांत भूक लागली असूनही माझ्याच्यानें हात पसरवेना. उपाशींच झोंपी जावयाचें असें मी ठरविलें. ते लोक तरी इतके जणांना एकदम कोठून अन्न देणार ? मग शीख स्वयं-पाक्यानें शिखास अन्न द्यावें, मुसलमानानें मुसलमानास द्यावें, इतरांस देऊं नये, असें चाललें होतें. माणसाच्या गुणांची पारख अशा कठिण परिस्थितीमध्येंच होत असते. इतर वेळीं एकमेकाशीं हंसणारे–खिदळणारे मानसिंग आणि प्रताप-सिंह चांगलेच वाटतात. वेळ आली म्हणजे मात्र राजा मानसिंग कोण व राणा प्रतापसिंह कोण हें कळून येतें. स्वार्थी धर्मांधतेची, चोरी, खून, मारामाऱ्या

करण्याची प्रवृत्ति, असत्य बोलण्याची संवय, आंगचोरपणा, मनाचा दुबळेपणा, भीरुता इत्यादि कित्येकांच्या अंगचे एरवीं लपलेले दुर्गुण आपत्कालांत खरजेंतील फोडांसारखे एकदम उठून दिसतात. उलट आपत्कालांतच रात्रीचा अंधार पडतांच रातराणी फुलावी तसे कांहींचे सद्गुण उमललेले दिसतात.

त्या रात्रीं बराकींतील लाकडी चौथऱ्यावर मी जुन्या इंग्रजी नियतकालिकाचे कागद एकाला एक जोडून व ते चादरीवजा पसरून त्यांवरच झोंपलों. उशी नाहीं, आंथरूण नाहीं, पांघरूण नाहीं, अशा परिस्थितींत झोंपण्याचा माझा तो पहिलाच प्रसंग. ती रात्र कशी तरी कुडकुडत घालविली. पूर्वीं तेथें इंग्रजी विमानदलाचे इंग्रज शिपाई राहात असत त्यामुळें जुन्या सचित्र नियतकालिकांचे अंक तरी आंथरावयास मिळाले. दुसऱ्या दिवशीं मोटारी आल्यामुळें सेलेतार छावणींतील आमचा दिनक्रम सुरू झाला.

---

## मोहनसिंगांचें कार्य : ८

सिंगापूर पडल्यावर कॅ. मोहनसिंग यांस जपान्यांनीं सर्व हिंदी युद्धबंद्यांचे मुख्य जी. ओ. सी. म्हणजे जनरल ऑफिसर कमांडिंग नेमलें. यापुढें कॅ. मोहनसिंग यांस जनरल मोहनसिंग असें संबोधित असत. ब्रिटिशांचे अमदानींत जे कॅप्टनच्या हुद्याचे वरचे अधिकारी होते त्यांस याबद्दल वैषम्य वाटूं लागलें. कारण आतां यापुढें त्यांस मोहनसिंगांस अभिवादन करावें लागणार होतें. लष्करी नियमाप्रमाणें वरिष्ठ अधिकाऱ्यास प्रत्येक भेटीचे सुरुवातीस व शेवटीं शिस्तींत अभिवादन करावें लागतें. ब्रिटिश पद्धतीनें शिक्षण घेतलेल्या हिंदी लष्करी अधिकाऱ्यांचा असा कांहीं एक विशिष्ट दृष्टिकोन होता कीं ब्रिटिशांनीं दिलेला सैन्यांतील दर्जा हेंच प्रत्येक माणसाच्या किंमतीचें उत्कृष्ट प्रमाण आहे. उदाहरणार्थ एखादा उच्च शिक्षण घेतलेला इसम जर सैन्यांतील कनिष्ठ श्रेणींत शिरला तर त्याच्या वरचे अधिकारी असा आव आणतात कीं ज्या अर्थीं तो सैन्यांत त्यांच्या हाताखालीं आहे त्या अर्थीं जगांतील कोणत्याही विद्येंत वा कलेंतही त्यांचें अकटोपासून विकटोपर्यंतचें ज्ञान हें केव्हांही त्या कनिष्ठाच्या ज्ञानापेक्षां कितीतरी पटीनें अधिक असणार. अशा दूषित ग्रहानेंच ते त्याच्याशीं वागणूक ठेवतात. दुसरी गोष्ट म्हणजे, येतां जातां सैनिकांकडून सलाम घेण्याच्या संवयीला सोकावलेले हे अधिकारी इतके आढ्यतेखोर बनतात, त्यांना खुशामतीची अशी कांहीं एक चट लागते कीं रोजच्या नागरी जीवनांतसुद्धां आपल्यापेक्षां कमी पगार मिळणाऱ्या माणसांनींही आपणांस ‘ सलाम ’ कां करूं नये ? याचें त्यांस फार आश्चर्य वाटतें आणि ते मनांतल्या मनांत संतापतातही. या वृत्तीमुळें अर्थातच कॅ. मोहनसिंग कानामागून आला व तिखट झाला असें या वरिष्ठ अधिकाऱ्यांस वाटूं लागलें. वास्तविक ब्रिटिशांनीं दिलेला दर्जा हेंच कांहीं जन्मभराचें प्रमाण राहूं शकत नाहीं. कालचा कॅप्टन आज जनरल होऊं शकतो. त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें खरोखर कांहींच नाहीं. वैषम्य वाटणाऱ्यांपैकीं प्रत्येकास हा दर्जा व मान मिळाला असता तर त्यांनीं तो नाकारला असता थोडाच ? पण हेंही लक्षांत ठेवण्यासारखें आहे कीं सत्ताधीश व्यक्तीच्या मागें लांबलांब गप्पा मारणाऱ्या या अधिकाऱ्यांनीं कॅप्टन मोहनसिंग यांच्या हाताखालीं कामें केलीं, त्यांची खुशामत केली, त्यांचा उदोउदोही केला व लष्करी नियमाप्रमाणें येतां जातां त्यांस अभिवादनही केलें. मत्सरग्रस्त अशा या लोकांच्या स्वभावांतील दुसरा विशेष म्हणजे सत्तेपुढें ते नमतें घेऊन अगदीं

गोगलगाय बनतात. कनिष्ठापुढें धाकदपटशा, अरेरावी आणि आढ्यता मिरविणारे हे लोक जबरदस्त सत्ताधाऱ्यापुढें लोण्यासारखे मऊ येतात.

माउंट प्लेझेंट हा सिंगापुरांतील भूभाग उंचसखल हिरवळीचा आहे. या भागांतील टेकड्यांवर एक एक स्वतंत्र बंगला, त्याचें आवार, बाग, हिरवळीचें टेनिस कोर्ट अशी रचना आहे. या भागांत ब्रिटिशांचे फार वरच्या दर्जाचे अधिकारी व इतर गर्भश्रीमंत लोक राहात असत. अर्थात् जपान्यांचें सरकार प्रस्थापित होतांच त्यांनींसुद्धां आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना राहावयास हे बंगले दिले. जनरल मोहनसिंग स्वतः अशाच एका बंगल्यांत राहात असत. व जवळच्याच एक दोन बंगल्यांत त्यांचे इतर सहकारी अधिकारी व कारकून, टंकलेखक, शरीररक्षक इत्यादि लोक राहात. त्यांचे स्वतःचे बंगल्यांत त्यांचे डॉक्टर मेजर राजू (तेलगू गृहस्थ) व दोनतीन कॅप्टनच्या हुद्याचे अधिकारी राहात असत.

जनरल मोहनसिंग स्वतः शीख असल्यामुळें अर्थातच त्यांचेभोवतीं बरेच शीख सहकारी गोळा झाले. यांत गैर कांहींच नव्हतें. कोणताही माणूस, अधिकारपदावर पोहोंचतांच निरनिराळ्या पदांवर तो आपल्या विश्वासांतील लोक नेमतो हें साहजिक आहे. एक मातृभाषा बोलणाऱ्या कोणत्याही दोन इसमांस एकमेकांबद्दल जास्त विश्वास वाटणें स्वाभाविकच आहे. अमुक एका माणसाची व आपली मातृभाषा एकच आहे असें समजल्यावर त्याच्याबद्दलचें अर्धें अधिक ज्ञान तो माणूस प्रत्यक्ष पहाण्याच्या पूर्वींच आपणांस होतें. तो कोणत्या परिस्थितींत जन्मला असेल ? लहानपणापासून त्याच्या मनावर कोणकोणते संस्कार झाले असतील ? स्थूलमानानें त्याचीं मतें निरनिराळ्या बाबतींत काय असतील ? इत्यादि सर्व गोष्टी स्वानुभवानें चटकन् आपल्या डोळ्यापुढें उभ्या राहातात. अर्थात् हें त्रिकालाबाधित सत्य असल्यामुळें जनरल मोहनसिंगांस शीखांच्या धार्जिणेपणाबद्दल दोष देतां येत नाहीं.

सैन्यांतून पळून गेलेल्या, गांवांत दारू पिऊन दंगा करणाऱ्या व लांचलुचपत घेणाऱ्या सैनिकांस पकडून योग्य ती शिक्षा करण्याकरतां मोहनसिंगांनीं शिंघारासिंग यांस फौजी पोलिसांचा मुख्य म्हणून नेमिलें होतें. हे फौजी पोलीस सिंगापूर शहरांत ठिकठिकाणीं उभे असत. मोहनसिंगांच्या बंगल्यावर सशस्त्र हिंदी शिपायांचा पहारा असे. त्यांचे एक दोन सहकारी ए. डी. सी. म्हणून त्यांच्या दिमतीला असत. शिवाय कांहीं कारकून, व स्टेनो-टायपिस्ट होतेच. जवळच्या बंगल्यांत स्वातंत्र्य-चळवळीची एक कचेरी होती. यांतूनच पत्रव्यवहार, हिशेब इत्यादि कामें चालत असत.

सर्व युद्धबंदी निरनिराळ्या बंदीछावण्यांत राहावयास लागल्यापासून मोहनसिंगांचे सहकारी अधून मधून वेळ ठरवून व त्याप्रमाणें प्रत्येक छावणीच्या मुख्य अधिकाऱ्यास अगोदर लेखी कळवून त्या त्या छावणींत व्याख्यान देण्यास

जात. स्वातंत्र्याच्या लढ्याकरतां जास्तींत जास्त लोकांचीं मनें वळवावयाचीं हा व्याख्यानाचा उद्देश असे. त्याप्रमाणें ते तास दोन तास व्याख्यान देत. व्याख्यानाकरतां त्या त्या छावणींतील पटांगणांत सुस्थितींत असलेल्या सर्व युद्धबंद्यांस हजर राहावें लागे. व्याख्यानानंतर प्रत्येकास निरनिराळे प्रश्न विचारण्याची मुभा असे. या प्रश्नांचीं उत्तरें व्याख्याता स्वतःच्या बुद्धीस सुचेल तशीं देत असे. बरेचसे प्रश्न मुद्दाम कुत्सितपणेंच विचारिले जात. व्याख्यानानंतर तो अधिकारी सर्वांस उद्देशून सांगे, "आपल्यापैकीं जे कोणी स्वातंत्र्य-लढ्यांत भाग घ्यावयास तयार असतील त्यांनीं आपलीं नांवें नोंदवून तीं आपल्या छावणीच्या कचेरी मार्फत आमच्या मुख्य कचेरीकडे पाठवावीं." प्रत्येक छावणींत प्रत्येक सात आठ दिवसांनीं अशीं कित्येक व्याख्यानें होऊन गेलीं. दरवेळेस कमी अधिक स्वयंसिद्ध लोकांच्या याद्या प्रत्येक तुकडीच्या अधिकाऱ्यांकडून छावणींतील मुख्य अधिकाऱ्याकडे व तेथून माउंट प्लेझेंटवरील मुख्य कचेरीकडे जात असत. असे चार महिने गेले तरीसुद्धां या सिद्ध असलेल्या लोकांस तारेच्या कुंपणानें वेष्टित अशा बंदीछावणींतून आणि ब्रिटिशधार्जिण्या अशा त्यांच्या इतर बांधवांच्या संगतींतून काढून दुसरीकडे नेण्याची व त्यांना स्वातंत्र्यप्राप्तीकरतां कांहीं विशिष्ट कामगिरी देण्यांत येणार असल्याचीं कांहींच चिन्हें दिसेनात. दरवेळेस आपण नांवें देतों, पण पुढें काय? पुन्हा एखाद्या अधिकाऱ्याचें व्याख्यान, पुन्हा नांवांची यादी. हें आहे तरी काय? हें गौडबंगाल कोणासच उमगेना. घोडें कोठें पेंड खात आहे हें कळावयास कांहींच मार्ग नव्हता. दिवसेंदिवस प्रत्येक बंदीछावणींतील प्रत्येक तुकडींत दोन गट पडूं लागले. एक स्वातंत्र्यलढ्यासाठीं नांवें दिलेल्यांचा व दुसरा न दिलेल्यांचा. या दोन गटांत वितुष्ट वाढूं लागलें. नांवें न दिलेल्या लोकांनीं नांवें दिलेल्या लोकांचे कपडे रात्रीं हळूच चोरावे, कांहींतरी निमित्तानें मारहाण करावी, चिडवावें, हिणवावें, त्यांच्यावर बहिष्कार टाकावा, असें चाललें होतें. याच्या उलट, नांवें दिलेल्या लोकांस आपणांस कैदी म्हणून समजण्यांत येऊं नये, या बंदीछावणींतून दूर कोठेंतरी नेऊन मानानें वागविण्यांत यावें असें वाटे. क्वचित् एखाद दुसऱ्या माणसास बोलावणें येई व तो आपलें चंबूगबाळें घेऊन मोहनसिंगांच्या कचेरींत निघून जाई. तेथेंच कोठेंतरी त्यास काम मिळे. परंतु अशा एखाद दुसऱ्या माणसास बोलावणें येई तें, त्याच्या ओळखीचा कोणी मोहनसिंगांच्या कचेरींत काम करणारा असे त्याच्या वशिल्यानें.

स्वतः मोहनसिंगांचीही महिना पंधरा दिवसांनीं सर्व युद्धबंद्यांस उद्देशून व्याख्यानें होत असत. हीं व्याख्यानें बहुधा बिद्याधारी छावणीच्या पटांगणांत होत. अशा व्याख्यानाच्या दिवशीं प्रत्येक छावणींतील दहा दहा बारा बारा हजार युद्धबंद्यांस पहाटे उठून या व्याख्यानस्थानाकडे रांगेनें शिस्तींत कूच करावयाचा हुकूम असे. अशा वेळीं प्रत्येक तुकडींत पहाटे अन्न शिजवून तें प्रत्येक

शिपायाबरोबर बांधून दिलें जात असे. कारण १०-१२ मैलांची रपेट करून दोन तीन तास व्याख्यान ऐकून पुनः त्यांस तितकेंच अंतर तोडून पायीं यावें लागत असे. आजारी माणसांनीं जाऊं नये असा हुकूम असे. परंतु इतरांनीं आजाराचें ढोंग करूं नये याचीही तितकीच दक्षता घेतली जाई. मोहनसिंगांच्या व्याख्यानाचा रोखही ' स्वातंत्र्याच्या लढ्यांत भाग घेण्यास पुढें या ' अशा तऱ्हेचाच असावयाचा. ज्यांनीं नांवें दिलीं होतीं त्यांच्या मनांत साहजिकच प्रश्न उभा राही ' अहो, आम्ही इतक्यांदा नांवें दिलीं तरी आम्हांला नेत कां नाहीं ? शेवटीं आम्ही बंदी ते बंदीच ! नांव द्यावें कीं नाहीं, द्यावें कीं नाहीं अशा विचारांत पडलेले लोकही यामुळें कचरूं लागले. कारण त्यांना वाटलें, नांवें दिलीं काय अन् न दिलीं काय, परिस्थितींत कांहींच बदल नाहीं. बंदी ते बंदीच. मग उगीच हात दाखवून अवलक्षण कशाला करून घ्यावयाचें. नांव देऊं नये असें ठाम मत ज्यांचें होतें ते लोक आपला टेंभा मिरवूं लागले, ' बघा, नांव देऊन काय मिळविलेंत ? त्यापेक्षां आम्ही बरे. इंग्रज जिंकले तर तुम्ही राजद्रोही मात्र ठरणार ! '

१७ फेब्रुवारी १९४२ या दिवशीं फॅरर पार्क मधील समारंभानंतर सर्व युद्धबंद्यांनीं एक मुखानें स्वातंत्र्य-लढ्यांत भाग घेण्याची आपली तयारी आहे असें कित्येकदां जयघोष करून दाखवून दिलें. त्यानंतर तरी त्यांस बंदी-छावण्यांतून न ठेवतां एका स्वतंत्र देशाच्या सैनिकांप्रमाणें वागविलें असतें तर पुढच्या भानगडीच कराव्या लागल्या नसत्या. त्याच त्याच गोष्टींचें चर्वितचर्वण मात्र जास्त झालें आणि परिस्थितींत तर कांहींच फरक पडला नव्हता. त्यामुळें निरनिराळ्या लोकांच्या सुपीक डोक्यांत रिकामपणीं शंकाकुशंका उत्पन्न होऊं लागल्या व कित्येक देशद्रोही लोकांस विरोधी प्रचार करावयास वाव मिळाला. सिंगापूर पडल्यावर, जणूं कांहीं, कांहीं झालेंच नाहीं अशा तऱ्हेनें जर साठ हजारच्या साठ हजार हिंदी सैनिकांस युद्धबंदी न समजतां स्वतंत्र सैनिकाच्या दर्जानें वागविलें असतें आणि त्यांची नवी स्वतंत्र संघटना केली असती तर एकानें सुद्धां ' ब्र ' काढला नसता. जणूं काय हें क्रमप्राप्तच आहे अशा मनोवृत्तीनें त्यांनीं त्याचा स्वीकार केला असता. परंतु " अजून यांत तुम्हाला 'हो' किंवा ' नाहीं ' म्हणावयाला जागा आहे. पुन्हा पुन्हा विचार करा, " असें त्यांना वारंवार बजावण्यांत आलें. त्यामुळें त्यांचीं डोकीं फिरलीं. नुसता विचार करावयाचा तर प्रत्येकानें आपला निराळा विचार कां पाहूं नये ? असें प्रत्येकास वाटूं लागलें. अशा स्थितींत कोणी नांव द्यावें, कोणी काढून घ्यावें, कोणी पुनः आपलें मत बदलून उलट मार्ग धरावा, कोणी नसत्या शंका उपस्थित करून शंकासमाधान झाल्याशिवाय कोणत्याही मार्गाचा अवलंब करावयाचा नाहीं असें अडमुठेपणाचें धोरण ठेवीत. एकूण सर्वच गोंधळ माजला होता.

या सर्व प्रकारांतलें इंगित हें होतें कीं जनरल मोहनसिंगांस नुसतें नामधारी

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 27332 दि: 2/1/65
क्रमांक 682 नों. दि. 20/7/65



सर्वाधिकारी बनवून आपल्या बाजूनें लढावयास किती युद्धबंदी तयार आहेत याचा अदमास काढावयाचा व त्यांच्या नांवें हुकूम देऊन जरूर तसें आपल्या कामाकरतां दूरपूर्वेतील निरनिराळ्या प्रदेशांत हिंदी सैनिक पाठवावयाचे हा जपान्यांचा मुख्य हेतु होता म्हणूनच अनेक वेळां स्वातंत्र्याचें ध्येय गांठण्यास सिद्ध असलेल्या लोकांच्या याद्या घेऊन जपान्यांनींसुद्धां त्यांच्याकरतां सिंगापुरांतच निराळी व्यवस्था ठेवण्याचें मनांतसुद्धां आणलें नाहीं. पुन्हा पुन्हा स्वातंत्र्य-संदेश युद्धबंद्यांच्या कानावर घातला म्हणजे सर्वजण तयार आहेत असें एक दिवस आपल्याला ऐकावयास मिळेल असें जपान्यांस वाटलें. मग त्यांपैकीं आपल्यास लागतील तितके लोक आपण वाटेल तेव्हां घेत जाऊं आणि जरूर त्या ठिकाणीं पाठवीत जाऊं असें त्यांनीं ठरविलें होतें. परंतु हें त्यांचें धोरण अगदीं चुकीचें आणि घातक ठरलें. मानवी स्वभावाचें सामान्यज्ञानसुद्धां त्या अधिकाऱ्यांस नव्हतें असें दिसून आलें. नवीन लोक तर तयार झाले नाहींतच परंतु जुनेही कंटाळून पाऊल मागें घेऊं लागले. अशा दांभिकतेनें आपला स्वार्थ तेवढा साधूं व या युद्धबंद्यांचा आपल्या कार्यास उपयोग करून घेऊं असा जपान्यांचा आपमतलबी डाव होता. परंतु सर्वस्वीं एकतर्फी डाव कधींच साधत नाहीं. या त्यांच्या डावाची सर्वसामान्य हिंदी युद्धबंद्यांस कल्पना नव्हती. परंतु मानवी मनोव्यापारास अनुसरून सर्व युद्धबंदी या खेळास साहजिकच कंटाळले.

या फसवेगिरीचें ठळक उदाहरण म्हणजे जनरल मोहनसिंगांस भुलथापा देऊन युद्धबंद्यांच्या तोफखान्याच्या तुकडीचा जपान्यांनीं स्वतःच्या मतलबाकरतां केलेला उपयोग. युद्धबंद्यांत तोफखान्याच्या कांहीं तुकड्या होत्या त्यांस स्वातंत्र्य-युद्धावर जाण्याच्या अगोदर तोफखान्याचें एक विशिष्ट शिक्षण देण्याच्या मिषानें व तोफा चालविण्याची संवय व्हावी हें खोटेंच निमित्त पुढें करून जपान्यांनीं त्यांना जनरल मोहनसिंगांच्या परवानगीनें सिंगापूरच्या दक्षिणेकडे असलेल्या एका बेटावर नेण्याचें ठरविलें. जनरल मोहनसिंगांस हें खरें वाटलें म्हणून म्हणा, किंवा जपान्यांनीं त्यांच्यावर दडपण आणलें म्हणून म्हणा, जनरल मोहनसिंगांनीं एके दिवशीं त्या तोफखान्याच्या अधिकाऱ्यांस उद्देशून म्हटलें, " तुम्ही हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्यासाठीं लढण्यास तयार आहांत ना ? मग तोंवर तुमचा तोफखान्याचा सराव तुटूं नये एवढ्याकरतां मी तुम्हांला थोडे दिवस एका कामगिरीकरतां एखाद्या बेटावर पाठविलें तर तुम्ही जाण्यास तयार आहांत काय ? " ते चटकन् ' हो ' म्हणाले. जपान्यांचा डाव त्यांना माहीत नव्हता. कोणत्याही निमित्तानें कां होईना परंतु आपण काबीज केलेल्या विस्तीर्ण प्रदेशाच्या संरक्षणाकरतां हिंदी तुकड्यांचा उपयोग करावयाचा हाच जपान्यांचा उद्देश होता. निमित्त मात्र हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्याचें. आमच्या तुकड्या दूर-वरच्या बेटांवर नेऊन तुम्हीं हिंदुस्थानाचें स्वातंत्र्य मिळवून देण्यास आम्हांला मदत करणार तरी कशी ? असें कोणी म्हटलेंच तर ते उत्तर देत ' अहो, आमच्या

लढाईंत सहभागी होऊन आम्हाला मदत करणें हाच तुमच्या स्वातंत्र्य-प्राप्तीचा मार्ग. कारण आम्हीं विजयी झालों, तुमच्या शत्रूचा निःपात केला कीं झाला तुमचा देश स्वतंत्र.' त्या तुकडीला एकदां त्या बेटावर नेऊं दिल्यावर पुन्हां तिला परत आणून हिंदी स्वातंत्र्य-सैन्यांत सामिल करणें फारच प्रयासाचें काम ठरलें. जपान्यांनीं टाळाटाळ करून एक दोन वर्षे त्या तुकडीचा कांहीं थांग पत्ता लागूं दिला नाहीं. प्रथम ते म्हणत, "हो. बोलावून घेऊं; त्याला काय !" पुन्हां थोड्या महिन्यांनीं आठवण केली म्हणजे म्हणत, "हो हो. आम्हीं प्रयत्न चालविले आहेत." आणखी कांहीं महिन्यांनीं विचारलें म्हणजे ते सांगत, "हो आणावयास तर पाहिजेच परंतु तें फार कठिण काम आहे बरें का. अर्थात् आम्ही आमच्याकडून शक्य तो प्रयत्न करूंच पण जरा वेळ लागेल, एवढेंच." अशा तऱ्हेनें ते वेळ मारून नेत. 'हे लोक म्हणजे दुधखुळीं बाळें आणि आपण सत्ताधिकारी मात्र धूर्त. वाटेल तशा भुलथापा मारून यांची समजूत घालतां येईल' अशी या जपान्यांची कल्पना. हीच त्यांची वृत्ति पुढें कित्येक वेळां नेताजींनाही नडली.

ज. मोहनसिंगांच्याच प्रांतांतले व गांवांतले बरेचसे लोक त्यांचे सहकारी म्हणून पुढें आले होते. नवीन राजा गादीवर बसला म्हणजे त्याच्या मर्जीतल्या लोकांचें जसें राज्य सुरू होतें त्याप्रमाणें या लोकांचीही सद्दी सुरू झाली. जो तो त्यांच्यापाशीं वशिला लावूं लागला. त्यांच्याबरोबर फिरतांना अथवा बोलतांना लोकांनीं आपणांस पाहावें असें कांहीं जणांस वाटे. या शिद्यांनीं अधूनमधून प्रत्येक बंदीछावणींत जावें, ज्या कांहीं अफवा ऐकूं येतील त्या भडकपणें लिहाव्या व ज. मोहनसिंगाकडे पाठवाव्या, असा क्रम चालू ठेविला. या सपाट्यांत कांहीं इंग्रजप्रेमी 'किंग्ज कमिशन्ड ऑफिसर्स' सांपडले. आपआपसांत अथवा सहज तिऱ्हाइतापाशीं ते ज. मोहनसिंगांविरुद्ध अथवा या चळवळीविरुद्ध कांहीं बोलत. या ना त्या रीतीनें, तें जपानी अधिकाऱ्यांच्या व ज. मोहनसिंगांच्या कानीं पोंचतच असे. जपान्यांनींही आपल्या हाताशीं धरलेले असे कांहीं हिंदी युद्धबंदी होते कीं ते इतरांबद्दल कांहीं खऱ्या, कांहीं खोट्या, अशा एवढ्या तेवढ्याशा सर्व गोष्टींची वित्तंबातमी जपान्यांस देत. स्वजनांविरुद्ध जपान्यांस ( किंवा कोणाही परकी माणसास ) बातमी देणें हा अधमपणा आहेच परंतु ज. मोहनसिंगांस व पुढें नेताजींसही बातमी पुरविणारे हे लोक वरपांगी देशभक्तीचा आव आणीत होते, तरी आंतून ते अत्यंत स्वार्थसाधू, भोंदू असल्याचेंही निदर्शनास आलेलें आहे. केवळ, वरिष्ठांची आपणावर मर्जी बसावी, आपल्यावर कांहीं वेडावांकडा प्रसंग आला तर आपलें वरिष्ठांकडे वजन असावें, नेहमीं त्यांच्याकडे जाण्यायेण्याची संधी मिळावी, इतरांनीं आपली खुशामत करावी, आपल्याला भिऊन लोकांनीं खायलाप्यायला द्यावें हा मुख्य उद्देश हे उद्योग करणाऱ्या कित्येकांचा असे.

या ठिकाणीं आलेल्या अनुभवावरून हिंदी लोकांचा मानसिक दर्जा इतका हीन झालेला दृष्टोत्पत्तीला आला कीं कोणीही त्यांस दमडी द्यावी व त्यांच्याकडून वाटेल ती अराष्ट्रीय कामगिरी करवून घ्यावी. दमडीसुद्धां द्यावयाला नको, अधिकारी मनुष्याचें एक स्मित किंवा एक स्नेहकटाक्षसुद्धां पुरे. तेवढ्यावरसुद्धां स्वबांधवांविरुद्ध वाटेल तें करावयास उद्युक्त होणाऱ्या हिंदी लोकांचे मासले तेथें दिसले. प्रत्यक्ष सक्रिय देशभक्ति तर दूरच राहिली परंतु फुकटची निष्क्रिय देशभक्ति तीसुद्धां आमच्या हातून होत नाहीं, याचें मात्र वाईट वाटलें. परंतु जपान्यांस, ज. मोहनसिंगांस व नेताजी सुभाषचंद्र बोस यांस माहिती पुरविणारे बरेच लोक विघ्नसंतोषी, स्वार्थांध, मोठेपणास हपापलेले, मत्सरग्रस्त व अत्यंत हीन वृत्तीचे होते हें खरें असलें तरी त्यालाही अर्थात् अपवाद होतेच. कै. श्री. देशपांडे यांनीं मात्र ही कामगिरी केवळ सद्बुद्धीनेंच बजावली हें अवश्य नमूद केलें पाहिजे.

या युद्धाच्या सुरुवातीला जपान व जर्मनी यांची बरीच सरशी होत गेली. तेव्हां सर्व देशप्रेमी हिंदी लोकांना साहजिकच आनंद झाला. आशियाचा उर्जितकाल जवळ येऊन पोंचलेला आहे व पाश्चात्य साम्राज्यशाहीचें दडपण नष्ट होऊन आपणाला अनुकूल अशी जगाची घडी बसत आहे अशी आशा सर्वांस वाटूं लागली. मॅन्चेस्टर गार्डियन या ब्रिटिश वृत्तपत्राच्या कलकत्ता येथील बातमीदारानें आपल्या वृत्तपत्रास धडधडत्या अंतःकरणानें अशी बातमी कळविली कीं " हिंदुस्थानांत जिकडे पाहावें तिकडे जपानच्या सुरुवातीच्या विजयानें सगळ्या हिंदी लोकांचीं मनें आनंदानें उचंबळून येत आहेत. दूरपूर्वेतील गडगडणाऱ्या इंग्रजी साम्राज्याबद्दल कोणत्याही हिंदी माणसाच्या मनांत लवमात्रही दुःखाची छटा दिसून येत नाहीं. " अशा वेळीं मलाही त्याबद्दल आनंद वाटणें साहजीक होतें. सेलेतार छावणींत आल्यावर थोड्याच दिवसांनीं एका रात्रीच्या संपूर्ण विचारानंतर मी एक अर्ज लिहून काढला व त्यांत लिहिलें कीं " हिंदी स्वातंत्र्याकरतां संपूर्ण स्वार्थत्याग करावयाची माझी तयारी आहे. या चळवळीच्या प्रचाराकरतां कांहीं सुशिक्षित लोक नभोवाणी केंद्रावरून प्रचार करण्याकरतां म्हणून निवडावयाचे आहेत असें मी ऐकतों तरी माझें उच्चतम विश्वविद्यालयीन शिक्षण व माझी आवड या दोन्ही बाबी लक्षांत घेतां मी तें काम उत्तम रीतीनें पार पाडूं शकेन. अर्थात् तें काम करण्याची संधी दिली तर मी आभारी होईन. त्या कामानिमित्त जगाच्या पाठीवरील कोठल्याही केंद्रावर काम करण्याची माझी तयारी आहे. " त्या सर्व युद्धबंद्यांत मिळून चार किंवा पांच जण बॅरिस्टर किंवा एल्एल्.बी. म्हणजे कायदा जाणणारे असतील. त्यांपैकीं मी एक होतों. एम्.ए. ही पदवी घेतलेलेही माझ्याशिवाय दोघेतिघेच होते. परंतु वरील दोन्ही पदव्या घेतलेला त्या सर्व युद्धबंद्यांतच काय परंतु त्या सर्व प्रदेशांत मी एकटाच होतों, असें मला वाटतें. माझा अर्ज मी जनरल मोहनसिंग यांच्याकडे

पाठविला. थोड्या दिवसांनीं एक कॅप्टनच्या हुद्याचा अधिकारी आमच्या छावणींतील मुख्य कचेरींत आला व त्यानें मला बोलावणें पाठविलें. मी तेथें गेल्यावर तो म्हणाला, " तुमचें पत्र आमच्या कचेरींत पोंचलेलें आहे. आपण दाखविलेल्या स्वार्थत्यागाच्या तयारीबद्दल आम्ही तुमचें अभिनंदन करितों. त्याचा योग्य तो विचार होईल. " एवढें बोलून तो अधिकारी निघून गेला. तो कोण, काय, इत्यादि त्यानें मला कांहींच सांगितलें नाहीं. थोड्या दिवसांनीं माझ्या कानांवर जी बातमी आली तिनें लष्करी लायकी-नालायकीच्या मोजमापन-पद्धतीबद्दल मला चीडच आली. अशीं प्रत्यंतरें मला अगोदर पुष्कळ आलेलींच होतीं परंतु त्याच्या भरीला हें आणखी एक मिळालें. एक लेफ्टनंट कर्नल व दोन कॅप्टन हे त्या नभोवाणी केंद्रावरील प्रचाराकरतां निवडले गेले होते आणि मी तसाच राहिलों. त्यांचें शिक्षण मॅट्रिकइतकें सुद्धां झालेलें नव्हतें. राजकारण तर कशाशीं खातात हेंसुद्धां त्यांस ठाऊक नव्हतें. डेहराडूनच्या शाळेंत दोन वर्षें शिक्षण घेणारे लोक हेच हिंदी सैन्यांतील अधिकारी पदावर सुरुवातीस सेकंड लेफ्टनंट म्हणून नेमले जातात. फौजेंत कोणतेंही का काम असेना लष्करी हुद्दा हेंच सर्व प्रकारच्या लायकीचें अत्युत्तम प्रमाण समजलें जातें. वरील नेमणुकीचें वृत्त मला कळल्यावर मी दुसरें एक पत्र लिहिलें. त्यांत, विशिष्ट कार्याकरतां एखाद्या माणसाची लायकी न बघतां हुद्दा बघणें या अन्यायाविरुद्धच मुख्यतः माझा विरोध मी दर्शविला होता. त्या पत्राचें उत्तरच आलें नाहीं. तद्नंतर मी दुसरें एक तदर्थींच पत्र लिहिलें त्याचेंही कांहीं उत्तर आलें नाहीं.

त्यानंतर एके दिवशीं मोहनसिंगांचें, बिदाधारी छावणींत महत्त्वाचें व्याख्यान होतें. सर्व अधिकारीच तेवढे जावयाचे होते. मी तुकडींतील सर्वांत सुशिक्षित मनुष्य या नात्यानें मला चलण्याचा पुष्कळांनीं आग्रह केला परंतु मी तो साफ नाकारला. सैन्यांत स्वार्थत्याग वा सचोटी याला वाव नसून हुद्दा आणि दिखाऊपणा यांवरच भर दिला जातो, याचा मला मनस्वी राग आला होता. दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं व्याख्यान ऐकून लोक परतले तेव्हां हिंदी स्वातंत्र्यसेनेची अभिनव संघटना करण्याचें जनरल मोहनसिंगांनीं आपल्या व्याख्यानांत सांगितल्याचें कळलें. स्वातंत्र्यसेनेचा पोषाख, हुद्यांचीं निदर्शक चिन्हें इत्यादि सर्व गोष्टींचा नव्यानें विचार करण्याकरतां एक नवी समिति स्थापन करण्याचा विचार जनरल मोहनसिंगांनीं जाहीर केला. विशेष आनंदाची गोष्ट ही कीं, युद्धबंद्यांतील सर्व दर्जांचे आणि हुद्यांचे लोक यांत घेण्यांत येणार होते. त्यांची निवड कशा तऱ्हेनें आणि केव्हां होणार हें मात्र जाहीर झालें नव्हतें. तरीपण अधिकाऱ्यांनाच तेवढा ईश्वरानें अकलेचा मक्ता दिलेला असतो, हें सैन्यांतील गृहीत धरलेलें तत्त्व या बाबतींत प्रथमच बाजूला सारलें गेलें होतें.

माझ्या मनांत विचारचक्र सुरू झालें. मेजरच्या हुद्याचे व त्यावरील

अधिकारी आपल्या हुद्याची खूण म्हणून खांद्यावर ब्रिटिश मुकुटचिन्ह धारण करीत. अर्थात् स्वातंत्र्यसेनेंत दास्याचें प्रतीक असणाऱ्या अशा प्रकारच्या चिन्हांना फांटा मिळणें जरूर होतें. स्वातंत्र्यसेनेंत हुद्यांचीं निदर्शक काय काय चिन्हें असावींत याचा विचार मी रात्रभर केला व दुसऱ्या दिवशीं एक सूचनापत्र लिहून काढलें. त्यांत खांद्यावर लावण्यास निरनिराळ्या अधिकाऱ्यांच्या हुद्यांचीं निदर्शक अशीं चार-पांच पितळी चिन्हें मी सुचविलेलीं होतीं. पहिलें, सुदर्शन-चक्र. दैवी सामर्थ्य, पवित्र भावना आणि शत्रूचा निःपात करून परत फिरण्याची त्या शस्त्राची शक्ति यामुळें त्याची योजना मला योग्य वाटली. दुसरें, स्वस्तिक. शुभ कार्याचें सूचक असें आर्यांचें एक पुरातन चिन्ह या दृष्टीनें ग्राह्य. तिसरें, धनुष्यबाण. हें मानवाचें पहिलें महत्त्वाचें शस्त्र व उत्कृष्ट नेमबाजीचें द्योतक. चवथें, तरवार. हें वीरश्रीचें प्रतीक. आणि पांचवें चिन्ह, हिंदुस्थानचा एक लहान (पितळी) नकाशा. मातृभूमीची कायमची स्मृति या दृष्टीनें हें चिन्ह आवश्यक. अशीं निरनिराळीं सविस्तर कारणें देऊन मी हीं पांच चिन्हें ग्राह्य व्हावीं असें सुचविलें होतें. मी सायगांवला (फ्रेंच इंडोचायनामध्यें) गेल्यावर सुदर्शनचक्र हें चिन्ह मान्य झालें व हिंदी स्वातंत्र्यसेनेंत ब्रिटिश मुकुटचिन्हाच्या जागीं मेजर अथवा त्यावरच्या हुद्याचें निदर्शक म्हणून पुढें त्याचें स्थान अढळ झालें. परंतु सुदर्शनचक्राच्या रूपरेषेबद्दल ज्यांना यत्किंचितही कल्पना नाहीं, अशा लोकांच्या हातीं सुरुवातीसच सुदर्शनचक्राचें चित्र (डिझाईन) तयार करण्याचें काम दिल्यामुळें गणपती करितां माकड झालें! सुदर्शनचक्र म्हणून जें काढलें तें कोळ्यासारखें दिसूं लागलें. तथापि तेंच पुढें सुदर्शनचक्र या नांवाखालीं रूढ झालें. दुसरें चिन्ह जें हिंदी स्वातंत्र्यसेनेंत घेतलें गेलें तें वरीलपैकीं कोणतेंही नव्हतें. तें एक केवळ [] अशी एक उभी पट्टी होती. ती खांद्यावर लावीत. सूचना केल्यानंतर बऱ्याच दिवसानंतरचा हा इतिहास आहे. माझे स्नेही डॉक्टर जोशी (त्यांच्या तुकडीची बदली होऊन ते सुद्धां सेलेतार छावणींत आले होते.) यांस मी माझें सूचनापत्र दाखवितांच त्यांसही तें पसंत पडलें. थोड्या दिवसांनीं त्यांनींसुद्धां टीकात्मक व सूचनात्मक असें एक जोरकस पत्र लिहून तें ज. मोहनसिंगांच्या नांवें मध्यवर्ती कचेरीकडे पाठवून दिलें. त्यांत त्यांनीं मुख्यतः म्हटलें होतें कीं, ब्रिटिश अंमलाखालीं किंग्ज कमिशन्ड ऑफि-सर्सना जें महत्त्व होतें व स्वतःचाच टेंभा मिरविण्याची आणि प्रत्येक गोष्टींत हुद्दा प्रमाण मानण्याची अनिष्ट प्रथा पडलेली होती तीच जर आपण यापुढेंही चालू ठेविली तर ही चळवळ कधींही यशस्वी होणार नाहीं. देशभक्ति व स्वार्थत्याग यांची तयारी ही हुद्यांवर तर मुळींच अधिष्ठित नाहीं, उलट वाढत्या हुद्याशीं यांचें व्यस्त प्रमाण असतें. कारण ब्रिटिश सत्तेनें वर चढविलेला अधि-कारी हा केव्हांही स्वतः गुलामी वृत्तीचा असून इतरांस दाबून, दडपून गुला-मींत खितपत ठेवूं शकेल अशा वृत्तीचा (म्हणजे 'राजनिष्ठ') आहे अशी

खात्री करून घेतल्यावरच त्यास बढती मिळे. या वृत्तीची जशी जशी वाढ होत जाईल तसतशी त्याच्या हुद्यांतही वाढ होत जावयाची. हे अधिकारी, हिंदुस्थानांतील गर्भश्रीमंत, अत्यंत राजनिष्ठ आणि पिढ्यान्‌पिढ्या राजकारणा-पासून सर्वस्वीं अलिप्त अशा कुटुंबांतून मोठ्या काळजीनें निवडले जात. अर्थात्, अशांच्यापासून स्वार्थत्यागाची अथवा देशभक्तीची काय अपेक्षा करावी ? म्हणून हा किंग्ज कमिशन-धार्जिणेपणा नव्या संघटनेंत सोडून देऊन नवी संघटना स्वतंत्र पायावर अधिष्ठित असावी .

अशा रीतीनें माझें आणि डॉ. जोश्यांचें नांव ज. मोहनसिंग व त्यांच्या इतर सहकाऱ्यांच्या समोर आलें. नवी समिति स्थापन करावयाची आहे तेव्हां त्यांत या दोघांसही घ्यावें असा त्यांचा संकेत झालेला असावा. कारण त्यानंतर थोड्या दिवसांनीं आम्हांला स्वतंत्रपणें टाईप केलेलीं दोन पत्रें आलीं. त्यांत नवीन मध्यवर्ती समितीवर तुमची दोघांची नेमणूक झालेली आहे; तेव्हां ज्या ज्या वेळीं त्या समितीच्या बैठकी होतील त्या त्या वेळीं सूचना मिळतांच सभेस हजर राहात जावें असें लिहून कळविलें होतें. पुढें दर सात-आठ दिव-सांनीं आमच्या छावणींत एक मोटार व त्याबरोबर सभा असल्याबद्दलचें एक निमंत्रण-पत्र येई. त्याप्रमाणें आम्ही दोघेही या साप्ताहिक सभांना हजर राहात असूं. महाराष्ट्रीय असे आम्ही दोघेच त्या समितीवर होतों व ते सुद्धां अगदीं अकल्पित रीतीनें त्यांत घेतले गेलेले. इतर बहुतेक सर्व पंजाबीच होते.

त्या समितीच्या पहिल्याच बैठकीला म्हणून आम्ही ज्या दिवशीं गेलों त्या दिवशीं माऊंट प्लेझंट येथील बंगाल्याच्या फाटकाशीं बागेंत आम्हांला कॅप्टन ताज महंमद भेटले. तेही मोहनसिंगांच्या सहकाऱ्यांपैकींच एक होते. वृत्तीनें इतरांहून अगदीं निराळे म्हणजे सात्त्विक, विचारी, विनयशील, मन-मिळाऊ, दयाळू असे ते गृहस्थ होते. यांचा थोडाबहुत अनुभव आम्हांला स्वत:ला आला व शिवाय इतरांचे तोंडूनही आम्ही त्यांच्याबद्दल नेहमीं प्रशंसोद्‌गारच ऐकले. त्या सर्व मंडळींत त्यांच्यासारखा दुसरा माणूस नव्हता. आम्हांला बघतांच आमच्याशीं हस्तांदोलन करीत एखाद्या स्त्रीला शोभेल अशा विनयानें आणि सस्मित वदनानें त्यांनीं आम्हांला प्रश्न केला, " तुम्ही कोण ? " मी म्हटलें, " आम्ही कोण म्हणून काय पुसतां ?...आम्ही आजच्या सभेला आलों आहोंत. हे डॉक्टर जोशी. " डॉक्टर जोश्यांकडे बोट दाखवीत मी म्हटलें, " आणि माझें नांव ओक. " " असं का ? वा: छान ! " ते उद्‌गारले. नंतर माझ्याकडे वळून ते म्हणाले, " अरे हो. तुम्हीच चांगले शिकलेले म्हणजे एम्. ए., एल्‌एल्. बी. आहांत. नाहीं का ?...छान छान. तुम्ही तीं चिन्हें मोठीं छान सुचविलीं आहेत...अगदीं नाविन्यपूर्ण. अन् हें बघा, डॉक्टर जोशी, तुम्ही आपल्या पत्रांत अधिकाऱ्यांवर सरसहा ताशेरे झाडले आहेत ना, ते अगदीं अक्षरश: खरे आहेत बरं ! "

आमच्या सभांच्या सुरुवातीसच ज. मोहनसिंग वा त्यांचे मदतनीस कयानी यांचें भाषण होई. त्यांत ते पुढील कार्याची रूपरेषा सांगत व नंतर निरनिराळ्या प्रश्नांवर खलबतें होत. पूर्वीच्या तुकड्या मोडाव्या कीं नाहीं ? नवीन तुकड्या कोणत्या धर्तीवर कराव्यात ? अधिकाऱ्यांची बढती कोणत्या तत्त्वावर व्हावी इत्यादि प्रश्न चर्चिले जात. सभा मोहनसिंगांच्या बंगल्यावरच सायंकाळीं ७ च्या सुमारास सुरू व्हावी असें ठरलेलें असे. परंतु ' हा आला, तो आला ' करितां करितां ८ व्हावयाचे. एकंदर सुमारें पंचवीस-तीस सभासद कांहीं ना कांहीं कारणामुळें त्या समितींत घेतले गेले होते. ८ वाजल्यावर साहजिकच आतां जेवूनच मग निवांतपणें सभेस सुरुवात करूं, असें म्हणून आम्हीं त्या आसपासच्या तीन चार बंगल्यांतून प्रत्येक टेबलावर पांच-पांच, सहा-सहा असे जेवावयास बसत असूं. जेवण चांगलें, म्हणजे दाट तुरीचें फोडणीचें वरण, रोट्या, तूप, दोन भाज्या, कोंबडीची आमटी व अंड्याच्या खरवसाच्या वड्यासारख्या वड्या असा बेत असे. माझा नंबर बहुतेक ज० मोहनसिंगांच्याच टेबलावर लागावयाचा. जेवतांना अगदीं मोकळेपणानें गप्पागोष्टी होत असत. या सभाही खेळी-मेळीच्या वातावरणांत पार पडत. हुद्याचा भेदभाव तेथें आड येत नसे. त्यामुळें प्रत्येकाचें मन प्रसन्न राही. मोकळेपणानें व स्वतंत्र रीतीनें विचार करावयास असल्या प्रकारचें वातावरण अत्यावश्यक असतें. जेथें कनिष्ठ व वरिष्ठ असा भेद-भाव एका अगर अधिक व्यक्तींच्या बाबतींत कायम आहे तेथें सल्लामसलतीची सभा भरवून कांहीं उपयोग नसतो. कारण अशा वेळेस कनिष्ठ दर्जाचे लोक भीति मनांत बाळगून योग्यता असतांही खराखुरा सल्ला कदापि देऊं शकत नाहींत. या सभा बहुतेक ११ वाजेपर्यंत चालत. सभेनंतर आम्हाला आमच्या छावण्यांत सोडून मोटारी परत जात.

या सभांना येऊं लागल्यापासून आम्हाला पुन्हां माणसांत आल्यासारखें वाटूं लागलें. स्वतंत्र वारें आणि बाहेरचें जग यांना आम्हीं अगदीं पारखे झालों होतों. हें आणखी किती दिवस असें चालणार याचाही आम्हास कांहीं अंदाज लागत नव्हता. नाना खटपटी करून सिंगापूर गांवांत जाण्याची परवानगी मिळ-वावयाची, कोठेंतरी दिवसभर भटकावयाचें, गांवांत कोणी ओळखीचें नाहीं, गांव कोणत्या दिशेला आहे आणि किती लांब आहे हेंही माहीत नाहीं, संध्याकाळच्या आंत छावणींत परत यावयाचें. त्यांतच गांवांत ठिकठिकाणीं संशयावरून हटकणार. तेव्हां इतक्या भानगडी हव्यात कशाला ? म्हणून आम्ही कधीं छावणीच्या बाहेर जाण्याची खटपट केलीच नाहीं व छावणींतल्या छावणींतच मन रमेल अशी अंतर्मुख दृष्टि केली आणि त्या दृष्टीनें निरनिराळे व्यवसायही सुरू केले. त्याची माहिती पुढील प्रकरणीं येईल. परंतु या सभांच्या निमित्तानें स्वतंत्रपणें व मान-मरातबान बाहेर जावयास मिळणें, मनाजोगता व्यवसाय व खेळीमेळीचें वातावरण,

करमणूक आणि रोजच्या त्या रूक्ष जेवणांत व वातावरणांत बदल असे अनेक फायदे आम्हास मिळूं लागले. निरनिराळ्या लोकांच्या ओळखीही होऊं लागल्या.

मुख्यतः मोहनसिंगांस काम भरपूर असे. व्याख्यानें देऊन सैनिकांत जागृति उत्पन्न करणें, शंकाकुशंका काढणाऱ्या व भेटूं इच्छिणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशीं विचारविनिमय करणें, युद्धबंद्यांची खाण्यापिण्याची व राहण्याची व्यवस्था यांकडे लक्ष देणें, पुढील संघटनेसंबंधीं विचार करणें, जपानी अधिकाऱ्यांशीं वाटाघाटी करणें, सिंगापुराच्या हिंदी नागरिकांस स्वातंत्र्य-सेनेशीं परिचित करणें निरनिराळ्या गटातर्फे केलेल्या सत्कार समारंभांस हजर राहणें इत्यादि सर्व काम ते मन लावून करीत असत.

---

## बंदी-छावणींतील महाराष्ट्रीयांचें कार्य : ९

अठरा पगड लोकांत सर्वांशीं मिळून मिसळून वागणारा, कोणतीही गोष्ट समजून घेणारा, मनमिळाऊ, व्यासंगी, उद्योगप्रिय व शीलवान् इत्यादि दृष्टींनीं महाराष्ट्रीय हा इतर प्रांतांतील लोकांपेक्षां केव्हांही श्रेष्ठ ठरतो. पंजाबी हे हडेलहप्पी आणि त्यांतल्या त्यांत गांवढळ. मद्रासी हे हुशार खरे, परंतु आहार, वेश व भाषावैचित्र्य यांनीं बुजून सहसा इतरांशीं संबंध न ठेवणारे. बंगाली लोक जास्त प्रांताभिमानी असल्यामुळें कोठेंही गेले तरी आपली अशी एक विशिष्ट कक्षा निर्माण करितात आणि सहसा तिच्या बाहेर ते कधीं पडत नाहींत. उलट हिंदुस्थानी नीट बोलतां न आल्यामुळें उत्तर हिंदुस्थानचे लोक महाराष्ट्रीयांस दक्षिण हिंदुस्थानी समजतात व दाबून दडपून कसेंही हिंदुस्थानी बोलणारा आणि सर्वांशीं मिळून मिसळून वेळ मारून नेणारा या दृष्टीनें मद्रासी व तत्सम लोक महाराष्ट्रीयांस उत्तर हिंदुस्थानी समजतात. महाराष्ट्रीय लोक स्वतःस जेव्हां भौगोलिक दृष्ट्या दक्षिण हिंदुस्थानी म्हणवितात तेव्हां तामिळ व मलबारी लोकांस आश्चर्य वाटतें. दक्षिण हिंदुस्थान त्यांनाच आंदण दिलेला आहे. कारण भाषा, वर्ण, रीतरिवाज, पोषाख, इत्यादि दृष्टींनीं त्यांना महाराष्ट्रीय लोकांत आणि उत्तर हिंदुस्थानच्या लोकांत फारच साम्य दिसतें.

बंदीछावणींतील वास्तव्यांत राजकीय आणि सर्वसामान्य जागृतिपर कार्य जर कोणी केलें असेल तर तें फक्त महाराष्ट्रीयांनींच. यास त्यांचा बडबड्या मनमिळाऊ आणि चळवळ्या स्वभाव व सर्वसामान्य उच्च शैक्षणिक दर्जा हेच दोन गुण विशेष कारणीभूत झाले. डॉ. शंकर विष्णु नेने यांनीं जपानी भाषा कामापुरती चटकन् आत्मसात् केली. आणि नीसून छावणीच्या जपानी अधिकाऱ्यांशीं चांगली मैत्री जोडिली. नंतर डॉ. श्रीश कृष्ण जोशी, डॉ. नेने, श्री. गोरे ( पोस्ट मास्तर ), क्षीरसागर, केळकर व त्यांच्या सहकाऱ्यांनीं मिळतील तेथून मराठी मासिकें, पुस्तकें जमवून एक ग्रंथालय उघडलें. मी सेलेतार छावणीमध्यें आल्यावर माझ्या मागोमाग डॉ. जोशी, श्री. गोरे, डॉ. सोहोनी, श्री. पद्मनाभराव ( जिंजीकर ) इत्यादींच्याही बदल्या त्यांच्या त्यांच्या तुकडीसह सेलेतार छावणीमध्यें झाल्या.

जनरल मोहनसिंगांकडे मी जीं दोन चार पत्रें पाठविल्याचा उल्लेख या पूर्वीं आला आहे तीं पत्रें आमच्या सेलेतार छावणीच्या मुख्य अधिकाऱ्यातर्फेंच पाठवावीं लागत. अर्थात् मी कधीं त्यांची भेट घेण्याच्या भानगडींत न पडतां

तीं त्यांच्या कचेरींतील कारकुनाकडे सोंपवून देत असें. माझ्या पत्राखालील माझें नांव, त्या खालीं एम्.ए.,एल्एल्.बी. हीं अक्षरें पाहून त्या वेळचे आमच्या छावणीचे मुख्य अधिकारी यांनीं त्या कारकुनास सांगून ठेविलें कीं, "या गृहस्थांस भेटण्याची माझी इच्छा आहे तरी त्यांस तसें कळवावें." तो निरोप मला कळविण्यांत आल्यावर, मी त्या दिवशीं दुपारीं त्यांच्या झोंपडीचा शोध करीत त्यांच्याकडे जाऊन पोंचलों. माझ्या नांवाचा व त्यांच्या निरोपाचा उल्लेख करितांच त्यांनीं उठून माझ्याशीं हस्तांदोलन करीत सस्मित वदनानें माझें स्वागत केलें. मेजर बरार (हेंच त्यांचें नांव) मोठे गुणग्राही दिसले. सर्व युद्धबंद्यांत शैक्षणिक दर्जाबद्दल आदर असणारे असे तेच एक अपवादात्मक लष्करी अधिकारी माझ्या नजरेंत आले. ज्ञानाचाच मोठेपणा खरा; लठ्ठ पगाराचा, लष्करी दर्जाचा अथवा अधिकाराचा मोठेपणा हा खरा मोठेपणा नव्हे हें तत्त्व त्यांच्या अंगीं पूर्णपणें बाणलें असावें असें दिसत होतें. ते म्हणाले, 'या ... या. तुमच्याइतकें उच्च शिक्षण घेतलेला गृहस्थ या छावणींत असेल अशी मला यत्किंचित् देखील कल्पना नव्हती. कारण फौजेंत असे सुविद्य लोक क्वचितच आढळतात. तुमच्या भेटीमुळें मला फार आनंद झाला; कारण अशा या वातावरणांत सुविद्य माणसाशीं बोलण्याची संधी मिळणें ही एक अत्यंत आनंददायक गोष्ट आहे.... बरं मोहनसिंगांनीं चालू केलेल्या या कार्याविषयीं तुमचें मत काय आहे? कारण या कार्याच्या यशापयशाविषयीं बऱ्याच जणांचें दुमत आहे......" मोहनसिंगांच्या चळवळींत शिरावयाचें किंवा नाहीं तें मेजर बरार यांनीं अजून ठरविलें नव्हतें. माझें मत ज्या बाजूला पडेल ती बाजू आपणही स्वीकारावी असा त्यांचा कल स्पष्ट दिसला. मोहनसिंगांचा व त्यांचा बराच परिचय असल्याचें त्यांनीं सांगितलें. मी त्यांस म्हटलें, "माझें मत विचाराल तर यशापयशाच्या दृष्टीनें मी कोणत्याही कार्याचा कधींच विचार करीत नाहीं. अमुक एक कार्य योग्य किंवा अयोग्य एवढेंच मी बघतों...." या उत्तरानें त्यांचें विशेष समाधान झाल्यासारखें दिसलें नाहीं. नंतर ते म्हणाले, "आपल्या छावणींतील सुशिक्षित लोकांस जमवून तुम्ही जर एखादें मंडळ स्थापन केलेंत आणि छावणींतील इतर युद्धबंद्यांस हितोपदेशात्मक असा कांहीं कार्यक्रम आखलात तर त्यापासून फार फायदा होईल...तुम्हांला काय वाटतें?" या सूचनेला माझी पूर्ण संमति आहे असें मी त्यांस सांगितलें. शिवाय असेंही सुचविलें कीं, रोज सकाळीं जपान्यांच्या हाताखालीं शहरांत काम करावयास जाणाऱ्यांच्या यादींतून या लोकांस वगळण्यांत यावें. ही माझी सूचना त्यांनीं मान्य केली. 'इंटरमीजिएट्' आणि त्यावरचें शिक्षण घेतलेल्या लोकांस या मंडळाचे सभासद करून घ्यावें असें ठरलें.

आमच्या छावणींत एकंदर दहा-बारा हजार मंडळींत 'इंटर' झालेले

लोक केवळ पसतीस-चाळीसच होते. तेसुद्धां बहुतेक सर्व कारकून, डॉक्टर इत्यादि, युद्धापुरतेच हंगामी सैनिक बनलेले लोक होते. प्रत्येकाच्या शब्दावरच विश्वास ठेवणें भाग होतें. कोणाजवळ दाखला मागण्याची सोयच नव्हती. प्रत्येक तुकडींतून इंटर झालेल्या सर्व लोकांच्या याद्या मागवून त्या सर्व लोकांची मी एक सभा बोलाविली. त्यांना ती सभा बोलविण्याचा मुख्य उद्देश आणि मंडळाचें ध्येय निवेदन करून मुख्य अधिकाऱ्यांचें नांव मंडळाच्या अध्यक्षपदाकरतां मी सुचविलें. तें मान्य झाल्यावर उपाध्यक्षपदाकरतां नांवें सुचवातींत असें मी मागितलें. दोन तीन नांवें सुचविलीं गेलीं. मी स्वतःबद्दल कांहींच बोललों नाहीं. परंतु तेवढ्यांत मला परिचित नसलेल्या एका माणसानें माझें नांव सुचविलें आणि माझ्याबद्दल इतरांस थोडी माहिती करून दिली. त्याबरोबर सर्वानुमतें मीच त्या मंडळाचा उपाध्यक्ष म्हणून अचानकपणें निवडलों गेलों. नंतर दोन चिटणीसांची निवडणूक झाली. चारपांच दिवसांनीं दुसरी सभा झाली तींत प्रत्येक भाषेंतील उच्च शिक्षण घेतलेल्यांची परीक्षक म्हणून निवडणूक आणि नेमणूक झाली. बंगाली, मराठी, हिंदी, उर्दू, पंजाबी, इंग्रजी आणि तामिळ इत्यादि भाषांचे प्रत्येकीं एक असे परीक्षक आम्ही नेमिले. इंग्रजीचा व मराठीचा परीक्षक म्हणून माझी नेमणूक सर्वानुमतें झाली. श्री. रामाधरसिंग बी. ए., एल्एल्. बी. या काशींत राहणाऱ्या गृहस्थांची हिंदीचे परीक्षक म्हणून नेमणूक झाली. श्री. दीनानाथ झादू एम्. ए. हे माझे श्रीनगरवासी स्नेही इंग्रजी, हिंदी आणि उर्दू यांचे परीक्षक म्हणून निवडले गेले. वर उल्लेखिलेल्या कोणत्याही भाषेंत आमच्या मंडळांतील सभासदांनीं सुचतील त्या सार्वजनिक हिताच्या उत्तम विषयांवर किंवा आमच्या साप्ताहिक सभांतून मी सुचवीन त्या विषयांवर निबंध लिहावे आणि ते आपापल्या भाषेंतील परीक्षिकांजवळ द्यावे. त्यानें त्या निबंधाचें नीट परीक्षण करून त्यांत कांहीं विशेष उद्बोधक विचार असल्यास ते मला कळवावेत व मला ते सार्वजनिक हिताचे वाटल्यास मी ते आमच्या साप्ताहिक सभांतून प्रगट करून लेखकाचा गौरव करावा, असा क्रम ठरला होता. याशिवाय मंडळाच्या सभासदांनीं कोणताही सार्वजनिक आवडीचा उद्बोधक विषय सुचवून त्यावर व्याख्यान द्यावयाची तयारी दर्शवावी व मंडळानें योग्य दिवस आणि वेळ ठरवून त्याचें व्याख्यान करवावें हेंही आमच्या मंडळाचें कार्य ठरून गेलें. आमच्या छावणींत अशा सभांकरतां ३० × ५० फुटांचा एक मंडप होता व त्यांत बिनपाठीचे बरेचसे बाक ओळीनें जमिनींत पक्के बसविलेले होते. या मंडपाच्या एका टोंकाला एक उंच लांकडी रंगभूमि तयार केलेली होती. येथें सैनिकांचे खेडवळ नाचरंग, तमाशे, नाटकें इत्यादि कार्यक्रम कधीं-कधीं होत.

आमच्या मंडळांतील एका सभासदानें 'आंतरराष्ट्रीय राजकारण' या विषयावर इंग्रजींत व्याख्यान दिलें. थोड्या दिवसांनीं 'व्यसनें' या विषयावर

रात्रीं ९-१५ ते ११-३० पर्यंत माझें व्याख्यान झालें. अडीचशें-तीनशें माणसें हजर होतीं. माझें व्याख्यान इंग्रजींतूनच झालें; अर्थात् श्रोतृवृंदही इंग्रजी समजणाराच होता. पुढें नेताजींच्या समागमानंतर आम्हांला आपापसांत इंग्रजी या परकी भाषेंत बोलण्याची लाज वाटूं लागली. परंतु त्या वेळीं इंग्रजीशिवाय इतर कोणत्याही भाषेंत सभेपुढें बोलावें असा विचार आमच्या स्वप्नांतही आला नव्हता. इतकें त्या भाषेचें प्रभुत्व आमच्या हाडींमासीं खिळलेलें होतें. अर्थात् त्यावेळेस एवढी साधी गोष्ट आपल्या लक्षांत येऊं नये याचें आज मला आश्चर्य वाटतें. परंतु भाषा, पोषाख, चहा, सिगारेट, वेषभूषा, मदिराप्राशनादि संवयी, पत्रव्यवहार, शिष्टाचार अशा कित्येक गोष्टी आहेत कीं त्यांत आपण आपल्या जेत्यांचें अंधानुकरण करीत आहोंत हें आपल्या ध्यानींमनींही येत नाहीं. या गोष्टी क्रमप्राप्तच आहेत असें आपणांस वाटतें परंतु खऱ्या राष्ट्रीय वृत्तीच्या माणसानें या सर्व गोष्टींचा विचार करून पाश्चात्य संवयी वर्ज्य कराव्या आणि त्या जागीं पूर्वींच्या चांगल्या गोष्टी रूढ कराव्या हें अगदीं आवश्यक आहे. डोक्यास शीतलता देणारें सुगंधी चंदनाचें गंध कपाळावर लावून कचेरींत जाणें हें आज आपणांस लज्जास्पद वाटत असेल तर ती आपल्या हाडींमासीं खिळलेली गुलामी वृत्तीच आहे. ' आमच्या मिसेस् ', आमचे ' फादर ' असा आप्तेष्टांचा इंग्रजींत उल्लेख करणें योग्य वाटणें आणि पत्नी, कुटुंब, बायको, वडील इत्यादि आपले शब्द वापरावयाची लाज वाटणें हें आपल्या रक्तांत भिनलेल्या गुलामीचेंच स्पष्ट निदर्शक आहे. आम्ही आपापसांतील पत्रव्यवहार इंग्रजींत कां करितों ? मातृभाषा व राष्ट्रभाषा या दोन्हींस डावलून इंग्रजींत बोलणारे व लिहिणारे आम्हींच. पोषाखांत व शिष्टाचारांत तर आम्ही संपूर्ण विलायतीच बनलेले आहोंत. नेताजींना या गोष्टींचा फार तिटकारा असे. तसें ते अनेकदां बोलूनही दाखवीत आणि त्यामुळें नेताजींबद्दल व्यक्तिशः आदर असणाऱ्या व त्यांच्या कार्याचें कौतुक करणाऱ्या सर्व लोकांनीं एक साधें कर्तव्य म्हणून तरी स्वतःच्या दैनंदिन जीवनांत काया-वाचा-मनें स्वदेशीचा पुरस्कार करावा व त्याबद्दल अभिमान बाळगून अट्टाहास धरावा असें साहजिक आम्हांस वाटूं लागलें. कारण अशा लहान लहान संवयींतूनच माणसाचें चारित्र्य बनत असतें. 'व्यसनें' या विषयावर माझें व्याख्यान फारच उत्तम झालें असें सर्वांचें मत पडलें व मी व्याख्यान देत असतांना सतत सव्वादोन तास श्रोतृवृंद अगदीं स्तब्ध व निश्चल अशा एकाग्रतेनें ऐकत बसलेला होता. डॉ. जोशी यांनीही त्यानंतर दहापंधरा मिनिटें मी व्याख्यानांत प्रगट केलेल्या मतप्रणालीच्या मंडनपर स्वानुभव सांगितले. दुसऱ्या दिवशीं श्रोतृवृंदापैकीं एकजण माझ्याकडे भेटावयास आला व म्हणाला, " चहा-कॉफी घेण्याच्या संवयीमुळें इतकें नुकसान होत असेल याची मला कल्पनाही नव्हती. आतां मात्र मी चहा-कॉफीसारखीं पेयें घेणार नाहीं. "

'व्यसनें' हा माझ्या व्याख्यानाचा पहिला विषय घेण्याला कारणेंही तशींच घडलीं. बंदीजीवनांत चिंता आणि कष्ट म्हणजे मानसिक व शारीरिक अशा दुहेरी हल्ल्यामुळें सामान्य लोक विवेकभ्रष्ट होतात आणि वाटेल तें करावयास प्रवृत्त होतात. वेश्यागमन ( लग्न झालेले लोक तर या व्यसनाच्या आहारीं जास्तच पडतात असें दृष्टोत्पत्तीला आलें. ), मदिराप्राशन, सिगारेट ओढणें व चहा घेणें या संवयी नसलेल्यास तर लागतातच पण ज्यांस त्या संवयी अगोदरच्या जडलेल्या असतात ते त्या व्यसनांच्या आहारीं जाऊन ते किती हीन स्थितीस पोंचूं शकतात याचीं उदाहरणें मी प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिलीं. सिगारेटस् घ्यावयास पैसे नव्हते, म्हणून इतरांनीं फेंकलेलीं सिगारेटसचीं थोटकें छावणीभर फिरून दिवसभर वेंचणारीं माणसें पुष्कळ होतीं. गरिबाच्या म्हाताऱ्या बायका ज्याप्रमाणें कंबर वांकवून दुष्काळाच्या दिवसांत रस्त्यावरील कणन्कण वेंचून तो जतन करून ठेवितात तितक्याच कसोशीनें हे लोक तीं थोटकें गोळा करून त्यांतील तंबाखू काढून ती चिलमींत अथवा लांकडी नळींत भरून ओढीत असत. दारूची संवय असलेला एक सुशिक्षित अधिकारी बंदी झाल्यावर दारू न मिळाल्यामुळें एका रात्रीं बराकींत थैमान घालूं लागला. त्याच्या येरझारा, त्याची आरडा-ओरड, यांमुळें त्यानें त्याच्या इतर साथीदारांना अगदीं जीव नकोसा करून टाकला. याच्या या आरडाओरडीमुळें त्यांना झोप येईनाशी होऊन कांहीं सुचेनासें झालें. तेव्हां हा त्रास थांबविण्याची एक विलक्षण कल्पना एकाच्या सुपीक डोक्यांतून निघाली. त्यानें दारूची एक रिकामी बाटली घेतली आणि बराकीच्या बाहेर जाऊन ती भरून आणली. त्या दारुवेड्याजवळ येऊन तो म्हणाला, "बघ, तुझ्याकरतां केवढा खटाटोप करून दारू मिळवून आणली !" त्यानें ती बाटली दारूनें वेडावलेल्या त्या माणसापुढें करितांच त्या गृहस्थानें बाटलींतून भरून आणलेलें तें मानव + + घटाघट प्राशन केलें आणि त्यावर एक आत्यंतिक समाधानाची ढेकर दिली ! ही कल्पित गोष्ट नसून, नागपूरचे माझे स्नेही डॉ. जोशी यांनीं प्रत्यक्ष पाहिलेली आहे. व्यसनाधीन झालेल्या माणसाचा इतका अधःपात होतो हें पाहून मला दुःख झालें आणि म्हणूनच मी 'व्यसनें' हाच माझ्या व्याख्यानाचा पहिला विषय निवडला.

डॉ. जोश्यांनीं राष्ट्रीय संघटनेचा प्रचार सेलेतार छावणींत सुरू केला. स्वातंत्र्यवीर सावरकरांसारख्या दूरदर्शी मुत्सद्यानें सैनिकीकरणाचा प्रचार करून त्या प्रचारानें सैन्यांत शिरण्यास उद्युक्त झालेले माझ्यासारखे कांहीं तरुण होते. त्यांत या संघटनेचे पूर्वींचेच घटक होते. परंतु तेवढे वगळल्यास इतरांस या संघटनेची कांहींच माहिती नव्हती. अशा परिस्थितींत डॉ. जोश्यांनीं हें महत्त्वाचें परंतु अवघड कार्य हातीं घेऊन त्यांत पुष्कळच प्रगति केली. त्यांनीं या संघटनेच्या तीन-चार मराठी, दोन हिंदी व एक कानडी अशा शाखा बरेच महिने

नियमानें चालू ठेविल्या होत्या. पोस्टमास्तर गोरे यांनीं या कार्यांत डॉ. जोश्यांस पुष्कळच साहाय्य केलें तसेंच मी व डॉ. सोहोनी, श्री. पद्मनाभराव (जिंजीकर), रा. कोठावळे इत्यादींनींही त्या कार्यास, हातभार जरी नाहीं तरी बोटभार लाविला असें म्हणावयास कांहीं प्रत्यवाय नाहीं. डॉ. जोश्यांचें दुसरेंही एक कार्य असे; तें म्हणजे निरनिराळ्या तुकड्यांतून कधीं कधीं सत्यनारायण होई त्या वेळीं सत्यनारायणाच्या कथेच्या निमित्तानें राष्ट्रीय जागृतीचा प्रचार करावयाचा. या कलेंत आतां ते पारंगत झालेले आहेत व पर्यायानें त्यांस राष्ट्रीय कीर्तन-कारही होतां येईल यांत शंका नाहीं.

सिंगापूर पडल्यावर कांहीं दिवसपर्यंत सर्व युद्धबंद्यांस कांहीं महिने अन्न-धान्य बरें मिळालें. नांवाला का होईना परंतु तूप, दूध, डाळ, कणीक, तांदूळ इत्यादि सर्व मिळावयाचें. अर्थात् या वस्तूंचें प्रमाण कमी कमी होत जाऊन कांहीं वस्तू तर अखेर मिळेनाशाच झाल्या. सिंगापूर पडल्यानंतर एक वर्षाच्या आंतच तांदूळ, मुगाचें वरण व रताळीं, पडवळें किंवा असलीच कसली तरी भाजी हेंच पुढें सर्व हिंदी सैनिकांचें अन्न, लढाई संपेपर्यंत कायम राहिलें. त्यांतसुद्धां एखाद् दोन महिने मध्येंच डाळ बंद होई. शरणागतीनंतर सुरु-वातीच्या कांहीं महिन्यांत शीख लोक वैशाख प्रतिपदा आणि त्यांच्या प्रसिद्ध गुरूंचे जन्मदिवस साजरे करीत व तसाच कांहीं तुकड्यांतून सत्यनारायण केला जाई. अशा प्रसंगीं तुकडींतील लोक एकोप्यानें व आनंदानें आपापले मतभेद विसरून सहकार्य करीत. सर्वजण मिळून एक दोन वेळचा चहा घेण्याचें बंद करून ती साखर अशा उत्सवप्रसंगीं शिरा करण्यास उपयोगांत आणीत. क्वचित् प्रसंगीं रोजच्या जेवणांतील कणकेचें प्रमाण कमी करून शिरा करण्या-करतां ती राखून ठेवावी लागे. कोणी पताका लावीत, कोणी बैठक व इतर साहित्य गोळा करीत व सर्वजण त्या बंदीछावणींतील आपापल्या आप्तेष्टांस निमंत्रण करीत. अशा प्रसंगीं डॉ. जोशी यांचीच बहुधा कथा सांगण्याकरतां योजना व्हावयाची. तेही त्याचा पुरेपूर फायदा घेऊन त्या कथेंत स्वातंत्र्य-चळवळीचाच पुरस्कार करीत.

शीखांच्या उत्सवांतून मोहनसिंगप्रणीत चळवळीशीं सहमत नसलेले लोक केवळ अशा उत्सवांच्या धार्मिक बाजूवरच जोर देत तर इतर लोक अशा निमित्तानें स्वातंत्र्यप्रचार करीत. सहमत नसलेल्या लोकांची असह-काराचा प्रचार उघड रीतीनें करण्याची छाती होत नसे कारण मोहनसिंगांच्या गुप्त पोलिसांची भीति त्यांच्या मनांत वसत होती. तरी कांहींजण धार्मिक विवे-चनांत मोहनसिंगप्रणीत चळवळीविरुद्ध आडून टीका करीतच. धार्मिक वचनें इतकीं ओतप्रोत आणि विविध प्रकारचीं झालेलीं आहेत कीं कोणीही त्यांचा उपयोग एखाद्या तत्त्वप्रणालीच्या खंडणार्थ अथवा मंडणार्थ वाटेल तसा करावा.

जवळ जवळ प्रत्येक छावणींत शीख लोकांनीं एखादा लहानसा तंबू उभारून तो, अथवा एखादी लहानशी झोपडी 'गुरुद्वार' (शीखांचें मंदिर) म्हणून राखून ठेवावी, ती निरनिराळ्या चित्रांनीं रंगीबेरंगी फडक्यांनीं व पताका लावून सजवावी, तेथें एखादा म्हातारा अथवा त्यांतल्यात्यांत अशक्त सैनिक पुजारी म्हणून कायमचा ठेवावा व रात्रीं सर्वांनीं मिळून तेथें भजन करावें असें चालत असे. त्याचप्रमाणें जवळ जवळ प्रत्येक छावणींत मुसलमान सैनिक त्याच धर्तीची एखादी मशीद् तयार करीत. क्वचित् एखाद् दुसऱ्या छावणींत हिंदूंचें मंदिर असे. प्रत्येक तुकडींतील शीख सैनिकांच्या शिरगणतीच्या प्रमाणांत त्यांस आठवड्यास तेल व साबण पुरविण्याची खास व्यवस्था करण्यांत आली होती. अशा रीतीनें शीखांस कांहीं खास सवलती मिळाल्या होत्या. वर उल्लेखिलेली सवलत मात्र शीख सैनिकांचा केशभार लक्षांत घेतां रास्तच होती. इतर बाबतींत शीख इसमाचा पुष्कळशा गोष्टींत सहानुभूतिपूर्ण विचार केला जाई. पण तेंही नैसर्गिकच आहे; कारण नाहीं म्हटलें तरी प्रत्येकास आपल्या लोकांविषयीं सहानुभूति वाटतेच, मग ते शीख असोत किंवा कोणी असोत. स्वदेशांत प्रांताभिमान, परदेशांत देशाभिमान व हिंस्रपशुव्याप्त अरण्यांत मानवजात्याभिमान वाटणें साहजिकच आहे.

रेडिओ स्टेशनवर मला पाठवावें अशी मी विनंति करूनसुद्धां माझ्या शिक्षणाचा विचार न करितां इतर दोन तीन अधिकाऱ्यांस केवळ ब्रिटिशांच्या जवळचा त्यांचा लष्करी हुद्दा लक्षांत घेऊन माझ्या आधीं काम करण्यास पाठविलें याचा मला राग येऊन मी मोहनसिंगांस निषेधपर एक पत्र लिहिलें हें मागें आलेंच आहे. त्याचें उत्तर म्हणून मला एक पत्र आलें त्यांत मी ज. मोहनसिंगांस त्यांच्या बंगल्यावर अमक्या दिवशीं भेटावयास जावें असें लिहिलें होतें. त्या दिवशीं ठरल्या वेळीं एक मोटार माझ्या बराकीपाशीं येऊन उभी राहिली. मी तींत बसून माऊंट प्लेझेंटवर गेलों. त्यांच्या ए. डी. सी. नीं मला विचारिलें, 'तुमचें काय काम आहे?' माझें कांहींच काम नव्हतें; मला बोलावणें आल्यामुळें मी गेलों होतों. तसें मी त्याला सांगितलें. त्या वेळीं मोहनसिंग जेवत होते. बराच वेळ लोटला. तो ए. डी. सी. पुन्हा बाहेर आला, व त्यानें मला विचारिलें, 'तुमचें जेवण झालें का?' 'नाहीं' असें मी त्यास सांगितल्यावर मोहनसिंगांच्या परवानगीनें त्यानें मला जेवावयाला आंत बोलाविलें.

त्या ए. डी. सी.ची ती ब्रिटिशांच्या वेळचीच ऐट, आणि इतर हावभाव इत्यादि बघितल्यावर माझी खात्री झाली कीं हे वरचे अधिकारी वरपांगी मोहनसिंगांशीं सहकार्य करण्यास तयार झालेले असले तरी त्यांच्या वृत्तींत यत्किंचितही पालट झालेला नाहीं. पूर्वीं इतकेच हे ब्रिटिशधार्जिणे आहेत.

तो बंगला सुंदर होता. कोणी वरिष्ठ ब्रिटिश अधिकारी पूर्वी तेथें राहात असे, त्या वेळचें मेज, खुर्च्या इत्यादि उत्तम सागवानी लांकडाचें सामान जसेंच्या तसें होतें. टेबलाशीं ज० मोहनसिंग व त्यांचे वैयक्तिक डॉक्टर राजू हे दोघे जेवावयास बसले होते. त्यांचीं जेवणें संपत आलीं होतीं. मोहनसिंगांनीं सस्मित वदनानें माझें स्वागत करून मला शेजारच्याच खुर्चीवर बसावयास सांगितलें. साधेंच परंतु फारच रुचकर असें तें भोजन मला अर्थातच आवडलें. जेवण झाल्यावर आम्ही माडीवर गेलों. अद्यावत् फर्निचरनें ती खोली सजलेली होती. आम्ही दोघेही तेथील एका कोचावर बसतों न बसतों तोंच लेफ्टनंट कुनीझगानें (त्याची माझी त्या वेळेस ओळख नव्हती. त्याचें नांव मला पुढें वर्षानंतर कळलें.) येऊन मोहनसिंगांशीं काम असल्याचें सांगितलें. मोहनसिंगांनीं बाजूला जाऊन त्याच्याशीं कांहीं कुजबूज केल्यावर परत येऊन मला म्हटलें, "मला माफ करा हं. कांहीं महत्त्वाच्या कामामुळें मला आतां बाहेर जावें लागत आहे. हे 'मेजर' आमच्या प्रचार खात्याचे प्रमुख आहेत. त्यांच्याशीं तुम्ही अगदीं मनमोकळेपणानें बोला. कसल्याही तऱ्हेचा किंतु मनांत बाळगण्याचें कारण नाहीं." एवढें बोलून व नुकत्याच आलेल्या एका 'मेजर' अधिकाऱ्याशीं माझी ओळख करून देऊन मोहनसिंग निघून गेले. त्या अधिकाऱ्यास मी माझा झालेला हिरमोड सांगितला आणि केवळ लष्करी दर्जा बघून या कामाकरतां दुसऱ्या अधिकाऱ्यांची निवड केल्याबद्दल मी निषेध व्यक्त केला. माझें म्हणणें शांतपणें ऐकून घेऊन तो उत्तरला, "सिंगापूर, रंगून, बँकॉक, सायगांव व जाव्हा बेट या प्रत्येक ठिकाणीं एक अशा पांच नभोवाणी केंद्रांवरून आपला स्वातंत्र्यप्रचार लवकरच सुरू होईल. त्या वेळेस आम्हांला पुष्कळ माणसें लागतील आणि त्यांत पाहिल्यांदा मी तुम्हांला घेईन." अशा प्रकारें दोन तीन वेळां निरनिराळ्या तऱ्हेनें त्याच्या आश्वासनाचा उच्चार त्यास करावयास लावून मी मोटारीनें फिरून माझ्या छावणींत परत आलों तथापि हें आश्वासन पोकळच ठरणार असेंच शेवटपर्यंत मला मनांतून वाटत होतें.

आमच्या छावणींत कांहीं तुकड्यांत स्वतःचें नाक कापून दुसऱ्यास अपशकून करणारे विघ्नसंतोषी सुशिक्षित महाराष्ट्रीय लोक होतेच. ते कट्टर ब्रिटिशधार्जिणे असून स्वातंत्र्याच्या चळवळींत सामील होण्याचा प्रचार त्यांस मुळींच रुचला नाहीं. त्यांत विघ्नें व अडथळे उत्पन्न करण्याकरतां साम-दाम-दंड-भेदादि सर्व उपाय त्यांनीं योजून पाहिले. आपल्या तुकडींतील कनिष्ठ लोकांस आमच्या सभांस हजर न राहाण्याबद्दल त्यांनीं कडक हुकूम सोडले आपले बगलबच्चे आमच्या सभांस पाठवून निरनिराळ्या वायफळ शंकाकुशंका उपस्थित करून वादविवाद वाढविणें, सभा उधळविण्याचा प्रयत्न करणें, आमच्याविषयीं खोट्यानाट्या अफवा पसरविणें, आम्हांस धमक्या देणें, आमच्या पश्चात् आमच्या-

बद्दल अपशब्द काढणें, आमच्याशीं सर्व प्रकारचे संबंध तोडणें इत्यादि अनेक प्रकार त्यांनीं महिनेन् महिने करून पाहिले; तरी आमच्या कार्यांत कधींच खंड पडला नाहीं. या बाबतींत डॉक्टर जोशी यांस बराच त्रास सहन करावा लागला तरी त्यांनीं आपली शांत वृत्ति कायम ठेवून शेवटपर्यंत न डगमगतां नेटानें अव्याहत आपलें काम चालू ठेविलें.

प्लेगची सांथ आली म्हणजे ज्याप्रमाणें आपण घरेंदारें सोडून बोचकीं घेऊन लांब एखाद्या मैदानावर जाऊन झोंपड्या बांधून वसती करितों त्याप्रमाणें त्या वेळचें आमचें आयुष्य होतें. सर्व कामें आटोपून जेवण झाल्यावर सूर्यास्ताच्या सुमारास आम्ही आमच्या झोंपड्यांच्या मधोमध असलेल्या आवारांत शिळोप्याच्या गप्पा मारण्यास जमत असूं किंवा सभा घेत असूं. इतरांस उद्देशून डॉ. जोशी, डॉ. सोहोनी, श्री. पोरे अथवा मी एखाद्या विषयाबद्दलची प्रवचन रूपानें माहिती सांगत होतों. दहा पंधरा मंडळींपासून तों दीड-दोनशें-पर्यंत प्रसंगाप्रसंगानें समाज जमावयास लागला.

सेलेतार छावणींतील आमचा दिनक्रमही ठरून गेलेला होता. उजाडतांच प्रातर्विधीनंतर पहिल्या शिटीबरोबर रांगेंत उभें राहून हजेरी, नंतर ड्रिल, परेड अथवा प्रत्येकाच्या हुद्याप्रमाणें व पाळीप्रमाणें पहाऱ्यावर जाणें, जपान्यांच्या कामाकरतां छावणीबाहेर जाणें, शौचकूप खणणें, लाकडें आणणें, धान्य आणणें, स्वयंपाक करणें इत्यादि काम दिवसभर सर्व सैनिकांस असावयाचें. दोन्ही वेळां प्रत्येकानें एक ताटली व एक टीनचा ( आटीव दुधाचा रिकामा डबाच बहुतेक असावयाचा ) डबा घेऊन रांगेनें पुढें सरकून जेवण घ्यावयाचें व कोठेंतरी झाडाखालीं बसून चार घांस खावयाचे असें चालत असे. शौचास पाणी नेण्याकरतां व जेवतांना आमटी घेण्याकरतां बहुधा तो एकच डबा वापरण्यांत येई. सायंकाळीं जेवणानंतर पुन्हां शिटी होतांच सर्वांची रांगेंत उभें राहून हजेरी होई. त्या वेळीं सामान्य स्वरुपाचे, शिस्तीचे, डॉक्टरांकडून आलेले कँपच्या स्वच्छतेबद्दलचे किंवा दुसऱ्या दिवशींच्या कामाबद्दल विशिष्ट हुकूम ऐकविले जात व मग सर्वसाधारण दोन तीन तास प्रत्येकास मोकळा वेळ मिळत असे. डॉक्टरच्या शिफारसीनें ज्यांना दिवसभर सुट्टी मिळे ते क्वचित् पत्ते खेळत किंवा जुनीं वर्तमानपत्रें व मासिकें यांच्या वाचनांत वेळ घालवीत किंवा आठवड्याचे सांचलेले कपडे धुवून काढीत. क्वचित् आम्ही एकमेकांच्या बराकींत एकमेकांस भेटावयाला व गप्पा मारावयास जात असूं. बराकींतून मधोमध आरपार एक मोठा रस्ता, मधून उंच व दोन्ही बाजूस उतरतें झोपडीवजा छत, दोन्ही बाजूस जमिनीच्या सपाटीपासून सुमारें दोन फूट उंच लांकडी जोतावर ६ फूट रुंदीची व सुमारें ३० फूट लांबीची लांकडी फळ्या मारलेली सपाटी. याच्यापासून सुमारें ४ फूट उंचीवर लांकडी फळ्यांची दुसऱ्या मजल्याची सपाटी. या वरच्या मजल्यावर चढावयास तळमजल्यास व

वरच्या मजल्यास जोडलेल्या अशा अगदीं उभ्या दोन-तीन पायऱ्याच्या शिड्या सुमारें ७–७, ८–८ फूटांच्या अंतरावर दोन्ही बाजूला खिळयांनीं ठोकून पक्क्या बसविलेल्या होत्या. दोन्ही बाजूंच्या या तळजमल्यावर आणि वरच्या मजल्यावर एखाद्या फुटाच्या अंतरानें प्रत्येक सैनिकाची पथारी रात्रीं पसरून ठेविलेली व सकाळीं गुंडाळून ठेविलेली असे. मधोमध प्रत्येकाचें एखाद दुसरें बोचकें असे. बंदीछावणींत व पुढें स्वातंत्र्यसेनेंतसुद्धां अशीच प्रत्येकाची राहावयाची व्यवस्था असे.

फेब्रुवारी १५ तारखेपासून तों जून २१ ( १९४२ ) पर्यंत माझें हें वैयक्तिक बंदीजीवन कायम होतें. वर उल्लेखिलेल्या गोष्टी या दरम्यानच्या काळांत घडल्या. मी मोहनसिंगांच्या कार्यकारी मंडळाच्या तीन-चार सभांना गेलों होतों. आमच्या छावणींतील 'इंडियन लिटररी असोशिएशन 'चा उपाध्यक्ष या नात्यानें मी चार-पांच सभा पार पाडल्या होत्या. 'व्यसनें' या विषयावर एक व्याख्यानही दिलेलें होतें. श्री. दिनानाथ व कांतीचंद्र झादू हें बंधुद्वय, श्री. रामाधरसिंग व मी असे मिळून आम्ही एक स्वतंत्र्य प्रचारात्मक नाटकही लिहून काढलेलें होतें.* अशा रीतीनें माझें कार्य चालू असतां ता. १९ जून १९४२ रोजीं अचानक एक टाईप केलेला हुकूम माझ्या हातीं आणून देण्यांत आला. त्यांत लिहिल्याप्रमाणें सायगांव रेडिओवर माझी नेमणूक झालेली होती व अवघ्या दोन-तीन तासांत मला निघावयाचें होतें. मला तयारी कांहीं करावयाची नव्हतीच. वाळत घातलेले एक दोन कपडे व इकडे तिकडे पडलेल्या एक दोन वस्तु घाईघाईनें माझ्या बोचक्यांत कोंबून एक कांबळें व रबरमिश्रित कापडाची सतरंजी यांचें आंथरूण बांधून मी माझ्या स्नेह्यांचा निरोप घ्यावयास त्यांच्या बराकींत गेलों. घाईघाईनें दोघां-चौघांचा निरोप घेतल्यावर मी परत आलों तों मोटार बराकीशीं येऊन उभीच होती. सामानासहित त्यांत जाऊन बसतांच ती जी चालू झाली ती थेट बिद्या-धारी छावणींत येऊन थांबली. तेथील ज्या एका गृहस्थाची माझ्याबरोबर सायगांवला नेमणूक झालेली होती तोही येणार होता, परंतु तेथें जातों तों तेथें एक दूरध्वनिसंदेश थोड्या वेळापूर्वींच आलेला होता; 'आजचें जाणें रहित सम-जावें. २३ तारखेला तयार असावें. कदाचित् त्या दिवशीं जावें लागेल.' आमच्या जागा ज्या विमानांत राखून ठेविलेल्या होत्या त्या आयत्या वेळीं निकडीचें काम असलेल्या दोन वरिष्ठ जपानी लष्करी अधिकाऱ्यांना देण्यांत आल्यामुळें आमचें जाणें त्या दिवशीं रहित झालें. विमानांतून उड्डाण करून या अशोकवनांतून सुटून जाण्याची संधी हातांतून निसटून गेल्याबद्दल कोणाला वाईट वाटणार नाहीं ? पुनः बंदीखान्यांत जावें लागणार, स्वातंत्र्यकार्य कर-

* हें "झांशीच्या राणीचें" नाटक नव्हे, दुसरेंच होतें.

ण्याची संधी गेली व एका नवीन प्रदेशांत आपण जाणार होतों तेंही राहिलें! याबद्दल नशिबास दोष देत मी तसाच मोटारींत परतलों. मला मनांतून वाटत होतें, ' आतां पुन्हा केव्हां योग येणार, कोणास ठाऊक. '

दुसरे दिवशीं मी पुन्हा आमच्या नेहमींच्या कार्यक्रमांत रमून गेलों. आमच्या त्या लहानशा जगांतच आम्ही असें कांहीं वातावरण निर्माण केलें होतें कीं बाहेरील जगाबद्दल सहसा मनांत विचारदेखील येऊं नयेत. त्या दिवशीं रोजच्या नियमाप्रमाणें सायंकाळीं आम्ही गप्पा मारीत बसलों असतांना " आपण घरीं केव्हां पोहोंचूं ? " असा सहजच प्रश्नात्मक विषय ( नगरच्या ) चांदेकरांनीं सुरू केला. ब्रह्मदेश इंग्रजांच्या ताब्यांतून पूर्णपणें जाऊन जपानी अंमलाखालीं आला होता. मोहनसिंगांची स्वातंत्र्य-चळवळ लवकरच फलद्रूप होऊन आपण थोड्याच दिवसांत ब्रह्मदेशांतून हिंदुस्थानांत पाऊल टाकूं असें कांहीं लोकांस वाटूं लागलें होतें. चांदेकर डॉ. जोश्यांस उद्देशून म्हणाले, " यंदाच्या दिवाळीस आपण घरीं पोहोंचूं, नाहीं का डॉक्टर ? " डॉ. जोशीही उलट म्हणाले, " असा रंग दिसतोय् खरा. " मी गप्प बसलों आहें असें पाहून चांदेकरांनीं तोच प्रश्न मला पुनः केला. मी त्यांस सांगितलें, " चांदेकर, आणखी तीन वर्षें घराचें नांव काढूं नका. " ४२ साल होतें तें. ४५ सालच्या ऑगस्ट महिन्यांत लढाई संपली व कांहीं जण सुटून ४५ सालच्या दिवाळीस घरीं आले. अशा रीतीनें माझ्या अंतःस्फूर्तीचे बोल तंतोतंत खरे ठरलेले पाहून मला अजूनही मोठें नवल वाटतें.

माझा व मेजर बरार यांचा परिचय होतांच त्यांच्याकडून आमच्या बंदी-छावणींतील एक लहानशी झोंपडी, व्यायाममंदिर चालू करण्याकरतां म्हणून मी मागून घेतली होती व तेथें रोज पहांटे ५॥ पासून ६॥ पर्यंत सूर्यनमस्काराचा वर्ग मी चालू केला होता. त्यांत रोज दहा बाराजण नियमानें सूर्यनमस्कार शिकण्यास व घालण्यास यावयाचे. हा वर्ग सुमारें महिनाभर म्हणजे मी सायगांवला जाईपर्यंत चालू होता.

जून महिन्याच्या २१ तारखेस रविवार होता. सकाळीं सूर्यनमस्काराचा वर्ग आटोपला. नंतर मी आमच्या हिंदी साहित्य संघाच्या ( इंडियन लिटररी ॲसोशिएशन ) साप्ताहिक सभेचें काम पूर्ण केलें आणि सकाळीं १० च्या सुमारास बराकींत परत आलों. माझी प्रकृति ठीक नव्हती. आमच्या छावणींत आंवेची सांथ जोरांत होती. रोज दोन चार, दोन चार सैनिक मृत्युमुखीं पडत होते हें आम्ही पाहात होतों किंवा ऐकत होतों. मलाही तीन चार दिवसांपासून आंव झालेली होती व नुसती भाताची पेज खाऊनच मी राहात होतों. अशक्तता व थोडी कसर आल्यासारखी वाटत होती. नुकतेंच सभेचें काम संपवून बराकींत परतल्यावर एका मित्राच्या पथारीवर पडल्या पडल्या मी त्याच्याशीं बोलत असतांना दोन जपानी अधिकारी व एक शीख अधिकारी एका हिरव्या

मोटारगाडींतून उतरून माझ्या बराकींत आले व माझा शोध करूं लागले. मला क्षणमात्र कांहींच बोध होईना. माझ्या पथारीपाशीं त्यांनीं मला अगोदर शोधलें. मी नाहीं असें पाहून व इतरांच्या सांगण्यावरून मी बसलों होतों त्या जागेच्या रोखानें ते आले. त्या शीख अधिकाऱ्यानें टाईप केलेला एक कागद माझ्यापुढें धरीत विचारलें, " काहो, ' ओक ' नांव तुमचेंच ना ? " मी होकारार्थीं मान हालवितांच तो म्हणाला, " मग चला आमच्याबरोबर त्या मोटारींत. " मी विचारिलें, " अहो पण कुठें तें तर सांगाल ? " " सायगांवला " एवढेंच त्यानें उत्तर दिलें. मी घाईघाईनें माझे धुतलेले ओले कपडे बोचक्यांत भरले, आंथरूण बांधलें; दुसऱ्याला दिलेलें माझें फिडल ( व्हायोलिन ) तिसऱ्या एकाकरवीं मागविलें. ते तिघेही अधिकारी मला लवकर चलण्याबद्दल घाई करीत होते. व्हायोलिन येईपर्यंत कसातरी वेळ काढतां आला तर बरा अशा विचारांत मग्न होऊन कोंबाकोंबी करीत मी तयारी चालविली होती. मोटारींत सामानासह जाऊन बसतों न बसतों तोंच एकानें माझें व्हायोलिन घाईघाईनें मला आणून दिलें, तें मी तसेंच आंत ओढून घेतलें व मोटार निघाली. विद्याधारी छावणींतील माझा दुसरा साथीदार अगोदरच मोटारींत बसलेला होता. आतां मात्र मी सायगांवला नक्कीच जाणार अशी माझी खात्री झाली व माझें सेलेतार बंदी-छावणींतील आयुष्य तेव्हांपासून संपलें.

---

## हिंदी स्वातंत्र्य-संघ : १०

मागें उल्लेखिलेल्या बंदीछावणींतील हिंदी सैनिकांच्या स्वातंत्र्यचळवळी-बरोबरच सर्वसामान्य नागरिकांत या चळवळीची सुरुवात व वाढ कशी झाली हें पाहणेंही आतां क्रमप्राप्तच आहे. जपानी मलायांत शिरतांच त्यांच्या ' हिकारी कीकान ' या खात्याच्या प्रोत्साहनानें ' इंडियन इंडिपेन्डन्स् लीग ' म्हणजे हिंदी स्वातंत्र्य-संघ, पेनांग, ईपो, कोलालंपूर, सिंगापूर इ. मुख्य मुख्य शहरांतून स्थापन झाले. या सर्व शाखा एकाच प्रकारचें काम, आपापल्या प्रांतांत स्वतंत्रपणें करूं लागल्या. तेथील हिंदी जनतेंत प्रसंगाप्रसंगानें पुढारी म्हणून पुढें आलेले श्री. एन्. राघवन् व के. पी. के. मेनन हे मलबारी बरिस्टर्स, श्री. गोहो हे बंगाली बॅरिस्टर इत्यादि गृहस्थ त्या त्या शाखेचे प्रमुख होऊन इतर सहकाऱ्यांच्या साहाय्यानें तेथील काम बघूं लागले. जपानी राज्य-पद्धतीप्रमाणें प्रत्येक नागरिकाजवळ स्वतःच्या नांवाचें, खुणेचें व स्वतःचें छायाचित्र असलेलें एक कार्ड असावें लागतें. प्रत्येक घरांत कायम राहाणारीं माणसें, त्या घरांतील जन्ममृत्यूची नोंद, एक रात्र जरी वसती करा-वयास कोणी दुसरा इसम ( पाहुणा, आप्त, इष्ट इत्यादि ) आल्यास त्याचें नांव, गांव, धंदा, येण्याचें कारण, त्याची चालचलणूक वगैरे सर्व गोष्टींची फावल्या वेळीं विनावेतन नोंद ठेवण्याकरतां त्याच वस्तींत राहणारा एक गृहस्थ दहा घरावरचा मुख्य म्हणून नेमला जातो. त्यानें न कुरकुरतां व कसल्याही प्रकारच्या मोबदल्याची अपेक्षा न करितां हें काम चोख रीतीनें पार पाडलेंच पाहिजे असा दंडक असतो. प्रत्येक वस्तींतील दहा दहा घरांवरील हे मुख्य अधिकारी त्या त्या वस्तीच्या पोलीस ठाण्यावरील मुख्यास जबाबदार असतात. अशा या व्यवस्थेनें सरकारची कोणतीही आज्ञा अगदीं यःकश्चित नागरिकापर्यंत तावडतोब पोंचूं शकते. सर्वांमध्यें काम सारखें वांटलें गेल्यामुळें कोणावरच त्याचा बोजा पडत नाहीं आणि एवढ्या मोठ्या संघटनेस कांहीं खर्चही लागत नाहीं. लढाईच्या किंवा तत्सम सामुदायिक संकटाच्या दिवसांत त्या त्या वस्तींतील वयांत आलेल्या दोन दोन पुरुषांनीं आळीपाळीनें आपल्या वस्तींत गस्त घालावी; दिवसा हवाई हल्ल्याच्या वेळीं घरांतील मंडळींनीं आपापल्या घरां-पुढें, रहदारी व इतर सर्व हालचाल स्थगित करणारीं निदर्शक अशीं लाल निशाणें लावावींत; शत्रूचीं विमानें गेल्याची सूचना होतांच लाल निशाणांच्या जागीं निळीं निशाणें लावावींत; आगलावे स्फोटगोल पडल्यास आग विझविण्याकरतां

म्हणून प्रत्येक घरापुढें एक पिंप भरून बारीक वाळू, लांब लोखंडी सळया, फावडीं इत्यादि ठेवावींत असें योजिलेलें असे. प्रत्येक दहा घरांमधील एका घरांतील जबाबदार व्यक्तीकडेच त्या दहा घरांचें अन्नवांटपाचें काम सोंपविलेलें असे. अशा रीतीनें सर्व राष्ट्रांत एककुटुंबात्मक भावना निर्माण करून, घरांतल्याप्रमाणें प्रत्येक व्यक्तीकडून राष्ट्राचीं दैनंदिन कामें केवळ एक कर्तव्य म्हणून कसोशीनें परंतु विनावेतन करून घेणें हें जपानी राज्यव्यवस्थेचें एक वैशिष्ट्य आहे. या व्यवस्थेपासून अनेक फायदे आहेत. आपण राष्ट्राचे एक जबाबदार घटक असून, स्वतःच्या शारीरिक आणि कौटुंबिक कर्तव्यांइतक्याच तत्परतेनें राष्ट्रकर्तव्य पार पाडणें हेंही आवश्यक आहे, हें तत्त्व कोणत्याही शाळेंत वा विद्यालयांत न जातां प्रत्येक व्यक्तीच्या मनांत बिंबतें. वेतन दिलें तर आपण भाडोत्री आहोंत, पैसे दिले तरच काम करूं, नाहीं दिले तर कामाची कोणाला पर्वा, काम न करितांच पैसे मिळाल्यास उत्तम, अशा विकृत भावना निर्माण होतात. उलट कांहींही वेतन न घेतां केवळ एक राष्ट्रकर्तव्य म्हणून कांहीं गोष्टी करण्याची संवय प्रत्येक व्यक्तीस लहानपणापासून शिस्तीचा दंडक घालून लाविली म्हणजे इतर सद्गुणांप्रमाणें हा अमोलिक राष्ट्रगुणही वाढीस लागतो. या राज्यव्यवस्थेचा दुसरा फायदा म्हणजे कोणतीही आज्ञा राष्ट्रप्रमुखापासून तों राष्ट्राच्या अगदीं सांदीकोपऱ्यापर्यंत चुटकीसरशी पोंचूं शकते व कोणत्याही प्रकारचा गोंधळ न माजतां सर्व राष्ट्राकडून त्या आज्ञेचें एकदम पालन होतें. सुव्यवस्था, सुरळीतपणा, जबाबदारीचा भार सारखा वांटला जाणें व हें एवढें राज्यतंत्र बिनखर्चानें चालणें असे अनेक फायदे या व्यवस्थेपासून होतात. जपानी लोकांनीं जे जे प्रांत काबीज केले त्या त्या प्रांतांत जपानच्या धर्तीवर त्यांनीं ही राज्यव्यवस्थाही तावडतोब रूढ केली.

अर्थात् हिंदुस्थानी लोकांची अशा रीतीनें संघटना करण्याचें कार्य त्यांनी हिंदी स्वातंत्र्य-संघ स्थापन करून सर्वस्वीं त्या संस्थेकडेच सोंपविलें. मलायी, चिनी व इतर तत्सम नागरिकांचा संबंध प्रत्यक्ष जपान्यांशींच होता. त्यांच्या सार्वभौम अशा संस्था जपान्यांनीं कधींच स्थापन होऊं दिल्या नाहींत. यावरूनच जपान्यांची हिंदी लोकांविषयीं कांहीं एक विशेष सहानुभूतीची भावना होती हें सिद्ध होतें. मुख्य, मुख्य अशा प्रत्येक गांवांतील हिंदी लोकांनीं हिंदी स्वातंत्र्य-संघाच्या कचेरींत जाऊन भराभर आपापलीं नांवें नोंदविलीं. त्यांना हिंदी स्वातंत्र्य-संघाच्या मुख्य अधिकाऱ्यांच्या सहीचीं छापील कार्डे देण्यांत आलीं. या कार्डांवर नांव, वय, धंदा, पत्ता इत्यादि गोष्टी नमूद केलेल्या असत. यावरच नागरिकत्व सिद्ध होत असे. उलट असलें कार्ड नसलेला मनुष्य संशयित म्हणून पकडला जाण्याचा संभव असे. धान्य इत्यादि मिळण्याचा हक्क हें कार्ड दाखवूनच प्रस्थापित करितां येई. त्यामुळें हें नोंदणीचें कार्य बिनबोभाट होत असे. ब्रिटिशांच्या फोडा आणि झोडा या नीतीप्रमाणें मात्र यांत जात, वंश इत्यादि नसत्या भान-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 29332 वि. 2 तिहास
क्रमांक 6602 नों. दि. 20/9/50



गडी नसत. दूरपूर्वेंतील सर्व प्रदेशांत जपान्यांचा अंमल सुरू झाल्यावर त्यांनीं जिकडे तिकडे हिंदी स्वातंत्र्य-संघ स्थापण्यास उत्तेजन देऊन सर्व हिंदी माणसांची नोंद करून घेतली. त्यामुळें या विस्तीर्ण व तुटक प्रदेशांतील हिंदी नागरिकांना एकवटण्याची एक अमोल संधी प्राप्त झाली. प्रत्यक्ष जपानमध्यें कै. रासबिहारी बोस हे सावरकरांचे समकालीन क्रांतिकारक, आनंदमोहन सहाय, हनुमान व्यायाम मंडळाचे श्री. देशपांडे, पुण्याचे श्री. सुपनेकर इत्यादि मंडळी त्यावेळेस होतीच. जहाल क्रांतिकारक, कट्टर देशभक्त, वयोवृद्ध अनुभविक गृहस्थ, व जपानच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांत चांगलें वजन असलेले असे रासबिहारी बोस हे अर्थातच या नव्या संघटनेचे एकमेव पुढारी होते. जपानमधील हिंदी स्वातंत्र्य-संघाचें अध्यक्षपद व दूरपूर्वेच्या यच्चयावत् सर्व हिंदी संघटनेचे प्रमुख अशी दुहेरी जबाबदारी त्यांच्यावर पडलेली होती व ती त्यांनीं नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आगमनापर्यंत उत्कृष्टपणें पार पाडली. जपाननें युद्धाची घोषणा करितांच रासबिहारी बोस यांनीं एक जबरदस्त संघटना उभी करण्याचें काम हातीं घेतलें व जो जो प्रदेश जपान्यांच्या अंमलाखालीं येत गेला त्या त्या प्रदेशांत जपानी अधिकाऱ्यांच्या सहकार्यानें त्यांनीं हें सतीचें वाण नेलें.

दूरपूर्वेतील इतर प्रदेशांपेक्षां मलाया आणि सिंगापूर या भागांत व ब्रम्हदेशांत हिंदुस्थानी लोकांची सर्वांत जास्त वस्ती आहे. ब्रम्हदेशांतील लाखों हिंदुस्थानी व जवळ जवळ सर्व फौजफाटा इंग्रजांच्या पिछेहाटीबरोबरच खुष्कीच्या मार्गानें हिंदुस्थानांत निघून गेला. मलायांत युद्धबंदी या नात्यानें व नागरीक म्हणून बरेच हिंदी लोक होते. लंडनपासून सिंगापूरपर्यंत जमीन जोडलेली असती तर त्यांनीही पीछेहाट केली असती यांत तिळमात्र शंका नाहीं; परंतु सिंगापूरच्या दक्षिणेस समुद्रच आला व अक्षरशः पळतां भुई थोडी झाली म्हणून दुसरा कांहीं इलाजच उरला नाहीं. एवढ्याकरतां सिंगापूर बेटासकट त्यांत अडकलेल्या लोकांसही जपान्यांस शरण जावें लागलें. अर्थात् हिंदी बहुसंख्य असल्यामुळें मलाया आणि सिंगापूर हेंच दूरपूर्वेंतील हिंदी स्वातंत्र्य-चळवळीचें केंद्र व्हावें हें क्रमप्राप्तच होतें.

दूरपूर्वेंतील सर्व हिंदी लोकांच्या संघटनेकरतां रासबिहारी बोस यांनीं टोकियोस एक लहानशी परिषद बोलाविण्याचें ठरविलें. ही परिषद २८ मार्च ते ३० मार्च १९४२ पर्यंत चालली. मलायाच्या हिंदी नागरिकांतर्फे गोहो, मेनन्, राघवन् हे टोकियो परिषदेस हजर राहिले. याच वेळेस एक शोकजनक घटना घडून आली. ग्यानी प्रीतमसिंग, स्वामी सत्यानंद पुरी, कॅप्टन महंमद अक्रम व के ए. एन्. अय्यर हे ज्या विमानांतून टोकियोंतील या परिषदेस जाण्याकरतां म्हणून निघाले तें विमानच वाटेंत आदळलें व तीं सर्व माणसें प्राणास मुकलीं.

स्वामी सत्यानंद पुरी या हिंदपुत्राचा वाचकांस येथें परिचय करून देणें

योग्य ठरेल. हे सुमारें छत्तीस वर्षांचे तरुण संन्यासी सयामची राजधानी बँकॉक या शहरीं जाऊन बरींच वर्षें स्थायिक झाले होते. तेथें राहून ते सयामी भाषा शिकले, एवढेंच नव्हे तर त्यांनीं त्या भाषेवर असामान्य प्रभुत्व मिळविलें. मराठी व हिंदी या भाषांप्रमाणेंच सयामी भाषेवर प्रभुत्व मिळविण्यास संस्कृतचें उत्तम ज्ञान असावें लागतें व तें त्यांस होतें आणि म्हणूनच त्यांस हें सहजसाध्य झालें. त्या भाषेंत त्यांनीं बरेच ग्रंथ लिहिले. थाय-भारत कल्चरल असोशिएशन (सयाम-भारत सांस्कृतिक संस्था) स्थापन करून तद्वारां भारतीय संस्कृतीचें बीजारोपण आणि वाढ सयाममध्यें कशी झाली तें त्यांनीं दाखवून दिलें. सयाममध्यें सयामी लोक त्यांस अत्यंत पूज्य मानीत. त्यांचें नांव सर्वतोमुखीं झालेलें होतें. अशा या गृहस्थानें केलेलें महत्त्वाचें कार्य असावें तितकें आपल्या लोकांस परिचित नाहीं. त्यांचें अनुकरण करणारा तर विरळाच. युद्धकालांतील सयामच्या पिबुल संग्राम नामक पंतप्रधानानें एका प्रसंगीं या व्यक्तीबद्दल असे उद्‌गार काढले होते कीं, 'भगवान् बुद्धानंतर आम्हांला दुसरी कोणती थोर हिंदी व्यक्ती भेटली असेल तर ती हीच.'

ज. मोहनसिंग व लेफ्टनंट कर्नल गिल हे दोघे सैनिकांचे प्रतिनिधी या नात्यानें त्या परिषदेस हजर राहिले. जपानमधील प्रमुख हिंदी नागरिक (ज्यांचा वर उल्लेख आलेला आहे ते व इतर कांहीं) हे परिषदेस हजर होतेच, याशिवाय हाँगकाँग, शांघाय, मांचूरिया (येथील एकमेव हिंदी नागरीक श्री. नायर हे मलबारी गृहस्थ) येथील हिंदी प्रतिनिधीही परिषदेस आले. या परिषदेंत मुख्यतः चार ठराव संमत झाले. (१) दूरपूर्वेंत ठिकठिकाणीं हिंदी स्वातंत्र्य-संघ स्थापन करून हिंदी लोकांची संघटना करावी व हिंदुस्थानाचें गेलेलें स्वातंत्र्य परत मिळवावें. (२) हिंदी स्वातंत्र्यसेनेची उभारणी करावी. (३) या सैन्यानें हिंदुस्थानाच्या भूमीवर व सर्वस्वीं हिंदी अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं लढाई लढवावी; आणि (४) या गोष्टींबद्दल पूर्ण विचार करण्याकरतां सयामची राजधानी बँकॉक या शहरीं एक मोठी परिषद बोलवावी.

हे प्रतिनिधी आपापल्या देशीं परतले आणि त्यांनीं परिषदेचें इत्यंभूत वृत्त आपापल्या देशांतील सर्व हिंदी लोकांस निवेदन केलें. तेव्हां सगळीकडे एकच उत्साहपूर्ण वातावरण पसरलें. बँकॉक येथें भरणारी परिषद जास्त प्रातिनिधिक स्वरूपाची व्हावयाची होती. फिलीपीन्स, बोर्निओ, मलाया, जावा, सुमात्रा, इंडोचायना, चीन, सयाम, ब्रह्मदेश इत्यादि देशांतील सर्व हिंदी लोकांनीं आपली संघटना करून आपापले प्रतिनिधी निवडले.

जपाननें युद्ध सुरू करितांच अवघ्या तीन-चार महिन्यांतच दूरपूर्वेंतील सर्व शत्रूंचा निःपात केला होता. "जपाननें युद्ध सुरू केलेंच तर त्यास ए. बी. सी. आणि डी अशा चार प्रबळ शत्रूंचा गराडा पडला आहे हें त्यानें विसरूं नये" असें इंग्रज लोक जपान्यांस धमकावणी देत. 'ए' म्हणजे ऑस्ट्रे-

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६६०७

लिया, 'बी' म्हणजे ब्रिटन, 'सी' म्हणजे चीन व 'डी' म्हणजे डच. परंतु या प्रदेशांत एकच मुसंडी मारून जपाननें या ए. बी. सी. डी. शत्रूंची कोंडी फोडून त्यांचा पत्त्याचा बंगला एका फुंकरीसरशीं कोलमडून टाकला! जपाननें ८ डिसेंबर १९४१ ला युद्ध सुरू केल्यापासून किती झपाट्यानें एक एक प्रांत काबीज केले हें खालील तारखांवरून समजेल. पॅसिफिक महासागरांतील ग्वाम बेट १३ डिसेंबरला पडलें; पेनांग बेट २० डिसेंबर; वेक बेट २२ डिसेंबर; हाँगकाँग बेट २५ डिसेंबर; मनीला शहर (फिलीपीन्स बेटांची राजधानी) २ जानेवारी १९४२ रोजीं; मलाया द्वीपकल्प १ फेब्रुवारी १९४२, सिंगापूर १५ फेब्रुवारी, रंगून (ब्रह्मदेशाची राजधानी) मार्च महिन्यांत, अंदमान-निकोबार बेटें २३ मार्च व मंडाले (ब्रह्मदेशांतील उत्तरेकडचें मोठें शहर) १ मे रोजीं पडलें.

अशा रीतीने हा सर्व प्रदेश विलक्षण झपाट्याने जपान्यांच्या हाताखालीं येऊन ऑस्ट्रेलियापासून तों हिंदुस्थानाच्या पूर्वसरहद्दीपर्यंत जपान्यांचा अखंड अंमल सुरू झाला व या विस्तीर्ण प्रदेशांतील पंचवीस लाख हिंदी नागरिकांचें संघटन शक्य झालें. हिंदी लोकांचें संघटन करविण्यांत किंवा होऊं देण्यांत जपान्यांचा स्वार्थी हेतु असलाच पाहिजे, नाहींपेक्षां त्यांनीं हिंदी संघटनेबद्दल एवढी आस्था बाळगून तीस एवढी मदत कां करावी? ही विचारसरणी बरोबर नाहीं. जपान्यांना हिंदुस्थानावर राज्य करावयाचें होतें हा जो सूर त्यांतून निघतो त्याला या एकाच तर्काचा आधार पुरत नाहीं. इंग्रज हे जपान्यांचे मुख्य शत्रू. त्यांची सगळी भिस्त अवाढव्य हिंदीं फौजेवर व हिंदी मालावर. थोड्या हिंदी लोकांस प्रोत्साहन देऊन त्यांयोगें हिंदुस्थानांतील लोकांत चेतना उत्पन्न करून इंग्रजांना तेथून घालवून हिंदुस्थानाला स्वातंत्र्य प्राप्त करून देणें हें इंग्रजांना पूर्णपणें शरण आणण्यास पुरें होतें. हिंदुस्थान हातचा गेला म्हणजे इंग्रजांची ताकद खच्ची झालीच हें जपान चांगलें समजून होता. हिंदी लोकांच्या संघटनेस मदत देण्यास जपानला प्रवृत्त करण्याकरतां एवढा स्वार्थ काय थोडा होता? 'क्ष' हा गृहस्थ जर अ, ब, क, ड, अशा चार शत्रूं-विरुद्ध दोन्ही हातांत दोन लाठ्या घेऊन एकटा लढत असला, आणि 'भा' हा गृहस्थ जर बाजूला स्वस्थ बसलेला असला—मात्र 'ब' हा 'भा' चा सुद्धां शत्रु असला आणि निदान 'ब' चा तरी निःपात व्हावा असें 'भा' ला वाटत असलें, तर 'क्ष' नें आपल्या हातांतील एक लाठी 'भा' ला देऊन त्यास निदान 'ब' विरुद्ध तरी लढण्यास उद्युक्त करणें हें मानवी स्वभावास सर्वस्वीं अनुसरूनच आहे. यांत असामान्य अथवा अपायकारक असा स्वार्थ नाहीं किंवा मोठें परोपकाराचें किंवा धार्मिक कार्यही नाहीं. 'भा' हा गृहस्थ त्याच्या हातीं लाठी मिळतांच 'ब' विरुद्ध लढावयास तयार झाला तर 'क्ष' ला तीनच शत्रू उरले, हा 'क्ष' चा मोठाच फायदा नाहीं का? बरें

'भा' च्या दृष्टीने बघतां त्याला 'ब' शीं लढण्यासाठीं हत्यार नव्हतें तें मिळालें, हा त्याचा फायदाच. मग 'क्ष' नें 'भा' चें सहकार्य मागितलें आणि 'भा' नें तें त्याला दिलें यांत विपरीत असें काय आहे ?

आम्हांला बंदीछावणींत प्रत्येक तुकडीस दोन-दोन—तीन-तीन या प्रमाणांत 'आझाद हिंद' या नांवाचें दोन पानीं रोमन-हिंदुस्थानींत छापलेलें एक वर्तमानपत्र मिळत असे. तें बहुधा पंजाबी गृहस्थांच्या देखरेखीखालीं चालविलें जात असल्यामुळें त्यांस रोजच्या प्रचारांतील वाटत असलेले शब्द बहुजनसमाजास मात्र अत्यंत क्लिष्ट आणि परकी वाटत. कारण ते उर्दू, फारशी आणि अरबी शब्द होते. अर्थात् त्या वेळेस दुर्घट वाळवंटांतून रखडल्याप्रमाणें आम्ही कसेतरी सुरुवातीपासून शेवटपर्यंत तें वाचीत त्याचा सारांश आत्मसात करीत असूं. वर्तमान सुखदायी नव्हतें म्हणून निदान भविष्य तरीं उज्ज्वल होईल का ? अशा दृष्टीने आम्ही त्या वर्तमानपत्राचें रोज परिशिलिन करावयाचें ठरविलें होतें. त्यांतून आम्हांला हिंदी संघटना, रासबिहारी बोस यांचा नेतृत्व-स्वीकार, स्वामी सत्यानंदपुरींस आणि इतर मंडळीस झालेला विमान अपघात, भावी बँकॉक परिषद् इत्यादि विषयींच्या बातम्या समजत असत.

सयाम हा देश मलायास जोडूनच असल्यामुळें मलायाहून या परिषदेस आगगाडीनें बरेच प्रतिनिधी पाठविणें शक्य होतें. मलायांत इतर प्रदेशांपेक्षां हिंदी लोक बहुसंख्य असल्यामुळें त्यांचे बरेचसे प्रतिनिधी जाणेंही आवश्यक होतें. शिवाय स्वातंत्र्य-सेना उभारावयाची असें ठरल्यामुळें सैन्याचेही बरेच प्रतिनिधी जाणार होते. प्रत्येक बंदीछावणींतून दोन दोन प्रतिनिधी या परिषदेस पाठविण्याचें ठरलें. मलाही जाण्याची उत्कंठा लागली व मी त्या दिशेनें प्रयत्न चालविला. मेजर बरार हे आमच्या छावणीचे प्रमुख होते हें वर आलेंच आहे. त्यांची मोहनसिंगांशीं बरीच ओळख होती. मी त्या परिषदेचा प्रश्न काढून तेथें जाण्याची माझी इच्छा प्रदर्शित करितांच त्यांनीं आपण होऊन सेलेतार छावणीतर्फे माझें नांव सुचविण्याचें आश्वासन दिलें. परंतु मेजर, कर्नल असे वरिष्ठ अधिकारी असेपर्यंत कोणत्याही कनिष्ठ सैनिकास त्याच्या वैयक्तिक आणि विविक्षित योग्यतेचा विचार न करितां निवडलें जाऊं नये ही घातक लष्करी प्रथा तेथेंही माझ्या आड आली. मेजर बरार हे गुणग्राही असल्यामुळें त्यांनीं माझ्याकरतां पुष्कळ खटपट करून पाहिली; परंतु शेवटीं अतिशय जड अंतःकरणानें त्यांत अपयश आल्याचें त्यांनीं मला सांगितलें. मग मी म्हटलें, "छावणीचा नाहींतर निदान महाराष्ट्रीयांचा प्रतिनिधी म्हणून तरी मला जाऊं द्या. महाराष्ट्रीयांचा प्रतिनिधी म्हणून तुम्ही कोणालाच निवडलें नाहीं." ते उत्तरले, "लेफ्टनंट कर्नल भोसले हे त्या सभेस हजर राहाणार असल्या-मुळें त्या सबबीवरही तुम्हांस परिषदेस जातां येणार नाहीं......भोसले

तुम्हांला माहीत आहेत का ? " मी म्हटलें, " नाहीं......मी त्यांस बघितलें सुद्धां नाहीं अजून. "

आपण सामान्य नागरीक असतों तर हरतऱ्हेनें या परिषदेस हजर राहूं शकलों असतों, परंतु आपण पडलों बंदी......बंदी जपान्यांचे आणि अधिकार मोहनसिंगांचा; तेव्हां या दुहेरी पेचांतून सुटणें महाकठिण. असें किती दिवस या बंदिखान्यांत खितपत पडणार ? इतकी खटपट करून व अंगीं सामर्थ्य असूनही कार्य करण्यास वाव मिळत नाहीं याबद्दल मला फार वाईट वाटलें. परंतु तितक्यांतच पूर्वी उल्लेखिल्याप्रमाणें माझी नेमणूक सायगांव रेडिओवर होऊन मी २१ जून १९४२ रोजीं सायगांवला प्रयाण केलें.

ठरल्याप्रमाणें १५ जून १९४२ पासून २३ जून १९४२ पर्यंत दूरपूर्वेतील सर्व हिंदी लोकांची एक मोठी प्रातिनिधिक परिषद सयाम देशाची राजधानी बँकॉक येथें भरली. सयाम, ब्रह्मदेश, मलाया, जावा, सुमात्रा, बोर्निओ, फिलिपीन्स, चीन, इंडोचीन, मांचूरिया, जपान इत्यादि सर्व प्रदेशांतील एकंदर सव्वाशें प्रतिनिधी या सभेस हजर होते. त्यांत कांहीं स्त्रियाही होत्या. बँकॉकमधील निरनिराळ्या हॉटेलांमधून या प्रतिनिधींची उतरण्याची सोय केलेली होती. पिबुल संग्राम हे त्या वेळेस सयामचे पंतप्रधान होते. त्यांच्या सरकारानें ही परिषद भरविण्याच्या कामीं सर्व प्रकारची मदत दिली. एका विस्तीर्ण सभागृहांत हिंदुस्थान, सयाम आणि जपान अशा तिन्ही देशांचे प्रत्येकीं एक एक असे तीन मोठे झेंडे भव्य भिंतीवर वरपासून खालपर्यंत सोडलेले होते. रंगीबेरंगी पताका, देशभक्तांचीं चित्रें इत्यादींनीं तें सभागृह शृंगारलेलें होतें. रासबिहारी बोस हे अध्यक्षस्थानीं होते. जपानचें महाराष्ट्रीय द्वय ( कै. देशपांडे आणि श्री. विनायकराव सुपनेकर ) हेंही आलें होतें. परिषदेच्या सभागृहांत ध्येयनिदर्शक वचनें ठळक अक्षरांत कापडावर रंगवून तीं ठिकठिकाणीं लाविलेलीं होतीं. परिषदेच्या सात दिवसांच्या अधिवेशनांत श्री. रासबिहारी बोस, ज. मोहनसिंग, श्री. देवनाथदास इत्यादींची वीरश्रीपूर्ण आणि ध्येयनिदर्शक व्याख्यानें झालीं. सर्व प्रतिनिधींचा सयामी सरकारातर्फे जाहीर सत्कार, हिंदी लोकांच्या जाहीर सभा इत्यादि कार्यक्रमही झाले. या परिषदेंत महत्त्वाचे वीस ठराव संमत होऊन ही परिषद संपली. **आगामी स्वातंत्र्य-चळवळीचा पाया येथेंच घातला गेला** असें म्हणणें चुकीचें होणार नाहीं. या परिषदेंत संमत झालेले वीस ठराव येणेंप्रमाणें:—

( १ ) हिंदुस्थानाचें पूर्ण स्वातंत्र्य हेंच आमचें उद्दिष्ट आहे आणि तें साध्य करून घेण्याची वेळ येऊन ठेपलेली आहे. ( २ ) स्वातंत्र्य-संपादनार्थ योग्य ती चळवळ या परिषदेनें हातीं घ्यावी. ( ३ ) अ : आपल्या ध्येयपूर्तीवर अढळ विश्वास, सर्व हिंदी लोकांचें संपूर्ण ऐक्य आणि पराकोटीचा स्वार्थत्याग या तीन मुख्य तत्त्वांवर ती चळवळ

आधारलेली असावी. आ : हिंदुस्थानाचे तुकडे न पाडतां हिंदुस्थान अखंड ठेवण्यांत यावा. इ : सर्व गोष्टी राष्ट्रीय तत्त्वावर आधारलेल्या असाव्यात. त्यांत कोणत्याही प्रकारचे जातीय, प्रांतीय किंवा पंथीय भेद्भाव असूं नयेत. ई : हिंदुस्थानांतील राष्ट्रसभा ही स्वदेशांतील एकमेव राष्ट्रीय संस्था असल्यामुळें त्या संस्थेच्या उद्दिष्टाशीं आपल्या कार्याची रूपरेषा जुळती ठेविली पाहिजे. उ : हिंदुस्थानाची भावी आणि कायम स्वरूपाची राज्यघटना हिंदी जनता ठरवील तीच राहील. त्या बाबतींत ढवळाढवळ करण्याचा आपल्याला कांहीं अधिकार राहणार नाहीं. ( ४ ) हिंदी स्वातंत्र्य-संघातर्फे स्वातंत्र्य-चळवळ चालविण्यांत येईल. ( ५ ) स्वातंत्र्ययुद्धाकरतां हिंदी स्वातंत्र्यसैन्य उभारण्यांत यावें. ( ६ ) हिंदी-स्वातंत्र्य-संघाचे खालीलप्रमाणें विभाग पाडण्यांत येतील अ. कार्यकारी मंडळ आ : प्रतिनिधी मंडळ इ : प्रांतिक समित्या ( ई ) स्थानिक शाखा. ( ७ ) कार्यकारी मंडळांत अध्यक्षाव्यतिरिक्त चार सभासद असावेत. पैकीं कमींत कमी दोन सभासद हिंदी स्वातंत्र्य-सैन्यांतील असावेत. कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष म्हणून श्री. रासबिहारी बोस यांची निवड करण्यांत आलेली आहे. तसेंच श्री. राघवन्, श्री. के. पी.के. मेनन, ज. मोहनसिंग व कर्नल गिलानी हे त्याचे चार सभासद म्हणून निवडले गेले आहेत. ( ८ ) या परिषदेकडून आंखून देण्यांत येणाऱ्या रूपरेषेप्रमाणें सर्व कामकाज पार पाडण्याची जबाबदारी या कार्यकारी मंडळावर राहील. पुढचा कार्यक्रम आंखण्याचें काम प्रतिनिधीमंडळ करील. या कार्यक्रमानुरूप कार्य करण्याची व ज्या नवीन बाबी उद्भवतील त्या योग्य तऱ्हेनें निकालांत काढण्याची जबाबदारीही सर्वस्वीं कार्यकारी मंडळावर आहे. ( ९ ) दूरपूर्वेतील सर्व हिंदी युद्धबंदी आमच्या ताब्यांत देण्यास ही परिषद् निप्पॉन ( जपान ) सरकाराला विनंति करीत आहे. ( १० ) हिंदी स्वातंत्र्य-सैन्याच्या कोठल्याही पदावर अन्यदेशीय इसमाची नेमणूक होणार नाहीं किंवा त्याचा कसल्याही प्रकारचा संबंध असणार नाहीं. ( ११ ) हिंदी स्वातंत्र्य-सैन्याच्या स्थापनेपासूनच त्यास स्वतंत्र राष्ट्रीय फौजेचा दर्जा आणि आनुषंगिक सर्व सत्ता राहील. म्हणजे हिंदी स्वातंत्र्य-सैन्य हें जपान किंवा अन्य स्वतंत्र राष्ट्रांच्या फौजेच्या दर्जाचें राहील. ( १२ ) अ : हिंदी स्वातंत्र्य-सैन्य हें हिंदुस्थानाच्या भूमीवरच लढेल व तें सुद्धां इंग्रज आणि त्यांस मदत करणाऱ्या राष्ट्रांविरुद्धच. आ : हिंदुस्थानाचें स्वातंत्र्य मिळवून तें टिकविणें याच एका अंतिम ध्येयास अनुसरून जें कांहीं करावें लागेल तें सर्व हिंदी स्वातंत्र्य सैन्य करील, परंतु अन्य कोणत्याही हेतूस धरून हिंदी स्वातंत्र्य-सैन्याचा उपयोग करितां येणार नाहीं. ( १३ ) हिंदी स्वातंत्र्य-सैनिक, हा हिंदी

स्वातंत्र्य संघाचाही सभासद समजण्यांत येईल आणि त्या संघाशीं एकनिष्ठ राहणें हें त्याचें कर्तव्य ठरेल. ( १४ ) जनरल ऑफिसर कमांडिंग मोहनसिंग हे हिंदी स्वातंत्र्यसेनेचे मुख्य अधिकारी राहतील व कार्यकारी मंडळाच्या सल्ल्यानुरूप ते या सैन्याचें कार्य चालवितील. ( १५ ) इंग्रजांविरुद्ध युद्ध पुकारण्यापूर्वी हिंदी राष्ट्रीय सभेच्या ध्येयाशीं आपलें ध्येय जुळत असल्याची, कार्यकारी मंडळानें खात्री करून घ्यावी. ( १६ ) कार्यकारी मंडळास योग्य वाटेल त्या वेळेस व वाटेल त्या प्रकारची मदत इतर राष्ट्रांकडून घ्यावयास कांहीं हरकत नाहीं. ( १७ ) दूरपूर्वेतील सर्व हिंदी लोकांकडून जरूर तितकें द्रव्य जमविण्याचे सर्व अधिकार कार्यकारी मंडळास देण्यांत येत आहेत. ( १८ ) या परिषदेची निप्पॉन ( जपान ) सरकारला अशी विनंति आहे कीं दूरपूर्वेतील कोणाही निरपराध हिंदी माणसास त्यांनीं शत्रू म्हणून समजूं नये व त्याची मालमत्ता ही शत्रूची मालमत्ता म्हणून धरूं नये. (१९) आमच्या तिरंगी झेंड्यास मान्यता देण्याची ही परिषद सर्व मित्रराष्ट्रांस विनंति करीत आहे. ( २० ) श्री. सुभाषचंद्र बोस यांनीं या प्रदेशांत यावें व निप्पॉन सरकारानें त्यांस इकडे आणण्याची सर्व प्रकारची व्यवस्था करावी अशी त्या दोघांसही या परिषदेची कळकळीची विनंति आहे.

हे महत्त्वाचे ठराव संमत केल्यावर या परिषदेचें काम संपलें. याच सुमारास बँकॉक शहरांत पूर आला होता. बँकॉक हें शहर सखल जागेवर वसलेलें असल्यामुळें येथें दर आठ-दहा वर्षांनीं पूर येतो. त्याप्रमाणें या वर्षीही आला होता. बहुतेक सर्व घरांचे पहिले मजले बुडून गेले होते व लोक दुसऱ्या मजल्यावरून होड्या टाकून जरूरीच्या कामासाठींच तेवढें बाहेर जात येत. बरेच दिवस भाजीपाला इत्यादि नित्योपयोगी वस्तूही मिळणें दुरापास्त झालें होतें.

दरम्यान मेजर फूजीवारा हे बदलून कर्नल इवागुरू हे हिकारी कीकान खात्याचे मुख्य अधिकारी झाले होते. हिकारी कीकानला प्रत्यक्ष जपानी युद्धमंडळाकडून काय हुकूम होते हें एक गूढच आहे; परंतु हिंदी स्वातंत्र्य-चळवळीची धुरा धारण करणाऱ्या अधिकाऱ्यांचा तरी असा समज झाला कीं कोणत्याही महत्वाच्या बाबतींत त्या खात्यास अंतिम अधिकार नसून टोकियो युद्धमंडळाशीं हिंदी अधिकाऱ्यांस संबंध ठेवावयास मदत करणारें तें एक खातें आहे. अर्थात्, हिंदी लोक, त्यांची संस्कृति, स्वभाव, संवयी, त्यांची भाषा ( हिंदी व इंग्रजी ) जाणणारेच बहुतेक सर्व लोक वरपासून खालपर्यंत या खात्यांत नेमलेले असत. या खात्यांतील शिपायापासुन तों कर्नल ( अथवा जनरल ) च्या हुद्यापर्यंतचे बहुतेक सर्व लोक लष्करी लोकच असत. बिनलष्करी असा क्वचितच एखाद् दुसरा इसम या खात्यांत काम करी.

या खात्याच्या संबंधांत मोहनसिंगांच्या कारकिर्दींत घडलेली एक मनो-

रंजक गोष्ट येथें नमूद करून मगच पुढच्या इतिहासाकडे वळूं. इंग्रजांचा अंमल असेपर्यंत ऑस्ट्रेलियामध्यें तयार केलेलें डब्यांतील आटीव दूध सर्व सैनिकांस मिळत असे. सिंगापूर पडल्यावर तिकडून येणाऱ्या दुधाचा पुरवठा बंद झाला. स्थानिक गवळ्यांचा धंदा युद्धाच्या वावटळींत आणि गोंधळांत बसल्यासारखाच झाला होता. त्यामुळें इतर सैनिकांना दूध मिळण्याचें राहोच परंतु आजारी पडणाऱ्या सैनिकांस पथ्य म्हणून सुद्धां दूध मिळेनासें झालें. तेव्हां मोहनसिंगांनीं हिकारी कीकानच्या लेफ्टनंट कुनिझगास सांगितलें कीं,...अशी अशी परिस्थिति असल्यामुळें आम्हाला कमींत कमी दीडशें गाई तरी तावडतोब पाहिजेत. जपानी लोकांच्या दैनंदिन जीवनांत दुध-दुभत्याचा प्रघात नसल्यामुळें त्यांच्या भाषेंत ' उशी ' हा एकच शब्द गाय आणि बैल या दोन्हींचा निदर्शक आहे. तसेंच घोडा आणि घोडी असा सामान्य प्रचाराच्या भाषेंत भेद नसून ' उमा ' हा एकच शब्द दोन्ही अर्थीं वापरला जातो. अगदीं फरक करणें जरूरच असलें तर " ओउशी " म्हणजे बैल ( " ओउमा " म्हणजे घोडा, " मेउमा " म्हणजे घोडी ) व " मेउशी " म्हणजे गाय असा भेद करितात. लेफ्टनंट कुनिझगानें हिंदी स्वातंत्र्य-सैन्यास दीडशें ' उशी ' पाहिजेत एवढेंच लक्षांत ठेवलें व आपल्या कचेरींत जाऊन कर्नल इवागुरू यांच्या संमतीनें मलायांतील त्यांच्या निरनिराळ्या खात्यांस दीडशें 'उशी' गोळा करून पाठविण्यास पत्रें लिहिलीं. एक-दोन महिन्यानंतर हिकारी कीकानच्या एका शिपायानें दीडशें बैल हाकीत आणून ते हिंदी अधिकाऱ्यांच्या स्वाधीन केले! हिंदी अधिकाऱ्यांना ' आपल्याला हिकारी कीकानकडून दीडशें गाई मिळतील ' असें मोहनसिंगांकडून कळलें होतें. गाईंच्या ऐवजीं बैल आले हें त्यांच्या लक्षांत आलें व त्यांनीं तसें कॅ. मोहनसिंग यांस कळविलें. पुढच्या खेपेस मोहनसिंग हे जेव्हां हिकारी कीकानच्या वरिष्ठ अधिकाऱ्यास भेटले तेव्हां नेहमींच्या दुभाष्याकरवीं त्यांस सांगितलें, " तुम्ही जे बैल पाठविले आहेत ते आम्हाला कांहीं उपयोगाचे नाहींत. त्यांचें दूध निघत नाहीं ! " जपानी दुभाष्यानें अर्थातच बैल या शब्दाचें ' उशी ' असें भाषांतर करून मोहनसिंगांचें म्हणणें आपल्या अधिकाऱ्याच्या कानावर घातलें. त्या अधिकाऱ्यानें उत्तर दिलें, " तुम्हाला ठाऊकच आहे कीं युद्धानंतरची परिस्थिति किती बिकट आहे. आम्ही आमच्याकडून प्रयत्न करूं. परंतु सध्यांपुरतें तरी या दीडशें उशींच्यापासून जें काय थोडें थोडकें दूध मिळेल त्यावरच भागवा. " शेवटीं बराच वेळ निरनिराळ्या तऱ्हेनें फोड करून सांगितल्यावर त्यांच्या लक्षांत आलें कीं, ' प्रयत्नें वाळूचे कण रगडितां ... ' हें तत्त्व बैलाच्या बाबतींत लागूं पडणार नाहीं! दोघांसही या प्रकाराचें फारच हसूं आलें व त्यांनीं बैल परत घेतले.

हिकारी कीकानचे यच्चयावत् सर्व अधिकारी मात्र आपली मध्यस्थाची भूमिका विसरून जाऊन या चळवळीचे जपान सरकारतर्फेचे सर्व निर्णयात्मक

हक्क आपल्याकडेच आहेत असें वागूं लागले. या त्यांच्या वृत्तीचा, पुढें नेताजी सुभाषचंद्र बोस यांसही फार त्रास झाला. तें पुढें सविस्तर येईलच व हिकारी कीकानच्या अयोग्य वागणुकीमुळें या चळवळीचें कसें नुकसान झालें, त्या खात्याची मुख्य मुख्य कामें कोणतीं, त्यांच्याऐवजीं दुसरी कोणती व्यवस्था असावयास पाहिजे होती इत्यादि गोष्टींचा ऊहापोह आपण पुढें एका स्वतंत्र प्रकरणांत करूं. सध्या एवढेंच सांगितलेलें पुरे कीं यच्चयावत् हिकारी कीकानच्या अधिकाऱ्यांची वृत्ति—ही चळवळ म्हणजे काय आपल्याच हातचें बाहुलें. आपण सांगूं तसें त्यांस ( हिंदी लोकांस ) वागलें पाहिजे. या निमित्तानेंच आपण त्यांचा उपयोग करून घेऊं शकतों तर करा ना का त्यांची समजूत जरा वेळ—अशा तऱ्हेची होती. यामुळें त्यांच्यांत व मोहनसिंगांत तेढ वाढूं लागली.

बँकॉक परिषदेचे ठराव असलेला खलिता व त्याबरोबरचें औपचारिक पत्र निप्पॉन सरकारकडे ( टोकियोस ) त्याच्या मान्यतेकरतां पाठविण्यासाठीं म्हणून हिकारी कीकानकडे ( कारण बहिर्गत व्यवहारांतील सर्व पत्रव्यवहार त्यांच्या मध्यस्थीनेंच चाले ) पाठवून बरेच दिवस झाले होते. अजून त्याचें उत्तरच आलें नव्हतें. हिकारी कीकाननें हा खलिता स्वतःच्या कचेरींत दडपून ठेवून त्याचा केवळ सारांश निप्पॉन सरकारला कळवून त्यावर त्याचें मत कलुषित होण्यासारखा कांहीं शेरा मारला होता कीं काय अथवा तो खलिता पाठवून त्यांतील महत्त्वाच्या अटी मान्य करूं नये असा सल्ला दिला होता किंवा कसें हें कळावयास कांहीं मार्ग नव्हता. एक तर त्या खात्याचा गुप्त पत्रव्यवहार, त्याची अगम्य आणि जगविरहित लेखनपद्धति, आमच्याकडे धूर्त हेरांचा अभाव व त्यांच्याच राज्यांत त्यांच्यावर हेरगिरी करण्याचा धोका यांमुळें त्या खलित्याचें पुढें काय झालें हें कळावयास कांहीं मार्ग नव्हता. बरेच दिवस परस्परांच्या गांठीभेटींत जपान्यांस आठवण करूनसुद्धां त्यांच्याकडून टाळाटाळीचीं उत्तरें आलीं. तदनंतर १९४२ सालच्या नोव्हेंबर महिन्याच्या २९ तारखेला पुन्हा एक खलिता त्या हिकारी कीकानच्याच मध्यस्थीनें ( कारण दुसरा मार्गच नव्हता ) निप्पॉन सरकारकडे पाठविला गेला. कोणत्याही कागद-पत्राचें जपानी भाषांतर होऊन मग तें इतर जपानी खात्यांकडे अथवा निप्पॉन सरकारकडे जाई. हें भाषांतराचें काम हिकारी कीकानकडेच असे. अर्थात् त्यांच्या समजुतीप्रमाणें तें भाषांतर योग्य तऱ्हेनें करीत असतील यांत कांहींच शंका नाहीं. परंतु त्यावर आपला शेरा देणें, मत देणें व सर्व स्थानिक परिस्थितीचें आपल्या मताच्या ( सल्ल्याच्या ) मंडनार्थ वाटेल तसें दिग्दर्शन करणें हें सर्वस्वीं त्यांच्या हातीं असे. वरून तसा हुकूम असेल म्हणून म्हणा किंवा अधिकारी अननुभवी म्हणून म्हणा परंतु ते तसें करीत असतील अशी शंका घेण्यास पुष्कळशी जागा होती. अर्थात् नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या संबधांत या गोष्टीचा विस्तारपूर्वक विचार होणार असल्यामुळें या ठिकाणीं एवढेंच सांगितलेलें पुरे.

त्या पत्रांत खालील मुख्य मुद्दे नमूद केले होते:--(१) बँकॉक परिषदेचे ठराव असणारा खलिता व त्याबरोबरचें पत्र आपणांस पोहोंचलेंच असेल. (२) सर्व ठराव मान्य आहेत कीं नाहींत तें कळवावें--नसल्यास कोणते मान्य आहेत व इतर कां नाहींत? (३) इंग्रज व इतर शत्रूराष्ट्रांस खोडसाळ प्रचार करण्यास जागा राहूं नये म्हणून आमच्याशीं उभयतांस बंधनकारक असा, समानतेच्या तत्त्वावर आधारलेला एक करार करावा. (४) हिंदी स्वातंत्र्य-फौज मान्य करून तीस जरूर त्या सर्व सवलती द्याव्या. या पत्राखालीं श्री.. रासबिहारी बोस यांची कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष या नात्यानें सही होती. या पत्राचेंही, बराच वेळ वाट बघून सुद्धां, कांहीं समाधानकारक उत्तर आलें नाहीं.

मोहनसिंग अधीर झाले. "तुम्ही भलतीच जबाबदारी आपल्या शिरावर घेत आहांत. आजपर्यंत जगांत कोणी केली नाहीं अशी--म्हणजे युद्धबंदी होऊन नंतर इंग्रजांच्या शत्रूस मिळण्याची--घोडचूक तुम्ही केली आहे. इंग्रज तुम्हाला फांशीं देतील--तुमच्या कुटुंबाची धुळधाण करतील. जपानसारख्या साम्राज्य-लालसी आणि हुकुमशाही राष्ट्रास मिळणें--हिटलर, मुसोलिनी यांच्यासारख्या राक्षसी वृत्तीच्या हुकुमशहांच्या गटास मिळणें-- योग्य नव्हे हें, आपले कनवाळू राज्यकर्ते इंग्रजही आजवर सांगत आले आहेत. जवाहरलाल नेहरूंचेंही तेंच मत आहे. मग तुम्हाला जपान्यांचे पित्ते म्हणून हिंदी जनतेचा व इंग्रजांचे शत्रू म्हणून आपल्या दयाळू राज्यकर्त्यांचाही तुमच्यावर रोष होईल. जपान्यांचें काम होतांच ते तर तुम्हास सोडून जातील--पहा बुवा, आम्हाला कांहीं माहीत नाहीं. आम्ही आपले तुमच्या हिताच्या दृष्टीनें चार शब्द सांगत आहों. पटलें तर ऐका. नाहीं पटलें तर नका ऐकूं. आमचें कांहीं म्हणणें नाहीं. हो! कोणी-कडूनही तुमचें भलें व्हावें हाच आमचा मुख्य उद्देश--नाहींतर आम्हाला तरी काय करावयाचें आहे या भानगडींत पडून?" अशा तऱ्हेनें मोहनसिंगांचे कान फुंकणारे बरेच भोंदू हितशत्रू होते. अगदीं सुरवातीपासूनच अशा तऱ्हेचा उपदेश मोहनसिंगास प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणें मिळूं लागला होता. त्याच्या भरीस हिकारी कीकानची तऱ्हेवाईक वागणूक व वर उल्लेखिलेल्या या पत्रास उत्तर न देण्याची वृत्ति, हिंदी स्वातंत्र्य-सैन्याच्या तुकड्या कांहींतरी निमित्तानें वाटेल तेथें घेऊन जाऊन त्यांचा थांगपत्ता लागूं न देणें व त्यांच्याशीं दळण-वळण ठेवूं न देणें, आठशें हिंदी लोकांची तुकडी उडवा उडवी करून आपल्या उपयोगाकरतां ब्रह्मदेशाच्या उत्तर सरहद्दीवर घेऊन जाणें, या आणि अशा अनेक गोष्टींमुळें मोहनसिंग त्रागा करावयास लागले. जपानी जास्तींत जास्त काय करतील? मारून टाकतील. कोणीकडूनही आपण मरणारच मग हा रोजचा मनःस्ताप तरी नको. शिवाय, किती झालें तरी जपान्यांची, आपली आणि रासबिहारी इत्यादींची ओळख आहे तेव्हां ते आपल्याला मारणार नाहींत; असे विचार मोहनसिंगांच्या मनांत आले असतील. म्हणून त्यांनीं हिंदी स्वातंत्र्य-

सैन्यांतून आपलें अंग काढून घेण्याचें ठरविलें असेल. स्वतः श्री. रासबिहारी बोस मात्र वृद्ध, अनुभविक आणि बरेच टक्के टोणपे खाल्लेले गृहस्थ असल्यामुळें व जपानमध्यें बरींच वर्षें वास्तव्य करून राहिलेले असल्यामुळें, त्यांस जपान्यांची वृत्ति पूर्णपणें माहीत झालेली होती. म्हणून त्यांनीं मोहनसिंगांस जरा दमानें घेण्याचा सल्ला बरेच दिवस दिला. परंतु त्यांचा उपदेश न पटून, मोहनसिंग व त्यांच्या कांहीं साथीदारांनीं या चळवळींतून आपलें अंग काढून घेण्याचा निश्चय कायम केला. डिसेंबर महिन्यांत एके दिवशीं त्यांनीं सर्व सैनिकांस उद्देशून एक जाहीर हुकूम काढला व त्यांत असें म्हटलें कीं, ' या चळवळीवरचा माझा विश्वास पूर्णपणें उडाला आहे. इतके दिवस हिंदी स्वातंत्र्यसेनेचा मुख्य अधिकारी या नात्यानें तुम्ही सर्वजण माझ्याशीं स्वामिनिष्ठ राहाल अशी जी तुम्ही शपथ घेतली होती, तींतून मी तुम्हां सर्वांस मुक्त करितों. यापुढें प्रत्येकानें स्वमतानुरूप आपआपला मार्ग धरावा अर्थात् यानंतर तुम्हाला आलेल्या कोणत्याही हुकमास मी जबाबदार राहाणार नाहीं. " नंतर मोहनसिंगांनीं श्री. रासबिहारी बोस यांस आपला लेखी राजीनामा सादर केला. कार्यकारी मंडळाच्या इतर कांहीं सभासदांनींही एकामागून एक असे राजिनामे दिले. त्याबरोबर जपान्यांनीं या सर्व लोकास स्थानबद्ध केलें. आणि लढाईच्या अखेरपर्यंत निदान मोहनसिंग तरी याच स्थितींत होते.

यापूर्वीं कांहीं दिवस हिंदी स्वातंत्र्य सैन्यांत दाखल होण्यासाठीं ज्या ज्या सैनिकांनीं नांवें दिलेलीं होतीं, त्यांना इतर युद्धबंद्यांपासून वेगळें काढण्यांत आलेलें होतें; व बिद्याधारी छावणी ही त्यांच्या वास्तव्याकरतां देण्यांत आलेली होती. मोहनसिंगांच्या व इतरांच्या राजिनाम्यामुळें प्रत्येक सैनिकानें मनास येईल तसें वागण्यास सुरुवात केली. उदाहरणार्थ, कागदपत्र अगर इतर सामानाची लुटालूट, जाळपोळ वगैरे प्रकार झाले. कोणी खाकी वेष बदलून नागरीक म्हणून शहरांत जाऊन राहूं लागले, इतर कांहीं पूर्वयुद्धबंद्यांत सामील झाले. व बाकीचे हतबुद्ध होऊन ' किंकर्तव्यतामूढ ' होऊन तेथेंच राहिले.

श्री. रासबिहारी बोस यांना जरी जपान्यांचा अत्यंत राग आला होता, तरी त्यांनीं मुत्सद्दीगिरीनें तो आंतल्या आंत गिळून, या मोडकळीस आलेल्या चळवळीची धुरा आपल्या खांद्यावरून दूर सारली नाहीं. या घटनेपूर्वीं दोन-चार महिने म्हणजे सप्टेंबर १९४२ च्या सुमारास लेफ्टनंट कर्नल भोसले हे या स्वातंत्र्यचळवळीस मिळाले होते. या कामीं त्यांस प्रवृत्त करण्याचें श्रेय बहुतांशीं धुळ्याचे डॉ. पळशीकर व पुण्याचे पोस्टमास्तर गोरे यांस आहे, असें कर्नल भोसल्यानीं कृतज्ञतापूर्वक बरेच प्रसंगीं उद्‌गार काढले आहेत. मलायांतील सर्व हिंदी फौजी अधिकाऱ्यांत लेफ्टनंट कर्नल भोसले, हेच हुद्यानें सर्वांत वरिष्ठ होते. श्री. रासबिहारी बोस यांनीं हिंदी स्वातंत्र्यसेनेचें धुरीणत्व स्वतःकडे घेण्याची त्यांस विनंति केली. ती त्यांनीं मोठ्या आनंदानें मान्य करून

१९४३ च्या फेब्रुवारी महिन्यांत, पुनश्च या सेनेची जुळवाजुळव करण्याचें कार्य स्वीकारलें. नंतर १० फेब्रुवारी १९४३ रोजीं झालेल्या सर्व फौजी अधिकाऱ्यांच्या एका खास बैठकींत लेफ्टनंट कर्नल भोसले हे D. M. B. म्हणजे 'डायरेक्टर ऑफ मिलिटरी ब्यूरो' झाल्याचें जाहीर झालें. कॅप्टन मोहनसिंग हे प्रथम कैद झालेल्या लोकांपैकीं असल्यानें, 'नंतर नंतरची सर्व मंडळी जरी श्रेष्ठ हुद्याची असली, तरी त्या सर्वांचें धुरीणत्व आपल्याकडेच आहे; अर्थात् कार्यकारी मंडळास आपण जबाबदार नसून, त्यांनींच आपल्या सल्ल्यानें काम केलें पाहिजे;' अशा भावनेनें 'निदान फौजी बाबतींत तरी कार्यकारी मंडळानें ढवळाढवळ करूं नये' असा पायंडा त्यांनीं घातला होता. तो बदलून या सभेंत असें स्पष्ट करण्यांत आलें कीं, 'हिंदी स्वातंत्र्य-सैन्य हें सर्वस्वीं कार्यकारी मंडळास जबाबदार राहील, व सैन्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यानेंही मंडळाचेंच धोरण अमलांत आणलें पाहिजे. 'श्री. सुभाषचंद्र बोस यांना जर्मनींतून इकडे आणविण्याचे प्रयत्न चालू आहेत' ही आनंदाची बातमीही त्या वेळेस सांगण्यांत येऊन अशीही सर्वांस विनंति केली गेली कीं, निदान तोंवर सर्वांनीं एकमतानें राहावें आणि ते येऊन दाखल झाल्यावरच त्यांच्या सल्ल्यानें वाटल्यास या प्रथेंत बदल व्हावा.'

लेफ्टनंट कर्नल भोसले यांनीं मोठ्या धैर्यानें, मुत्सद्दीगिरीनें आणि धोरणानें आपला मार्ग आखून हिंदी स्वातंत्र्य–सैन्याची पुनरपि जुळवणी केली. त्यांचे व श्री. रासबिहारी बोस यांचे संबंध अखेरपर्यंत फार चांगले राहिले. हिंदी स्वातंत्र्य-सेनेची पुन्हां जुळवणी केल्याबद्दल श्री. रासबिहारी बोस यांनीं, कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष या नात्यानें लेफ्टनंट कर्नल भोसले यांस पत्र पाठवून कृतज्ञता व्यक्त केली व त्यांचा गौरव केला. श्री. रासबिहारी व जगन्नाथराव भोसले यांचे बंगले माउंट रोझीवर शेजारी शेजारींच होते. व थॉमसनरोडवर हिंदी स्वातंत्र्य-सैन्याची मध्यवर्ती कचेरी होती.

या वेळेपर्यंत हिंदी स्वातंत्र्य-सेनेला व्यवस्थित आणि इतर युद्धबंदांपासून पूर्ण निराळें असें स्वरूप नव्हतें. तें देण्यास मुख्यतः ले. कर्नल भोसले हे कारणीभूत झाले. त्यांनीं जपानी अधिकाऱ्यांवर सुद्धां आपलें उत्तम वजन बसविलें व श्री. रासबिहारी बोस यांच्याही विश्वासास ते पात्र झाले. हिंदी स्वातंत्र्य-सेनेचे शिपाई व अधिकारी यांच्यामध्यें पूर्ण सलोखा व एकसूत्रता त्यांनीं निर्माण केली. श्री. सुभाषचंद्र बोस हे तिकडील प्रदेशांत येईपर्यंत, कोणत्याही बाबतींत ढवळाढवळ न करण्याबद्दल त्यांनीं जपानी अधिकाऱ्यांस निक्षून सांगितलें. अशा रीतीनें २ जुलै १९४३ पर्यंत (म्हणजे नेताजींच्या आगमनापर्यंत) हिंदी स्वातंत्र्य-सेनेचा कारभार त्यांनीं पाहिला.

---

## माझें सायगांवला प्रयाण : ११

पूर्वीं उल्लेख केल्याप्रमाणें २१ जून १९४२ रोजीं, सकाळीं ९॥ वाजतां कॅप्टन मोहनसिंगांनीं निवडल्यामुळें मी व दुसऱ्या एका छावणींतील ' इकबाल ' नांवाचा पंजाबी असे दोघे आम्हांस न्यावयास आलेल्या शीख आणि जपानी अधिकाऱ्यांबरोबर, त्यांच्या मोटारींतून बोटीच्या धक्क्याकडे निघालों. धक्क्याच्या सुमारें एक मैल अलीकडे, त्यांची एक कचेरी होती. तेथें मोटार थांबवून आमच्या बरोबरच्या जपान्यानें आंत जाऊन आम्हां दोघांकरतां पासपोर्ट वगैरे तयार करून घेतले या कामास सुमारें अर्धा तास लागला. नंतर आमची मोटार थेट बोटीशी जाऊन उभी राहिली. आमची बोट म्हणजे ' मिकेमारू ' नांवाचें १२००० टनी जपानी जहाज होतें. या बोटीला एकंदर पांच मजले होते. परंतु एवढ्या मोठ्या जहाजावर काम करण्याकरतां सर्व मिळून सुमारें २०० च माणसें होतीं. त्यामुळें इतर बोटींवरील प्रवासाच्या तुलनेनें या जहाजावर आम्हास ऐसपैस व मोकळें मोकळें वाटत होतें. दोन जिने चढून वर गेल्यावर खुर्च्या वगैर ठेवलेली अशी एक बैठकीची खोली होती. तेथें आम्हांस बसवून तो जपानी अधिकारी पुढें बोटीच्या कप्तानाचा शोध करावयास गेला. थोड्याच वेळानें कप्तानाबरोबर तो परत आला. हा कप्तान आनंदी चेहऱ्याचा एक लहानसा तरूण दिसला. कुलीन, घरंदाज घराण्यांत त्याचा जन्म झाला असल्यामुळें त्याच्या चेहऱ्यावर तेज विलसत होतें. त्याच्या हुद्याच्या निदर्शक अशा सोनेरी फिती खांद्यावर लावलेल्या होत्या. शुभ्र कोट व पँट असा त्याचा पोशाख होता. आमच्याबरोबरच्या जपानी अधिकाऱ्यानें त्याची व आमची ओळख करून देतांच त्यानें जपानी अभिवादन पद्धतीनें मान वांकवून, आमच्याशीं सस्मित हस्तांदोलन केलें. नंतर आपल्या हाताखालील एका अधिकाऱ्यास बोलावून आम्हांस खालच्या मजल्यावरील आमची खोली दाखविण्यास सांगितलें. कप्तानास मोडकें तोडके इंग्रजी येत असल्यामुळें आम्हांस त्या बोटीवर कोणत्याही प्रकारची अडचण भासली नाहीं. इतकें झाल्यावर आमच्या बरोबर आलेले शीख आणि जपानी अधिकारी, आमचा निरोप घेऊन परत गेले. आम्ही आमची खोली पाहावयास, त्या दुय्यम अधिकाऱ्याचे मागोमाग खालील मजल्यावर गेलों. आमच्या खोलीचा नंबर ६ होता. सुमारें ६×६ फुटाची ती खोली होती. परंतु मुंबईच्या चाळींतून लहानशा जागेंत ज्याप्रमाणें सर्व सुखसोई असतात, तशा तेथें केलेल्या होत्या. दारांतून समोर गेल्याबरोबर एक ड्रेसिंग टेबल, उजव्या हातास एक पक्कें बसवलेलें

बांक, व डाव्या हातास एकावर एक अशीं पक्या गाद्या असलेलीं दोन शयनीयें होतीं. जहाज सुमारें एक वाजतां दुपारीं चालूं झालें.

आम्हीं भोजनाच्या वेळेच्या अगोदर छावणींतून निघून, जेवणाची वेळ झाल्यावर बोटींत येऊन पोहोंचल्यामुळें, आम्हांला सपाटून भूक लागली होती. परंतु याची तेथील लोकांस कल्पना नसल्यामुळें, या बाबतींत आमची कोणी विचारपूस केली नाहीं. जहाज एवढें अवाढव्य होतें कीं, आम्ही कोणत्या भागांत कितव्या मजल्यावर आहोंत हेंही कळण्यास मार्ग नव्हता. भाषेच्या अडचणीमुळें कॅप्टन कोठें असेल तें विचारतां येईना. जपानी अधिकाऱ्यांस अर्धवट कां होईना इंग्रजी येत असतें. परंतु आमच्या भोंवतीं सर्व साधे शिपाईच दिसले. शेवटीं आमच्या शेजारच्या खोलींत बरेच जपानी शिपाई होते त्यांच्याशीं कांहीं तरी निमित्तानें ओळख करून घेण्याचा व बोलण्याचा प्रयत्न केला. परंतु बराच वेळ ते काय बोलत होते, हें आम्हांस समजेना व आम्हीं काय सांगत होतों, हें त्यांस समजेना. कुतुहलानें त्या खोलींतील सर्वच जपानी शिपाई आमच्या भोंवतीं जमा झाले. जपानी शिपाई रणांगणावर जितके कडवे अगर क्रूर भासतात, तितकेच सामान्य नागरीक अगर मित्र या नात्यानें प्रेमळ व आदरातिथ्य करणारे असतात. आमच्या भाषणांत व खाणाखुणांत केव्हां मलायी, केव्हां इंग्रजी, असे शब्द योजून आम्ही आमचा भाव व्यक्त करण्याचा प्रयत्न केला. परंतु बराच वेळ एक उद्देश व तिसराच समज अशा प्रकारें उभयतांच्या मनांत घोटाळेच उत्पन्न झाले. शेवटीं त्यांपैकीं एकानें कांहींतरी कल्पनेनें उठून आपल्या पिशवींतून सांबणाच्या बाराच्या आकाराची एक ब्रेड आणून आम्हांस दिली. ती हातांत पडल्यावर थोडा वेळ तेथें थांबून आम्ही आमच्या खोलींत परत आलों आणि इकबाल बरोबर असलेला साखरेचा पुडा फोडून तिच्याशीं अर्धी अर्धी ती ब्रेड आम्ही दोघांनीं खाली. ती बरीच मोठी असल्यामुळें आमची भूक भरपूर भागली. नंतर दुपारभर झोंप काढून आम्ही सायंकाळीं ६ वाजतां पोषाख करून, बोटीच्या गच्चांवर फिरण्यासाठीं जावयास निघणार इतक्यांत, दुपारीं परिचित झालेल्या जपानी शिपायांपैकीं एकजण आम्हास भोजनाचें आमंत्रण देण्यास आला.

जेवावयास बटाटच्याची रसदार भाजी, भात, माशाची आमटी व ब्रेड हे प्रकार होते. अर्थात् कोणत्याहि अडचणीच्या प्रसंगींदेखील मी माशाची आमटी वगैरे पदार्थ केव्हांच खाल्ले नाहींत, हा भाग वेगळा. प्रत्येक पदार्थ एका चिनी-मातीच्या वाडग्यामध्यें ठेवलेला असे. अशा रीतीनें टेबलावर प्रत्येकाच्या खुर्ची-समोर, वरील चार पदार्थांनीं भरलेलीं वाडगीं व जेवणासाठीं दोन लांबलचक काड्या ( ज्यास इंग्रजींत चॉप स्टिक्स व जपानी भाषेंत ‘ हाशी ’ म्हणतात ) असत. काड्यांनीं खाणें आम्हांस मुळींच जमणार नाहीं अशी खात्री असल्या-मुळें आम्हीं हातांनींच जेवावयास प्रारंभ केला. भात खाऊन सुद्धां जपानी

लोकांची प्रकृति सुदृढ असण्याचें एक कारण असें कीं, आपल्याप्रमाणें गिरणींत दोन-चारदां साफ केलेला (पॉलिश्ड) अगर तकाकणारा तांदूळ ते खात नसून घरीं कांडलेल्या लालसर व कसदार तांदुळाचाच भात खाण्याचा त्यांचा नेहमींचा प्रघात आहे. शिवाय शिजविलेल्या तांदुळाची पेज ते कधींही काढीत नाहींत. त्यामुळें त्यांच्या भातास दिखाऊपणा नसला, तरी तो अत्यंत चविष्ट व कसदार असतो. सर्व साधारण जपानी लोकांच्या जेवणांत दूधदुभतें, डाळी व कणीक यांचा समावेश नसतो. असें असतांनाही त्यांच्या निरोगी व सशक्त प्रकृतीचें एकमेव कारण म्हणजे वरील भात होय. आपल्याकडील केवळ भातखाऊ बिहारी, बंगाली, अथवा मद्रासी लोक अगर मिश्र खाद्य खाणारे आपण, या गोष्टीकडे पूर्ण दुर्लक्ष करतों आणि पिढ्यानु-पिढ्या आपली शारीरिक हानी करून घेतों. तरी या बाबीकडे स्वतंत्र सरकारनें जास्त लक्ष देणें आवश्यक आहे.

या जपानी शिपायांशीं दोन दिवस निकट संबंध आल्यामुळें, त्यांची दिनचर्या काय असते, याची आम्हांस बरीचशी कल्पना आली. सकाळीं साडे-पांचला उठून शौचमुखमार्जन करून ते बोटीच्या गच्चीवर, आपल्या दुय्यम अधिकाऱ्याच्या देखरेखीखालीं मोकळ्या हवेंत व्यायाम करतात. व्यायाम करितांना त्यांचे अंगावर केवळ एका चड्डीशिवाय कोणतेंही वस्त्र नसतें. जपानी फौजी नियमाप्रमाणें, फौजेंतील कोणासही डोक्यावर केस वाढविण्याची परवानगी नसते. यामुळें केसांची जोपासना करण्यासाठीं लागणारा त्यांचा वेळ वांचतो, आणि कशाही परिस्थितींत स्वच्छता राखण्यास मदत होते. पाणी विपुल अस-ल्यास, इंग्रजी पद्धतीप्रमाणें टबमध्यें बसून ते स्नान करतात. अगर तशी स्थिति नसल्यास, प्रत्येक शिपायाजवळ असलेल्या गळपट्टेवजा (पाण्यांत भिजविलेल्या) फडक्यानें ते आपलें सर्व अंग पुसून काढतात. उघड्या मैदानावरील मुख्य परेडशिवाय इतर कोणत्याही कार्याचे वेळीं बोटीवर अगर इतरत्र, जपानी शिपाई नग्न स्थितींत अगर एखादी लंगोटी लावून आपलें काम करीत असल्यास, त्यास कोणीही हरकत घेत नाहीं. अशी स्थिति इंग्रजांच्या अगर त्यांच्या हातांखालील सैन्यांत नसल्यामुळें शिपायांचीं शरीरें उबून निरनिराळ्या रोगांचा त्यांच्यांत प्रादुर्भाव होतो. अर्थात् काम करितांना औपचारिक बाबतींकडे दुर्लक्ष करण्याचा जपान्यांचा गुण घेण्यासारखा आहे.

व्यायाम झाल्यावर सकाळीं सात वाजतां त्यांचें जेवण असतें. तें आटो-पल्यावर प्रत्येकजण आपणास नेमून दिलेल्या कामास लागतो. सुमारें बारा वाजतां, अपघात झाल्यास 'लाइफबेल्ट' घालून कसें तयार राहावें याची तालीम बोटी-वर होत असते. त्या वेळीं बोटीवरील प्रत्येकास हजर राहावें लागतें. यानंतर साडे-बाराच्या सुमारास दुपारचें जेवण होतें. नंतर एक तास विश्रांति घेऊन सर्वजण आपापलें काम सुरू करतात. संध्याकाळचें जेवण सूर्यास्तापूर्वीं साडेपांच

अगर सहाचे सुमारास होतें. बोटीवर भोजनालयाच्या बाहेर ( म्हणजे वरून नंबर दोनच्या गच्चीवर ) विजेच्या साहाय्यानें सतत उकळत्या ठेवलेल्या पाण्याचें एक टब असे. त्यांत स्वयंपाकाचीं भांडीं चिनी मातीच्या जेवलेल्या कपबशा वगैरे साफ करीत असत. या योजनेमुळें भांडीं स्वच्छ करण्याचें काम चटकन् आणि शास्त्रोक्त होत असे. अशा रीतीनें, तीन वेळां जेवण, व दोन वेळां ( म्हणजे दुपारीं व रात्रीं ) झोंप घेत दोन दिवस आणि दोन रात्री काढून २३ जून १९४२ रोजीं दुपारीं दोन वाजतां आम्ही सायगांवला पोचलों. सायगांव हें बंदर अगदीं समुद्रकाठीं नसल्यामुळें समुद्रांतून मेकाँग नदीच्या मुखांतून बरेंच आंत जावें लागतें. हें बंदर यावयाच्या अगोदर ' शोलोन ' या गजबजलेल्या व व्यापारी गांवांतील एकाला एक लागलेलीं घरें, व तांदुळाच्या गिरण्यांचे भोंगे वगैरे दिसतात. इंडोचायनांत तांदुळाचें उत्पादन, जगांतील इतर कोणत्याही भागांपेक्षां जास्त होत असल्यामुळें, शोलोन (Cholon शोलोन) या बंदरांतून तांदुळाची निर्यात फार मोठ्या प्रमाणावर होते. म्हणून बाहेर जाणारा तांदूळ साफसूफ करण्यासाठीं येथें बऱ्याच गिरण्या आहेत. शोलोनला लागूनच ' सायगांव ' हें टुमदार आणि छानछोकी शहर आहे. एकाच शहराचे ( शोलोन हा एक व्यापारी गजबजलेला व दुसरा सायगांव हा शांत व सुखसोई असणारा ) हे दोन भाग आहेत असें म्हटल्यास चालेल.

सायगांव बंदरावर पोचतांच, दोन दिवस आम्हांस मुळींच न दिसलेला त्या बोटीचा मुख्य कप्तान आमच्याकडे आला व त्यानें आम्हांस म्हटलें, " तुम्ही थोडा वेळ येथें थांबा. मी समोरील कचेरींत जाऊन टेलिफोन करतों; म्हणजे तुमच्यासाठीं येथें मोटार येईल. " यानंतर २-३ तास वाट पाहिल्यावर हिरवा गार पोषाख चढविलेला आणि कमरेस तरवार लटकाविलेला ' लेफ्टनंट नागाव ' हा जपानी फौजी अधिकारी बोटीवर येऊन आम्हास भेटला. आम्हांस नेण्यासाठींच तो आला होता. येथें विशेष गोष्ट सांगावीशी वाटते ती ही कीं, जपानी अधिकारी बोटीवरून उतरतांना आपापलें सामान पाठीवर अगर हातांत घेऊन उतरतात. त्यांना तसें करतांना कोणतीच लाज वाटत नाहीं. या कामासाठीं त्यांच्या दिमतीस एकही शिपाई दिलेला नसतो. या उलट इंग्रजांच्या हाताखालील फौजेंत सर्व अधिकाऱ्यांच्या दिमतीस, त्यांच्या त्यांच्या हुद्याप्रमाणें एक एक, दोन दोन, शिपाई दिलेले असतात. या शिपायांचें मुख्य काम साहेबाच्या तैनातीला दिवसभर हजर राहून, त्याचें सामान व्यवस्थित ठेवणें, जोड्यास पॉलिश करणें, सिगारेटस् वगैरे वस्तु आणणें, अगर आंथरूण तयार करणें हें असतें. इंग्रजांच्या फौजेंत ही पद्धत रूढ होण्यास आफ्रिकन, हिंदुस्थानी, वगैरे एशियाटिक लोक विपुल संख्येनें गुलाम करण्यास मिळाले, हेंही कारण असूं शकेल. सायगांवच्या धक्क्यास बोट लागत असतांना प्रथमच आम्हांस जपान्यांचे युद्धबंदी असलेले बरेच गोरे लोक हमाली

करीत असलेले दिसले. बोटीवरून अवजड सामान काढणें, तें धक्क्यावर रचणें अथवा मोटारलॉऱ्यांत भरणें इत्यादि कामें त्यांच्याकडून करून घेतलीं जात होतीं. हीन परिस्थितीमुळें व कांहींशा जपान्यांच्या उदाहरणामुळें त्यांच्या अंगावरही चड्डीशिवाय इतर वस्त्र नव्हतें. साडेतीन वर्षांच्या युद्धकालांत, गोऱ्या युद्धबंद्यांच्या तुकड्या, दूरपूर्वेतील सर्व प्रदेशांत ठिकठिकाणीं अशा रीतीनें काम करीत असलेल्या दिसत. एशियाटिक लोकांची हमाली तुम्हास करावी लागेल, असें कोणा गोऱ्या इसमास एखाद्या ज्योतिषानें पूर्वी सांगितलें असतें, तर त्यावर त्याचा विश्वास बसला असता किंवा नाहीं याबद्दल शंकाच आहे. परंतु ही गोष्ट प्रत्यक्ष घडलेली आहे. त्यामुळें युरोपियनांची अरेरावी व त्यांच्या गर्वाचें घर खालीं होत चाललें आहेच. आणि त्याबरोबर एशियाटिक लोकांच्या 'न्यूनगंडास' फाटा मिळत आहे.

लेफ्टनंट नागाव याच्याबरोबर मोटारींतून आम्ही उभयतां निघालों, ते सायगांवच्या हमरस्त्यावरील एका सिमेंट काँक्रीटच्या तीन मजली भव्य इमारतीजवळ उतरलों. तेथें लिफ्टमध्यें बसून आम्ही तिघेही त्या इमारतीच्या अगदीं वरच्या मजल्यावर पोचलों. तेथें एका मोठ्या हॉलमध्यें बरींच टेबलें, टाइप रायटर इत्यादि सामान असून, तेथें कांहीं जपानी अधिकारी व हिंदी स्वातंत्र्य-सैन्याचे चार अधिकारी काम करीत असतांना आम्हांस आढळले. सायगांव रेडिओवरून हिंदी स्वातंत्र्य-चळवळीचा प्रचार ६ फेब्रुवारी १९४२ पासूनच चालू झालेला होता. प्रथम या सेनेच्या एका अधिकाऱ्यानेंच सुरुवात केली. परंतु मागून सिंगापुराहून आणखी तीन अधिकारी आले होते. म्हणजे आम्ही दोघे जाण्यापूर्वीं तेथें चार हिंदी लोक हें प्रचाराचें कार्य करीत असत. आम्ही तेथें गेल्याबरोबर आमची प्रथम सर्वांशीं ओळख करून देण्यांत आली. तेथें अर्धा पाऊण तास थांबल्यावर सायंकाळीं सहाच्या सुमारास, आम्ही सर्व हिंदी लोक व लेफ्टनंट नागाव असे आमच्या निवासस्थानीं आलों. नंबर १७ (Rue Frere Louis) ऱ्यू फ्रेअर लुई—ऱ्यू म्हणजे रस्ता अर्थात् फ्रेअर लुइ रस्त्यावरील १७ नंबरचा दुमजली बंगला—हें आमचें निवासस्थान होतें.

फ्रान्सच्या पाडावाबरोबर (जून १९४०) जपानी लोक इंडोचायनांत घुसले होते, हें पूर्वीं विदित केलेंच आहे. त्यानंतर ८ डिसेंबर १९४१ रोजीं म्हणजे जपान्यांनीं इंग्लंड-अमेरिकेशीं युद्ध पुकारल्याबरोबर, इंडोचायनामधील सर्व इंग्रज व अमेरिकन लोकांस, त्याचप्रमाणें आपल्याविरुद्ध असलेल्या सर्व फ्रेंच अधिकाऱ्यांस त्यांनीं कैद करून स्थानबद्ध केलें. अशा रीतीनें त्यांचे मोकळे झालेले बंगले व इतर इमारती जपान्यांनीं आपल्याकडे घेतल्या होत्या, त्यांपैकींच हा एक बंगला होता. या बंगल्यापासून सुमारें एका फर्लांगावर असलेल्या दुसऱ्या बंगल्यांत लेफ्टनंट नागाव व त्याचे सहकारी राहात असत. आमच्या बंगल्यांत आम्ही खालीं तिघे व वर तिघे असे राहात असूं. हे बंगले

फ्रेंच पद्धतीनें बांधलेले होते. त्यांच्या खिडक्या प्रशस्त असून त्यांस गज वगैरे कांहीं नव्हतें. आमच्या बंगल्याभोंवतीं एक मोठें आवार होतें; त्याच्या दोन बाजूंस भिंती व इतर दोन बाजूंस खांब व कांटेरी तारांचें कुंपण होतें; बंगल्याच्या मागल्या बाजूस एकंदर तीन खोल्या आणि एक गॅरेज होतें. त्यांपैकीं एक स्वयंपाकघर, एक कोठार व तिसरी खोली आमच्या मोटार ड्रायव्हरास राहण्याकरतां होती. स्वयंपाकघरास लागूनच एक सीमेंट काँक्रीटचा हौद व नळ होता. स्वयंपाक करावयास एक तामीळ मुसलमान बबर्जी होता. आमचा ड्रायव्हर अन्नामी होता. त्याचें नांव 'नंग' म्हणजे 'पांच' होतें. (क्रमांक पांचचा तो भाऊ; अर्थात् प्रत्येकाच्या क्रमांकाप्रमाणें त्यांचीं नांवें असत) त्याचीच पत्नी आमचीं धुणीं, भांडीं, केर वगैरे करीत असे.

रेडिओ स्टेशनवर जाण्याच्या आधींची पूर्वतयारी म्हणजे लेखन वगैरे सर्व काम, आम्ही आमच्या बंगल्यांतील पहिल्या मजल्यावर असलेल्या एका खोलींत करीत असूं. तेथें टेबल, खुर्च्या, टाइपरायटर, वगैरे कचेरीस जरूर तें सामान होतें. बंगल्यांत शिरतांच असलेल्या हॉलमध्यें आमचें जेवावयाचें टेबल होतें. फर्लांगावरील बंगल्यांतील जपानी अधिकारी 'नागाव' व त्यांचे सहकारी आमच्या बरोबर जेवावयास आमच्या बंगल्यांत येत असत. आमच्या सहवासानें त्यांस हिंदुस्थानी जेवणाची गोडी लागली. आमच्यांत कोणी कांड्यांनीं, कोणी काट्या चमच्यांनीं व कोणी हातांनीं जेवत असत. त्याच खोलींत कोपऱ्यांत एका लहानशा टेबलावर रेडिओ ठेवलेला असे. तो रेडिओ सकाळीं उठल्यापासून रात्रीं निजेपर्यंत चालत ठेवून आमच्यांतील सर्वजण आळीपाळीनें जगांतील निरनिराळ्या नभोवाणी केंद्रावरील प्रचार, बातम्या वगैरे कार्यक्रम ऐकून, त्याचें टांचण करीत असूं. त्यांत आमच्या बाजूंचीं केंद्रें म्हणजे सिंगापूर, बँकॉक, शांघाय, टोकिओ, बर्लिन, रोम व (हिंदुस्थानांत गुप्तपणें काम करीत असलेलीं) काँग्रेस व वझिरीस्थान अशीं होतीं. हीं आमच्या ध्येयाशीं एकरूप असल्यानें यांच्या प्रचारांतील परिणामकारक मुद्यांचा आम्ही उपयोग करीत असूं; त्याचप्रमाणें लंडन, मास्को, सॅनफ्रॉन्सिस्को व दिल्ली इत्यादि विरुद्ध बाजूच्या केन्द्रांचे कार्यक्रमही, त्यांचें योग्य तें खंडन करण्याच्या हेतूनें आम्ही लक्षपूर्वक ऐकत असूं. 'रेडिओचें प्रचारतंत्र' यावर स्वतंत्र ग्रंथ लिहितां येईल. तें तूर्तचें कार्य नव्हे. म्हणून त्या भानगडींत न पडतां, थोडक्यांत आमची कार्यपद्धति निवेदन करण्याचें मी ठरविलें आहे. दिल्ली नभोवाणी केन्द्रावरून पाठविलेले युद्धबंद्यांच्या घरचे संदेश उतरून घेऊन ते त्या त्या व्यक्तीकडे पाठविण्याची व्यवस्था आम्ही करीत होतों. सायगांव स्थानिक वेळेप्रमाणें आमचा हिंदी स्वातंत्र्य-चळवळीचा कार्यक्रम रात्रीं ९॥ तें १०॥ व हिंदुस्थानी वेळेप्रमाणें रात्रीं ८ ते ९ असे. रेडिओ स्टेशन सायगांव गांवांतच, परंतु आमच्या राहत्या बंगल्यापासून सुमारें तीन मैल दूर

होतें. तेथील रेडिओ स्टेशन फ्रेंच असल्यामुळें, त्याच्या एक तासाच्या उपयोगासाठीं आम्ही त्यांना योग्य तो मोबदला देत होतों. घरून रात्रीं ९। ला मोटारीनें निघून, कार्यक्रमापूर्वीं पंधरा मिनिटें आम्ही तेथें पोहोंचत असूं. ९॥ वाजल्याबरोबर प्रथम वंदेमातरम्ची रेकॉर्ड लावून ती संपल्यानंतर ' हें स्वतंत्र भारत सायगांव रेडिओ-स्टेशन आहे. येथून रोज रात्रीं हिंदुस्थानी वेळेनुसार ८ ते ९ पर्यंत तुम्हांला आमचा कार्यक्रम २५ व ३१ मीटर्सवर ऐकूं येईल.... ' अशा तऱ्हेची सुरुवातीची घोषणा करून आम्ही पुढील कार्यास सुरुवात करीत असूं. इंग्रजी, हिंदी आणि पंजाबी या प्रत्येक भाषेंतील कार्यक्रम पंधरा पंधरा मिनिटें याप्रमाणें पाऊण तासांत वांटलेला असे. व राहिलेलीं पंधरा मिनिटें आळीपाळीनें मराठी, तामीळ व गुरखाली या भाषांसाठीं राखून ठेवलेलीं असत. प्रत्येक भाषेंतील कार्यक्रमांतून सुरुवातीची घोषणा सारखीच होत असे. पहिली तीन मिनिटें रेकॉर्ड व घोषणा यांत खर्च झाल्यावर, सात मिनिटें आम्हांस अनुकूल व शत्रूंस प्रतिकूल, अशी लढाईची व इतर बातमी देण्यांत येई. उरलेलीं पांच मिनिटें आम्ही आमच्या कार्याच्या समर्थनाकरतां अगर शत्रूंचा प्रचार खोडून टाकण्याकरतां उपयोगांत आणीत होतों. इंग्रजी व हिंदी कार्यक्रमास चार, पंजाबीस तीन, गुरखाली व तामीळ भाषेस दोन दोन व मराठीसाठीं मी अशीं माणसें नेमलेलीं असत. इंग्रजी आणि हिंदी कार्यक्रमांतही माझा प्रमुख भाग असे व इतर तिघे असत. कोणत्यातरी चालू महत्त्वाच्या विषयावर आमचें भाषण आधारलेलें असे व तें दिवसा वरीं लिहून ठेवावें लागे. म्हणजे तें ऑफिसांतून टाईप होऊन आमच्या हातीं सहाच्या सुमारास पडत असे. त्याच्याबरोबर निरनिराळ्या कागदावर टाईप केलेल्या बातम्या जपानी सरकाराच्या बातमी खात्यांतर्फे आमच्याकडे घोषणेसाठीं पाठविल्या जात. जगांतील सर्व राष्ट्रांत असलेले त्यांचे प्रतिनिधी अगर बातमीदार यांच्याकडून निरनिराळ्या साधनांनीं ( रेडिओ, टेलिग्राफ, वायरलेस वगैरे ) दिवसरात्र येत असलेल्या वार्तांची छाननी व जुळवाजुळव करून, त्यांतील महत्त्वाच्या वार्ता आमच्याकडे पाठविल्या जात. त्या सर्व बातम्या सांगण्यास रोजच्या कार्यक्रमांतील सात मिनिटें अगदींच अपुरीं पडत. त्यामुळें त्यांतील, आमच्या धोरणास अनुरूप, तेवढ्याच आम्ही घेत असूं भाषण दिवसांतून केव्हांही लिहून तयार करितां येत असे. परंतु सुरुवातीची घोषणा आणि बातमी देण्याची पाळी ज्याच्यावर असे, त्यास मात्र सरकारी बातम्या सायंकाळीं ५ च्या सुमारास आल्यावर, त्यांचें आपापल्या भाषांत रूपांतर करावें लागे. भाषण करणाऱ्यास अर्थातच जास्त वेळ मिळे म्हणून तो गांवांतील भेटीगांठी व रेडिओंतील युद्धबंद्यांचे संदेश आणि इतर कार्यक्रम ऐकून जरूर ती नोंद करून ठेवी. शिवाय हिंदुस्थानांत जप्त झालेलीं, परंतु देशभक्तीनें भरलेलीं अशीं पुष्कळ पुस्तकें आम्ही

त्या भागांत जमविलीं होतीं. तीं फावल्या वेळीं वाचून, त्यांतील मजकुराचाही आमच्या कार्यक्रमांत आम्ही उपयोग करीत असूं.

मी सायगांवला पोहोंचल्यावर सुमारें दोन महिन्यांनीं इंद्रसिंग नांवाचा एक पंजाबी गृहस्थ आम्हांला मदतनीस म्हणून आला. आणि ऑक्टोबर १९४२ मध्यें दोघे गुरखे आले. तेव्हांपासूनच गुरखालीमध्यें कार्यक्रम सुरू झाला. त्यांपैकीं एकाचें नांव खडकजंग बहादूर व दुसऱ्याचें नांव राणा होतें. सायगावांत स्वातंत्र्य चळवळीच्या कार्याशीं प्रत्यक्ष संबंध असलेले असे आम्ही सर्व मिळून आठ जण तेथें होतों. सायगांव गांवांत सिंधी कापडाचे व्यापारी, शीख दारवान ( दरवाज्यावरील पहारेकरी ) व तामिळी सावकार असे मुख्यतः तीन प्रकार हिंदी जनतेंत आहेत. तेथील हिंदी लोकसंख्या सुमारें चार हजार आहे. वर सांगितलेल्या तीन वर्गांचे लोक, हॅनॉय नांवाच्या सायगांवच्या उत्तरेस सुमारें ८०० मैलांवर असलेल्या इंडोचायनाच्या राजधानींतही आहेत. येथील कापडाच्या व्यापारामुळें सिंधी व सावकारीमुळें तामिळी फार श्रीमंत झालेले आहेत. कापडाचा व्यापार बहुतेक पूर्णतः सिंधी व्यापाऱ्यांच्याच हातीं आहे. सायगांवच्या गल्ल्याकुच्या वगैरे सुद्धां सर्व रस्ते सरळ, स्वच्छ, रुंद आणि डांबरी आहेत. आणि त्यांत अधून मधून बागबगीचे लाविलेले आहेत. तसेंच सर्व सुखसोई असलेले पोहण्याचे तलावही तेथें अनेक आहेत. पाश्चात्य पद्धतीचा नाच व जुगार यांची फ्रेंच लोकांस आवड असल्यामुळें यांचीही ठिकठिकाणीं व्यवस्था केलेली आहे. रात्रीं रस्त्यावर मधोमध आणि दोन्ही कडेला अशा झगझगीत दिव्यांच्या तीन रांगा आहेत. अशा रीतीनें स्वच्छता, सुखसोई व सौंदर्य इत्यादींचे चाहते असलेले फ्रेंच राज्यकर्ते जिंकलेल्या देशांतही या सुधारणा घडवून आणण्यांत कसर करीत नाहींत. हा त्यांच्यामध्यें इंग्रजापेक्षां विशेष गुण आहे. शिवाय ते रोजच्या सामाजिक जीवनांत वर्णभेदही मानीत नाहींत. सार्वजनिक हॉटेलमध्यें अगर क्लब वगैरेमध्यें कोणास मज्जाव अगर कोणाचा अपमान होत नाहीं. आम्हीं तेथें असतांना रोजचा नागरीक कारभार यथापूर्ण फ्रेंच अधिकारीच चालवीत असले तरी इतर सर्व बाबतींत जपानी सरकारचाच वरचढपणा ( ते इंडोचायनांत शिरल्यापासून ) असे. अर्थात् फ्रेंच अधिकाऱ्यांस नेहमीं जपान्यांपुढें नमतें घ्यावें लागे.

वरील जाणीव असल्यामुळें दोघांमध्यें कलह उत्पन्न होत नसे. परंतु एखाद्या वेळेस झालाच तर फ्रेंच शिपायासच हार खावी लागे. उभयतांमध्यें सलोख्याचा करार असल्यामुळें राजकीय धोरणाच्या आणि मुत्सद्देगिरीच्या दृष्टीनें वरवरच्या व लहान सहान गोष्टींत फ्रेंच लोकांशीं जपानी सहकार्यानें वागत. परंतु राष्ट्राच्या इभ्रतीचा अगर तसाच महत्त्वाचा प्रश्न आला तर ते फ्रेंच आधिकाऱ्यांवर दडपण आणण्यास कमी करीत नसत. एकदां सायगांव येथें असणाऱ्या जापानीज व्हाइस कॉन्सल 'सातो' यानें आम्हांस भोजनास निमंत्रण दिलें होतें. सरकारी रीतीनें उपहार अगर भोजन देण्यासाठीं पाहुण्यांच्या दर्जाप्रमाणें निरनिराळ्या राखीव

बंगल्यांत व्यवस्था केली जाते. अशांपैकीं एका बंगल्यांत भोजनासाठीं आम्ही सकाळीं अकरा वाजतां पोचलों. तेथें पूर्वींच आलेल्या श्री. सातोनीं खालीं येऊन स्मितपूर्वक आमच्याशीं हस्तांदोलन केलें; त्या वेळेस आमच्याबरोवर असलेल्या जपान्यांनीं त्यांना आमचीं नांवें सांगून ओळख करून दिली. नंतर आम्ही वर भोजनगृहांत गेलों. तेथें सबंध हॉलभर दोन फूट उंचीची लाकडी बैठक पक्की केलेली होती. फक्त दरवाज्याजवळची थोडीशी जागा जोड्यांसाठीं मोकळी होती. त्या बैठकीवर सतरंजी आंथरून तीवर शुभ्र चादर पसरलेली होती. त्यावर मधोमध चौरंगाच्या उंचीचें व दोन अडीच फूट रुंदीचें एक लांबलचक टेबल मांडलेलें होतें. त्यावर समोरासमोर सहा सहा व्यक्तींकरतां चिनी मातीचे वाडगे ठेवलेले होते. सतरंजीवर बसून या चौरंगावर आमचें जेवण झालें. श्री. सातो यांनीं जपानतर्फे राष्ट्रसंघाच्या ( League of Nations ) बैठकींत व समित्यांतून भाग घेतलेला होता. ते अत्यंत शांत, सात्विक, अनुभवी व हुषार असे गृहस्थ दिसले. वाढावयाला फ्रॉक घातलेल्या जपानी स्त्रिया होत्या. इंग्रजी पद्धतीप्रमाणेंच एक एक पदार्थ संपल्यावर तो वाडगा उचलून त्या जागीं दुसरा त्या आणीत असत. जेवणांत मुख्यत: एक दोन माशांचे तुकडे असलेलें उकळलेलें पाणी, भात, तळलेला मासा आणि चिरलेला कच्चा पाला इत्यादि नेहमींच्या जपानी जेवणांतील पदार्थ होते. प्रत्येकास जेवणासाठीं दोन दोन काड्या व शेवटीं हात पुसण्यास एक एक चौकोनी कागदी रुमाल ठेवलेला होता.

जेवतांना श्री. सातो यांनीं हिंदुस्थानाचें हवापाणी, तेथील लोक, चालीरिती, स्वातंत्र्य-चळवळ व आमचें कार्य इत्यादि विषयीं आस्थेनें इंग्रजी भाषेंत चौकशी केली. राष्ट्रसंघांत ते असल्यामुळें इंग्रजी भाषेवर त्यांचें प्रभुत्व होतें. बोलतांना त्यांनीं मला सहज विचारलें कीं, " हिंदुस्थानांत सकाळीं, दुपारीं, रात्रीं इत्यादि वेळीं एकमेकांस भेटतांना तुम्ही कसें अभिवादन करितां ? " कोणत्याही वेळीं आम्ही ' नमस्कार ' एवढेंच म्हणतों, असें सांगतांच त्यांना फार आश्चर्य वाटलें. कारण जपानमध्यें इंग्रजांप्रमाणेंच वेळेला आणि कार्याला अनुसरून अभिवादनाचे निरनिराळे प्रकार आहेत. त्यांनीं आश्चर्य प्रकट केल्यावर मी त्यांस म्हटलें, " इंग्लंड अगर जपान या देशांत कधीं बर्फ, कधीं धुकें, कधीं पाऊस, केव्हांतरी ऊन असे बदल हवेंत नेहमीं होत असल्यामुळें, अभिवादनाचे पुष्कळ प्रकार सुरू झाले आहेत. परंतु हिंदुस्थानाचें हवामान जवळजवळ नेहमींच चांगलें असल्यामुळें केवळ विनयदर्शक असा एकच अभिवादन प्रकार चालू आहे. " या उत्तरानें त्यांचें खरोखर समाधान झालें असें दिसलें.

अशा प्रकारें भोजन आटोपल्यावर उभयपक्षीं शिष्टाचार होऊन, आम्ही त्यांचा निरोप घेतला. आंतरराष्ट्रीय व्यवहाराच्या अशा सरकारी औपचारिक भोजनादि समारंभांत मोकळेपणानें अघळपघळ गप्पा मारणें इष्ट नसतें. कारण एक तर अशा प्रसंगीं एकत्र येणारी मंडळी महत्त्वाचें राष्ट्रकार्य करीत असल्या-

मुळें, त्यांचा दिवसाचा कार्यक्रम बांधलेला असतो; व राजकीय दृष्टीनें पाहिल्यास संभाळून मोजकेच शब्द बोलावे लागतात. नाहींतर राजकीय गोटांत संभाषणाचे निरनिराळे अर्थ होऊन, राष्ट्राच्या इभ्रतीस धक्का लागण्याचा, गुप्त बातमी फुटण्याचा, अगर इतर दूरगामी घोर परिणाम घडून येण्याचा संभव असतो.

आपला देश बरींच वर्षें परतंत्र राहिल्यामुळें, आपणास एतद्देशीय अगर आंतरराष्ट्रीय अशीं महत्त्वाचीं कार्यें करण्याची संधी मिळत नाहीं. म्हणून आपल्यापैकीं प्रत्येकजण बोलण्या-चालण्यांत अथवा वागणुकींत किती बेजबाबदारपणा दाखवितो, याची आपणास कल्पना नसते. म्हणूनच आपलें आयुष्य एकप्रकारें कमकुवत, नीरस आणि निःसत्व असें बनतें. याच्या उलट प्रत्येक स्वतंत्र राष्ट्राच्या नागरिकांत बाणेदारपणा, देशभक्ति, स्वदेशी वस्तूंची आवड व ज्ञान मिळवून देशकार्य करण्याची लालसा इत्यादि गुणांचें अस्तित्व असल्यामुळें, तो परतंत्र राष्ट्राच्या नागरिकापेक्षां फार उच्च पातळीवर उभा असतो.

'मयेकर' नांवाचे एक वृद्ध महाराष्ट्रीय गृहस्थ, सायगांव येथें चित्रपटांच्या देवघेवीचा व्यापार त्या प्रदेशांत करीत असत. त्यांच्या अनेक मित्रांपैकीं एका सिंधी व्यापाऱ्यानें माझा मराठी भाषेंतील रेडिओचा पहिला कार्यक्रम ऐकून, त्यांस कळविलें कीं, 'येथें कोणीतरी नवीन महाराष्ट्रीय गृहस्थ आले असावेत.' तेव्हां श्री. मयेकर हे माझा शोध करीत आमच्या निवासस्थानीं आले; तेव्हांपासुन त्यांची माझी ओळख झाली. ब्रम्हदेश, मलाया व जपान या व्यतिरिक्त, दूर-पूर्व-प्रदेशांत तेच एकटे महाराष्ट्रीयगृहस्थ होते. इतर प्रांतांतील लोकांपेक्षां, महाराष्ट्रीय व बंगाली हे परदेशांत कमी आढळतात. त्यांनीं ही कूपमंडूकवृत्ति सोडून आक्रमक स्वभाव आंगवळणीं पाडला पाहिजे.

एके दिवशीं रात्रीं आमच्या सायगांव रेडिओ स्टेशनवर, एक गमतीदार प्रकार घडला. भाषणापूर्वी दहा मिनिटें हजर राहावयाचें असें अगोदर ठरलें असूनही, तामिळी भाषण करणारा गृहस्थ उशीरां आला. तत्पूर्वीच्या घोषणा, बातम्या इत्यादि वाचणाऱ्यानें ठरल्याप्रमाणें लिहून आणलेला 'अमूक अमूक गृहस्थ आज तामीळमध्यें भाषण करतील' असा मजकूर वाचला. त्याच वेळीं अवतरलेला हा गृहस्थ आपण मायक्रोफोन जवळ आहोंत हें विसरून, 'अहो, मी घाईघाईत आज कांहींच लिहून आणलें नाहीं' असें बोलला. त्याबरोबर पहिलाही बेशुद्धींत असल्यासारखा 'नसेना कां, आयत्या वेळेस तोंडास येईल तें बोला.' असें म्हणाला. असलीं खाजगीं प्रश्नोत्तरें एखादे वेळेस चहूंकडे चुकीनें ऐकविलीं जात ! यापेक्षां निराळा घडलेला एक प्रकार येथें सांगावांसा वाटतो. आमच्या प्रचारांत एकदां 'मिलिटरी अकॅडमी डेहराडून' येथील तरुणांस उद्देशून 'तुम्ही पास होऊन अधिकारी बनल्यावर, आपल्या हाताखालील सैन्याचा इंग्रजांविरुद्ध उपयोग करा, व त्यासाठीं काँग्रेसमधील अगर इतर जहाल मतवाद्यांचें साहाय्य घ्या.' असें एकानें भाषण केलें होतें. हें ऐकून डेहराडूनच्या

शाळेंतील कोणातरी हिंदी विद्यार्थ्याच्या नांवानें, चुंकिंगमार्गे ब्रॉडकास्ट करणाऱ्याच्या टोपण नांवाचें एक पत्र आलें. त्यांतील मजकूर 'आपली अमुक दिवशींची सूचना ऐकून आम्हाला फार आनंद झाला. यासाठीं आम्ही संघटना करून जोराचा प्रयत्न करावयाचा असें ठरविलें आहे. तरी तुमचे पुढील बेत व हालचाली आम्हांस कळवाव्या' असा होता. C/o पोस्टमास्तर डेहराडून अशा पत्त्यावर उत्तर मागविलें होतें. या पाकिटावर चुकिंगच्या पोस्टाचा छाप होता. हिंदुस्थानांतून येणाऱ्या पत्रांचा नेहमींचा मार्ग कलकत्ता, रंगून, डेहराडून, बँकॉक, सायगांव असा असे. त्यामुळें हें पत्र डेहराडूनहून विमानमार्गे कोणाबरोबर तरी चुंकिंगला आलें व तेथून पोस्टानें इंडोचायनास भिडलेल्या चीनच्या दक्षिण सरहद्दीपर्यंत आलें असलें पाहिजे. इंडोचायनांतील सर्व फ्रेंच अधिकारी वर वर जरी जपान्यांशीं सहकार्य करीत होते, तरी इंग्रज व अमेरिकन यांचा जय व्हावा, अशीच त्यांची इच्छा असे. या इच्छेस अनुसरून इंग्रज-अमेरिकनांना बातमी पुरविणें अगर इतर मदत करणे, हें ते हॅनॉयच्या उत्तरेस कांहीं मैलांवर असलेल्या इंडोचायनाच्या सरहद्दीवरून करीत असत. या अनुरोधानें जपान्यांस नकळत त्यांचें इंग्रज-अमेरिकनांशीं वरील मार्गानें सतत दळणवळण चाललेलें असे.

अर्थात् वरील पत्र चीनच्या दक्षिण सरहद्दीवर येतांच, तेथील अधिकाऱ्यांच्या सांगण्यावरून फ्रेंच अधिकाऱ्यांनीं अपल्या सरहद्दींत घेतलें असलें पाहिजे, व तेथून तें पोस्टानें सायगांव रेडिओवर आलें असावें, असा आम्ही निष्कर्ष काढला. ज्या अर्थीं इतक्या अडचणींतून खाजगी पत्र सहसा येऊं शकत नाहीं, त्याअर्थीं सरकारानेंच आमचे बेत समजून घेण्यासाठीं हा उपद्व्याप केला असला पाहिजे, असा आमचा सर्वांचा तर्क झाला. युद्धकाळांत असेही चमत्कार घडणें अशक्य नाहीं.

भाषणें, संवाद व गाणीं असेच बहुधा प्रचाराचे प्रकार असतात. परंतु मी याशिवाय दोन तीन नवीन प्रकार तेथें रूढ केले. ते म्हणजे—नाट्यछटा, राजकीय चुटके व उपरोधिक व्याख्या, वगैरे होते. नाट्यछटा म्हणजे काय हें सर्वांना माहीतच आहे. म्हणून राजकीय चुटक्याचें व उपरोधिक व्याख्येचें एक एक उदाहरण येथें देतों. एकदां असें जाहीर झालें होतें कीं, अमेरिकेंत लोखंडाची टंचाई झाल्यामुळें इतःपर मुख्यतः लाकडी जहाजें बांधण्यांत येतील. त्यावर दोघांच्या तोंडीं पुढील संवाद घातला होता. एक—'कांहो अमेरिकेनें लाकडी जहाजें बांधण्याचें कां ठरविलें आहे?' दुसरा—'अहो, हें स्पष्ट आहे, आतांपर्यंत लाखांनीं त्यांचीं जहाजें बुडतात, तशीं बुडूं नयेत म्हणून, दुसरें काय?' उपरोधिक व्याख्येचें उदाहरणः—ब्रिटिश लोक स्वातंत्र्य देण्याच्या नेहमीं गप्पा मारतात पण आपणांस तर तें कोठें दिसत नाहीं. अर्थात् हिंदुस्थानांत वाटेल तो धुमाकूळ घालावयास त्यांस मिळणें, याचेंच नांव 'हिंदुस्थानाचें स्वातंत्र्य' वगैरे. हे चुटके, व्याख्या अगर नाट्यछटा लोकांच्या ताबडतोब लक्षांत याव्या म्हणून

त्या त्या दिवशींच्या बातम्यावरच त्या आधारलेल्या असत, हें सांगायला नको. विनोदी लेख व बोल सर्वांना आवडत असल्यामुळें असला प्रचार फार परिणामकारक होई व त्यामुळें वेळाचीही बचत होत असे. कारण अमेरिकेच्या बोटी मोठ्या प्रमाणांत कां बुडतात वगैरे गोष्टींचें सांगोपांग विवेचन लांबलचक भाषणांत करण्यापेक्षां, वरील सारख्या चुटक्यांतूनच मनांत जास्त ठसतें.

आमच्या बाजूच्या इतर सर्व नभोवाणी केन्द्रांत, आमचा प्रचार फारच परिणाकारक होत असे, हें आम्हांस वारंवार पत्रद्वारें व कित्येकजण प्रत्यक्ष मुद्दाम कळवीत असत. याचें मुख्य कारण म्हणजे जपान्यांच्या सेन्सारादि अडचणींपासून आम्ही पूर्ण स्वतंत्र होतों; त्यामुळें आम्हाला मोकळेपणानें वाटेल तें बोलतां येत असे. आमचीं भाषणें जपानकडून सेन्सार करून घ्यावयाचीं नाहींत, अशीच आम्ही प्रथमपासून प्रथा पाडली होती. अर्थात् हिंदी लोक जपान्यांचे हस्तक होऊं पाहात आहेत ' या इंग्रजांच्या बोभाट्यास ' दुसरें कोणी राष्ट्र ( अर्थात् जपानीही ) आमच्या स्वातंत्र्याच्या आड आल्यास त्यांचाही आम्ही समाचार घेऊं ', असें मोकळेपणानें आम्हांस सांगतां येत असे. शिवाय इतर ठिकाणचे जपानी सेन्सार हिंदुस्थानांतील विशेष बातम्यांचें अगर प्रसंगांचें वर्णन बाजूला ठेवून, जपानी प्रगतीची थोडी तरी भरमसाट वर्णनें देण्यास तेथील केन्द्रांस भाग पाडीत असत. त्यामुळें हिंदुस्थानावरील त्यांची दृष्टि चळत असे. असें आमच्या बाबतींत घडण्यास वाव नव्हता. आणि ठराविक वेळाचें बंधन आम्हांस नसल्यामुळें स्फूर्ति येईल तेव्हां आपलें काम तयार ठेवून, मोकळेपणानें करमणुकीसाठींही इतरत्र संचार आम्हांस करितां येई. त्याचप्रमाणें अमुक दिवशीं नाटक झालेंच पाहिजे असें ठरलेलें नसल्यामुळें उत्तम संवाद कोणाला सुचो वा न सुचो, कांहींतरी बोलावयाचें असें होत नसे. ज्याला ज्या विषयाची स्फूर्ति होईल, त्यानें तो विषय लिहून काढावा आणि सर्वांचें त्यास अनुमोदन मिळालें कीं तो कार्यक्रम त्या दिवशीं करावा. सर्वांचीं मनें उत्साहानें प्रेरित असलीं म्हणजे नियमित विषयपत्रक नसलें तरी आळसानें कार्यहानी होत नाहीं. त्या प्रकारची आस्था आमच्या सर्वांच्या अंतःकरणांत जागृत होती. आमच्या नभोवाणी केन्द्राच्या प्रचारनैपुण्याचें पुष्कळसें श्रेय एहेसान कादर यांस आहे. यांनींच ६ फेब्रुवारी १९४२ पासून या केंद्रावरून प्रथम एकट्यानेंच प्रचारास सुरुवात केली. नभोवाणी केन्द्रीय प्रचाराची त्यांना नैसर्गिक देणगी तर आहेच, परंतु शिवाय इतरांच्या योग्य सूचनाही ते तावडतोब मान्य करून उदारपणानें अमलांत आणण्यास कांकूं करीत नसत.

जून १९४३ च्या सुरुवातीस सिंगापूरच्या लेफ्टनंट कर्नल भोसले यांच्याकडून निरोप घेऊन हिंदी स्वातंत्र्यसेनेचा एक अधिकारी, सायगांवला विमानानें येऊन पोहोंचला. तो म्हणाला, " कर्नल भोसले हे एका खाजगी चिटणीस व

ए. डी. सी. च्या शोधांत आहेत. तें काम पत्करण्याची तुमची इच्छा असल्यास त्यांनीं तुम्हांला बोलाविलें आहे. " हें ऐकून मला फार आश्चर्य वाटलें. कारण कर्नलसाहेबांची व माझी केव्हांही गांठ पडली नव्हती. त्यावर तो गृहस्थ म्हणाला, " तुमच्या बऱ्याचशा मित्रांनीं तुम्ही एकटेच त्या कार्याला लायक आहांत असें सुचविलें आहे. तुम्ही अनमान करूं नये. " हें ऐकून मी विचार केला—वर्षभर नभोवाणी केन्द्राचें काम झालेंच आहे. आतां दुसऱ्या कोणत्या तरी कामाचा अनुभव मिळाल्यास उत्तमच. अशा विचारानें जाण्याचें ठरविल्यावर आम्हांला वाहनासाठीं पंधरा-वीस दिवस वाट पाहावी लागली. या अवधींतच तीन-चार वेळां आमच्या सामानाची चोरी झाली. आमच्या बंगल्याच्या खिडक्या फ्रेंच पद्धतीच्या विस्तृत असून, त्यांना गज नव्हते हें पूर्वी सांगितलेंच आहे. त्या उघड्या ठेवल्या नाहींत तर अतोनात उकडून झोंप येत नसे. नेमकी ती संधी साधून आम्हांला झोंप लागल्यावर वेळोवेळीं जोडे, कपडे वगैरेची चोरी, सवकलेल्यांनीं करावी असें चाललें होतें. हा अनुभव वर्षभरांत कधींही आला नव्हता. परकी हद्दींतून जपानी लोकांच्या हद्दींत जाण्याच्या वेळेस कडक डॉक्टरी परीक्षेंतून पार व्हावें लागतें. त्याप्रमाणें या पंधरा दिवसांत माझी परीक्षा होऊन देवी, टायफॉइड व कॉलरा यांची लस टोंचून घ्यावी लागली होती.

नंतर २३ जून १९४३ रोजीं सकाळीं एका जपानी मिलिटरी बसमध्यें बसून २५० मैलांवर असलेल्या कांबोडियाची राजधानी प्नॉम्पेन् ( Pnom-penn ) येथें सायंकाळीं पांचाच्या सुमारास पोचलों. मध्यें दुपारीं बाराच्या सुमारास ' मेकांग ' नदीशीं येतांच, आमची बस नदीवर तरंगत असलेल्या जाडच्या चौरंगवजा फळ्यावरून गेली. हा फळा इतका प्रशस्त असतो कीं, त्यावर एका वेळेस चार बसेस राहूं शकतात. याप्रमाणें आमच्यासह चार बसेस तेथें गेल्यावर, एका बाष्पनौकेनें तो फळा ओढून दुसऱ्या किनाऱ्यास लावला. असें करण्याचें कारण त्या नदीचा प्रवाह फार जोराचा आहे आणि तेथें पूल टिकूं शकत नाहीं. किनाऱ्यावर एक मोठा फळा लावून त्यावर पश्चिमेचा रस्ता ' प्नॉन्पेन 'कडे व वायव्येचा ' अंकोर वट ' याकडे जात असल्याचें दर्शविलें आहे.

तेथून ' अंकोर वट ' ३३६ मैल आहे. तेथें जाण्याची माझी इच्छा अपुरीच राहिली. ही बृहत् भारताची एके काळीं म्हणजे सुमारें १२ व्या १३ व्या शतकांत राजधानी होती. त्या वेळीं भारतीयांचें राज्य दूरपूर्वेतील विस्तीर्ण प्रदेशांवर म्हणजे जावा, सुमात्रा, बाली, बोर्निओ, फिलिपीन्स, इंडोचायना, मलाया, सयाम व ब्रह्मदेश इत्यादींवर पसरलेलें होतें. याचें प्रमाण म्हणजे त्या देशांतील निर-निराळ्या भाषांतून विपुल असे संस्कृत शब्द आढळतात; आणि खणल्यावर निर्जन प्रदेशांत मंदिरें, देवादिकांच्या मूर्ती व संस्कृत शिलालेखही सांपडतात.

अंकोर वटाचें पूर्वीचें नांव ' नगरथोंम ' होतें. आज तेथें सुमारें १०० चौरस मैलाच्या प्रदेशावर या राजधानीचे अवशेष– भव्य मंदिरें व प्रासाद इत्यादि– अद्यापही उत्तम स्थितींत असलेले आढळतात. याच्या आजूबाजूच्या प्रदेशास अजूनही ' अरण्यप्रदेश ' म्हणतात व तसाच सरकारी कागदपत्रांतून उल्लेख असतो. अंकोर वटांतील शेकडों वर्षांच्या अनास्थेमुळें झाडें वाढून जंगल झालें होतें. तें पंचवीस वर्षांपूर्वीं एका फ्रेंच वाटसरूच्या लक्षांत आलें. त्याच्या खटपटीनें त्या राजधानींतील प्रदेश साफ करून, आतां तेथें पूर्वइमारतीभोंवतीं प्रवाशांसाठीं हॉटेल्स व वसतिगृहें बांधिलीं आहेत. हें आपल्या प्राचीन संस्कृतीचें ठिकाण, जमेल त्यानें अवश्य जाऊन पाहाण्यासारखें आहे. तेथील शिल्पकला इतकी अप्रतीम आहे कीं त्याला हल्लीं जगांतील पहिलें आश्चर्य समजतात. त्याचें दर्शन घेण्यास थेट अमेरिकेहून लोक येत असतात, म्हणून आपण हें तीर्थक्षेत्र समजून तेथें प्रत्येकानें जाण्याचा अवश्य प्रयत्न करावा.

कांबोडिया किंवा कांबोज हा ' खंबूज ' या शब्दाचेंच विकृत रूप आहे. आणि खंबोज हें तेथील लोकांचें नांव आहे. कारण त्यांचा पूर्वपुरुष ' खंबु ' असा होता. यांच्या शरीराची ठेवण, वर्ण वगैरे बाबतींत आपल्याशीं बरेंच साम्य आहे. हल्लीं ते लोक बौद्धधर्मी आहेत. तरी पण उपनयन किंवा व्रतबंधाची चाल अद्याप तिकडे आहे. सोडमुंजीच्या अगोदर कांहीं दिवस पिवळ्या वस्त्रांत वावरणारीं मुलें तेथें मुबलक दिसतात. तेथील बाजार, नगर-विभाग अगर जिल्हे इत्यादींच्या नांवांचा उगम संस्कृतांतून झाला असला पाहिजे, हें स्पष्ट नजरेस येतें. तेथील लोक इतकीं वर्षें फ्रेंच अमलाखालीं असूनही अद्याप आमच्याच पद्धतीचा नमस्कार करितात. त्यांच्या पूर्वजांची ऐतिहासिक नाटकें जेव्हां ते करितात, तेव्हांचे पोशाख, आचार, व्यवहार वगैरे सर्व आपल्या संस्कृतीशीं पूर्णपणें जुळणारे असे असतात. हल्लींही त्यांची राजवाड्यांची बांधणी भारतीय पद्धतीची असून राजास अभिषेकही आपल्याकडील रिवाजाप्रमाणें होत असतो. यज्ञोपवीत धारण करणाऱ्या मनुष्याबद्दल त्यांस अत्यंत आदर वाटतो; अर्थात् आपली समाजरचना त्यांस आपुलकीची वाटते.

सायंकाळीं पांच वाजतां प्नॉम्पेन् ' स्टेशनवर पोहोंचल्यावर, मी तेथील जपानी स्टेशनमास्तरास बँकॉकला जाण्यास गाडी केव्हां मिळेल असें विचारलें. त्या वेळीं युद्ध चालू असल्यामुळें, सयाम अगर इंडोचायना येथील रेल्वे वाहतूक खाजगी लोकांच्या उपयोगासाठीं नव्हती. त्यामुळें गाड्या सुटण्याचे दिवस व वेळा हीं ठरलेलीं नसत फौजेच्या गरजेप्रमाणें त्या सोडीत असत. अर्थात् दुसऱ्या दिवशीं सकाळीं दहा वाजतां सैनिकांसाठीं गाडी सुटेल, असें मास्तरांनीं कळविलें. तेव्हां मी एका हॉटेलचा शोध करून रात्र तेथील खोलींत काढली. सायंकाळीं गांवांत फिरावयास गेलों तेव्हां तेथें बरेच हिंदी व्यापारी आहेत असें मला आढळून आलें. तो दिवस सोमवार असल्यामुळें तेथील म्यूझियम बंद होतें.

तरीपण त्याच्या ग्यालरींत फिरून आणि काचेंतून डोकावून साधलें तेवढें निरीक्षण केलें, तेव्हां सर्व म्यूझियम गणपतीच्या, शंकराच्या अगर देवींच्या मूर्तीनींच भरलेलें दिसलें. त्यावरून या प्रदेशांत पूर्वीं भारतीय संस्कृति किती प्रभावी ठरली होती, हें स्पष्ट होतें. या म्यूझियममध्येंच राहात असलेल्या एक-दोन अधिकाऱ्यांशीं मी मोडक्या तोडक्या फ्रेंचमध्यें बोललों, तेव्हां सोमवारीं म्युझियम बंद असतें, हें मला कळलें. त्यांनींही 'येथील सर्व वस्तु तुमच्याच संस्कृतीच्या निदर्शक आहेत' असें कबूल केलें. नंतर तेथील राजवाड्यावरून पुढें त्या गांवांतील एका सुंदर तळ्याचे कांठीं फिरावयास गेलों. सायंकाळ झाल्यामुळें राजवाडा बघण्यास पास मिळण्यासारखा नव्हता, असें कळलें. त्या तलावांत राजनौका व इतरही नौका सुंदर कलाकुसरीनें युक्त होत्या. नंतर हॉटेलमध्यें रात्र घालवून, दुसऱ्या दिवशीं सकाळीं १० वाजतांच्या गाडीनें बँकॉककडे निघालों.

तिकडच्या गाड्या सर्व स्टँडर्ड गेजच्या ( म्हणजे आपल्या मीटर गेजपेक्षां मोठ्या व ब्रॉड गेजपेक्षां लहान अशा ) होत्या. दोन दिवसांनीं म्हणजे २५ जून १९४३ रोजीं १२ वाजतां दुपारीं आम्ही बँकॉकला पोहोंचून 'युरोप हॉटेल'मध्यें उतरलों. तेथून पुढें सिंगापूरला जावयास सात दिवस गाडी नव्हती. येथें फ्रेंच नाणें ( पीआस्टर्स ) बदलून आम्हास सयामी 'बाट' ( किंवा इंग्रजींत 'टिकल्स' असें संबोधित असलेलें ) नाणें घ्यावें लागलें. हॉटेलमध्यें दोन वेळां जेवून, सबंध गांवभर हिंडून बँकॉक शहर पाहाणें, असाच आमचा सात दिवस कार्यक्रम होता. एक दिवस सकाळीं आगगाडीनें निघून तेथून चाळीस मैलांवर असलेलें अयोध्या हें गांव पाहून सायंकाळीं परत आलों. सयाममधील सर्व गांवांचीं, इमारतींचीं, मंदिरांचीं, हॉटेल्सचीं, रस्त्यांचीं व पेठांचीं नांवें संस्कृतच आहेत. परंतु हल्लीं तीं विकृत स्वरूपांत आहेत. उदाहरणार्थ, 'नगर श्री धर्मराज' या मूळ नांवाचें हल्लीं 'नाखोन श्री तामरात' आणि 'नगर प्रथम'चें 'नाखोन पाथोम' अशीं रूपें झालेलीं दिसून येतात. त्याचप्रमाणें पेठांचीं नांवें सूर्यवंश, राजवंश अशीं मूळ असतांना आज तीं 'सूरवोंग' 'रवोंग' अशीं आढळतात. त्यांच्या नव्या मुख्य महारस्त्याचें नांव 'राजदमन' हें जवळजवळ मूळ स्वरूपांतच कायम आहे. हॉटेल्सचीं नांवें 'शुथ्थभोजन हॉटेल' अशा प्रकारचीं आहेत. मंदिरांचीं नांवें 'वट अरुण' 'वट श्रीदेवेंद्र' अशीं आहेत सायकलला ते 'रोट चक जोन्' ( रथचक्रयंत्र ) व मोटारीला, रोट जोन् ( रथयंत्र ) म्हणतात. 'स्वस्ति' पासून निघालेला 'सवड्डी' हा त्यांचा नमस्काराऐवजीं अभिवादनाचा नेहमींचा शब्द आहे. त्यांचें राजचिन्ह 'गरुड' असून त्यास ते 'क्रुट' ( मूळ गरुड—ग्रुड—क्रुट ) म्हणतात. त्यांची लिपी 'पाली' आहे व भाषाही पूर्वीं पालीच असे. अर्थात् हल्लींची सयामी भाषा हें तिचेंच विकृत स्वरूप आहे. पुरोहित वगैरेंच्या परंपरेमुळें राजघराण्यांतील भाषा अद्यापि शुद्ध पालीच आहे.

सयामी लोक स्वतःच्या मुलांचीं नांवेंही आपल्यासारखीं संस्कृतच परंतु थोडा बदल करून ठेवतात. पाश्चात्यांशीं संबंध आल्यामुळें नवीन वस्तूंचीं नांवें बनविण्यासाठीं आपण जशी संस्कृतची मदत घेतों, त्याचप्रमणें तेही घेतात, हें वर दिलेल्या ' रोट चक जोन् ' व ' रोट जोन् 'वरून स्पष्ट होईल.

तेथील सर्व मंदिरांवरील छपरांचा सोन्याच्या कळसापर्यंत गेलेला भाग निरनिराळ्या रंगांनीं इतका सुंदर रंगविलेला असतो कीं सूर्यप्रकाशांत तो डोळे दिपविण्याइतका झळकतो. देवळांचीं नांवें जरी निरनिराळीं असलीं तरी सर्वांत बुद्धाचीच मूर्ति असते. बँकॉकमधील मुख्य राजमंदिरांत पाचूची मूर्ति आहे. तें मंदीर भव्य आणि टोलेजंग असून त्यांत ठिकठिकाणीं फार बारीक कलाकुसर आहे. या मंदिराचें भलें मोठें आवार असून त्यांतही अशींच तीन-चार मंदिरें आहेत. राजमंदिराच्या भिंतींच्या आंतले बाजूस बुद्धाचें चरित्र चितारलेलें आहे. तसेंच या आवाराच्या भिंतींच्या आंतील बाजूस सीताजन्मापासून रामराज्याभिषेकापर्यंत रामायणांतील सर्व प्रसंग चित्रित केले आहेत. मागें उल्लेखिलेले सत्यानंद पुरी येथेंच कार्य करीत असत. आपल्या संस्कृतीबद्दलच्या आत्मीयतेची जाणीव सयामी लोकांना करून देण्यासाठीं, बंगालमधून येऊन ते येथें कायम राहिले होते.

युरोप हॉटेल ही पाश्चात्य पद्धतीनें चालविलेली खाणावळ होती. तेथें जेवणानंतर फारच मधुर सयामी कलमी आंबे चाखावयास सांपडले. हें हॉटेल पुढें एका वर्षानें अमेरिकन बॉंबहल्ल्यामुळें नाश पावलें. अशा रीतीनें करमणुकींत आनंदानें सात दिवस तेथें घालवून आम्ही २ जून १९४३ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां आगगाडीनें निघालों व चार दिवसांनीं म्हणजे ६ जून रोजीं सायंकाळीं ६ च्या सुमारास सिंगापुरास पोंचलों.

## सुभाषचंद्र निवास : १२

सिंगापुरास थॉमसन रोडवरील हिंदी स्वातंत्र्य-सेनेच्या मुख्य कचेरींत मी येऊन उतरलों. ती कचेरी रस्त्यावरच पण लहानशा टेकडीवर होती. तिच्या पायथ्याशींच तेथें काम करणाऱ्या (दोन-चार वरिष्ठ सोडून इतर) अधिकाऱ्यांस राहण्यासाठीं झोंपड्या बांधलेल्या होत्या. दुसऱ्या दिवशीं सकाळीं कर्नल भोसले कचेरींत आल्यावर, मी त्यांस भेटलों. त्यांचा बंगला तेथून दोन फर्लांगावर होता. त्यांची माझी प्रथम भेट व औपचारीक बोलणें झाल्यावर एक महिना तेथेंच वास्तव्य करून, ६ जुलै १९४३ रोजीं त्यांच्याच बंगल्यांत मी राहावयास गेलों. तेथें असतांना श्री. सुभाषचंद्र बोस टोकिओंत आले अशी आनंदाची बातमी आम्हीं 'आझाद हिंद' वर्तमानपत्रांत वाचली. सुभाषबाबूंनीं मुख्यतः पाणबुडीनेंच जर्मनीहून जपानचा प्रवास केला हें सर्वांस विदित आहेच. सामान्य जनतेस त्या वेळीं अत्यंत आश्चर्य वाटलें. जरी तत्पूर्वी बरेच दिवस अगोदर ते आले होते, तरी जपानी सरकारशीं त्यांच्या वाटाघाटी चालल्या असल्यामुळें, त्या संपल्याशिवाय या बातमीस प्रसिद्धि मिळूं शकली नाहीं. जपानचे मुख्य मंत्री जनरल टोजो, व युद्धमंडळांतील इतर अधिकारी यांच्याबरोबर या वाटाघाटी चालल्या होत्या. त्यांतील मुख्य आशय हा कीं, 'जपानला हिंदुस्थानावर स्वामित्व मिळवावयाचें नाहीं. उभयतांचे समान शत्रु म्हणूनच केवळ सहकार्यानें इंग्रजांशीं दोघांनीं लढावयाचें.' या बाबतींत सुभाषबाबूंची पूर्ण खात्री झाल्यावरच त्यांनीं दूरपूर्वेतील हिंदी स्वातंत्र्य-चळवळीचें धुरीणत्व पत्करावयाचें असें निश्चित केलें. या सर्व वाटाघाटींत श्री. रासबिहारी बोस यांचें प्रमुख अंग होतेंच. नंतर टोकिओ रेडिओवरून सुभाषचंद्रांनीं सर्व हिंदी लोकांस उद्देशून एक भाषण केलें. त्यांत 'हिंदुस्थानाचें स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठीं जपानी राष्ट्र सर्व तऱ्हेची मदत देण्यास तयार आहे. तरी या संधीचा आपल्याला पुरा फायदा करून घेतला पाहिजे' असें त्यांनीं निवेदन केलें. टोकिओंत असतांना त्यांनीं रेडिओवरून जीं जीं भाषणें केलीं त्यांतील दोहोंचा प्रामुख्यानें उल्लेख केला पाहिजे. एक जर्मनांना उद्देशून होतें व दुसरें जपान्यांसाठीं होतें. जर्मनांसाठीं केलेलें भाषण त्यांच्याच भाषेंत होतें. ती भाषा एक वर्षाच्या तेथील वास्तव्यांत त्यांनीं आत्मसात् केली होती. त्यांत त्यांनीं हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्यासंबंधीं जर्मनांनीं दाखविलेल्या कळकळीबद्दल आणि त्यांनीं केलेल्या मदतीबद्दल आभार मानून 'उभयतांचें उद्दिष्ट साध्य होईपर्यंत आम्ही आपल्याशीं सहकार्य करूं

याची खात्री असूं द्यावी ', अशा आशयाचें निवेदन केलें. जपान्यांना उद्देशून केलेल्या भाषणांत त्यांनीं केलेल्या हार्दिक स्वागताचा व पाहुणचाराचा उल्लेख करून त्यांचे त्यांनीं आभार मानले. 'सर्व एशिआटिक राष्ट्रांत तुम्हीच योग्य वेळीं जागृत होऊन हा लढा सुरू केलात, हें खरोखर कौतुकार्ह आहे ' अशी सुरुवात करून 'तुमच्या आमच्या संवयी, संस्कृति समान असल्यामुळें आपण एकमेकांच्या मदतीनें आपलें ध्येय गाठूं ' असा त्या भाषणाचा शेवटीं त्यांनीं समारोप केला.

टोकिओंतील त्यांच्या वास्तव्यांत निरनिराळ्या राष्ट्रांच्या वकिलांशीं त्यांच्या भेटी परतभेटी झाल्या. त्यांत आपल्या ध्येयपूर्तीसाठीं कोणकोणतीं राष्ट्रें सहानुभूतीनें आपल्याला मदत देऊं शकतील, याचा अंदाज बांधण्यासाठीं सर्वांच्या दृष्टिकोनांचें त्यांनीं सूक्ष्म निरीक्षण केलें. यांपैकीं आशियांतील राष्ट्रांत मुख्यत: जपान व युरोपीय राष्ट्रांत प्रमुखपणें जर्मनी यांवरच मुख्य भर होता, हें सांगण्याची आवश्यकता नाहीं.

यानंतर श्री. सुभाषचंद्र, श्री. रासबिहारी बोस यांच्याबरोबर विमानमार्गे २ जुलै १९४३ रोजीं सिंगापुरांत दाखल झाले. विमानतळावर त्यांच्या स्वागतासाठीं लेफ्टनंट कर्नल भोसले व इतर ८–१० प्रमुख अधिकारी हजर होते. त्यांना लष्करी सलामी देण्यासाठीं हिंदी स्वातंत्र्य-सैन्याची एक तुकडीही आली होती. त्याचप्रमाणें कांहीं वरिष्ठ जपानी अधिकारीही हजर राहाण्यास चुकले नव्हते. ते विमानांतून उतरतांच त्यांस हार घालून लष्करी सलामी देण्यांत आली. उत्तरादाखल, ' लांबलचक भाषण न करितां मी आज इतकेंच सांगतों कीं, मित्रहो, तुमच्यामध्यें आल्यानें मला फार आनंद झाला आहे ' एवढेंच ते हिंदींत उद्गारले. यानंतर ते मोटारींत बसून त्यांच्यासाठीं मुद्दाम राखून ठेवण्यांत आलेल्या एका भव्य आणि विस्तीर्ण बंगल्यांत गेले.

हा बंगला समुद्रकाठीं सिंगापुरांतील ' कातोंग ' नांवाच्या विभागांत आहे. तो पूर्वीं ' मेयर ' नांवाच्या एका ज्यू कोट्याधिशाचा होता. दूरपूर्वेंत जपान्यांनीं युद्ध सुरू केल्याबरोबर, तो इंग्रजांच्या राज्यांत कोठेंतरी पळून गेला होता. त्यामुळें शत्रूची ( व शत्रूच्या हद्दींत पळून गेलेल्या इतर नागरिकांची ) मालमत्ता म्हणून जपान्यांच्या ताब्यांत आलेल्या इमारतींपैकीं ही एक होती. त्या बंगल्याच्या तीन बाजूंस सीमेंट कॉंक्रीटची सुमारें बारा फूट उंचीची भिंत होती. आंत चहूंकडे बागबगीचा होता. रस्त्यावरील बाजूच्या कोटास जाण्यास व येण्यास अशीं दोन फाटकें होतीं. या फाटकांवर नेहमीं हिंदी स्वातंत्र्य-सेनेचा एक एक शिपाई उभा असे. आंत शिरल्याबरोबर डाव्या हाताला पहारेकऱ्यांची एक झोपडी होती; त्यांत पांच पहारेकरी व त्यांच्यावरील एक मुख्य, असे सहा सशस्त्र सैनिक तयार असत. यांतील लोक तीन-तीन तासांनीं फाटकावरील शिपायांच्या जागा घेत, व ते दोघे झोपडींत परत येत असत. झोपडीजवळ एक बरेंच मोठें दुमजली घर होतें.

त्यांत त्या बंगल्यांतील न्हावी, धोबी, चांभार, वाढपी, स्वयंपाकी आणि पहारेकरी या सर्वांची राहण्याची सोय होती. बंगल्याच्या मागील बाजूस समुद्र होता.

मुख्य बंगल्याला समोर पोर्च व त्यांतून आंत जाण्यास बंगल्याच्या मानानें ठेंगणा दिसणारा, परंतु उत्तम सागवानी लाकडाचा नक्षीदार व मजबूत दरवाजा होता. त्यावर घुमटाच्या आकाराचें बांधकाम होतें. दारांतून पुढें बरेंच लांब गेल्यावर दोन्ही बाजूनें जिने निघून, गोलाकार मार्गें येऊन, मागील दारावरच आले होते. तेथें थोडी सपाट जागा सोडल्यावर मधोमध दुसऱ्या मजल्यावर जाण्याकरतां पायऱ्या होत्या. अर्थात् दार ठेंगणें होतें. पहिल्या मजल्याचें छत उंच असल्यामुळें, दारावरील सपाटी हा वर जाण्याचा टप्पा होता. खालच्या दोन्ही जिन्यांच्या त्याचप्रमाणें, वरील जिन्याच्या पायऱ्या संगमरवरी दगडाच्या असून त्यांवर नेहमीं गालीचा आंथरलेला असे. जिन्याच्या गोलाकार कठड्यांवर चकचकीत पितळी पत्रा मारलेला होता. श्रीसुभाषचंद्र फक्त दोन वेळां जेवणापुरते खालील मजल्यावर येत असत. बाकी सर्वकाळ त्यांचें वास्तव्य दुसऱ्या मजल्यावरच असे. प्रवेशद्वारापुढील मार्गातून सरळ आंत आल्याबरोबर समोरील पडवींत एक पहारेकरी असे. या पडवीच्या मागें तितक्याच लांबीचें (म्हणजे सुमारें १०-१२ खणी) एक दालन होतें. त्याची तक्तपोशी चकाकणाऱ्या महॉगनी लाकडाची होती. त्या तक्तपोशीवर अंतराअंतरानें तीन बैठकी होत्या. प्रत्येक बैठकीखालीं म्हणजे एक गालिचा, वर निरनिराळ्या आकाराचें एक एक टेबल व त्याभोवतीं निरनिराळ्या तऱ्हेचीं कोचें, खुर्च्या वगैरे होत्या. डाव्या हाताच्या कोपऱ्यांत एका टेबलावर टेलिफोन होता. जवळच्या खुर्चीवर एक सुशिक्षित निरोप्या असे. प्रत्यक्ष सुभाषचंद्रांशीं कोणास बोलावयाचें असल्यास, अगर त्यांनाच वर बसल्या बसल्या इतरांशीं बाहेर संभाषण करावयाचें असल्यास, वरच्या टेलिफोनशीं हा निरोप्या संबंध जोडीत असे.

या आंतील दालनाच्या दोन्ही बाजूंस दोन मोठ्या खोल्या होत्या. आणि मागील बाजूस संगमरवरी फरशी असलेला एक व्हरांडा होता. त्याच्या पलीकडे दोन हिरवींगार लॉन टेनीस-कोर्टस् होतीं. त्यानंतर रस्त्यावरील पदपथाप्रमाणें लांबलचक दगडी ओटा होता. त्याला समुद्राचे बाजूस गच्चीसारखा कठडा होता. येथें सतत येरझारा घालणारा एक पहारेकरी असे.

या कठड्यावर समुद्राच्या लाटा आदळत असत. अर्थात् या बाजूनें सबंध बंगल्यांत समुद्रावरील तुषारयुक्त वारा खेळत असे. बैठकीच्या दालनांत जाण्यास समुद्राच्या बाजूनें सहा दरवाजे व आंतील बाजूनें पांच दरवाजे होतें. जिन्यांतून वर दुसऱ्या मजल्यावर गेल्यावर खालीलप्रमाणेंच एक लांबलचक पडवी होती. त्यानंतरच्या खालील बैठकीच्या दालनाच्या वरील भाग, दोन हिश्यांत

विभागला होता. मधोमध मागील ग्यालरींत जाण्यास एक मार्ग होता; तेथून अथांग समुद्राचें दर्शन घडे.

त्या मार्गाचा उजवीकडील विभाग म्हणजे श्रीसुभाषचंद्रांचें शयनगृह होय; व डावीकडील विभाग हा सरकारी काम व भेटीगांठीसाठीं ते वापरीत. याच्या डाव्या बाजूस अध्ययन, पत्रलेखन, चिंतन इत्यादींसाठीं त्यांची खास बैठकीची खोली असे. उजव्या बाजूच्या कडेच्या खोलींत त्यांचा पर्सनल डॉक्टर राहात असे. डॉक्टरांसाठीं आणि अध्ययन इत्यादींसाठीं उपयोगिलेल्या कडेच्या खोल्यांच्या खालील पहिल्या मजल्यावरील खोल्यांत श्रीसुभाषांचे ए. डी. सी. राहात असत.

बंगल्यांतील सर्व खोल्यांना मुख्य दालनाप्रमाणेंच उत्तम चमकदार लाकडी तक्तपोशी असून त्यावर गालिचे व टेबल, पलंग, खुर्च्या अलमाऱ्या अशी इतर व्यवस्था होती. प्रत्येक खोलीस स्नानगृह, शौचकूप इत्यादींची स्वतंत्र व्यवस्था होती. मागें वर्णन केलेल्या दारावर जाणाऱ्या जिन्यांच्या दोन्हीं बाजूस बरीच मोकळी जागा सोडलेली होती. आणि नंतर एकीकडे श्रीसुभाषचंद्रांचें भोजनगृह व दुसरीकडे एका अधिकाऱ्यास राहाण्याची सोय होती. या भोजनगृहांतही इतर खोल्यांप्रमाणें सुंदर तक्तपोशी असून तीवर गालिचा आंथरलेला होता. त्यावर नक्षीदार टेबल व तितक्याच मौल्यवान, उंच पाठीच्या गाद्या असलेल्या कलाकुसरीच्या खुर्च्या होत्या. त्या टेबलावर एक शुभ्र वेलबुट्टीदार उंची कापडाची चादर आंथरलेली होती. जेवावयास चांदीचें नक्षीकाम केलेले कांटे चमचे, व उंची कपबशा, प्लेटी होत्या. भोजनगृहांतील विद्युतप्रकाशासाठीं खास व्यवस्था होती. ती अशी : छताजवळील भिंतींच्या वरच्या बाजूस खांचा असून त्यांत लांब नळीच्या आकाराचे दिवे चोहोंबाजूस लावलेले होते. त्यामुळें खोलींत चहूंकडे सौम्य परंतु स्वच्छ प्रकाश पडत असे. यापलीकडे आंत स्वयंपाकगृह, कोठारगृह वगैरे.

या बंगल्यांतील इतर रहिवासी म्हणजे वर उल्लेखिलेल्या न्हावी, धोबी वगैरे नोकरांशिवाय तीन ए. डी. सी., डॉक्टर, सेक्रेटरी, टायपिस्ट, रेडियोवृत्त-लेखक, गृहव्यवस्थापक व एक सुशिक्षित जपानी अधिकारी इत्यादि होते. जपानी अधिकारी जपानी व इंग्रजी भाषा उत्तम जाणणारा होता. जपानी भाषाज्ञानाची जरूर असणारीं सर्व कामें करण्यासाठीं जपानी सरकारकडून त्याला मागून घेतला होता.

श्रीसुभाषांचे गृहव्यवस्थापक हे मलायांत बरेच दिवसांपासून स्थायिक झालेले असे 'सुरीन बोस' नांवाचे गृहस्थ होते. ते श्रीसुभाषांची सर्व व्यवस्था ठेवीत व त्यांना भेटावयास येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची विचारपूस करून त्यांच्या योग्यतेप्रमाणें आदरातिथ्य करीत. त्याचप्रमाणें वर उल्लेखिलेल्या परिषदे-साठीं अगर खलबतासाठीं आलेल्या मोठमोठ्या अधिकाऱ्यांची अगर त्यांच्या

नोकरवर्गाची, त्याचप्रमाणें बंगल्यांतील इतर रहिवाश्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था यांच्याकडेच असे. भोजनव्यवस्थेंत, शाकाहार व मांसाहार अशा दोन्ही प्रकारचे भरपूर जिन्नस तयार असत. त्यांपैकीं स्वतःच्या आवडीप्रमाणें प्रत्येकास जिन्नस घेतां येत असत. श्रीसुभाषांना गोड पदार्थांची आवड असल्यामुळें बंगाली मिठाईचे प्रकारही केलेले असत. क्वचित् काळीं मलायांत स्थायिक झालेले बंगाली अगर इतर लोकही खास श्रीसुभाषांच्या आवडीचे पदार्थ आपल्या घरीं तयार करून त्यांच्यासाठीं पाठवीत असत. त्यांच्या पंक्तीला सकाळ-संध्याकाळ बाहेरचे सहा-सात वरिष्ठ दर्जाचे अधिकारी–जपानी अगर हिंदी स्वातंत्र्य-संघाचे अथवा हिंदी स्वातंत्र्य सैन्याचे अधिकारी किंवा प्रतिष्ठित गृहस्थ–अशांपैकीं कोणीतरी नेहमीं असायचेच. बाहेरचें कोणी नाहीं, असें एकाद्या प्रसंगीं घडलें तर ते बंगल्यांतील सर्व अधिकाऱ्यांस आपल्या पंक्तीस घेत असत.

जेवतांना राजकीय विषय, त्या दिवसाचें कामकाज अगर तदनुषंगिक माहिती, विनोदी प्रसंग अशा विषयांवर ते मोकळेपणानें सर्वांशीं बोलत. आठवड्यांतून एक दिवस प्रत्यक्ष आघाडीवरच्या सैन्यांतील शिपायास खावें लागणारें अन्न–म्हणजे डाळ-भात, भाजी व मसाला या सर्वांचा मिळून केलेला एकच जिन्नस ते खात असत. अर्थात् तसेंच इतरांसही करावें लागे. मांजर, कुत्रें, पोपट इत्यादि पाळणें त्यांस आवडत नसे. ते म्हणत, “ माणसांकडे लक्ष देऊन त्यांचीच व्यवस्था आपल्यास नीट ठेवतां येत नाहीं. मग पशुपक्ष्यांचा हा रिकामा उपद्व्याप कशाला ? ” म्हणून ते येण्याच्या वेळेस इतरांनीं पाळलेल्या कुत्र्यां–मांजरांचें दर्शन तर राहोच पण आवाजही ऐकूं येऊं नये म्हणून, त्यांना लांब कोठें तरी डांबून ठेवण्याची खबरदारी घ्यावी लागे.

एवढ्या माणसांची जेवणाखाण्याची, प्रसंगोपात् विशेष भोजनसमारंभाची आणि आल्यागेल्यांच्या आदरातिथ्याची व्यवस्था ठेवण्याचें महत्त्वाचें व जबाबदारीचें काम श्री. सुरीन बोस यांनीं अत्यंत चोख रीतीनें पार पाडलें. एवढ्याकरतां त्यांस, घरांत कोणते जिन्नस आहेत किंवा नाहींत हें बघणें, नसलेल्या जिनसांकरतां वेळींच योग्य माणसास सावध करणें, ते मागवून घेऊन साफसूफ करवून घेणें, जास्त पाहुणे येणार असल्यास निरनिराळ्या ठिकाणांहून उपकरणीं जमा करून आणणें व तीं ज्यांचीं त्यांस पोचविणें हें सर्व बघावें लागे.

हिंदी स्वातंत्र्यसैन्याची रोजची भाजी, डाळ, तांदूळ, मीठ, हळद, मिरची इत्यादि सामान शिधा-वांटप पद्धतीप्रमाणें जसें रोज प्रत्येक तुकडीस दिलें जाई तसें तें रोज श्रीसुभाषचंद्र यांच्या बंगल्यावरही तेथें कायम वस्तीस असलेल्या लोकांच्या व अपेक्षित पाहुण्यांच्या संख्येप्रमाणें पाठविलें जाई.

जर्मनी, जपान यांसारख्या स्वतंत्र राष्ट्रांच्या दर्जानेंच हिंदी राष्ट्रपतीनेंही राहावें अशी सर्वांची इच्छा असल्यामुळेंच श्रीसुभाषचंद्र यांची राहाणी त्या दर्जाची असावी असें सर्वानुमतें ठरलें होतें. अथवा हा प्रघात आपोआपच

पहिल्यापासून रूढ झाला असें म्हणावयास हरकत नाहीं. अर्थातच निरनिराळ्या स्वतंत्र राष्ट्रांच्या अत्युच्च दर्जाच्या व्यक्ती, अधिकारी रोजच त्यांच्याबरोबर भोजनास येत असल्यामुळें त्यांच्या निवासस्थानीं अंडीं, कोंबड्या, मासे, डाळी, रवा, गहूं, साबुदाणा, दूध, खवा इत्यादि दुर्मिळ वस्तू नेहमीं पाठवाव्या लागत. नेताजींवरील असंख्य लोकांच्या अलोट प्रेमामुळेंच या वस्तू कोठून ना कोठून त्यांच्या उपयोगाकरतां म्हणून शोधण्यास विशेष जड जात नसे. कोणी आपण होऊन आणून देत असत किंवा एकाद्या परदेशीय व्यक्तीजवळ तें सामान आहे अशी माहिती मिळाली तर भारी किंमत देऊनही त्या वस्तू आणविण्याची व्यवस्था होत असे. परंतु याचा अर्थ असा कोणीही करूं नये कीं हा सर्व सरंजाम आणि दिमाख अथवा या सुखसोयी श्रीसुभाषचंद्र यांस व्यक्तिशः जरूर होत्या. या सर्व बाबतींत त्यांची वृत्ति किती संन्यस्त होती हें पुढें एका स्वतंत्र प्रकरणांत आपण बघूं, परंतु येथें एवढें सांगून ठेवितों कीं हा सरंजाम सर्व चळवळीस एक विशिष्ट दर्जा प्राप्त करून देण्यास जरूर होता. सामान्य जनांस व हिंदी सैनिकांस भात, थोडेसें मुगाचें वरण व एकादी भाजी कधीं मिळाली, कधीं न मिळाली अशींच ३-४ वर्षे काढावीं लागलीं. श्रीसुभाषचंद्र यांनींही त्यांत आनंद मानला असता. परंतु परराष्ट्रीय उच्च अधिकाऱ्यांशीं नेहमीं संबंध येत असल्यामुळें हें सगळें आवश्यक होतें असेंच कोणालाही वाटेल.

श्रीसुभाषचंद्र यांच्या निवासस्थानीं त्यांच्या भव्य आणि सुंदर अशा खास मोटारीशिवाय दोन मोटारसायकली व निरनिराळ्या कामांकरतां चार मोटारी नेहमीं जय्यत तयार असत. अशा रीतीनें या सर्व सरंजामानिशीं व्यवस्था ठेवण्यांत आलेली होती व पुढेंही वेळोवेळीं जरुरीप्रमाणें त्यांत योग्य तो बदल करण्यांत येत असे.

---

## “ नेताजी ” नामाभिधान रूढ झालें : १३

हिंदुस्थानांत एका विशिष्ट चाकोरीच्या बाहेर कार्य करणें शक्य नसल्यामुळें, तसल्या प्रकारचें कार्य कमीअधिक प्रमाणांत करणाऱ्या सर्व व्यक्तींस आपण पूज्य मानतों व सर्वांस त्यांच्या त्यांच्या नांवानेंच संबोधितों. परंतु दूरपूर्वेंत श्री. सुभाषचंद्र बोस यांच्या तोडीचा कोणीच मोहरा नसल्यामुळें किंबहुना दूरपूर्वेंत त्यांनीं जें कार्य करून दाखविलें तें कार्य करण्याचें सामर्थ्य अंगीं असलेली व त्या थोर पदवीची दुसरी कोणी व्यक्ति हिंदुस्थानांतही नसल्यामुळें त्यांच्या त्या असामान्य स्थानाचें व लोकांच्या पूज्य भावाचें द्योतक म्हणून त्यांचें नेहमींचें सुभाषचंद्र हें नांव जाऊन त्या जागीं दुसरें संबोधन येणें आवश्यक झालें. तें कोणी एका अगर अधिक व्यक्तींनीं विचारविनिमय करून ठरविलेलें नव्हतें. तें दूरपूर्वेंतील लाखों हिंदी लोकांच्या हृदयांतील आदरांतून उत्पन्न झालें. श्रीसुभाषचंद्र हे सिंगापुरांत येणार...आले...ते हिंदी लोकांच्या बऱ्याचशा पूज्य नेत्यांपैकीं एक आहेत व ते दूरपूर्वेंत येऊन आपल्या चळवळीचें नेतृत्व स्वीकारणार आहेत...नव्हे, त्यांनीं येऊन तें नेतृत्व स्वीकारलें हें वृत्त जेव्हां हिंदी स्वातंत्र्यसैनिकांनीं व सिंगापूर शहरांतील आपल्या गोपालादि सर्वसामान्य लोकांनीं ऐकलें तेव्हां साहजिकच ‘ सुभाषचंद्र बोस ’ हें नांव फार मोठें आणि एकेरी, वाटून त्यांनीं आपोआपच त्यांच्याबद्दल एकमेकांशीं आदरानें बोलतांना ‘ नेताजी ’ हें संबोधन स्वयंस्फूर्तीनें रूढ केलें. विशेषतः सैन्यांत तर प्रत्येकास आपल्या वरिष्ठांस ‘ साब ’ ( इंग्रजींत ‘ सर ’ ) म्हणून संबोधावें लागतेंच. अर्थातच त्या जागीं ‘ नेताजी ’ हें नामाभिधान जास्त सोइस्कर वाटूं लागलें. अगदीं अक्षरशः वायुगतीनें तें दूरपूर्वेंतील सर्व लोकांच्या तोंडीं आणि कागदोपत्रीं रूढ झालें.

या संबोधनाच्या उत्पत्तीविषयीं कांहींजण असें समजतात कीं शिवाजी महाराजांच्या वेळच्या “ नेताजी ” ( पालकर ) च्या नांवाशीं याचा कांहीं संबंध असावा. परंतु तसें कांहीं नसून श्रीसुभाषचंद्र यांस जें “ नेताजी ” हें नांव पडलें तें केवळ “ नेता ” या संस्कृत शब्दास “ जी ” हा पूज्यतादर्शक हिंदी प्रत्यय लावून केलेलें आहे. अर्थात् या नव्या नांवाची उत्पत्ति व तें रूढ होण्याची कारणें सांगितल्यावर यापुढें या ग्रंथांत श्री. सुभाषचंद्र बोस यांचा आपण ‘ नेताजी ’ असाच उल्लेख करूं; कारण या एकाच नांवानें ते पूर्वेंतील सर्व हिंदी लोकांस माहीत आहेत.

हिंदी लोकांनीं जसें नेताजी हें नांव स्वयंस्फूर्तीनें ठेविलें तसेंच जपान्यांनींही 'चंद्रबोस' हें नांव ठेविलें होतें. जपानांतील अथवा जपानाबाहेरील आबालवृद्धांपासून यच्चयावत् सर्व जपान्यांस ते 'चंद्रबोस' या नांवानें ज्ञात होते. कोठल्याहि जपान्याजवळ अगदीं डोळे मिटून "चंद्रबोस" म्हणावें त्याला हटकून त्या व्यक्तीचा आणि पर्यायानें त्या व्यक्तीच्या कार्याचा बोध झालाच पाहिजे. त्यांचें नांव माहित नसलेला असा एकही जपानी आमच्या बघण्यांत कोठेंच आला नाहीं. चीनसारख्या अफाट देशाच्या कानाकोपऱ्यांत बरींच वर्षें लढत असलेल्या व बाहेरील जगाशीं कांहीं संबंध नसलेल्या त्यांच्या शिपायांसही "चंद्रबोस" हें नांव माहीत होतें. जपान देशांत मूल बोलूं लागतांच त्यास "चंद्रबोस" हें नांव परिचित होत असे. इतका आदर एका परक्या देशांत प्राप्त करून घेणारी व्यक्ति अनन्यसाधारणच समजली पाहिजे.

नेताजी सिंगापुरांत आल्याबरोबर दूरपूर्वेंतील सर्व हिंदी लोकांच्या प्रतिनिधींची एक मोठी परिषद् भरवावी हें टोकियोंतच श्रीरासबिहारी व श्रीसुभाषचंद्र यांच्या परस्पर अनुमतीनें ठरलेलें होतें. त्याप्रमाणें फिलिपीन्स, बोर्निओ इत्यादि सर्व देशांतील हिंदी लोकांस अगोदरच तसें कळवून त्यांस आपापले प्रतिनिधी तांतडीनें पाठविण्याबद्दल सांगण्यांत आलेलें होतें. जपानी युद्धमंडळाकडून त्या त्या प्रदेशांतील त्यांच्या मुख्य अधिकाऱ्यांस या हिंदी प्रतिनिधींस सिंगापुरास जाऊन येण्याकरतां विमानांची सोय करण्याचे हुकूम सुटले. नेताजी जुलै १९४३ ला सिंगापुरांत येऊन पोचले. ४ तारखेस परिषदेचें अधिवेशन भरण्याचें ठरलें होतें. २ व ३ तारखेस नेताजींच्या निवासस्थानीं महत्त्वाच्या गांठीभेटी चाललेल्या होत्या. श्री. रासबिहारी बोस यांच्यावरच नेताजींना दूरपूर्वेंतील सर्व ठळक व महत्त्वाच्या व्यक्ती आणि बाबी परिचित करून देण्याचें कठीण कार्य होतें. अर्थात् ते बहुतेक सर्व वेळ नेताजींच्या बरोबर असत. जपानी युद्धमंडळाच्या हुकुमाप्रमाणें सिंगापुरांतील सर्व श्रेष्ठ जपानी अधिकाऱ्यांनीं आपल्या एक-दोन साथ्यांसह नेताजींची भेट घेऊन त्यांस अभिवादन केलें; परस्परांची ओळख झाली; औपचारिक बोलणें झालें व नेताजींबरोबर पूर्ण सहकार्य करण्यास तयार असल्याची त्यांनीं सविनय ग्वाही दिली. सर्व श्रेष्ठ जर्मन अधिकारी– सिंगापुरास असलेल्या जर्मन आरमाराचे मुख्य – आले व त्यांनीं नेताजींच्या जर्मनीमधील पाहुणचाराची व प्रकृतीची विचारपूस करून त्यांस यथापुर्व जर्मन राष्ट्रातर्फे आपण स्वत: त्यांच्या सेवेस हजर असल्याचें आश्वासन दिलें. श्री. रासबिहारी यांनीं गांवांतील ठळक व्यक्ती त्यांच्या भेटीस आणल्या. ले. क. भोसले व हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या इतर प्रमुख अधिकाऱ्यांच्या व त्यांच्या गांठीभेटी, बोलणें झालें. नंतर वेळोवेळीं प्रसंग साधून व वेळ मिळाला त्याप्रमाणें श्री. रासबिहारींनीं दूरपूर्वेंतील सर्व हिंदी लोकांची माहिती नेताजींस समजावून सांगितली. युद्धबंदी व कॅप्टन मोहनसिंग यांच्या कार्याचीही रूपरेषा त्यांस इत्थंभूत निवेदन

केली. नेताजींनीं एक मिनिटाचाही अवधि वायां न दवडतां म्हणजे अक्षरशः २-३ तासांच्या झोंपेवरच भागवून ती सर्व माहिती आत्मसात् करून घेतली व ऐकीव बातमीवरून कोणत्याही व्यक्तीबद्दल आपलें कसल्याही प्रकारचें बरें किंवा वाईट मत करून न घेतां स्वतःच्या पुढील कार्यांत प्रसंगाप्रसंगानें त्या माहितीचा उपयोग करून घेण्याचें ठरविलें. अशा रीतीनें आल्या क्षणापासून त्यांनीं दोन व तीन तारखेस अव्याहत काम केलें.

श्रीसुभाषचंद्र हे विमानांतून उतरले तेव्हां त्यांनीं खादीचा कोट, टोपी व विजार असा पोषाख परिधान केलेला होता. सिंगापुरांत आपल्या निवासस्थानीं पोहोंचल्यावर त्यांनीं खादीचा सैलसा सदरा, धोतर व टोपी हा त्यांचा हिंदुस्थानांतील नेहमींचा वेष धारण केला. ३ तारखेच्या सायंकाळपर्यंत, हाँगकाँग इंडोचायना, फिलिपीन्स, मान्चूरिया, जावा, सुमात्रा, ब्रह्मदेश इत्यादि दूरपूर्वप्रदेशांतील हिंदी लोकांचे प्रतिनिधी दुसऱ्या दिवशींच्या परिषदेकरतां येऊन दाखल झाले.

सिंगापुरांत असलेल्या सर्वांत मोठ्या अशा सीमेंट काँक्रीटच्या चौदा मजली इमारतींतील तळमजल्यावरच्या मोठ्या सभागृहांत या परिषदेची व्यवस्था करण्यांत आली होती. सभागृहाच्या बाहेरच्या बाजूस सर्व बंदोबस्त हिंदी स्वातंत्र्यसेनेनें ठेविलेला होता. तिरंगी व जपानी पताकांनीं सर्व सभागृह सुशोभित केलेलें होतें. प्रवेशद्वाराच्या बरोबर समोर, पलीकडील बाजूस असलेल्या भिंतीजवळील लाकडी चौथऱ्यावर, दोन खुर्च्या व वर स्वच्छ चादर पसरलेलें एक मेज होतें. दूरध्वनिक्षेपकांचीही व्यवस्था होती. मागील बाजूच्या भिंतीस, एक हिंदी व दुसरा जपानी असे दोन मोठे ध्वज लाविलेले होते. सभागृहांत सुमारें हजार लोकांची बसण्याची व्यवस्था होती. त्यामुळें प्रतिनिधींशिवाय इतरही प्रतिष्ठित गृहस्थांस प्रवेशपत्रें देण्यांत आलीं होतीं. याशिवाय इतरांना आंत प्रवेश नव्हता. त्यामुळें त्यांस बाहेरील अलोट गर्दींत सामील व्हावें लागलें. परिषदेस हिंदी स्वातंत्र्यसेनेचे शंभर-दीडशें वरिष्ठ अधिकारी प्रतिनिधी म्हणून हजर होते. दि. ४ जुलै १९४३ रोजीं सकाळीं बरोबर ८ वाजतां नेताजी, कर्नल भोसले व श्री. रासबिहारी बोस असे तिघे मोटारींतून सभागृहाशीं येऊन थडकले. त्यांच्या मागोमाग निरनिराळ्या मोटारींतून इतर हिंदी आणि जपानी सेनेचे अधिकारी येऊन दाखल झाले. नेताजी व रासबिहारी सभागृहाशीं उतरतांच त्यांना लष्करी सलामी देण्यांत आली. नंतर प्रवेशद्वारांतून स्त्री-पुरुषांनीं भरगच्च खचलेल्या अशा त्या सभागृहांतून जाऊन दोघेही समोरील चौथऱ्यावर स्थानापन्न झाले. त्या वेळीं त्यांच्या नांवांच्या जयघोषानें सभागृह दुमदुमून गेलें.

प्रथमतः कांहीं हिंदी कन्यकांनीं वंदेमातरम् व इतर देशभक्तीपूर्ण पद्यगायन केलें. त्यानंतर दोघांनांही निरनिरनिराळ्या व्यक्तीकडून व संस्थांकडून हार घालण्यांत आले. प्रकृतीच्या दृष्टीनें जर्मनींतील एका वर्षाचें वास्तव्य नेताजींना फायदेशीर

झालें आहे असे त्यांच्या चेहऱ्यावरून स्पष्ट दिसत होतें. त्या वेळेस ते साडे-सेहेचाळीस वर्षांचे होते. रासबिहारी बोस यांचें, बरोबर उलट, म्हणजे साडे-चवसष्ट वय होतें. त्यांची प्रकृति वयोमानानें व इतके दिवसांच्या हालअपेष्टांमुळें बरीच खालावलेली दिसत होती. त्या वेळीं टाळ्यांच्या कडकडाटांत, दूरपूर्वेतील हिंदी स्वातंत्र्यसंघाचे मावळते अध्यक्ष या नात्यानें, श्री. रासबिहारी बोस हे बोलावयास उठले. त्यांनीं आपल्या लांबलचक भाषणांत दूरपूर्वेतील हिंदी स्वातंत्र्यचळवळीचा इतिहास निवेदन केला. आणि ' सर्व एशियाटिक राष्ट्रांत जपाननें स्वतः प्रबल होऊन व पुढाकार घेऊन इंग्लंड आणि अमेरिका यांसारख्या बलाढ्य पाश्चात्य राष्ट्रांशीं सुरू केलेल्या युद्धाचा आपण पूर्ण फायदा घ्यावा व आपलें गमावलेलें स्वातंत्र्य परत मिळविण्याची ही सुवर्णसंधी वांया घालवूं नये ' अशी त्यांनीं सर्वांस कळकळीची विनंति केली. नंतर वाढत्या वयामुळें व खचलेल्या प्रकृतीमुळें, स्वतःस असल्या महत्त्वाच्या कार्याचा भार वाहणें कठीण जात आहे असें त्यांनीं सांगितलें. नंतर आजपर्यंतच्या नेताजींच्या हिंदी स्वातंत्र्याबद्दलच्या आस्थेचें व अविरत कार्याचें सांगोपांग वर्णन करून, प्रस्तुत प्रसंगीं दूरपूर्वेतील हिंदी जनतेच्या विनंतीस मान देऊन नेताजींनीं इकडे येऊन आपल्या कार्याची धुरा वाहण्याचें कबूल केल्याबद्दल त्यांचे अंतःकरण-पूर्वक आभार मानले. शेवटीं, यापुढें स्वातंत्र्यचळवळीचें नेतृत्व व अध्यक्षपदाचें कार्य यांपासून स्वतः निवृत्त होत असल्याबद्दल जनतेची क्षमा मागून, त्या जागीं आपणापेक्षां जास्त उत्साहपूर्ण, तरुण व कार्यक्षम अशा जगद्वंद्य विभूतीची स्थापना करण्यांत आपल्याला धन्यता वाटत असल्याचें त्यांनीं निवेदन केलें. यानंतर नेताजी भाषण करण्यासाठीं उठल्याबरोबर बराच वेळ टाळ्यांच्या कड-कडाटानें व जयघोषांच्या निनादानें सर्व सभागृह भरून गेलें. हा आवाज शांत झाल्यावर नेताजींनीं आपल्या भाषणास सुरुवात केली. ते म्हणाले :

> ' मित्रहो, तुम्ही प्रेमानें ओथंबलेल्या स्तुतिस्तोत्रांचा जो माझ्यावर वर्षाव केलात, त्याच्या वजनाखालीं दडपून गेल्याचा मला भास होत आहे. कारण या सर्वांस मी खरोखर लायक आहे किंवा नाहीं, याची मला जबरदस्त शंका आहे. मी स्वीकारीत असलेलें कार्य किती जोखमीचें आहे, यांची मला पूर्ण कल्पना आहे. श्री. रासबिहारी बोस यांनीं आजपर्यंत दूरपूर्वेत जें जें कार्य केलें, व आपल्या बिघडलेल्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करूनही, युद्ध सुरू होण्याबरोबर हिंदी स्वातंत्र्य-चळवळीस जोराची चालना देऊन, ती इतकी रंगारूपास आणली, त्याबद्दल त्यांस जितके धन्यवाद द्यावेत तितके थोडेच आहेत. साध्या कार्यांतही मनुष्यास हजारों अडचणी असतात. असें असतांना असल्या खडतर कार्यांतून मार्ग काढतांना किती मुत्सद्देगिरीनें, शांतपणानें व कुशलतेनें त्यांना आपली नौका हांकारावी लागली असेल, हें सांगणें

नकोच. आतां माझ्या बाबतींत बोलावयाचें म्हणजे, सशस्त्र लढा पुकारल्याशिवाय कोणालाही स्वातंत्र्य प्राप्त झालेलें नाहीं व म्हणून त्याशिवाय हिंदुस्थानास गत्यंतर नाहीं, अशी माझी बालंबाल खात्री झाली आहे. त्यासाठीं स्वदेशांतच राहून जमवाजमव करणें अशक्य होतें; म्हणून युक्तीयुक्तीनें देशाच्या बाहेर पडून, इंग्रज-अमेरिकनांच्या शत्रुपक्षांतलीं कोणकोणतीं राष्ट्रें आपल्यास मदत करूं शकतील, हें पाहाण्याचा माझा मुख्य हेतु होता. त्याप्रमाणें मी युरोपांतील राष्ट्रांचें निरीक्षण करून त्यांचें मत अजमावण्यासाठीं, आजपर्यंत तिकडे राहिलों. नंतर जपानमध्यें जाऊन, तेथील वरिष्ठ अधिकाऱ्यांशींही वाटाघाटी केल्या. या सर्वांचा निष्कर्ष मी काढला आहे तो असा कीं, हिंदुस्थान इंग्रजांच्या मगरमिठींतून सुटून स्वतंत्र व्हावा, हीच त्या सर्वांची मनापासून इच्छा आहे व ती फलद्रूप होण्याकरतां ते हिंदी लोकांस सर्व तऱ्हेचें साहाय्य देण्यास तयार आहेत. इंग्रज व त्यांचे पित्ते, फॅसिस्ट राष्ट्रांकडे आमचा ओढा असल्याबद्दल नेहमीं बोटें मोडतात. परंतु आम्हांस त्यांच्या अंतस्थ राज्यतंत्राशीं कांहीं कर्तव्य नसून आमच्या कार्यांत जो कोणी आम्हांस मदत करील तो आमचा मित्र होय, असें आम्ही समजतों.

निरनिराळ्या राष्ट्रांच्या स्वातंत्र्यलढ्याच्या अभ्यासानें मला असें दिसून आलें कीं कोणत्याही जिंकलेल्या देशास आपलें स्वातंत्र्य परत मिळविण्यास दोन गोष्टींची मुख्यत: आवश्यकता असते. एक — सशस्त्र लढा चालू करण्याकरतां पुरेसा फौजफांटा व स्वातंत्र्येच्छु लोकांचें स्वतःचें सरकार. हिंदुस्थानांत राहून आजच्या काळीं या दोन्ही बाजू उत्पन्न करणें शक्य नाहीं. परंतु या स्थळीं आपण त्यांची जुळवाजुळव करूं शकतों. या कामीं आपल्या सर्वांच्या सहकार्यानें यशाची अपेक्षा करण्यास मला कांहींच हरकत वाटत नाहीं......... ”

त्यांचें भाषण झाल्यावर ‘ वंदेमातरम् ’ होऊन त्या वेळचा कार्यक्रम समाप्त झाला. पुढील दोन तीन दिवसांत कांहीं महत्त्वाच्या घडामोडींची या परिषदेच्या कार्यांत भर पडल्यामुळें हा सबंध आठवडा नानाविध कार्यक्रमांच्या गर्दींतून निघून गेला. या सर्वांतून वेळ साधून, परिषदेच्या मुख्य प्रतिनिधींच्या खाजगी बैठकी आणि अल्पोपहारादि कार्यक्रमही होत असत. या सर्व प्रसंगीं नेताजी उपस्थित राहात व प्रतिनिधींबरोबर वाटाघाटी करून, जरूर त्या सूचनाही त्यांस करीत असत. प्रथम बैठकींत, त्यांनीं सर्वांस सिंगापुरांतून जाण्यापूर्वीं, आपआपल्या प्रदेशांतील हिंदी लोकांची परिस्थिति, स्वातंत्र्य-चळवळ, तेथील सरकारची सहानुभूति इत्यादि बद्दलचा लेखी अहवाल सादर करण्यास सांगितलें होतें. त्याप्रमाणें तीन-चार दिवसानंतरच्या बैठकींत हे अहवाल त्यांच्या हातीं आले. या कार्यास पोषक अशा लेखी अगर तोंडी सूचना द्यावयाची मुभा सर्वांस ठेवलेली होती. आप-

आपल्या प्रांतीं नेताजींनीं स्वतः येऊन पाहाणी करून, योग्य तें मार्गदर्शन करण्याची सर्वांनीं त्यांस विनंति केली व ती त्यांनीं आनंदानें मान्य केली; पण तत्पूर्वी त्या प्रतिनिधींनीं त्या त्या प्रांतांतील खेडोपाडीं जाऊन सर्वत्र स्वातंत्र्य-संघाचीं केन्द्रें स्थापन करून एकसूत्री संघटनेचें जाळें पसरावें असें त्यांनीं सुचविलें. तसेंच या संघटनेंतील प्रत्येक मनुष्याची नोंद करून त्याचें वय, लायकी, मालमत्ता, कामधंदा इत्यादींची सर्व माहिती असावी असें सुचविलें. परिषदेचें कार्य आटोपल्यावर विमानाची जसजशी सोय झाली तसतसे सर्व प्रतिनिधी आपआपल्या ठिकाणीं परत गेले.

ता. ५ जुलै रोजीं हिंदी स्वातंत्र्यसेनेचा 'मिलिटरी रिव्ह्यू' झाला. याची कल्पना वाचकांस द्यावयाची ती अशी: सिंगापूर शहराच्या दक्षिणेस मुख्य मुख्य भव्य इमारतींपैकीं तेथील म्युनिसिपालिटीच्या कचेरीची एक टोलेजंग इमारत आहे. तिला समुद्राकडे तोंड करून उंच आणि रोमन शिल्पपद्धतीचे भव्य असे खांब आहेत. त्यांच्यापुढें एक विस्तृत दगडी ओटा आहे, त्या ओट्यापासून खालील डांबरी रस्त्यापर्यंत लांब रुंद अशा पायऱ्या गेल्या आहेत. या पायऱ्यांवर एक चौथरा तयार करण्यांत आला होता. त्यावर टेबल, खुर्च्या व मायक्रोफोनची व्यवस्था केलेली होती. तेथें नेताजी, रासबिहारी बोस, कर्नल भोसले, वरिष्ठ जपानी व इतर प्रतिनिधी विराजमान झाले होते. पायऱ्यालगत असलेल्या डांबरी रस्त्याच्या पलीकडे एक हिरवेंगार विस्तीर्ण मैदान होतें. या मैदानापलीकडे पुन्हां एक डांबरी रस्ता असून, त्यापलिकडे समुद्र आहे. येथेंच समुद्रकाठीं १९१४ च्या महायुद्धाच्या स्मरणार्थ एक दगडी खांब व त्याखालीं एक चौथरा उभारलेला आहे. या युद्धस्मारकावर, निरनिराळ्या वृक्षांवर व समुद्राच्या कडेला असलेल्या रस्त्याच्या बाजूस प्रेक्षकांची अतोनात गर्दी झालेली होती. त्या वेळेस हिंदी स्वातंत्र्यसैन्याची संख्या एकंदर दहा हजार होती. या सैन्याच्या निरनिराळ्या तुकड्या आपआपल्या रणसाहित्यासह ज्या क्रमानें नेताजींच्या पुढून जावयाच्या होत्या, त्या क्रमानें, आपआपल्या विशिष्ट गटांत समुद्राच्या काठीं त्या सज्ज करून ठेवलेल्या होत्या. नेताजींनीं त्या ठिकाणीं येऊन, आगाऊ केलेल्या व्यवस्थेप्रमाणें दोरी ओढून तिरंगी ध्वज उभारला. ते ध्वज उभारीत असतां, सैनिकांच्या एका तुकडीनें बँडच्या साथीनें राष्ट्रगीत गाण्यास सुरुवात केली. तें संपेपर्यंत नेताजींनीं ध्वजास सलामी दिली. याचप्रमाणें पुढील दोन वर्षांतील या चळवळींत प्रत्येक समारंभाच्या सुरुवातीस झेंडावंदनाचा व राष्ट्रगीताचा हा विधि पार पाडण्यांत येई. त्या वेळीं नेताजी हजर असल्यास ते स्वतः अगर इतर वेळीं स्वातंत्र्य-सेनेचा वरिष्ठ अधिकारी वरील ध्वज उभारणीचें व सलामीचें कार्य करीत असे.

हा विधि संपवून नेताजी चौथऱ्यावरील आपल्या खुर्चीवर स्थानापन्न झाले. नहमींप्रमाणें त्यांना हार अर्पण केल्यावर, त्यांनीं दूरध्वनिक्षेपकाचे साहाय्यानें

सर्वांस उद्देशून एक भाषण केलें. त्यांत त्यांनीं हिंदी स्वातंत्र्यसेनेचें ध्येय सांगून ती ब्रिटिशांच्या हिंदी सेनेप्रमाणें भाडोत्री नसून, एक क्रांतिकारक आणि ध्येय-वादी संघटना आहे याची सर्वांस जाणीव करून दिली. हिंदी सैनिकांस उद्देशून ते म्हणाले, " ध्येयाकरतां प्राणार्पण करण्याची तुमची तयारी पाहून मला अत्यंत कौतुक व आदर वाटतो. आपलें ध्येय साध्य होईपर्यंत सतत लढणें, अगर मृत्यूस आनंदानें माळ घालणें, या दोन गोष्टी खऱ्या सैनिकास माहीत असतात. अर्थात् तुमच्यापैकीं प्रत्येकजण, या कसोटीस उतरेल, याची मला पूर्ण खात्री आहे..." त्यांचें भाषण झाल्यावर, मैदानापलीकडील समुद्रालगतच्या रस्त्यावर सज्ज असलेल्या सैनिकांच्या तुकड्या हळूहळू पुढें सरकूं लागल्या, आणि त्या रस्त्यानें वळण घेऊन, नेताजींच्या समोरील, चौथऱ्यानजीकच्या रस्त्यावरून जाऊं लागल्या. त्यांच्यापुढें आल्याबरोबर प्रत्येक तुकडी त्यांना सलामी देत असे. प्रथम रणगाडे, नंतर चिलखती गाड्या, त्यांच्यामागून तोफा इत्यादि यांत्रिक युद्ध-सामुग्रीनें सुसज्ज अशा तुकड्या, आपापल्या वेगवेगळ्या गटांनीं त्यांना सलामी देत पुढें सरकल्या. हें सर्व बँडच्या तालावर चाललें होतें. या तुकड्यांच्या मागोमाग पायदळाचे निरनिराळे गट आले. तेही यथापूर्व सलामी देत पुढें गेले.

ता. ६ जुलै १९४३ रोजीं जपानचे मुख्य मंत्री जनरल टोजो हे टोकिओ-हून विमानानें सिंगापुरास येऊन दाखल झाले. त्यांच्या स्वागतासाठीं ठिकठिकाणीं शहरभर कमानी उभारून पताका लावण्यांत आल्या होत्या. तत्पूर्वीं दोन दिवस जनरल टोजो यांच्या सुरक्षिततेसाठीं जपानी पहारेकरी सिंगापूरच्या निरनिराळ्या रस्त्यावर उभे राहून, जाणाऱ्या येणाऱ्या सर्व नागरिकांची कसून झडती घेत असत. आल्यावर जनरल टोजोनीं नेताजींची भेट घेतली आणि हिंदी स्वातंत्र्य-सेनेच्या मिलिटरी रिव्ह्यूची आदल्या दिवशींची हकिगत ऐकून स्वतःची तें दृश्य पाहाण्याची इच्छा प्रदर्शित केली. तीस अनुसरून त्याच दिवशीं तो रिव्ह्यू पुन्हां झाला. या वेळीं चौथऱ्यावरून जनरल टोजो व नेताजी या दोघांनीं स्वातंत्र्यसेनेची सलामी घेतली. अशा रीतीनें दुसऱ्या दिवशींचा कार्यक्रम पार पडला.

यानंतर दुसऱ्या दिवशीं म्हणजे ता. ७ रोजीं सकाळीं जनरल टोजो एकटेच पहाटे फिरावयास म्हणून साध्या पोषाखांत आपल्या निवासस्थानांतून बाहेर पडले. वाटेंत त्यांना कांहीं जपानी अधिकारी आपल्या मोटारींतून जात असल्याचें दिसलें. त्यांस हटकून त्यांनीं त्या अधिकाऱ्यांना खालीं उतरण्यास सांगितलें. विचारपूस करतां ते एक मैलावर असलेल्या जपानी अधिकाऱ्यांकडे कांहीं सरकारी कामानिमित्त जात असल्याचें त्यांनीं सांगितलें. त्याबरोबर जनरल टोजो यांस त्वेष येऊन त्या अधिकाऱ्यांची कानउघाडणी करण्यास त्यांनी सुरु-वात केली. ते म्हणाले, " आपलें राष्ट्र एक जिवावरची लढाई लढत असतां, इतक्या थोड्या अंतरावर तुम्हांला पायीं अगर सायकलीनें जातां आलें असतें.

मोटारगाड्या आणि पेट्रोल यांची आज राष्ट्राला किती गरज आहे याची तुम्हाला कल्पना असावयास पाहिजे. या सर्व युद्धोपयोगी जिनसा तुम्ही जितक्या काट-कसरीनें वापराल तितकें थोडेंच. आपलें राष्ट्र गरीब आहे व आपल्यास जगाशीं टक्कर द्यावयाची आहे, हें विसरूं नका." असें म्हणून ते पुढें चालूं लागले.

इकडे ते जपानी अधिकारीही श्रीमुखांत बसली नाहीं, हें भाग्य समजून, परंतु प्रत्यक्ष जनरल टोजो यांच्या भेटीच्या, शरिरावर शहारे उत्पन्न करणाऱ्या आनंदांत ड्रायव्हरास मोटार परत नेण्यास सांगून पायींच पुढें गेले. नंतर जनरल टोजो जपानी अधिकाऱ्यांच्या एक दोन बंगल्यांत शिरले. या बंगल्यांत पूर्वी वरिष्ठ इंग्रज अंमलदार राहात असल्यामुळें, तेथें ' रिफ्रिजरेटर ' सारख्या सुखसोई होत्या. जनरल टोजोंनीं रेफ्रिजरेटर उघडून आंत काय काय जिन्नस आहेत, त्याची पाहाणी केली. त्यांत त्यांस बटर, ब्रेड, मासे व इतर मांसखंड इत्यादि पदार्थ आढळले. त्याबरोबर त्यांनीं त्या बंगल्यांतील अधिकाऱ्यास खालीं बोला-वून घेऊन, " एवढ्या ऐषआरामांत तुम्ही युद्ध कसलें लढणार ? एकाच मनु-ष्यानें इतके निरनिराळे पदार्थ खाण्याच्या ऐवजीं प्रत्येकानें थोडें व मोजकेंच खाल्लें तर याच अन्नानें पुढें युद्धाच्या आघाडीवर किती सैनिकांचे प्राण वांचतील याची तुम्हांला कल्पना आहे का ? " असा खडसून प्रश्न केला. वर गेल्यावर पलंग आणि त्यावरील गाद्यागिरद्या पाहून त्याबद्दलही तिरस्कार दर्शविला. अशा तऱ्हेनें आपल्या कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या राहाणीची बारकाईनें पाहाणी करून, ते आपल्या निवासस्थानीं परत आले.

जपानी फौजेंतील शिस्त इतक्या पराकोटीस पोंचली होती कीं, कोणताहि सैनिक आपल्या दैनंदिन कार्यांत, आणि प्रत्यक्ष युद्धांतही, कोणत्याही प्रकारची कुचराई करीत नसे. साधी राहाणी आणि वरिष्ठांचा कोणताही हुकूम पार पाड-ण्याची तयारी, त्याचप्रमाणें चुरशीनें प्राणार्पण करण्याची सिद्धता हे गुण सर्व जपानी सैनिकांच्या अंगीं पक्के बाणलेले होते. अर्थात् याबद्दल जपानी अधिकाऱ्यांना मनांतून आनंदच होत असे. परंतु आपल्या हाताखालील लोकांसमोर त्यांचें गुणवर्णन न करितां, राहाणीच्या साधे-पणाविषयीं व शिस्तीच्या कडकपणाविषयींच ते उपदेश करीत असत. सर्व जपानी राष्ट्र हें एकच कुटुंब आहे, अशीच प्रत्येक जपान्यास जन्मतः शिकवण असल्यामुळें ती त्याच्या हाडींमासीं खिळलेली असते. म्हणून कोणत्याही वरिष्ठानें, कनिष्ठास चुकीनें अगर रास्तपणें रागें भरणें अगर मारणें यांत कोणीच गैर समजत नाहीं. कारण प्रत्यक्ष स्वतःच्या कुटुंबांतील वडील माणसाप्रमाणेंच, वरिष्ठाचा अधिकार गणला जातो. या कृत्याबद्दल कनिष्ठानें क्रोध न दर्शवितां, किंवा मनांत आढी न बाळगितां, वरिष्ठानें आपली चूक सुधारल्या-बद्दल आनंद मानावयाचा असतो. उलट वरिष्ठ जितका रागीट असेल, तितका जास्त कर्तव्यदक्ष व शिस्तीचा भोक्ता असा समजला जातो.

नेताजी दोन तारखेस सिंगापुरांत अवतरल्यानंतर, ता. ६ अखेर–त्यांचा खाकी पोषाख तयार होईतों – खादीच्याच पोषाखांत असत. तदनंतर ता. ७ पासून खाकी ब्रीचिस ( मांड्यांशीं फुगीर व गुडघ्यापासून घोट्यापर्यंत तुस्त अशी विजार ) वर लष्करी पद्धतीचा कोट, डोक्यावर लष्करी पद्धतीची घडीची टोपी आणि पायांत गुडघ्यापासून असलेले, मागें स्पर्स् लावलेले लांब बूट, असा लष्करी पद्धतीचाच त्यांचा पोषाख नेहमीं असे. कोटावर उजव्या बाजूच्या वरील खिशावर दोन बिल्ले लाविलेले असत. एक गोल तिरंगी असे व दुसरा सोनेरी रंगाचा असून त्यावर मधोमध निळ्या रंगांत हिंदुस्थानाचा नकाशा कोरलेला असे.

ता. ९ जुलै रोजीं मुख्यतः सिंगापूरच्या हिंदी नागरिकांकरतां, सायंकाळीं नेताजींचें जाहीर व्याख्यान झालें. या व्याख्यानाची व्यवस्थाही म्युनिसिपल इमारतीसमोर असलेल्या विस्तीर्ण मैदानावर करण्यांत आली होती. त्या इमारतीच्या पायऱ्यांवर पूर्वींप्रमाणेंच एक चौथरा उभारून, त्यावर नेताजींनीं दूर ध्वनिक्षेपकाच्या साहाय्यानें भाषण केलें. बरेच सन्माननीय पाहुणेही त्यांच्या शेजारीं विराजमान झालेले होते. पूर्वीं कोणत्याही पुढाऱ्याच्या व्याख्यानाला जमला नव्हता, इतका जनसमुदाय त्या दिवशीं एकत्र आला होता. झाडांवर, इमारतींवर किंवा अन्यत्र चहूंकडे, जेथून कोठून नेताजींचें दर्शन शक्य होतें, अशा सर्व ठिकाणीं मनुष्येंच मनुष्यें दिसत होतीं. या भागांत नेताजींचें हें पहिलेंच जाहीर व्याख्यान असल्यामुळें, आणि तेंही अशा अद्वितीय परिस्थितींत ऐकावयास मिळणार होतें म्हणून, जो तो दृष्टि रोखून आणि कान टवकारून एकाग्र चित्तानें त्यांच्या भाषणाची प्रतीक्षा करीत होता. इतक्या लोकांचीं अंतःकरणें आकर्षित करणारी व्यक्ति खरोखरच असामान्य असली पाहिजे असा साहजिक तर्क करून, कितीतरी विदेशी लोकही त्या ठिकाणीं एकसारखे जमा होत होते. या विस्तीर्ण जनसमुदायांतून अधूनमधून हिंदी स्वातंत्र्यसंघांतले, त्याचप्रमाणें कांहीं जपानी फोटोग्राफरही नेताजींचीं छायाचित्रें घेतांना दिसत होते.

सुरुवातीचें राष्ट्रगायन, हारसमर्पणादि विधि आटोपल्यावर नेताजी भाषण करावयास उभे राहिले. या प्रसंगीं त्यांचा पोषाख खादीचाच होता. ते म्हणाले,

> " मित्रहो, प्रतिनिधींच्या सभेंत मी एकदां उल्लेखिल्याप्रमाणें, आपल्या सर्वांसही हें पूर्णपणें पटलें असेल कीं, हिंदुस्थानांत राहून सशस्त्र क्रांति घडवून आणणें, आजच्या स्थितींत शक्य नाहीं. यासाठीं सध्यांच्या युद्धप्रसंगाचा फायदा घेऊन, या बाबतींत आपल्याला जर्मनी, जपान इत्यादि इंग्रजांच्या शत्रुराष्ट्रांकडून कोणकोणतें साहाय्य मिळणें शक्य आहे, याचें सूक्ष्म अवलोकन करण्यासाठीं प्रथम मी हिंदुस्थानांतून बाहेर पडलों. आणि तसें पुरेसें अवलोकन केल्यावर, आज मी आपणांस निश्चितपणें स्वानुभवानें असें सांगूं शकतों कीं, हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्यसंपादनाकडे या राष्ट्रांची केवळ सहानुभूति आहे एवढेंच नव्हे

तर शस्त्रास्त्रांनीं आणि मनुष्यबळानेंही तीं आपणांस अंतःकरणापासून साहाय्य करण्यास तयार आहेत. म्हणून या अपूर्व संधीचा फायदा घेणें, हें सर्वस्वीं आपल्या प्रयत्नांवर अवलंबून राहील. आपला बंदोबस्त सदोदित पक्का असतो, अशाबद्दल इंग्रज फुशारकी मारीत असतात. परंतु इतकें असूनही मी त्यांच्या हातावर तुरी देऊन निसटून जातांना ते मला अडवूं शकले नाहींत, व आजच्या स्थितींत माझ्या संचारास आळा घालण्याची त्यांची छाती नाहीं. जे मला हिंदुस्थानांतून बाहेर निघतांना अडवूं शकले नाहींत, ते हिंदुस्थानांत पुनश्च पदार्पण करतांनाही मला रोखूं शकणार नाहींत. ' हिंदुस्थानाचें स्वातंत्र्य ' याशिवाय माझ्या रोमरोमांत दुसऱ्या विषयास थारा नाहीं. आणि तीच स्थिति तुम्हां सर्वांची असावी, अशी माझी उत्कट इच्छा आहे. तें साध्य करण्यास मला तुमच्याकडून तीन लाख सैनिक व तीन कोटि रुपयांची आवश्यकता आहे. आजपर्यंत आपल्याला स्वातंत्र्य न मिळण्याचें कारण, आपण स्वातंत्र्याची किंमत दिली नाहीं, हेंच होय.

प्रत्येक वस्तूस तिचें स्वतःचें म्हणून कांहीं ठराविक मूल्य असतें. अर्थात् स्वातंत्र्यास रक्तदान हें आवश्यक आहे. त्याशिवाय स्वातंत्र्यप्राप्ति केव्हांही शक्य नाहीं. तुम्ही रक्त सांडण्याची तयारी करा म्हणजे मी तुम्हांला स्वातंत्र्य मिळवून देण्याची हमी घेतों. यापुढें संपूर्ण स्वार्थत्याग हेंच प्रत्येक हिंदी मनुष्याचें ध्येय असलें पाहिजे. करितां शक्य तितकें मनुष्यबळ, द्रव्यबळ आणि साहित्यबळ जमा करण्याची प्रार्थना मी आपणांस करितों. तिचा अव्हेर आपणांपैकीं कोणीही करणार नाहीं, हें आपल्या सर्वांच्या उत्साहावरून स्पष्ट दिसत आहे. "

वरील प्रकारचें नेताजींचें भाषण त्या दिवशीं अडीच तासपर्यंत चाललें होतें. दरम्यान मुसळधार पाऊस पडला तरी नेताजी अगर श्रोतृबृंद, यांपैकीं कोणीही आपल्या जाग्यावरून हललें नाहीं. यानंतरचें नेताजींचें महत्त्वाचें भाषण म्हणजे १२ जुलै १९४३ चें होय. त्या दिवशीं हिंदी स्वातंत्र्य-संघाच्या स्त्रीशाखेतर्फे सर्व हिंदी स्त्रियांस उद्देशून त्यांचें भाषण ठेवण्यांत आलेलें होतें. याप्रसंगीं ' नेताजी ' सभागृहाबाहेर नेताजी आल्याबरोबर संगीनी लावून बंदुका घेतलेल्या स्त्री स्वयंसेवकांनीं त्यांस लष्करी पद्धतीची सलामी दिली. हें सभागृह हिंदी स्वातंत्र्य-संघाच्या सिंगापूर शाखेच्या कचेरीचें होतें. या संस्मरणीय भाषणांत नेताजी उद्गारले,

" हिंदी स्त्रियांच्या शौर्याची परंपरा फार जुनी आणि उज्ज्वल आहे. हिंदुस्थानांतील आजपर्यंतच्या दुर्गावती, चांदबिबी, पन्नादाई, अहिल्याबाई, जोहारास तयार असलेल्या रजपूत स्त्रिया आणि झांशीची राणी यांची स्फूर्ति तुमच्या अंतःकरणांत सतत जागृत आहेच. १८५७

च्या पहिल्या स्वातंत्र्ययुद्धांत एकच झांशीची राणी झाली. परंतु आपल्या आगामी स्वातंत्र्य-लढ्यांत त्या प्रकारच्या हजार राण्या तुमच्यांतून उत्पन्न झाल्या पाहिजेत. तरच त्या स्मृतीचें सार्थक तुम्ही केल्यासारखें होणार आहे. स्त्रियांचें काम लढण्याचें नाहीं, असें कित्येक म्हणतात. परंतु ती दुबळी आणि कमकुवत मनोवृत्ति आपण सर्वांनीं अंतःकरणांतून पार घालवून दिली पाहिजे. कारण हिंदुस्थानाच्या इतिहासांतील स्त्रियांच्या पराक्रमाचीं हजारों उदाहरणें डोळ्यापुढें असतांना, हें विधान चूक असल्याबद्दलचा दुसरा पुरावा नको. तुम्ही हिंदी स्वातंत्र्य-सेनेच्या सैनिक स्त्रिया जी कामगिरी बजावाल, तीपासून अनेक नैतिक सुपरिणाम घडून येतील. हिंदुस्थानांतील सर्वसाधारण स्त्रियांचीच नव्हे, तर वैश्य वगैरे जमातींच्या पुरुषांचीही समजूत, युद्ध करणें हें आपलें काम नव्हे अशी आहे. त्यांनांही तुमच्या उदाहरणावरून लाज वाटूं लागेल. दुसरें असें कीं तुमच्या अशा धाडसानें चहूंकडे सर्वांच्या अंतःकरणांत युद्धाचेंच दाट वातावरण पसरून राहील. त्यासाठींच आपलें जीवन व इतर मालमत्ता आहे, असें सर्वांस वाटूं लागेल व पदोपदीं त्याप्रमाणें आचार त्याच्या अगर तिच्या हातून घडेल. शिवाय आपल्याकडे मनुष्यबळ कमी असल्यामुळें अप्रत्यक्ष रीतीनें युद्धाला उपकारक अशीं बरीचशीं कार्यें तुम्ही करूं शकाल. आणखी एक दोन विशेष फायदे असे कीं, ब्रिटिश फौजेंतील हिंदी लोकांच्या समोरासमोर केवळ आपली पुरुष-सेनाच उभी असली, तर शत्रूच्या प्रचारामुळें ' आपल्याकडील लोक जपान्यांचे हस्तक आहेत ' असें त्यांस वाटण्याचा संभव आहे. आणि असें झालें तर, आपल्या बांधवांवर शस्त्र उचलण्यास ते मागेंपुढें पाहाणार नाहींत. परंतु तुम्हांस पुढच्या बाजूस उभ्या असलेल्या पाहून, अशा प्रकारचे त्यांच्या अंतरंगींचे विचार तर गळतीलच, परंतु त्यांनीं तुमच्याविरुद्ध उचललेलें शस्त्रही त्यांच्या हातांतून गळून पडेल. हिंदुस्थानांतील स्त्रियांना तुम्ही रणांगणावर गाजवीत असलेल्या शौर्याच्या बातम्या कळतील, तेव्हां देशांतल्या देशांतच क्रांति होण्यास वेळ लागणार नाहीं. स्वतःच्या आयुष्यांतील एका प्रसंगावरून माझी खात्री झाली आहे, स्त्रियाही धाडसाचीं कामें करूं शकतात. किंबहुना अशीं कार्यें करण्यास लागणारे कित्येक अमूल्य गुण स्त्रियांच्याच अंगीं वास करतात. उदाहरणार्थ, पुरुष जितके चंचल, धरसोडवृत्तीचे आणि आरंभशूर असतात, तितक्याच स्त्रिया निश्चयी असून एकदां अंगीकृत केलेलें कार्य शेवटास नेल्याशिवाय राहात नाहींत. पुरुष स्वार्थत्याग करण्यास कचरतो; परंतु स्त्रियांचा पिंडच स्वार्थत्यागाचा बनलेला आहे. एकदां तुरुंगांत असतांना मला एक गुप्त चिठ्ठी एका तरुण मुलीनें आणून

दिली. त्या वेळेस मी तिला विचारलें, " असें कार्य करतांना तुला भीति वाटत नाहीं का ? " त्याबरोबर तिनें पदराखालीं लपविलेला खंजीर दाखवून सांगितलें, "माझें रक्षण करण्यास हा समर्थ आहे......."

भाषण आटोपल्यावर 'तुमच्यापैकीं कितीजणी सैन्यांत दाखल होण्यास तयार आहेत ' असा प्रश्न नेताजींनीं करितांच, एकूण एक सर्वांचे हात वर झाले व सर्वांनीं एकमतानें आपण तयार असल्याचें सांगितलें. नंतर नेताजी मोटारींतून स्वस्थानीं परतले व स्त्रिया आपल्या निश्चयाला पोषक अशा कामांत मग्न झाल्या. यानंतर तीन महिन्यांनीं म्हणजे २२ ऑक्टोबर १९४३ रोजीं 'राणी झांशी' रेजिमेंटचा ट्रेनिंग कँप औपचारिक रीत्या उघडून, स्त्रीसैनिक नोंदवून त्यांस लष्करी शिक्षण देण्यास प्रत्यक्ष सुरुवात झाली. त्यापूर्वीं इतर आवश्यक कामें असल्यामुळें इतका अवधि लागला. परंतु स्त्रियांच्या अंतःकरणांत अत्यंत अधिरता उत्पन्न झाली. नेताजींनीं फुकटच आम्हांला मधाचें बोट लावलें किंवा काय, अशी शंका येऊन वरचेवर त्यांच्याकडून विनंतिवजा अर्ज येत असत. स्त्रियांच्या सर्व कार्यांत प्रथमपासून डॉ. लक्ष्मी यांचा प्रमुख भाग असे.

नेताजी सिंगापुरांत येऊन दाखल झाल्यावर, त्यांच्याकडे निरनिराळ्या गटांकडून, खाजगी व्यक्तींकडून किंवा निनांवीही बरीचशीं पत्रें येत असत. त्यांतील कांहीं जपान्यांच्या सद्हेतुबद्दल शंका घेणारीं, कांहीं मोहनसिंगास परत घेण्याबद्दल शिखांकडून आलेलीं, कांहीं त्यांना तेथील सार्वत्रिक माहिती पुरविणारीं, कांहीं त्यांच्याभोंवतीं असलेल्या व्यक्तींच्या वर्तणुकीवर अगर योग्यतेवर आक्षेप घेणारीं, त्याचप्रमाणें त्यांच्यासाठीं आत्मसमर्पण करावयास तयार असणारांचीं अशीं अनेक पत्रें, अर्ज, विनंत्या नेताजींकडे येऊन त्यांच्या इतर कामांत भर टाकीत.

नंतर ४।५ दिवसांनीं दूरपूर्वेंतील दक्षिणेकडील जावा, सुमात्रा, बोर्निओ इत्यादि भागांतून आलेल्या प्रतिनिधींनीं विनंति केल्याप्रमाणें तेथील हिंदी जनतेस कार्यप्रवण करून त्यांचा उत्साह वाढविण्यासाठीं नेताजी विमानमार्गे सिंगापुरांतून रवाना झाले. अशा प्रकारच्या दौऱ्याच्या सर्व प्रसंगीं निरनिराळ्या ठिकाणीं तद्देशीय जपानी अधिकाऱ्यांकडून त्यांची बरदास्त उत्तम प्रकारें राहावी म्हणून, आगाऊ व तारेनें वा बिनतारी यंत्रानें निरोप जातच असत—परंतु प्रत्यक्ष त्यांच्या बरोबरही दोन वरिष्ठ जपानी अधिकारी व एक दुभाष्या, त्याचप्रमाणें नेताजींचे चार-पांच सहकारीही असत. ठिकठिकाणच्या विमानतळांवर त्यांच्या स्वागतासाठीं तेथील हिंदी स्वातंत्र्यसंघाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष वगैरे प्रमुख मंडळी व वरिष्ठ जपानी अधिकारी हजर असत. तसेंच त्यांच्यासाठीं एक खास बंगला उतरण्याकरतां ठेवलेला असे. त्यांच्या व सहकाऱ्यांच्या तैनातीला दोन मोटारी तयार असत. अशा तऱ्हेनें प्रत्येक ठिकाणीं त्यांची सरबराई अत्यंत कसोशीनें ठेविली जात असे. जावा, बोर्निओ व सुमात्रा या बेटांतील प्रमुख शहरीं त्यांनीं

जाहीर व्याख्यानें दिलीं. लोकांची परिस्थिति समजून घेऊन तेथील प्रतिनिधींशीं त्यांनीं वाटाघाटी केल्या, आणि पूर्वीं इतरत्र उल्लेखिलेलें मनुष्यबळ, द्रव्यबळ व युद्धोपयोगी साहित्य जमविण्याबद्दल त्यांस उपदेश केला. त्याचप्रमाणें तेथील हिंदी स्वातंत्र्यसंघाचीं केंद्रें दूरवर पसरवून, त्यांची कार्यक्षमताही वाढविली. या दौऱ्यांत लोकांनीं स्वयंस्फूर्तीनें संघशः व व्यक्तिशः त्यांस जडजवाहीर, अलंकार आणि प्रत्यक्ष द्रव्यही पुष्कळ अर्पण केलें. अशा रीतीनें दौरा संपवून ऑगस्ट १९४३ च्या सुरुवातीस नेताजी सिंगापुरास परत आले.

युद्धाच्यापूर्वीं बोर्निओ बेट, हें अर्धें डच आधिपत्याखालीं, व अर्धें ब्रिटिशांच्या अंमलाखालीं असे. सर चार्ल्स व्हायनर ब्रूक हा जगांतील एकमेव गोरा राजा ब्रिटिश बोर्निओचा अधिपति असे. जपान्यांनीं काबीज केल्यावर मात्र, सर्व बेट एकाच शासनपद्धतीखालीं आलें होतें. येथें रॉकेल तेलाच्या बऱ्याच खाणी असून, तेथें काम करण्यास आपल्याकडील तामील, तेलगू या जमातींचे बरेच हिंदी मजूर गेलेले आहेत.

सुमात्रा हें डच आधिपत्याखालीं मोठें बेट, अद्याप बहुतांशीं जंगलमय आहे. त्याच्या विस्ताराच्या मानानें तेथें फारच थोडी वसाहत झालेली आहे. तेथें रबराची लागवड झालेली असल्यामुळें मजुरीसाठीं बरेच हिंदी लोक गेलेले आहेत आणि कांहीं हिंदी लोक तेथें व्यापार करून सधन झालेलेही आहेत.

जावा बेटांत डच लोकांची या प्रांतांतील 'बटेव्हिया' ही राजधानी असल्यामुळें, सुमात्रा बेटापेक्षां येथें सर्व बाबतींत जास्त प्रगति झालेली आढळते. मुख्यतः येथें साखरेचे मळे आणि रबराच्या झाडांची लागवड असे दोन मुख्य धंदे आहेत. या दोन्ही धंद्यांसाठीं जावांत बरेच हिंदी मजूर गेलेले असून, हिंदी व्यापारीही संख्येनें सुमात्रापेक्षां साहजिकच जास्त आहेत. ते साखर, रबर, कापड, मसाला इत्यादींचा व्यापार करून उपहारगृहेंही चालवितात.

जावा, सुमात्रा व मलाया या तिन्ही देशांत मलायी भाषाच, सर्वसाधारण लोकांची व्यवहाराची भाषा आहे. धर्मानें ते मुसलमान असून, त्यांची लिपी उर्दू आहे. कांहीं शतकांपूर्वीं अरबी लोकांनीं येथें स्वाऱ्या केल्या त्या वेळीं त्यांनीं सर्वांना बाटवून मुसलमान केलें. परंतु हिंदुस्थानांत 'मुसलमान' या शब्दावरून जी वृत्ति आपल्या डोळ्यासमोर उभी राहाते, त्या दृष्टीनें यांच्याकडे पाहाणें चूक होईल. कारण हे केवळ नांवाचेच मुसलमान आहेत. पूर्वीं त्या प्रांतांत प्रभावी असलेल्या हिंदु संस्कृतीची त्यांच्या मनावर असलेली पकड अद्याप कायम आहे. जावा, सुमात्रा व मलाया यांमधील पुष्कळ गांवांना पूर्वींचींच संस्कृत नांवें अद्यापि कायम आहेत. जावाजवळ एक मथुरा नांवाचें बेट आहे. तेथील विशेषतः उच्च घराण्यांतील लोक स्वतःच्या अबदुल, महम्मद्, हुस्सेन इत्यादि मुसलमानी नांवास राम, लक्ष्मण इत्यादींची जोड नांवांची महती वाढविण्यासाठीं देतात. कित्येक, नवीन मुसलमानी रिवाज स्वीकारूनही, स्वतःचे पूर्व हिंदु रिवाज चालू

ठेवीत असलेले दिसतात. सिंगापूर हें अस्सल सिंहपूरच होय. मलायामध्यें एक जोहर नांवाचें संस्थान आहे, तेथील संस्थानिकांस आजपर्यंत ' महाराजा ऑफ जोहोर ' असेंच म्हणत असतात व तसेंच त्यांच्या मेजावरील आच्छादनांवर अद्याप उठावदार अक्षरांत लिहिलेलें असतें. त्यांच्या राजवाड्यास ' राजस्थाना ' ऐवजीं हल्लीं केवळ ' आस्थाना ' म्हणतात आणि युवराजास ' तुंकु मुकुट ' म्हणतात. येथील पूर्व संस्कृतीचें अस्तित्व दर्शविणारीं, अशा प्रकारचीं किती तरी उदाहरणें देतां येतील. हे सर्व प्रदेश नेताजींनीं आपल्या संचारानें पूनीत केले.

———

## सैन्याची उभारणी : १४

ता. ९ जुलै रोजीं केलेल्या आपल्या भाषणांत, नेताजींनीं तीन लाख सैन्य उभें करण्याचा जो निर्धार प्रगट केला होता, आणि सैनिक म्हणून नांवें नोंदविण्याचा तरुण लोकांस जो आदेश दिला होता, त्यास अनुसरून शरिरानें सुदृढ असलेले १४ वर्षांपासून ते ५० वर्षांपर्यंतचे लोक अहमहमिकेनें पुढें आले आणि ठिकठिकाणच्या हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या कचेऱ्यांत नांवें नोंदून घेण्यासाठीं फार मोठ्या संख्येनें येऊं लागले. इतक्या लोकांचीं नांवें नोंदवून घेण्यास पुरेसे कारकून नसल्यामुळें वरील लोकांस तासन् तास उभें राहावें लागे. अशा स्थितींत सर्व रीतीनें सुसज्ज अशीं लष्करी शिक्षणकेन्द्रें अद्याप अस्तित्वांत आलीं नव्हतीं यांत नवल नाहीं.

अर्थात् हे कारकून ब्रिटिश राजवटींत पूर्वीं वागलेले असल्यामुळें, नांवें नोंदवून घेण्यास किती प्रतिष्ठित लोक आलेले आहेत इकडे लक्ष न देतां, त्यांना " दूर व्हा, येथें गर्दी करूं नका ", " जरा दोन पैशाच्या विड्या घेऊन या बघूं ! " वगैरे अर्थाचे शब्दही बोलत असत. त्यामुळें बऱ्याच लोकांचीं अंतःकरणें व्यथित होत असत. आणि अंतःकरणांत उत्कट प्रेम असूनही ते नांवें नोंदविण्यापासून परावृत्त होत असत. यापासून सार्वजनिक कामें करणारांनीं धडा घेण्यासारखा आहे. ' आपण जनतेचे नोकर आहोंत ' ही भावना लहानापासून थोरापर्यंत सर्व अधिकाऱ्यांनीं व इतर कार्यकर्त्यांनीं सतत मनांत न बाळगल्यास कार्यास मदत होण्याऐवजीं, क्षुल्लक गोष्टीनें विरोधी वातावरणच कसें निर्माण होतें हें वरील उदाहरणावरून प्रत्ययास येईल. अशा रीतीनें खालपासून वरपर्यंत बऱ्याच लोकांनीं आपल्या आढ्यतेनें व मूर्खपणानें, नेताजींच्या कार्याची हानि केली. याउलट नेताजी स्वतः कोणत्याही मनुष्याच्या दर्जाचा, जातीचा, धर्माचा अगर प्रांताचा भेद मनांत मुळींच न आणतां सर्वांशीं अत्यंत विनयानें, सभ्यतेनें व प्रेमानें वागत असत.

हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या रिक्रूटिंग विभागाकडे, सैन्यभरतीचें काम होतें. त्या प्रदेशांत जपानी सरकाराकडून सर्व कामें करून घ्यावयाचीं असल्यामुळें, सुसज्ज अशीं लष्करी शिक्षणकेन्द्रें निर्माण करण्यास बराच अवधि लागला. त्यामुळें कांहीं देशप्रेमी लोक अधिकाऱ्यांच्या गैरवर्तणुकीमुळें रागावून पुन्हां न येण्याचा निश्चय करून निघून गेले. त्याचप्रमाणें कांहीं ' बोलावणें येईपर्यंत आपआपल्या घरींच थांबा ' असा आदेश मिळाल्यामुळें हिरमुसले होऊन परतले आणि

नोकरी वा इतर धंद्यास लागले. कोणी जपानी सरकारच्या निरनिराळ्या खात्यांतून कामास लागले. एकदां कामधंद्यास लागलेला मनुष्य पुन्हा तें सोडून इकडे कशाला येईल? जीवनाची एकदां नीट बसलेली घडी विस्कटून मृगजलाच्या पाठीमागें धांवणें कोणाला आवडेल? भरती होणाऱ्या स्वयंसेवकांच्या व्यवस्थेची तयारी नसल्यामुळें विरोधी प्रचारास पुष्कळ वाव मिळाला. खुद्द नेताजींच्याबद्दल त्या सर्व लोकांचे मनांत उत्कट प्रेमभाव वसत होता यांत मुळींच शंका नाहीं. परंतु त्यांच्या कार्याची अम्मलबजावणी करणाऱ्या लोकांच्या निष्काळजीपणाच्या, बेपर्वाईच्या व पुष्कळ वेळां उद्धटपणाच्या वागणुकीनें ते अगदीं बेजार झाले. येणाऱ्या सर्व लोकांची व्यवस्था लावण्याची तयारी होईपर्यंत सर्वांस जाहीर रीतीनें न बोलविणें हें उत्तम ठरलें असतें.

नेताजींनीं जेव्हां हिंदी स्वातंत्र्यसैन्याची संख्या तीन लाखापर्यंत नेण्याचें ठरविलें आणि ९ जुलै १९४३ रोजीं तसें व्याख्यानांत जाहीर रीतीनें सांगितलें, तेव्हां हिकारी कीकान या जपानी खात्याच्या अधिकाऱ्यांचें कपाळ दुखूं लागलें. प्रत्यक्ष नेताजींस उघड रीतीनें ते कांहींच तसें म्हणूं शकले नाहींत, परंतु आडून आडून त्यांनीं तें ध्वनित करण्याचा प्रयत्न केला. नेताजींस तसें उघड उघड न सांगतां त्यांच्या कानांवर ही गोष्ट जाईल अशा तऱ्हेनें जपानी अधिकारी नेताजींच्या सहकाऱ्यांजवळ गोष्ट काढीत असत कीं, "...हिंदी स्वातंत्र्यसैन्याची संख्या तीन लाखापर्यंत वाढविण्याची नेताजींची इच्छा आहे...अर्थात् तें योग्यच आहे, परंतु हें जाहीर रीतीनें सांगून कसें चालेल? त्या मार्गांत पुष्कळ अडचणी आहेत..." जपानी अधिकाऱ्यांचे असले उद्गार नेताजींचे सहकारी, संधी साधून नेताजींच्या कानांवर घालीत. जेवतांना अशा जपान्यांच्या या 'अव्यापारेषुव्यापार:' वृत्तीवर नेताजी कधीं कधीं हंसत हंसत एकाद-दुसरें वाक्य बोलत असत.

जपानी अधिकाऱ्यांच्या अशा उपद्व्यापामुळें त्यांच्या सद्हेतूबद्दल पुष्कळ वेळां शंका घेण्यास जागा राहात असे. विशेषत: हिकारी कीकानला तर अशा गोष्टींत ढवळाढवळ करण्याचें कांहींच कारण नव्हतें. त्याची भूमिका केवळ 'निरोप्या'ची होती. टोकिओहून वरिष्ठ युद्धमंडळानें नेताजींचें सर्व म्हणणें मान्य करावें व तें प्रत्यक्ष कृतींत उतरवीत असतांना हिकारी कीकाननें त्यांत हजारों अडचणी उत्पन्न कराव्या असें होत असे. घोडें कोठें पेंड खातें हेंच समजत नसे. वर वर 'हो' म्हणून जपानी युद्धमंडळानेंच विघ्नें उपस्थित करण्यास हिकारी कीकान खात्यास गुप्त हुकूम देऊन ठेविले होते कीं तें खातें स्वत:च विघ्नसंतोषीपणास प्रवृत्त झालेलें होतें हें समजण्यास कांहीं मार्ग नव्हता. हिकारी कीकान खात्याचें उद्दिष्ट व या चळवळीच्या मार्गांतील ती कशी मुख्य धोंड होती त्याचा आपण पुढें एका वेगळ्या प्रकरणांत सविस्तर विचार करूं. त्या खात्याच्या ऐवजीं माझ्या मतें दुसरी कोणती व्यवस्था असणें जरूर होतें तेंही

मी त्याच प्रकरणांत सांगण्याचें योजिलें आहे; म्हणून एकीकडे हिंदी स्वातंत्र्य-सैन्याची संख्या तीन लाखापर्यंत वाढविण्याचें नेताजींच्या मनांत असतांना जपान्यांस तें नको होतें एवढेंच येथें सांगून या मुद्याचें विवेचन येथेंच थांबवतों.

केवळ सैनिक होण्यास नांवें नोंदवितील त्यांसच लष्करी शिक्षण द्यावें असें नेताजींचें मत नसून सर्व हिंदी लोकांस म्हणजे बायका, पुरुष, मुलगे, मुली, म्हातारे-कोतारे इत्यादि यच्चयावत् सर्वांस कवाईत, बंदूकीनें नेम मारणें, तलवार व संगिनीनें लढाई करितां येणें असें सैनिकाचें प्राथमिक शिक्षण द्यावें ही त्यांची इच्छा होती. यामुळें घरांतील मुलांबाळांस व म्हाताऱ्या बायका-पुरुषांस लष्करी शिक्षण देऊन त्यांस व्यक्तिशः फायदा कांहीं नाहीं असें जरी घटकाभर धरून चाललें तरी त्यामुळें सबंध समाजाचा दृष्टिकोन बदलण्यास मदत होते. स्वतःस पोहतां येणारे आईबाप 'पाण्याजवळ जाऊं नकारे बाबा' असा भित्रा उपदेश आपल्या मुलांस सहसा करीत नाहींत. लढाईच्या बाबतींतही तीच गोष्ट खरी आहे. 'न्याय्य मागणीकरतां आम्ही युद्ध करूंच' हें कृष्ण-शिष्टाईचें तत्त्व मनांत बिंबण्याकरतां व त्याप्रमाणें झुंज देण्याकरतां मनगटांत जोर असला तरच तोंडांतून तसे शब्द बाहेर पडतात. आपण कमकुवत आहोंत हें ज्यांना पदोपदीं जाणवतें ते सामोपचाराचीच भाषा बोलणार. याच्या उलट लढाई म्हणजे काय ? ती कशी लढतात ? याबद्दल पूर्ण ज्ञान असणारे लोक आपली न्याय्य मागणी पूर्ण करून घेण्याकरतां युद्ध पुकारण्यास मागें पुढें पाहत नाहींत. समाजाच्या रोमरोमांत युद्धाचें वातावरण निर्माण करण्याकरतां व आपण एक जीवन-मरणाचें युद्ध लढत आहोंत, ही जाणीव मनांत ठसविण्याकरतां त्या प्रकारचें वातावरण, घरांत आणि बाहेर, सगळीकडे सतत खेळत ठेविलें पाहिजे. तसला पोषाख, तसलें शिक्षण, तसली चर्चा, तसलीं व्याख्यानें व गाणीं, प्रभात-फेऱ्या; एवंच उठल्यापासून निजेपर्यंत युद्ध हाच एक विषय असला पाहिजे. हा कार्यक्रम जितक्या पूर्णपणें दूरपूर्वेंतील हिंदी लोकांत प्रसृत व्हावयास पाहिजे होता, तितका तो शेवटपर्यंत कधींही पसरला नाहीं.

सर्व आबालवृद्ध स्त्री-पुरुषांनीं प्राथमिक लष्करी शिक्षण घ्यावें एवढ्याकरतां सिंगापूरसारख्या मोठमोठ्या शहरांतील निरनिराळ्या पेठांतून एकादी उघडी मोकळी जागा अथवा मैदान निश्चित केलेलें असे. 'अमुक विभागांतील लोकांनीं अमक्या मैदानावर आपापल्या सोयीप्रमाणें सकाळीं अथवा सायंकाळीं दोन तास लष्करी शिक्षणाकरतां जमावें' अशा तऱ्हेच्या सूचना सिंगापुरांतील इंग्रजी, तामिळ व हिंदुस्थानी वर्तमानपत्रांतून अधून मधून प्रसिद्ध होत. तें शिक्षण द्यावयास हिंदी स्वातंत्र्यसैन्यांतील सैनिक ठरलेल्या वेळीं त्या त्या केंद्रांवर जरूर तें साहित्य घेऊन हजर असत. या सोयीचा जसा फायदा घ्याव तसा जनतेनें घेतला नाहीं. कांहीं उत्साही तरुण सोडून दिले तर इतर नागरिकांपैकीं विशेषसे त्या शिक्षणास हजर राहात नसत. अशा गोष्टी सक्तीशिवाय आम्ही हिंदी लोक करीतच नाहीं.

या नागरिकांवर प्राथमिक (लष्करी) शिक्षणाची सक्ती नसल्यामुळें, त्यांनीं त्याच्याकडे दुर्लक्ष केलें. मी जेव्हां जेव्हां सेरेंबन, ईपो इत्यादि मलायांतील निरनिराळ्या ठिकाणीं दौऱ्यावर जात असें त्या त्या वेळीं तेथील लोकांवर सामाजिक व नैतिक दडपण आणून त्यांनीं लष्करी शिक्षणाकरतां रोज नियमानें स्वतः होऊन उत्साहानें येत जावें या दृष्टीनें पुष्कळ प्रयत्न केले. परंतु मी असेपर्यंतच, कसाबसा मारून मुटकून उत्पन्न केलेला तो उत्साह टिकत असे. अशा रीतीनें सामान्य नागरिकांस लष्करी शिक्षण देण्याचा दूरपूर्वेतील स्वातंत्र्य-चळवळींत प्रयत्न झाला. परंतु वाणी म्हणे, "मी बोलून चालून वाणीच"; पांढरपेशे लोक म्हणत, "आम्ही बोलून चालून खर्डेघाशी करणारे." अशा तऱ्हेनें महार तो महार; चांभार तो चांभार. मग परतंत्र देशांत लढावें कोणी ? आणि स्वातंत्र्य मिळावें कसें ?

मलाया इत्यादि सर्व प्रांत जपान्यांच्या ताब्यांत असल्यामुळें त्यांच्याच मर्जीप्रमाणें सर्व कामें त्यांच्या पाठीमागें लागून करून घ्यावीं लागत. एवढीं हजार, दोन हजार माणसें सैनिक म्हणून भरती करून घ्यावयाचीं व त्यांना निरनिराळ्या केंद्रांमधून लष्करी शिक्षण द्यावयाचें, एवढ्यासाठीं प्रथम एक विस्तीर्ण व मोकळी जागा, नंतर त्यांत सर्वांची राहाण्याची सोय होईल इतक्या झोंपड्या, कपडे, बूट, धनधान्य, रोजच्या भाज्या, दूध तसेंच बंदुकी, संगिनी इत्यादि लढाईचें साहित्य यांची आवश्यकता होती. मलायासारख्या देशांत शांततेच्या काळींसुद्धां टीन आणि रबर यांशिवाय कांहीं उत्पन्न होत नाहीं. सर्व वस्तू बाहेरून आणाव्या लागतात. त्यांत आणखी युद्धानें गोंधळ निर्माण केलेला. जपानसारखा गरीब देश अगोदरच दहा वर्षांपासून चीनशीं लढाईत गुंतलेला आणि त्यांत पुन्हां इंग्रज-अमेरिकनांसारख्या बलाढ्य शत्रूंशीं टक्कर द्यावयाला निघालेला. अशा स्थितींत जपानचें वार्षिक उत्पादन जेमतेम त्याचें त्याला पुरें पडतां पडतां मारामार; मग तो इतरांना धनधान्य, युद्धसामुग्री, कपडेलत्ते इत्यादि कोठून पुरविणार ! आणि तसें, पुरवूं म्हटलें तरी तें पुरविण्यास जहाजें नव्हतीं. तोफा-बंदुकादि शस्त्रास्त्रें, दारूगोळा, कपडा, धनधान्य, मोटारी ही युद्धसामुग्री सिंगापूर पडल्यानंतर इतक्या विपुल प्रमाणांत उपलब्ध होती कीं त्या सामुग्रीवर हिंदी स्वातंत्र्यसैन्याचें सर्व काम भागलें असतें. परंतु तिच्यांतीलसुद्धां बरीचशी जपानी घेऊन गेले. अर्थात् तें सामान नेण्याचा त्यांस हक्क होताच. त्यांत गैर असें कांहींच नाहीं. प्रश्न एवढाच कीं, हिंदी स्वातंत्र्य-चळवळीस शक्य ती सर्व मदत करण्याची त्यांची सदिच्छा असती तर त्यांनीं हें सर्व सामान हिंदी अधिकाऱ्यांच्या हातीं सोंपविलें असतें अथवा स्वतःजवळच, परंतु हिंदी स्वातंत्र्य-चळवळीकरतां राखून ठेवून वेळोवेळीं लागेल तसें पुरविलें असतें. तें त्यांनीं न करितां पहिल्यापासूनच कित्येक गोष्टींबद्दल काचकूच करण्यास सुरुवात केली.

अशा परिस्थितींत प्रत्येक गोष्टीस उशीर लागणें अपरिहार्य होतें. तरीपण अशा अडचणींतूनही मार्ग काढीत हिंदी स्वातंत्र्य-चळवळीचें काम पुढें रेटलें जात होतें. सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या तारखेस सेलेतार छावणींत सिंगापुरांतील पहिलें लष्करी शिक्षणाचें केंद्र उघडण्यांत आलें. येथील युद्धबंदी दुसरीकडे हालविण्यांत आलेले होते. यानंतर एकामागून एक ठिकठिकाणीं नवीन नवीन केंद्रें उघडण्यांत आलीं. सेरेंबन, क्वोलालंपूर, ईपो इत्यादि मलायांतील प्रमुख शहरीं एक एक केंद्र उघडण्यांत आलें. चीन देशांतील शांघाय व सयाममधील चोलबुरी या शहरांतही त्या त्या प्रदेशांतील हिंदी लोकांच्या सोईसाठीं एक एक लष्करी केंद्र उघडण्यांत आलें. ब्रम्हदेशांतील रंगूनमध्यें व इतर प्रमुख शहरांत मिळून चार केंद्रें सुरू करण्यांत आलीं. ठिकठिकाणच्या हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या शाखांनीं सैन्यांत भरती होऊं इच्छिणाऱ्या लोकांच्या याद्या केलेल्या होत्या, त्यांतील लोक त्यांनीं जवळच्या केंद्रांतून शिक्षण घेण्यासाठीं पाठविले. या सर्व केंद्रांतून एका वेळीं सुमारें दहा हजार सैनिक तयार होऊन निघत. प्रत्येक गटास आपलें शिक्षण पूर्ण करण्यास तीनपासून सहा महिने लागत. अशा रीतीनें प्रत्येक गट शिक्षण घेऊन तयार झाला कीं एक मोठा समारंभ होऊन त्यास हिंदी स्वातंत्र्य-सैन्याच्या एकाद्या विशिष्ट तुकडींत सामील करून घेण्यांत येई. अशा-रीतीनें तें केंद्र रिकामें झालें कीं पुन्हां त्यांत स्वातंत्र्यसंघाच्या रिक्रूटभरती शाखे-कडून रिक्रूटांचा दुसरा गट लष्करी शिक्षणाकरतां पाठविण्यांत येई. नंतर त्याचें शिक्षण संपलें म्हणजे त्यांतील लोकांसही सैनिक म्हणून हिंदी स्वातंत्र्य-सैन्यांत दाखल करून घेण्यांत येई. अशा तऱ्हेनें प्रत्येक लष्करी शिक्षणाच्या केंद्रांतील काम चालत असे.

क्रांतिकारक संघटनेंत साध्या नागरिकाचा साधा शिपाई तयार करण्यास तीन महिन्यापेक्षां जास्त अवधी लागूं नये. त्यास प्रत्यक्ष लढाईच्या ज्या गोष्टी शिकाव्या लागतात त्या अशाः— कवाईत, बंदुकीनें नेम मारणें, हातघाईच्या लढाईचा प्रसंग आल्यास, बंदुकीच्या पुढच्या टोंकास लाविलेल्या संगिनीनें शत्रूवर वार करावयास शिकणें, गनिमी काव्यानें अचानक हल्ला करून, विद्युत् वेगानें नाहींसें होणें, जंगल प्रदेशाच्या नकाशावरून इष्ट ठिकाणाचा पत्ता लावतां येणें, खाणाखुणांच्या साहाय्यानें कोलाहल न करितां दूरवर उभ्या अस-लेल्या मित्रास गुप्त संदेश सांगतां येणें इत्यादि. एवढ्या गोष्टी तीन महिन्यांत शिकणें सहज शक्यं आहे. परंतु प्रत्येक केंद्रांतून सतत दहा-पंधरा दिवस तरी प्रत्येक रिक्रूटास प्रत्यक्ष गोळीबाराची भरपूर संवय करितां येईल इतक्या दारू-गोळ्याची आवश्यकता असते. त्याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांस लगेच सैन्यांत भरती करून आघाडीवर नेऊन प्रत्यक्ष लढाईत नेऊन आणावें लागतें. लष्करी शिक्षणाची उजळणी रणांगणावरच झाली पाहिजे; तरच ते शिकलेले धडे मनांत पक्के ठसतात. मग वाटल्यास त्यांना पुन्हां आघाडीवरून काढून

कांहीं दिवस मागें ठेवावें, विश्रांति द्यावी; दिसतील त्या चुका त्यांच्या लक्षांत आणून द्याव्या व पुन्हां आघाडीवर पाठवावें. हिंदी स्वातंत्र्य-चळवळीच्या या लष्करी शिक्षणकेंद्रांतून मात्र खरोखरच्या गोळीबाराचा अनुभव या भावी सैनिकांस अगदींच अल्प प्रमाणांत देतां येत असे. कारण बंदुकीच्या गोळ्यांचा पुरवठा अगदींच कमी होता. शिकून तयार झालेल्या सैनिकांस चटकन् आघाडीवर नेऊन लढाईचा प्रत्यक्ष अनुभव घेऊं देण्याची व्यवस्था नव्हती. कारण सिंगापुराहून ब्रम्हदेशाची सरहद्द फार लांब होती. या दोन प्रदेशांस जोडणारी आगगाडी ही जेमतेम जपानी सैन्याच्या हालचालींच्या गरजा भागवूं शकत असे.

सिंगापुरांतील सर्व युद्धबंद्यांपैकीं केवळ अठरा हजार युद्धबंदीच हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत सामिल झालेले होते; व नेताजी सिंगापुरांत प्रथमच येऊन दाखल झाले त्या वेळीं तेवढीच काय ती हिंदी स्वातंत्र्यसैन्याची शिरगणती होती. अठरा हजारांवरून ती तीन लाख करण्याचा नेताजींचा मानस होता, एवढ्या-करतां लष्करी शिक्षणाचींही विविध केंद्रें उघडण्यांत आलेलीं होतीं. दूरपूर्वेंत वस्ती करून राहिलेल्या पंचवीस लाख हिंदी लोकांपैकीं निदान २८२००० लोकांनीं तरी सैनिक म्हणून सैन्यांत दाखल व्हावें अशी नेताजींची इच्छा होती. युद्धबंद्यांपैकीं जे १८००० सैनिक हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत आलेले होते त्यांस ( डॉक्टर, कारकून इत्यादि वगळून ) सर्वसाधारणपणें प्राथमिक लष्करी शिक्षण मिळालेलें होतें; व अर्थांत तेच लोक इतर रिक्रूटांस शिक्षण देणार. हिंदी स्वातंत्र्य-सैन्याच्या मुख्य कचेरीनें योग्य ते सैनिक निवडून निरनिराळ्या लष्करी केंद्रांवर त्यांची नेमणूक केली. प्रत्येक केंद्राचा मुख्य अधिकारी कॅप्टनच्या अथवा मेजरच्या हुद्याचा असे. त्याचा मदतनीस एक लेफ्टनंट. त्यांच्या हाताखालीं रिक्रूटांच्या निरनिराळ्या तुकड्यांस कवाइतीचें, बंदुका चालविण्याचें वगैरे शिक्षण देण्यास बरेच दुय्यम अधिकारी, व इतर कामांसाठीं कांहीं कारकून इत्यादि असत. त्या सर्वांची खाण्यापिण्याची व्यवस्था बघणारा एक कोठारी-अधिकारी असे. अशा तऱ्हेनें प्रत्येक लष्करी शिक्षणकेंद्रावर १५-२० जणांचा अधिकारीवर्ग हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या मुख्य कचेरीतर्फे नेमला जात असे. रिक्रूटांच्या संख्येप्रमाणें त्यांचें धान्य, जळण, कपडालत्ता, बूट वगैरे सामान स्वातंत्र्यसंघातर्फे पुरविण्यांत येई.

प्रत्येक लष्करी शिक्षणकेंद्रावर असा दुहेरी अंमल ( स्वातंत्र्यसंघाचा व सैन्याचा ) असल्यामुळें या दोन्ही संघटनांचे अधिकारी, देखरेखीकरतां त्या केंद्रांस भेट देत तेव्हां क्वचित् रुसवा-रुसवी, मान-अपमान, व एकमेकांचे गैरसमज होत. अमकें काम सैन्याच्या अधिकाऱ्यांच्या कक्षेंतील कीं संघाच्या कक्षेंतील असल्या रिकाम्या वादविवादांतच बरेचसे दिवस जाऊन त्यावर पुष्कळ पत्र-व्यवहार होई व खरें काम करण्याचें बाजूलाच राहून बिचाऱ्या रिक्रूटांचें

नुकसान होत असे. स्वयंपाकाच्या भांड्यांना भोकें पडल्यामुळें त्यांतील जिन्नस शिजावयाच्या आधींच त्यांतील पाणी निघून जाई व कच्चा भात खाण्याचें त्या रिक्रूटांच्या नशिबीं येई. आधींच लष्करी स्वयंपाक काय विचारतां ! त्यांत पुष्कळसे खडे, कधीं धुरकटलेला, तर कधीं करपलेला असा भात; डाळ तळाला आणि पाणी वर अशी आंबटीची स्थिती. वास्तविक कोणत्याही संघटनेनें अशा वेळीं तावडतोब भांडीं आणून द्यावी आणि मग वाटल्यास वादविवाद करीत बसावें. दोन्ही संघटना म्हणजे एकाच चळवळींचे दोन खिसे; मग कोणीही पैसे खर्च केले तरी रिकाम्या झालेल्या खिशांत दुसऱ्या खिशांतील पैसे केव्हांही टाकतां येतील, हें ध्यानीं यावयास पाहिजे होतें. परंतु आपल्या दैनंदिन व्यवहारांत पैशाच्या देवघेवींत रिकामा, स्वार्थी अडेलतट्टूपणा दाखविणारे, अशा चळवळींत सुद्धां तेंच धोरण नकळत अंगिकारितांना दिसलें. दिवसभराच्या श्रमानें थकून गेलेले बिचारे रिक्रूट गळक्या भांड्यांत शिजलेलें कच्चें अन्न खाऊन आजारी पडत. त्यांतील कित्येक सधन घराण्यांतील असून, आपले पैसे, मालमत्ता, धनदौलत इत्यादि सर्व चळवळीस अर्पण करून स्वतः शिपाईगिरी करण्यास सिद्ध झालेले होते. या त्यांच्या स्वार्थत्यागाचें कौतुक करून त्यांस मानानें व इभ्रतीनें वागविण्याचें तर बाजूलाच राहिलें उलट, त्यांस सैन्यांतील अधिकारीवर्गाचे शिव्याशापच खावे लागत. अधिकारी वर्गाच्या या वर्तणुकीस सुद्धां त्यांची पूर्वींची ब्रिटिश सैन्यांतील निंद्य परंपराच कारणीभूत होती. इंग्रजप्रणीत हिंदी सैन्यांत शिपायाला अगदीं तुच्छ लेखण्यांत येतें; कारण तो म्हणजे एकाद्या गरीब गांवढळ घराण्यांतील अडाणी माणूस, अशीच त्याच्याविषयीं अधिकाऱ्यांची समजूत असते. याच्या उलट एकाद्यास कांहीं येत नसलें तरी त्याला अधिकारीपदावर चढविण्यांत येतें; आणि तें मात्र तो श्रीमंत आणि इंग्रजी बोलतां येणारा म्हणून त्याला फार शहाणा समजून ! या इंग्रज-शिक्षित अधिकाऱ्यांत हा दूषित दृष्टिकोन शेवटपर्यंत कायमच होता. त्यांच्या अशा या अरेरावी आणि तुच्छतादर्शक वृत्तीमुळें, सर्वत्याग करून देशसेवा करावयास आलेल्या स्वयंसेवकांचा फारच हिरमोड झाला. कित्येकांनीं तर या अपमानास्पद वर्तणुकीस कंटाळून देशसेवा करण्याचें बाजूलाच ठेवून, अधिकारीवर्गाच्या या कृत्यांचा सूड घेण्याचेंही ठरविलें.

युद्धबंद्यांतील स्वयंसेवक बनलेले लोक हे जुन्या इंग्रजप्रणीत सैन्यांतीलच असल्यामुळें बहुतेक पंजाबी होते व तेच बहुधा लष्करी शिक्षण-केंद्रांच्या अधिकारीवर्गांत असत. याच्या उलट दूरपूर्वेंत स्थायिक झालेल्या मद्रासी लोकांचा मुख्यतः रिक्रूटांत जास्त भरणा असे. हिंदुस्थानांतील दोन टोंकाच्या या दोन प्रांतांतील लोकांच्या स्वभावांतही फार फरक असतो. मद्रासी हे भात खाणारे, हुशार, भावनावश, तामीळ भाषा बोलणारे व शरीरप्रकृतीनें दुर्बळ व खुजे तर पंजाबी हे रोटीखाऊ, हडेलहप्पी, आडमुठे, आडदांड, भरभक्कम

कांहीं दिवस मागें ठेवावें, विश्रांति द्यावी; दिसतील त्या चुका त्यांच्या लक्षांत आणून द्याव्या व पुन्हां आघाडीवर पाठवावें. हिंदी स्वातंत्र्य-चळवळीच्या या लष्करी शिक्षणकेंद्रांतून मात्र खरोखरच्या गोळीबाराचा अनुभव या भावी सैनिकांस अगदींच अल्प प्रमाणांत देतां येत असे. कारण बंदुकीच्या गोळ्यांचा पुरवठा अगदींच कमी होता. शिकून तयार झालेल्या सैनिकांस चटकन् आघाडीवर नेऊन लढाईचा प्रत्यक्ष अनुभव घेऊं देण्याची व्यवस्था नव्हती. कारण सिंगापुराहून ब्रम्हदेशाची सरहद्द फार लांब होती. या दोन प्रदेशांस जोडणारी आगगाडी ही जेमतेम जपानी सैन्याच्या हालचालीच्या गरजा भागवूं शकत असे.

सिंगापुरांतील सर्व युद्धबंद्यांपैकीं केवळ अठरा हजार युद्धबंदीच हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत सामिल झालेले होते; व नेताजी सिंगापुरांत प्रथमच येऊन दाखल झाले त्या वेळीं तेवढीच काय ती हिंदी स्वातंत्र्यसैन्याची शिरगणती होती. अठरा हजारांवरून ती तीन लाख करण्याचा नेताजींचा मानस होता, एवढ्या-करतां लष्करी शिक्षणाचींही विविध केंद्रें उघडण्यांत आलेलीं होतीं. दूरपूर्वेंत वस्ती करून राहिलेल्या पंचवीस लाख हिंदी लोकांपैकीं निदान २८२००० लोकांनीं तरी सैनिक म्हणून सैन्यांत दाखल व्हावें अशी नेताजींची इच्छा होती. युद्धबंद्यांपैकीं जे १८००० सैनिक हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत आलेले होते त्यांस (डॉक्टर, कारकून इत्यादि वगळून) सर्वसाधारणपणें प्राथमिक लष्करी शिक्षण मिळालेलें होतें; व अर्थांत तेच लोक इतर रिक्रूटांस शिक्षण देणार. हिंदी स्वातंत्र्य-सैन्याच्या मुख्य कचेरीनें योग्य ते सैनिक निवडून निरनिराळ्या लष्करी केंद्रांवर त्यांची नेमणूक केली. प्रत्येक केंद्राचा मुख्य अधिकारी कॅप्टनच्या अथवा मेजरच्या हुद्याचा असे. त्याचा मदतनीस एक लेफ्टनंट. त्यांच्या हाताखालीं रिक्रूटांच्या निरनिराळ्या तुकड्यांस कवाइतीचें, बंदुका चालविण्याचें वगैरे शिक्षण देण्यास बरेच दुय्यम अधिकारी, व इतर कामांसाठीं कांहीं कारकून इत्यादि असत. त्या सर्वांची खाण्यापिण्याची व्यवस्था बघणारा एक कोठारी-अधिकारी असे. अशा तऱ्हेनें प्रत्येक लष्करी शिक्षणकेंद्रावर १५-२० जणांचा अधिकारीवर्ग हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या मुख्य कचेरीतर्फे नेमला जात असे. रिक्रूटांच्या संख्येप्रमाणें त्यांचें धान्य, जळण, कपडालत्ता, बूट वगैरे सामान स्वातंत्र्यसंघातर्फे पुरविण्यांत येई.

प्रत्येक लष्करी शिक्षणकेंद्रावर असा दुहेरी अंमल (स्वातंत्र्यसंघाचा व सैन्याचा) असल्यामुळें या दोन्ही संघटनांचे अधिकारी, देखरेखीकरतां त्या केंद्रांस भेट देत तेव्हां क्वचित् रुसवा-रुसवी, मान-अपमान, व एकमेकांचे गैरसमज होत. अमकें काम सैन्याच्या अधिकाऱ्यांच्या कक्षेंतील कीं संघाच्या कक्षेंतील असल्या रिकाम्या वादविवादांतच बरेचसे दिवस जाऊन त्यावर पुष्कळ पत्र-व्यवहार होई व खरें काम करण्याचें बाजूलाच राहून बिचाऱ्या रिक्रूटांचें

नुकसान होत असे. स्वयंपाकाच्या भांड्यांना भोकें पडल्यामुळें त्यांतील जिन्नस शिजावयाच्या आधींच त्यांतील पाणी निघून जाई व कच्चा भात खाण्याचें त्या रिक्रूटांच्या नशिबीं येई. आधींच लष्करी स्वयंपाक काय विचारतां! त्यांत पुष्कळसे खडे, कधीं धुरकटलेला, तर कधीं करपलेला असा भात; डाळ तळाला आणि पाणी वर अशी आंबटीची स्थिती. वास्तविक कोणत्याही संघटनेनें अशा वेळीं ताबडतोब भांडीं आणून द्यावी आणि मग वाटल्यास वादविवाद करीत बसावें. दोन्ही संघटना म्हणजे एकाच चळवळींचे दोन खिसे; मग कोणीही पैसे खर्च केले तरी रिकाम्या झालेल्या खिशांत दुसऱ्या खिशांतील पैसे केव्हांही टाकतां येतील, हें ध्यानीं यावयास पाहिजे होतें. परंतु आपल्या दैनंदिन व्यवहारांत पैशाच्या देवघेवींत रिकामा, स्वार्थी अडेलतट्टूपणा दाखविणारे, अशा चळवळींत सुद्धां तेंच धोरण नकळत अंगिकारितांना दिसलें. दिवसभराच्या श्रमानें थकून गेलेले बिचारे रिक्रूट गळक्या भांड्यांत शिजलेलें कच्चें अन्न खाऊन आजारी पडत. त्यांतील कित्येक सधन घराण्यांतील असून, आपले पैसे, मालमत्ता, धनदौलत इत्यादि सर्व चळवळीस अर्पण करून स्वतः शिपाईगिरी करण्यास सिद्ध झालेले होते. या त्यांच्या स्वार्थत्यागाचें कौतुक करून त्यांस मानानें व इभ्रतीनें वागविण्याचें तर बाजूलाच राहिलें उलट, त्यांस सैन्यांतील अधिकारीवर्गाचे शिव्याशापच खावे लागत. अधिकारी वर्गाच्या या वर्तणुकीस सुद्धां त्यांची पूर्वींची ब्रिटिश सैन्यांतील निंद्य परंपराच कारणीभूत होती. इंग्रजप्रणीत हिंदी सैन्यांत शिपायाला अगदीं तुच्छ लेखण्यांत येतें; कारण तो म्हणजे एकाद्या गरीब गांवढळ घराण्यांतील अडाणी माणूस, अशीच त्याच्याविषयीं अधिकाऱ्यांची समजूत असते. याच्या उलट एकाद्यास कांहीं येत नसलें तरी त्याला अधिकारीपदावर चढविण्यांत येतें; आणि तें मात्र तो श्रीमंत आणि इंग्रजी बोलतां येणारा म्हणून त्याला फार शहाणा समजून! या इंग्रज-शिक्षित अधिकाऱ्यांत हा दूषित दृष्टिकोन शेवटपर्यंत कायमच होता. त्यांच्या अशा या अरेरावी आणि तुच्छतादर्शक वृत्तीमुळें, सर्वत्याग करून देशसेवा करावयास आलेल्या स्वयंसेवकांचा फारच हिरमोड झाला. कित्येकांनीं तर या अपमानास्पद वर्तणुकीस कंटाळून देशसेवा करण्याचें बाजूलाच ठेवून, अधिकारीवर्गाच्या या कृत्यांचा सूड घेण्याचेंही ठरविलें.

युद्धबंद्यांतील स्वयंसेवक बनलेले लोक हे जुन्या इंग्रजप्रणीत सैन्यांतीलच असल्यामुळें बहुतेक पंजाबी होते व तेच बहुधा लष्करी शिक्षणकेंद्रांच्या अधिकारीवर्गांत असत. याच्या उलट दूरपूर्वेंत स्थायिक झालेल्या मद्रासी लोकांचा मुख्यतः रिक्रूटांत जास्त भरणा असे. हिंदुस्थानांतील दोन टोंकाच्या या दोन प्रांतांतील लोकांच्या स्वभावांतही फार फरक असतो. मद्रासी हे भात खाणारे, हुशार, भावनावश, तामीळ भाषा बोलणारे व शरीरप्रकृतीनें दुर्बळ व खुजे तर पंजाबी हे रोटीखाऊ, हडेलहप्पी, आडमुठे, आडदांड, भरभक्कम

व धिप्पाड. इंग्रजांनीं घालून दिलेल्या पायंड्यानें पंजाबी अधिकारीवर्गांतील कांहीं इसम या मद्राश्यांची 'भातखाऊ व हेंगाडी भाषा बोलणारे' अशी हेटाळणी करीत व त्यांस निरनिराळ्या प्रकारांनीं त्रास देत. या त्यांच्या वर्तनास कंटाळून, निघून जाऊं म्हणावें तर लष्करी कायद्याप्रमाणें शिक्षा देणें त्या अधिकाऱ्यांच्याच हातीं. शिवाय एकदां फौजेंत शिरल्यावर लष्करी कायद्याप्रमाणें तींतून निघतां येत नाहीं. पिंजऱ्यांत अडकणें सोपें असतें परंतु त्यांतून सुटणें फार कठीण असतें. सैन्यांतून निघून गेल्यास नेताजींना वाईट वाटावयाचें. पुन्हा सैन्यांतून निघून कामधंदा तरी काय करावयाचा? कारण लष्करी शिक्षणकेंद्रांत नांव दाखल करितांनाच प्रत्येकानें आपल्या कामधंद्याची विल्हेवाट लावलेली होती.— अशा परिस्थितींमुळें कांहीं शिक्षणकेंद्रांतील रिक्रूटांनीं अधिकाऱ्यांच्या अरेरावी कारभाराविरुद्ध अन्नसत्याग्रह सुरू केला. कांहीं ठिकाणीं उघड बंडही झालें. नेताजीबद्दल मात्र सर्व रिक्रूटांच्या मनांत इतका पूज्यभाव वसत होता कीं त्यांचा प्रत्येकास आधार वाटे. ते सिंगापुरांत असतांना सेलेतार छावणींत असा एकही प्रकार घडला नाहीं. परंतु महिन्या दोन महिन्याकरतां ते बाहेर गेले कीं अधिकाऱ्यांच्या गैर वर्तणुकीला ऊत येत असे; आणि रिक्रूटांस तें असह्य झालें म्हणजे त्या प्रकारास तोंड फुटे. नेताजींना मात्र स्वतःचें वजन खर्च करून व आपला अमूल्य वेळ फुकट घालवून असलीं प्रकरणें निस्तरावीं लागत.

दूरपूर्वेतील दोन वर्षांच्या स्वातंत्र्य-चळवळींत अशा दहा लष्करी शिक्षणकेंद्रांतून एकंदर वीस हजार स्वयंसेवक सैनिक म्हणून तयार झाले. हिंदी स्वातंत्र्यसैन्याची संख्या युद्ध संपण्याच्या सुमारास ४०,००० होती. पैकीं वीस हजार, युद्धबंद्यांतून हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत सामील झालेले होते प्रथम एक दोन खेपेस सर्व लष्करी शिक्षणकेंद्रें स्वयंसेवकांनीं पूर्ण भरलेलीं होतीं; परंतु पुढें पुढें अधिकाऱ्यांच्या गैर वर्तणुकीची बातमी जेव्हां बाहेर फुटूं लागली तेव्हां मात्र पूर्वींइतके लोक स्वयंसेवक म्हणून नांव दाखल करण्यास पुढें येईनासे झाले. १९४४ च्या उत्तरार्धापासून सर्व लष्करी शिक्षणकेंद्रें जेमतेम अर्धीं भरलेलीं असत. पुढें पुढें जपान्यांनींही दिसेल त्या गरीब हिंदी माणसास धरून सुमारें एक लाख लोकांना सयाम-ब्रम्हदेश आगगाडीचा नवीन रस्ता तयार करण्यास पाठविलें. तेथें त्या दाट जंगलांत रोगराईनें, औषधोपचाराच्या अभावीं, जंगलांतील ओलीनें आणि निकृष्ट तऱ्हेच्या अन्नामुळें त्यांतील अर्ध्याच्यावर लोक मेले व इतर अर्धमेल्या परिस्थितींत कसेबसे परत आले. अशा निरनिराळ्या कारणामुळें सुरुवातीचा उत्साह ओसरून स्वयंसेवकांच्या संख्येला ओहोटी लागली. शिवाय निरनिराळ्या अडचणी उपस्थित करून हिकारी कीकान हिंदी स्वातंत्र्यसेनेची संख्या वाढविण्याच्या मार्गांत अडथळे आणीतच होती. म्हणून तीन महिन्याचा शिक्षणक्रम पुरा करूनही सैन्यांत घेतां येणें शक्य नसल्यामुळें स्वयंसेवकांस तद्नंतर झालेल्या

अभ्यासक्रमाची उजळणी करीत सहा महिने, नऊ महिने, क्वचित वर्षभरही आपापल्या केंद्रांत ' रंगरूट ' म्हणूनच राहावें लागे. आपण लढावयास म्हणून आलों व वर्ष झालें तरी आपल्याला अजून सैनिक म्हणून सैन्यांतहि दाखल करून घेतलें नाहीं, हे पाहून तोच तोच शिक्षणक्रम ध्येयशून्य रीतीनें पुन्हा पुन्हा उगाळीत बसावें लागल्यामुळें स्वयंसेवकांचा उत्साह पार ओसरून जाऊन 'कोठून या भानगडींत सांपडलों ' असें त्यांस होऊन जाई !

लष्करी शिक्षणकेंद्रांतून कोणकोणते विषय शिकविले जात याचा निर्देश वर आलेलाच आहे. प्रत्येक स्वयंसेवकास सकाळीं लवकर उठून प्रातर्विधि व चहा आटोपून, आपापलें बराकींतील सर्व सामान गुंडाळून व्यवस्थित ओळीनें ठेवावें लागे. नंतर सांघिक व्यायाम, कवाईत, संगिनीची लढाई, गोळीबार, शत्रूवर तुटून पडणें, गुप्त संदेश पाठविणें, गनिमी कावा, शत्रूची बातमी काढून आणणें, गुप्त कामगिरी करणें इत्यादि विषय सकाळ-दुपार-संध्याकाळ उघड्या मैदानावर, गटागटानें शिकविले जात. उरलेल्या वेळांत वर्गांत बसल्याबसल्या कांहीं विषयांचें शिक्षण दिलें जाई. उदा:—राष्ट्रभाषा म्हणून हिंदुस्थानी शिकविणें, नकाशावरून एकाद्या जागेचा पत्ता लावणें, देशाकरतां आनंदानें प्राण देण्याची तयारी होण्याच्या दृष्टीनें निरनिराळीं व्याख्यानें ऐकविणें; इत्यादि.

हीं दहा लष्करी शिक्षणकेंद्रें तीन तीन महिन्यांचा शिक्षणक्रम ठरवून दोन वर्षांच्या अवधींत एकंदर सुमारें ८०,००० सैनिक तयार करूं शकलीं असतीं. परंतु दर तीन महिन्यांनीं दहा हजार सैनिकांची वाढ हिंदी स्वातंत्र्य-सैन्यांत होऊं नये म्हणून जपान्यांनीं पुष्कळ तात्त्विक अडचणी निर्माण करून ठेविल्या होत्या. अर्थात् मोठ्या मिनतवारीनें दरवर्षीं दहा दहा हजार याप्रमाणें फक्त वीस हजारांचीच वाढ हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या संख्येंत होऊं शकली. जपान्यांनीं अडचणी उत्पन्न केल्या तरी त्यांना न जुमानतां हिंदी स्वातंत्र्यसैन्य कां वाढविण्यांत आलें नाहीं असा प्रश्न उद्भवणें साहजिक आहे. पण त्याचें उत्तर असें कीं, तो प्रांत जपान्यांच्या अंमलाखालीं असल्यामुळें वाढत्या सैन्याच्या नवीन छावण्यांकरतां जमिनी देणें, त्यांवर बराकी बांधण्याकरतां सामानसुमान पुरविणें, कपडालत्ता, युद्धसामुग्री देणें हें सर्व जपान्यांच्याच हातांत असल्यामुळें हिंदी स्वातंत्र्य-चळवळीस खीळ घालणें त्यांच्या स्वाधीन होतें. या चळवळीस मदत करणें हें तर त्यांच्या अंतिम फायद्याचेंच होतें. हिंदुस्थान स्वतंत्र झाल्याबरोबर इंग्रजांचें नरडेंच दाबलें जाऊन जपानचा एक जबरदस्त शत्रु युद्धांतून आपलें आंग काढून घेऊन स्वस्थच बसला असता. सुएझपासून हाँगकाँगपर्यंत इंग्रजांचें साम्राज्य पसरलें त्यास सर्वस्वीं हिंदी फौजाच कारणीभूत झालेल्या आहेत. शेकडों वर्षांच्या ऐषआरामामुळें आतां हिंदी सेनेच्या मदतीशिवाय इंग्रज स्वतःच्या बळावर अशी एकादी लहानांत लहान अशी लढाईसुद्धां जिंकू शकणार नाहींत. इंग्रजी शिपायांत पूर्वीचें पाणी कायम असतें तर एका हांकेवरील

आयर्लंड त्यांनीं हातचा जाऊं दिला नसता. तथापि हिंदवी-स्वातंत्र्य हें आपल्या अंतिम फायद्याचें होईल हें जपाननें ओळखलें नसेल म्हणून म्हणा किंवा हिंदुस्थानांत चंचुप्रवेश करण्याच्या स्वार्थी हेतूनें वा केवळ आडमुठेपणाच्या धोरणानें आंधळें होऊन म्हणा त्यांनीं नेताजी सुभाषचंद्रांसारख्या पुढाऱ्याचा मार्ग सुकर करण्याऐवजीं उलट अवघड करून ठेवण्यास कमी केलें नाहीं.

एकदां नेताजी टोकिओस गेले असतांना त्यांनीं जपानी सरकारशीं एक लेखी करार केलेला होता. त्यांत हिंदी स्वातंत्र्यसैन्याची वाढ पन्नास हजारांपर्यंत व्हावी असें ठरलें होतें. अर्थात् त्यांचा हेतु त्यांत असा होता कीं, एकदम तीन लाख सैन्य उभारावें असें आम्ही म्हटलें तर तें जपान्यांस रुचणार नाहीं म्हणून टप्याटप्यानें करार करावें. "आधीं पन्नास हजार सैन्य तर उभें करावें मग पुढचें पुढें बघूं." असा त्यांचा विचार. या करारांत एकीकडे नेताजी आणि दुसरीकडे जपानी सरकार व मध्यस्थी हिकारी कीकान खात्याचे वरिष्ठ नारदमुनी. अर्थात् हा करार लेखी झाला, त्यावर शिक्कामोर्तब इ. सर्व कांहीं झालें; परंतु त्याप्रमाणें व्यवस्था करण्यास सिंगापूरमधील हिकारी कीकान अधिकाऱ्यांस सांगितलें तेव्हां बरेच दिवस "आमच्याकडे अजून त्या कराराची अधिकृत प्रतच आलेली नाहीं तर आम्ही तरी काय समजावें?" यावरच त्यांनीं अळंटळं केली. नंतर आमच्याकडे आलेल्या इंग्रजी प्रतीची नक्कल करून आम्ही त्यांस दिली तों ते म्हणूं लागले कीं, "प्रत्येक कराराची जपानी प्रतच आम्ही अधिकृत मानतों. इंग्रजी अथवा इतर कोणत्याही प्रतीस आम्ही गौण स्थान देतों." १९४४ च्या नोव्हेंबर महिन्यांत नेताजींनीं जें एक खासगी पत्र कर्नल भोसले यांस पाठविलें होतें, त्यांतही त्यांनीं लिहिलें होतें कीं, "...हिकारी कीकानचे अधिकारी आतां आपल्या सैन्याची वाढ ५०,००० पर्यंत करूं देण्यास रुकार देत नाहींत..." हिकारी कीकान खात्याच्या शाखा दूरपूर्वेंतील प्रत्येक देशांत लहानमोठ्या प्रमाणांत होत्या. त्यांचा सर्वांत वरिष्ठ अधिकारी व मध्यवर्ती कचेरी हीं नेताजींबरोबर जागोजाग हालत असत. हिंदी स्वातंत्र्यसैन्याची वाढ पन्नास हजारांपर्यंत करावी असे प्रयत्न नेताजी व कर्नल भोसले हे दोघेही आपापल्या परीनें ब्रह्मदेशांत व मलायांत (कामानिमित्त असतील तेथून) करीत असत. पुढें पुढें हिकारी कीकानचे अधिकारी म्हणूं लागले कीं, "पन्नास हजारांपर्यंत सैन्याची वाढ होऊं द्यावी हें उभयतांच्या करारांत ठरलें आहे हें आम्हासही मान्य आहे आणि तात्त्विकदृष्ट्या तें योग्यच आहे. परंतु प्रत्यक्ष तें अमलांत आणण्यांत बऱ्याचशा अडचणी आहेत त्यास आम्ही तरी काय करणार?"

सन १९४४ च्या उत्तरार्धांत जेव्हां प्रशान्त महासागरावरील लढाईस जोर चढला, तेव्हां जपान्यांच्याकडे युद्धाच्या सामानाची इतकी तूट पडली कीं, त्यांनीं वैमानिक शिक्षणकेंद्रें बंद करून त्यांतील विमानें व शिकविण्याकरतां असलेले सैनिक काढून प्रत्यक्ष युद्धांत भाग घेण्याकरतां म्हणून नेले. एवढेंच

नव्हे तर हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या लष्करी शिक्षणकेंद्रांतूनही, पूर्वीं प्रत्येक स्वयंसेवकास शिक्षण देण्याकरतां एका माणसास एक याप्रमाणें बंदुका असत त्याही आतां आठजणांमागें एक याप्रमाणें ठेवून बाकी त्यांच्या उपयोगाकरतां द्याव्या अशी विनंति करून त्याही त्यांनीं नेल्या. आमच्या कांहीं तुकड्या 'छत्रीसैनिक तुकड्या' म्हणून तयार करण्यांत येत होत्या. त्यांस हवाई शिक्षण देणाऱ्या जपानी तुकड्या, वर वर्णन केल्याप्रमाणें हुकूम आल्यामुळें एके दिवशीं एकाएकीं आपलें चंबूगवाळें उचलून निघून गेल्या व आमच्या त्या तुकड्यांचें शिक्षण अर्धवटच पडलें.

अशा रीतीनें दांत कोरून जपान्यांचें पोट किती दिवस भरणार? हाच एक विचार माझ्या मनांत पुष्कळ वेळां उभा राही. शिक्षणकेंद्रांतून आठ स्वयंसेवकांमागें एक बंदुक राहिल्यावर तर या परिस्थितीचा अगदीं कडेलोट झाला. हीं लष्करी शिक्षणकेंद्रें आहेत कीं थट्टा आहे? असें वाटून मला संताप आला. अशा प्रमाणांत शिक्षणकेंद्रांचीं हत्यारें कमी करण्यास मी तीव्र विरोध केला परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. आधींच त्या शिक्षणकेंद्रांतून सैनिक म्हणून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक सैनिकास गोळीबाराची आणि नेमबाजीची पूर्ण संवय होण्याइतका दारूगोळा पुरविण्यांत आलेला नव्हता. तीच एक अत्यंत महत्त्वाची उणीव आहे असें आम्हां सर्वांस वाटत होतें. ती दूर होण्याची खटपट करण्याच्या विवंचनेंत आम्ही होतों तोंच आतां प्रत्येक स्वयंसेवकास यापुढें बंदूक कशी असते हें बघण्यास मिळण्याचीही मारामार. आठजणांस एक बंदूक; ती दिवसांतून प्रत्येकाचे हातांत किती वेळ राहाणार? त्यापेक्षां बंदुकीचीं चित्रें काढून तींच या भावी सैनिकांस दाखवावींत! किंवा इंग्रजांच्या राज्यांत आपण करितों त्याप्रमाणें खेळांतील खोट्या लाकडी बंदुका द्याव्या यांच्या हातीं! अर्थात् अशा रीतीनें अर्धे कच्चे शिकून तयार झालेले हे सैनिक रणांगणावर फुकट प्राणास मुकतील हा विचार मला बेचैन करून सोडीत असे. अर्थातच नेताजींना या सर्व प्रकाराबद्दल काय वाटत असेल याची कल्पनाच केलेली बरी.

या लष्करी शिक्षणकेंद्रांचीं हत्यारें कमी केल्यामुळें दुसऱ्या एका संकटाची भीति उत्पन्न झाली. हीं शिक्षणकेंद्रें बहुधा लोकवस्तीपासून दोन-चार मैलांच्या अंतरावर टेकड्यांच्या आणि दाट जंगलाच्या आसपास असत. या जंगलांतील चिनी शेतकरी थोडीबहुत शेती करीत. आधींच गरीब त्यांत युद्धानें त्यांची स्थिती अत्यंत खालावलेली. जपान्यांवरही त्यांचा राग; कारण जपान्याचें व त्यांचें पिढीजाद वैमनस्य. फावल्या वेळीं ते जपानी सैनिकांवर, त्यांच्या मोटारींवर, सामानावर घाला घालून त्यांस मारून, लूट करून पळून जात. या उपद्व्यापाकरतां त्यांस हत्यारें व दारूगोळा इत्यादींची जरूर असल्यामुळें व हिंदी लोक जपान्यांशीं सहकार्य करितात म्हणूनही या केंद्रांवर हल्ला करण्याचा विचार त्यांच्या डोक्यांत कधीं कधीं डोकावून जात असे. या केंद्रांचीं

व धिप्पाड. इंग्रजांनीं घालून दिलेल्या पायंड्यानें पंजाबी अधिकारीवर्गातील कांहीं इसम या मद्राश्यांची ‘ भातखाऊ व हेंगाडी भाषा बोलणारे ’ अशी हेटाळणी करीत व त्यांस निरनिराळ्या प्रकारांनीं त्रास देत. या त्यांच्या वर्तनास कंटाळून, निघून जाऊं म्हणावें तर लष्करी कायद्याप्रमाणें शिक्षा देणें त्या अधिकाऱ्यांच्याच हातीं. शिवाय एकदां फौजेंत शिरल्यावर लष्करी कायद्याप्रमाणें तींतून निघतां येत नाहीं. पिंजऱ्यांत अडकणें सोपें असतें परंतु त्यांतून सुटणें फार कठीण असतें. सैन्यांतून निघून गेल्यास नेताजींना वाईट वाटावयाचें. पुन्हा सैन्यांतून निघून कामधंदा तरी काय करावयाचा ? कारण लष्करी शिक्षणकेंद्रांत नांव दाखल करितांनाच प्रत्येकानें आपल्या कामधंद्याची विल्हेवाट लावलेली होती.– अशा परिस्थितींमुळें कांहीं शिक्षणकेंद्रांतील रिक्रूटांनीं अधिकाऱ्यांच्या अरेरावी कारभाराविरुद्ध अन्नसत्याग्रह सुरू केला. कांहीं ठिकाणीं उघड बंडही झालें. नेताजीबद्दल मात्र सर्व रिक्रूटांच्या मनांत इतका पूज्यभाव वसत होता कीं त्यांचा प्रत्येकास आधार वाटे. ते सिंगापुरांत असतांना सेलेतार छावणींत असा एकही प्रकार घडला नाहीं. परंतु महिन्या दोन महिन्याकरतां ते बाहेर गेले कीं अधिकाऱ्यांच्या गैर वर्तणुकीला ऊत येत असे; आणि रिक्रूटांस तें असह्य झालें म्हणजे त्या प्रकारास तोंड फुटे. नेताजींना मात्र स्वतःचें वजन खर्च करून व आपला अमूल्य वेळ फुकट घालवून असलीं प्रकरणें निस्तरावीं लागत.

दूरपूर्वेतील दोन वर्षांच्या स्वातंत्र्य-चळवळींत अशा दहा लष्करी शिक्षणकेंद्रांतून एकंदर वीस हजार स्वयंसेवक सैनिक म्हणून तयार झाले. हिंदी स्वातंत्र्यसैन्याची संख्या युद्ध संपण्याच्या सुमारास ४०,००० होती. पैकीं वीस हजार, युद्धबंद्यांतून हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत सामील झालेले होते प्रथम एक दोन खेपेस सर्व लष्करी शिक्षणकेंद्रें स्वयंसेवकांनीं पूर्ण भरलेलीं होतीं; परंतु पुढें पुढें अधिकाऱ्यांच्या गैर वर्तणुकीची बातमी जेव्हां बाहेर फुटूं लागली तेव्हां मात्र पूर्वींइतके लोक स्वयंसेवक म्हणून नांव दाखल करण्यास पुढें येईनासे झाले. १९४४ च्या उत्तरार्धापासून सर्व लष्करी शिक्षणकेंद्रें जेमतेम अर्धीं भरलेलीं असत. पुढें पुढें जपान्यांनींही दिसेल त्या गरीब हिंदी माणसास धरून सुमारें एक लाख लोकांना सयाम-ब्रम्हदेश आगगाडीचा नवीन रस्ता तयार करण्यास पाठविलें. तेथें त्या दाट जंगलांत रोगराईनें, औषधोपचाराच्या अभावीं, जंगलांतील ओलीनें आणि निकृष्ट तऱ्हेच्या अन्नामुळें त्यांतील अर्ध्याच्यावर लोक मेले व इतर अर्धमेल्या परिस्थितींत कसेबसे परत आले. अशा निरनिराळ्या कारणामुळें सुरुवातीचा उत्साह ओसरून स्वयंसेवकांच्या संख्येला ओहोटी लागली. शिवाय निरनिराळ्या अडचणी उपस्थित करून हिकारी कीकान हिंदी स्वातंत्र्यसेनेची संख्या वाढविण्याच्या मार्गांत अडथळे आणीतच होती. म्हणून तीन महिन्याचा शिक्षणक्रम पुरा करूनही सैन्यांत घेतां येणें शक्य नसल्यामुळें स्वयंसेवकांस तदनंतर झालेल्या

अभ्यासक्रमाची उजळणी करीत सहा महिने, नऊ महिने, क्वचित वर्षभरही आपापल्या केंद्रांत ' रंगरूट ' म्हणूनच राहावें लागे. आपण लढावयास म्हणून आलों व वर्ष झालें तरी आपल्याला अजून सैनिक म्हणून सैन्यांतहि दाखल करून घेतलें नाहीं, हे पाहून तोच तोच शिक्षणक्रम ध्येयशून्य रीतीनें पुन्हा पुन्हा उगाळीत बसावें लागल्यामुळें स्वयंसेवकांचा उत्साह पार ओसरून जाऊन 'कोठून या भानगडींत सांपडलों ' असें त्यांस होऊन जाई !

लष्करी शिक्षणकेंद्रांतून कोणकोणते विषय शिकविले जात याचा निर्देश वर आलेलाच आहे. प्रत्येक स्वयंसेवकास सकाळीं लवकर उठून प्रातर्विधि व चहा आटोपून, आपापलें बराकींतील सर्व सामान गुंडाळून व्यवस्थित ओळीनें ठेवावें लागे. नंतर सांघिक व्यायाम, कवाईत, संगिनीची लढाई, गोळीबार, शत्रूवर तुटून पडणें, गुप्त संदेश पाठविणें, गनिमी कावा, शत्रूची बातमी काढून आणणें, गुप्त कामगिरी करणें इत्यादि विषय सकाळ-दुपार-संध्याकाळ उघड्या मैदानावर, गटागटानें शिकविले जात. उरलेल्या वेळांत वर्गांत बसल्याबसल्या कांहीं विषयांचें शिक्षण दिलें जाई. उदा:—राष्ट्रभाषा म्हणून हिंदुस्थानी शिकविणें, नकाशावरून एकाद्या जागेचा पत्ता लावणें, देशाकरतां आनंदानें प्राण देण्याची तयारी होण्याच्या दृष्टीनें निरनिराळीं व्याख्यानें ऐकविणें; इत्यादि.

हीं दहा लष्करी शिक्षणकेंद्रें तीन तीन महिन्यांचा शिक्षणक्रम ठरवून दोन वर्षांच्या अवधींत एकंदर सुमारें ८०,००० सैनिक तयार करूं शकलीं असतीं. परंतु दर तीन महिन्यांनीं दहा हजार सैनिकांची वाढ हिंदी स्वातंत्र्य-सैन्यांत होऊं नये म्हणून जपान्यांनीं पुष्कळ तात्त्विक अडचणी निर्माण करून ठेविल्या होत्या. अर्थात् मोठ्या मिनतवारीनें दरवर्षी दहा दहा हजार याप्रमाणें फक्त वीस हजारांचीच वाढ हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या संख्येंत होऊं शकली. जपान्यांनीं अडचणी उत्पन्न केल्या तरी त्यांना न जुमानतां हिंदी स्वातंत्र्यसैन्य कां वाढविण्यांत आलें नाहीं असा प्रश्न उद्‌भवणें साहजिक आहे. पण त्याचें उत्तर असें कीं, तो प्रांत जपान्यांच्या अंमलाखालीं असल्यामुळें वाढत्या सैन्याच्या नवीन छावण्यांकरतां जमिनी देणें, त्यांवर बराकी बांधण्याकरतां सामानसुमान पुरविणें, कपडालत्ता, युद्धसामुग्री देणें हें सर्व जपान्यांच्याच हातांत असल्यामुळें हिंदी स्वातंत्र्य-चळवळीस खीळ घालणें त्यांच्या स्वाधीन होतें. या चळवळीस मदत करणें हें तर त्यांच्या अंतिम फायद्याचेंच होतें. हिंदुस्थान स्वतंत्र झाल्या-बरोबर इंग्रजांचें नरडेंच दाबलें जाऊन जपानचा एक जबरदस्त शत्रु युद्धांतून आपलें आंग काढून घेऊन स्वस्थच बसला असता. सुएझपासून हाँगकाँगपर्यंत इंग्रजांचें साम्राज्य पसरलें त्यास सर्वस्वीं हिंदी फौजाच कारणीभूत झालेल्या आहेत. शेकडों वर्षांच्या ऐषआरामामुळें आतां हिंदी सेनेच्या मदतीशिवाय इंग्रज स्वतःच्या बळावर अशी एकादी लहानांत लहान अशी लढाईसुद्धां जिंकू शकणार नाहींत. इंग्रजी शिपायांत पूर्वीचें पाणी कायम असतें तर एका हांकेवरील

आयर्लंड त्यांनीं हातचा जाऊं दिला नसता. तथापि हिंद्वी-स्वातंत्र्य हें आपल्या अंतिम फायद्याचें होईल हें जपाननें ओळखलें नसेल म्हणून म्हणा किंवा हिंदुस्थानांत चंचुप्रवेश करण्याच्या स्वार्थी हेतूनें वा केवळ आडमुठेपणाच्या धोरणानें आंधळें होऊन म्हणा त्यांनीं नेताजी सुभाषचंद्रांसारख्या पुढाऱ्याचा मार्ग सुकर करण्याऐवजीं उलट अवघड करून ठेवण्यास कमी केलें नाहीं.

एकदां नेताजी टोकिओस गेले असतांना त्यांनीं जपानी सरकारशीं एक लेखी करार केलेला होता. त्यांत हिंदी स्वातंत्र्यसैन्याची वाढ पन्नास हजारांपर्यंत व्हावी असें ठरलें होतें. अर्थात् त्यांचा हेतु त्यांत असा होता कीं, एकदम तीन लाख सैन्य उभारावें असें आम्ही म्हटलें तर तें जपान्यांस रुचणार नाहीं म्हणून टप्याटप्यानें करार करावें. "आधीं पन्नास हजार सैन्य तर उभें करावें मग पुढचें पुढें बघूं." असा त्यांचा विचार. या करारांत एकीकडे नेताजी आणि दुसरीकडे जपानी सरकार व मध्यस्थी हिकारी कीकान खात्याचे वरिष्ठ नारदमुनी. अर्थात् हा करार लेखी झाला, त्यावर शिक्कामोर्तब इ. सर्व कांहीं झालें; परंतु त्याप्रमाणें व्यवस्था करण्यास सिंगापूरमधील हिकारी कीकान अधिकाऱ्यांस सांगितलें तेव्हां बरेच दिवस "आमच्याकडे अजून त्या कराराची अधिकृत प्रतच आलेली नाहीं तर आम्ही तरी काय समजावें?" यावरच त्यांनीं अळंटळं केली. नंतर आमच्याकडे आलेल्या इंग्रजी प्रतीची नक्कल करून आम्ही त्यांस दिली तों ते म्हणूं लागले कीं, "प्रत्येक कराराची जपानी प्रतच आम्ही अधिकृत मानतों. इंग्रजी अथवा इतर कोणत्याही प्रतीस आम्ही गौण स्थान देतों." १९४४ च्या नोव्हेंबर महिन्यांत नेताजींनीं जें एक खासगी पत्र कर्नल भोसले यांस पाठविलें होतें, त्यांतही त्यांनीं लिहिलें होतें कीं, "...हिकारी कीकानचे अधिकारी आतां आपल्या सैन्याची वाढ ५०,००० पर्यंत करूं देण्यास रुकार देत नाहींत..." हिकारी कीकान खात्याच्या शाखा दूरपूर्वेंतील प्रत्येक देशांत लहानमोठ्या प्रमाणांत होत्या. त्यांचा सर्वांत वरिष्ठ अधिकारी व मध्यवर्ती कचेरी हीं नेताजींबरोबर जागोजाग हालत असत. हिंदी स्वातंत्र्यसैन्याची वाढ पन्नास हजारांपर्यंत करावी असे प्रयत्न नेताजी व कर्नल भोसले हे दोघेही आपापल्या परीनें ब्रह्मदेशांत व मलायांत (कामानिमित्त असतील तेथून) करीत असत. पुढें पुढें हिकारी कीकानचे अधिकारी म्हणूं लागले कीं, "पन्नास हजारांपर्यंत सैन्याची वाढ होऊं द्यावी हें उभयतांच्या करारांत ठरलें आहे हें आम्हासही मान्य आहे आणि तात्त्विकदृष्ट्या तें योग्यच आहे. परंतु प्रत्यक्ष तें अमलांत आणण्यांत बऱ्याचशा अडचणी आहेत त्यास आम्ही तरी काय करणार?"

सन १९४४ च्या उत्तरार्धात जेव्हां प्रशान्त महासागरावरील लढाईस जोर चढला, तेव्हां जपान्यांच्याकडे युद्धाच्या सामानाची इतकी तूट पडली कीं, त्यांनीं बैमानिक शिक्षणकेंद्रें बंद करून त्यांतील विमानें व शिकविण्याकरतां असलेले सैनिक काढून प्रत्यक्ष युद्धांत भाग घेण्याकरतां म्हणून नेले. एवढेंच

नव्हे तर हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या लष्करी शिक्षणकेंद्रांतूनही, पूर्वी प्रत्येक स्वयंसेवकास शिक्षण देण्याकरतां एका माणसास एक याप्रमाणें बंदुका असत त्याही आतां आठजणांमागें एक याप्रमाणें ठेवून बाकी त्यांच्या उपयोगाकरतां द्याव्या अशी विनंति करून त्याही त्यांनीं नेल्या. आमच्या कांहीं तुकड्या 'छत्रीसैनिक तुकड्या' म्हणून तयार करण्यांत येत होत्या. त्यांस हवाई शिक्षण देणाऱ्या जपानी तुकड्या, वर वर्णन केल्याप्रमाणें हुकूम आल्यामुळें एके दिवशीं एकाएकीं आपलें चंबूगवाळें उचलून निघून गेल्या व आमच्या त्या तुकड्यांचें शिक्षण अर्धवटच पडलें.

अशा रीतीनें दांत कोरून जपान्यांचें पोट किती दिवस भरणार? हाच एक विचार माझ्या मनांत पुष्कळ वेळां उभा राही. शिक्षणकेंद्रांतून आठ स्वयंसेवकांमागें एक बंदुक राहिल्यावर तर या परिस्थितीचा अगदीं कडेलोट झाला. हीं लष्करी शिक्षणकेंद्रें आहेत कीं थट्टा आहे? असें वाटून मला संताप आला. अशा प्रमाणांत शिक्षणकेंद्रांचीं हत्यारें कमी करण्यास मी तीव्र विरोध केला परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. आधींच त्या शिक्षणकेंद्रांतून सैनिक म्हणून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक सैनिकास गोळीबाराची आणि नेमबाजीची पूर्ण संवय होण्याइतका दारूगोळा पुरविण्यांत आलेला नव्हता. तीच एक अत्यंत महत्त्वाची उणीव आहे असें आम्हां सर्वांस वाटत होतें. ती दूर होण्याची खटपट करण्याच्या विवंचनेंत आम्ही होतों तोंच आतां प्रत्येक स्वयंसेवकास यापुढें बंदूक कशी असते हें बघण्यास मिळण्याचीही मारामार. आठजणांस एक बंदूक; ती दिवसांतून प्रत्येकाचे हातांत किती वेळ राहाणार? त्यापेक्षां बंदुकीचीं चित्रें काढून तींच या भावी सैनिकांस दाखवावींत! किंवा इंग्रजांच्या राज्यांत आपण करितों त्याप्रमाणें खेळांतील खोट्या लाकडी बंदुका द्याव्या यांच्या हातीं! अर्थात् अशा रीतीनें अर्धे कच्चे शिकून तयार झालेले हे सैनिक रणांगणावर फुकट प्राणास मुकतील हा विचार मला बेचैन करून सोडीत असे. अर्थातच नेताजींना या सर्व प्रकाराबद्दल काय वाटत असेल याची कल्पनाच केलेली बरी.

या लष्करी शिक्षणकेंद्रांचीं हत्यारें कमी केल्यामुळें दुसऱ्या एका संकटाची भीति उत्पन्न झाली. हीं शिक्षणकेंद्रें बहुधा लोकवस्तीपासून दोन-चार मैलांच्या अंतरावर टेकड्यांच्या आणि दाट जंगलाच्या आसपास असत. या जंगलांतील चिनी शेतकरी थोडीबहुत शेती करीत. आधींच गरीब त्यांत युद्धानें त्यांची स्थिती अत्यंत खालावलेली. जपान्यांवरही त्यांचा राग; कारण जपान्याचें व त्यांचें पिढीजाद वैमनस्य. फावल्या वेळीं ते जपानी सैनिकांवर, त्यांच्या मोटारींवर, सामानावर घाला घालून त्यांस मारून, लूट करून पळून जात. या उपद्व्यापाकरतां त्यांस हत्यारें व दारूगोळा इत्यादींची जरूर असल्यामुळें व हिंदी लोक जपान्यांशीं सहकार्य करितात म्हणूनही या केंद्रांवर हल्ला करण्याचा विचार त्यांच्या डोक्यांत कधीं कधीं डोकावून जात असे. या केंद्रांचीं

हत्यारें काढून घेतलीं आहेत, असें कळल्यावर तर त्यांनीं हा प्रयत्न जरूर केला असता. अशा हल्ल्यांत केवळ अशा दरवडेखोरांच्या टोळीकडून आम्ही हार खाणें हें अत्यंत लज्जास्पद झालें असतें. अर्थात् सैनिकांस शिक्षण देण्याच्या दृष्टीनें नाहीं तरी स्वसंरक्षणाकरतां कां होईना, जवळ हत्यारें भरपूर असणें जरूर होतें. पण तीं तशीं राहूं शकलीं नाहींत. आमच्या जवळील हत्यारें कमी झालीं ही गोष्ट बाहेर फुटली नाहीं, म्हणून सुदैवानें दरवडेखोरांच्या टोळ्यांकडून हार खाण्याचा प्रसंग त्या केंद्रांवर आला नाहीं. १९४५ च्या ऑगस्ट महिन्यांत युद्ध संपतांच ' सुगाई सिपुत ' या मलायांतील एका लहान खेडेगांवीं असलेल्या आमच्या एका तुकडीवर एका चिनी दरवडेखोरांच्या टोळीनें हल्ला केला. जपान्यांची शरणागती झाल्यामुळें आमच्या सैन्याचींही शस्त्रास्त्रें जपान्यांनीं काढून घेतलीं असावींत असा त्यांचा तर्क झाला म्हणून म्हणा, किंवा जपानी आतां हतबल होऊन ते चिनी लोकांच्या विरुद्ध कांहीं करूं शकणार नाहींत या विचारानें म्हणा, चिनी लोकांनीं उघडपणें जपान्यांविरुद्ध हल्ले सुरू केलेले होते. त्याचबरोबर एक दिवस त्यांनीं आपला मोर्चा आमच्याकडे वळविला. परंतु त्या लहानशा लढाईत त्यांना असा मार बसला कीं, त्यांचे चार-पांच ठार झालेले लोक, सायकली, मोटार लॉऱ्या व बंदुका इत्यादि सामान तेथेंच टाकून त्यांनीं पळ काढला. दुसरे दिवशीं त्यांचे पुढारी आमच्या त्या तुकडीच्या वरिष्ठ अधिकाऱ्याची माफी मागून 'पुन्हा तुमच्या वाटेस जाणार नाहीं' असें अभिवचन देऊन निघून गेले.

स्वयंसेवकांमधून साधे शिपाई तयार करण्याऱ्या या दहा केंद्रांशिवाय इतरही अन्य प्रकारचीं शिक्षणकेंद्रें हिंदी स्वातंत्र्य-चळवळींत होतीं. सिंगापूर व रंगून या दोन प्रमुख शहरीं प्रत्येकीं एक एक अशा उच्च लष्करी शिक्षणाच्या दोन शाळा होत्या. यांत हिंदी स्वातंत्र्यसैन्याचे अधिकारी सहा महिने शिक्षण घेऊन तयार होत असत. युद्धबंद्यांपैकीं हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत सामिल झालेल्या तरुण, हुषार, चुणचुणीत व सुविद्य अशा ( परंतु ब्रिटिशांच्या वेळेस अधिकारी पदावर नसलेल्या ) लोकांस एका निवडणूक मंडळातर्फे निवडून त्यांस दर शिक्षणक्रमाच्या सुरुवातीस जागा असतील त्याप्रमाणें या शाळांतून अधिकारी-पदाचें शिक्षण घेण्यास पाठवीत. त्याचप्रमाणें नागरिकांच्या मुलांचेहि अर्ज हिंदी स्वातंत्र्यसंघातर्फे आगाऊ जाहिरात देऊन मागविले जात. त्या मुलांचीही मंडळातर्फे निवडणूक होऊन त्यांसही वरील दोन शाळांतून पाठविण्यांत येत असे. ब्रम्हदेशांतील मुलांचें लष्करी शिक्षण रंगूनच्या लष्करी शाळेंत होत असे व मलायांतील मुलांचें सिंगापूरच्या शाळेंत. बहुधा इतिहास, भूगोल, इंग्रजी भाषा इत्यादि विषयांचें मॅट्रिकच्या दर्जापर्यंतचें शिक्षण झालेल्या मुलांस अधिकार पदाकरतां योग्य समजून त्यांस या लष्करी शाळांच्या शिक्षणक्रमांकरतां निवडण्यांत येई. सुशीक्षित नसलेल्या नागरिकांस साधें शिपायाचें शिक्षण देण्या-

साठीं या प्रकरणाच्या सुरुवातीस वर्णिलेल्या लष्करी केंद्रांतून त्यांस 'रिक्रूट' म्हणून भरती करण्यांत येई. अधिकारी बनविण्याच्या लष्करी शाळांतून युद्धतंत्र, नेतृत्व इत्यादि ( साध्या शिपाइगिरीकरतां शिकाव्या लागणाऱ्या विषयापेक्षां ) अधिक विषय असत. या शाळांतील अभ्यासक्रम सहापासून नऊ महिनेपर्यंत चालत असे. एका वेळेस सुमारें पांचशें विद्यार्थ्यांची सोय प्रत्येक शाळेंतून होत असे. दोन वर्षांत मिळून एकंदर सुमारें अडीच हजार क्षात्र विद्यार्थी या शाळेंतून शिक्षण घेऊन बाहेर पडले व 'सेकंड लेफ्टनंट' या हुद्यावर नेमले गेले. हिंदी स्वातंत्र्य-सेनेच्या इंफालपर्यंतच्या लढयांत या तरुण अधिकाऱ्यांनीं जी कामगिरी केली ती अप्रतिम होती. प्रत्येकाच्या हाताखालीं वीस-वीस, पंचवीस पंचवीस शिपायांचा गट असे. आपापले गट घेऊन यांनीं इंग्रजांच्या सैन्यावर इतके निकराचे हल्ले चढविले कीं, त्या हल्ल्यांत एकतर त्यांनीं हल्ला केलेलें ठिकाण जिंकून शत्रूची दाणादाण उडविली अथवा त्या हल्ल्यांत मरण तरी पत्करिलें. परंतु माघार म्हणून कशी ती त्यांस ठाऊकच नव्हती !

हे तरुण आधिकारी बहुधा सर्वच तामिळ इत्यादि दक्षिण हिंदुस्थानांतील लोक होते. क्षात्रवृत्ति अंगीं मुळींच नसलेले लोक म्हणून आजपर्यंत इंग्रजांनीं त्यांच्याविरुद्ध खोडसाळ प्रचार करून त्यांस हिंदी फौजेंत येऊं दिलें नव्हतें. आपल्यापैकीं पुष्कळसे इंग्रजधार्जिणे लोक इंग्रज म्हणतील तें वेदवाक्य असें समजून दक्षिण हिंदुस्थानांतील लोक लढाऊ वृत्तीचे नाहींत असें समजत आले आहेत. परंतु हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या विजयाचें बहुतेक सर्व श्रेय याच लोकांस आहे. इंग्रजांनीं सेकंड लेफ्टनंटच्या हुद्यावर घेतलेल्या आधिकारीवर्गापैकीं एकही अधिकारी — जो पुढें सिंगापुरांत युद्धबंदी होऊन त्याच इंग्रजदत्त हुद्याच्या जोरावर हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत, मेजर–कर्नल या दर्जाप्रर्यंत आपोआप ( लायकी-नालायकीचा विचार न होतां ) पोंचला — १९४३–४५ च्या या स्वातंत्र्ययुद्धांत प्रत्यक्ष भाग घेऊन मरण पावला नाहीं ही येथें लक्षांत घेण्या-सारखी गोष्ट आहे. अर्थात् क्वचित् एकाद दुसरा हवाई हल्ल्यांत मेला असेल पण तो रणांगणापासून दूर ! तशीं तर काय आजकालच्या युद्धांत नागरिकांचीं निष्पाप मुलेंही शेकड्यांनीं मरतात ! इंग्रजांच्या तंत्राप्रमाणें जितका वरचा आधिकारी तितका तो लढाईच्या मैदानापासून लांब. अर्थात हें तत्त्व जसेंच्या तसेंच या अधिकाऱ्यांनीं उचलून तें हिंदी स्वातंत्र्यसैन्यांतही लागू करून ठेविलेलें होतें. प्रत्येक वरिष्ठ अधिकाऱ्यानें आपल्या तुकडीची एक लहानशी मध्यवर्ती कचेरी समरांगणापासून दूर कोठेंतरी स्थापावी व तेथें वृत्तांत लिहून त्यावर सह्या करून कागदी घोडे नाचवावे, मोटारींतून इकडे जावें, तिकडे पळावें, निरनिराळे हुकूम आणि जाहीरनामे काढावे व अशा रीतीनें चोवीस तास काम करीत आहों असें दाखवावें, असा देखावा अनेकदां दिसे.

नवीन शिकून तयार झालेल्या त्या तरुण अधिकाऱ्यांची व त्यांच्या

हाताखालच्या सैनिकांची—ज्यांनीं नेताजींच्या एका शब्दावर हिंदी स्वातंत्र्ययुद्धांत आपले प्राण दिले त्यांची—मात्र खरोखरीच धान्य होय. हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या परत आलेल्या लोकांचा जो सन्मान करण्यांत आलेला आहे तो खरोखर त्यांचा बहुमान नसून, पतन पावलेल्या या हुतात्म्यांचा बहुमान आहे. आज आझाद सैनिकांचें जें नांव होत आहे तें खरोखर या धारातीर्थीं पतन पावलेल्या लोकांचे वारस म्हणूनच !

ओघानेंच, शौर्याचा व जातीचा प्रश्न आला म्हणून त्याविषयीं येथें थोडें विवेचन करूं. पंजाबी लोक जातीचेच शूर व लढाऊ वृत्तीचे आणि युक्त-प्रांतीय, मद्रासी इत्यादि लोक तसे नाहींत, असें आजवर इंग्रज लोक सारखे म्हणत आले आहेत. एकादी गोष्ट चूक का असेना परंतु ती सतत कानींकपाळीं ओरडत राहिलें म्हणजे कांहीं दिवसांनीं तीही खरी वाटूं लागते, त्याप्रमाणें आपल्याकडील कांहीं लोक या गोष्टींची 'री' ओढतात. क्वचित् वादविवादांत, पंजाबी लोक तो भेद स्वतःस अनुकूल असल्यामुळें त्या जोरावर स्वतःची फुशारकी मारतात. मद्रासी लोकही या सततच्या हिणविण्यामुळें आपल्यांत खरोखरच मुळांत क्षात्रवृत्ति नाहीं कीं काय असें शंकाकुल वृतीनें वागतांना दिसतात. परंतु शौर्य, पराक्रम, वीरता, क्षात्रवृत्ति हे गुण फक्त पंजाबच्या सरकारी हद्दींत जन्मणाऱ्या लोकांमध्येंच असतील आणि इतरांमध्यें ते विकास पावणार नाहींत, असा कांहीं दंडक ईश्वरानें घातला आहे असें दिसत नाहीं. हे गुण, जात, धर्म, प्रांत, जिल्हा इत्यादींच्या मर्यादा जाणीत नाहींत. जगांतील लहानांत लहान कीटकास जरी छळलें तरी तो आपली सर्व शक्ति एकवटून छळणारास जोरानें चावा घेतो. मग त्याचा प्रतिस्पर्धी हत्तीसारखा अगडबंब प्राणी असला तरी त्याचा अजस्र देह पाहून आपला जय होणार नाहीं या विचारानें तो मूग गिळून स्वस्थ बसत नाहीं. याचेंच नांव शौर्य व तें जगांतील सर्व प्राण्यांत आहे. इंग्रजांना मात्र असा प्रत्यय आला कीं, हिंदुस्थानांतील ज्या ज्या प्रांताच्या लोकांत शिक्षण आणि जागृति जास्त, ते ते इंग्रजांचे कडवे विरोधक. अर्थात् अशा लोकांस सैन्यांत घेऊन कसें चालेल ? तें सैन्य संधी सांपडतांच त्यांच्या विरुद्धच जाणार. बरें, मद्रासी, संयुक्तप्रांतीय, बंगाली, महाराष्ट्रीय इत्यादि लोकांस सैन्यांत घेण्याचें टाळावयाचें मग त्याला कांहीं कारण तर दाखवावयाला पाहिजे ! म्हणून हे वर उल्लेखिलेले लोक जन्मतःच क्षात्रवृत्तीचे नाहींत असें वरपांगी बोलून गुप्तपणें मात्र त्यांनीं असा दंडक घातला कीं राजकीय दृष्ट्या हे लोक इंग्रजांच्या विश्वासास पात्र नसल्यामुळें शक्यतोंवर त्यांचा शिरकाव सैन्यांत होऊं देऊं नये. असो.

वर वर्णिलेल्या दोन लष्करी शाळांचे शिक्षणक्रम संपवून जेव्हां हे नवीन तयार झालेले अधिकारी 'सेकंड लेफ्टनंट' या अधिकारपदास पात्र समजले जात त्या वेळेस ( सर्वसाधारणपणें सहा सहा महिन्यांचा शिक्षणक्रम असल्यामुळें वर्षांतून

असे प्रसंग दोनदां येत) त्या त्या शाळेंत एक मोठा समारंभ होत असे. नेताजी त्या प्रसंगीं त्या शहरीं असल्यास ते या समारंभास मुद्दाम हजर राहात. सर्वांत प्रवीण समजल्या जाणाऱ्या पहिल्या दोन विद्यार्थ्यांस प्रत्येकीं एक तलवार व एक घड्याळ आणि इतर बक्षीसें देण्यांत येत असत. त्या प्रसंगीं या विद्यार्थ्यांचे प्राविण्यदर्शक निरनिराळे खेळ, कवाईत, बक्षिससमारंभ ( नेताजी असल्यास ), नेताजींचें स्फूर्तिदायक भाषण, भोजनसमारंभ, नाटक, गाणें, व नंतर नेताजींचे आवतींभोंवतीं बसून सर्व विद्यार्थ्यांची त्यांच्याशीं मनमोकळेपणानें प्रश्नोत्तरें, गप्पा, हास्यविनोद इत्यादि कार्यक्रम होत असे.

ब्रिटिश साम्राज्यांत डेहराडून वगैरे ठिकाणीं ज्या लष्करी शाळा आहेत त्यांत साधनसामुग्री पुष्कळ आहे; परंतु कांहीं शास्त्रीय दृष्ट्या महत्त्वाचीं अशीं उपकरणीं सोडल्यास इतर वस्तूंचा दिखाऊपणाच जास्त असतो. जरूर ती सर्व साधनसामुग्री स्वातंत्र्यचळवळींतील लष्करी शाळांतूनही सर्वांच्या उत्साही सहकार्यामुळें सहज जमवितां आली. क्षात्रकर्माला खऱ्या क्षात्रवृत्तीची जितकी गरज असते तितकी अन्य ( बाह्य ) उपाधींची जरूर असतेच असें नाहीं. म्हणून सैनिकांत 'हतो वा प्राप्यसे स्वर्गम् जित्वा वा भोक्ष्यसे महीम्' अशी वृत्ती उत्पन्न झाली म्हणजे लष्करी शिक्षणाचा बराचसा कार्यभाग उरकला असें समजण्यास हरकत नाहीं. एकाद्या महायोध्याच्या हातीं गाण्डीव धनुष्य नसलें तरी तो अन्य मार्गानें लढेल; परंतु तें हातीं असून जर 'गांडीवम् स्रंसते हस्तात्...' अशी स्थिति झाली तर तो योद्धा कितीही कुशल असो व त्याचें शस्त्र केवढेंही प्रभावी असो, त्या दोहोंचाही कांहीं उपयोग होऊं शकत नाहीं !

स्वातंत्र्यचळवळींत, जपानी-इंग्रजी व जपानी-हिंदुस्थानी असे दुभाष्ये तयार करण्याच्या दोन शाळा हिंदी स्वातंत्र्यसैन्यातर्फे सिंगापूर आणि कोलालंपूर अशा दोन ठिकाणीं चालू करण्यांत आलेल्या होत्या. यांतील शिक्षणक्रम सहा महिन्यापासून वर्षभरापर्यंत असे. यांतून तयार झालेल्या मुलांची योजना पुढें स्वातंत्र्यसैन्यांतील निरनिराळ्या तुकड्यांत आणि कचेऱ्यांत करण्यांत येई. जपानी भाषाच शिकण्याचा प्रश्न असल्यामुळें येथें अर्थातच जपानी शिक्षक असत. जपानी भाषेबरोबरच या मुलांस सर्वसामान्य प्रकारचें लष्करी शिक्षणही दिलें जात असे. या मुलांनीं जपानी भाषेंतही चांगलेंच प्राविण्य मिळविलें होतें.

जपानी लष्करी शिक्षणांतील महत्त्वाच्या गोष्टी शिकण्याकरतां म्हणून, टोकिओ येथील जपानच्या उच्च प्रतीच्या लष्करी ( अधिकारी तयार करणाऱ्या ) शाळेंत कांहीं निवडक हिंदी विद्यार्थ्यांस प्रवेश मिळावा अशा तऱ्हेचीं बोलणीं नेताजींनीं टोकिओमध्यें असतांनाच सुरू केलीं होतीं. तीं फलद्रूप होऊन जपानी अधिकाऱ्यांनीं सुमारें पन्नास विद्यार्थी त्या शाळेंत घेण्याचें कबूल केलें होतें. सिंगापूर शहरांत जपानी सरकारातर्फे 'स्योनान टाईम्स' ( कारण जपान्यांनीं सिंगापूरचें नांव बदलून त्याच्याऐवजीं स्योनान हें नवीन नांव त्या शहरास दिलें

होतें ) नांवाचें वर्तमानपत्र चालत असे व हिंदी स्वातंत्र्यसंघातर्फे ' आझाद हिंद ' हें वर्तमानपत्र निघत असे. याशिवाय कांहीं तामीळ, मल्याळी व एक हिंदुस्थानी वर्तमानपत्रही निघत असे. या सर्व वर्तमानपत्रांतून स्वातंत्र्य-चळवळीचाच प्रचार होत असे. " टोकिओ लष्करी शाळेच्या शिक्षणक्रमाकरतां कांहीं हिंदी तरूण निवडावयाचे आहेत; त्यासाठीं सोळा ते वीस वर्षांपर्यंतच्या तरुणांनीं अर्ज करावेत. " अशा अर्थाचें निवेदन या वर्तमानपत्रांतून छापलें जातांच कित्येक उत्साही तरुणांनीं अर्ज केले. ठरलेल्या दिवशीं त्या सर्वांस सिंगापुरांतील हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या मध्यवर्ती कचेरींत बोलावून नेताजींनीं त्यांची स्वत: पाहणी केली व त्यांतून पंचेचाळीस तरूण निवडले. त्या सर्वांची टोकिओस रवानगी होईपर्यंत सिंगापुरांतील एका वेगळ्या इमारतींत त्या सर्वांची सोय करण्यांत येऊन त्यांना जपानी भाषेचें व लष्करी विषयांचें प्राथमिक शिक्षण देण्यास सुरुवात झालेली होती. १९४३ च्या अखेरीस त्या सर्वांस बोटीनें टोकिओस पाठविण्याची व्यवस्था होऊन त्याप्रमाणें ते सर्वजण सुखरूपपणें टोकिओस जाऊन पोंचले. तेथें ठरल्याप्रमाणें त्यांचें शिक्षण सुरू झालें. त्यांच्या बाबतींतील सर्व पत्रव्यवहार सुरळीत चालण्याकरतां सिंगापुराच्या हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या मध्यवर्ती कचेरींत त्यांच्याकरतां एक नवीन आणि स्वतंत्र खातें निर्माण करण्यांत आलें. याच खात्यातर्फे त्या तरुणांचीं पत्रें त्यांच्या आईबापांस व आईबापांचीं पत्रें त्या तरुणांस मिळत. स्वत: नेताजींचाही त्यांच्याशीं पत्रव्यवहार असे. जपानच्या शरणागतीपर्यंत हे पंचेचाळीस तरूण टोकिओच्या या वरिष्ठ शिक्षण-केंद्रांत शिक्षण घेत होते. त्यांच्या प्रगतीबद्दल व शिस्तीबद्दल जपानी अधिकारी प्रशंसोद्गारच काढीत. जपानी लष्करी शिक्षण फारच कडक समजलें जातें; परंतु त्यांतसुद्धां या हिंदी विद्यार्थ्यांनीं नांव मिळविलें.

सिंगापुरांत ' बुकित तीमा ' रस्त्यालगतच एक-दोन शेजार-शेजारच्या बंगल्यांत मिळून ' आझाद-शाला ' नांवाची एक लष्करी शिक्षणसंस्था स्थापन करण्यांत आलेली होती. आपल्या नेहमींच्या व्यवहारांत ज्याप्रमाणें ट्रेनिंग स्कूलस् अथवा बी. टी. कॉलेजेस् या शिक्षक तयार करणाऱ्या विशिष्ट शिक्षणसंस्था असतात त्याचप्रमाणें लष्करी शिक्षक तयार करणारी ही शाळा होती. येथून तयार होणारे लष्करी शिक्षक इतर लष्करी केंद्रांतून पुढें शिक्षक म्हणून काम करीत. हिंदी स्वातंत्र्यसंघानें सर्वसामान्य नागरिकांस आठवड्यांतून तीन दिवस दोन दोन तास याप्रमाणें लष्करी शिक्षण देण्याचा जो उपक्रम सुरू केलेला होता, त्याकरतांही ठिकठिकाणच्या स्वातंत्र्यसंघांकडून या शिक्षकांकरतां मागणी येत असे. ही आझाद-शाला संस्था हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या अंमलाखालीं होती त्यामुळें बरेच घोटाळे माजत. खातें लष्करी मग तें सिव्हिल (साध्या नागरीक संघाच्या) लोकांच्या ताब्यांत कां ? अशा दुसऱ्या कित्येक गोष्टी होत्या कीं त्यामुळें कधीं कधीं काम होण्याचें तर बाजूलाच पण हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या व सैन्याच्या अधि-

कान्यांमध्यें वितुष्ट येई, भांडणें होत, गैरसमज वाढे आणि कामाचा एकच गोंधळ उडे. हें सर्व लक्षांत घेऊन नेताजींनीं रंगूनहून सिंगापुरांतील आपल्या दुय्यम अधिकाऱ्यांस असें पत्र लिहिलें कीं, “ सध्यां हिंदी स्वातंत्र्यसंघाकडे असलेलें ‘ भरती आणि शिक्षण ’ हें खातें हिंदी स्वातंत्र्यसेनेकडे सोंपविण्याच्या दृष्टीनें दोन्ही बाजूच्या अधिकाऱ्यांनीं आपापसांत वाटाघाटी करून योग्य तो मार्ग अनुसरावा. ” अर्थात् कामाच्या सोईच्या दृष्टीनें तें खातें हिंदी स्वातंत्र्यसेनेकडेच जाणें इष्ट होतें व तशी नेताजींची इच्छा स्पष्ट दिसत होती. परंतु त्या वेळच्या हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या सिंगापुरांतील वरिष्ठ अधिकाऱ्यानें ‘ हें खातें आमच्या हातून जाऊं दिलें तर आमच्या संघाचें महत्त्व तें काय राहिलें ! ’ अशा तऱ्हेचे उद्गार काढले. अशा तऱ्हेनें त्यानें स्वतःच्या खात्याच्या महत्त्वाबद्दलची एक वेडगळ दुराग्रही कल्पना मनांत ठेवून हिंदी स्वातंत्र्य-चळवळीच्या दृष्टीनें उपयुक्त ठरणाऱ्या अशा या सोयीला खो घातला. तें खातें संघाकडून सैन्याकडे गेलें असतें तर संघाचें बरेचसें काम कमी झालें असतें व वार्षिक खर्चाचे पैसेही त्या खात्याच्या वार्षिक अंदाजपत्रकांतून निघून त्यांची नोंद वार्षिक अंदाजपत्रकांत झाली असती. त्यांत कोणत्याही खात्याचें महत्त्व वाढण्याचा अगर कमी होण्याचा प्रश्न उत्पन्न करणें योग्य नव्हतें. एकंदर चळवळीस उपकारक काय होईल एवढेंच जो पाहील तोच खरा लायक अधिकारी. वर दिलेला स्वार्थी दृष्टिकोन असणाऱ्या अधिकाऱ्यास पदच्युत करावयास तेवढें कारण पुरे होतें; पण तसें त्या वेळेस करून चाललें नसतें.

‘ झांशी-राणी पथका ’च्या छावणीचें उद्‌घाटन २२ ऑक्टोबर १९४३ रोजीं झालें. त्या दिवसापासून त्या तुकडींतील स्त्री-सैनिकांस लष्करी शिक्षण देण्याकरतां हिंदी स्वातंत्र्यसैन्यांतील सहा-सात जणांची एक तुकडी निवडण्यांत आली. ते शिक्षक रोज सकाळपासून सायंकाळपर्यंत त्या छावणींत हजर राहून इतर सैनिकांप्रमाणें त्या स्त्री-सैनिकांसही सकाळ-दुपार कवाईत, संगिनींची लढाई इत्यादि सर्व विषयांचें शिक्षण देत.

झांशी-राणी पथकांत येणाऱ्या मुलींस आपापल्या आवडीनिवडीप्रमाणें लढाईचें शिक्षण किंवा औषधोपचाराचें व शुश्रुषेचें शिक्षण घेण्याची मोकळीक असे. परंतु शुश्रुषा-पथकांत केवळ पंधरा-वीस स्त्रियाच सामील झाल्या. त्यांना सुरुवातीस इतर सर्वसामान्य प्रतीचें लष्करी शिक्षण देण्यांत येऊन नंतर शुश्रुषा आणि रुग्णोपचार या विशिष्ट शाखेचें शिक्षण मुख्यतः देण्यांत येई. लढाऊ पथकांतील मुली जशा सकाळ-दुपार लढाईचें शिक्षण घेत. तशाच या शुश्रुषा-पथकांतील मुलींच्या शिक्षणाची सोय हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या रुग्णालयांत करण्यांत आली होती. तेथें काम करणारे डॉक्टर लोक त्यांना या विषयाचें शिक्षण देत. रुग्णालयांत त्यांना कामाचा प्रत्यक्ष अनुभवही मिळावयाची सोय झालेली होती.

सिंगापुराच्या शरणागतीनंतर जे युद्धबंदी हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत येण्यास कबूल झाले त्यांत डॉक्टरांचें प्रमाण फारच कमी होतें. हिंदी स्वातंत्र्यसैन्याची, स्वयंसेवक भरतीनंतर, जी वाढ करण्यांत आली त्यामुळें तर डॉक्टरांची उणीव फारच भासूं लागली. दूरपूर्वेंत बरेच हिंदी डॉक्टर आपला धंदा बऱ्याच वर्षांपासून करीत आहेत. डॉक्टर लक्ष्मीही त्यांपैकींच एक होत. असे स्वतंत्रपणें धंदा करणारे अथवा सरकारी नोकरींत असलेले बरेचसे डॉक्टर आपला स्वतंत्र धंदा किंवा नोकरी सोडून हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत डॉक्टर म्हणून येऊन दाखल झाले. इंग्रजी पद्धतीला अनुसरून त्यांस एकदम मेजरचा हुद्दा देण्यांत येत असे. कांहीं डॉक्टरांची सरकारी नोकरी सोडून, हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत येऊन मिळण्याची इच्छा असतांना देखील जपानी सरकारनें त्यांचे राजिनामे नामंजूर करून त्यांस नोकरींत राहण्यास भाग पाडलें. हे नवीन दाखल झालेले डॉक्टर जमेस धरून सुद्धां हिंदी स्वातंत्र्यसैन्यास डॉक्टर पुरेसे नव्हते म्हणून उच्च व मध्यम दर्जाचे ‘ड्रेसर्स’ तयार करण्याचा उपक्रम सुरू करण्यांत आला. मॅट्रिकपर्यंतचें अथवा त्याहून वरील दर्जाचें शिक्षण झालेल्या सदृढ हिंदी लोकांकडून अर्ज मागाविण्यांत आले होते. यांत वयाची अट नव्हती. या लोकांस दुय्यम प्रतीचे डॉक्टर बनवून डॉक्टरांची भासत असलेली उणीव भरून काढावयाची असें ठरलें होतें. या लोकांस शिक्षण देऊन तयार करण्याचें काम, हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या वैद्यकखात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे होतें. त्यांनीं या लोकांस दुय्यम प्रतीचे डॉक्टर म्हणून तयार करण्याकरतां योग्य तो शिक्षणक्रम आंखला व हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या मुख्य रुग्णालयास जोडून योग्य डॉक्टरांच्या देखरेखीखालीं त्या सर्वांच्या शिक्षणाची सोय केली. त्या शिक्षणक्रमांतून उत्तम तऱ्हेनें उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांस उच्च दर्जाचे ‘ड्रेसर्स’ म्हणून हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत घेतलें जाई. इतरांस मध्यम प्रतीचे म्हणून घेण्यांत येई. हा शिक्षणक्रमही सहा महिन्यांचा होता. यामुळें दोनतीनशें ‘ड्रेसर्स’ हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत सामील झाले व डॉक्टरांची उणीव बरीचशी भरून निघाली. त्यामुळें अत्यवस्थ किंवा शस्त्रक्रियेची जरूर असणाऱ्या रोग्यांशिवाय इतर सर्वसामान्य रोग्यांस ‘ड्रेसर्स’ वर सोपविणें सोईचें झालें.

प्रत्येक महत्त्वाच्या ठिकाणीं बालकसेनाही उभारण्यांत आलेली होती. यांत सामान्यतः बारा ते अठरा वर्षें वयाच्या दरम्यान असलेलीं मुलें घेण्यांत येत. परंतु कित्येक मुलांचा दांडगा उत्साह लक्षांत घेतां, त्यांचें वय कमी असलें तरी त्यांस प्रवेश नाकारणें कठिण होई. बालकसेनेंतील या बालसैनिकांची शिस्त फारच वाखाणण्यासारखी होती. त्याची थोडीबहुत कल्पना यावी म्हणून येथें माझ्या स्मरणांतील एक दोन प्रसंगांचा उल्लेख करितों. एके प्रसंगीं नेताजीसप्ताहानिमित्त हिंदी स्वातंत्र्यसैन्याचे निरनिराळे खेळ ठेवण्यांत आलेले होते. यांत बालकसेनेचाही भाग होताच. बालकसेनेच्या विशिष्ट खेळांची पाळी येतांच

त्यांच्या पंचवीस-तीसजणांच्या तुकडीस त्यांच्या चिमुकल्या म्होरक्यानें चार चार जणांचे रांगांत धांवत धांवत मैदानाच्या मध्यावर आणून शिस्तींत उभें केलें. नंतर तो लहानसा नायक पळत पळत नेताजी बसले होते त्या तंबूशीं येऊन त्यांच्यासमोर ताठ उभा राहून, डोळ्यांचीं बुबुळें मुळींच न हालवितां, नेताजींच्या दृष्टीस नजर भिडवीत, हातपाय व एकंदर शरीर निश्चल ठेवून, ठासून 'जयहिंद' असें जोरांत म्हणाला. त्याच्या अभिवादनाचा नेताजींकडून स्वीकार होतांच "खेळ सुरू करूं का ?" असें त्यानें पुन्हां उच्च स्वरांत विचारलें. नेताजींनीं आपला रुकार दर्शवितांच तो पळत पळत मैदानाच्या मध्यावर गेला व त्यानें हुकुमावर हुकूम सोडून त्या छोट्याशा तुकडीकडून विविध प्रकारचे खेळ करवून प्रेक्षकांस थक्क करून सोडलें. सांघिक खेळांत क्वचित् एखाद्या मुलानें चूक केल्यास तो त्यांचा चिमुकला नायक त्यास दरडावीत असे. त्यांच्या बोलण्याचालण्यांत व वागण्यांत मिळमिळीतपणास कोठेंच वाव ठेवण्यांत आलेला नव्हता.

दुसऱ्या एका प्रसंगीं कर्नल भोसले हे या बालकशिक्षणकेंद्राच्या पाहाणीस गेले असतांना ते एका वर्गांत शिरले. तेथें नकाशाच्या साहाय्यानें हिंदुस्थानाच्या पूर्व सरहद्दीवर हिंदी स्वातंत्र्यसैन्यानें केलेल्या हल्ल्याची त्यांस माहिती दिली जात होती. भोसल्यांनीं त्या वर्गांत बसलेल्या पंचवीस-तीस मुलांपैकीं एकास विचारिलें "तूं कोण आहेस ?" "मी हिंदुस्थानी आहे." त्यानें ताड्कन् उत्तर दिलें. "येथील शिक्षणक्रम झाल्यावर कोठें जाण्याची तुझी इच्छा आहे ?" या प्रश्नाच्या उत्तरादाखल तो म्हणाला, "मला हिंदुस्थानाच्या सरहद्दीवर लढावयास जावयाचें आहे." अशी त्या सर्वांची मनोवृत्ति तयार झालेली होती. 'आम्ही सर्व एक आहोंत, आमचा देश एक, राष्ट्रभाषा एक, आमचा शत्रु एक,' हें तत्त्व त्या सर्वांच्या मनांत पक्कें बिंबलें होतें.

लष्करी शिक्षणाच्या दुसऱ्या महत्त्वाच्या अंगांचाही हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या विविध कार्यक्रमांत अंतर्भाव करण्यांत आलेला होता. ब्रिटिश मलायाच्या उत्तरेस पूर्व किनाऱ्यावर पेनांग नांवाचें एक लहानसें बेट महत्त्वाचें बंदर आहे. येथें जपान्यांनीं हिंदुस्थानावर चढाई करण्याच्या उद्देशानें एका गुप्त लष्करी शिक्षणाच्या शाळेची मुहूर्तमेढ रोवलेली होती. येथें तयार झालेल्या तरूण आणि धाडसी लोकांस पाणबुडीनें हिंदुस्थानाच्या किनाऱ्यावर सोडावयाचें व मग या लोकांनीं हिंदुस्थानांत निरनिराळ्या ठिकाणीं गुप्तपणें राहून इंग्रजांच्या युद्धतयारीचे अनेक डाव हाणून पाडावयाचे, त्यांत अडथळे आणावयाचे, सैनिकांनीं भरलेल्या गाड्या उलथून पाडावयाच्या, पूल उडवावयाचे, लष्करी कोठारें उध्वस्त करावयाचीं, तिकडील महत्त्वाची बातमी बिनतारी यंत्रानें जपानी अधिकाऱ्यांस पोंचवावयाची असा त्यांचा हेतु होता. ही शिक्षणसंस्था नाममात्र जरी ज. मोहनसिंग आणि त्या वेळच्या स्वातंत्र्य-चळवळीच्या इतर पुढाऱ्यांच्या हाताखालीं होती तरी जपानी त्यांस न विचारतां हा सर्व डाव आपल्यास अनु-

कूल असाच टाकीत होते. १९४२ च्या ऑक्टोबर महिन्यांत जपान्यांनीं येथें तयार करण्यांत आलेल्या लोकांस हिंदी चळवळीच्या पुढाऱ्यांस विचारिल्याशिवायच हिंदुस्थानांत पाठवून दिलें. तेव्हां सर्व हिंदी लोकांनीं जपान्यांशीं या बाबतींत सहकार्य करावयाचें सोडून दिलें आणि त्याच वर्षीं नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीस ही शिक्षणसंस्था बंद पाडली. यामुळें जपानी अधिकाऱ्यांच्या तळपायाची आग मस्तकास जाऊन पोहोंचली. ज. मोहनसिंगांचें व जपान्यांचें वांकडें येण्याच्या अनेक कारणांत या एकाची भर पडली.

नेताजी आल्यावर हीच शिक्षणसंस्था हिंदी स्वातंत्र्य-चळवळीचें एक मुख्य अंग म्हणून हिंदी अधिकाऱ्यांच्या आधिपत्याखालीं पुन्हां चालू करण्यांत आली. आतां मात्र यावर प्रत्यक्ष नेताजींचाच अधिकार असे. ह्या संस्थेच्या कार्याबद्दल संपूर्णपणें गुप्तता राखण्यांत येत असे. स्वतः नेताजी व त्यांनीं या कामाकरतां नेमलेले चार-पांच अधिकारी याव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस या शाळेबद्दल यत्किंचितही माहिती कळत नसे. प्रत्यक्ष त्यांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा त्यांच्या जन्मदात्या मातापित्यांशीं संबंध तुटल्याप्रमाणें होई. आपली खुशाली घरीं कळविण्याची परवानगीही त्यांना क्वचितच मिळत असे. अर्थात् हें कामच इतकें महत्त्वाचें होतें कीं, याबाबत जेवढी खबरदारी घ्यावी तेवढी थोडीच होती. वेळोवेळीं इंग्रज सरकार व त्यांचे अधिकारी यांनींच या व अशा इतर शाळांच्या कामगिरीबद्दल जी माहिती दिली आहे त्यावरूनच या शाळांच्या कार्याबद्दल आपणांस बरीचशी कल्पना येण्यासारखी आहे. १९४२ पासून अशा तऱ्हेचे लोक हिंदुस्थानाच्या पश्चिम किनाऱ्यावर म्हणजे त्रावणकोर, ब्रिटिश मलबार, गोवा, कोंकण, कच्छचें रण, बलुचिस्थान येथें कोळ्याच्या किंवा तत्सम वेषांत उतरतात आणि कोठल्याकोठें अदृश्य होतात असा इंग्रजांस संशय येऊं लागला. त्यामुळें त्यांनीं जास्त जागरूक राहून या दिशेनें कसून शोध केला. मुंबईच्या अभूतपूर्व स्फोटासारख्या अनेक उत्पातांचें हिंदुस्थानांत जागोजागीं जें पेंव फुटलें होतें त्याच्याशीं या लोकांचा कांहीं संबंध असावा हा त्यांचा ग्रह दिवसेंदिवस दृढ होत गेला. पुढें बलुचिस्थानाच्या किनाऱ्यावर उतरलेलें अशा हेरांचें एक टोळकें सरळ इंग्रजांस जाऊन मिळालें व त्यानें सर्व गौप्यस्फोट केला. दुसऱ्या एका टोळीपैकीं पांच लोक इंग्रजांच्या तावडींत सांपडले. त्यांस ‘ देशद्रोही ’ ( म्हणजे इंग्रजद्रोही ! ) या आरोपाखालीं त्यांनीं लाहोरास फाशीं दिलें. हें वृत्त सिंगापूर येथें पोंचतांच नेताजींना आणि स्वातंत्र्यचळवळींतील सर्वच लोकांना अत्यंत हळहळ वाटली. त्या हुतात्म्यांच्या तसबिरी मोठ्या मानसन्मानानें हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या सिंगापुरांतील सभागृहांत लावण्यांत आल्या. एक मोठा समारंभ करून त्या वीरांच्या निकटच्या आप्तेष्टांस बोलावून व त्यांना थैल्या अर्पण करण्यांत येऊन त्यांचा सन्मान करण्यांत आला. पेनांगच्या या शाळेंत उत्पातादि विषय शिकविण्याकरतां तज्ज्ञ जपा-

ऱ्यांची नेमणूक करण्यांत आलेली होती. त्यांत 'यामानूची' नांवाचा एक कॅप्टन-च्या हुद्याचा अधिकारी होता. अखेर निवडीच्या वेळीं कोणकोण विद्यार्थी हिंदुस्थानांतील अनेक संकटांस तोंड देऊन काम करण्यास लायक आहेत हें ठरविणाऱ्या चार-पांच हिंदी आणि जपानी अधिकाऱ्यांपैकीं तो एक होता. बलुचिस्थानाच्या किनाऱ्यावर जी १०-१२ जणांची टोळी उतरविण्यांत आली ती सर्वच्या सर्व इंग्रजांस सामिल झाली हें वृत्त ऐकून त्या संस्थेच्या अधिकाऱ्यां-विरुद्ध एकच गहजब झाला. दोष, सर्वस्वीं कांहीं विशिष्ट हिंदी अधिकाऱ्यांचाच होता; कारण वरपांगीं देशभक्तीच्या आणा-भाका वाहिलेले ते लोक खरे देश-प्रेमी नव्हते असें आढळून आलें. अधिकारलालसा आणि जपान्यांच्या कैदें-तील त्रास टाळणें या दोन कारणास्तव ते स्वातंत्र्य-चळवळींत शिरलेले होते, असे लक्षांत आलें. हिंदुस्थानांतील फितुरीच्या अरिष्टास कारणीभूत झालेल्या अशांपैकीं एक दोन अधिकाऱ्यांविरुद्ध नेताजींनीं कडक उपाययोजना कर-ण्याचें ठरविलें. एका उच्च पदावरील हिंदी अधिकाऱ्याचें त्यांत अंग आहे असेंही स्पष्ट दिसून आलें. तथापि त्याच्याविरुद्ध सबळ पुरावा गोळा करण्यांत कांहीं तात्त्विक अडचणी येत असल्यामुळें, क. भोसल्यांच्या मध्यस्थीमुळें आणि स्वतःच्या बळकट दैवामुळें तो अधिकारी सपशेल सुटला. त्या शाळेशीं निकटचा संबंध असलेल्या दुसऱ्या एका उच्च अधिकाऱ्यावर आरोप ठेवून त्याची नेताजींसमोर रीतसर चौकशी झाली. यासारख्या घोर अपराधास देहान्त शासनाशिवाय दुसरी शिक्षा नसतांही नेताजींनीं आपल्या नेहमींच्या अत्यंत दयाळू स्वभावास अनुसरून त्यास साध्या कैदेची शिक्षा सांगितली.

इकडे, कॅप्टन यामानूची या अधिकाऱ्याचा कांहींही दोष नसतां, केवळ 'आपली देखरेख असून सुद्धां इतकी गफलत कशी झाली ?–द्रोही लोक आपण या कार्यास विश्वासू म्हणून कसे निवडून दिले ? ' असा ठपका आपल्यावर येईल म्हणून त्यानें सिंगापुरांतील स्वतःच्या बंगल्यांत ' हाराकीरी ' करून घेतली. रक्ताच्या थारोळ्यांत त्याचा मृत देह लडबडत पडलेला होता. आंतडीं बाहेर आलेलीं होतीं. अंगावर शहारे आणणारें असें तें भयंकर दृश्य होतें. हिंदी लोकांनीं देशद्रोह केला म्हणून बिचारा हा जपानी प्राणास मुकला असें माझ्या मनांत सारखें येत असे. उलट ज्या हिंदी अधिकाऱ्यांनीं प्राण द्यावयास पाहिजे होते ते तर उजळ माथ्यानें फिरतच राहिले. लांछनास्पद जीवन जगण्यापेक्षां स्वेच्छेनें मरण पत्करणें हेंच प्रत्येक वीराचें कर्तव्य आहे असा जपानांत पायंडा पडलेला आहे; व खंजीरानें पोट फाडून मरणें हेंच वीरोचित मरण. या रीतीनें होणाऱ्या हालअपेष्टांस भिऊन जो इतर रीतीनें सत्वर मरण ओढवून घेण्याचा प्रयत्न करील तो भ्याड ही मतप्रणाली जपानमध्यें सर्वमान्य झालेली आहे. कॅप्टन यामानूची याच्या शवाचें यथोचित दहन करण्यांत आलें. त्याच्या कुटुंबियांस हिंदी स्वातंत्र्य-सैन्यातर्फे सांत्वन-पर पत्र पाठविण्यांत आलें.

जपानी रीतीरिवाजाप्रमाणें शवाचें यथोचित दहन केल्यावर जेंगांझी नांवाच्या एका मंदिरांत मृतात्म्यास शांति मिळावी म्हणून कांहीं संस्कार-समारंभ करण्यांत येतात. आमच्या चळवळीशीं संबंध असलेल्या जपान्याचा मृत्यु झाला म्हणजे अशा समारंभास आमच्या सैन्याचे व संघाचे प्रतिनिधी हजर राहात. मला अशा समारंभास हजर राहण्याचे दोन-तीन प्रसंग आले. त्यांपैकीं हा एक प्रसंग होता म्हणून त्या समारंभाची वाचकांस यथार्थ कल्पना येण्याकरतां त्याचें वर्णन येथें देत आहें. अमुक इतक्या वाजतां समारंभास सुरुवात होईल असें सर्वांस आगाऊ लेखी कळविण्यांत येत असतें. त्याप्रमाणें ठरलेल्या दिवशीं योजिलेल्या वेळेच्या ५-१० मिनिटें अगोदर सर्व मंडळी येतात. आल्याबरोबर सर्वांचें स्वागत करण्यास मंदिराच्या दाराशींच उभे असलेले दोघे गृहस्थ सर्वांस वरच्या बसावयाच्या खोलींत जाऊन बसण्याची विनंति करितात. सर्वांचा पोषाख पाश्चात्य पद्धतीचाच असतो. मंदिराच्या पडवींत शिरल्याबरोबर प्रत्येकास एक टांचणी ( किंवा सेफ्टीपिन ) आणि काळ्या कापडाची एक लहान पट्टी देतात. त्या टांचणीच्या साहाय्यानें प्रत्येकजण ती पट्टी स्वतःच्या उजव्या किंवा डाव्या दंडास अडकवितो आणि नंतर माडीवरील दिवणखान्यांत जाऊन समारंभाची वेळ होईपर्यंत गप्पा मारीत बसतो. समारंभाची वेळ एका घंटेनें सर्वांस सूचित करण्यांत येते. सर्वजण खालच्या मजल्यावरील मंदिराच्या सभागृहांत जमतात. तेथें मधोमध लहानशी अशी वाट सोडून दोन्ही बाजूस रांगेनें ठेवलेल्या खुर्च्यांवर प्रत्येकजण आपल्या हुद्याप्रमाणें पुढच्या अथवा मागच्या रांगेंत बसतो. दोन्ही बाजूच्या दालनांत मृत व्यक्तीच्या बहुमानार्थ पाश्चात्य पद्धतीप्रमाणें, पाठविणाऱ्या व्यक्तीचें वा संस्थेचें नांव त्यावर अडकवून पाठविलेलीं मोठालीं पत्र-पुष्पवलयें उंच तिपाईवर रांगेनें एकामागें एक ठेविलेलीं असतात. प्रेक्षकांच्या-समोर भिंतीजवळ बुद्धाची एक भव्य मूर्ती आणि त्या मूर्तीच्या बाजूला विविध वस्तूंची आरास केलेली असते. मेणबत्त्या, उदबत्त्या इत्यादि लाविलेल्या असून समोरील एका भांड्यांत धूप जळत असतो. त्या मूर्तीसमोर भात व इतर वस्तूंचा प्रसादही ठेविलेला असतो. मृत व्यक्तीची रक्षा मिळणें शक्य असल्यास तीही एका खोक्यांत बंद करून तेथें आणून ठेवितात. ( शव, दहनाच्या आधीं, कांहीं कारणामुळें एक-दोन दिवस ठेवावें लागल्यास तें एका पेटींत बंद करून त्याच्यासमोरही प्रसाद ठेवून व मेणबत्त्या, उदबत्त्या लावून मंत्रपठन इत्यादि होतें.) या आराशीचे खालच्या टोंकास दोन्ही बाजूंस ठेविलेल्या तीन-चार खुर्च्यांवर, नाटकाची वेळ होतांच ज्याप्रमाणें तबलजी व पेटीवाले येऊन बसतात, त्या-प्रमाणें, पाश्चात्य पद्धतीच्या पोषाखावर लांब काळे डगले घातलेले आणि डोक्याची स्वच्छ हजामत केलेले असे जपानी पुरोहित येऊन बसतात. मुख्य पुरोहिताच्या समोर एक तांब्याची अथवा तत्सम् स्थाली एका लांकडी चौकटींत अडकविलेली असते. तीवर तो एका दांड्यानें अधून मधून स्थालीनाद करीत

असतो. वेळ होतांच ॐ याच अक्षराचा एक विकृत हेल काढून ते मंत्रपठन करूं लागतात. त्यांच्या त्या मंत्र म्हणण्याच्या पद्धतीवरून ते मंत्र व ती पद्धत मुळांत आपल्याकडूनच तिकडे गेलेली असली पाहिजे, याबद्दल मुळींच शंका राहात नाहीं. आजमितीसही बौद्ध धर्मावरील अथवा त्याच्याशीं संबंध असलेले बरेच संस्कृत ग्रंथ जपानांत आहेत व पिढीजात पौरोहित्य करणारे आणि इतर विद्वान त्या ग्रंथांचें अद्यापि परिशीलन करितात. हें मंत्रपठन सुमारें अर्धा तास चालतें. तदनंतर त्या व्यक्तीशीं निकटचा संबंध असणारे अधिकारी त्याच्या गुणवर्णनपर एक लहानसा लेख वाचतात. यानंतर प्रेक्षकगणांतील मुख्य मुख्य व्यक्ती एका-मागून एक उठून त्या धूपपात्राशीं जाऊन तेथें थोडा वेळ थांबून जवळ ठेविलेला धूप तीन वेळां त्या पात्रांत घालून परत येतात आणि मग हा कार्यक्रम समाप्त होतो.

पेनांगच्या या संस्थेनें बरेंच महत्त्वाचें कार्य केलें. ब्रिटिशांनीं दिलेल्या लष्करी हुद्याचा विचार न करितां येथें जर योग्य म्हणजे खरोखर देशभक्त अधिकाऱ्यांची निवड झाली असती तर या संस्थेकडून आणखी उत्तम कार्य झालें असतें. त्यांतल्या त्यांत मला समाधान वाटण्यासारखी गोष्ट अशी कीं, या कार्याकरतां हिंदुस्थानांतील एका विशिष्ट प्रांतांतील भाषा बोलणाऱ्या एका व्यक्तीचें नांव सुचवावें अशी नेताजींकडून मागणी आल्यामुळें मी एका व्यक्तीचें नांव सुचविलें. नेताजींनीं त्या व्यक्तीची भेट घेतली. त्यांचें समाधान होऊन असल्या कार्यास सर्वतोपरी योग्य म्हणून नेताजींची त्या व्यक्तीबद्दल खात्री झाली. त्या व्यक्तीस पुढें कार्य करण्याकरतां हिंदुस्थानांत पाठविलें आणि आमची ती निवड योग्य ठरली.

वर वर्णिलेल्या अनेक प्रकारच्या लष्करी शिक्षणाशिवाय छत्रीसैनिकांचें ( पॅरॅट्रुप्स ) शिक्षणही हिंदी स्वातंत्र्यसैन्यांतील दोन तुकड्यांस दिलें गेलें होतें. या तुकड्यांचें शिक्षण सुमात्रा बेटांत झालें. १९३९ ते ४५ च्या महायुद्धांत जर्मनीनें बेलजियम, हॉलंड, क्रीट इत्यादि देशांत आपल्या छत्रीसैनिकांचा पाऊस पाडून ते देश काबीज करून जगाला थक्क करून सोडलें. तद्वत पुढेंही रोम शहरांत जर्मन छत्रीसैनिकांनीं एकाद्या घारीप्रमाणें झेंप घालून मुसो-लिनीला शत्रूच्या दाढेंतून त्याच्या डोळ्यांदेखत अलगद उचलून नेलें. यावरून छत्रीसैनिक किती महत्त्वाचीं कामें करूं शकतात, याची आपणांस कल्पना येईल. अर्थात् अशा अचाट कृत्यांनीं जगाला थक्क करून सोडणें हिंदी स्वातंत्र्य-सैन्याच्या छत्रीसैनिकांस, मनुष्यबळ आणि युद्धसामुग्री यांच्या अभावीं शक्यच नव्हतें. तरीपण छत्रीसैनिकांचें आणखी एक महत्त्वाचें कार्य असतें व तें म्हणजे शत्रूस न कळतां रात्रीं अपरात्रीं छत्र्यांच्या साहाय्यानें शत्रुव्याप्त प्रदेशांत उतरा-वयाचें व तेथें राहून उत्पात, नाशकारक उपद्व्याप, हेरगिरी यांसारखीं गुप्त

कामें करावयाचीं, शत्रूची रसद तोडावयाची, मध्यवर्ती केंद्राशीं शत्रूच्या आघाडी-वरील फौजेचें चालणारें सर्व प्रकारचें दळणवळण बंद पाडावयाचें इत्यादि. ह्या कामाकरतां थोडे छत्रीसैनिक पुरतात व हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत अशा तुकड्या तयार करण्यांत हाच मुख्य उद्देश होता. सुमात्रा बेटांतील पहिल्या तुकडीचें शिक्षण संपल्यावर दुसऱ्या तुकडीकरतां, योग्य अशा सुमारें सव्वाशें माणसांची निवड करण्याचें काम कर्नल भोसले यांनीं माझ्यावरच सोंपविलें. सिंगापूर व जोहोर-बारू येथें असलेल्या हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या निरनिराळ्या तुकड्यांस आगाऊ जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार मी भेट दिली आणि आलेल्या उमेद-वारांपैकीं सव्वाशें सैनिकांची निवड केली. त्यांत लेफ्टनंटपासून तों साध्या शिपायापर्यंतच्या सर्व दर्जाचे सैनिक होते. छत्रीसैनिकांचें काम विशेष जोखमीचें असल्यामुळें त्यांतील धोक्याची स्पष्ट कल्पना दिल्यावरही ज्यांचा उत्साह दुर्दम दिसत होता त्यांसच या तुकडींत स्थान द्यावयाचें असें मी मनाशीं ठरविलें होतें. त्याशिवाय अचल देशभक्ती, सुदृढ आणि काटक शरीर, शिक्षण, चुण-चुणीतपणा, सचोटी, धीटपणा, आज्ञापालनतत्परता इत्यादि गुणही भावी छत्री-सैनिकांच्या अंगीं असणें आवश्यक होतें. जरूर तितक्या लोकांची निवड करून ही तुकडी संघटित केल्यावर ती एका लहान मोटारबोटीनें सुमात्रा बेटांत शिक्षण घेण्याकरतां रवाना झाली. लेफ्टनंट वामनराव देशमूख हे अमरावतीचे गृहस्थ या तुकडीचे मुख्य होते. त्यांनीं ती जबाबदारी उत्तम प्रकारें पार पाडली. सिंगापूरच्या धक्क्यावरून ही बोट सुटावयाच्या वेळीं कर्नल भोसले हे हिंदी स्वातंत्र्यसैन्याचे कार्याध्यक्ष ( चीफ ऑफ स्टाफ ) या नात्यानें त्या तुकडीस शुभाशीर्वाद देण्यास जातीनें तेथें हजर होते. ही तुकडी तीन-चार महिने सुमात्रा बेटांतील एका लहानशा गांवीं राहिली. तेथें एका जपानी, हवाई शिक्षण-केंद्रावर त्यांचें शिक्षण सुरू होतें. परंतु तीन-चार महिने त्यांचें शिक्षण होतें न होतें तोंच प्रशान्त महासागरांतील लढाईस जोर चढला. जपानमधील विमानांचें उत्पादन अमेरिकेंतील विमानांच्या उत्पादनाशीं टिकाव धरूं शकलें नाहीं. असतील नसतील तेथून आपल्या हवाई तुकड्या आणि विमानें मागवून घ्याव-याचीं असें जपानी सरकारनें ठरविलें. त्याप्रमाणें या तुकडीसही हुकूम येतांच ही तुकडी आपलें चंबूगबाळें आटोपून निघून गेली हें वर आलेंच आहे. अर्थात् आमच्या तुकडीचें शिक्षण अर्धवटच राहिलें आणि ती मलायांत परत आली. त्यांचें शिक्षण मलायांतही चालू ठेवण्यांत आलें. खरेंखुरें कार्य करून दाख-विण्याकरतां त्यांना पुढें पाठविण्याची तयारी चालली होती; पण इतक्यांत युद्धच बंद पडलें.

वाचकांच्या माहितीकरतां येथें एवढें सांगून ठेविलें पाहिजे कीं, छत्री-सैनिकांच्या एकंदर शिक्षणांत प्रत्यक्ष छत्री घेऊन विमानांतून उडी टाकणें व पृथ्वीवर सुखरूप येऊन उतरणें या भागास अगदीं गौण स्थान असतें. शत्रूला नकळत

अचानकपणें त्याच्या प्रदेशांत उतरतां यावें, एवढ्याकरतां तें एक साधन आहे एवढेंच ! अंतराळांतून पृथ्वीवर पोंचावयास लागणाऱ्या वीस-पंचवीस मिनिटांपुरताच त्या छत्रीचा आणि त्या सैनिकाचा संबंध. पृथ्वीवर पोंचून छत्री टाकून दिल्यावर त्या छत्रीसैनिकाच्या खऱ्या कार्यास सुरुवात होते. उत्पातादि गुप्त कार्य करण्यांत त्यानें जें कौशल्य मिळविलें असेल त्याचेंच खरें महत्त्व असतें. छत्रीच्या साहाय्यानें सैनिक उतरविण्यांत मात्र अनेक फायदे असतात; विशेषतः शत्रूला नकळत शत्रूच्या प्रदेशांत वाटेल तेथें असे सैनिक उतरवितां येतात. याकरतां काळा पोषाख, अमावास्येची रात्र व कार्यक्षेत्राच्या आसपास असलेलें मोकळें मैदान इत्यादि गोष्टींचा उपयोग केला म्हणजे झालें. अलास्कासारख्या बर्फमय प्रदेशांत असे सैनिक उतरावयाचे झाल्यास सैनिकांस पांढरा पोषाख चढविल्यास ते त्या प्रदेशांत लवकर लुप्तप्राय होऊं शकतात. विमानाचा वेग जास्त असल्यानें कोणत्याही ठिकाणीं सैनिक उतरविण्याचें काम झटकन् होतें. विमान वाटेल त्या मार्गानें व बऱ्याच उंचीवरून उड्डाण करूं शकत असल्यामुळें शत्रुदलाकडून त्यास सहसा अडवणूक होण्याची भीति नसते. याच्या उलट बोटीनें सैन्य वाटेल त्या ठिकाणीं उतरविणें तर शक्य नसतेंच; पण शिवाय बोटीचा मार्ग खडक इत्यादींच्या अस्तित्वामुळें नियंत्रित झालेला असतो. बोटीच्या मंदगतीमुळें प्रवासाला बरेच दिवस लागून तेवढ्यांत शत्रूच्या पाणबुड्यांच्या, लढाऊ जहाजांच्या व विमानांच्या उपद्रवानें सर्वनाश होण्याचा विशेष संभव असतो. विमानें टेहेळणी करावयास व शत्रुप्रदेश उध्वस्त करावयास जातात तेव्हां त्या स्वारींत छत्रीसैनिक उतरविण्याचा त्यांचा हेतूही साध्य होऊं शकतो. छत्रीसैनिक तुकड्यांचे असे अनेक फायदे आहेत. या बाबतींतही हिंदी स्वातंत्र्यसैन्याचें पाऊल पुढेंच होतें.

इतक्या विविध तऱ्हेच्या शिक्षणाची सोय हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत केलेली होती. लष्करी शिक्षणाच्या मार्गातील अनेक अडचणी लक्षांत घेतां हें लष्करी अंगोपांगाच्या शिक्षणाचें काम चांगलेंच यशस्वी झालें असें म्हणावयास हरकत नाहीं.

## नेताजींनीं सर्व जबाबदारी पत्करली : १५

दूरपूर्वेतील सुमात्रा, जावा, बोर्निओ इत्यादि प्रदेशांत दौरा काढून नेताजी १९४३ च्या ऑगस्ट महिन्याच्या ११ तारखेस फिरून सिंगापुरांत येऊन दाखल झाले. सर्व प्रदेशांतील हिंदी लोकांचा दुर्दम उत्साह पाहून त्यांचा आत्मविश्वास दुणावला. हिंदी पारतंत्र्याच्या इतिहासांत, येथील मनुष्यबळ आणि द्रव्यबळ यांच्या जोरावर व इतर राष्ट्रांच्या मदतीनें आपण एक अचाट कामगिरी करूं शकूं अशी त्यांची खात्री झाली. शिष्याची उत्कट इच्छा असली तर त्यास योग्य असा गुरु लाभतोच, त्याप्रमाणें दूरपूर्वेतील लोकांस श्री. सुभाषचंद्र यांच्यासारखा नेता मिळाला व त्यांनांही हवे होते तसे लढाऊ वृत्तीचे अनुयायी मिळाले. हवी होती तशी सर्व परिस्थिति अनुकूल आहे असें दिसून आल्यावर नेताजींनीं मोठ्या धडाडीनें सर्व जबाबदारी आपल्या शिरावर घेण्याचें ठरविलें. यापूर्वीं ज्यांनीं ज्यांनीं या चळवळीचें धुरीणत्व पत्करलें होतें, त्यांनीं तें केवळ धडधडत्या अंतःकरणानें व साशंक मनोवृत्तीनें पत्करलें होतें. आपण पूर्वीं इंग्रजांच्या लष्करी नोकरींत असून त्यांस राजनिष्ठ राहाण्याबद्दल शपथ वाहिली होती, हिंदुस्थानाची जनताही आपणांस जपान्यांचे हस्तक समजून आपल्यास पाठिंबा देणार नाहीं, इंग्रजांची शक्ति अचाट असून तेच युद्ध जिंकतील व मग आपले हाल कुत्राही खाणार नाहीं असें ज्यास त्यास वाटत होतें. श्री. सुभाषचंद्र यांच्या मनांत मात्र असा कोठल्याच प्रकारचा किंतु नव्हता. आपल्याला काम करितां येण्यासारखी परिस्थिति आहे कीं नाहीं एवढेंच त्यांस बघावयाचें होतें. देशसेवेचें व्रत तर त्यांनीं पहिल्यापासूनच घेतलें होतें. अर्थात् त्यांनीं कोणाचीही मदत घेतली असती तरी त्यांच्या शुद्ध हेतुबद्दल हिंदुस्थानांत कोणाच्याही मनांत यत्किंचितही शंका आली नसती. यदाकदाचित् अशी शंका घेणारा कोणी असला तरी अशा लोकांच्या मताबद्दल मुळींच पर्वा न करण्याइतके श्री. सुभाषचंद्र हे देशहितरत आहेत. देशाच्या स्वातंत्र्याची त्यांस इतकी तळमळ लागलेली आहे कीं, तें साध्य करण्याच्या मार्गांत येणाऱ्या कसल्याही प्रकारच्या अडचणीस तोंड देण्याची त्यांची तयारी आहे. मग त्यांत स्वतःबद्दल इतरांचीं मतें कांहीं कारणानें कलुषित झालीं तरी त्याची ते काय तमा बाळगणार ?

जर्मनींतील वर्षभराच्या वास्तव्यांत त्यांना लष्करी संघटनेची माहिती करून घेण्याची चांगलीच संधी मिळाली व त्याचा त्यांनीं चांगला फायदाही करून घेतला. उत्तर आफ्रिकेच्या लढायांत जे हिंदी युद्धबंदी हातीं लागले त्यांपैकीं

बरेचसे रोम व बर्लिन येथें आणून स्थानबद्ध करण्यांत आले होते. त्यांतून पांच हजार सैनिकांची हिंदी स्वातंत्र्यसेना श्री. सुभाषचंद्र यांनीं आपल्या बर्लिन येथील एक वर्षाच्या वास्तव्यांत उभी केली. तिरंगी झेंड्यावरील चरखा काढून त्या जागीं झेप घेत असलेल्या वाघाचें चित्र प्रस्थापित करण्यांत आलें. ' जर्मनींत उपलब्ध असलेली उत्तमोत्तम सामुग्री आधीं या सैन्यास पुरवावी ' असा जर्मन वरिष्ठ युद्धमंडळाचा हुकूम होता. एका जाहीर सभेंत हिटलरनें जर्मन व हिंदी लोकांस उद्देशून श्री. सुभाषचंद्र यांच्याबद्दल असे उद्गार काढले कीं, " श्री. सुभाषचंद्र यांचा दर्जा माझ्याहून मोठा आहे. कारण मी आठ कोटि जर्मनांचाच पुढारी आहें, परंतु माझ्या शेजारीं बसलेले हे गृहस्थ चाळीस कोटि लोकांचे पुढारी आहेत ! " तथापि दूरपूर्वेंत जितके हिंदी लोक वस्ती करून राहिले आहेत तितके युरोपमध्यें नसल्यामुळें हिंदी स्वातंत्र्यचळवळीची वाढ होण्यास त्या बाजूला वाव नव्हता. शिवाय जर्मनीची जोंपर्यंत रशियांत सरशी होत होती तोंवर हें लहानसेंच स्वातंत्र्यसैन्य कां होईना परंतु अफगाणिस्थान वा बलुचिस्थानमार्गें हिंदुस्थानांत येऊं शकेल अशी आशा करण्यास जागा होती. परंतु रशियन प्रकरण लवकर आटोक्यांत येणारें नाहीं असें दिसूं लागलें तेव्हां ही आशासुद्धां नष्ट झाली.

वर वर्णिलेल्या दोन्ही गोष्टींची अनुकूलता दूरपूर्वेंत असल्यामुळें आपल्याला सर्वस्वीं तेंच कार्यक्षेत्र उत्तम असें मनाशीं ठरवून नेताजी बर्लिनमधून दूरपूर्वेंत आले. येथें येऊन परिस्थितीची प्रत्यक्ष पाहाणी केल्यावर आतां कार्यास जोरानें सुरुवात करावयास कसलीही हरकत नाहीं, असें त्यांनीं स्वतःच्या मनाशीं ठरविलें. या दिशेनें पहिलें पाऊल टाकावयाचें म्हणून स्वातंत्र्य-सैन्याचें धुरीणत्व स्वतःकडे लवकरच घेण्याचा त्यांनीं बेत केला. नंतर त्यांनी छावणींतील हिंदी स्वातंत्र्यसैन्यापुढें दिलेल्या आपल्या जाहीर व्याख्यानांत त्यांनीं हा बेत प्रगट केला. ते म्हणाले, " या सैन्याचें धुरीणत्व लवकरच माझ्या स्वतःकडे घेण्याचें मी ठरविलें आहे. आपण सर्वजण पूर्वीं युद्धबंदी होतां. अर्थात् आपल्यापैकीं कोणासही ' आम्हांला जबरदस्तीनें हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत सामील व्हावें लागलें ' असें म्हणण्यास निमित्त राहूं नये म्हणून मी सर्वांस आठ दिवसांची मुदत देत आहें. एवढ्या अवधींत ज्यांस या सैन्यांतून निघून जावेंसें वाटत असेल त्यानें खुशाल निघून जावें. मग मात्र तेथून कोणाची कुरबुर राहूं नये. " या व्याख्यानास आठ दिवस होऊन गेले तरी कोणीही तेथून निघून गेल्याचें आढळलें नाहीं.

ऑगस्ट महिन्याच्या १५ तारखेस नेताजींचें फॅरर पार्कच्या मैदानांत सिंगापुरांतील हिंदी लोकांस उद्देशून जाहीर व्याख्यान झालें. हें व्याख्यान अनेक कारणांमुळें संस्मरणीय असेंच झालें. अलोट जनसमुदाय लोटला होता. जपान्यांच्या ताब्यांत असलेले व हिंदी स्वातंत्र्य-सैन्यास न मिळालेले बरेचसे हिंदी युद्धबंदीही

या व्याख्यानास हजर होते. सभामंडपाजवळील रस्त्यावर लोकांची गर्दी होऊं नये म्हणून नेहमींप्रमाणें थोड्याथोड्या अंतरावर दुतर्फा सैनिक उभे करण्यांत आले होते. ठरल्या वेळीं नेताजींची ती सुंदर, भव्य मोटार आली. मोटारीच्या पुढें व मागें मोटारसायकलीवर हिंदी स्वातंत्र्य-सैन्याचे दोन दोन सशस्त्र रक्षक होते. मोटार हांकणाऱ्याच्या बरोबर मागच्या बाजूस नेताजी बसत. त्यांच्या शेजारीं त्यांचा एक सहकारी बसे व एकजण पुढच्या आसनावर म्हणजे मोटारहांक्याच्या शेजारीं बसे. योजिलेल्या ठिकाणीं मोटार येऊन उभी राहतांच त्यांचा सहकारी चटकन् उतरून नेताजींकरतां मोटारीचा दरवाजा उघडून धरीत असे अथवा स्वागतार्थ उभ्या असलेल्या व्यक्तींपैकीं कोणीतरी पुढें होऊन तें काम करीत असे. मोटारींतून उतरल्याबरोबर, आजूबाजूच्या जनसमुदायाच्या अभिवादनाचा स्वीकार करीत नेताजी तेथें उपस्थित असलेल्या लष्करी तुकडीची लष्करी सलामी स्वीकारून त्या तुकडीची पाहणी करीत. यानंतर झेंडा वर चढवून बँडच्या नादांत सर्वजण राष्ट्रगीत म्हणत असतांना, नेताजी स्वतः राष्ट्रगीत म्हणत वर फडकणाऱ्या झेंड्याकडे तोंड करून सलामी देत उभे राहात. राष्ट्रगीत म्हणणें संपलें कीं 'जय हिंद' 'चलो देहली' इत्यादि जयघोष होत. यानंतर नेताजी सभामडपांत जात. निरनिराळ्या व्यक्ती व संस्था यांच्याकडून हार घातले गेल्यावर त्यांच्या व्याख्यानास सुरुवात होई. प्रारंभीं उल्लेखिलेल्या या प्रसंगींच्या व्याख्यानास ब्रह्मदेशाचे पुढारी 'डॉक्टर बा मॉ' हे हजर होते.

नेताजींनीं आपल्या भाषणाच्या सुरुवातीस या प्रसिद्ध पाहुण्यांची सर्व श्रोतृवृंदास ओळख करून दिली व मग ते म्हणाले,

> "आपल्या हिंदी लोकांच्या रोमारोमांत भरलेल्या गुलामीबद्दल जों जों विचार करावा तों तों मला जास्तच आश्चर्य वाटतें. ब्रह्मदेशांत युद्धापूर्वी पांच-सहा लाख हिंदुस्थानी लोक कामधंद्यानिमित्त वस्ती करून राहिले होते. येथें आज उपस्थित असलेले आमचे मित्र डॉक्टर बा मॉ यांनीं मला सांगितलें कीं, जपानी फौज जसजशी विजयी होऊन ब्रह्मदेशांत पुढें पाऊल टाकूं लागली, तसतसें इंग्रजांनीं हिंदुस्थानाच्या दिशेनें काढतें पाऊल घेतलें. त्यांच्या माघाऱ्या फिरणाऱ्या फौजांबरोबर दोन-तीन लाख हिंदी नागरिकांनींसुद्धां आपलें बिऱ्हाड पाठीवर घेऊन कूच केलें. या लोकांची मात्र हिंदुस्थान—ब्रह्मदेश सरहद्दीवर फारच दैना झाली. त्यांचे हाल कुत्रासुद्धां खाईना. पुढचा मागचा कांहीं एक विचार न करतां इंग्रज पळाले म्हणून आपण पळावें अशा तऱ्हेचें धोरण अवलंबिणाऱ्या या लोकांपैकीं लाख दीड लाख लोक, कांहीं अन्नपाण्याविना, कांहीं रोगराईस तर कांहीं हिंस्र पशूंस बळी पडून मेले. त्यांची मालमत्ता—सोनें, चांदी, नोटा इत्यादि—जंगलांत इतस्ततः फेंकलेली होती. कोणी त्यास हातसुद्धां लावीना. हेच लाख दीड लाख लोक जर स्वातंत्र्याकरतां

मरते तर आज हिंदुस्थान स्वतंत्र झाला असता. तुम्ही म्हणाल, त्यांच्याजवळ शस्त्रें नव्हतीं; परंतु जंगलांत काय दगड, विटा, सोटे इत्यादि वस्तू कमी असतात! प्रत्येकानें जर असा निश्चय केला असता कीं, आपला प्राण जाण्याच्या अगोदर शत्रूपैकीं एकाद्याचा तरी प्राण घेऊं, तर हिंदुस्थानाच्या शत्रूचीं किती माणसें गारद झालीं असतीं? आम्ही हिंदी लोक इतके मूर्ख आणि शेळपट बनलेले आहोंत! जपानी लोक येत आहेत व इंग्रज ब्रह्मदेश सोडून जात आहेत म्हणून गरीब बिचाऱ्या हिंदुस्थानी लोकांनीं आपलें सामान डोक्यावर घेऊन इंग्रजांबरोबर पळ कां काढावा? इंग्रजांस जपान्यांपासून भीति असेल; आम्हांला हिंदी लोकांना त्यांची भीति वाटावयाचें कारण काय? आम्हांला इंग्रजही सारखे आणि जपानीही सारखेच. इंग्रजांबरोबर हिंदुस्थानांत जाऊन आमच्याकरतां काय पंचपक्वान्नाचीं ताटें वाढून ठेविलेलीं आहेत कीं काय? या गोष्टीचा सांगोपांग विचार न करितां इंग्रजांच्या शेपटीला धरून पळ काढणें व लाखावारीनीं रानांत मरून जाणें यासारखी दुसरी लज्जास्पद गोष्ट नाहीं.... ... ... पुढील दोन-तीन महिन्यांत हिंदी स्वातंत्र्यसैन्य ब्रह्मदेशाकडे कूच करूं लागेल व हें वर्ष संपावयाच्या आंतच आम्ही हिंदुस्थानांत पाऊल ठेवूं... "

नेताजींची ही घोषणा कानीं पडतांच त्या सर्व समाजांत साश्चर्यानंदाची एक लाटच पसरली असें म्हणावयास हरकत नाहीं. जिकडे तिकडे जयघोष सुरू झाले. प्रत्येक चेहऱ्यावर आनंद विलसत होता. जपान्यांनीं सिंगापूर जिंकल्यापासून हिंदी स्वातंत्र्यचळवळीस सुरुवात झालेली होती, पण अशा तऱ्हेनें अमक्या तारखेच्या आंत आपण नक्कीच हिंदुस्थानांत पाऊल ठेवूं असें कोणीच आजपर्यंत म्हटलें नव्हतें. अशा तऱ्हेचें जाहीर आश्वासन देण्यासारखी तयारी इतक्या लवकर झाली, हे खरोखरच नेताजींच्या कर्तृत्वाचें निदर्शक आहे, असा विचार मनांत येऊन जमलेल्या लोकांस धन्यता वाटली. या वेळीं हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या बहादुर ग्रुपमधील श्री. दत्तात्रय श्रीधर चांदेकर (नगर) यांनीं स्टेजवर जाऊन, आपलें बोट कापून अंगांत सळसळणाऱ्या रक्ताचा टिळा नेताजींना लावला.

नेताजींनीं सढळ हातानें द्रव्यसाहाय्य करण्याची विनंति सर्वांस केली. पैसे देण्यास कुरकुरणाऱ्या लोकांस उद्देशून ते म्हणाले,

" इंग्रजी प्रजा या दृष्टीनें वास्तविक जपान्यांनीं तुम्हांस स्थानबद्ध करून तुमची मालमत्ता जप्त केली असती तर त्यांत आंतरराष्ट्रीय कायद्याच्या दृष्टीनें गैर असें कांहींच झालें नसतें. परंतु आम्ही हिंदी लोक स्वातंत्र्यप्रेमी आहोंत व अंतःकरणांतून इंग्रजद्वेष्टे आहोंत हें ठाऊक असल्यामुळेंच जपान्यांनीं हिंदी लोकांस मोकळे राहूं दिलें आणि व्यापार वगैरे करण्याची मुभाही दिली. अर्थात् तुम्ही जो व्यापार करितां तो स्वातंत्र्यप्रेमी

हिंदुस्थानी म्हणूनच करूं शकतां, त्याअर्थीं त्या व्यापारांत होणारा फायदा तुम्ही देशकार्यार्थ देण्यास यत्किंचितही कुरकूर करितां कामा नये....आम्ही आमच्या मालमत्तेंतील शेंकडा दहा अथवा शेंकडा वीसच देशकार्यार्थ देऊं अशी कित्येकजण घासाघीस करितात असें माझ्या ऐकिवांत आलेलें आहे. परंतु ही वेळ अशा प्रकारची घासाघीस करण्याची नसून शंभर टक्के स्वार्थत्याग करण्याची आहे. स्वदेशार्थ लढाईवर जाणारा सैनिक जर जिवानिशीं जातो—'मी दहा टक्के किंवा वीस टक्केच रक्त सांडीन' असें जर तो म्हणत नाहीं, तर सुखासुखी मागें बसून केवळ पैसे देणाऱ्यांस असें कोणत्या तोंडानें म्हणवेसें ?...तें कांहीं नाहीं. सिंगापुरांतील कोनाकोपऱ्यांत काय चाललें आहे, कोण काय म्हणतो, याची बित्तंबातमी मला आहे. त्यांच्याबद्दलची खडान्खडा माहिती माझ्याकडे येत असते...देशद्रोही लोकांविरुद्ध कडक उपाययोजना करण्यास मी कधींही मागें पुढें पाहाणार नाहीं...."

सुरुवातीसच नेताजींच्या गळ्यांत जे पंधरा-सोळा हार पडले होते, ते शेजारच्याच मेजावर ठेवलेले होते. त्यांचें व्याख्यान संपतांच यांपैकीं एकेक हार घेऊन त्या प्रत्येकाचा लिलांव करण्यांत आला. पहिले एक-दोन हार दोन चार लाखास गेले. तदनंतरचे पाऊण लाख, अर्धा लाख, पंचवीस हजार, पंधरा हजार इत्यादि निरनिराळ्या किंमतीस गेले. मोठ्यांत मोठा आंकडा बोलून जो धनिक तो हार विकत घेत असे तो त्या सभामंडपांतील चौथऱ्यावर येऊन नेताजींस वंदन करीत असे, नंतर नेताजी स्वतः तो हार त्याच्या गळ्यांत घालून हंसत त्याच्याशीं हस्तांदोलन करीत. पुन्हा वंदन करून तो माणूस परत जाई. अशा तऱ्हेनें त्या सर्व हारांचा लिलांव करावयास सुमारें तासभर लागला. यानंतर वैयक्तिक निधि देणाऱ्यांची रीघ लागली. यांत दहा डॉलरपासून हजारों डॉलर्स—(सिंगापुरचें नाणें—१ डॉलर = १ रु. १२ आ.) पर्यंत देणारे गरीब श्रीमंत, म्हातारे-कोतारे, मुलें, बायका, गवळी, वाणी असे नानातऱ्हेचे लोक होते. प्रत्येकाच्या रकमेचा स्वहस्तानें स्वीकार करीत नेताजींना तेथें आणखी दोन तास उभें राहावें लागलें. कोणी आपल्या लहान बालकाच्या हस्तें ती रक्कम नेताजींच्या स्वाधीन करीत, तेव्हां नेताजी लगेच त्या मुलास जवळ घेऊन त्याचें कौतुक करीत. हार-लिलांवाचा व वैयक्तिक रक्कमा घेण्याचा हा उपक्रम नेताजी हजर असलेल्या प्रत्येक जाहीर सभेंत हटकून होत असे. अशा तऱ्हेनें दोन अडीच तास व्याख्यान व त्यानंतर तीन तास हा कार्यक्रम, मिळून नेताजी दर जाहीर व्याख्यानाच्या दिवशीं पांच-साडेपांच तास सभागृहांत उभेच्या उभे असत. दर सभेस लाखों रुपये तेथल्या तेथें जमत असत

नीसून छावणींतील सैनिकांस उद्देशून केलेल्या भाषणांत जाहीर केल्याप्रमाणें नेताजींनीं १९४३ सालच्या ऑगस्ट महिन्याच्या २५ तारखेस एक

जाहीर लष्करी हुकूम काढून त्या दिवसापासून हिंदी स्वातंत्र्यसैन्याचें सरसेनापतित्व स्वतःकडे घेतलें आहे असें घोषित केलें. सिंगापुरांत आल्याबरोबर दोनच दिवसांनीं म्हणजे ४ जुलै १९४३ रोजीं श्री. सुभाषचंद्र हे दूरपूर्वेतील हिंदी स्वातंत्र्यसंघाचे अध्यक्ष झाले. २५ ऑगस्टपासून हिंदी स्वातंत्र्यसेनेचें सरसेनापतित्वही त्यांनीं आपल्याकडे घेतलें. अशा तऱ्हेनें लष्करी व बिनलष्करी अशी दोन्ही प्रकारची जबाबदारी स्वतःच्या शिरावर घेऊन नेताजींनीं धडाडीनें कार्य सुरू केलें. एवढी मोठी जबाबदारी आपणास झेपेल कीं नाहीं ? आपल्या हातून एवढा कामाचा गाडा रेटेल कीं नाहीं ? असले भ्याडपणाचे किंवा न्यूनगंडी विचार नेताजींच्या मनास शिवलेही नाहींत. आपल्या राष्ट्राचे सर्व अधिकार आपल्याकडेच असणें योग्य आहे व आपण तें काम शिरावर घेतलेंच पाहिजे, तो अधिकार स्वीकारलाच पाहिजे, परदेशी उपटसुंभ लोकांस ते अधिकार उपभोगावयाचा कांहीं हक्क नाहीं हा त्यांचा पूर्ण आत्मविश्वास !

आधींच युद्धाचीं बरींच वर्षें फुकट गेलेलीं. आतां यापुढें अधिक वेळ दवडून उपयोगी नाहीं असें ठरवून नेताजींनीं १९४३ साल उलटून जाण्यापूर्वीं हिंदुस्थानांत आपल्या सैन्यानिशीं पाऊल ठेवावयाचें अशी एक मर्यादा ठरवून घेतली व त्याप्रमाणें कार्यास सुरुवात केली. नेताजींच्या खालोखाल फौजेचे सर्व अधिकार कर्नल भोसले यांजकडेच होते. स्वातंत्र्यसंघाचे अध्यक्ष या नात्यानें नेताजी रोज सकाळीं दोन-तीन तास, संघाच्या सिंगापूर येथील मध्यवर्ती कचेरींत जाऊन तेथील कामकाज पाहात. त्यानंतर ते सुमारें तासभर स्वातंत्र्यसैन्याच्या मुख्य कचेरींत येऊन बसत व तेथील महत्त्वाचीं कामें करीत. याप्रमाणें सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीपर्यंत त्यांचें काम चाललें होतें. सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीस ते मोटारीनें मलायाच्या दौऱ्यावर निघाले. सेरंबन, कोलालंपूर, ईपो, पेनांग इत्यादि ठिकाणांस त्यांनीं भेट दिली. दर ठिकाणीं सर्व जनतेंत अलोट उत्साह दिसून येत होता. जाहीर सभेंत नेताजींचें व्याख्यान, हारांचा लिलांव, इतर स्वयंस्फूर्त देणग्या, स्थानिक स्वातंत्र्यसंघाच्या कार्यकर्त्यांशीं विचारविनिमय इत्यादि कार्यक्रम दर ठिकाणीं पार पाडला. एका श्रीमंत तामीळ सावकारानें एक सोन्याची तोफ नेताजींस भेट म्हणून दिली. दुसऱ्यानें दोन लाख रुपयांची वैयक्तिक देणगी नेताजींस अर्पण केली.

मलायांतील आपला दौरा संपविल्यानंतर नेताजी विमानानें ब्रह्मदेशास गेले. येथेंही नेताजींचें पहिल्या प्रथमच लोकांस दर्शन घडत असल्यामुळें त्यांचें अपूर्व स्वागत झालें. सप्टेंबर महिन्याच्या २६ तारखेस रंगून येथील 'झापरशहा' रस्त्यावर असलेल्या—पदच्युत मोंगल बादशहा बहादूरशहा—जाफरशहाच्या कबरेस नेताजींनीं भेट दिली. हिंदुस्थानावर एके काळीं अंमल गाजविणाऱ्या राजघराण्याच्या एका वंशजास हिंदुस्थानापासून दूर अशा या परक्या मुलुखांत मरण यावें याहून खडतर असा दैवदुर्विलास तो कोणता ? हा विचार नेताजींच्या

हिंदुस्थानी म्हणूनच करूं शकतां, त्याअर्थीं त्या व्यापारांत होणारा फायदा तुम्ही देशकार्यार्थ देण्यास यत्किंचितही कुरकूर करितां कामा नये....आम्ही आमच्या मालमत्तेंतील शेंकडा दहा अथवा शेंकडा वीसच देशकार्यार्थ देऊं अशी कित्येकजण घासाघीस करितात असें माझ्या ऐकिवांत आलेलें आहे. परंतु ही वेळ अशा प्रकारची घासाघीस करण्याची नसून शंभर टक्के स्वार्थत्याग करण्याची आहे. स्वदेशार्थ लढाईवर जाणारा सैनिक जर जिवानिशीं जातो—'मी दहा टक्के किंवा वीस टक्केच रक्त सांडीन' असें जर तो म्हणत नाहीं, तर सुखासुखी मागें बसून केवळ पैसे देणाऱ्यांस असें कोणत्या तोंडानें म्हणवतें ?...तें कांहीं नाहीं. सिंगापुरांतील कोनाकोपऱ्यांत काय चाललें आहे, कोण काय म्हणतो, याची बित्तंबातमी मला आहे. त्यांच्याबद्दलची खडान्‌खडा माहिती माझ्याकडे येत असते...देशद्रोही लोकांविरुद्ध कडक उपाययोजना करण्यास मी कधींही मागें पुढें पाहाणार नाहीं...."

सुरुवातीसच नेताजींच्या गळ्यांत जे पंधरा-सोळा हार पडले होते, ते शेजारच्याच मेजावर ठेवलेले होते. त्यांचें व्याख्यान संपतांच यांपैकीं एकेक हार घेऊन त्या प्रत्येकाचा लिलांव करण्यांत आला. पहिले एक-दोन हार दोन चार लाखास गेले. तदनंतरचे पाऊण लाख, अर्धा लाख, पंचवीस हजार, पंधरा हजार इत्यादि निरनिराळ्या किंमतीस गेले. मोठ्यांत मोठा आंकडा बोलून जो धनिक तो हार विकत घेत असे तो त्या सभामंडपांतील चौथऱ्यावर येऊन नेताजींस वंदन करीत असे, नंतर नेताजी स्वतः तो हार त्याच्या गळ्यांत घालून हंसत त्याच्याशीं हस्तांदोलन करीत. पुन्हा वंदन करून तो माणूस परत जाई. अशा तऱ्हेनें त्या सर्व हारांचा लिलांव करावयास सुमारें तासभर लागला. यानंतर वैयक्तिक निधि देणाऱ्यांची रीघ लागली. यांत दहा डॉलरपासून हजारों डॉलर्स—(सिंगापुरचें नाणें—१ डॉलर = १ रु. १२ आ.) पर्यंत देणारे गरीब श्रीमंत, म्हातारे-कोतारे, मुलें, बायका, गवळी, वाणी असे नानातऱ्हेचे लोक होते. प्रत्येकाच्या रकमेचा स्वहस्तानें स्वीकार करीत नेताजींना तेथें आणखी दोन तास उभें राहावें लागलें. कोणी आपल्या लहान बालकाच्या हस्तें ती रक्कम नेताजींच्या स्वाधीन करीत, तेव्हां नेताजी लगेच त्या मुलास जवळ घेऊन त्याचें कौतुक करीत. हार-लिलांवाचा व वैयक्तिक रक्कमा घेण्याचा हा उपक्रम नेताजी हजर असलेल्या प्रत्येक जाहीर सभेंत हटकून होत असे. अशा तऱ्हेनें दोन अडीच तास व्याख्यान व त्यानंतर तीन तास हा कार्यक्रम, मिळून नेताजी दर जाहीर व्याख्यानाच्या दिवशीं पांच-साडेपांच तास सभागृहांत उभेच्या उभे असत. दर सभेस लाखों रुपये तेथल्या तेथें जमत असत.

नीसून छावणींतील सैनिकांस उद्देशून केलेल्या भाषणांत जाहीर केल्याप्रमाणें नेताजींनीं १९४३ सालच्या ऑगस्ट महिन्याच्या २५ तारखेस एक

जाहीर लष्करी हुकूम काढून त्या दिवसापासून हिंदी स्वातंत्र्यसैन्याचें सरसेनापतित्व स्वतःकडे घेतलें आहे असें घोषित केलें. सिंगापुरांत आल्याबरोबर दोनच दिवसांनीं म्हणजे ४ जुलै १९४३ रोजीं श्री. सुभाषचंद्र हे दूरपूर्वेतील हिंदी स्वातंत्र्यसंघाचे अध्यक्ष झाले. २५ ऑगस्टपासून हिंदी स्वातंत्र्यसेनेचें सरसेनापतित्वही त्यांनीं आपल्याकडे घेतलें. अशा तऱ्हेनें लष्करी व बिनलष्करी अशी दोन्ही प्रकारची जबाबदारी स्वतःच्या शिरावर घेऊन नेताजींनीं धडाडीनें कार्य सुरू केलें. एवढी मोठी जबाबदारी आपणास झेपेल कीं नाहीं? आपल्या हातून एवढा कामाचा गाडा रेटेल कीं नाहीं? असले भ्याडपणाचे किंवा न्यूनगंडी विचार नेताजींच्या मनास शिवलेही नाहींत. आपल्या राष्ट्राचे सर्व अधिकार आपल्याकडेच असणें योग्य आहे व आपण तें काम शिरावर घेतलेंच पाहिजे, तो अधिकार स्वीकारलाच पाहिजे, परदेशी उपटसुंभ लोकांस ते अधिकार उपभोगावयाचा कांहीं हक्क नाहीं हा त्यांचा पूर्ण आत्मविश्वास!

आधींच युद्धाचीं बरींच वर्षें फुकट गेलेलीं. आतां यापुढें अधिक वेळ दवडून उपयोगी नाहीं असें ठरवून नेताजींनीं १९४३ साल उलटून जाण्यापूर्वीं हिंदुस्थानांत आपल्या सैन्यानिशीं पाऊल ठेवावयाचें अशी एक मर्यादा ठरवून घेतली व त्याप्रमाणें कार्यास सुरुवात केली. नेताजींच्या खालोखाल फौजेचे सर्व अधिकार कर्नल भोसले यांजकडेच होते. स्वातंत्र्यसंघाचे अध्यक्ष या नात्यानें नेताजी रोज सकाळीं दोन-तीन तास, संघाच्या सिंगापूर येथील मध्यवर्ती कचेरींत जाऊन तेथील कामकाज पाहात. त्यानंतर ते सुमारें तासभर स्वातंत्र्यसैन्याच्या मुख्य कचेरींत येऊन बसत व तेथील महत्त्वाचीं कामें करीत. याप्रमाणें सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीपर्यंत त्यांचें काम चाललें होतें. सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीस ते मोटारीनें मलायाच्या दौऱ्यावर निघाले. सेरंबन, कोलालंपूर, ईपो, पेनांग इत्यादि ठिकाणांस त्यांनीं भेट दिली. दर ठिकाणीं सर्व जनतेंत अलोट उत्साह दिसून येत होता. जाहीर सभेंत नेताजींचें व्याख्यान, हारांचा लिलांव, इतर स्वयंस्फूर्त देणग्या, स्थानिक स्वातंत्र्यसंघाच्या कार्यकर्त्यांशीं विचारविनिमय इत्यादि कार्यक्रम दर ठिकाणीं पार पाडला. एका श्रीमंत तामीळ सावकारानें एक सोन्याची तोफ नेताजींस भेट म्हणून दिली. दुसऱ्यानें दोन लाख रुपयांची वैयक्तिक देणगी नेताजींस अर्पण केली.

मलायांतील आपला दौरा संपविल्यानंतर नेताजी विमानानें ब्रह्मदेशास गेले. येथेंही नेताजींचें पहिल्या प्रथमच लोकांस दर्शन घडत असल्यामुळें त्यांचें अपूर्व स्वागत झालें. सप्टेंबर महिन्याच्या २६ तारखेस रंगून येथील 'झाफरशहा' रस्त्यावर असलेल्या—पदच्युत मोंगल बादशहा बहादूरशहा—जाफरशहाच्या कबरेस नेताजींनीं भेट दिली. हिंदुस्थानावर एके काळीं अंमल गाजविणाऱ्या राजघराण्याच्या एका वंशजास हिंदुस्थानापासून दूर अशा या परक्या मुलुखांत मरण यावें याहून खडतर असा दैवदुर्विलास तो कोणता? हा विचार नेताजींच्या

मनास असह्य झाला. ती कबर बघून त्या बादशाही घराण्यांतील म्हाताऱ्या जाफरशहाच्या वृद्धापकाळांतील आत्यंतिक गरिबीचे आणि हालाचे दिवस आठवून नेताजींच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. हिंदुस्थानाचें स्वातंत्र्य परत मिळवून त्याच्या अपमानाचा सूड उगविण्याची नेताजींनीं त्याच्या कबरेशीं शपथ वाहिली.

ब्रह्मदेशांतील आपला दौरा संपल्यानंतर नेताजी परत सिंगापुरास न येतां तसेच तडक विमानानें टोकिओस गेले. दूरपूर्वेंत आल्यापासून, किंबहुना, हिंदुस्थानांतून बाहेर पडल्यापासून आपलें स्वतःचें असें एक स्वतंत्र सरकार आपल्यास कधीं काळीं स्थापना करितां येईल का? हा विचार त्यांच्या मनांत सारखा येत असे. आयर्लंडसारखे देश, जे पूर्वीं इंग्रजांच्या आधिपत्याखालींच होते, त्यांनीं आपला स्वातंत्र्यलढा जारीनें सुरू करावयाच्या वेळीं स्वतःचें एक स्वतंत्र सरकार स्थापिलें होतें. याच सरकाराच्या तर्फे त्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाचें मार्गदर्शन होत असे.

**एक राज्यव्यवस्था उलथून पाडतांना तिच्या जागीं ताबडतोब दुसरी राज्यव्यवस्था कायम करण्याची तयारी असावी लागते. क्रांति म्हणजे नुसताच गोंधळ आणि मारामारी नव्हे. अराजक हाच जेथें हेतु असतो तेथें ती क्रांति कधींच यशस्वी होत नाहीं. पूर्व प्रथा उध्वस्त करण्याबरोबरच त्या जागीं आपल्यास हवी तशी नवी प्रथा रूढ करणें म्हणजेच क्रांति.** अशा तऱ्हेनें प्रत्येक क्रांति-चळवळींत दुहेरी उद्देश असावा लागतो. सामान्य जनतेस कोणी नामधारी का होईना परंतु शास्ता असल्याशिवाय चालत नाहीं. भावी प्रथा किंवा राज्यव्यवस्था कितीही का गोंडस असेना, ती जर लवकर अंमलांत येण्याचें चिन्ह दिसलें नाहीं तर लोकमत एकदम पुन्हा पूर्वींचीच व्यवस्था स्वीकारतें. जगाच्या इतिहासांत ज्या ज्या वेळीं स्वराज्यवादी लोकांचे क्रांतिकट फसून छलवादी अशा पूर्व प्रथेचाच विजय झाला त्या त्या वेळीं जनतेस सुराज्य नको होतें असें नाहीं; तर थोडे दिवस कां होईना परंतु तिला अराजकता सहन झाली नाहीं व कोणतीही व्यवस्था नसण्यापेक्षां वाईट असली तरी व्यवस्था - मग ती वाईटही बरी असें म्हणून ती पूर्व प्रथेकडेच झुके. आपल्या चळवळींत ही उणीव राहूं नये एवढ्याकरतां दूरपूर्वेंत आल्यापासून नेताजींनीं हिंदी स्वातंत्र्य-सरकार प्रस्थापित करण्याचा प्रयत्न चालविला होता. अर्थात् सरकार प्रस्थापित करावयाचें म्हणजे त्यास निदान आपल्या बाजूच्या राष्ट्रांची तरी मान्यता हवीच. नेताजी हिंदुस्थानाच्या बाहेर पडल्यामुळें इंग्रजांच्या शत्रुराष्ट्रांची मदत घेऊन त्यांनीं हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नास महत्त्वाचें असें आंतर्राष्ट्रीय स्थान प्राप्त करून दिलें होतें. जागतिक शांततेच्या काळांत इंग्रजांच्या विरुद्ध हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांतच जर हिंदी लोकांनीं युद्ध पुकारून स्वतंत्र सरकार स्थापन केलें असतें तर त्यांस

इतर राष्ट्रांच्या मान्यतेची विशेष गरज नव्हती व अशा वेळेस कोणी मान्यता देतही नाहीं. परंतु आंतरराष्ट्रीय आखाड्यांत उतरून आपल्या शत्रूच्या प्रतिस्पर्ध्यांची मदत घेतांना आपण इतरांच्याच तोडीचे एक नामांकित मल्ल आहोंत, असा आव आणून आपल्यास जर आपली बडदास्त ठेवून घ्यावयाची असेल तर त्यास निदान आपल्या मदतनिसांची मान्यत पाहिजे. हिंदी स्वातंत्र्य-सरकारच्या बाततींत हें कितपत शक्य आहे तें अजमावून बघण्याकरतां नेताजी टोकिओस गेले. तेथें जर्मन वकिलांशीं व जनरल टोजो आणि जपानचे परराष्ट्रमंत्री यांच्याशीं वाटाघाटी केल्यावर या सूचनेस ते अनुकूल आहेत असें दिसून आलें.

आतां या गोष्टीस विलंब लावून उपयोग नाहीं असें ठरवून नेताजी १९४३ मध्यें ऑक्टोबर महिन्याच्या पूर्वार्धांत सिंगापुरास परत आले. या अपूर्व प्रसंगीं दूरपूर्वेतील प्रत्येक देशांतील हिंदी प्रतिनिधी हजर पाहिजेत म्हणून त्यांच्या आज्ञेनें ' सर्व प्रतिनिधींनीं ऑक्टोबर महिन्याच्या २१ तारखेच्या पूर्वीं एका महत्त्वाच्या परिषदेकरतां सिंगापुरांत हजर राहावें ' अशा सिंगापुरांतील स्वातंत्र्यसंघाच्या मध्यवर्ती कचेरींतून तांतडीच्या सूचना जागोजागीं पाठविण्यांत आल्या. श्री. रासबिहारी बोस यांची प्रकृति बरी नसल्यामुळें ते त्या वेळेस जपानमध्येंच होते. नेताजींची धडाडी, त्यांची कार्यक्षमता व कामाचा उरक पाहून त्यांना फारच समाधान वाटलें. नेताजींच्या या नव्या उपक्रमास त्यांनीं स्वतःची पूर्ण अनुमति तर दिलीच परंतु निप्पॉन सरकाराची या सूचनेस मान्यता मिळविण्यांत त्यांची बरीच मदत झाली. त्यांच्या सल्ल्यानें नेताजींनीं आपल्या नवीन मंत्रिमंडळांतील मन्त्र्यांचीं नांवें ठरविलीं. तीं अर्थात्‌च प्रत्यक्ष स्वतंत्र सरकाराच्या स्थापनेची घोषणा होईपर्यंत गुप्त ठेवण्यांत आलेलीं होतीं.

———

## हिंदी युद्धबंद्यांची मनोवृत्ति : १६

हिंदी स्वातंत्र्य-सरकाराच्या स्थापनेचा वृत्तान्त कथन करण्याच्या अगोदर तत्पूर्वी घडलेल्या इतर कांहीं गोष्टींचा आपणांस आढावा घेतला पाहिजे. ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीस नेताजी सिंगापुरास परत आले हें वर आलेंच आहे. हिंदी स्वातंत्र्य-चळवळीस आतां श्री. सुभाषचंद्रांचें नेतृत्व लाभल्यामुळें पूर्वी स्वातंत्र्य-सेनेस येऊन न मिळणाऱ्या पुष्कळशा हिंदी युद्धबंद्यांस आतां स्वातंत्र्य-सेनेस येऊन मिळावेंसें वाटणें स्वाभाविक होतें. म्हणून त्यांच्या अनेक छावण्यांतून नेताजींनी दौरा काढून त्यांस स्वातंत्र्य-सेनेस येऊन मिळण्याची संधी द्यावी असें नेताजींच्या अनेक निकटवर्ती सहकाऱ्यांनीं त्यांस सांगितल्यामुळें त्यांनीं प्रत्येक बंदी-छावणींत एक एक व्याख्यान देण्याचें ठरविलें.

मात्र या व्याख्यानांचा कार्यक्रम ठरविण्याच्या अगोदर जपानी अधिकाऱ्यांकडून त्यांस असें आश्वासन पाहिजे होतें कीं व्याख्यान झाल्याबरोबर जे युद्धबंदी स्वातंत्र्य-सेनेस येऊन मिळण्याची तयारी दर्शवितील त्यांस आपलें सामान घेऊन, हिंदी स्वातंत्र्य-सैन्याच्या मोटार लाऱ्यांतून तावडतोब सैन्याच्या छावणींत न्यावयाची मुभा असावी. निरनिराळ्या बंदी-छावण्यांतून आपल्या भाषणांचा कार्यक्रम सुरू करावयाच्या अगोदर जपानी अधिकाऱ्यांच्याकडून अशा प्रकारचें आश्वासन मागण्याचें कारण असें होतें कीं यापूर्वी अनेकदां अनेकांनीं स्वातंत्र्य-सेनेस जाऊन मिळण्याकरतां आपलीं नांवें दिलेलीं होतीं. परंतु या बाबतीत जपानी अधिकाऱ्यांनीं उदासीन वृत्ति पत्करून त्यांना कधींही स्वातंत्र्य-सेनेस मिळूं देण्याची संधी दिली नाहीं. स्वातंत्र्य-सेनेच्या अधिकाऱ्यांच्या समाधानार्थ व त्यांनीं लाविलेल्या सततच्या भुणभुणीमुळें वरपांगीं, 'ज्या कोणास स्वातंत्र्य-सेनेंत दाखल व्हावयाचें असेल त्यांनी नांवें द्यावींत' अशा तऱ्हेचा आविर्भाव जपानी अधिकारी दर वेळेस आणीत. अनेकदां नांवांच्या याद्या घेतल्यावर मात्र त्यावर ढेंकर देऊन स्वस्थ बसण्याची धाटी त्यांनीं चांगली आत्मसात् केलेली होती. त्यावर ते हूं का चूं करीत नसत. विचारलेंच तर, 'आम्ही आमच्याकडून आटोकाट प्रयत्न करीत आहोंत. हें काम दिसतें तेवढें सोपें नाहीं' वगैरे ठराविक उत्तरें हटकून ठेविलेलींच.

जपान्यांच्या विकृत दृष्टिकोनास, हिंदी युद्धबंद्यांचा, स्वातंत्र्य-चळवळीपेक्षां जपान्यांच्या एकंदर युद्धकार्याच्या दृष्टीनें मजूर म्हणूनच जास्त उपयोग होण्यासारखा होता. जितके लोक युद्धबंद्यांतून निघून स्वातंत्र्य-चळवळीस

मिळणार,तितके जपान्यांच्या युद्धकार्यास हवे असलेले हक्काचे मजूर कमी पडणार, या दृष्टीनें युद्धबंद्यांची संख्या कमी होऊं देण्यास जपानी सर्वस्वीं नाखूष असत. अर्थात् हें सुद्धां ते स्पष्ट कांहींच सांगत नसत. परंतु त्यांच्या एकंदर वागणुकीवरून हाच एक निष्कर्ष निघण्यासारखा होता. दुसरी गोष्ट म्हणजे हिंदी स्वातंत्र्य-सैन्य संख्येनें वाढल्यास त्या चळवळीच्या बाबतींत आपण म्हणूं तें प्रमाण अशी स्थिति राहाणार नाहीं असेंही त्यांना वाटणें स्वाभाविक होतें. म्हणून त्यांनीं अनेक उपाय योजून हिंदी स्वातंत्र्य-चळवळीच्या वाढत्या व्यापास आळा घालण्याचा प्रयत्न केला. हिंदी युद्धबंद्यांचा बंदोबस्त ठेवणें आणि त्यांना ठिकठिकाणीं कामाकरतां पाठविणें हें काम जपान्यांच्या एका निराळ्याच खात्याकडे असे. ते अधिकारी कोण आणि त्यांचें म्हणणें काय हें हिंदी स्वातंत्र्य-चळवळीच्या अधिकाऱ्यांना कधींच कळूं न देण्याचा हिकारी कीकानचा कटाक्ष असे. परस्परांची गांठ कधींच पडूं देऊं नये अशीच हिकारी कीकाननें सर्व व्यवस्था करून ठेविली होती. म्हणून पडद्यामागें हिकारी कीकानमधील व इतर खात्यांतील जपानी अधिकाऱ्यांचा काय संबंध होता हें कळावयास कांहीं मार्ग नव्हता. हिकारी कीकानचे अधिकारी येऊन सांगतील तें प्रमाण ! क्वचित् एकादे वेळेस ते सांगत असलेल्या गोष्टी खऱ्या न वाटून जर परस्पर एकाद्या खात्याशीं संबंध ठेवण्याचा हिंदी अधिकाऱ्यांनीं प्रयत्न केला तर, त्यांस असें उत्तर मिळे कीं, "तुमचें म्हणणें हिकारी कीकानच्या मध्यस्थीनेंच मांडा म्हणजे मग त्याचा काय तो विचार करूं." अशा तऱ्हेनें हिकारी कीकाननें हिंदी अधिकाऱ्यांविरुद्ध आधींच त्यांचे कान फुंकून ठेविल्याचा अनुभव येई. इकडे हिंदी अधिकाऱ्यांनीं एका विशिष्ट बाबतींत इतर जपानी खात्यांशीं परस्पर संबंध ठेविला म्हणून हिकारी कीकानच्या अधिकाऱ्यांस आपलें महत्त्व कमी झालें किंवा आपल्यास बाजूला डावलण्याचा हिंदी अधिकारी प्रयत्न करीत आहेत, असें वाटून तेही रुष्ट होऊन थोडे दिवस जरा ताठरपणें वागत.

नेताजींना हवें होतें तसें आश्वासन जपान्यांकडून यावयास वेळ लागला. परंतु तें आश्वासन मिळण्याच्या अगोदर भाषणांचा कार्यक्रम उरकणें योग्य झालें नसतें. कारण पूर्वीं झालेल्या प्रयत्नांप्रमाणें हाही प्रयत्न जपान्यांच्या सहकार्याच्या अभावीं निष्फळ ठरला असता. जपानी बोलून चालून परकीच असल्यामुळें त्यांनीं हिंदी स्वातंत्र्य-चळवळीस त्यांच्या काबूबाहेर वाढूं न देण्याचे प्रयत्न करावेत यांत कांहीं नवल नव्हतें. परंतु एकीकडे जपान्यांचे हे प्रयत्न चालू असतां दुसरीकडे स्वतःला हिंदी म्हणविणाऱ्या परंतु मनोवृत्तीनें पूर्णपणें इंग्रजांच्या आहारीं गेलेल्या हिंदी युद्धबंद्यांनींही नेताजींच्या स्वातंत्र्य-चळवळीस शक्य त्या मार्गानीं विरोध करण्याचा प्रयत्न करावा ही मात्र आश्चर्य करण्यासारखी गोष्ट होती ! त्यांच्या या स्वातंत्र्यविरोधी उपद्व्यापांचीं कांहीं उदाहरणें येथें देतां येण्यासारखीं आहेत.

सेलेतार बंदी-छावणींत असतांना श्री. जोशी, गोरे, सोहोनी, पद्मनाभराव व मी इत्यादि व्यक्तींनीं मिळून स्वातंत्र्य चळवळीचा व राष्ट्रीय संघटनेचा जो प्रचार चालविलेला होता त्यांत निरनिराळीं विघ्नें उत्पन्न करण्याचा आटोकाट प्रयत्न दोन महाराष्ट्रीय अधिकारी व त्यांचे चार-पांच हस्तक यांनीं केला. या विरोधकांनीं आमच्या सभांस मुद्दाम हजर राहून वादविवाद उत्पन्न करून तो विकोपास न्यावा, निरनिराळ्या कलागती लावून एकमेकांचीं मनें एकमेकांविरुद्ध कलुषित करावीं, अधिकाराचा दुरुपयोग करून स्वातंत्र्य-सैन्यांत शिरूं इच्छिणाऱ्या आपल्या तुकडींतील हाताखालच्या लोकांस धाकदपटशा दाखवावा, कांहींतरी निमित्त करून शिक्षा ठोठावावी, असा क्रम ठेविला. हे दोघे अधिकारी व त्यांचे हस्तक शेवटपर्यंत ब्रिटिशधार्जिणेच राहिले. श्री. सुभाषचंद्र हे जोंवर दूरपूर्वेंत आलेले नव्हते तोंवर हे लोक म्हणत, " जपान्यांचा खरोखरच सद्हेतु आहे तर ते श्री. सुभाषचंद्र बोस यांस इकडे आणविण्याची व्यवस्था कां करीत नाहींत ? " प्रत्यक्ष सुभाषचंद्र आल्यावर स्वतःचें हें पूर्वींचें वचन विसरून जाऊन त्यांनीं दुसरींच कांहीं तरी निमित्तें शोधण्यास सुरुवात केली. ' अंदरकी बात ' अशी होती : हे अधिकारी होते हिंदुस्थानांतील जमीनदार. यांचीं घराणीं इंग्रजांशीं अत्यंत राजनिष्ठ होतीं. यांच्या नातेवाईकांस चांगल्या पगाराच्या ( त्यांच्या स्वतःच्या दृष्टींनें ) नोकऱ्या होत्या. इंग्रजच अखेरीस जिंकणार अशी त्यांची मनोदेवता त्यांस सांगत होती. इंग्रजाचें राज्य हिंदुस्थानावरून केव्हांतरी निघून जाईल, अशा कालाची कल्पनाच गुलामीनें बधिर झालेल्या त्यांच्या कल्पनाशक्तीस करवेना. इंग्रज जिंकणार असेल तर राजनिष्ठ राहाणेंच बरें व स्वातंत्र्य-सैन्यानें लढाई जिंकली तर आपण हिंदुस्थानी म्हणून हक्कानें परत जाऊंच असा विचार करून त्यांनीं स्वातंत्र्य-चळवळीस न मिळण्याचेंच स्वार्थी धोरण ठेविलें. शिवाय उगीच लढाईंतून कसेबसे प्राण वांचले आहेत ते पुन्हां धोक्यांत कशाला घाला ? असाही विचार त्यांनीं केला. आपल्या कनिष्ठांस धाकदपटशा दाखवून आपल्यामागें अनुयायी जमविण्याचें धोरणही या आत्यंतिक स्वार्थी वृत्तीस धरूनच होतें. शेपटी तुटलेल्या कोल्ह्यास आपण एकटेच शेपटी तुटलेले आहों हें बघून जेव्हां लाज वाटूं लागली तेव्हां त्यानेंही थापा मारून इतरांस तसें करावयास लावलें ! अधिकाऱ्यानें आपल्यामागें अनुयायी जमविले नाहींत तर मग त्यानें अधिकार गाजवावा कोणावर ? अधिकारी लोक स्वार्थी बुद्धीनें बंदी राहावयाचें ठरवून आपल्या हातांखालील शिपायांस धाकदपटशादि मार्गांनीं आपल्या बाजूला न वळविते तर बंदी-छावणींत सर्व अधिकारीच राहून त्यांस स्वहस्तानें कपडे धुणें, स्वयंपाक करणें, पाणी आणणें, झाडलोट, मोलमजुरी वगैरे कामें करावीं लागलीं असतीं आणि इंग्रजप्रणीत हिंदी फौजेंतील पद्धतीप्रमाणें त्यांच्या दिमतीस सतत चोवीस तास कोणी शिपाई मिळणें शक्य नव्हतें. ही मुख्य सवलत गेल्यावर त्यांचें बंदीजीवन फारच खडतर झालें असतें. म्हणून त्यांनीं

बिचाऱ्या गरीब शिपायांस फूस देऊन त्यांनीं हिंदी स्वातंत्र्य सैन्यास मिळूं नये असा घाट घातला.

शिपाई व इतर कनिष्ठ दर्जाच्या लोकांस महिना सोळा रुपये पगार कोठेंही मिळवितां आला असता. त्या वेळीं इंग्रजांशीं राजनिष्ठ राहून त्यांचा कांहीं विशेष फायदा नव्हता. उलट नेताजींच्या चळवळींत सामील व्हावें हेंच त्यांची निष्पाप मनोदेवता त्यांस सांगत होती. परंतु ते अडाणी होते, अशिक्षित होते. न्याय्य मार्ग कोणता हें कळण्याचें तर बाजूलाच राहो परंतु आपल्या अंतिम फायद्याचा मार्ग कोणता हेंही त्यांस कळत नव्हतें. अशा वेळेस 'तूं स्वातंत्र्याकरतां लढ' असा उपदेश करणारा श्रीकृष्णासारखा सारथी तर त्यांस कोणी मिळाला नाहींच, उलट त्यांस नरकाचा रस्ता दाखविणारे शकुनिसारखे हे अधिकारी मात्र मिळाले. कॅप्टन मोहनसिंग यांनीं स्वातंत्र्य चळवळ सुरू केली तेव्हां, नंतर पुन्हा ती मोडून ले. कर्नल भोसल्यांचे नेतृत्वाखालीं स्वातंत्र्य-सैन्याची पुन्हा जुळवाजुळव झाली त्या वेळेस किंवा तदनंतर जेव्हां नेताजी आले तेव्हां, दर वेळेस बंदी-छावण्यांतून मतामतांचा गलबला होत असे. कोणी म्हणे—स्वातंत्र्य-चळवळींत सामील व्हावें आणि कोणी म्हणत होऊं नये. या दुसऱ्या मताचेच लोक बंदी-छावण्यांतून जास्त होते. कारण स्वातंत्र्य-सैन्यांत यावें असें ज्याचें ठाम मत होतें ते तर बहुतेक सर्व या चळवळींत सामील झालेच होते. उरलेले कांहीं लोक जावें न जावें अशा द्विधा मनःस्थितीचे एवंच कच्च्या दिलाचे होते. बंदी-छावण्यांतून त्यांच्या विरुद्धपक्षाचें मताधिक्य इतकें होतें कीं, हे लोक आपलें खरें मत बोलून दाखविण्यास क्वचितच धजत.

शिपाई व दुय्यम अधिकारी हे या मतामतांच्या गलबल्यांत दिङ्मूढ होऊन आपल्या वरिष्ठांस म्हणत, " साहेब, आमास्नी काय बी कळत नाय बघा. तुमी जिकडे जाल तकडं आमास्नी बी सांगाती घेऊन चला. " आपली व आपल्या साहेबांची परिस्थिति फार निराळी आहे, हेंही समजण्याइतकें त्या बिचाऱ्या शिपायांस ज्ञान नव्हतें. साहेबाला आपली जहागीर संभाळावयाची होती आणि इंग्रजी बोलतां येत असल्यामुळें खर्डेघाशीची गुलामी पत्करावयाची होती. या गरीब बिचाऱ्या शिपायाला तसले कांहींच बंध नसल्यामुळें त्याला स्वाभि-मानाचें जीवन जगतां येण्यासारखे होतें. अधिकाऱ्यांच्या बाबतींत ज्ञान आणि विद्या यांनीं त्यांस स्वार्थी व गुलामी वृत्तीचे बनविलें होतें, तर शिपायांच्या बाबतींत, त्याचें अज्ञान हेंच अधिकाऱ्यांचे गुलाम होण्यास भाग पाडीत होतें. पडत्या फळाची आज्ञा घेऊन अधिकाऱ्यांनींही त्यांस आपल्या बाजूस ओढलें.

सिंगापुराच्या पाडावानंतर जपान्यांनीं सर्व हिंदी युद्धबंद्यांबद्दलची नोंद ठेवण्याकरतां त्या युद्धबंद्यांपैकींच एक दोन अधिकारी, टंकलेखक (टायपिस्ट) कारकून इत्यादि चार-पांच माणसें घेऊन एक युद्धबंदी-कचेरी स्थापन केली. सर्व युद्धबंद्यांची यादी ठेवणें, त्यांच्या मृत्यूची नोंद करणें, कोणकोणत्या छावण्यांत

किती युद्धबंदी आहेत ? त्यांतील आजारी किती पडले ? सुदृढ किती ? याची आंकडेवारी काढणें, त्यांची डाक हिंदुस्थानांतून आली म्हणजे त्यांस वाटणें इत्यादि कामें त्या कचेरींतून होत. यांत, चाळीशीच्या घरांतील, लांब भरदार मिशा असलेला, मेजरच्या हुद्याचा एक रजपूत अधिकारी होता. तो इतका ब्रिटिशधार्जिणा अधिकारी होता कीं दर वेळेस स्वातंत्र्य-चळवळीबद्दल कांहीं तरी शंकात्मक उद्गार काढावयाचे हाच एक त्याचा उद्योग होऊन बसला होता. श्री. भोसले यांस भेटण्याकरतां म्हणून तो सहज एकदां आम्ही राहात असलेल्या बंगल्यांत आला, तेव्हां श्री. भोसले हे कांहीं कामांत असल्यामुळें मी त्याच्याशीं थोडा वेळ गप्पा मारीत बसलों होतों. त्यानें सहज मला प्रश्न केला कीं, " काय हो, नुकतेंच कांहीं दिवसांपूर्वीं रेडिओवर जवाहरलाल नेहरू यांनीं दिल्लीहून भाषण केलें, त्यांत ते म्हणाले कीं, ' हिंदुस्थानांतील एकसुद्धां मनुष्य दूरपूर्वेतील या स्वातंत्र्य-चळवळीस अनुकूल नाहीं'—तें भाषण तुम्हीं ऐकलें का ?" त्या अधिकाऱ्याच्या वृत्तीची मला कींव तर आलीच परंतु संतापही आला. एकाद्या गोष्टींतील छिद्रेंच तेवढीं बघत राहून खलनायकाप्रमाणें त्या छिद्रांवर टोचे मारण्यापुरताच तेवढा यांचा रंगभूमींवर प्रवेश व्हावयाचा ! मी जरा चिडूनच त्यास उत्तर दिलें, "रेडिओवरील सर्व महत्त्वाच्या बातम्या आमच्या कानीं येतात; तेव्हां असलें कांहीं भाषण झाल्याचें माझ्या ऐकिवांत नाहीं. परंतु जवाहरलाल नेहरू हे सध्या इंग्रजांच्या कैदेंत आहेत आणि ते कांहीं इंग्रजांच्या हातांतलें बाहुलें नाहींत कीं वाटेल तेव्हां त्यांस कैदेंतून हालवून नभोवाणी केंद्रावर नेऊन त्यांच्याकडून इंग्रजांच्या बाजूचें वाटेल तसें वक्तव्य करून घ्यावें...तुम्ही तें भाषण ऐकलें का ?" मी मुद्दाम त्यास खोंचक प्रश्न विचारला. तो म्हणाला, " मी स्वतः ऐकलें नाहीं परंतु असें ऐकतों खरें. नाहींतरी तुम्हांलाही काय ठाऊक असणार म्हणा !" असा शंकापूर्ण उद्गार काढून आपलें पूर्वींचेंच मत कायम असल्याचें त्यानें व्यक्त केलें.

पुढें ऑक्टोबर महिन्यांत जेव्हां हिंदी स्वातंत्र्य-सरकार व झांशी-राणी पथक हीं दोन्हीं स्थापन झालीं तेव्हां स्वातंत्र्य-चळवळींतील या घटनांबद्दल वर उल्लेखिलेल्या त्या रजपूत अधिकाऱ्याचें व त्याच युद्धबंदी-कचेरींत काम करणाऱ्या श्री. क्षीरसागरांचें सहज मजेनें एक दिवस बोलणें चाललेलें होतें. क्षीरसागर म्हणाले, "काय योगायोग पहा, १८५७ सालीं इंग्रजांविरुद्ध लढलेली झांशीची राणी लक्ष्मीच आणि आजही जिच्याकडे झांशी-राणी पथकाचें आधिपत्य आलें आहे ती सुद्धां लक्ष्मीच !" त्यावर तो अधिकारी उत्तरला, " पण झांशीच्या राणीला रणांगणांत कोणी मारलें ?—माहिती आहे का ?...आमच्या ४/१९ हैद्राबाद रेजिमेंटनेंच मारलें तिला !" त्या प्रसंगाची कल्पना करीत तो अधिकारी आपल्या भरदार मिशीला पीळ देऊं लागला. एका हिंदी वीरस्त्रीला ज्या हिंदी पथकानें मारलें त्याच पथकांत आज आपलें नांव नोंदविलेलें आहे अशा बादरायणी संबंधांत समाधान मानून

घेणारा तो अधिकारी, हा इंग्रजप्रणीत हिंदी सैन्यांत अधिकारपदावर चढलेल्या लोकांच्या गुलामी वृत्तीचा उत्तम नमुना होता ! जी गोष्ट हिंदी लोकांच्या नांवास काळिमा आणणारी होती, त्यावरच तो स्वतःचा टेंभा मिरवीत होता. वास्तविक ज्या मिशांना तो पीळ भरीत होता त्यांचें त्यानें मुंडन करावयास हवें होतें !

अमुक अमुक दिवशीं नेताजी अमक्या अमक्या छावणींत तेथील युद्धबंद्यांपुढें व्याख्यान देतील, असा कार्यक्रम आगाऊ सर्व बंदीछावणीच्या प्रमुख अधिकाऱ्यांस कळविण्यांत आलेला होता. हे प्रमुख अधिकारी हिंदी अधिकारीच होते. स्वतःही स्वातंत्र्य-चळवळीस मिळावयाचें नाहीं व इतरांसही त्यांत भाग घेऊं द्यावयाचा नाहीं ही जणूं काय त्यांनीं शपथच वाहिलेली. त्या प्रत्येक छावणींतील वरिष्ठ अधिकाऱ्याच्या हाताखालचे इतर अधिकारीही त्याच्याच तालमींत तयार झालेले. तेव्हां त्यांची मनोवृत्ति त्यांच्याहून भिन्न कशी असणार ? बंदी छावणींतील जीवनही कांहीं वाईट नव्हतें. कांहीं काम नाहीं, धाम नाहीं; दोन वेळ जेवावें, गप्पा माराव्या, पत्ते खेळावे. सर्व काम करावयास नोकर आहेतच दिमतीला. कोठें जायला नको न् यायला नको. 'युद्ध संपलें म्हणजे जाऊंच घरीं. कशाला उगीच युद्धाच्या धकाधकींत पुन्हां पडा ? आणि कोणास ठाऊक इंग्रज जिंकताहेत कीं जपानी ! कोणी का जिंकूं द्याना. बंदी म्हणून राहिलों तर दोन्हीकडूनहीं फायदाच. मग आपले असेच गप्प बसून काढाना दिवस.... ' अशा तऱ्हेची बंदीछावणींतील अधिकाऱ्यांची मतप्रणाली असे. आपल्या अज्ञानी कनिष्ठांस ते म्हणत, "पहारे बुवा ! आम्हांला कांहीं माहीत नाहीं. तुम्हांला वाटेल तें करा. परंतु तुमच्या हिताचें म्हणूनच सांगतों कीं, हे जपानी लोक कसले जिंकावयाला बसले आहेत ? इंग्रज किती बलवान !...किती धूर्त ! सिंगापूर सोडण्यांत त्यांचा डावच आहे एक प्रकारचा. हे कांहीं हरले नाहींत कांहीं. तुम्ही जर आज जपान्यांना जाऊन मिळालांत तर इंग्रज तुम्हांसच काय परंतु तुमच्या मुलांबाळांसुद्धां सर्वांस फांशीं देतील. कोणीही जिंको, तुम्ही बंदी म्हणून राहिलांत तरच तुम्ही सुखरूप घरीं पोंचाल. आणि परवांच महात्मा गांधी व जवाहरलाल अशा दोघांनींही रेडिओवर भाषणें करून सर्वांना सावध केलें आहे कीं जपान्यांस मिळूं नका म्हणून ..."

क्रांजी बंदीछावणींत असलेल्या माझ्या एका जखमी झालेल्या मित्रास भेटण्याकरतां म्हणून मी एके दिवशीं मोटारसायकलीवरून गेलों होतों. ही छावणी माझ्या निवासस्थानापासून (सिंगापूर बेटांतच परंतु-) १२-१४ मैल दूर होती. त्या मित्रास भेटून नंतर त्याच छावणींत राहात असलेल्या बऱ्याच महाराष्ट्रीय व बंगाली डॉक्टर मित्रांस भेटण्याकरतां म्हणून मी गेलों. बहुधा तेथें गेलें म्हणजे या सर्व मंडळींच्या आग्रहावरून मी तेथेंच जेवत असें. नेताजी व श्री. भोसले यांच्या निकटच्या गटांत मी आहे हें ठाऊक असल्यामुळें साहाजिकच माझ्याशीं गप्पा मारण्यास ते सर्वजण उत्सुक असत. एका बंगाली डॉक्टरनें

शंका प्रदर्शित केली कीं, "आलेला गृहस्थ हा तोतया नसून खरोखरच सुभाषचंद्र बोस आहे याला पुरावा काय ?" त्याचाच एक मित्र, दुसरा बंगाली डॉक्टर म्हणाला, "बाह्यतः जरी हे खरे सुभाषचंद्र असले तरी यांच्या मनोवृत्तींत मात्र आतां फार बदल झालेला आहे. आतां तो हिंदुस्थानांतील पूर्वींचा सुभाष राहिला नाहीं." तिसऱ्या एकानें म्हणावें, "जपानसारख्या फॅसिस्ट राष्ट्राशीं यांनीं संधान बांधावयास नको होतें." चवथे एक त्याच छावणींतील महाराष्ट्रीय डॉक्टर म्हणाले, "सुभाषचंद्रांनीं जपान्यांची यत्किंचितही मदत घेतली नाहीं तर आम्हीं स्वातंत्र्य-चळवळीस येऊन मिळावयास तयार आहोंत." अशी एकमेकांची विचित्र मतप्रणाली होती. हेच महाराष्ट्रीय डॉक्टर युद्ध संपल्यावर, इंग्रजांचा विजय हा जणूं काय आपलाच विजय असें समजून मला म्हणाले, "बघितलंत ? मी म्हटलेंच होतें, तुम्हां लोकांची चूक होत आहे." असें म्हणत मोठ्या मुत्सद्दीपणाचा आव आणून आपल्या हातांतील काठी आनंदानें बोटांमध्यें फिरवीत ते पुढें चालते झाले !

आपल्या छावणींत श्री. सुभाषचंद्र बोस यांचें व्याख्यान होणार तेव्हां त्यांच्या भाषणानें भारून जाऊन जर आपल्या छावणींतून फार लोक स्वातंत्र्यसैन्यास मिळाले तर त्यांत आपला कमीपणा आहे असें छावणीच्या मुख्य अधिकाऱ्यास आणि त्याच्या सहकाऱ्यांस वाटे. एवढ्याकरतां व्याख्यानाच्या आदल्या दिवशीं आपल्या विश्वासांतील माणसांस त्यांनीं सबंध छावणींतील निरनिराळ्या गटांत पाठवून स्वातंत्र्यसैन्यांत शिरण्याचा कोणाकोणाचा कल आहे त्या त्या सैनिकांच्या नांवांची यादी तयार केली व नेताजींच्या व्याख्यानाचे दिवशीं नेमकें त्याच माणसांस निरनिराळ्या कामगिरीवर लावून दिलें. कोणास पहाऱ्यावर, कोणाला स्वयंपाकास, कोणाला पाणी आणण्यास पाठविलें, तर कोणाला लाकडें आणण्यास सांगितलें. याप्रमाणें नाना तऱ्हा करून सर्वांची विल्हेवाट लाविली व ज्यांचीं मनें 'खंबीर' आहेत—जे कोणत्याही तऱ्हेनें सांगितलें असतां स्वातंत्र्यसैन्यास मिळणार नाहींत—असें त्यांना वाटलें असेच लोक व्याख्यानास हजर राहूं शकतील अशी सर्व अधिकाऱ्यांनीं खबरदारी घेतली.

ऑक्टोबर महिन्याच्या ११ तारखेपासून तों १२ तारखेपर्यंत नेताजींचीं सिंगापूरमधील निरनिराळ्या बंदीछावण्यांत व्याख्यानें झालीं. प्रत्येक छावणींतील दहा-बारा हजार लोक त्या छावणींतील मैदानांत जमत. त्यांच्यासमोर एका उंच लाकडी चौथऱ्यावर उभे राहून नेताजी दोन अडीच तास व्याख्यान देत. येथील सर्वच वातावरण निराळें असे. दूरध्वनिक्षेपकाची व्यवस्था नसतांना सुद्धां नेताजींचा खणखणीत आवाज श्रोतृवृंदांस चांगला ऐकूं जाई. एकंदर सर्व कार्यक्रम व भाषण अगदीं स्तब्ध अशा वातावरणांत पार पडे. कोणी विरोधाचा अथवा अनुमतीचा एक चकार शब्दही बोलत नसे. येथें नेताजींस हार वगैरेही घातले जात नसत. इतर सभांतून जयघोषानें वातावरण अनेकदां दुमदुमून

जाई आणि नेताजींना तो कल्लोळ शांत होईपर्यंत आपलें भाषण थांबवावें लागे. येथें तसला कांहींच प्रश्न नव्हता. जाणून बुजून पाषाणहृदयी बनलेले लोकच तेथें बसविण्यांत आलेले होते. त्यांना देशभक्तीचा पाझर फुटणें शक्यच नव्हतें. जादूटोणा झाल्याप्रमाणें हे लोक विस्फारित नेत्रांनीं तेथें बसलेले होते, परंतु नेताजींच्या आत्मीयत्वाची त्यांना कांहीं खात्री पटत नव्हती. स्मृत्यक्षम झालेल्या इसमास ज्याप्रमाणें घरचीं माणसें, आप्तेष्ट, आपला पूर्वेतिहास इत्यादि सर्व गोष्टींचा विसर पडून तो जसा नव्या परिस्थितीशीं ( विसंगतीची जाणीव न होतां ) एकचित्त होतो, त्याप्रमाणेंच हे लोक हिंदी राष्ट्रीयत्वास पूर्णपणें पारखे झालेले होते. प्रत्यक्ष भारतमातेनें जरी त्यांचेसमोर टाहो फोडला असता तरी, ' आम्ही तुझीं मुलें नसून, आम्हांला तुझ्याशीं कांहीं कर्तव्य नसतांना कां वृथाशोक करतेस ?' असेंच हे लोक उद्गारले असते !

नेताजींच्या व्याख्यानास त्यांच्याबरोबर हिंदी स्वातंत्र्यसेनेचे सात-आठ वरिष्ठ अधिकारी असत. युद्धबंद्यांपैकीं जे लोक नेताजींच्या भाषणानंतर हिंदी स्वातंत्र्यसेनेंत सामील होण्यास तयार होत, त्यांस तेथून तावडतोब नेण्याकरतां हिंदी स्वातंत्र्यसेनेच्या ' प्रचार आणि प्रसिद्धी ' खात्याचे दहा-बारा सैनिक चार मोटार लॉन्यांसह तेथें हजर असत.

युद्धबंद्यांस उद्देशून नेताजींनीं सांगितलें, " मित्रहो......आतां अशी वेळ येऊन ठेपलेली आहे कीं तुमच्यापैकीं प्रत्येकास आपला एक कांहींतरी विचार ठाम केला पाहिजे. आपलें स्वातंत्र्य परत मिळ-ण्याची ही जी संधी हातीं आलेली आहे, अशी वारंवार येत नाहीं. अर्थात् या संधीचा आपण पूर्ण फायदा करून घेतला पाहिजे. आम्ही आमचा कार्यक्रम आंखलेला आहे. हें वर्ष संपण्याच्या अगोदर म्हणजे ३१ डिसेंबर १९४३ चे आंत आम्ही हिंदुस्थानाच्या भूमीवर आमचा पाय रोवूं. ' चलो दिल्ली ' हेंच आमचें ब्रीदवाक्य आहे. दिल्ली काबीज करून हिंदुस्थानाचें स्वातंत्र्य तेथील जनतेच्या विश्वासांतील नेत्यांच्या स्वाधीन केलें म्हणजे हिंदी स्वातंत्र्यसेनेचा कार्यभाग संपला. तदनंतर हिंदी स्वातंत्र्यसेना स्वतःकडे कोणत्याही प्रकारचे अधिकार ठेवणार नाहीं. या कार्यांत तुम्हांस सहभागी व्हावयाचें असेल तर आम्हांला आनंदच आहे. माझ्या भाषणानंतर ज्याला ज्याला आमच्या सेनेंत सामील व्हावयाचें असेल त्याला नेण्यास आमच्या मोटारी बाहेर तयार उभ्या आहेत. तुमच्यापैकीं सर्वांनीं जरी आमच्या कार्यांत समभागी न होण्याचें धोरण स्वीकारलें तरीही आमचें कार्य तेवढ्यामुळें अडून राहाणार नाहीं. आमचें कार्य अविरत चालू राहीलच. तुमच्यापैकीं ज्यांनीं ज्यांनीं दोन्हीं दरडींवर हात ठेवून बसण्याचें धोरण स्वीकारलें असेल त्यांस मात्र वेळींच जागरूक करणें आम्ही आमचें कर्तव्य समजतों. कोणीही जिंको किंवा कोणाचाही पराजय होवो, तटस्थ वृत्ति

धारण केली म्हणजे कसल्याही परिस्थितींत आपला फायदाच होईल अशी कांहींजणांची कल्पना आहे. स्पष्टच बोलावयाचें म्हणजे—कांहींजण असें समजतात कीं, इंग्रजांनीं युद्ध जिंकलें तर राजनिष्ठ म्हणून आपल्या मालमत्तेस व नोकरीस कसलाही बाध येणार नाहीं. उलट आमचा जय झाला तर हिंदी म्हणून त्यांस हिंदुस्थानांत प्रवेश मिळेल, एवढेंच नव्हे तर स्वातंत्र्याच्या भरभराटींत त्यांचा तिकडूनही फायदाच होईल – असें समजणाऱ्यांची ही निव्वळ भूल आहे. आम्ही त्यांना असें स्पष्ट सांगूं इच्छितों कीं, त्यांचें हें दुटप्पी धोरण ओळखून त्यांची काय व्यवस्था लावावयाची त्याबद्दलचें धोरण आम्ही अगोदरच आंखून ठेविलेलें आहे. **देशद्रोही लोकांस तावडतोब हद्दपार न करितां त्यांस आपल्यांतच राहूं देण्याची जी घोडचूक आमच्या पूर्वजांनीं वेळोवेळीं केली त्याचेंच प्रत्यंतर म्हणजे आज गुलाम स्थितींतील हिंदुस्थान होय!** त्या चुकीची पुनरावृत्ति आम्ही कदापि होऊं देणार नाहीं. अशा दुटप्पी लोकांबद्दल अगदीं दयाळू अंतःकरणानें जरी आम्ही विचार केला तरी जास्तींत जास्त त्या सर्वांस तिसऱ्या दर्जाचें इंग्लंडचें एक फुकट तिकीट आम्ही काढून देऊं शकूं! अशा लोकांस हिंदुस्थानांत कधींही स्थान मिळणार नाहीं...”

अशा अर्थाचें नेताजींचें निरनिराळ्या बंदीछावण्यांतून व्याख्यान झाल्यावर सुमारें दीड हजार सैनिकांची भर हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत पडली. आणखी सुद्धां पडली असती, परंतु वर सांगितल्याप्रमाणें तेथील अधिकाऱ्यांनीं कित्येकांस निरनिराळ्या कामास लावून त्यांनीं व्याख्यान ऐकूंच नये व त्यांस हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या मोटारलॉऱ्यांत बसून जाण्याची संधी मिळूंच नये अशी व्यवस्था करून ठेवली होती. इतर कांहींजणांस परावृत्त करण्यास धाकदटपशा, मार इत्यादि साधनें योजण्यांत आलीं. अशा रीतीनें सर्व युद्धबंदी मिळून सुमारें चाळीस-पन्नास हजार जनसमुदायापुढें नेताजींनीं व्याख्यान दिल्यावर त्यांतील केवळ दीड हजार सैनिक हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत सामील झाले. यांत सुद्धां अनेक गमतीचे प्रकार घडले.

कांहीं युद्धबंद्यांच्या तुकड्या लहान छावण्यांतून वेगळ्या ठेविलेल्या असत. कारण त्यांच्याकडे एकाद्या विशिष्ट तऱ्हेचें काम जपान्यांनीं कायमचेंच देऊन ठेविलेलें होतें. उदाहरणार्थ, (सिंगापुर बेटांतच) सिंगापूर शहरापासून इंग्रजांच्या वेळचीच पांच-सात बराकी असलेली ‘मॅक् ऑर्थर कँप’ नांवाची एक छावणी होती. मोटारींचें सर्व काम जाणणाऱ्या युद्धबंद्यांतील सुमारें सव्वाशें लोकांस निवडून त्यांची एक स्वतंत्र तुकडी करून येथें ठेवण्यांत आलेली होती. या तुकडीकडे पंचवीस-तीस मोटारलॉऱ्या सोंपवून त्यांजकडे रोज पेट्रोलच्या पिपांची ने-आण करण्याचें काम होतें. या तुकडीच्या शरीरस्वास्थाकरतां एका महाराष्ट्रीय डॉक्टराची नेमणूकही त्या तुकडीवर करण्यांत आली होती. या तुकडींतील कोणीही इसमानें हिंदी स्वातंत्र्यसेनेंत जाऊं नये हा जपानी अधिकाऱ्यांचा कटाक्ष असे;

कारण ही तुकडी मोडली असती तर त्यांचें पेट्रोलची ने-आण करण्याचें काम गडगडलें असतें. उलट या तुकडींतील प्रत्येक सैनिक हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत सामील होण्यास आतुर होता. या तुकडीच्या डॉक्टरांचा व माझा चांगला स्नेह असल्यामुळें आम्हीं नेहमीं भेटत असूं. "तुम्हीं आम्हांला तुमच्या स्वातंत्र्य-सेनेंत घेत नाहीं" असें ते नेहमीं माझ्यामागें टुमणें लावीत. मी माझ्याकडून पराकाष्ठा केली. कित्येक वेळां त्यांचे अर्ज घेऊन ते कर्नल भोसले व नेताजी यांच्यापर्यंत पोंचविले. नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें त्यांनींही हिकारी किकानच्या अधिकाऱ्यांस तसें सांगितलें. हिकारी कीकानच्या अधिकाऱ्यांनीं थोडे शिथिल प्रयत्न केले व दर वेळेस टाळाटाळीचीं उत्तरें देऊन वेळ मारून नेली. नेताजींनीं प्रश्न काढतांच त्यांनीं म्हणावें, "हो, आम्ही अवश्य प्रयत्न करूं" जनरल भोसल्यांनीं त्यांस आठवण केली म्हणजे ते म्हणत, "काम जरा बिकट दिसतें पण आम्ही आमच्याकडून प्रयत्न करीत राहूंच." मी त्यांस विचारलें म्हणजे ते म्हणत, "आम्ही आमच्याकडून काय होईल तें बघतों, परंतु ती तुकडी ज्या जपानी खात्याच्या ताब्यांत आहे तिचे अधिकारी त्यांच्यापैकीं कोणासही जाऊं देण्यास नाखूष आहेत." नेताजींचीं व्याख्यानें जेव्हां निरनिराळ्या बंदीछावण्यांत झालीं, तेव्हां या लहान लहान तुकड्यांनीं जपानी अधिकाऱ्यांच्या मागें लकडा लावून जवळच्या कोणत्या तरी मोठ्या छावणींत व्याख्यानांच्या दिवशीं जाऊन नेताजींचें भाषण ऐकण्याची परवानगी मिळविली. भाषण ऐकल्यावर जेव्हां हे लोक आपल्या छावणींत येऊन आपापलें सामान घेऊन हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या छावणींत जाण्याची तयारी करूं लागले, तेव्हां मात्र जपानी अधिकाऱ्यांनीं त्यांस जाऊं दिलें नाहीं. अशा तऱ्हेनें या लोकांस स्वातंत्र्य-चळवळींत भाग घेण्याची इच्छा असतांना देखील त्यांस शेवटपर्यंत जपान्यांनीं आपल्या कामाकरतां बंदी म्हणूनच डांबून ठेविलें. स्वातंत्र्यसैन्याच्या अधिकाऱ्यांच्या समाधानार्थ जपानी अधिकारी म्हणत, "या लोकांनीं स्वातंत्र्यसैन्यांत येऊन तुमचें काम केलें काय किंवा आमचें काम केलें काय, आपलें ध्येय एकच आहे व कोणीकडूनही आपला उद्देश साध्य झाला म्हणजे झालें." जपान्यांचा हा कांगावखोरपणा आम्हांस कळत नव्हता असें नाहीं. परंतु आपल्यास एक मोठें ध्येय गांठावयाचें असतांना एवढे तेवढेसे प्रश्न धसाला लावून काय उपयोग? दुसऱ्याकडून काम काढून घ्यावयाचें असलें म्हणजे थोडें दमानें व त्याच्या मर्जीप्रमाणेंच घ्यावें लागतें. या तुकडींतील लोक बंदी या नात्यानें त्यांस मिळणाऱ्या भत्त्यां-तून वर्गणी जमवून हिंदी स्वातंत्र्यसंघास ती दर महिन्यास नियमानें देत असत. पुढें पुढें जपानचा पराभव होणार असें स्पष्ट दिसत असतांना सुद्धां हे लोक हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत येण्यास आतुर होते.

दुसऱ्या एका वेगळ्या राहाणाऱ्या तुकडींतील लोक त्यांच्याजवळच्या मोठ्या छावणींत नेताजींचें भाषण ऐकण्यास गेले. नेताजींचें भाषण ऐकल्यानंतर

या तुकडींतील तेवीस लोक हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत येण्यास तयार झाले. आपलें सामानसुमान घेऊन जाण्यास जेव्हां हे लोक आपल्या लहान छावणींत परत आले, तेव्हां तेथील एका इंग्रजधार्जिण्या हिंदी हवालदारानें आपल्या इतर सहकाऱ्यांसह, त्यांस मारहाण करून त्या सर्वांस कैद केलें! ही गोष्ट जेव्हां स्वातंत्र्यसैन्याच्या अधिकाऱ्यांच्या कानावर गेली, तेव्हां ते कांहीं जपानी अधिकाऱ्यांकडून घेऊन तेथें आले व नंतरच त्या तेवीस लोकांची सोडवणूक होऊन त्यांस स्वातंत्र्यसैन्यांत सामील होतां आलें. या तुकडींतील लोकांस जाऊं देण्यास जपानी अधिकारी विशेष नाखूष नव्हते; कारण या तुकडीकडून ते मोलमजुरीच करून घेत. तें काम युद्धबंद्यांपैकीं कोणीही करूं शकलें असतें. त्या कामास मोटारीच्या कामाप्रमाणें एका विशिष्ट शाखेच्या तांत्रिक ज्ञानाची आवश्यकता नव्हती. परंतु अशा एखाद्या तुकडीच्या बाबतींत जपानी अधिकारी राजी असले तर तेथील इंग्रजधार्जिणे हिंदी लोकच जास्त खाष्ट असावयाचे. एकूण, 'आधींच उल्हास अन् त्यांत फाल्गुन मास' अशी युद्धबंद्यांची परिस्थिति होती. स्वातंत्र्यसैन्यांत येण्यास आतुर असलेले परंतु ज्यांस घेतां आलें नाहीं असे सुमारें चारशें-पांचशें तरी लोक असतील.

सिंगापुरांतील बंदीछावण्यांतच दौरा काढणें नेताजींस शक्य झालें. इतर बऱ्याचशा तुकड्यांस जपानी वेळोवेळीं इंडोचायना, बोर्निओ, न्यूगिनी, पोर्तुगीज टिमोर, सयाम वगैरे लांबच्या प्रदेशांत घेऊन गेले होते आणि त्या दिवसांत इतस्ततः दूरवर पसरलेल्या या तुकड्यांशीं पत्रव्यवहार करणें शक्यच नव्हतें. शिवाय त्यांतून कांहीं विशेष निष्पन्नही झालें नसतें. कारण या लोकांस त्या बंदीजीवनाचीच एक प्रकारची गोडी लागलेली होती एका दूरवरच्या प्रदेशांत नेलेल्या एका हिंदी अधिकाऱ्यास, तो स्वातंत्र्यसैन्यांत येण्यास तयार होईल असें कोणी सांगितल्यावरून आम्ही जपान्यांकरवीं सिंगापुरांत बोलावून घेतलें. परंतु तो कांहीं स्वातंत्र्यसैन्यांत येण्यास तयार झाला नाहीं. मग त्याला जपान्यांनीं पुन्हा स्थानबद्ध केलें.

मी पूर्वी बंदीछावणींत असतांना माझ्या चांगल्या ओळखीच्या एका वरिष्ठ शीख अधिकाऱ्यास जपान्यांनीं सिंगापुरांतील कैदखान्यांत कैद करून ठेविलें होतें. त्याचा पोषाख सामान्य कैद्याप्रमाणें होता. हातापायांत बेड्या. खाण्यापिण्याच्या हालामुळें भेसूर झालेला चेहरा. जाड लोखंडी गजांचा दरवाजा असलेल्या एका लहानशा खोलींत त्याला कोंडलेलें होतें. तोही कदाचित स्वातंत्र्य सैन्यांत येण्यास तयार होईल असें कोणाकडून तरी कळल्यावरून जनरल भोसल्यांनीं जपानी अधिकाऱ्यांस सांगून त्याची सुटका करविली. हिकारी कीकानच्या एका जपानी अधिकाऱ्याबरोबर मी त्या कैदखान्यांत जाऊन त्या शीख अधिकाऱ्याची सुटका करून घेतली. त्याच्या कारागृहाचें दार उघडून त्याला जेव्हां बाहेर आणलें तेव्हां त्याला कांहीं निराळाच भास झाला. सहसा

त्या कैद्यांना कधीं बाहेर काढीत नसत. आज भलत्याच वेळीं दार उघडलें गेल्यामुळें दैवानें आणखी काय वाढून ठेविलें आहे ? असा प्रश्न त्याच्यासमोर उभा राहिला. आपली सुटका होणार याची त्यास मुळींच वार्ता नव्हती. माझी त्याची पूर्वीची ओळख असल्यामुळें काळजीयुक्त स्वरांत त्यानें मला विचारलें, "हे लोक मला कोठें घेऊन जात आहेत ?" त्याच्या डोळ्यांत अश्रू चमकूं लागले होते. मी त्याचें सांत्वन करीत त्यास म्हटलें, "घाबरावयाचें कांहीं कारण नाहीं. तुमची येथून सुटका करवून घेण्यासच मी आलों आहे." थोड्या वेळानें सरकारी कोठारांत ठेविलेली त्याच्या सामानाची पेटी जेव्हां त्याच्या स्वाधीन करण्यांत आली, तेव्हां माझ्या म्हणण्याची सत्यता त्यास पटूं लागली. कैद्याचा पोषाख बदलून आपला पूर्वींचा वेष त्यानें धारण केला व मग आम्हीं मोटारींत बसून निघालों. स्वातंत्र्यसैन्यांतील एका वरिष्ठ शीख अधिकाऱ्याच्या बंगल्यांत त्याची उतरावयाची सोय करण्यांत आली. परंतु सांगावयाची गोष्ट अशी कीं, हा अधिकारीही स्वातंत्र्यसैन्यांत येण्यास नाकबूल झाला !

प्रत्येक बंदीछावणींतील नेताजींच्या भाषणानंतर सर्व युद्धबंद्यांस स्वातंत्र्य-सैन्यांत सामील होण्याची शेवटली संधी देण्यांत आली. त्या संधीचा फायदा घेऊन सुमारें दीड हजार सैनिक स्वातंत्र्य-चळवळींत आले. यापूर्वीं युद्धबंद्यांपैकीं सुमारें १८,५०० लोक स्वातंत्र्यसैन्यांत होते. हे दीड हजार मिळून एकंदर २०,००० युद्धबंदी शेवटपर्यंत स्वातंत्र्यसैन्यांत होते. सिंगापुराच्या पाडावानंतर सुमारें साठ हजार हिंदी युद्धबंदी जपान्यांच्या ताब्यांत सांपडले होते. पैकीं चाळीस हजारांनीं अखेरपर्यंत बंदी म्हणूनच राहाण्याचें ठरविलें ! या चाळीस हजार सैनिकांपैकीं सर्व अधिकारी जर वेगळे काढून ठेविले असते तर उरलेले कनिष्ठ दर्जाचे लोक खात्रीनें स्वातंत्र्यसैन्यास येऊन मिळाले असते; परंतु स्वार्थी धोरणाच्या अधिकाऱ्यांनीं अनुयायी जमवून त्यांस आडमार्गास कसें लाविलें, हें वर आलेंच आहे.

## हिंदी स्वातंत्र्य-सरकाराची स्थापना : १७

१९४३ च्या ऑक्टोबर महिन्याच्या २१ तारखेस सिंगापुरांत दूरपूर्वेतील सर्व हिंदी प्रतिनिधींची परिषद् भरणार असल्याचीं माहितीपत्रकें व निमंत्रणें सर्वांस पाठविलीं याचा उल्लेख मागें आला आहे. त्यास अनुसरून ठिकठिकाणचे हिंदी प्रतिनिधी सिंगापुरांत येऊन दाखल झाले. श्री. रासबिहारी बोस मात्र प्रकृति ठीक नसल्यामुळें सिंगापुरांत येऊं शकले नाहींत. पूर्वी वर्णन केलेल्या सिंगापुरांतील सर्वोच्च अशा कॅथे नामक चौदा मजली इमारतीच्या तळमजल्यावरील विस्तीर्ण सभागृहांतच या परिषदेचें अधिवेशन भरविण्याचें ठरलें होतें. नेताजी दूरपूर्वेत आल्यापासून सर्वच कार्य फार झपाट्यानें होत असल्यामुळें, सगळीकडे एकच उत्साहजनक वातावरण पसरलें होतें. स्वयंसेवक-भरती व सैनिक तयार करण्याचीं केंद्रें सुरू झाल्यामुळें, दिवसेंदिवस हिंदी स्वातंत्र्यसैन्य वाढत चाललें असून इतर स्वतंत्र राष्ट्रांप्रमाणें आपल्या मागेंही एक राष्ट्रीय फौज उभी आहे अशा विचारानें तेथील सर्व हिंदी लोकांस आपलें दास्य जाऊन पुन्हा स्वत्व प्राप्त झाल्यासारखें वाटूं लागलें.

२१ ऑक्टोबर १९४३ रोजीं सकाळीं, हिंदी प्रतिनिधी हिंदी स्वातंत्र्यसैन्याचे वरिष्ठ अधिकारी, इत्यादि सर्व वर उल्लेखिलेल्या सभागृहांत जमले. परिषदेच्या सकाळच्या अधिवेशनांत नेताजींनीं त्या वेळपर्यंतच्या स्वातंत्र्यचळवळीचा आढावा घेतला व तदनंतर स्वातंत्र्य-चळवळीस एका विशिष्ट तऱ्हेचें महत्त्वाचें वळण देऊन पुढील जोखमीचें कार्य अंगावर घेण्याची वेळ येऊन ठेपली आहे असें सांगितलें. त्याच दिवशीं हिंदी स्वातंत्र्य-सरकाराची घोषणा होणार म्हणून सिंगापूर शहरांत बरेच जणांस, विशेषतः वृत्तपत्रव्यवसायिकांस कुणकुण लागलेली होती. दुपारीं ४ वाजतां जें अधिवेशन भरणार होतें, त्यांत ती घोषणा होण्याच्या अगोदरच त्याची कांहीं बातमी लागल्यास पाहावें अशा विचारानें निरनिराळे बातमीदार व त्यांचे फोटोग्राफर्स इत्यादि लोक नेताजींच्या, श्री. भोसल्यांच्या व इतर श्रेष्ठींच्या निवासस्थानीं धरणें देऊन बसले होते. परंतु त्यांस कोणीच कांहीं थांगपत्ता लागूं दिला नाहीं. अशा तऱ्हेची गुप्तता त्या सर्व प्रकरणांत ठेविण्यांत आलेली होती.

ठरल्याप्रमाणें दुपारीं ४ वाजतां परिषदेचें अधिवेशन कॅथे सभागृहांत सुरू झालें. व्यासपीठावर समोरील बाजूस एक सुंदर मेज, त्या मेजापाशीं दोन खुर्च्या व शेजारीं एक दूरध्वनिक्षेपक अशी व्यवस्था करण्यांत आलेली होती.



श्री. एन्. राघवन्
(हिंदी स्वातंत्र्य-सेनेला मिळालेले
मलायांतील प्रसिध्द कार्यकर्ते )



मेजर जनरल लोकनाथन्

( 'शहीद' बेटाचे 'गव्हर्नर' )



कै. रासबिहारी बोस
(हिंदी स्वातंत्र्यसंघाचे पहिले अध्यक्ष )



श्री. एस्. ए. अय्यर
( हिंद स्वातंत्र्य-सरकाराचे प्रचारमंत्री )

याच्याच मागच्या बाजूस व्यासपीठावर ओळीनें पंधरा-सोळा खुर्च्या मांडून ठेविलेल्या होत्या. त्या वेळच्या वातावरणांतील गांभीर्यपूर्ण स्तब्धता व त्या परिषदेचा थाट यांमुळें त्या परिषदेच्या अपूर्वत्वाची साक्ष प्रत्येकाच्या मनास पटत होती. सभागृहाच्या बाहेर नेताजींचें थाटानें स्वागत करण्यांत आल्यावर ते व त्यांचे शेजारीं, जपानी सरकारतर्फे हिकारी किकानचे त्या वेळचे मुख्य, मेजर जनरल यामामाटो हे, व्यासपीठावरील मेजाजवळ असलेल्या खुर्च्यांवर स्थानापन्न झाले. नेताजींच्या समोर उजव्या बाजूस हिंदी स्वातंत्र्यसैन्याचे अधिकारी बसलेले होते व डावे बाजूस दूरपूर्वेतील हिंदी जनतेचे प्रतिनिधी स्थानापन्न झालेले होते. त्या दिवशीं स्वातंत्र्य-सरकाराच्या स्थापनेबरोबर होणाऱ्या महत्त्वाच्या घोषणेचीं पत्रकें अधिवेशनाच्या सुरुवातीस स्वयंसेवकांनीं सर्वांस वांटली. **बरोबर ४ वाजून ५ मिनिटांनीं नेताजींनीं हिंदी स्वातंत्र्य-सरकार स्थापन झाल्याची घोषणा करून** त्यांतील मंत्र्यांचीं व इतर मुख्य व्यक्तींचीं नांवें वाचून दाखविलीं, तीं अशीं:—सुभाषचंद्र बोस—हिंदी स्वातंत्र्य-सरकाराचे राष्ट्रपति, पंतप्रधान, युद्धमंत्री, परराष्ट्रमंत्री, आणि हिंदी स्वातंत्र्यसेनेचे सर-सेनापति; डॉ. लक्ष्मी—स्त्री संघटनामंत्री; एस्. ए. आय्यर—प्रचार आणि प्रसिद्धी खात्याचे मंत्री; लेफ्टनंट कर्नल ए. सी. चॅटर्जी—अर्थमंत्री; या मंडळींशिवाय हिंदी स्वातंत्र्यसेनेचे आठ प्रतिनिधी मंत्रिमंडळावर घेतले होते. ते म्हणजे, ले. क. भोसले, ले. क. अझीझ अहमद, ले. क. भगत, ले. क. गुलझारा सिंग, ले. क. एम्. झेड्. क्यानी, ले. क. ए. डी. लोकनाथन्, ले. क. एहसान कादर, ले. क. शहानवाझ. आनंद-मोहन सहाय हे या मंत्रिमंडळाचे चिटणीस म्हणून नेमले जाऊन त्यांसही मंत्र्याचा दर्जा देण्यांत आला होता. कै. रासबिहारी बोस हे सर्वश्रेष्ठ सल्लागार व करीम गनी, देवनाथ दास, ईश्वरसिंग, डी. एम्. खान, येल्लाप्पा, थिवी हे ( सामान्य ) सल्लागार आणि ए. एन्. सरकार यांची कायद्याचे सल्लागार, अशा नेमणुका झाल्याचें जाहीर करण्यांत आलें.

वर उल्लेखिलेल्या व्यक्तींची येथें थोडक्यांत माहिती देणें इष्ट ठरेल. डॉ. लक्ष्मी या मद्रास विश्वविद्यालयाच्या एम्. बी. बी. एस्. असून सिंगापुरांत त्यांनीं डॉक्टरीण म्हणून चांगलेंच नांव मिळविलें होतें. सुंदर, हंसतमुख चेहरा, मनमिळाऊ स्वभाव, ठेंगणी, तरुण, उत्साही मूर्ती, धडाडीनें कोणतेंही काम करण्याची तयारी, इत्यादि गुणांमुळें त्या तेथें फारच लोकप्रिय होत्या.

श्री. एस्. ए. आय्यर हे चाळिशीच्या घरांतील गृहस्थ मलाया, सयाम वगैरे भागांत 'रॉयटर' वृत्तसंस्थेचे प्रतिनिधी म्हणून बरींच वर्षें काम करीत होते. मुंबई-पुणें या बाजूस त्यांचें वास्तव्य झाल्यामुळें त्यांस मराठीही चांगलें येतें. ते मद्रासी ब्राह्मण असल्यामुळें तिकडे राहूनसुद्धां ते शाकाहारीच होते, परंतु हिंदी स्वातंत्र्य-सरकाराच्या घोषणेनंतर दुसऱ्या दिवशीं सिंगापुराच्या क्रिकेट क्लबाच्या इमारतींत जो मोठा सरकारी खाना देण्यांत आला त्यांत नेताजींच्या समोरच बसण्याचा

त्यांच्यावर प्रसंग आला. मासे व इतर पदार्थ वगळून ठेवून मिळेल तेवढा शाकाहारच करीत असतांना त्यांस नेताजींनीं जेव्हां बघितलें, तेव्हां त्यांस उद्देशून हंसत हंसत नेताजी म्हणाले, " अहो आय्यरसाहेब, हे क्रांतीचे दिवस आहेत." त्यांच्या बोलण्याचा रोख लक्षांत येऊन श्री. आय्यर यांनीं कांहींएक विचार न करितां तळलेल्या माशाचा तुकडा कापून तो कसातरी घशाखालीं ढकलला. त्या प्रसंगानंतर हळूहळू मांसाहारी पदार्थ खाण्याची त्यांनीं संवय केली. हिंदी स्वातंत्र्य-सरकारांत त्यांच्याकडे जें काम दिलें होतें त्याचा त्यांस चांगला अनुभव होता. त्यांच्या कामास योग्य असाच मनमिळाऊ आणि शांत त्यांचा स्वभाव होता.

मंत्रिमंडळावर असलेल्या आठ लष्करी प्रतिनिधीपैकीं लेफ्टनंट कर्नल जगन्नाथराव भोसले हेच एकटे सँढर्स्ट या अत्युच्च इंग्रजी लष्करी शिक्षणाच्या कॉलेजांत शिक्षण घेतलेले अधिकारी होते. दूरपूर्वेंत असलेल्या सर्व हिंदी अधिकाऱ्यांत यांच्या दर्जाचें फौजी शिक्षण घेतलेले तीन-चारच गृहस्थ होते. वर उल्लेखिलेल्या आठ फौजी अधिकाऱ्यांपैकीं श्री. जगन्नाथराव भोसले हेच एकटे इंग्रजांच्या वेळीं लेफ्टनंट कर्नलच्या हुद्यापर्यंत चढलेले होते. इतरांस स्वातंत्र्यसैन्यांतच वेळोवेळीं वरचा दर्जा मिळत गेला. श्री. जगन्नाथराव भोसले हे नेताजी येण्याच्या अगोदर स्वातंत्र्यसेनेचे प्रमुख असल्यामुळें स्वतःचाच लष्करी दर्जा स्वहस्तानें वाढवून घेण्याचें त्यांनीं कधींच मनांत आणिलें नाहीं. जपानी अधिकारी मात्र त्यांस नेहमीं सल्ला देत कीं, हिंदी स्वातंत्र्य-चळवळींत इंग्रजांचा पूर्ण अभाव असल्यामुळें वरच्या अधिकाराच्या जागीं हिंदी अधिकाऱ्यांची बढती होणें योग्यच आहे. अर्थात् स्वातंत्र्य-चळवळींत तुम्ही तुमच्या हाताखालच्या अधिकाऱ्यांस जर वरचे हुद्दे देतां तर त्या प्रमाणांत तुम्ही स्वतःसुद्धां जनरलचा हुद्दा स्वीकारणें योग्य ठरेल. परंतु जगन्नाथरावांच्या सद्सद्विवेकबुद्धीस हें न पटल्यामुळें, नेताजी आले त्या वेळीं अनेक लेफ्टनंट कर्नलपैकीं हे एक, असें वरवर पाहाणाऱ्यास दिसणें स्वाभाविक होतें; परंतु त्यांचा पूर्वीचा लष्करी दर्जा इतर हिंदी अधिकाऱ्यांपेक्षां फार वरचा होता.

श्री. ए. सी. चटर्जी हे बऱ्याच पदव्या मिळविलेले डॉक्टर असून, ते इंग्रजप्रणीत हिंदी फौजेंतील डॉक्टरी खात्यांत, सिंगापुराच्या पाडावाचे वेळीं लेफ्टनंट कर्नलच्या हुद्यापर्यंत पोचले होते. स्वातंत्र्य-चळवळींत ते कॅ. मोहनसिंगांच्या वेळेपासूनच सामील झाले होतें. सुरुवातीपासूनच ते हिंदी स्वातंत्र्यसंघाचे मुख्य अधिकारी म्हणून काम पाहात होते व तेव्हांपासूनच त्यांचा फौजेशीं संबंध तुटला. हिंदी स्वातंत्र्यसंघाचे मुख्य या नात्यानें त्यांस पैशाच्या व्यवहाराकडे बघावें लागे. स्वातंत्र्य-सरकाराच्या स्थापनेपर्यंत त्यांस या बाबतींत बराच अनुभव मिळालेला होता.

श्री. आनंदमोहन सहाय हे बऱ्याच वर्षांपासून जपानमध्यें वास्तव्य

करून होते. हिंदुस्थानांत श्री. राजेंद्रप्रसाद यांच्याजवळ कांहीं दिवस व नंतर जपानमध्यें कै. रासबिहारी बोस यांच्याबरोबर काम करण्याची संधी त्यांस मिळाली होती. चीन, जपान इत्यादि देशांतील हिंदी लोकांची त्यांनीं राष्ट्रीय तत्त्वांवर संघटना केली. तद्देशीय लोकांस हिंदी स्वातंत्र्य-चळवळीचें थोडक्यांत ज्ञान व्हावें, या दृष्टीनें त्यांनीं इंग्रजींत एक लहानसें पुस्तकही लिहिलें आहे.

श्री. रासबिहारी बोस यांच्याबद्दल पूर्वीच सांगितलेलें असल्यामुळें त्यांचें कार्य सर्वांस परिचित आहेच; एवढ्याकरतां त्याचा येथें पुनरुच्चार करीत नाहीं. श्री. करीम गनी हे ब्रह्मदेशांत व्यापार करीत असत. श्री. देवनाथ दास हे जपानमध्यें बरींच वर्षें राहिलेले बंगाली गृहस्थ कै. रासबिहारी बोस व श्री. आनंदमोहन सहाय यांचे सहकारी होते. श्री. ईश्वरसिंग हे शीख गृहस्थ, सयामची राजधानी बँकॉक या शहरांतील बऱ्याच वर्षांपासूनचे धनाढ्य, कापडाचे व्यापारी आहेत. श्री. डी. एम्. खान हे पठाण गृहस्थ बरींच वर्षें हाँगकाँगमध्यें वास्तव्य करून होते. श्री. रासबिहारी बोस यांची त्यांजवर विशेष मर्जी होती. श्री. येल्लाप्पा हे तामीळ गृहस्थ बॅरिस्टर असून सिंगापुरांत वकिली करीत असत. ते पुढें हिंदी स्वातंत्र्य-चळवळीचें काम करण्याकरतां म्हणून ब्रम्हदेशांत गेले व तेथेंच लढाईच्या धामधुमींत वारले. श्री. थिवी हेही बॅरिस्टर असून, मलायांतील ईपो या गांवीं वकिली करितात. श्री. सरकार हे बंगाल प्रांतांत मॅजिस्ट्रेटच्या हुद्या-वर काम करीत असत. दूरपूर्वेंत लढाई सुरू होण्याच्या अगोदर ते सुट्टी घेऊन मलायांत त्यांच्या जामातास भेटण्यास गेले होते. अचानक लढाई सुरू झाल्यामुळें ते तेथेंच अडकले. आपल्या बऱ्याच वर्षांच्या, पेन्शनीपर्यंत येऊन ठेपलेल्या नोकरीचीही पर्वा न करितां श्री. सरकार हे स्वातंत्र्य-चळवळींत सामील झाले. ते अत्यंत प्रेमळ असून त्यांना स्वतःबद्दलची आढ्यता मुळींच नाहीं, हा त्यांचा स्वभावविशेष आहे.

श्री. रासबिहारी बोस यांच्याशिवाय वर उल्लेख केलेल्या सर्व व्यक्ती स्वातंत्र्य-सरकाराच्या घोषणेच्या दिवशीं तेथें हजर होत्या. सर्वांचीं नांवें जाहीर होतांच राष्ट्रपति या नात्यानें प्रथम नेताजींनीं शपथ घेतली. शपथेचा मसुदा हिंदुस्थानींत " मैं खुदाका नाम लेकर ये पवित्र कसम उठाता हूँ ...... " असा तयार करण्यांत आलेला होता. मात्र नेताजींनीं शपथेचा कागद हातांत घेऊन शपथ वाचली ती अशी—

**" ईश्वरास साक्ष ठेवून, मी सुभाषचंद्र बोस अशी पवित्र शपथ घेतों ( प्रतिज्ञा करितों ) कीं हिंदुस्थान आणि अडतीस कोटि हिंदी प्रजा यांस स्वतंत्र करण्याकरतां मी हें स्वातंत्र्ययुद्ध माझ्या आयुष्याच्या अखेरपर्यंत चालू ठेवीन. सदासर्वकाळ भारतभूमीचा सेवक राहून अडतीस कोटि हिंदी बंधुभगिनींचें हित साधणें हेंच माझें सर्वश्रेष्ठ कर्तव्य असें मी समजेन."**

शपथ घेतांना नेताजींचा कंठ दाटून आला. 'हिंदुस्थान आणि अडतीस कोटि हिंदी प्रजा' हे सुरुवातीचे शब्द उच्चारतांच हिंदी लोकांची पारतंत्र्यांतील दीनवाणी परिस्थितिही त्यांच्या डोळ्यासमोर मूर्तिमंत उभी राहून त्या कल्पनेनें त्यांच्या हृदयाचा ठाव घेतला. भरसभेंत त्यांच्या डोळ्यांतून अक्षरशः घळघळ अश्रू वाहूं लागून त्यांच्या तोंडून पुढें शब्द फुटेनासा झाला. शपथ घेत असतांनाच हृदय भरून आल्यामुळें अश्रूंचा पूर ओसरेपर्यंत ते पांच-दहा क्षण थांबले. तेवढ्यांत त्यांनीं आपल्या ब्रीचेसच्या उजव्या खिशांतील रुमाल काढून आपले डोळे पुसले. डाव्या हातानें शपथेचा कागद त्यांच्या डोळ्यांसमोर धरलेला असून त्याच्यावरच त्यांची दृष्टी खिळलेली होती. ते पांच-दहा क्षणच, परंतु नेताजींच्या मनास होणाऱ्या आत्यंतिक यातनांमुळें तेथें हजर असलेल्या सर्व व्यक्तींस, ते युगाप्रमाणें भासले. केव्हां एकदां नेताजींच्या दुःखाचा पूर ओसरून त्यांस शपथ पुरी करितां येईल, असें सर्वांस होऊन गेलें. त्यांच्या त्या दुःखी-कष्टी चेहऱ्याकडे कोणास बघवेना. त्यांनींही त्या कागदावरून स्वतःची दृष्टी चळूं दिली नाहीं. क्षणमात्र देहभान विसरून स्वतंत्र हिंदुस्थानाचा उज्ज्वल इतिहास व परतंत्र हिंदुस्थानाचा सर्वांगीण अधःपात हीं दोन्ही चित्रें त्यांच्या हृदयपटलावर चमकून गेलीं. एकानें त्यांच्या हृदयास सुखसंवेदना केल्या; परंतु दुसऱ्यानें विरोधरूपानें त्याच सुखद चित्रावर डागण्या दिल्या!

त्यांच्या शेजारींच बसलेल्या जनरल यामामाटोसही नेताजींचें हिंदुस्थानाबद्दलचें इतकें उत्कट प्रेम पाहून त्यांच्या त्या कष्टी चेहऱ्याकडे बघवेना. सभेंत सर्वत्र एकच स्तब्धता पसरलेली होती. दगडासही पाझर फोडणारा तो प्रसंग होता. रुमालानें डोळ्यांतील अश्रू पुसून नेताजींनीं शांतपणें रुमाल खिशांत ठेविला. क्षणमात्र हरपलेलें देहभान पुन्हा परत आलें. त्यांनीं शपथ पुरी केली.

त्यांचा शपथविधि पूर्ण झाल्यानंतर वर दिलेल्या क्रमानें हिंदी स्वातंत्र्य-सरकाराच्या इतर मंत्र्यांनींही एकामागून एक व्यासपीठावर चढून नेताजींच्या शेजारीं ध्वनिक्षेपकाजवळ उभें राहून आपापल्या हातांतील कागदावरील शपथ वाचली; नंतर नेताजींशीं हस्तांदोलन करून मागील बाजूस मांडून ठेविलेल्या खुर्च्यांवर ते स्थानापन्न झाले. नेताजींचा शपथविधि पूर्ण झाल्यावर सुद्धां त्यांच्या अंतःकरणांतील वादळ कांहीं काळ शांत झालें नव्हतें. त्यांच्या मागून लगेच ज्या एक दोघां मंत्र्यांनीं शपथा घेतल्या, त्यांचा शपथविधि पूर्ण झाल्यावर जेव्हां नेताजींशीं हस्तांदोलन करण्याचा त्यांस प्रसंग आला, तेव्हां अंतःकरणांतील खळबळीमुळें नेताजींनीं त्यांच्या दृष्टीला दृष्टी भिडवून त्यांचा हात इतका जोरानें आणि दीर्घकाल हालविला कीं, त्यांतील अनैसर्गिकता कोणाच्याही ध्यानांत येण्यासारखी होती. जणूं काय ते आपल्या नव्या सहकाऱ्यांच्या हृदयाचा ठाव घेत त्यांस विचारीत होते कीं, 'तुम्ही खरोखरच शरीरांत प्राण असेपर्यंत माझ्या कार्यांत समभागी व्हाल का? ......तुम्ही शपथ घेतलीत




हिंदी स्वातंत्र्य सरकाराच्या स्थापनेची घोषणा

ती वरपांगीं माझ्या समाधानाकरतां नसून खरोखरच तुमच्या अंतःकरणांत तशी तळमळ उत्पन्न झाली आहे का ? '

यानंतर नेताजींनीं घोषणा वाचून दाखविली ती अशी :

इसवी सन १७५७ सालीं बंगाल्यांत इंग्रजांनीं हिंदी लोकांचा पहिला पराभव केल्यानंतर पुढील शंभर वर्षांत हिंदी लोकांचें इंग्रजांशीं सतत युद्ध चालून त्यांत अनेक घनघोर रणसंग्राम झाले.

या कालखंडाच्या इतिहासांत अप्रतिम शौर्याचीं व आत्यंतिक स्वार्थत्यागाचीं अनेक उदाहरणें आढळतात. त्या इतिहासांत बंगालचे सिराजउद्दौला आणि मोहनलाल, दक्षिण हिंदुस्थानांतील हैदरअली, टिपू सुलतान आणि वेलुत्तंबी, महाराष्ट्राचे अप्पासाहेब भोसले आणि पेशवा बाजीराव, औंधच्या बेगमा, पंजाबचा सरदार शामसिंग अत्तारिवाला आणि अखेरच्या काळांतील परंतु तितक्याच शूर व उल्लेखनीय व्यक्ती म्हणजे झांशीची राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, महाराज कुंवरसिंह आणि नानासाहेब यांचीं नांवें कायमचीं सुवर्णाक्षरांत लिहिलीं गेलीं आहेत.

इंग्रजांपासून आखिल हिंदुस्थानास धोका आहे हें सुरुवाती सुरुवातीस दुर्दैवानें आमच्या पूर्वजांच्या लक्षांत आलें नाहीं. त्यांनीं सर्वांनीं एकवटून इंग्रजांस तोंड दिलें नाहीं. अखेरीस खरी परिस्थिति लक्षांत आल्यावर सर्व हिंदी लोकांनीं एकवटून इसवी सन १८५७ सालीं बहादुरशहाच्या ध्वजाखालीं स्वातंत्र्यकालांतील अखेरचें युद्ध लढवलें. या युद्धाचे पूर्वार्धांत हिंदी लोकांनीं वाखाणण्याजोगे असे अनेक विजय संपादन केले असले तरी आपलें दुर्भाग्य आणि आपल्याकडील अयोग्य नेतृत्व अशा दोन कारणांमुळें अखेरीस त्यांचा पराजय होऊन ते दास बनले. तें कसेंही असलें तरी झांशीची राणी, तात्या टोपे, कुंवरसिंह आणि नानासाहेब यांच्यासारख्या शूर व्यक्तींचीं नांवें आपल्या राष्ट्राच्या स्मृतींत प्रकाशमान ताऱ्यांप्रमाणें कायमचीं झळकत राहून आपणांस स्वार्थत्यागी आणि शौर्याचीं कृत्यें करण्यास स्फूर्तिदायक होतील.

इसवी सन १८५७ नंतर इंग्रजांनीं हिंदी लोकांस बळजबरीनें निःशस्त्र करून त्यांचा पाशवी छळ केल्यामुळें हिंदी लोक कांहीं काळ निपचित पडले; परंतु १८८५ सालीं हिंदी राष्ट्रीय-संघाच्या ( इंडियन नॅशनल कॉंग्रेसच्या ) जन्मानंतर त्यांच्यांत नवचैतन्य निर्माण झालें. १८८५ सालापासून तों गेल्या ( १९१४ ते १८ ) महायुद्धाच्या अखेरपर्यंत, हिंदी लोकांनीं आपलें स्वातंत्र्य परत मिळविण्याच्या खटपटींत चळवळ, प्रचार, परदेशी मालावर बहिष्कार, रक्तपात, उत्पात व शेवटीं सशस्त्र बंड इत्यादि शक्य तितके सर्व उपाय योजून पाहिले. परंतु हे सर्व उपाय कांहीं काळ निष्फळ ठरले. अखेरीस आपले सर्व

प्रयत्न फसले, अशा नैराश्यमय अंधकारांत स्वातंत्र्याची एखादी वाट शोधून काढावयाच्या विचारानें हिंदी लोक चांचपडत असतां महात्मा गांधींनीं असहकाराचें व कायदेभंगाचें आपलें नवें शस्त्र उपसलें.

त्यानंतर सुमारें वीस वर्षें सगळीकडे खळबळ उत्पन्न करणाऱ्या अशा एका राष्ट्रीय चळवळींत हिंदी लोक गुंतले. घरोघर स्वातंत्र्य-संदेश पोंचला. देशाच्या स्वातंत्र्याकरतां यातना भोगणें, स्वार्थत्याग करणें आणि मरण पत्करणें यांचें प्रत्यक्ष उदाहरण जनतेसमोर ठेवण्यांत आलें. या टोंकापासून त्या टोंकापर्यंत सर्व लोक एका राष्ट्रीय अशा राजकीय संघटनेंत संबद्ध झाले. अशा रीतीनें पुनश्च हिंदी लोकांची राष्ट्रीय वृत्ति जागी झाली एवढेंच नव्हे, तर त्यांची एक राजकीय संघटनाच तयार झाली. स्वातंत्र्याच्या एकमेव ध्येयाकरतां हिंदी लोकांस एका मनानें प्रयत्न करणें शक्य झालें. १९३७ पासून १९३९ पर्यंत आठ प्रांतांत कॉंग्रेस मंत्रिमंडळांनीं जें कार्य करून दाखविलें त्यावरून हिंदी लोक स्वतःचा कारभार हांकण्यास तयार असून, समर्थ आहेत हें सिद्ध झालें. अशा रीतीनें हल्लींचें जागतिक युद्ध सुरू होण्याच्या वेळेस हिंदुस्थानाचें स्वातंत्र्य परत मिळविण्याकरतां शेवटलें ( यशस्वी ) स्वातंत्र्ययुद्ध पुकारण्याची जय्यत तयारी झालेली होती.

हिंदुस्थानाच्या सांप्रतच्या इतिहासांत प्रथमच, परदेशस्थ हिंदी लोकांतही राष्ट्रीय वृत्ति जागृत होऊन ते एका राष्ट्रीय संघटनेंत संबद्ध झाले आहेत. विशेषतः दूरपूर्वेतील वीस लाख लोक हे एका घनिष्ट संघटनेंत ग्रथित झालेले असून या स्वातंत्र्यलढ्यास त्यांनीं तन-मन-धन अर्पण करण्याचें ठरविलें आहे. या संघटनेच्या पुढयांत ‘ चलो दिल्ली ’-च्या ध्येयानें प्रेरित झालेली हिंदी स्वातंत्र्यसेना एकजुटीनें उभी आहे. आपल्या आत्यंतिक भोंदूगिरीनें हिंदी लोकांस जिणें नकोसें करून, त्यांना सर्व प्रकारें नागवून भिकेस लावण्याची व उपाशीं पोटीं मारण्याची जी प्रथा इंग्रजांनीं पाडली, त्यामुळें त्यांच्यांत व हिंदी लोकांत कायमची तेढ उत्पन्न झाली असून इंग्रजांचें हिंदुस्थानांतील राज्य संपुष्टांत येण्याच्या मार्गास लागलें आहे. या दुष्ट राज्यपद्धतीचा भडका उडवून नाश करावयास एका काडीचीच आवश्यकता आहे आणि ही काडी लावण्याचेंच कार्य हिंदी स्वातंत्र्यसैन्याकडे आहे.

स्वातंत्र्याचा उषःकाल होण्याची वेळ येऊन ठेपलेली असतांना आपलें स्वतःचें सरकार स्थापून त्या सरकाराच्या नेतृत्वाखालीं अखेरचें ( यशस्वी ) स्वातंत्र्ययुद्ध पुकारणें हें सर्व हिंदी लोकांचें कर्तव्य आहे. हिंदुस्थानांतील सर्व नेते तुरुंगांत असतांना आणि तेथील जनता निःशस्त्र असतांना असें सरकार हिंदुस्थानांत प्रस्थापित करून त्या सरकाराच्या

मार्गदर्शनानें स्वातंत्र्ययुद्ध लढणें हें आजच्या परिस्थितींत शक्य नाहीं. अर्थात् हिंदुस्थानांतील व हिंदुस्थानाबाहेरील सर्व राष्ट्रीय वृत्तीच्या हिंदी लोकांच्या पाठिंब्यानें दूरपूर्वेतील हिंदी स्वातंत्र्यसंघाकडेच हें कार्य ओघानेंच येतें — तें कार्य म्हणजे, हिंदी स्वातंत्र्य-सरकार स्थापून हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या मदतीनें अखेरचें ( यशस्वी ) हिंदी स्वातंत्र्ययुद्ध लढण्याचें होय.

दूरपूर्वेतील हिंदी स्वातंत्र्यसंघानें, हिंदी स्वातंत्र्य-सरकार स्थापून आमच्यावर जें जबाबदारीचें कार्य सोपविलें आहे त्या जबाबदारीच्या पूर्ण जाणीवेनें आम्ही आमचें कर्तव्य पार पाडूं. स्वदेशमुक्तीच्या या कार्यांत आणि युद्धांत परमेश्वराचा आम्हांस आशीर्वाद असो अशी आमची त्यास ( हात जोडून ) प्रार्थना आहे. हिंदुस्थानाचें स्वातंत्र्य परत मिळविण्याकरतां, स्वदेशाची भरभराट होण्याकरतां आणि भारतास जगांतील इतर राष्ट्रांत मानाचें स्थान मिळवून देण्याकरतां आम्ही आमचे व आमच्या सैनिकांचे प्राण पणास लावण्याची प्रतिज्ञा करितों. हिंदुस्थानांतील सर्वसामान्य जनतेच्या अनुमतीनें त्यांच्या विश्वासास सर्वतोपरी पात्र असें कायमचें सरकार हिंदुस्थानांत प्रस्थापित होईपर्यंत, स्वातंत्र्य-लढा पुकारण्याचें व तें युद्ध चालविण्याचें कार्य या ( तात्पुरत्या ) हिंदी स्वातंत्र्य-सरकाराकडे राहील.

या हिंदी स्वातंत्र्य-सरकारास सर्व हिंदी लोक एकनिष्ठ राहतील अशी अपेक्षा करण्याचा या सरकारास हक्क आहे. प्रत्येक नागरिकास धर्मस्वातंत्र्य राहून सर्वांस समान हक्क मिळतील याची आम्ही सर्वांस हमी देतों. हिंदुस्थानांतील विदेशी सरकारानें उत्पन्न केलेले अनेक भेदभाव बुजवून, भारतमातेच्या सर्व मुलांस समानतेनें वागविण्याचें व अखिल भारताची आणि त्याच्या सर्व घटकांची भरभराट करून हिंदी लोकांचें जीवन सुखमय करण्याचें आपलें अढळ ध्येय असल्याचें हें सरकार घोषित करीत आहे.

परमेश्वराचें नांव घेऊन, हिंदी राष्ट्राच्या एकीकरणास कारणीभूत झालेल्या आपल्या सर्व पूर्वजांस स्मरून आणि आपल्यापुढें, त्यागाचें व स्वतःच्या वीरवृत्तीचें उदाहरण ठेवणाऱ्या त्या उज्ज्वल विभूतींचें स्मरण करून आम्हीं सर्व हिंदी लोकांस आमच्या ध्वजाखालीं संघटित होऊन, स्वातंत्र्यलढ्यांत भाग घेण्यास पाचारण करितों. शौर्यानें, चिकाटीनें आणि अंतिम यशाची खात्री मनांत बाळगून, इंग्रज व हिंदुस्थानांतील त्यांचे मदतनीस यांविरुद्ध लढून व आपल्या शत्रूस हिंदुस्थानाबाहेर घालवून आपल्या देशास स्वातंत्र्य मिळवून हा लढा शेवटास नेण्याची आम्ही त्यांस आज्ञा करितों."

हिंदुस्थानाच्या पारतंत्र्याच्या इतिहासांत स्वातंत्र्य-सरकाराच्या स्थापनेचा हा प्रसंग अपूर्व होता. श्री. सुभाषचंद्र बोस यांचा जगांतील निरनिराळ्या राष्ट्रांच्या स्वातंत्र्यलढ्यांचा व्यासंग फारच खोल आहे. त्यापासूनच त्यांस स्फूर्ती मिळून, जित लोकांनीं जेत्यांविरुद्ध युद्ध पुकारल्याशिवाय त्यांस घालवून स्वदेश स्वतंत्र केल्याचें एकही उदाहरण त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आलें नसल्यामुळें हिंदुस्थानाच्या बाबतींतही त्यांची तशीच खात्री झालेली आहे. एकदां एकाद्या गोष्टीची खात्री पटल्यावर कोणी वानो अथवा निंदो, कोणी अनुयायी असोत वा नसोत, आपल्या सद्सद्विवेकबुद्धीस पटेल तसें राष्ट्रकार्य अविरत करीत राहण्याच्या त्यांच्या अद्वितीय गुणामुळें हिंदुस्थानांतील थोर पुरुषांत त्यांची गणना झाली आहे. या गुणास जोडून इतरही अनेक अप्रतिम गुण त्यांच्यांत वसत आहेत. व्यक्ती या नात्यानें एका स्वतंत्र प्रकरणांत त्यांच्या अंगच्या बहुमोल गुणांचा आपण विचार करूं. हिंदुस्थानांत सध्या महात्मा गांधी ( कोणास त्यांचीं मतें पटोत वा न पटोत ) हे एकच असे पुढारी आहेत कीं, जे त्यांच्या सद्सद्विवेकबुद्धीला पटेल ती गोष्ट त्या त्या वेळीं कोणाचीही व कशाचीही पर्वा न करतां ठामपणें लोकांपुढें मांडतात. दुसरे अनेक पुढारी आपलीं मतें गुंडाळून ठेवून ( महात्मा गांधींचीं मतें पटत नसतांनासुद्धां ) लोकसंग्रहाकरतां महात्मा गांधींच्या 'हो' ला 'हो' देतात. स्वतःच्या सद्सद्विवेकबुद्धीस पटेल तें ठामपणें कोणापुढेंही मांडण्याची, तें आचरणांत आणण्याची अगर त्यासाठीं लोकसंग्रहाचीही पर्वा न करण्याची धडाडी श्री. सुभाषचंद्र बोस यांच्यांतच दिसते. जगांत स्वतःची टिमकी वाजावी म्हणून जो आपलीं मतें गुंडाळून ठेवतो व लोकांस आवडेल तें करितो त्यास नेता न म्हणतां तमासगीरच म्हटलें पाहिजे. 'बोले तैसा चाले' त्यासच नेता म्हणणें योग्य होईल. नुसतें तोंडानें 'हिंदुस्थान स्वतंत्र झाला पाहिजे' असें म्हणणारे, नव्हे—तशी सदिच्छा मनांत धरून स्वसामर्थ्यानुरूप राष्ट्रकार्य करणारे बरेच लोक आहेत; परंतु या सर्वांस आपण सामान्यच समजतों. कारण 'हिंदुस्थानाचें स्वातंत्र्य मिळविलेंच पाहिजे' या त्यांच्या वचनास अथवा सदिच्छेस तत्तुल्य अशा कृतीची जोड नसते. एवंच, श्री. सुभाषचंद्र बोस हे नेतृत्वाच्या या कसोटीस पूर्णपणें उतरतात.

हिंदी स्वातंत्र्य-सरकाराची अघटित घटना साध्य करून दाखवून श्री. सुभाषचंद्र बोस यांनीं हिंदुस्थानाच्या इतिहासांत आपलें नांव अजरामर करून ठेविलें यांत शंका नाहीं. त्यांनीं जें कार्य करून दाखविलें तें हिंदी राष्ट्रीय-संघाच्या ( इंडियन नॅशनल कॉंग्रेसच्या ) इतिहासांत कोणी करून दाखविलें नाहींच, परंतु आजही पुन्हा ती कृती करून दाखविण्याची कोणाची छाती नाहीं ! यावरूनच त्या कार्याकरतां केवढ्या धडाडीची आवश्यकता आहे याची कल्पना येईल.

स्वातंत्र्य-सरकाराची घोषणा झाल्यावर हजर असलेल्या हिंदी व जपानी

फोटोग्राफर्सनीं ठिकठिकाणांहून भराभर बरींच छायाचित्रें घेतलीं. सर्व मित्रराष्ट्रांस, तटस्थ राष्ट्रांस व वृत्तसंस्थांस तारेनें व बिनतारी संदेशानें या स्वातंत्र्य-सरकाराच्या स्थापनेची माहिती कळविण्यांत आली व दुसऱ्या दिवशीं, वरील प्रसंगीं घेतलेलीं छाया-चित्रेंही सगळीकडे प्रसिद्धीकरतां पाठविण्यांत आलीं. स्वातंत्र्य-सरकाराच्या स्थापनेनंतर या परिषदेचें काम संपलें. त्याच दिवशीं रात्रींपासून बरींच महत्त्वाचीं कामें होतीं. नव्या मंत्रिमंडळाच्या महत्त्वाच्या बैठकी नेताजींच्या बंगल्यावर तातडीचीं कामें उरकण्याकरतां भरूं लागल्या. दुसऱ्या दिवशीं दुपारीं सिंगापूर क्रिकेट क्लबाच्या इमारतींत स्वातंत्र्य-सरकाराच्या स्थापनेबाबत सरकारी खाना देण्यांत आला. या प्रसंगीं जपानी व जर्मन अधिकारी उपस्थित होते. तेथेंही भोजन-समारंभानंतर नव्या मंत्रिमंडळाचें छायाचित्र घेण्यांत आलें. त्याच दिवशीं सायं-काळीं म्हणजे २२ ऑक्टोबर १९४३ रोजीं चार वाजतां वॉटर्लू स्ट्रीटवरील हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या सिंगापूर शाखेच्या सभागृहांत झांशी-राणी पथकाच्या स्थापनेचा समारंभ होणार होता. या सभागृहाच्या समोरच, रस्त्याच्या पलीकडे, सिंगापूर शहराच्या मध्यवस्तींत समुद्रापासून फर्लांग दोन फर्लांगाच्या अंतरावर नवीन बराकी व त्यांच्याभोंवतीं उंच लाकडी फळ्यांचें कुंपण घालून झांशी-राणी पथकाची छावणी तयार करण्यांत आली होती.

झांशीची राणी लक्ष्मीबाई यांची जन्मतारीख २१ ऑक्टोबर १८३५ ही आहे. ज्या दिवशीं हिंदी स्वातंत्र्य-सरकार स्थापन झालें त्या दिवशींच त्यांचा जन्मोत्सव असल्यामुळें झांशी-राणी पथकाच्या छावणीचा उद्घाटन समारंभही वास्तविक त्याच दिवशीं व्हावयाचा. परंतु कार्यबाहुल्यामुळें त्या दिवशीं तो कार्यक्रम ठेवणें शक्य झालें नाहीं. अर्थात् दुसऱ्या दिवशीं म्हणजे २२ ऑक्टोबर १९४३ रोजीं हा कार्यक्रम व्हावयाचें ठरलें होतें. स्त्रियांचें लढाऊ पथक स्थापन होणार ही बऱ्याच हिंदी लोकांस अत्यंत कुतुहलाची गोष्ट वाटत होती. त्याच्या उपयुक्ततेबद्दल तर नेताजींशिवाय जवळ जवळ इतर सर्व हिंदी अधिकाऱ्यांस शंकाच होती. त्या सर्वांचें हें मत शेवटपर्यंत कायम राहिलें. हें झांशी-राणी पथक म्हणजे एक नसती काळजी, जबाबदारी आणि वेळेचा व सामानाचा अपव्यय असेंच हिंदी स्वातंत्र्यसेनेचे आणि स्वातंत्र्यसंघाचे अधिकारी शेवटपर्यंत उद्गार काढीत असत. नेताजींच्या समोर मात्र तसें उघड म्हणण्याची कोणाचीच छाती झाली नाहीं !

सिंगापूरच्या हिंदी स्त्रियांत त्या दिवशीं अपूर्व उत्साह दिसून येत होता. पथकाच्या उद्घाटन समारंभाकरतां तें सभागृह चांगलें शृंगारलें होतें. अधिकारी-वर्ग, निमंत्रित प्रतिष्ठित स्त्री-पुरुष, वृत्तपत्रव्यवसायी लोक व इतरेजन यांची एकच गर्दी झालेली होती. आपणही कांहीं महत्त्वाचें कार्य हातीं घेणार असून इतर रिकामटेकड्या व्यक्तींपैकीं आपण नाहीं अशा तऱ्हेचा अहंभाव सर्व स्त्री-कार्यकर्त्यांच्या बोलण्या-चालण्यांत त्या दिवशीं दिसून येत होता. चार वाजतां

नेताजी व त्यांच्याबरोबर इतर महत्त्वाच्या व्यक्ती आल्या. लष्करी सलामी घेऊन दोन्ही बाजूंस आपापल्या खुर्च्यांपुढें उभ्या असलेल्या स्त्री-पुरुषांच्या रांगांतून नेताजी व त्यांजबरोबरील व्यक्ती व्यासपीठावर गेल्या. राष्ट्रगीत वगैरे झाल्यावर त्या प्रसंगींच्या नेताजींच्या महत्त्वाच्या भाषणांचीं पत्रकें सर्वांस आधींच वाटण्यांत आलीं होतीं. टाळ्यांच्या कडकडाटांत व जयघोषांत नेताजी भाषण करावयास उठले. ते म्हणाले,

"हिंदी वीरास्त्रियांची मालिका अखंड असून त्यांची परंपरा उज्ज्वल आहे. लढण्याचें काम स्त्रियांचें नव्हे, असें बरेच लोक समजतात. परंतु माझें याच्या अगदीं विरुद्ध मत आहे. आमचे कित्येक सहकारी या पथकाकरतां खर्च होणारा वेळ व पैसा अनाठायीं समजतात. परंतु मी तसें समजत नाहीं. हिंदुस्थानाची परिस्थिति सध्यां इतकी आणी-बाणीची आहे कीं, स्त्रियांनींसुद्धां पुरुषांच्या बरोबरीनें लढलें पाहिजे. स्त्रिया कित्येक वेळां पुरुषांपेक्षांही जास्त मर्दुमकी दाखवूं शकतात, याचीं उदाहरणें हिंदुस्थानाच्या इतिहासांत भरपूर सांपडतील. ज्या वीर-स्त्रीचें नांव या पथकास देण्यांत आलें आहे तिचेंच चरित्र पहा....... १८५७ च्या पहिल्या स्वातंत्र्ययुद्धांत जर एक झांशीची राणी निपजली असली तर या खेपेस तशा हजार तरी चमकल्या पाहिजेत, अशा उद्देशानें आम्हीं हें पथक स्थापन करीत आहोंत. येथील स्त्री-समाजाचा याबाब-तींतील उत्साह पाहून हें पथक स्थापन करण्याचा आमचा उद्देश विफल होणार नाहीं, याची मला खात्री वाटते. या पथकाची वास्तविक यापूर्वींच स्थापना व्हावयाची होती. परंतु पुरुष सैनिकांचें पथक उभें करण्याची गोष्ट वेगळी व स्त्री-सैनिकांचें पथक उभें करण्याची गोष्ट वेगळी. स्त्री-पथकास बऱ्याच गोष्टींची विचारपूर्वक तयारी करावी लागते. ती तशी करण्यासच आम्हांला एवढा वेळ लागला. हें पथक स्थापण्यास जो अवधी लागला तेवढ्यांत आमच्या स्त्री-कार्यकर्त्या इतक्या अधीर झाल्या होत्या कीं, हें पथक स्थापण्याचें खरोखरच आमचे मनांत आहे कीं, आम्हीं त्यांस नुसतीं पोकळ आश्वासनेंच देत राहणार याबद्दल त्यांचे मनांत शंका उद्भवूं लागल्या होत्या...."

अशा तऱ्हेनें नेताजींचें भाषण झाल्यावर नेताजी आणि निवडक मंडळी, त्या सभागृहांतून निघून, रस्ता ओलांडून समोरच नवीन तयार केलेल्या झांशी-राणी पथकाच्या छावणीच्या मोठ्या लाकडी दरवाज्यापाशीं गेली. डॉ. लक्ष्मींनीं छावणीच्या मुख्य दरवाजाच्या किल्ल्या नेताजींचे स्वाधीन केल्यावर नेताजींनीं त्या दरवाजाचें कुलुप उघडून त्या छावणीचा उद्‌घाटन समारंभ पार पाडला. छावणीचे आंतील आवारांत शिरल्याबरोबर डाव्या बाजूला पहारेकऱ्यांची खोली व त्यांचें लहानसें शस्त्रागार होतें. समोरील बाजूस असलेल्या लांबलचक बराकींत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ...................... वि: ..................
क्रमांक .............................. नों: दि: ..............



त्या पथकाच्या मुख्य अधिकाऱ्यांची कचेरी, नंतर त्यांच्या हाताखालच्या दुसऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची कचेरी व तिसऱ्या एका खोलींत टंकलेखक, कारकून, कोठारी इत्यादींची काम करावयाची जागा होती. डाव्या बाजूस कचेरीच्या पलीकडे असलेल्या बराकींत त्या छावणीचें रुग्णालय होतें. पहारेकऱ्यांच्या खोलीस लागूनच आंतल्या बाजूस त्या पथकाचें, कपडे व सैनिकांस लागणाऱ्या इतर सामानाचें कोठार होतें. कचेरीच्या पलीकडे उजवे बाजूस एका बराकींत स्त्री सैनिकांच्या, फळ्यांच्या खाटा रांगेनें लाविलेल्या होत्या. त्याच्या पलीकडील बराकींत दोन-तीन खोल्या करून एकांत त्या छावणीच्या वरिष्ठ अधिकारी राहात असत. दुसरींत त्यांच्या हाताखालीं असलेल्या दुसऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची राहावयाची खोली असे. तिसऱ्या खोलींत अधिकाऱ्यांचें भोजनगृह. त्या छावणीच्या आवारांत आणखी चार-पांच बराकींत स्त्री-सैनिकांची राहावयाची व्यवस्था होती. त्या सर्वांचें भोजनगृह म्हणून एक मोठी बराक राखून ठेवण्यांत आली होती. वरिष्ठ अधिकाऱ्यांचें भाषण ऐकण्यास, अथवा इतर प्रसंगीं पथकांतील सर्व व्यक्तींस एके ठिकाणीं जमण्याचा प्रसंग आल्यास या भोजनगृहाच्या लांब-रुंद बराकींत अशा सभा पार पडत. याशिवाय स्वयंपाकगृह, धान्याचें कोठार आणि सर्व सैनिकांचें शस्त्रागार अशा वेगवेगळ्या तीन झोपड्या बांधलेल्या होत्या. सर्व बराकींस पांढरा स्वच्छ रंग दिलेला होता. या झोपड्यांस लागूनच असलेल्या मोकळ्या जागेंत स्त्री-सैनिक कवाईत करीत असत. पूर्वी इंग्रजांचे अंमलांचे वेळीं लढाईचे दिवसांत निराधार झालेल्या लोकांची या ठिकाणीं सोय करण्यांत आलेली होती. या कारणाकरतां बांधलेल्या पूर्वीच्या कांहीं झोपड्या तेथें होत्याच; त्यांची डागडुजी करून, त्यांस रंग देऊन व आवश्यकतेप्रमाणें आणखी नव्या झोपड्या बांधून ही छावणी तयार करण्यांत आलेली होती. इंग्रजी अंमल संपुष्टांत येणार असल्याचीं चिन्हें दिसूं लागतांच इंग्रजांचे हुकुमानें सामानाच्या नासधुशीस सुरुवात झाली, त्या धामधुमीच्या काळांत, इंग्रज सैनिकांनीं छावणीच्या आवारांतील त्या मोकळ्या जागेंत दारूगोळा, तांदुळाचीं पोतीं इत्यादि बरेंच सामान पुरून ठेविलें होतें. अधून मधून ती मोकळी जागा उकरण्याचें काम पडल्यास त्या दारूगोळ्याचा कधीं कधीं स्फोट होत असे.

झांशी-राणी पथकांत प्रथमतः दीडशें स्त्रियांनीं नांवें नोंदविलीं व त्यांचें लष्करी शिक्षण हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या लष्करी शिक्षकांच्या मार्गदर्शनानें सुरू झालें. या पथकाबद्दल एवढीच माहिती सध्यां देऊन आपण दुसऱ्या महत्त्वाच्या गोष्टींकडे वळूं. झांशी-राणी पथकाचा संपूर्ण इतिहास प्रसंगाप्रसंगानें पुढें येईलच.

हिंदी स्वातंत्र्य-सरकाराच्या स्थापनेचें वृत्त सगळीकडे कळविल्यावर निरनिराळ्या राष्ट्रांच्या परराष्ट्रमंत्र्यांकडून या सरकाराचें अस्तित्व आणि त्याचा समान दर्जा मान्य केल्याच्या तारा नेताजींकडे येऊं लागल्या. २३ ऑक्टोबर

१९४३ रोजीं, जपाननें हिंदी स्वातंत्र्य-सरकार मान्य केल्याची तार सिंगापुरांतील जपानी राजप्रतिनिधीनें आणून दिली. यानंतर एका मागून एक जर्मनी, इटाली, फिलीपीन्स, मांचूरिया, चीन (नॅनकिंग येथील अध्यक्ष 'वँग चिंग वे' यांचें चिनी राष्ट्रीय-सरकार) क्रोएशिया, सयाम, ब्रह्मदेश या राष्ट्रांनींही नेताजींस तारा पाठवून हिंदी स्वातंत्र्य-सरकारास मान्यता देऊन शुभेच्छा व्यक्त केली. नोव्हेंबर ८ तारखेस अचानकपणें स्वतंत्र आयर्लंडचे अध्यक्ष 'डी व्हॅलेरा' यांचेकडून अभिनंदनपर अशी एक तार आली. एका राष्ट्रीय वृत्तीच्या जाज्वल्य अशा अन्यदेशीय राष्ट्रभक्ताची नेताजींस तार आलेली पाहून सर्वांस फारच आनंद झाला. श्री. सुभाषचंद्र बोस व डी व्हलेरा यांची पूर्वीं गांठ पडलेली असून दोघांचेंही मनांत एकमेकांविषयीं गाढ प्रेम आणि आदर वसत होता. आयर्लंडच्या स्वातंत्र्यसंपादनाच्या इतिहासाचा श्री. सुभाषचंद्र बोस यांनीं चांगला अभ्यास केलेला असून त्यापासून त्यांना बरीच स्फूर्ती मिळालेली आहे. इंग्रजांचा कट्टर शत्रु, आयर्लंडच्या स्वातंत्र्ययुद्धाचा यशस्वी पुढारी आणि नंतर त्या राष्ट्राचा लोकनियुक्त अध्यक्ष या दृष्टीनें डी व्हॅलेरा यांचेबद्दल श्री. सुभाषचंद्र बोस यांचे मनांत गाढ आदर वसत होता. अशा व्यक्तींकडून आलेल्या अभिनंदनाच्या तारेचें त्यांस जास्त महत्त्व वाटणें साहजिक होतें; कारण त्यांत कसल्याही प्रकारचा राजकारणी डाव नसून शुद्ध प्रेमभाव होता. त्या तारेंत मजकूर होता तो असा : "तुम्ही हिंदी स्वातंत्र्य-सरकार स्थापलें हें ऐकून मला अत्यानंद झाला. या कामगिरीबद्दल मी तुमचें अभिनंदन करितों. तुमचें स्वातंत्र्य-सरकार स्थापन झाल्याचें वृत्त ऐकून मला एकदम आमच्या स्वातंत्र्य-सरकाराच्या स्थापनेचे दिवस आठवले. तुम्ही आज ज्या आणीबाणीच्या परिस्थितींत आहांत, तशाच परिस्थितींत आम्हीं त्या वेळेस होतों. मी तुम्हांस व तुमच्या सहकाऱ्यांस तुमच्या कार्यांत सुयश चिंतितों."

२३ ऑक्टोबर १९४३ रोजीं जपानची मान्यता आली. अर्थात् इतरांचीही येईलच, तेव्हां आतां हिंदी स्वातंत्र्य-सरकाराची खंबीर आंतरराष्ट्रीय पायावर उभारणी झाली हें दिसून आल्यावर त्याच दिवशीं सायंकाळीं ७ वाजतां नेताजींचे निवासस्थानीं मंत्रिमंडळाची बैठक बोलाविण्यांत आली होती. मंत्रिमंडळाचे चिटणीस श्री. आनंदमोहन सहाय यांनीं सरकाराच्या स्थापनेपासून झालेला सर्व आंतरराष्ट्रीय पत्रव्यवहार व इतर वृत्तान्त मंत्रिमंडळास कथन केला. नंतर, या नव्यानें स्थापन झालेल्या सरकारानें युद्धाची घोषणा करून आंतरराष्ट्रीय आखाड्यांत दंड थोपटून युद्धास उतरावें किंवा कसें? हा महत्त्वाचा प्रश्न चर्चिला गेला. इंग्रजांनीं हिंदुस्थानांतून निघून जावें किंवा त्यांना काढून लावावें एवढ्याकरतां त्यांच्याविरुद्ध युद्ध पुकारणें तर जरूरच होतें. तेंच मुळीं या हिंदी स्वातंत्र्य-सरकाराच्या स्थापनेचें उद्दिष्ट होतें. परंतु इंग्रजांच्या दोस्त राष्ट्रांपैकीं आणखी कोणाविरुद्ध म्हणजे अमेरिका इत्यादि राष्ट्रांविरुद्ध युद्ध पुकारावें कीं,

इंग्रजांविरुद्धच तेवढी युद्धाची घोषणा करावी, हा महत्त्वाचा प्रश्न होता. या प्रश्नावरील चर्चेंत मंत्रिमंडळांत दोन तट पडले. एका गटाचें असें म्हणणें पडलें कीं, आपण फक्त इंग्रजांविरुद्धच युद्धाची घोषणा करावी; कारण त्यांच्याशींच आपलें प्रत्यक्ष शत्रुत्व आहे. इतर राष्ट्रांशीं आपला कांहीं संबंध नाहीं, मग विनाकारण आपण होऊन सापाच्या शेपटीवर पाय कां द्यावा ? आपण अमेरिकेविरुद्ध युद्धाची उघड घोषणा केली नाहीं म्हणजे ते आपल्याविरुद्ध इंग्रजांस मदत करीत असल्याचा कांगावा आपणास करितां येईल व प्रचारतंत्रांत या गोष्टीचा आपणास फायदा करून घेतां येईल. प्रत्यक्ष युद्धाची घोषणा करून त्यांच्याविरुद्ध आपल्याला कांहींच उपाययोजना करणें शक्य नाहीं; मग नुसतें तोंडानें युद्ध पुकारून काय होणार ? दुसऱ्या पक्षाचें म्हणणें असें होतें कीं, अमेरिका इंग्रजांस सर्व प्रकारें मदत करीत आहे. त्यांचें सैन्य आणि युद्धसामुग्री हीं दोन्ही हिंदुस्थानांत विपुल प्रमाणांत आहेत. अर्थात् इंग्रजांविरुद्ध युद्ध पुकारावयाचें तर त्यांच्या मुख्य मदतनिसांकडे डोळेझांक करून चालणार नाहीं. बहुमत या दुसऱ्या गटाचेंच होऊन ग्रेटब्रिटन व अमेरिका या दोघांविरुद्ध हिंदी स्वातंत्र्य-सरकारानें युद्धाची घोषणा करून युद्ध जारी करावें असें ठरलें.

हा सर्व ऊहापोह होईपर्यंत, मध्यरात्रीची वेळ येऊन ठेपली. हिंदी स्वातंत्र्य-सरकाराचा एक प्रतिनिधी ताबडतोब सिंगापूर नभोवाणीकेंद्रावर ( पूर्वीं उल्लेखिलेल्या कॅथे इमारतीच्या पांचव्या मजल्यावर ) पाठविण्यांत आला. त्यानें बरोबर १२ वाजून ५ मिनिटांनीं, म्हणजे २३ तारखेची मध्यरात्र उलटून गेल्यावर, नभोवाणीकेंद्रावरून जाहीर केलें कीं, " हिंदुस्थानांतून इंग्रज व त्यांचे मदतनीस अमेरिकन या दोघांस घालवून हिंदुस्थान पूर्णपणें स्वतंत्र करण्याकरतां सर्वानुमतें स्थापन झालेलें हें हिंदी स्वातंत्र्य-सरकार या क्षणापासून ग्रेटब्रिटन व अमेरिका या द्वयाविरुद्ध युद्धाची घोषणा करीत आहे." दुसरे दिवशीं म्युनिसिपल इमारतीचे समोरील मैदानावर सर्व हिंदी लोकांची जाहीर सभा बोलविण्यांत आली होती. हिंदी स्वातंत्र्यसेनेचे सर्व सैनिक, झांशी-राणी पथकांतील स्त्री-सैनिक व बालक-सेना आणि सिंगापुरांतील इतर हिंदी नागरीक या प्रचंड सभेस हजर होते. नेहमींप्रमाणें म्युनिसिपल इमारतीच्या पायऱ्यांवर उभारण्यांत आलेल्या व्यासपीठावर नेताजी व इतर सन्मान्य व्यक्ती स्थानापन्न झाल्या. आजच्या सभेचें एक वैशिष्ट्य होतें तें असें कीं, अवघ्या तीनच दिवसांपूर्वीं हिंदी स्वातंत्र्य-सरकार स्थापन झालें होतें. या सरकारास स्वतःची अशी हक्काची स्वतंत्र जमीन नसली तरी दूरपूर्वेतील कोठल्याही देशांतील हिंदी लोक तद्देशीय सरकाराचे नागरीक नसून यापुढें ते हिंदी स्वातंत्र्य-सरकाराचे नागरीक म्हणून गणले जाऊं लागले. जपान, चीन, मांचूरिया, फार्मोसा, हाँगकाँग, इंडोचायना, सयाम, ब्रह्मदेश, मलाया, सुमात्रा, जावा, बोर्निओ, फिलीपीन्स इत्यादि सर्व देशांतील पंचवीस

नेताजी व त्यांच्याबरोबर इतर महत्त्वाच्या व्यक्ती आल्या. लष्करी सलामी घेऊन दोन्ही बाजूंस आपापल्या खुर्च्यांपुढें उभ्या असलेल्या स्त्री-पुरुषांच्या रांगांतून नेताजी व त्यांजबरोबरील व्यक्ती व्यासपीठावर गेल्या. राष्ट्रगीत वगैरे झाल्यावर त्या प्रसंगींच्या नेताजींच्या महत्त्वाच्या भाषणांचीं पत्रकें सर्वांस आधींच वाटण्यांत आलीं होतीं. टाळ्यांच्या कडकडाटांत व जयघोषांत नेताजी भाषण करावयास उठले. ते म्हणाले,

"हिंदी वीरास्त्रियांची मालिका अखंड असून त्यांची परंपरा उज्ज्वल आहे. लढण्याचें काम स्त्रियांचें नव्हे, असें बरेच लोक समजतात. परंतु माझें याच्या अगदीं विरुद्ध मत आहे. आमचे कित्येक सहकारी या पथकाकरतां खर्च होणारा वेळ व पैसा अनाठायीं समजतात. परंतु मी तसें समजत नाहीं. हिंदुस्थानाची परिस्थिति सध्यां इतकी आणी-बाणीची आहे कीं, स्त्रियांनींसुद्धां पुरुषांच्या बरोबरीनें लढलें पाहिजे. स्त्रिया कित्येक वेळां पुरुषांपेक्षांही जास्त मर्दुमकी दाखवूं शकतात, याचीं उदाहरणें हिंदुस्थानाच्या इतिहासांत भरपूर सांपडतील. ज्या वीर-स्त्रीचें नांव या पथकास देण्यांत आलें आहे तिचेंच चरित्र पहा....... १८५७ च्या पहिल्या स्वातंत्र्ययुद्धांत जर एक झांशीची राणी निपजली असली तर या खेपेस तशा हजार तरी चमकल्या पाहिजेत, अशा उद्देशानें आम्हीं हें पथक स्थापन करीत आहोंत. येथील स्त्री-समाजाचा याबाब-तींतील उत्साह पाहून हें पथक स्थापन करण्याचा आमचा उद्देश विफल होणार नाहीं, याची मला खात्री वाटते. या पथकाची वास्तविक यापूर्वींच स्थापना व्हावयाची होती. परंतु पुरुष सैनिकांचें पथक उभें करण्याची गोष्ट वेगळी व स्त्री-सैनिकांचें पथक उभें करण्याची गोष्ट वेगळी. स्त्री-पथकास बऱ्याच गोष्टींची विचारपूर्वक तयारी करावी लागते. ती तशी करण्यासच आम्हांला एवढा वेळ लागला. हें पथक स्थापण्यास जो अवधी लागला तेवढ्यांत आमच्या स्त्री-कार्यकर्त्या इतक्या अधीर झाल्या होत्या कीं, हें पथक स्थापण्याचें खरोखरच आमचे मनांत आहे कीं, आम्हीं त्यांस नुसतीं पोकळ आश्वासनेंच देत राहणार याबद्दल त्यांचे मनांत शंका उद्भवूं लागल्या होत्या...."

अशा तऱ्हेनें नेताजींचें भाषण झाल्यावर नेताजी आणि निवडक मंडळी, त्या सभागृहांतून निघून, रस्ता ओलांडून समोरच नवीन तयार केलेल्या झांशी-राणी पथकाच्या छावणीच्या मोठ्या लाकडी दरवाज्यापाशीं गेली. डॉ. लक्ष्मींनीं छावणीच्या मुख्य दरवाजाच्या किल्ल्या नेताजींचे स्वाधीन केल्यावर नेताजींनीं त्या दरवाजाचें कुलुप उघडून त्या छावणीचा उद्घाटन समारंभ पार पाडला. छावणीचे आंतील आवारांत शिरल्याबरोबर डाव्या बाजूला पहारेकऱ्यांची खोली व त्यांचें लहानसें शस्त्रागार होतें. समोरील बाजूस असलेल्या लांबलचक बराकींत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .................... वि: ....................
क्रमांक .................... नों: दि: ....................



त्या पथकाच्या मुख्य अधिकाऱ्यांची कचेरी, नंतर त्यांच्या हाताखालच्या दुसऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची कचेरी व तिसऱ्या एका खोलींत टंकलेखक, कारकून, कोठारी इत्यादींची काम करावयाची जागा होती. डाव्या बाजूस कचेरीच्या पलीकडे असलेल्या बराकींत त्या छावणीचें रुग्णालय होतें. पहारेकऱ्यांच्या खोलीस लागूनच आंतल्या बाजूस त्या पथकाचें, कपडे व सैनिकांस लागणाऱ्या इतर सामानाचें कोठार होतें. कचेरीच्या पलीकडे उजवे बाजूस एका बराकींत स्त्री सैनिकांच्या, फळ्यांच्या खाटा रांगेनें लाविलेल्या होत्या. त्याच्या पलीकडील बराकींत दोन-तीन खोल्या करून एकांत त्या छावणीच्या वरिष्ठ अधिकारी राहात असत. दुसरींत त्यांच्या हाताखालीं असलेल्या दुसऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची राहावयाची खोली असे. तिसऱ्या खोलींत अधिकाऱ्यांचें भोजनगृह. त्या छावणीच्या आवारांत आणखी चार-पांच बराकींत स्त्री-सैनिकांची राहावयाची व्यवस्था होती. त्या सर्वांचें भोजनगृह म्हणून एक मोठी बराक राखून ठेवण्यांत आली होती. वरिष्ठ अधिकाऱ्यांचें भाषण ऐकण्यास, अथवा इतर प्रसंगीं पथकांतील सर्व व्यक्तींस एके ठिकाणीं जमण्याचा प्रसंग आल्यास या भोजनगृहाच्या लांब-रुंद बराकींत अशा सभा पार पडत. याशिवाय स्वयंपाकगृह, धान्याचें कोठार आणि सर्व सैनिकांचें शस्त्रागार अशा वेगवेगळ्या तीन झोपड्या बांधलेल्या होत्या. सर्व बराकींस पांढरा स्वच्छ रंग दिलेला होता. या झोपड्यांस लागूनच असलेल्या मोकळ्या जागेंत स्त्री-सैनिक कवाईत करीत असत. पूर्वी इंग्रजांचे अंमलांचे वेळीं लढाईचे दिवसांत निराधार झालेल्या लोकांची या ठिकाणीं सोय करण्यांत आलेली होती. या कारणाकरतां बांधलेल्या पूर्वीच्या कांहीं झोपड्या तेथें होत्याच; त्यांची डागडुजी करून, त्यांस रंग देऊन व आवश्यकतेप्रमाणें आणखी नव्या झोपड्या बांधून ही छावणी तयार करण्यांत आलेली होती. इंग्रजी अंमल संपुष्टांत येणार असल्याचीं चिन्हें दिसूं लागतांच इंग्रजांचे हुकुमानें सामानाच्या नासधुशीस सुरुवात झाली, त्या धामधुमीच्या काळांत, इंग्रज सैनिकांनीं छावणीच्या आवारांतील त्या मोकळ्या जागेंत दारूगोळा, तांदुळाचीं पोतीं इत्यादि बरेंच सामान पुरून ठेविलें होतें. अधून मधून ती मोकळी जागा उकरण्याचें काम पडल्यास त्या दारूगोळ्याचा कधीं कधीं स्फोट होत असे.

झांशी-राणी पथकांत प्रथमतः दीडशें स्त्रियांनीं नांवें नोंदविलीं व त्यांचें लष्करी शिक्षण हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या लष्करी शिक्षकांच्या मार्गदर्शनानें सुरू झालें. या पथकाबद्दल एवढीच माहिती सध्यां देऊन आपण दुसऱ्या महत्त्वाच्या गोष्टींकडे वळूं. झांशी-राणी पथकाचा संपूर्ण इतिहास प्रसंगाप्रसंगानें पुढें येईलच.

हिंदी स्वातंत्र्य-सरकाराच्या स्थापनेचें वृत्त सगळीकडे कळविल्यावर निरनिराळ्या राष्ट्रांच्या परराष्ट्रमंत्र्यांकडून या सरकाराचें आस्तित्व आणि त्याचा समान दर्जा मान्य केल्याच्या तारा नेताजींकडे येऊं लागल्या. २३ ऑक्टोबर

१९४३ रोजीं, जपाननें हिंदी स्वातंत्र्य-सरकार मान्य केल्याची तार सिंगापुरांतील जपानी राजप्रतिनिधीनें आणून दिली. यानंतर एका मागून एक जर्मनी, इटाली, फिलीपीन्स, मांचूरिया, चीन (नॅनकिंग येथील अध्यक्ष ' वँग चिंग वे ' यांचें चिनी राष्ट्रीय-सरकार) क्रोएशिया, सयाम, ब्रह्मदेश या राष्ट्रांनींही नेताजींस तारा पाठवून हिंदी स्वातंत्र्य-सरकारास मान्यता देऊन शुभेच्छा व्यक्त केली. नोव्हेंबर ८ तारखेस अचानकपणें स्वतंत्र आयर्लंडचे अध्यक्ष ' डी व्हॅलेरा ' यांचेकडून अभिनंदनपर अशी एक तार आली. एका राष्ट्रीय वृत्तीच्या जाज्वल्य अशा अन्यदेशीय राष्ट्रभक्ताची नेताजींस तार आलेली पाहून सर्वांस फारच आनंद झाला. श्री. सुभाषचंद्र बोस व डी व्हलेरा यांची पूर्वीं गांठ पडलेली असून दोघांचेंही मनांत एकमेकांविषयीं गाढ प्रेम आणि आदर वसत होता. आयर्लंडच्या स्वातंत्र्यसंपादनाच्या इतिहासाचा श्री. सुभाषचंद्र बोस यांनीं चांगला अभ्यास केलेला असून त्यापासून त्यांना बरीच स्फूर्ती मिळालेली आहे. इंग्रजांचा कट्टर शत्रु, आयर्लंडच्या स्वातंत्र्ययुद्धाचा यशस्वी पुढारी आणि नंतर त्या राष्ट्राचा लोकनियुक्त अध्यक्ष या दृष्टीनें डी व्हॅलेरा यांचेबद्दल श्री. सुभाषचंद्र बोस यांचे मनांत गाढ आदर वसत होता. अशा व्यक्तींकडून आलेल्या अभिनंदनाच्या तारेचें त्यांस जास्त महत्त्व वाटणें साहजिक होतें; कारण त्यांत कसल्याही प्रकारचा राजकारणी डाव नसून शुद्ध प्रेमभाव होता. त्या तारेंत मजकूर होता तो असा : " तुम्ही हिंदी स्वातंत्र्य-सरकार स्थापलें हें ऐकून मला अत्यानंद झाला. या कामगिरीबद्दल मी तुमचें अभिनंदन करितों. तुमचें स्वातंत्र्य-सरकार स्थापन झाल्याचें वृत्त ऐकून मला एकदम आमच्या स्वातंत्र्य-सरकाराच्या स्थापनेचे दिवस आठवले. तुम्ही आज ज्या आणीबाणीच्या परिस्थितींत आहांत, तशाच परिस्थितींत आम्हीं त्या वेळेस होतों. मी तुम्हांस व तुमच्या सहकाऱ्यांस तुमच्या कार्यांत सुयश चिंतितों."

२३ ऑक्टोबर १९४३ रोजीं जपानची मान्यता आली. अर्थात् इतरांचीही येईलच, तेव्हां आतां हिंदी स्वातंत्र्य-सरकाराची खंबीर आंतरराष्ट्रीय पायावर उभारणी झाली हें दिसून आल्यावर त्याच दिवशीं सायंकाळीं ७ वाजतां नेताजींचे निवासस्थानीं मंत्रिमंडळाची बैठक बोलाविण्यांत आली होती. मंत्रिमंडळाचे चिटणीस श्री. आनंदमोहन सहाय यांनीं सरकाराच्या स्थापनेपासून झालेला सर्व आंतरराष्ट्रीय पत्रव्यवहार व इतर वृत्तान्त मंत्रिमंडळास कथन केला. नंतर, या नव्यानें स्थापन झालेल्या सरकारानें युद्धाची घोषणा करून आंतरराष्ट्रीय आखाड्यांत दंड थोपटून युद्धास उतरावें किंवा कसें ? हा महत्त्वाचा प्रश्न चर्चिला गेला. इंग्रजांनीं हिंदुस्थानांतून निघून जावें किंवा त्यांना काढून लावावें एवढ्याकरतां त्यांच्याविरुद्ध युद्ध पुकारणें तर जरूरच होतें. तेंच मुळीं या हिंदी स्वातंत्र्य-सरकाराच्या स्थापनेचें उद्दिष्ट होतें. परंतु इंग्रजांच्या दोस्त राष्ट्रांपैकीं आणखी कोणाविरुद्ध म्हणजे अमेरिका इत्यादि राष्ट्रांविरुद्ध युद्ध पुकारावें कीं,

इंग्रजांविरुद्धच तेवढी युद्धाची घोषणा करावी, हा महत्त्वाचा प्रश्न होता. या प्रश्नावरील चर्चेंत मंत्रिमंडळांत दोन तट पडले. एका गटाचें असें म्हणणें पडलें कीं, आपण फक्त इंग्रजांविरुद्धच युद्धाची घोषणा करावी; कारण त्यांच्याशींच आपलें प्रत्यक्ष शत्रुत्व आहे. इतर राष्ट्रांशीं आपला कांहीं संबंध नाहीं, मग विनाकारण आपण होऊन सापाच्या शेपटीवर पाय कां द्यावा ? आपण अमेरिके-विरुद्ध युद्धाची उघड घोषणा केली नाहीं म्हणजे ते आपल्याविरुद्ध इंग्रजांस मदत करीत असल्याचा कांगावा आपणास करितां येईल व प्रचारतंत्रांत या गोष्टीचा आपणास फायदा करून घेतां येईल. प्रत्यक्ष युद्धाची घोषणा करून त्यांच्याविरुद्ध आपल्याला कांहींच उपाययोजना करणें शक्य नाहीं; मग नुसतें तोंडानें युद्ध पुकारून काय होणार ? दुसऱ्या पक्षाचें म्हणणें असें होतें कीं, अमेरिका इंग्रजांस सर्व प्रकारें मदत करीत आहे. त्यांचें सैन्य आणि युद्ध-सामुग्री हीं दोन्ही हिंदुस्थानांत विपुल प्रमाणांत आहेत. अर्थात् इंग्रजांविरुद्ध युद्ध पुकारावयाचें तर त्यांच्या मुख्य मदतनिसांकडे डोळेझांक करून चालणार नाहीं. बहुमत या दुसऱ्या गटाचेंच होऊन ग्रेटब्रिटन व अमेरिका या दोघांविरुद्ध हिंदी स्वातंत्र्य-सरकारानें युद्धाची घोषणा करून युद्ध जारी करावें असें ठरलें.

हा सर्व ऊहापोह होईपर्यंत, मध्यरात्रीची वेळ येऊन ठेपली. हिंदी स्वातंत्र्य-सरकाराचा एक प्रतिनिधी ताबडतोब सिंगापूर नभोवाणीकेंद्रावर ( पूर्वीं उल्लेखि-लेल्या कॅथे इमारतीच्या पांचव्या मजल्यावर ) पाठविण्यांत आला. त्यानें बरोबर १२ वाजून ५ मिनिटांनीं, म्हणजे २३ तारखेची मध्यरात्र उलटून गेल्यावर, नभोवाणीकेंद्रावरून जाहीर केलें कीं, " हिंदुस्थानांतून इंग्रज व त्यांचे मदतनीस अमेरिकन या दोघांस घालवून हिंदुस्थान पूर्णपणें स्वतंत्र करण्याकरतां सर्वानुमतें स्थापन झालेलें हें हिंदी स्वातंत्र्य-सरकार या क्षणापासून ग्रेटब्रिटन व अमेरिका या द्वयाविरुद्ध युद्धाची घोषणा करीत आहे." दुसरे दिवशीं म्युनिसिपल इमारतीचे समोरील मैदानावर सर्व हिंदी लोकांची जाहीर सभा बोलविण्यांत आली होती. हिंदी स्वातंत्र्यसेनेचे सर्व सैनिक, झांशी-राणी पथकांतील स्त्री-सैनिक व बालक-सेना आणि सिंगापुरांतील इतर हिंदी नागरीक या प्रचंड सभेस हजर होते. नेहमींप्रमाणें म्युनिसिपल इमारतीच्या पायऱ्यांवर उभारण्यांत आलेल्या व्यास-पीठावर नेताजी व इतर सन्मान्य व्यक्ती स्थानापन्न झाल्या. आजच्या सभेचें एक वैशिष्ट्य होतें तें असें कीं, अवघ्या तीनच दिवसांपूर्वीं हिंदी स्वातंत्र्य-सरकार स्थापन झालें होतें. या सरकारास स्वतःची अशी हक्काची स्वतंत्र जमीन नसली तरी दूरपूर्वेंतील कोठल्याही देशांतील हिंदी लोक तद्देशीय सरकाराचे नागरीक नसून यापुढें ते हिंदी स्वातंत्र्य-सरकाराचे नागरीक म्हणून गणले जाऊं लागले. जपान, चीन, मांचूरिया, फार्मोसा, हाँगकाँग, इंडोचायना, सयाम, ब्रह्मदेश, मलाया, सुमात्रा, जावा, बोर्निओ, फिलीपीन्स इत्यादि सर्व देशांतील पंचवीस

लाख हिंदी लोक यापुढें हिंदी स्वातंत्र्य-सरकाराचे आधिपत्याखालीं होते. तद्देशीय सरकाराचा त्यांचेवर कांहीं हक्क नव्हता. त्यांचे बाबतींत कांहीं प्रश्न उद्भवल्यास तो तद्देशीय सरकारास तेथील हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या मुख्य कचेरीकडे सोपवावा लागे. तेच त्याचा काय तो निकाल करीत. प्रत्येक देशांतील हिंदी स्वातंत्र्यसंघ हीच सर्व हिंदी लोकांची एकमेव प्रातिनिधिक संस्था होती. हिंदी स्वातंत्र्य-सरकाराचें ठिकठिकाणचें कामसुद्धां याच संस्थेतर्फे होत असे. अशा रीतीनें या संघाच्या शाखा, उपशाखा, पाळेंमुळें, पारंब्या इत्यादि, दूरपूर्वेतील सर्व देशांत सर्वत्र पसरल्या-मुळें व खोल रुजल्यामुळें हिंदी स्वातंत्र्य-सरकाराच्या या विस्तीर्ण वटवृक्षाच्या शीतल छायेखालीं या प्रदेशांतील हिंदी जनतेस दोन वर्षे निर्भेळ स्वातंत्र्य भोगावयास मिळालें. ‘ एशियाटिक ’, ‘ काला आदमी ’ अथवा ‘ गुलाम ’ अशा तऱ्हेचे टोमणे त्यांस मारावयास कोणी उरलें नव्हतें. इतर राष्ट्रांप्रमाणें मानाचें, इभ्रतीचें आणि स्वतंत्र आंतरराष्ट्रीय दर्जाचें सरकार हिंदी लोकांसही मिळालें होतें. प्रत्येक हिंदी मनुष्य आतां छाती वर काढून चालत असे ! स्वतःची हक्काची जमीन नसतांना, निरनिराळ्या देशांतील अनेक हिंदी लोक तद्देशीय सरकाराच्या आधि-पत्याखालीं न राहतां एका दूरस्थ हिंदी स्वातंत्र्य-सरकाराचे नागरीक होते ही किती महत्त्वाची गोष्ट होती ! इतक्या निरनिराळ्या राष्ट्रांस पंचवीस लाख हिंदी लोकांवरचे आधिपत्याचे हक्क सोडावयास लावणारी व्यक्ती किती असामान्य असली पाहिजे ? एक प्रकारें या सर्व देशांत स्वातंत्र्यसंघाच्या शाखोपशाखांच्या रूपानें हिंदी स्वातंत्र्य-सरकाराचेंच राज्य या प्रदेशांत पसरलेलें होतें. त्यांचे नागरीक जे हिंदी लोक, तेही कांहीं सामान्य नसून दूरपूर्वेतील अतिधनाढ्य असेच लोक होते.

२४ ऑक्टोबर १९४३ रोजीं सायंकाळीं भरलेल्या जाहीर सभेपुढें भाषण करतांना नेताजींनीं, हिंदी स्वातंत्र्य-सरकारानें ग्रेटब्रिटन व अमेरिका यांच्याविरुद्ध, आदले रात्रीं केलेल्या युद्धघोषणेचा वृत्तान्त सर्वांस निवेदन केला. “ यापुढें आपण सर्वांनीं ह्या युद्धाचा यशस्वी शेवट करण्यास कंबर कसली पाहिजे. प्रत्येकानें या लढ्यास तन-मन-धन अर्पण करावें. एवढ्या तेवढ्यानें काम भागणार नाहीं. ‘ मीं एवढें केलें, इतरांनीं, काय केलें ? ’ असें एक-मेकाकडे बोट दाखवून विचारण्याची ही वेळ नव्हे. ‘मी किती दिलें ?’ याचा विचार न करितां, ‘ माझ्याजवळ अजून काय द्यावयास उरलें आहे ?’ याचा प्रत्येकानें विचार केला पाहिजे. ‘तुम्ही आत्यंतिक स्वार्थत्यागास तयार आहांत कीं नाहीं ?’ या प्रश्नाचा नीट ज्यानें त्यानें आपल्या मनाशीं पूर्ण विचार करून मला निर्ण-यात्मक असें उत्तर द्यावें ...” असें नेताजींनीं म्हणतांक्षणींच तो अफाट जन-समुदाय आपला रुकार दर्शविण्याकरतां उठून उभा राहिला. सर्वांनीं आपले हात वर केले, सैनिकांनीं आपल्या बंदुका उंच धरल्या, तिरंगी निशाणें, लाठ्या, काठ्या, छत्र्या यांचें एकच रान तेथें एकदम उगविल्याचा भास झाला. कोणी

टोप्या वर फेकूं लागले, ढोलकीं व बँड वाजूं लागले. जिकडे तिकडे आनंद-मिश्रित उत्साहाच्या आरोळ्या, जयघोष, टाळ्या यांचा एकच विचित्र असा कोलाहल सुरू झाला. 'ततः शंखाश्च भेर्यश्च पणवानकगोमुखाः। सहसैवाभ्यहन्यन्त स शब्दस्तुमुलोऽभवत्॥' अशी परिस्थिति झाली. नेताजी पांच-दहा मिनिटें निश्चल उभे राहून तें दृश्य बघत राहिले. नेताजींनीं एक हात वर उचलतांच ते सर्व लोक शांत होऊन जागच्या जागीं बसले असते, परंतु ते कांहीं काळ भूमी-तलास विसरून स्थिर दृष्टीनें त्या जनसमुदायाकडे बघत दुसऱ्याच कसल्यातरी गोष्टींचा विचार करीत असावेत असें दिसलें. ही अनिश्चित परिस्थिति फार वेळ सहन न होऊन तो सर्व जनसमुदाय समुद्राच्या लाटेप्रमाणें एकदम पुढें आला. त्या महापुरांत जागोजागीं ठेवलेले पहारेकरी, कडेला लावलेल्या दोऱ्या व त्यांस आधारभूत असलेले लहान खांब इत्यादि वस्तू बुडून जाऊन, क्षणमात्र अदृश्य होऊन कोठल्या कोठें दूर फेंकल्या गेल्या. म्युनिसिपल इमारतीच्या पायऱ्या आणि मैदान यांच्या मधोमध इतका वेळ मोकळा असलेला डांबरी रस्ता त्या जनसमुदायानें आच्छादून टाकला. पायऱ्या व चौथरा यांच्यावर चढून थेट नेताजी उभे असलेल्या व्यासपीठापर्यंत लोकांची लाट आली. जागेकरतां लोकांची एकच झुम्मड झाली. जेथें जागा मिळेल तेथेंच जो तो बसला. या गडबडींत एक दोन माणसें चेंगराचेंगरीनें बेशुद्ध झालीं. त्यांस बाजूला ओढून काढून त्यांच्यावर योग्य ते उपचार करण्यांत आले. या विशिष्ट मर्यादेपुढें जनसमुदायाची लाट जाणें शक्यच नव्हतें. कारण, येथें नेताजींची दिव्य विभूति खड्या पहाडाप्रमाणें या लाटेपुढें उभी होती. नेताजींनीं उजवा हात वर उचलतांच तो सर्व कोलाहल बंद होऊन सर्वत्र स्तब्धता पसरली.

दुसरे दिवशीं म्हणजे २५ ऑक्टोबर १९४३ रोजीं सायंकाळीं, सिंगापुरांतील जालनबसार वस्तींतील मोठया क्रीडोद्यानांत मलायांतील सर्व धनाढ्य हिंदी व्यापाऱ्यांची सभा बोलाविण्यांत आली होती. हिंदी स्वातंत्र्य-सरकाराच्या प्रस्थापना-समारंभास दूरपूर्वेतील ठिकठिकाणांहून आलेले हिंदी प्रतिनिधी अजून सिंगापुरांतच वास्तव्य करून होते. कारण, त्या सप्ताहांत सिंगापुरांत बराच महत्त्वाचा कार्यभाग उरकावयाचा होता. या प्रतिनिधींत दूरपूर्वेतील बरेच धनाढ्य व्यापारी होते. ते प्रतिनिधी या नात्यानें व व्यापारी म्हणूनही या सभेस हजर राहणें आवश्यक होतें. वास्तविक क्रांतिकालांत आणि विशेषतः एका गरीब देशाच्या स्वातंत्र्य-चळवळींत पैशाच्या कृत्रिम मोठेपणास महत्त्व देऊन धनाढ्य व्यापाऱ्यांसच सर्वसामान्य हिंदी लोकांचे प्रतिनिधी म्हणून निवडून देण्याच्या अनिष्ट प्रथेस अर्धचंद्र मिळावयास पाहिजे होता. कारण धनाढ्य लोक हे स्वतःची मालमत्ता सुरक्षित ठेवण्याच्या विवंचनेंत धड स्वतःचीं मतेंसुद्धां नीट मोकळेपणानें बोलून दाखविण्यास धजत नाहींत, तर ते सर्वसामान्य गरीब हिंदी जनतेचे खरेखुरे प्रतिनिधी कसचे होणार ? कोणासही सहज कळून येण्यासारखी गोष्ट आहे.

परंतु अंत:करणांतील कळकळ, प्रेम, सत्य, सचोटी, माणुसकी, सद्वर्तन, विद्वत्ता इत्यादि गुणांचें खरें चीज होत नसून पैशासारख्या यदृच्छेनें येणाऱ्या व जाणाऱ्या बाह्य उपाधीमुळें प्राप्त होणाऱ्या कृत्रिम मोठेपणासच सर्वसामान्यपणें जगांत अजून महत्त्व दिलें जातें हें मानवजातीचें दुर्दैव होय. या प्रतिनिधींत बरेचसे लोक केवळ धनाढ्य म्हणूनच प्रतिनिधीपदास पोंचले होते. या धनाढ्य लोकांच्या सभेंत नेताजींनीं भाषण केलें. ते म्हणाले,

> " आपलें स्वातंत्र्य-सरकार स्थापन होऊन आपण युद्धाची घोषणा केल्यामुळें आपल्यावर आतां एक नवीन जबाबदारी येऊन पडली आहे. अडतीस कोटि हिंदी प्रजेस दास्यांतून मुक्त करण्याचें आपलें पवित्र व्रत आहे. आजपर्यंत आपणांस हें साध्य झालें नाहीं, याचें कारण आपण स्वातंत्र्याची पुरी किंमत दिली नाहीं. अडतीस कोटि लोकांचें स्वातंत्र्य ही एवढी अमोल गोष्ट आहे कीं, तेवढ्याकरतां दूर-पूर्वेतील पंचवीस लाख लोक भिकेस लागले किंवा मेले तरीसुद्धां आपल्या साध्याचे दृष्टीनें हा स्वार्थत्याग अत्यल्पच ठरेल ! अर्थात्, 'मी एवढेच पैसे देईन, तो दुसरा गृहस्थ माझ्याहून श्रीमंत असून त्यानें इतकेच पैसे दिले' — असें म्हणण्याची ही वेळ नव्हे. ' आमच्याकडून शेंकडा दहा अथवा शेंकडा वीस एवढ्या प्रमाणांतच पैसे घ्या, जास्त घेऊं नका '—असें म्हणूं नका. तुमच्याजवळ जितकें आहे तें सर्व देऊन सुद्धां कदाचित आपली गरज भागणार नाहीं, अशी ही वेळ आहे. आपला वैयक्तिक स्वार्थ आणि स्वत:पुरताच विचार करण्याची कूपमंडूक वृत्ति सोडून देऊन, जरा आपल्या भारतमातेकडे डोळे उघडून बघा. आपण आज आहोंत, उद्यां कदाचित या जगांतून नाहीसे होऊं. त्या वेळेस ही सर्व संपत्ती आपल्या कांहीं कामास येणार नाहीं. परंतु हिंदुस्थानांत मात्र आपल्या लोकांच्या पिढ्यान् पिढ्या राहावयाच्या आहेत. त्यांच्या कायमच्या सौख्याची तरतूद करणें हें आपलें आद्य कर्तव्य आहे. रणांगणावर जाणारा सैनिक जिवानिशीं जातो. मी दहा टक्केच रक्त सांडीन किंवा वीस टक्केच सांडीन असला व्यापारी भाव करण्याच्या भानगडींत तो पडत नाहीं ! त्याच्या तर प्रत्यक्ष प्राणाशींच गांठ असते; असें असतांना तुम्हांला तुमच्या थैलीची गांठ सोडतांना दुःख कां व्हावें ? रणांगणावर देहत्याग करणाऱ्या एका सैनिकाच्या प्राणाची सर तुमच्या कोट्यवधी रुपयांसही येणार नाहीं !......" अशा तऱ्हेनें नेताजींचें भाषण झाल्यावर तेथल्या तेथें दोन कोटींचे आंकडे पडले.

नेताजींचीं दूरपूर्वेतील तीं दोन वर्षें अत्यंत गर्दीच्या कार्यक्रमांत निघून गेलीं. दिवसभर त्यांचा कार्यक्रम इतका भरगच्च असे कीं, पंचवीस तासाचा दिवस असता तरी तो त्यांस पुरला नसता. परंतु त्यांतल्यात्यांतही हिंदी

स्वातंत्र्य-सरकाराच्या स्थापनेचे हे दहा-पंधरा दिवस तर त्यांस एका क्षणाचीही फुरसत होत नसे. रात्रीं मंत्रिमंडळाच्या बैठकी आणि त्यांत महत्त्वाच्या प्रश्नांचा खल होत असे. मध्यरात्र उलटून गेल्यावर एक-दोन दिवसाआड सिंगापूर नभोवाणी-केंद्रावर जाऊन हिंदुस्थानांतील लोकांस उद्देशून भाषण करावयाचें, पुन्हां निवास-स्थानीं परत आल्यावर कागदपत्र इत्यादि बघावयाचे, इतर नभोवाणीकेंद्रांवरील त्यांच्या लघुलेखकानें उतरून घेतलेली महत्त्वाची बातमी वाचून त्याच्यावर मनन करावयाचें, नंतर दोन-तीन तास झोंप घेऊन सकाळीं पुन्हां तयार व्हावयाचें, तों पांच-पंचवीस वृत्तपत्रकार मुलाखतीसाठीं व छायाचित्रें घेण्यास तयारच! नंतर दिवसभर स्वातंत्र्यसैन्याचीं व संघाचीं अनेक कामें, हिंदी अधिकाऱ्यांच्या गांठीभेटी व त्यांच्याशीं विचारविनिमय, जाहीर सभेंत जाणें, नभोवाणीकेंद्रावरून करावयाचें भाषण लिहून काढणें, महत्त्वाच्या प्रसंगीं संघाच्या कार्यकर्त्यांस अथवा स्वातंत्र्यसैनिकांस उद्देशून जाहीरनामा काढणें, आघाडीवर सैन्य पाठविण्याबद्दलच्या अनेक गोष्टींचा विचार करणें अशा तऱ्हेचीं शेंकडों कामें त्यांस बघावीं लागत.

सबंध मंत्रिमंडळांत त्यांच्या तोडीचा माणूस असणें तर दूरच राहिलें, परंतु त्यांचे पासंगालासुद्धां पुरणारा एकही माणूस नव्हता. त्यांचें ज्ञान, त्यांचा अनुभव, त्यांची विद्वत्ता व सर्वांत अधिक म्हणजे देशांकरतां तिळ तिळ तुटणारें त्यांचें अंतःकरण हे गूण त्यांच्यांत परमावधीस पोंचले होते, तर त्यांच्या भोंवतालच्या मंडळींत या गुणांचें अस्तित्व कितपत होतें याबद्दल शंकाच आहे. 'हो' ला 'हो' करून, माना डोलावून आणि कायापालट करून सनदी नोकरांचे एका क्षणांत देशभक्त होणें कधींच शक्य नसतें! वरचे रंग लगेच बदलूं शकतात, परंतु अंतरंग बदलावयास कित्येक वर्षांची खडतर तपश्चर्या लागत असते. या लोकांचे मनांत स्वदेशाबद्दल सदिच्छा नव्हती असें नाहीं, परंतु या सदिच्छेपलिकडे, ती सदिच्छा प्रत्यक्षांत उतरविण्यास सर्वस्व अर्पण करणारे लोक प्रतिष्ठित व्यक्तींत क्वचितच असतील. अशी परिस्थिति असल्यानें नेताजींस प्रत्येक कामांत जातीनें लक्ष घालावें लागत असे. तीं कामें कोणावर सोपवून भागत नसे. कामाचा इतका व्याप असूनसुद्धां व त्रिखंड फिरून आल्यावर देखील त्यांस त्यांच्या भोवतालच्या बऱ्याचशा व्यक्तींप्रमाणें मदिराप्राशनांत आनंद मानण्याची घातुक संवय लागलेली नव्हती. कारण त्यांच्यापुढें एक विशिष्ट ध्येय होतें. कामाचा व्याप मागें असतांना व सर्व काम पूर्ण करावयास चोवीस तास अपुरे पडत असतांना मदिराप्राशनानें कांहीं काळ देहभान विसरून जाण्यास त्यांस फुरसत नव्हती.

ऑक्टोबर महिन्यांतील हा महत्त्वाचा कार्यक्रम पार पडतो न पडतो तोंच टोकिओंत दूरपूर्वेंतील सर्व राष्ट्रांच्या मुख्य अधिकाऱ्यांची एक महत्त्वाची परिषद नोव्हेंबर महिन्यांत भरणार असल्याचें अधिकृत वृत्त हिंदी स्वातंत्र्य-सरकारास

कळविण्यांत आलें. 'दूरपूर्वेतील सर्व राष्ट्रांनीं जपानच्या नेतृत्वाखालीं एकमेकांशीं सहकार्य करून परस्परांच्या उत्कर्षास मदत करावी हें जपानच्या दूरपूर्वेतील धोरणाचें मुख्य तत्त्व आहे' असें जपानी राष्ट्रातर्फे नेहमीं घोषित केलें जात असे. दूरपूर्वेतील परस्पर सहकार्याच्या या कक्षेंत ब्रह्मदेशापासून जपानपर्यंत सर्व राष्ट्रांचा त्यांनीं अंतर्भाव केलेला होता. नेताजींनीं मात्र हिंदुस्थानाला या कक्षेच्या बाहेरच ठेवलें. कारण हिंदुस्थानासारखें अडतीस कोटींचें राष्ट्र जपानच्या धोरणानुरूप वागण्याचें हें बंधन कधींच मान्य करणें शक्य नव्हतें. जपानच्या शौर्याबद्दल व पाश्चात्यांविरुद्ध त्यांनीं धीटपणें सुरू केलेल्या युद्धाबद्दल मात्र सर्व एशिआटिक राष्ट्रांस त्याचें कौतुकच वाटत होतें व त्याबद्दल तीं त्याचें ऋण व आभार मानण्यास तयार होतीं.

---

## हिंदी स्वातंत्र्यसंघ : १८

' हिंदी स्वातंत्र्यसंघ ' ही दूरपूर्वेतील सर्व हिंदी नागरिकांची एकमेव राजकीय संस्था होती. या राष्ट्रीय संघटनेचें बळ हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत एकवटलेलें होतें. या दोन प्रभावी संघटनाच दूरपूर्वेतील स्वातंत्र्य-चळवळीस व हिंदुस्थानाच्या दुसऱ्या स्वातंत्र्ययुद्धास कारणीभूत झाल्या. अर्थात् या दोन संघटनांची सविस्तर माहिती आपणांस असणें आवश्यक आहे, म्हणून या व पुढच्या अशा दोन प्रकरणांत अनुक्रमें हिंदी स्वातंत्र्यसंघ व हिंदी स्वातंत्र्यसैन्य यांच्याबद्दलची माहिती ग्रथित करण्याचें योजिलें आहे.

हिंदुस्थानांत ज्याप्रमाणें हिंदी राष्ट्रीय सभा ( इंडियन नॅशनल कॉंग्रेस ) या राजकीय संस्थेचीं पाळेंमुळें सर्व खेड्यापाड्यांतूनसुद्धां खोल रुजलेलीं आहेत, त्याप्रमाणेंच किंबहुना त्याहून जास्त हिंदी स्वातंत्र्यसंघाचा प्रसार आणि प्रभाव दूरपूर्वेत झालेला होता. येथें ज्याप्रमाणें तालुका कॉंग्रेस कमिटी, जिल्हा कॉंग्रेस कमिटी, शहर कॉंग्रेस कमिटी, प्रांतिक कॉंग्रेस कमिटी, अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटी, कॉंग्रेस वर्किंग कमिटी व या सर्वांवर राष्ट्रपति अशी श्रेणी आपणांस दिसून येते, तद्वतच हिंदी स्वातंत्र्यसंघाची उभारणी दूरपूर्वेतील सर्व भेदातीत अशा सर्वसामान्य हिंदी जनतेच्या भरभक्कम पायावर केलेली होती. स्वतः नेताजी हे या संघटनामंदिराच्या सुवर्णकळसाच्या स्थानीं होते. या मंदिरांत स्वातंत्र्यदेवीची स्थापना केलेली होती. मलायांत जोहोर, नेग्री सेंबिलन, सेलॅंगोर, पेराक, केडा, पहांग, केलांटन, पर्लिस, पेनांग इत्यादि निरनिराळे प्रांत आणि संस्थानें आहेत. या प्रत्येक प्रांताच्या अथवा संस्थानाच्या मुख्य शहरीं त्या त्या प्रांताच्या वा संस्थानाच्या संघाची मुख्य कचेरी असे. प्रांतांतील वा संस्थानांतील प्रत्येक खेड्यांत, गांवांत वा शहरांत एक स्थानिक संघकचेरी असे. या स्थानिक संघकचेऱ्या त्या त्या प्रांतांतील अथवा संस्थानांतील मुख्य कचेरीच्या आधिपत्याखालीं असत. या सर्व प्रांतीय अथवा संस्थानी संघकचेऱ्या अखिल मलायाकरतां केलेल्या मलाया मध्यवर्ती संघकचेरीच्या आधिपत्याखालीं होत्या. ही मध्यवर्ती संघकचेरी सिंगापूर शहरांत होती. सिंगापूर शहराची ( बेटाची ) एक स्वतंत्र संघकचेरी वॉटर्लू स्ट्रीटवर होती. अशा तऱ्हेनें सिंगापुरांत व मलायांत ही संघटना केलेली होती. फिलीपिन्स बेटांतील मुख्य संघकचेरी ' मनीला ' या तेथील राजधानीच्या शहरांत होती. तिच्या आधिपत्याखालीं फिलीपीन्स बेटाच्या खेड्यापाड्यांतील, गांवांतील व शहरांतील संघ-

शाखा काम करीत असत. सयाम देशांतील मुख्य कचेरी बँकाक या राजधानीच्या शहरांत होती. चीन देशांत शांघाय हें हिंदी स्वातंत्र्यसंघटनेचें केंद्र होतें. हाँगकाँग बेटाची स्वतंत्र संघकचेरी होती. अशाच तऱ्हेनें जपान, जावा, सुमात्रा, अंदमान टापू, ब्रह्मदेश इत्यादि सर्व प्रदेशांत या संघटनेचें जाळें पसरलें होतें. वर उल्लेखिलेल्या प्रदेशांतील मुख्य कचेऱ्यांवर दूरपूर्वेंतील हिंदी संघटनेची मुख्य कचेरी असे. ही कचेरीही नेताजी आल्यापासून १९४४ च्या जानेवारी महिन्याच्या ७ तारखेपर्यंत सिंगापुरांतच होती. नंतर हिंदुस्थान-ब्रह्मदेश सरहद्दीवर युद्ध सुरू करण्याकरतां म्हणून जेव्हां हिंदी स्वातंत्र्यसैन्यानें १९४३ साल अखेर सिंगापूर सोडून ब्रह्मदेशाकडे कूच केलें, तेव्हां नेताजींना व इतर बऱ्याचशा कार्यकर्त्यांनाही युद्धक्षेत्राच्या शक्य तितक्या जवळ आपली मुख्य कचेरी नेणें आवश्यक वाटलें. अर्थात् १९४४ सालच्या सुरुवातीस ही मध्यवर्ती कचेरी सिंगापुराहून रंगून या ब्रह्मदेशाच्या राजधानींत हालविण्यांत आली. नेताजींनीं १९४४ साल उजाडण्याचे अगोदरच हिंदुस्थानावर हल्ला करून भारतभूमीवर पाय रोवण्याची घोषणा केली होती. परंतु जपान्यांच्या दिरंगाईमुळें हें शक्य झालें नाहीं. आघाडीवर सैन्याची जमवाजमव व युद्धसामुग्रीची तरतूद झालेली नव्हती. सैन्याच्या वाहतुकीस लागणाऱ्या आगगाड्या इत्यादि वाहतुकीचीं साधनें, विमानदल इत्यादि सर्व जपान्यांचे हातीं असल्यामुळें त्यांच्या सहकार्याची आवश्यकता होतीच. म्हणूनच नेताजींनीं ठरविलेल्या कालमर्यादेंत ही पूर्वतयारी न झाल्यामुळें १९४४ साल उजाडण्याचे अगोदर हिंदी स्वातंत्र्यसेना हिंदुस्थानांत शिरूं शकली नाहीं.

१९४४ सालच्या सुरुवातीपासून हिंदी स्वातंत्र्यसंघाची मुख्य कचेरी सिंगापुराहून रंगूनला हालविण्यांत हा उद्देश होता कीं, जसजशी हिंदी स्वातंत्र्यसेना हिंदुस्थानांत पुढें पाऊल टाकीत जाईल, तसतशी स्वातंत्र्यसंघाची कचेरीसुद्धां पुढें पुढें हालविण्यांत यावी. हा क्रम दिल्ली हस्तगत होईपर्यंत चालावयाचा होता. या कार्यक्रमास अनुसरून एप्रिल १९४४ मध्यें हिंदी स्वातंत्र्यसेना इंफाल ( ऊर्फ मणिपूर ) पर्यंत पोंचली, तेव्हां ही संघाची मध्यवर्ती कचेरी कोहिमा येथें हालविण्यांत आली. दुर्दैवानें त्या वर्षीच्या पावसाळ्यांत जेव्हां त्या आघाडीवरून स्वातंत्र्यसेनेस काढता पाय घ्यावा लागला, तेव्हां जून १९४४ च्या सुमारास ही संघाची मध्यवर्ती कचेरी पुन्हां पूर्ववत् ‘ मेमिओ ’ या उत्तर ब्रह्मदेशांतील शहरांत व तेथून पुन्हा १९४४ साल अखेर रंगूनमध्यें आणण्यांत आली. एप्रिल १९४५ मध्यें रंगूनचा त्याग करावा लागला तेव्हां सयामची राजधानी बँकॉक या शहरीं व नंतर जून १९४५ च्या सुमारास पुन्हा सिंगापुरास ही कचेरी हालवावी लागली. नेताजी हे दूरपूर्वेंतील हिंदी स्वातंत्र्यसंघाचे अध्यक्ष असल्यामुळें ते हालतील तसतशी या मध्यवर्ती कचेरीची मुख्य कार्यकर्ती मंडळी व कचेरीचे कागदपत्र हालत असत. नेताजींच्या गैरहजेरींत रंगून

व सिंगापूर येथील मध्यवर्ती कचेऱ्यांचें काम बघण्यास वेळोवेळीं डॉक्टर लक्ष्मेया, बॅरिस्टर जॉन थिवी, बॅरिस्टर राघवन्, श्री. ए. एन्. सरकार यांची उपाध्यक्ष म्हणून नेमणूक होत असे. नेताजी रंगून-मेमिओ-कोहिमा अशा रीतीनें पुढें गेले त्या त्या वेळेस मध्यवर्ती कचेरी त्यांच्याबरोबर हाले, म्हणून सिंगापूर व रंगून येथील कायमच्या मध्यवर्ती कचेऱ्यांस नंबर एक व नंबर दोनच्या कचेऱ्या म्हणत. नेताजींच्या गैरहजेरींत अथवा युद्धाच्या धामधुमींत नेताजींशीं संबंध तुटला म्हणजे नंबर एकच्या मध्यवर्ती कचेरीचें काम बघणारा अधिकारी संघाचे सर्व कार्यांत सर्वाधिकारी समजला जाऊन त्याच्या आज्ञेप्रमाणें नंबर दोनच्या मध्यवर्ती कचेरीस वागावें लागे. नेताजी व नंबर एक कचेरीचा मुख्य अधिकारी, असे दोघेही गैरहजर असले तर नंबर दोनचा उपाध्यक्ष त्यांचे जागीं काम बघत असे. अशा तऱ्हेनें सर्व अधिकाऱ्यांची श्रेणी ठरवून दिलेली होती.

हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या प्रत्येक कचेरींतून, मग ती खेड्यांतील संघकचेरी असो किंवा अत्युच्च अशी मध्यवर्ती कचेरी असो, एकोणीस वेगवेगळीं खातीं असत. अर्थात् खेड्यापाड्यांत तितकें काम कमी म्हणून तेथील काम संभाळण्यास थोडे कार्यकर्ते पुरत असत. जितका व्याप मोठा तितकी प्रत्येक खात्यांचें काम बघण्यास वेगवेगळ्या लोकांची गरज लागत असे. परंतु कार्यकर्त्यांची संख्या आवश्यकतेप्रमाणें कमीजास्त असली तरी एकोणीस खात्यांचा व्यवहार भिन्न भिन्न ठेविला जात असे. ह्यांतील महत्त्वाच्या खात्यांचा आपण येथें सविस्तर विचार करूं.

प्रत्येक संघाच्या कचेरींत एक ' सिलोन डिपार्टमेंट ' अथवा ' लंकाखातें ' असे. दूरपूर्वेंत, विशेषतः मलायांत पिढ्यान्‌पिढ्या लंकेंत वास्तव्य करून राहिलेले तामीळ ( मद्रासी ) लोक बरेच आहेत. या लोकांस ' जाफना ' किंवा ' जाफना तामीळ लोक ' असें संबोधितात. यांची मातृभाषा तामीळच आहे. लंकेंतील सिंहली लोकांहून हे लोक भिन्न आहेत. सिंहली लोकांची सिंहली भाषा ही संस्कृतप्रचुर आहे. जाफना तामीळांची मलायांत बरीच वस्ती आहे. विशेषतः तेथील रेल्वेखातें जवळ जवळ त्यांनींच व्यापिलें आहे. यांची भाषा व वंश यांचें मूळ हिंदुस्थानांत असलें तरी इतर हिंदी लोकांपासून स्वतःस भिन्न मानावयाची व एक वेगळा गट करून राहाण्याची या लोकांस संवय जडलेली आहे. नेताजी सिंगापुरांत आल्यावर एक-दोन महिन्यांनीं जाफना तामीळ संघाच्या लोकांनीं नेताजींस एकदां अल्पाहारास निमंत्रण दिलें. सिंगापुरांतील समुद्रकांठच्या व्हिक्टोरिया हॉलमध्यें हा समारंभ झाला. वास्तविक या लोकांनीं स्वतःस हिंदी म्हणवून घ्यावयास कांहीं हरकत नव्हती; परंतु त्यांनीं शेवटपयत स्वतःचें अस्तित्व भिन्नच ठेविलें. या प्रसंगीं भाषण करितांना नेताजी म्हणाले, " तुमच्या पुढाऱ्यांनीं हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्ययुद्धांत सहभागी होण्याची जी इच्छा प्रदर्शित केली आहे त्यामुळें मला आनंदच होत आहे. कारण लंकेचें स्वातंत्र्य

हें सर्वस्वीं हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्यावरच अवलंबून आहे. लंका कांहीं काळ स्वतंत्र झाली आणि हिंदुस्थान परतंत्र राहिला तर लंकेचें स्वातंत्र्य फार वेळ टिकणें शक्य नाहीं. याचे उलट हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर लंकेंतून परकीयांचें उच्चाटन करण्यास मुळींच वेळ लागायचा नाहीं..." इत्यादि.

त्या दिवसांपासूनच जाफना तामीळ लोक हिंदी स्वातंत्र्य-चळवळींत सहभागी झाले असें म्हणावयास हरकत नाहीं. त्यांचीं मुलेंही सैन्यांत दाखल हाण्यास येऊं लागल्यावर एक स्वतंत्र 'लंका तुकडी' स्थापन करण्यांत आली. या तुकडीचें शिक्षण सिंगापूरच्या आझाद् लष्करी शाळेंत सुरू झालें. लंकेंत पाणबुडीनें अथवा अन्य मार्गानें जाऊन तेथें स्वातंत्र्य-चळवळीची संघटना करणें, गुप्त बातमीचा शोध लावणें, उत्पात, अपघात व अंतस्थ बंडाळी इत्यादि कामगिरीस तयार असलेली वानरसेनाही तयार करण्याचें काम सुरू झालें. जाफना तामीळ लोकांकडून वार्षिक खंडणी, देणग्या व सैनिक गोळा करण्याच्या कामाकरतां स्वतंत्र असें 'लंका खातें' प्रत्येक हिंदी स्वातंत्र्यसंघ-कचेरींत सुरू करण्यांत आलें. या खात्यानें चांगलें काम केलें. प्रश्न एवढाच कीं, 'इंग्रजांनीं जरी आपल्या कुटिल धोरणास अनुसरून लंका हिंदुस्थानापासून फोडून वेगळी केली असली, तरी लंकाही इतर प्रांतांप्रमाणें हिंदुस्थानाचाच एक भाग आहे; तुम्ही-आम्ही एक आहोंत आणि आम्ही स्वतःस हिंदी म्हणवून घेण्यास तयार आहोंत'—असें म्हणणारा जाफना तामीळ लोकांत कोणी निघाला नाहीं. प्रत्यक्ष हिंदी वंशाचे व तामीळ भाषा बोलणारे लोक जर भिन्नत्व मानूं लागले तर सिंहली लोकांनीं काय समजावें? जाफना तामीळ लोक जर स्वतःस हिंदी लोकांहून भिन्न व परके मानूं लागले तर सिंहली लोकांनीं त्यांस भाषा व वंश यांच्या भिन्नत्वामुळें परके मानून लंकेंत स्थान देण्याचें कां नाकारूं नये?

हिंदी स्वातंत्र्यसंघांतील दुसरें महत्त्वाचें खातें म्हणजे रिक्रूटभरती व लष्करी शिक्षणखातें. शक्य तितके जास्त सैनिक नोंदवून घेऊन त्यांस लष्करी शिक्षण देण्याचें काम या खात्याकडे असे. सर्वसामान्य नागरिकांस – आबालवृद्ध स्त्री-पुरुषांस – आपापले संघशाखेंत, सकाळीं अथवा सायंकाळीं दोन तास जाऊन, प्राथमिक स्वरुपाचें लष्करी शिक्षण घेण्यास प्रवृत्त करणें, निरनिराळ्या लष्करी शिक्षण-केंद्रांतून अधिक रिक्रूट यावे म्हणून जागा होईल तसतशा जाहिराती लावणें व अन्य रीतीनें प्रचार करणें, अधिकाऱ्यांच्या लष्करी शिक्षणशाळेंतील नवा शिक्षणक्रम सुरू होण्याचे अगोदर योग्य तरुणांकडून अर्ज मागवून त्यांची निवड करणें, टोकिओच्या लष्करी शिक्षणाकरतां विद्यार्थी पाठवावयाचे होते त्या वेळेस त्या शिक्षणक्रमाची जाहिरात देऊन योग्य उमेदवारांची निवड करणें, गुप्त लष्करी शिक्षणाच्या शाळांकरतां योग्य विद्यार्थ्यांची निवड करणें, व या सर्वांच्या लष्करी शिक्षणाची सोय करणें हें काम

या खात्याकडे असे. तदनुषंगिक इतर गोष्टी म्हणजे प्रचार, शिक्षणकेंद्रांतील विद्यार्थीवर्ग व शिक्षकवर्ग यांच्या राहाण्याची सोय करणें, धनधान्य पुरविणें, शिक्षणसाहित्याची तरतूद करणें या सर्व गोष्टी याच खात्यास कराव्या लागत. सर्वश्रेष्ठ अशा मध्यवर्ती संघकचेरींतील या खात्यावर देखरेख करण्यास एक हिंदी स्वातंत्र्यसैन्याचा अधिकारी स्वातंत्र्यसंघास देण्यांत आलेला होता. परंतु तेवढ्यापुरता तो सैन्याचा नोकर नसून संघाचा नोकर समजला जाई.

पूर्वीं एकदां उल्लेख केल्याप्रमाणें ९ जुलै १९४३ रोजीं नेताजींच्या सिंगापुरांतील पहिल्या जाहीर भाषणानंतर बरेच उत्साही नागरीक, रिक्रूट म्हणून नांव नोंदवून घेण्यास संघकचेऱ्यांत जमूं लागले. त्या वेळेस एवढ्या रिक्रूटांस एकदम लष्करी शिक्षण देण्याची सोय नसल्यामुळें बरेचजणांचा हिरमोड झाला. त्यांस घरीं परत जावें लागलें. नंतर ते आपापल्या कामधंद्यास लागल्यावर सैन्यांत येण्यास राजी नव्हते. शिवाय या कालांत कांहीं लष्करी केंद्रांतील उत्तर हिंदुस्थानी अधिकाऱ्यांची दक्षिणेकडील रिक्रूटांशीं वाईट वागणूक, कच्चें अन्न, रिक्रूटभरती करणाऱ्या अधिकाऱ्यांची तुसडेपणाची वागणूक व दुर्लक्ष इत्यादिबद्दलच्या बऱ्याच बातम्या प्रसृत होऊन, सैन्यांत दाखल होऊं पाहाणाऱ्या नवतरुणांचा उत्साह ओसरला. याबद्दलची प्रत्यक्ष माझ्या अनुभवांतील गोष्ट सांगावयाची म्हणजे, एकदां मी माझ्या (सिंगापुरांतील) निवासस्थानीं जेवावयास बसलों असतांना युक्तप्रांतांतील ४-५ तरूण माझ्याकडे एक चिठ्ठी घेऊन आले. ते जरा घाबरत घाबरतच बंगल्याच्या दारांत उभे राहून माझ्या नांवाचें एक पत्र पुढें करीत दारावरील नोकरास म्हणाले, “हे साहेब येथेंच राहातात का?” नोकरानें ‘हो’ म्हणतांच ते कांहींशा भयभीत अंतःकरणानें व कावऱ्याबावऱ्या नजरेनें तेथें उभे राहिले. जेवणाच्या टेबलाशीं बसल्या-बसल्या मी दारांतून हें दृश्य पाहातच होतों. पत्र फोडून पाहिलें तेव्हां माझ्या ओळखीच्या एका बँकॉकच्या गृहस्थानें तें पत्र मला उद्देशून या लोकांबरोबर पाठविलें होतें. माझें जेवण होईपर्यंत शेजारच्या बैठकीच्या खोलींत बसण्यास मी त्या लोकांस सुचविलें. जेवण झाल्यावर मी त्या लोकांची मुलाखत घेतली तेव्हां त्या तरुणांनीं अत्यंत व्यथित अंतःकरणानें आपली हकीगत सांगितली ती अशीः “आम्ही बँकॉकमधील आपला कामधंदा सोडून स्वातंत्र्यसैन्यांत शिरण्याच्या ध्येयानें प्रेरित होऊन तेथील संघकचेरीतर्फे येथें आलों. येथें आमच्या ओळखीचें कोणी नाहीं. अशा स्थितींत काल रात्रीं आम्ही कोठें-तरी सामान ठेविण्याची व्यवस्था केली व आज सकाळीं स्वातंत्र्यसंघाच्या मुख्य कचेरींत गेलों. आतां दोन वाजले आहेत. सकाळपासून या वेळेपर्यंत आम्ही उभेच्या उभे आहोंत. तेथें आमची कोणी दादही घेतली नाहीं. हा म्हणतो त्याच्याकडे जा, तो म्हणतो त्याच्याकडे जा असला प्रकार झाला. ‘कोठें उतरलां? जेवलां किंवा नाहीं? उभे कां राहतां,’ वगैरे विचारपूस करण्याचें तर

हें सर्वस्वीं हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्यावरच अवलंबून आहे. लंका कांहीं काळ स्वतंत्र झाली आणि हिंदुस्थान परतंत्र राहिला तर लंकेचें स्वातंत्र्य फार वेळ टिकणें शक्य नाहीं. याचे उलट हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर लंकेंतून परकीयांचें उच्चाटन करण्यास मुळींच वेळ लागायचा नाहीं..." इत्यादि.

त्या दिवसांपासूनच जाफना तामीळ लोक हिंदी स्वातंत्र्य-चळवळींत सहभागी झाले असें म्हणावयास हरकत नाहीं. त्यांचीं मुलेंही सैन्यांत दाखल होण्यास येऊं लागल्यावर एक स्वतंत्र 'लंका तुकडी' स्थापन करण्यांत आली. या तुकडीचें शिक्षण सिंगापूरच्या आझाद लष्करी शाळेंत सुरू झालें. लंकेंत पाणबुडीनें अथवा अन्य मार्गानें जाऊन तेथें स्वातंत्र्य-चळवळीची संघटना करणें, गुप्त बातमीचा शोध लावणें, उत्पात, अपघात व अंतस्थ बंडाळी इत्यादि कामगिरीस तयार असलेली वानरसेनाही तयार करण्याचें काम सुरू झालें. जाफना तामीळ लोकांकडून वार्षिक खंडणी, देणग्या व सैनिक गोळा करण्याच्या कामाकरतां स्वतंत्र असें 'लंका खातें' प्रत्येक हिंदी स्वातंत्र्यसंघ-कचेरींत सुरू करण्यांत आलें. या खात्यानें चांगलें काम केलें. प्रश्न एवढाच कीं, 'इंग्रजांनीं जरी आपल्या कुटिल धोरणास अनुसरून लंका हिंदुस्थानापासून फोडून वेगळी केली असली, तरी लंकाही इतर प्रांतांप्रमाणें हिंदुस्थानाचाच एक भाग आहे; तुम्ही-आम्ही एक आहोंत आणि आम्ही स्वतःस हिंदी म्हणवून घेण्यास तयार आहोंत'—असें म्हणणारा जाफना तामीळ लोकांत कोणी निघाला नाहीं. प्रत्यक्ष हिंदी वंशाचे व तामीळ भाषा बोलणारे लोक जर भिन्नत्व मानूं लागले तर सिंहली लोकांनीं काय समजावें? जाफना तामीळ लोक जर स्वतःस हिंदी लोकांहून भिन्न व परके मानूं लागले तर सिंहली लोकांनीं त्यांस भाषा व वंश यांच्या भिन्नत्वामुळें परके मानून लंकेंत स्थान देण्याचें कां नाकारूं नये?

हिंदी स्वातंत्र्यसंघांतील दुसरें महत्त्वाचें खातें म्हणजे रिक्रूटभरती व लष्करी शिक्षणखातें. शक्य तितके जास्त सैनिक नोंदवून घेऊन त्यांस लष्करी शिक्षण देण्याचें काम या खात्याकडे असे. सर्वसामान्य नागरिकांस – आबालवृद्ध स्त्री-पुरुषांस – आपापले संघशाखेंत, सकाळीं अथवा सायंकाळीं दोन तास जाऊन, प्राथमिक स्वरुपाचें लष्करी शिक्षण घेण्यास प्रवृत्त करणें, निरनिराळ्या लष्करी शिक्षण-केंद्रांतून अधिक रिक्रूट यावे म्हणून जागा होईल तसतशा जाहिराती लावणें व अन्य रीतीनें प्रचार करणें, अधिकाऱ्यांच्या लष्करी शिक्षणशाळेंतील नवा शिक्षणक्रम सुरू होण्याचे अगोदर योग्य तरुणांकडून अर्ज मागवून त्यांची निवड करणें, टोकिओच्या लष्करी शिक्षणाकरतां विद्यार्थी पाठवावयाचे होते त्या वेळेस त्या शिक्षणक्रमाची जाहिरात देऊन योग्य उमेदवारांची निवड करणें, गुप्त लष्करी शिक्षणाच्या शाळांकरतां योग्य विद्यार्थ्यांची निवड करणें, व या सर्वांच्या लष्करी शिक्षणाची सोय करणें हें काम

या खात्याकडे असे. तदनुषंगिक इतर गोष्टी म्हणजे प्रचार, शिक्षणकेंद्रांतील विद्यार्थीवर्ग व शिक्षकवर्ग यांच्या राहाण्याची सोय करणें, धनधान्य पुरविणें, शिक्षणसाहित्याची तरतूद करणें या सर्व गोष्टी याच खात्यास कराव्या लागत. सर्वश्रेष्ठ अशा मध्यवर्ती संघकचेरींतील या खात्यावर देखरेख करण्यास एक हिंदी स्वातंत्र्यसैन्याचा अधिकारी स्वातंत्र्यसंघास देण्यांत आलेला होता. परंतु तेवढ्यापुरता तो सैन्याचा नोकर नसून संघाचा नोकर समजला जाई.

पूर्वी एकदां उल्लेख केल्याप्रमाणें ९ जुलै १९४३ रोजीं नेताजींच्या सिंगापुरांतील पहिल्या जाहीर भाषणानंतर बरेच उत्साही नागरीक, रिक्रूट म्हणून नांव नोंदवून घेण्यास संघकचेऱ्यांत जमूं लागले. त्या वेळेस एवढ्या रिक्रूटांस एकदम लष्करी शिक्षण देण्याची सोय नसल्यामुळें बरेचजणांचा हिरमोड झाला. त्यांस घरीं परत जावें लागलें. नंतर ते आपापल्या कामधंद्यास लागल्यावर सैन्यांत येण्यास राजी नव्हते. शिवाय या कालांत कांहीं लष्करी केंद्रांतील उत्तर हिंदुस्थानी अधिकाऱ्यांची दक्षिणेकडील रिक्रूटांशीं वाईट वागणूक, कच्चें अन्न, रिक्रूटभरती करणाऱ्या अधिकाऱ्यांची तुसडेपणाची वागणूक व दुर्लक्ष इत्यादिबद्दलच्या बऱ्याच बातम्या प्रसृत होऊन, सैन्यांत दाखल होऊं पाहाणाऱ्या नवतरुणांचा उत्साह ओसरला. याबद्दलची प्रत्यक्ष माझ्या अनुभवांतील गोष्ट सांगावयाची म्हणजे, एकदां मी माझ्या (सिंगापुरांतील) निवासस्थानीं जेवावयास बसलों असतांना युक्तप्रांतांतील ४-५ तरूण माझ्याकडे एक चिठ्ठी घेऊन आले. ते जरा घाबरत घाबरतच बंगल्याच्या दारांत उभे राहून माझ्या नांवाचें एक पत्र पुढें करीत दारावरील नोकरास म्हणाले, "हे साहेब येथेंच राहातात का?" नोकरानें 'हो' म्हणतांच ते कांहींशा भयभीत अंतःकरणानें व कावऱ्याबावऱ्या नजरेनें तेथें उभे राहिले. जेवणाच्या टेबलाशीं बसल्याबसल्या मी दारांतून हें दृश्य पाहातच होतों. पत्र फोडून पाहिलें तेव्हां माझ्या ओळखीच्या एका बँकॉकच्या गृहस्थानें तें पत्र मला उद्देशून या लोकांबरोबर पाठविलें होतें. माझें जेवण होईपर्यंत शेजारच्या बैठकीच्या खोलींत बसण्यास मी त्या लोकांस सुचविलें. जेवण झाल्यावर मी त्या लोकांची मुलाखत घेतली तेव्हां त्या तरुणांनीं अत्यंत व्यथित अंतःकरणानें आपली हकीगत सांगितली ती अशी: "आम्ही बँकॉकमधील आपला कामधंदा सोडून स्वातंत्र्यसैन्यांत शिरण्याच्या ध्येयानें प्रेरित होऊन तेथील संघकचेरीतर्फे येथें आलों. येथें आमच्या ओळखीचें कोणी नाहीं. अशा स्थितींत काल रात्रीं आम्ही कोठेंतरी सामान ठेविण्याची व्यवस्था केली व आज सकाळीं स्वातंत्र्यसंघाच्या मुख्य कचेरींत गेलों. आतां दोन वाजले आहेत. सकाळपासून या वेळेपर्यंत आम्ही उभेच्या उभे आहोंत. तेथें आमची कोणी दादही घेतली नाहीं. हा म्हणतो त्याच्याकडे जा, तो म्हणतो त्याच्याकडे जा असला प्रकार झाला. 'कोठें उतरलां? जेवलां किंवा नाहीं? उभे कां राहतां,' वगैरे विचारपूस करण्याचें तर

बाजूलाच राहो, परंतु आम्ही ज्या कामाकरतां आलों त्या कामाबद्दलही कोणी आम्हाला योग्य मार्ग दाखवीत नाहीं. आम्हाला एकतर लष्करी अधिकाऱ्यांच्या शाळेंत भरती व्हावयाचें होतें किंवा पुढें लष्करी शिक्षक व्हावयाचें मनांत असल्यामुळें तसलें शिक्षण तरी घ्यावयाचें होतें. परंतु येथील अधिकाऱ्यांची तुटक व तुसडेपणाची वागणूक पाहून आम्ही अगदीं नाउमेद झालों आहोंत. कोठून आमचा कामधंदा सोडून येथें आलों असें आम्हांस झालें आहे. आम्हाला परत आमच्या गांवीं जाण्यास परवानगी द्या म्हटलें तर त्याकडेही कोणी लक्ष देत नाहीं. आतां तुम्ही तरी आम्हाला परत जाण्यास मदत करा..." मी सहानुभूती-पूर्वक श्रवण करीत असल्यामुळें शेवटीं त्यांनीं अगदीं रडकुंडीस येऊन मला वरीलप्रमाणें विनंति केली. उत्साहानें स्वातंत्र्यार्थ प्राण द्यावयास सिद्ध झालेले चार तरूण अधिकाऱ्यांच्या एका दिवसाच्या तुटक व तुसडेपणाच्या वागणुकीमुळें अगदीं नाउमेद होऊन या स्वातंत्र्यकार्यापेक्षां आपला स्वतंत्र कामधंदा बरा, अशा विचारानें परत जावयास सिद्ध झाले होते! स्वातंत्र्य-चळवळीस याहून मोठी हानी ती काय असणार? हे चार लोक नाउमेद होऊन परत गेल्यानें आपल्या इतर चारशें संबंधित लोकांस स्वातंत्र्य-चळवळीपासून परावृत्त करूं शकले असते. अशा तऱ्हेनें कित्येक लोक निराश होऊन गेले असतील व त्यामुळें स्वातंत्र्य-चळवळीस किती शत्रू उत्पन्न झाले असतील? त्या लोकांची ती करुण कहाणी ऐकून मला वाईट वाटलें. अशा गरीब व गुलामीनें गांजलेल्या लोकांस साहजिकच थाटामाटांत राहणाऱ्या श्रीमंत लोकांची व अधिकारी-वर्गाची भीति वाटते हें ओळखून, ते एका अधिकाऱ्याच्या बंगल्यांतील दिवाण-खान्यांत बसले आहेत या गोष्टीची मी त्यांस मुळींच जाणीव होऊं दिली नाहीं. जणूं काय ते एका जीवश्चकंठश्च मित्रालाच आपलीं गाऱ्हाणीं सांगत आहेत. असलें वातावरण मी माझ्या सहानुभूतिपूर्ण प्रश्नोत्तरांनीं निर्माण केलें. त्यांचें सर्व म्हणणें मी शांतपणें ऐकून घेतलें. नव्या 'अधिकारी वातावरणा'नें भेदरलेली त्यांची ही स्थिती हळूहळू निवळत जाऊन ते शांतपणें व आपुलकीच्या भावानें माझ्याशीं बोलूं लागले. नंतर मी त्यांस म्हटलें, "तुम्ही सर्वजण स्वातंत्र्यार्थ प्राण देण्यास तयार होऊन येथें आलां आहांत ना? मग अधिकाऱ्यांच्या एवढ्याशा तुटक वागण्यामुळें नाउमेद होऊन कां जातां? ज्यानें प्राण देण्याची तयारी केली त्यानें त्याबरोबरच मानापमानादि मानसिक व्यथाही गुंडाळून ठेविल्या पाहिजेत; तरच तुम्ही स्वतःस खरे देशभक्त म्हणवूं शकाल. नेताजींनीं ही चळवळ एका उच्च आणि पवित्र ध्येयानें प्रेरित होऊन सुरू केली, परंतु त्या चळवळींतील निरनिराळ्या कार्यकर्त्यांत यक्षिणीची कांडी फिरल्याप्रमाणें एका-एकीं बदल कसा होणार? या सर्व गोष्टी आधींच आपण गृहीत धरावयास पाहिजेत. त्या तशा आहेत याबद्दल नवल न वाटतां आपण त्या अपेक्षित गोष्टीच समजून आपलें मन निगरगट्ट केलें पाहिजे. स्वातंत्र्याच्या मार्गांत अशा

कित्येक अडचणी येतात. अशा क्षुल्लक अडचणींची तर क्षितीच बाळगूं नये हें बरें. आपले नेताजीच पहा, ते अकरा वेळां तुरुंगांत गेले. त्यांस आजपर्यंत किती अपमान सहन करावे लागले असतील ? खरें ना...... " अशा तऱ्हेनें त्यांच्याशीं बोलतांच आपण नाउमेद होऊन घाईनें परत जाण्यांत खरोखर चूक करीत आहोंत असें त्यांस वाटूं लागलें व ते शांतपणें विचार करण्याच्या स्थितींत आले. प्रथम त्यांच्या मनांतील भीति व कावरेबावरेपणा आणि नंतर त्यांची नैराश्यवृत्ति यांचें उच्चाटन केल्यावर मी त्यांस म्हटलें, " आतां, तुम्हीं ज्या उद्देशानें सयाममधून येथें आलांत त्या बाबतींत तुम्हांस मी शक्य ती मदत करीन. तुम्ही एक-दोन दिवस शांतपणें सिंगापुरांतच रहा. सामान वाटल्यास माझ्या खोलींत ठेवा...... " नंतर टेलिफोन करून मी आझाद लष्करी शाळेच्या अधिकाऱ्यांस या लोकांबद्दल कळविलें. पुढील एक-दोन दिवसांतच या लोकांची व्यवस्था लागली. त्या तरुणांपैकीं एक अधिकाऱ्यांच्या शाळेंतील शिक्षण-क्रमाकरतां निवडला गेला; दोन आझाद लष्करी शाळेंत व दोन सेलेतार लष्करी शिक्षणकेंद्रांत शिक्षण घेऊं लागले. केवळ सहानुभूतीच्या दोन शब्दांनीं किती काम होतें ! बेजबाबदार वृत्तीच्या लोकांनीं मात्र बदलत्या काळानुरूप आपल्या वृत्तींत बदल न केल्यामुळें नेताजींच्या पवित्र कार्याचें अपरिमित नुकसान केलें. वर दिलेल्यासारखीं व अन्य प्रकारचीं अनेक उदाहरणें घडलीं.

लष्करी शिक्षणकेंद्रावरील पंजाबी अधिकाऱ्यांचें व तामीळ रिक्रूटांचें वितुष्ट येण्याचेही अनेक प्रकार झाले. तामीळ रिक्रूट केवळ भातखाऊ, रंगानें काळे, हिंदी नीट बोलूं न शकणारे असल्यामुळें कांहीं अधिकारी त्यांस तुच्छ लेखून दर वेळेस वाईट भाषा वापरून हिणवीत. त्यावर त्यांची व रिक्रूटांची मारामारी, कधीं रिक्रूटांचा अन्नसत्याग्रह असलेही अनिष्ट प्रकार झाले. नेताजींस स्वतः जातीनें असलीं प्रकरणें निस्तरावीं लागत. अर्थात् या सर्व गोष्टी वरून धडा घ्यावयाचा तो असा कीं, स्वातंत्र्य-चळवळींत कोठल्याही अधिकार-पदावर एकाद्या माणसाची नेमणूक करतांना तो अत्यंत विनयशील, स्वतःस जनतेचा केवळ सेवक समजणारा व सुशिक्षित आहे हें पाहूनच त्याची नेमणूक करावी. असे थोडे परंतु निवडक कार्यकर्ते असलेले बरे.

तिसरें महत्त्वाचें खातें म्हणजे आर्थिक खातें. हिंदी स्वातंत्र्य-सरकार स्थापन झाल्यावर सर्वानुमतें असें ठरलें होतें कीं, दरवर्षी प्रत्येक हिंदी नागरिका-कडून हिंदी स्वातंत्र्य-सरकाराच्या खर्चाकरतां व स्वातंत्र्ययुद्धाच्या खर्चाकरतां मिळून प्रत्येकाचे मिळकतीवर वर्षाकाठीं शेंकडा दहा या प्रमाणांत कर वसूल करावा. प्रत्येकाची मालमत्ता व मिळकत किती आहे याचा तपास लावून त्याप्रमाणें कर-आकारणीकरतां मध्यवर्ती व स्थानिक समित्या स्थापन करण्यांत आल्या होत्या. स्थानिक समित्यांच्या कामावर देखरेख करणें, त्यांस येणाऱ्या अडचणीं-तून त्यांचा मार्ग निर्वेध करणें, त्यांच्याविरुद्ध तक्रारी आल्यास न्यायनिवाडा देणें

## हिंदी स्वातंत्र्यसेना : १९

दूरपूर्वेतील स्वातंत्र्य-चळवळ ज्या दोन प्रभावी संघटनांनीं चालविली, त्यांपैकीं हिंदी स्वातंत्र्यसंघ या हिंदी नागरिकांच्या संघटनेचें वर्णन वर आलेंच आहे. या प्रकरणांत हिंदी स्वातंत्र्यसैन्य वरपासुन खालपर्यंत कसें संबद्ध होतें, तें आपण पाहूं. हिंदी स्वातंत्र्यसेनेच्या अधिकाऱ्यांत शिरोभागीं असणाऱ्या नेताजींपासून सामान्य शिपायापर्यंत निरनिराळ्या श्रेणींचे अनेक अधिकारी असत. सैन्यांत प्रत्येकास दिलेला दर्जा योग्य असो अथवा अयोग्य असो, सैन्यांतील प्रत्येकाचें स्थान त्याच्या फौजी पोशाखावर असलेल्या खाणाखुणांनीं अगदीं स्पष्ट उल्लेखिलेलें असतें. साध्या शिपायापासून तों सरसेनापतिपर्यंतच्या या अधिकारीश्रेणींत आपलें विशिष्ट स्थान कोणतें, हें ज्याचें त्यास व त्या सैन्यांतील इतरांस एकदम कळून येतें. त्यानें कोणाची आज्ञा पाळावयाची, अथवा त्याच्या आज्ञा कोणी कोणी पाळावयाच्या, त्यास कोणी अभिवादन करावयाचें किंवा त्यानें कोणास अभिवादन करावयाचें या गोष्टी सैन्यांत ज्याचे त्याचे हुद्याप्रमाणें ठरलेल्या असल्यामुळें तेथें शंकाकुशंकांस, वादविवादास अथवा बाचाबाचीस मुळींच जागा ठेवलेली नसते. वरिष्ठ सांगेल तें कनिष्ठानें ऐकावयाचेंच, न ऐकल्यास त्यास फौजी कायद्याप्रमाणें शिक्षा, असा सैन्यांत दंडक असल्यामुळें सैन्यांत शिस्त चांगली राहते. क्रांतिकालांत नागरिकांच्या संघटनेंतसुद्धां अशाच प्रकारची श्रेणी ठरवून अशी शिस्त राखावयास हवी; नाहींतर जो तो स्वतःस शिष्ट समजून, नसते वादविवाद माजतात व काम अडून राहातें. मात्र अशी श्रेणी ठरवितांना केवळ श्रीमंती अथवा पूर्वीचा लठ्ठ पगार यांचेंच स्तोम न माजवितां ज्ञान, अक्कल, हुषारी, सारासार विचार करण्याची शक्ति, अनुभव इत्यादींस खरें महत्त्व दिलें पाहिजे. एकादा श्रीमंत मनुष्य त्याच्यापेक्षां हुषार अशा गरीब माणसाच्या हाताखालीं निरपेक्ष बुद्धीनें काम करण्यास तयार नसल्यास तो अशा स्वातंत्र्येच्छु संघटनेंत काम करण्यास सर्वस्वीं अपात्र समजण्यांत येऊन त्यास अजिबात वगळलेलें बरें. देशाच्या हिताकडे ज्याची दृष्टी नाहीं व केवळ स्वतःची आढ्यता मिरविण्याचीच ज्यास हौस आहे त्याच्या हातून देशाचें खरें हित साधणें कधींच शक्य नाहीं. अर्थात् अशा प्रकारच्या कोठल्याही चळवळींत सर्व कार्यकर्त्यांच्या कानींकपाळीं रात्रंदिवस हें तत्त्व ओरडत राहिलें पाहिजे कीं, ‘ आपलें व्यक्तीमत्व विसरून जा. कनिष्ठांशींसुद्धां अत्यंत सभ्यपणें, विनयानें आणि आदरानें वागा. कारण ईश्वरानें प्रत्येकास अक्कल दिलेली आहे.



**जनरल भोसले**
( हिंदी स्वातंत्र्य-सेनेचे कार्याध्यक्ष )
( चीफ ऑफ स्टाफ )



**कॅ. मोहनसिंग**
( हिंदी स्वातंत्र्य-सेनेचे उत्पादक )

★



**कर्नल हबीबुर रहमान**
( हिंदी स्वातंत्र्य-सेनेचे उपप्रमुख )



**कॅप्टन लक्ष्मी**
( 'झांशी राणी' सेनाविभागाच्या सेनानी )

अमूक एक गृहस्थ अधिकारपदावर नाहीं म्हणून त्यास आपल्यापेक्षां कमी अक्कल आहे असें समजूं नका. आपल्याला दिलेला अधिकार हा स्वतःचा नसून त्या जागेचा आहे, अर्थात् त्यामुळें स्वतःच्या मोठेपणांत यत्किंचितही भर पडल्याचें मनांतसुद्धां येऊं देऊं नका. पैसा मिळविण्याची आकांक्षा धरूं नका; अधिकार-लालसा सोडा. मानमरातब, आढ्यता यांचाही त्याग करा. ' अशा तऱ्हेचें शिक्षण कार्यकर्त्यांस नेहमीं पाहिजे. दूरपूर्वेतील स्वातंत्र्य-चळवळींत, संघांत काय किंवा सेनेंत काय, दुर्दैवानें या मनोवृत्तीचे लोक फार कमी सांपडत. या बाबतींत प्रत्यक्ष नेताजींचा स्वभाव मात्र आदर्श असाच होता. अशी मूलगामी शिकवण जर कनिष्ठापासून वरिष्ठापर्यंत सर्वांस मिळत राहिली, तर स्वातंत्र्यसंघांतील अथवा सैन्यांतील कांहीं अधिकारी ज्याप्रमाणें आपल्या तुसड्या वागणुकीनें इतरांस नकोसें करून सोडीत व बरेच जणांना स्वातंत्र्य-चळवळींत भाग घेण्यापासून नकळत परावृत्त करीत तसें पुन्हा होणार नाहीं.

स्वातंत्र्यसेनेची संख्या ४०००० होती, हें पूर्वीं आलेंच आहे. नेताजी प्रथम सिंगापुरांत आले तेव्हां ही सेना युद्धबंद्यांतील सुमारें १८५०० सैनिकांची होती. नेताजींनीं युद्धबंद्यांस उद्देशून त्यांच्या छावण्यांतून जीं भाषणें केलीं, त्यामुळें आणखी १५०० सैनिकांची त्यांत भर पडली. पुढें निरनिराळ्या लष्करी केंद्रांतून सुमारें वीस हजार नागरीक रिक्रूट म्हणून भरती होऊन लष्करी शिक्षण घेऊन सैनिक झाले. अशा रीतीनें वीस हजार जुने सैनिक व वीस हजार नवे अशी चाळीस हजार हिंदी स्वातंत्र्यसेना तयार झाली होती. जुने सैनिक मुख्यतः पंजाबी व इतर अन्यप्रांतीय होते. त्यांत जवळजवळ दोन हजार महाराष्ट्रीय होते. नवे मुख्यतः तामीळ होते. हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या दहा दहा हजाराच्या तीन डिव्हिजन्स होत्या. उरलेले दहा हजार कांहीं चवथ्या डिव्हिजनमध्यें सामील केले जाणार होते तर कांहीं कोणत्याच विशिष्ट डिव्हिजनमध्यें सामील नसून प्रत्यक्ष स्वातंत्र्यसैन्याच्या सर्वोच्च अशा मुख्य मध्यवर्ती केन्द्रकचेरीच्या हाता-खालींच असत. पहिल्या डिव्हिजनचे मुख्य अधिकारी महंमद झमान क्यानी हे होते. दुसऱ्या डिव्हिजनचे मुख्य अझीझ अहमद व तिसऱ्या डिव्हिजनचे मुख्य अधिकारी गणपतराम नागर होते. हे तिघेही सुरुवातीस आपापल्या डिव्हिजनचे मुख्य अधिकारी झाले तेव्हां लेफ्टनंट कर्नल हाच तिघांचाही हुद्दा होता. पुढें क्यानी हे कर्नल होऊन मेजर जनरलच्या हुद्यावर पोचले. श्री. नागर हे कर्नल झाले.

प्रत्येक डिव्हिजनमध्यें गनिमीकाव्यानें लढणाऱ्या हजार-हजाराच्या तीन तुकड्या, एक तोफखान्याची सव्वाशें माणसांची तुकडी, पूल, रस्ते इत्यादि तयार करणाऱ्या इंजिनियरिंग खात्याच्या माणसांची एक तुकडी, मोटार वाह-कांची तुकडी, चिलखती गाड्या व रणगाड्यांची एक तुकडी, धान्य-पुरवठा-खात्याची एक तुकडी, युद्धसामुग्री — बंदुका, दारूगोळा, कपडे, बूट इत्यादि— पुरविणाऱ्यांची एक तुकडी, एक वैद्यकीय पथक व एक हेरांचें पथक असे. अशा

तऱ्हेनें कोणत्याही सैन्यांतील प्रत्येक डिव्हिजन हा सर्व दृष्टीनें परिपूर्ण आणि स्वावलंबी असा विभाग असतो. इंग्रजांची एक एक डिव्हिजन सुमारें पंधरा हजार सैनिकांची असते. कारण मोंगल बादशहाप्रमाणें अवाढव्य विस्तार, पसारा व सर्व प्रकारचा जामानिमा असल्याशिवाय त्यांना लढतांच येईनासें झालें आहे. याच्या उलट जपान्यांच्या तुकड्या लहान, आटोपशीर व सुटसुटीत असल्यामुळें त्यांस दाट अरण्यांत गनिमीकाव्यानें लढणें सोपें जातें. हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या दहा दहा हजारांच्या तुकड्या हें जपानी तत्त्व लक्षांत घेऊनच केलेल्या होत्या. शिवाय हिंदी स्वातंत्र्यसैन्याची थोडी संख्या हेंही त्याचें एक कारण होतें. एवढ्या अवाढव्य इंग्रज फौजफाट्यास तोंड देणें हें गनिमी-काव्याशिवाय अन्य मार्गानें स्वातंत्र्यसैन्यास शक्यच नव्हतें, म्हणून हिंदी स्वातंत्र्यसैन्यांतील जेवढ्या म्हणून पायदळ तुकड्या होत्या त्या सर्वांस खुल्या मैदानावरील लढाईचें शिक्षण न देतां जंगल-लढाईचें म्हणजे गनिमीकाव्याचेंच शिक्षण दिलें होतें. खुल्या मैदानावरील लढाईचेंच शिक्षण असलेल्या तुकड्या जंगलच्या लढाईत गोंधळून जातात व त्यांस त्या हाल-अपेष्टा सहन होत नाहींत. परंतु गनिमीकाव्यानें लढणारे लोक हे मैदानी लढाईत सुद्धां मर्दुमकी दाखवूं शकतात. हिंदुस्थान-ब्रह्मदेश सरहद्दीचा भाग जंगली, डोंगराळ असा असल्यामुळें येथें योजिल्या जाणाऱ्या सैनिकांस जंगल-लढाईचें शिक्षण असणें अवश्य होतें.

कित्येक वेळां पीछेहाट करणारें शत्रुसैन्य रस्त्यांत स्फोटगोल इत्यादि पेरून ठेवितें. उद्देश हा कीं, विरुद्ध पक्षाच्या सैन्यास लवकर पाठलाग करितां येऊं नये. स्फोटगोल पेरलेल्या मार्गावरून विरुद्ध पक्षाचे सैनिक व युद्धसाहित्य वगैरे जाऊं लागलें कीं, या स्फोटगोलांचा स्फोट होऊन त्या सैन्याची फार हानी होते. अर्थात् पुढें सरकणाऱ्या आपल्या सैन्यास निर्वेधपणें पुढें जातां यावें म्हणून इंजिनियरिंग कंपनीचीं माणसें पुढें जातात व रस्ता नीट तपासून असले स्फोट-गोल असल्यास ते काढून रस्ता निर्वेध करितात. जंगल कापून रस्ता तयार करणें, लहान ओढ्यांवर किंवा नद्यांवर चटकन् पूल तयार करणें किंवा शत्रूचा मार्ग अडविण्यास, असलेले पूल उध्वस्त करणें, स्फोटगोल पेरणें असलीं कामें इंजिनियरिंग कंपनीचीं माणसें करितात. या माणसांचें काम फारच धोक्याचें आणि जोखमीचें असतें. कारण नेहमीं स्फोटक पदार्थांशीं यांचा संबंध असतो. यांत सुतार, लोहार, चांभार, यंत्रशास्त्रज्ञ, विजेचे इंजिनियर इत्यादि अनेक तज्ज्ञ लोकांचा समावेश होतो. प्रत्यक्ष आघाडीवर जेव्हां एका डिव्हिजनचे सैनिक ठिकठिकाणीं विभागले जातात तेव्हां या इंजिनियरिंग तुकडीचे लोकही विभागून ते थोडथोडे प्रत्येक पायदळ तुकडीबरोबर देतात.

मोटारलॉऱ्यांची जी वाहतूक कंपनी असते, तिला सैनिकांच्या तुकड्या आघाडीवर पोंचविणें, आजारी सैनिकांस मागें आणून सोडणें, धान्य, पेट्रोल,

युद्धसाहित्य इत्यादींची ने-आण करणें वगैरे काम असतें. या लोकांस विमानांपासून धोका असतो. कारण पुरवठा-केंद्रापासून तों आघाडीपर्यंत या वाहनांची एकदां रीघ लागली कीं, शत्रुविमानें त्यांच्यावर झेप घेऊन बॉम्बचा किंवा मशिनगनच्या गोळ्यांचा मारा करतात.

चिलखती गाड्या व रणगाडे यांचा विशेषतः सपाट जमिनीवर अथवा चांगल्या रस्त्यावर उपयोग होतो. जेथें दाट जंगल, खांचखळगे, डोंगर, दऱ्या-खोरीं असला प्रकार असतो, तेथें यांचा विशेष उपयोग होत नाहीं. परंतु एरवीं शत्रुव्याप्त प्रदेशांत चढाई करावयाची झाल्यास यांचा फारच उपयोग असतो. कित्येक वेळां महत्त्वाच्या अशा रस्त्यांच्या किंवा लोहमार्गाच्या आजूबाजूला खंदक खणून किंवा मजबूत असे सीमेंट कॉंक्रीटचे वा दगडाचे बुरूज करून त्यांत शत्रुसैनिक बसल्याबसल्या हे रस्ते रोखून धरतात. अशा रस्त्यांवरून चिलखती गाड्या व रणगाडे हेच जाऊन शत्रूच्या त्या बुरुजांवर व खंदकांवर दारूगोळ्याचा वर्षाव करून शत्रूस हुसकूं शकतात व मगच पायदळ तुकड्यांस त्या रस्त्यावरून जाणें शक्य व इष्ट असतें. कित्येक वेळां हे रणगाडे आणि चिलखती गाड्या निघाल्या म्हणजे त्यांच्या मागोमाग दबकत दबकत दहा-दहा, पंधरा-पंधरा सैनिक संगिनी लाविलेल्या बंदुकी घेऊन निघतात. चिलखती गाड्यांच्या मागोमाग वांकून चालल्यामुळें शत्रूच्या गोळीबारापासून त्यांचें रक्षणही होतें. शत्रूच्या गुहेजवळ पोचलें म्हणजे त्यांस शत्रूवर तुटून पडतां येतें. रणगाडा किंवा चिलखती गाडीच्या ड्रायव्हराच्या शेजारीं जो दुसरा सैनिक बसलेला असतो त्याच्या नाकाच्या समांतर रेषेंत, सोंडेसारखें मशीनगनचें एक नळकांडें चिलखतांतून बाहेर आलेलें असतें. शत्रूवर आक्रमण करतांना आंतील सैनिक ही मशीनगन चालवून समोरील शत्रूवर गोळ्यांचा वर्षाव करूं शकतो. याशिवाय रणगाड्यांच्या व चिलखती गाड्यांच्या वरच्या बाजूस असलेल्या गोल भोकांतून-सुद्धां डोकें वर काढून गोळीबार करितां येतो. अर्थात् लहान पण मजबूत तट-बंदीचीं ठिकाणें तयार करून त्यांत दडून बसलेल्या सैनिकांच्या जवळ पोंचून त्यांना तेथून हुसकून लावून पायदळाचा मार्ग निर्वेध करण्याचें महत्त्वाचें काम मुख्यतः या चिलखती गाड्यांच्या तुकड्यांकरवीं होतें.

धान्य-पुरवठा-खातें हें आघाडीवरील एकाद्या मध्यवर्ती ठिकाणीं आपलें कोठार स्थापून तेथून निरनिराळ्या तुकड्यांस अन्नसामुग्री पुरवितें. बहुधा प्रत्येक तुकडी ठरलेल्या दिवशीं तेथें आपलीं माणसें व मोटारी, बैलगाड्या इत्यादि कांहीं वाहनें असल्यास तीं पाठवून आपली आठवड्याची, महिन्याची अथवा २-३ महिन्यांची धान्यसामुग्री मागवून घेते. शत्रूच्या विमानहल्ल्यापासून बचाव होईल अशा ठिकाणीं हें कोठार स्थापणें, शत्रूचे हेर या ठिकाणाची शत्रूस बातमी देतील असा संभव वाटल्यास रातोरात तें कोठार इकडून तिकडे व तिक-डून इकडे असें वारंवार हालविणें, पावसापाण्यापासून त्याची काळजी घेणें, माल

संपेल तसा तो मागून आणविणें व त्याच्या आयव्ययाचा हिशोब ठेवणें हीं सर्व कामें या खात्याकडे असतात.

या खात्यासारखेंच युद्धसाहित्य-पुरवठा-खातेंही आघाडीवरील एकाद्या मध्यवर्ती ठिकाणीं आपलें केंद्र स्थापन करतें. बहुधा हीं केंद्रें दळणवळणाचीं चांगलीं साधनें असलेल्या अशा त्या भागांतील प्रमुख वस्तींत अथवा अशा वस्तीस लागून असतात. त्यामुळें सामानाची ने-आण करणाऱ्या मोटारलॉऱ्या इत्यादि वाहनांस सोईचें जातें. आघाडीवरून तुट्न फुट्न आलेल्या युद्धसामुग्रीची नीट तपासणी करून त्यांतील उपयुक्त वस्तू अथवा भाग काढून घेऊन त्यांची दुरुस्ती करून, साफ करून, तेल देऊन त्यांस सुस्थितींत आणणें, नादुरुस्त झालेल्या तोफा-बंदुकादि शस्त्रास्त्रांची दुरुस्ती करणें, वगैरे काम करण्यास या खात्यास एक लहानसा कारखानाही जोडलेला असतो. आघाडीवरील फौजांजवळ ज्या मानानें तोफा, पिस्तुलें, बंदुकादि शस्त्रास्त्रें असतील त्या त्या प्रमाणांत तऱ्हे-तऱ्हेचा दारूगोळा सतत भरपूर प्रमाणांत ठेवावा लागतो. शस्त्रास्त्रांची मोडतोड होईल त्याप्रमाणें तत्सम दुसरीं शस्त्रात्रें पुरवावीं लागतात. त्यानंतर कपडे, बूट, चिलखती टोप्या, अशा सैनिकांस लागणाऱ्या अनेक आवश्यक वस्तूंच्या व्ययाचा अंदाज करून त्या प्रमाणांत त्यांच्या पुरवठ्याची व्यवस्था करून ठेवावी लागते. हिंदी स्वातंत्र्यसैन्याजवळ इंग्रजांप्रमाणें अजस्त्र कारखाने, अमूप सामान, मुबलक पैसा व वाटेल तितकें मनुष्यबळ नसल्यामुळें, फाटलेल्या कपड्यांस ठिगळें लावून तेच पुन्हा वापरावयाचे, बुटांची डागडुजी करून ते पुन्हा उपयोगांत आणावयाचे, असला गरिबींतला संसार करण्याचेंच काम बहुधा या आघाडीवरील पुरवठा-केंद्राकडे असे. ज्या ठिकाणीं कपडे दर वेळेस फाटणार, तेथें दर वेळेस नवे कोठून आणणार?

आघाडीवर हेरांच्या तुकडीचे अनेक विभाग करून ते ठिकठिकाणच्या पायदळ तुकड्यांना जोडण्यांत येत असत. हे हेर अनेक वेष धारण करून व विविध ढोंगें करून, शत्रुव्याप्त अशा प्रदेशांत जाऊन शत्रु-सैनिकांची संख्या, त्यांचीं शस्त्रास्त्रें, वाहनें, दारूगोळा, व त्यांचे बेत इत्यादींबद्दल माहिती काढून आणीत. या माहितीप्रमाणें पुढें त्या त्या तुकडीस आपले बेत करणें सोपें जाई. विशेषतः साधूचा अथवा बैराग्याचा वेष घेणें, माणूस मेल्याचें सोंग करून तिरडी बांधून साळसूदपणें शत्रुप्रदेशांत प्रवेश करणें, इत्यादि अनेक उपाय हे हेर योजीत असत. युद्धकालांत साधूच्या वेषांत असे अनेक हेर दूरपूर्वेतून हिंदुस्थानांत आल्यामुळें इंग्रजांस इतकी दहशत बसली कीं, युद्ध संपल्यावर दूरपूर्वेत वास्तव्य करीत असलेले सनातनी वृत्तीचे, देशोधडीला लागलेले गरीब ओडिये ( ओरिसा प्रांतातील ) लोक जेव्हां शेंकडोंनीं इंफालमार्गें हिंदुस्थानांत परत येऊं लागले, तेव्हां हेही हेरच असतील असें समजून त्या बिचाऱ्यांस

हिंदुस्थानाच्या हद्दींत येऊं देण्याचें इंग्रज अधिकारी नाकारूं लागले. इतरेजनांस मात्र येण्याची सोय होऊं शकत असे.

आघाडीवरील सैन्याचें आणखी एक महत्त्वाचें अंग म्हणजे 'सिग्नल कोर' अथवा गुप्त संदेश पाठविणारी तुकडी. अमुक शब्दाची अमुक खूण अशा प्रत्येक सैन्यांत त्या त्या भाषेंतील अक्षरावर आधारलेल्या खुणा असतात. या खुणांचा उपयोग करून बिनतारी यंत्रानें पिछाडीस असलेल्या आपल्या अधिकाऱ्यांशीं, कचेऱ्यांशीं व एकंदर संघटनेशीं त्या गुप्त खुणांच्या साहाय्यानें सतत दळणवळण ठेवून आघाडीवरील परिस्थितीची व आवश्यक गोष्टींची त्यांस माहिती करून देणें आणि त्यांच्या आज्ञा आपल्या अधिकाऱ्यांस कळविणें हें या तुकडीचें काम असतें.

अशा तऱ्हेचीं, हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या प्रत्येक डिव्हिजनचीं अंगोपांगें असत. डिव्हिजनच्या मुख्य अधिकाऱ्यास इंग्रजींत ' डिव्हिजनल कमांडर ' असें म्हणतात. ती डिव्हिजन ज्या प्रदेशांत लढत असेल त्या आघाडीच्या मागें कांहीं अंतरावर एकाद्या मध्यवर्ती ठिकाणीं या डिव्हिजनच्या अधिकाऱ्याची मुख्य कचेरी असते. यांत वैद्यकीय खातें, युद्धसामुग्री-पुरवठाखातें, धान्यपुरवठा-खातें, नेमणूका-बदल्या खातें अशीं अनेक खातीं असतात. त्या डिव्हिजन-मधील निरनिराळ्या तुकड्यांच्या अनेक प्रकारच्या गरजा भागविण्याचें काम या निरनिराळ्या खात्यांकडे असतें. डिव्हिजनल कमांडरच्या हाताखालीं या प्रत्येक खात्याचा एक एक मुख्य अधिकारी असतो. या डिव्हिजनमधील पायदळ-तुकड्या व इतर ज्या तुकड्या असतात, त्यांच्याही अशाच प्रकारच्या परंतु त्या मानानें लहान, अशा कचेऱ्या असतात व त्यांच्या कचेऱ्यांतही अशींच खातीं असतात. प्रत्येक डिव्हिजनमध्यें पायदळ, रणगाडे व चिलखती गाड्यांच्या तुकड्या, तोफखाना अशा ज्या लढाऊ तुकड्या असतात, त्यांस रेजिमेंट म्हणतात. पूर्वीं उल्लेख केल्याप्रमाणें हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या प्रत्येक डिव्हिजनमध्यें सर्वसाधारण-पणें तीन पायदळ-तुकड्या असत. ब्रह्मदेशांत पकडले गेलेले व १९४५ सालअखेर दिल्लीच्या लाल किल्ल्यांतील खटल्यांत प्रसिद्धीस आलेले शहानवाझ, सहगल व धीलन हे तिघेही अशा गनिमीकाव्यानें लढणाऱ्या पायदळ-तुकड्यांचे मुख्य अधिकारी होते. शहानवाझ हे क्रमांक १ च्या पायदळ-तुकडीचे मुख्य होते. या तुकडीस 'सुभाष रेजिमेंट'ही म्हणत. सुभाष, गांधी, नेहरू, आझाद अशीं पहिल्या चार पायदळ-तुकड्यांस नांवें दिलेलीं असून कागदोपत्रीं आणि बिनतारी संदेशांत त्यांचा क्रमांत १।२।३।४ असा उल्लेख करीत. धीलन हे क्र. ४ तुकडीचे व सहगल हे क्र. ५ तुकडीचे मुख्य अधिकारी होते. एका डिव्हिजनमध्यें तीन पायदळ-तुकड्या व इतर तोफखाना, चिलखती गाड्यांच्या तुकड्या अथवा रेजिमेंटस् असतात. शहानवाझ, सहगल अथवा धीलन यांच्यासारखे एकेका रेजिमेंटचे जे मुख्य अधिकारी असत त्यांस ' रेजिमेंटल कमांडर ' म्हणत. हे सर्व रेजिमेंटल कमांडर

त्या त्या डिव्हिजनल कमांडरच्या हाताखालीं काम करीत. तिन्ही डिव्हिजनल कमांडर हे जनरल जगन्नाथराव भोसले यांच्या हाताखालीं व या सर्वांवर हिंदी स्वातंत्र्यसैन्याचे सरसेनापति नेताजी सुभाषचंद्र बोस – अशा तऱ्हेची हिंदी स्वातंत्र्यसैन्याची अधिकारश्रेणी होती.

हिंदी स्वातंत्र्यसैन्याची मध्यवर्ती केन्द्रकचेरी १९४३ सालअखेरपर्यंत सिंगापुरांत थॉमसन् रोडवर होती. पुढें १९४४ सालाच्या जानेवारी महिन्यांत स्वातंत्र्ययुद्धाची लवकरच सुरुवात होणार म्हणून स्वातंत्र्यसंघाची मुख्य कचेरी जशी आघाडीच्या जास्त जवळ असावी म्हणून सिंगापुराहून रंगून येथें नेण्यांत आली, त्याप्रमाणें स्वातंत्र्यसैन्याची कचेरीसुद्धां सिंगापुराहून रंगून येथें नेण्यांत आली. पुढें इंफालपर्यंतचा टापू जसजसा स्वातंत्र्यसैन्याच्या ताब्यांत येत गेला तसतशी स्वातंत्र्यसैन्याची मध्यवर्ती केन्द्रकचेरीसुद्धां प्रथम उत्तर ब्रह्मदेशांतील ‘ मेमिओ ’ या ठिकाणीं व नंतर ‘ कोहिमा ’ या हिंदुस्थानाच्या हद्दींतील गांवांत नेण्यांत आली. या मध्यवर्ती केन्द्रकचेरीची सत्ताविभागणी पुढील पृष्ठावर दिल्याप्रमाणें होती.

या मध्यवर्ती केन्द्रकचेरीच्या हाताखालीं निरनिराळया डिव्हिजन्स् असत. प्रत्येक डिव्हिजनच्या मुख्याधिकाऱ्याची स्वतःची एक कचेरी असे. त्यांत वरीलप्रमाणेंच खातीं असून त्याच्या हाताखालीं निरनिराळ्या लढाऊ तुकड्या व पायदळ-तुकड्या असत. या तुकड्यांच्या रेजिमेंटच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्यासुद्धां मध्यवर्ती कचेऱ्या असत. प्रत्येक डिव्हिजन – रेजिमेंटस्, बॅटॅलियन्स्, कंपनीज व सेक्शनस् याप्रमाणें – उतरत्या क्रमानें विभागलेली असे. कोणतीही आज्ञा वरपासून खालपर्यंत त्या त्या विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत येई. एवढ्या सैन्याची हालचाल करणें, निरनिराळ्या तुकड्यांनीं कोणत्या आघाडीवर जावें हें ठरविणें, त्यांच्याजवळची शस्त्रसामुग्री, नकाशे वगैरे इतर साहित्य कशा प्रकारचें असावें ? त्यांचें लष्करी शिक्षण गनिमीकाव्याचें असावें अथवा अन्यप्रकारचें असावें ? लढाईचें तंत्र–इत्यादि ज्या युद्धविषयक बाबी असतात त्या सर्व मध्यवर्ती कचेरीच्या युद्धखात्यातर्फे होतात. त्यांच्या राहण्याची, खाण्यापिण्याची व्यवस्था, कपड्यालत्त्याची व्यवस्था, आघाडीवर जाण्याकरतां आगगाड्या, मोटारलॉऱ्या इत्यादि वाहनांची सोय, या सर्व गोष्टी मध्यवर्ती कचेरीच्या कारभाराच्या कार्यक्षेत्रांत येतात.

वरिष्ठांचा हुकूम न ऐकणाऱ्या उद्धट सैनिकांस पकडून कैदेंत ठेवणें, दारू पिऊन दंगा करणाऱ्यांस अटक करणें, सैन्याच्या हालचालीच्या वेळीं रस्त्यावर वा इतरत्र बंदोबस्त ठेवणें, नाना तऱ्हेच्या गुन्हेगार सैनिकांचा शोध लावून त्यांस पकडणें, याकरतां प्रत्येक सैन्यांत त्या त्या सैन्याचें फौजी पोलीसखातें असतें. हें फौजी पोलीसखातें प्रत्यक्ष मध्यवर्ती केंद्रकचेरीच्याच अनेक खात्यांपैकीं एक असतें. प्रत्येक डिव्हिजनला किंवा रेजिमेंटला या

**मध्यवर्ती केन्द्रकचेरी**

सरसेनापति हिंदी स्वातंत्र्यसेना
( नेताजी सुभाषचंद्र बोस )

चीफ ऑफ स्टाफ ( कार्याध्यक्ष )
( मेजर जनरल जगन्नाथ कृष्ण भोसले )

ए. डी. सी. व खाजगी चिटणीस
( लेफ्टनंट पुरुषोत्तम नागेश ओक )

- युद्धखातें ( ले. क. शहानवाझ* )
- नेमणुका व बदल्या-खातें ( मेजर प्रेमकिशन सहगल† )
- सेनाकारभार-खातें
  - कारभारी
  - कोठारी
  - कोष
  - न्याय
  - वैद्यक
  - पोलीस

---

* युद्धखात्याचे मुख्याधिकारी म्हणून ले. क. शहानवाझ हे १९४३ सालअखेर काम पाहात; नंतर सुभाष उर्फ क्रमांक १ रेजिमेंटचे मुख्याधिकारी म्हणून त्यांची आघाडीवर बदली झाली.

† मेजर प्रेमकिशन सहगल हे १९४४ अखेरपर्यंत 'सेनाचिटणीस' या नात्यानें या खात्याचें काम पाहात; त्यानंतर रेजिमेंटल कमांडर म्हणून आघाडीवर त्यांची बदली झाली.

मध्यवर्ती पोलिसांची एक तुकडी बंदोबस्ताकरतां जोडलेली असते किंवा डिव्हिजन अथवा रेजिमेंट आपल्यांतीलच कांहीं सैनिकांस फौजी पोलीस नेमून त्यांच्याकडे हा बंदोबस्त सोपवितें.

न्यायखात्याकडे गुन्हेगारांची चौकशी करून न्याय देणें, शिक्षा ठोठावणें, फौजी कायदेकानू बनविणें, त्यांची अंमलबजावणी होते कीं नाहीं तें पाहणें, अशा प्रकारचें काम असतें. हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत कायदा शिकलेले असे पांच-सहाच अधिकारी होते. ' लेफ्टनंट कर्नल नाग '—ज्यांनीं दिल्लीच्या लाल खटल्यांत सरकारतर्फे साक्ष दिली — या खात्याचे प्रमुख अधिकारी होते. त्यांनीं सरकारतर्फे साक्ष दिली हें एक प्रकारें बरेंच झालें. कारण त्यांनीं केलेलीं विधानें स्वातंत्र्यसैन्याच्या अधिकाऱ्यांच्या बचावास अनुकूलच ठरलीं. प्रस्तुत ग्रंथलेखकालासुद्धां इतर काम संभाळून शिवाय हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या न्यायालयाचा उपवरिष्ठ अधिकारी म्हणून सिंगापुरास व नंतर बँकॉकच्या स्वातंत्र्यसैन्याच्या सर्वोच्च कचेरींत काम करावें लागलें.

सैन्याच्या प्रत्येक तुकडीस (रेजिमेंटला) एक एक डॉक्टरही नेमून दिलेला असे. प्रत्येक डिव्हिजनला एक एक रुग्णालय असे. या डॉक्टराजवळ रुग्णालयांत आवश्यक तें सामान आहे किंवा नाहीं ? औषधें वगैरे पुरेशीं नसल्यास त्यांचे अभावीं दुसरे काय उपाय योजावयाचे ? सैनिकांस कार्यक्षम राखण्याइतकें त्यांचें अन्न सकस आहे किंवा नाहीं ? नसल्यास तें तसें करण्याचे उपाय कोणते ?—या सर्व गोष्टींचा विचार वैद्यकखात्यास करावा लागे. हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत डॉक्टरांची इतकी वाण होती कीं, सिंगापुरांत खाजगी रीतीनें वैद्यकीचा धंदा करीत असलेल्या वैद्यांस व होमिओपॅथिस्टस्‌नासुद्धां सैन्यांतील वैद्यक-खात्यांत घेण्यांत यावें अशी मी सूचना केली व त्याप्रमाणें सिंगापुरांतील दहा-बारा वैद्यांचीं मनें वळवून त्यांच्याकडून मी तसा अर्जही करविला. परंतु इंग्रजी पद्धतीनें शिकलेल्या डॉक्टरांच्या हातीं सत्ता असली म्हणजे ते याला कसून विरोध करितात याचें मला प्रत्यंतर आलें. वास्तविक क्रांतिकालांत स्वदेशी पद्धतींसच महत्त्व द्यावयास पाहिजे. त्या डॉक्टरांपैकीं कांहीं सूज्ञ लोकांस ही सूचना मान्य होती. परंतु वरिष्ठ अधिकारी याच्या अगदीं विरुद्ध होता. त्याचा मुख्य मुद्दा असा होता कीं, पाश्चात्य वैद्यकशास्त्रांत एकच विशिष्ट शास्त्रशुद्ध पद्धत अनुसरली आहे. त्या शास्त्रांतील सर्व पदवीधरांची चिकित्सापद्धति व उपचार-पद्धति वगैरे रेखीव आहे. त्याला फाटे फुटलेले नाहींत. उलट हिंदी वैद्यकशास्त्राचें अजून तसें झालेलें नाहीं. त्याच्या म्हणण्यांत थोडेसें तथ्य होतें, नाहीं असें नाहीं. कारण सरकारी प्रोत्साहनाच्या अभावीं प्रयोग, शोध आदि मार्गांनीं कोठ-ल्याही शास्त्रांत सुसंबद्धता येणें फारच कठीण असतें. परंतु माझें म्हणणें असें असे कीं, ' अगदीं प्रत्यक्ष आघाडीवरील जखमी सैनिक जरी तुम्ही यांच्या हातीं सोपविण्यास तयार नसलां तरी सिंगापूरसारख्या आपल्या मूलकेंद्रावरील एक

हिंदी स्वातंत्र्य-सेनेंतील कांहीं महत्त्वाचे अधिकारी



कॅ. शहानवाझ



ले. धिलन



कॅ. सहगल



कॅ. बुऱ्हाणुद्दिन

स्वतंत्र रुग्णालय तरी हिंदी वैद्यकपद्धतीनें कां चालविण्यांत येऊं नये ? एका रुग्णालयांत सर्व वैद्यच असावेत, दुसऱ्यांत सर्व होमिओपॅथिस्ट्स् असावेत. प्रत्येकांत त्या त्या विशिष्ट शास्त्रांतील पारंगत लोकांची नेमणूक व्हावी व आपापल्या रुग्णालयांत त्यांनीं स्वतःच्या पद्धतीचा अवलंब करावा. निदान किरकोळ आजाराचे रोगी तरी या रुग्णालयांत उपचाराकरतां पाठविण्यांत यावे. अशीं दोन रुग्णालयें उघडलीं गेलीं तर कितीतरी डॉक्टर्स आघाडीवर कामाकरतां पाठवितां येतील.' परंतु हें म्हणणें कांहीं त्या वैद्यकखात्याच्या वरिष्ठ आधिकाऱ्यास पटेना व इतरांची वरील योजनेला सहानुभूती असतांना याच्या एकट्याच्या विरोधामुळें ही योजना अंतिम फायद्याची असून तिला मूर्त स्वरूप येऊं शकलें नाहीं. याचें कारण एक तर असें असूं शकतें कीं, पाश्चात्य तें सर्वच चांगलें अशी आपल्या सर्वांच्या मनाची ठेवण झालेली असल्यामुळें एकाद्या सुसंबद्ध संघटनेंत आपण एकाद्या हिंदी पद्धतीचा अवलंब करूं शकतों ही कल्पनाच मनास कशीशी वाटूं लागते. दुसरें कारण म्हणजे पाश्चात्य पद्धतीनें एकाद्या शास्त्रांत पदवी मिळविलेले लोक हे, त्याच शास्त्राच्या हिंदी पद्धतीच्या पदवीधरांस आपल्यापेक्षां विद्वान् समजणें तर बाजूलाच राहो परंतु त्यांस बरोबरीचेही न मानतां हीन समजून तुच्छ लेखतात. उदाहरणार्थ, इंग्रजी भाषेंत पाश्चात्य पद्धतीनें, फिलॉसॉफी म्हणजे तत्त्वज्ञानशास्त्रांत जो पी. एच्. डी. ही पदवी मिळवील तो मात्र अगदीं विद्वान् पण जो काशीहून वेदान्त शिकून येईल तो अगदीं गावंढळ; या हिंदुस्थानांतील हलींच्या सुशिक्षितांच्या विचारसरणीनें हिंदुस्थानाचा फार घात केला आहे. याच विचारसरणीस अनुसरून पाश्चात्य पद्धतीनें तयार झालेल्या डॉक्टरवर्गास हिंदी वैद्यांस बरोबरीचें मानतांना किती मानसिक कष्ट पडत असतील याची कल्पनाच केलेली बरी. स्वातंत्र्य-चळवळींत अशा पाश्चात्यप्रेमी विचारसरणीस प्राधान्य देणें कधींच सुखावह होत नाहीं.

याच्या उलट जपानी लोकांची अथवा कोणत्याही स्वतंत्र राष्ट्राच्या लोकांची वृत्ति बघण्यासारखी असते. जपानचें तें सर्व चांगलें, योग्य आणि बरोबर असेंच प्रत्येक जपान्याचें ठाम मत असतें. आपल्या जेत्यांविषयीं खरा द्वेष आणि त्वेष आपल्या राष्ट्राच्या प्रत्येक व्यक्तींत उत्पन्न केला तरच त्या सर्वांचे हातून संघटित प्रयत्न होऊन शत्रूचें उच्चाटन होऊं शकेल. आपल्या शत्रूचे आचार, विचार, पोषाख, भाषा, शिष्टाचार, त्याच्या पद्धति या सर्व लोकांच्या मनांतून पार उतरवून टाकून त्या जागीं अखंड आणि अविरत अशा जोरदार चळवळीनें स्वदेशी गोष्टींबद्दल उत्कट प्रेमभाव उत्पन्न केला तरच त्या शत्रूचें उच्चाटन होणें शक्य आहे. एकाद्याबद्दल आदर, प्रेमभाव, ओलावा असला तर त्या व्यक्तास जोरानें थप्पड देण्याचें कार्य कोणाच्याही हातून होणें शक्य नाहीं. बहुतेक सुशिक्षित हिंदी माणसें, मग तीं अगदीं माननीय अशा देशभक्त श्रेणींतीलही कां असेनात, इंग्रजी भाषा, पोषाख, आचार, व्यवहार,

राहणी यांत इतकीं मुरलेलीं असतात कीं, त्यांस त्या जागीं हिंदी पद्धतीचा अवलंब करावयाचा म्हटलें कीं, अंगावर शहारे येतात. तें अशक्य कोटींतील वाटतें. याचा अनुभव पाहावयाचा असल्यास प्रत्येकानें, गंध लावून, टोपी घालून व धोतर नेसून, आपण कचेरींत गोऱ्या साहेबासमोर जाऊं का ? असा स्वतःस प्रश्न करावा. अर्थात् जे नेहमीं अशा तऱ्हेचा हिंदी पद्धतीचा पोषाख करितात किंवा आपल्या पूर्वींच्या चालीरीती बेधडकपणें पाळण्यास ज्यांस यत्किंचितही विषाद वाटत नाहीं त्यांच्याकरतां वरील प्रश्न नसून, ज्यांनीं नेहमीं 'पॅंट, नेकटाय, गुडमॉर्निंग व ऑफिस ' हेंच एक कोष्टक घोकलें आहे त्यांच्याकरतां तो आहे. वरील विचारसरणीमुळें स्वातंत्र्यसैन्याचें फार नुकसान झालें. वैद्यकीय लोकांची उणीव असली तरी चालेल परंतु हिंदी वैद्यांस स्वातंत्र्यसैन्यांत शिरूं देणार नाहीं, हाच नाहीं का पर्यायानें या अट्टाहासाचा अर्थ झाला ?

स्वातंत्र्यसैन्यांत डॉक्टरांच्या या उणीवेपेक्षांही औषधांची उणीव जास्त भासूं लागली व या क्षेत्रांत तर पाश्चात्य पद्धतीनें शिकलेल्या लोकांचे हातपाय अगदींच थंड पडले. 'ब्लड ट्रॅन्स्फ्यूजन्' वर म्हणजे दुसऱ्याच्या शरिरांतील रक्तावर जिवंत राहणाऱ्या माणसाप्रमाणें परदेशांतील कोष्टकें, वजनें, मापें व औषधें हीं मिळत राहिलीं तर हे डॉक्टर लोक उपचार करणार ! लढाईचे दिवसांत पाश्चात्य व पौर्वात्य राष्ट्रांत उघड वैमनस्य असल्यावर हीं औषधें, पश्चिम दिशेकडे डोळे लावून बसलें तरी तिकडून येणार कशीं व हे पाश्चात्य वैद्यकशास्त्रांत पारंगत असलेले लोक उपचार करणार कसे ? मग थोडें सलाइन त्यांत बरेंचसें पाणी, असा दूधवाल्यासारखा फसवाफसवीचा धंदा सुरू झाला ! आपल्या देशांतही वनस्पति उगवतात, त्यांचीही परिणामकारक औषधें होऊं शकतात; अर्थात् पाश्चात्य औषधें नाहींत तर निदान देशाच्या स्वातंत्र्याकरतां आपण आपल्या ज्ञानाचा ओघ या बाजूला वळवून, वैद्य लोकांचे मदतीनें या दिशेनें नेटानें प्रयत्न करून विपुल प्रमाणांत देशी औषधें तयार करून ठेवूं – अशी बुद्धि हिंदी स्वातंत्र्य-सैन्याच्या पाश्चात्य धाटणीच्या वैद्यकखात्यास मुळींच झाली नाहीं. वास्तविक कोणत्याही पद्धतीनें कां होईना शरिराच्या ठेवणीचें शास्त्रीय ज्ञान असलेला मनुष्य मनांत आणील तर आणि तितकी स्वतःच्या बांधवांच्या जिवाची, राष्ट्राच्या स्वातंत्र्याची व आपल्या धंद्याच्या महतीची त्यांस कळकळ वाटत असेल तर, तो चटकन् आपल्या ज्ञानसामर्थ्यानें सर्वस्वीं हिंदी पद्धतीनें आपलें ध्येय साध्य करण्यांत धन्य मानून घेईल. दुर्दैवानें असले प्रयत्न हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत झाले नाहींत. कांहीं सूज्ञ महाराष्ट्रीय डॉक्टरांनीं मात्र एक-दोन देशी औषधें अधून-मधून वापरलीं. एकंदरींत ज्या प्रमाणावर हा प्रयत्न व्हावयास पाहिजे होता त्या प्रमाणांत तो झाला नाहीं. स्वातंत्र्ययुद्ध याचा अर्थ एकट्या नेताजींनींच अथवा कांहीं निवडक सैनिकांनींच कळकळीनें लढावें असें नसून प्रत्येक खात्यांतील प्रत्येक माणसानें आपल्यावर सोंपविलेलें काम चोख करण्याची पराकाष्ठा केली पाहिजे.

हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत 'अँब्यूलन्सीस्'ची म्हणजे जखमी झालेल्या सैनिकांकरतां खास मोटारींची सोय मुळींच नव्हती. लढाईनंतर वेळ व संधी मिळेल त्याप्रमाणें जखमी लोकांस अंगाखांद्यावर किंवा सामानाच्या लॉऱ्यांतून आणावें लागे. रोग्यावर शस्त्रक्रिया करण्यास जरूर त्या बऱ्याचशा वस्तू फक्त सिंगापुरांतील स्वातंत्र्यसैन्याच्या मुख्य दवाखान्यांतच होत्या. आघाडीवर स्वातंत्र्यसैन्याचे एक-दोनच दवाखाने होते. त्यांत या सामुग्रीपैकीं बरींचशी उपलब्ध नव्हती. अशा तऱ्हेनें हा सर्व अगदीं गरिबीतील संसार होता, तरी स्वातंत्र्यसैनिकांनीं तें सर्व मुकाट्यानें व धैर्यानें सोसलें. नेताजी जेव्हां आघाडीवरील रुग्णालयांत जात तेव्हां हातापायांस भयंकर जखमा झालेले सैनिक क्लोरोफॉर्मच्या अभावीं तसेच हातापायांवर आनंदानें शस्त्रक्रिया करून घ्यावयास तयार असलेले त्यांस दिसत. जबर जखमी झालेले असलों तरी हरकत नाहीं, परंतु कसेंतरी बरे होऊन रुग्णालयांतून बाहेर पडलों कीं पुन्हां कधीं आपण आघाडीवर जाऊन शत्रूविरुद्ध लढूं शकूं, अशी कित्येकांस तळमळ लागलेली असे.

वैद्यकखात्यापुढील दुसरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे निकस अन्नानें होणाऱ्या सैनिकांच्या शक्तिक्षयाचा. प्रत्येकास पोटभर तांदूळ, दोन औंस मुगाची डाळ व चार औंस कुठली तरी भाजी हाच साडेचार वर्षें स्वातंत्र्यसैनिकांचा आहार असे. मांसाहार जवळजवळ सर्वसामान्य सैनिकांस लाभतच नसे असें म्हटलें तरी चालेल. कारण युद्धाच्या दिवसांत खाद्योपयोगी जनावरांचें उत्पादन व जोपासना धान्याचे अभावीं व माणसांचे अभावीं शक्यच नसते. आपल्याला रोजच्या आहारांत ( तुरीची ) डाळ, दहीं, दूध, तूप, कणीक, पालेभाज्या इत्यादि जिन्नस मिळतात. त्यामुळें अशा वस्तू रोजच्या आहारांत पुरेशा प्रमाणांत नसल्यामुळें किती घोर परिणाम होतात हें चटकन् आपल्या लक्षांत येणें शक्य नाहीं. तसेंच निकस अन्नानें माणसास क्षय होणें अथवा मृत्यू येणें या गोष्टी आपल्या परिचयांतील नाहींत. परंतु तिकडे आम्हां सर्वांस अनुभव आला तो असा कीं, सतत तीनचार वर्षें जर माणसानें भात, थोडी डाळ व एक कसली तरी म्हणजे रताळीं किंवा पडवळ असल्या प्रकारची भाजी एवढ्यावरच निर्वाह केला, गाईचें दूध, दहीं, तूप, कणीक ( बाजरी-ज्वारी-नाचणी ) इत्यादि वर्ज्य केलें तर त्यांस क्षय तरी लागतो किंवा ' बेरी बेरी ' नांवाचा रोग होतो व तो लवकरच मृत्यु पावतो. जेवण म्हणजे भूक शिलक न ठेवणें—कोणत्या तरी पदार्थानें पोट भरणें —हा अर्थ करणें ही घोडचूक होय. पोट पूर्ण भरल्यासारखें वाटलें नाहीं तरी चालेल, परंतु लोणी, दूध, दहीं, तूप यांसारखे स्निग्ध व गहूं, डाळ, नाचणी इत्यादींसारखे कसदार पदार्थ रोज शरिरांत जाणें आवश्यक आहे. हे जर कांहीं कालपर्यंत योग्य प्रमाणांत शरिरांत गेले नाहींत तर रोगण नसलेल्या फार ताण पडलेल्या तप्त यंत्राप्रमाणें हें शरीरयंत्रही लवकरच निकामी होतें. शरीरपोषणास आवश्यक तीं जीवनसत्त्वें कमी पडल्यामुळेंच ' बेरीबेरी ' रोग होतो.

राहणी यांत इतकीं मुरलेलीं असतात कीं, त्यांस त्या जागीं हिंदी पद्धतीचा अवलंब करावयाचा म्हटलें कीं, अंगावर शहारे येतात. तें अशक्य कोटींतील वाटतें. याचा अनुभव पाहावयाचा असल्यास प्रत्येकानें, गंध लावून, टोपी घालून व धोतर नेसून, आपण कचेरींत गोऱ्या साहेबासमोर जाऊं का? असा स्वतःस प्रश्न करावा. अर्थात् जे नेहमीं अशा तऱ्हेचा हिंदी पद्धतीचा पोषाख करितात किंवा आपल्या पूर्वींच्या चालीरीती बेधडकपणें पाळण्यास ज्यांस यत्किंचितही विषाद वाटत नाहीं त्यांच्याकरतां वरील प्रश्न नसून, ज्यांनीं नेहमीं 'पॅंट, नेकटाय, गुडमॉर्निंग व ऑफिस' हेंच एक कोष्टक घोकलें आहे त्यांच्याकरतां तो आहे. वरील विचारसरणीमुळें स्वातंत्र्यसैन्याचें फार नुकसान झालें. वैद्यकीय लोकांची उणीव असली तरी चालेल परंतु हिंदी वैद्यांस स्वातंत्र्यसैन्यांत शिरूं देणार नाहीं, हाच नाहीं का पर्यायानें या अट्टाहासाचा अर्थ झाला?

स्वातंत्र्यसैन्यांत डॉक्टरांच्या या उणीवेपेक्षांही औषधांची उणीव जास्त भासूं लागली व या क्षेत्रांत तर पाश्चात्य पद्धतीनें शिकलेल्या लोकांचे हातपाय अगदींच थंड पडले. 'ब्लड ट्रॅन्स्फ्यूजन्' वर म्हणजे दुसऱ्याच्या शरिरांतील रक्तावर जिवंत राहणाऱ्या माणसाप्रमाणें परदेशांतील कोष्टकें, वजनें, मापें व औषधें हीं मिळत राहिलीं तर हे डॉक्टर लोक उपचार करणार! लढाईचे दिवसांत पाश्चात्य व पौर्वात्य राष्ट्रांत उघड वैमनस्य असल्यावर हीं औषधें, पश्चिम दिशेकडे डोळे लावून बसलें तरी तिकडून येणार कशीं व हे पाश्चात्य वैद्यकशास्त्रांत पारंगत असलेले लोक उपचार करणार कसे? मग थोडें सलाइन त्यांत बरेंचसें पाणी, असा दूधवाल्यासारखा फसवाफसवीचा धंदा सुरू झाला! आपल्या देशांतही वनस्पति उगवतात, त्यांचींहीं परिणामकारक औषधें होऊं शकतात; अर्थात् पाश्चात्य औषधें नाहींत तर निदान देशाच्या स्वातंत्र्याकरतां आपण आपल्या ज्ञानाचा ओघ या बाजूला वळवून, वैद्य लोकांचे मदतीनें या दिशेनें नेटानें प्रयत्न करून विपुल प्रमाणांत देशी औषधें तयार करून ठेवूं – अशी बुद्धि हिंदी स्वातंत्र्य-सैन्याच्या पाश्चात्य धाटणीच्या वैद्यकखात्यास मुळींच झाली नाहीं. वास्तविक कोणत्याही पद्धतीनें कां होईना शरिराच्या ठेवणीचें शास्त्रीय ज्ञान असलेला मनुष्य मनांत आणील तर आणि तितकी स्वतःच्या बांधवांच्या जिवाची, राष्ट्राच्या स्वातंत्र्याची व आपल्या धंद्याच्या महतीची त्यांस कळकळ वांटत असेल तर, तो चटकन् आपल्या ज्ञानसामर्थ्यानें सर्वस्वीं हिंदी पद्धतीनें आपलें ध्येय साध्य करण्यांत धन्य मानून घेईल. दुर्दैवानें असले प्रयत्न हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत झाले नाहींत. कांहीं सूज्ञ महाराष्ट्रीय डॉक्टरांनीं मात्र एक-दोन देशी औषधें अधून-मधून वापरलीं. एकंदरींत ज्या प्रमाणावर हा प्रयत्न व्हावयास पाहिजे होता त्या प्रमाणांत तो झाला नाहीं. स्वातंत्र्ययुद्ध याचा अर्थ एकट्या नेताजींनींच अथवा कांहीं निवडक सैनिकांनींच कळकळीनें लढावें असें नसून प्रत्येक खात्यांतील प्रत्येक माणसानें आपल्यावर सोंपविलेलें काम चोख करण्याची पराकाष्ठा केली पाहिजे.

हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत 'अँब्यूलन्सीस्'ची म्हणजे जखमी झालेल्या सैनिकां-करतां खास मोटारींची सोय मुळींच नव्हती. लढाईनंतर वेळ व संधी मिळेल त्याप्रमाणें जखमी लोकांस अंगाखांद्यावर किंवा सामानाच्या लॉऱ्यांतून आणावें लागे. रोग्यावर शस्त्रक्रिया करण्यास जरूर त्या बऱ्याचशा वस्तू फक्त सिंगापुरांतील स्वातंत्र्यसैन्याच्या मुख्य दवाखान्यांतच होत्या. आघाडीवर स्वातंत्र्य-सैन्याचे एक-दोनच दवाखाने होते. त्यांत या सामुग्रीपैकीं बरीचशी उपलब्ध नव्हती. अशा तऱ्हेनें हा सर्व अगदीं गरिबीतील संसार होता, तरी स्वातंत्र्य-सैनिकांनीं तें सर्व मुकाट्यानें व धैर्यानें सोसलें. नेताजी जेव्हां आघा-डीवरील रुग्णालयांत जात तेव्हां हातापायांस भयंकर जखमा झालेले सैनिक क्लोरोफॉर्मच्या अभावीं तसेच हातापायांवर आनंदानें शस्त्रक्रिया करून घ्यावयास तयार असलेले त्यांस दिसत. जबर जखमी झालेले असलों तरी हरकत नाहीं, परंतु कसेंतरी बरे होऊन रुग्णालयांतून बाहेर पडलों कीं पुन्हां कधीं आपण आघा-डीवर जाऊन शत्रूविरुद्ध लढूं शकूं, अशी कित्येकांस तळमळ लागलेली असे.

वैद्यकखात्यापुढील दुसरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे निकस अन्नानें होणाऱ्या सैनिकांच्या शक्तिक्षयाचा. प्रत्येकास पोटभर तांदूळ, दोन औंस मुगाची डाळ व चार औंस कुठली तरी भाजी हाच साडेचार वर्षें स्वातंत्र्यसैनिकांचा आहार असे. मांसाहार जवळजवळ सर्वसामान्य सैनिकांस लाभतच नसे असें म्हटलें तरी चालेल. कारण युद्धाच्या दिवसांत खाद्योपयोगी जनावरांचें उत्पादन व जोपा-सना धान्याचे अभावीं व माणसांचे अभावीं शक्यच नसते. आपल्याला रोजच्या आहारांत ( तुरीची ) डाळ, दहीं, दूध, तूप, कणीक, पालेभाज्या इत्यादि जिन्नस मिळतात. त्यामुळें अशा वस्तू रोजच्या आहारांत पुरेशा प्रमाणांत नसल्यामुळें किती घोर परिणाम होतात हें चटकन् आपल्या लक्षांत येणें शक्य नाहीं. तसेंच निकस अन्नानें माणसास क्षय होणें अथवा मृत्यू येणें या गोष्टी आपल्या परिचयां-तील नाहींत. परंतु तिकडे आम्हां सर्वांस अनुभव आला तो असा कीं, सतत तीन-चार वर्षें जर माणसानें भात, थोडी डाळ व एक कसली तरी म्हणजे रताळीं किंवा पडवळ असल्या प्रकारची भाजी एवढ्यावरच निर्वाह केला, गाईचें दूध, दहीं, तूप, कणीक ( बाजरी-ज्वारी-नाचणी ) इत्यादि वर्ज्य केलें तर त्यांस क्षय तरी लागतो किंवा 'बेरी बेरी' नांवाचा रोग होतो व तो लवकरच मृत्यु पावतो. जेवण म्हणजे भूक शिल्लक न ठेवणें—कोणत्या तरी पदार्थानें पोट भरणें —हा अर्थ करणें ही घोडचूक होय. पोट पूर्ण भरल्यासारखें वाटलें नाहीं तरी चालेल, परंतु लोणी, दूध, दहीं, तूप यांसारखे स्निग्ध व गहूं, डाळ, नाचणी इत्यादींसारखे कसदार पदार्थ रोज शरिरांत जाणें आवश्यक आहे. हे जर कांहीं कालपर्यंत योग्य प्रमाणांत शरिरांत गेले नाहींत तर रोगण नसलेल्या फार ताण पडलेल्या तप्त यंत्राप्रमाणें हें शरीरयंत्रही लवकरच निकामी होतें. शरीर-पोषणास आवश्यक तीं जीवनसत्त्वें कमी पडल्यामुळेंच 'बेरीबेरी' रोग होतो.

या 'बेरीबेरी' रोगानें एका महिन्यांत दोन हजार स्वातंत्र्यसैनिक पछाडले. दूरपूर्वेत डाळ मिळणें फार कठीण होऊन बसलें होतें. बाजारांत डाळ विपुल प्रमाणांत होती. परंतु ती डाळ भरमसाट किंमतीनें विकतां यावी म्हणून व्यापाऱ्यांनीं सर्व सांठा दडवून ठेविला होता. त्याचा पत्ता लागून योग्य भावांत डाळ मिळणें दुरापास्त होतें. दुसरा डाळीचा मोठा सांठा इंडोचायनांत होता. तेथें हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या पुरवठा-खात्यानें मध्यवर्ती कचेरीच्या आज्ञेवरून डाळीचा मोठा सांठा केलेला होता. परंतु ती डाळ तेथून मलाया व सिंगापुरांतील स्वातंत्र्यसैनिकाकरतां आणणें जवळ जवळ अशक्यच होतें. बोट तर त्याकाळांत मिळतच नसे. आगगाडीनें आणावी म्हणावें तर सयाम-ब्रह्मदेश या नवीन तयार केलेल्या लोहमार्गावर जपान्यांनीं मलायांतील बरेच आगगाडीचे डबे नेल्यामुळें उरलेले डबे त्यांच्याच फौजी वाहतुकीस पुरेसे नव्हते. अर्थात् आगगाडीनेंही ती डाळ सिंगापुरांत आणतां आली नाहीं. इकडे तर सिंगापुरांतील डाळीचा सांठा संपत आला. शेवटीं दर सैनिकामागें रोजच्या स्वयंपाकांत घेण्यांत येणाऱ्या दोन औंस डाळीऐवजीं एक एक औंसच डाळ घेण्यांत यावी असें ठरलें. ज्या महिन्यांत हें प्रमाण कमी झालें त्या महिन्यांत 'बेरीबेरी' ची साथ पसरून स्वातंत्र्यसैन्यांतील सैनिक पटापट मृत्युमुखीं पडूं लागले. या संकटामुळें तांतडीची कांहींतरी उपाययोजना करण्यास अधिकाऱ्यांची धांवपळ सुरू झाली. रोजच्या आहारांतील डाळीची कमतरता भरून काढण्याकरतां वाटेल ती किंमत देऊन व दूरच्या खेड्यापाड्यांत मोटारलॉऱ्या पाठवून दर सैनिकास रोजचें एक कागदी लिंबू, एक अंडें, चार औंस पालेभाजी या प्रमाणांत या वस्तू पुरविण्याची व्यवस्था झाली व आश्चर्य हें कीं, त्या रोगाचें प्रमाण एकदम कमी झालेलें दिसून आलें. नाहींतर पांच-सहा महिन्यांत हाहाःकार उडाला असता. या मार्गाशिवाय दुसराही एक त्वरित व बिनखर्ची उपाय असतो, तो म्हणजे सर्व सैनिकांचा चहा अजिबात बंद करून, तंबाखू ओढणें, दारू पिणें इत्यादि व्यसनें थांबविणें हा होय. गिरणींत चकाकी दिलेला तांदूळ न खातां हातानें कांडलेला तांदूळ खाणें व भात शिजवतांना भातांतील पेज काढून न टाकणें हेंही आवश्यक आहे. परंतु हे उपाय लागू करण्यास स्वत: अधिकारी व्यसनातीत असले पाहिजेत; तरच ते असले उपाय सक्तीनें अंमलांत आणूं शकतात. परंतु वरिष्ठ अधिकाऱ्यांत सैनिकांच्या अंतिम फायद्याच्या दृष्टीनें असले ध्येयवादी व बिनखर्चाचे उपाय सक्तीनें अंमलांत आणण्याचें एकाच्याही मनांत आलें नाहीं. नवीन पौष्टिक वस्तू शोधण्याचा त्रास व खर्च सोसण्याच्या अगोदर चहा, तंबाखू, दारू इत्यादि व्यसनांनीं, मिळत असलेल्या जीवनसत्त्वांचाच आपण नाश करीत आहोंत, हें लक्षांत येऊन त्याची उपाययोजना अगोदर व्हावयास पाहिजे. तशी ती झाली असती तर कितीतरी फायदा झाला असता. परंतु पैसा, अधिकार, सत्ता यांच्या जोडीला ध्येयवादीपणाचें प्रमाण

बहुधा शून्यच असतें. जे अधिकारी स्वतः चहा-सिगारेट व मदिराप्राशन करीत ते अशा गोष्टींस बंदी करण्याचें एक तर मनांत आणणार नाहींत किंवा त्यांच्या मनांत आलें तरी स्वतःच्या मनोदौर्बल्यामुळें त्यांच्या हातून आवश्यक त्या कडक उपायांची अंमलबजावणी होणें शक्य नाहीं. आपल्या राष्ट्रीय व खाजगी जीवनांत या पूर्वानुभवाचा योग्य फायदा करून घेऊन आपण प्रगति-पथावर दर वेळेस पुढें पुढें पाऊल टाकीत गेलें पाहिजे.

हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या मध्यवर्ती कचेरींतील नोंदणी खात्यांत एकूण-एक स्वातंत्र्यसैनिकांची संपूर्ण माहिती असलेलीं पत्रकें भरून ठेवलेलीं होतीं. पूर्वींचा ( इंग्रजप्रणीत हिंदी सैन्यांतील ) हुद्दा व भरतीची तारीख लक्षांत घेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यापासून साध्या शिपायापर्यंत प्रत्येकाचा दर्जा दर्शविणारी सर्व सैनिकांची यादी छापून तयार करण्यांत आली होती. एकाद्या इसमास पूर्वी ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं दिलेला कनिष्ठ वा वरिष्ठ दर्जा हाच स्वातंत्र्यसैन्यांत प्रमाण मानण्यांत आला. डॉक्टर लोकांस ब्रिटिशांच्या पद्धतीनें एकदम वरिष्ठ दर्जा देण्याची घातुक प्रथा कायम ठेवण्यांत आली. डॉक्टरांच्याच तोलाचें परंतु अन्य शाखेचें महाविद्यालयीन शिक्षण घेतलेल्यास मात्र साधा शिपाई म्हणून घेतलें जाई. किंवा फार तर अधिकारी तयार करण्याच्या लष्करी शाळेंत तो निवडला जाऊन त्यानें तेथील शिक्षणक्रम पुरा केला तर त्यास सेकंड लेफ्टनंटच्या हुद्यावर घेण्यांत येई. याच्या उलट, डॉक्टर कसल्याही प्रकारचें लष्करी शिक्षण घेतल्याशिवाय एकदम मेजरच्या हुद्यावर चढविला जाई. ब्रिटिश पद्धती-प्रमाणेंच स्वातंत्र्यसैन्यांत भरतीच्या तारखेनें व आपल्या हुद्यानें वरिष्ठ असलेला इसम कितीही मूर्ख किंवा अयोग्य असला तरी वरच्या हुद्यावर चढेपर्यंत खालच्यास तो हुद्दा मिळणें अशक्य करून ठेविलें होतें.

हिंदी स्वातंत्र्य-सरकाराच्या नेमणुका, बदल्या इत्यादि घोषित करणाऱ्या सरकारी पत्रकाप्रमाणेंच हिंदी स्वातंत्र्यसैन्याचेंही फौजी पत्रक निघे. त्यांत फौजी गुन्हेगारांस झालेल्या शिक्षा, सैनिकांच्या बढत्या, नेताजी, जनरल भोसले अथवा केंद्रकचेरींतील इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांचीं आज्ञापत्रकें, नवीन वटहुकूम, कायदे, नेमणुकी, बदल्या वगैरे विषय असत. स्वातंत्र्य-सरकाराच्या पत्रकांत वर नमूद केलेल्या गोष्टींशिवाय हिंदी स्वातंत्र्य-सरकाराकडून वेळोवेळीं इतर राष्ट्रांच्या परराष्ट्रमंत्र्यांस वा अन्य अधिकाऱ्यांस गेलेल्या किंवा इतरांच्याकडून हिंदी स्वातंत्र्य-सरकारास किंवा नेताजींस आलेल्या तारा, शुभ संदेश, इत्यादि असत.

स्वातंत्र्यसैन्यास आरमार व हवाईदल या बाबतींत सर्वस्वीं जपान्यांवरच अवलंबून राहावें लागत असे. अर्थात् आरमाराचें स्वातंत्र्यसैन्यास कधीं काम लागलेंच नाहीं. नाहीं म्हणावयास हिंदुस्थानाच्या पश्चिम किनाऱ्यावर अंतर्गत गुप्त कामगिरी करावयास जे लोक सोडण्यांत आले ते मात्र जपान्यांच्या पाण-बुड्यांतून सोडण्यांत आले. नंतर जर हिंदी स्वातंत्र्ययुद्धास रंग चढला

असता तर हिंदुस्थानाच्या किनाऱ्यावर सैन्य उतरविण्यास जपान्यांच्या आरमाराची मदत घ्यावी लागली असती. परंतु तशी वेळ दुर्दैवानें कधीं आलीच नाहीं. हवाई हल्ल्यांच्या बाबतींत जपानी हवाईदल हें त्यांच्या तंत्राप्रमाणें व सोईप्रमाणें हवाई हल्ले करीत असे.

कित्येकजण असें विचारतात कीं, स्वातंत्र्यसैन्यास शस्त्रास्त्रें व इतर युद्धसामुग्री जपान्यांकडून मिळत असे का? प्रत्येक राष्ट्राची शस्त्रास्त्रसामुग्री एका विशिष्ट नमुन्याची आणि मापाची असते. कपडेलत्ते, बूट, इत्यादि जपानी सामुग्री तर हिंदी सैनिकांच्या देहाच्या मानानें लहानच पडत असे. शस्त्रास्त्रांत कितीही सारखेपणा असला तरी एका विशिष्ट प्रकारचीं शस्त्रास्त्रें वापरण्याची संवय झालेली असली म्हणजे तींच हाताळण्याची संवय आणि आवड उत्पन्न होते. परस्परांचे सुटे भागही एकमेकांस बसत नाहींत. म्हणून जपानी शस्त्रास्त्रें, मोटारलॉऱ्या, कपडेलत्ते हे जपानी सैनिक त्यांच्याच देशांत तयार झालेले वापरीत. इंग्रजांच्या मलाया, सिंगापूर, ब्रह्मदेश या टापूंत शस्त्रास्त्रें व इतर युद्धसामुग्री यांची नुसती लयलूट होती. एकट्या सिंगापुरांतच ९२००० युद्धबंदी शरण गेले, तेव्हां निदान प्रत्येकाची एक एक या हिशेबानें ९२००० बंदुकी, २००-३०० तोफा, मैदानेंच्या मैदानें क्षितिजापर्यंत आटोकाट भरतील, अशा हजारोंनीं मोजण्याइतक्या सर्व तऱ्हेच्या लहानमोठ्या मोटारी, मोटारलॉऱ्या व बसेस्, पांच-सहा वर्षे पुरेल इतका पर्वताच्या विस्तीर्ण भुयारांतील दारूगोळा, कपड्यालत्त्याचे अनेक ढीग अशी युद्धसामुग्री जपान्यांच्या हातांत पडली. यांतलीच आवश्यक तेवढी त्यांनीं हिंदी स्वातंत्र्यसैन्यास पुरविली. यामुळें हिंदी स्वातंत्र्यसैन्याला जपानी पद्धतीचीं शस्त्रास्त्रें आणि इतर युद्धसामुग्री वापरावी लागली नाहीं. जपानीही स्वतःच्याच बंदुका, तोफा इत्यादि वापरण्यांत खूष असत. अर्थात् दोघांनाही परस्परांची भिन्नभिन्न शस्त्रास्त्रें हाताळण्याची संवय करावयास विनाकारण वेळ दवडावा लागला नाहीं.

स्वातंत्र्यसैन्याजवळ बंदुका, तोफा (साध्या आणि विमानविरोधक), लहानसर रणगाडे आणि चिलखती गाड्या यांशिवाय कांहीं आधुनिक प्रकारची अवाढव्य युद्धसामुग्री मुळींच नव्हती. या सुटसुटीत व सामान्य साहित्याच्या जोरावरच त्यांनीं इंफालपर्यंतचे विजय मिळविले. जपान्यांनीं स्वतःच्या सैन्याच्या बाबतींतही हेंच धोरण ठेवलें होतें. जपानी फौजी तज्ज्ञांच्या मतें पायदळास किंवा खुष्कीवरील फौजेस जितका जामानिमा कमी द्यावा, त्यांस जितकी साधी अथवा जुन्या पद्धतीची युद्धसामुग्री किंवा शस्त्रास्त्रें द्यावीत, तितक्या शौर्यानें ती फौज लढूं शकेल. जाड चिलखत व अद्यावत् बचावाचीं साधनें दिलीं म्हणजे सैनिक भ्याड बनतात किंवा ते जीव बचावण्याचा प्रयत्न करितात असा त्यांचा अनुभव आहे.

सकाळीं ६ वाजतां उठून, प्रातर्विधी आटोपून व चहा वगैरे घेऊन

सैनिकांनीं आपापल्या बराकींत आपलें सामान एका ओळींत व्यवस्थित ठेवण्याची एक पद्धत असते. तें झाल्यावर आजारी सैनिकांशिवाय इतर सर्व सैनिक सकाळच्या सांघिक व्यायामास जात. या व्यायामानंतर कवाईत झाल्यावर प्रत्येक तुकडीच्या विशिष्ट शस्त्रास्त्रांचा – म्हणजे तोफखान्याच्या लोकांनीं तोफांचा, बंदूकधारी तुकड्यांनीं बंदूक व संगिनीच्या उपयोगाचा, रणगाडेवाल्या तुकडींतील सैनिकांनीं रणगाड्यांच्या हालचालीचा–अभ्यास सुमारें १२ वाजेपर्यंत चालत असे. १२ वाजल्यावर जेवणाकरतां तास दोन तास सुट्टी असे व त्यानंतर हिंदुस्थानी भाषा शिकणें, नकाशाचा उपयोग करावयास शिकणें इत्यादि विषय चालत. स्वदेशाकरतां आनंदानें प्राण देण्याची प्रत्येक सैनिकाची तयारी व्हावी अशा तऱ्हेचें बौद्धिक शिक्षण विशेषत: दुपारीं दिलें जाई. अधूनमधून लटुपटीच्या लढाईसाठीं प्रत्येक तुकडी दूर, रानांतील मोकळ्या जागीं जाऊन व्यूह रचणें, डावपेंच करणें, तुकडीची हालचाल करणें, हल्ला करणें वगैरे गोष्टींचा प्रयोग करी. नेताजी सिंगापुरांत असतांना मधूनच कधींतरी निरनिराळ्या तुकड्यांची व छावण्यांची पाहणी करावयास येत त्या वेळेस ते सैनिकांचें लष्करी शिक्षण, त्यांच्या लटुपटीच्या लढाया, सैनिकांची राहणी व आहार यांची बारकाईनें पाहणी करून आस्थेनें चौकशी करीत. नेताजीबद्दल स्वातंत्र्य-चळवळींतील प्रत्येक व्यक्तीच्या मनांत उत्कट प्रेमभाव वसत असे व ते येतांच कोणतीही व्यक्ती आपलीं सर्व शारिरीक वा मानासिक दु:खें विसरून जात असे. पाहणी करून गेल्यावर सैनिकांच्या राहणींत व आहारांत जीं न्यूनें दिसतील त्यांची दुरुस्ती करविण्यांत ते मुळींच विलंब लावीत नसत. अधूनमधून कधीं अधिकारीवर्गापुढें तर कधीं सर्व सैनिकांपुढें, कधीं लष्करी अधिकाऱ्यांच्या शाळेंतील भावी अधिकाऱ्यांपुढें, केव्हां लष्करी शिक्षणकेंद्रांतील रिक्रूटांपुढें प्रसंगाप्रसंगानें ते व्याख्यानें देत. त्यांचा प्रत्येक शब्द अंत:करणांतील तीव्र धगधगींत तावून सुलाखून बाहेर निघत असल्यानें हृदयाचा ठाव घेत असे.

हिंदी सैनिकांचा पोषाख म्हणजे गुडघ्यापर्यंतची खाकी चड्डी, अर्ध्या बाह्यांचा खाकी सदरा, डोक्यावर खाकी कापडाची घडीची टोपी, टोपीवर हिंदुस्थानाचा नकाशा कोरलेला व तीवर विश्वास, एकता आणि स्वार्थत्याग असे ध्येयवादी शब्द असलेलें एक काळ्या पत्र्याचें चिन्ह, उजवे बाजूस छातीवर लावलेलें पत्र्याचें एक गोल तिरंगी चिन्ह, पायांत मोजे आणि लांब बूट, असा असे.

स्वातंत्र्यसैन्याच्या कवाइतींतील व इतर वेळच्या सर्व आज्ञा हिंदुस्थानी भाषेंतच असत. तथापि इंग्रजी वाक्प्रचाराचें कित्येक वेळां शब्दश: भाषांतर केल्याचें आढळून येई. परंतु हें काम अयोग्य माणसांच्या हातीं सोपवून घाईघाईनें करण्यांत आल्यामुळें कित्येक शब्द वेडेवांकडे तर कांहींना योग्य हिंदुस्थानी प्रतिशब्द असतांना ते तसेच इंग्रजींतून उचललेले असत. उदाहरणार्थ,

'रायफल' या शब्दाला 'बंदूक' हा प्रतिशब्द असतांना दर वेळेस तो शब्द तसाच वापरण्यांत येत असे. थोडे दिवस कां होईना परंतु एकदां रूढ झालेली प्रथा बदलावयाच्या भानगडींत सहसा कोणी पडत नसे.

अधिकाऱ्यांचा पोषाख म्हणजे लांब खाकी विजार, खाकी बुशशर्ट, घडीची खाकी टोपी, पायांत मोजे व नेहमींचे बूट असा असे. त्यांच्या हुद्याची निदर्शक अशीं चिन्हें त्यांच्या खांद्यांवर असत. इतर छातीवरील आणि टोपीवरील चिन्हेंही नेताजींपासून साध्या सैनिकांपर्यंत सर्वांस सारखींच असत. कांहीं वरिष्ठ अधिकारी ब्रीचेस् (खालपासून गुडघ्यापर्यंत घट्ट व मांड्यांशीं फुगीर असलेल्या, घोड्यावर बसण्याच्या विजारी) व त्यावर आरी लावलेले गुडघ्यापर्यंतचे लांब बूट घालीत.

जपानी सैन्यांत प्रत्येक सैनिक आपल्या सर्व वरिष्ठांस ते दिसतील तेथें येतां-जातां सलाम करतो अथवा बोडका असल्यास नुसता त्यांच्यासमोर मान लववून जातो. हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत मात्र इंग्रजी प्रथेप्रमाणें सेकंड लेफ्टनंटपासून तों वरच्या सर्व अधिकाऱ्यांस सर्व कनिष्ठांनीं सलाम करावा आणि त्या दर्जाच्या खालच्या सैनिकांस कोणीही सलाम करण्याची आवश्यकता नाहीं, अशी प्रथा ठेवण्यांत आलेली होती. बोडकें असल्यावर सलाम न करितां केवळ 'जयहिंद' म्हणून तोंडानें अभिवादन करण्याची पद्धत होती. सलाम करतांनासुद्धां दर वेळेस जयहिंद हें म्हणावें लागे. फौजी प्रथेप्रमाणें सेकंड लेफ्टनंटपासूनच्या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांस भेटतांना अथवा त्यांचा निरोप घेतांना किंवा त्यांच्या समोरून जातां-येतांना त्यांस सलाम करावा लागतो. इंग्रजी सैन्यांत, विशेषत: त्यांच्या हिंदी सैन्यांत हें अभिवादन मूक अभिवादनच असतें. फारतर सुशिक्षित अधिकारी आपल्या वरिष्ठांस 'गुडमॉर्निंग' असें विलायती थाटाचें अभिवादन करतात; परंतु स्वातंत्र्य-चळवळींत कोणीही कोणास भेटो अथवा कोणाचाही निरोप घेवो, 'जयहिंद' हा एकच प्रघात होता. हें अभिवादन फारच लोकप्रिय ठरलें.

स्वातंत्र्यसैन्यांतील भंगी, न्हावी, धोबी, कारकून, डॉक्टर, पुरवठा-खात्याचे लोक, मोटार वाहतूक तुकड्यांतील वाहक आणि यंत्रतज्ज्ञ यांस सकाळ-संध्याकाळ त्यांचें त्यांचें असें विशिष्ट काम असल्यामुळें त्यांस कवाईत, शस्त्रास्त्रांचा अभ्यास वगैरे रोज करावा लागत नसे. परंतु स्वातंत्र्यसैन्यांतील प्रत्येक सैनिक स्वरक्षणक्षम व वेळ पडल्यास शत्रूशीं दोन हात करावयास तयार असावा, म्हणून यांसही दर तीन-चार महिन्यांनीं पंधरा दिवस सकाळीं अथवा संध्याकाळीं शस्त्रास्त्रांचें व कवाइतीचें प्राथमिक शिक्षण देत.

दर रविवारीं, सणावारीं आणि राष्ट्रीय उत्सवांचे दिवशीं सैनिकांस सुट्टी असे. त्या दिवशीं दुपारचे तीन-चार तास गांवांत फिरून येण्याची त्यास परवानगी असे. नेताजींचा जन्मदिवस : २३ जानेवारी, स्वातंत्र्यदिन : २६ जानेवारी, नेताजींचें सिंगापुरांत आगमन : २ जुलै, जालियनवालाबाग-दिन : १३ एप्रिल,

महात्माजींचा जन्मदिन : २ ऑक्टोबर, स्वातंत्र्य-सरकार स्थापनेचा दिवस : २१ ऑक्टोबर; दसरा, दिवाळी, मोहरम, वैशाखी (वैशाख शु॥ १ : शिखांचा सण) नाताळ इत्यादि हिंदु, मुसलमान, शीख, ख्रिश्चन यांचे सणवार अशा सर्वसाधारणपणें वर्षांतून स्वातंत्र्यसैनिकांस सुट्या असत. त्या त्या दिवशीं ते आपापले बरेच दिवसांचे सांठलेले कपडे धुणें, दुसऱ्या छावण्यांत असलेल्या व गांवांतील आप्तेष्टांस भेटणें, एकादा चित्रपट पाहून येणें असा कार्यक्रम करीत. अशा सुट्टीच्या दिवशीं त्यांच्या जेवणांतसुद्धां बदल म्हणून कांहीं निराळे पदार्थ केले जात.

नेताजींचा वाढदिवस, सिंगापुरांतील त्यांच्या आगमनाचा दिवस, स्वातंत्र्य-सरकार स्थापनादिन, नववर्षदिन (जानेवारी १ आंतरराष्ट्रीय महत्त्वामुळें), अशा दिवशीं हिंदी स्वातंत्र्य-सरकारातर्फे इतर राष्ट्रांच्या म्हणजे जपान, जर्मनी इत्यादींच्या प्रतिनिधींस व वरिष्ठ अधिकाऱ्यांस खाना देण्यांत येत असे. हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या मध्यवर्ती केन्द्र कचेरीतर्फे व स्वातंत्र्यसंघातर्फेही नेहमीं ज्यांच्याशीं काम पडे अशा जपानी व इतर अधिकाऱ्यांस खाना देण्याचा प्रघात पाडलेला होता. त्यांच्या उत्सवप्रसंगीं म्हणजे बादशाहाच्या वाढदिवसाचे दिवशीं, डिसेंबर ८ तारखेस त्यांनीं युद्धघोषणा केली त्या दिवशीं, वर्षारंभाच्या दिवशीं वगैरे जपानीही हिंदी स्वातंत्र्य-चळवळींतील अनेक श्रेष्ठींस पाचारण करीत. अशा वेळेस चारशें-पांचशें पाहुणे निमंत्रित असत. अशा प्रसंगीं उभय पक्षांच्या श्रेष्ठींचीं भाषणें होत. ध्येयपूर्ति होईतों सर्व संकटांना तोंड देऊन लढण्याचा व एकमेकांस पूर्ण मदत करण्याचा निर्धार उभय पक्षांकडून प्रकट केला जाई.

जर्मन राष्ट्राचा संबंध दूरपूर्वेत फक्त आरमारापुरताच मर्यादित होता. सिंगापुरांत जर्मन पाणबुड्यांचा कायमचा तळ असे. येथून पॅसिफिक महासागरांत न्यूझीलंडपर्यंत व हिंदी महासागरांत मादागास्करपर्यंत या पाणबुड्या संचार करीत व शत्रूचीं जहाजें बुडवून परत येत. त्यांचे बरेचसे नाविक अधिकारी व दर्यासैनिक सिंगापुरांत कायमचे राहात असत. त्यांची एक वेगळी छावणी होती. इटालियन लोकांचीही एक छावणी होती, परंतु त्यांचा आमचा कधींच संबंध आला नाहीं, किंबहुना तसा संबंध घडवून आणण्याची स्वातंत्र्यसैन्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं मुळींच प्रयत्न केला नाहीं. मात्र जर्मन अधिकाऱ्यांची आम्ही आपण होऊन मैत्री संपादन केली. जर्मन राष्ट्राचा आरमारी-प्रतिनिधि सिंगापुरांत कायमचा असे. क्वचित् पेनांग, बँकॉक, मलाका वगैरे. दूरपूर्वेतील बंदरांस भेट देऊन त्याला आपल्या आरमाराची पाहणी करावी लागे. परंतु त्याचें मुख्य ठिकाण सिंगापूर हेंच होतें. तो एक नाविकदलाचा प्रतिनिधि व आम्ही खुष्की फौजेचे प्रतिनिधि या दृष्टीनें आम्ही सरकारीरीत्या प्रातिनिधिक स्वरूपांत एकमेकांस भेटत नव्हतों. परंतु आंतरराष्ट्रीय मित्र या दृष्टीनें अनौपचारिकरीत्या आम्ही

' रायफल ' या शब्दाला ' बंदूक ' हा प्रतिशब्द असतांना दर वेळेस तो शब्द तसाच वापरण्यांत येत असे. थोडे दिवस कां होईना परंतु एकदां रूढ झालेली प्रथा बदलावयाच्या भानगडींत सहसा कोणी पडत नसे.

अधिकाऱ्यांचा पोषाख म्हणजे लांब खाकी विजार, खाकी बुशशर्ट, घडीची खाकी टोपी, पायांत मोजे व नेहमींचे बूट असा असे. त्यांच्या हुद्याची निदर्शक अशीं चिन्हें त्यांच्या खांद्यांवर असत. इतर छातीवरील आणि टोपीवरील चिन्हेंही नेताजींपासून साध्या सैनिकांपर्यंत सर्वांस सारखींच असत. कांहीं वरिष्ठ अधिकारी ब्रीचेस् ( खालपासून गुडघ्यापर्यंत घट्ट व मांड्यांशीं फुगीर असलेल्या, घोड्यावर बसण्याच्या विजारी ) व त्यावर आरी लावलेले गुडघ्यापर्यंतचे लांब बूट घालीत.

जपानी सैन्यांत प्रत्येक सैनिक आपल्या सर्व वरिष्ठांस ते दिसतील तेथें येतां-जातां सलाम करतो अथवा बोडका असल्यास नुसता त्यांच्यासमोर मान लववून जातो. हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत मात्र इंग्रजी प्रथेप्रमाणें सेकंड लेफ्टनंटपासून तों वरच्या सर्व अधिकाऱ्यांस सर्व कनिष्ठांनीं सलाम करावा आणि त्या दर्जाच्या खालच्या सैनिकांस कोणीही सलाम करण्याची आवश्यकता नाहीं, अशी प्रथा ठेवण्यांत आलेली होती. बोडकें असल्यावर सलाम न करितां केवळ 'जयहिंद' म्हणून तोंडानें अभिवादन करण्याची पद्धत होती. सलाम करतांनासुद्धां दर वेळेस जयहिंद हें म्हणावें लागे. फौजी प्रथेप्रमाणें सेकंड लेफ्टनंटपासूनच्या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांस भेटतांना अथवा त्यांचा निरोप घेतांना किंवा त्यांच्या समोरून जातां-येतांना त्यांस सलाम करावा लागतो. इंग्रजी सैन्यांत, विशेषत: त्यांच्या हिंदी सैन्यांत हें अभिवादन मूक अभिवादनच असतें. फारतर सुशिक्षित अधिकारी आपल्या वरिष्ठांस 'गुडमॉर्निंग' असें विलायती थाटाचें अभिवादन करतात; परंतु स्वातंत्र्य-चळवळींत कोणीही कोणास भेटो अथवा कोणाचाही निरोप घेवो, ' जयहिंद ' हा एकच प्रघात होता. हें अभिवादन फारच लोकप्रिय ठरलें.

स्वातंत्र्यसैन्यांतील भंगी, न्हावी, धोबी, कारकून, डॉक्टर, पुरवठा-खात्याचे लोक, मोटार वाहतूक तुकड्यांतील वाहक आणि यंत्रतज्ज्ञ यांस सकाळ-संध्याकाळ त्यांचें त्यांचें असें विशिष्ट काम असल्यामुळें त्यांस कवाईत, शस्त्रास्त्रांचा अभ्यास वगैरे रोज करावा लागत नसे. परंतु स्वातंत्र्यसैन्यांतील प्रत्येक सैनिक स्वरक्षणक्षम व वेळ पडल्यास शत्रूशीं दोन हात करावयास तयार असावा, म्हणून यांसही दर तीन-चार महिन्यांनीं पंधरा दिवस सकाळीं अथवा संध्याकाळीं शस्त्रास्त्रांचें व कवाइतीचें प्राथमिक शिक्षण देत.

दर रविवारीं, सणावारीं आणि राष्ट्रीय उत्सवांचे दिवशीं सैनिकांस सुट्टी असे. त्या दिवशीं दुपारचे तीन-चार तास गांवांत फिरून येण्याची त्यास परवानगी असे. नेताजींचा जन्मदिवस : २३ जानेवारी, स्वातंत्र्यदिन : २६ जानेवारी, नेताजींचें सिंगापुरांत आगमन : २ जुलै, जालियनवालाबाग-दिन : १३ एप्रिल,

महात्माजींचा जन्मदिन : २ ऑक्टोबर, स्वातंत्र्य-सरकार स्थापनेचा दिवस : २१ ऑक्टोबर; दसरा, दिवाळी, मोहरम, वैशाखी ( वैशाख शु॥ १ : शिखांचा सण ) नाताळ इत्यादि हिंदु, मुसलमान, शीख, ख्रिश्चन यांचे सणवार अशा सर्वसाधारणपणें वर्षातून स्वातंत्र्यसैनिकांस सुट्ट्या असत. त्या त्या दिवशीं ते आपापले बरेच दिवसांचे सांठलेले कपडे धुणें, दुसऱ्या छावण्यांत असलेल्या व गांवांतील आप्तेष्टांस भेटणें, एकादा चित्रपट पाहून येणें असा कार्यक्रम करीत. अशा सुट्टीच्या दिवशीं त्यांच्या जेवणांतसुद्धां बदल म्हणून कांहीं निराळे पदार्थ केले जात.

नेताजींचा वाढदिवस, सिंगापुरांतील त्यांच्या आगमनाचा दिवस, स्वातंत्र्य-सरकार स्थापनादिन, नववर्षदिन ( जानेवारी १ आंतरराष्ट्रीय महत्त्वामुळें ), अशा दिवशीं हिंदी स्वातंत्र्य-सरकारातर्फे इतर राष्ट्रांच्या म्हणजे जपान, जर्मनी इत्यादींच्या प्रतिनिधींस व वरिष्ठ आधिकाऱ्यांस खाना देण्यांत येत असे. हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या मध्यवर्ती केन्द्र कचेरीतर्फे व स्वातंत्र्यसंघातर्फेही नेहमीं ज्यांच्याशीं काम पडे अशा जपानी व इतर अधिकाऱ्यांस खाना देण्याचा प्रघात पाडलेला होता. त्यांच्या उत्सवप्रसंगीं म्हणजे बादशाहाच्या वाढदिवसाचे दिवशीं, डिसेंबर ८ तारखेस त्यांनीं युद्धघोषणा केली त्या दिवशीं, वर्षारंभाच्या दिवशीं वगैरे जपानीही हिंदी स्वातंत्र्य-चळवळींतील अनेक श्रेष्ठींस पाचारण करीत. अशा वेळेस चारशें-पांचशें पाहुणे निमंत्रित असत. अशा प्रसंगीं उभय पक्षांच्या श्रेष्ठींचीं भाषणें होत. ध्येयपूर्ति होईतों सर्व संकटांना तोंड देऊन लढण्याचा व एकमेकांस पूर्ण मदत करण्याचा निर्धार उभय पक्षांकडून प्रकट केला जाई.

जर्मन राष्ट्राचा संबंध दूरपूर्वेंत फक्त आरमारापुरताच मर्यादित होता. सिंगापुरांत जर्मन पाणबुड्यांचा कायमचा तळ असे. येथून पॅसिफिक महासागरांत न्यूझीलंडपर्यंत व हिंदी महासागरांत मादागास्करपर्यंत या पाणबुड्या संचार करीत व शत्रूचीं जहाजें बुडवून परत येत. त्यांचे बरेचसे नाविक आधिकारी व दर्यासैनिक सिंगापुरांत कायमचे राहात असत. त्यांची एक वेगळी छावणी होती. इटालियन लोकांचीही एक छावणी होती, परंतु त्यांचा आमचा कधींच संबंध आला नाहीं, किंबहुना तसा संबंध घडवून आणण्याची स्वातंत्र्यसैन्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं मुळींच प्रयत्न केला नाहीं. मात्र जर्मन अधिकाऱ्यांची आम्ही आपण होऊन मैत्री संपादन केली. जर्मन राष्ट्राचा आरमारी-प्रतिनिधि सिंगापुरांत कायमचा असे. क्वचित् पेनांग, बँकॉक, मलाक्का वगैरे. दूरपूर्वेंतील बंदरांस भेट देऊन त्याला आपल्या आरमाराची पाहणी करावी लागे. परंतु त्याचें मुख्य ठिकाण सिंगापूर हेंच होतें. तो एक नाविकदलाचा प्रतिनिधि व आम्ही खुष्की फौजेचे प्रतिनिधि या दृष्टीनें आम्ही सरकारीरीत्या प्रातिनिधिक स्वरूपांत एकमेकांस भेटत नव्हतों. परंतु आंतरराष्ट्रीय मित्र या दृष्टीनें अनौपचारिकरीत्या आम्ही

एकमेकांस खेळीमेळीच्या वातावरणांत भेटत असूं. असो. याबद्दल अधिक माहिती पुढें ओघानें येईलच.

हिंदी स्वातंत्र्यसैन्यांतील मुख्य पत्रव्यवहार, फर्मानें, आज्ञापत्रकें, फौजी पत्रकें वगैरे सर्व इंग्रजींतच निघत असत. शेवटीं शेवटीं कांहीं तुकड्यांतून त्या तुकड्यांचा अंतर्गत पत्रव्यवहार हिंदुस्थानींत चालविण्याची प्रथा थोडी थोडी सुरू करण्यांत आली होती, पण ती फारच अल्प प्रमाणांत. यांतसुद्धां लिपी रोमन म्हणजे पाश्चात्य अथवा इंग्रजीच होती. शुद्ध हिंदी लिपी आणि हिंदुस्थानी भाषा सरसहा सर्व पत्रव्यवहारांत आणि पत्रकांतून वापरण्याची प्रथा पडावयास पाहिजे होती, ती कांहीं पडली नाहीं. दुसरी एक घातक आणि जपानी, जर्मन इत्यादींच्या पुढें लाजेनें मान खालीं घालावयास लावण्यासारखी गोष्ट म्हणजे, हिंदी अधिकाऱ्यांची आपसांत इंग्रजी बोलण्याची प्रथा ! जपान्यांनीं आपापसांत जपानी भाषेंत बोलावें, जर्मनांनीं जर्मन भाषेंत बोलावें व आम्ही मात्र आपापसांत इंग्रजींत बोलावें, यांतील विसंगती हिंदुस्थानांत आपल्या चटकन् लक्षांत येत नाहीं. परंतु राष्ट्रीय वृत्तीच्या अन्यदेशीय लोकांच्या सहवासांत मात्र याबाबतींतील स्वतःचा खुळेपणा फारच तीव्रतेनें जाणवतो. विशेषतः इंग्रजप्रणीत सैन्यांतील व युद्धबंद्यांतून स्वातंत्र्यसैन्यांत आलेले किंग्ज् कमिशन्ड ऑफिसर्स हे एकाच प्रांताचे कां असेनात, हटकून इंग्रजींत बोलूं लागत. त्यांची जीभ व मन त्याच बाजूला वळतात. तें एकप्रकारचें त्यांचें बाळकडूच होतें. आपला पोशाख, आपल्या संवयी, शिष्टाचार, व आपसांत बोलावयाची भाषाही अस्सल इंग्रजी असतांना, पदोपदीं इंग्रजांचें अनुकरण करणारे हे स्वातंत्र्यसैन्याचे अधिकारी इंग्रजांविरुद्ध लढण्यास उद्युक्त झाले आहेत याच्यावर परकीयांनीं विश्वास ठेवावा तरी कसा ? आमच्याशीं सलगीनें वागणारे कांहीं जपानी अधिकारी कित्येक वेळां असें स्पष्ट बोलवून दाखवीत व त्यामुळें निदान परकीयांच्या समोर बोलतांना तरी आपापसांत हिंदुस्थानींत बोलण्याची आमचे कांहीं अधिकारी काळजी घेत. या साध्या गोष्टीही सहजासहजीं मोठ्यामोठ्यांच्या लक्षांत येत नाहींत. अर्थात् हेंही एक राष्ट्रीय शिक्षण आहे. संगतीचा आपल्या वृत्तीवर फार परिणाम होतो हें आपणा सर्वांस ठाऊक आहे. अर्थात् राष्ट्रीय वृत्तीच्या निरनिराळ्या लोकांत फिरून आपली वृत्तीही कशी राष्ट्रीय बनूं लागते याचें हें एक उदाहरण आहे. तरी अशा गोष्टींपासून कायमचा धडा शिकणारे फारच थोडे लोक दिसतात.

स्वातंत्र्यसैन्यांत सुमारें दहा दहा हजाराच्या तीन डिव्हिजनस् होत्या हें पूर्वीं लिहिलेंच आहे. यांत प्रत्येकीं मोजके दहा दहा हजार सैनिक नसून शें-पन्नास जास्तच असत. कारण कार्याच्या महत्त्वाप्रमाणें प्रत्येक गट लहान मोठा करावा लागतो. पण एकंदर स्वातंत्र्यसैन्य चाळीस हजारांचें होतें. मग उरलेल्या

सुमारें नऊ-दहा हजार सैनिकांचा हिशोब काय हा प्रश्न साहजिकच डोळ्यासमोर उभा राहतो. परंतु सैन्यांत कित्येक खातीं अथवा तुकड्या अशा असतात कीं, त्यांचा समावेश कोठल्याच डिव्हिजनमध्यें करितां येत नाहीं. त्या सर्व तुकड्या स्वतंत्र अशाच ठेवून त्यांचा संबंध परस्पर थेट मध्यवर्ती केन्द्रकचेरीशींच जोडावा लागतो. फौजी पोलीसखातें हें एकंदर सर्व सैन्यांतील शिस्त राखणें, गुन्हेगारांस पकडून त्यांस शिक्षा ठोठावणें इत्यादि कामें करीत असल्यामुळें, तें मध्यवर्ती केन्द्रकचेरीशीं स्वतंत्रपणें संबंधित असतें. स्वत: नेताजींच्या शरीर-रक्षणार्थ निवडक सैनिकांची एक तुकडी होती. नेताजींचा तळ जेथें असेल तेथें या तुकडीचा तंबू असे पुण्याचे श्री. गोरे हे याच तुकडीचे कोठारी होते. प्रथम कांहीं महिने ते फौजी पोलिसखात्याचे कोठारी होते. पुढें त्यांची या जागेवर बदली झाली. ही तुकडीही कोणत्या एकाद्या डिव्हिजनला जोडणें अशक्य होतें. रंगूनपासून ते मलायाच्या उत्तरसरहद्दीपर्यंत तीन मुख्य ठिकाणीं हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या विमानविरोधी तोफखान्याच्या तुकड्या होत्या. लोहमार्गाच्या कडेला आगगाडीच्या मुख्य मुख्य पुलांच्या संरक्षणार्थ या तुकड्या जंगलांत राहून शत्रूच्या हवाई हल्ल्याच्या वेळीं शत्रूच्या विमानांच्या दिशेनें जंगलांत लपवून ठवि-लेल्या आपल्या तोफांचा मारा करीत. तीनपैकीं दोन तुकड्या दक्षिण ब्रह्मदेशांत व एक मध्यसयाममध्यें होती. या तुकड्या चळवळीच्या सुरुवातीपासून अखेर-पर्यंत तेथेंच होत्या. यांचा संबंधही परस्पर मध्यवर्ती केंद्रकचेरीशींच होता. निरनिराळीं लष्करी शिक्षणकेंद्रें, अधिकाऱ्यांच्या लष्करी शाळा, दुभाष्ये तयार करण्याच्या शाळा, नभोवाणीकेंद्रें या ठिकाणीं असणारे लोक, मध्यवर्ती केंद्र-कचेरींत काम करणारे सैनिक, या सर्वांचा सर्वोच्च अशा हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या मध्यवर्ती केंद्रकचेरीशींच परस्पर संबंध होता. म्हणून त्यांचाही कोणत्या एका विशिष्ट डिव्हिजनमध्यें समावेश करणें शक्य नव्हतें. अशा तऱ्हेनें उरलेल्या या नऊ-दहा हजार सैनिकांचा स्वतंत्रपणें थेट सर्वोच्च अशा मध्यवर्ती केंद्र-कचेरीशींच संबंध होता.

ऑक्टोबर १९४३ मध्यें हिंदी स्वातंत्र्य-सरकारची स्थापना झाल्यावर हिंदी स्वातंत्र्यसैन्याची एक एक तुकडी हळू हळू ब्रह्मदेशाकडे कूच करूं लागली. वास्तविक, नोव्हेंबर महिन्यांत सिंगापुरांतून निघण्याच्या ऐवजीं या सुमारास हें सैन्य हिंदुस्थानाचे सरहद्दीवर हल्ला करण्याकरतां तयार राहावयास पाहिजे होतें. कारण १९४४ साल उजाडावयाचे आंत हिंदुस्थानाच्या भूमीवर पाऊल ठेवण्याची नेताजींची घोषणा होती. परंतु जपान्यांच्या दिरंगाईमुळें हें शक्य झालें नाहीं. याचा उल्लेख पूर्वीं एकदां आलेलाच आहे. वाहनांची सोय चांगली नव्हतीच. कारण इंग्रजी साम्राज्याचें मलायांतून उच्चाटन झालें. त्या वेळीं जपान्यांच्या

हवाई हल्ल्यामुळें लोहमार्गाची नासधूस झाली. नंतर सयाम-ब्रह्मदेश हा नवीन लोह-मार्ग तयार करून जपान्यांनीं त्यांच्याकरतां मलायांतील उत्तर-दक्षिण जाणारा मुख्य लोहमार्ग सोडून इतर फांट्याफुट्याचे रूळ नेऊन तेथें लावले. बरीचशीं इंजिनें व डबे तेथें नेले. अर्थात् हे डबे सर्व मालाचेच होते. उतारू बसावयाची सोय असलेले डबे मलायांतील वाहतुकीकरतांच ठेवण्यांत आले. ब्रह्मदेश-सयाम या नवीन लोहमार्गावर व मलायांतील मुख्य लोहमार्गावर, दोन्हीकडे आगगाडीच्या डब्यांची टंचाईच होती. जपान्यांचाच माल आणि सैन्य वाह-तुकीस हे पुरेसे नव्हते. तेव्हां अर्थात् ते हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या वाहतुकीस आगगाडीचे डबे देण्यास नाखूषच असत. कित्येक महिने त्यांस आठवण करीत त्यांच्यामागें लकडा लावावा तेव्हां कुठे ते पांच-सहा डबे स्वातंत्र्यसैन्याच्या उपयोगाकरतां देत.

सिंगापूर ते रंगून हा प्रवास प्रत्येक तुकडीस टप्प्या-टप्प्यानें, थांबत थांबत करावा लागत असे. मध्यें अनेक अडचणी असत. धान्य, तोफा, मोटारी इत्यादि जड सामान कित्येक वेळां बोटीनें अगर आगगाडीनें नेण्याची व्यवस्था होऊन सैनिकांस बहुतेक शेकडों मैल पायीं चालावें लागे. सिंगापुरांत बरेचसें सैन्य एकवटल्यामुळें तेथें अन्न आणणें, बराकी बांधण्याकरतां सामान आणणें हें कठीण जाई. एवढ्याकरतां ब्रह्मदेशास जाणारी तुकडी आगगाडीच्या डब्यांची सोय होईल त्या दिवशीं तेथून निघून 'ईपो' या उत्तर मलायांतील शहरीं जाऊन तेथील छावणींत राहात असे. येथें एका वेळीं एक-दोनच तुकड्या असल्यामुळें अन्न जरा स्वस्त मिळत असे. मलायाच्या कांहीं खेड्यांतून एकादी भाजी, अंडीं वगैरेही सैनिकांकरतां घेतां येत असे. येथें कांहीं दिवस राहून पुढील टप्प्यापर्यंत सोय झाली कीं, मलायाच्या उत्तर सरहद्दीजवळ 'जित्रा' या लहानशा गांवांजवळील छावणींत ही तुकडी तळ देत असे. येथें वस्तू आणखी थोड्या स्वस्त मिळत. यापुढचा प्रवास मात्र फार कठीण. पुष्कळसा जंगलांतून, पावसांतून, चिखलांतून, असा पायीं करावा लागे. प्रवासाचा शीण होई, त्या मानानें भात हेंच एक प्रधान अन्न निकस असल्यामुळें सर्व सैनिक हे दुसऱ्या टप्प्यास पोंचून तेथें चांगली विश्रांति घेईपर्यंत पुन्हां धडधाकट दिसत नसत. वाटेंतील दलदल, ओल आणि जंगलें यामुळें हिंवताप व रानांतील अशुद्ध पाण्यामुळें हगवण या रोगांचाही पुष्कळांना त्रास होई. औषधें अगदींच अल्प प्रमाणांत असल्यामुळें व पौष्टिक आहार शक्य नसल्यामुळें उपचार करणें बाजूलाच राहून यदृच्छेवरच अवलंबून राहावें लागत असे. सुभाष रेजिमेंटला अथवा नंबर एक तुकडीलाच हिंदुस्थानावर पहिला हल्ला करण्यास निवडण्यांत येऊन तीस आधीं कूच करण्याचा हुकूम मिळाला. 'सुभाष रेजिमेंट'ही पहिल्या डिव्हिजनमधील एक पायदळ तुकडी होती. अर्थात् या डिव्हिजनलाही

कूच करण्याचा हुकूम मिळाल्यामुळें ही सबंध डिव्हिजनच्या डिव्हिजन हालूं लागली. ही संबंध डिव्हिजन सिंगापुरांत नव्हती. इतक्या अवाढव्य समूहास लागणाऱ्या सर्व वस्तू एके ठिकाणीं मिळणें शक्य नसतें, म्हणून जवळ जवळच परंतु निरनिराळ्या गांवांच्या आसपास डिव्हिजन विभागावी लागते; म्हणूनच या डिव्हिजनची मुख्य कचेरी व मुख्य अधिकारी मात्र सिंगापुरांत होते व इतर तुकड्या मलायांतील जोहोर बारू, ईपो, जित्रा अशा निरनिराळ्या गांवीं तळ देऊन होत्या.

---

## नेताजी सुभाषचंद्र बोस : २०

कांहीं अत्यंत नांवाजलेल्या व्यक्ती अशा असतात कीं, 'दुरून डोंगर साजरे' या म्हणीप्रमाणें दुरून त्यांची आपण कीर्ति ऐकतों व त्यांच्या निकट सहवासांत राहण्याचा प्रसंग येतो त्या वेळेस त्यांच्याबद्दलचा आपला सर्व आदर ओसरून जातो. परंतु नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे गूण जवळून पाहणाऱ्या माणसांस दूरच्या माणसापेक्षांही अधिक चमकून दिसत. मागील प्रकरणाच्या अंतापर्यंत दूरपूर्वेंतील स्वातंत्र्य-चळवळीचा इतिहास ज्या कालखंडापर्यंत आपण बघितला आहे, त्या कालापर्यंत नेताजींची दूरपूर्वेंतील लोकांस चांगलीच ओळख झालेली होती. म्हणूनच, नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या व्यक्तिमत्वाबद्दल दूरपूर्वेंतील लोकांस काय वाटत होतें ? एवढी प्रचंड आणि अभूतपूर्व चळवळ त्यांस कशी साध्य झाली ? इतकी कर्तबगारी अंगांत असतांना हिंदुस्थानांतील लोकांचा त्यांस अखंड पाठिंबा कसा मिळाला नाहीं ? त्यांच्यांत कांहीं दोष होते किंवा काय ? वगैरे प्रश्नांचा आपण या प्रकरणांत विचार करूं.

श्री. सुभाषचंद्र बोस यांच्या निवासस्थानाचें वर्णन यापूर्वीं आलेलेंच आहे. पूर्वीं तें एका लक्षाधीशाचें राहातें घर असल्यामुळें तेथें नाचरंग, तमाशा व मदिराप्राशन चालत असे. एवढ्याकरतांच तेथील लांब-रुंद खोल्यांत, तकाकणाऱ्या लाकडी फळ्यांनीं बनविलेली जमीन असून इतर सुखसोयी, थाटमाट आणि सजावट करण्यांत आली होती. कालाचा महिमा असा कीं, याच बंगल्यांत आतां एका संन्यस्त वृत्तीच्या ब्रह्मचाऱ्याचा संसार थाटलेला होता ! त्या बंगल्यांतील बादशाही वातावरणांत वावरतांनासुद्धां नेताजींच्या हालचालींत एक प्रकारचा अलिप्तपणा, सूक्ष्मपणें पाहाणाऱ्याच्या दृष्टीस चटकन् दिसून येई.

> " या बाह्य उपाधींमध्यें मी वावरत आहें, तें केवळ माझें जन्मकर्तव्य म्हणून. परंतु हें वातावरण मला सर्वस्वीं परकें असें वाटतें. यांत शाश्वत अशा कोणत्याच वस्तू मला दिसत नाहींत. हिंदुस्थानाचें स्वातंत्र्य हें या जड शरिराचें जड कर्तव्य साध्य झालें कीं, शाश्वत अशा सुखाच्या शोधार्थ मी जाणार. मग माझ्या मनांत कसलीच रुखरुख राहणार नाहीं आणि माझ्या मार्गांत कसली अडवणूक राहणार नाहीं. मला मागें कसलीच ओढ न राहून माझा आत्मा मग पूर्णपणें स्वतंत्र झाला असें मला वाटेल व पुढें स्वोन्नतीकरतां मला स्वैरसंचार करितां येईल. जगाचे हे सर्व पाश, हीं भांडणें, ही कटकट, हा कोलाहल सोडून मला शांत आणि

प्रसन्न वातावरणांत केव्हां स्वैरसंचार करावयास मिळेल असें मला झालें आहे. या एका गोष्टीची अंतिम तळमळ माझ्या मनांत आहे. परंतु माझें असें ठाम मत आहे कीं, माझ्या अडतीस कोटि बांधवांस पारतंत्र्याच्या जाळ्यांत तडफडत सोडून, त्यांच्या दुःखाकडे डोळेझांक करून, मी एकटा जर स्वतःच्या आत्म्याच्या उन्नतीकरतां व शांतीकरतां त्या सर्वांस सोडून गेलों तर माझ्यासारखा स्वार्थी मीच ! छे ! तें माझ्या हातून कधींच व्हावयाचें नाहीं. हिमालयाच्या गिरिकंदरांत शांतपणें तप करतां करतां त्यांच्या किंकाळ्या, त्यांचे टाहो माझ्या समाधीचा भंग करतील. त्यांस तसें किंचाळत सोडून माझी समाधी लागणेंच शक्य नाहीं. तो विचारच मला कसासा वाटतो. त्या सर्व बांधवांना त्यांच्या प्राण-संकटांतून वांचवून मगच मला गेलें पाहिजे. त्यांस अशा वेळीं सोडून जाणें म्हणजे त्यांचा विश्वासघात ठरेल. अशा वेळेस स्वतः एकट्यापुरता परमार्थ साधणें हासुद्धां एक प्रकारचा स्वार्थच आहे. त्यांस स्वतंत्र आणि सुखी केल्यावर मगच मी माझ्या स्वतःच्या स्वातंत्र्याकडे आणि सुखाकडे लक्ष देऊं शकतों. हाच खरा परमार्थ आहे. माझे बांधव परकी राज-सत्तेचे गुलाम असेपर्यंत माझ्या आत्म्यासही माझ्या बांधवाच्या सेवेचें दास्यत्व पत्करलें पाहिजे..."

अशा तऱ्हेची नेताजींची मनोभूमिका होती. याच एका पार्श्वभूमीवर त्यांच्या इहलोकींच्या अलौकिक कृतीचें चित्र रेखाटलेलें असल्यामुळें तें इतकें मनोहारी, उठावदार, चित्तवेधक, डोळे दिपविणारें, आणि उदात्त असें उमटलें होतें ! मनाची अशा तऱ्हेची तयारी झाल्यामुळें त्यांना लोकसंग्रहाची कधीं गरज वाटली नाहीं. त्याचप्रमाणें एकाद्या पूज्य मानलेल्या व्यक्तीचीं सर्व मतें पटत नसलीं तर त्या व्यक्तीबद्दलच्या पूज्यभावानें अंध होऊन स्वतःच्या मतांस अर्धचंद्र द्यावयाचा ही गोष्टही त्यांस मान्य नसे. "तुम्ही तुमच्या आंगच्या कांहीं गुणांमुळें वंदनीय असाल, परंतु तुमचें अमुक अमुक म्हणणें मला मान्य नाहीं. माझी सद्सद्विवेकबुद्धी माझा मार्ग तुमच्याहून भिन्न असल्याचें मला सांगत आहे. तरीपण माझा तुमच्याबद्दलचा पूज्यभाव यत्किंचितही कमी व्हावयाचा नाहीं......" असें छातीठोकपणें सांगून आपला निराळा मार्ग पत्करण्याच्या सडेतोडपणा त्यांच्यांत होता. लोकांनीं उदो उदो करावा म्हणून अथवा एकाद्या पूज्य व्यक्तीच्या मार्गाहून भिन्न मार्ग पत्करण्याचें धैर्य होत नाहीं म्हणून, आपलीं मतें गुंडाळून ठेवून आचरणांत न आणण्याचा भ्याडपणा त्यांनीं कधींच दाखविला नाहीं. अशा रीतीनें कोणाची भीडभाड न ठेवितां, केवळ आपल्या सद्सद्विवेकबुद्धीस एकादी गोष्ट पटली म्हणून ती आचरून दाख-विणाऱ्याचें अंतःकरण किती करारी व खंबीर असलें पाहिजे याची प्रत्येकानें कल्पनाच केलेली बरी. स्वबांधवांबद्दलचें उत्कट प्रेम, त्यांच्या दीन आणि

हलाखीच्या स्थितीबद्दल सतत वाटणारी हळहळ, आपल्या ध्येयाबद्दलची तळमळ, आपलें सर्वस्व आपल्या बांधवांच्या सुखाकरतां अर्पण करण्याची त्यांची उदार व त्यागी वृत्ति इत्यादि अलौकिक गुण सुभाषांच्या व्यक्तिमत्वाचे विशेष पैलू होते!

हिंदी स्वातंत्र्यसैन्यांतील कॅप्टन रॉय नांवाचा एक डॉक्टर, माझा स्नेही आहे. त्यानें नेताजींबद्दल जी माहिती सांगितली ती मनोरंजक व उद्बोधक होईल म्हणून येथें देत आहें. तो ओरिसा प्रांताची राजधानी कटक या शहरीं ज्या इंग्रजी शाळेच्या पहिल्या इयत्तेंत होता, त्याच शाळेच्या मॅट्रिकच्या वर्गांत त्या वर्षीं सुभाषचंद्र बोस या नांवाचा एक विद्यार्थी होता. सुभाषचंद्राचे वडील त्या शहरांतील नांवाजलेले वकील होते. त्यांचें घराणें श्रीमंत अर्थात् इतर सर्वसाधारण श्रीमंत घराण्यांप्रमाणें तें घराणेंही राजनिष्ठ म्हणून प्रसिद्ध होतें. शाळेंतील कोणतीही परीक्षा असो, कसलीही चढाओढ असो, कोणताही बक्षीस-समारंभ असो, सर्वदा सुभाषचंद्र बोस याचाच पहिला नंबर व सर्व बक्षिसेंही त्यासच मिळावयाचीं. इतिहास, भूगोल, इंग्रजी, गणीत कोणंताही विषय असला तरी सुभाषचंद्राचा पहिला नंबर ठरलेलाच. पुढें कॉलेजमध्येंसुद्धां तत्त्वज्ञानासारख्या विषयांतही सुभाषचंद्र यांचाच पहिला नंबर असावयाचा. मॅट्रिकचे वर्गांत असतांना सुभाषचंद्रानें एका निबंधाच्या चढाओढींत भाग घेतला. कसलासा ऐतिहासिक विषय होता व एम्. ए. च्या विद्यार्थ्यांससुद्धां त्यांत भाग घ्यावयाची मोकळीक ठेवलेली होती. परंतु आश्चर्य असें कीं, सुभाषचंद्राचाच नंबर पहिला आला. इंग्रजांची स्तुति करणाऱ्या एका शिक्षकाची व सुभाषचंद्राची खडाजंगी होऊन सुभाषचंद्राचें नांव शाळेंतून काढून टाकण्यांत आलें. पुढें कशीतरी मॅट्रिकच्या परीक्षेस बसण्याची परवानगी मिळाली व त्या वर्षीं मॅट्रिकच्या परीक्षेंत सुभाषचंद्र पहिल्या वर्गांत उत्तम रीतीनें उत्तीर्ण झाला. मॅट्रिकच्या वर्गांत त्यानें आपल्या पंधरा-सोळा साथीदारांस जमवून, स्वतःच्या रक्तानें एका कागदावर चवदा तत्त्वें उतरवून त्याप्रमाणें आजन्म आचरण ठेवण्याची प्रतिज्ञा केलेली होती! त्या चवदा तत्त्वांत 'आजन्म ब्रह्मचर्य पाळणें, हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्यासाठीं शेवटपर्यंत झगडणें' यांसारख्या गोष्टी गोंविलेल्या होत्या! नेहमीं 'सुभाषचंद्र... सुभाषचंद्र' हें नांव कानीं आल्यामुळें लहानग्या रॉयनें आपल्या बहिणीस विचारलें, "कायग ताई, हा सुभाषचंद्र आहे तरी कोण? ज्यांत त्यांत आपलें त्याचेंच नांव ऐकूं येतें!" — अशा तऱ्हेनें लहानपणापासुन सुभाषचंद्र हा सर्वांच्या कुतुहलाचा विषय झालेला होता.

विवेकानंदांसारख्या त्यागी थोर पुरुषाबद्दल त्यांस नितान्त आदर होता. ते नेहमीं बेलूर मठाच्या ग्रंथशाळेंत जाऊन धर्मग्रंथांचें परिशीलन करीत व योगाभ्यासही करण्याचा त्यांनीं थोडाबहुत प्रयत्न केला. भगवीं वस्त्रें घालून व दंड घेऊन त्यांनीं कोणांस न कळवितां लहान वयांतच घरांतून पलायन

केलें. तीन-चार महिने हिमालयांत फिरूनसुद्धां त्यांस कोणी गुरु भेटला नाहीं, तेव्हां ते परत आले. जात्याच हुषार असल्यामुळें, श्रीमंत राजनिष्ठ घराण्यांत जन्म झाल्यामुळें, त्यांनीं आय्. सी. एस्. व्हावें व मोठ्या हुद्याची नोकरी पत्करावी असें त्यांच्या वडिलांस वाटे; परंतु तें त्यांच्या मर्जीच्या अगदीं विरुद्ध होतें. आपली सर्व हुषारी आपल्या शत्रूची सेवा करण्यांत योजून आपल्याच बांधवांच्या मानेवरील फास आवळणें त्यांना मुळींच पसंत नव्हतें. तरी, 'आधीं आय. सी. एस्. परीक्षेंत उत्तीर्ण होऊन दाखीव, मग वाटल्यास सोडून दे' — अशी त्यांच्या वडिलांनीं गळ घातल्यामुळें ते त्या परीक्षेस बसून त्यांत त्यांचा चवथा नंबर आला. मुंबईच्या किनाऱ्यावर पाऊल ठेवतांच त्यांनीं आपल्या आय. सी. एस्. पदवीचा, हुद्याचा राजीनामा दिला व ते सरळ महात्मा गांधींस भेटण्यास गेले. महात्माजींच्या खादी, सत्य, आणि अहिंसा अशा स्वातंत्र्याच्या साध्या त्रिदल मंत्रानें त्यांचें समाधान झालें नाहीं. श्री. चित्तरंजनदास यांच्या मतांशींच त्यांचीं मतें जास्त जुळत असल्याचें त्यांच्या प्रत्ययास आलें. खादी, असहकार वगैरे चळवळींतसुद्धां त्यांनीं भाग घेतला. सत्ताविसाव्या वर्षींच ते कलकत्ता म्युनिसिपालिटीचे एक महत्त्वाचे कार्यवाह (चीफ ऑफिसर) झाले. त्यांस एकंदर अकरा वेळां तुरुंगवास भोगावा लागला. हरिपुरा कॉंग्रेसच्या वेळीं प्रचंड बहुमतानें त्यांची राष्ट्राध्यक्ष म्हणून निवड झाली. परंतु महात्मा गांधींच्या एका शब्दामुळें लोकांनीं त्यांच्यामागील आपला पाठिंबा काढून घेतला. नामधारी राष्ट्रपति म्हणून दुसऱ्याच्या मर्जीनें आपण कारभार चालवावयाचा हें त्यांस कधींच पटलें नाहीं. अध्यक्षस्थानीं एक व्यक्ती बदलून दुसरी तरी आपण अधिष्ठित कां करितों, तर त्या व्यक्तीनें आपल्या नवचैतन्यानें त्या संस्थेस नवीन चालना द्यावी म्हणून. परंतु त्या व्यक्तीस जुन्या तंत्रानेंच काम करावें लागलें तर नव्या व्यक्तीचा काय उपयोग ?— म्हणून सुभाषचंद्रांस अधिकारपदाचा त्याग करावा लागला.

प्रथमपासूनच त्यांची वृत्ति लढाऊ होती, हें त्यांच्या वर दिलेल्या जीवनचरित्रावरून कोणाच्याही सहज लक्षांत येण्यासारखें आहे. 'शत्रूस मारण्याऐवजीं शत्रूकडून मुकाट्यानें मार खाणें, तरवार फिरविण्यास शिकण्याऐवजीं चरखा फिरविण्यास शिकणें, गुन्हेगारांस कैद करण्याऐवजीं स्वतःच तुरुंगाचें दार उघडून आपण त्यांत जाऊन बसणें — यामुळें स्वराज्य मिळूं शकेल का ?' असा त्यांनीं स्वतःच्या मनास प्रश्न केला. कोठल्याही राष्ट्रानें अशा तऱ्हेनें स्वातंत्र्य मिळविलें नाहीं. ते नेहमीं गीता वाचतात. श्रीमद्भगवद्गीता हा त्यांच्या आवडीचा ग्रंथ आहे. संस्कृत श्लोक व त्याबरोबरच बंगाली पदें असलेली एक श्रीमद्भगवद्‌गीतेची प्रत त्यांचेजवळ नेहमीं असे. त्या आपल्या आवडत्या गीतेस त्यांनीं तोच प्रश्न केला. गीतेनें त्या प्रश्नाचें एकच एक उत्तर निरनिराळ्या शब्दांत पुन्हा पुन्हा सांगितल्याचें नजरेस आलें... "तस्मात् त्वम् युद्ध्यस्व...मामनुस्मर युद्ध्यच...हतो वा प्राप्स्यसि स्वर्गम्, जित्वा वा भोक्ष्यसे महीम्॥" 'हिंदुस्थानाची

हलाखीच्या स्थितीबद्दल सतत वाटणारी हळहळ, आपल्या ध्येयाबद्दलची तळमळ, आपलें सर्वस्व आपल्या बांधवांच्या सुखाकरतां अर्पण करण्याची त्यांची उदार व त्यागी वृत्ति इत्यादि अलौकिक गुण सुभाषांच्या व्यक्तिमत्वाचे विशेष पैलू होते !

हिंदी स्वातंत्र्यसैन्यांतील कॅप्टन रॉय नांवाचा एक डॉक्टर, माझा स्नेही आहे. त्यानें नेताजींबद्दल जी माहिती सांगितली ती मनोरंजक व उद्बोधक होईल म्हणून येथें देत आहें. तो ओरिसा प्रांताची राजधानी कटक या शहरीं ज्या इंग्रजी शाळेच्या पहिल्या इयत्तेंत होता, त्याच शाळेच्या मॅट्रिकच्या वर्गांत त्या वर्षी सुभाषचंद्र बोस या नांवाचा एक विद्यार्थी होता. सुभाषचंद्राचे वडील त्या शहरांतील नांवाजलेले वकील होते. त्यांचें घराणें श्रीमंत अर्थात् इतर सर्वसाधारण श्रीमंत घराण्यांप्रमाणें तें घराणेंही राजनिष्ठ म्हणून प्रसिद्ध होतें. शाळेंतील कोणतीही परीक्षा असो, कसलीही चढाओढ असो, कोणताही बक्षीस-समारंभ असो, सर्वदा सुभाषचंद्र बोस याचाच पहिला नंबर व सर्व बक्षिसेंही त्यासच मिळावयाचीं. इतिहास, भूगोल, इंग्रजी, गणीत कोणंताही विषय असला तरी सुभाष-चंद्राचा पहिला नंबर ठरलेलाच. पुढें कॉलेजमध्येंसुद्धां तत्त्वज्ञानासारख्या विषयांतही सुभाषचंद्र यांचाच पहिला नंबर असावयाचा. मॅट्रिकचे वर्गांत असतांना सुभाष-चंद्रानें एका निबंधाच्या चढाओढींत भाग घेतला. कसलासा ऐतिहासिक विषय होता व एम्. ए. च्या विद्यार्थ्यांससुद्धां त्यांत भाग घ्यावयाची मोकळीक ठेवलेली होती. परंतु आश्चर्य असें कीं, सुभाषचंद्राचाच नंबर पहिला आला. इंग्रजांची स्तुति करणाऱ्या एका शिक्षकाची व सुभाषचंद्राची खडाजंगीं होऊन सुभाष-चंद्राचें नांव शाळेंतून काढून टाकण्यांत आलें. पुढें कशीतरी मॅट्रिकच्या परीक्षेस बसण्याची परवानगी मिळाली व त्या वर्षी मॅट्रिकच्या परीक्षेंत सुभाषचंद्र पहिल्या वर्गांत उत्तम रीतीनें उत्तीर्ण झाला. मॅट्रिकच्या वर्गांत त्यानें आपल्या पंधरा-सोळा साथीदारांस जमवून, स्वतःच्या रक्तानें एका कागदावर चवदा तत्त्वें उतरवून त्याप्रमाणें आजन्म आचरण ठेवण्याची प्रतिज्ञा केलेली होती ! त्या चवदा तत्त्वांत 'आजन्म ब्रह्मचर्य पाळणें, हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्यासाठीं शेवट-पर्यंत झगडणें' यांसारख्या गोष्टी गोंविलेल्या होत्या ! नेहमीं 'सुभाषचंद्र... सुभाष-चंद्र' हें नांव कानीं आल्यामुळें लहानग्या रॉयनें आपल्या बहिणीस विचारलें, "कायग ताई, हा सुभाषचंद्र आहे तरी कोण ? ज्यांत त्यांत आपलें त्याचेंच नांव ऐकूं येतें !" — अशा तऱ्हेनें लहानपणापासुन सुभाषचंद्र हा सर्वांच्या कुतुहलाचा विषय झालेला होता.

विवेकानंदांसारख्या त्यागी थोर पुरुषाबद्दल त्यांस नितान्त आदर होता. ते नेहमीं बेलूर मठाच्या ग्रंथशाळेंत जाऊन धर्मग्रंथांचें परिशीलन करीत व योगाभ्यासही करण्याचा त्यांनीं थोडाबहुत प्रयत्न केला. भगवीं वस्त्रें घालून व दंड घेऊन त्यांनीं कोणांस न कळवितां लहान वयांतच घरांतून पलायन

केलें. तीन-चार महिने हिमालयांत फिरूनसुद्धां त्यांस कोणी गुरु भेटला नाहीं, तेव्हां ते परत आले. जात्याच हुषार असल्यामुळें, श्रीमंत राजनिष्ठ घराण्यांत जन्म झाल्यामुळें, त्यांनीं आय्. सी. एस्. व्हावें व मोठ्या हुद्याची नोकरी पत्करावी असें त्यांच्या वडिलांस वाटे; परंतु तें त्यांच्या मर्जीच्या अगदीं विरुद्ध होतें. आपली सर्व हुषारी आपल्या शत्रूची सेवा करण्यांत योजून आपल्याच बांधवांच्या मानेवरील फास आवळणें त्यांना मुळींच पसंत नव्हतें. तरी, 'आधीं आय. सी. एस्. परीक्षेंत उत्तीर्ण होऊन दाखीव, मग वाटल्यास सोडून दे' — अशी त्यांच्या वडिलांनीं गळ घातल्यामुळें ते त्या परीक्षेस बसून त्यांत त्यांचा चवथा नंबर आला. मुंबईच्या किनाऱ्यावर पाऊल ठेवतांच त्यांनीं आपल्या आय. सी. एस्. पदवीचा, हुद्याचा राजीनामा दिला व ते सरळ महात्मा गांधींस भेटण्यास गेले. महात्माजींच्या खादी, सत्य, आणि अहिंसा अशा स्वातंत्र्याच्या साध्या त्रिदल मंत्रानें त्यांचें समाधान झालें नाहीं. श्री. चित्तरंजनदास यांच्या मतांशींच त्यांचीं मतें जास्त जुळत असल्याचें त्यांच्या प्रत्ययास आलें. खादी, असहकार वगैरे चळवळींतसुद्धां त्यांनीं भाग घेतला. सत्ताविसाव्या वर्षींच ते कलकत्ता म्युनिसिपालिटीचे एक महत्त्वाचे कार्यवाह (चीफ ऑफिसर) झाले. त्यांस एकंदर अकरा वेळां तुरुंगवास भोगावा लागला. हरिपुरा काँग्रेसच्या वेळीं प्रचंड बहुमतानें त्यांची राष्ट्राध्यक्ष म्हणून निवड झाली. परंतु महात्मा गांधींच्या एका शब्दामुळें लोकांनीं त्यांच्यामागील आपला पाठिंबा काढून घेतला. नामधारी राष्ट्रपति म्हणून दुसऱ्याच्या मर्जीनें आपण कारभार चालवावयाचा हें त्यांस कधींच पटलें नाहीं. अध्यक्षस्थानीं एक व्यक्ती बदलून दुसरी तरी आपण अधिष्ठित कां करितों, तर त्या व्यक्तीनें आपल्या नवचैतन्यानें त्या संस्थेस नवीन चालना द्यावी म्हणून. परंतु त्या व्यक्तीस जुन्या तंत्रानेंच काम करावें लागलें तर नव्या व्यक्तीचा काय उपयोग ?— म्हणून सुभाषचंद्रांस अधिकारपदाचा त्याग करावा लागला.

प्रथमपासूनच त्यांची वृत्ति लढाऊ होती, हें त्यांच्या वर दिलेल्या जीवनचरित्रावरून कोणाच्याही सहज लक्षांत येण्यासारखें आहे. 'शत्रूस मारण्याऐवजीं शत्रूकडून मुकाट्यानें मार खाणें, तरवार फिरविण्यास शिकण्याऐवजीं चरखा फिरविण्यास शिकणें, गुन्हेगारांस कैद करण्याऐवजीं स्वतःच तुरुंगाचें दार उघडून आपण त्यांत जाऊन बसणें — यामुळें स्वराज्य मिळूं शकेल का ?' असा त्यांनीं स्वतःच्या मनास प्रश्न केला. कोठल्याही राष्ट्रानें अशा तऱ्हेनें स्वातंत्र्य मिळविलें नाहीं. ते नेहमीं गीता वाचतात. श्रीमद्भगवद्गीता हा त्यांच्या आवडीचा ग्रंथ आहे. संस्कृत श्लोक व त्याबरोबरच बंगाली पदें असलेली एक श्रीमद्भगवद्गीतेची प्रत त्यांचेजवळ नेहमीं असे. त्या आपल्या आवडत्या गीतेस त्यांनीं तोच प्रश्न केला. गीतेनें त्या प्रश्नाचें एकच एक उत्तर निरनिराळ्या शब्दांत पुन्हा पुन्हा सांगितल्याचें नजरेस आलें... "तस्मात् त्वम् युद्ध्यस्व...मामनुस्मर युद्ध्यच...हतो वा प्राप्स्यसि स्वर्गम् , जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ॥" 'हिंदुस्थानाची

बहुसंख्यप्रजा चिकित्सक नाहीं. हिंदी समाज प्रेमांध होऊन वाटेल तें करण्यास उद्युक्त होतो. आपले विचार बरोबर कीं इतरांचे बरोबर ?— हें हिंदी लोक पाहात नाहींत. अमक्याच्या तोंडून अमुक एक वाक्य बाहेर पडलें ना, मग तें बरोबर असलेंच पाहिजे, अशी येथील लोकांची अंधवृत्ति आहे. अर्थात् येथें आपल्याला काम करावयास वाव नाहीं. एक तर मूग गिळून स्वस्थ बसावें किंवा आपलीं मतें गुंडाळून ठेवावीं व दुसऱ्याच्या तंत्रानें वागावें. दोन्हीही शक्य नाहीं. मग हिंदुस्थानाच्या बाहेर जाऊन निराळ्या वातावरणांत आपलें कार्य सुरू करावें. ” —असे त्यांच्या मनांत विचार येत. आपलें मत ठाम करून त्यांनीं हिंदुस्थानाच्या बाहेर जाण्याचें ठरविलें. त्यांनीं बरेच दिवस अन्नत्याग करून कारागृहांतून आपली मुक्तता करून घेतली होती. कलकत्त्याच्या एलगिन् रोडवरील त्यांच्या बंगल्यांतच त्यांस स्थानबद्ध करण्यांत आलें. त्या बंगल्याच्या दुसऱ्या मजल्यावरील अगदीं हमरस्त्यावरची खोली त्यांच्याकडे होती. बंगल्याच्या आजबाजूस ६४ गुप्त-पोलीसांचा जागता पाहारा असे. त्या पोलीसांच्या दिमतीला एक दोन मोटारीही तयार ठेविलेल्या असत. नेताजींच्या खोलींत त्यांच्या आईचीं, वडिलांचीं आणि सर्व बंधूंचीं छायाचित्रें लाविलेलीं होतीं. खोलींत दोन पलंग, एक प्रवेश-द्वाराचे जवळ व दुसरा त्यास संमातर असा परंतु जरा आंतले बाजूस; बाजूला एका चौरंगावर एक मोठी भगवद्गीता ठेविलेली, तेथेंच त्यांच्या खडावा; खुंटाळ्यावर एक-दोन पोषाख; त्याच्याखालीं पांढऱ्या रंगाच्या रजपूती चढावांचा एक जोड होता. दोन्ही पलंगाच्या मधोमध प्रवेशद्वारासमोर एक पडदा टांगलेला असे. यामुळें खोलीच्या आंतील अर्ध्या भागांत काय चाललें आहे हें दारांतून दिसत नसे. राहात्या घरांतून गुप्त होण्याच्या अगोदर दहा-बारा दिवस नेताजींनीं घरांतील आप्तेष्टांसही भेटणें किंवा त्यांचें तोंडदेखील पाहाणें बंद केलें होतें. नाहीं म्हणावयास त्यांचा पुतण्या कधीं कधीं त्यांच्या अंगास मॉलीश करून जात असे. पडद्यानें झाकलेल्या खोलीच्या अर्ध्या भागांत ते निजत असत व तेथेंच बसत असत. त्यांच्याजवळ एक घंटा ठेविलेली असे. ती वाजली तरच आप्तेष्टांपैकीं कोणीतरी खोलीच्या दाराशीं यावें. त्याला सुभाषचंद्र दृष्टीस पडतच नसत, परंतु दाराजवळील पलंगावर एक चिठी ठेवलेली मिळे. त्या चिठीप्रमाणें त्यानें मुकाट्यानें करावें. जेवणही त्यांनीं मागितलें म्हणजे त्या पडद्याच्या बाहेरील बाजूस ठेवलें जाई. तें ताट आंत ओढून ते जेवीत असत व पुन्हा बाहेर सरकवून ठेवीत असत. त्यांची आई शेजारच्या खोलींतच राहात असे. दोन्ही खोल्यांच्या मधलें दार नेहमीं बंदच असे. शेवटल्या दहा बारा दिवसांत ते आईलासुद्धां भेटले नाहींत. सतत दोन तीन दिवस घंटा वाजली नाहीं, तेव्हां आप्तेष्टांस संशय येऊन त्यांनीं कानोसा घेण्याचा प्रयत्न केला, हांका मारल्या, परंतु हूं का चूं नाहीं. मग मनाचा हिय्या करून पडदा दूर सारून ते आंत आले, तों काय ? आंत कोणीच नव्हतें ! यापुढें ते जर्मनींत कसे पोंचले व तेथें वर्ष दीडवर्ष राहून दूरपूर्वेंत कसे आले हें सर्वांस

माहीत आहेच. त्यांची आई शेजारच्या खोलींत राहात असतांनासुद्धां तिला न कळवितां ते पसार झाले. मातृप्रेमसुद्धां त्यांनीं आपल्या कर्तव्याच्या आड येऊं दिलें नाहीं.

हिंदुस्थानांत आपल्याला सर्व पुढारी सारख्याच तोलाचे वाटतात. कारण खादी वापरणें, व्यासपीठावरून भाषणें देणें, असहकार चळवळींत भाग घेणें व तुरुंगांत जाणें हाच एक जीवनक्रम सर्वांचा दिसून येतो. अर्थात् हा कार्यक्रम ज्या महात्म्यानें प्रथम अंमलांत आणला तो इतरांहून फारच श्रेष्ठ व त्या कार्यक्रमांत भाग घेणारे इतर त्याच्याहून कनिष्ठ असें वाटणें स्वाभाविक आहे. कारण लांब लांब गप्पा मारण्यांत सर्वच पटाईत असतात. परंतु जो कार्य करून दाखवील तोच खरा. त्यासच 'नेता' म्हणावें. श्री. सुभाषचंद्र बोस यांस हवा तसा लढाऊ कार्यक्रम अंगिकारण्यास हिंदुस्थानांतील लोक तयार नव्हते. किंबहुना एकीकडे परकी राजसत्तेची आडकाठी व दुसरीकडे काँग्रेसच्या अहिंसा, सत्य आणि खादी या व्रताची आडकाठी, यामुळें स्वतःचें म्हणणें लोकांपुढें मांडून प्रत्यक्ष तशी कृति स्वतः करून दाखविण्यास त्यांस हिंदुस्थानांत वाव मिळाला नाहीं. 'हिंदुस्थानांत नाहीं तर नाहीं, आप्तेष्टांपासून दूर, स्वजनांपासून लांब, पृथ्वीच्या पाठीवर कोठेंही, परंतु कुडींत प्राण असेपर्यंत त्यांच्याच कल्याणार्थ मी झटत राहीन' हें त्यांचें ब्रीदवाक्य होतें. त्याप्रमाणें त्यांनीं प्रथम जर्मनींत व नंतर दूरपूर्वेंत आपलें कार्य अविरत चालू ठेविलें.

हिंदुस्थानाचें स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्याची सुभाषचंद्रांच्या मनांतील तळमळ कशा प्रकारची आहे, याची कल्पना दुरून बघणाऱ्यास येणें शक्य नाहीं. हिंदुस्थानांत त्यांच्यासारखे शेकडों आहेत असें वरवर पाहाणाऱ्याला वाटणें साहजिक आहे. परंतु ते रात्रीं कधींही झोपत नाहींत, एकसारखें अक्षरशः रात्रंदिवस ते राष्ट्रकार्य करीत असतात, ही गोष्ट सांगितल्यावर कदाचित् त्यांच्या मनांतील खऱ्या तळमळीची आपल्याला कांहीं अंशीं कल्पना येणें शक्य आहे. माझ्या त्यांच्या दोन वर्षांच्या सहवासांत मी त्यांस केव्हांही झोंपतांना बघितलें नाहीं. त्यांची नेहमींची झोपावयाची वेळ म्हणजे पहांटे पांच वाजल्यापासून तों सकाळीं आठ किंवा नऊ वाजेपर्यंत. या वेळेव्यतिरिक्त ते केव्हांही झोंपत नसत. उलट स्वातंत्र्य-सरकाराच्या स्थापनेच्या दिवसांत, दौऱ्यांतील गर्दीच्या कार्यक्रमांत व तत्सम कार्यबाहुल्याच्या दिवसांत श्री. सुभाषचंद्र यांस एक क्षणभरही झोंप मिळाली नाहीं. असें कित्येक दिवस होत असे. इतर सर्व काम संपलें तर रात्रीचा शांत वेळ ते स्वतःच्या अभ्यासाकरतां व मननाकरतां राखून ठेवीत. या वेळीं एकाद्या वीरपुरुषाचें चरित्र अथवा एकाद्या देशाच्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास, हिंदुस्थानाबद्दलचें कांहींतरी बोधप्रद व उपयुक्त पुस्तक, अशा तऱ्हेचें ते रात्रीं वाचन करीत व त्यावर मनन करीत. स्वातंत्र्य-सरकाराचे स्थापनेनंतर १९४३ च्या नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीस टोकिओस जाण्याकरतां त्यांस ज्या

दिवशीं सकाळीं निघावयाचें होतें, त्याच्या आदल्या रात्रीं त्यांस सिंगापुरांतील बरेचसें काम संपवावयाचें होतें. हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या, सैन्याच्या व सरकाराच्या अधिकाऱ्यांशीं विचारविनिमय करावयाचा, बऱ्याचशा आज्ञा द्यावयाच्या, आज्ञापत्रकांवर सह्या करावयाच्या, भेटावयास येणाऱ्या जपानी अधिकाऱ्यांशीं वाटाघाटी करावयाच्या, हें सर्व होतां होतां सकाळीं आठ वाजतां, कसेबसे घाईनें प्रातर्विधी उरकून व कपडे बदलून ते विमानतळावर हजर झाले. ठरलेल्या वेळेपेक्षां अर्धा तास उशीरच झाला होता. स्वतःच्या अभ्यासाकरतांही त्या रात्रीं त्यांस वेळ मिळाला नाहीं व झोपेकरतां तर मुळींच मिळाला नाहीं. दुसरे एके प्रसंगीं 'बातू पहात' (सिंगापूरच्या उत्तरेस सुमारें ७५ मैलांवरील शहर —सिंगापुरांतील लष्करी अधिकाऱ्यांची शाळा कांहीं महिन्यांनीं येथें आणण्यांत आलेली होती) येथें स्वातंत्र्यसैन्याच्या लष्करी शाळेंतील एक शिक्षणक्रम संपवून त्यांतील २००-२५० उमेदवार दुसरे दिवसापासून स्वातंत्र्यसैन्यांत सेकंड लेफ्टनंट म्हणून पदारूढ व्हावयाचे होते. या प्रसंगींच्या समारंभास नेताजी हजर होते. सायंकाळीं सर्वांची कवाईत, नेताजींचें भाषण, बक्षीससमारंभ इत्यादि झाल्यावर रात्रीं १० चे सुमारास भोजनसमारंभ झाला. दरम्यान नेताजींनीं शाळेची पाहणी केली. भोजनानंतर गाणीं, नाटक इत्यादि करमणुकीचा कार्यक्रम ठेवण्यांत आलेला होता. त्यानंतर पहांटे ३-४ वाजतां या सर्व नवीन तरुण २००-२५० अधिकाऱ्यांस नेताजींनीं आपल्याभोवतीं बसवून त्यांच्याशीं गप्पा मारण्यास सुरुवात केली. मुलांनीं निरनिराळे प्रश्न करावे व नेताजींनीं त्यांचीं उत्तरें द्यावीं असें चाललें होतें. सकाळीं ७॥ पर्यंत हा कार्यक्रम झाला व नंतर मोटारीनें नेताजी सिंगापुरास परत आले. असें अनेकदां होत असे. स्वातंत्र्याच्या तळमळीनें झोपेविना जन्म काढणारे किती देशभक्त असतील व ते कोणत्या कोटींतले असावेत याचा ज्यानें त्यानें आपल्या मनाशीं विचार करावा.

या नेहमींच्या जागरणाचा परिणाम मात्र नेताजींच्या प्रकृतीवर फार अनिष्ट असा झालेला आहे. बाहेरून जरी त्यांचें शरीर धष्टपुष्ट दिसत असलें तरी आंतून तें तितक्या सुस्थितींत नाहीं. दूरपूर्वेतील दोन वर्षांत त्यांची प्रकृति दोनदां बिघडली होती. अर्थात् हें फक्त त्यांच्या निकटवर्ती लोकांसच माहीत होतें. कारण त्यांनीं कामाचा एक दिवसही फुकट घालविला नाहीं. प्रकृति दोनदां बिघडली होती याचा अर्थ दोनदां त्यांस ताप आला होता, त्यांचें अंग दुखत होतें एवढेंच. परंतु त्यांच्या कार्यक्षमतेंत किंवा कार्यक्रमांत कांहीं फरक पडला नाहीं.

दिवसांतून एक-दोन वेळां शरिरास मालीश करून घेण्याची नेताजींस सवय आहे. या कामावर स्वातंत्र्यसैन्यांतील एका सशक्त महाराष्ट्रीयाची नेमणूक झालेली होती. अधूनमधून त्यांच्या शरिराची वैद्यकीय तपासणी करण्यास स्वातंत्र्यसैन्यांतील 'मेजर राजू' या डॉक्टरांची नेमणूक करण्यांत आलेली होती.

नेताजींकडे अनेक प्रकारचीं कामें होतीं. एक तर ते स्वतः हिंदी स्वातंत्र्य-सरकाराचे राष्ट्रपति होते. परराष्ट्रमंत्री आणि युद्धमंत्री हीं दोन्हीं कामेंही तेच बघत. दूरपूर्वेतील हिंदी स्वातंत्र्य-संघाचे अध्यक्ष व हिंदी स्वातंत्र्यसेनेचे सरसेनापति हे दोन्ही अधिकारही त्यांच्याकडेच होते. यावरून त्यांच्या कामाचा व्याप किती मोठा होता याची कल्पना यावयास कांहींशी मदत होईल. त्यांचा पोषाख नेहमीं खाकीच असे. पायांत खाकी ब्रीचेस्, अंगांत खाकी बुश्-शर्ट; छातीवर उजव्या बाजूच्या खिशावर एक स्वातंत्र्यसंघाचें चिन्ह व स्वातंत्र्यसैन्याचें तिरंगी चिन्ह; डोक्यास हिरवट उन्हो कापडाची घडीची फौजी टोपी, त्या टोपीवर, हिंदुस्थानाचा नकाशा कोरलेलें आणि विश्वास, एकता व स्वार्थत्याग हे ध्येयवादी शब्द असलेलें एक काळें चिन्ह; टोपीवर समोरच्या बाजूस मधोमध कपाळावर पितळेच्या दोन चकाकणाऱ्या गुंड्या लावलेल्या असत व पायांत गुडघ्यापर्यंतचे आरी लावलेले लाल बूट, हा त्यांचा पोषाख असे. हिंदी स्वातंत्र्यसेनेच्या इतर अधिकाऱ्यांप्रमाणें त्यांच्या खांद्यावर त्यांच्या हुद्याच्या निदर्शक अशा कांहीं खुणा अथवा चिन्हें नव्हतीं. अन्य राष्ट्रांच्या सरसेनापतींप्रमाणें त्यांच्या पोषाखावर बिल्ले, रंगीत पट्ट्या, सांखळी घातलेल्या रंगीबेरंगी दोऱ्या, गोंडेदार मखमलीच्या म्यानाची तरवार वगैरे कांहीं साज नव्हता. त्यांचा नेहमींचा खाकी पोषाखही उंची उन्ही कापडाचा नसून साध्या खाकी सुती कापडाचा होता. सरसेनापतीच्या पोषाखावरील चिन्हें आणि इतर सजावट वगैरे ठरविण्यास त्या वेळीं वेळ नव्हता आणि तें ठरविणेंही इष्ट नव्हतें; म्हणून या साध्या परंतु रुबाबदार पोषाखांतच वावरण्याची नेताजींनीं पाहिल्यापासून प्रथा पाडली. निजण्यापुरता किंवा स्नानापुरता तो पोषाख अंगांतून काढीत तेवढाच, एरवीं त्यांच्या अंगावर हा जामानिमा रात्रंदिवस असे. हिंदी स्वातंत्र्यसैनिकही नेहमीं फौजी पोषाखांतच असत. सायंकाळीं फिरावयास वा आप्तेष्टांकडे भेटावयास जातांना मात्र फक्त अधिकाऱ्यांस, फौजी पोषाखाशिवाय अन्य पेहराव घालण्याची मुभा असे.

थोर पुरुषाच्या हितचिंतकांप्रमाणेंच त्याचे हितशत्रूही असावयाचेच, भक्तगणांबरोबरच त्याचे निंदकही असावयाचेच असें दिसतें. त्याप्रमाणें नेताजींबद्दल वाईट बोलणारे कांहीं लोक होतेच. स्वातंत्र्य-चळवळीच्या इतिहासांत त्यांच्याशीं तीव्र मतभेद होऊन त्यांच्यापासून फुटून वेगळे निघणारेही दोनचार लोक होते. त्यांच्याशीं भांडून निघणाऱ्या या लोकांपैकीं एक गृहस्थ माझ्या परिचयाचे होते. नेताजींची देशभक्ति व त्यांचें चारित्र्य हे नेताजींचे गूण या गृहस्थांसही मान्य होते. त्याबद्दल त्यांचें माझ्याशीं दुमत नव्हतें; परंतु ते म्हणत कीं, "नेताजींस आत्मस्तुति प्रिय असून त्यांच्याशीं फटकून वागणाऱ्या लोकांस किंवा स्पष्टपणें त्यांस चार गोष्टी सांगणाऱ्या लोकांस ते कधींच जवळ करूं इच्छित नाहींत. आपलीं भाषणें, आपलें कार्य, सर्वच चांगलें आहे असें सर्वांनीं म्हणावें

असें त्यांस वाटतें." मी त्यांस म्हटलें कीं, "माझ्या अनुभवावरून मला तसें वाटत नाहीं. सर्व स्वार्थ त्यांनीं गुंडाळून ठेविला आहे व स्वदेशाबद्दल त्यांच्या मनांत उत्कट प्रेम आहे असें जर तुम्हीं मानतां तर, केवळ आत्मस्तुति ऐकण्याची लालसा त्यांचे मनांत उरली असेल असें मला वाटत नाहीं. अर्थात् आपल्यास सर्वांनीं चांगलें म्हणावें म्हणूनच आपण सद्गुणी व्हावें ही सर्वांचीच इच्छा असते. परंतु त्यास तुम्हीं आत्मस्तुतीची लालसा म्हणूं शकत नाहीं. दुसरा मुद्दा असा कीं, एकादी गोष्ट आदरपूर्वक समजावून सांगितली, तिचे फायदे-तोटे, ती प्रत्यक्षांत कशी आणतां येईल, प्रचलित पद्धति कशी वाईट आहे, तिच्या जागीं दुसरी पद्धति कशी रूढ करितां येईल हें जर सांगोपांग रीतीनें नेताजींसारख्या व्यक्तीस सांगितलें, तर ते कदापीही त्या सूचनांचा अव्हेर करणार नाहींत. उलट त्या त्यांस पटल्या तर ते आनंदानें त्या मान्य करून अंमलांत आणतील. परंतु एकायानें केवळ छिद्रेंच दाखवीत राहून भांडण व अट्टाहास चालू ठेवला तर त्याचा अर्थ 'विरोध' असाच करून त्या व्यक्तीस, चाललेल्या कार्यांत ढवळाढवळ करूं न देतां, बाजूला काढण्याचाच कोणीही प्रयत्न करील. एक वेळ असेंही धरून चाललें कीं, नेताजीं-सारख्या व्यक्तीस आत्मस्तुति आवडत असेल, तरीही तो कांहीं मोठा किंवा एकंदर कार्यास विघातक असा दोष नव्हे. प्रत्येक व्यक्तींत कांहींना कांहीं दोष असावयाचेच. एवढें मोठें कार्य ज्याच्या हातून घडतें त्यास त्याच्या मोबदल्यांत स्वकार्याचा गौरव व्हावा अशी व एवढीच अपेक्षा असली तर त्यांत गैर असें कांहींच नाहीं. आपल्याला सत्कार्यीं प्रवृत्त करणाऱ्या कांहीं विशिष्ट गोष्टींपैकीं, दुसऱ्यांनीं आपल्याला चांगलें म्हणावें ही इच्छा नेहमींच अधिक प्रभावी असते." वर उल्लेखिलेले हे गृहस्थ महाराष्ट्रीय होते. दुर्दैवानें त्यांचा नेताजींशीं बेबनाव झाला व आज हे गृहस्थ हयातही नाहींत. परंतु त्यांची कार्यक्षमता, कार्यतत्परता, निरलसपणा, देशाचें हित साधण्याचा शुद्ध हेतु याबद्दल मात्र त्यांच्या सहकाऱ्यां-पैकीं कोणीही शंका प्रदर्शित करीत नसे. नेताजींशीं जरी त्यांचा बेबनाव झाला तरी त्यांत त्यांचा कोणताही वाईट हेतु नव्हता.

नेताजींच्या उज्ज्वल चारित्र्याबद्दल सर्वसामान्य जनांत किंवा त्यांच्या निकटवर्ती लोकांच्या मनांत यत्किंचितही शंका नव्हती. परंतु तरीही कोठेंतरी कानाकोपऱ्यांत, त्यांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविणारे कांहीं लोक असल्याची कुणकुण, कधीं कधीं कानावर येत असे. या लोकांस नेताजींच्या धवल कीर्ती-बद्दल वैषम्य तरी वाटत असावें किंवा खरूज खाजवितांना अनुभवास येणाऱ्या घातुक आनंदाचा प्रत्यय या लोकांस एकाद्या सत्पुरुषाबद्दल निष्कारण कंड्या पिकवितांना होत असावा. कोणास 'ब्र' काढतां येण्यासारखी नेताजींच्या दैनंदिन कार्यक्रमांत यत्किंचितही जागा नव्हती. याचें एक मजेदार उदाहरण आहे. एकदां नेताजींना सिंगापुरांतील त्यांच्या निवासस्थानीं, वरच्या मजल्यावरील

त्यांच्या अभ्यासाच्या खोलींतील मेजावर एक विजेच्या दिव्याचा स्टँड पाहिजे होता. हसन नांवाचे जर्मनीहून त्यांच्याबरोबर आलेले गृहस्थ त्यांचे चिटणीस होते. त्यांस नेताजींनीं एक विजेच्या दिव्याचा स्टँड आणावयास सांगितला. श्री. हसन यांनीं दूरध्वनियंत्रानें स्वातंत्र्यसंघाच्या पुरवठा-खात्यास तो स्टँड आणावयास सांगितलें. त्या खात्याचा एक मनुष्य लगेच मोटारीनें बाजारांत जाऊन सिंगापूर शहरांत उपलब्ध असलेला एक उत्तमोत्तम स्टँड घेऊन आला व त्यानें तो नेताजींच्या निवासस्थानीं पोंचविला. श्री. हसन यांनीं त्याच्यावरील जाड कागदी आवरण काढून, तो उत्तम असल्याबद्दल मनांत समाधान मानीत नेताजींच्या मेजावर नेऊन ठेवला. दिवसभर नेताजी निरनिराळ्या कार्यक्रमांत दंग असल्यामुळें बाहेरच होते. पहांटे तीन-चार वाजेपर्यंत बाहेरचें सर्व काम उरकल्यावर नेहमींच्या संवयीप्रमाणें अभ्यास व मनन करावयास ते आमच्या खोलींत गेले. टेबलावरील नवा स्टँड पाहून त्यांच्या कपाळास आंठ्या पडल्या ! श्री. हसन हे त्या वेळेस आपल्या खोलींत स्वस्थ झोंपीं गेलेले असल्यामुळें त्या स्टँडबद्दलची आपली नापसंती त्यांजपाशीं दुसऱ्या दिवशीं व्यक्त करावी असें नेताजींनीं ठरविलें. दुसऱ्या दिवशीं संधी सांपडतांच नेताजींनीं श्री. हसन यांस बोलविलें.

नेताजी:– हसन ! मी तुम्हांला काल विजेचा एक स्टँड आणावयास सांगितलें होतें ना ?

हसन:– हो, त्याप्रमाणें मी तो आणून ठेवला ना आपल्या मेजावर.

नेताजी:– कसा चांगला आहे का तो ?

हसन:– हो.

नेताजी:– नीट बघितलात तुम्ही ?

हसन:– हो.

नेताजी:– त्यांत कांहीं गैर दिसलें नाहीं तुम्हांला ?

हसन:– छे.

नेताजी:– पुन्हां एकदां बघून या बघूं वर जाऊन !

श्री. हसन हे तडक वर गेले. त्या स्टँडमध्यें काय बरें वैगुण्य असेल ? याचा त्यांनीं मनाशीं सारखा विचार चालविला. ‘ आपण तो टेबलावर ठेवला तेव्हां तर त्यांत कांहींच बिघाड नव्हता. त्यानंतर कांहीं झालें कीं काय ? ’ असा एक विचार त्यांच्या मनांत येऊन गेला. वर जाऊन त्यांनीं दिव्याचा खटका खालीं-वर करून बघितला. दिवा नीट लागत होता. स्टँडही जसाच्या तस्सा होता. त्यांतही कांहीं फरक नव्हता. इकडून तिकडून, खालून-वरून, या बाजूनें, त्या बाजूनें, त्यांनीं सगळीकडून तो स्टँड न्याहाळला. त्यांना त्यांत कांहींच दोष आढळला नाहीं नेताजींचा कांहींतरी गैरसमज झाला असावा कदाचित् ! अशा बुचकळलेल्या मनस्थितींत ते खालीं आले. नेताजींनीं पुन्हा त्यांस प्रश्न केला, “ काय ! बघितलात ” श्री. हसन म्हणाले “ हो बघितला,

परंतु त्यांत कांहींच दोष नाहीं. सर्व ठीक आहे " त्यावर नेताजी त्यांस म्हणाले, " त्या स्टँडच्या तळाशीं एका स्त्रीची लहान, नग्न मूर्ति आहे ती तुमच्या नजरेस आली नाहीं काय ? " हा उद्गार कानीं पडल्याबरोबर श्री. हसन यांच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला. एवढी साधी गोष्ट आपल्या लक्षांत कशी येऊं नये, याचें त्यांस आश्चर्य वाटलें. त्यांनीं मानेनेंच रुकार दर्शविला. नेताजी म्हणाले, " असला स्टँड नकोय् माझ्या मेजावर. द्या फेकून तो समुद्रांत ! " लगेच तो स्टँड त्यांच्या टेबलावरून काढण्यांत आला.

स्वातंत्र्यसैन्याची सिंगापुरांतून ब्रह्मदेशाच्या रोखानें हालवाहालव होण्याच्या अगोदर नेताजींनीं स्वातंत्र्यसैन्याच्या सर्व अधिकाऱ्यांस बिद्याधारी छावणींत जमवून त्यांच्यासमोर एक भाषण केलें. त्यांत ते म्हणाले,

" मित्रहो, हिंदी स्वातंत्र्यसेनेचे अधिकारी या नात्यानें तुम्ही आपली वागणूक, चारित्र्य व शील फारच पवित्र राखलें पाहिजे. इतर राष्ट्रांच्या सैन्यांतून प्रत्येक अधिकारी आपलें काम वेळेवर, चोखपणें व योग्य तऱ्हेनें पार पाडतो कीं नाहीं, एवढेंच त्यांचे इतर देशबांधव बघतात. फावल्या वेळीं तो काय करतो ? त्याची खाजगी वागणूक व चाल-चलणूक चांगली आहे कीं नाहीं ?–हें बघण्याच्या भानगडींत कोणी पडत नाहीं. इतर राष्ट्रांच्या सेनेंतील अधिकाऱ्यांच्या शीलास कोणी महत्त्व देत नाहीं. परंतु हिंदी लोकांचें तसें नाहीं. त्यांच्या दृष्टीनें ' चारित्र्य ' ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे. अलोट स्वार्थत्याग कर-णाऱ्या राष्ट्रपुरुषाच्या चारित्र्यावर एक शिंतोडा जरी उडाला तरी हिंदी बांधवांच्या मतें त्याच्या कार्याची किंमत कवडीइतकीही उरत नाहीं. ही वृत्ति चांगली किंवा वाईट हा प्रश्न अगदीं वेगळा आहे. परंतु आहे हें असें आहे. राष्ट्रवृत्तींत रतिभरही बदल करणें आपल्याला शक्य नाहीं. तसा फरक करण्याचें कांहीं कारणही नाहीं. त्या वृत्तीस जुळेल असेंच आपण वर्तन ठेवलें पाहिजे. ' आपण सात-आठ तास काम केलें म्हणजे झालें, त्यानंतर आपल्याकडे कोणीही लक्ष देऊं नये ' असें तुमच्यापैकीं कोणीही समजूं नये. तुमच्या आयुष्यांतील प्रत्येक क्षण तुम्ही कसा घालवितां याकडे सर्वांचें लक्ष असतें. अमुक एक गोष्ट आपण गुप्तपणें करितों, ती कोणाला समजणार आहे ? असें कदाचित् तुम्हांला वाट-ण्याचा संभव आहे परंतु भिंतींनासुद्धां कान व डोळे असतात. तेव्हां आपलें मन ताब्यांत ठेवून, चारित्र्य उज्ज्वल राखणें हेंच सर्वांत श्रेयस्कर. आतां आपण सर्वजण हिंदुस्थानांत प्रवेश करणार; आपणा सर्वांवर एक फार मोठी जबाबदारी आहे. हिंदी स्वातंत्र्यसेनेचा अधिकारी म्हटला कीं त्याची वागणूक नमुनेदार असली पाहिजे. तुमच्याबद्दल

सर्वांच्या मनांत आदर उत्पन्न होईल अशीच तुमची वर्तणूक असावयास पाहिजे. या एका महत्त्वाच्या बाबतींत तुम्ही स्वतःस इतर राष्ट्रांच्या सेनेंतील अधिकाऱ्यांहून भिन्न समजलें पाहिजे.... "

वरील दोन उदाहरणांवरून व नेताजींच्या एकंदर कार्यव्यग्रतेवरून आपणास त्यांच्या धवल शीलाची व उज्ज्वल चारित्र्याची कल्पना यावयास पाहिजे. या एका बाबतींत त्यांच्याविरुद्ध बोलणारे लोक हे एक तर कोणाच्या आज्ञेवरून किंवा प्रोत्साहनावरून तसें करीत असले पाहिजेत अथवा सत्कार्यांत विघ्न आणणें, कंड्या पिकविण्यांत आनंद मानणें, नेताजींच्या कीर्तीबद्दल वैषम्य वाटून ती कमी करण्याचा प्रयत्न करणें, असलीं कांहींतरी कारणें त्यांस या कार्यास प्रवृत्त करीत असलीं पाहिजेत.

नेताजींस कोणीही भेटावयास गेला म्हणजे ते त्याचें सस्मित स्वागत करून त्यास आपल्या जवळ बसवितात. उच्च नीच हा भेद त्यांच्याजवळ नाहीं. राव असो किंवा रंक असो ते त्याचें स्वागत तितक्याच आपुलकीनें, शुद्ध मनानें आणि विनयानें करतात. अपरिचित व्यक्तीशीं प्रथमच भेट होत असल्यास ते त्याच्याकडे शांत आणि स्थिर दृष्टीनें बघत राहतात. जणूं काय त्याच्या चेहऱ्यावरून त्याचा स्वभाव, भेटीस येण्यांतील उद्देश यांचा ते ठाव घेत असावेत.

एरवीं त्यांचा चेहरा नेहमीं धीरगंभीर आणि शांत दिसतो. कोणतीही सूचना, वयानें अथवा अधिकारानें कितीही लहान अशा माणसाकडून आली तरी तिचा ते शांतपणें विचार करितात. एकदम तुसडेपणानें उत्तर देणें अथवा ती सूचना फेटाळून लावणें असें त्यांच्या हातून कधींही घडत नाहीं. नेताजींच्या चेहऱ्यावरचा नेहमींचा भाव जरी शांततेचा आणि गंभीरतेचा असला तरी त्यावर हास्य झळकण्यास वेळ लागत नाहीं. मेजाशीं जेवावयास बसत तेव्हां ते इतरांसही थोडाबहुत आग्रह करून, शेजारीं बसलेल्या माणसास तर स्वतः हातानें तो तो पदार्थ आपण घेण्याच्या अगोदर वाढीत. जेवतांना बहुतेक कांहीं गमतीदार प्रसंगावर बोलणें व्हावयाचें. त्या वेळेस सहसा कोणत्याही गंभीर विषयाची चर्चा होत नसे. अर्थात् तेव्हां नेताजींना हसतांना पाहणें दुरापास्त नव्हतें.

त्यांचा दुसरा एक स्वभावविशेष म्हणजे त्यांचें अत्यंत कोमल अंतःकरण. दुसऱ्याचें दुःख पाहून किंवा त्याचें स्मरण होऊन चटकन् त्यांच्या डोळ्यांत पाणी येतें. दुसऱ्याच्या हृदयांतून प्रकट झालेल्या उत्कट भावना त्यांच्या हृदयाचा ठाव घेतात. एके दिवशीं सेलेतार लष्करी केंद्रांत रिक्रूटांस उद्देशून नेताजींचें भाषण झालें. भाषण संपल्यावर त्यांचा तो ध्येयनिष्ठपणा पाहून त्यांच्याबद्दल उत्कट प्रेम असलेला एक रिक्रूट ओंजळींत पुष्कळशीं फुलें घेऊन त्यांच्या मोटारीजवळ उभा राहिला. ते मोटारींत बसावयास आले तेव्हां त्यानें चटकन् पुढें होऊन त्यांस नमस्कार केला. त्याच्या डोळ्यांत अश्रू चमकत होते. दोन्ही

ओंजळींतील फुलें त्यानें त्यांच्या डोक्यावरील टोपीवर ठेवलीं. तीं पडूं लागलीं तों पुन्हां त्यानें तीं सांवरून तेथें ठेवण्याचा प्रयत्न केला. त्याचा कंठ सद्गदित झाला. तोंडांतून शब्द फुटेना. नेताजींबद्दल त्यास वाटणारें उत्कट प्रेम व आत्यंतिक आदर यांचा उमाळा सहन न होऊन तो हुंदके देऊन रडूं लागला ! खालीं वांकून त्यानें आपल्या बाहूंच्या बंधांत त्यांचे पाय घट्ट धरून ठेवले. " अरे...ये क्या, ये क्या " असें म्हणून नेताजी त्याला उठवूं लागले तों त्यानें त्याचे पाय जास्तच आवळून धरले. " तुम सिपाई हो, ऐसा नहीं करना " असें म्हणत ते त्याला उठवूं लागले. तो रिक्रूट ( उत्तर हिंदुस्थानी भय्या होता तो ) थोडा उठूं लागे व पुन्हां प्रेमाच्या आवेगानें त्यांचे पाय घट्ट आवळून धरी. जणूं काय नेताजींस आपण कोठें जाऊंच देऊं नये अशी त्याच्या मनाची स्थिती झालेली होती. शेवटीं इतर अधिकाऱ्यांनीं चटकन् पुढें होऊन त्या माणसास बाजूला ओढलें. नेताजींचा चेहराही लालबुंद होऊन, त्यांच्या डोळ्यांतही अश्रूंचीं अभ्रें स्पष्ट दिसूं लागलीं होतीं. आपली भावना इतरांच्या नजरेस येऊं नये म्हणून ते झट्कन् मोटारींत जाऊन बसले व त्यांच्या जयजयकारांत त्यांची मोटार पुढें निघाली.

कित्येक लोक गीता नुसतीच वाचतात, परंतु नेताजी गीता वाचतात एवढेंच नव्हे, तर ती आचरणांत आणण्याच्या हेतूनें वाचून, अर्थ समजून घेऊन आचरणांत तंतोतंत उतरवितात. श्रीमद्भगवद्गीतेंतील उपदेशाप्रमाणें आजकालच्या जीवनांतही भगवान् श्रीकृष्णाचा उपदेश कसा प्रत्यक्षांत उतरवितां येईल, याचें नेताजींचें जीवन हें एक मूर्तिमंत उदाहरण आहे. ते स्थितप्रज्ञाच्या स्थितीप्रत पोंचले आहेत असें म्हणण्यास पुष्कळ पुरावा आहे. १९४५ च्या एप्रिलमध्यें, ब्रह्मदेश सोडून नेताजींस सयाममध्यें परत यावें लागलें. हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या दोन संबंध डिव्हिजन्स् ब्रह्मदेशांतच अडकून इंग्रजांच्या हातांत पडल्या. इकडे जर्मनीचाही सर्वनाश झाला. जपानही हरणार अशीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं. तेव्हां सामान्य माणसाला निराशामय भासणाऱ्या या परिस्थितीबद्दल नेताजींस काय वाटत होतें, ही फारच विचार करण्यासारखी गोष्ट आहे. त्यानंतर त्यांच्या बँकॉकमधील वास्तव्यांत अनेक भाषणांतून त्यांनीं जे उद्गार काढले त्यावरून त्यांची वृत्ति स्पष्ट कळून येण्यासारखी आहे. ते म्हणाले,

> " कांहींजणांकडून मला असे उद्गार ऐकूं येतात कीं, जर्मन राष्ट्र हरलं, आतां आपण लढण्यांत कांहींच अर्थ नाहीं. ही लढाई, हा नाश फोल आहे. मला हें मत मुळींच मान्य नाहीं. स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं आम्ही जर दुसऱ्याच्या जिवावरच अवलंबून राहिलों तर आम्हांला स्वातंत्र्य कधींच मिळणार नाहीं. आज जर्मन राष्ट्र हरलें, उद्यां जपान हरलें, म्हणजे आम्हीही हातावर हात ठेवून स्वस्थ बसावें कीं काय ?

उलट मी तर असें म्हणेन कीं, आपल्याला बाहेरची मदत जितकी कमी येईल त्या मानानें आपला उत्साह, आपले प्रयत्न, हे कमी न होतां जास्त वाढलेच पाहिजेत. जर्मनी हरला तरी हरकत नाहीं. तो इंग्रजांच्याविरुद्ध लढत असतांना आमचे प्रयत्न शिथिल झाले असते तर एक वेळ आम्ही असें म्हणूं शकलों असतों कीं, दुसऱ्याची मदत आहेच, तेव्हां आपण जरा सुस्तावलों तरी चालेल. जपान आमच्याबरोबर इंग्रजांविरुद्ध लढत राहीपर्यंत आम्हांला कांहीं काळ असें म्हणतां येईल कीं, जपानी मदतीला आहेतच, आपण जरा आळस केला तरी चालेल. परंतु आज जर्मनी हरला, उद्यां जपानही हरेल कदाचित्, म्हणून आम्ही आमचे प्रयत्न त्या त्या प्रमाणांत जास्त जोरकस करावयाचे सोडून ते कमी कमी करीत जावें हें कोठलें शास्त्र ? हिंदुस्थानाचें— तुमच्या मातृभूमीचें स्वातंत्र्य म्हणजे काय साधी सुधी गोष्ट आहे कीं, जी आशा निराशेच्या दरक्षणीं बदलणाऱ्या वातावरणांत आपण थोडा वेळ उत्साहानें हातीं घ्यावी व मग सोडून द्यावी, पुन्हा घ्यावी पुन्हा सोडून द्यावी ? इतकी सोपी किंवा इतक्या धरसोडीची ती गोष्ट नाहीं. या जागतिक युद्धाची संधी हातची जात असूनसुद्धां हिंदुस्थान स्वतंत्र होण्याचीं चिन्हें दिसत नाहींत म्हणून हा प्रयत्न सोडून देणें अथवा निराश होऊन स्वस्थ बसणें हें त्यांतून कसें निष्पन्न होतें तेंच मला समजत नाहीं ! अशा कित्येक संधी येतात आणि जातात. आजपर्यंत हा प्रयत्न करण्यांत राष्ट्रभक्तांच्या कित्येक पिढ्या गेल्या. थोड्या वर्षांत हें साध्य होईल असें तुम्हाला वाटत होतें. तुमची अपेक्षा खोटी ठरली म्हणून प्रयत्न सोडून देण्याची ही तुमची वृत्ति पहा व आपल्या आयुष्यांतच काय परंतु दोन-तीन पिढ्यांतही हें ध्येय कदाचित् साध्य होणार नाहीं, असें स्पष्ट दिसत असतांना सुद्धां आमरणान्त प्रयत्न करून नामशेष झालेल्या राष्ट्रभक्तांच्या त्या अनेक पिढ्यांकडे पहा! आम्हीही कदाचित् प्रयत्न करतां करतां असेच मरून जाऊं. हिंदुस्थानाचें दुर्भाग्य तेवढ्यावरच संपलें नसेल, तर आणखी एक-दोन पिढ्यांनाही स्वातंत्र्य मिळणार नाहीं, असें आपण धरून चाललों, तरी आपण निराश होऊन प्रयत्न सोडून द्यावा हें कोठेंच सिद्ध होत नाहीं. आपण मेलों तरी आपलें राष्ट्र राहीलच; म्हणून त्याच्या स्वातंत्र्याकरतां प्रयत्न करणें हें आपलें कर्तव्य ठरतें. यशापयश हा प्रश्न डोळ्यासमोर येऊं देऊं नका. त्याच्याबद्दल वाईट वाटून घेऊन तुमचे प्रयत्न शिथिल होऊं देऊं नका. शरिरांत प्राण असेपर्यंत व ध्येय साध्य होईपर्यंत अविरत प्रयत्न करणें हेंच आपलें कर्तव्य आहे. असें लढतां लढतां कोणी जरी आपल्या साहाय्यार्थ उरलें नाहीं तरी आपण आपला लढा चालूच ठेवूं असा निर्धार करा !

जागतिक युद्ध संपल्यावर तुम्ही हरलांत असेंही मानण्याचें कारण नाहीं. १९१४–१९१८ च्या महायुद्धांतील दोस्तराष्ट्रांच्या जोड-सेनेचा प्रमुख ' मॉर्शल फॉच ' यानें असें म्हटलें आहे कीं, ' बहु-संख्य शत्रुसैन्यामुळें वा इतर कारणामुळें एकाद्या फौजेचा रणांगणावर कितीं वेळां कां पराजय होईना, आपण हरलों अशी नैराश्यमय वृत्ति त्या फौजेंत येईपर्यंत ती फौज हरली असें कधींच म्हणतां येणार नाहीं. ' त्याचप्रमाणें तुमचेंही मन खंबीर असेल, तुमच्या ध्येयावर तुमचा अढळ विश्वास असेल तर तुम्हाला हरविण्याची कोणाचीही शक्ती नाहीं.

प्रचलित जागतिक युद्ध संपलें आणि तरीही हिंदुस्थान स्वतंत्र झाला नाहीं, तर हातची संधी गेली असें समजण्याचें मुळींच कारण नाहीं. आयर्लंडचेंच उदाहरण घ्या. १९१६ सालच्या ' ईस्टर रिबेलियन ' नांवानें प्रसिद्ध असलेल्या स्वातंत्र्य मिळविण्याच्या प्रयत्नांत आयरिश लोक मुळींच यशस्वी झाले नाहींत. त्या वेळेस इंग्रजी फौजा जर्मनी-सारख्या जबरदस्त शत्रूविरुद्ध लढण्यांत गुंतल्या होत्या. इंग्रज प्रत्येक ठिकाणीं हरत होते तरीही त्यांनी हां हां म्हणतां आयरिश लोकांना चिरडून टाकलें. जागतिक युद्ध संपून इंग्रज फौजा परत आल्या. आयरिश लोकांनीं पुन्हा उचल खाऊन १९२२ सालीं एक जोरदार संघटित प्रयत्न आरंभिला आणि आश्चर्य हें कीं, त्या वर्षी इंग्रजांना दुसरें कांहींही व्यवधान नसतांना इंग्लंडपासून एका हांकेवर असलेलें हें चिमुकलें राष्ट्र इंग्रजांच्या एकवटलेल्या शक्तीस विरोध करून स्वतंत्र झालें ! प्रत्येक जागतिक लढा संपल्यावर निष्क्रीयतेची एक लाट येते. सर्व शिपाई बरेच वर्षांनीं, अनेक संकटांस तोंड देऊन घरीं परत येतात. एकदां टाकून दिलेलीं शस्त्रास्त्रें पुन्हां हातीं घेऊं नयेत असें त्यांस वाटतें. फौजी जीवनाचा त्यांस वीट येतो. पुन्हा मुलुखगिरीवर जावयास ते नाखूष असतात. पुन्हा तसा हुकूम आला तरी ते त्याचा अव्हेर करून बंड करण्यासही मागें पुढें पाहात नाहींत. युद्धकालांत कष्ट पडून कमी प्राप्ती झालेले मजूरही संप करतात. किंमती भरमसाट वाढून मालही पुरेसा नसल्यामुळें जनताही खवळलेली असते. अशा तऱ्हेनें प्रस्थापित सरकाराशीं कोणीच सहकार करावयास तयार नसतें. अशी संधी दर जागतिक युद्धानंतर येत असते. अर्थात् युद्ध संपल्यानें निराश होण्याचें कांहींच कारण नाहीं.

ग्रीक व तुर्क लोकांच्या युद्धांत ग्रीक लोकांनीं तुर्कांस मागें रेटीत रेटीत थेट त्यांच्या राजधानीच्या वेशींपर्यंत ते येऊन ठेपले. परंतु

तेवढ्यानें निराश न होतां तुर्क लोकांनीं निकराचा प्रयत्न करून त्यांना तेथून हुसकून लावलें व अशा रीतीनें आपला गमाविलेला सर्व प्रांत पुन्हा काबीज केला.

या सर्व उदाहरणांवरून, आपणही निराश न होतां आपला प्रयत्न सतत चालू ठेवला पाहिजे. आज ब्रह्मदेश गेला, हरकत नाहीं; आपण सयाममधून लढूं. येथूनही कदाचित् माघार घ्यावी लागली तर मलायांतून लढूं. तेथेंही आपला टिकाव न लागतां जगाच्या अगदीं एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत जावें लागलें तरी शरिरांत प्राण असेपर्यंत आपण प्रयत्न सोडणार नाहीं असा निश्चय करा ! ”

अशा तऱ्हेचा नेताजींचा दुर्दम्य उत्साह होता. 'शेवटपर्यंत कर्म करीत राहावयाचें, यशापयशाची फिकीर करावयाची नाहीं, निराश व्हावयाचें नाहीं' ही गीतेंतील शिकवण नेताजींनीं तंतोतंत आचरणांत आणून दाखविली. अशा असामान्य पुरुषास केवळ आपल्याच कालांतील एक थोर व्यक्ति असें न मानतां भगवान् बुद्ध, अशोक, चंद्रगुप्त, विक्रमादित्य, हर्षवर्धन, आद्य श्रीशंकराचार्य, छत्रपति शिवाजीमहाराज, राणा प्रताप, राणी लक्ष्मीबाई, नानासाहेब, तात्या टोपे इत्यादि हिंदुस्थानाच्या इतिहासांत ' यावच्चंद्र दिवाकरौ ' अजरामर झालेल्या व्यक्तींच्या मालिकेंत त्यांच्या नांवाचाही समावेश करावा लागेल !

नेताजी हे दूरपूर्वेंत असतांनादेखील वेळांत वेळ काढून तेथील रामकृष्ण मिशनच्या शाखेंत निरनिराळ्या प्रसंगांच्या निमित्तानें दोन-तीन खेपेस गेले होते. “ मला आणखी वेळ असता तर येथें येऊन वेळोवेळीं मी ध्यानस्थ बसलों असतों. माझ्या मनांत ईश्वरचिंतनाची एक फारच तीव्र तळमळ नेहमीं उचल खाते, परंतु काय करूं ? कामामुळें मला ती तशीच दाबून ठेवावी लागते ! ” असे उद्गार त्यांनीं अनेक वेळां सिंगापूरच्या रामकृष्ण मिशनचे ब्रह्मचारी कैलासम् यांजपाशीं काढले.

नाहीं म्हणावयाला नेताजींना दूरपूर्वेंत असतांना म्हणा किंवा जर्मनी-मध्येंच एक व्यसन जडलेलें होतें. तें म्हणजे सिगारेटस् ओढण्याचें. परंतु थोर माणसाला सर्वच शोभून दिसतें. यांतला अर्थ एवढाच कीं, एवढें अलौकिक कार्य करणाऱ्या माणसानें सिगारेटस् फुंकणें निराळें व एकाद्या उडाणटप्पू मुलानें त्या ओढणें निराळें. शिवाय त्यांचें सिगारेटस्चें व्यसन हें त्यांच्या कार्याच्या आड मुळींच येत नसे. सिगारेट ओढणारे अट्टल सर्वसामान्य लोक ज्याप्रमाणें सिगारेटस् फुंकीत, धुराकडे बघत किंवा आकाशाकडे तोंड करीत, आपल्या अमोल आयुष्याचे तासन्तास घालवितात, तसा नेताजी एक क्षणही घालवीत नसत. सिगारेटस् असल्याशिवाय मला काम सुचणार नाहीं असें तर त्यांच्या वृत्तीवरून कधींच निदर्शनास आलें नाहीं. कोणाशीं बोलत असतांनाच ते बहुधा सिगारेट ओढीत. लिहितां वाचतांना सिगारेटस् फुंकण्याकडे लक्ष घालण्यास त्यांस मुळींच

वेळ नसे. अर्थात् या दोन्ही दृष्टींनीं सामान्य व्यसनाधीन मनुष्यापेक्षां त्यांचें हें व्यसन फारच निराळ्या तऱ्हेचें होतें. व्हिस्की, ब्रँडी इत्यादि पाश्चात्य मदिरा, आंतरराष्ट्रीय समारंभप्रसंगीं चाखाव्या लागत तेवढ्याच ते घेत. 'हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्याकरतां मी वाटेल तें करीन' अशी नेताजींची तयारी होती. अमूकच मार्गानें तें मिळालें तर मला तें हवें आहे, अमक्या अमक्या गोष्टी मी कदापिही करणार नाहीं हें मत त्यांस मुळींच संमत नव्हतें. 'हिंदुस्थानाचें स्वातंत्र्य—अडतीस कोटि लोकांना दास्यांतून मुक्त करणें, हें एवढें मोठें उच्च, उदात्त आणि पवित्र ध्येय आहे कीं, तें साध्य करण्याकरतां कोणतेही उपाय उपयोजिले तरी त्यामुळें साध्य वस्तू मलीन न होतां योजिलेलीं साधनेंच पूनीत होतील' हें त्यांचें ठाम मत होतें. त्यांनीं स्वतःकरतां ठरविलेल्या या निकषावरच त्यांचे गुणदोष पारखले पाहिजेत अथवा त्यांच्या कार्याचें मोल ठरविलें पाहिजे.

कार्यव्यग्रतेमुळें त्यांचें मध्यान्हीचें जेवण हें दुपारीं ३ किंवा ५ वाजेपर्यंतही पुढें ढकलत असे. रात्रीचें जेवण ९ च्या सुमारास होई. कुत्रीं, मांजरें इत्यादि पाळीव जनावरांकडे लक्ष द्यावयास त्यांस मुळींच फुरसत होत नसे. तो विचारही त्यांच्या मनांत कधीं डोकावत नसे. कोट्यवधि लोकांच्या दुःखांकडे लक्ष द्यावयास फुरसत नसतांना, आपण विनाकारण जनावरांचा व्याप कां वाढवून घ्या, अशीच जणुं काय नेताजींची वृत्ति होती, हें पूर्वीं आपण पाहिलेंच आहे.

सिंगापुरांत दुधाचा व्यापार करणारे कांहीं हिंदी गवळी लोक एके दिवशीं ढोलकें वाजवीत, हारतुरे, पैसे, दागिने व इतर कांहीं वस्तू नेताजींना नजर करावयास म्हणून घेऊन थेट नेताजींच्या निवासस्थानीं येऊन पोंचले. दारावरचा पहारेकरी त्यांचा आंत शिरकाव होऊं देईना. नेताजींचें दर्शन घेतल्याशिवाय आपण कांहीं परत जाणार नाहीं, काय वाटेल तें होवो, असा या लोकांनीं हट्ट धरला. नेताजी स्वातंत्र्यसंघाचे कचेरींत रोज मध्यान्हीचे सुमारास तीन-चार तास जात असत, त्या वेळेस त्यांच्याशीं महत्त्वाचें काम असलेल्या नागरिकांनीं त्यांस तेथें भेटावें, अशी प्रथा असल्यामुळें त्या लोकांस तसें सांगण्यांत आल्यावरही ते ऐकेनात. त्यांनीं ढोलकें वाजवून नाचण्यास व नेताजींच्या नांवाचा जयजयकार करण्यास सुरुवात केली. आमचे ते नेते असल्यास त्यांनीं आम्हांस आत्तां दर्शन दिलेंच पाहिजे, असें म्हणून ते लोक कांहीं तेथून हालेनात. आंत वरच्या मजल्यावर नेताजींची व जपानी आणि हिंदी फौजी अधिकाऱ्यांची कसलीशी बैठक भरून त्यांत महत्त्वाचीं खलबतें चाललेलीं होतीं. अशा वेळेस नेताजींना बाहेरचा हा प्रकार सांगण्यास कोणीच आंत जाणें शक्य नव्हतें. शेवटीं त्यांनींच बाहेर काय गोंधळ चालला आहे तें बघून येण्यास एक-दोघांना पाठविलें. त्यांनींही नेताजी फार महत्त्वाच्या कामांत गुंतले असल्याबद्दल त्या लोकांस सांगून पाहिलें, तरीही ते ऐकेनात. शेवटीं ती बैठक थोडा वेळ थांबवून नेताजी खालीं आले. त्या लोकांना आंत येऊं द्यावें अशी त्यांनीं आज्ञा केली. ते लोक आंत आले व

त्यांनीं नेताजींस हार घातले, नजर करावयास आणलेल्या वस्तू आणि पैसे नजर केले. कांहींनीं त्यांच्या पायाला हात लावून साष्टांग नमस्कार घातले. अशा तऱ्हेनें त्यांचें समाधान झाल्यावर ते लोक नेताजींचे आभार मानीत निघून गेले. या एका लहानशा उदाहरणावरून नेताजींबद्दल तेथील सर्व हिंदी लोकांची काय भावना होती हें कळून येण्यासारखें आहे.

सिंगापुरांत नेताजींचें वास्तव्य असलें म्हणजे ते बहुतेक तीन-चार तास, म्हणजे सकाळीं सुमारें १० वाजल्यापासून ते दुपारीं २ वाजेपर्यंत स्वातंत्र्य-संघाच्या केन्द्रकचेरींत येऊन बसत असत. दूरपूर्वेंतील हिंदी स्वातंत्र्यसंघाचे अध्यक्ष या नात्यानें जें जें काम बघावयाचें तें ते या कचेरींत उरकून टाकीत. तदनंतर ते तास दोन तास स्वातंत्र्यसैन्याच्या मुख्य कचेरींत जाऊन बसत. तेथें सैन्याच्या हालचाली, जपान्यांकडून शस्त्रास्त्रें, दारूगोळा, धान्यसामुग्री व इतर युद्धसाहित्य बरोबर मिळत आहे किंवा नाहीं हें बघणें, एकाद्या वरिष्ठ अधिकाऱ्यानें कांहीं गुन्हा केला असल्यास त्यावर खटला चालविणें, वैद्यक व पुरवठा-खात्यास असलेल्या अडचणींचा विचार करणें, दूर गांवीं असलेल्या तुकड्यांचे, छावण्यांचे अथवा केंद्रांचे वरिष्ठ अधिकारी कांहीं कामाकरतां आलेले असल्यास त्यांची भेट घेऊन त्यांस त्यांच्या तुकडीच्या कार्याबद्दल विचारणें इत्यादि कामें त्यांच्या-कडे असत. उरलेल्या वेळीं बहुधा त्यांच्या निवासस्थानींच बैठकी, खलबतें, परिषदा, गांठीभेटी, विचारविनिमय, मुलाखती असा ओतप्रोत कार्यक्रम असे. क्वचित, सिंगापुरांतील जपानी राजप्रतिनिधींस किंवा सरसेनापतीस परत भेट देण्यास त्यांस जावें लागे.

अशा तऱ्हेनें सदासर्वकाळ कोट्यवधी बांधवांच्या सुखदुःखाच्या चिंतनांत मग्न राहून त्याकरतां अविरत कार्य करीत राहणारा, त्याच्यापुढें स्वतःची आत्मिक उन्नती अथवा परमार्थसाधन यांससुद्धां स्वार्थ समजून त्यांचाही त्याग करणारा, लोकसंग्रहाची अथवा एकाद्या आत्यंतिक पूज्य वाटणाऱ्या व्यक्तीचीही पर्वा न करतां, स्वतःच्या सद्सद्विवेकबुद्धीस पटेल तें निधड्या छातीनें करीत राहणारा हा पुरुष असामान्य होय यांत संशय नाहीं! अलौकिक स्वभावविशेष व आश्चर्य-कारक कार्यक्षमता या दोन्ही दृष्टींनीं श्री. सुभाषचंद्र यांच्यासारखी व्यक्ति हिंदु-स्थानास लाभणें हें हिंदुस्थानाचें परम भाग्यच म्हटलें पाहिजे.

---

## युद्धाची पूर्वतयारी : २१

१९४३ च्या नोव्हेंबर महिन्याच्या ६ तारखेस टोकिओंत जपानतर्फे दूरपूर्वेतील सर्व राष्ट्रप्रमुखांची एक परिषद् बोलाविण्यांत यावयाची होती. ही परिषद् फारच महत्त्वाची होणार असल्याचें सगळीकडे बोललें जात होतें. जपानमध्यें या परिषदेची पूर्वतयारी जोरांत सुरू होती. निरनिराळ्या राष्ट्रांचे सर्वाधिकारी व त्यांचे इतर मंत्री जपानला जाण्यास सिद्ध होऊं लागले. सहकारी-तत्त्वावर सर्वांचें बळ एकवटून इंग्रज व अमेरिकन यांच्याविरुद्ध लढून विजय कसा प्राप्त करून घेतां येईल, हा मुख्य प्रश्न चर्चिला जावयाचा असल्यामुळें, त्या दृष्टीनें प्रत्येक राष्ट्रास परस्पर सहकार्याच्या या गंगाजळींत काय काय टाकतां येईल, याचा विचार त्या त्या राष्ट्रानें करून तशा तयारीनें या परिषदेस हजर राहावयाचें होतें. जपानच्या नेतृत्वाखालीं तयार झालेल्या दूरपूर्वेतील राष्ट्रांच्या या सहकारी संघटनेंत हिंदुस्थानाला गोंवून न घेण्याचें नेताजींनीं ठरविल्यामुळें त्यांनीं केवळ प्रेक्षक या नात्यानेंच आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह या परिषदेला हजर राहण्याचा निश्चय केला. हिंदी स्वातंत्र्य-सरकारानें रीतसर-पणें जपान सरकाराला कळविलें कीं, " आपलें निमंत्रण पोंचलें परंतु केवळ प्रेक्षक या नात्यानेंच आम्ही परिषदेस हजर राहूं. हें आपल्याला मान्य असेल तर आमची यावयास कांहीं हरकत नाहीं. " जपाननेंही तें मान्य केलें. परिषदेचा दिवस जसजसा जवळ येऊं लागला तसतसे आपापल्या सोयीप्रमाणें निरनिराळ्या राष्ट्रांचे प्रमुख त्यांच्या त्यांच्या सहकाऱ्यांसह विमानानें टोकिओंत येऊं लागले. मॉंचूरिया, चीन, सयाम, ब्रह्मदेश, फिलीपीन्स् या दूरपूर्वेतील स्वतंत्र राष्ट्रांचे अधिपति व त्यांचे मंत्री एकामागून एक टोकिओंत येऊन दाखल झाले. त्यांचें स्वागत करून त्यांची सरबराई ठेवण्यांत जपानी अधिकारी गर्क होते. विमानतळावर दर वेळेस जपानचे मुख्य प्रधान जनरल टोजो व परराष्ट्रमंत्री इत्यादि वरिष्ठ अधिकारी पाहुण्यांच्या स्वागतार्थ विमानतळावर हजर असत. पाहुण्यांचें सुयोग्य स्वागत करून त्यांस थाटामाटांत, आगाऊच तयार केलेल्या त्यांच्या निवासस्थानीं पोंचविण्यांत येई. नेताजीही नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीस सिंगापुराच्या ' क्लँग ' विमानतळावरून या परिषदेस हजर राहण्याकरतां म्हणून निघाले. त्यांच्याबरोबर कर्नल जगन्नाथराव भोसले, श्री. हसन, मेजर राजू ( नेताजींचे डॉक्टर ) व स्वातंत्र्य-सरकाराच्या मंत्रिमंडळाचे

चिटणीस श्री. सहाय असे चौथे अधिकारी होते. जपानमध्यें त्यांस जरूर तें सर्व साहाय्य करण्यास हिकारी कीकानचे दोन दुभाष्ये अधिकारीही त्यांच्याबरोबर होते.

सिंगापुराहून त्यांचें विमान निघालें तें ईशान्येस बोर्निओटापूच्या उत्तरेस लागून असलेल्या एका लहानशा बेटावर उतरलें. तेथें मध्यान्हीच्या जेवणासाठीं व विमानांत पेट्रोल वगैरे भरण्यासाठीं दीड तास अवधि ठेवण्यांत आलेला होता. दुपारीं २-२॥ च्या सुमारास तेथून उड्डाण करून सायंकाळीं ६॥ चे अंदाजाला नेताजींचें विमान ' मनीला ' येथें येऊन पोंचलें. मनीला हें फिलीपीन्स् बेटाच्या राजधानीचें शहर असून, पूर्वी येथें राहात असलेल्या सर्वोच्च अमेरिकन अधिकाऱ्यांकरतां एक फारच भव्य, सुंदर आणि सर्व आधुनिक सुखसोयींनीं सज्ज असा ' मॅलॅकॅनन पॅलेस ' नांवाचा प्रासाद बांधलेला आहे. आंत दर ठिकाणीं डोळे दिपवून टाकण्याइतका साज आणि थाटमाट केलेला आहे. फिलीपीन्स बेटांतील अमेरिकन फौज जपान्यांना शरण गेल्यानंतर सर्व अमेरिकन अधिकारी व सैनिक युद्धबंदी झाले. तद्नंतर या टापूंतील जपानी फौजेचे सरसेनापति येथें राहात असत. १४ ऑक्टोबर १९४३ रोजीं जेव्हां फिलीपीन्सला स्वातंत्र्य दिल्याचें जपान्यांनीं जाहीर केलें, तेव्हां त्यांनीं हा प्रासाद रिकामा करून तो फिलीपीन्स् राष्ट्रांचे अध्यक्ष श्री. जोस् लॉरेल यांच्याकडे सोंपविला. तेव्हांपासून जोस् लॉरेल हेच त्यांत राहात होते. अमेरिकन लोकाचें फिलीपीन्स्वर राज्य असतांना जोस् लॉरेल हेच तेथील प्रजापक्षाचे मुख्य होते. ते एक माननीय राष्ट्रभक्त असून ज्या राष्ट्राच्या स्वातंत्र्याकरतां त्यांनीं इतक्या खस्ता खाल्ल्या त्या राष्ट्रास स्वातंत्र्य मिळाल्यावर ते त्याचे अध्यक्ष होणें हें योग्यच होतें. श्री. जोस् लॉरेल यांचें इंग्रजी भाषेवर फारच चांगलें प्रभुत्व आहे असें म्हणतात. त्यांच्या बाबतींत एक विशेष गोष्ट म्हणजे वक्तव्य करतांना ते सभागृह दणाणून सोडतात व दंडाचे स्नायू दाखविणाऱ्या एकाद्या पेहेलवानाप्रमाणें दोन्ही मुठी वळून त्यांचे हात खांद्याकडे फिरलेले असतात. दणदणीत भाषण आणि त्याबरोबरच धमकावणीवजा हलणारे, मुठी वळविलेले, कोपरांशीं वळवून खांद्यावर नेलेले हात बघितले, म्हणजे हे आतां आखाड्यांत उतरण्याच्या तयारीनेंच तणतणत आहेत कीं काय, असाच इंग्रजी भाषा न समजणाऱ्या कोणाही माणसाचा ग्रह व्हावयाचा ! असो.

आपल्या हिंदी पाहुणेमंडळीचीही याच मॅलॅकॅनन प्रासादांत उतरण्याची सोय करण्यांत आलेली होती. येथील त्या रात्रींच्या वास्तव्यांत स्वातंत्र्यसंघाचे अधिकारी नेताजींशीं विचारविनिमय करावयास तेथें आले. तेथील जपानी वरिष्ठ अधिकारीही नेताजींच्या समाचारास आले. दुसरे दिवशीं तेथून उड्डाण करून ही मंडळी फॉर्मोसा बेटांत आली. येथें अनेक कारखाने आहेत. जपाननें येथें एक फारच मोठा आरमारी तळ तयार केलेला होता. येथून उडून पुढें जपान देशाच्या अनेक बेटांपैकीं अगदीं दक्षिणेकडील बेटावर एक मुक्काम करून ही मंडळी

दुसरे दिवशीं सकाळीं टोकिओस येऊन पोंचली. सुमारें साडेचार ते पांच हजार मैलांचा हा प्रवास होता. विमानतळावर जनरल टोजो आणि त्यांच्या मंत्रिमंडळांतील प्रमुख व्यक्ती व हिंदी चळवळीशीं संबंध असलेले इतर कांहीं प्रतिष्ठित गृहस्थ उपस्थित होते. हस्तांदोलन व लवून अभिवादन, औपचारिक समाचार, पृच्छा इत्यादि शिष्टाचार झाल्यावर ही मंडळी पाहुण्याकरतां तयार ठेवलेल्या मोटारगाड्यांतून निघाली. नेताजी बसले होते त्या मोटारीला सिंगापुरांतील त्यांच्या मोटारीप्रमाणेंच अग्रभागीं एक लहान तिरंगी निशाण फडकत ठेवलें होतें. रस्त्याच्या कडेला दोन्ही बाजूंस आबालवृद्ध जपानी स्त्री-पुरुषांच्या दाट रांगा उभ्या होत्या. प्रत्येकाच्या हातांत लहान कागदी जपानी निशाण होतें. इतर कोणत्याही राष्ट्राच्या प्रमुखांपेक्षां नेताजींविषयीं प्रत्येक व्यक्तीच्या मनांत उत्कट प्रेमभाव व आदर वसत होता. त्यांचें स्वागत करणाऱ्या या अखंड आणि अथांग मेळाव्यांतील प्रत्येक व्यक्तीच्या चेहऱ्यावर हास्य विलसत होतें. नेताजींची मोटार समोरून जात असतांना हातांतील लहान जपानी निशाणें उंच करून सर्वजण मोठ्यानें 'चंद्रबोस बँझाई, चंद्रबोस बँझाई', असा जयजयकार करीत. 'बँझाई' या शब्दाचा अर्थ 'दीर्घायुषी होवोत' असा आहे. खांद्यावर असलेल्या मुलांस त्यांच्या माता मोटारीकडे बोट दांखवून 'चंद्रबोस' कोठें बसले आहेत हें मोठ्या कौतुकानें दाखवीत होत्या. अशा थाटानें हिंदी पाहुणेमंडळीच्या व जपानी अधिकाऱ्यांच्या मोटारी त्या जयजयकाराच्या वर्षावांतून आपला मार्ग काढीत होत्या. नेताजींच्या राहण्याची सोय एका जपानी सरदाराच्या महालांत करण्यांत आलेली होती. त्यांच्या घरची मंडळी नेताजींचें स्वागत करण्यास बाहेर येऊन उभी होती. अत्यंत प्रेमानें आणि आदरानें खालीं वांकून सर्वांनीं अभिवादन केलें. व त्यांचें स्वागत केलें.

कांहीं जपानी सैनिकांच्या वर्तनावरून जर आपण सरसहा सर्व जपानी लोकांच्या वागणुकीविषयीं अनुमान काढूं लागलों तर तें चुकीचें होईल. सर्वसामान्य जपानी स्त्री-पुरुष फारच सभ्य आणि विनयशीलपणें वागतात. आदरातिथ्य करण्यांत ते फारच परिश्रम घेतात. त्यांची कौटुंबिक पद्धति, वडील माणसांबद्दल आदर, स्त्रियांची पुरुषांशीं वागण्याची पद्धत, मुलांची आईबापांशीं वागणूक ही एकाद्या अस्सल जुन्या पद्धतीच्या हिंदी घराण्यासारखीच असते. 'अतिथि देवोभव' हें तत्त्व ते पूर्णपणें आचरणांत आणतात. आपण जणूं काय पाहुण्यांचे नम्र सेवकच आहोंत, अशी त्यांची वागणूक व भाषा असते. युद्धावर जाणाऱ्या सैनिकांस अथवा इतर अधिकाऱ्यांस ज्याप्रमाणें मुद्दाम ताठरपणाचें शिक्षण दिलें जातें त्याचप्रमाणें प्रत्येक जपानी नागरिकास नम्रतेचें, सभ्यतेचें व आदरातिथ्याचें बाळकडूच पाजलें जातें. दुसरा त्यांचा घेण्यासारखा गुण म्हणजे, ते आदरातिथ्याची आपली रीत सोडून पाश्चात्य पद्धत कधींही स्वीकारणार नाहींत; मग पाहुणा कोणीही असो. जोडे खालीं काढून ओट्यावर

बसून चौरंगावर काड्यांच्या साहाय्यानें जेवणाची पद्धत इतरांस आवडेल किंवा नाहीं याचा ते काथ्याकूट करीत बसत नाहींत. आपलें ते आपलें व त्याचा ज्याचा त्यानें स्वाभिमान बाळगलाच पाहिजे अशी त्यांची वृत्ति असते.

नेताजींच्याबरोबर त्यांचे चिटणीस श्री. हसन हेही तेथेंच राहिले. इतर तिघे ' इंपीरियल निप्पॉन हॉटेल ' मध्यें गेले. येथें त्यांच्याकरतां तीन-तीन खोल्यांचा एक एक गट मुद्दाम राखून ठेवण्यांत आलेला होता. हें तेथील सर्वोच्च प्रतीचें सरकारी वसतिगृह असल्यामुळें येथें माननीय सरकारी पाहुण्यांची सोय करण्यांत येत असे. सुमोरें अर्ध्या तासानें जनरल टोजो हे नेताजींच्या वसतिगृहीं सरकारी शिष्टाचाराप्रमाणें पहिल्या औपचारिक भेटीस्तव आले. त्यांनीं नेताजींच्या राहाण्याच्या व्यवस्थेबद्दल व इतर सुखसोयींबद्दल आस्थेनें चौकशी केली. त्यांच्याबरोबर ते जे दुभाष्ये आणीत त्याच्याच मध्यस्थीनें दोघांचें बोलणें व्हावयाचें. त्यांचे उच्च प्रकारचे दुभाष्ये हे इंग्लंड, अमेरिका यांसारख्या देशांत जाऊन तेथें वास्तव्य करून त्या त्या लोकांत मिसळलेले असे असल्यामुळें त्यांस दोन्ही भाषा उत्तम समजत. सरकारी कामांत वेळेला जो मिळेल तो दुभाष्या घ्यावा असें चालत नाहीं. जपानी सरकाराची इतकी चोख व्यवस्था असे कीं, दुभाष्यांस त्या त्या देशांत शिक्षण घ्यावयास पाठवून, त्यांस तेथील जपानी वकिलाच्या कचेरींत काम करावयाची संधी देऊन, हळू हळू उत्तेजन देऊन, मार्गदर्शन करून त्यांस उच्च प्रतीच्या दुभाष्यांच्या दर्जाप्रत आणून पोचवीत. दुभाष्यास अर्थातच त्या त्या परकी लोकांचे स्वभावविशेष, आवडीनिवडी, शिष्टाचार, अवगूण, त्यांच्यातील खांचाखोंचा हें कळणें आवश्यक असतें व त्याप्रमाणें मुत्सद्देगिरीनें व सफाईनें शब्दयोजना करण्यास शिकावें लागतें.

सायंकाळीं नेताजी जनरल टोजो यांच्या निवासस्थानीं सरकारी शिष्टाचाराप्रमाणें परतभेटीस्तव गेले. जपानी अधिकारी हे अष्टपैलू असतात. त्यांस अनेक युक्त्या-प्रयुक्त्या कला, भाषा इत्यादि अवगत असतात, परंतु या सर्वांचा तिऱ्हाइतास थांगपत्ताही लागूं न देण्याची लबाडीही त्यांस त्याबरोबरच शिकविलेली असते. जपानी अधिकारी जितका उच्च दर्जाचा, तितके त्याच्यांत हे गूण जास्त प्रगल्भ झालेले दिसतात. जनरल टोजो हेही जपानी अधिकाऱ्यांच्या या वैशिष्ट्याप्रमाणें सरकारी वाटाघाटींच्या वेळीं इंग्रजीचा एक शब्दही तोंडावाटे बाहेर पडूं देत नसत. जपानी अधिकाऱ्यांनीं सरकारी बोलणीं जपानी भाषेंतच करावीत व जपानी दुभाष्यानें त्यांचें भाषांतर करीत जावें हाच पायंडा घातलेला असे. यांत एकतर त्यांचा स्वभाषाभिमान, स्वदेशाभिमान इत्यादि तर दिसून येतातच, पण शिवाय पुढें मागें कांहीं आंगलट आलेंच तर दुभाष्या चुकला असेल असें म्हणण्याकरतां वाट मोकळी राहाते ! वाटाघाटी करणारा अधिकारी इंग्रजी भाषेंत कितीही प्रवीण असला तरी सर्व सरकारी कामाच्या वेळीं दुभाष्याकरवींच बोलतो. याप्रमाणें या प्रसंगींही जनरल टोजो व नेताजी

यांचें संभाषण जपानी दुभाष्याच्या मदतीनेंच झालें. वाटाघाटी संपल्यानंतर मात्र नेताजी मोटारींत बसून परत जावयाच्या वेळीं जनरल टोजो हे इंग्रजींत बोलूं लागले !

जपानी वरिष्ठ कायदेमंडळास ' डायट ' म्हणतात. या कायदेमंडळाचीं अधिवेशनें ज्या इमारतींत भरत असत त्याच इमारतीच्या भव्य आणि विस्तीर्ण सभागृहांत दूरपूर्वेंतील राष्ट्रांची ही सहकारी परिषद् भरण्याचें ठरलें होतें. सर्व प्रतिनिधींस कार्यक्रमाची रूपरेषा दर्शवणारीं पत्रकें, बिल्ले, प्रत्येकाची बसण्याची जागा इत्यादींच्या सूचना आगाऊ संपूर्णपणें देण्यांत आलेल्या होत्या. एवढा मोठा पसारा आणि इतकें जबाबदारीचें तें काम असून सर्व व्यवस्था इतकी चोख ठेवण्यांत आलेली होती कीं, कसलीही गडबड, घाई, गोंधळ, घोंटाळा न होऊन सर्व काम एकाद्या यंत्राप्रमाणें सुनियंत्रित रीतीनें चाललेलें होतें. त्या सभागृहांत सर्व प्रतिनिधींची बसण्याची व्यवस्था अर्धवर्तुलाकृती करण्यांत आलेली होती. अर्धवर्तुलाच्या खोलगट भागाच्या मधोमध जनरल टोजो यांच्या डाव्या बाजूला नेताजी आणि त्यांच्या हिंदी सहकाऱ्यांची बसण्याची व्यवस्था केलेली होती. पुढच्या रांगेंत प्रत्येक देशाचे अधिपति व त्यांच्याजवळ मागच्या रांगांत त्यांचे त्यांचे इतर सहकारी अशी मांडणी केलेली होती. मध्यान्हीची जेवणाची वेळ सोडून सकाळीं दोन तास व दुपारीं दोन तास अशी त्या परिषदेची बैठक तीन-चार दिवस भरली. बहुधा मध्यान्हीच्या वेळीं व सायंकाळीं जनरल टोजो यांच्यातर्फें किंवा जपानी सम्राट अथवा परराष्ट्रमंत्री यांच्यातर्फें सरकारी भोजनसमारंभ, अल्पाहार इत्यादि कार्यक्रम असल्यामुळें सर्व मंडळी परिषदेच्या अधिवेशनानंतर मिळूनच अशा दुसऱ्या कार्यक्रमाच्या ठिकाणीं जात. परिषदेच्या उद्घाटन प्रसंगीं जनरल टोजो यांचें भाषण झालें. जपान राष्ट्रातर्फें त्यांनीं सर्वांचें स्वागत केलें व परिषदेचा उद्देश समजावून सांगितला.

परिषद् ज्या सभागृहांत भरलेली होती त्याच्या आजूबाजूच्या खोल्यांतून कांचेच्या तावदानांपलिकडे दुभाष्ये, कारकून, टंकलेखक इत्यादि लोक आपापल्या मेजावर आपल्या कामांत गढून गेलेले होते. परिषदेंत प्रत्येक वक्त्याचें जें भाषण होणार होतें त्याची आगाऊ एक एक प्रत या लोकांस दिलेली होती. त्या त्या भाषणांचीं भाषांतरें जपानच्या अधिकृत दुभाष्यांनीं ब्रह्मी, सयामी, चिनी, इंग्रजी, जपानी इत्यादि भाषांतून केलेलीं होतीं. सर्व प्रतिनिधींस एक एक कर्णयंत्र देण्यांत आलेलें होतें. या कर्णयंत्राचा अर्धवर्तुलाकृति लवचिक पट्टा डोक्याच्या वरील भागास घट्ट बसून दोन्ही बाजूंच्या दोन वाट्या बरोबर प्रत्येकाच्या कानांवर आच्छादनाप्रमाणें पक्क्या बसत. या सर्व कर्णयंत्रांचा संबंध तारांच्या योगें या भोवतालच्या खोल्यांतील ध्वनियंत्रांशीं जुळविण्यांत आलेला होता. आंत बरीचशीं ध्वनियंत्रें असून प्रत्येक यंत्रापाशीं एक एक दुभाष्या बसलेला असे. प्रत्येक दुभाष्यापुढें मूळ भाषणाची एक प्रत व ज्या भाषेंत भाषांतर

करावयाचें त्याची एक प्रत ठेवलेली असे. परिषदेंतील वक्ता कोणत्याही भाषेंत बोलत असला तरी त्यानें तिकडे एक वाक्य उच्चारल्याबरोबर त्या वाक्याचें भाषांतर त्या त्या भाषेंत प्रत्येक दुभाष्या समोरील यंत्रांत उच्चारी. ती भाषा समजणाऱ्याच्या कानांत तें भाषांतरित भाषण वक्त्याच्या भाषणाबरोबरच ऐकूं जाई. अशा रीतीनें जनरल टोजो यांचें जपानी भाषेंत भाषण सुरू झालें म्हणजे त्यांच्या प्रत्येक वाक्याबरोबर त्या वाक्याचें भाषांतर, कर्णयंत्राच्या साहाय्यानें चिनी प्रतिनिधींच्या कानांत चिनी भाषेंत ऐकूं येईल, हिंदी व फिलीपीन प्रतिनिधींच्या कानांत इंग्रजींत उतरेल व ब्रह्मी प्रतिनिधींस ब्रह्मी भाषेंत समजेल अशी व्यवस्था केलेली होती.

ब्रह्मदेशाचे अधिपति 'डॉक्टर बा मॉ' यांनीं त्या परिषदेपुढें एक ठराव मांडला. श्री. बा मॉ यांना डॉक्टर ही पदवी वैद्यक शाखेची नसून अन्य शाखेची आहे. ते बॅरिस्टर आहेत. ब्रह्मदेशांतील ते एक लोकप्रिय पुढारी असून इंग्रजांनीं ब्रह्मदेशांतून माघार घेतली त्या वेळेस ते कैदेंतच होते. जपान्यांच्या आगमनानंतर ते सुटले. ब्रह्मी भाषेंत संस्कृत शब्द बरेच आहेत. 'अधिपति' या संस्कृत शब्दाचा ब्रह्मी उच्चार 'अदिपदि' असा आहे. डॉ. बा मॉ हेच स्वतंत्र ब्रह्मदेशाचे सर्वाधिकारी असल्यानें त्यांस 'अदिपदि बा मॉ' असें म्हणत. अदिपदि बा मॉनीं असा ठराव आणला कीं, 'दूरपूर्वेतील प्रत्येक राष्ट्र स्वतंत्र राहावें अशी आपली सर्वांची इच्छा असेल तर हिंदुस्थान स्वतंत्र होणें ही आवश्यक गोष्ट आहे. अर्थात् आपण सर्वजण एकजुटीनें, एकमतानें व आपली सर्व शक्ति एकवटून नेताजी सुभाषचंद्र बोस यांस त्यांच्या स्वातंत्र्ययुद्धांत सर्वतोपरी मदत करूं या.' या ठरावाच्या मंडनार्थ केलेल्या भाषणांत डॉ. बा मॉ म्हणाले, "हिंदुस्थान गुलाम झाला म्हणून एशियांत सर्व ठिकाणीं पाश्चात्य राष्ट्रांस आपला पाय रोवतां आला. सुएझच्या कालव्यापासून तों हाँगकाँगपर्यंत पसरलेलें इंग्रजांचें साम्राज्य हें सर्वस्वीं हिंदी फौजेच्या मदतीनेंच त्यांस मिळवितां आलें. हिंदुस्थान स्वतंत्र होऊन हिंदी फौज इंग्रजांच्या हातची गेली कीं, हें साम्राज्य पत्त्याच्या बंगल्याप्रमाणें एका फुंकरीसरशीं कोलमडून पडेल. हिंदुस्थान ही एशियाच्या स्वातंत्र्याची गुरुकिल्ली आहे..." त्यांचें म्हणणें सर्वांना पटून तो ठराव सर्वांनीं एकमतानें मंजूर केला.

या परिषदेंत नेताजी सुभाषचंद्र बोस काय भाषण करतील, हा एक सर्वांच्या कुतुहलाचा व चर्चेचा विषय झालेला होता. विद्वत्ता, अनुभव, ज्ञान, कळकळ, देशभक्ति व उज्ज्वल चारित्र्य या गुणांच्या कसोटीनें पाहतां, नेताजींच्या तोलाचा एकही पुढारी त्या सभेंत नव्हता, असें निश्चितपणें म्हणतां येईल. नेताजी भाषण करावयास उठले तेव्हां सभेंत सगळीकडे निस्तब्ध वातावरण पसरलें होतें. सर्वांचे डोळे नेताजींच्या तेजस्वी मूर्तीवर खिळलेले होते. नेताजी म्हणाले,

"...मी आणि माझे सहकारी या परिषदेंत प्रातिनिधिक स्वरूपांत आलेलों नसून केवळ प्रेक्षक या नात्यानें आलेले आहोंत; असें असतांना

देखील मला या सभेंत भाषण करण्याची जी सवलत देण्यांत आलेली आहे, त्याबद्दल मी आपणां सर्वांचा फार आभारी आहें...एक वेळ प्रगतीच्या उच्चतम शिखरावर असलेला व जगास धडे देणारा आमचा देश आज या अधोगतीस पोंचावा...अडतीस कोटि जनता पारतंत्र्याखालीं चिरडून तिचे हालहाल व्हावेत...आम्हांला दास्यांतून मुक्त होण्यास मदत करितां का ?—असें म्हणत तिच्या अनेक पुत्रांस वणवण हिंडावें लागावें, हा कालाचा महिमा तर खराच, परंतु याहून दुर्भाग्य तें कोणतें! आजपर्यंत कितीतरी देशोधडीला लागले, शेकडोंना हालहाल सहन करावे लागले, हजारों तुरुंगांत खितपत पडले, लाखों अर्धपोटीं राहात आहेत, कोट्यवधि भुकेनें मेले— अशी आमच्या देशाची स्थिति झालेली आहे. आज आम्हांला जपानबद्दल अभिमान वाटतो कीं, इतर एशियाई राष्ट्रांप्रमाणें जपान पाश्चात्य राष्ट्रांच्या कावेबाजीस बळी न पडतां स्वतः स्वतंत्र राहिला व पाश्चात्य राष्ट्रांना आव्हान देण्याइतकी जपानी राष्ट्रानें स्वतःची शक्ति वाढविली. जपाननें सुरू केलेल्या या युद्धामुळेंच आज दूरपूर्वेतील राष्ट्रांत आपणांस ही जागृति दिसत आहे. ही सुवर्णसंधी आपण हातची जाऊं देतां कामा नये. आमचे स्नेही डॉ. बा मॉ यांनीं परिषदेपुढें स्वातंत्र्ययुद्धांत आम्हांला पूर्ण मदत करण्याचा जो ठराव मांडला व त्यास आपण सर्वांनीं जो जोरदार पाठिंबा दिलात, त्याबद्दल मी व माझे सहकारी आभारी आहोंत. हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर दूरपूर्वेतीलच काय परंतु कोणतेंही पौर्वात्य राष्ट्र परतंत्र राहणार नाहीं, हें मी खात्रीनें सांगू शकतों...शेवटीं ही परिषद् भरविण्यांत पुढाकार घेऊन आम्हांला या युद्धांत एकमेकांशीं सहकार्य करण्याची संधी दिल्याबद्दल मी व माझे सहकारी जपानी राष्ट्राचे फार आभारी आहोंत..."

अशा अर्थाचें नेताजींचें भाषण झालें. नेताजींच्या अत्यंत हृदयस्पर्शी व उत्कृष्ट भाषणांपैकीं तें एक आहे असें सर्वांचें त्या भाषणाबद्दल मत आहे

परिषदेंत इतर राष्ट्रांच्या प्रमुखांनींही भाषणें केलीं. सर्वांवर सारख्याच फिरणाऱ्या या पाश्चात्य साम्राज्यशाहीच्या वरवंट्याचा नाश करावयास आपण सर्वांनीं या युद्धांत आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे, असेंच सर्वानुमतें ठरलें. अर्थात् परिषदेंत लांब लांब गप्पा मारणाऱ्या या विविध देशांच्या प्रतिनिधींच्या पोटांत काय होतें कोण जाणें ? जपानी फौजी अधिकाऱ्यांनीं त्या त्या देशांत चढेल धोरण पत्करून पुष्कळांस वीट आणलेला होता. अर्थात् त्यांच्या तोंडावर त्यांस रुचेल असें जरी सर्वजण बोलत असले तरी तें अंतःकरणापासून नव्हतें. युद्ध सुरू असतांना हडेलप्पी किंवा ताठरवृत्ति ठीक आहे, परंतु युद्ध संपून शत्रूच्या सर्व लोकांस युद्धबंदी केल्यावर ज्या तद्देशीय लोकांच्या सुटकेकरतां आपण अवतार घेतल्याचें जपानी लोक मोठेपणानें सांगत असत,

त्यांचा पदोपदीं अपमान न करतां, त्यांस हीन व तुच्छ न ठरवितां जपानी फौजी अधिकारी जर समजुतीनें, गोडी गुलाबीनें आणि खेळीमेळीनें वागले असते, तर या युद्धाचा शेवट जरा निराळ्या तऱ्हेनें लागला असता. ती परिषद् मोठ्या झोकांत पार पडली खरी, परंतु त्या वेळेस त्या परिषदेपासून ज्या दूरगामी परिणामांची अपेक्षा होती ती अंतीं फोल ठरली. हिंदुस्थान-ब्रह्मदेश सरहद्दीवर फक्त हिंदी आणि जपानी अशीं दोनच सैन्यें लढलीं. त्यांच्या मदतीस ब्रह्मी, सयामी, चिनी, मॉंचूरियन इत्यादि सैन्यें नव्हतीं. वास्तविक हिंदुस्थानाचें स्वातंत्र्य हें आपणा सर्वांचें स्वातंत्र्य असें सर्वांनीं कबूल केल्यावर त्यांनीं आगामी स्वातंत्र्यसंग्रामांत आपापलें सैन्यबळ एकवटावयास पाहिजे होतें; परंतु तसें कोणीच केलें नाहीं. आजकालच्या आंतरराष्ट्रीय व्यवहारांत आंत एक आणि बाहेर एक, दाखवावयाचे दांत निराळे आणि खावयाचे निराळे असाच बहुधा प्रकार असतो. वर दिलेल्या सर्व राष्ट्रांनीं जर आपलें सैन्य आणि युद्धसाहित्य हीं रणांगणावर पाठविलीं असतीं तर हिंदुस्थान-ब्रम्हदेश सरहद्दीवर इंग्रजांचा जोर कधींच वाढला नसता व त्यांना ब्रम्हदेशांत शिरतां आलें नसतें. कारण युद्धसाहित्य व मनुष्यबळ कमी पडल्यामुळेंच हिंदी स्वातंत्र्यसैन्यास व जपानी फौजेस इंफालपासून माघार घ्यावी लागली.

या परिषदेबरोबर इतरही, अल्पाहार, भोजनसमारंभ इत्यादि सरकारी आंतरराष्ट्रीय शिष्टाचाराचे कार्यक्रम पार पडले, हें वर आलेंच आहे. जनरल भोसले आदि हिंदी प्रतिनिधी सहज टोकिओ शहर बघावयास म्हणून जर बाहेर पडले तर तेथील लोकल ( आगगाड्यांत ) गाड्यांत व अन्यत्र ज्या जपानी स्त्री-पुरुषांशीं त्यांचा परिचय होत असे, ते लोक ‘चंद्रबोसांचे हे सहकारी आहेत व हिंदी स्वातंत्र्य-सरकाराचे उच्च अधिकारी आहेत’ असें कळतांच अत्यंत आदरानें उठून त्यांस लवून अभिवादन करीत. सहज टोकिओंतील या प्रसंगाची आठवण म्हणून व आपल्या मित्रमंडळीस देण्याकरतां जेव्हां कांहीं चांदीच्या अथवा इतर वस्तू घेण्याचें त्यांच्या मनांत आलें तेव्हां त्यांनीं जरूर त्या वस्तू घेऊन त्यांची किंमत विचारली. परंतु ‘आपणांस पाहिजे त्या वस्तू आपण निवडा व घेऊन चला किंवा आम्हीं त्या आपल्या निवासस्थानीं पाठवून देऊं, परंतु आपल्यापासून पैसे घेण्याची आम्हाला मनाई आहे’ असें त्यांस सांगण्यांत आलें. सरकारतर्फे सर्व दुकानदारांस असे हुकूम सोडण्यांत आलेले होते कीं, पाहुण्यांकडून पैसे घेण्यांत येऊं नयेत. प्रतिनिधींस ते मागतील त्या वस्तू द्याव्या. सरकार सर्व खर्च भरून देईल. प्रत्येक जपानी नागरिकांत शिस्त हा एक गुण फारच वाखाणण्यासारखा असतो. जपानची सबंध बाजारपेठ मोकळी ठेवली तरी त्यांत इकडची वस्तू तिकडे हालणार नाहीं, इतकें चोरीचें प्रमाण जपानमध्यें कमी असतें. दुकानदारही इतर नागरिकांप्रमाणें सचोटीचा

व्यवहार करितात. अशा प्रसंगीं सरकार व गिऱ्हाईक अशा दोघांकडून पैसे उकळण्याचा निंद्य व्यवहार करण्याचें ते मनात सुद्धां आणीत नाहींत.

जपानमध्यें एक आरमारी-वस्तूसंग्रहालय आहे. त्यांत काचेच्या कपाटांतून, टॉर्पेडो मारून समुद्रांत संचार करणाऱ्या जहाजांना पाणबुड्या कशा बुडवितात हें सुसंगत असें फारच ठळकपणें आणि हुबेहूब दाखविलें आहे. आंत समुद्रासारखें निळें पाणी आहे. त्याच्यावर तरंगणारीं लहान खेळांतल्यासारखीं जहाजें आहेत व कांहीं पाणबुड्याही आहेत. त्या कपाटाच्या बाहेर असलेला विजेचा एक एक खटका दाबला कीं, एक एक क्रिया घडते. पहिला खटका दाबला कीं, पाणबुडी इतस्ततः पाण्याच्या आंतून संचार करूं लागते. नंतर दुसरीं जहाजें समुद्राच्या पाण्यावरून फिरतांना दिसतात. त्या जहाजांपैकीं एक या पाणबुडीच्या समोर आलें कीं, या पाणबुडींतून एक टॉर्पेडो जोरांत बाहेर पडतो व त्या जहाजाला लागून त्या जहाजाचे बरोबर मधोमध दोन तुकडे करतो. जपानी मुलांना लहानपणापासून असें शिक्षण मिळतें. अशा तऱ्हेच्या पुष्कळ गमती व लढाईचीं हुबेहूब दृश्यें दाखविण्याची सोय जपानमध्यें केलेली आहे. पाश्चात्य देशांतून सफर करून आलेल्या व पाश्चात्य लोकांइतके पुढें गेलेले लोक जगांत कोठेंही नाहींत असें प्रतिपादणाऱ्या लोकांसदेखील आश्चर्यानें तोंडांत बोट घालावयास लावणाऱ्या बऱ्याच गोष्टी जपानमध्यें आहेत. जपानी लोक पाश्चात्य लोकांप्रमाणें स्वतःची बढाई कधींच मारीत नाहींत व हिंदी लोकांप्रमाणें ते अंतःकरणाचे उथळ किंवा भडभडे नाहींत. १९०४-१९०५ या काळांत जपानचें रशियाशीं जें युद्ध झालें तें अनेक दृष्टींनीं फारच महत्त्वाचें ठरलें. जपान हें पाश्चात्य राष्ट्रांच्या तोडीचें एक बलाढ्य राष्ट्र आहे हें तर त्यांत सिद्ध झालेंच, परंतु शिवाय पाश्चात्य राष्ट्रांच्या दडपणाखालून एशिआटिक राष्ट्रांस कधींच सुटका करून घेतां येणार नाहीं, अशी जी एक नैराश्यवृत्ति सर्व एशिआटिक लोकांत आलेली होती ती जपानच्या या विजयामुळें ओसरूं लागली. एशिआटिक राष्ट्रसुद्धां पाश्चात्य राष्ट्रावर सहज विजय मिळवूं शकतें हें या विजयामुळें एशिआटिक लोकांना कळून ते जास्त उत्साहित झाले.

जपानच्या लष्करी अधिकाऱ्यांच्या शाळेंतील शिस्त फारच कौतुकास्पद असते. एकाद्या मुलाला प्रश्न विचारतांच तो झट्दिशीं विजेच्या वेगानें एकदम उठून ताठ उभा राहतो. हात-पाय व संबंध शरीर निश्चल ठेवून विचारणाऱ्याच्या दृष्टीस आपली दृष्टि भिडवून आपल्या डोळ्यांचीं बुबुळेंही न हालवितां त्याच्या प्रश्नाचें उत्तर मोठ्यानें आणि स्पष्टपणें तसेंच अस्खलितपणें देतो. त्याच्या बोलण्यांत कसलाही मिळमिळितपणा नसतो. अमुक एक गोष्ट माझ्या हातून होणें शक्य नाहीं, असें त्याच्या तोंडून कधींही ऐकावयास मिळणार नाहीं. वरिष्ठाचा हुकूम तो अगदीं शिरसावंद्य मानतो.

जपानांतील विमान तयार करण्याचे व तोफा वगैरे शस्त्रास्त्रें तयार करण्याचे कारखाने बघण्याची इच्छा जेव्हां कांहीं प्रतिनिधीमंडळींनीं प्रदर्शित केली, तेव्हां त्यांस असें सांगण्यांत आलें कीं, ते कोठें आहेत हें आम्हाला सुद्धां माहीत नाहीं. कांहीं गुप्त गोष्टींपैकींच ही एक असून, त्याबद्दल फक्त त्या खात्याच्या अधिकाऱ्यांनाच काय ती माहिती आहे. जपानांत महत्त्वाच्या बाबतींत इतकी गुप्तता राखण्यांत येते कीं, या कानाचें त्या कानाला कळत नाहीं. जपानांत जाणाऱ्या प्रत्येक परकी इसमावर इतकी कडक देखरेख ठेवण्यांत येते कीं, त्यानें जपानांत पाऊल ठेविलेल्या क्षणापासून तों थेट तो इसम जपानांतून निघून जाईपर्यंत दरक्षणीं त्यानें काय केलें ही तारीखवार नोंद सर्व जपानी पोलीस-स्टेशनावर असते. त्याच्याशीं ज्यांचा ज्यांचा संबंध येतो, मग ते दुकादार असोत, वा वेश्या असोत, त्या जपानी व्यक्ती नेमक्या जपानी पोलिसास, आपण होऊन परकीयांशीं झालेल्या सर्व व्यवहाराची बारीक सारीक माहितीसुद्धां कळवितात. प्रत्येक जपानी नागरिक अशा तऱ्हेनें आपली सर्व जबाबदारी ओळखून त्याप्रमाणें वागून सरकाराचा बराच बोजा हलका करतात. जपानी नागरिकांस शिक्षणच अशा प्रकारचें असतें.

जपानमधील वास्तव्यांत जपानी मंत्रिमंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशीं नेताजींच्या स्वातंत्र्ययुद्धाबाबत व पुढील कार्याबाबत वाटाघाटी झाल्या. यांतील महत्त्वाची गोष्ट म्हणजे नेताजींनीं अंदमान व निकोबार बेटें हिंदी स्वातंत्र्य-सरकारास मिळावींत अशी जनरल टोजो यांस विनंती केली. ब्रम्ही सरकार हेंही अंदमान व निकोबार बेटांची मागणी करण्याच्या तयारीनें आलेलें होतें. परंतु त्याच्या आधींच हिंदी स्वातंत्र्य-सरकारातर्फें ही मागणी करण्यांत आली. हिंदुस्थानाचा अफाट विस्तार व अनेक हिंदी देशभक्तांचे येथें पडलेले बळी या दोन्ही गोष्टी लक्षांत घेतां हिंदुस्थानाचाच या बेटांवर हक्क आहे. ब्रम्हदेशासारखें लहान राष्ट्र हें, इतक्या दूर असलेल्या या बेटांचें भावी काळांत संरक्षण करण्यासही सर्वस्वीं असमर्थच ठरेल. जपाननेंही, ही न्याय्य मागणी मान्य करून अंदमान व निकोबार बेटें हिंदी स्वातंत्र्य-सरकारास देण्याचें ठरविलें. यास अनुसरून जनरल टोजोनीं जपानी राष्ट्रातर्फें ६ नोव्हेंबर १९४३ रोजीं, दूरपूर्वेतील राष्ट्रांच्या परिषदेंत असें जाहीर केलें कीं, " हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्ययुद्धांत हिंदी स्वातंत्र्य-सरकारास जपानी सरकार पूर्ण मदत करावयास तयार आहे, याची साक्ष म्हणून मी असें जाहीर करितों कीं, सध्यां जपानच्या ताब्यांत असलेलीं अंदमान व निकोबार बेटें जपानी सरकार लवकरच हिंदी स्वातंत्र्य-सरकाराच्या स्वाधीन करणार आहे." या घोषणेनें हिंदी लोकांच्या मनावर फारच चांगला परिणाम झाला. जपानी सरकार हें खरोखरच कळकळीनें आपल्याला मदत करावयास तयार आहे याबद्दल त्यांची खात्री झाली. नाहींतर जिंकलेला प्रांत असा सुखासुखीं एका शब्दासरशीं कोण सोडावयास बसला आहे ? हिंदी स्वातंत्र्य-सरकारास

आजपर्यंत स्वतःची अशी हक्काची जमीन नव्हती, ती ही आयतीच मिळाली व या दृष्टीनें शत्रूच्या प्रचारास आळा घालवयास एक नवीन साधन प्राप्त झालें. जपानी राष्ट्र आम्हांस शुद्ध हेतूनें मदत करीत आहे असेंही म्हणतां आलें व इतके दिवस हिंदी स्वातंत्र्य-सरकार हें हक्काची जमीन नसलेलें सरकार होतें ती परिस्थिति बदलून त्या जागीं आतां प्रजाजन व हक्काची भूमि अशा दोन्ही गोष्टी असलेलें, सर्व दृष्टीनें परिपूर्ण असें हें सरकार आहे असेंही म्हणतां आलें. जपानच्या सम्राटानें एखाद्या व्यक्तीची भेट घेणें हें प्रत्यक्ष ईश्वर प्रसन्न होण्याइतकें महत्त्वाचें आहे असें सर्व जपानी लोक समजतात. तोही दुर्मिळ बहुमान नेताजींस या प्रसंगीं मिळाला !

शाळेंत व एकंदर लहानपणाच्या आयुष्यक्रमांत ज्याप्रमाणें कुसंगतीपासून सावध राहावें लागतें, त्याचप्रमाणें आंतरराष्ट्रीय राजकारणांत मोठमोठ्या हुद्यावर असलेल्या व्यक्तींस आपल्या शीलास जपावें लागतें. आंतरराष्ट्रीय राजकारणांत एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राच्या प्रतिनिधींचें अथवा इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांचें आदरातिथ्य करण्याचा जेव्हां जेव्हां प्रसंग येतो त्या त्या वेळेस मदिरा व मदिराक्षी यांचा सर्रास उपयोग केला जातो. पाहुण्यांनीं या दोन्ही गोष्टींचा उपभोग घेऊन आदरातिथ्य करणाऱ्या राष्ट्राचें मिंधें व्हावें, त्यांचीं छिद्रें आपल्या लक्षांत येऊन वेळप्रसंगीं त्या छिद्रांचा फायदा घेऊन त्यांच्यावर आपली पकड घट्ट करितां यावी. व अशा तऱ्हेनें मिंधे बनलेल्या अधिकाऱ्यांवर दडपण आणून राजकारणांत त्याचा फायदा करून घ्यावा, असा संघटित प्रयत्न निर्घृणपणें आजकालच्या राजकारणांत प्रत्येक राष्ट्राकडून केला जातो. दारा आणि दारू याचा पाहुण्यांनीं स्वीकार करावा हें अनेक मार्गांनीं सूचित वा ध्वनित केलें जातें. पाहुणेमंडळींपैकीं प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव पारखून या सूचना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दिल्या जातात. सरकारी प्रेरणेनेंच हे सर्व प्रयत्न होतात व खास या कामाकरतां कित्येक 'शकुनी' आणि 'कलुषे' सरकारानें नेमलेले असतात.

निव्वळ पोटभरू माणसेंच उच्च अधिकारपदावर पोंचली तर राजकारणांत त्यांस केळीं खावयास लागून शिवाय मार्गांत पसरलेल्या याच केळ्यांच्या सालींवरून त्यांची साफ घसरगुंडी होते. हिंदुस्थानासारख्या परतंत्र देशांत बहुतेक सर्व अधिकारी असेच असतात. खरोखर राष्ट्रभक्तीनें प्रेरित झालेले लोकच जर अधिकारपदावर अधिष्ठित झाले तर त्यांच्या अंतःकरणांतील देशभक्तीच्या जळजळीत निखाऱ्यांत असले दुर्गूण जळून भस्मसात झालेले असतात आणि परकीय राष्ट्राच्या जाळ्यांत ते कधींच सांपडत नाहींत. स्वदेशीं काय किंवा परदेशीं काय, त्यांच्या चारित्र्याचें पावित्र्य भंग पावत नाहीं. हे अगदीं पहिल्या श्रेणींतील लोक. यांच्यांत सर्व मानवजातीविषयीं उत्कट प्रेम, संन्यस्तवृत्ति, अहंपणाचा अभाव इत्यादि गूण इतक्या पूर्णत्वास पोंचलेले असतात कीं, अशा व्यक्तींसमोर कसल्याही कुमार्गाचा चकार शब्द काढण्याची कोणाची छाती होत

नाहीं ! असला कांहीं प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रयत्न झालाच तर तो प्रयत्न तिरस्कारून झिडकारण्याचें आत्मिक बल अशा व्यक्तींत असतें. नेताजी सुभाषचंद्र ही याच उच्च कोटींतील व्यक्ति होती. दुसऱ्या श्रेणींतील व्यक्ती राष्ट्रभक्त असतात परंतु सुखोपभोगाची लालसा त्यांच्यांतून नष्ट झालेली नसते. स्वार्थ आणि परमार्थ अशा दोन्ही गोष्टी साधल्या तर कांहींच हरकत नाहीं, अशा तऱ्हेची त्यांची वृत्ति असते. मात्र आपला मान व इभ्रत सांभाळून राष्ट्रकार्य आधीं व मग—राष्ट्रकार्यास पुढें मागें कधींही बाधक होणार नाहींत अशी मनाची पूर्ण खात्री झाल्यास—इतर सुखोपभोग, हें दुसऱ्या श्रेणींतील लोकांचें धोरण असतें. ते संत वृत्तीचे नसतात. इतर सामान्य माणसांप्रमाणेंच त्यांच्यांत सर्व प्रकारचे गूण व अवगूण वास करीत असतात; परंतु कर्तव्यभावानें प्रेरित होऊन आपली जबाबदारी ओळखून, त्याचप्रमाणें मन आवरण्याची या लोकांची तयारी झालेली असते. या श्रेणींतील लोकांससुद्धां आपल्या राष्ट्रातर्फे जबाबदारीच्या कामगिरीवर अन्य देशांत पाठविण्यास मुळींच हरकत नाहीं. परंतु केवळ पोटभरू, स्वार्थसाधू अथवा आधीं स्वार्थ आणि मग राष्ट्रकार्य ह्या मतप्रणालीचे लोक आपल्या राष्ट्राचे प्रतिनिधी म्हणून पाठविणें फारच धोक्याचें असतें. ते स्वतःही घसरतील आणि आपल्याबरोबर आपल्या राष्ट्रासही घेऊन बुडतील. जितका पाहुणचार मोठा तितकीं मोह पाडण्याचीं साधनें अधिक. अशा वेळीं मोह आवरण्यास माणसाचें आत्मिक बल पणास लागतें.

नोव्हेंबर १९४३ अखेर नेताजी जपानांतून निघाले. जपानच्या अनेक बेटांपैकीं अगदीं दक्षिणेकडच्या बेटावर एक मुक्काम करून दुसरे दिवशीं चिनी समुद्र ओलांडून, चीन देशांत नॅनकिंग येथें (जपानप्रणीत) चिनी राष्ट्रीयसरकाराचे पाहुणे म्हणून नेताजींस जावयाचें होतें. त्या दिवशीं समुद्रावर वादळी वाऱ्यांचें थैमान चाललें होतें. नेताजींस जनरल टोजो यांनीं नजर केलेल्या एका खास विमानांतून नेताजी या वेळेस सिंगापुरास परत येत होते. तीन जपानी वैमानिकही त्या विमानाबरोबरच नेताजींच्या चाकरीस कायमचे देण्यांत आलेले होते. नेताजींचा पुढील सर्व कार्यक्रम आंखलेला असल्यामुळें त्या वैमानिकांनीं नेताजींस असें कळविलें कीं, 'समुद्रावर फार भयंकर वादळी वारे घोंघावत असल्यामुळें आज निघणें फार धोक्याचें ठरेल. तरी उद्यां निघण्यास आपली हरकत नसल्यास उद्यां निघूं या.' नेताजींनीं त्यांस कळविलें कीं, 'अशा वादळांतसुद्धां निघावयाची तुमची तयारी असल्यास माझ्याकडून कांहीं हरकत नाहीं.' नेताजींचा भवितव्यतेवर विश्वास आहे. आपण आपलें कार्य करीत राहावें, परंतु प्राक्तन कांहीं चुकावयाचें नाहीं असें त्यांचें ठाम मत आहे. या त्यांच्या वृत्तीस अनुसरून, वादळ असलें तरी वैमानिक जर सारथ्य करावयास तयार असले तर आपली कांहीं हरकत नाहीं — आपण निघावयास तयार आहोंत असें त्यांनीं ठरविलें. वैमानिकही तयार झाले आणि त्या दिवशीं नेताजी निघाले.

जपानी वैमानिक आपल्या कामांत फारच तरबेज असतात. पाश्चात्य राष्ट्रांत वैमानिकांचें अवास्तव स्तोम माजविलें जातें. मोठमोठे हुद्दे, लठ्ठ पगार, भरमसाट भत्ते, ऐटबाज पोषाख असे त्यांचे नाना तऱ्हेचे लाड पुरविले जातात. जपानांत हा प्रकार मुळींच नसतो. खुष्की फौजेंतील मोटारहाक्यांप्रमाणें वैमानिकांसही शिपाई, लान्स नाईक, नाईक असेच हुद्दे असतात. त्यांचे पोषाख, पगार, भत्ते वगैरे सर्व, इतर अनेक खात्यांतील सामान्य सैनिकांप्रमाणेंच असतात. आमच्या इकडील इंग्रजी फौजी तालमींत तयार झालेल्या हिंदी अधिकाऱ्यांस ही चाल पाहून फारच चमत्कार वाटला व ते तोंडांत बोट घालून या जपानी चालीबद्दल आश्चर्य प्रकट करूं लागले. इंग्रजी पद्धत प्रमाण समजण्याची त्यांच्या मनाला अशी कांहीं एक निंद्य खोड जडलेली असते कीं, त्याहून वेगळी अशी एकादी गोष्ट दिसल्यास ती त्यांस फारच चमत्कारिक वाटते. एवढ्या हलक्या हुद्द्याचीं माणसें कशीं विमानें चालवूं शकतात ? असले प्रश्नार्थक खुळचट उद्गार ते नेहमीं काढीत. परंतु ही अगदीं बालिश तर्कपद्धति होती.

वादळी वाऱ्यांमुळें अंतरिक्षांत ढगांचे ढीग तयार होऊन त्यांत वायुप्रवाहाचे भोंवरे तयार झालेले होते. खालीं समुद्र खवळून लाटा उसळत होत्या. वारा घोंघावत होता. मेघाच्छादित आकाशांत मेघपटलांच्या वेष्टनांनीं निर्वात बोगदे तयार झालेले होते. आजूबाजूच्या सोसाट्याच्या वाऱ्यांतून मार्ग काढीत विमान या मेघपटलांत शिरलें कीं, तेथें असा एकादा निर्वात बोगदा असावयाचा. वाऱ्याचा आधार आणि विरोध एकाएकीं कमी झाल्यामुळें विमान एकदम पंधरावीस फूट खालीं जाई व त्या वेळेस पोटांत एकदम 'धस्स' होई. विमानास वरच्या बाजूनें कोणी साखळींत ओढून धरावें अशा तऱ्हेनें विमानाचें अधःपतन एकदम थांबत असे. विमानांतील या प्रत्येक हिसक्यासरशीं मळमळूं लागतें आणि उलटी होईल असें वाटतें. जितकें जास्त वादळ, तितकें विमान जास्त खालीं-वर असें हलतें आणि पोटांतही तशीच प्रतिक्रिया होते. फार खालीं यावें तर समुद्र खवळलेला आणि फार उंचीवरून उडावें तर तुफानी झंझावात आणि मेघांचा कडकडाट;यामुळें सुमारें तीनशें फूट उंचीवरून नेताजींचें विमान मार्गक्रमण करीत होतें. हा प्रवास फारच धोक्याचा झाला. कोणत्या क्षणीं विमान समुद्रांत कोसळेल याचा नेम नव्हता. वाऱ्याच्या लहरीप्रमाणें दर वेळेस विमानाची दिशा बदलावी लागून नेहमींपेक्षां या प्रवासास दुप्पट अवधि लागला. नॅनकिंगपर्यंत पोंचणें तशा स्थितींत अशक्य होतें. अंधार पडूं लागला होता व त्याबरोबरच वादळाचा जोर वाढत चालला होता. कसा तरी समुद्र पार झाला यांतच आनंद मानून शांघायला विमान सुखरूप उतरलें. नॅनकिंग विमानतळावर ठरलेल्या वेळीं चीनच्या ( नॅनकिंग येथील ) राष्ट्रीय-सरकाराचे प्रमुख, 'वँग चिंग वे' व त्यांचे इतर सहकारी उपस्थित राहून बराच वेळ वाट पाहून गेले. वादळी हवेमुळें आपला पूर्वीचा

रोख बदलून विमानाला शांघायलाच उतरावें लागलें, याची बातमी त्यांस मिळूं शकली नाहीं. शांघायहून सर्व मंडळी मोटारीनें नॅनकिंग येथें येऊन पोंचली. त्यांचें थाटानें स्वागत झालें.

दुसरे दिवशीं येथील रेडिओवरून नेताजींनीं चुंगकिंग येथील जपानविरोधी चिनी सरकाराचे अधिपति 'जनरल चँग कै शेक' यांस उद्देशून एक भाषण केलें. त्यांत ते म्हणाले, "आपण सर्वजण एकवटून पाश्चात्य साम्राज्यशाहीविरुद्ध लढूं या...तुम्ही तुमचें पाश्चात्यधार्जिणें परराष्ट्रीय धोरण बदलून एशिआटिक राष्ट्रांशीं सहकार्य करा. एक अफाट आणि बलाढ्य राष्ट्र या नात्यानें एशिआंत तुमचा मान मोठा आहे. आमच्या कार्यांत समभागी होऊन तुम्ही स्वतःचा व एशिआचाही फायदा करून घ्याल अशी आम्हांला आशा आहे..." या भाषणानें जनरल चँग कै शेक यांच्या धोरणामध्यें कांहींच बदल पडूं शकला नाहीं. १९३१ सालीं त्यांचें व जपान्यांचें युद्ध सुरू झालें तें या वेळपर्यंत चालूच होतें व पुढेंही जागतिक युद्धाच्या अंतापर्यंत चीन-जपानचें हें भांडण चालूच राहिलें.

ही आपापसांतील तेढ वाढीस लागून त्याचें युद्धांत रूपांतर होऊन तें १४-१५ वर्षें सतत चालू राहावयास जपानचा चढेलपणा व जनरल चँग कै शेक यांचें पाश्चात्यधार्जिणें धोरण हीं दोन्हीही अंशतः कारणीभूत होतीं. चीन देशाच्या अवाढव्य विस्तारामुळें व चिनी लोकांच्या चिवट लढाऊ वृत्तीमुळें या युद्धांत जपानला जनरल चँग कै शेकवर निर्णायक स्वरूपाचा विजय मिळविणें अशक्य आहे, हें जपानी अधिकारी कबूल करीत असतांना त्यांनीं उभयपक्षीं कांहींतरी सन्मान्य तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न करूं नये, ही त्या वेळच्या जपानी मुत्सद्यांची ढोबळ चूक होती. या चुकीमुळें त्यांचा तर शेवटीं नाश झालाच, पण शिवाय सबंध एशिआचें त्यामुळें नुकसान झालें. चीन देश जर एशिआटिक राष्ट्रांच्या बाजूनें लढता, तर त्याचें अफाट सैन्यबळ एशिआंतून परकीयांची उचलबांगडी करण्यास उपयोगी पडलें असतें. निदान चीन तटस्थ असता तरी इंग्रज व अमेरिकन लोकांना चीनसारख्या अफाट देशांतील विमानतळांचा व नाविकतळांचा उपयोग करितां आला नसता. शत्रुप्रदेशाच्या जवळपास आरमारी आणि हवाई तळ नसले म्हणजे हवाई हल्ले करणें व शत्रुप्रदेशावर सैन्य उतरविणें किती कठीण जातें हें अमेरिका खंडाच्या उदाहरणावरून आपणांस कळून येईलच. अमेरिका खंडाच्या दोन्ही बाजूला पॅसिफिक व अटलांटिकसारखे विस्तीर्ण जलाशय असल्यामुळें अमेरिकेला युद्धाची झळसुद्धां लागली नाहीं. उलट अमेरिकेनें चीनसारख्या एशिआटिक राष्ट्राचा यासाठीं उपयोग करून जपानचा धुव्वा उडविला.

चीन देशांत या वेळेस दोन राज्यसत्ता होत्या. एक अमेरिकनधार्जिणें जनरल चँग कै शेक यांचें सरकार. चुंगकिंग ही त्याची राजधानी होती. दुसरें म्हणजे जपानच्या प्रोत्साहनानें नॅनकिंग या शहरीं प्रस्थापित झालेलें सरकार. चीन देशाचा समुद्रकांठचा भाग दाट वस्तीचा असून, यांतच बहुधा त्यांचे मोठ-

मोठे कारखाने आणि मुख्य मुख्य बाजारपेठा आहेत. आंतील प्रदेशांत विरळ लोकवस्ती व कोठें कोठें तर केवळ वाळवंटच आहे. जपाननें १९३१ मध्यें लढाई सुरू करतांच समुद्रकांठचा हा सर्व प्रदेश व्यापून टाकला. जनरल चँग कै शेक यांच्या सरकाराची येथून उचलबांगडी होऊन त्यांस चुंगकिंग येथें जावें लागलें. जपान्यांनीं व्यापलेल्या प्रदेशांत 'वँग चिंग वे' या गृहस्थांच्या अध्यक्षतेखालीं नॅनकिंग येथें दुसरें सरकार प्रस्थापित झालें. वँग चिंग वे यांचा जीव घेण्याचे तीन अयशस्वी प्रयत्न कांहीं चिनी लोकांनीं वेळोवेळीं केले होते. या प्राणसंकटांत त्यांस पिस्तुलाच्या अनेक गोळ्या पचवाव्या लागल्या होत्या. त्यांच्या हृदयांत घर करून राहिलेल्या एका गोळीचा मधून मधून नेहमीं त्रास व्हावयाचा. ती गोळी एका प्रसिद्ध जपानी डॉक्टरानें त्यांच्यावर शस्त्रक्रिया करून अत्यंत कौशल्यानें बाहेर काढली.

वँग चिंग वे यांचें सरकारही जपान्यांशीं वरपांगीं सहकार्य करीत असे. चिनी लोकांचा हा स्वभावविशेष आहे कीं, त्यांची आपापसांत कितीही चुरस असली, वैमनस्य असलें, तरी ते परकीयांविरुद्ध एकमेकांशीं सलोख्याचे संबंध हटकून ठेवतील. 'वँग चिंग वे' व 'चँग कै शेक' या दोघांच्या बाबतींतही लोकांचा हाच अनुभव होता. वँग चिंग वे यांच्यावर जपान्यांचा कितीही दाब असला तरी आंतून त्यांचें व चँग कै शेक यांचें दळणवळण कायमच होतें.

नॅनकिंगमध्यें नेताजींचें जाहीर व्याख्यान झालें. चीन देशांत आधुनिक युगांतील त्यांचे एक दिवंगत पुढारी ' डॉक्टर सन्यात्सेन ' यांच्याबद्दल सर्व चिनी लोकांच्या मनांत इतका पूज्यभाव आहे कीं, एकादे व्याख्यानांत जितके वेळां त्यांचें नांव येतें तितक्या वेळां सर्व श्रोतृसमुदाय एकदम उठून उभा राहतो. जपानमध्यें नेताजी असतांना सर्व जपानी लोकांस उद्देशून नेताजींचें 'हिबिया पार्क 'मध्येंही एक जाहीर भाषण झालें होतें. चिनी व जपानी लोकांच्या शिस्तींत महदंतर आहे. हिबिया पार्कच्या त्या विस्तीर्ण पटांगणांत लक्षावधी लोकांचा समुदाय नेताजींचें भाषण ऐकण्यास जमलेला होता. दूरदूरच्या गांवांहून आलेल्या लोकांची पहांटेपासून हिबिया पार्कच्या रोखानें रीघ लागलेली होती. त्यांत निरनिराळ्या दर्जाचे आबालवृद्ध स्त्री-पुरुष होते. परंतु रांगेनें बसणें, रांगेनें उभें राहणें, व्याख्यानांत हूं का चूं होऊं न देणें, विशिष्ट गणवेष, जयजयकार करावयाचा तो सर्वांनीं एकदम करणें, या सर्व बाबतींत तो जनसमुदाय इतर कोणत्याही राष्ट्रांतील कवाईत करणाऱ्या फौजेसही लाजवील अशा सांघिक पद्धतीच्या सूत्रबद्ध हालचाली स्वयंस्फूर्तीनें करीत होता. त्यांस, तेथें तासन्तास बसावें लागलें तरी हसणें-खिदळणें, आरडा-ओरड, अचकट विचकट बोलणें, चिवडा-भेळ इत्यादि वस्तू उगीच भरमसाट घेऊन खात सगळीकडे घाण करून ठेवणें, अर्ध्या व्याख्यानांत येऊन बसणें, वाटेल तेव्हां चालू लागणें,

अर्धवट अंतःकरणानें जयजयकार करणें, वाटेल तसे पाय पसरून बसणें इत्यादि बेशिस्तीचे प्रकार तेथें नव्हते.

नॅनकिंग येथील कार्यक्रम आटोपून नेताजी विमानानें फॉर्मोसा बेटामार्गें फिलीपीन्सची राजधानी मनीला येथें आले. जातांना मनीला शहरीं फार वेळ थांबण्यास त्यांस वेळ नव्हता. जपानमध्यें अनेक प्रसंगींच्या भेटीगांठींत फिलीपीन्सचे अध्यक्ष 'जोस लॅरेल' यांनीं नेताजींस, मनीला येथें येऊन पाहुणचार स्वीकारण्याची कळकळीनें विनंति केली होती. त्या विनंतीस मान देऊन नेताजी पुन्हा मनीला शहरीं आले. या प्रसंगीं मनीला येथें हिंदी लोकांस उद्देशून त्यांचें जाहीर व्याख्यान झालें. मॅलॅकॅनन प्रासादांतच सरकारी पाहुणे या नात्यानें त्यांची उतरण्याची व्यवस्था करण्यांत आलेली होती. 'हिज् एक्सलन्सी सुभाषचंद्र बोस' असेंच त्यांस व त्यांच्या इतर मंत्र्यांस दूरपूर्वेतील आंतरराष्ट्रीय व्यवहारांत संबोधित असत. 'हिज् एक्सलन्सी' या वाक्प्रचाराचें मराठी भाषेंत हुबेहूब भाषांतर होऊं शकत नाहीं. 'सरकार' अथवा 'महाराज' असें कांहींसें त्याचें रूपांतर होऊं शकेल. जपानी भाषेंत मात्र 'हिज् एक्सलन्सी'च्या समानार्थक 'कक्का' हा शब्द आहे. त्यामुळें जपानी लोक नेहमीं 'बोस कक्का' असाच श्री. सुभाषचंद्र यांचा उल्लेख करीत असत.

मनीलाहून विमानानें निघून पश्चिमेस इंडोचायनांतील सायगांव शहरीं व दुसरे दिवशीं बँकॉक येथें मुक्काम करून नेताजी डिसेंबर १९४३ च्या सुरुवातीस सिंगापुरास परत येऊन पोंचले. नेताजींबद्दल जपानमध्यें जितका आदर आहे तितका तो इतर हिंदी पुढाऱ्यांबद्दल नाहीं. महात्मा गांधींना सेना, युद्ध इत्यादि गोष्टी मान्य नाहींत, तेव्हां एक साधु वृत्तीचा हिंदी पुढारी अशाच नात्यानें फक्त सुशिक्षित व सुविद्य जपानी लोक त्यांस ओळखतात. युद्धाच्या सुरुवातीस जपानी जेव्हां मलायावर चाल करून आले, तेव्हां इंग्रज, ऑस्ट्रेलियन, मलायी, जाव्हानीज व हिंदी अशा अनेक सैनिकांशीं त्यांचा संबंध आला. कांहीं पूर्ण गोऱ्या रंगाच्या हिंदी लोकांस इंग्रज किंवा ऑस्ट्रेलियन समजून त्यांचा छळ करण्यास ते सुरुवात करीत. अशा वेळेस तो स्वतः जर म्हणूं लागला कीं, "अरे बाबांनों, मी हिंदी आहें ... ... माझा कां विनाकारण छळ करितां?" तर ते त्याच्या गोऱ्या कातड्याकडे बोट दाखवून आपल्या भाषेंतच गुरगुरत रागावून म्हणत, "हिंदी माणसाचें कातडें इतकें गोरें कसें?" हिंदी सैनिकांस युद्धबंदी म्हणून घेण्यापूर्वी या संशयाचें निराकरण करण्यास ते संगीन लाविलेली बंदूक त्यांच्यापुढें रोखून, दरडावून विचारीत, "इंडिया का? (तूं हिंदी आहेस का?)" त्या सैनिकानें "हो" असें म्हटल्यावर ते पुन्हा विचारीत, "गांधी का इंडिया का?" (तुम्ही गांधींचेच हिंदी लोक ना?)" या प्रश्नासही होकार मिळतांच त्या माणसाविरुद्ध ते कोणतीही कडक उपाययोजना करीत नसत! अशा तऱ्हेनें गांधी हे हिंदुस्थानाचे एकमेव

सर्वमान्य पुढारी आहेत हें हिंदी सैनिकांशीं संबंध येणाऱ्या सर्व जपानी सैनिकांस अगोदरपासून शिकवून ठेविलेलें होतें. 'का' हा मराठींतल्याप्रमाणेंच जपानी भाषेंतही प्रश्नार्थक उद्‌गार आहे. हिंदुस्थानाविषयीं बोलतांना सहज महात्मा गांधींबद्दल प्रश्न निघाला तेव्हां, ' मिके मारू ' जहाजावरील जपानी डॉक्टर मला म्हणाला, " तुमचे महात्मा गांधी इंग्रजांकडून पैसे घेऊन त्यांच्याशीं संगनमत करितात ना ? त्याला इंग्रजी येत नव्हतेंच परंतु त्यानें हावभावांनीं हें समजावून दिल्यावर मी त्याला सांगितलें कीं, तशांतील कांहीं एक गोष्ट नसून ते एक अत्यंत पूज्य असे पुरुष आहेत. मलाही अर्थात् हावभावांनींच त्यास ती गोष्ट समजावून सांगावी लागली !

पंडित जवाहरलाल नेहरूबद्दल मात्र कोणत्याच जपान्याचें मत चांगलें नाहीं. प्रत्येक जपानी अधिकारी आम्हांला विचारीत असे, " हे तुमचे जवाहरलाल नेहरू नेहमीं चँग-कै-शेकचीच बाजू कां घेतात ? आम्ही त्यांचें काय घोडें मारलें आहे ? "

अर्थात् सुभाषचंद्र बोस हेच त्यांस सर्व दृष्टीनें योग्य असे हिंदी पुढारी वाटत असत व त्यामुळें सर्व जपानी लोकांच्या मनांत त्यांच्याबद्दल फार आदर होता. डिसेंबर १९४३ मध्यें नेताजी सिंगापुरांत आले तेव्हां हिंदी स्वातंत्र्य-सैन्याच्या तुकड्या ब्रह्मदेशाच्या रोखानें चाल करूं लागल्या. दोन-तीन दिवसा-आड कोणती ना कोणती तुकडी सिंगापूर स्टेशनावरून गाडींत बसावयाचीच. नेताजी स्वतः दर वेळेस स्टेशनावर उपस्थित असत. त्यांच्याबरोबर स्वातंत्र्य-सरकाराच्या, संघाच्या व सैन्याच्या इतर प्रतिष्ठित व्यक्तीही असत. या गाड्यांस सर्व मालाचेच डबे असत. एकेका डब्यांत २५-३० शिपायांस अडचण करून बसावें लागे. आपल्या तुकडींतील सर्व अधिकारी ओळीनें उभे करून तुकडीचा मुख्य अधिकारी नेताजींस स्टेशनावर त्यांचा परिचय करून देत असे. नंतर नेताजी त्या सर्वांस स्वतः हार घालीत असत. अशा तऱ्हेनें सर्व कार्यक्रम झाल्यावर नेताजींच्या जयजयकारांत गाडी पुढें निघे. बहादुर पथक, हेरांची तुकडी, सुभाष रेजिमेंट, मोटार-वाहतूक तुकडी, एंजिनियरिंग कंपनी अशा पहिल्या डिव्हिजनच्या तुकड्या एकामागून एक कांहीं दिवसांच्या अंतरानें सिंगा-पुराहून निघाल्या.

दूरपूर्वेंतील एक एक प्रदेश जपान्यांच्या ताब्यांत आल्यावर त्यांनीं तेथील सर्व कामकाज सरसहा जपानी भाषेंत सुरू केलें. न्यायालयें, कचेऱ्या, शाळा या सर्वांतून जपानी भाषेंतच शिक्षण देण्याची प्रथा सुरू झाली. सर्व नागरिकांनीं जपानी भाषा शिकावी म्हणून सरकारतर्फे ठिकठिकाणीं मोफत वर्ग सुरू करण्यांत आले. जपानी गाणीं, संभाषणें इत्यादींच्या चढाओढी सुरू करण्यांत येऊन यशस्वी उमेदवारांस पारितोषिकें देऊन सर्व प्रकारचें प्रोत्साहन देण्यांत येऊं लागलें. होतकरू विद्यार्थ्यांस उच्च शिक्षणासाठीं जपानमध्यें अथवा इतरत्र पाठविणें,

रेडिओ स्टेशनावर अथवा अन्य ठिकाणीं नोकरीवर लावून घेणें, असलेल्या नोकरींत बढती देणें, अशा अनेक उपायांनीं जपानी भाषा, शिष्टाचार, रीतभात यांचा फारच झपाट्यानें प्रसार झाला. स्वराज्य असलें म्हणजे अशा अनेक गोष्टी कारितां येतात, पण त्यालासुद्धां निश्चयी आणि कणखर मन लागतें. आपल्या हिंदुस्थानांतच पहा. हैद्राबाद संस्थानांत नव्वद टक्के लोकांची मातृभाषा उर्दू नसतांना त्यांच्यावर ती भाषा जबरदस्तीनें लादण्यांत आलेली आहे. याच्या उलट एकाही उत्तर हिंदुस्थानी मराठी संस्थानांत, मराठी भाषा सरकारी कामकाजांत रूढ नाहीं. दूरपूर्वेंतील हिंदी लोकांनाही अशा रीतीनें सर्व विषय जपानींतून शिकावे लागले असते, परंतु अशा प्रसंगीं सिंगापुरांतील रामकृष्ण मिशनचे 'ब्रह्मचारी कैलासम्' पुढें झाले व त्यांनीं राष्ट्रीयत्वाची ढाल पुढें करून जपानी शिक्षण अधिकाऱ्यांस सांगितलें कीं, 'प्रत्येकास स्वदेशप्रेम व राष्ट्राभिमान असला पाहिजे हें तत्त्व आम्हांला अगदीं पूर्णपणें मान्य आहे व म्हणूनच आम्हीही आमच्या स्वतंत्र शाळा चालवून त्यांत आमच्या मातृभाषेंतून शिक्षण देऊं.' ही विचारप्रणाली जपानी अधिकाऱ्यांस मान्य करावी लागली. त्यांनीं अट एवढीच घातली कीं, इतर विषयांबरोबर जपानी भाषा हाही एक आवश्यक विषय म्हणून ठेविला पाहिजे. अर्थात् त्या प्रांतांत त्यांचें राज्य असल्यामुळें व सर्व कामकाज त्यांच्या भाषेंत चालत असल्यामुळें त्यांची ही अट कांहीं गैर नव्हती. अशा रीतीनें सिंगापुरांतील रामकृष्ण मिशनच्या शाखेनें प्रथम हिंदी राष्ट्रीय शाळा चालविली. यांत जपानी, हिंदी आणि (तामीळ मुलांस) तामीळ या तीन भाषा व हिंदुस्थानाचा इतिहास, भूगोल इत्यादि आवश्यक विषय ठेवण्यांत आले होते. हीच प्रथा मग दूरपूर्वेंतील इतर ठिकाणींही रूढ होऊन हिंदी राष्ट्रीय शाळा सगळीकडे सुरू झाल्या. या शाळांतून निर्भेळ स्वातंत्र्याचें शिक्षण (गेल्या सव्वाशें वर्षांतील अनेक हिंदी पिढ्यांत) दूरपूर्वेंतील हिंदी मुलांस प्रथमच, त्या दोन वर्षांत मिळूं शकलें. याचें सर्व श्रेय नेताजी सुभाषचंद्र बोस यांस व ब्रह्मचारी कैलासम् यांच्या समयसूचक प्रयत्नांस आहे. असें शिक्षण हिंदुस्थानांतील हिंदी मुलांस केव्हां मिळेल तें मिळो, परंतु दूरपूर्वेंतील त्या हिंदी मुलांचें भाग्य थोर खरें! २७ डिसेंबर १९४३ रोजीं नेताजींच्या हस्तें रामकृष्ण मिशनच्या या हिंदी राष्ट्रीय शाळेचा एक कार्यक्रम पार पडला. त्या दिवशीं नेताजींसमवेत सर्व विद्यार्थ्यांचें छायाचित्र घेण्यांत आलें. ब्रह्मचारी कैलासम् यांचें शाळेची इत्थंभूत माहिती देणारें व नेताजींच्या स्वागतपर भाषण झाल्यावर नेताजींचें भाषण, बक्षिससमारंभ, अल्पाहार व शेवटीं छायाचित्र घेणें असा कार्यक्रम पार पडला. नेताजी अध्यक्षस्थानीं असल्यामुळें त्या कार्यक्रमास विशेष शोभा आलेली होती आणि त्यामुळेंच सर्व कार्यकर्त्यांत व विद्यार्थ्यांत अपूर्व उत्साह आणि आनंद दिसून येत होता. हिंदी स्वातंत्र्यसेना आघाडीकडे कूच करूं लागलेली आहे व लवकरच स्वातंत्र्ययुद्धाला तोंड लागणार हें सर्वांस

माहीत असल्यामुळें उज्ज्वल भविष्याच्या आनंदही त्या प्रसंगीं प्रत्येकाच्या चेहऱ्यावर झळकत होता. ज्या नेत्यानें ही संधी सर्वांस आणून दिलेली होती व जो लवकरच स्वातंत्र्यसैन्याबरोबर आघाडीवर जाणार होता, त्या नेत्याकडे पाहून सर्वांस एक प्रकारचा आदर, अभिमान प्रतीत होऊन धन्य धन्य वाटे !

येथील रामकृष्ण मिशनची स्वतःची एक चांगली भक्कम आणि भव्य इमारत आहे. यांत श्रीरामकृष्ण परमहंस यांची तसबीर असलेली एक खोली आहे. या खोलींत एक-दोन वेळां नेताजी तास दोन तास ध्यानस्थ बसलेले होते. "मला वेळ मिळाला असता, तर येथें येऊन ध्यानस्थ बसण्याचें माझ्या मनांत अनेक वेळां येत असे" असे उद्गार नेताजींनीं ब्रह्मचारी कैलासम् यांच्याजवळ या प्रसंगींही काढले. ब्रह्मचारी कैलासम् व त्यांजबरोबर स्वामी भास्वरानंद ( संन्यासाश्रमाचा स्वीकार केलेले ) हे दोघेही या संस्थेचें येथील कार्य बघत असत. रामकृष्ण मिशननें येथें अनाथाश्रम, मुलांमुलींची राष्ट्रीय शाळा, अशा अनेक उपयुक्त संस्था चालविल्या.

हिंदी स्वातंत्र्य-सरकार २१ ऑक्टोबर १९४३ रोजीं स्थापन झाल्यावर पुढील प्रत्येक महिन्याच्या २१ तारखेस दूरपूर्वेतील सर्व हिंदी लोक स्वातंत्र्यसरकार स्थापनेचा राष्ट्रीय दिन म्हणून तो साजरा करीत असत. प्रत्येक राष्ट्रीय दिनाच्या दिवशीं नेताजींचें हिंदी जनतेस उद्देशून जाहीर व्याख्यान होत असे. या प्रसंगीं ते सिंगापुरांत असल्यामुळें सिंगापुरांतील हिंदी लोकांपुढें त्यांचें जाहीर भाषण झालें. ते म्हणाले, "मित्रहो...हिंदी स्वातंत्र्यसैन्य आघाडीकडे कूच करूं लागलें आहे. लवकरच स्वातंत्र्ययुद्ध सुरू होणार आहे. अशा वेळीं मी माझ्या शूर सैनिकांबरोबर आघाडी-वर राहणार. यानंतरचें माझें सर्व लक्ष त्या बाजूला राहील. इकडील गोष्टींकडे लक्ष देण्यास मला मुळींच फुरसत होणार नाहीं. येथील सर्व कार्य उत्तम प्रकारें चालू ठेवण्याचें मी तुम्हां सर्वांवर सोंपवून जाणार आहें. येथील कार्याबद्दल मला कसल्याही प्रकारची काळजी राहूं नये अशी चोख वागणूक ठेवण्याचें सर्वस्वीं तुमच्या हातीं आहे. आघाडीवर युद्ध चालू असतांना आपला मुख्य तळ जेथें असेल तेथील सर्व व्यवहार सुरळीत चालले पाहिजेत. त्यावरच जय अथवा अपजय बऱ्याचशा प्रमाणांत अवलंबून असतो. १९१४ ते १९१८ च्या महायुद्धांत जर्मन फौज केव्हांही इतर फौजांपेक्षां फार बलवान् होती; परंतु जर्मनीचा अंतर्गत व्यवहार अयोग्य माणसांच्या हातीं असल्यामुळें जर्मनीचा सरतेशेवटीं पराभव झाला; तशी अवस्था येथें होऊं देऊं नका..." यानंतरचा एक आठवडा फारच गर्दीचा गेला. नेताजी ब्रह्मदेशास जाणार होते. पुन्हा या बाजूला त्यांना येण्यास केव्हां फुरसत मिळेल त्याचा अंदाज लावितां येणें शक्य नव्हतें. त्यांच्याबरोबर स्वातंत्र्यसंघाच्या आणि सैन्याच्या मध्यवर्ती कचेऱ्याही सिंगापुराहून रंगून येथें हालविण्यांत येणार होत्या. मुख्य कार्यकर्ते स्वतःच्या सामानाची व कचेऱ्यांच्या कागदपत्रांची बांधाबांध करण्यांत गर्क झाले होते.

सिंगापुरांतील स्वातंत्र्यसैन्याचा सर्व कारभार नेताजींच्या गैरहजेरींत कर्नल भोसले यांच्याकडे व संघाचा कारभार श्री. थिवी यांच्याकडे सोपविण्यांत आलेला होता.

२९ डिसेंबर १९४३ रोजीं सकाळीं ९ वाजतां सिंगापूर विमानतळावरून नेताजी अंदमान बेटाकडे जावयास निघाले. टोकिओंत असतांना जनरल टोजो यांनीं नेताजींच्या स्वतःच्या उपयोगाकरतां एक विमान भेट म्हणून दिलें होतें, हें वर आलेंच आहे. १९४५ च्या मार्च महिन्यांत एका हवाई हल्ल्यांत बँकॉक विमानतळावर हें विमान जायबंदी होईपर्यंत नेताजी नेहमीं याच विमानांतून प्रवास करीत असत. हें विमान भलें मोठें होतें. त्याला पुढच्या बाजूस जे दोन पंखे होते, त्या पंख्यांच्या मधोमध विमानाचा जो उन्नत भाग पुढें आलेला होता त्याच्या उजव्या बाजूस तिरंगी निशाण रंगविलें होतें. त्यावर एक झेप घालीत असलेला वाघ काढलेला असून, 'AZAD HIND' (आझाद हिंद) हीं अक्षरें त्याच्यावर रंगविलेलीं होतीं. हें विमान सर्व आधुनिक सुखसोयींनीं युक्त होतें. याच विमानांतून नेताजींनीं अंदमान बेटाकडे उड्डाण केलें.

अंदमान-निकोबारचा टापू आतां जवळ जवळ हिंदी स्वातंत्र्य-सरकाराचाच असल्यामुळें ब्रम्हदेशांत युद्धाच्या आघाडीवर जाण्याच्या अगोदर अंदमानाची पाहणी करून जावें, असें नेताजींनीं ठरविलें. या राजकीय निकडीपेक्षां ज्या बेटांवर कित्येक हिंदी देशभक्तांनीं स्वातंत्र्यदेवीच्या खडतर तपश्चर्येंत वर्षानुवर्षें घालविलीं होतीं, कित्येकांनीं आपले देहही जेथें ठेविले होते, त्या देशभक्तांच्या रक्तानें पावन झालेली ती पुण्यभूमि पाहावी, असें नेताजींच्या मनांत फार होतें. त्यांच्या तुरुंगाच्या अकरा वाऱ्या झाल्या, परंतु त्यांत अंदमान-मध्यें जाण्याचा प्रसंग त्यांस आलेला नव्हता.

दोन-तीन दिवस ते अंदमानामध्यें राहिले. अंदमानांत 'पोर्ट ब्लेअर' एवढेंच एक सुमारें वीस हजार वस्तीचें गांव आहे. इतरत्र सर्व दऱ्याखोरीं असून तेथें जंगली लोकांचीच तुरळक वस्ती आहे. येथें इंग्रज कमिशनराचा बंगला आहे. या बंगल्यावरच आज तिरंगी झेंडा फडकत होता व तेथील जपानी आरमाराच्या मुख्य अधिकाऱ्यांचे पाहुणे म्हणून व या टापूचे भावी राज्यकर्ते या नात्यानें नेताजी त्याच बंगल्यांत राहात होते. तेथेंही हिंदी स्वातंत्र्यसंघ स्थापन झालेला होता. तेथील लोकांस उद्देशून नेताजींचें भाषण झालें. हा टापू जपानी आरमाराच्या ताब्यांत होता. जपानी आरमार आणि खुष्की फौज हीं दोन्ही एकमेकांशीं अगदीं परक्यासारखें व स्वतंत्र वृत्तीनें वागतात. मंत्रिमंडळांत नेहमीं खुष्की फौजेच्या अधिकाऱ्यांचेंच वर्चस्व असतें. १९४२ च्या सुरुवातीस दूर-पूर्वेंत इंग्रज, अमेरिकन व डच या पाश्चात्य सत्तांची जेव्हां पूर्णपणें हकालपट्टी झाली, तेव्हां लगेच हिंदुस्थानावर स्वारी करण्याची जपानी आरमारी-खात्याची तयारी होती. परंतु तेवढ्यांत जपानच्या मंत्रिमंडळांत कांहींतरी बदल होऊन

तूर्त जिंकलेल्या प्रांताचीच व्यवस्था लावावी, नवा प्रांत काबीज करूं नये असें ठरलें. अर्थात् यामुळें जपान्यांचें बरेंच नुकसान झालें. ते जर त्याच वेळीं हिंदुस्थानावर स्वारी करते तर इंग्रजांचा पराभव होण्यास वेळ लागला नसता. सैन्यबळ आणि युद्धसामुग्री या दोन्हींच्या अभावीं हिंदुस्थानांत जपान्यांना विशेष विरोध झाला नसता. त्या वेळेस लोकमतही त्यांच्या बाजूचें होतें. हिंदुस्थान हातचा गेला असता तर ( फुकटचे १५-२० लाख हिंदी सैनिक हिंदुस्थानाबाहेर नेऊन ) इंग्रजांस आफ्रिकेंत व युरोपमध्यें लढतां आलें नसतें. अशा स्थितींत इंग्रजांची शरणागती ठेवलेली होती. इंग्रज पूर्णपणें शरण गेले अथवा सैन्यबळाच्या अभावीं लढण्याचें नुसतें सोंग करीत आहेत असें बघून अमेरिकेनेंही युद्धांतून आपलें आंग काढून घेतलें असतें. परंतु भविष्याच्या उदरांत कांहीं निराळ्याच गोष्टी होत्या व आटोकाट प्रयत्न होऊनसुद्धां बहुसंख्य मानवांच्या छळावर आधारलेली सांप्रतची विश्वाची घडी कांहीं काल बदलणार नव्हती !

नेताजींनीं अंदमानमधील तो विस्तीर्ण तुरुंग पाहिला तेव्हां त्यांचें हृदय भरून आलें व तेथें हाल-अपेष्टांत दिवस काढलेल्या व मृत झालेल्या देशभक्तांच्या स्मृति त्यांच्या मनःचक्षूसमोर पुन्हा जागृत झाल्या. एके दिवशीं अंदमानाच्या किनाऱ्याभोंवतीं पाहणी करीत असतांना ते पश्चिमेच्या बाजूला आले. तेथें एका नारळाच्या झाडाखालीं ते उभे असतांना पश्चिमेकडील क्षितिजावर त्यांची दृष्टी खिळली. समुद्राच्या लाटा त्यांच्या पायाशीं आपटत होत्या. जणूं काय दुःखी, परतंत्र हिंदुस्थानाचे अश्रूच त्यांच्या चरणांशीं लोळण घेऊन, धाय मोकलून आपली करुण कहाणी त्यांस निवेदन करीत होते ! रुदनाचा तो धीरगंभीर ध्वनि कानीं पडून नेताजींचें अंतःकरण व्यथित झालें. वाऱ्याच्या झुळझुळीबरोबर कोट्यवधी दीन-दुबळ्यांचे निश्वासच जणुं काय त्यांच्या कानीं पडत होते ! 'त्या क्षितिजा-पलीकडे माझी प्रिय मातृभूमि आहे. तिचे कोट्यवधी सुपुत्र आज दुसऱ्याचे दास बनलेले आहेत. तसें नसतें तर आज मला येथें कशाला यावें लागलें असतें ? ती माझी खरी कर्मभूमि आहे...असे अनेक विचार त्यांच्या अंतःकरणावर आदळत होते. उभ्याउभ्याच ते आजूबाजूचें सर्व जग विसरले. त्यांचा जड देह तेथें ताठ उभा होता, परंतु त्यांचें मन केव्हांच हिंदुस्थानांतील पीडितांच्या समाचारास गेलेलें होतें. त्यांच्यामागें अंदमानाचे प्रमुख जपानी अधिकारी व नेताजींचे हिंदी सहकारी उभे होते. बराच वेळ नेताजी तेथेंच होते. त्यांना वेळेचें किंवा इतर कसलेंही भान उरलेलें नव्हतें. ' नेताजींनीं आतां चलावें' अशा अर्थीं त्यांच्या सहकाऱ्यांनीं व जपानी अधिकाऱ्यांनीं बऱ्याच हालचाली केल्या. परंतु नेताजींना त्यांचें यत्किंचितही भान नव्हतें. त्या स्थळीं आल्याबरोबर थोड्याच वेळांत नेताजींची उभ्या उभ्या लागलेली ती समाधी पाहून सर्वांनाच फार आश्चर्य वाटलें. तशा स्थितींत त्यांचें घेतलेलें छायाचित्र आज उपलब्ध आहे. नेताजींच्या

अंदमानाच्या दौऱ्याचें दिग्दर्शन करणारा चित्रपटही घेतलेला आहे व तो स्वतंत्र हिंदुस्थानांत सर्वांस बघावयास मिळेल.

अंदमानांत असतांना नेताजींनीं अंदमानाचा राज्यकारभार स्वातंत्र्य-सरकाराकडे घेण्याबद्दलच्या वाटाघाटी तेथील जपानी प्रमुखांशीं केल्या. "जपानी मंत्रिमंडळाकडून त्याबद्दलचा हुकूम आपणांस आलेला आहे" असें तेथील जपानी आरमारी-प्रमुखानें नेताजींस सांगितलें. सिंगापुरांतून निघावयाच्या अगोदर नेताजींनीं लेफ्टनंट कर्नल लोकनाथन् यांची अंदमान-निकोबार टापूचे लेफ्टनंट गव्हर्नर अथवा स्वातंत्र्यसरकाराचे त्या टापूचे सुभे म्हणून नेमणूक केलेली होती. लेफ्टनंट कर्नल लोकनाथन् हे, आपले सहकारी अधिकारी निवडण्यांत गुंतले होते. अंदमानांतील पाहाणीचें व राजकीय वाटाघाटींचें आपलें काम संपवून नेताजी विमानानें रंगूनला गेले. तेथेंही सिंगापुरांतल्यासारखीच त्यांच्या निवासस्थानीं सर्व व्यवस्था होती. येथील त्यांचा गृहव्यवस्थापक 'लेफ्टनंट डे' नांवाचा एक अधिकारी होता.

७ जानेवारीपासून हिंदी स्वातंत्र्यसंघाची व सैन्याची मध्यवर्ती कचेरी रंगूनमध्यें स्थापन झाली. ब्रह्मदेश आतां स्वतंत्र झालेला होता. डॉ. बॉ मॉ त्याचे आधिपति असल्याचें वर आलेलेंच आहे. युद्धामुळें ब्रह्मदेशाची फारच वाताहात झालेली होती. ब्रह्मदेशाच्या उत्तर सरहद्दीवर इंग्रज, अमेरिकन व चिनी सैन्यें चढाई करण्याच्या उद्देशानें तयार होऊन बसलेलीं असल्यामुळें व त्यांचे हवाई हल्लेही ब्रह्मदेशावर अनेक ठिकाणीं एक-दोन दिवसांआड सारखे होत राहिल्यामुळें विस्कटलेली घडी पुन्हा नीट बसविण्याचे प्रयत्न होण्याचें तर दूरच राहिलें, परंतु सर्व व्यवहार दिवसेंदिवस अधिकच विस्कळित होत जाऊन ब्रह्मदेशाची परिस्थिति फारच गंभीर स्वरूप धारण करूं लागली होती. उत्तर ब्रह्मदेशांत अमेरिकन विमानें, शेतांत काम करणाऱ्या एक एक शेतकऱ्याच्या पाठीमागें भुंग्यासारखें भुणभुण करीत लागून त्यास सळो कीं पळो करून सोडीत. त्यांनीं मशिनगन्सच्या गोळ्यांचा किंवा बॉंबसूचा वर्षाव केला नाहीं तरी एकाद्या समंधानें केल्यासारखा तो पाठलाग अंगांत कायमची धडकी भरविण्यास पुरेसा असतो. विशेषतः 'कोणी का जिंकेना, आपल्यामागें काय हा रिकामा त्रास!' अशा वृत्तीचे गरीब बिचारे नागरीक तर एकाद्या भुतानें झपाटावें किंवा उड्या मारणाऱ्या एकाद्या जंगली, चपळ भुजंगानें पाठलाग करावा त्याप्रमाणें या प्रकारानें घाबरून जात. इंग्रजांच्या हल्ल्याचा वरवंटा केव्हां येईल या भीतीनें व नेहमींच्या हवाई हल्ल्यांच्या धडकीनें ब्रम्ही शेतकरी आपली जमीन सोडून दक्षिणेकडे कोठल्यातरी खेड्यांत राहात. जमिनीच्या जमिनी अशा तऱ्हेनें ओस पडल्या. लागवडीच्या अभावीं तांदुळाचें आगर समजल्या जाणाऱ्या ब्रम्हदेशांत लवकरच अन्नाचा तुटवडा पडेल असें वाटूं लागलें. कापड मिळण्याची तर त्याहून मारामार होती. खेड्यापाड्यांतून जातांना तरट किंवा गोणपाट गुंडाळलेल्या अर्धनग्न स्त्रिया बऱ्याचशा दिसावयाच्या. रस्त्याच्या कडेला जुने पुराणे कपडे विकणारे रंगूनसारख्या

शहरांत कांहीं लोक असले तरी त्या कपड्यांच्या किंमती भरमसाट वाढलेल्या होत्या. इंग्रजांच्या शिक्याच्या कागदी नोटा बाद करून जपान्यांनीं त्याच धर्तीच्या आपल्या चालविल्या होत्या. परंतु ' किंग एम्परर ऑफ जपान ' ( जपानचा अधिराज ) अशा तऱ्हेची इंग्रजी पद्धतीची कांहीं भानगड त्यांनीं त्या नोटांवर ठेविलेली नव्हती. या नोटा जाळून अथवा अन्य प्रकारें, लोक आपल्या बादशहाचा अपमान करतील, याबद्दल जपानी लोक फार दक्ष असतात. म्हणूनच ते राजाच्या छापाला अथवा छायाचित्राला प्रसिद्धी देऊन सामान्य जनांच्या हातीं लागूं देत नाहींत.

कपडा आणि पुरेसें धान्य यांच्या अभावीं ब्रह्मदेश अगदीं भिकेला लागला. इंग्रजांनीं जेथें जेथें राज्य केलें, तेथला कच्चा माल नेऊन तद्देशीय लोकांस तर लुटलेंच, परंतु त्या कच्चा मालाच्या निरनिराळ्या वस्तू तयार करून त्या पुन्हा त्याच देशाच्या लोकांस विकून त्यांचें असेल नसेल तें धन घेऊन त्यांनीं त्यांस पूर्णपणें नागविलें. घरांतच प्रत्येकानें गाई-म्हशी ठेवून दूध दुभतें करावें, शेतीवर धान्य पिकवावें व मातीच्या झोंपडींत आपल्यापुरतें सूत कातून सुखावें राहावें, या जुन्या समाजरचनेचा नाश करून त्या जागीं नवी यांत्रिक समाजरचना पाश्चात्य लोकांनीं निर्माण केली. परंतु या नवीन पद्धतीची चटक लावून तिच्या नाड्या मात्र इंग्रजांनीं आपल्या हातांत ठेविल्या. नवीन आधुनिक पद्धतीच्या वस्तू तयार करण्याची यंत्रसामुग्री आणि जहाजें, मोटारी, विमानें इत्यादि आजकालच्या वाहतुकीची साधनें हीं दोन्हींही जित देशांत उत्पन्न होणार नाहींत व तेथील लोक अशिक्षित राहतील याची त्यांनीं पूर्ण खबरदारी घेतली. युद्धकालांत तर पाश्चिमात्य देशांशीं दळणवळण तुटून, या वस्तू गांठचे पैसे देऊनसुद्धां उपलब्ध होणें शक्य नसतें. अशा तऱ्हेनें आपली पूर्वीची स्वयंपूर्ण समाजरचना नष्ट होऊन त्या जागीं इतरांस पंगू बनविणारी परकी समाजरचना रूढ झाली. त्यामुळें पौर्वात्य लोक गरीब बनले, भिकेला लागले व परावलंबी झाले. युद्धाच्या दिवसांत तर ' धड हें ना तें ' असें होऊन कोट्यवधी लोक मरणोन्मुख होतात. अशीच हुबेहूब स्थिती ब्रम्हदेशाची झालेली होती. नेसायला मिळालें तर गोणपाट व खायला कसलेतरी तांदूळ एवढ्यांत सुख मानावयाची वेळ प्रत्येकावर येऊन ठेपलेली होती.

ब्रम्हदेशाला जपान्यांनीं स्वातंत्र्य दिल्यावर ब्रम्हदेशाचे वकील निरानिराळ्या राजदरबारीं पाठविण्यांत आले. कित्येकजण म्हणतात कीं, जपाननें ब्रम्हदेशाला नाममात्र स्वातंत्र्य दिलें होतें. परंतु हें म्हणणें तितकें खरें नाहीं. या विधानास अनेक बाजू होत्या. स्वतंत्र राष्ट्राच्या नागरिकांची राहणी फार चांगली व सुखाची असते, तशी ती या दिवसांत ब्रम्ही लोकांची नव्हती म्हणून जपान्यांनीं दिलेलें स्वातंत्र्य खोटें असलें पाहिजे असेंच कित्येकजण

आपल्या मनाची समजूत करून घेत. अर्थात् नागरिकांची स्थिति कोणत्याही साधनांच्या अभावीं युद्धाच्या धामधुमीच्या दोन वर्षांत सुधारणें जपान्यांसही शक्य नव्हतें व सत्ताधारी ब्रम्ही अधिकाऱ्यांसही शक्य नव्हतें, हें वर वर्णन केलेल्या परिस्थितीवरून कोणासही सहज समजून येण्यासारखें आहे. जपानी लोक या परिस्थितीला मुळींच कारणीभूत नव्हते. आपला अगदीं जवळचा आप्त किंवा जीवश्च कंठश्च मित्र मृत्युशय्येवर पडला म्हणजे अंतःकरणांत कितीही तळमळ किंवा कळकळ असली तरी उघड्या डोळ्यांनीं आपल्याला त्याचा मृत्यु पाहावा लागतो, त्याप्रमाणें स्वतंत्र ब्रम्ही सत्ताधिकाऱ्यांचाही याबाबतींत नाइलाज होता. अर्थात् या दृष्टीनें विचार करतां जपान्यांनीं दिलेलें स्वातंत्र्य खरें नव्हतें असा निष्कर्ष काढणें चुकीचें होईल. बरें, असें जर म्हटलें कीं जपान्यांनीं अफाट फौजफाटा ब्रम्हदेशांत ठेवलेला होता, त्यांच्याच ताब्यांत सर्व आरमारी आणि फौजी तळ होते आणि याबाबतींत ते ब्रम्ही स्वातंत्र्य-सरकाराच्या अधिकाऱ्यांस मुळींच ढवळाढवळ करूं देत नव्हते म्हणून ब्रम्ही लोक स्वतंत्र नव्हते, तर तेंही म्हणणें खरें नव्हे. ब्रम्ही लोकांत जपान्यांसारखी राष्ट्रवृत्ति, वीरवृत्ति एकदम निर्माण होणें शक्य नव्हतें. इंग्रजप्रणीत सैन्यांत नोकरी करणाऱ्या थोड्याथोडक्या पोटभरू ब्रम्ही सैनिकांचें शस्त्रास्त्रांबद्दलचें थुतुरमुतुर ज्ञान सोडल्यास ब्रम्ही लोकांस लढाई कशाशीं खातात हें ठाऊक नव्हतें व अजूनही ठाऊक नाहीं. याच्या उलट जपान्यांचें युद्धयंत्र आणि तंत्र जगांतील अर्ध्या अधिक राष्ट्रांशीं टक्कर देण्यास समर्थ होतें. हातावर शीर घेऊन त्यांनीं ही लढाई सुरू केलेली होती. पॅसिफिक महासागराच्या कक्षेंतील सर्व प्रांत साफ करून त्यांनीं शत्रूला मागें रेटीत रेटीत ब्रम्हदेशाच्या पार थोपवून धरलेलें होतें. अर्थात् स्वतः होऊन सुरू केलेल्या आपल्या जिवावरच्या या युद्धांत ब्रम्हदेशासारखा शत्रूच्या परिसीमेवरील देश, ( राष्ट्रीयत्व जागृत न झालेल्या व दुबळ्या ) ब्रम्ही लोकांच्या हातीं सोडून आपली सर्व फौज तेथून काढून घेणें हा शुद्ध वेडेपणा ठरला असता. उघड उघड शत्रूला आव्हान देऊन, शत्रूचें स्वागत करून आपल्या गळ्याला फांस लावून घेण्याचेंच हें धोरण झालें असतें. अर्थात् या दृष्टीनें विचार करतांही जपाननें केवळ कपटानें ब्रम्हदेशास ( नाममात्र ) स्वातंत्र्य दिलें, परंतु खरी सत्ता दिली नाहीं, हें विधान चूक ठरेल. जागतिक शांततेच्या काळांतही जपाननें हेंच धोरण चालू ठेविलें असतें तरच ब्रम्हदेशाचें स्वातंत्र्य, निर्भेळ स्वातंत्र्य नाहीं असें आपणांस ठामपणें म्हणतां आलें असतें. जागतिक युद्ध सुरू होण्याच्या अगोदर स्वतंत्र नसलेल्या राष्ट्रांस स्वातंत्र्य दिल्याचें युद्धकालांत जपाननें जाहीर केलें व बरेचसे अंतर्गत व्यवहार त्यांच्या हातीं सोपविले हें काय कमी झालें ! इंग्रज व अमेरिकन लोकांनीं तर मनास येईल तेथें सैन्य उतरवून स्वतंत्र राष्ट्रांचें स्वातंत्र्य हरण केलें, मग इतरांस स्वातंत्र्य देण्याचें तर दूरच राहो.

एवढें मात्र म्हणतां येईल कीं, सर्व जपानी सैनिक हे स्वतःला शिष्ट समजत. त्यांनीं स्वतंत्र म्हणून जाहीर केलेल्या राष्ट्राच्या अधिकाऱ्यांशीं त्यांची वागणूक चांगली नव्हती. प्रत्येक जपानी सैनिक स्वतःच्या सैन्यांतील वरिष्ठांबाबत इतकी उत्तम शिस्त पाळतो कीं, आपल्या कोणत्याही वरिष्ठाकडून आलेला हुकूम प्रत्यक्ष सम्राटाकडून म्हणजे पर्यायानें परमेश्वराकडूनच आला असें समजून तो त्याचें पालन करतो. परंतु मित्र देशांतील उच्च प्रतीच्या अधिकाऱ्यांबद्दलही तो विशेषसा आदर दाखवीत नसे. ' ही काय खेळांतली बाहुलीं. आपण नाचवूं तशीं नाचतील. यांची नुसती दिखाऊ ऐट ! हे काय लढणार आहेत ! आपण आहोंत म्हणून हे आहेत. ' अशा तऱ्हेची त्यांच्याबद्दलची जपानी सैनिकांची तुच्छ वागणूक असे. असली तुच्छतापूर्ण वागणूक आणि त्याबरोबरच धसमुसळेपणा या दोन अवगुणांमुळें त्यांनीं कित्येकांस नकोसें करून सोडलें. मात्र इंग्रजांप्रमाणें ते जातिभेद अथवा पंक्तिभेद मुळींच करीत नसत. सर्व जपानी म्हणजे कोणी उच्च कुळांतले व इतर लोक सर्व हीन, निकृष्ट दर्जाचे, बेअकली अशी त्यांची भावना मुळींच नव्हती. त्यांची शिस्त, त्यांची राष्ट्रीय वृत्ति इत्यादि गुणांमुळें ते स्वतःस इतरांहून श्रेष्ठ समजत व तें अगदीं तंतोतंत खरें होतें. परंतु खाण्यापिण्यांत व राहाण्यांत आपण चैन करावी व इतरांनीं हमाली करावी अशी त्यांची इच्छा नव्हती. सर्व एशिआटिक लोक एकच आहेत, परंतु इतरांनीं आळशी न राहतां आमच्यासारखें उद्योगप्रिय व्हावें व आपला राष्ट्रोद्धार करून घ्यावा, असेंच त्यांचें सांगणें व वागणें असे. गरिबींतील काबाडकष्टानें व स्वहुषारीनें नांवलौकिकास चढलेला इसम ज्याप्रमाणें इतर गरीब आळशी विद्यार्थ्यांस तुच्छ लेखतो, परंतु होतकरू दिसतील तेवढ्यांस मात्र हाताशीं धरून आनंदानें मदत करतो, तशीच जपान्यांची वृत्ति होती. इंग्रजांसारख्या पाश्चात्य लोकांपेक्षां मात्र यांची वृत्ति शतपट बरी होती एवढें खास म्हणतां येईल.

वरील ब्रम्हदेशाच्या स्वतंत्र सरकाराकडे सर्व अंतर्गत व्यवहार व स्वतंत्र राष्ट्राच्या दर्जाचें बाह्यांग अशा दोन गोष्टी जपाननें सोपविलेल्या होत्या हें निर्विवाद आहे. अंतर्गत व्यवहारांत लोहमार्गाचा अंतर्भाव नव्हता. डबे, इंजिनें व पूल उध्वस्त झालेल्या परिस्थितींत नागरिकांना आगगाड्यांपासून विशेष उपयोग होण्यासारखा नव्हता. सैनिक हालचालीसच त्या अपुऱ्या होत्या. तरी जेथें शक्य तेथें नागरिकांसही आगगाडीचा उपयोग करण्याची मुभा होती. टपालखातें तर बंदच झालें होतें. एवंच हिंदी स्वातंत्र्यसेना ब्रम्हदेशांत आली तेव्हां ब्रम्हदेशाची परिस्थिति अशी होती.

---

## युद्धाला तोंड लागलें : २२

मलाया व ब्रम्हदेश यांस जोडणारा जो ' क्राय ' नांवाचा चिंचोळा भूमिभाग आहे. येथपर्यंत आगगाडीनें येऊन यापुढें मात्र स्वातंत्र्यसैन्याच्या तुकड्या मर्ग्युई – टॅव्हॉय – ये या मार्गानें किनाऱ्याकिनाऱ्यानें मोलमीनपर्यंत जात. मोलमीनहून मार्ताबानपर्यंत सालवीन नदीचें मुख होडीनें ओलांडावयास सुमारें अर्धा तास लागतो. तेथून पुढें रंगूनपर्यंत आगगाडीनें जातां येई. स्वातंत्र्य-सैन्याच्या तुकड्या जेव्हां समुद्राच्या किनाऱ्या किनाऱ्यानें कूच करीत असत, तेव्हां तोफा, मोटारी इत्यादि त्यांचें जड युद्धसाहित्य लहान लहान बोटींतून अथवा होड्यांतून जलमार्गें नेलें जाऊन तें त्यांना रंगूनला मिळे. एका मोटार-बोटीला जाड दोरानें एकामागें एक पांच-सहा होडगे बांधून त्यांच्या साहाय्यानें जलमार्गें बऱ्याच सामानाची कमी खर्चांत जलद वाहतूक करितां येते. याच प्रयुक्तीचा उपयोग स्वातंत्र्यसैन्यानेंही केला.

सिंगापुरापासून सयामची राजधानी बँकॉकपर्यंत पूर्वींचा लोहमार्ग होताच. बँकॉकपासून पुढें मोलमीनपर्यंत जपान्यांनीं ८०,००० हिंदी मजुरांच्या साहाय्यानें, घनदाट अरण्य लोहमार्गापुरतें कापून, नवीन आगगाडीचा रस्ता तयार कला. या लोहमार्गाकरतां रूळ, डबे, एंजिनें इत्यादि सर्व इतर लोहमार्गाचे लहान फाटेफुटे बंद करून त्यांचेंच सामान या ठिकाणीं जपान्यांनीं उपयोगांत आणलें. या मार्गानें सैन्य व युद्धसाहित्य आणण्यास पुरेसे डबे व एंजिनेंही नसत. बदलीवर अथवा निकडीच्या कामावर जाणारे येणारे सैनिक, फौजी अधिकारी, अगदीं लहान तुकड्या यांच्याच नेहमींच्या वाहतुकीचें काम या लोहमार्गानें जेमतेम पार पडत असे. या दाट अरण्यांतील लोहमार्गावर आग-गाडीच्या डब्यांचा जितका तुटवडा भासत असे, तितका सिंगापूर ते बँकॉक या मार्गावर भासत नसे. बँकॉकपर्यंत आगगाडीनें गेल्यास पुढें आगगाडीनें जाणें अशक्य. तेथून पायीं जावें तर लांबचा रस्ता व शिवाय जड युद्धसाहित्य वाहून नेण्याची सोय नाहीं; म्हणून सिंगापूर-बँकॉक या लोहमार्गावर दोन्ही देशांस जोडणाऱ्या ' क्राय 'च्या चिंचोळ्या संयोगभूमीवरील एका लहानशा स्टेशनावर उतरून, तेथून पुढें समुद्राच्या पश्चिम किनाऱ्यालगतच्या वाटेनें चालत जावें, असेंच ठरविण्यांत आलें. याप्रमाणें मजल दरमजल कूच करीत ऑक्टोबर १९४३ पासून पुढील सात-आठ महिन्यांत हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या दोन डिव्हिजन्स ( पहिली आणि दुसरी ) मलायांतून निघून ब्रम्हदेशांत जाऊन

पोंचल्या. या डिव्हिजन्सचे मुख्य मुख्य अधिकारी, त्या त्या डिव्हिजनच्या मध्यवर्ती कचेऱ्यांत काम करणारे सैनिक, पुरवठा-खात्याचे लोक हे मात्र आपापल्या डिव्हिजनच्या बऱ्याचशा तुकड्या मलायांतून निघून गेल्यावर आपापल्या कचेऱ्या व खातीं बंद करून विमानानें अथवा लोहमार्गानें (जशी सोय होईल त्याप्रमाणें) बँकॉकमार्गे रंगूनला पोंचत व तेथें पुन्हा आपल्या कामास सुरुवात करीत. तेथें गेल्यावर, आपल्या तुकड्या आल्यावर त्यांची व त्यांच्या युद्धसाहित्याची जुळवाजुळव करून थोडे दिवस रंगूनमध्येंच त्यांच्या राहाण्याची व्यवस्था करणें व मग नेताजींच्या आज्ञेप्रमाणें पुन्हा पायीं अथवा आगगाडीनें निरनिराळ्या दिशेस युद्ध-आघाडीवर त्यांची रवानगी करणें हें बहुधा त्यांचें काम असे.

हिंदी स्वातंत्र्यसेनेच्या पहिल्या डिव्हिजनमध्यें बहुतेक सर्व जुने शिपाई, म्हणजे युद्धबंद्यांतून स्वातंत्र्यसेनेस येऊन मिळालेले सैनिक होते. दुसऱ्या डिव्हिजनमध्यें जुन्या सैनिकांचें व दूरपूर्वेतील नागरिकांमधून सैनिक बनलेल्यांचें प्रमाण बहुधा सारखें होतें. तिसऱ्या डिव्हिजनमध्यें बहुतेक सर्व नवे सैनिक होते. ही डिव्हिजन अखेरपर्यंत मलायांतच राहिली. या ज्या दोन डिव्हिजन्स रंगूनला येऊन पोंचल्या त्यांना वाटेंतील तीन-चार मुख्य मुख्य ठिकाणीं १५-२० दिवसाचा अथवा महिन्याभराचा मुक्काम करावा लागला. अशी दरकूच दरमजल करीतच सैन्याची हालचाल नेहमीं होते. मुख्य प्रश्न जड युद्धसाहित्याच्या वाहतुकीचा असतो. त्याला वाहनें लागतात व त्या वाहनांची सोय लागल्या-शिवाय सैनिकांच्या तुकड्या पुढें जाण्यांत कांहीं अर्थ नसतो.

दक्षिणेकडे पालेटावा या गांवाजवळ हिंदुस्थान-ब्रम्हदेश सरहद्द सुरू होऊन ती उत्तरेस कोहीमा गांवाच्या जवळून गेलेली आहे. ही जरी प्रत्यक्ष राजकीय सरहद्दीची रूपरेखा असली तरी प्रत्यक्ष त्या रेषेच्या अलीकडे पलीकडेच प्रत्येक ठिकाणीं उभयपक्षांचीं सैन्यें होतीं असें नाहीं. हिंदुस्थान व ब्रम्हदेश यांतील सरहद्दीचा विस्तीर्ण प्रदेश दाट अरण्य, दऱ्या व खोरीं यांनीं व्यापलेला आहे. डोंगरमाथ्यांचीं वलयेंच्या वलयें आहेत व यांतून वाटेल तसा मार्ग काढणें शक्य नसतें. या राजकीय रूपरेखेप्रमाणें जंगलांत वाटेल तेथें खांब ठोकून याच्या अलीकडे हिंदुस्थानाची व पलीकडे ब्रम्हदेशाची सरहद्द असें म्हणतां येतें. परंतु सैन्याचा तळ कायम करतांना अथवा सैन्याची हालचाल करतांना रसद मिळत राहील असें एकादें लोकवस्तीचें गांव, मोटारी येतील जातील असा दळणवळ-णाचा रस्ता, पिण्याच्या पाण्याचें सान्निध्य अशा अनेक गोष्टी बघाव्या लागतात.

या दृष्टीनें कालाडान नदीच्या कांठीं पालेटावा या गांवीं, त्याच्या उत्तरेस फालम या ठिकाणीं, त्याच्या ईशान्येस वंथो, काथा, भामो, मिचीना इत्यादि ठिकाणीं हिंदी स्वातंत्र्यसेना विभागलेली होती. ही सुमारें १५०० मैलांची आघाडी होती. सर्वसाधारणपणें पहिली डिव्हिजन रंगूनहून उत्तरेस

पेगू–टाँगू–पिनमिना–यामेथीन या लोहमार्गानें मंडालेस गेली व तेथून पुढें ती भामो, मिचीना, काथा, कालेवा या ठिकाणीं विभागली गेली. दुसरी डिव्हिजन रंगूनहून प्रोममार्गें पाकोक, मिंगयांग, पालेटावा, माँगडो, बुथेडाँग ( दक्षिण सरहद्दीवरील पालेटावा जवळील दोन खेडीं ), फालम इत्यादि ठिकाणीं पसरली. दक्षिणेकडील सरहद्द ही आराकान पर्वतराजींनीं व्याप्त आहे. सरहद्दीच्या मधोमध म्हणजे फालम गांवापासून उत्तरेस 'चिन' नांवाचा पर्वतमय प्रदेश आहे. याच्याही उत्तरेस कोहिमाच्या बाजूला 'नाग' पर्वतश्रेणी आहे. या तिन्ही पर्वतव्याप्त प्रदेशांत त्या त्या जातीचे जंगली लोक राहतात. हे वाघासारखे क्रूर नसून हरिणासारखे बुजरे असतात. नाग लोक हे ख्रिश्चन मिशनऱ्यांनीं एकजात बाटविले आहेत. वंथो आणि काथाच्या पूर्वेस चिंदविन नदीच्या कांठावर कालेवा नांवाचें एक लहानसें गांव आहे. येथें हिंदी स्वातंत्र्यसैन्याचा व जपान्यांचाही एक मोठा तळ होता.

या पंधराशें मैलाच्या लांबलचक आणि विस्तीर्ण आघाडीचे सर्वसाधारण तीन विभाग पाडण्यांत आलेले होते. उत्तरेकडील, मधला व दक्षिणेकडचा. उत्तरेकडे मुलुखगिरी करणाऱ्या सैन्याचीं मुख्य ठिकाणें म्हणजे भामो-मिचीना आणि मोगाँग. मधल्या विभागांत काथा, कालेवा, फालम, वंथो येथें सैन्याचे प्रमुख तळ होते. दक्षिणेकडे पालेटावा, बुथेडाँग, माँगडो येथें मुख्यतः सैन्याचे तळ ठेवण्यांत आलेले होते.

आजकालच्या लढाईची बरोबर कल्पना करितां न आल्यामुळें कित्येक लोक असें विचारतात कीं, आधुनिक युद्धांत हातघाईच्या लढाईचा कधीं प्रसंग येतो कीं नाहीं ? कीं नुसतें तोफखान्याच्या माऱ्यानें आणि हवाई हल्ल्यानें बेजार होऊन मागें सरकावें लागतें ? त्याचें असें आहे कीं, हातघाईचा प्रसंग थोडाफार येतो, परंतु तो पूर्वीच्या प्रमाणांत येत नाहीं. पानपतच्या लढाईप्रमाणें एका मैदानांत समोरासमोर दोन्ही फौजा बरेच दिवस तळ देऊन बसल्या आहेत असें तर आधुनिक युद्धांत कधींच होत नाहीं. कारण तोफा, मशीगन्स्, विमानें इत्यादि साधनांनीं शत्रूची रसद तोडणें, त्याच्या सैन्याची नासाडी करणें, त्याच्या दळणवळणाचे मार्ग बंद करणें–अशा अनेक रीतींनीं शत्रूस बेजार करितां येतें व त्यास माघार घेण्यास किंवा शरण येण्यास भाग पडतां येतें. परंतु घाटांतून गेलेल्या मार्गाच्या दोन्ही बाजूला जंगलमय पर्वतप्रदेशांत खंदक खणून दडून बसलेल्या शत्रूस हुसकून लावण्यास हवाई-हल्ला, तोफांचा भडिमार इत्यादींच्या जोडीला लहान लहान गनिमी तुकड्यांचाही उपयोग करावा लागतो. या आठ-आठ, दहा-दहाजणांच्या तुकड्या जेव्हां अचानक हल्ला करतात, तेव्हां संगिनींच्या लढाईचा प्रसंग येतो. अर्थात्, आजकालच्या दिवसांत हजारों सैनिकांच्या हातघाईच्या लढाईचे प्रसंग येतच

नाहींत, असें म्हटलें तरी चालेल. अशा लहान लहान तुकड्यांचे मात्र हल्ले होतात.

वर वर्णन केलेल्या सरहद्दीवरील पर्वतमय प्रदेशांत जे अनेक डोंगरमाथे आहेत, त्यांस सरकारी नकाशांत क्रमांक दिलेले आहेत. डोंगरमाथा क्रमांक १३८५, डोंगरमाथा क्रमांक २४६७ असाच त्यांचा सरकारी कागदपत्रांत उल्लेख आहे. अमुक क्रमांकाच्या डोंगरावर आपल्या इतक्या सैनिकांचें ठाणें आहे, तमक्या क्रमांकाच्या डोंगरावर शत्रूचे इतके सैनिक आहेत, अमक्या डोंगरावर शत्रूच्या तोफेचे गोळे येऊन पडत आहेत; तमक्या डोंगरावर आपल्या सैनिकांनीं हल्ला चढविला असें फौजी नकाशांमधील क्रमांक देऊन मोहिमेच्या पत्रव्यवहारांत त्या त्या डोंगरांचा उल्लेख केला जाई.

वर वर्णिलेल्या आघाडीवर हिंदी सैनिक आणि जपानी सैनिक हे दोघेही मिळून मिसळून इंग्रजांविरुद्ध लढत असत. क्वचित् कांहीं ठिकाणीं आघाडीचा विशिष्ट भाग हिंदी स्वातंत्र्यसैन्याकडे स्वतंत्रपणें सोपविलेला असे. अशा वेळीं नकाशावर दाखविलेल्या अमक्या गांवापासून (अथवा खेड्यापासून) अमक्या गांवापर्यंतच्या प्रदेशाचा बचाव स्वातंत्र्यसैनिकांनीं करावा व अमूक एका मार्गानें पुढें चढाई करून अमकें अमकें ठिकाण गांठावें व तेथें आपला झेंडा रोवावा असें ठरलेलें असे. जेव्हां एकाद्या मोठ्या जपानी तुकडीला एकादी स्वातंत्र्यसैन्याची लहान तुकडी जोडली जात असे, तेव्हां जपानी अधिकाऱ्यांच्या आज्ञेप्रमाणेंच त्या संकलित सैन्याच्या हालचाली होत. असें होणें केव्हांही योग्यच होतें. जपान हें स्वतंत्र राष्ट्र असून त्याचें युद्धतंत्रही पुढारलेलें होतें. त्यांच्या अधिकाऱ्यांच्या इतका अनुभव व त्यांच्याइतकें युद्धतंत्राचें ज्ञान स्वातंत्र्यसैन्याच्या अधिकाऱ्यांस नव्हतें. आपल्याहून अधिकारानें, ज्ञानानें व अनुभवानें श्रेष्ठ अशा अधिकाऱ्यांच्या हाताखालीं मित्रराष्ट्र म्हणून काम करण्यास तयार होणें यांत कांहींच गैर नाहीं. युरोपमध्यें नाइलाजानें इंग्रज फौजी अधिकाऱ्यांना अमेरिकन जनरल 'आयझेन हॉवर 'च्या हाताखालीं काम करावेंच लागलें. चर्चिलनें जंग जंग पछाडले, परंतु त्याला असें दिसून आलें कीं, अमेरिकेच्या मदतीशिवाय तर काम भागणार नाहीं व ती मदत हवी असली तर त्यांच्यापुढें नाक घासून आपल्या अधिकाऱ्यांना दुय्यम स्थानच पत्करावें लागेल. तशी स्थिति स्वातंत्र्यसैन्यांत नव्हती. संख्या, अनुभव अशा अनेक गोष्टी लक्षांत घेतां आघाडीवरील युद्धतंत्राच्या दृष्टीनें जपानी फौजी अधिकाऱ्यांच्याच सल्ल्यानें वागणें इष्ट होतें. जपानी अधिकारीही अर्थात् त्यांच्याबरोबर असलेल्या स्वातंत्र्यसेनाधिकाऱ्यांचाही सल्ला घेत असत.

२६ जानेवारी १९४४ रोजीं रंगूनमध्यें 'सुभाष' रेजिमेंटची गोळीबाराची तालीम होती. नेताजी स्वतः त्या ठिकाणीं हजर होते. सैनिकांस उद्देशून नेताजी म्हणाले, "...मित्रहो, तुम्ही आतां आघाडीवर जाणार आहांत. ती पहा...या पश्चिम दिशेकडे नजर टाका ... त्या पर्वतराशींच्या पलीकडे आपली पवित्र

जन्मभूमि आहे. आपल्या मायभूमीला दास्यांतून मुक्त करण्याची पवित्र घटी जवळ येऊन ठेपलेली आहे. स्वदेशाच्या स्वातंत्र्यार्थ प्राण खर्ची घालण्यास कचरूं नका. तुमच्या स्वतःच्या आणि हिंदुस्थानाच्या नांवाला शोभेल असेंच कार्य करून दाखवा..." २७ जानेवारीला सुभाषरेजिमेंटला आघाडीकडे कूच करून जाण्याचा हुकूम देण्यांत आला. हिंदुस्थानाच्या सरहद्दीवर पहिला हल्ला चढविण्याचा मान या रेजिमेंटला देण्यांत आलेला होता. या रेजिमेंटच्या मागोमाग स्वातंत्र्यसैन्याच्या पहिल्या डिव्हिजनच्या इतर तुकड्याही पांच-पांच, सहा-सहा दिवसांच्या अंतरानें आघाडीकडे कूच करूं लागल्या.

आघाडीच्या डोंगराळ मुलुखावर स्वातंत्र्यसैन्याच्या दहा-दहा, पंधरा-पंधरा जणांच्या लहान लहान तुकड्या करून त्या जपानी तुकड्यांस जोडण्यांत आलेल्या होत्या. प्रत्येक तुकडीवर हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या लष्करी शाळेंत शिकून तयार झालेल्या तरुण, सेकंड लेफ्टनंट अधिकाऱ्याची नेमणूक केलेली होती. प्रत्येक अधिकाऱ्याजवळ एक एक पिस्तुल असे. बहादुर पथक, हेरांचें पथक व रीइन्फोर्समेंट पथक यांचे आठ-आठ विभाग करून या तिन्हींचा एक-एक विभाग एकेका जपानी तुकडीबरोबर काम करीत असे. इंग्रजांच्या बाजूचे हिंदी सैनिक पकडून कैद केले कीं, ते सर्व रीइन्फोर्समेंट पथकाच्या सैनिकांकडे सोपवावयाचे आणि मग रीइन्फोर्समेंट पथकाच्या सैनिकांनीं या नव्या हिंदी युद्धबंद्यांच्या खाण्यापिण्याची, कपड्यालत्त्यांची वगैरे विचारपूस करून त्यांचें आदरातिथ्य करावयाचें, त्यांच्या मनाचा कल बघावयाचा व त्यांस स्वातंत्र्य-युद्धांत भाग घेण्यास प्रवृत्त करावयाचें, अशा तऱ्हेची व्यवस्था होती.

हेरांच्या पथकाच्या लहान लहान तुकड्यांतील सैनिक, शत्रुव्याप्त अशा जंगलप्रदेशांत शिरत तेव्हां त्यांच्या अंगावर पानें, गवत इत्यादि ठिकठिकाणीं खोवलेलें असे व त्यामुळें जंगलांतून जमिनीवरून सरपटतांना अथवा झाडां-झुडपांतून वांकून चालतांना, शत्रू आसपास असला तरी त्यास सहसा पत्ता लागत नसे. जवळचीं सर्व शस्त्रास्त्रें म्हणजे बंदुका, पिस्तुलें, तलवारी, संगिनी इत्यादि पानें वगैरे लावून, अशीं नीट झांकलेलीं असत.

३ फेब्रुवारी १९४३ पर्यंत सर्व तयारी झाली. कालाडान, पालेटावा, हाका, फालम, कालेवा, वंथो, काथा, भामो, मोगाँग, मिचीना या मुख्य मुख्य शहरीं स्वातंत्र्यसैन्याचे व जपानी फौजेचे प्रमुख तळ स्थापन करण्यांत आले. या शहरांच्या पश्चिमेस व वायव्येस हिंदुस्थानाच्या सरहद्दीजवळ असलेल्या लहान खेड्यापाड्यांतून किंवा पहाडी लोकांच्या लहान वस्तीच्या ठिकाणीं स्वातंत्र्यसेनेच्या व जपान्यांच्या तुकड्या पसरण्यांत आल्या. वस्तीचीं गांवें रोखावीं लागतात किंवा त्यांचा बचाव करावा लागतो तो एवढ्याकरतांच कीं, तेथें पिण्याचें पाणी, रसद व जंगलांतील पाऊलवाटांसंबंधीं माहिती वगैरे मिळणें शक्य

असतें. अशा खेड्यापाड्यांतच इकडचे तिकडचे रस्ते किंवा पाऊलवाटा येऊन मिळतात. हीं खेडीं अथवा वस्तीचीं ठिकाणें सोडून नुसतेंच सरहद्दीच्या रोखानें जाऊं म्हटलें तर उगीच घनदाट अरण्यांतून जोरदार प्रवाहाचे नदीनाले तुडवीत, खडे पहाड चढावे लागतील. प्रत्येक शिपायाच्या पाठीवर सामानानें भरलेली एक खाकी पिशवी पट्ट्यांनीं बांधलेली असते. या पिशवींत एक कांबळें, एक खाकी अर्धी विजार, सद्रा, एक गरम स्वेटर, मच्छरदाणी, गंजिफ्रॉक वगैरे सामान असतें. गळ्यांत पाण्याकरतां पत्र्याची एक अरुंद तोंडाची, गरम कापड गुंडाळलेली बाटली व रेस्पिरेटर ( विषारी वायूपासून संरक्षण करणारा मुखवटा ) लटकाविलेला असतो. हातांत बंदूक, कंबरेला संगीन, तरवार किंवा पिस्तुल असा एकंदर प्रत्येक सैनिकाचा शस्त्रसंभार असतो. पाठीवर आवळलेल्या सामानामुळें शिपायांस पोंक निघाल्याप्रमाणें पुढें वाकून चालावें लागतें. एवढ्या सामानानिशीं खडे पहाड चढणें-उतरणें शक्य नसतें. शिवाय तोफा, वगैरे इतर जड युद्धसाहित्य, बैलगाड्या, मोटारी हें सर्व त्या वाटेनें जाणें अशक्य असतें. शिवाय अशा रीतीनें पहाड चढणें व उतरणें यांतच बरेच दिवस फुकट जाऊन, प्रत्यक्ष अंतर कमीच कापलें जातें. वाटेंत अन्न वगैरे मिळण्याची कांहीं सोय नसल्यामुळें प्रवासापुरतें धान्य औषधें वगैरे सामान बरोबर घ्यावें लागतें. एवढ्या सर्व अडचणी सोसून शत्रूच्या छावणीजवळ पोंचलेंच तर मोटारी, रणगाडे, तोफा, मशीनगन्स इत्यादि युद्धसाहित्यानें शत्रू सुसज्ज असतांना त्याच्यावर हल्ला करून जय मिळविण्याची आशा कमीच. एवंच पाऊलवाटा, रस्ते, नद्या, खेडीं, गांवें, आगगाडीचा मार्ग इत्यादि सोडून आधुनिक फौज सहसा येत नाहीं. विशेषतः इंग्रजांच्या साम्राज्य-फौजांसारख्या ऐषआरामी फौजा तर 'धोपट मार्गा सोडूं नको ' अशाच मताच्या असतात. एवढें विस्तारानें सांगण्याचें कारण एवढेंच कीं, लढाईचा अनुभव नसलेल्या सामान्य जनांस असें वाटतें कीं 'आघाडीवरचा भूमिभाग एवढा विस्तीर्ण असतांना त्याचा बचाव कसा करीत असतील ? शत्रू एकदम कोठल्या बाजूनें येईल हें कोणी सांगावें ! आघाडीवर दक्षिणेपासून उत्तरेपर्यंत आपल्या सैनिकांची, हातांत हात घालून एक रांग केल्याशिवाय शत्रूस अडविणें कसें शक्य आहे ? ' परंतु अशी परिस्थिति नसते. वर सांगितल्याप्रमाणें आघाडीवरच्या गांवांतून सैन्य पसरून दिलें, म्हणजे निरनिराळ्या वाटांचें संरक्षण होतें. तेथून शत्रूच्या हालचालींचा सुगावा काढण्याकरतां सैनिकांच्या लहान लहान तुकड्या पुढें पाठवून शत्रूचें सैन्य आपल्या रोखानें येत आहे कीं काय ? येत असल्यास कोणत्या वाटेनें येत आहे ? वगैरे बातमी काढल्यावर आपल्या पिछाडीच्या मुख्य तळांवरून बिनतारी संदेशानें किंवा जासूद पाठवून ताबडतोब कुमक मागवितां येते. अशा रीतीनें शत्रूच्या हल्ल्याचा रोख ज्या बाजूला दिसेल, त्या बाजूला आपली कुमक पाठवून त्या भूमिभागाचें संरक्षण करितां येतें.

वर हिंदी स्वातंत्र्यसैन्य आणि जपानी फौज यांच्या, आघाडीवरील मुख्य तळांची रूपरेषा दिलेली आहे. याच्या पलीकडे डोंगराळ जंगली मुलूख सोडून, वायव्येस व उत्तरेस इंग्रजांचे मोर्चे होते. बुथेडाँग, माँगडॉ ही ब्रम्हदेशाच्या दक्षिण सरहद्दीवरचीं दोन खेडीं, कॉक्स बाजार, मणिपूर ( इम्फाळ ), कोहिमा, हे इंग्रजांचे मुख्य तळ होते. इंग्रजांच्या बाजूनें, चिनी, अमेरिकन, कॅनॅडियन, आफ्रिकन व हिंदी असें अठरापगड सैन्य होतें. यांत अर्थातच हिंदी सैन्य बहुसंख्य होतें. त्याच्या खालोखाल आफ्रिकन व चिनी अशा तऱ्हेनें सर्व एशिआटिक ( व आफ्रिकन ) सैन्यच या बाजूला मुख्य लढणारें होतें. इंग्रज ( अमेरिकन, कॅनॅडियन ) हे फक्त हुकूम गाजवावयाला, अरेरावी करावयाला व राज्यकारभाराचें सोपें काम बघावयाला. निकराचा हल्ला चढवून तोफेच्या तोंडीं व मृत्यूच्या आहारीं जाण्याकरतां एशिआटिक लोक, विजयोत्सव करून मिरवणुकींत भाग घेण्याकरतां व मजा मारण्याकरतां गोरे लोक, असा प्रकार नेहमींप्रमाणें येथेंही होताच. एका बाजूला जपानी आणि हिंदी स्वातंत्र्यसैनिक आणि दुसऱ्या बाजूला चिनी व इंग्रजधार्जिणें हिंदी सैन्य एकूण दोघेही एशिआटिक. दोघांनीं एकमेकांचा संहार करावयाचा व साम्राज्य कोणाचें पसरावयाचें तर तें इंग्रजांचें ! या खऱ्या परिस्थितीची जाणीव एशिआटिक लोकांना होऊन ते केव्हां एक होतील ते होवोत; परंतु सध्यां चीन-जपानसारख्या आपसाआपसांतील वितुष्टामुळें परक्यांचें मात्र चांगलें फावतें.

उभय पक्षींच्या मोर्चांच्या मधोमध जे कांहीं रस्ते अथवा पाऊलवाटा होत्या, त्यांनीं शत्रुसैन्य आपल्या रोखानें चाल करून येऊं नये म्हणून त्या रस्त्यांलगतच्या डोंगरमाथ्यावर ठिकठिकाणीं तोफा, मशीनगन्स इत्यादि अंतरानें लाविलेल्या होत्या. शिपायांस गोळीबार करितां यावा म्हणून अधूनमधून खंदक खणलेले होते. आजूबाजूला उंच उंच जंगली झाडें होतींच. सैनिकांना राहावयास लहान लहान झोपड्या केलेल्या असत. झोपड्यांजवळ पेट्रोलचीं पिपें अथवा दारूगोळ्याच्या पेट्या रचून ठेविलेल्या असत.

३ फेब्रुवारीला रात्रीं आघाडीवरील प्रत्येक तुकडीच्या मुख्यानें आपापल्या सैनिकांस जमवून दुसऱ्या दिवशीं शत्रूवर हल्ला करण्याच्या तयारीनें राहावयास सांगितलें. जिकडे तिकडे एकच उत्साह दिसूं लागला. प्रत्येक स्वातंत्र्यसैनिकाच्या चेहऱ्यावर आनंद विलसत होता. ‘ उद्यां आपण हिंदुस्थानाच्या, आपल्या मातृभूमीच्या रोखानें शत्रूवर चाल करून जाणार. हिंदुस्थानांत लवकर प्रवेश करणें हें आतां सर्वस्वीं आपल्या वीरश्रीवर अवलंबून राहील. अनिश्चितीचा व तयारीचा काल संपला आणि आतां प्रत्यक्ष युद्धाचा दिवस येऊन ठेपला आहे. आपण यापुढें इंग्रजाचे गुलाम म्हणून हिंदुस्थानांत प्रवेश करणार नसून आपल्या बाहुबलानें आपल्या हक्काच्या जमिनीवर पाय ठेवणार आहोंत. यांत स्वत: आपण तर स्वातंत्र्य उपभोगूंच, परंतु शिवाय आपल्या असंख्य बांधवांनाही दास्यांतून

मुक्त करूं. धन्य त्या नेताजी सुभाषचंद्र बोसांची, ज्यांनीं आमच्यांत ही जागृती उत्पन्न केली व ही संधी आम्हाला आणून दिली ! आतां आम्ही आहोंत आणि आमचा शत्रू आहे, पाहून घेऊं ! आतांच खरी परिक्षेची वेळ आहे. मरूं पण मागें हटणार नाहीं.' असेच त्या दिवशीं प्रत्येकाचे विचार होते.

प्रत्यक्ष युद्धाच्या धुमश्चक्रींत कवाईत, रांगेनें चालणें, सर्वांनीं शिस्तीनें पाय टाकणें यांतलें कांहींच होत नाहीं. हें सर्व सैनिकांना शिस्त लावावी एवढ्या-करतांच असतें. परंतु प्रत्यक्ष युद्धांतील हल्ल्याचा आणि त्याचा संबंध नसतो. तसेंच बँडचेंही असतें. विजयोत्सवाच्या मिरवणुकीकरतांच बँडचा उपयोग होतो; लढाईच्या प्रसंगीं होत नाहीं. उलट असे गनिमी हल्ले गाजावाजा न करितां अत्यंत गुप्ततेनें करावयाचे असतात.

३ फेब्रुवारीला पालेटावा येथील हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या एका छावणींत रात्रीं दहा वाजतां एकाएकीं शिटी वाजली. छावणीच्या आजूबाजूला येरझाऱ्या घालणारे संत्री एकदम थबकले आणि त्यांनीं आपल्या बंदुकी सांवरल्या. सगळी-कडे काळोख होता. झाडींतून मधूनच वाऱ्याच्या झुळुकीचा किंवा झाडें हाल-ल्याचा आवाज ऐकूं येई. रातकिड्यांचा किर्र–किर्र शब्द सुरूच होता. पहारे-कऱ्यांनीं कान टवकारले. राखीव पहारेकरी एकदम आपापल्या शिबिरांतून बाहेर पडले व शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज होऊन बाहेर येऊन शिस्तीनें उभे राहिले. बराकींत जागे असलेल्या सैनिकांनीं आपल्या साथीदारांस हलवून जागें केलें. दोनतीन मिनिटांत सर्वजण खडबडून जागे झाले. ज्यानें त्यानें आपला सर्व जामानिमा चढविला व प्रत्येकजण आपापल्या विशिष्ट नायकासमोर वेगवेगळ्या रांगांत उभे राहिले. छावणीच्या मुख्यानें आपल्या दुय्यम अधिकाऱ्यांस आज्ञा केली कीं, 'आपापल्या तुकडीची हजेरी घेऊन मला कळवा.' प्रत्येक नायकानें "झेंडासिंग ...उस्मानखान...रामचरण" अशी आपापल्या पथकांतील सैनिकांची हजेरी घेतली. कांहीं पथकांतील शिपायांस हिंवताप आलेला होता. आदले दिवशींच्या लटुपटुच्या लढाईत कोणाच्या पायाला जखम होऊन तो सुजला होता. कोणाला विषमज्वर आणि कोणाला अमांशाचा थोडा त्रास झालेला होता. हे रुग्णाईत तेवढे बराकींत त्या तुकडीच्या डॉक्टराच्या देखरेखीखालीं आपापल्या शय्येवर होते; बाकी सर्वजण बाहेर रांगांत उभे होते. प्रत्येक नायकानें हाताखालच्या सैनिकांच्या पाठीवरील पिशव्या तपासल्या. क्वचित् एकाद्यानें कांहीं जास्त सामान पिशवींत घेतलें असल्यास तें काढून टाकण्यांत आलें. प्रत्येकाची बंदूक, मशीन-गन वगैरे सुस्थितींत असून प्रत्येकाच्याजवळ बंदुकीच्या शंभर गोळ्या देण्यांत आलेल्या होत्या. सर्व नायकांनीं छावणीच्या मुख्य अधिकाऱ्याला आपापल्या पथकां-तील किती सैनिक सुस्थितींत आहेत, किती रुग्ण आहेत, शस्त्रास्त्रें सुसज्ज आहेत अशी सर्व माहिती कळविली. यानंतर छावणीच्या मुख्य अधिकाऱ्यानें सर्वांस आपल्या भोंवतीं एके ठिकाणीं बसवून त्यांस उपदेशाच्या व वीरश्रीच्या चार गोष्टी सांगितल्या.

'नेताजींस स्मरून ज्यानें त्यानें देशकार्य उत्तम प्रकारें करावें त्यांत कसलीही हयगय होतां कामा नये व कोणीही यत्किंचितही भ्याडपणा दाखवूं नये–शत्रूस नामोहरम करावें असा सर्वांस उपदेश करण्यांत आला. त्यानंतर, कोणत्याही प्रसंगास तोंड देण्याकरतां जय्यत तयारीनें रहा...कामगिरीवर जाण्याची तुम्हाला केव्हांही आज्ञा मिळेल' असें एकदां शेवटीं सांगून सभा संपविण्यांत आली. प्रत्येकजण आपापल्या बिछान्यावर जाऊन पडला. बिछाना कसला तो! खालीं आंथरावयास रबरमिश्रित खाकी कापडाची सतरंजी – मेणकापडाप्रमाणें यांतसुद्धां पाणी शिरणें शक्य नव्हतें; अंगावर घ्यावयास एक कांबळें, उशाशीं पाठीशीं बांधावयाच्या खाकी पिशवीचें बोचकें. त्या रात्रीं कोणाही सैनिकास झोंप येणेंच शक्य नव्हतें. ही रात्र केव्हां एकदां संपेल व आपल्याला शत्रूवर चाल करून जाण्याची केव्हां आज्ञा मिळेल? अशी प्रत्येक सैनिकास उत्कंठा लागलेली होती. ती रात्र संपतां संपेनाशी वाटत होती. इकडे छावणीच्या मुख्यानें निरनिराळ्या पथकाच्या नायकांस आपल्या झोपडींत नेलें. एका मिणमिणत्या मेणबत्तीशीं सर्वजण खालीं डोकीं वांकवून कांहीं तरी निरीक्षीत होते. खालीं एक नकाशा होता. दुसऱ्या दिवशींच्या हल्ल्याबद्दल प्रत्येक नायकास त्याची कामगिरी समजावून दिली जात होती.

४ फेब्रुवारीस पहाटे ३ वाजल्यापासूनच छावणींत हालचाल दिसूं लागली. जो तो आपापलें सामान पाठीवर बांधून व शस्त्रास्त्रें घेऊन सज्ज झाला. छावणीच्या स्वयंपाक्यानीं स्वयंपाक करून प्रत्येकास खिचडी दिली, ती ज्यानें त्यानें खाली व दोन वेळ पुरेल इतकी आपल्या डब्यांतही भरून घेतली. ४॥ वाजतां जो तो रांगेंत उभा राहिला. आदल्या रात्रींप्रमाणेंच सामानाची तपासणी आणि वीरश्रीचे चार शब्द सांगितल्यावर छावणीच्या मुख्य अधिकाऱ्यानें प्रत्येक नायकास आपापलें पथक घेऊन नेमून दिलेली कामगिरी पार पाडण्यासाठीं कूच करण्यास सांगितलें. अजून सगळीकडे अंधारच होता. त्या छावणीच्या आसपास एक-दोन मैलांच्या घेऱ्यांत निरनिराळ्या ठिकाणीं तोफा ठेवण्यांत आलेल्या होत्या. पक्का रस्ता असा नव्हताच. परंतु बुथेडॉंग, मॉंगडॉ या सरहद्दीच्या खेड्यांकडे जाणाऱ्या घाटांतील कांहीं पाऊलवाटा होत्या. हेरांच्या तुकडीनें कांहीं दिवसांपूर्वीं आणून दिलेल्या बातमीप्रमाणें चार मैलांवर शत्रूसैन्याचें आघाडीवर एक ठाणें होतें. त्याच्यावर तोफांचा भडिमार सुरू झाला. हेरांनीं आणलेल्या बातमीप्रमाणें नकाशावर या ठिकाणाचा बिंदू देण्यांत आला. दिशा आणि अंतर याच्या मानानें तोफेवर असलेला कांटा लावला म्हणजे उद्दिष्ट ठिकाणीं नेमका गोळा जाऊन पडतो. तोफेचा गोळा सर्व साधारणपणें चार ते पांच मैल अंतरावर जाऊन पडतो. तोफेचा गोळा दीड-दोन फूट उंचीचा असून तो तोफेच्या तोंडांतून निघाला म्हणजे चेंडूप्रमाणें आकाशांत जातो व तोफेवरील कांटा ज्या मानानें स्थिर केला असेल, तेवढ्या अंतरावर जाऊन पडतो. तोफेचा

गोळा तोफेच्या तोंडांतून बाहेर पडल्यापासून अंतरिक्षांतून अर्ध वर्तुलाकृती मार्गानें लक्ष्यावर येऊन पडतो. तो निघाल्यापासून तोफेच्या तोंडापासून सरळ रेषेंत कधींच जात नाहीं. आपण हातांतील चेंडू अगदीं सरळ फेंकावयाचा प्रयत्न केल्यास तो फारच जवळ पडेल. लांब फेंकावयाचा असल्यास उंच फेंकावाच लागेल. आपण चेंडू लांब फेंकतो त्याच वेळेस जर आपले कांहीं मित्र आपल्या जवळून निघून त्या चेंडूच्याच दिशेनें पुढें जात असले तर त्यांस चेंडू लागणार नाहीं. कारण चेंडू त्यांच्या डोक्यावरून फारच उंचीवरून पुढें जाऊन पडतो. तद्वतच तोफेचे गोळे नेमके शत्रूच्या अंगावर पडून शत्रूची दाणादाण करीत असतांना त्याच वेळेस आपले सैनिकही त्याच रोखानें शत्रूच्या त्या ठाण्याच्या दिशेनें कूच करणें योग्य असतें. आपल्या तोफखान्याचा मारा एकसारखा चालू ठेवला म्हणजे तें आपल्या सैनिकांचें एक प्रकारचें संरक्षक छत्रच असतें. शत्रूची दाणादाण होऊन तो मोडकळीस आलेल्या आपल्या तुकडीची व छावणीची जुळवाजुळव करीत मागेंच सरकतो. पुढें सरकावयाचें साहस तो सहसा करीत नाहीं; कारण रस्त्यावर तोफांचा भडिमार होत असतांना त्या रस्त्यानें त्याच्या मोटारी, बैलगाड्या, इतर रणसाहित्य, सैनिक इत्यादि एकामागून एक आल्यास त्या सर्वांचा नाश होईल. बंदुकीच्या गोळ्यांचेंही 'असेंच. परंतु त्या जास्तींत जास्त हजार दोन हजार गजांवर जाऊन पडत असल्यामुळें त्या फार उंच जात नाहींत. या दारूगोळ्याच्या बाबतींत दुसरी लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे, तोफेचे गोळे काय, किंवा बंदुकीच्या गोळ्या काय, या तोफेच्या किंवा बंदुकीच्या नळकांड्यांतून निघाल्या म्हणजे गरगर फिरत निघतात. या नळकांड्याच्या तोंडाशीं आंतल्या बाजूला पेंच असतात. या पेंचांत तो गोळा ( किंवा गोळी ) घट्ट जाऊन बसतो. त्या गोळ्याच्या मागच्या बाजूस भरलेली दारू पेटवून उडाली कीं, हा गोळा त्या पेंचांतून गरगर फिरत बाहेर पडतो. याचें कारण असें कीं, या गोळ्यास जर पेंचांच्या साहाय्यानें गरगर अशी गती दिली नाहीं तर तो कोलांट्या खात जाईल व लक्ष्यावर नेमका जाऊन पडणार नाहीं. हातांतील लहान वेताची काठी आपण फेंकली म्हणजे ती जशी कोलांट्या खात जाते व तिचें टोंक नेमकें एकाद्या बिंदूवर जाऊन लागणें शक्य होत नाहीं, तशीच कोलांट्या खात जाणाऱ्या गोळ्यांचीही स्थिती होऊन, नेम बरोबर लागणार नाहीं. म्हणूनच बंदुकीच्या व तोफेच्या नळकांड्याच्या तोंडाशीं पेंचांचे आटे केलेले असतात.

तोफेचे गोळे बरोबर लक्ष्यावर पडत आहेत कीं नाहींत हें बघण्यास व शत्रूच्या एकंदर हालचालीवर लक्ष ठेवण्यास शत्रूच्या ठाण्याच्या अगदीं जवळ जंगलांत अथवा पहाडीच्या खबदाडांत उंच परंतु गुप्त ठिकाणीं एक ' निरीक्षण ठाणें ' ठेवलेलें असतें. येथें दोन चार सैनिक व एखादा अधिकारी नेहमीं पाळतीवर असतात. येथून दूरध्वनियंत्राच्या तारा मुख्य तळाशीं जोडलेल्या असतात.

बिनतारी यंत्रानें, दूरध्वनियंत्रानें व इतर खाणाखुणांच्या साहाय्यानें तोफेच्या गोळ्यांची दिशा बदलण्याबाबत किंवा शत्रूच्या हालचालीबाबत आपल्या मुख्य फौजी तळावरील अधिकाऱ्यांस संदेश पाठविले जातात.

४ फेब्रुवारी १९४३ ला पहांटे स्वातंत्र्ययुद्ध सुरू झालें. वर दिलेलें वर्णन मासलेवजा आहे. यावरून इतर आघाडीवरील छावण्यांची व तेथील हालचालींची थोडीबहुत कल्पना करितां येईल. लढाऊ पथकें आपापल्या नायकांच्या हाताखालीं लपत छपत निघत. शत्रूची अमूक एक मुख्य छावणी आपल्याला काबीज करावयाची आहे, असें त्या त्या विभागांतील अधिकारी ठरवीत व त्या दिशेनें मधल्या भागांतील शत्रू-ठाण्यांचा फडशा पाडण्याचें काम हातीं घेत. मुख्य छावणी बऱ्याच अंतरावर असे. तेथें विमानें जाऊन हल्ला करीत. यामुळें शत्रूच्या मुख्य तळावर बरीच नासधूस होऊन आघाडीवरील तुकड्यांची रसद व कुमक तुटावी हा मुख्य उद्देश असतो. डोंगरमाथ्यावरील किंवा दऱ्याखोऱ्यांतील वाटा अडवून धरणाऱ्या नाक्याच्या ठिकाणींही शत्रूनें सीमेंट काँक्रीटची पक्की तटबंदी अथवा बचावस्थानें ( पिल बॉक्सेस ) करून त्यांत बसून जर गोळीबार चालविला तर तेथूनही त्याला विमानांच्या साहाय्यानें बाँबस् टाकून हुसकावें लागतें. अशा पक्क्या तटबंदींतून हुसकून लावण्यास आपल्या पायदळ तुकडीचा सहसा उपयोग होत नाहीं. कारण त्यांच्या तटबंदीवर आपल्या गोळ्या निष्प्रभ ठरतात. त्यांची कांहींच प्राणहानी होत नाहीं. परंतु आपण मात्र तेथें चाल करून जाईपर्यंत बचावस्थानांत बसून त्यांनीं केलेल्या गोळीबारानें आपलेंच नुकसान होतें. अशीं पक्कीं बचावस्थानें उध्वस्त करण्यास स्फोटगोल किंवा तोफेचे गोळेच उपयुक्त ठरतात. तोफेचे गोळे व स्फोटगोल हे निरनिराळ्या वजनाचे व आकाराचे असतात. त्यांच्या लांबींत फारसा फरक होत नाहीं.

सेकंड लेफ्टनंट केशवन् हा सिंगापुरांतील एका तामीळ व्यापाऱ्याचा तरुण मुलगा होता. नेताजींच्या उदाहरणामुळें त्याला स्फुरण चढून आपणही आपल्या मायदेशाकरतां कांहीं स्वार्थत्याग केला पाहिजे अशी तळमळ त्याच्या मनांत उत्पन्न झाली. त्यानें लष्करी अधिकाऱ्यांच्या शाळेंत प्रवेश मिळण्याकरतां अर्ज केलेला होता. त्याची निवड होऊन त्यानें तो शिक्षणक्रम उत्तम प्रकारें पूर्ण केला. हिंदी स्वातंत्र्यसैन्यांत सेकंड लेफ्टनंटच्या हुद्यावर त्याची नेमणूक झाली. आघाडीवर १९४३ च्या ऑक्टोबर–नोव्हेंबरच्या सुमारास ज्या लढाऊ तुकड्या पाठविण्यांत आल्या त्यांत तो होता. आराकान आघाडीवर म्हणजे हिंदुस्थान–ब्रह्मदेश सरहद्दीच्या दक्षिण टोंकाला त्याची तुकडी होती. प्रथम बुथेडाँग, माँगडॉ हीं सरहद्दीवरचीं खेडीं घेऊन नंतर कॉक्स्बझारकडे मोर्चा वळविण्याचा या तुकडीचा उद्देश होता. या वाटेवर शत्रूचीं डोंगरमाथ्यावर एकंदर तेरा नाकीं होतीं. या नाक्यांवरून शत्रूस हुसकून

लाविल्याशिवाय त्या वाटेनें आपलें सैन्य पुढें सरकणें शक्य नव्हतें. शत्रूच्या त्या उत्तुंग ठाण्यावरून त्या रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्यांवर दारूगोळ्याचा वर्षाव होऊं शकत होता. इंग्रजांच्या पद्धतीप्रमाणें प्रत्येक ठाण्यावर सैनिकांची आणि युद्धसामुग्रीची रेलचेल होती. याच्या उलट स्वातंत्र्यसैनिक संख्येनेंही कमी व त्यांच्याजवळ एकंदर सामुग्रीही तुटपुंजी. सेकंड लेफ्टनंट केशवन्कडे नंबर ११८५ च्या डोंगरमाथ्यावरील शत्रूच्या ठाण्यावर हल्ला करून तेथून शत्रूचें उच्चाटन करण्याचें काम होतें. परंतु पहांटे ४ वाजतां त्यानें आपल्या २५ सैनिकांच्या टोळीस जमविलें. त्यांच्या हाताखालच्या सैनिकांत एक हवालदार, दोन नाईक व इतर शिपाई होते. सर्वांना त्यानें आपला उद्देश नीट समजावून दिला. शत्रूच्या ठाण्यावर सर्व मिळून सत्तर–पंचाहत्तर तरी सैनिक असावेत असा अंदाज होता. त्या डोंगरमाथ्यावर सर्व चढून हातघाईच्या लढाईनंतर शत्रूस हुसकून लावीपर्यंत शत्रूनें वरून गोळीबार करून केशवन्च्या सैनिकांचा फन्ना पाडला असता. त्या प्रदेशाचें बारकाईनें निरीक्षण करून त्यानें शत्रूच्या ठाण्यापासून सुमारें एक हजार गज अंतरावरील दुसरा एक उंचवटा निवडला. हवालदार चरणसिंग याच्याकडे एक मशिनगन सोंपवून व त्याच्या हाताखालीं एक नाईक आणि तीन शिपाई देऊन त्यानें त्या हवालदारास निवडलेल्या टेकडीवर जाऊन तेथून शत्रूवर गोळीबार करण्यास सांगितलें. वरिष्ठ अधिकाऱ्याची आज्ञा मिळतांच हवालदार चरणसिंग आपल्या साथीदारांसह निघाला. शत्रूच्या लक्षांत न येईल अशा तऱ्हेनें दबकत दबकत ते त्या उंचवट्यावर जाऊन पोंचले. तेथें जाऊन शत्रूच्या ठाण्यावर उत्तम प्रकारें मारा कोठून करितां येईल याची त्यांनीं बारकाईनें पाहणी केली. नंतर त्यानें स्वतःच्या मशिनगनची एक विशिष्ट जागा निश्चित करून व इतर सैनिकांस आपल्या आजूबाजूला निरनिराळीं स्थानें ठरवून दिलीं. सर्वांनीं मिळून दोन-तीन खंदक खणून शत्रूच्या गोळीबारापासून संरक्षण करण्याकरतां बचावाचीं स्थानें बनविलीं. प्रत्येक जण आपापल्या जागीं जय्यत तयार होऊन बसला. इकडे सेकंड लेफ्टनंट केशवन् हा उरलेल्या एकोणीस सैनिकांसह लपत छपत मधून मधून जमिनीवरून सरपटत, शत्रूच्या ठाण्याच्या रोखानें निघाला. शत्रूला न कळत शत्रूच्या मागें जावयाचें असल्यामुळें त्यांना लांब वळसा घ्यावा लागला. खोल दरींत उतरावयाचें व पुन्हां सरळ पहाडावर चढावयाचें, मध्येंच थोडें थांबून बारकाईनें सभोंवार पाहणी करावयाची असा त्याचा क्रम चालला होता. शत्रूच्या ठाण्याच्या खालच्या बाजूस त्या डोंगरमाथ्याच्या उतारावर आपापल्या बंदुकी सरसावून जमिनीलगत स्तब्ध पडून राहाण्यास सांगितलें. एका उंच वृक्षावर झरझर चढून त्यानें हवालदाराच्या तुकडीच्या रोखानें नजर टाकिली. तेथून त्यानें ठरलेला संकेत केला. हवालदाराच्या हाताखालचे लोक वाटच पहात होते. त्यांनीं तावडतोब गोळीबार सुरू केला. अनपेक्षित दिशेनें एकदम गोळीबार सुरू झालेला पाहून शत्रूच्या ठाण्या

वर एकच गोंधळ उडाला. सर्व शत्रुसैनिक भयभीत झाले पण धीर बांधून त्यांनीं-ही उलट गोळीबार सुरू केला. सुमारें अर्धा तास गोळागोळी झाल्यावर हवालदाराच्या लहानशा तुकडीनें गोळीबार थांबविला. सेकंड लेफ्टनंट केशवन्नें सर्वांना, गुपचुपपणें, शत्रूस मुळींच चाहूल लागू न देतां पुढें सरकण्याची खुणेनें आज्ञा केली. ते दबकत दबकत पुढें सरकूं लागले. प्रत्येकाच्या बंदुकीस पुढील टोंकास संगिनी जोडलेल्या होत्या. ज्या दिशेनें गोळीबार सुरू झालेला होता, त्याच दिशेनें शत्रुसैनिक बघत बसले होते. गोळीबार थांबून दहा मिनिटें झालीं होतीं. पुन्हां केव्हां गोळीबार सुरू होईल याचा नेम नव्हता. म्हणून ते आपापल्या स्थळींच बसून राहिले होते. इकडे सेकंड लेफ्टनंट केशवन्चे एकोणीस सैनिक विखरून शत्रूच्या मागील बाजूस पन्नास गज़ वर येऊन ठेपले होते.

झपाझप पावलें टाकीत केशवन्च्या बारा सैनिकांनीं पुढें होऊन आपल्या हातांत असलेल्या स्फोटगोलांच्या खिळ्या काढून ते चेंडूप्रमाणें सपासप शत्रुसैनिकांच्या अंगावर फेंकले. त्याच्या मागोमाग ताबडतोब "चलो देहली" अशा कर्णकर्कश किंकाळ्या फोडून एकच गिल्ला करीत सेकंड लेफ्टनंट केशवन् आपली तरवार उपसून व त्याचे इतर एकोणीस सैनिक आपल्या संगिनी लाविलेल्या बंदुकी सरसावीत शत्रूवर चोहोबाजूनें तुटून पडले. या गर्जनेस व त्या स्फोटगोलांचा स्फोट होण्यास एकच गांठ पडली. 'कड्ड्ड्ड्ड् धडाम्, फाड् फाड्' असे ते गोळे एकामागून एक निमिषमात्राच्या अंतराअंतरानें फुटूं लागले, तसतसे जमिनीला त्या त्या ठिकाणीं खळगे पडून त्यांतून माती उधळली गेली. शत्रूच्या मशीनगन्सची मोडतोड होऊन त्या लांब जाऊन पडल्या. शत्रुसैनिक भेदरून गेले. त्यांना कांहींच उमज पडेना. समोरून गोळीबार अचानक सुरू होऊन अर्ध्या तासानें थांबतो काय व अनपेक्षितपणें मागील बाजूनें स्फोटगोलांचा स्फोट होऊन स्वातंत्र्यसैनिक तुटून पडतात काय! सर्वच अकल्पित. थोडी हातघाईची लढाई झाली. परंतु शत्रुसैनिकांपैकीं बरेचसे जखमी होऊन इतरांनीं गोंधळून व गर्भगळित होऊन हात उंच केले. लगेच त्यांना निःशस्त्र करण्यांत येऊन पहाऱ्याखालीं वेगळें बसवण्यांत आलें. या हल्ल्यांत एक स्वातंत्र्यसैनिक कामीं आला आणि चार जखमी झाले. शत्रूचे पंधरा सैनिक ठार, तेहतीस जखमी झाले आणि बारा शरण आले. सेकंड लेफ्टनंट केशवन्ला सामान्य स्वरूपाच्या कांहीं जखमा झालेल्या होत्या. त्या ठाण्यावर त्यानें आपले चौक्या-पहारे बसविले. हवालदाराला संकेत करून बोलाविल्यावर तो आपल्या साथीदारांसह आला. सर्व युद्धबंद्यांस पहाऱ्याखालीं मुख्य छावणीच्या अधिकाऱ्याकडे पाठवून त्यांच्याबरोबर जखमी लोकांसुद्धां धाडण्यांत आलें. एका खास दूताकरवीं या झटापटीची आणि विजयाची सर्व हकिगत वरिष्ठांस कळविण्यांत आली.

अशा तऱ्हेनें फेब्रुवारी महिन्याच्या १० तारखेपर्यंत विजयावर विजय मिळत जाऊन शत्रूचीं डोंगरमाथ्यावरील अनेक ठाणीं हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या

ताब्यांत आलीं. नेताजींनीं या विजयाबद्दल तेथील सर्व तुकड्यांचें अभिनंदन केलें. पंधराशें मैलांच्या या विस्तृत आघाडीवर हल्ले सुरू करून जेथें वाव मिळेल त्या ठिकाणाहून हिंदुस्थानांत घुसण्याचा हिंदी स्वातंत्र्यसैनिकांचा व जपान्यांचा बेत होता. विशेषतः मणिपूर भागानें शिरून कलकत्त्याच्या मार्गानें कूच केलें म्हणजे खालच्या आसाम प्रांतांतून इंग्रज आपलें सैन्य काढून घेतील व तो प्रांत लढाई न करितां आणि प्राणहानी न होतां आपोआप आपल्या हातीं पडेल, हें इंग्रजांच्या आजपर्यंतच्या युद्धतंत्रावरून स्पष्ट दिसत होतें. आपल्या पाठीमागच्या बाजूस शत्रू येत आहे असें पाहिल्याबरोबर त्याच्याशीं तोंड फिरवून दोन हात करावयाचे सोडून, केवढाही विस्तृत प्रदेश, अफाट सैन्य व भरमसाट युद्धसामुग्री असली तरी तेथून पीछेहाट करावयाचें इंग्रजांचें नेहमींचें धोरण आहे. अर्थात् स्वातंत्र्यसैन्य आराकानच्या बाजूनें वर न येतां केवळ मणिपूरपासून कलकत्त्याच्या रोखानें निघालें असतें, तर इंग्रजांनीं कॉक्स बझार, चितगांव वगैरे आपलीं सर्व खालचीं ठाणीं सोडून शत्रूच्या वेऱ्यांत सांपडावयाच्या भीतीनें तेथून पळ काढला असता.

हाका, फालम, कालेवा अशा निरनिराळ्या विभागांतसुद्धां वर वर्णिल्या-प्रमाणें हिंदी व जपानी फौजेचे हल्ले सुरू झाले. स्वातंत्र्यसैनिकांच्या वीरश्रीची अनेक उदाहरणें रोज ऐकूं येऊं लागलीं. जपानी सैनिकसुद्धां हिंदी सैनिकांची वीरश्री पाहून थक्क झाले. त्यांनीं नेताजींस तसें कळविलेंही. नेताजींस आपल्या सैनिकांबद्दल धन्यता वाटली. प्रत्यक्ष लढाईस तोंड लागेपर्यंत जपान्यांचा असा समज होता कीं, सव्वाशें वर्षें जे हिंदी लोक स्वतःचें स्वातंत्र्य परत मिळवूं शकत नाहींत, त्यांच्यांत वीरश्री ती काय असणार ? परंतु हा त्यांचा ग्रह चुकीचा ठरला. हिंदी लोकांस शस्त्र मिळूं शकलें तर ते पराक्रमांत कोणाहीपेक्षां कमी नाहींत, असें त्यांस दिसून आलें. १९४४ च्या मार्च महिन्याच्या ११ तारखे-पर्यंत स्वातंत्र्यसेना आणि जपानी फौजा पुढें सरकत टिड्डीमपर्यंत येऊन पोंचल्या. टिड्डिम हें गांव सर्व बाजूनें वेढून, शत्रूचे रसद येण्याचे सर्व रस्ते रोखून धरण्यांत आले. वेढलेल्या शत्रूस टिकाव धरणें अशक्य झालें. दिवसभर त्यांच्या ठाण्यावर होणारा तोफांचा भडिमार व हवाई हल्ले यांमुळें शत्रु लवकर टेकीस येईल अशी चिन्हें दिसूं लागलीं. त्याचा दारूगोळा आणि धान्यसामुग्री संपुष्टांत येऊं लागली.

इकडे, जपानी अधिकाऱ्यांमध्यें व हिंदी स्वातंत्र्य-सैनिकांमध्यें तेढ उत्पन्न होऊन ती दिवसेंदिवस वाढीस लागली. ज्या ज्या जपानी तुकड्यांस हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या लहान लहान तुकड्या जोडण्यांत आल्या होत्या, त्या त्या जपानी तुकड्यांचे अधिकारी हिंदी सैनिकांस लढण्याची संधी न देतां त्यांस केवळ भारवाहक म्हणूनच त्यांचा उपयोग करूं लागले. " आम्ही कांहीं येथें तुमची हमाली करावयास आलों नाहीं. सामान वाहून नेण्याचें काम सर्व सैनिकांचें असतें. तुमच्या जपानी सैनिकांनींही तें केलें पाहिजे. हिंदभूमीकरतां लढण्याचा

आमच्या सैनिकांचा पहिला हक्क आहे. " – असें जेव्हां जंगलांत एके ठिकाणीं एका हिंदी अधिकाऱ्यानें एका जपानी अधिकाऱ्यास ठांसून सांगितलें, तेव्हां त्या जपानी अधिकाऱ्यानें आपली तलवार काढून ती उगारली. यानेंही आपल्या कमरेचें पिस्तूल काढून तें त्या जपान्यावर रोखून धरलें ! इतक्यांत एका वरिष्ठ जपानी अधिकाऱ्याला दुरून हा प्रकार दिसतांच तो धांवत धांवत त्या ठिकाणीं आला आणि त्या दोघांचीही समजूत घातली. असे अनेक निरनिराळे प्रकार नेहमीं घडत. आगगाडींत अथवा मोटारलॉऱ्यांत जागा असल्यास प्रथम ती जपानी सैनिकांस दिली जाई ! हिंदी सैनिकांस कित्येक दिवस वाहनांची वाट पाहात एके ठिकाणीं तळ देऊन राहावें लागत असे. खाण्यापिण्याच्या, कपड्यालत्त्याच्या इत्यादि सर्व बाबतींत हा पक्षपातीपणा सुरू झाला व दर वेळेस एकमेकांत वितुष्ट येऊं लागलें. तिकडे नेताजींशीं गोड गोड बोलत राहून प्रत्यक्ष युद्धआघाडीवर लहानसहान बाबतींत हिंदी अधिकाऱ्यांचा अपमान व हिंदी सैनिकांशीं भाऊबंदकी सुरू करावयास जपानी अधिकाऱ्यांनीं कमी केलें नाहीं.

अशा स्थितींत जपानी आणि हिंदी फौजा पुढें सरकत होत्या. टिड्डिमला वेढा टाकल्यापासून पांच दिवसांतच टिड्डिम पडलें. १८ मार्चला टिड्डिम गांवांत अडकून पडलेले हिंदी आणि इंग्रजी सैनिक शरण आले. इतर तुकड्या आधींच पीछेहाट करून पश्चिमेकडे कूच करीत हिंदुस्थानाच्या सरहद्दीच्या आंत निघून गेल्या. त्यांच्या पाठोपाठ त्याच दिवशीं हिंदी स्वातंत्र्यसैन्यानें हिंदुस्थानाच्या भूमीवर प्रथमच तिरंगी ध्वज रोविला. स्वातंत्र्ययुद्ध ४ फेब्रुवारी रोजीं सुरू झालें. तेव्हांपासून अवघ्या दीड महिन्यांत हिंदी स्वातंत्र्यसैन्यानें हिंदुस्थानांत आपला प्रवेश करून घेतला, ही अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. यांत अर्थातच जपान्यांचा वांटाही पुष्कळच होता. जपान्यांच्या मर्दुमकीची अशी एक परंपरा गेल्या दोन वर्षांत प्रस्थापित झालेली होती कीं, जपान्यांचें नांव काढलें कीं इंग्रज काय किंवा अमेरिकन काय, सर्व गोरे अधिकारी चळचळ कांपत असत ! जपान्यांचीं विमानें डोक्यावर आलीं असें म्हणतांच यांची पांचावर धारण बसत असे.

हिंदी स्वातंत्र्यसैन्य तारीख १८ मार्च रोजीं हिंदी सरहद्दींतील पहिल्या गांवीं पोंचून सैनिकांनीं तेथें स्वातंत्र्यध्वज रोविला. त्या वेळीं नेताजी सुभाषचंद्र बोस यांची तसबीर अग्रभागीं ठेवून एक मोठी मिरवणूक काढण्यांत आली. सर्व नागरिकांच्या डोळ्यांत आनंदाश्रु चमकत होते. हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या कर्तृत्वाबद्दल सर्वांच्या चेहऱ्यावर कृतज्ञतेची भावना स्पष्ट रेखाटलेली दिसत होती. जयघोषानें सर्व वातावरण दुमदुमून गेलें होतें. जयघोष करून घशाला कोरड पडली तरी अंतःकरणांतील आनंदाला पुरेसा वाव मिळेना. इतका सर्व हिंदी लोकांस त्या दिवशीं आनंद झालेला होता.

स्वातंत्र्यसेनेनें हिंदुस्थानांत पदार्पण केलें असें कळल्याबरोबर जपानी सरकारातर्फे 'जनरल कावाबे' यांचें एक व स्वातंत्र्य-सरकारातर्फे नेताजी सुभाषचंद्र बोस यांचें एक, अशीं दोन पत्रकें एकाच दिवशीं प्रसिद्ध झालीं. त्यांतील मजकूर असा होता कीं, "हिंदुस्थानाचा कोणताही भूमिभाग प्रत्यक्ष हल्ला करून म्हणा अगर इतर कोणत्याही रीतीनें जपानी फौजेच्या ताब्यांत आला कीं तो स्वतंत्र हिंदुस्थानाचा भूमिभाग म्हणून हिंदी स्वातंत्र्यसैन्याकडे तावडतोब सोपविण्यांत येईल. त्याचा राज्यकारभार हिंदी स्वातंत्र्य-सरकार चालवील."

सिंगापुरांतील एका जाहीर व्याख्यानांत नेताजींनीं असें सांगितलें होतें कीं, १९४४ साल उजाडण्याच्या अगोदर हिंदी स्वातंत्र्यसेना हिंदुस्थानाच्या भूमीवर पदार्पण करून तेथें स्वातंत्र्यध्वज रोवील. विधिलिखितांत १८ मार्च १९४४ अगोदर हें शक्य नव्हतें, परंतु दुसऱ्या एका चमत्कारिक रीतीनें नेताजींचे बोल खरे ठरले. ६ नोव्हेंबर १९४३ रोजीं जनरल टोजो यांनीं अंदमान निकोबार टापू हिंदी स्वातंत्र्य-सरकाराकडे सोपवावयाचें वचन दिलें होतें. स्वातंत्र्य-सरकाराच्या त्या स्वतंत्र भूमीवर नेताजी ३० व ३१ डिसेंबर रोजीं म्हणजे १९४४ साल उजाडण्याच्या अगोदर दोन दिवस स्वतः हजर होते. पोर्ट ब्लेअर येथील कमिशनरच्या बंगल्यावर तिरंगी ध्वज फडकत होता व या ना त्या रीतीनें परंतु नेताजींचे शब्द खरे ठरले !

हिंदी स्वातंत्र्य-सरकारातर्फे जिंकलेल्या मुलुखाचा राज्यकारभार बघण्याकरतां लेफ्टनंट कर्नल चॅटर्जी यांची नेमणूक झाली. या कार्यांत त्यांस मदत करण्यासाठीं ' रीकन्सट्रक्शन् ' ( पुनर्घटना खातें ) खात्याचे लोक होते. हें खातें सिंगापुरांतच उघडलें जाऊन यांत नगररक्षक, एंजिनियर्स, न्यायाधीश, इत्यादि सर्व प्रकारचे मुलकी अधिकारी तयार करण्यांत आले होते. जरूरीप्रमाणें हे लोकही आघाडीवर पाठविण्यांत आलेले होते. स्वातंत्र्यसैन्यानें एक विभाग जिंकावयाचा, तो या पुनर्घटना खात्याकडे सोपवावयाचा व पुढचा प्रदेश हस्तगत करावयाचा अशी व्यवस्था होती.

पुनर्घटना खात्यातर्फे स्वतंत्र हिंदुस्थानांत प्रचारांत आणण्याकरतां म्हणून पोस्टाचीं तिकिटें, तारेचे फॉर्मस्, उध्वस्त झालेल्या आगगाड्या पुनः सुस्थितींत आणण्याकरतां जरूर तें सर्व सामान, अशी सर्व जय्यत तयारी करण्यांत आली होती. स्वातंत्र्य-सरकाराचें स्वतःच्या छापाचें नाणें असावें म्हणून नेताजींनीं दिल्लीच्या लाल किल्ल्याचें चित्र असलेले असे कांहीं नमुने तयार करून त्याच्या नोटा छापण्यास जपानी टांकसाळीस सांगितलें होतें. त्या नोटांनीं भरलेलें जहाज याच सुमारास रंगून बंदरांत शिरतां शिरतां पाणसुरुंग लागून बुडालें, असें जपानी अधिकाऱ्यांनीं स्वातंत्र्य-सरकारास कळविलें. जपान्यांनीं या कामांत दिरंगाई मात्र बरीच केली. या नोटा छापण्यास सांगितल्यापासून कित्येक महिने लोटले तरी त्यांच्याकडून या नोटा छापूनच होईनात. स्वातंत्र्य-सरकाराच्या नांवें नोटा

छापूनच न देण्याचा त्यांचा मूळ हेतु असला तर या कामांत अळंटळं करून दिरंगाई करणें व शेवटीं बोट बुडाल्याची ओरड करणें या सर्व गोष्टी त्या हेतूशीं बरोबर जुळतात. या प्रकरणांतील खरें इंगित काय हें त्यांचें त्यांनाच माहीत. परंतु अशा कित्येक बारीकसारीक गोष्टींनीं जपान्यांच्या शुद्ध हेतूबद्दल मनांत वारंवार शंका डोकावण्यास त्यांनीं बराच वाव ठेवला होता.

कालेवापासून टम्मू हें हिंदुस्थानाच्या सरहद्दीवरचें गांव उत्तरेच्या बाजूस १०५ मैलांवर आहे. येथूनच पुढें घाटांतील उत्तम बांधून काढलेला डांबरी रस्ता पलेल गांवामार्गे इंफाल अथवा मणिपूर या शहरीं जातो. मणिपूर हें शहर संस्थानाची राजधानी आहे. या शहरास इंफाल असेंही दुसरें नांव आहे. चिंदविन नदीच्या तीरावर असलेल्या कालेवा या गांवीं हिंदी स्वातंत्र्यसैन्याचा व जपानी फौजेचा मोठा तळ होता हें वर आलेलेंच आहे. येथून मुलूखगिरीवर निघालेल्या अनेक तुकड्यांनीं शत्रूचीं डोंगरमाथ्यावरील अनेक ठिकाणें काबीज करीत करीत एप्रिलअखेर टम्मूमधूनही शत्रूस हुसकावून लावलें. पूर्वींच्या मैदानी लढाईंत ज्याप्रमाणें शत्रु शरण येईपर्यंत दर पावलागणिक त्यास मागें रेटावें लागत असे, तसें आजकालच्या युद्धांत नसतें. एका ठिकाणाहून शत्रूस हुसकून लावलें म्हणजे त्यास नैसर्गिक बचावाचा दुसरा योग्य तळ मिळेपर्यंत कित्येक मैल मागें जावें लागतें. पाठलाग करणाऱ्या सैन्यासही पळणाऱ्या शत्रूच्या मागोमाग जाऊन चालत नाहीं. यामुळें उभय पक्षांच्या आघाडीवरील छावण्यांच्या मधोमध धड कोणाच्याच ताब्यांत नसलेला कित्येक मैलांचा टापू असतो. टम्मू गांव काबीज केल्यावर स्वातंत्र्य-सैन्याचा तळ टम्मूमध्यें व इंग्रजी साम्राज्य-फौजांचा तळ इंफाल-मध्यें अशी परिस्थिति होती. दरम्यान ११६ मैलांचा घाटांतील रस्ता धड कोणाच्याच ताब्यांत नव्हता असें म्हटलें तरी चालेल. इंफालपासून अलीकडे पंधरा मैलांवर असलेलें पलेल हें गांव साम्राज्य-फौजांच्या ताब्यांत होतें. टम्मूपासून पलेलपर्यंतच्या रस्त्याच्या कडेला एका बाजूला खोल दरी व दुसऱ्या बाजूला उंच पर्वत आहेत. जिकडे पाहावें तिकडे दऱ्याखोऱ्यांचीं व पर्वतश्रेणींचीं वलयेंच्या वलयें दिसतात. पलेल गांवाजवळ आलें कीं उंच कड्यांवरून उतरून खालीं एका विस्तीर्ण सपाट प्रदेशावर अवतीर्ण झाल्याचें मनाला एक प्रकारचें समाधान वाटतें. टम्मूपासून पलेलच्या या रस्त्यावर असलेल्या डोंगरमाथ्यांवर आजमितीस तेथें झालेल्या लढाईचे अनेक अवशेष दृष्टीस पडतात. सैनिकांच्या राहावयाच्या झोपड्या, खंदक, मातीनें किंवा वाळूनें भरलेलीं पोतीं व त्यांचे बनविलेले बुरूज, चक्काचूर झालेल्या विमानांचे विखुरलेले अवशेष, पेट्रोलचीं पिपें, हवाई हल्ल्याची स्मृति जागृत करणाऱ्या स्फोटगोलानें उध्वस्त करून जाळलेल्या छावण्या, अस्ता-व्यस्त पडलेले पत्र्याचे तुकडे किंवा इतर मोडतोड झालेलें सामान इत्यादि गोष्टी इतस्ततः दिसतात. जोराचा भूकंप किंवा तत्सम सार्वजनिक संकट येऊन गेलें म्हणजे पूर्वींच्या वस्तीचीं निदर्शक परंतु निर्मनुष्य झालेलीं खेडींपाडीं दिसतात,

तसेंच तें सर्व दृश्य दिसतें. तीं अबोल स्मारकें पाहून साहजिकच जो तो आपआपल्या कल्पनाशक्तीप्रमाणें त्या लढाईचें चित्र स्वतःच्या मनश्चक्षूंसमोर चित्रित करण्याचा प्रयत्न करतो. 'येथें किती जणांचे प्राण गेले असतील? मरतांना त्यांस कशा असह्य वेदना झाल्या असतील! हल्ला करणाऱ्यांची व स्वतःचा बचाव करणाऱ्यांची त्या वेळेस काय मनःस्थिति असेल? हें सर्व सामान जसेंच्या तसें सोडून सर्वांत शेवटीं कोण व्यक्ति गेली असेल? त्या व्यक्तीच्या मनास त्या वेळेस काय वाटलें असेल? त्यानंतर किती दिवस हें असें निर्मनुष्य झालें असेल? भवितव्यतेची तरी गम्मत काय आहे पहा! एका वेळेस येथें केवढा उत्साह, रहदारी व वस्ती होती. आज येथें कसें भयाण उदास वाटतें! किती भीषण प्रसंग अनेक लोकांच्यावर या ठिकाणीं ओढवले असतील! एकमेकांवर दांतओंठ खाऊन तुटून पडणारीं तीं ईश्वराचीं लेकरें पहा व त्या जागीं शांतपणें नांदणारी ही वृक्षलतांची सृष्टि पहा!' असे अनेक विचार युद्धानंतर या प्रदेशांतून जाणाऱ्या येणाऱ्यांच्या मनांत येतात.

याच रस्त्यालगतच्या ११५ मैलांच्या डोंगरमाथ्यावर कित्येक हवाई हल्ले आणि उभयपक्षांच्या फौजी तुकड्यांच्या झटापटी झाल्या. सुमारें एक महिन्यानें म्हणजे मे महिन्याअखेर पलेलवर तिरंगी झेंडा फडकूं लागला. हिंदुस्थानाच्या हद्दींतील या रस्त्यावरचें हेंच पहिलें गांव होतें. साम्राज्य-फौजा येथून पंधरा मैल दूर इंफाल शहराच्या हद्दींत निघून गेल्या होत्या. मणिपूरचे महाराज व इंग्रज रेसिडेंट हे दोघेही दिल्लीला जाऊन बसले. ब्रह्मदेशाचा पदच्युत गव्हर्नरसुद्धां दिल्लींतच जाऊन बसलेला होता. मणिपूरही हातचें जातें असें दिल्लीस पळून आलेल्या रेसिडेंटला व महाराजांस वाटूं लागलें. इंफालवर सारखे हवाई हल्ले होऊं लागले. हवाई हल्ले करणारीं विमानें जपानीच होतीं. त्यांचे वैमानिकही जपानीच होते. परंतु टेहेळणीसाठीं किंवा स्फोटगोल टाकण्यास आलेल्या त्या विभागांत त्या त्या प्रांताचे माहितगार हिंदी लोक बसलेले असावयाचे व त्यांच्याच मार्गदर्शनानें हे हल्ले होत असत. त्यामुळें साहजिकच हिंदी नागरिकांचा बचाव होऊन नेमक्या शत्रुसैन्याच्या फौजेच्या (म्हणजे इंग्रज, अमेरिकन, चिनी, कॅनॉडियन, ऑस्ट्रेलियन, हबशी इत्यादींच्या) तळांवरच नेमके स्फोटगोल पडावयाचे.

पलेलपासून स्वातंत्र्यसेना पुढें सरकली. इंफालपासून केवळ सात मैलांवर तिरंगी ध्वज डोलूं लागला. इंफालमधील, आघाडीवर असलेल्या कांहीं हिंदी व इंग्रज सैनिकांनीं तो बघितलासुद्धां. हिंदी सैनिकांस धन्य वाटलें. इंग्रजांच्या कचाट्यांतून सुटून आपण केव्हां एकदां नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या शूर सैनिकांस भेटूं! त्यांच्या खांद्याला खांदा लावून आपल्याला केव्हां आपल्या शत्रूविरुद्ध लढावयाला मिळेल! असें त्यांस होऊन गेलें. कित्येकजण लपत छपत संधी साधून तेथून निसटत व स्वातंत्र्यसैन्यास येऊन मिळत. उभयपक्षांचा तोफखाना दिवस-रात्र कडाडत होता.

इंफाल हा साम्राज्य-फौजांचा फारच मोठा तळ होता. येथें बेसुमार युद्धसाहित्य व सैनिक होते. इंफालला सगळीकडून वेढून तेथील सर्व सैन्याला शरण येण्यास लावावयाचा स्वातंत्र्यसेनेचा व जपानी फौजी तज्ज्ञांचा बेत होता. या बेतास अनुसरून पलेल-इंफालमार्गावर आठ मैल पुढें सरकून इंफालपासून सात मैलांच्या अंतरावर आपल्या चौक्यापहारे बसवून या दोन्ही फौजा उत्तरेकडे वळल्या. इंफालपासून उत्तरेकडे सुमारें ७७ मैलांवर कोहिमा गांव आहे. कोहिमापासून पश्चिमेस पस्तीस मैलांवर आसाम-बंगाल रेल्वेचें दीमापूर ( मणिपूर रोड ) नांवाचें रेल्वेस्टेशन आहे. कोहिमामार्गें इंफालपासून दीमापूरकडे जाणारा हा रस्ता डांबरी नसला तरी चांगला पक्का आहे. दीमापूरकडे जाण्याचा हा रस्ता मोकळा असता तर साम्राज्य-फौजांनीं दीमापूरकडे केव्हांच पळ काढला असता. परंतु साम्राज्य फौजांना मागें पळण्यास मोकळीक देऊन पुन्हा त्यांच्याशींच लढण्याचा प्रसंग ओढवून आणण्यापेक्षां, एकदां त्यांना वेढून शरण आणून कैद केलें कीं, मग त्यांतील हिंदी लोक आपल्या बाजूनें लढण्यास उपयोगी पडतील किंवा निदान इंग्रजांच्या बाजूला तेवढें सैन्यबळ कमी पडेल, असा स्वातंत्र्यसेनेच्या व जपानी अधिकाऱ्यांनीं विचार केला. दुसरा एक फायदा म्हणजे इंफालमधील धान्य, युद्धसामुग्री इत्यादि अफाट साहित्यही हातीं आलें असतें. वर दिलेल्या या अनेक कारणांमुळें साम्राज्य-फौजांना पळून जाण्यास एकसुद्धां वाट राहूं न देतां त्यांना सर्व बाजूंनीं वेढून, त्यांची रसद कापून त्यांस शरण येण्यास भाग पाडावयाचें, हें तंत्र निश्चित झालें.

कोहिमाच्या रोखानें प्रचलन सुरू झालें. मधल्या ७७ मैलांच्या अनेक डोंगरमाथ्यांवर तोफांचा भडिमार व बंदुकीच्या फैरी झडूं लागल्या. मे महिन्याअखेरची गोष्ट. स्वातंत्र्यसैन्याची, शंभर सैनिकांची एक तुकडी लपत छपत जंगलांतून वाट काढीत निघाली. शुक्लपक्षांतीलच रात्र होती ती. शक्य झाल्यास कोहिमा गांवापर्यंत पोंचून तेथील सर्व परिस्थिति कशी काय आहे हें पाहण्याच्या उद्देशानें ही तुकडी निघाली होती. रात्रभर जंगलांतून वाट काढीत काढीत तिनें सुमारें पंधरा मैल अंतर कापलें; तरी वाटेंत शत्रूचें एकसुद्धां ठाणें लागलें नाहीं. सकाळीं ७ वाजण्याच्या सुमारास ते सर्वजण कोहिमाजवळ येऊन पोंचले. कोहिमा गांवांत नाग लोकांची वस्ती असून किरिस्ताव पाद्र्यांच्या सुळसुळाटामुळें हे बहुतेक सर्व बाटून ख्रिश्चन झाले आहेत. कोहिमा हें गांव एका पठारावर वसलेलें असून याच्या आसपासच्या दऱ्याखोऱ्यांमुळें एक नैसर्गिक खंदकच बनलेला आहे. आमच्या शूर सैनिकांनीं एवढा लांबचा पल्ला गांठून कोहिमा शहर गांठलें. कोहिमा शहरांत असलेल्या शत्रूच्या अफाट सैन्यबळाची या शंभर स्वातंत्र्यसैनिकांस मुळींच भिती वाटली नाहीं. उलट हिंदुस्थानांतील हें गांवही आतां आपल्याच छत्राखालीं येणार हा विचार त्यांच्या मनांत येऊन त्यांस एक प्रकारचा अननुभूत आनंद झाला.

त्यांच्या सर्वांगावर रोमांच उभे राहिले. 'आपल्या हातांतील शस्त्रांत केवढें बळ सांठविलेलें आहे! आतां आपण बंदुकींचा, या मशीनगन्सचा टट्...टट्... ट्...ट् ध्वनि सुरू करूं तोंच शत्रूची दाणादाण उडून शत्रू सैरावैरा पळूं लागेल' या कल्पनेनें त्यांचे बाहू स्फुरण पावूं लागले. एका लहानशा दरीच्या पलीकडे असलेल्या एका टेकडीवरून ते कोहिमाचें सकाळचें तें दृश्य बघत होते. सर्व लोक उठून आपापल्या उद्योगास लागले होते. शांतपणें सर्वांचे व्यवहार चाललेले होते. विरुद्ध पक्षाची एक तुकडी इतक्याजवळ येऊन ठेपली असेल हें कोणाच्या गांवींही नव्हतें! नाहींतर सर्वांची कोण त्रेधा उडाली असती.

एका मैदानावर कांहीं इंग्रज सैनिक सकाळचा सांघिक व्यायाम घेत होते. या शूर सैनिकांच्या तुकडीच्या मुख्य अधिकाऱ्याचें लक्ष तिकडे गेलें. तो आपल्या सैनिकांस म्हणाला, "मित्रहो, आपण येथवर आलोंच आहोंत तर थोडा पराक्रम करून जाऊं या... बातमी घेऊन नुसतेंच जाण्यापेक्षां थोडेसे शत्रु-सैनिक गारद करून जाणें बरें." एक-एक दोन-दोन असे त्या जंगलांत इतस्ततः विखुरले. सूर्य त्यांच्या मागच्या बाजूस नुकताच उगवून वरवर येत होता. सकाळच्या त्या प्रकाशांत जरा खबरदारीनेंच पुढें सरकणें योग्य होतें. कधीं सरपटत तर कधीं ओणव्यानें ते त्या इंग्रज तुकडीपासून सुमारें आठशें गज़ दूर असलेल्या एका टेकाडावर येऊन उभे राहिले. नायकाच्या हुकुमानें प्रत्येकजण भराभर एकेका झाडावर चढला. सर्व सैनिकांनीं गोळीबार न करितां फक्त तीस सैनिकांनींच गोळीबार करावा अशी मुख्य अधिकाऱ्याची आज्ञा झाली. गोळीबार न करणाऱ्याच्या जवळ हातांत धरून फिरवावयाचें एक एक हलकें असें खेळांतलें यंत्र होतें. जत्रेंत लहान मुलांस, एका कामटीवर काळ्या पत्र्याचा लांबोडा त्रिकोण असलेलें, कर्र...कर...करकर कट्कट् असें वाजणारें जसें एक खेळणें आपण घेऊन देतों, अगदीं अस्सल तेंच खेळणें म्हणाना! लढाईंतील खऱ्या गोळीबाराबरोबर अधून मधून बऱ्याच सैनिकांनीं हीं यंत्रें हातांत धरून फिरविलीं म्हणजे अनेक मशीनगन्स अथवा बंदुकींतून गोळीबार होत आहे असा शत्रु-सैनिकांचा समज होतो व एवढ्या भयंकर गोळीबारापुढें आणि इतक्या सैनिकांपुढें आपला टिकाव कसा लागणार, असें वाटून येथून पळच काढणें बरें, असें ते ठरवितात. या यंत्राचा उपयोग केला म्हणजे दारूगोळ्यांत बचत होते. विशेषतः सैन्यबळही कमी लागतें. मशीनगन्ससारखीं जड शस्त्रास्त्रें फारशीं बाळगावीं लागत नाहींत. थोड्याशा गोळीबारानें बरेंचसें काम होतें.

मलायांतील युद्धांत जपान्यांनीं प्रथम या युक्तीचा सर्रास उपयोग केला व त्यांच्यापासूनच स्वातंत्र्यसैन्यानें ती उचलली. इंग्रज सैनिकांवर एकदम गोळीबार सुरू झाला. कट्ट्...कट्...तो ध्वनि त्या पर्वतराजींत घुमूं लागला. कोहिमागांवांत एकच गोंधळ उडाला. शत्रू अनपेक्षितपणें इतक्याजवळ येऊन ठेपला असेल याची त्यांस कल्पनाच नव्हती. अर्थात् शत्रुसैनिक आहेत किती, कोठून

गोळीबार करीत आहेत, या सर्व गोष्टींचा प्रसंगावधान राखून विचार करण्याइतका कोणास धीरच झाला नाहीं. एकच धांवपळ सुरू झाली. दीमापूरच्या रस्त्यानें जो तो धूम ठोकूं लागला. बैलगाडी, मोटार, घोडा, लॉरी, बस, टॅक्सी ज्याच्या जें वाहन हाताशीं लागलें तें घेऊन त्यानें पळ काढावयास सुरुवात केली. ज्याला हातीं कांहींच लागलें नाहीं, तो धांवायला लागला. सैनिकांनींसुद्धां आपापल्या लॉऱ्यांतून धूम ठोकली. सर्व गांव जवळ जवळ रिकामा होईपर्यंत स्वातंत्र्य-सैनिकांनीं आपला खोटा आणि खरा गोळीबार चालू ठेवला. बँका, पोस्ट ऑफिसें, दुकानें जशींच्या तशीं उघडीं टाकून सर्व लोक पळाले होते. ही संधी साधून नायकानें गोळीबार थांबवून अर्धी तुकडी गांवांत पाठविली. तेथील महत्त्वाचीं कागदपत्रें, सोनें, चांदी, जडजवाहीर इत्यादि घेऊन व इंग्रजांचें बरेंचसें युद्ध-साहित्य निरुपयोगी करून ती तुकडी परत आली. यानंतर अनेक तुकड्या अशा प्रकारच्या मोहिमेवर रोज निघूं लागल्या. साम्राज्य-फौजांना दिवसेंदिवस त्यांची फारच धास्ती वाटूं लागली व थोडेच दिवसांत तेथें निकराची लढाई होऊन इंग्रजांना कोहिमा सोडावें लागलें. कोहिमावर तिरंगी ध्वज फडकूं लागला. कोहिमावर स्वातंत्र्यसैन्याचा व जपानी फौजेचा ताबा आल्यावर इम्फाल-मधील साम्राज्य-सेनेचा दीमापूरकडे जाण्याचा रस्ताही बंद झाला. दुसरा एक असाच वळसा घेऊन जून महिन्याच्या सुरुवातीस विष्णुपूरही हिंदी स्वातंत्र्य-सेनेनें काबीज केलें व अशा तऱ्हेनें इंफालमध्यें असणारी इंग्रजांची फौज पूर्ण-पणें वेढली गेली. कोठें सात मैलांवर, कोठें चार मैलांवर, कोठें तीन मैलांवर असे स्वातंत्र्यसैन्याचे चौक्यापाहारे चोहों बाजूला बसविले गेले होते. इंग्रजांच्या ध्वजाला सर्व बाजूनें तिरंगी ध्वजानें वेढून टाकलें होतें! १८५७ नंतर तित-क्याच तोलाचा आणि मोलाचा इंग्रजांविरुद्ध हिंदी लोकांचा हा पहिलाच विजय होता!

या स्वातंत्र्ययुद्धांत जपानी अधिकाऱ्यांनीं हिंदी स्वातंत्र्यसेनेशीं विश्वास-घातकीपणाचें वर्तन केलें. जपानच्या मंत्रिमंडळाकडून नेताजींना आश्वासन मिळावें एका प्रकारचें व मलाया, ब्रह्मदेश इत्यादि निरनिराळ्या देशांतील अनेक खात्याच्या जपानी अधिकाऱ्यांनीं प्रत्यक्ष आचरण करावें अगदीं उलट प्रकारचें, असें अनेक वेळां होत असे. एक तर मंत्रिमंडळाकडूनच त्यांस अडेलतट्टूप-णाचें किंवा चढेलपणाचें धोरण स्वीकारण्याचा आदेश असावा किंवा हिंदुस्थाना-संबंधींचें जपानचें धोरण काय असावें हें ठरविण्याचा अधिकार ज्यांच्याकडे होता ते एक-दोन वरिष्ठ अधिकारी तरी दर वेळेस खीळ घालण्याचा प्रयत्न करीत असावेत. याचीं अनेक उदाहरणें घडलेलीं आहेत.

हिंदी स्वातंत्र्य-सरकार व जपानी सरकार यांच्यांत उभयपक्षीं असा ठराव झालेला होता कीं, हिंदुस्थानाच्या भूमीवर हिंदी सरकारचेंच प्रामुख्य राहील व तो प्रदेश तिरंगी ध्वजाखालचाच समजण्यांत येईल. जपानी ध्वज फार तर

जपान्यांचा फौजी तळ असेल तेथें लावण्यांत यावा. परंतु या मोहिमेंत असे कांहीं प्रसंग आले कीं, एकादें नवीन गांव जिंकलें कीं तेथें हिंदी स्वातंत्र्यसैन्यानें तिरंगी निशाण लावावें, व तें जपानी अधिकाऱ्यांनीं काढून टाकून तेथें आपला ध्वज लावण्याचा प्रयत्न करावा. जपानी मंत्रिमंडळानें हिंदी स्वातंत्र्ययुद्धांतील आपली जबाबदारी ओळखून अगदीं चोख वर्तन ठेवण्याबद्दल सर्व जपानी फौजेस बजावलें असतें, तर वर वर्णिल्यासारखे प्रकार कधींच घडले नसते. परंतु त्यांनीं तसें केलेलें परिणामीं तरी दिसून येत नव्हतें. दुर्दैवानें आंतरराष्ट्रीय व्यवहारांत हा दुटप्पीपणा फार बोकाळलेला आहे. सांगावें एक आणि करावें भलतेंच, अशा प्रकारचें आजकाल जपानचेंच नाहीं तर जवळ जवळ प्रत्येक स्वतंत्र राष्ट्राचें धोरण दिसून येतें. हा मानवजातीचा अधःपातच म्हटला पाहिजे. माणसानें शब्द द्यावा व तो पाळूं नये असें जर सर्रास होऊं लागलें तर शब्दाला कांहीं किंमत राहणार नाहीं. जगावर ती एक मोठीच आपत्ति ओढवेल, असें म्हणावें लागेल.

इंग्रजांच्या बाजूनें लढणाऱ्या व शरण येणाऱ्या किंवा युद्धबंदी म्हणून धरल्या जाणाऱ्या हिंदी सैनिकांस स्वातंत्र्यसेनेच्या स्वाधीन करावें असें आपापसांत ठरलेलें होतें. परंतु जपान्यांनीं हा नियम जवळ जवळ पाळलाच नाहीं म्हटलें तरी चालेल. हिंदी सैनिकांस युद्धबंदी म्हणून घेतल्यावर त्यांस जपान्यांनीं सडकून चोपावें, त्यांचे हाल करावेत अशींही कांहीं उदाहरणें घडलीं. जपान्यांच्या छळास बळी पडलेले हे लोक जेव्हा संधी साधून पळून पुन्हा इंग्रजांच्या बाजूस जाऊन मिळाले, तेव्हां त्यांच्या या कटु अनुभवाच्या प्रचारानें अनेक सैनिक स्वातंत्र्यसेनेचे कट्टर शत्रू बनले; यांत स्वातंत्र्यसेनेचा कांहींच दोष नव्हता. स्वातंत्र्यसेना संख्येनें व बलानें जपानी फौजेच्या मानानें अगदीं लहान होती. अर्थात् जपान्यांच्या तंत्रानेंच कां होईना परंतु आपला कार्यभाग साधून घेण्याचें अवघड काम स्वातंत्र्यसेनेकडे होतें. चिडून जाऊन हा डाव एका क्षणांत उधळून लावतां येण्यासारखा होता. परंतु नेताजींच्या सर्व कार्यावर त्यामुळें पाणी पडलें असतें. अशा वेळेस चित्तवृत्ति अगदीं शांत ठेवून जरा दमानेंच घेणें योग्य होतें. नाहींतर सगळाच बेत फिसकटला असता. यामुळें वेळोवेळीं कांहीं अपमान सहन करावे लागले, जपान्यांच्या शुद्ध हेतूबद्दल शंका उत्पन्न झाली, परंतु तरी आपली संख्या वाढली, हिंदुस्थानांतील एक दोन प्रांत स्वतंत्र करून आपलें बल वाढविलें कीं, मग पाहून घेऊं, ही एकच आशा मनांत धरून हिंदी स्वातंत्र्यसेना ध्येयनिष्ठपणें व स्वामिनिष्ठतेनें आपलें कार्य करीत होती.

हिंदुस्थानाच्या सरहद्दींतील एका खेड्यांत जपानी व स्वातंत्र्यसैनिक शिरले. त्या वेळेस धान्याचा तुटवडा होता म्हणून जपान्यांनीं सर्व लोकांच्या गाई, वासरें, शेळ्या इत्यादि जनावरें गोळा करून आणलीं व त्यांची ते हत्या करणार इतक्यांत स्वातंत्र्यसेनेच्या अधिकाऱ्यांच्या कानीं ही गोष्ट गेली व त्यांनीं

जपानी अधिकाऱ्यांस या गोष्टीपासून परावृत्त करण्याची पराकाष्ठा केली. हिंदुस्थानांत अशा गोष्टींचे किती भयंकर परिणाम होतील याची त्यांनीं त्यांस कल्पना दिली. हिंदुस्थानांत डुकरें, बदकें, कोंबड्या इत्यादि पाळण्याची विशेष प्रथा नसल्यामुळें, शेळ्या, मेंढ्या व गाई हींच जनावरें मुख्यत्वें दिसतात. त्यांची कत्तल करणें हें हिंदी लोकमतास किती प्रक्षोभकारक होतें, याची परकीयांस कल्पना येणें शक्य नाहीं. इतर देशांत जपान्यांनीं जे प्रकार केले ते त्यांनीं हिंदुस्थानांतही सुरू केले. वरील खेड्यांत महत्प्रयासानंतर दुभत्या जनावरांची हत्या करण्यापासून जपान्यांस परावृत्त करितां आलें. तरी शेवटीं या एकत्र केलेल्या जनावरांची वांटणी करतांना पुन्हा भांडणें आणि मारामारीची वेळ आली. नागरीक कुरकुरूं लागले. ज्याचें जनावर त्यास मिळालें नाहीं. उपटसुंभ्या लोकांनींच त्यांतील कांहीं जनावरें उपटलीं. या भांडणाचा शेवट करावयास जपान्यांनीं दंडेली सुरू केली व तेथील लोकमत त्यांच्याविरुद्ध प्रक्षुब्ध झालें.

हिंदुस्थानांत शिरल्याबरोबर हिंदी स्वातंत्र्यसेनेचाच खरा अधिकार व आपण केवळ पाहुणे म्हणून किंवा मित्र म्हणून त्यांस मदत करावयास जात आहोंत, अर्थात् त्यांच्या सल्ल्याप्रमाणें वागणें हें आपलें कर्तव्य आहे असें जपानी समजले असते तर सर्व सुरळीत झालें असतें. परंतु जपान्यांची ही भावना कधींच नव्हती. आपणच सर्व सत्ताधारी आहोंत आणि स्वातंत्र्यसेनेचे खेळ हे केवळ आपल्याच लाडामुळें चालतात अशी त्यांची वृत्ति शेवटपर्यंत कायम होती.

१९४४ च्या जून महिन्याच्या सुरुवातीस इंफाल शहराला सर्व बाजूंनीं वेढल्यावर इंफालमध्यें अडकून पडलेल्या साम्राज्य फौजांना रसद मिळणें बंद झालें. परंतु इकडे जपान्यांना येणारी रसदही बंद पडली. इंफालला वेढा देऊन बसलेल्या सैन्याजवळील दारूगोळा संपला, अन्नधान्य संपलें. मागचे बाजूनें आजिबात येईनासें झालें. पाश्चात्त्य राष्ट्रांचीं जशीं अन्नधान्य-पुरवठाखातें, युद्धसामुग्री-पुरवठाखातें अशा प्रकारचीं मोठमोठीं निरनिराळीं खातीं असतात, तसें जपान्यांचें नव्हतें. दोन वेळेचा शिधा बांधून बरोबर द्यावयाचा व त्याच्यावरच निर्वाह करावयाचा. इंग्रज-अमेरिकन लोकांची धान्य आणि युद्धसामुग्रीची कोठारें पुरेपूर भरलेलीं असतात. आपल्याला त्या दृष्टीनें विशेष ओझें बाळगण्याचें कारण नाहीं. शत्रूची सामुग्री जिंकून त्याच्यावरच काम चालवावयाचें एवढेंच नव्हे, तर त्यांतील जरूर तेवढेंच ठेवून बाकीचें आपल्या राष्ट्राच्या गंगाजळींत पाठवून द्यावयाचें हें जपान्यांचें तत्त्व असे. शिवाय पॅसिफिक महासागरांत अमेरिकेच्या हल्ल्याचा जोर जपानला आतां जाणवूं लागला होता. गेल्या वीस पंचवीस वर्षांत आपल्या प्रत्येक नागरिकास आत्यंतिक काटकसरीचें तत्त्व पटवून जपानी सरकारानें त्याच्याकडून जास्तींत जास्त काम करवून घेऊन व त्यास कमींत कमी वेतन देऊन निरनिराळ्या वस्तूंच्या उत्पादनानें राष्ट्राची

संपत्ति पुष्कळच वाढविली होती. आंतरराष्ट्रीय व्यापारांत या वस्तू दुसऱ्या राष्ट्रांस देऊन त्यांच्या मोबदल्यांत जपाननें लोखंड, रबर, टीन असें युद्धोपयोगी सामान विकत घेतलें. या कच्च्या मालापासून त्यांनीं तोफा, विमानें, मोटारी इत्यादि युद्धसामुग्री तयार केली. विस्तृत प्रदेशावरील मोहिमेंत दोन-तीन वर्षांत हें त्यांचें युद्धसाहित्य संपुष्टांत येऊं लागलें. विशेषतः विमानें, मोटारी, तोफा, जहाजें, पेट्रोल, टायर, ट्यूब्स, इत्यादि वस्तूंची त्यांस फारच टंचाई भासूं लागली. प्रत्यक्ष युद्धकालांत या वस्तूंचें जरूर त्या प्रमाणांत उत्पादन करावयास त्यांच्याजवळ मनुष्यबळ, कच्चा माल व पुरेसे कारखाने या सर्वच गोष्टींचा अभाव होता. याशिवाय प्रत्यक्ष जपानवर हवाई हल्ले होत असल्यामुळें असलेले कारखानेही उध्वस्त होणार. याच्या उलट अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, चीन, हिंदुस्थान यांसारख्या शत्रूंच्या ताब्यांतील विस्तीर्ण प्रदेशांत कोणत्याच गोष्टीची वाण नव्हती. कारखान्यांतून दिवसभर राबवावयाला असंख्य एशिआटिक लोक होते व कच्चा मालही होता.

पॅसिफिक महासागरांतील घडामोडींवर जपान्यांचें जास्त लक्ष होतें; कारण त्या मार्गानें अमेरिका हळू हळू जपान देशावर चाल करून येत होती. युद्धसाहित्याची व सैनिकांची तर तूट पडलेली आणि अमेरिका तर दिवसें दिवस आपलें एक एक पाऊल जपानच्या रोखानें पुढेंच टाकीत होती. अशा वेळेस हिंदुस्थान-ब्रह्मदेश आघाडीकडे दुर्लक्ष करून स्वतःच्या बचावाकडे लक्ष द्यावें असें जपानच्या युद्धमंडळानें ठरविलें. त्यांनीं हिंदुस्थानांत शिरलेल्या हिंदी व जपानी फौजांना सामान पाठविणें बंद केलें. या दोघांचा दारूगोळा आणि अन्न संपुष्टांत आल्यामुळें त्यांची उपासमार तर होऊं लागलीच, परंतु पुढें होऊन निकराचा हल्ला करणेंसुद्धां त्यांस दारूगोळ्याच्या अभावीं अशक्य झालें. मागें हटावें तर शत्रू पाठलाग करून आपला नाश करील. 'दैव देतें पण कर्म नेतें' अशी परिस्थिति झाली. तोंडचा घास कोणी ऐनवेळीं काढून घ्यावा अशांतली गत झाली. विजयोन्मादाच्या ऐन शिखरावर असतांना दुर्भाग्यानें निराशेच्या खोल दरींत ढकलून दिलें.

दारूगोळ्याविना तोफा व बंदुका निरुपयोगी होत्या. स्वातंत्र्यसैन्यास पूर्वी फक्त भात व मुगाची डाळ मिळत असे. तेवढेंही अन्न आतां मिळेनासें झालें. अशा वेळीं इंफाल हस्तगत करण्याची एक तोड हिंदी अधिकाऱ्यांनीं जपानी अधिकाऱ्यांस सुचविली. इंफाल शहराभोवतालचा वेढा उठवून साम्राज्य फौजांस पीछेहाट करण्यास त्यांच्या पीछाडीचे एक-दोन मार्ग मोकळे करून द्यावे म्हणजे ते आपोआप सोडून जातील, अशी ती सूचना होती. परंतु जपानी युद्धतंत्रतज्ज्ञांनीं या वेळेस फारच आडमुठेपणाचें धोरण ठेवलें. 'घेऊं तर इंफाल, सर्व सैन्य आणि युद्धसामुग्रीसकट घेऊं, नाहींतर मुळींच घेणार नाहीं' अशीच त्यांची

वृत्ति होती. अर्थात् अशा परिस्थितींत ओसाड इंफाल घेण्यापेक्षां समृद्ध इंफाल घेतलेलें बरें हें कोणासही पटण्यासारखें होतें. परंतु तसें मिळणें शक्य नाहीं तर 'सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः।' हें धोरण तरी असावयास पाहिजे होतें. ओसाड पडलेलें इंफाल घेऊनसुद्धां अनेक महत्त्वाचे सुपरिणाम घडून आले असते. एक तर साम्राज्य-फौजांना दुसरें नैसर्गिक बचावाचें ठिकाण म्हणून एकदम पार्वतीपुराजवळ ब्रह्मपुत्रा नदीच्या पलीकडे जाऊन तळ द्यावा लागला असता. यामुळें फारच विस्तीर्ण टापू हिंदी स्वातंत्र्यसरकारास मिळाला असता. दुसरा फायदा म्हणजे इंफालसारखें नाक्याचें ठिकाण काबीज केल्यानें हिंदुस्थानांतील जनतेस स्वातंत्र्य-चळवळीचें खरें स्वरूप कळलें असतें. इंग्रजांनीं प्रचाराची धूळ डोळ्यांत फेंकून आंधळे केलेल्या हिंदी लोकांस इंफालच्या विजयाच्या एका फुंकरीसरशीं स्वातंत्र्याची दिव्य दृष्टि लाभली असती. दास्याच्या नैराश्यमय वातावरणाचें मेघपटल, इंफालगिरीवर उगविणाऱ्या स्वातंत्र्यरवीच्या किरणांनीं विदीर्ण करून टाकलें असतें. इंफालच्या विजयानंतर वस्तुस्थितीचा कोंबडा इंग्रजांनीं लपवून ठेविला असता, तरी स्वातंत्र्याची प्रभा पूर्व क्षितिजावर फांकावयाची राहिली नसती ! इंफालच्या विजयानें हिंदुस्थानांतील दाट लोकवस्तीचा भाग प्रथमच ताब्यांत येऊन स्वातंत्र्यसैन्याची पुष्कळच वाढ करणें शक्य होतें. इंग्रजांच्या इभ्रतीला धक्का बसून लोकमताला कलाटणी मिळाली असती व जपान्यांच्या मदतीशिवाय हिंदी स्वातंत्र्य-चळवळ आपल्या पायावर उभी राहूं शकली असती. कांहीं काळ कां होईना परंतु एकादा प्रांत स्वतंत्र झाला, तेथील जनतेस शस्त्रास्त्रें मिळालीं, आपलेंही एक स्वतंत्र सरकार आहे असें त्यांस कळलें कीं, त्या जनतेस स्वातंत्र्यलढ्याचा साहजिकच चेव येतो. हल्लीं जाव्हा बेटांत जसा जनतेचा आणि डच व इंग्रज सैन्याचा लढा चालला आहे, त्यांस दडपणें जसें इंग्रजांस शक्य होत नाहीं तसेंच हिंदुस्थानांतही स्वातंत्र्ययुद्धाचा वणवा पेटून तो आटोक्यांत आणणें कोणासही शक्य झालें नसतें.

कोहिमा हातीं आल्याबरोबर नेताजींनीं हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या व सेनेच्या मुख्य कचेऱ्या मेमिओहून तेथें नेल्या. स्वातंत्र्ययुद्ध सुरू झालें तेव्हांच, युद्ध-आघाडीच्या शक्य तितकें जवळ असावें म्हणून व पुढें सरकणाऱ्या सैन्याबरोबर दर वेळेस पुढें पुढें जातां यावें म्हणून संघाच्या, सेनेच्या अत्युच्च कचेऱ्या मेमिओला आणण्यांत आलेल्या होत्या. शक्य तितक्या लवकर हिंदुस्थानाच्या आंत आपल्या प्रिय मातृभूमीमध्येंच या अत्युच्च कचेऱ्या स्थापन करावयाच्या ही त्यांची फार दिवसापासूनची आकांक्षा होती. ती जून १९४४ मध्यें सफल झाली. १९४४ च्या मे व जून या दोन महिन्यांत त्यांनीं आघाडीचा दौरा केला. निरनिराळ्या तुकड्यांस व सैनिकांस त्यांच्या कामगिऱ्यांबद्दल शाबासकी दिली. पदकें, बक्षिसें, पदव्यादान इत्यादींचे समारंभ झाले व जून महिन्यांत कोहिमा हें हिंदी स्वातंत्र्य-चळवळीचें केंद्रस्थान बनविण्यांत आलें.

स्वातंत्र्ययुद्धांत पराक्रम करणाऱ्यांस शाबासकी दाखल : शहीद-ए-भारत, शेर-ए-हिंद, सरदार-ए-जंग, वीर-ए-हिंद, तमगा-ए-बहादुरी, तमगा-ए-शत्रुनाश अशीं ज्याच्या त्याच्या कामगिरीप्रमाणें द्यावयाचीं पद्वीपदकें ठरविण्यांत आलीं होतीं. यांत दोन दोष होते. एक तर अस्सल ब्रिटिश फौजी कागदपत्रांत अशा तऱ्हेचीं पदकें देण्याबाबत जी भाषा किंवा जो शब्दसमुच्चय वापरण्यांत येतो, अगदीं तोच या पदकाच्या बाबतींतही वापरण्यांत आलेला होता. असें करण्यांत हें काम ज्याच्याकडे सोपविलें होतें त्यानें कांहीं स्वत्व दाखविण्याचा प्रयत्न न करितां ज्याच्याविरुद्ध शत्रु म्हणून लढावयाचें त्याचीच परंपरा कायम ठेवली. दुसरा दोष हा होता कीं, या पदव्या हिंदी पद्धतीच्या नसून अस्सल इराणी किंवा अरबी झोकाच्या होत्या. " तमगा, जंग,–ए–, शहीद " या शब्दांपासून बहुजन हिंदी समाजास कांहींच बोध होत नाहीं. तेव्हां या पदव्यांची धाटणी भारतीय पद्धतीचीच असावयास हवी होती.

स्वातंत्र्ययुद्धांत निरनिराळ्या प्रकारची बहुमोल कामगिरी बजाविल्याबद्दल व पराक्रम गाजविल्याबद्दल सुमारें दोनशेंजणांस वरील तऱ्हेचीं निरनिराळीं पद्वी-पदकें देण्यांत आलीं. लेफ्टनंट कर्नल मिश्रा या शूर हिंदी अधिकाऱ्यास आराकान आघाडीवर वीरोचित कार्य केल्याबद्दल अशा प्रकारचें पहिलें पारितोषक मिळालें. त्यांचा या कार्याबद्दल गौरव करून नेताजींनीं, श्री. मिश्रा यांच्याप्रीत्यर्थ केलेल्या एका मोठ्या सत्कार-समारंभांत त्यांच्या छातीवर तें पदक स्वतः लाविलें.

या मोहिमेनें हिंदुस्थानाचा दीडलक्ष चौरस मैल क्षेत्रफळाचा भाग हिंदी स्वातंत्र्य-सरकाराच्या ताब्यांत अवघ्या चारपांच महिन्यांच्या आंत आणला होता. शिवाय अंदमान निकोबार हा टापू व ब्रह्मदेशांतील पिनमिना स्टेशनाजवळील शियावदी गांवाचा पन्नास चौरस मैलाचा प्रदेश आतां हिंदी स्वातंत्र्य-सरकाराच्या अधिपत्याखालीं होता. हिंदुस्थानाच्या गेल्या सव्वाशें वर्षांच्या इतिहासांत हें केवढें महत्कृत्य होतें! ब्रह्मदेशांतील शियावदी गांवाच्या पन्नास चौरस मैल क्षेत्रफळाच्या भूमिभागांत उसाचे मळे आणि साखरेचे कारखाने आहेत. इंफाल या क्षणीं पडेल अथवा पुढच्या क्षणीं पडेल, अशी वेळ येऊन ठेपलेली होती. दूरपूर्वेतील हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या सर्व शाखांस इंफालच्या पाडावाचा महोत्सव करण्यास सर्व प्रकारची सिद्धता करून ठेवण्याबद्दल सरकारी संदेश गेलेले होते. जिकडे तिकडे या विजयमहोत्सवाची जय्यत तयारी करण्यांत आलेली होती. इंफाल पडल्याची तार आज येईल, उद्यां येईल अशी सर्वांची उत्कंठापूर्ण मार्गप्रतीक्षा चाललेली होती. इंग्रजांच्या बाजूला, इंफालमध्यें वेढलेल्या साम्राज्य फौजांना विमानांतून कसाबसा थोडचा रसदीचा पुरवठा केला जात होता. परंतु तो अगदींच अपुरा पडत होता. इंफालमध्यें अडकलेल्या सेनेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यानें दिल्लीला बिन-तारी संदेश पाठविला, " उपासमार होत आहे...शरण जावें लागेल...आज्ञा असावी..." याला अनुकूल उत्तर आलें. कसल्याच प्रकारची कुमक येणें शक्य

नव्हतें आणि दिवसेंदिवस वेढलेल्या फौजांची कशी बिकट परिस्थिति होत चाललेली होती, याची वार्ताही मिळणें दुरापास्त झालेलें होतें. पडत्या फळाची आज्ञा घेऊन वेढलेल्या सैन्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं शरण जाण्याची सर्व सिद्धता केली. एक-दोन दिवसांत आपल्याला शरण जावें लागेल असें प्रत्येक सैनिकास अप्रत्यक्षपणें सांगण्यांत आलें. हाच या दुसऱ्या हिंदी स्वातंत्र्ययुद्धाचा अत्युत्कर्षबिंदु ठरला. याच्यापुढें सर्वच गाडें उलटलें. दर वेळेस एक एक पाऊल मागें पडत गेलें व ओठाशीं आलेला हा विजयामृताचा पेला भवितव्यानें ओढून दूर दूरच नेला ! !

स्वातंत्र्यसेना जेव्हां प्रथम हिंदुस्थानांत शिरली व पुढें तिला अनेक विजय प्राप्त होऊं लागले, तेव्हा स्वतंत्र हिंदुस्थानाचे विभाग कसे पाडण्यांत यावेत व स्वतंत्र-भारताचा राज्यकारभार कसा चालविण्यांत यावा याबद्दल प्रस्तुत ग्रंथकारानें एक योजना तयार करून ती राष्ट्रपति नेताजी सुभाषचंद्र बोस यांस सादर केली. कांहीं दिवसानंतर त्यांचे ए. डी. सी. ( सहाय्यक अधिकारी ) 'कॅप्टन रावत' हे प्रस्तुत ग्रंथकारास भेटले असतांना म्हणाले, " तुमची योजना पूर्णपणें मान्य आहे आणि ती जित-देशाचे कारभारी लेफ्टनंट कर्नल चॅटर्जी यांच्याकडे देण्यांत आली आहे. (Your scheme has been accepted in toto by Netaji and is forwarded to Lt. Col. Chatterjee, Governor of Liberated Territories )

इंफाल आज पडेल उद्यां पडेल असें म्हणतां म्हणतां एक दिवस गेला, दोन दिवस गेले. पुढें दिवसावर दिवस जाऊं लागले तरी इंफालच्या पाडावाची वार्ता येईना. घोडें पेंड तरी कोठें खातें आहे हेंच कांहीं उमगेना. खरी परिस्थिति अशी होती कीं, घोड्याला खावयाला पेंड असावयाची तर बाजूलाच राहिलें परंतु घोडें खाऊन पोट भरण्याचीसुद्धां सोय सैनिकांस उरली नाहीं. हिंदी स्वातंत्र्यसैन्य थोडेंथोडकें असल्यामुळें त्यांस पुरवठा-कार्यांत गुंतवून ठेवण्याइतके लोक नव्हते व वाहनें आणि त्या प्रांतांतील अधिकार यांच्या अभावीं त्यांस स्वतःचें पुरवठा-कार्य स्वतःच करणें अशक्य होतें. जपानी पुरवठा-खातेंच दोन्ही फौजांस युद्ध-सामुग्री व अन्नधान्य पुरवीत असे. ही पद्धत घातक ठरली. प्रत्यक्ष आघाडीवर लढत नसलेल्या व पुरवठा वगैरे तऱ्हेचें दुय्यम प्रतीचें युद्धकार्य करणाऱ्या सैनिकांस जपानी वरिष्ठ युद्धकार्यालयाकडून असा तांतडीचा संदेश आला कीं, 'हातांत असेल तें कार्य जसेंच्या तसें सोडून, असाल तसे, शक्य तितक्या सैनिकांनिशीं व असतील तितक्या मोटारी, विमानें वगैरे युद्धसाहित्य घेऊन सायगांव येथें यावें.' येथून पॅसिफिकमधील अनेक बेटांवर अमेरिकेच्या वाढत्या हल्ल्यांना तोंड देण्यास हे सर्व पाठविले जाणार होते.

सगळीं विमानें काढून घेण्यांत आलीं. दारूगोळा तर संपलेलाच होता अगोदर. वाट पाहात पाहात अठावीस दिवस गेले, परतु पिछाडीच्या तळावरून धान्य-पुरवठा झाला नाहीं. आणखी फक्त दोनच दिवस तोफखान्याचा भडिमार

करण्याइतका दारूगोळा असता, किंवा हवाई हल्ले करण्यापुरतीं ५०-६० विमानें असतीं तर इंफाल काबीज करितां आलें असतें. एवढ्यावर हें सगळें येऊन ठेपलेलें असतांना इकडे स्वातंत्र्यसैनिकांनींसुद्धां सोशिकपणाची परिसीमा गांठली होती. निकराचा हल्ला करावयास बंदूकींत गोळ्या नव्हत्या व दारूगोळ्याच्या अभावीं, त्याची वाट पाहात, नेटानें तेथें बसून राहाण्यास कित्येक दिवस पोटांत अन्न नव्हतें. सैनिकांची अन्नान्न परिस्थिति झाली. प्रत्येक तुकडींतील कांहीं सैनिकांस रोज अन्नाच्या शोधार्थ पाठविण्यांत येऊं लागलें. त्या रानांत कंदमुळें कांहीं मिळणें शक्य झालें नाहीं. प्रयोग करण्यास अवधीही नव्हता व तशी परिस्थितीही नव्हती. सर्वांचीं शरीरें उपासानें आणि जंगलांतील (हिंवतापासारख्या) निरनिराळ्या आजारांनीं इतकीं कृश झालेलीं होतीं कीं, प्रयोगांत कांहीं भलती वस्तू खाण्यांत आली असती तर शरिराच्या प्रतिकारक्षमतेच्या आणि औषधींच्या अभावीं रोगराईची सांथ पसरून सर्वांचा फन्ना उडाला असता.

केळींच्या झाडाच्या बुध्यांतील गाभा, वेळूच्या झाडाचे कोवळे कोंब व गवत हें शिजवावयास सैनिकांनीं सुरुवात केली. त्यांत घालावयास तिखटमीठही नव्हतें. जपानी सैनिकांचीही तीच परिस्थिति झाली. त्या भागांत जड सामानाची ने-आण करावयास इतर वाहनांच्या अभावीं हत्तींनीं ओढावयाच्या लहान गाड्यांची सैनिक-वाहतुकीस थोडी मदत झाली. भुकेची कळ सहन न होऊन कांहीं जपान्यांनीं हे हत्तीच कापून त्यांचें मांस खाल्लें. तें मांस न पचून हगवणीनें ते मृत्युमुखीं पडले. स्वातंत्र्यसैन्यांत जून महिन्याच्या २७ तारखेस चार गढवाली शिपाई उपासमारीस बळी पडले. त्यानंतर उपासमारीनें मरण येणें ही एक सरावांतील गोष्ट झालेली होती. तरीपण मागें हटण्याचें नांव एकानेंही काढलें नाहीं! एवढा प्रांत काबीज केला आहे तो हातचा जाऊं देणार नाहीं, असा प्रत्येकानें निर्धार केलेला होता. मरूं तर येथें भरतभूमीवर तरी मरूं, असेंच सर्वांनीं ठरविलें होतें! शरिरांत प्राण असेपर्यंत, पुन्हा अन्नाचा पुरवठा झाला आणि कार्यक्षमता अंगीं आली कीं, पुन्हा येथूनच पुढें आपल्या मोहिमेस सुरुवात करूं, नाहींतर शेवटचें एकदां ‘ जयहिंद–जयनेताजी ’ म्हणून येथेंच प्राण सोडूं असेंच जो तो म्हणत होता! पावसाळ्यास सुरुवात झालेली होती. नदीनाले भरून वाहात, दऱ्याखोरीं सर्व जलमय झालेली; ओल, अशक्तता, पाऊस औषधांचा आणि अन्नाचा अभाव, यामुळें हिंवताप, कॉलरा, आंव, क्षय, रक्तक्षय इत्यादि आजार वाढीस लागले. सैनिक पटापट मरूं लागले. मरतांनासुद्धां कर्तव्यपूर्तीचा आनंदच प्रत्येकाच्या चेहऱ्यावर स्पष्ट उमटलेला होता. इतकी निकराची परिस्थिति झाली असूनसुद्धां स्वातंत्र्य-सरकारास किंवा जपानी सरकारास उद्देशून दूषणात्मक शब्द उच्चारण्याचें एकाही हिंदी किंवा जपानी सैनिकाचें मनांत आलें नाहीं! युद्धाच्या अनेक प्राणसंकटांपैकीं हें एक आहे,

अशीच प्रत्येकाची भावना होती. उपासमार सहन न होऊन कांहींनीं आत्महत्या करून घेतली. इंग्रजांना या गोष्टीचा पत्ताच नव्हता. आज शरण जावें लागतें कीं उद्यां अशा धडधडत्या अंतःकरणानें ते तिकडे आपल्या नशिबाला आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेभळेपणाला दोष देत बसले होते.

जपान्यांच्या दृष्टीनें या परिस्थितींत कांहींच गैर नव्हतें. 'आपलें राष्ट्र युद्धमान परिस्थितींत असतांना रणांगणावर मृत्यु येणें यांतच आपला खरा पुरुषार्थ अशी त्यांची भावना होती. अर्थात् लढतां लढतां मृत्यु न येतां उपासमारीनें आला, हा वरिष्ठ अधिकाऱ्यांचा प्रश्न आहे. आपल्या कक्षेंतील तो प्रश्न नव्हे. आज्ञा होईल त्याप्रमाणें वागणें व आलेल्या परिस्थितीस वीरपुरुषाप्रमाणें तोंड देणें, एवढेंच आपलें कर्तव्य.' अशी प्रत्येक जपानी सैनिकाची मनोभावना होती. त्यांच्या युद्ध-तंत्राच्या दृष्टीनें हें ठीक होतें. परंतु हिंदी सैनिकांपुढें राष्ट्रास स्वतंत्र करण्याचें ध्येय होतें. तें ध्येय गांठावयास आत्तां कोठें नुकती सुरुवात झालेली होती, तोंच जपान्यांच्या पुरवठा-खात्यावर विसंबल्यामुळें त्यांस उपासमारीनें मरावयाची पाळी आली. अर्थात् दोस्तराष्ट्रांच्या मदतीनें लढतांनासुद्धां आपापला सर्व वेगळा आणि स्वतंत्र कारभार असलेला बरा. त्यामुळें पुढचें धोरण ठेवून आपल्याला आपला मार्ग आंखतां येतो. या वेळेस पडद्यामागें काय चाललें आहे हें कळावयास मार्ग नव्हता. जपानी युद्धखात्याकडून जपानी सैनिकांस केव्हां काय हुकूम येतील व ते केव्हां आपलें चंबूगबाळें आटोपून चालूं लागतील हें कोणासच समजणें शक्य नव्हतें. त्यांचा सर्व कारभार अत्यंत गुप्त ठेवला जात असे व त्यांचें तंत्र हें त्यांच्या राष्ट्राच्या अंतिम फायद्याच्या दृष्टीनें एकंदर युद्धाच्या बदलत्या रागरंगाप्रमाणें क्षणोक्षणीं बदलण्याची शक्यता होती. ब्रह्मदेश आघाडीवरच्या युद्धाची त्यांस मुळींच पर्वा नव्हती. उलट, हिंदी स्वातंत्र्यसैन्याची तीच एकमेव आघाडी होती.

शेवटीं हें सर्व जसेंच्या तसें सोडून जपानी फौजांनीं माघार घेतली. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं कोहिमास नेलेल्या हिंदी स्वातंत्र्य-सरकाराच्या, संघाच्या व सेनेच्या कचेऱ्या पुन्हा मेमिओमार्गें रंगूनला आणाव्या लागल्या. जपान्यांनीं आपल्या फौजा काढून घ्यावयास सुरुवात केली. मात्र हिंदी स्वातंत्र्यसेनेच्या अधिकाऱ्यांना त्यांनीं स्पष्टपणें कांहींच सांगितलें नाहीं. कांहीं कांहीं हिंदी तुक-ड्यांस तर त्यांनीं पुढें सरकण्यास सांगितलें. पुढें सरकावयाचें पण तें कशाच्या जोरावर ? याचा त्यांनीं विचार केला नाहीं. इकडे उपासमारीनें फार मृत्यु होऊं लागून परिस्थिति दिवसेंदिवस जास्तच बिकट होत जाणार, हें स्पष्ट दिसूं लागलें. नेताजींनीं स्वातंत्र्यसेनेस मागें फिरण्याचा हुकूम दिला. 'नेताजी असा कधींच हुकूम देणार नाहींत' असें म्हणत स्वातंत्र्यसैनिक माघारीं फिर-ण्याचें नाकारूं लागले ! शेवटीं नेताजींची लेखी आज्ञा सर्वांस दाखवावी लागली; तेव्हां नाइलाजानें सर्वजण परत येण्यास कबूल झाले. १९४४ च्या जुलै

महिनाअखेर स्वातंत्र्यसैन्यानें पीछेहाट करण्यास सुरुवात केली. त्यांचा पाठलाग होणें शक्यच नव्हतें. कारण साम्राज्य-फौजा शरण जाण्याच्या तयारीनें बसलेल्या होत्या! पावसाळी हवेंत बाहेर फिरकणें हें त्यांस कोणी शिकविलें नव्हतें. विरुद्ध पक्षाकडील सैन्याची उपासमार होत आहे हें त्यांच्या ध्यानींमनींही नव्हतें. इंग्रजांच्या हेरखात्याबद्दल आणि त्यांच्या बळाबद्दल आपण उगीचच भलती कल्पना करून घेतों, परंतु इंग्रजांच्या इतका भोंगळ कारभार क्वचितच दुसऱ्या कोणत्या देशाचा असेल हें घराबाहेर पडल्यावर समजलें.

इंग्रजांकडील हिंदी सैनिक, स्वातंत्र्यसैनिकांस युद्ध आघाडीवरील दऱ्याखोऱ्यांत नदीनाल्यांच्या कांठीं भेटत असत. क्वचित प्रसंगीं उभयपक्षाचे सैनिक एकाच झऱ्यावर पाणी भरण्यास येत. तेथें त्यांच्या गप्पागोष्टी मोकळेपणानें होत असत. अशा प्रसंगीं पुष्कळसे स्वातंत्र्यसैन्यास येऊन मिळत. इंग्रजांनीं प्रत्येक तुकडींत शीख, हिंदु, मुसलमान, तामीळ, पंजाबी असे अनेक धर्माचे व प्रांताचे लोक मिळून मिसळून ठेविलेले होते. उद्देश हा कीं, स्वातंत्र्यसैन्यास जाऊन मिळण्याचें एकाद्याच्या मनांत आलें तरी या बाबतींत त्यांचें मतैक्य तर होऊं नयेच परंतु त्याच्याबद्दल चुगल्या सांगणारेही इतर कोणीतरी असावेत. दुर्दैवानें अजून कांहीं हिंदुस्थानी लोक इंग्रजांच्या दुही माजविणाऱ्या या प्रयत्नांस बळी पडतात.

पीछेहाटींत स्वातंत्र्यसैन्याची बरीच हानी झाली. कोणी रोगराईस तर कोणी उपासमारीस बळी पडले. कोणास हिंस्र श्वापदांनीं गट्ट केलें. कॅप्टन गौडासारखे कांहीं लोक ओढे-नाले पार करीत असतांना वाहून गेले. ऑगस्ट महिन्याच्या २१ तारखेस नेताजींनीं एक खास हुकूम काढून ती मोहीम तात्पुरती स्थगित केल्याचें जाहीर केलें. त्यांत त्यांनीं म्हटलें होतें, "माझ्या शूर सैनिकांनो......फेब्रुवारी महिन्याच्या ४ तारखेस हिंदुस्थानावर हल्ला सुरू केल्यापासून तुम्ही एकामागून एक सारखे विजय मिळवीत इंफाल शहरापर्यंत जाऊन पोंचलांत. यानंतर धान्य आणि इतर सामुग्रीचा तुटवडा पडल्यामुळें अशा परिस्थितींत जंगल प्रदेशांत राहणें केव्हांही इष्ट नव्हतें. इंफालवर तर पावसाळ्यानंतर आपल्याला हल्ला करावयाचा आहेच, परंतु तोंपर्यंत मागें येऊन आपल्या सैन्याची जुळवाजुळव करणें हें एकंदर युद्धतंत्राच्या दृष्टीनें तितकेंच महत्त्वाचें आहे...म्हणून नाउमेद व्हावयाचें मुळींच कारण नाहीं."

———

## विजय-कालांतील इतर कार्य : २३

१९४४ च्या पूर्वार्धांत जेव्हां हिंदी स्वातंत्र्यसेना मर्दुमकी गाजवून विजयावर विजय मिळवीत होती, त्या वेळेस आघाडीच्या मागें इतर काय काय महत्त्वाचें कार्य होत होतें, त्याचा आपण या प्रकरणांत विचार करूं. लेफ्टनंट कर्नल लोकनाथन् यांस नेताजींनीं अंदमान-निकोबार टापूचा राज्यकारभार हांकण्यास निवडल्याचें मागें आलेंच आहे. श्री. लोकनाथन् हे पन्नाशी उलटून गेलेले एक वृद्ध, अनुभवी, विनोदी गृहस्थ आहेत. त्यांनीं आंग्ल पद्धतीच्या वैद्यकशास्त्रांतील बऱ्याच पदव्या मिळविलेल्या आहेत. ते फौजी डॉक्टर या नात्यानें सिंगापूरला गेले असतांना तेथें जपान्यांचे युद्धबंदी झाले व पुढें स्वातंत्र्यसेनस मिळाले. ते आय्. एम्. एस्. खात्याचे म्हणजे (इंग्रजप्रणीत) हिंदुस्थान-सरकाराच्या वैद्यकखात्यांतील एक प्रमुख अधिकारी होते. याच खात्यांत ते लेफ्टनंट कर्नलच्या हुद्यापर्यंत चढलेले होते. प्रकृती खालावलेली असतांनासुद्धां अंदमान-निकोबारच्या राज्यकारभाराचें जबाबदारीचें काम त्यांनीं आनंदानें पत्करलें. त्यांच्या जठरांत व्रण झालेला होता व त्याच विकाराचा त्यांस नेहमीं त्रास होई.

अंदमान बेटाचें नांव 'शहीद बेट' व निकोबारचें 'स्वराज्य बेट' असें या जुळ्या भावंडांचें नेताजींनीं नामाभिधान केलेलें होतें. फेब्रुवारी १९४४ च्या दुसऱ्या आठवड्यांत श्री. लोकनाथन् हे आपल्या इतर पांच सहकाऱ्यांसह विमानानें अंदमानाच्या पोर्ट ब्लेअर बंदरावर उतरले. या सर्वांस सिंगापुरांतून जाण्याच्या अगोदर स्वातंत्र्य-चळवळींतील सर्व अधिकाऱ्यांतर्फे थाटाचा खाना देण्यांत आला. त्यांना नेण्यास अंदमानाच्या जपानी नाविकदलाचे दुय्यम नाविक प्रमुख आलेले होते. अंदमान बेटांत त्या सर्वांचें थाटानें स्वागत झालें. तेथील पूर्वींचा ब्रिटिश कमिशनरचा बंगला व आजूबाजूचे इतर बंगले या पांच हिंदी अधिकाऱ्यांच्या वास्तव्याकरतां म्हणून तयार ठेवण्यांत आलेले होते. ज्या बंगल्यावर पूर्वीं इंग्रजांचें निशाण असून त्या निशाणाच्या नियमनाखालीं त्या बेटांत हिंदी देशभक्तांचा छळ होत असे, तेथेंच आज एका परमोच्च हिंदी देशभक्ताच्या भगीरथ प्रयत्नांमुळें तिरंगी निशाण फडकत असून सर्वस्वीं राष्ट्रीय-वृत्तीचा राज्यकारभार सुरू झालेला होता, हा कालाचा महिमाच म्हटला पाहिजे!

१७ फेब्रुवारी १९४४ रोजीं एक मोठा समारंभ होऊन त्यांत जपानी आरमारी अधिकाऱ्यांनीं अंदमान-निकोबार टापू हिंदी स्वातंत्र्य-सरकाराच्या

स्वाधीन करण्याचा विधि पार पाडला. त्या दिवसापासून हिंदी स्वातंत्र्य-सरकारतर्फे लेफ्टनंट कर्नल लोकनाथन् त्या प्रदेशाचा कारभार पाहूं लागले. हिंदी स्वातंत्र्य-सैन्य संख्येनें लहान असल्यामुळें व स्वातंत्र्य-सरकाराचें स्वतःचें विमानदल आणि आरमार नसल्यामुळें त्या प्रदेशाच्या बचावाचें काम सर्वस्वीं, जपान्यांकडेच होतें. या व्यवस्थेंत गैर वाटण्यासारखें कांहींच नाहीं. स्वातंत्र्य-सरकाराच्या आधिपत्यास बाध येण्यासारखें त्यांत कांहींच नव्हतें. दोन अथवा अधिक राष्ट्रें मित्रत्वाच्या नात्यानें युद्ध लढत असतांना एकाच्या उणीवा दुसऱ्यानें भरून काढाव्याच लागतात. परंतु याचा अर्थ असा होत नाहीं कीं, त्या त्या ठिकाणीं दुसऱ्याचा कायमचाच वरचष्मा राहील. अंतर्गत कारभारांत नागरिकांचें रक्षण व विद्याखातें हींच दोन स्वातंत्र्य-सरकाराकडे सोपविण्यांत आलेलीं होतीं.

अंदमान बेटांत जपानी अधिकाऱ्यांनीं हिंदी लोकांचा फार छळ केला. तेथें हिंदी व जपानी यांच्याशिवाय तिसरें कोणी नव्हतेंच असें म्हटलें तरी चालेल. एका गोऱ्या अधिकाऱ्याशिवाय त्या प्रदेशांत गोरा म्हणून कोणी राहिला नव्हता. सिंगापूर जपान्यांनीं काबीज केलें असें कळतांच त्या सर्वांनीं पळ काढलेला होता. येथील जपानी अधिकारी इतर ठिकाणच्या जपानी अधिकाऱ्यांपेक्षां जास्त संशयखोर होते असें म्हटलें पाहिजे. कारण अंदमानमधील हिंदी लोक हे इंग्रजांचे हेर आहेत अशा संशयपिशाच्चानें जपानी अधिकाऱ्यांनीं सरसकट धरपकड करून संशयित लोकांचा छळ करण्यास, कांहींना भराभर फाशीं देण्यास अथवा गोळ्या घालून ठार मारण्यास सुरुवात केली. एकाद्यानें उठून दुसऱ्याविरुद्ध जपान्यांकडे कागाळ्या कराव्या व आपल्या खाजगी द्वेषाचा वा भांडणाचा सूड उगवून घ्यावा असें सर्रास होत असे. अमुक एक माणूस इंग्रजांचा हेर आहे अशी कुजबूज जरी कानीं आली तरी त्या माणसास पकडून, तो 'गुन्हा' कबूल करीपर्यंत जपानी त्या माणसास छळीत. छळ सहन न होऊन संशयित मनुष्य खरा गुन्हेगार नसला तरी गुन्हा कबूल करी! त्या माणसाविरुद्ध दुसरा कांहीं पुरावा नसला तरी त्याच्या कबुलीजबाबावर त्यास शिक्षा होत असे. अशा तऱ्हेनें अंदमानमध्यें पुष्कळ निरपराध लोक मेले. बायकामुलांचाही छळ झाला. यामुळें अंदमान-निकोबार प्रदेशांतील लोक जपान्यांविरुद्ध फारच खवळले होते. प्रत्यक्ष असें त्यांनीं जपान्यांविरुद्ध कांहींच केलें नाहीं. परंतु केवळ जपान्यांचें पारिपत्य व्हावें या एका हेतूनें इंग्रजांबद्दल मनांत यत्किंचितही प्रेमभाव नसलेले लोकसुद्धां खरोखरच जपान्यांपेक्षां इंग्रज परवडले असें म्हणूं लागले. हेर नसलेले लोक हा छळ सहन न होऊन किंवा जपान्यांची अशा तऱ्हेची वागणूक पाहून इंग्रजांचे हेर बनले. जपानसारख्या शूर एशिआई राष्ट्राबद्दल आम्हाला केव्हांही आदरच वाटतो, परंतु जपानचा सर्वनाश जो झाला तो केवळ त्यांच्या क्रूर, मूर्ख, हडेलहप्पी व आडमुठ्या अधिकाऱ्यांच्या वर्तणुकीमुळें. कोट्यवधी

लोकांचे शिव्याशाप, लक्षावधी माता-भगिनींचे तळतळाटच त्यांना भोंवले असें म्हणावयास हरकत नाहीं.

लेफ्टनंट कर्नल लोकनाथन् व त्यांचे सहकारी जेव्हां अंदमान बेटावर येऊन उतरले, त्या वेळपासून त्यांच्या कानावर अनेक करुण कहाण्या येऊं लागल्या. अनेक दारुण प्रसंग त्यांच्या डोळ्यादेखत प्रत्यहीं घडत होते. हे सर्व नेताजींच्या कानावर घालण्यास कांहींच मार्ग नव्हता; कारण अंदमान टापूंत व इतर प्रदेशांत दळणवळण नव्हतेंच म्हटलें तरी चालेल. एकादें विमान कधीं जायचें व यायचें. त्यांत सर्व जपानी अधिकारीच असावयाचे. बिनतारी यंत्राच्या साहाय्यानें जपानी आरमार खात्याचें इतर प्रांतांशीं दळणवळण होतें. परंतु जपानी अधिकाऱ्यांविरुद्ध करावयाच्या तक्रारींच्या बाबतींत त्या यंत्राचें साहाय्य होणें शक्यच नव्हतें. एवढ्याकरितां हिंदी नागरिकांचा छळ पुष्कळशा हिश्शानें कमी करण्याच्या बाबतींत हिंदी अधिकाऱ्यांचा बराच उपयोग झाला. एक तर जपानी अधिकाऱ्यांच्या छलवृत्तीला आळा घालणें व दुसरें म्हणजे हिंदी नागरिकांचें म्हणणें त्यांच्यापुढें योग्य रीतीनें मांडणें; या दोन गोष्टींनीं त्यांना हिंदी नागरिकांचें दुःख बऱ्याचशा अंशानें कमी करतां आलें. मात्र हा छळ अजिबात थांबविणें त्यांस शक्य झालें नाहीं. कारण ' या प्रदेशाच्या बचावाचें काम आमच्याकडे आहे आणि त्याकरतां आम्हांला जरूर ती काळजी घेतलीच पाहिजे ' अशा निमित्तानें राजकीय आरोप असलेल्या संशयितास अटक करून त्याबाबतींत न्याय देण्याचें काम जपान्यांकडेच होतें. तथापि हिंदी अधिकारी आल्यापासून त्यांस पूर्वींसारखा अप्रतिहत कारभार चालवितां आला नाहीं, एवढें मात्र खरें.

येथें एवढें सांगणें जरूर वाटतें कीं जपानी लोक परकीयांशींच असे वागतात आणि स्वतःच्या देशबांधवांशीं अगदीं ममताळूपणें वागतात असें मात्र नाहीं. प्रत्यक्ष जपानांत राजकीय आरोप असलेल्या संशयितांची मुळींच गय केली जात नाहीं. त्यांचाही असाच छळ होतो. शासनपद्धतींत, इंग्रजांसारखा त्यांचा आपपर भाव नसतो. ते एक कायदा सर्वांस सारखाच लागू करतात. त्यांच्या एकाद्या इसमानें तोच गुन्हा केला तर त्यास परकीयांपेक्षांही खचित जास्त कडक शिक्षा होते.

लेफ्टनंट कर्नल लोकनाथन्, हे सात-आठ महिन्यांच्या वास्तव्यानंतर प्रकृतिस्वास्थ्याकरतां पुन्हा सिंगापुरांत परत आले. जठरांतील व्रणाचा त्यांचा विकार बळावत चालला होता. त्यांचे सहकारी मात्र युद्ध संपेपर्यंत अंदमानांत काम करीत होते. श्री. लोकनाथन् यांनीं सिंगापुरांत परत आल्याबरोबर जपानी अधिकाऱ्यांच्या, साप म्हणून भुई धोपटण्याच्या वर वर्णिलेल्या पद्धतीचा व स्वतःच्या एकंदर कामाचा एक गुप्त अहवाल नेताजींस सादर केला. दूरपूर्वेतील

हिंदी स्वातंत्र्य-चळवळीच्या संबंधांत अंदमानाबद्दल एवढेंच सांगण्यासारखें असल्यामुळें आतां आपण दुसऱ्या एका प्रसंगाकडे वळूं.

१ जानेवारी म्हणजे 'वर्षदिन' उत्सवाचा दिवस जपाननें पाश्चात्त्य राष्ट्रांच्या बरोबरीनें आपली शक्ति वाढविण्याकरतां ज्या कांहीं पाश्चात्त्य गोष्टींचा अंगिकार केलेला होता, त्यांपैकींच १ जानेवारी हा वर्षदिन म्हणून पाळणें ही सुद्धां एक बाब होती. प्रत्येक जपानी मनुष्य केव्हांही जन्मलेला का असेना, तो दर जानेवारी महिन्याच्या पहिल्या तारखेस आपल्या वयांत एक वर्ष वाढलें असें धरतो. सर्वसामान्य अंतर्गत व्यवहारांत व आंतरराष्ट्रीय व्यवहारांत एक प्रकारची सुसंबद्धता असावी आणि उगीच आकडेमोड करावी लागूं नये, म्हणून त्यांनीं ठोकळमानानें १ जानेवारी हाच सर्व नागरिकांचा व सबंध राष्ट्राचाही वर्षदिन म्हणून मानण्यास सुरुवात केली. अर्थात् हा दिवस इतर पाश्चात्त्य राष्ट्रांप्रमाणें जपानांतही महत्त्वाचा समजण्यांत येतो. या दिवशीं गतवर्षांतील कार्याचा आढावा घेणें व नवें वर्ष भरभराटीचें होण्याच्या दृष्टीनें शुभेच्छा व्यक्त करणें वगैरे कार्यक्रम होतात. युद्धाच्या दिवसांत तर या वर्षदिनास फारच महत्त्व असतें; कारण गतवर्षांतील आपलें कार्य फुगवून सांगणें व नव्या वर्षांतील भावी कार्याबद्दल मोठमोठया वलगना शत्रुराष्ट्रांस उच्च स्वरानें सांगणें हें कार्य या दिवशीं व्हावयाचें असतें! १ जानेवारी १९४४ रोजीं या वर्षदिनानिमित्त 'हिकारी कीकान' च्या सिंगापुरांतील माऊंट प्लेझेंटवरील कार्यालयांत दुपारीं २ वाजतां अल्पाहाराचा समारंभ होता. कर्नल भोसले, मी व स्वातंत्र्यसैन्याचे एक-दोघे अधिकारी, तीन-चार जपानी अधिकारी व दोघे जर्मन अधिकारी अशी मंडळी या अल्पाहाराच्या प्रसंगीं उपस्थित होती. तत्पूर्वीं स्वातंत्र्यसैन्यांतील वीस-पंचवीस महाराष्ट्रीय सैनिकांनीं मल्लखांबावरील बरेच चांगले चांगले प्रयोग करून दाखविले. जपानी, जर्मन व इतर सर्व हिंदी अधिकाऱ्यांससुद्धां हे प्रयोग फारच प्रेक्षणीय वाटले. मल्लखांब हें महाराष्ट्रांचें वैशिष्ट्य आहे. याप्रकारचें व्यायाम-साधन हिंदुस्थानांतच काय परंतु जगांतही दुसरें कांहीं नाहीं.

सिंगापुरांतील जर्मन आरमारी-प्रतिनिधी 'कॅपितान यरहार्ट' व त्यांचे सल्लागार 'डॉक्टर पिप्पॉन' हे अल्पाहार प्रसंगीं ज्या जागीं बसले होते, तिच्यासमोर कर्नल भोसले व स्वातंत्र्यसैन्याचे लेफ्टनंट कर्नल हुद्याचे एक अधिकारी बसलेले होते. अल्पाहारास जपानी पद्धतीनें तयार केलेले बरेचसे पदार्थ होते. 'साके' नांवाची तांदुळापासून तयार केलेली जपानी दारूही होती. फराळ, मदिराप्राशन व गप्पा असा तो समारंभ चालला होता. अशा प्रसंगीं खाण्याच्या वस्तूंपेक्षां मदिरेचा आग्रह करणेंच योग्य समजलें जात असल्यामुळें ज्याच्या त्याच्या प्रकृतीच्या व संयमनाच्या मानानें प्रत्येकाच्या चेहऱ्यावर मदिरेचा कमी जास्त अम्मल दिसून येत होता. चेहऱ्यावर लाली व धर्मबिंदू आणि बोलतांना घसरणारी आणि सैल सुटलेली जिव्हा, अशी कमी जास्त प्रमाणांत या सर्व अधिकाऱ्यांची

स्थिति झालेली होती. जपानी अधिकाऱ्यांचा एक गुणविशेष येथें लक्षांत घेण्यासारखा आहे तो असा कीं, अशा समारंभांत ते राजकीय विषयावर बोलण्याचें सहसा टाळतातच, परंतु मदिरेचा अंमल चढूं लागला कीं ते अवांतर बडबड करतील परंतु राजकारणाबद्दल एक शब्दसुद्धां उच्चारणार नाहींत. आमच्या हिंदी अधिकाऱ्यांबद्दल मात्र तसें नाहीं, असें दुर्दैवानें म्हणावें लागतें. किंबहुना कोणत्याच हिंदी माणसाला लहानपणापासून असें शिक्षण नसतें, असें म्हटलें तरी चालेल. आम्ही पाश्चात्त्यांचे किंवा कोणाही परक्यांचे दुर्गुण तेवढे उचलतों, असेंच कित्येकदां आढळून येतें.

बोलतां बोलतां सहज प्रश्न निघाला, प्रत्येक राष्ट्रांत सर्वांत शूर कोण ? किंवा अगदीं पहिल्या प्रतीचा सैनिक कोण ? कॅपितान यरहार्ट म्हणाला, "जर्मनींत विचाराल तर हर हिटलर हाच या बाबतींत सर्वश्रेष्ठ म्हटला पाहिजे." नंतर त्यानें आमच्या या लेफ्टनंट कर्नल अधिकाऱ्यास प्रश्न केला, "तुमच्या स्वातंत्र्यसेनेंत पहिल्या प्रतीचा सैनिक कोण आहे ? सांगा बघूं !" आमचे हे राजश्री म्हणाले, "तें अजून दृष्टोत्पत्तीस यावयाचें आहे, इतक्यांतच कांहीं सांगतां येणार नाहीं." कॅप्टन यरहार्टला आश्चर्य वाटून तो म्हणाला, "म्हणजे तुमच्या बाजूला नेताजी सुभाषचंद्र बोस हे पहिल्या प्रतीचे सैनिक नाहींत, असें तुमचें म्हणणें आहे कीं काय ?" तो हिंदी अधिकारी उत्तरला, "ते सैनिक कुठें आहेत ? ते तर सिव्हिलियन आहेत" यानंतर अशाच प्रकारचीं त्या दोघांचीं बरींच प्रश्नोत्तरें झालीं. तो जर्मन अधिकारी सारखा म्हणे, "छे...छे असें कसें म्हणतां !...नेताजी हेच तुमच्या बाजूचे सर्वश्रेष्ठ सैनिक." वास्तविक जी गोष्ट आमच्या या हिंदी अधिकाऱ्यानें अभिमानानें प्रतिपादन करावयास पाहिजे होती, ती गोष्ट तो जर्मन अधिकारी ठांसून सांगत होता. मला व जगन्नाथराव भोसल्यांनाही आमच्या या हिंदी अधिकाऱ्याचा फारच संताप आला व त्याच्या वृत्तीचें नवलही वाटलें. रोमारोमांत भरलेली गुलामी वृत्ति ती हीच ! या हिंदी अधिकाऱ्याची अशी ठाम समजूत झालेली होती कीं, इंग्रज ज्यास 'सैनिक' म्हणतील तोच सैनिक व इतर सर्व 'सिव्हिलियन्स' अथवा बिनफौजी लोक. सैनिक म्हणजे रिक्रुटिंग ऑफिसरतर्फे ज्याचें नांव फौजी बुकांत नोंदलें जाईल, ज्याला एकाद्या गोऱ्या अधिकाऱ्याकडून पगार व खाकी पोषाख मिळेल, जो रोज 'लेफ्ट राईट' अशी कवाईत करून सलाम करील तो सैनिक व इतर सर्व बिनफौजी लोक, अशीच सर्व इंग्रजप्रणीत हिंदी सैन्यांतील अधिकाऱ्यांची समजूत झालेली असते. त्यांचीं मनें सुविद्य व सुसंस्कृत नसल्यामुळें त्यांस स्वतंत्र विचार करण्याची संवयच नसते. इंग्रजांच्या तोंडून निघेल किंवा त्यांच्या वर्तुणुकींतून प्रतीत होईल तेंच त्रिकालाबाधित सत्य अशी त्यांच्या बुद्धीची ठेवण होऊन जाते. वर उल्लेखिलेल्या समजुतीहून बालिश, अपरिपक्व आणि कोती अशी दुसरी कोणती समजूत असूं शकेल ?

जो वीर आहे, ज्यास दोन हात करावयाची हिम्मत आहे, ज्याच्यापाशीं दुर्दम्य उत्साह आहे, ज्याला शत्रूविषयीं अतोनात चीड आहे, ज्याच्यांत भाडुत्राई पणाचा किंवा स्वार्थाचा लवलेशही नाहीं व ज्यानें शत्रूचें पारिपत्य करण्याचा विडा उचललेला आहे, अशाहून श्रेष्ठ असा सैनिक कोण असूं शकेल ? शस्त्रास्त्रविद्या आणि कवाईतही येत असेल तर उत्तमच, परंतु ही नसेल किंवा रिक्रूटिंग ऑफिसरची शिफारस, फौजी पोषाख व नोंदणीबुकांत नांव या गोष्टी नसतील तर तो सैनिक नाहीं असें म्हणणें घोडचूक होईल. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचें तर ठिकठिकाणीं सर्व प्रकारचें लष्करी शिक्षण झालेलें आहे. स्वातंत्र्यसेनेचे सरसेनापति या नात्यानें सैन्याच्या नोंदणीबुकांत त्यांचें पहिलें नांव होतेंच ! एवढेंच कीं वर उल्लेखिलेले अधिकारीमहाशय हे ज्याप्रमाणें सिंगापुरांत युद्धबंदी होण्यापूर्वी वयांत आल्यापासुन इंग्रजांचे फौजी नोकर होते तसे नेताजी कधींच कोणत्याही खात्यांत इंग्रजांच्या नोकरींत नव्हते ! वीरवृत्ति हें सैनिकाचें द्योतक आहे; इंग्रजी फौजी रजिस्टर बुकांतील नोंद नव्हे !

आम्ही लगेच तो विषय बदलून संभाषणाचा ओव दुसरीकडे वळविला. परंतु झाला तो प्रकार परक्यांसमोर, विशेषतः जपानी व जर्मन यांच्यासारख्या वीर-वृत्तीच्या व राष्ट्रीय वृत्तीच्या लोकांसमोर फारच लज्जास्पद झाला. त्या आनंदाच्या समारंभांत मिठाचा खडा पडल्याप्रमाणें होऊन आम्ही लवकरच कार्यबाहुल्याचें निमित्त करून तेथून उठलों.

१९४४ सालीं घडलेला दुसरा एक महत्त्वाचा प्रसंग म्हणजे नेताजींची सुवर्णतुला. रंगूनमधील सर्व हिंदी लोकांनीं स्वयंस्फूर्तीनें त्यांची सुवर्णतुला करण्याचें ठरविलें. धनाढ्य, व्यापारी, श्रीमंत, नागरीक व गरीब परंतु देशप्रेमी व स्वार्थत्यागी हिंदी स्त्री-पुरुष, या सर्वांच्या सहकार्यानें आणि नेताजींबद्दलच्या त्यांच्या उत्कट प्रेमभावामुळेंच हें सर्व शक्य झालें.

आधुनिक स्वतंत्र राष्ट्राचीं सर्व लक्षणें हिंदी स्वातंत्र्य-सरकारांतसुद्धां असावींत म्हणून 'आझाद हिंद बँक' १९४४ च्या एप्रिल महिन्यांत रंगूनला नं. ९४ पार्करोड या ठिकाणीं स्थापण्यांत आली. पन्नास लाखांचे शेअर्स काढण्यांत आलेले होते. पैकीं पंचवीस लक्ष रुपये तावडतोब द्यावयाचे व उरलेले पंचवीस लक्ष बँक मागेल तेव्हां भरावयाचे, अशी विभागणी करण्यांत आलेली होती. स्वतंत्र ब्रह्मी राष्ट्राच्या कायद्यान्वयें ही बँक सरकारांत नोंदली ( रजिस्टर ) गेली होती. या बँकेंतील सरकारी खात्यांत वीस कोटि रुपये स्वातंत्र्य-सरकारातर्फे जमा होते. यापैकीं पंधरा कोटी ब्रह्मदेशांतील हिंदी लोकांच्या देणग्या होत्या व पांच कोटि मलायांतील हिंदी लोकांच्या देणग्या होत्या. लोकांच्या खाजगी ठेवींची एकूण रक्कम चाळीस लक्ष होती. स्वातंत्र्य-सैन्याच्या खर्चास या बँकेंतून सरकारातर्फे दरवर्षी तीस लक्ष रुपये दिले जात. स्वातंत्र्य-सरकाराचे सर्व आंतरराष्ट्रीय व्यवहार या

बँकेतर्फेच चालत. पुढें पुढें या बँकेची पुष्कळच भरभराट झाली. ब्रह्मदेशांत इतर कोणत्याही बँकेपेक्षां या बँकेचें महत्त्व अधिक वाढलें होतें.

स्वतंत्र ब्रह्मदेशाचे अधिपति डॉक्टर बा मॉ यांच्या मुलीच्या विवाहप्रसंगीं, ब्रह्मदेशानें हिंदी स्वातंत्र्य-सरकारास दिलेल्या अनेक सवलतींबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याकरतां म्हणून नेताजींनीं पांच लक्ष रुपयांची देणगी दिली. जपानी आरमारास व जपानी फौजेस, कधीं दहा, कधीं वीस अशीं विमानेंही त्यांनीं वेळोवेळीं दिलीं. ' हिंदी स्वातंत्र्य-सरकाराचे स्वतःचे कारखाने नसतांनाही हीं विमानें नेताजींनीं जपान्यांस दिलीं कोठून ? उलट हिंदी स्वातंत्र्य-सरकारच जपान्यांकडून विमानें घेत असे ! ' हा प्रश्न साहजिकच उद्‌भवतो. जपानी विमानांच्या किंमतीबद्दल तपास करून वेळोवेळीं जितकीं विमानें भेट द्यावयाचीं असतील तेवढी रक्कम या बँकेंतून दिली जात असे. एका वेळीं नेताजींनीं जपानी आरमार व जपानी फौज यांस प्रत्येकीं दहा-दहा विमानें भेट म्हणून देऊं केलीं होतीं. तीं विमानें तयार होऊन सिंगापुराच्या कँग विमानतळावर आलेलीं होतीं. नेताजी त्या वेळेस ब्रह्मदेशांत होते. वर उल्लेखिलेल्या विमानतळावर हीं विमानें नजर करण्याचा व त्यांचा नामकरणविधी करण्याचा मोठा समारंभ पार पाडण्यांत आला. याच वेळीं सिंगापुरांतील चिनी व यूरेशियन नागरिकांनींही आपापल्या संघटनेतर्फे दोन-चार विमानें जपानी राष्ट्रास नजर केलीं होतीं. म्हणून या प्रसंगीं त्यांचे प्रतिनिधीही हजर होते. हिंदी स्वातंत्र्य-सरकारातर्फे नेताजींच्या जागीं कर्नल जगन्नाथराव भोसले व डॉक्टर लक्ष्मैया हे दोघे हजर होते. विलायती पोषाख केलेले जपानी धर्मगुरु ओळीनें उभ्या केलेल्या विमानांच्या रांगेजवळ आले. आजूबाजूला हास्यवदनी मुलांबाळांची आणि निरनिराळ्या देशांतील स्त्री-पुरुषांची गर्दी होती. जपानी धर्मगुरु सैनिकाप्रमाणेंच पूर्ण मुंडन केलेले असतात. त्यांनीं उदक शिंपडून व कसल्याशा वृक्षांचीं पानें त्या विमानांवर फेंकून विमानांचा ' शांति-समारंभ ' उरकला.

दोन महिन्यांचा आघाडीचा दौरा संपवून नेताजी जुलै महिन्याच्या २ तारखेस रंगूनला परत आले. दिवसेंदिवस आघाडीवरील वृत्त त्यांच्या कानीं येऊन त्यांस स्वातंत्र्यसैनिकांच्या हालअपेष्टांबद्दल व उपासमारीबद्दल फारच वाईट वाटत होतें. तरी धीर सोडावयाचा नाहीं व आपल्या ध्येयमार्गापासून मुळींच च्युत व्हावयाचें नाहीं, हें त्यांच्या जीवनाचें पहिलें तत्त्व असल्यामुळें त्यांनीं शोक करण्यांत अगर वाईट वाटूं देण्यांत कधीं एक क्षणही फुकट घालविला नाहीं. आलेल्या परिस्थितीस तोंड देण्याच्या पुढील कार्यास ते चटकन् लागत असत.

१९४४ च्या फेब्रुवारीअखेर श्रीमती कस्तुरबा गांधी इंग्रजांच्या कैदेंत दिवंगत झाल्या. त्याप्रसंगीं दुःखप्रदर्शनार्थ दूरपूर्वेंत सर्व ठिकाणीं सभा भरविण्यांत आल्या. त्यांच्या मृत्यूनें दूरपूर्वेंतील सर्व हिंदी जनतेंत इंग्रजांबद्दलचा त्वेष द्विगुणित झालेला होता. हिंदी स्वातंत्र्य-सरकारातर्फे हा राष्ट्रीय दुःखाचा दिन

जो वीर आहे, ज्यास दोन हात करावयाची हिम्मत आहे, ज्याच्यापाशीं दुर्दम्य उत्साह आहे, ज्याला शत्रूविषयीं अतोनात चीड आहे, ज्याच्यांत भाडूत्राई पणाचा किंवा स्वार्थाचा लवलेशही नाहीं व ज्यानें शत्रूचें पारिपत्य करण्याचा विडा उचललेला आहे, अशाहून श्रेष्ठ असा सैनिक कोण असूं शकेल ? शस्त्रास्त्रविद्या आणि कवाईतही येत असेल तर उत्तमच, परंतु ही नसेल किंवा रिक्रूटिंग ऑफिसरची शिफारस, फौजी पोषाख व नोंदणीबुकांत नांव या गोष्टी नसतील तर तो सैनिक नाहीं असें म्हणणें घोडचूक होईल. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचें तर ठिकठिकाणीं सर्व प्रकारचें लष्करी शिक्षण झालेलें आहे. स्वातंत्र्यसेनेचे सरसेनापति या नात्यानें सैन्याच्या नोंदणीबुकांत त्यांचें पाहिलें नांव होतेंच ! एवढेंच कीं वर उल्लेखिलेले अधिकारीमहाशय हे ज्याप्रमाणें सिंगापुरांत युद्धबंदी होण्यापूर्वी वयांत आल्यापासुन इंग्रजांचे फौजी नोकर होते तसे नेताजी कधींच कोणत्याही खात्यांत इंग्रजांच्या नोकरींत नव्हते ! वीरवृत्ति हें सैनिकाचें द्योतक आहे; इंग्रजी फौजी रजिस्टर बुकांतील नोंद नव्हे !

आम्ही लगेच तो विषय बदलून संभाषणाचा ओघ दुसरीकडे वळविला. परंतु झाला तो प्रकार परक्यांसमोर, विशेषतः जपानी व जर्मन यांच्यासारख्या वीर-वृत्तीच्या व राष्ट्रीय वृत्तीच्या लोकांसमोर फारच लज्जास्पद झाला. त्या आनंदाच्या समारंभांत मिठाचा खडा पडल्याप्रमाणें होऊन आम्ही लवकरच कार्यबाहुल्याचें निमित्त करून तेथून उठलों.

१९४४ सालीं घडलेला दुसरा एक महत्त्वाचा प्रसंग म्हणजे नेताजींची सुवर्णतुला. रंगूनमधील सर्व हिंदी लोकांनीं स्वयंस्फूर्तीनें त्यांची सुवर्णतुला करण्याचें ठरविलें. धनाढ्य, व्यापारी, श्रीमंत, नागरीक व गरीब परंतु देशप्रेमी व स्वार्थत्यागी हिंदी स्त्री-पुरुष, या सर्वांच्या सहकार्यानें आणि नेताजींबद्दलच्या त्यांच्या उत्कट प्रेमभावामुळेंच हें सर्व शक्य झालें.

आधुनिक स्वतंत्र राष्ट्राचीं सर्व लक्षणें हिंदी स्वातंत्र्य-सरकारांतसुद्धां असावींत म्हणून 'आझाद हिंद बँक' १९४४ च्या एप्रिल महिन्यांत रंगूनला नं. ९४ पार्करोड या ठिकाणीं स्थापण्यांत आली. पन्नास लाखांचे शेअर्स काढण्यांत आलेले होते. पैकीं पंचवीस लक्ष रुपये ताबडतोब द्यावयाचे व उरलेले पंचवीस लक्ष बँक मागेल तेव्हां भरावयाचे, अशी विभागणी करण्यांत आलेली होती. स्वतंत्र ब्रह्मी राष्ट्राच्या कायद्यान्वयें ही बँक सरकारांत नोंदली ( रजिस्टर ) गेली होती. या बँकेंतील सरकारी खात्यांत वीस कोटि रुपये स्वातंत्र्य-सरकारातर्फे जमा होते. यापैकीं पंधरा कोटी ब्रह्मदेशांतील हिंदी लोकांच्या देणग्या होत्या व पांच कोटि मलायांतील हिंदी लोकांच्या देणग्या होत्या. लोकांच्या खाजगी ठेवींची एकूण रक्कम चाळीस लक्ष होती. स्वातंत्र्य-सैन्याच्या खर्चास या बँकेंतून सरकारातर्फे दरवर्षी तीस लक्ष रुपये दिले जात. स्वातंत्र्य-सरकाराचे सर्व आंतरराष्ट्रीय व्यवहार या

बँकेतर्फेंच चालत. पुढें पुढें या बँकेची पुष्कळच भरभराट झाली. ब्रह्मदेशांत इतर कोणत्याही बँकेपेक्षां या बँकेचें महत्त्व अधिक वाढलें होतें.

स्वतंत्र ब्रह्मदेशाचे अधिपति डॉक्टर बा मॉ यांच्या मुलीच्या विवाहप्रसंगीं, ब्रह्मदेशानें हिंदी स्वातंत्र्य-सरकारास दिलेल्या अनेक सवलतींबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याकरतां म्हणून नेताजींनीं पांच लक्ष रुपयांची देणगी दिली. जपानी आरमारास व जपानी फौजेस, कधीं दहा, कधीं वीस अशीं विमानेंही त्यांनीं वेळोवेळीं दिलीं. ' हिंदी स्वातंत्र्य-सरकाराचे स्वतःचे कारखाने नसतांनाही हीं विमानें नेताजींनीं जपान्यांस दिलीं कोठून ? उलट हिंदी स्वातंत्र्य-सरकारच जपान्यांकडून विमानें घेत असे ! ' हा प्रश्न साहजिकच उद्‌भवतो. जपानी विमानांच्या किंमतीबद्दल तपास करून वेळोवेळीं जितकीं विमानें भेट द्यावयाचीं असतील तेवढी रक्कम या बँकेंतून दिली जात असे. एका वेळीं नेताजींनीं जपानी आरमार व जपानी फौज यांस प्रत्येकीं दहा-दहा विमानें भेट म्हणून देऊं केलीं होतीं. तीं विमानें तयार होऊन सिंगापुराच्या कँग विमानतळावर आलेलीं होतीं. नेताजी त्या वेळेस ब्रह्मदेशांत होते. वर उल्लेखिलेल्या विमानतळावर हीं विमानें नजर करण्याचा व त्यांचा नामकरणविधी करण्याचा मोठा समारंभ पार पाडण्यांत आला. याच वेळीं सिंगापुरांतील चिनी व यूरेशियन नागरिकांनींही आपापल्या संघटनेतर्फे दोन-चार विमानें जपानी राष्ट्रास नजर केलीं होतीं. म्हणून या प्रसंगीं त्यांचे प्रतिनिधीही हजर होते. हिंदी स्वातंत्र्य-सरकारातर्फे नेताजींच्या जागीं कर्नल जगन्नाथराव भोसले व डॉक्टर लक्षुमेया हे दोघे हजर होते. विलायती पोषाख केलेले जपानी धर्मगुरु ओळीनें उभ्या केलेल्या विमानांच्या रांगेजवळ आले. आजूबाजूला हास्यवदनी मुलांबाळांची आणि निरनिराळ्या देशांतील स्त्री-पुरुषांची गर्दी होती. जपानी धर्मगुरु सैनिकांप्रमाणेंच पूर्ण मुंडन केलेले असतात. त्यांनीं उदक शिंपडून व कसल्याशा वृक्षांचीं पानें त्या विमानांवर फेंकून विमानांचा ' शांति-समारंभ ' उरकला.

दोन महिन्यांचा आघाडीचा दौरा संपवून नेताजी जुलै महिन्याच्या २ तारखेस रंगूनला परत आले. दिवसेंदिवस आघाडीवरील वृत्त त्यांच्या कानीं येऊन त्यांस स्वातंत्र्यसैनिकांच्या हालअपेष्टांबद्दल व उपासमारीबद्दल फारच वाईट वाटत होतें. तरी धीर सोडावयाचा नाहीं व आपल्या ध्येयमार्गापासून मुळींच च्युत व्हावयाचें नाहीं, हें त्यांच्या जीवनाचें पहिलें तत्त्व असल्यामुळें त्यांनीं शोक करण्यांत अगर वाईट वाटूं देण्यांत कधीं एक क्षणही फुकट घालविला नाहीं. आलेल्या परिस्थितीस तोंड देण्याच्या पुढील कार्यास ते चटकन् लागत असत.

१९४४ च्या फेब्रुवारीअखेर श्रीमती कस्तुरबा गांधी इंग्रजांच्या कैदेंत दिवंगत झाल्या. त्याप्रसंगीं दुःखप्रदर्शनार्थ दूरपूर्वेंत सर्व ठिकाणीं सभा भरविण्यांत आल्या. त्यांच्या मृत्यूनें दूरपूर्वेंतील सर्व हिंदी जनतेंत इंग्रजांबद्दलचा त्वेष द्विगुणित झालेला होता. हिंदी स्वातंत्र्य-सरकारातर्फे हा राष्ट्रीय दुःखाचा दिन

म्हणून पाळण्यांत आला. खुद्द जपानमध्येंही हा दिन सरकारी शिष्टाचाराप्रमाणें पाळण्यांत येऊन त्यांत सर्व जपानी जनतेनें भाग घेतला. या प्रसंगानंतर महात्मा गांधीची सुटका करून हिंदुस्थानाचे व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल यांनीं त्यांच्याशीं सलोखा घडवून आणण्याच्या दृष्टीनें पत्रव्यवहार सुरू केला. परंतु पूर्ण स्वातंत्र्य मिळाल्याखेरीज सलोखा शक्य नाहीं, असें महात्मा गांधींनीं त्यांस स्पष्ट शब्दांत सांगितल्यामुळें नेताजी हर्षभरित झाले.

६ जुलै रोजीं रंगून रेडिओवरून त्यांनीं महात्मा गांधींस उद्देशून एक भाषण केलें. त्यांत "हिंदुस्थानाचे पूज्य पिताजी" असा महात्मा गांधींचा त्यांनीं उल्लेख केला. महात्मा गांधींनीं, इंग्रजांना हिंदुस्थान सोडून जाण्याबद्दल स्पष्ट शब्दांत सांगून जी चळवळ सुरू केली होती, तीबद्दल महात्मा गांधींना धन्यवाद देऊन नेताजींनीं त्यांस असें अभिवचन दिलें कीं, इंग्रजांना हिंदुस्थान सोडून जावयास लावण्यासाठींच त्यांनीं शस्त्र उचललें होतें व तें ध्येय साध्य होईपर्यंत शस्त्र खालीं न ठेवण्याचा त्यांचा निर्धार होता. आणि त्या कार्यांत त्यांनीं महात्मा गांधीच्या आशीर्वादाची याचना केली.

दूरपूर्वेंतील हिंदी जनता दरवर्षीं २ जुलैपासून ९ जुलैपर्यंत नेताजी-सप्ताह साजरा करीत असे; कारण २ जुलै (१९४३) रोजीं नेताजी सिंगापुरास येऊन त्या दिवशींपासून त्यांच्या दूरपूर्वेंतील कार्यास आरंभ झाला. हा सप्ताह फारच उत्साहानें साजरा केला जात असे. १९४४ च्या जुलै महिन्यांत हिंदी स्वातंत्र्यसैन्यानें इंफालपासून माघार घ्यावयास सुरुवात केल्यामुळें पुढील प्रयत्न याहून अधिक जोरदार व्हावा एवढ्याकरतां नेताजींनीं या सप्ताहांत "करो सब निछावर और बनो सब फकीर" (सर्व कांहीं त्यागा, अंगीं बाणवा वैराग्य) हा स्फूर्तिदायक संदेश हिंदी जनतेस दिला. त्यास अनुसरून श्री. हबीब या ब्रह्मदेशांतील धनाढ्य हिंदी व्यापाऱ्यानें आपली एक कोटि, तीस लक्षांची सर्व मिळकत नेताजींच्या चरणीं अर्पण केली. त्यानिमित्त ९ जुलै रोजीं म्हणजे नेताजीसप्ताहाच्या अखेरच्या दिवशीं मोठा समारंभ होऊन श्री. हबीब यांस 'सेवक–ए–हिंद'चें पदक देण्यांत आलें. श्री. हबीब यांच्या उज्ज्वल उदाहरणाचें अनुकरण करून जो कोणी आपल्या सर्वस्वाचा त्याग करील, त्यास वर उल्लेखिलेलें पदक देण्याचें ठरलें. नेताजींनीं श्री. हबीब यांचा गौरवपूर्ण उल्लेख करून त्यांच्यासारखा त्याग करण्याचा इतरांस उपदेश केला. नेताजींची सुवर्णतुलाही याच सप्ताहांत झाली. थोड्याच दिवसांत श्रीमती बेताई या गुजराथी स्त्रीनें स्वतःची तीस लक्षांची सर्वच्या सर्व मिळकत नेताजींच्या चरणीं वाहिली. रंगूनमधील एका धनाढ्य व्यापाऱ्याच्या या धर्मपत्नी होत. त्यांचाही गौरव करून नेताजींनीं त्यांस 'सेवक–ए–हिंद'चें पदक दिलें. या दोघां व्यक्तींचा हा त्याग खरोखरच फार मोठा होता. १० जुलै रोजीं रंगूनला जाहीर सभेंत नेताजींनीं व्याख्यान दिलें. त्यांत त्यांनीं हिंदी जनतेस सांगितलें

कीं, “ही वेळ मागें पुढें पाहाण्याची नव्हे. सबंध हिंदुस्थानाचा — अडतीस कोटि जनतेचा प्रश्न लक्षांत घेतां आपण कःपदार्थ आहोंत. श्रीमती बेताई व श्री. हबीब यांच्यासारखा त्याग करावयास शिका. आपल्याला एका बलाढ्य शत्रूशीं लढावयाचें आहे. ती साधीसुधी गोष्ट नव्हे. केवढाही स्वार्थत्याग केलात तरी तो कमीच पडेल......... ”

मोगल बादशहांच्या परंपरेंतील शेवटचा बादशहा, बहादुरशहा झाफरशहा ह्यास १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धानंतर इंग्रजांनीं पकडून, दिल्लीच्या लाल किल्ल्यांत त्याचा खटला चालवून, रंगून येथें हद्दपार केलें. तेथें अत्यंत गरिबींत त्याचा, त्याच्या मुलीचा व बायकोचा अंत झाला. तीं सर्वजण ज्या ठिकाणीं एका झोंपडींत राहात असत, तेथून थोड्याशाच अंतरावर या तिघांच्या कबरी एकमेकांस चिकटून बांधलेल्या आहेत. त्या कबरींवर एका वृक्षाची छाया आहे. कबरींच्या आजूबाजूस भिंती बांधण्यांत आलेल्या असून, वर पत्र्याचें छप्पर आहे. सर्व आवाराभोंवतीं ७-८ फूट उंच अशी मशिदीच्या धाटणीची एक भिंत आहे. दाराशीं दोन मिनार आहेत. आंतल्या बाजूस फकिरांना राहावयास कांहीं ओबडधोबड पडव्या व खोल्या बांधलेल्या आहेत. त्या कबरींची सेवा करण्यास तेथें एक-दोन माणसें कायमचीं राहिलेलीं आहेत. इतरही चार-पांच फकीर तेथें राहातात. नेताजींनीं स्वातंत्र्य-सरकारातर्फे या कबरींचा जीर्णोद्धार करविला. ११ जुलै हा बहादुरशहाचा मृत्युदिवस असल्यामुळें ११ जुलै १९४४ रोजीं त्या कबरींसमोर हिंदी स्वातंत्र्यसैन्याचा खास कवाईत-समारंभ झाला. बहादूरशहाच्या विटंबनेबद्दल पूर्ण सूड उगवून हिंदुस्थानाला पूर्वीची इभ्रत व मानाचें स्थान मिळवून देण्याची सर्वांनीं शपथ वाहिली. या रस्त्यास आज ‘झापरशहा रोड’ असें नांव आहे. हें ठिकाण रंगून शहरांतच आहे.

पॅसिफिक महासागरांतील परिस्थिति दिवसेंदिवस जास्तच गंभीर होऊं लागली. अमेरिकेचा जोर वाढूं लागला. शेंकडों विमानें, कित्येक विमानवाहक बोटी, विनाशिका, पाणबुड्या, लढाऊ जहाजें व सैन्यवाही बोटी असे मोठमोठे काफिले पाठवून, अमेरिकेनें पॅसिफिक महासागरांतील जपानच्या भूप्रदेशाजवळ असलेल्या एकेका लहान लहान बेटावर भराभर सैन्य उतरविण्यास आरंभ केला. जून महिना अखेर जपान देशाच्या अर्ध्या वाटेवर असलेलें ‘सायपान’ हें महत्त्वाचें बेट अमेरिकेनें काबीज केलें. जुलैमध्यें ‘ग्वाम’ बेटावर त्यांनीं सैन्य उतरविलें. तेंही हातचें जाईल अशीं चिन्हें दिसूं लागलीं. अंतिम विजय आपलाच होणार, असें टोजो-मंत्रिमंडळ पुनः पुनः सांगत होतें, तरी सायपानसारखें महत्त्वाचें बेट हातून गेल्यामुळें सर्व जपान खडबडून जागा झाला व टोजो-मंत्रिमंडळाकडून हें काम तडीस जाणें शक्य नाहीं, असेंच सर्व वृद्ध जपानी मुत्सद्यांचें मत पडलें. असंख्य अमेरिकन बोटी आणि विमानें रोज पुढें पुढें येऊन हल्ले करीत होतीं व बेटांवर सैन्य उतरवीत होतीं. एवढ्या अजस्त्र तांड्यास तोंड देणें सोपें काम नव्हतें.

लढाऊ वृत्तीच्या दृष्टीनें पाहतां एक जपानी शिपाई दहा अमेरिकन शिपायांस भारी होता! परंतु या सुमारास अमेरिकन सैन्यास हवाई व आरमारी मदत बेसुमार होती, तर उलट जपान्यांना ती अगदींच तोकडी पडली. जपान्यांच्या सैन्याच्या दुसपट अमेरिकन सैन्य दर बेटावर उतरविण्यांत येत असे. जपानी फारच कडवेपणानें लढत असत. त्यांचा प्रत्येक शिपाई लढण्याची पराकाष्ठा करीत असे. आपला मुख्य अधिकारी बघत असो वा नसो, पथकाचा नायक जिवंत असो वा नसो, जपानी शिपाई एकटा राहिला तरी अक्षरशः शरिरांत प्राण असेपर्यंत जीव तोडून लढत असे. कारण शत्रूस शरण जाणें अथवा शत्रूचे बंदी होणें यापेक्षां लज्जास्पद तें काय! अशी त्यांच्या मनाची पूर्ण खात्री झालेली असते. कांहीं बेटांवर सर्व सैनिक संपुष्टांत आले त्या वेळीं शाळेंत जाणाऱ्या ८ ते १६ वर्षपर्यंतच्या जपानी मुलांमुलींनीं हातांत स्फोटगोल घेऊन शत्रूवर शेवटचा हल्ला केला. कोणीही शत्रूस जिवंत शरण गेला नाहीं! अशीं स्फूर्तिदायक उदाहरणें ज्या देशाच्या इतिहासांत अनेक घडलीं त्या देशाची खरोखरच धन्य होय! प्रत्येक नागरिकाच्या व प्रत्येक सैनिकाच्या मनांत देशभक्तीचें, पराक्रमाचें व वीरश्रीचें बीं कायमचें रुजविण्यास त्यांच्या माता, पालक, शिक्षक व त्यांची शिक्षणपद्धति हीं सर्व कारणीभूत होतात. त्यांची शिक्षणपद्धति बहुतांशीं जर्मन शिक्षणपद्धतीवरून घेतलेली आहे. त्यांच्या शिक्षणपद्धतींत कांहीं असामान्य गुण आहेत यांत शंका नाहीं.

याच सुमारास प्रत्यक्ष जपानमधील परिस्थिति कशी होती हें सांगणें जरूर आहे. जपानमध्यें युद्धकालांत प्रत्येक घरांतून जितकीं माणसें युद्ध-कार्यावर बाहेर गेलेलीं असत, त्यांच्या प्रत्येकाच्या नांवानें एक एक झेंडा (जपानी) त्या घरावर उभारलेला असे. अशा तऱ्हेनें कोणत्याही घराकडे दृष्टि टाकून त्यावरील निशाणें मोजलीं कीं त्या घरांतून किती माणसें लढाईवर परदेशीं गेलीं आहेत त्याची चटकन् कल्पना येई. प्रत्येक कुटुंबांत या बाबतींत एक-प्रकारची चुरस लागलेली असे व प्रत्येक कुटुंबास ती एक अभिमानाची गोष्ट होऊन बसे. घरांतील बायका, घरचें काम आटोपून दिवसभर निरनिराळ्या सरकारी कारखान्यांतून कामें करीत व शिवाय आपलें धान्यवांटप घ्यावयास तासन् तास रांगेनें त्या वाटपकेंद्रांपाशीं उभ्या राहात. न्हावी, धोबी व हॅटेल-वाले यांचीं दुकानें अजिबात बंद करण्यांत येऊन त्यांना निरनिराळ्या युद्ध-सामुग्रीच्या उत्पादक कारखान्यांत कामाला लावण्यांत आलेलें होतें. न्हावी व धोबी लोक फावल्या वेळीं, रात्रीं बेरात्रीं आपल्या गिऱ्हाइकांचें काम करून देत. तेवढ्याकरतां ते एक विशिष्ट दिवस आणि वेळ नेमून टाकीत. त्या विशिष्ट दिवसांचे दोन-तीन दिवस अगोदरच त्यांच्याकडे गिऱ्हाइकांचीं नांवें येऊन पडत. तेथेंसुद्धां प्रत्येकास नंबर लावावा लागे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम .................... वि: ....................
क्रमांक ....................



आपण हिंदुस्थानांतलें 'रेशनिंग' (दर माणशीं नेमलेलें धान्य अथवा कापडवांटप) अपुरें असल्याची तक्रार करितों. अर्थात् हिंदुस्थानांत परकी सरकार असल्यामुळें हें ठीक आहे; कारण परक्यांच्या अंमलामुळेंच भारताची आज अशी उपासमार होत आहे. परंतु आज आपल्याला ज्या प्रमाणांत धान्य किंवा कापड मिळत आहे त्याच्या एक शतांश प्रत्येक जपान्यास मिळत होतें, हें कदाचित् कोणाला खरें वाटावयाचें नाहीं. जागतिक युद्ध संपण्याच्या सहा महिने अगोदर वर्षाकाठीं एक गज कापड, रोज दोन्ही वेळांकरतां मिळून मूठभर तांदूळ आणि एक मासा हें जपानांतील दर माणशीं वांटणीचें प्रमाण होतें. इतकें असूनसुद्धां एकाही नागरिकानें शत्रूस शरण जाण्याचें मनांतसुद्धां आणलें नाहीं. धान्य व कापड यांच्या वांटपाचें प्रमाण जसें कमी कमी होत गेलें, तसतसें सक्तीच्या लष्करभरतीचें वयसुद्धां कमी कमी होत जाऊन, शेवटीं चवदा वर्षांच्या मुलांससुद्धां लष्करांत घेणें सुरू झालें. रोज जपानच्या भूमीच्या रोखानें शत्रु पुढें पुढें सरकत होता. जपानमधील सर्व मुलांबाळांस व बायकांस शस्त्रास्त्रें वांटण्यांत आलीं व शत्रूची फौज जपानच्या भूमिभागावर उतरली तर सर्वांनीं त्याच्याविरुद्ध कसें लढावें याचें सर्व नागरिकांस ठिकठिकाणीं जारीनें शिक्षण देण्यास सुरुवात झाली. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं जनरल टोजो यांच्या मंत्रिमंडळास सर्व जनतेकडून असा आग्रह सुरू झाला कीं, त्यांनीं जपानची कुटुंबव्यवस्था मोडून बायकांससुद्धां युद्धकार्यास लावावें. जनरल टोजो यांना मात्र हें मुळींच मान्य नव्हतें. दिवसेंदिवस बिकट होत जाणाऱ्या परिस्थितीविरुद्ध काय उपाययोजना करावी याबद्दल सर्व जपानी मुत्सद्यांना काळजी उत्पन्न झाली. या परिस्थितीमधून यशाचा मार्ग दिसण्याची मुळींच आशा उरली नव्हती. यशाची आशा करायची कशाच्या बळावर? १४ वर्षांपर्यंतच्या मुलांससुद्धां सक्तीच्या लष्करभरतीचा नियम लागू करून, सैन्यवाढीची किमान मर्यादा ओलांडली गेलेली होती. सामान्य मनुष्याच्या उदरनिर्वाहास जरूर असणाऱ्या धान्यापेक्षां कमी धान्य दर माणशीं देण्यांत येत असल्यामुळें धान्यवांटपाचीही परिसीमा झालेली होती. हवाईदल व आरमार तर नामशेष होण्याच्याच पंथावर होतें. याच्या उलट अमेरिकेचा जोम दिवसेंदिवस जास्त जास्तच वाढत चालला होता. त्यांच्या विमानांचें व बोटींचें उत्पादन अवाढव्य प्रमाणांत होऊं लागलें होतें. या सर्व गोष्टींमुळें टोजो-मंत्रिमंडळाची परिस्थिति दिवसेंदिवस जास्त बिकट होऊं लागलेली होती. इकडे ब्रह्मदेशाच्या सरहद्दीवरूनही माघार घ्यावयाची वेळ आल्यामुळें, तिकडूनही बांध फुटून शत्रूच्या हल्ल्याचा महापूर केव्हां येईल याचा नेम नव्हता. अशा वेळेस टोजो-मंत्रिमंडळाला आभाळ फाटल्याप्रमाणें होऊन, जनरल टोजो यांनीं स्वतःचा व स्वतःच्या मंत्रिमंडळाचा राजिनामा जपानच्या सम्राटाकडे १९४४च्या जुलै महिन्यांत सादर केला.

भरलेला गाडा घसरूं लागला म्हणजे त्याला सांवरायला कोण पुढें येणार? तसेंच या वेळेसही झालें. कोणीच ही जबाबदारी अंगावर घ्यावयास तयार होईना.

कारण उगीच अपयश पदरीं येणार व तें साधेंसुधें नाहीं तर राष्ट्राच्या राखरांगोळीचें! तथापि अशा वेळेस प्रत्येकानेंच अंग चोरून तोंड लपविणें हेंसुद्धां वीरवृत्तीस शोभणारें नव्हतें. ' सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः।' या न्यायाप्रमाणें, नाश कां होईना परंतु तोसुद्धां शक्य तितका कमी व्हावा याकडे लक्ष देणें, हेंसुद्धां कसलेल्या मुत्सद्यांचें कर्तव्य होतें. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं जनरल 'कुनियाकी कोइसो' हे पुढें झाले. त्यांनीं सम्राटाला विनंति केली कीं, " सम्राटांनीं सर्व जबाबदारी स्वतःच्या शिरावर घ्यावी; मग मी सम्राटांच्या आज्ञेप्रमाणें पंतप्रधानपद घेण्यास तयार आहें.' जपानी राष्ट्राच्या प्रथेप्रमाणें सम्राटपद हें परमेश्वराइतकेंच पूज्य असतें. एकादी गोष्ट सम्राटांनीं केली असें झालें म्हणजे कोणीही त्याविरुद्ध ' ब्र ' सुद्धां काढीत नाहीं. ती ईश्वरेच्छेनेंच झाली, अर्थात् मानवांचा त्यापुढें कांहीं इलाज नाहीं, अशाच दृष्टीनें सर्व जपानी नागरीक त्या गोष्टीकडे बघतात. सम्राट हा राष्ट्रकुटुंबाचा पिता आणि पालक या नात्यानें तो जें कांहीं करील तें सर्वांस हितावह म्हणजे योग्य असेंच करील, ही सर्वांची मनोमन भावना. म्हणून धडधडीत अपयश समोर दिसत असतांना सम्राटानें सर्व जबाबदारी आपल्या शिरावर घेणें जरूर होतें व तशी ती त्यांनीं घेतली व म्हणूनच ॲडमिरल कोइसो यांस कारभार हांकणें शक्य झालें. ते सम्राटांच्या आज्ञेनें सर्व गोष्टी करीत आहेत, असें घोषित झाल्यामुळें तशा नैराश्यमय परिस्थितींतसुद्धां बंड, क्रांति, उलथापालथ, गडबड, गोंधळ कांहीं न होतां सैनिक व नागरीक आपापलीं कामें अगदीं सुरळीत करीत राहिले. सम्राटपदाबद्दल असलेल्या आत्यंतिक पूज्यभावनेमुळेंच हें शक्य झालें. नाहींतर बंड होण्यास व शत्रूस जपानवर धाड घालण्याची संधी मिळण्यास, इतर सर्व गोष्टींची शीग भरलेली होती. कापड व धान्य हें तर अगदीं उंदरामांजरांच्या प्रमाणांत सर्वसामान्य जनतेस मिळत होतें. युद्धसामुग्री, मनुष्यबळ इत्यादि सर्वच संपुष्टांत आलें होतें. अशा वेळेस सम्राटपदाचा सांधणारा दुवा नसता तर जपानी राष्ट्राच्या, पक्षोपक्षांच्या भांडणामुळें व अंतस्थ बंडाळीनें चिंधड्या चिंधड्या उडाल्या असत्या. विशेषतः विपत्कालीं मतभेदांस आणि भांडणास ऊत येतो, तो तसा येऊं न देणें हाच एकतंत्री राज्यपदाचा फार मोठा गुण आहे. भारताच्या भरभराटीच्या काळांत राजाबद्दल अक्षरशः हीच सर्वांची भावना होती व त्या वेळचे राजेही लहानपणापासून उत्तम प्रकारचें (त्या वेळचें सकलकलाशास्त्रांचें शिक्षण) सर्वांगीण शिक्षण घेऊन तयार झालेले, सर्वथा शासनक्षम असेच होते. असो.

याच्या अगोदरच श्री. हाचिया यांची जपानी मंत्रिमंडळाकडून स्वातंत्र्यसरकाराचे दरबारीं, जपानचे वकील म्हणून नेमणूक झालेली होती. श्री. हाचिया हे पूर्वी बल्गेरिया, युगोस्लाव्हिया इत्यादि युरोपखंडांतील कांहीं लहान राष्ट्रांच्या दरबारीं जपानचे वकील होते. दरबारी वकील या नात्यानें श्री. हाचिया हे रंगूनला नेताजींच्या प्रथम भेटीस आले. त्या वेळीं आंतरराष्ट्रीय शिष्टाचाराप्रमाणें

त्यांनीं आपल्या नेमणुकीबद्दलचे कागदपत्र आणणें जरूर होतें. परंतु ते त्यांनीं आणले नव्हते. तेव्हां त्यांची भेट घेण्याचें नेताजींनीं साफ नाकारलें. दुसऱ्या खेपेस त्यांनीं जरूर तो दाखला आणल्यावरच जपानचे दरबारी वकील या नात्यानें नेताजींनीं त्यांची पहिली भेट घेतली.

टोजो-मंत्रिमंडळ जाऊन त्याच्याजागीं कोइसो-मंत्रिमंडळ आलें त्या वेळीं, ठिकठिकाणच्या नागरिकांत या युद्धांतील जपानच्या अंतिम विजयाबद्दल साशंकता तर उत्पन्न झालेली नाहीं ना ? याबद्दलची माहिती मिळविण्याकरतां मलाया, ब्रह्मदेश आदि देशांतील जपानी 'केम्पेथाई' (फौजी पोलीस) * खात्यानें आपलीं माणसें निरानिराळ्या पक्षांच्या, गटांच्या, अगर संस्थांच्या कार्यकारी व्यक्तींकडे, प्रमुख प्रतिष्ठित गृहस्थांकडे किंवा सामान्य नागरिकांकडेही पाठवून, या मंत्रिमंडळाच्या खांदेपालटाबद्दल त्या त्या व्यक्तीचें मत काय आहे, अशा-बद्दलची प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रीतीनें माहिती विचारण्यास सुरुवात केली. सर्व नागरीकही आतां जपानी केम्पेथाईच्या पद्धतीस सरावलेले होते. जपानचा पराजय होणार असें एकाद्या व्यक्तीचें मत असल्याची यत्किंचित् शंका जर त्या केम्पेथाई खात्याच्या माणसाच्या मनांत आली असती तर त्यानें त्या व्यक्तीचा छळ करण्यास कमी केलें नसतें, हें सर्व सूज्ञ लोकांस कळून आलेलें होतें. म्हणून त्यांनीं असें दाखविलें कीं, 'छे...छे जपानचा पराजय होणेंच शक्य नाहीं. मंत्रिमंडळ बदलणें हा ज्याच्या त्याच्या सोईचा प्रश्न आहे. त्यानें आणीबाणीची परिस्थिति थोडीच प्रतीत होते ! उलट यापुढें जपान अधिक चेवानें लढून अनेक विजय प्राप्त करून शेवटीं हें युद्ध जिंकील. अहो, इंग्रज अमेरिकन जिंकतील हें आमच्या मनांतसुद्धां येणें शक्य नाहीं. ते कसले जिंकतात ! जपानसारखें परमसहिष्णु व अखिल एशिआटिक लोकहितदक्ष राष्ट्रच केव्हांही अंतीं विजयी होणार...'... अशा तऱ्हेचा तपास करणें हेंच मुळीं मूर्खपणाचें होतें. दुसरें कांहींही मत प्रदर्शित केल्यानें एकतर आपला मुडदा तरी पडेल किंवा छळ तरी होईल हें माहीत असतांना 'जपानचा पराजय होईल' असें उघड उघड कोण सांगावयाला बसला आहे ? हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडेही हे केम्पेथाई दूत आले. या अधिकाऱ्यांस थोडें स्पष्ट बोलणें शक्य होतें; कारण केम्पेथाई त्यांचें कांहींच पारिपत्य करूं शकलें नसतें. परंतु विनाकारण वितुष्ट येऊन चालत्या गाड्याला खीळ पडली असती आणि सहकार्य करणें जड झालें असतें. स्पष्ट बोलूनही कांहीं फायदा नव्हता. आणि त्यामुळें जपानचा पराजय व्हावयाचा तर तोही कांहीं चुकत

* कोणीही नागरीक अगर सैनिक, इतरांस नाउमेद करणारा भेटल्यास त्यास कडक शासन करणें हें या खात्याचें एक काम असे.

नव्हता. तेव्हां लहान मुलाची समजूत केल्याप्रमाणें गोड बोलून वेळ मारून नेणेंच सर्वस्वीं इष्ट होतें.

जपानी मंत्रिमंडळांतील या फेरबदलाबद्दल हिंदी स्वातंत्र्य-सरकाराचें जुलै महिन्याच्या २७ तारखेस एक खास पत्रक निघालें. जपानशीं ( अर्थात् नव्या मंत्रिमंडळाशीं ) पूर्ण सहकार्य करून अंतिम विजय मिळेपर्यंत लढत राहण्याच्या स्वातंत्र्य-सरकाराच्या धोरणांत यत्किंचितही बदल झाला नसल्याचें त्यांत स्पष्ट नमूद केलेलें होतें. नेताजींकडून ॲडमिरल कोइसो यांस व जपानच्या परराष्ट्र-मंत्र्यांस तशा अर्थाच्या तारा पाठविण्यांत आल्या. त्यांच्याकडूनही समर्पक उत्तरें आलीं.

१९४४ च्या ऑगस्ट महिन्यांत नेताजी टोकिओस गेले. नव्या मंत्रि-मंडळाशीं वाटाघाटी करून हिंदी स्वातंत्र्य-सरकारास मदत करण्याचा जपानचा निश्चय कितपत कायम आहे हें अजमाविणें जरूर होतें. निरनिराळ्या अधिकाऱ्यांशीं वाटाघाटी केल्यावर व एकंदर परिस्थिति पाहून जपानची शक्ती खचत चालल्याचें त्यांच्या निदर्शनास आलें. जपानचा पाडाव होणार याबद्दल त्यांची खात्री होऊं लागली. ब्रह्मदेश-हिंदुस्थान आघाडीकडे विशेष लक्ष देणें जपानला आतां शक्य नाहीं, असें त्यांस स्पष्ट दिसून आलें; तरी सर्व प्रकारची मदत करण्याचें आश्वासन नेहमींप्रमाणें नव्या मंत्रिमंडळानें दिलें! नेताजींपुढें आतां दोन मार्ग होते. एक तर जपानच्या मदतीनें आपला हेतू साधणें शक्य नाहीं असें दिसल्यावर जपानशीं मित्रत्वानें असलेल्या व इंग्रजांशीं ( वरपांगीं सख्य दाखवीत असलें तरी ) प्रतिस्पर्धा करणाऱ्या दुसऱ्या एकाद्या बलाढ्य राष्ट्राकडे जाऊन त्याच्या मदतीनें कांहीं साधणें शक्य असल्यास बघावयाचें किंवा हिंदी स्वातंत्र्य-सैन्याची वाढ करून जरूर तें सर्व युद्धसाहित्य जपान्यांकडून मिळवावयाचें व आपल्या एकट्याच्या हिंमतीवर ( जपानी सैन्याच्या मदतीशिवाय ) हिंदुस्थान-ब्रह्मदेश सरहद्दीवर लढून हिंदुस्थानांत प्रवेश करून घ्यावयाचा व नंतर तेथील सर्व जनतेस इंग्रजांविरुद्ध उठाव करण्यास लावावयाचें. वर उल्लेखिलेल्या दोन मार्गांपैकीं पहिला मार्ग अवलंबिण्याची एक तर वेळ आलेली नव्हती व शिवाय अशा एकाद्या राष्ट्रांत आपण गेलों तर तें एवढ्यांतच इंग्रजांचें शत्रुत्व पत्करून आपल्याला मदत करावयास तयार होईल कीं नाहीं, याबद्दल त्यांच्या मनांत शंका होती. ' हातचें सोडून पळत्याच्या पाठीस लागण्यापेक्षां, आहे या परिस्थितींतच आटोकाट प्रयत्न करून पाहावा, या मार्गानेंच आपलें ध्येय लवकर साध्य होणें शक्य आहे. दुसऱ्या मार्गाचा अवलंब केल्यास कांहीं उपयोग होईल कीं नाहीं, हीच मुळांत शंका आणि उपयोग झाल्यास त्याला किती काळ लागेल याचा नेम नाहीं. जपान्यांचें सर्वच ओमफस झालें तर मग हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्याकरतां दुसऱ्या कोणत्या तरी राष्ट्राकडे पदर पसरूं, परंतु केवढ्याही अडचणी आल्या तरी प्राण आहे तोंपर्यंत निराश होऊन प्रयत्न सोडणार नाहीं,

हें नेताजींचें ब्रीदवाक्य होतें. अशा तऱ्हेनें त्यांनीं तूर्त तरी जपानच्या मदतीनेंच पुढील वाट चोखाळण्याचा निर्णय घेतला. परंतु हा मार्ग खुंटला तर दुसऱ्या कोणत्या तरी देशांत जावें लागेल या दृष्टीनें त्यांचे विचार या वेळेपासूनच सुरू झाले असें म्हणावयास हरकत नाहीं.

आपल्या भाषणांतून नेताजींनीं अनेक वेळां सांगितलें होतें कीं, ' **हिंदी स्वातंत्र्यसैन्य हें फक्त हिंदुस्थानामध्यें शिरकाव करून घेण्यापुरतें आहे. केवळ या स्वातंत्र्यसैन्यावर किंवा जपान्यांच्या मदतीवर मी अवलंबून नाहीं. सर्व हिंदी जनता इंग्रजांच्या विरुद्ध आहे व त्यांच्या पाशांतून सुटण्यास ती बेचैन आहे अशी जर माझी खात्री नसती तर मी हा खटाटोप कधींच केला नसता.** परंतु सैन्य घेऊन हिंदी लोकांपुढें ठाकण्याचा अवकाश कीं ते सर्व स्वयंस्फूर्तीनें इंग्रजांविरुद्ध उठून बंड करतील. त्यांस शस्त्रांची जरूर आहे ती आपण पुरवूं. ज्या सरकाराच्या प्रेरणेनें आणि आधारानें ते संघटितपणें इंग्रजांविरुद्ध लढूं शकतील असें स्वतःचें एक स्वतंत्र सरकार त्यांस हवें आहे; तसें सरकार आपण स्थापन केलेंच आहे. आतां फक्त हिंदुस्थानांत पदार्पण करावयाचें बाकी राहिलें आहे. ' शिरकाव ' करून घेणें याचा अर्थ अर्थातच कमींतकमी अर्धा बंगाल तरी स्वातंत्र्यसैन्यानें काबीज करणें आवश्यक होतें. तसें झालें असतें, तर इंग्रजांच्या बाजूचें बरेचसें हिंदी सैन्य ठिकठिकाणीं अडकून पडून तें स्वातंत्र्यसैन्यास येऊन मिळालें असतें. पुष्कळसे बंगाली तरूण उत्साहानें स्वातंत्र्यसैन्यांत दाखल झाले असते व पूर्व बंगाल ( जपान्यांच्या ताब्यांत नव्हे ) खरोखरच स्वतंत्र झाला हें कळून सर्व हिंदी जनता ईर्षेनें व स्वयंस्फूर्तीनें इंग्रजांविरुद्ध लढण्यास सिद्ध झाली असती, यांत कांहीं शंका नाहीं.

स्वतःच्या हिंमतीवर लढण्यास पुरेसें सैन्यबळ असणें आवश्यक होतें. म्हणून त्यांनीं नव्या मंत्रिमंडळाशीं स्वातंत्र्यसैन्याच्या वाढीबाबत वाटाघाटी सुरू केल्या. वास्तविक स्वातंत्र्यसैन्याची वाढ करणें किंवा न करणें, केल्यास ती किती करणें हा स्वातंत्र्यसरकाराचा खाजगी प्रश्न होता. जपाननें त्यास खोडा घालण्याची आवश्यकता नव्हती. अगदीं नेताजींच्या इच्छेप्रमाणें स्वातंत्र्यसैन्य तीन लाखांपर्यंत झालें असतें, तरी त्यांत जपानचा फायदाच झाला असता. कारण हिंदुस्थान स्वतंत्र होऊन इंग्रजांची ताकत खच्ची झाली असती व त्यांनीं युद्धांतून आपलें आंग पूर्णपणें काढून घेतलें असतें. यामुळें युरोपमध्यें रशिया व जर्मनी आणि पॅसिफिक भागांत जपान व अमेरिका यांच्याच कांहींशा सम-तोल जोड्या बाकी राहिल्या असत्या. त्यांत जय मिळण्याची जपान व जर्मनीस पुष्कळशी शक्यता होती. कांहीं नाहीं तरी स्वातंत्र्यसैन्याची अमर्यादित वाढ होऊं देऊन निदान त्यांना हिंदुस्थान-ब्रम्हदेश सरहद्दीबद्दल तरी निर्धास्त राहतां आलें असतें. परंतु दुर्दैवानें जपाननें याबाबतींत अगदीं संकुचित धोरण ठेवलें. वाढत्या

सोडून इतर कोणासहीं ब्रम्हदेशास जाण्याचें काम पडलें नाहीं. झांशी-राणी पथकाची किमान संख्या सुमारें ५०० होती. रंगून येथील त्यांच्या छावणींत सिंगापुराहून गेलेल्या स्त्री-सैनिक धरून पथकाची संख्या १५० च्या आसपास होती. रंगून-मधील त्यांची छावणी हॅलपिन रस्त्यावरील एका बंगल्यांत होती.

झांशीची राणी लक्ष्मीबाई हिच्याबद्दल दूरपूर्वेतील हिंदी जनतेंत सर्व-साधारणपणें अज्ञानच होतें असें म्हटलें तरी चालेल. ती महाराष्ट्रीय वीरांगना असून तिनें १८५७च्या स्वातंत्र्ययुद्धांत रणांगणावरील हातघाईच्या अनेक लढायांत इंग्रज फौजेविरुद्ध विजय मिळवून त्यांस 'दे माय धरणी ठाय' असें करून सोडलें हें फारच थोड्या लोकांस ठाऊक होतें. २२ ऑक्टोबर १९४४ रोजीं झांशी-राणी पथकाच्या स्थापनेचा पहिला वार्षिकोत्सव होता. त्या प्रसंगीं सर्वांस तिच्या चरित्राचें ज्ञान व्हावें या हेतूनें प्रस्तुत ग्रंथकारानें सप्टेंबर महिनाअखेर हिंदुस्थानी भाषेंत 'झांशीची राणी' नांवाचें एक नाटक लिहिलें. तामीळ, इंग्रजी व हिंदु-स्थानी अशा तिन्ही भाषांतून त्याच्या प्रत्येकीं एक एक हजार प्रती छापल्या जाऊन त्या दूरपूर्वेत ( विशेषतः मलाया, सिंगापूर या ठिकाणीं ) विकल्या गेल्या. झांशी-राणी पथकाच्या स्त्री-सैनिकांनीं तें नाटक बसविलें. अनेक अडचणींमुळें वार्षिकोत्सव-दिनापर्यंत तें नाटक बसविणें शक्य न झाल्यामुळें त्या प्रसंगीं, त्याचा प्रयोग होऊं शकला नाहीं. सिंगापूरमधील व्हिक्टोरिया सभागृहांत या नाटकाचे २७, २८ व २९ नोव्हेंबर रोजीं दररोज एक याप्रमाणें तीन प्रयोग करण्यांत आले. मलाया व सिंगापुरांतील निरनिराळ्या वर्तमानपत्रांचे त्यावर उत्कृष्ट अभिप्राय आले. रंगभूमीवर प्रयोग चालू असतांना अनेक वृत्तसंस्थांच्या फोटोग्राफर्सनीं निरनिराळ्या प्रसंगांचीं छायाचित्रें घेतलीं. पुस्तकविक्री व तीन खेळांचें उत्पन्न मिळून सुमारें ५०,००० डॉलर्स गोळा झाले. ५०,००० डॉलर्स म्हणजे ८३,००० रुपये होतात. खास स्वातंत्र्य सैनिकांकरतां कांहीं प्रयोग फुकट दाखविण्यांत आले. तें नाटक नेताजींस अर्पण केलेलें आहे. प्रयोगाचें व पुस्तकविक्रीचें सर्व उत्पन्न स्वातंत्र्ययुद्धाच्या खर्चास्तव नेताजीफंडास देण्याचें प्रस्तुत ग्रंथकारानें ठरविलें असल्यामुळें, ते ५०,००० डॉलर्स त्या फंडांत जमा झाले. हें द्रव्य जसजसें येत गेलें तसतसें वेळोवेळीं तें हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या मुख्य कचेरींत दिलें गेलें. हे प्रयोग झाले तेव्हां नेताजी रंगूनला होते. अर्थातच ते या प्रयोगांस हजर राहूं शकले नाहींत. लोकाग्रहास्तव व्हिक्टोरिया सभागृहांतच या खेळाचे ११ ते १४ डिसेंबरपर्यंत रोज एक याप्रमाणें पुन्हा चार प्रयोग झाले. सायंकाळीं ७॥ ते ९॥ पर्यंत हे प्रयोग व्हावयाचे. योगायोग असा कीं, १४ डिसेंबर रोजीं संध्याकाळीं ६ वाजतां नेताजी विमानानें सिंगापूरच्या क्लँग विमानतळावर येऊन उतरले. त्या दिवशीं ७॥ वाजतां या नाटकाचा शेवटचा प्रयोग व्हावयाचा होता. अवघा दीड तास उरलेला होता. नेताजी टोकिओस जाऊन आले होते. जपानची परिस्थिति दिवसें-दिवस जास्तच बिकट होत असून पुढच्या कार्याबद्दल विचारविनिमय करण्या-

करतां म्हणूनच ते टोकिओस गेलेले होते. लांबच्या प्रवासाचा शीण व बरेच दिवसांनीं सिंगापुरांत प्रथमच आल्यामुळें कार्यव्यग्रता, इतकें असूनही नेताजींनीं त्या दिवशींच्या प्रयोगास येण्याचें आनंदानें कबूल केलें. ते ८ वाजतां आले आणि त्या दिवशींचा प्रयोग ८ ते १० पर्यंत झाला. या चार खेळांचें उत्पन्न २०,००० डॉलर्स म्हणजे सुमारें ३३,००० रुपये झालें. हे पैसेही स्वातंत्र्य-संघाच्या मुख्य कचेरींत नेताजी फंडास देण्यांत आले. एकूण सुमारें एक लक्ष सोळा हजार रुपये उत्पन्न झालें. नेताजींना तें नाटक अर्पण केलेलें असल्यामुळें माझी त्यांची भेट झाली तेव्हां मी तामीळ, इंग्रजी व हिंदुस्थानी भाषांतील एक एक प्रत त्यांस सादर केली. झांशी-राणी पथकाच्या या नाट्य-तुकडीनें दूरपूर्वेतील सर्व ठिकाणीं दौरा काढून या नाटकाचे प्रयोग करावे व त्याबरोबरच आपल्या लष्करी शिक्षणाचेंही दिग्दर्शन करावें म्हणजे स्वातंत्र्य-चळवळीच्या प्रचाराचें तें एक प्रभावी साधन होईल असा नेताजींचा विचार होता. परंतु अनेक अडचणींमुळें तो फलद्रूप होऊं शकला नाहीं.

जर्मन आरमारी अधिकाऱ्यांशीं आम्ही बरीच मैत्री जोडलेली होती. वरीलप्रमाणें नाट्यप्रयोगांस अथवा अन्य प्रकारच्या जाहीर कार्यक्रमांस किंवा सरकारी समारंभास आम्ही त्यांस मुद्दाम पाचारण करीत असूं. त्यांच्यांत कसल्याही प्रकारची आढ्यता नव्हती. त्यांच्या मोकळ्या, आनंदी आणि मन-मिळाऊ स्वभावामुळें त्यांचा सहवास कोणासही हवासाच वाटे. या बाबतींत जपानी अधिकाऱ्यांत व त्यांच्यांत फारच तफावत आढळली. जपानी अधिकारी आंतल्या गांठीचा असतो. आपण आपल्या मैत्रींत एकादे वेळेस सरकारी बाबींचा गौप्यस्फोट करूं कीं काय या भावनेचें भूत त्याच्या मानगुटीवर इतकें घट्ट बसलेलें असतें कीं, साध्या साध्या गोष्टींतसुद्धां त्यांना कांहीं ना कांहीं तरी हातचें राखून ठेवावयाची संवयच जडून गेलेली असते. एकाद्या जपानी अधिकाऱ्याला त्याचें नांव विचारलें तरी त्याच्या मनांत संशयपिशाच्च डोकावूं लागतें. ती एक गुप्त गोष्ट असल्याचा आविर्भाव करून तो तें सांगण्याचें साफ नाकारतो व रुष्ट चेहरा करून बसतो. अशा परिस्थितींत 'तुम्ही कोण? कुठले? तुमची तुकडी कोणती?' वगैरे विचारण्याची तर अजिबात सोय नसते. याच्या उलट जर्मन अधिकारी अगदीं मनमोकळे बोलतात. याचें उदाहरण म्हणजे एका जर्मन पाणबुडीचा मुख्य अधिकारी दुसरे दिवशीं सिंगापुराहून निघून न्यू झीलंडपर्यंत शत्रूच्या बोटी बुडविण्याच्या मोहिमेवर निघणार होता. ही गोष्ट-सुद्धां त्यानें आदल्या दिवशीं एका अल्पाहार प्रसंगीं आम्ही भेटलों असतांना आम्हांस सांगितली. दोन-तीन महिन्यांनीं तो जेव्हां या मोहिमेवरून परत आला तेव्हां त्यानें आपल्या सर्व उलाढालींची इत्थंभूत हकीगत आम्हांस निवेदन केली. अर्थात् जर्मन अधिकारी बेजबाबदारपणें वागतात हा याचा अर्थ नसून, मित्र म्हटला कीं त्याच्याशीं ते मोकळेपणानें वागतात, भलत्यासलत्या गोष्टींत गौप्याचें

स्तोम ते माजवीत नाहींत. जर्मन अधिकाऱ्यांत हिंदी स्वातंत्र्य-चळवळीच्या अधिकाऱ्यांनीं मुळींच मिसळूं नये असें जपानी अधिकारी ( हिकारी कीकान खात्याचे ) आम्हांस कित्येक वेळां सुचवीत असत. कांहीं आंतरराष्ट्रीय समारंभांचे वेळीं त्यांच्याशीं संबंध ठेवावयाचाच झाल्यास तो हिकारी कीकानच्या मध्यस्थीनें ठेवावा, स्वतंत्रपणें ठेवूं नये, अशा प्रसंगींसुद्धां केवळ समाचाराच्या औपचारिक शब्दांशिवाय अधिक उणें कांहींही बोलूं नये, अशा तऱ्हेचा जपान्यांचा नेहमीं प्रयत्न चालू असे. सयाम वगैरेसारख्या दुसऱ्या कोणत्याही राष्ट्रांशीं जपान्यांच्या मध्यस्थीशिवाय आम्ही परस्पर संबंध ठेवूं नये ही त्यांची इच्छा होती व त्या दृष्टीनें ते अनेक वेळां प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीत्या आम्हांला तसें सांगत असत. आमचेंच त्यांत हित आहे, अशा प्रकारचा कांगावखोर-पणाचा उपदेश करण्यासही त्यांनीं मागें पुढें पाहिलें नाहीं. या सर्व सूचनांस आम्ही धाब्यावर बसविलें. एकदां जर्मनीच्या पाणबुड्यांवर जाऊन त्या प्रत्यक्ष पाहाण्याची आम्ही इच्छा दर्शविल्यामुळें जर्मन अधिकाऱ्यांनीं तें लक्षांत ठेवून एके दिवशीं तसा योग घडवून आणला.

सिंगापूर बंदराच्या आवारांत आरमारीखात्याच्या मोटारींशिवाय इतर मोटारींस प्रवेश मिळूं नये असा जपान्यांचा नियम होता. सिंगापूर बंदर जपा-न्यांच्या मालकीचें असल्यामुळें त्यांचे नियम जर्मन आरमारीखात्याच्या अधि-काऱ्यांस पाळावे लागत. ज्या दिवशीं आम्हांला त्यांच्या पाणबुड्या दाखविण्याचा कार्यक्रम जर्मन अधिकाऱ्यांनीं ठरविलेला होता, त्या दिवशीं सकाळीं ते सर्व अधिकारी आपापल्या मोटारगाड्यांतून सिंगापूर बंदरावर जाऊन पोंचले व त्यांनीं ८-३० च्या सुमारास आपल्या तीन मोटारी आमच्या बंगल्यावर पाठवून दिल्या. त्यांच्या सूचनेप्रमाणें आम्ही सर्वांनीं एक एक खाकी सदरा व विजार बरोबर घेतलेली होती. आम्ही एकंदर आठ अधिकारी होतों. तेथें पोंचल्यावर त्या सर्वांनीं आमचें स्वागत केलें. सर्व जर्मन अधिकाऱ्यांशीं आमची ओळख करून देण्यांत आली. धक्क्यावर पुष्कळ जहाजें होतीं. स्वच्छ ऊन पडलेलें असून समुद्राच्या लहरी त्यांत तळपत होत्या. समुद्राचे चंचल तरंग धक्क्यावर आपटून त्यांतून खळखळ ध्वनि निघत होता. किनाऱ्यालगतच्या बोटीवर चढून त्याच्या पलीकडील बाजूस त्यास चिकटून असलेल्या पाणबुडीवर शिडी लावून आम्ही उतरलों. यंत्रांचें तेल लागून घाण झालेल्या निळ्या चड्ड्या घातलेले ते उघडे गौरकाय जर्मन लोक आपापल्या कामांत गर्क होऊन गेले होते. कोणी जाडजूड दोरखंडाचें वेटोळें करीत होते, कोणी शिड्या इकडून तिकडे नेत होते. इतर कांहींजण बोटीवरील सौधावर उभे राहून शांतपणें हें सर्व दृश्य बघत होते. वाऱ्याचा जोर आणि समुद्राचा खळखळाट यामुळें आपला शब्द हाताखालच्या लोकांस ऐकूं जाणार नाहीं, म्हणून इकडे तिकडे संचार करणाऱ्या लहान बोटींचे कप्तान पत्र्याच्या कर्ण्यांतून हुकूम सोडीत होते. मधूनच फट्फट्

करीत एकादी जपानी मोटारबोट आपला लहानसा झेंडा फडकावीत आमच्या समोरून दूर कोठेंतरी निघून जात असे. समुद्रांत आसपास लहान लहान बेटें, त्यांवरील हिरवेगार डोंगर आणि त्यांवर बांधलेल्या लहान लहान इमारती दिसत होत्या. बरोबर आणलेले कपडे आम्ही 'क्रीटो' नांवाच्या जहाजावर अधिकाऱ्यांच्या खोल्यांत ठेवून दिले.

आम्ही ज्या पाणबुडीवर उतरलों ती U २३८ नंबरची पाणबुडी होती. हिची लांबी सुमारें १२५ फूट असून जणूं काय समुद्रसपाटीपेक्षां तीन फूट उंच बांधलेली, समुद्राच्या पाण्यावर तरंगती ठेवलेली, निमुळत्या टोकाची ती एक विस्तीर्ण गच्चीच होती. पाणबुडीच्या दोन्ही बाजूला एका टोंकापासून तों थेट दुसऱ्या टोंकापर्यंत लांबच लांब लोखंडाच्या पत्र्याचे दोन फुगीर आणि पोकळ मोठे नळ बसविलेले असतात. पाणबुडीला पाण्यांत बुडी मारण्याची वेळ आली कीं यांत्रिक पंपानें समुद्राचें पाणी या दोन्ही बाजूच्या नळांत ओढून घेतात. अशा तऱ्हेनें पाणबुडीचें वजन वाढलें कीं ती आपोआप पाण्यांत बुडूं लागते. पाणबुडीच्या दोन्ही निमुळत्या टोकांजवळ एक एक हलकी तोफ बसविलेली असून, तिच्या मधोमध कांहीं लोखंडी भोंगे इत्यादि यंत्रसामुग्रीचीं टोकें वर आलेलीं होतीं. त्यांच्यावर ही एक लहानशी गच्ची तयार करण्यांत आली होती. या गच्चीवर जाण्यास लोखंडी गज लावलेली एक लहानशी शिडी होती. वरच्या बाजूसही एक-दोन तोफा बसविलेल्या होत्या. जर्मन अधिकाऱ्यांच्या दुर्बिणींतून आम्ही सभोंवारचें दृश्य बघितलें. त्या जर्मन दुर्बिणी उत्कृष्ट प्रकारच्या होत्या. सिंगापूर बेटापासून कांहीं मैलांच्या अंतरावर असलेल्या एका बेटावर इंग्रजांनीं मोठमोठ्या कोठ्या बांधवून त्यांत बरेंचसें पेट्रोल सांठविलेलें आहे. दुर्बिणींतून त्या बाजूला नजर टाकली तेव्हां जणूं काय आपण एकादा गिरणीचा भोंगा अगदीं जवळून बघत आहोंत, अशा प्रकारचें विटांनीं बांधलेल्या त्या अवाढव्य कोठ्यांचें दृश्य दिसूं लागलें. आम्ही पाणबुडीवर उतरल्याबरोबर किनाऱ्यावरील इतर बोटींपासून ती पाणबुडी दूर नेऊन तिचें यंत्र चालू करण्यांत आलें. सिंगापूर बंदराच्या बाहेर खडकाळ भागापासून दूर जाण्यास पाणबुडीनें सुरुवात केली. बोटीवर एक डॉक्टर, एक इंजिनियर, एक कप्तान असे तीन मुख्य अधिकारी, एक-दोन दुय्यम अधिकारी व इतर सुमारें चाळीस आरमारी-सैनिक असतात. कप्तानाच्या सूचनेप्रमाणें एका लहान चौकोनी भोकशांत शिरून पक्क्या बसविलेल्या एका लहान लोखंडी शिडीवरून आम्ही आंत उतरलों. येथें मधोमध थोडीशी पोकळी असून कांहीं यंत्रसामुग्री होती. त्याच्याच खालीं असलेल्या आणखी एका लोखंडी शिडीवरून आम्ही अगदीं तळमजल्यावर उतरलों. येथें एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत सबंध पोकळी होती. वरील दोन्ही भोकें बंद करण्यांत आलीं होतीं. आंत जणूं काय रात्र असल्याचाच भास होत होता. ठिकठिकाणीं विजेचे दिवे होतेच. त्या पोकळ

स्तोम ते माजवीत नाहींत. जर्मन अधिकाऱ्यांत हिंदी स्वातंत्र्य-चळवळीच्या अधिकाऱ्यांनीं मुळींच मिसळूं नये असें जपानी अधिकारी ( हिकारी कीकान खात्याचे ) आम्हांस कित्येक वेळां सुचवीत असत. कांहीं आंतरराष्ट्रीय समारंभांचे वेळीं त्यांच्याशीं संबंध ठेवावयाचाच झाल्यास तो हिकारी कीकानच्या मध्यस्थीनें ठेवावा, स्वतंत्रपणें ठेवूं नये, अशा प्रसंगींसुद्धां केवळ समाचाराच्या औपचारिक शब्दांशिवाय अधिक उणें कांहींही बोलूं नये, अशा तऱ्हेचा जपान्यांचा नेहमीं प्रयत्न चालू असे. सयाम वगैरेसारख्या दुसऱ्या कोणत्याही राष्ट्रांशीं जपान्यांच्या मध्यस्थीशिवाय आम्ही परस्पर संबंध ठेवूं नये ही त्यांची इच्छा होती व त्या दृष्टीनें ते अनेक वेळां प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीत्या आम्हांला तसें सांगत असत. आमचेंच त्यांत हित आहे, अशा प्रकारचा कांगावखोर-पणाचा उपदेश करण्यासही त्यांनीं मागें पुढें पाहिलें नाहीं. या सर्व सूचनांस आम्ही धाब्यावर बसविलें. एकदां जर्मनीच्या पाणबुड्यांवर जाऊन त्या प्रत्यक्ष पाहाण्याची आम्ही इच्छा दर्शविल्यामुळें जर्मन अधिकाऱ्यांनीं तें लक्षांत ठेवून एके दिवशीं तसा योग घडवून आणला.

सिंगापूर बंदराच्या आवारांत आरमारीखात्याच्या मोटारींशिवाय इतर मोटारींस प्रवेश मिळूं नये असा जपान्यांचा नियम होता. सिंगापूर बंदर जपा-न्यांच्या मालकीचें असल्यामुळें त्यांचे नियम जर्मन आरमारीखात्याच्या अधि-काऱ्यांस पाळावे लागत. ज्या दिवशीं आम्हांला त्यांच्या पाणबुड्या दाखविण्याचा कार्यक्रम जर्मन अधिकाऱ्यांनीं ठरविलेला होता, त्या दिवशीं सकाळीं ते सर्व अधिकारी आपापल्या मोटारगाड्यांतून सिंगापूर बंदरावर जाऊन पोंचले व त्यांनीं ८-३० च्या सुमारास आपल्या तीन मोटारी आमच्या बंगल्यावर पाठवून दिल्या. त्यांच्या सूचनेप्रमाणें आम्ही सर्वांनीं एक एक खाकी सदरा व विजार बरोबर घेतलेली होती. आम्ही एकंदर आठ अधिकारी होतों. तेथें पोंचल्यावर त्या सर्वांनीं आमचें स्वागत केलें. सर्व जर्मन अधिकाऱ्यांशीं आमची ओळख करून देण्यांत आली. धक्क्यावर पुष्कळ जहाजें होतीं. स्वच्छ ऊन पडलेलें असून समुद्राच्या लहरी त्यांत तळपत होत्या. समुद्राचे चंचल तरंग धक्क्यावर आपटून त्यांतून खळखळ ध्वनि निघत होता. किनाऱ्यालगतच्या बोटीवर चढून त्याच्या पलीकडील बाजूस त्यास चिकटून असलेल्या पाणबुडीवर शिडी लावून आम्ही उतरलों. यंत्रांचें तेल लागून वाण झालेल्या निळ्या चड्डया घातलेले ते उघडे गौरकाय जर्मन लोक आपापल्या कामांत गर्क होऊन गेले होते. कोणी जाडजूड दोरखंडाचें वेटोळें करीत होते, कोणी शिड्या इकडून तिकडे नेत होते. इतर कांहींजण बोटीवरील सौधावर उभे राहून शांतपणें हें सर्व दृश्य बघत होते. वाऱ्याचा जोर आणि समुद्राचा खळखळाट यामुळें आपला शब्द हाताखालच्या लोकांस ऐकूं जाणार नाहीं, म्हणून इकडे तिकडे संचार करणाऱ्या लहान बोटींचे कप्तान पत्र्याच्या कर्ण्यांतून हुकूम सोडीत होते. मधूनच फट्फट्

करीत एकादी जपानी मोटारबोट आपला लहानसा झेंडा फडकावीत आमच्या समोरून दूर कोठेंतरी निघून जात असे. समुद्रांत आसपास लहान लहान बेटें, त्यांवरील हिरवेगार डोंगर आणि त्यांवर बांधलेल्या लहान लहान इमारती दिसत होत्या. बरोबर आणलेले कपडे आम्ही 'क्वीटो' नांवाच्या जहाजावर अधिकाऱ्यांच्या खोल्यांत ठेवून दिले.

आम्ही ज्या पाणबुडीवर उतरलों ती U २३८ नंबरची पाणबुडी होती. हिची लांबी सुमारें १२५ फूट असून जणूं काय समुद्रसपाटीपेक्षां तीन फूट उंच बांधलेली, समुद्राच्या पाण्यावर तरंगती ठेवलेली, निमुळत्या टोकाची ती एक विस्तीर्ण गच्चीच होती. पाणबुडीच्या दोन्ही बाजूला एका टोंकापासून तों थेट दुसऱ्या टोंकापर्यंत लांबच लांब लोखंडाच्या पत्र्याचे दोन फुगीर आणि पोकळ मोठे नळ बसविलेले असतात. पाणबुडीला पाण्यांत बुडी मारण्याची वेळ आली कीं यांत्रिक पंपानें समुद्राचें पाणी या दोन्ही बाजूच्या नळांत ओढून घेतात. अशा तऱ्हेनें पाणबुडीचें वजन वाढलें कीं ती आपोआप पाण्यांत बुडूं लागते. पाणबुडीच्या दोन्ही निमुळत्या टोकांजवळ एक एक हलकी तोफ बसविलेली असून, तिच्या मधोमध कांहीं लोखंडी भोंगे इत्यादि यंत्रसामुग्रीचीं टोकें वर आलेलीं होतीं. त्यांच्यावर ही एक लहानशी गच्ची तयार करण्यांत आली होती. या गच्चीवर जाण्यास लोखंडी गज लावलेली एक लहानशी शिडी होती. वरच्या बाजूसही एक-दोन तोफा बसविलेल्या होत्या. जर्मन अधिकाऱ्यांच्या दुर्बिणींतून आम्ही सभोंवारचें दृश्य बघितलें. त्या जर्मन दुर्बिणी उत्कृष्ट प्रकारच्या होत्या. सिंगापूर बेटापासून कांहीं मैलांच्या अंतरावर असलेल्या एका बेटावर इंग्रजांनीं मोठमोठ्या कोठ्या बांधवून त्यांत बरेंचसें पेट्रोल सांठविलेलें आहे. दुर्बिणींतून त्या बाजूला नजर टाकली तेव्हां जणूं काय आपण एकादा गिरणीचा भोंगा अगदीं जवळून बघत आहोंत, अशा प्रकारचें विटांनीं बांधलेल्या त्या अवाढव्य कोठ्यांचें दृश्य दिसूं लागलें. आम्ही पाणबुडीवर उतरल्याबरोबर किनाऱ्यावरील इतर बोटींपासून ती पाणबुडी दूर नेऊन तिचें यंत्र चालू करण्यांत आलें. सिंगापूर बंदराच्या बाहेर खडकाळ भागापासून दूर जाण्यास पाणबुडीनें सुरुवात केली. बोटीवर एक डॉक्टर, एक इंजिनियर, एक कप्तान असे तीन मुख्य अधिकारी, एक-दोन दुय्यम अधिकारी व इतर सुमारें चाळीस आरमारी-सैनिक असतात. कप्तानाच्या सूचनेप्रमाणें एका लहान चौकोनी भोकशांत शिरून पक्क्या बसविलेल्या एका लहान लोखंडी शिडीवरून आम्ही आंत उतरलों. येथें मधोमध थोडीशी पोकळी असून कांहीं यंत्रसामुग्री होती. त्याच्याच खालीं असलेल्या आणखी एका लोखंडी शिडीवरून आम्ही अगदीं तळमजल्यावर उतरलों. येथें एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत सबंध पोकळी होती. वरील दोन्ही भोकें बंद करण्यांत आलीं होतीं. आंत जणूं काय रात्र असल्याचाच भास होत होता. ठिकठिकाणीं विजेचे दिवे होतेच. त्या पोकळ

कोठडींत उतरल्यावर विजेच्या कृत्रिम पिवळसर प्रकाशांत आपण एका विचित्र वातावरणांत प्रविष्ट झाल्याचा भास होतो. आंतल्या बाजूस बोटीचे तीन भाग करण्यांत आले होते. निमुळत्या टोकांशीं दोन्ही बाजूस लाकडी भिंती घालून मधल्या विस्तीर्ण भागांतून त्या निमुळत्या टोंकाच्या खोलींत जावयास मधोमध गोल भोकें (दरवाजे) होतीं. आंत सर्व ठिकाणीं ताठ उभे राहतां येण्याइतकी त्या मजल्याच्या छताची उंची होती. निमुळत्या टोंकाच्या खोलींत आठ टॉर्पेडो होते. टॉर्पेडो म्हणजे फारच जड असे ५-६ फूट लांब लोखंडी गोळे असतात. तोफेप्रमाणें हे पाणबुडीच्या आंतून डागले जातात. एक टॉर्पेडो मारल्याबरोबर ज्या नळींतून अथवा तोफेंतून तो डागला जातो त्या तोफेचें तोंड आपोआप बंद होतें. त्यामुळें समुद्राचें पाणी त्याच वाटेनें आंत येऊं शकत नाहीं. हे लोखंडी गोळे जमिनीवरून उचलून बरोबर तोफेच्या नळकांड्यांत बसतील अशी यंत्रसामुग्री असते.

एकदां पाणबुडी मोहिमेवर निघाली कीं तिला परत येईपर्यंत दोन-तीन महिने तरी लागतात. एवढ्या अवधींत बोटीवरील सर्व (४५) माणसांची राहण्याची व खाण्यापिण्याची सोय त्यांत असते. बोट पाण्यांत बुडाली म्हणजे आंत असणाऱ्या सर्व माणसांस घाम सुटतो. आंत असतांना बोटीची हालचाल मुळींच समजून येत नाहीं. एवढ्याश्या जागेंत सर्व सुखसोयी करण्यांत मानवी कौशल्याचा परमोत्कर्ष त्या ठिकाणीं झालेला दिसतो. एकाच मेजाचे पाय मोडून व दुमडून तें लेखन, भोजन किंवा एकाद्या रुग्णाइतावर करावी लागणारी शस्त्रक्रिया अशा अनेक व्यापारांकरतां वापरण्याची त्यांत सोय असते. एवढ्याश्या जागेंतून हालचाल करतांना लागल्यास इजा होऊं नये म्हणून रबरी पातीं असलेले लहान विजेचे पंखे आंत असतात. पाणबुडीच्या मधोमध झाडाच्या बुंध्यासारखा एक जाडजूड खांब अथवा मनोरा असतो. याचें लहानसें निमुळतें टोंक पाणबुडीच्या शेंडीप्रमाणें पाण्यावर निघालेलें असतें. पाणबुडी आंतून संचार करीत असली तरी तिची ही शेंडी पाण्याच्या पृष्ठभागावर तरंगत असते. या खांबाला एक लहानसा आरसा बसविलेला असतो. तळमजल्यावरील या खांबास अनेक लहानसहान यंत्रें बसविलेलीं असतात. या खांबास लागूनच मोटारसायकलच्या सीटप्रमाणेंच एक मोठें आसन बसविलेलें असतें. खांबाकडे तोंड करून या आसनावर बसलें म्हणजे खालच्या बाजूस पाय ठेवण्याकरतां खांबाच्या दोन्ही बाजूस दोन पॅड्ल्स् असतात. वर खांबाच्या समांतर रेषेंत हातानें धरून ठेवावयास खांबापासून फुटलेले (दोन्ही बाजूस एक एक असे) दोन दांडे असतात. खांबाकडे तोंड करून आसनावर बसून दोन्ही पॅड्ल्सवर दोन पाय व दांड्यावर दोन हात ठेवले म्हणजे डोळ्यासमोर खांबाला लावलेला एक आरसा येतो. या आरशांत शेंडीवरील आरशाचें प्रतिबिंब पडून समुद्राचा पृष्ठभाग अगदीं एकाद्या खिडकींतून बघितल्यासारखा स्वच्छ दिसतो. उजव्या

पॅड्‌लवर पाय किंचित् दाबला म्हणजे तो खांब उजवे बाजूस फिरूं लागतो. डाव्या पायानें डाव्या पॅड्‌लवर जोर दिला तर तो डाव्या बाजूस फिरूं लागतो. याप्रमाणें क्षणार्धांत पायाच्या थोड्याश्या दाबानें तो मनोरा फिरवून आंत बसल्या बसल्या समुद्राच्या पृष्ठभागाचें संकीर्ण समालोचन करितां येतें. या आरशावरून दृष्टि काढून शेजारच्या दुसऱ्या एका लहानशा चौकोनी आरशांत बघितलें म्हणजे अंतरिक्षांत सभोंवार पाहतां येतें. अशा तऱ्हेनें पृष्ठभागावर शत्रूचें जहाज व आकाशांत शत्रूचें विमान आहे कीं काय हें चटकन् समजतें व त्याप्रमाणें शत्रूच्या जहाजावर टॉर्पिडो मारावयाचा किंवा कसें हें त्या जहाजाचा मुख्य अधिकारी ठरवितो.

या बोटीवरील अधिकाऱ्यांनीं आम्हांला सर्व प्रकारची माहिती दिली. आंतील माणसें म्हणजे तरणीं बांड जर्मन पोरें अर्ध्या विजारी घालून उघड्या अंगानें शांतपणें यांत्रिक देखरेखीचीं आपलीं कामें करीत होतीं. शिस्त, आज्ञाधारकपणा व शांत चित्तवृत्ति हे गूण त्यांच्या अंगीं पूर्णपणें बाणलेले होते. अर्ध्या पाऊण तासानें बोट फिरून पाण्याच्या पृष्ठभागावर आणण्यांत आली. वरचे दरवाजे उघडले जाऊन थोडा उजेड आणि वारा आंत आल्याचा भास होत होता. तळमजल्यावरून आम्ही मधल्या मजल्यावर आलों. येथें वरून थोडें पाणी गळत होतें. तेथून चढून बोटीच्या वरच्या बाजूस आलों. जणूं काय बोटीला स्नान घातलें असावें अशा तऱ्हेनें बोटीचें सर्वांग ओलें दिसत होतें. तोफासुद्धां ओल्या झालेल्या होत्या व त्याच्यावरून पाण्याचे बिंदू अधूनमधून पडत होते. समुद्राच्या वाऱ्याच्या झुळकीनें व उन्हानें हें पाणी चटकन् शोषून घेतल्यामुळें समुद्रस्नान केलेल्या त्या पाणबुडीचें अंग पूर्वीप्रमाणें पुन्हा स्वच्छ आणि कोरडें झालें. आमचे कपडे यंत्रावरील तेलानें, पाण्यानें व घामानें स्वच्छ राहिलेले नव्हते. मध्यान्हीचा सुमार झाला होता. बोट किनाऱ्यावरील इतर जहाजांच्या जवळ आणण्यांत आली. या वेळेस फारच काळजी घ्यावी लागते. कारण पाणबुडीच्या दोन्ही बाजूंस नाजुक लोखंडी पत्र्याचे जे नळ असतात ते टक्कर लागून फुटण्याचा किंवा त्यांस भोंक पडण्याचा संभव असतो, म्हणून पाणबुडी इतर बोटींच्या अथवा किनाऱ्याच्या लगत आणावयाची असली म्हणजे ज्या बाजूस जहाजाचा किंवा किनाऱ्याचा संपर्क व्हावयाचा असेल, त्या बाजूस दोरी बांधलेल्या जाडजूड वेताच्या भरीव टोपल्या घेऊन दोन-तीन लोक धांवतात. पाणबुडीची बाजू त्या जहाजास अथवा किनाऱ्यास लागावयाचे आंतच ते या टोपल्या दोरीनें त्या दोघांच्या मधोमध पाण्यांत धरतात व त्यामुळें पाणबुडीच्या नाजुक फुगीर नळांस या संपर्काचा धक्का बसत नाहीं. वेताच्या टोपल्या हळू हळू दोरीनें वर ओढून पाणबुडी अगदीं बेतानें जहाजाला अथवा धक्क्याला चिकटवितां येते. त्यानंतर टोपल्या काढून घेण्यांत येतात.

आम्ही किनाऱ्यालगतच्या 'क्वीटो' या जर्मन जहाजावर जाऊन हात-पाय, तोंड धुतलें व कपडे बदलले. हें जहाज व याच्याच जोडीचें किनाऱ्यास लागलेलें दुसरें जहाज युद्ध सुरू झालें त्या वर्षीं म्हणजे १९३९ च्या सप्टेंबर महिन्यांत दक्षिण अमेरिकेंत होतें. युद्धकालांत तीं दोन्हीं एवढी लांबची सफर करून शत्रूचा डोळा चुकवून येथवर आलीं. 'क्वीटो' जहाजाच्या सर्वांत वरच्या सौधावर जाड (कॅनव्हासचा) कापडाचा मांडव घालून छाया करण्यांत आली होती. त्या छतापासून तों जहाजाच्या कठड्यास लागून त्या सौधाच्या लाकडी फरसबंदीपर्यंत येणारे असे पडदेवजा दोन झेंडे शेजारीं शेजारीं लावण्यांत आलेले होते. एक लाल होता. त्याच्या मधोमध एक शुभ्र वर्तुळ असून त्या वर्तुळांत एक मोठें काळें स्वस्तिक काढलेलें होतें. त्याच्या शेजारीं आपलें तिरंगी निशाण होतें. दोन्हीं निशाणें सुमारें सहा फूट लांब व तीन फूट रुंद अशा मापाचीं होतीं. कोठल्याही आंतरराष्ट्रीय समारंभांत समभागी होणाऱ्या सर्व राष्ट्रांचे झेंडे बरोबरीनें एका शेजारीं एक असे लावावयाचे असतात. या झेंड्यालगतच म्हणजे कठड्याजवळ खुर्च्यांची एक रांग होती. त्याच्या पलीकडे लागूनच भोजनाचें मेज व दुसऱ्या बाजूसही खुर्च्यांची अशीच रांग होती. टेबलाच्या दोन्हीं अरुंद बाजूंस एक एक खुर्ची होती. मेजावर स्वच्छ चादर, लहान हात-रुमाल, काटे-चमचे, सुऱ्या, चिनी मातीच्या ताटल्या,मधोमध मीठ वगैरे असलेलें एक लहान पंचपात्र इत्यादि साहित्य होतें. आमचें कपडे बदलणें होईपर्यंत त्या 'क्वीटो' बोटीवरील मुख्य अधिकारी, पाणबुडीवरील मुख्य अधिकारी, आरमारी-प्रतिनिधि व त्यांचे सल्लागार हे आमचें स्वागत करण्यास वर उभे होते. स्मित वदनानें आमच्याशीं हस्तांदोलन करीत आरमारी-प्रतिनिधीनें आमचें स्वागत केलें. अपरिचित अधिकाऱ्यांशीं आमची ओळख करून देण्यांत आली. गप्पा, विनोद, व परस्परांच्या देशाविषयीं, धर्माविषयीं, अथवा कुटुंबाविषयीं पृच्छा असें सुरू झालें. त्याबरोबरच बियर, व्हिस्की, सोडा, शॅंपेन इत्यादि पेयें ज्याच्या त्याच्या आवडीप्रमाणें देण्यांत आलीं. सुमारें अर्ध्या तासानें आम्ही भोजनास बसलों. मांसमिश्रित उकडून केलेली बटाट्याची भाजी, गव्हाची ब्रेड वगैरे आमच्या रोजच्या सरावांतल्या पदार्थांहून भिन्न असे ते पदार्थ होते. जेवण ऐन रंगांत आलें असतांना सर्वजण जिन्‌चे (जिन् हें एक प्रकारचें मादक पेय असतें.) पेले हातांत घेऊन जागचे जागीं उभे राहिले. पेले धरलेले हात वर करून परस्परांचा विजय होवो अशी इच्छा प्रदर्शित करून सर्वांनीं त्या मदिरेचे घोट घेतले व जो तो आपापल्या जागीं स्थानापन्न झाला. आंतरराष्ट्रीय समारंभांत परस्परांच्याबद्दल शुभेच्छा प्रदर्शित करणारा हा विधि दोन-तीन वेळां तरी पार पडतो. त्या दिवशींच्या या नव्या व अमोल अनुभवानंतर आम्ही दुपारीं २ च्या सुमारास आमच्या निवासस्थानीं परत आलों.

## फांसा उलटा पडला ! : २४

डिसेंबर १४ ला नेताजी सिंगापुरांत आले हें वर सांगितलेंच आहे. टोकिओंत उभयपक्षीं झालेल्या कराराप्रमाणें, आल्यावर कांहीं दिवसांनीं दक्षिण प्रदेशाच्या जपानी सेनाधिपतीची त्यांनीं भेट घेतली. उलट, जपानी सेनाधिपती-नेंही नेताजींच्या निवासस्थानीं येऊन त्यांस परत भेट दिली. या जपानी अधिकाऱ्याचा हुद्दा जनरलचा होता. जपानी राजकारणांत आपल्या मुत्सद्दे-गिरीनें यांनीं फारच उच्च स्थान पटकाविलें होतें. मांचूरियासारखा संपन्न देश जपानला मिळवून देण्यास हेच कारणीभूत झाले होते. कांहीं दिवसांनीं नेताजींनीं दक्षिण प्रदेशाच्या जपानी आरमारी-प्रमुखांची गांठ घेतली. उच्च अधिकारपदावर असलेल्या सर्वच जपानी अधिकाऱ्यांच्या चेहऱ्यावर उच्च कुलाचें निदर्शक असें तेज विलसत असलेलें दिसतें. या आरमारी अधिकाऱ्यांच्या चेहऱ्यावर कोणाच्याही सहज लक्षांत येईल इतक्या स्पष्टपणें त्यांच्या धीरगंभीर स्वभावाचा व शांत-वृत्तीचा भाव उमटलेला होता. किती शांतपणें ते आपापले व्यवहार उरकीत होते ! यांच्यावर आकाश जरी कोसळून पडलें तरी यांची शांतता किंवा मनाचा समतोलपणा भंग पावणार नाहीं, हाच निष्कर्ष त्यांच्या हालचालींवरून निघत होता. हीसुद्धां एक प्रकारची साधना आहे. जपानी लोक सांगतात कीं, बौद्ध धर्मामुळेंच हा मनाचा समतोलपणा ते शिकले. लहानपणापासून जपानी तरुणांस जें एक विशिष्ट प्रकारचें शिक्षण दिलें जातें त्यांत सर्वांगीण उन्नतीचाच मुख्य उद्देश असतो. विशेषतः संकटकाळीं न डगमगतां अत्यंत शांतपणें स्वतःचें कर्तव्य करीत राहाणें याचें त्यांस शिक्षण दिलें जातें.

फिलिपीन्स बेटावर अमेरिकन सैन्य उतरलें होतें. तेथें घनघोर रण-संग्राम चालू होता. मलायाच्या पश्चिम किनाऱ्यापर्यंत येऊन शत्रुपक्षाच्या पाणबुड्या धुडगुस घालीत होत्या. मलाया-सिंगापूर टापूवर ते केव्हां सैन्य उतरवितील याचा कांहींच नेम नव्हता. नेताजींनीं हिंदी स्वातंत्र्यसैन्यास उद्देशून एक जाहीर आज्ञा काढली कीं, " यापुढें हिंदुस्थान-ब्रह्मदेश आघाडीवरच आपण लढावयाचें अशी आंतरराष्ट्रीय परिस्थिति राहिलेली नसून, भेटेल तेथें शत्रूशीं दोन हात करण्याची तयारी ठेवा." मलायांत असलेली तीन नंबरची डिव्हिजन जरूर पडल्यास जपानी सेनाधिपतींच्या हातीं सोपावण्यांत यावी, या दृष्टीनें जपानी सेनाधिपतींनीं एके दिवशीं येऊन सिंगापुरांतील हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या तुकड्यांची पाहणी केली. या वेळीं नेताजी पुन्हां रंगूनला परत गेले होते. युरोपांत जर्मनी फार

काळ टिकाव धरू शकणार नाहीं, हें स्पष्ट दिसूं लागलें होतें. हिंदुस्थानांतील जिंकलेला सर्व प्रदेश १९४४च्या पावसाळ्यांत स्वातंत्र्यसैन्यानें आणि जपान्यांनीं सोडून दिलेला होता. इंफाल शहरांत वेढलेल्या साम्राज्य-फौजांचीं बंधनें शिथिल झालीं होतीं. कोहिमामार्गें दीमापुराहून त्यांस रसद पोचूं लागली. पावसाळा संपल्या-वर त्यांनीं सभोंवार नजर टाकली. आपलीं गस्तीपथकें पाठवून त्यांनीं जपानी फौज व स्वातंत्र्यसैन्य कोठें आहे त्याचा कानोसा घ्यावयास सुरुवात केली. निदान समोर तरी शत्रू असेल, असा त्यांचा अंदाज होता. परंतु काय चमत्कार ! तेथेंही मोकळें रान. त्यांच्यावर आलेलें प्राणसंकट तर आतां पार टळलें होतें. शिवाय हिंदुस्थानाचा स्वतंत्र झालेला भागही पुन्हा त्यांच्या ताब्यांत आपोआप आलेला होता. आंधळा मागतो एक डोळा, देव देतो दोन, तशांतलीच त्यांची स्थिति झाली. एवढ्या अवधींत हिंदुस्थानांतही बराच फौजफाटा आणि युद्धसामुग्री जमविण्यांत आली होती. ती सर्व या आघाडीवर पाठविण्यांत आली. हातून गेलेला व आतां मोकळा असलेला हिंदुस्थानाचा सर्व भाग त्यांनीं आपल्या ताब्यांत घेतला. सरहद्दीवर त्यांनीं आपले चौक्यापहारे बसविले व ब्रह्मदेशाकडे दृष्टि टाकली. आपल्या आजपर्यंतच्या धाकानें शत्रूस केवळ थोपवून धरावयाचें व वेळ मारून न्यावयाची, परंतु ब्रह्मदेश-हिंदुस्थान सर-हद्दीवरून शक्य तितका फौजफाटा व युद्धसामुग्री काढून सयाम-इंडोचायनामार्गें पॅसिफिक टापूकडे पाठवावयाची हें जपान्यांचें धोरण आतां ठरून गेलें होतें. ब्रह्मदेशांत ठिकठिकाणीं थोडी थोडी जपानी फौज होती. बाकी सगळा पोकळ कारभारच झालेला होता. बी. डी. ए. म्हणजे ( बर्मीज डिफेन्स आर्मी ) ब्रह्मदेश-संरक्षक-दलानें युद्धकालांतील हलाखीच्या परिस्थितीस व जपान्यांच्या हडेलहप्पी वर्तनास कंटाळून त्यांच्याविरुद्ध हल्ले करणें सुरू केलें होतें. लष्करी अधिकाऱ्यांच्या शाळेंत शिकून तयार झालेले तरूण आपला शिक्षणक्रम पुरा होतांच एके दिवशीं हत्यारांसकट चालते झाले. खेड्यापाड्यां-तून, रानावनांतून व हवाई हल्ल्यामुळें ओस पडलेल्या भयाण शहरांतून आणि गांवांतून ब्रह्मी फौजी तुकड्यांचे जपान्यांविरुद्ध चोरटे हल्ले सुरू झाले. रात्रीं-अपरात्रीं जपान्यांच्या विमानतळावर हल्ला करून ते विमानांची व इतर सामानाची नासधूस करीत व लूट घेऊन पळून जात. याच सुमारास जपान्यां-विरुद्ध प्रक्षुब्ध झालेल्या लोकमतामुळें ब्रम्हदेशांत हेरांचा सुळसुळाट झालेला होता. यांपैकीं कांहीं स्वयंस्फूर्त असून बाकीचे इंग्रजांच्या आमिषास बळी पडून हें काम करूं लागले होते. यांत हिंदी व ब्रम्ही दोघेही सामील होते. उपहार-गृहांत कोणाशीं बोलावयाची सोय उरलेली नव्हती. एकदां स्वातंत्र्यसैन्याची एक तुकडी आगगाडीनें रंगूनहून उत्तर ब्रम्हदेशांत जात असतांना स्वातंत्र्य-सैनिकासारखाच पोषाख केलेला एक गृहस्थ या आगगाडींतील इतर सैनिकांत मिळून मिसळून स्वातंत्र्यसैन्याच्या आघाडीवरील तुकड्यांबद्दल अघळपघळ



गप्पा मारू लागला. या अनुषंगानें त्यानें इतर चौकशीसही आरंभ केला. त्यानें 'नारायण' नांव धारण केलेलें होतें. त्याच्या चौकस स्वभावाबद्दल व एकंदर हालचालीवरून त्याचा संशय येऊन कांहीं सैनिकांनीं हळूच आपल्या तुकडीच्या मुख्य अधिकाऱ्याकडे जाऊन ती गोष्ट कळविली. त्या 'नारायणा'स अटक करून त्याची चौकशी केल्यावर तो अनेक नांवें धारण करून शत्रूस बातमी पुरविणारा एक हेर होता असें नजरेस आलें !

ब्रम्हदेशांत दिवस उजाडल्यापासून तों सूर्यास्त होईपर्यंत हवाई हल्ले व्हावयाचे. यांत बी २९, बी २४, पी ३८ हीं अमेरिकन विमानेंच बहुधा भाग घेत. क्वचित् इंग्रजांचें 'मॉस्किटो' नांवाचें लहान विमान यावयाचें. एकाद-दुसरें विमान आलें म्हणजे तें बहुधा टेहेळणीकरतांच आलेलें असावयाचें. हल्ला करावयास कधीं ६ विमानें, कधीं २७, ३६ अथवा १११ इतकीं विमानें यावयाचीं. शे-सव्वाशें विमानें आलीं म्हणजे तीं एकामागोमाग एक अशा तीन-तीन अथवा सहा-सहांच्या टोळ्यांनीं येतात. ज्या प्रदेशावर किंवा शहरांतील ज्या विभागावर स्फोटगोल टाकावयाचे असतील, त्या प्रदेशावर किंवा विभागावर खूण केलेले नकाशे प्रत्येकाजवळ दिलेले असतात. इंग्रज व अमेरिकन वैमानिकांचा नेम कधींही बरोबर नसल्यामुळें ते 'कारपेट बॉंबिंग'चा अवलंब करीत. 'कारपेट बॉंबिंग' याचा अर्थ शहराचा अथवा इतर कोणताही एक-एक विभाग घेऊन तो या टोंकापासून त्या टोंकापर्यंत उध्वस्त किंवा बेचिराख करावयाचा. तेवढ्यांत कोठेंतरी शत्रूचें एकादें ठाणें, महत्त्वाचें केंद्र अथवा युद्धसामुग्रीचा सांठा नाश होईल, याच एका आशेनें त्या विभागांत राहणाऱ्या यच्चयावत् सर्व नागरिकांचें वाटोळें करण्यास त्यांनीं मागें पुढें पाहिलें नाहीं. कारण शत्रूचें ठिकाण नेमकें कोठें आहे, हें त्यांस कळण्याइतकें त्यांचें हेरखातें कार्यक्षम नव्हतें व तें कळलें तरी बरोबर त्या ठिकाणावर स्फोटगोल टाकूं शकतील असे वैमानिक त्यांच्याजवळ नव्हते. या कारपेट बॉंबिंगचा अवलंब इंग्रज व अमेरिकन करीत, त्याला आणखीही एक दोन कारणें होतीं. एकतर, शत्रुत्वाच्या भावनेनें अंध होऊन त्यांनीं सर्व प्रकारचा ताळतंत्र सोडून अमानुष हल्ले केले व दुसरें कारण म्हणजे, ते जपान्यांस व स्वातंत्र्यसैनिकांस इतके घाबरत कीं, रणांगणांवर त्यांच्याशीं दोन हात करावयाची त्यांची छाती नसल्यामुळें हवाई हल्ल्यानें सर्व प्रदेश बेचिराख करून, शत्रूस दडावयास जागा राहिली नाहीं असें पाहून, सर्व भूप्रदेश सपाट झाल्यावर मग आसपास कोठें शत्रू नाहीं अशी खबरदारी घेत, यांची पराक्रमी साम्राज्य-सेना मोठ्या शौर्यानें पुढें आक्रमण करीत असे !

मार्ताबान या दक्षिण ब्रम्हदेशांतील बंदराची तर हवाई हल्ल्यांमुळें नुसती स्मशानभूमि झालेली आहे. एका अशा शेजारीं एक हजारों विहिरी खणल्याप्रमाणें, एका स्फोटगोलाच्या खळग्यास लागूनच दुसरा, असे अनेक खोल व विस्तीर्ण खळगे

तेथें पडलेले आहेत. आगगाडीच्या रुळांचे वाकविलेले दीर्घ लचके तुटून ते आजूबाजूच्या झाडांवर अडकून पडले होते ! आगगाडीचे डबे उधळून पार कोठें तरी फेंकले गेले होते. कित्येक डबे उंच उडून, उलटे होऊन, दुसऱ्या डब्यांवर जाऊन पडले होते. समुद्राच्या कडेचें बांधकाम चक्काचूर होऊन 'समुद्रास्तृप्यन्तु' झालें होतें. मार्ताबानच्या समोरच सालवीन नदीच्या मुखाच्या पलीकडे असलेलें मोलमीन शहर अर्धे अधिक उध्वस्त झालें. उत्तर ब्रम्हदेशांतील सर्व शहरांची तर इतकी नासधूस झाली होती कीं, हवाई हल्ल्याचा कमीजास्त प्रसाद प्रत्येक घरास व झोपडीस मिळाला होता. बँकॉकपासून रंगूनपर्यंत केलेल्या नव्या लोहमार्गावरील प्रत्येक पूल स्फोटगोल टाकून अमेरिकन वैमानिकांनीं उडविला होता. प्रत्येक पुलाजवळ जपानी सैनिकांची व मजुरांची एक एक तुकडी जय्यत तयार असे. हवाई हल्ल्यानें पूल पडला कीं सैनिकांची व मजुरांची ही तुकडी पांच-सहा दिवसांत तो पूल फिरून तयार करीत असे. रानांतील मोठमोठे वृक्ष तोडून, ते ओबडधोबड तासून, लोखंडाचे ओबडधोबड खिळे ठोकून अवघ्या पांच-सहा दिवसांत भले मोठे पूल तयार करण्याची जपानी फौजी इंजिनियरांची हातोटी फारच वाखाणण्यासारखी होती. पूल तयार झालेला पाहून अमेरिकन वैमानिकही तो पुन्हा पाडून टाकीत व जपानीही तो पुन्हा तयार करीत ! एक पूल पडला म्हणजे तोंवर आगगाडीचें दळणवळण अडूं नये म्हणून त्याच नदीवर मुख्य पुलाच्या आजूबाजूस जपानी दोन-तीन राखीव पूल तयार करून ठेवीत. नदीच्या अलीकडे व पलीकडे मुख्य लोहमार्गापासून फाटे काढून ते या पुलांना जोडलेले असत. मुख्य पूल पडला म्हणजे दुसऱ्या एकाद्या राखीव पुलावरून आगगाडी जात येत असे. मुख्य पूल सुस्थितींत असेपर्यंत हे राखीव पूल पालापाचोळा घालून आच्छादित करून ठेवले जात. म्हणजे शत्रु-वैमानिकांचें लक्ष त्यांच्याकडे चटकन् वेधलें जात नसे. केव्हां केव्हां पाण्याचा ओघ, नदीचें रुंद पात्र व आजूबाजूचा ओसाड प्रदेश यामुळें चटकन् व गुप्तपणें दुसरा पूल करणें शक्य होत नव्हतें. अशा ठिकाणीं दुसरा पूल न करितां तेथवर गाडी आणून थांबवीत. आपापलें सामान डोक्यावर घेऊन शक्य असल्यास पायीं किंवा होड्यांतून सर्वांस नदी पार करावी लागे. नंतर दुसऱ्या बाजूस असलेल्या गाडींत सामान ठेवून पुढें कांहीं अंतर आगगाडींतून जातां येई. अशा तऱ्हेनें बँकॉकपासून रंगूनपर्यंतचा आगगाडीचा प्रवास या दिवसांत फारच कष्टप्रद होता. आजूबाजूला घनदाट अरण्य व आणखी त्यांत पाऊस पडून चिखल झालेला असावयाचा. दिवसाच्या हवाई हल्ल्यामुळें फक्त रात्रींच आगगाडीचा प्रवास करीत असत. पहांट झाली कीं आगगाडी कोठें तरी जंगलांतील एका फाट्यावर थांबवायची, पालापाचोळ्यानें ती आच्छादून एंजिन दूर काढून न्यावयाचें व स्वतः सर्व सामान डोक्यावर घेऊन आजूबाजूच्या झाडींत दूर निघून जावयाचें, असा क्रम असे. सूर्यास्तानंतर अंधार पडूं लागला कीं, पुन्हां गाडींत बसून गाडी चालू करावयाची. रात्रीं-अपरात्रीं एकाद्या नदीशीं

येऊन गाडी थांबायची. पाऊल बुडेल इतका चिखल असे. डबकीं सांचलेलीं असत. अंधार गुडुप असावयाचा. दर पावलागणिक पाय घसरण्याइतकें निसरडें झालेलें असे. सामानासकट नदीच्या पार जावयास सर्व सैनिकांची घाई, गडबड व गोंधळ उडून जाई. तद्देशीय हमाल व नावाडी अशा ठिकाणीं जड सामान वाहून नेण्या-करतां असत. या सर्व गोंधळाचा व सैनिकांच्या नवखेपणाचा फायदा घेऊन ते सामानासह पोबारा करीत. सततच्या हवाई हल्ल्यांमुळें लोहमार्गावरील वाहतुकीची व एकंदर प्रवासाची ही अशी स्थिति होती.

अंधाऱ्या रात्रीं विमानें येऊन निर्जन प्रदेशावर हवाई छत्रीच्या साहाय्यानें हेर सोडीत. त्यांच्याजवळ बरेंचसें द्रव्य, नकाशे, जडजवाहीर, मौल्यवान् वस्तू, शस्त्रास्त्रें इत्यादि सामुग्री दिलेली असे. जंगलप्रदेशांतून, दऱ्याखोरीं तुडवीतही कांहीं हेर पाठविले जात. हे जंगलांत किंवा डोंगराळ प्रदेशांत आपलें ठाणें मांडून संधी साधेल तसा खेड्यापाड्यांत व शहरांत प्रवेश करीत. आपल्या बाजूला कल असलेल्या प्रतिष्ठित नागरिकांस स्वत:जवळील कागदपत्र दाखवून व प्रसंगीं कांहीं चिरिमिरी देऊन, ते आपलें जाळें पसरून काम सुरू करीत. १९४४ च्या पावसाळ्यानंतर ब्रम्हदेशांतील एकंदर परिस्थिति अशा प्रकारची होती.

मागून कुमक येणें बंद झालें. आतां दऱ्याखोऱ्यांतील आघाडीवरच्या छावण्यांतून राहणें इष्ट नव्हतें. ब्रम्हदेशांतील लोकवस्तीचा भाग सोडून, सरहद्दी-वरील जंगलें आणि इतर भूभाग ओलांडून स्वातंत्र्यसेना व जपानी फौज हिंदु-स्थानाच्या लोकवस्तीच्या भागांत शिरली होती. पावसाळा सुरू झाल्यावर, हिंदु-स्थानाचा काबीज केलेला प्रदेश नाइलाजानें सोडावा लागून, या फौजा सरहद्दीवर येऊन ठाकल्या व यांत अनेक प्रकारांनीं फार प्राणहानी झाली, हें आपण यापूर्वीं पाहिलेंच आहे. आतां कुमक येईनाशी झाली म्हणून सरहद्दीवरचीं दऱ्याखोऱ्यां-तील हीं ठाणीं सोडून पुन्हा ब्रम्हदेशाच्या वस्तीच्या भागांत माघारीं जाणें जरूर होतें. इकडे इंग्रजांनींही जोर सुरू केला. त्यांचीं गस्ती-पथकें जंगलांत चोहोंकडे हिंडूं लागलीं. क्वचित् त्यांच्या व विरुद्ध पक्षाच्या झटापटी होत. अशा झटापटी झाल्यावर बरेच दिवसांनीं त्यांस पत्ता लागे कीं, जपान्यांचें सैन्य या भागांत जवळ जवळ नाहींच. आतां पुढें सरकावयास हरकत नाहीं, असें निश्चितपणें कळून आल्यावर साम्राज्य-सेनेच्या तुकड्या पुढें सरकत असत.

जपानी व स्वातंत्र्यसैनिक यांस KOOA ( कुआ ) छापाच्या सिगारेटस् पुरविल्या जात असत. या छापाचें एकादें रिकामें सिगारेटचें पाकीट जरी जंगलांत पडलेलें सांपडलें, तरी तेथें आसपास कोठें तरी जपानी अथवा स्वातंत्र्यसैनिक असावेत, अशा संशयानें पांचावर धारण बसून साम्राज्य-सेनेची तुकडी त्या ठिकाणाहून पळ काढीत असे. जपान्याची मूर्ति डोळ्यासमोर आली कीं गोरे लोक अक्षरशः चळचळ कांपत असत. त्यांस दरदरून घाम सुटे व त्यांची बोबडी वळून जाई. युद्धाच्या सुरुवातीस जपानी विमानें डोक्यावर आलीं कीं,

त्यांतील जपानी वैमानिकांचें स्मरण होऊन त्यांची वरीलप्रमाणेंच परिस्थिति होई ! १९४४ च्या नोव्हेंबर महिन्यांत टिड्डिम सोडून, या दोन्ही सेना माघारीं फिरल्या. पुढील दोन महिन्यांत ' चिन ' घाटांतील सर्व ठिकाणें सोडून त्यांना चिंदविन नदीच्या पूर्व किनाऱ्यावर यावें लागलें. दक्षिणेच्या बाजूलाही बुथेडॉंग, मॉंगडॉ, पालेटावा इत्यादि ठिकाणें साम्राज्य-सेनेनें घेतलीं. ही सेना कोठल्याही दिशेनें पुढें सरकली, तरी थोड्याशा सैनिकांच्या तुटपुंज्या प्रतिकाराशिवाय, मोठी लढाई अशी कोठेंच होईना. कालेवा या मुख्य ठिकाणीं जपान्यांचा मोठा तळ होता. अनेक तंबू, राहुट्या, झोपड्या, कोठारगृहें, मोटारी, पेट्रोलचीं पिपें व रणगाडे इत्यादि सामान मोठ्या प्रमाणांत या ठिकाणीं होतें. याच्यावर साम्राज्य-सरकाराचे हवाई हल्ले फारच मोठ्या प्रमाणांत होऊं लागले. चिंदविन नदींत वाहतूक करणारीं अनेक लहान लहान जहाजें बुडून नदीच्या पात्रांत समाधिस्थ झालीं. टम्मू हातचें गेलेलेंच होतें. येथून कालेवाच्या रोखानें साम्राज्यसेना पुढें सरकली. तोफांचा गडगडाट सुरू झाला. ही सर्व अमेरिकेचीच तयारी; कारण इंग्रजांकडे कांहींच नव्हतें. हिंदुस्थानाकडून ब्रह्मदेशाकडे जातांना अमेरिकनांनीं युद्धाच्या धांद-लींत आणि गडबडींत केलेल्या टम्मूपासून कालेवापर्यंतच्या या एकशेंपांच मैलांच्या रस्त्याकडे पाहिलें म्हणजे मानवी कौशल्याची तारीफ करावीशी वाटते. डांबरांत भिजाविलेलें गोणपाट, नवारीचें कापड किंवा जाड कॅनव्हास पसरून ह्या रस्त्याचा बराचसा भाग डांबरी रस्त्याप्रमाणें साफ आणि गुळगुळीत केलेला आहे. रहदारीनें खळगे पडलेल्या रस्त्यावर जड मोटारलॉऱ्यांचीं चाकें चिखलांत रुतूं नयेत म्हणून जाळीदार लोखंडी पत्र्याच्या तुकड्यांची बिछायत या रस्त्यावर मैलोंगणती घातलेली आहे. रस्ता अरुंद होता, त्या ठिकाणीं पहाडास सुरुंग लावून तो मोठा करण्यांत आलेला आहे. रस्त्याच्या कडेला सीमेंटचे मोठमोठे चौकोनी ठोकळे एकावर एक रचून, त्यावर वाकवून तयार ठेवलेल्या पत्र्यांचें छप्पर ठोकून कोठारगृहें तयार करण्यांत आलेलीं आहेत. वाटेंतील ओढ्यांवर आणि नाल्यांवर अशाच प्रकारचे तयार सुटे विभाग जोडून त्यांचे पूल उभारलेले दिसतात. एवढ्या थोड्या अवधींत इतका सुंदर रस्ता तयार करणें ही खरोखर कौतुक करण्यासारखी गोष्ट आहे. अर्थात् याचें सर्व श्रेय अमेरिकन युद्धसामुग्री, कल्पनाशक्ति आणि त्यांच्या फौजी इंजिनियरिंग खात्याचे तज्ज्ञ यांस आहे. यांत इंग्रजांचा भाग यत्किंचितही नाहीं. वाईट वाटतें तें एवढेंच कीं, मानवजातीचा संहार करावयास सुंदर रस्ते, दळणवळणाचे मार्ग, इत्यादि तयार करण्याचें काम जितकें तडकाफडकी होतें तितकें तें शांततेच्या काळांत मनुष्यजातीच्या उद्धाराकरतां होत नाहीं ! या युद्धांत तर दुधाचे डबे, बिस्किटें, मोटारलॉऱ्या, तोफा, कपडे इत्यादि सर्व सामान अमेरिकेनें इंग्रजांस पुरविलें. या सर्व गोष्टींची इंग्रज अधिकाऱ्यांस इतकी लाज वाटत असे कीं, क्वचित् दुधाच्या डब्यावरील वगैरे छापील चिठी फाडून अथवा त्याच्यावरील छापील अक्षरें लपवून किंवा

खोडून तो माल इंग्लंडमध्येंच केला असल्याची ते हिंदी हस्तकांची खात्री करूं पाहात !

आज कालेवा गांवास जाऊन पाहिलें तर आकाशांतून खालीं आदळून चक्काचूर झालेलीं विमानें, मोडलेले रणगाडे, उध्वस्त झालेल्या राहुट्या, स्फोट-गोलांनीं पाडलेले खळगे, चौफेर पसरलेले पत्र्याचे तुकडे इत्यादि तेथें झालेल्या घनघोर रणसंग्रामाचे अनेक अवशेष दिसतात.

डिसेंबर १९४४ च्या अखेरीस, नेताजी पुन्हा विमानानें ब्रम्हदेशास आले. आघाडीवरील अनुभविक हिंदी अधिकारी रंगून, सिंगापूर अशा मुख्य तळावर नेमावे व इतके दिवस या ठिकाणीं काम केलेले अधिकारी आघाडीवर पाठवावे, अशा हेतूनें नेताजींनीं मुख्य मुख्य अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या. यांतच इतके दिवस फौजी चिटणीस म्हणून काम केलेले श्री. सहगल हे एका रेजिमेंटचे मुख्य अधिकारी म्हणून आघाडीवर गेले. जपान्यांनीं मोठ्या प्रमाणांत सैन्याची पीछेहाट सुरू केलेली होती. इंडोचायनांतील फ्रेंच अधिकारी, इंग्रज व अमेरिकनांस सामील होते. त्यांचीं सैन्यें पॅसिफिकमध्यें जितकीं अधिकाधिक जवळ येऊं लागलीं, तितकें त्यांचें शत्रुपक्षाशीं दळणवळण अधिक वाढलें. जपान्यांस आधींपासून याचा सुगावा लागलेला होताच, परंतु आतां तर परि-स्थिति जास्तच गंभीर होऊं लागल्यामुळें, या गोष्टीकडे कानाडोळा करणें शक्य नव्हतें. इंडोचायनामधील फ्रेंच अधिकाऱ्यांस बंदी करून राज्यकारभार आपल्या-कडे घेण्याचें त्यांनीं ठरविलें. फ्रेंच सैन्यानें यदा कदाचित् जास्त प्रतिकार केल्यास आपली जय्यत तयारी असावी अशा हेतूनें जपान्यांनीं ब्रम्हदेशाच्या आघा-डीवरील एक डिव्हिजन आणखी काढून घेतली व ती इंडोचायनामध्यें आणविली. यामुळें तर ब्रह्मदेशाच्या उत्तर सरहद्दीवर फारच कमी सैन्य उरलें. श्री. शहान-वाझ हे १९४५ च्या १५ जानेवारीस मंडालेस येऊन पोंचले. साम्राज्य-सेनांचा जोर फारच वाढला होता. त्यांना प्रतिकार जवळ जवळ नव्हताच असें म्हटलें तरी चालेल. मनांत जपान्यांबद्दलच्या बसलेल्या भीतीमुळें घाबरत घाबरत व चांचपडत हळूहळू पुढें सरकण्यास त्यांना वेळ लागला असेल तेवढाच !

फेब्रुवारीला एका खास सरकारी पत्रकाच्या द्वारें नेताजींनीं हिंदी स्वातंत्र्य-सैन्याच्या चार अधिकाऱ्यांस 'मेजर जनरल'च्या हुद्यावर चढविल्याचें जाहीर केलें. हे चौघे म्हणजे श्री. जगन्नाथराव भोसले, महंमद झमान क्यानी, चॅटर्जी व लोक-नाथन् होते. दिवसेंदिवस उत्तर ब्रम्हदेशांतील परिस्थिति जास्तच बिकट होऊं लागली होती. १९४५ मध्येंच युद्धाचा शेवट होणार असें सर्वसामान्य लोक समजूं लागले होते. जपान्यांस विचारतां, 'आम्ही ब्रम्हदेश कधींही सोडणार नाहीं' असेंच ते दर वेळेस ठांसून सांगत असत. आघाडीवरील परिस्थिति काय आहे हें प्रत्यक्ष पाहण्यासाठीं व तेथील आपल्या प्रमुख फौजी अधिकाऱ्यांशीं विचार-विनिमय करण्यासाठीं नेताजी फेब्रुवारी महिन्याच्या मध्याच्या सुमारास रंगून

सोडून पोपा-चौक पाडांग या विभागांत आले. साम्राज्य-सेना या वेळेस या विभागाच्या अगदीं जवळ येऊन ठेपलेली होती. परंतु संकटाची पर्वा न करितां आघाडीवरील परिस्थिति प्रत्यक्ष पाहण्यासाठीं म्हणून नेताजी या प्रदेशांत येऊन ठाकलेच. " येथें फार दिवस राहणें किंवा पुढें जाणें धोक्याचें आहे. रणगाडे, चिलखती मोटारी, बेसुमार तोफा, अजस्र फौजफाटा इत्यादि घेऊन शत्रु वेगानें पुढें सरकत आहे, तेव्हां आपण येथें येणें धोक्याचें आहे " असें सहकाऱ्यांनीं व जपान्यांनीं वारंवार सांगितलें, तरीसुद्धां नेताजींनीं त्यांचें म्हणणें मनावर घेतलें नाहीं. ' मरण यावयाचेंच असलें तर कोठेंही येईल. त्याच्यापासून दूर पळून तें टळत नाहीं. मृत्यु यावयाचाच असला तर आपलें ध्येय साध्य करीत असतांना आलेला मृत्यु उत्तम. त्याहून मानवानें जास्त काय अपेक्षावें ?' अशा तऱ्हेची नेताजींची वृत्ति होती. २६ फेब्रुवारीस इंग्रज सैन्य ' माहलेंग ' या ठिकाणीं मेक्टिला- (' मिथिला ' शब्दाचा अपभ्रंश ) पासून अवघ्या दहा मैलांवर येऊन पोंचलें. दरम्यान कांहीं फौज नव्हती. नेताजी घेऱ्यांत सांपडले. तरी स्वजनांच्या मदतीनें बैलगाडींत बसून, डोक्याला फडकें गुंडाळून, शेतकऱ्याच्या वेषांत उसाच्या मळ्यांतून व भाताच्या शेतांतून निघून ते शत्रूच्या कोंडीच्या बाहेर आले !

२८ फेब्रुवारीस स्वातंत्र्यसैन्याच्या क्रमांक २ डिव्हिजनचे चार प्रमुख अधिकारी व त्यांचे कांहीं हस्तक हे आघाडीवरून पळून जाऊन पांढरे रुमाल फडकावीत इंग्रजांस जाऊन मिळाले ! थोडेच दिवसांत त्यांच्या सहीचीं पत्रकें विमानांतून साम्राज्य-सेनेतर्फे स्वातंत्र्यसैनिकांच्या छावण्यांवर टाकण्यांत आलीं. हें वृत्त ऐकून नेताजींचा संताप अनावर झाला. " यापुढें अधिकारी काय किंवा साधा शिपाई काय कोणीही शत्रूस सामील होण्यास जात आहे असें दिसल्याबरोबर तेथल्या तेथें त्यास गोळी घालून ठार करावें " अशी नेताजींनीं सर्व स्वातंत्र्यसैनिकांस आज्ञा केली. फितुर झालेल्या लोकांचा निषेध करण्याकरतां, दूरपूर्वेत जागोजाग त्यांच्या आकृति वगैरे तयार करून निषेध-प्रदर्शक अनेक समारंभ करण्यांत आले.

दिवसेंदिवस शत्रुसैन्य जास्त जवळ येत चाललें, म्हणून झांशीराणी पथकाची ६५ स्त्री-सैनिकांची एक तुकडी रंगूनहून बँकॉकला पाठविण्यांत आली. आगगाडींत पासष्टजणींपुरतीच जागा होती. उरलेल्या पंचेचाळीस मुलींस पुढें केव्हांतरी आगगाडींत जागा असेल त्याप्रमाणें पाठविण्याची व्यवस्था करूं, असें जपानी अधिकाऱ्यांनीं सांगितलें. रंगून ते बँकॉक या जंगलप्रदेशांतून नवीन तयार केलेल्या आगगाडीनें प्रवास करणें त्या दिवसांत फार धोक्याचें होतें. दिवसा दक्षिणीं आकाशांत शत्रूचीं विमानें घिरट्या घालीत, म्हणून आगगाडी फक्त रात्रींच चालत असे. पूल व गाडीचा रस्ता कच्चा असल्यामुळें आगगाडीचा वेगही कमी असे. डबे सर्व मालाचेच असत. रात्रीं क्वचित् प्रसंगीं एकादें विमान येऊन आगगाडीवर घिरट्या घालून मशिनगनच्या गोळ्यांचा

मारा करी. अनेक ठिकाणीं पूल तुटलेले असत, त्यामुळें सामानासकट नदी ओलांडण्यास दोन-तीन तास लागत व नंतर पहांट झाली कीं पुढील प्रवास सुरू करण्याकरतां १२-१५ तास जंगलांत राहावें लागत असे ! रोज रात्रीं जेमतेम ४-५ तासच प्रवास होई. अशा तऱ्हेनें खुट्टरूट्टु खुट्टरूट्टु करीत रंगून ते बँकॉक या प्रवासास १२ ते १५ दिवसांचा अवधी लागे. आतां तर वाटेंतील या संकटांत एका नवीन आपत्तीची भर पडली होती. ती म्हणजे ब्रह्मदेश-संरक्षकदलानें रानांवनांतून सुरू केलेले चोरटे हल्ले. सर्व ब्रह्मी लोक आतां जपान्यांच्या विरुद्ध उठले होते. एके दिवशीं रात्रीं जंगलप्रदेशांतून आगगाडी मार्गक्रमण करीत होती. विमानांचें लक्ष वेधूं नये म्हणून गाडींत कसल्याही तऱ्हेचा उजेड न ठेवण्याची दक्षता या दिवसांत घेतली जात असे. लोहमार्गाच्या दोन्ही बाजूला दाट झाडी होती. त्या शांत वातावरणांत फक्त इंजिनाचाच भप्भप् भप्भप् असा व डब्यांच्या निरनिराळ्या भागांस तेल न दिलें गेल्यामुळें त्याचा आवाज येत होता. या शांत वातावरणाचा भंग करणारा एकदम 'कड्ड्ड्' असा ध्वनी झाला व त्याबरोबरच जंगलाच्या बाजूनें अंधारांत एकदम कांहींतरी चमकून पुन्हां लुप्त झालें. बंदुकीचीच गोळी होती ती. पथकाच्या नायिकेनें सर्वांस डब्यांत जागच्याजागीं सपाट, पालथें निजण्यास सांगितलें. कड्ड्ड्...कड्ड्ड्ड् गोळीबार सुरू झाला. गाडीच्या सभोंवार गोळ्या झडूं लागल्या. एंजिन चालविणाऱ्या जपानी सैनिकानें गाडीचा वेग थोडा वाढविला. कांहीं गोळ्या डब्यांच्या जाड लोखंडी पत्र्यांना भोकें पाडून आंत येऊं लागल्या. अंधारांत मुलींपैकीं एकीचा आवाज आला 'आः'; लगेच दोन-तीन मिनिटांनीं दुसरीनें किंकाळी फोडली. थोड्या वेळानें गोळीबाराचा ध्वनि अस्पष्ट होत होत थांबला. दोन्ही बाजूला जंगलांत दडलेले ब्रह्मी सैनिक जपान्यांच्या गाडीवर गोळीबार करीत होते. गोळीबाराच्या कक्षेंतून गाडी निघून गेल्यावर त्या पथकाची नायिका अंधारांत तशीच पोटावर सरकत सरकत, चांचपडत एकेका सैनिकेच्या डोक्यावर हात ठेवून विचारीत होती, 'ठीक आहे ?' त्या व्यक्तीकडून 'ठीक' असें उत्तर आलें कीं ती पुढें सरकून दुसऱ्या सैनिकेच्या डोक्यावर हात ठेवून तोच प्रश्न विचारी. असे करितां करितां तिनें एकीच्या डोक्यावर हात ठेवला व तोच प्रश्न विचारला. कांहींच उत्तर आलें नाहीं ! नायिकेचा हात मात्र कढत रक्तानें भिजला ! 'अगबाई ग !' तिच्या तोंडून दुःखपूर्ण उद्गार निघाला. दुसरी एक सैनिका वेदनांनीं विव्हळत होती. तिच्या काखेंतून आरपार गोळी निघून जाऊन हाड मोडलें होतें व रक्तस्राव जोरांत होत होता. आपण धोक्याच्या कक्षेंतून बाहेर पडलों आहोंत, आतां गाडी थांबविण्यास हरकत नाहीं, दोन्ही बाजूस जंगल नसून मोकळें मैदान आहे, असें दिसल्यावर गाडी थांबविण्यांत आली. कोणा कोणाला जखम झाली आहे, याची चौकशी झाली. दोन-तीन जपानी सैनिकांस जखमा झालेल्या होत्या. झांशी-राणी पथकाची एक सैनिका तर ठारच झाली होती. तिच्या मस्तकांतून एक गोळी पार निघून गेली होती.

दुसरीस रक्तस्रावानें ग्लानी येऊं लागली होती. दोघीही ख्रिस्ती धर्मी असून बहिणी बहिणी होत्या. पहांट झाल्यावर नेहमींप्रमाणें सर्वजण जंगलांत निघून गेले. तेथें सकाळीं ९ वाजतां ख्रिस्ती धर्माप्रमाणें एकीचा अंत्यविधी उरकण्यांत आला. दुपारीं दुसरीही मरण पावली. तिलाही तिच्या बहिणीच्या शेजारीं पुरण्यांत आलें. अशा तऱ्हेनें फारच दुःखपूर्ण असा या दोघींचा अंत झाला. भाविक समजुतींवर ज्यांचा विश्वास आहे, त्यांच्याकरतां येथें एक गोष्ट सांगावीशी वाटते. ती अशी कीं, या दोघां स्त्री-सैनिकांचा असा हृदयद्रावक अंत होण्याच्या अगोदर, त्यांच्या प्रवासांतील एका मुक्कामांत, दिवसा सर्वजणींनीं एका जंगलांत तळ दिला होता. तेथें भगवान् बुद्धाचें एक जीर्ण मंदीर होतें. या मंदिरांत भगवान् बुद्धाच्या लहान मोठ्या अशा अनेक मूर्ती ठेवलेल्या होत्या. ब्रम्हदेशांत (व सयाममध्येंही) रानांवनांत भगवान् बुद्धाचे अनेक मोठमोठे पुतळे व जीर्ण झालेलीं पडीक मंदिरें जागोजाग आढळतात. या मंदिरांत दोन-तीन भव्य अशा बुद्धाच्या मुख्य मूर्ती तर असतातच, परंतु शिवाय उरलेली सर्व जागा बुद्धाच्या लहान-मोठ्या अनेक मूर्तींनीं अगदीं खच्चून भरून गेलेली असते. नवस फेडण्याकरतां आलेले अनेक भाविक लोक येथें लहान-मोठ्या ( ऐपतीप्रमाणें ) एका मूर्तीची स्थापना करून इतर मूर्तींस वस्त्रप्रावरणें अर्पण करीत. ज्या ठिकाणीं झांशी-राणी पथकानें मुक्काम केला होता, त्या ठिकाणीं असेंच एक मंदीर होतें. प्रवासांतील आठवण म्हणून या दोघां बहिणींपैकीं ( आधीं जिचा मृत्यू झाला तिनें ) एकीनें एक मूर्ति उचलून आपल्याजवळ ठेवली. येथील मूर्तींस स्पर्श करणें किंवा त्या उचलणें चांगलें नाहीं, अशा तिच्या सर्व मैत्रिणी सांगत होत्या. परंतु तिनें त्यांच्याकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. तिच्या बहिणीनेंही, इतर सगळ्याजणी नको नको म्हणत असतांना तशीच एक लहान मूर्ति व एका जीर्ण वस्त्राचा कपटा फाडून आणला. बोला फुलाला गांठ पडली म्हणून म्हणा किंवा कसेंही म्हणा, परंतु भाविक मैत्रिणी मात्र म्हणूं लागल्या, "त्या दोघींचा मृत्यु ओढवल्याचें स्पष्ट दिसतच होतें मुळीं !"

नेताजींचें बोलावणें आल्यामुळें २ मार्च १९४५ रोजीं जनरल भोसले व मी सिंगापुराहून नेताजींच्या विमानांतून निघालों. सकाळीं ९ वाजतां निघून दुपारीं १ वाजतां आमचें विमान 'टायपिंग' ( उत्तर मलायांतील एक शहर ) हवाई तळाशीं आलें. आमच्याबरोबर जनरल लोकनाथन्, लेफ्टनंट कर्नल रॉड्रिग्ज, श्री. सरकार व शिपाई शिवसिंग अशी इतर मंडळीही होती. पक्षी जसे उड्डाण करितांना दोन्ही पाय आपल्या अंगाशीं ओढून घेतात, तद्वत् उड्डाण केल्याबरोबर विमानाचीं चाकेंही वर ओढून घेतात. यामुळें खालच्या बाजूस ओढ कमी होऊन स्थिर उड्डाणास मदत होते. टायपिंग विमानतळावर अर्धा तास उतरून विमानांत पेट्रोल भरलें जाईपर्यंत मध्यान्हीचा फराळ करावा व मग पुढें निघून सायंकाळीं बॅंकॉक शहरीं पोंचावें, असा कार्यक्रम होता.

परंतु दुपारीं १ वाजतां टायपिंग हवाईतळापाशीं पोंचून आतां खालीं विमान-तळावर उतरण्याकरतां म्हणून वैमानिक चाकें खालीं सरकवूं लागला, तों काय ! चाकें खालीं सरकेचनात ! दहा मिनिटें झालीं, पंधरा मिनिटें झालीं, सव्वा तास झाला, आमचें विमान टायपिंग हवाईतळावरच घिरट्या घालीत राहिलें. आतां एक तर पेट्रोल संपल्यामुळें विमान खालीं कोसळणार किंवा चाकें खालीं न सरकल्यामुळें विमान आपटून त्याचा चक्काचूर होणार, असें दृश्य डोळ्यापुढें दिसूं लागलें. बुडत्यास काडीचा आधार या म्हणीप्रमाणें खुर्चीच्या पाठींतून ओवलेला कापडाचा पट्टा कांहींजण आपल्याभोंवतीं आवळूं लागले. जणूं काय विमान आदळलेंच तर आपण स्वतःला खुर्चीशीं आंवळून बांधलें म्हणजे इजा होणारच नाहीं ! उलट विमानास आग लागली म्हणजे धड खुर्चीवरूनही उठतां यावयाचें नाहीं. विमान आदळल्यावर कंबरपट्टा खाड्कन् तुटणेंही शक्य होतें. अर्थात् काय होईल अन् काय नाहीं हें कोणीच सांगूं शकत नव्हतें. परंतु ‘ आपण कांहीं असे मरत नाहीं... ’ असें मला मात्र पक्कें वाटत होतें. चाकें खालीं करण्याचा वैमानिकाचा सारखा प्रयत्न चालला होता. वैमानिकाच्या साथीदारांपैकीं एका बिनतारी संदेश पाठविणाऱ्या तज्ज्ञानें खालीं हवाईतळाच्या कचेरींत असलेल्या बिनतारी-यंत्र-वार्ता-लेखकास संकेत लिपींत विमानांतील हा बिघाड कळविला. दोन्ही चाकें ज्या दांड्यास लावलेलीं असतात त्या दांड्याच्या मधोमध दुसऱ्या दोन दांड्या असतात. या तिघांचा त्रिकोण होतो व त्या दोन बारीक लोखंडी दांड्या वरील टोकांस एकमेकांस चिकटलेल्या असतात. चाकें खालीं करण्याच्या प्रयत्नांत या दोन्ही दांड्यांपैकीं एक मोडला व एकाच बाजूच्या दांड्यानें दोन्हीं चाकें सांधणारा तो मोठा दांडा खालीं करण्याचा प्रयत्न सुरू झाला. शेवटीं चाकें थोडीशीं खालीं आलीं, परंतु तीं नेहमींइतकीं खालीं आलीं नाहींत. आतां आहे या परिस्थितींतच उतरावें लागणार असें वैमानिकानें सांगितलें. शेवटीं २॥ वाजतां विमान खालीं उतरलें आणि आश्चर्य हें कीं, कोणास कसल्याही प्रकारची इजा न होतां व विमानासही धक्का न बसतां तें अगदीं सुखरूप उतरलें.

हवाईतळावर उतरून आमचें जेवण होतें न होतें तोंच वैमानिकानें येऊन सांगितलें कीं, विमान सुधारण्यास एक-दोन दिवस तरी लागतील. त्या विभागांतील जपानी व हिंदी सेनाधिकाऱ्यांस दूरध्वनिक्षेपकानें ( टेलिफोननें ) आमचा तेथें मुक्काम होणार असल्याचें कळविल्याबरोबर अर्ध्या तासाच्याआंत ते ४-५ मोटारी घेऊन आले. तेथून शें-दीडशें मैलांवर असलेल्या पेनांग शहरीं ( मलायाच्या पश्चिमकिनाऱ्यावर आपल्या मुंबईसारखेंच हें एक बेट आणि बंदर आहे. ) वास्तव्य करावें या हेतूनें मोटारीनें ‘ प्राय ’ नांवाच्या ठिकाणीं आम्ही सायंकाळीं ७ वाजतां पोंचलों. तेथें लहानशी खाडी ओलांडावयास सुमारें अर्धा तास लागतो. येथून पेनांगला टेलिफोन करून मोटारबोट येईपर्यंत रात्रीं ९ चा सुमार झाला.

दुसरीस रक्तस्रावानें ग्लानी येऊं लागली होती. दोघीही ख्रिस्ती धर्मी असून बहिणी बहिणी होत्या. पहांट झाल्यावर नेहमीप्रमाणें सर्वजण जंगलांत निघून गेले. तेथें सकाळीं ९ वाजतां ख्रिस्ती धर्माप्रमाणें एकीचा अंत्यविधी उरकण्यांत आला. दुपारीं दुसरीही मरण पावली. तिलाही तिच्या बहिणीच्या शेजारीं पुरण्यांत आलें. अशा तऱ्हेनें फारच दुःखपूर्ण असा या दोघींचा अंत झाला. भाविक समजुतींवर ज्यांचा विश्वास आहे, त्यांच्याकरतां येथें एक गोष्ट सांगावीशी वाटते. ती अशी कीं, या दोघां स्त्री-सैनिकांचा असा हृदयद्रावक अंत होण्याच्या अगोदर, त्यांच्या प्रवासांतील एका मुक्कामांत, दिवसा सर्वजणींनीं एका जंगलांत तळ दिला होता. तेथें भगवान् बुद्धाचें एक जीर्ण मंदीर होतें. या मंदिरांत भगवान् बुद्धाच्या लहान मोठ्या अशा अनेक मूर्ती ठेवलेल्या होत्या. ब्रम्हदेशांत (व सयाममध्येंही) रानांवनांत भगवान् बुद्धाचे अनेक मोठमोठे पुतळे व जीर्ण झालेलीं पडीक मंदिरें जागोजाग आढळतात. या मंदिरांत दोन-तीन भव्य अशा बुद्धाच्या मुख्य मूर्ती तर असतातच, परंतु शिवाय उरलेली सर्व जागा बुद्धाच्या लहान-मोठ्या अनेक मूर्तींनीं अगदीं खच्चून भरून गेलेली असते. नवस फेडण्याकरतां आलेले अनेक भाविक लोक येथें लहान-मोठ्या (ऐपतीप्रमाणें) एका मूर्तीची स्थापना करून इतर मूर्तींस वस्त्रप्रावरणें अर्पण करीत. ज्या ठिकाणीं झांशी-राणी पथकानें मुक्काम केला होता, त्या ठिकाणीं असेंच एक मंदीर होतें. प्रवासांतील आठवण म्हणून या दोघां बहिणींपैकीं (आधीं जिचा मृत्यू झाला तिनें) एकीनें एक मूर्ति उचलून आपल्याजवळ ठेवली. येथील मूर्तींस स्पर्श करणें किंवा त्या उचलणें चांगलें नाहीं, अशा तिच्या सर्व मैत्रिणी सांगत होत्या. परंतु तिनें त्यांच्याकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. तिच्या बहिणीनेंही, इतर सगळ्याजणी नको नको म्हणत असतांना तशीच एक लहान मूर्ति व एका जीर्ण वस्त्राचा कपटा फाडून आणला. बोला फुलाला गांठ पडली म्हणून म्हणा किंवा कसेंही म्हणा, परंतु भाविक मैत्रिणी मात्र म्हणूं लागल्या, "त्या दोघींचा मृत्यु ओढवल्याचें स्पष्ट दिसतच होतें मुळीं !"

नेताजींचें बोलावणें आल्यामुळें २ मार्च १९४५ रोजीं जनरल भोसले व मी सिंगापुराहून नेताजींच्या विमानांतून निघालों. सकाळीं ९ वाजतां निघून दुपारीं १ वाजतां आमचें विमान 'टायपिंग' (उत्तर मलायांतील एक शहर) हवाई तळाशीं आलें. आमच्याबरोबर जनरल लोकनाथन्, लेफ्टनंट कर्नल रॉड्रिग्ज, श्री. सरकार व शिपाई शिवसिंग अशी इतर मंडळीही होती. पक्षी जसें उड्डाण करितांना दोन्ही पाय आपल्या अंगाशीं ओढून घेतात, तद्वत् उड्डाण केल्याबरोबर विमानाचीं चाकेंही वर ओढून घेतात. यामुळें खालच्या बाजूस ओढ कमी होऊन स्थिर उड्डाणास मदत होते. टायपिंग विमानतळावर अर्धा तास उतरून विमानांत पेट्रोल भरलें जाईपर्यंत मध्यान्हीचा फराळ करावा व मग पुढें निघून सायंकाळीं बँकॉक शहरीं पोंचावें, असा कार्यक्रम होता.

परंतु दुपारीं १ वाजतां टायपिंग हवाईतळापाशीं पोंचून आतां खालीं विमान-तळावर उतरण्याकरतां म्हणून वैमानिक चाकें खालीं सरकवूं लागला, तों काय ! चाकें खालीं सरकेचनात ! दहा मिनिटें झालीं, पंधरा मिनिटें झालीं, सव्वा तास झाला, आमचें विमान टायपिंग हवाईतळावरच घिरट्या घालीत राहिलें. आतां एक तर पेट्रोल संपल्यामुळें विमान खालीं कोसळणार किंवा चाकें खालीं न सरकल्यामुळें विमान आपटून त्याचा चक्काचूर होणार, असें दृश्य डोळ्यापुढें दिसूं लागलें. बुडत्यास काडीचा आधार या म्हणीप्रमाणें खुर्चीच्या पाठींतून ओवलेला कापडाचा पट्टा कांहींजण आपल्याभोंवतीं आवळूं लागले. जणूं काय विमान आदळलेंच तर आपण स्वतःला खुर्चीशीं आंवळून बांधलें म्हणजे इजा होणारच नाहीं ! उलट विमानास आग लागली म्हणजे धड खुर्चीवरूनही उठतां यावयाचें नाहीं. विमान आदळल्यावर कंबरपट्टा खाड्कन् तुटणेंही शक्य होतें. अर्थात् काय होईल अन् काय नाहीं हें कोणीच सांगूं शकत नव्हतें. परंतु 'आपण कांहीं असे मरत नाहीं... ' असें मला मात्र पक्कें वाटत होतें. चाकें खालीं करण्याचा वैमानिकाचा सारखा प्रयत्न चालला होता. वैमानिकाच्या साथीदारांपैकीं एका बिनतारी संदेश पाठविणाऱ्या तज्ज्ञानें खालीं हवाईतळाच्या कचेरींत असलेल्या बिनतारी-यंत्र-वार्ता-लेखकास संकेत लिपींत विमानांतील हा बिघाड कळविला. दोन्ही चाकें ज्या दांड्यास लावलेलीं असतात त्या दांड्याच्या मधोमध दुसऱ्या दोन दांड्या असतात. या तिघांचा त्रिकोण होतो व त्या दोन बारीक लोखंडी दांड्या वरील टोकांस एकमेकांस चिकटलेल्या असतात. चाकें खालीं करण्याच्या प्रयत्नांत या दोन्ही दांड्यांपैकीं एक मोडला व एकाच बाजूच्या दांड्यानें दोन्हीं चाकें सांधणारा तो मोठा दांडा खालीं करण्याचा प्रयत्न सुरू झाला. शेवटीं चाकें थोडीशीं खालीं आलीं, परंतु तीं नेहमींइतकीं खालीं आलीं नाहींत. आतां आहे या परिस्थितींतच उतरावें लागणार असें वैमानिकानें सांगितलें. शेवटीं २॥ वाजतां विमान खालीं उतरलें आणि आश्चर्य हें कीं, कोणास कसल्याही प्रकारची इजा न होतां व विमानासही धक्का न बसतां तें अगदीं सुखरूप उतरलें.

हवाईतळावर उतरून आमचें जेवण होतें न होतें तोंच वैमानिकानें येऊन सांगितलें कीं, विमान सुधारण्यास एक-दोन दिवस तरी लागतील. त्या विभागां-तील जपानी व हिंदी सेनाधिकाऱ्यांस दूरध्वनिक्षेपकानें ( टेलिफोननें ) आमचा तेथें मुक्काम होणार असल्याचें कळविल्याबरोबर अर्ध्या तासाच्याआंत ते ४-५ मोटारी घेऊन आले. तेथून शें-दीडशें मैलांवर असलेल्या पेनांग शहरीं ( मला-याच्या पश्चिमकिनाऱ्यावर आपल्या मुंबईसारखेंच हें एक बेट आणि बंदर आहे. ) वास्तव्य करावें या हेतूनें मोटारीनें 'प्राय ' नांवाच्या ठिकाणीं आम्ही सायंकाळीं ७ वाजतां पोंचलों. तेथें लहानशी खाडी ओलांडावयास सुमारें अर्धा तास लागतो. येथून पेनांगला टेलिफोन करून मोटारबोट येईपर्यंत रात्रीं ९ चा सुमार झाला.

पेनांगला ' निर्वाण ' नांवाचा सामानसुमान, पडदे इत्यादींनीं सजविलेला एक सुंदर बंगला आमच्याकरतां राखून ठेविलेला होता. टायपिंगलाच ' निर्वाणास ' जावयाची वेळ आली होती, तें अखेर या ' निवार्णा 'वरच निभावलें ! अपेक्षेपेक्षां जास्त म्हणजे आठ दिवस येथें थांबावें लागलें; कारण विमान कल्पनेबाहेर बिघडलें होतें. कधीं विमान ठीक झालें असें वाटून तें उडून पेनांगच्या अर्ध्या वाटेवर जावयाचें व पुन्हा परत फिरावयाचें असें चाललें होतें. सिंगापूर व बँकॉक येथें तारा करून त्याचें जरूर तें सामानसुमान मोटारीनें मागविण्यांत आलें. एवढ्या आठ दिवसांच्या वास्तव्यांत जनरल भोसल्यांनीं मोटारीनें ईपो, सुंगाइसिपुत इत्यादि ठिकाणीं जाऊन तेथील स्वातंत्र्यसैन्याच्या तुकड्यांची पाहाणी केली. ईपो येथें सैनिक तयार करण्याचें एक लष्करी शिक्षणकेंद्र होतें व स्वातंत्र्यसैन्याच्या तीन नंबरच्या डिव्हिजनची मुख्य कचेरीही होती.

१० तारखेस आम्हीं सकाळीं ९ वाजतां विमानांत बसून निघालों. आतां बँकॉक येथें मुक्काम न करितां सरळ रंगूनला जावें असें ठरलें. सुमारें अर्ध्या वाटेवर व्हिक्टोरिया पॉइंटपर्यंत आम्हीं पोचलों आणि इतक्यांत रंगूनहून बिनतारी संदेश आला कीं, ' शें-सव्वाशें अमेरिकन 'बी २९' विमानें त्या रोखानें येत आहेत. ' लगेच वैमानिकानें विमान परत फिरविलें व आम्ही पुन्हा पेनांगला दुपारीं २ वाजण्याच्या सुमारास परत आलों. रात्रीं पुन्हां 'निर्वाणांत' मुक्काम ठोकला. दुसरे दिवशीं म्हणजे ११ मार्च रोजीं, पुन्हा १० वाजण्याच्या सुमारास आम्ही विमानतळावर आलों. कपडे इत्यादि सामान भरलेल्या आमच्या चामड्याच्या पेट्या विमानाच्या प्रवेशद्वाराजवळ ठेवलेल्या होत्या. प्रवेशद्वारास पायऱ्या लावलेल्या नसल्यामुळें मी तसाच आंत चढून बसणार, इतक्यांत विमानाचे दोन्ही पंखे जोरांत सुरू झाले. पंख्यांच्या भ्रमणामुळें इतका सोसाट्याचा वारा सुटला कीं, सर्व चामड्याच्या पेट्या थाड्...थाड् करीत कोलांट्या खात त्या मैदानावर दूर जाऊन पडल्या. त्यांचीं कुलपें व चामड्याचे पट्टे खड्खड् तुटून त्यांतील सामान इतस्ततः विखुरलें. मी प्रवेशद्वाराच्या दोन्हीं मुठींना घट्ट धरून ठेवलें होतें, तरी त्या वाऱ्यामुळें माझे पाय जमिनीवर ठरत नव्हते व हातांची पकड सुट्टं लागली होती. बोलून किंवा ओरडून त्या वाऱ्याच्या झोतामुळें आणि विमानाच्या घरघरीमुळें वैमानिकाला किंवा इतर कोणासही ऐकूं गेलें नसतें. माझे हात सुटले असते तर मी थाड्कन् विमानाच्या शेपटीवर आदळलों असतों. मोठ्या निश्चयानें मी हात घट्ट धरून ठेवले. थोड्या वेळानें पंख्यांचें भ्रमण कमी वेगानें सुरू होऊन वारा कमी झाला. सामान वगैरे गोळा करून नंतर आम्ही प्रवास सुरू केला. विमानाचें यंत्र अजून समाधानकारक रीतीनें सुधारलें नसल्यामुळें बँकॉक विमानतळावर उतरून तेथें विमान पुन्हा तपासावें असें ठरलें. दुपारीं २ च्या सुमारास आम्ही बँकॉक विमानतळावर पोंचलों. विमान सुखरूप उतरलें. उडतांना कधीं लख्ख ऊन, कधीं थोडा वेळ पाऊस, तर कधीं रुपेरी ढगांच्या

पिंजलेल्या कापसांत गुरफटून गेल्याप्रमाणें अंतरिक्षांतील सृष्टीचें क्षणोक्षणीं निरनिराळें स्वरूप दिसत होतें. बँकॉक विमानतळावर उतरण्याच्या आधीं सुमारें अर्धा तास हवाई हल्ला करावयास आलेलीं अमेरिकेचीं बरींच विमानें आमच्या डोक्यावरून बऱ्याच उंचीवरून गेलीं. ढगांमुळें आमचें विमान त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आलें नाहीं म्हणून म्हणा किंवा हवाई हल्ल्याच्या आपल्या कार्यक्रमांत फेरबदल होऊं नये म्हणून म्हणा, परंतु त्यांनीं आमचा पाठलाग केला नाहीं.

बँकॉक शहरीं ' ट्रोकॅड्रो ' हॉटेलमध्यें आम्ही उतरलों. दोन वर्षांपूर्वी मी सायगांवहून बँकॉकमार्गे सिंगापुरास परत जात असतांना ज्या ' युरोप ' हॉटेलमध्यें उतरलों होतों, ती इमारत याच हॉटेलच्या मागच्या बाजूस होती. या वेळेस ती हवाई हल्ल्यांतील स्फोटगोलानें नामशेष झालेली होती. बँकॉकवर अमेरिकन विमानांनीं जे अनेक हवाई हल्ले केले, त्यांत त्यांनीं तेथील मध्यवर्ती टपालकचेरीच्या टोलेजंग इमारतीवर व भव्य स्टेशनावर स्फोटगोल टाकून तीं दोन्हीं उध्वस्त करण्याचा प्रयत्न केला. त्यांची नेमबाजी इतक्या उत्कृष्ट प्रकारची होती कीं, दर वेळेस येऊन त्यांनीं आजूबाजूचा सर्व प्रदेश उध्वस्त केला; परंतु मुख्यत: ज्या इमारतींच्या नाशासाठीं हा सर्व खटाटोप ते करीत होते, ती टपालकचेरी आणि रेल्वेस्टेशन आजतागायत जशींच्या तशीं उभीं आहेत ! ट्रोकॅड्रो हॉटेल हें पाश्चात्त्य पद्धतीचें चार मजली भव्य हॉटेल आहे. येथें तिसऱ्या व चौथ्या मजल्यावर आमच्या सर्वांच्या राहण्याची व्यवस्था झाली. प्रत्येकास न्हाणीघर, शौचकूप, निजावयाची खोली, बसावयाची खोली, गॅलरी व कोठारगृह अशा खोल्यांचा एक एक गट राहण्यास दिला होता. चार दिवस आम्ही तेथें राहिलों. मध्येंच विमानतळीं जाऊन विमानांत बसून अर्धीअधिक वाट ओलांडून आम्ही परतही येत असूं. दर वेळेस विमानांतील बिघाड किंवा हवाई हल्ला अशा कोणत्या तरी निमित्तानें आम्हाला माघारीं फिरावें लागे. एके दिवशीं विमानतळावरील भव्य इमारतींतून निघून आम्ही आमच्या विमानांत बसण्याकरतां मैदानांत पदार्पण करणार, इतक्यांत हवाई हल्ल्याचा सूचक भोंगा झाला. आम्ही तेथेंच थबकलों. शत्रूचीं बरींच विमानें सूर मारून खालीं आलीं. हवाई मैदानावर सुमारें २०० विमानें इतस्तत: ठेविलेलीं होतीं. कड्ड्... धडाम्...धुम्...फाड्...फाड्...खट्...खट् ...ठक्...ठक्...ऽऽऽऽऽऽ असे निरनिराळे आवाज सुरू झाले. मोठमोठे स्फोटगोल, आगलावे गोळे आणि मशिनगन्स्च्या गोळ्यांचा मारा चौफेर होत होता. सुमारें अर्धा तास असें चाललें होतें. एकंदर २७ विमानें आमच्या डोळ्यादेखत जळून गेलीं. आमच्या विमानास मशीनगनच्या १७ गोळ्या लागून तें विमान कायमचें निकामी झालें.

१५ तारखेस मी, ले. क. रॉड्रिग्ज व शिवसिंग बँकॉक ते रंगून या नवीन तयार केलेल्या, अरण्यांतील लोहमार्गानें निघालों. जनरल भोसले एका बॉंबर विमानांत बसून रंगूनला गेले. आम्हांला लोहमार्गावरील त्या प्रवासास

बारा दिवस लागले. वाटेंत १००-१५० फूट खोल दऱ्यांवरील पूल, सामान पाठीवर घेऊन ओलांडावे लागले. कित्येक ठिकाणीं दोन्ही बाजूचे पूल तुटून मधल्या १५-२० मैलांच्या टापूवर एकही एंजिन नव्हतें. एवढा रस्ता पायीं तुडवावा लागे. ब्रम्हदेशांतील खेड्यापाड्यांतून तद्देशीय बायकांशीं लग्न करून स्थायिक झालेले बरेच हिंदी लोक आहेत. हे बहुधा तामीळ किंवा मलबारकडील मुसलमान आहेत. ब्रम्हदेशांत ब्रम्ही बायकांशीं मुसलमानांनीं लग्न करून जी प्रजा झालेली आहे तीस 'झेरबादी' अशी संज्ञा आहे. ही एक निराळीच जात बनलेली आहे. ब्रम्हदेशांत हिंदुस्थानी भाषेचा सर्रास प्रचार झालेला आहे. ब्रम्हदेशांत वाटेल त्याच्याशीं वाटेल त्या ठिकाणीं डोळे मिटून हिंदुस्थानींत बोलूं लागावें, त्यास ती भाषा येत असलीच पाहिजे. खेड्यापाड्यांत राहणारे गरीब हिंदी लोक अक्षरशः भिकेला लागले होते. त्यांच्या शरिराचीं हाडें निघालेलीं, कंबरेस चिंध्या गुंडाळलेल्या ! एकही वेळेस धड खावयास मिळावयाची मारामार. सशस्त्र ब्रम्ही लोक त्यांच्या झोपड्यांवर धाड घालून त्यांच्या पडक्या झोपड्यांतून असलेलीं भांडीकुंडीं व असतील नसतील ते जुने कपडेही घेऊन जात. आमच्या फौजी पोषाखांत आम्हांला खेड्यापाड्यांतून चालावयाची अथवा कोठेंतरी थांबून डाळ तांदुळ शिजवावयाची पाळी आली म्हणजे हे गरीब बिचारे हिंदी लोक आमच्याभोंवतीं जमून कौतुकानें लढाईची वगैरे बरीचशी माहिती विचारीत. त्यांच्या दीन परिस्थितीबद्दल मात्र त्यांनीं कधीं शब्दही काढला नाहीं. आम्हींच आपण होऊन त्यांस त्यांच्या परिस्थितीबद्दल प्रश्न विचारीत असूं, तेव्हांच आम्हाला काय तो पत्ता लागे.

आम्ही ज्या लोहमार्गानें जात होतों तोच तयार करावयास जपान्यांनीं मलायांतून सुमारें एक लाख तामीळ मजूर धरून आणले होते. येथें जंगलांतील पाऊस, हिंवताप, ओल असलेल्या मोडक्या तोडक्या झोपड्या व निःसत्व अन्न (भात आणि सार) यामुळें पन्नास-साठ हजार हिंदी मजूर क्षयानें अथवा अन्य आजारानें झिजून झिजून मेले. इतर जे जिवंत राहिले ते सर्वांगावर फोड उठलेले, चालावयाची शक्ती नसलेले, वेडसर झालेले अशा स्थितींत होते. जपानी लोक असते तर त्यांनीं आपल्या देशाकरतां इतके हाल सोसून काम केलें असतें; परंतु त्यांच्या कामाकरतां गरीब बिचारे हिंदी लोक उगीच मारले जात होते. इंग्रजांसारखा जपानी लोक पंक्तिप्रपंच करीत नसत, हें येथें कबूल केलें पाहिजे. इतरांनीं राबावें, शिळे तुकडे मिळाले तर त्यावरच कुत्र्यासारखा उदरनिर्वाह करावा व आपण मात्र चैन करावी अशी जपान्यांची वृत्ति नसे. ते म्हणत, "आम्ही कष्ट करतों, तुम्हीही करा." त्या लोहमार्गावर काम करणारे त्यांचे सैनिकही (तारमास्तर, स्टेशनमास्तर, पोर्टर) त्यांच्यासारखेच राहात होते व जेवत होते. फरक एवढाच कीं, ते शिकलेले असल्यामुळें त्यांस अशा परिस्थितींत कसें राहावें, किती खावें, कशा प्रकारची काळजी घ्यावी हें माहीत

असे. त्याप्रमाणें योग्य ती खबरदारी ते घेत. आमचे तामीळ लोक अडाणी असल्यामुळें परिस्थितीप्रमाणें त्यांनीं आपल्या नेहमींच्या संवयी बदलावयास पाहिजे होत्या त्या बदलल्या नाहींत. भात शिजवून त्यांतील पेज फेकून देणें, डाळ शिजवून त्यांतील फक्त पाणी पिणें व डाळ फेकून देणें किंवा अगदीं अल्प प्रमाणांत ती खाणें, कालवण अगदीं कमी घेऊन, पोट पूर्ण भरल्यासारखें वाटे-पर्यंत वाटेल तितका भात फस्त करणें, ह्या संवयींमुळेंच त्यांचे वर वर्णिल्याप्रमाणें हाल झाले. अज्ञानानें माणसांचा सर्वनाश होतो तो असा !

बारा दिवसांच्या अशा प्रवासानंतर आम्ही रंगूनला पोंचलों. वाटेंत एके दिवशीं 'ॲनॅक्वेन' नांवाच्या लहान खेड्याजवळ एका जंगलांत आम्हांला मुक्काम करावा लागला. येथें हिंदी स्वातंत्र्यसैन्याची एक विमानविरोधक तुकडी तळ देऊन असे. या तुकडीच्या चार तोफा व दोन मशीनगन्स जंगलांत चौफेर लावलेल्या होत्या. येथें आगगाडीचा एक लोखंडी पूल होता. हा पाडण्याकरतां त्याच्यावर विमानें आलीं म्हणजे बरोबर या विमानांवर मारा व्हावा, अशा रीतीनें तोफा रोखलेल्या होत्या. या तुकडीनें अशा एकूण १७ विमानांचा बळी घेत-लेला होता. चक्काचूर होऊन त्या विभागांत पडलेलीं एक-दोन विमानें पाहण्यास आम्ही गेलों होतों. त्या विमानाचे बारीक बारीक तुकडे दोन-तीन फर्लांग दूर जाऊन पडले होते. त्या खेड्यांतील बऱ्याचशा झोपड्या आणि आजूबाजूचे वृक्ष जळून खाक झाले होते. विमान पडलें त्या वेळेस एका गौरकाय स्त्रीचे पायच तुटून पडले होते व उरलेल्या देहाच्या चिंधड्या होऊन इतस्ततः विखुरल्या होत्या, असें त्या तुकडीच्या नायकानें आम्हांस सांगितलें. त्या विमानाचा तीन पातींचा एक पंखा मोलमीन गांवीं स्वातंत्र्यसंघाच्या कचेरींत ठेवण्यांत आला होता. तसेंच या विमानांत वैमानिकाच्या पायाखालीं अभ्रकाचा एक जाड चौकोनी तुकडा बसविलेला होता. हा पारदर्शक असल्यामुळें यांतून वैमानिकाला खालीं बघून शत्रूच्या नेमक्या कोणत्या ठिकाणावर आपण आलों आहोंत, तें कळून येत असे. त्या चौकोनी अभ्रकाच्या तुकड्याची प्रत्येक बाजू सुमारें एक फूट लांब होती. अभ्रकाच्या अनेक चकत्यांचे थर एकावर एक रचून सुमारें २॥ इंच जाडीचा तो पारदर्शक तुकडा तयार केलेला होता. याचें वैशिष्ट्य हें कीं, याच्यावर मशिनगनच्या गोळ्या लागल्याच्या खरचटल्यासारख्या खुणा होत्या, परंतु तरीही त्याला कसल्याही तऱ्हेची इजा पोंचली नव्हती.

मार्च महिन्याच्या २७ तारखेस आम्ही रंगूनला पोंचलों. त्याच दिवशीं नेताजींनीं मला त्यांच्याबरोबर जेवावयास ठेवून घेतलें. प्रवासाची एकंदर सर्व हकीगत त्यांनीं मला विचारली. जेवतांना त्याच विषयावर आमचें बोलणें चाललें होतें. जनरल भोसले चार-पांच दिवसांपूर्वींच येऊन पोंचले होते. मंडाले, मेमिओ, मेक्टिला इत्यादि शहरें इंग्रजांनीं काबीज केलीं होतीं. हिंदी स्वातंत्र्यसेनेच्या निरनिराळ्या तुकड्या आघाडीवर लढत होत्या. शत्रूशीं झटापट करून शत्रूला

थोपवून धरण्याकरतां थोडे सैनिक आघाडीवर ठेवावयाचे व सैन्याचा मुख्य तळ हालवून मागें न्यावयाचा, अशा प्रकारची लढाई चाललेली होती. जपानी सैन्य फार मोठ्या प्रमाणांत पूर्वेकडे कूच करीत, जंगलांतून मार्ग क्रमीत, सयामच्या हद्दींत निघून जात होतें. झियावदी येथें असलेलें स्वातंत्र्यसैन्याचें क्र. २ चें हॉस्पिटल आणि कांहीं प्रमुख अधिकारी यांस मागें आणविण्याची व्यवस्था करण्याकरतां म्हणून नेताजींनीं अत्युच्च मध्यवर्ती कचेरींतील कांहीं अधिकारी झियावदीला पाठविले होते. परंतु वाहनाची व्यवस्था होऊं न शकल्यामुळें कोणालाच रंगूनला येणें शक्य झालें नाहीं. इतके दिवस ब्रम्हदेशाच्या बचावाचें काम 'मोरी बुताय' नांवाच्या जपानी सैन्यविभागाकडे होतें. त्यांतील सैनिक पीछेहाट करून सयाममध्यें निघून जाऊं लागले. त्यांच्या जागीं चीन देशांत लढणाऱ्या जपान्यांच्या कांहीं तुकड्या दक्षिण दिशेनें कूच करीत ब्रम्हदेशांत आल्या. त्यांना स्वातंत्र्यसैन्याबद्दलची माहिती नव्हती. खाकी पोषाख घातलेला मनुष्य इंग्रजांचा हस्तक असावा, म्हणून एकट्यादुकट्या सांपडलेल्या स्वातंत्र्यसैनिकास 'अरे...अरे' म्हणतां ते कापून काढीत. यांत बरेचसे हिंदी नागरीक, कांहीं खरोखरचे हेर व कांहीं स्वातंत्र्यसैनिक प्राणास मुकले. डॉक्टर लक्ष्मी व त्यांच्याबरोबरच्या दोघांतिघांवर असाच प्रसंग आला. या मंडळींची इतरांपासून फारकत झालेली होती. एका खेड्यांत यांची व चीनमधून आलेल्या जपानी तुकडीची गांठ पडली. या चौघांस पकडून सरळ गोळ्या घालून ठार करावें असें त्या तुकडीच्या अधिकाऱ्यांनीं सांगितलें. "...वारे वारे वा इंडो कोकुमिन गुन नो शोको देसने." म्हणजे, "...आम्ही हिंदी स्वातंत्र्यसैन्याचे अधिकारी आहोंत." वगैरे या मंडळींनीं त्या जपानी अधिकाऱ्यांची पुष्कळ खात्री पटविण्याचा प्रयत्न केला, परंतु कर्तव्यदक्षतेमुळें त्यांची हृदयें पाषाणवत् झालेलीं होतीं. "... अशा बाता मारणारे पुष्कळ पाहिले आहेत.... आम्ही कांहींही जाणत नाहीं. आमच्या वरिष्ठांचा हुकूम आम्हाला पाळणें भागच आहे. युद्धकालांत राष्ट्रें धुळीस मिळतात तर व्यक्तीचें काय ! " अशा तऱ्हेची त्यांची वृत्ति दिसली. इतक्यांत त्या चौघांपैकीं एकाच्या डोक्यांत एक कल्पना आली. त्यानें स्वतःच्या खिशांतील नेताजींचें चित्र असलेला एक बिल्ला काढून त्या जपानी अधिकाऱ्यांस दाखविला व म्हटलें, "... वारे वारे वा चंद्रबोस कक्का नो शोको ने !"..."आम्ही राष्ट्राधिपति चंद्रबोस यांचे ( सैन्यांतील ) अधिकारी आहोंत बरं ! " चंद्रबोस असें म्हटल्याबरोबर मात्र त्यांच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला. त्या एका व्यक्तीला ते सर्व चांगले ओळखीत होते. लगेच त्यांनीं सर्वांस सोडून दिलें व सांगितलें कीं, "तुम्ही सर्वांनीं आमच्याबरोबरच माघारीं चलावें. आमच्या मागोमाग दुसऱ्या तुकड्या येत आहेत. त्यांनाही अशाच तऱ्हेचा हुकूम आहे. तुम्ही त्यांच्या तावडींत सांपडलां तर ते एवढीसुद्धां गय करणार नाहींत. "

हिंदी स्वातंत्र्यसैन्याच्या पंचवीस सैनिकांचें एक पथक, आठ-आठ जणांच्या तीन टोळ्यांत विभागलें जाऊन जंगलांतील निरनिराळ्या पाऊलवाटांनीं निघून एका विवक्षित स्थळीं पुन्हा एकत्रित येणार होतें. ज्या टोळीबरोबर त्या पथकाचा नायक होता, त्या टोळीस जंगलांतून जातांना कांहीं जपानी अधिकाऱ्यांनीं पाहिलें. दाट झाडींतील एका कच्च्या रस्त्यावर मोटार उभी करून आंत बसलेल्या मुख्य अधिकाऱ्याशीं बाहेर उभे राहिलेले दोघे जपानी अधिकारी बोलत होते. त्यांनीं त्या नायकास आणि त्याच्या टोळीस बोलाविलें. बाहेर उभा असलेला एक अधिकारी त्यांना जंगलांत एका बाजूला घेऊन गेला. हा काय प्रकार होत आहे, हें कळावयाच्या आधींच आठ-दहा जपानी सैनिकांनीं त्यांच्यावर झडप घातली, त्यांना निःशस्त्र केलें व मुसक्या बांधून सर्वांना जंगलांत आणखी पलीकडे ते घेऊन गेले. तेथें प्रत्येकाला एकेका झाडाशीं बांधून दोन-चार जपानी सैनिकांनीं संगिनी घेऊन त्यांस भोसकलें. त्या टोळींतील सैनिकांचें म्हणणें एकानेंही ऐकून घेतलें नाहीं व "अरे बाबा हें काय ?...... अरे बाबा हा काय प्रकार आहे ?..." असें म्हणतां म्हणतां भोंसकाभोंसकीनें किंकाळ्या फोडीत ते प्राणास मुकले.

युद्धाच्या या वावटळींत खेडींच्या खेडीं उध्वस्त होत होतीं. तोफांचा धुमधडाका, स्फोटगोलांचे भयंकर स्फोटध्वनि, मशिनगन्सचा कडकडाट, जोरांत खालीं झेप घेतांना 'सूं ऽ ऽ' असा विमानांचा कर्णभेदक भयानक सूर, पीछेहाट करणाऱ्या सैनिकांची सुंद मनस्थिति, पुढें सरकणाऱ्या सैन्याची धुंद वृत्ति अशा अनेक कारणांमुळें युद्धप्रदेशांतील वस्तीचीं गांवें अल्प काळांत निर्जन होतात. पडझड झालेल्या झोपड्या, इतस्ततः पडलेलीं भांडी-कुंडीं हेंच काय ते एका काळच्या लोकवस्तीचे भेसूर अवशेष बाकी राहतात. अशाच एका निर्जन खेड्यांत स्वातंत्र्य-चळवळींतील तीन माणसें सांपडलीं होतीं. जपानी सैन्य तें खेडें सोडून माघारीं निघून गेलें होतें. इंग्रजांची सेना त्या दिशेनें कूच करीत येत होती. एका झोपडींत वर उल्लेखिलेलीं माणसें होतीं. हीं तीन माणसें म्हणजे येल्लाप्पा नांवाचे स्वातंत्र्य-सरकाराचे सल्लागार, त्यांचा एक स्वामिनिष्ठ सेवक व एक स्वातंत्र्यसैनिक. श्री. येल्लाप्पांस एका हवाई हल्ल्यांत पायास गोळी लागल्यामुळें, चालतां येत नव्हतें. त्यांस मदत करण्याकरतां त्यांचा सेवक त्यांच्याबरोबर होता व तिसरा सैनिक वाट चुकून इकडे तिकडे भटकतां भटकतां शेवटीं या दोघांस येऊन भेटला होता. सायंकाळची वेळ झाली. तोफांचा धूमधडाका चालूच होता पण हवाई हल्ले थांबले होते. इंग्रजांच्या रणगाड्यांचा आणि मशीनगन्सचा आवाज ऐकूं येत होता. श्री. येल्लाप्पा यांस ऊन पाणी पाहिजे होतें, म्हणून त्यांच्या बरोबरीच्या दोघांनीं विस्तव पेटवून पाणी तापत ठेवलें. झोपडींतून धूर बाहेर येऊं लागला. साम्राज्य-सेनेची एक तुकडी लपत छपत तिथें येऊन पोंचली. त्या झोपडींतून धूर निघतांना पाहिल्या-

बरोबर या झोपडींत अजून कांहीं जपानी सैनिक असावेत असा संशय येऊन, त्या तुकडीनें घाबरत घाबरत त्या खेडयास चोहोंकडून वेढलें. आंतील लोकांना या गोष्टीचा पत्ताच नव्हता. कारण ते आपल्याच कामांत मग्न होते व बाहेरील बाजूस सर्व कारभार गुपचुप चाललेला होता. तोफांचे व मशीनगन्सचे आवाज तर नेहमींचेच होते. त्या खेडयाला सगळीकडून वेढून आपल्या बंदुका, मशीन-गन्स व एक तोफ त्या झोपडीवर रोखून इंग्रज अधिकाऱ्यानें हुकूम दिला, 'फायर.' सगळीकडून एकदम जोरांत गोळीबार झाला. तोफेच्या गोळ्यानें झोपडीचें छप्पर उडून, जळत जळत पार दूर जाऊन पडलें. अनेक गोळ्या शरिरांत घुसून हीं तीन निरपराध माणसें प्राणास मुकलीं ! साम्राज्यसेनेंतील सैनिकांस जपान्यांची इतकी दहशत बसलेली असे कीं, त्यांच्या एकटयादुकटया सैनिकाशीं-सुद्धां आपली हातघाईची लढाई होऊं नये, हा त्यांचा नेहमीं कटाक्ष असे. अशा वेळेस दुरूनच दारूगोळ्याच्या भडिमारानें त्यांस नेस्तनाबूद करतां आल्यास बरें असें त्यांस वाटे. न जाणों एकादे वेळेस जवळ जाऊन अवचित 'हुप्' करून एकादा जपानी सैनिक आपल्या दहा-जणांच्या मानगुटीवर बसला तर करतां काय ! हा विचार त्यांस भेदरवून सोडीत असे.

उत्तरेच्या बाजूनें साम्राज्यसेना भले मोठे रणगाडे घेऊन त्यांच्यायोगें बिनधोकपणें आपला मार्ग आक्रमीत आहे असें कळल्याबरोबर, रंगूनहून हिकारी कीकानचे लेफ्टनंट कर्नल ओगावा व आराकान आघाडीवर मर्दुमकी गाजविलेले स्वातंत्र्यसेनेचे एक अधिकारी लेफ्टनंट कर्नल मिश्रा हे मोटारींतून कांहीं भुई-सुरूंग घेऊन निघाले. त्यांच्या मोटारीच्या पुढें तीन-चार सैनिक असलेली एक चिलखती मोटारगाडी त्यांच्या संरक्षणार्थ देण्यांत आली होती. शें-सव्वाशें मैलांचा पल्ला त्यांस गाठावयाचा होता. एवढ्या लांबच्या प्रवासांतील सडकेच्या दोन्ही बाजूंकडील जंगलांत इंग्रजांस फितूर होऊन जपान्यांविरुद्ध उठलेल्या ब्रह्मी संरक्षकदलाच्या सैनिकांचा सुळसुळाट झालेला होता. हवाई हल्ल्यांमुळें दिवसाचा प्रवास टाळावा लागत असे. रंगूनहून उत्तरेस पंचवीस मैलांवरील पेगू गांव ओलांडून, त्यांची मोटार पुढें निघाली. त्यांच्यापुढें त्यांची संरक्षक चिल-खती गाडी जात होती. वाटेंत कांहीं दगाफटका होत आहे असें वाटल्यास चिलखती गाडींतील सैनिकांनीं चौफेर गोळीबार सुरू करावा व दोन्ही मोटार-वाहकांनीं मोटारी भरधांव सोडून, त्या धोक्याच्या प्रदेशांतून शक्य तितकें लवकर बाहेर पडावें, असें सर्वानुमतें ठरलेलें होतें. रात्रीं ११ चा सुमार होता. गुडुप अंधार होता. दोन्ही मोटारी ताशीं २०-२५ मैलांच्या वेगानें आपला मार्ग क्रमीत होत्या. इतक्यांत पुढच्या बाजूस दोन्ही बाजूंच्या रानांत कांहीं कुजबुज व जलद हालचाली होत असल्याचा भास झाला. दुसऱ्याच क्षणीं झाडींतून कोणी इंग्रजींत हुकूम दिला, 'फायर' शेंकडों गोळ्या कडाडल्या ! जणूं काय लाल, निळ्या, पिवळ्या ठिणग्या उडाल्याचा भास झाला. आगाऊ

ठरल्याप्रमाणें उलट गोळीबार करीत पुढची चिलखती गाडी जोरांत पुढें निघाली. सात-आठ मैल पुढें गेल्यावर त्या सैनिकांनीं मागें वळून बघितलें तों काय !.... मागच्या गाडीचा कोठें पत्ताच नव्हता. त्यांनीं हळूच गाडी मागें फिरविली. दर ठिकाणीं दबकत दबकत व कानोसा घेत घेत, वरील प्रकार ज्या ठिकाणीं झाला असा त्यांचा अंदाज होता त्या ठिकाणीं ते आले. कोठेंही मोटारीचा, मोटारवाहकाचा किंवा आंतील अधिकाऱ्यांचा मागमूसही लागला नाहीं. पूर्वीसारखी कांहीं चाहूलही त्या ठिकाणीं या वेळेस लागली नाहीं. जणूं काय सृष्टीनें आपला अक्राळविक्राळ जबडा उघडून या सर्वांस आपल्या उदरांत क्षणार्धांत गडप करून आपलें नेहमीचें शांत स्वरूप धारण केलें होतें !

९ एप्रिल १९४५ रोजीं साम्राज्य-सेना एकदम 'यामेथीन' या गांवीं येऊन पोंचल्या. हें ठिकाण रंगून-मंडाले या लोहमार्गावर रंगूनपासून अवघें २५०-३०० मैलांवर होतें. इकडे मार्च महिन्याच्या सुरुवातीस इंडोचायनांतील फ्रेंच सत्ता संपुष्टांत आणून जपान्यांनीं सर्व सत्ता आपल्या ताब्यांत घेतली व दुसरे दिवशीं 'अन्नमी' लोकांस स्वातंत्र्य दिल्याचें घोषित करून त्यांचें स्वतंत्र राज्य स्थापलें. अन्नमी लोक सशस्त्र झाल्यावर ते साहजिकच फ्रेंचांच्या विरुद्ध लढूं लागले. तेही कित्येक वर्षें फ्रेंच सत्ता उलथून पाडण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांस अशी संधी हवीच होती. फ्रेंच लोक हे सामाजिक दृष्ट्या चांगले असले तरी राजकीय गोष्टींत ते इंग्रजांपेक्षां जास्त हडेलहप्पी अथवा सुलतानशाही धोरण अवलंबितात. अन्नमी मनुष्याला फ्रेंच साम्राज्याच्या बाहेर जाण्यास कधींही परवानगी देण्यांत येत नसे. मग तो कितीही श्रीमंत असो. म्हणजे फ्रेंच साम्राज्यांत जो फ्रेंचेतर नागरीक जन्माला येईल तो जन्मभर एकप्रकारें फ्रेंच साम्राज्याच्या कैदेंतच जन्मास येई व त्या कैदेंतच त्याचा मृत्यु होई ! त्यानें फ्रेंच साम्राज्यांत वाटेल तेथें जावें, परंतु फ्रेंच साम्राज्याची परिसीमा ओलांडूं नये असा दंडक असे. राजकीय हेतूचा वाससुद्धां नसेल अशाच संस्था स्थापण्याची त्यास परवानगी मिळे व तीसुद्धां मोठ्या मेटाकुटीनें आणि दीर्घ कालानंतर. देशभक्तीबद्दल कोणत्याही स्वरूपांत कोणी 'ब्र' जरी उच्चारला तरी त्यास चौकशीशिवाय तडकाफडकीं 'पुलुकोंदॉर' नांवाच्या एका अंदमान-वजा बेटावर नेऊन, तेथें त्याचा अमानुष छळ करीत. तो कोठें गेला ? त्याचें काय झालें ? तो केव्हां येणार ? जिवंत तरी आहे कीं नाहीं ? याची माहिती त्याच्या कुटुंबियांस मुळींच दिली जात नसे. पूर्वीं अन्नमी लोकांनीं अंगिकारिलेल्या एका स्वातंत्र्य-चळवळीच्या वेळीं फ्रेंच अधिकाऱ्यांनीं भर चौकांत एक वधस्तंभ उभा करून भराभर लोकांस फांशीं दिलें. अशी परिस्थिति असल्यामुळें स्वातंत्र्य मिळाल्याचा अन्नमी लोकांस अवर्णनीय आनंद झाला. ज्या दिवशीं दूरपूर्वेंतील फ्रेंच साम्राज्य संपुष्टांत आणावयाचा जपान्यांनीं बेत केला होता, त्याच्या आदल्या दिवशीं रात्रीं सायगांव शहरीं सर्व वरिष्ठ जपानी अधिकाऱ्यांची एक गुप्त सभा भरली. दुसऱ्या दिवशीं प्रत्येकानें जी कामगिरी करावयाची

ती ज्याची त्यास नेमून दिली गेली. रात्रीं जपानी फौज जय्यत तयार ठेवण्यांत आली व सगळीकडे सामसूम झाल्यावर जपानी फौजी तुकड्यांच्या हालचाली सुरू झाल्या. नभोवाणीकेंद्र ( रेडिओस्टेशन ), महत्त्वाचे चौक, नाक्याचीं ठिकाणें, पोलीस-ठाणीं, फ्रेंच कचेऱ्या इत्यादि ठिकाणीं जाऊन टाळेबंदी करून, जपानी सैन्याचे चौक्यापहारे बसविण्यांत आले. एक सशस्त्र तुकडी फ्रेंच गव्हर्नर ' जॉन डकू ' यांच्या निवासस्थानीं जाऊन त्यांस कैद करून मोटारींतून अज्ञात स्थळीं घेऊन गेली. फ्रेंच बराकी व इतर फौजी आणि आरमारी केंद्रस्थानाभोंवतीं गराडा घालून त्यांस एक तासभराची मुदत देण्यांत आली. " तेवढ्यांत शरण न आल्यास गोळीबार करूं " अशी धमकी घालण्यांत आली. दहा-पंधरा दिवस फ्रेंच सैनिकांनीं किरकोळ स्वरूपाचा प्रतिकार केला. अन्नमी लोकांस स्वातंत्र्य दिल्याचें घोषित झाल्यामुळें फ्रेंचधार्जिणें अन्नमी सैन्य त्यांच्या बाजूनें लढण्यास तयार होईना. इंडोचायनांत अनेक ठिकाणीं जेथें जेथें फ्रेंच सैनिकांची छावणी होती, त्या त्या जागीं फ्रेंच व जपानी सैनिकांच्या झटापटी झाल्या. जपान्यांचाच जय होणार हें ठरलेलें होतें. दुसरे दिवशीं लोक आपापल्या कचेऱ्यांत जातात तों काय ! जेथें तेथें टाळेबंदी व जपानी पहारे बसलेले. सर्वांस आपापल्या घरीं परत जाण्यास सांगण्यांत आलें. एका रात्रींत एकाद्या यंत्राप्रमाणें प्रत्येक जपानी तुकडीनें आपलें काम अगदीं कांटेकोर पद्धतीनें व बेमालूम रीतीनें केलें. सर्व फ्रेंच नागरिकांस कैद करून एका जागीं स्थानबद्ध करण्यांत आलें. दिवसाउजेडीं आपापल्या आवारांत किंवा तेवढ्या वस्तीच्या भागांत त्यांस हिंडण्याफिरण्याची मोकळीक ठेवण्यांत आली. त्याच दिवशीं रस्त्यांत, दंडाला विशिष्ट अर्थाच्या पट्ट्या बांधलेले अन्नमी स्वयंसेवक उत्साहभरानें स्वातंत्र्यप्राप्तीची घोषणा करीत जात होते.

साम्राज्यसेना रोज अधिकाधिक पुढें येत असल्याच्या बातम्या येऊन थडकत होत्या. पश्चिम किनाऱ्याकिनाऱ्यानेंही ती रंगूनच्या रोखानें चाल करून येत होती. १९४५च्या एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यांत हिकारी कीकानच्या मुख्य अधिकाऱ्यानें नेताजींस सांगितलें, " आम्ही आतां रंगून सोडून देण्याचा विचार चालविला आहे. आपण आपला काय तो विचार पाहावा." झांशी-राणी पथकाच्या पंचेचाळीस स्त्री-सैनिक अजून रंगूनमध्यें राहिल्या होत्या. ब्रम्हदेशांतच ज्यांचीं ज्यांचीं घरें होतीं त्यांस दोन-दोन, तीन-तीन महिन्यांची रजा दिल्याचें सांगून त्यांस स्वगृहीं अथवा त्यांच्या आप्तेष्टांकडे पाठविण्यांत आलें होतें. उरलेल्या पंचेचाळीस स्त्रिया मलायावासी होत्या. कित्येक वेळां त्या रंगून स्टेशनावर जाऊन, त्यांज-करतां राखून ठेवण्यांत आलेली जागा आयत्या वेळीं दुसऱ्या कोणत्या तरी जपानी तुकडीस दिली गेल्यामुळें, परत आल्या होत्या. एवंच, त्या या वेळेपर्यंत रंगून-मध्येंच होत्या. नेताजींनीं जपानी अधिकाऱ्यांस सांगितलें कीं, 'आधीं या पथकास रंगूनहून बँकॉकला नेण्याची व्यवस्था करा, तोंवर आमच्यापैकीं एकही पुरुष परत जाणें शक्य नाहीं. ' एप्रिल महिन्याचा २२ सावा दिवस उजाडला. रंगून शहर

भयाण दिसत होतें. सगळीकडे उदासीनतेची छाया पसरलेली होती. रंगूनचा चवथा हिस्सा तर हवाई हल्ल्यांनीं केव्हांच उध्वस्त झालेला होता. सर्वसामान्य जनता हवाई हल्ल्यास भिऊन दिवसभर कोठें तरी दडून बसावयाची. सूर्यास्त झाल्यावर, जणूं वारुळांतून बाहेर पडावयाचें, कुठल्या तरी लांबच्या विहिरीवर स्नान व कपडे धुणें उरकावयाचें व थोडेसें पाणी घेऊन जें निजावयाला म्हणून परत यावयाचें तें पुन्हा दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं बाहेर पडावयाचें ! पुष्कळसे लोक रंगून सोडून जंगलांत व खेड्यापाड्यांत कायमचे जाऊन राहूं लागले होते. तेथें तरी त्यांस स्वस्थता कोठें होती ? तेथें रोज दरवडे पडावयाचे. रंगून शहरावर रोज हवाई हल्ले होत असत. आगलावे व स्फोटक बाँब विमानांतून टाकले जात. २२ तारखेस रात्रीं नेताजी जनरल भोसल्यांच्या निवासस्थानीं भोजनास आले होते. रात्रीं सुमारें १० वाजल्यापासून १२ वाजेपर्यंत ते तेथें होते. त्यांचा चेहरा फारच गंभीर दिसत होता. २३ तारखेस रंगूनमधील सर्व जपानी बांधाबांध करण्यांत गुंतलेले दिसून येत होते. बैलगाडी, घोडा, मोटार असें जें वाहन मिळेल त्यांत किंवा कांहींच नसलें तर पाठीवर घेववेल तितकें सामान घेऊन अनेक खात्यांत काम करणारे हे जपानी सैनिक कूच करूं लागले. कोणत्याही खात्यांत काम करीत असले, तरी सर्व जपानी लोक त्या दिवसांत फौजी पोषाखांतच असत. त्यांचे राहाते बंगले उघडे टाकून ते निघाले कीं त्यांच्या मागोमाग बाजारबुणगे लोक त्यांत प्रवेश करून वाटेल तें सामान उचलूं लागत. उचलवेल तेवढें सामान घेऊन जो तो चालू लागे. इतर जे जास्त अघाशी वृत्तीचे होते ते हाताला येईल तितकें सामान बाहेर आणून रस्त्याच्या एका कडेला ठेवीत व मागून एक एक असें आपल्या स्नेह्यासोबत्यांच्या मदतीनें आपापल्या ठिकाणीं घेऊन जात. मदत करणाऱ्या स्नेह्यासोबत्यांचा, प्राप्तींतील अर्धा वाटा असेच ! जपान्यांच्या विरुद्ध उठलेले ब्रम्ही सैनिक आतां शहरांत शिरून माघारीं फिरणाऱ्या जपानी सैनिकांवरही आडून गोळीबार करूं लागले होते. रंगून शहराच्या मध्यवस्तींतील जपानी व ब्रम्ही सैनिकांत मधूनच गोळागोळी सुरू होई. अशा रीतीनें आधींच प्रेतकळा आलेल्या त्या शहरांत जास्तच औदासीन्य पसरलें.

२३ तारखेस सायंकाळीं रंगून शहरांतील ' कालावस्तीं ' तून ( हिंदी लोक राहात असलेला विभाग ) मी परत येत होतों. स्टेशनानजीकच्या हमरस्त्यावरून, दिवसभर मोलमजुरी करून घरीं परत जात असलेले बरेचसे तामीळ लोक मला दिसले. कोणाच्या डोक्यावर लाकडाची मोळी अथवा हवाई हल्ल्यांत उध्वस्त झालेल्या घराचे वासे होते. मला फौजी पोशाखांत पाहून ते घाबऱ्या घाबऱ्या माझ्याकडे आले व मला सांगूं लागले, " पलीकडच्या कोपऱ्यावर एक ब्रह्मी मनुष्य उभा आहे व तो तिकडून येणाऱ्या जाणाऱ्या सर्व हिंदी लोकांची झडती घेऊन, त्यांच्याजवळचे पैसे वगैरे लुबाडीत आहे. " मी त्यांस म्हटलें,

ती ज्याची त्यास नेमून दिली गेली. रात्रीं जपानी फौज जय्यत तयार ठेवण्यांत आली व सगळीकडे सामसूम झाल्यावर जपानी फौजी तुकड्यांच्या हालचाली सुरू झाल्या. नभोवाणीकेंद्र (रेडिओस्टेशन), महत्त्वाचे चौक, नाक्याचीं ठिकाणें, पोलीस-ठाणीं, फ्रेंच कचेऱ्या इत्यादि ठिकाणीं जाऊन टाळेबंदी करून, जपानी सैन्याचे चौक्यापहारे बसविण्यांत आले. एक सशस्त्र तुकडी फ्रेंच गव्हर्नर 'जॉन डकू' यांच्या निवासस्थानीं जाऊन त्यांस कैद करून मोटारींतून अज्ञात स्थळीं घेऊन गेली. फ्रेंच बराकी व इतर फौजी आणि आरमारी केंद्रस्थानाभोंवतीं गराडा घालून त्यांस एक तासभराची मुदत देण्यांत आली. "तेवढ्यांत शरण न आल्यास गोळीबार करूं" अशी धमकी घालण्यांत आली. दहा-पंधरा दिवस फ्रेंच सैनिकांनीं किरकोळ स्वरूपाचा प्रतिकार केला. अन्नमी लोकांस स्वातंत्र्य दिल्याचें घोषित झाल्यामुळें फ्रेंचधार्जिणें अन्नमी सैन्य त्यांच्या बाजूनें लढण्यास तयार होईना. इंडोचायनांत अनेक ठिकाणीं जेथें जेथें फ्रेंच सैनिकांची छावणी होती, त्या त्या जागीं फ्रेंच व जपानी सैनिकांच्या झटापटी झाल्या. जपान्यांचाच जय होणार हें ठरलेलें होतें. दुसरे दिवशीं लोक आपापल्या कचेऱ्यांत जातात तों काय! जेथें तेथें टाळेबंदी व जपानी पहारे बसलेले. सर्वांस आपापल्या घरीं परत जाण्यास सांगण्यांत आलें. एका रात्रींत एकाद्या यंत्राप्रमाणें प्रत्येक जपानी तुकडीनें आपलें काम अगदीं कांटेकोर पद्धतीनें व बेमालूम रीतीनें केलें. सर्व फ्रेंच नागरिकांस कैद करून एका जागीं स्थानबद्ध करण्यांत आलें. दिवसाउजेडीं आपापल्या आवारांत किंवा तेवढ्या वस्तीच्या भागांत त्यांस हिंडण्याफिरण्याची मोकळीक ठेवण्यांत आली. त्याच दिवशीं रस्त्यांत, दंडाला विशिष्ट अर्थाच्या पट्ट्या बांधलेले अन्नमी स्वयंसेवक उत्साहभरानें स्वातंत्र्यप्राप्तीची घोषणा करीत जात होते.

साम्राज्यसेना रोज अधिकाधिक पुढें येत असल्याच्या बातम्या येऊन थडकत होत्या. पश्चिम किनाऱ्याकिनाऱ्यानेंही ती रंगूनच्या रोखानें चाल करून येत होती. १९४५च्या एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यांत हिकारी कीकानच्या मुख्य अधिकाऱ्यानें नेताजींस सांगितलें, "आम्ही आतां रंगून सोडून देण्याचा विचार चालविला आहे. आपण आपला काय तो विचार पाहावा." झांशी-राणी पथकाच्या पंचेचाळीस स्त्री-सैनिक अजून रंगूनमध्यें राहिल्या होत्या. ब्रम्हदेशांतच ज्यांचीं ज्यांचीं घरें होतीं त्यांस दोन-दोन, तीन-तीन महिन्यांची रजा दिल्याचें सांगून त्यांस स्वगृहीं अथवा त्यांच्या आप्तेष्टांकडे पाठविण्यांत आलें होतें. उरलेल्या पंचेचाळीस स्त्रिया मलायावासी होत्या. कित्येक वेळां त्या रंगून स्टेशनावर जाऊन, त्यांजकरतां राखून ठेवण्यांत आलेली जागा आयत्या वेळीं दुसऱ्या कोणत्या तरी जपानी तुकडीस दिली गेल्यामुळें, परत आल्या होत्या. एवंच, त्या या वेळेपर्यंत रंगूनमध्येंच होत्या. नेताजींनीं जपानी अधिकाऱ्यांस सांगितलें कीं, 'आधीं या पथकास रंगूनहून बँकॉकला नेण्याची व्यवस्था करा, तोंवर आमच्यापैकीं एकही पुरुष परत जाणें शक्य नाहीं.' एप्रिल महिन्याचा २२ सावा दिवस उजाडला. रंगून शहर

भयाण दिसत होतें. सगळीकडे उदासीनतेची छाया पसरलेली होती. रंगूनचा चवथा हिस्सा तर हवाई हल्ल्यांनीं केव्हांच उध्वस्त झालेला होता. सर्वसामान्य जनता हवाई हल्ल्यास भिऊन दिवसभर कोठें तरी दडून बसावयाची. सूर्यास्त झाल्यावर, जणूं वारुळांतून बाहेर पडावयाचें, कुठल्या तरी लांबच्या विहिरीवर स्नान व कपडे धुणें उरकावयाचें व थोडेसें पाणी घेऊन जें निजावयाला म्हणून परत यावयाचें तें पुन्हा दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं बाहेर पडावयाचें! पुष्कळसे लोक रंगून सोडून जंगलांत व खेड्यापाड्यांत कायमचे जाऊन राहूं लागले होते. तेथें तरी त्यांस स्वस्थता कोठें होती? तेथें रोज दरवडे पडावयाचे. रंगून शहरावर रोज हवाई हल्ले होत असत. आगलावे व स्फोटक बॉंब विमानांतून टाकले जात. २२ तारखेस रात्रीं नेताजी जनरल भोसल्यांच्या निवासस्थानीं भोजनास आले होते. रात्रीं सुमारें १० वाजल्यापासून १२ वाजेपर्यंत ते तेथें होते. त्यांचा चेहरा फारच गंभीर दिसत होता. २३ तारखेस रंगूनमधील सर्व जपानी बांधाबांध करण्यांत गुंतलेले दिसून येत होते. बैलगाडी, घोडा, मोटार असें जें वाहन मिळेल त्यांत किंवा कांहींच नसलें तर पाठीवर घेववेल तितकें सामान घेऊन अनेक खात्यांत काम करणारे हे जपानी सैनिक कूच करूं लागले. कोणत्याही खात्यांत काम करीत असले, तरी सर्व जपानी लोक त्या दिवसांत फौजी पोषाखांतच असत. त्यांचे राहाते बंगले उघडे टाकून ते निघाले कीं त्यांच्या मागोमाग बाजारबुणगे लोक त्यांत प्रवेश करून वाटेल तें सामान उचलूं लागत. उचलवेल तेवढें सामान घेऊन जो तो चालू लागे. इतर जे जास्त अघाशी वृत्तीचे होते ते हाताला येईल तितकें सामान बाहेर आणून रस्त्याच्या एका कडेला ठेवीत व मागून एक एक असें आपल्या स्नेह्यासोबत्यांच्या मदतीनें आपापल्या ठिकाणीं घेऊन जात. मदत करणाऱ्या स्नेह्यासोबत्यांचा, प्राप्तींतील अर्धा वाटा असेच! जपान्यांच्या विरुद्ध उठलेले ब्रम्ही सैनिक आतां शहरांत शिरून माघारीं फिरणाऱ्या जपानी सैनिकांवरही आडून गोळीबार करूं लागले होते. रंगून शहराच्या मध्यवस्तींतील जपानी व ब्रम्ही सैनिकांत मधूनच गोळागोळी सुरू होई. अशा रीतीनें आधींच प्रेतकळा आलेल्या त्या शहरांत जास्तच औदासीन्य पसरलें.

२३ तारखेस सायंकाळीं रंगून शहरांतील 'कालावस्तीं' तून ( हिंदी लोक रांहात असलेला विभाग ) मी परत येत होतों. स्टेशनानजीकच्या हमरस्त्या वरून, दिवसभर मोलमजुरी करून घरीं परत जात असलेले बरेचसे तामीळ लोक मला दिसले. कोणाच्या डोक्यावर लाकडाची मोळी अथवा हवाई हल्ल्यांत उध्वस्त झालेल्या घराचे वासे होते. मला फौजी पोशाखांत पाहून ते घाबऱ्या घाबऱ्या माझ्याकडे आले व मला सांगूं लागले, "पलीकडच्या कोपऱ्यावर एक ब्रह्मी मनुष्य उभा आहे व तो तिकडून येणाऱ्या जाणाऱ्या सर्व हिंदी लोकांची झडती घेऊन, त्यांच्याजवळचे पैसे वगैरे लुबाडीत आहे." मी त्यांस म्हटलें,

" मला दाखवा कुठें आहे तो. " माझ्या मागोमाग ते सर्वजण आले. जाड गरम कापडाचा लांब कोट घालून एक ब्रह्मी मनुष्य तेथें उभा होता. त्याच्या शेजारीं १२-१३ वर्षांचा एक लहान मुलगा उभा होता. त्या ब्रह्मी माणसाजवळ एक साधी वेताची लहानशी छडी होती. तिकडून येणाऱ्या सर्व मजूरांची तो झडती घेत होता. एकाची झडती चालली असल्यास तेवढ्यांत ती संधी साधून त्याच्या मागचा दुसरा मजूर चटकन् त्या ब्रह्मी मनुष्याचा डोळा चुकवून पुढें जाण्याचा प्रयत्न करी. पण त्या ब्रह्मी मनुष्यानें जरा डोळा वर केला कीं, तो स्वतः होऊनच त्याच्याकडे जाई व त्यास झडती घेऊं देई. तो एकटा होता आणि हे एवढे लोक होते परंतु सर्वांनीं मिळून त्यास मारून काढावयाचें त्यांच्या मनांत आलें नाहीं किंवा कोणाचा तसा धीर झाला नाही ! मी तेथें गेल्यावर माझ्या मागें बरेचसे तामीळ लोक जमावानें उभे राहिले. जो तो त्या ब्रह्मी माणसाविरुद्ध आपापलें गाऱ्हाणें सांगूं लागला. त्या सर्व लोकांपैकीं फक्त एका जवळच तेवढे पांच रुपये सांपडून ते त्या इसमानें घेतले होते. मी त्यास ते परत करण्यास दरडावून सांगितलें. प्रथम त्या भामट्यानें हिंदुस्थानी समजत नसल्याचें ढोंग केलें. परंतु आपादमस्तक मला न्याहाळल्यावर त्यानें जेव्हां माझ्या कंबरेशीं पिस्तुल पाहिलें, तेव्हां मात्र त्यानें त्या मुलाजवळ दिलेले पांच रुपये मागून घेऊन ज्याचे त्यास परत केले. नंतर मी जाऊं लागलों, तसा हा मनुष्य पुन्हा त्या सर्वांच्या पाठीमागें लागला व तेही लोक धांवा हो 'धांवा, आमच्या मदतीला कोणी धांवा ' असें म्हणत पळ काढूं लागले. मी पुन्हा जाऊन त्या भामट्यास हटकलें व त्याला विरुद्ध दिशेकडे जाण्यास दरडावून सांगितलें. अर्थातच तो तेथून नाहींसा झाला. मला मात्र या लोकांची कींव आली. आम्ही हिंदी लोक इतके निर्बल आहोंत कीं, आम्ही संख्येनें कितीही असलों तरी एका परकी इसमापुढें आम्ही अगदीं गोगलगाय बनतों ! त्यानें आम्हांला लुबाडावें, हाणावें, मारावें व आम्ही मदतीच्या आशेनें तिसऱ्याच्या तोंडाकडे शामळूसारखें बघत राहावें, प्रतिकारक्षमता, स्वत्व यांचा गंधही आमच्यांत राहूं नये याहून आमचें अधःपतन तें काय व्हावयाचें राहिलें आहे !

---

## मागें पाऊल : २५

ब्रम्हदेशांत हिंदी स्वातंत्र्यसेनेच्या दोन डिव्हिजन्स् अडकल्या. पुरेसें मनुष्यबळ व जरूर ती युद्धसामुग्री नसल्यामुळें ब्रह्मदेश सोडावयाचा हें धोरण जरी ठरलें होतें, तरी आघाडीवरून पीछेहाट करण्यास पुरेशा मोटारलॉऱ्या किंवा इतर वाहनें नव्हतीं; म्हणून कोणासच रंगूनला पोंचतां आलें नाहीं. साम्राज्य-सेना अप्रतिहतपणें सर्व दिशांनीं एकदम पुढें येऊं लागल्यामुळें आघाडीवरील स्वातंत्र्यसेनेची एकेक तुकडी त्यांच्या वेढ्यांत अडकूं लागली. उरतां उरली स्वातंत्र्यसेनेची, मलायांत असलेली एक डिव्हिजन. आपली एवढी फौज ब्रम्हदेशांत अडकून पडली, तिच्याबरोबर आपणही रंगूनमध्येंच राहावें असें नेताजींच्या मनांत होतें व तसें त्यांनीं जवळ जवळ ठरविलेंही होतें. परंतु त्यांच्या मंत्रिमंडळांतील सहकाऱ्यांनीं व विशेषतः जनरल जगन्नाथराव भोसले यांनीं त्यांस आग्रहानें पुन्हा पुन्हा असा सल्ला दिला कीं, " आपण जर कोठेंही सुरक्षित असलां तर दूरपूर्वेंतील इतर हिंदी लोकांच्या मदतीनें आपण ही चळवळ जिवंत ठेवूं शकाल. ब्रम्हदेश गेला म्हणून काय झालें ? परंतु आपण जर आतां इंग्रजांच्या हातांत सांपडलां तर मात्र ही सर्वच चळवळ एकदम बंद पडेल." वास्तविक एप्रिल महिन्याच्या २३ तारखेला रात्रींच नेताजींनीं निघावयाचें; कारण जपानी अधिकाऱ्यांनीं त्यांस असें कळविलेलें होतें कीं, " शत्रु फारच झपाट्यानें रंगूनच्या रोखानें पुढें येत आहे. वाटेंत त्यास अडविण्याचा व रंगूनचा बचाव करण्याचा बंदोबस्त नाहीं व तसा आमचा विचारही नाहीं. अर्थात् चोवीस तासांतच आपला काय तो विचार नक्की ठरला तर आम्ही, आपल्याला सुरक्षित पोंचविण्याची हमी घेऊं शकतों. नाहींतर पुढें कसा प्रसंग येईल त्याची आत्तां कांहींच कल्पना करितां येणें शक्य नाहीं. आम्ही मात्र उशीरांत उशीरा २४ तारखेस रात्रीं जाणार. आपला काय तो विचार आपण पहा." रंगूनच्या उत्तरेस २५ मैलांवर पेगू शहर आहे. रंगूनहून दक्षिण ब्रम्हदेशांत जावयाचें झाल्यास अगोदर पेगूला यावें लागतें. येथून पुढें हा रस्ता दक्षिणेकडे वळतो. इंग्रज ब्रम्हदेशांतून खालीं दक्षिणेकडे रंगूनच्या रोखानें चाल करून येत होते. त्यांना अर्थातच वाटेंत पेगू अगोदर लागणार व मगच ते रंगूनकडे आपला मोर्चा वळविणार. अर्थात् पेगू इंग्रजांच्या हातांत पडेपर्यंत रंगूनमधील माणसांनीं पेगूमार्गें दक्षिणेकडे निघून जाणें आवश्यक होतें.

सहकाऱ्यांच्या आग्रहामुळें नेताजींनीं रंगून सोडून सयामची राजधानी बँकॉक येथें जाण्याचें ठरविलें. परंतु "झांशी-राणी पथकाच्या उरलेल्या स्त्री-सैनिक माझ्यासमोर येथून आधीं हलल्याशिवाय मी येथून हालणार नाहीं" असें त्यांनीं सर्वांस निक्षून सांगितलें. ह्या सर्व वाटाघाटी होतां होतां २३ तारीख उजाडली. नेताजींच्या रंगूनमधील निवासस्थानीं या सर्व वाटाघाटी चालल्या होत्या. दिवस उजाडल्यावर प्रवास सुरू करणें इष्ट नव्हतेंच व अजून बेतही नक्की झालेला नव्हता. रंगून शहरांत स्वातंत्र्यसैन्याची संख्या पांच हजार होती. एवढ्यांना नेताजींबरोबर सयामला जाण्यास पुरेशीं वाहनेंही नव्हतीं व शिवाय ब्रम्हदेशांतील ज्या हिंदी नागरिकांनीं आपल्या अपूर्व स्वार्थत्यागानें स्वातंत्र्यचळवळीस एवढी बळकटी आणली होती, त्यांच्या जीविताचें व मालमत्तेचें रक्षण करण्याची जबाबदारी अशा आणीबाणीच्या प्रसंगीं स्वातंत्र्यसैन्यावर आपोआपच येऊन पडत होती. सर्व जपानी सैन्य निघून जाणार होतें. हिंदी व जपानी या दोघांच्याही विरुद्ध ब्रह्मी लोकांनीं शस्त्र उचललें होतें. दिवसाढवळ्या दरवडे पडणें व चालतां चालतां खून होणें या सरावांतील गोष्टी झालेल्या होत्या. लढाईमुळें देशोधडीस लागलेलेच बहुधा अशा दुर्वर्तनास प्रवृत्त झालेले होते. ब्रम्हदेशांतील व्यापार व वरिष्ठ प्रकारच्या नोकऱ्या या सर्व हिंदी लोकांच्या ताब्यांत असल्यामुळें ब्रह्मी लोक त्यांचा द्वेष करितात. या आर्थिक कारणास आतां एका राजकीय कारणाची जोड लाभली होती. व ती म्हणजे ब्रम्ही लोक जपान्यांच्या विरुद्ध असतांना हिंदी लोक जपान्यांशीं सहकार करीत होते. अशा तीन मुख्य कारणांमुळें हिंदी लोकांस ब्रम्ही लोकांपासून फार धोका होता. १९४२ मध्यें जपान्यांचा जोर असतांना इंग्रज जेव्हां रंगून सोडून गेले, तेव्हां ८ दिवस रंगूनचा कोणीच वाली नव्हता. जपान्यांनीं त्या शहराचा ताबा घेईपर्यंत मध्यें ८ दिवसांचा अवधि गेला होता. तेवढ्यांत ब्रम्ही लोकांनीं केलेल्या हल्ल्यांमुळें कित्येक हिंदी लोक प्राणास मुकले व अनेक देशोधडीस लागले. त्या प्रकाराची पुनरावृत्ति होऊं नये म्हणून नेताजींनीं जनरल लोकनाथन् यांजकडे रंगून शहराच्या बचावाचें काम सोपविलें. त्यांच्या हाताखालीं असलेल्या पांच हजार स्वातंत्र्यसैनिकांस नेताजींनीं जातांना सांगितलें कीं, "या शहरांतील हिंदी लोकांचे प्राण आणि वित्त यांचें संरक्षण करण्याची सर्व जबाबदारी तुमच्यावर आहे."

जपान्यांनीं झांशी-राणी पथकाच्या पंचेचाळीस स्त्री-सैनिकांकरतां तीन मोटारलॉऱ्यांची व्यवस्था केली. प्रवासांत लागतील म्हणून पेट्रोलनें भरलेलीं कांहीं पिपें त्यांत ठेवण्यांत आलीं. प्रत्येकानें जरूर तेवढेंच सामान बरोबर घ्यावें असें ठरलें. इकडे नेताजींच्या बरोबर कोणी कोणी निघावें त्याच्या याद्या सुरू झाल्या. प्रथम मला रंगूनमध्येंच राहावें लागेल असा एकंदर रागरंग दिसत होता. ते दोन दिवस फारच गडबडीचे होते. नेताजींच्या निवासस्थानीं

अधिकाऱ्यांची, रंगूनमधील प्रतिष्ठित हिंदी नागरिकांची व ब्रम्ही अधिकाऱ्यांची एकच ये-जा, धांवपळ, सल्ला-मसलत, घाई, गडबड, गोंधळ असें सारखें चाललें होतें. २४ तारखेस सायंकाळीं नेताजींच्या निवासस्थानीं पुन्हा त्यांच्याबरोबर कोणी कोणी जावें हें ठरविण्याकरतांच व इतर गोष्टींची निरवानिरव करण्याकरतां सव अधिकाऱ्यांची बैठक भरली. त्या यादींत माझें नांव होतें. नेताजींच्या बंगल्यांत वरच्या मजल्यावर या सल्ला-मसलती चालल्या होत्या. मी खालच्या मजल्यावर इतर अधिकाऱ्यांशीं बोलत बसलों होतों. पहाटे ३॥ च्या सुमारास जनरल भोसले खालीं आले व मला म्हणाले, "चला, आपल्याला लगेच निघावयाचें आहे." आम्ही आमच्या न्यूलिन रस्त्यावरील बंगल्यांत गेलों. जवळच रस्त्याच्या पलीकडे जनरल चॅटर्जी यांचा बंगला होता. तेथें जाऊन मी त्यांस जागें केलें व त्यांनींही त्यांच्या दोन चिटणीसांसह नेताजींबरोबर निघण्यास ताबडतोब तयार व्हावें, असा नेताजींचा निरोप मी त्यांस सांगितला. मी वरीं जाऊन घाईघाईनें कांहीं कपडे, कागदपत्र व प्रवासांत लागणारें सामान चामड्याच्या पेटींत भरलें. ४॥-५ च्या सुमारास आम्ही नेताजींच्या निवासस्थानीं जावयास निघणार, इतक्यांत निरोप आला कीं, "आज आतां सूर्योदयाची वेळ झाल्यामुळें आतां न निघतां रात्रीं निघूं."

२४ एप्रिल १९४५ रोजीं सकाळींच आमची सर्व बांधाबांध झालेली होती. दुपारीं ( नागपूरकडील ) डॉक्टर शंकर विष्णू नेने हे माझा निरोप घेण्यास आले होते. त्यांचें निवासस्थान येथून दोन फर्लांगांवरच होतें. रंगूनमधील वास्तव्यांत त्यांचा माझा पुष्कळ स्नेह जमला. त्याच्या अगोदर तीन वर्षांपूर्वीं नीसून ( सिंगापूर ) बंदीछावणींत आमची नुसती तोंडओळख झालेली होती. परस्परांची यापुढें कधीं, कोणत्या ठिकाणीं व कसल्या परिस्थितींत भेट होईल व त्या अवधींत एकमेकांवर काय काय प्रसंग येतील ह्याची कांहींच कल्पना नसल्यामुळें आम्ही व्यथित अंतःकरणानें एकमेकांचा निरोप घेतला. आमच्या न्यूलिन रोडवरील बंगल्यांत जनरल भोसले, जनरल लोकनाथन् व मी असे आम्ही तिघे राहात असूं. जनरल लोकनाथन् यांचाही आम्ही मोठ्या कष्टानें निरोप घेतला. ते लवकरच इंग्रजांच्या हातांत सांपडतील त्या वेळेस त्यांची काय परिस्थिति होईल असे विचार माझ्या मनांत राहून राहून येत होते. विशेषतः ते वृद्ध होते व जठरांतील व्रणामुळें सुस्थितींतही नव्हते. तथापि तशाही परिस्थितींत नेहमींच्या त्यांच्या आनंदी व विनोदी मनोवृत्तींत यत्किंचितही फेरबदल झालेला दिसला नाहीं. त्यांच्या विनोदी स्वभावामुळें ते सर्वांस फारच प्रिय होते. खेळीमेळीच्या वातावरणांत स्वातंत्र्य-चळवळींतील सर्व अधिकारी त्यांस काका अशा अर्थीं 'अंकल' म्हणून संबोधीत असत. हिंदुस्थानांत हिंदी जनतेचें इंग्रज सरकारावर भलतेंच दडपण पडून सर्व स्वातंत्र्यसैनिकांस अजिबात मोकळें सोडावें लागलें, ही अघटित व सर्वस्वीं अकल्पित अशी घटना

पुढें घडून आली. परंतु याबद्दल त्या वेळेस कोणासच कांहीं कल्पना नव्हती. अधिकाऱ्यांस फाशीं व इतरांस निरनिराळ्या प्रमाणांत कैद हेंच सर्व स्वातंत्र्य-सैनिकांचें भवितव्य असें सर्वांस त्या वेळीं वाटत होतें.

सायंकाळीं ६ वाजतां, जनरल भोसले, मी व त्यांचा फौजी नोकर शिवसिंग आणि आमचा मोटारहाक्या असे आम्हीं तिघे निघालों. रंगूनमधील आमच्या अत्युच्च कचेरीच्या आवारांत आल्यावर तेथें जमलेल्या मित्रमंडळींचा आम्हीं निरोप घेतला. त्यांस मागें सोडून जावें लागत असल्याबद्दल मला फार वाईट वाटत होतें. आमच्याबरोबर येणाऱ्या कांहीं अधिकाऱ्यांस घेऊन आम्हीं सायंकाळीं ७ वाजण्याच्या सुमारास नेताजींच्या निवासस्थानीं पोंचलों. जाणाऱ्या सर्व मंडळींनीं या सुमारास येथें जमावें असें ठरलें होतें. झांशी-राणी पथकाच्या मोटार लॉऱ्यांनीं वाटेंतील एका चौकाशीं येऊन थांबावें व आमच्या गाड्या त्या बाजूनें कूच करीत असतां त्यांनीं आमच्या गटांत सामील होऊन पुढें यावें असें ठरलें होतें. नेताजींच्या बंगल्यावर, जाणारी मंडळी जमूं लागली. जनरल चॅटर्जी, त्यांचे दोन चिटणीस, एक नोकर व मोटारहाक्या, जनरल क्यानी व त्यांचीं दोन माणसें, लेफ्टनंट कर्नल किंवा तशाच वरिष्ठ हुद्याचे पंचवीस-तीस अधिकारी, तीनशें सैनिक व इतर स्वयंपाकी वगैरे मिळून (झांशी-राणी पथकासुद्धां) आम्ही सुमारें चारशें माणसें होतों. स्वातंत्र्यसंघाचेही पांच-सहा प्रमुख अधिकारी कार्यकर्ते आमच्याबरोबर होते. गेल्या दोन-तीन दिवसांच्या जाग्रणामुळें म्हणा किंवा इतर कांहीं कारणामुळें म्हणा, त्या दिवशीं मला फारच थकल्यासारखें वाटत होतें. बँकॉकहून त्या बारा दिवसांच्या जंगलांतील प्रवासानंतर रंगूनमध्यें (२७ मार्च रोजीं) येऊन पोंचल्यावर चार-पांच दिवसांनींच मी आठ-दहा दिवस हिंवतापानें आजारी होतों. त्या आजाराचा परिणामही मला अजून जाणवत होता.

येणाऱ्या जाणाऱ्या अधिकाऱ्यांशीं, बंगल्याच्या गच्चीवर नेताजींचा विचार-विनिमय चाललेला होता. स्वच्छ चांदणें पडलें होतें. खुर्च्यांवर बसून ही सर्व मंडळी गप्पा मारीत होती. खालीं त्या बंगल्याच्या आवारांत जाणाऱ्या मंडळींचे निरनिराळे गट आपापसांत एकंदर परिस्थितीबद्दल गप्पा मारीत होते. इतक्यांत गच्चीच्या सुमारें दोनशें फूट उंचीवरून एक विमान ट्‌ट्‌ट्‌...असा मशीन-गनच्या गोळ्यांचा मारा करीत वेगानें पुढें निघून गेलें. मशीनगन्सच्या गोळ्या ठिणग्याप्रमाणें चमकल्या. नेताजी व त्या आवारांतील इतर माणसें थोडक्यांत बचावलीं. सर्व गोळ्या शेजारच्या मोकळ्या आवारांत पडल्या. नेताजींचा विचार-विनिमय तसाच शांतपणें चालू होता! लढाई थांबल्यावर साम्राज्य-हवाई-दलां-तील वैमानिकांचे नकाशे पाहावयास मिळाले, तेव्हां त्यांवर रंगूनमधील नेताजींचा बंगला कोणत्या ठिकाणीं आहे तें स्पष्ट निदर्शित केलेलें होतें. स्फोटगोल टाकून उध्वस्त करावयाच्या अनेक ठिकाणांपैकीं तेंही एक ठरविण्यांत आलें होतें!

नेताजींच्या बंगल्यांतील फौजी नोकर-चाकर व त्यांचे सहकारी अधिकारी हे खालच्या मजल्यावर नेताजींची निघण्याची तयारी करण्यांत गुंतले होते. २४ एप्रिल १९४५ रोजीं मध्यरात्रीं नेताजींनीं रंगूनमधील आपलें निवासस्थान सोडलें. रंगूनमधील सर्व रुग्ण सैनिकांच्या शुश्रुषेची व्यवस्था पाहाण्याकरतां त्यांनीं कर्नल राजू ( नेताजींचे डॉक्टर ) यांस रंगूनमध्येंच ठेवलें. नेताजींचा एक फौजी नोकर, श्री. रावत, श्री. स्वामी व श्री. समशेरसिंग असे त्यांचे तीन सहकारी व नेताजींचे गृहव्यवस्थापक लेफ्टनंट डे यांसह नेताजी निघाले. मागें राहणाऱ्या मंडळींचा त्यांनीं दुःखपूर्ण हृदयानें निरोप घेतला. हिकारी कींकानचे मुख्य लेफ्टनंट जनरल इसोडा व त्यांचा जपानी दुभाष्या हे दोघे जपानी अधिकारीही आमच्याबरोबर होते. जपानी अधिकाऱ्यांची एक मोटार, नेताजींची एक, तीन जनरल्सच्या तीन मोटारी मिळून एकंदर पांच मोटारी व पांच लॉऱ्यांत आम्ही सर्वजण दाटीनें बसून निघालों. वरिष्ठ अधिकारी प्रत्येक मोटारींत तीन-तीन, चार-चार बसले होते. प्रत्येक लॉरींत ३०-३५ माणसें बसलीं होतीं. ज्या वरिष्ठ अधिकाऱ्यांस मोटारींत जागा मिळाली नाहीं ते लॉऱ्यांत बसले होते. मध्यरात्र उलटल्यावर आम्ही नेताजींच्या बंगल्यावरून सर्व लवाजम्यानिशीं निघालों. मी मागें नजर टाकली. ज्या आवारांत आजपर्यंत महत्त्वाच्या घडामोडी घडल्या, जेथें एका क्षणापूर्वीं इतकीं माणसें कांहीं एका ध्येयानें प्रेरित झालेलीं अशीं जमलीं होतीं, तें आवार आतां शून्यवत् भासत होतें !

वाटेंत, ठरलेल्या ठिकाणीं झांशी-राणी पथकाच्या व त्यांच्याबरोबर असलेल्या स्वातंत्र्यसैनिकांच्या तीन लॉऱ्या आमची वाट पाहात उभ्या होत्या. त्या आम्हांस मिळाल्या व आम्ही सर्वजण निघालों. चांदणें चांगलें स्वच्छ पडलें होतें. प्रत्येक लॉरींत माणसें खच्चून भरलेलीं होतीं. पेट्रोलचीं पिपें, स्वयंपाकाचीं भांडीं, धान्यसामुग्री वगैरे सामानही बरेंच होतें. एकादी लांबच लांब मिरवणूक असावी अशा प्रकारची रंगून-पेगू रस्त्यावर सैनिकांच्या मोटारींची, लॉऱ्यांची व पायदळ तुकड्यांची एक रांगच रांग लागलेली होती. सर्वजण पेगूच्या रोखानें कूच करीत होते. पायदळ तुकड्यांच्या अथवा इतर मोटारींच्या किंवा लॉऱ्यांच्या पुढें जावयाचें असलें, म्हणजे त्या गर्दींतून वाट काढण्याकरतां मोटारीचा भोंगा वाजवीत रस्त्याच्या कडेला होऊन पुढें जावें लागे. वाटेंत एकादी लॉरी बिघडून उभी राहिली म्हणजे तेवढ्यापुरता मागून येणारा सैनिकांचा प्रवाह दुभंगून पुन्हा पुढें एक होत असे. कांहीं मोटारी वेगांत जात असत. वाटेंत कांहीं अडचण येऊन वेग कमी करावा लागला अथवा थांबावें लागलें म्हणजे एकदम तेवढ्यापुरता त्यांचा वेग कमी होई. पुन्हा थोडा वाव मिळाला कीं त्या भरधांव निघत. पायदळ तुकड्यांच्या पावलांचा रप्...रप् असा आवाज, मोटारींचे व लॉऱ्यांचे कर्णे आणि भोंगे, अधूनमधून मध्येंच

मोटारींना ब्रेक लावल्याचा किंवा त्यांचीं यंत्रें सुरू केल्याचे आवाज, पथक-नायकांचे खडद्या सुरांतील हुकूम, सैनिकांची आपापसांतील कुजबूज, हे सर्व आवाज संमिश्र रीतीनें कानावर येत. एवढ्या रहदारीमुळें धूळ एकसारखी उडत होती. वाटेंत रस्त्याच्या बाजूस लॉऱ्या कांहीं वेळ थांबवून आम्हीं झाडांच्या फांद्या तोडल्या व आमच्या लॉऱ्यांवर ठिकठिकाणीं अडकविल्या; उद्देश हा कीं, शत्रूचीं विमानें आलींच तर त्यांच्या दृष्टींतून आमच्या लॉऱ्या सुटाव्या. गर्दींतून वाट निघेल त्याप्रमाणें कांहीं लॉऱ्या पुढें व कांहीं बऱ्याचशा जपानी तुकड्यांच्या मागें, असें होई. मागील सर्व लॉऱ्या येत आहेत कीं नाहीं, हें बघावयास पुढच्या लॉऱ्यांस रस्त्याच्या कडेला केव्हां केव्हां थांबावें लागे. या गर्दींत कोणतीही लॉरी बिघाडामुळें, अथवा अन्य कांहीं अडचणीमुळें मागें राहूं नये एवढ्याकरतां नेताजींनीं स्वतःची मोटार या सर्व तांड्याच्या मागें ठेवण्यास मोटारहाक्यास सांगितलें होतें. एकादे वेळेस पुढें मार्गांत कांहीं अडचण आल्यामुळें सबंध तांडाच्या तांडा थांबे. पुढें वाटेंत कसली अडचण आहे व ती केव्हां निघेल याची मागच्या लोकांस कांहींच कल्पना होत नसे. अशा वेळीं नेताजी स्वतः आपल्या मोटारींतून उतरून पुढच्या टोंकास जात (वेळप्रसंगीं लॉरीहाक्यास खडसावून) व रस्त्यावरील अडवणुकींतून लवकर मार्ग काढण्याचा प्रयत्न करीत. मार्गांत असलेल्या लहान ओढ्यांवरील किंवा नाल्यांवरील पूल युद्धकालांतील दुर्लक्षामुळें आणि भरमसाट रहदारीमुळें मोडकळीस आले होते. त्यांस भोकें पडलीं होतीं. त्यांत लॉऱ्यांचीं चाकें अडकत असत व त्यामुळें अपघात होण्याचा फार संभव असे.

पहांटे ३ वाजण्याच्या सुमारास आम्ही पेगूला पोंचलों. सबंध पेगू शहराला आग लागलेली होती. जिकडे तिकडे आगीच्या ज्वालांचा लखलखाट झालेला होता. पेगू शहर जळण्याचीं तीन कारणें होतीं. साम्राज्य-सेना पेगू शहराच्या अगदीं जवळ येऊन ठेपल्यामुळें पेगूवर अतोनात हवाई हल्ले होत असत. जपान्यांविरुद्ध उठलेल्या ब्रह्मी सैनिकांनींही जपान्यांस त्रास व्हावा या हेतूनें पुष्कळशा आगी लावलेल्या होत्या व पीछेहाट करणाऱ्या जपानी सैनिकांनींही हालवितां न येण्यासारखी युद्धसामुग्री इंग्रजांच्या हातीं पडूं नये म्हणून ती आगीच्या स्वाधीन केली होती. कित्येक घरांच्या केवळ भिंती उभ्या असून त्यांचीं छपरें जळून खाक झालीं होतीं व कांहीं जळत होतीं. मला रात्रींच ताप भरला होता. जाग्रण, विश्रांतीचा व औषधांचा अभाव, जंगलांतील अशुद्ध पाणी; अनियमित खाणेंपिणें इत्यादींनीं बँकॉकला पोंचेपर्यंत माझा हिंवताप कायम होता. दुसऱ्या दिवशीं पहांटे ५ वाजतां आम्ही 'यागी' या नांवाच्या खेड्यांत पहिला मुक्काम केला. लॉऱ्या व मोटारी एकेका झाडाखालीं एकमेकांपासून दूर उभ्या करून त्यांवर आम्हीं पानें वगैरेचें आच्छादन घातलें. आजूबाजूच्या ब्रम्ही लोकांच्या झोंपड्यांत जाऊन त्यांच्याशीं मोडक्या तोडक्या ब्रम्ही भाषेंत

बोलून, आम्ही त्यांच्या आवारांत चुली पेटवल्या. प्रत्येक तुकडीनें अथवा मित्रमंडळींच्या गटांनीं आपला स्वयंपाक सुरू केला. भात व मुगाचें वरण हेच मुख्य दोन जिन्नस नेहमीं असत. खेडुतांना पैसे देऊन आम्ही त्यांच्या जवळून तांदूळ व मिळाल्यास दूध आणि भाजी विकत घेत असूं. तांदूळ आमच्याजवळ होते, परंतु प्रवासास किती दिवस लागतील, याचा नेम नसल्या-मुळें आमच्याजवळचा सांठा तसाच ठेवून आम्ही मिळतील तितके तांदूळ विकतच घेत असूं. दिवसभर अनेक वेळां विमानें येऊन गेलीं. त्यांनीं वेळोवेळीं स्फोटगोल टाकले व मशीनगन्सच्या गोळ्यांचा वर्षाव केला. नेता-जीही इतरांप्रमाणें कोठल्यातरी झाडाखालीं अथवा झोपडींत मुक्काम करीत. प्रवासांतसुद्धां सर्वांच्या खाण्यापिण्याच्या व्यवस्थेबद्दलची, पुढच्या मार्गा-बद्दलची व एकंदर कार्याबद्दलची नेताजींची व्यग्रता यत्किंचितही कमी झाली नाहीं. आझाद हिंद बँकेंतील उंची दागिने, जडजवाहिर, सोनें-चांदी इत्यादि सामान आमच्याबरोबर होतें.

मध्यान्हीं एक व सायंकाळीं ६ वाजण्याच्या सुमारास एक, अशीं दोन जेवणें उरकून आम्ही रात्रीच्या प्रवासास निघत असूं. त्याप्रमाणें सायं-काळीं आम्ही तेथून निघालों. मध्यरात्र उलटून गेली; दोन वाजले. आमच्या लॉऱ्या व मोटारगाड्या एकाएकीं एकामागें एक जशाच्या तशा थांबल्या. आमच्यापुढें गाड्यांची एकच रांग लागलेली होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूला विस्तीर्ण सपाट मैदान होतें. पावसामुळें चिखल झालेला होता. दोन्ही बाजूंच्या मैदानापेक्षां रस्ता दोन-तीन फूट उंच होता. समोर नदी होती. नदीवरील पूल बॉम्ब हल्ल्यांमुळें उध्वस्त झालेला होता. आमच्या लॉऱ्यांच्या व मोटारगाड्यांच्या मागें इतर गाड्यांची एकच एक रांग लागली. रस्त्याच्या आजबाजूला, मैदा-नावर लॉऱ्या व मोटारगाड्या अस्ताव्यस्त पडलेल्या होत्या. कांहीं कायमच्या नादुरुस्त झाल्या म्हणून तेथेंच राहिल्या. कांहीं रस्त्यावरून कोलमडून चिखलांत रुतल्या. कांहीं हवाई हल्ल्यांमुळें मोडकळल्या. अशा या गोंधळांतून मार्ग काढीत आम्ही रस्त्यावरून मैदानांत गाड्या उतरविल्या व नदीच्या कांठाशीं आण-ण्याचा प्रयत्न केला. चिखलांत लॉऱ्या रुतून त्यांचीं चाकें तेथल्या तेथें वेगांत फिरूं लागत, तेव्हां सर्वांस खालीं उतरून, वेळप्रसंगीं सामानही उतरवून, लॉऱ्या काढावयास हातभार लावावा लागे.

ती ' वॉव ' नदी होती. शत्रूचे रणगाडे व इतर चिलखती गाड्यांच्या तुकड्या आमच्या पिछाडीस अवघ्या ४० मैलांवर असल्याची बातमी एक जासूद घेऊन आला होता. तास-दीडतासांत शत्रु आम्हांला गांठणें शक्य होतें. लॉऱ्या सामानासकट तेथेंच सोडून आम्ही पलीकडे जाण्याचा निश्चय केला. नदीचा प्रवाह मधोमध फारच वेगवान् होता. पात्राच्या मध्यभागीं नदीची खोली पांच फूट होती. आमच्यापैकीं उंच असलेले सैनिक, दोन्ही कांठावर

एक, एक व मधोमध कांहीं अंतरावर दोन-तीन उभे करून, झांशी-राणी पथकांतील मुली उचलून घेऊन एकापासून दुसऱ्याकडे देत पार करण्यांत आल्या. इकडे निरनिराळे जपानी सैनिकसुद्धां आपापल्यापरी नदी पार करीत होते. अंगावरील चड्डीशिवाय इतर कपडे काढून आम्हीं डोक्यावर घेतले. हिंवतापामुळें मी कुडकुडतच होतों. कित्येकजण अंगावर कपडे तसेच ठेवून पार झाले. मी कपडे डोक्यावर घेऊन पलीकडे आलों. प्रवाहाच्या मध्यभागीं पाण्याच्या जोरदार प्रवाहामुळें व तापामुळें आलेल्या अशक्ततेनें पाय ठरत नव्हते. ग्लानी आल्यासारखें वाटत होतें. तरी तसाच निश्चयानें मी पार झालों. पलीकडे गेल्यावर असें मनांत आलें कीं, पूल नसल्यामुळें लॉऱ्या तिकडेच राहतील व आपण अंगावरच्या कपड्यांनिशीं पुढचा सगळा प्रवास कसा करणार? तेवढ्यांत दुसऱ्या एका डॉक्टर आधिकाऱ्याच्या मनांत तोच विचार आला. तो मला म्हणाला, "चला, पलीकडे येता का? आपण आपलें सामान घेऊन येऊं!" आम्ही दोघेही पुन्हा नदी पार करून पलीकडे गेलों. अंधारांत लॉऱ्यांच्या रांगेंत आमच्या लॉऱ्या कोणत्या याच घोटाळ्यांत आम्ही कांहीं वेळ पडलों. लॉऱ्या सांपडल्यावर मी आंत जाऊन माझें सामान बघूं लागलों. तापामुळें मला माझ्या टोपीची व सामानाची शुद्ध नव्हती. माझें सामान इतर सामानांत बरेंच खोल दडलेलें होतें. तें शोधून बाहेर काढण्यांत माझीं २०-२५ मिनिटें मोडलीं. माझ्याबरोबर आलेला अधिकारी आपलें सामान घेऊन केव्हांच पसार झालेला होता. मी त्याला हांका मारीत राहिलों. तो गेला असें पाहून, मी माझी चामड्याची बॅग व पांघरावयाकरतां म्हणून बाहेर ठेवलेली एक पातळ पासोडी डोक्यावर घेऊन पुन्हा निघालों. डोक्यावरील भारामुळें नदीच्या प्रवाहांत एक तर डोक्यावरील पेटी तरी वाहून जाणार किंवा ती जर न सोडली तर तिच्यासकट मी वाहून जाणार असें मला वाटूं लागलें. इतक्यांत माझ्या मागून दोन-तीन जपानी सैनिक पाण्यांतून एक बैलगाडी हांकीत आणीत होते. मी थोडा थबकलों. बैलगाडी पुढें झाल्यावर मी तींत माझी पेटी ठेवली. खांचखळग्यांच्या धक्क्यानें पेटी नदींत पडूं नये म्हणून पेटीवर उजवा हात ठेवून व बैलगाडीच्या कठड्यावर डावा हात ठेवून बैलगाडीच्या मागोमाग मी चालूं लागलों. तेवढ्यांत पुढें नदीचें पात्र एके ठिकाणीं जास्त खोल होतें. बैलगाडीचीं दोन्हीं चाकें त्यांत गेल्याबरोबर माझी चामड्याची पेटी पाण्यांत बुचकळून निघाली. माझा हात तीवर होता म्हणून ती गाडींतच राहिली. गाडी कांठावर पोंचली, तेव्हां मी माझी पेटी पुन्हां डोक्यावर उचलली व मार्ग चालूं लागलों.

जिकडे तिकडे सैनिकच सैनिक दिसत होते. कोणी तेथें पहाऱ्यावर होते, कोणी पुलाच्या कामावर होते. नंतर माझे कपडे ठेवले होते त्या ठिकाणीं आलों. आमचे इतर लोक कोठेंच दिसेनात. माझी पेटी घेऊन येण्याकरतां म्हणून पलीकडे जाण्याच्या आधीं मी त्यांना पुढें जातांना पाहिलें होतें, परंतु ते कोठें गेले असतील याची मला

कांहींच कल्पना होईना. कसेंबसें आंग कोरडें करून मी माझे कपडे चढविले. चामड्याची बॅग हातांत घेऊन मी चालूं लागलों, पण चालवेना. थंडीनें मी कुडकुडूं लागलों. रस्त्याच्या बाजूला शेजारींच कांहीं झोपड्या होत्या. पहांटे ३॥-४चा सुमार होता. सूर्योदयापर्यंत येथेंच पडून राहावें व चांगलें उजाडल्यावर मग इतरांचा तपास करावा असें मी ठरविलें. मी झोपडीजवळ गेलों. झालेल्या श्रमांमुळें झोपडींत कोणी आहे किंवा काय हें बघण्याचें मला जवळ जवळ भानच उरलें नव्हतें. पावसाची झिमझिम सुरू होती. झोपडीच्या चौथऱ्याचा कांहीं भाग भिंतींच्या बाहेर आलेला होता, तेथेंच मी आडवा झालों. पांघरावयास पातळशी पासोडी घेतली. डोक्यावर वळचणीचा भाग असल्यामुळें मला पाऊस असा लागत नव्हता; परंतु दंव पडल्यासारखे तुषार मात्र अंगावर येत. तशांतच मला दोन-तीन तास झोंप लागली. अंगांत ताप भरल्यामुळें उठूंच नये असें मला वाटे. ऊन अंगावर येऊं लागलें. तेव्हां मी तोंड वगैरे धुण्याकरतां उठलों. इकडे तिकडे पाहातों तों आमच्यापैकीं एक-दोन सैनिक जातांना दिसले; तेव्हां त्या सर्वांनींही आसपासच्या झोपड्यांतच तळ दिल्याचें मला समजून आलें. मी ज्या झोपडीच्या बाहेर निजलों होतों, ती झोपडी आंतून मोकळीच होती. मी आंत सामान थाटलें. पेटी उघडून पाहातों तों पेटींतील सर्व सामान भिजलें होतें व त्यास वासही येऊं लागला होता. मी सर्व कपडे उन्हांत ठिकठिकाणीं वाळत टाकले. प्रातर्विधि उरकतों न उरकतों तोंच, शत्रूंचीं २-३ विमानें घोंघावत येत असतांना दिसलीं. ‘ वाळत घातलेले कपडे आंत घ्या, आंत घ्या ’ म्हणून सर्वांची एकच ओरड सुरू झाली. ज्यांनीं ज्यांनीं कपडे वाळत घातले होते त्यांनीं त्यांनीं ते गोळा करून आपापल्या झोपड्यांत नेले. मीही माझे कपडे झोपडीच्या आंत टांगले. बाहेर इतस्ततः फिरणारे सर्व सैनिक झोपड्यांत किंवा इतर आडोशाला जाऊन बसले. सगळीकडे सामसूम झाली. तेवढा भाग जणूं काय एकदम निर्जन झाल्यासारखा झाला. विमानहल्ला संपल्यावर मी बघतों तों माझ्याच शेजारच्या झोपडींत डॉक्टर महादेव रामचंद्र बाम होते. ते, झांशी-राणी पथकाचे डॉक्टर म्हणून आमच्याबरोबर येत होते. मध्यान्हीं व सायंकाळीं त्यांच्या फौजी नोकरानें भात व मुगाची आमटी शिजविली व ती आम्ही दोघांनीं खाल्ली. मी उतरलों होतों त्या झोपडींत दोन पोतीं तांदूळ होते. त्याची वर्दी आम्ही आमच्या कोठाऱ्यास दिली व सायंकाळीं कूच करतांना आम्हीं एका लॉरींत तीं दोन पोतीं घातलीं. ६ वाजण्याच्या सुमारास, हवाई हल्ल्याची वेळ टळल्यावर आम्हीं सर्व अधिकारी, शिपायांची एक तुकडी घेऊन नदीच्या पलीकडे गेलों. कोसळलेला पूल पाण्यांत सबंध बुडाला नव्हता. त्याच्या कोसळलेल्या भागावर फळ्या वगैरे टाकून इकडून तिकडे पायीं जाणाऱ्यांसाठीं वाट तयार करण्यांत आलेली होती. त्याच्यावरून आम्ही पलीकडे गेलों. आमच्या लॉऱ्यांपैकीं दोन तर मशीनगन्सच्या गोळ्या वगैरे लागून जळाल्या होत्या. उरलेल्या

सहा लॉऱ्या आम्हीं नदीच्या कांठावर आणून एक एक अशा तराफ्यावर चढविल्या. तराफा वल्हविण्याकरतां नावाडी होते. एकेक लॉरी पलीकडे आणण्याकरतां तास तास लागायचा. लॉरी तराफ्यावर चढविणें हें फारच कठीण काम होतें. एक लॉरी तर तराफ्यावर चढवतां चढवतां जी घसरली ती पाण्यांत बुडून चिखलांत रुतून बसली. ती तशी तेथेंच सोडावी लागली. उरलेल्या चार लॉऱ्या व पांच मोटारी रात्रीं ११ वाजेपर्यंत पार येऊं शकल्या. यानंतर आठ लॉऱ्यांच्या ऐवजीं पांच लॉऱ्यांतच काम भागविणें भाग होतें, म्हणून नेहमींप्रमाणें सर्व मंडळी चार-पांच तुकड्यांत विभागण्यांत आली. प्रत्येक तुकडीच्या बरोबर एकेक प्रमुख अधिकारी देण्यांत आला. झांशी-राणी पथकाच्या मुलीही या चार तुकड्यांत विभागण्यांत आल्या. येथून ३५-४० मैलांच्या अंतरावर ' सतांग ' नांवाची मोठी नदी होती व त्या नदीपलीकडे त्याच नांवाचें एक गांव होतें. नदीच्या पलीकडील बाजूस लागूनच असलेल्या टेकडीवर स्वातंत्र्यसैन्याचा एक विमानविरोधक तोफखाना होता. तेथें दुसरा मुक्काम करण्याचा आमचा विचार होता.

रात्रीं ११ वाजल्यापासून एक एक तुकडी लॉरींत बसून जाऊं लागली. एका तुकडीला ३०-३५ मैलांवर सोडून, लॉऱ्या परत येत व दुसऱ्या तुकडीला घेऊन जात. ३०-३५ मैलांनंतर दलदल होती. रस्ता नादुरुस्त होता, त्यामुळें थेट सतांग नदीपर्यंत मोटारगाड्या पोंचणें शक्य नव्हतें. जनरल भोसले पहिल्या तुकडीबरोबर गेले. माझें नांव नेताजींच्या तुकडींत होतें. सर्वांची व्यवस्था लागून सर्वजण पुढें गेले अशी खात्री झाल्यावर मग नेताजींनीं जावयाचें ठरविलें असल्यामुळें, आमची पाळी सकाळीं ६ वाजतां चांगलें उजाडल्यावरच आली. दोन तास आमचा प्रवास सुरळीत चालला. रस्त्यांत चिखल झालेलाच होता; परंतु त्यामुळें विशेष व्यत्यय आला नाहीं. त्यानंतर मात्र अनेक अडचणी येऊं लागल्या. वाटेंत एके ठिकाणीं एक नवीन रस्ता तयार करण्याचें काम चाललें होतें. हा रस्ता तयार करण्याकरतां आजूबाजूच्या जमिनीपेक्षां तीन-चार फूट उंच असा मातीचा, गोट्यांचा, मोठमोठ्या दगडांचा व खडीचा थर टाकलेला होता. यावरून मोटारगाड्या जाणें अशक्यच होतें. या रस्त्याच्या मधून मधून जे नाले वाहात होते, त्यांच्यावर पूल तयार करण्यांत आलेले नव्हते. अशा प्रसंगीं या रस्त्याच्या खालून मैदानांतूनच जाणें आवश्यक होतें. वाटेंत एके ठिकाणीं एक लहानसा नाला होता; तेथें इतकी दलदल आणि चिखल झालेला होता कीं, त्यांतून आमची लॉरी पलीकडे जाणें शक्य नव्हतें. आमच्या तुकडीला एकच लॉरी व एकच मोटार होती. वाटेंतील अडीअडचणीमुळें इतर लॉऱ्या परत आल्याच नाहींत. आमच्याबरोबरची ती मोटार आजारी व अशक्त माणसांकरतां राखून ठेवण्यांत आलेली होती. मी आजारी होतों तरी मी त्या मोटारींतील जागा न अडविण्याचा निश्चय केला होता; कारण माझ्याहून अत्यवस्थ अथवा अशक्त लोकांस तिचा जास्त उपयोग होण्यासारखा होता. नेताजीही आमच्याच लॉरींत पुढच्या बाजूला

मोटारहाक्यापाशीं बसले होते. वर उल्लेखिलेल्या दलदलीच्या ठिकाणीं आम्ही सर्वजण उतरलों. त्या कच्च्या रस्त्याच्या कडेला दगडांचे ढीग पडले होते. रामायणांतील वानरसेनेप्रमाणें त्यांतील एक एक दगड उचलून आम्हीं ते त्या दलदलींत टाकले व थोडयाच वेळांत त्या नाल्यापार झालों. पुढें अधिकाधिक अडचणी येऊं लागल्या. ऊन चांगलें पडलें होतें. आम्ही उघडया मैदानांत होतों. विमानें आलीं असतीं तर लपावयाला एकादी झोपडी किंवा झुडूप, कांहींच नव्हतें. सगळीकडे गवत उगवलेलें होतें. आमची लॉरी त्यांतल्यात्यांत चांगली होती. झांशी-राणी पथकाकरतां ज्या तीन लॉऱ्या जपान्यांनीं दिल्या होत्या, त्यांपैकीं ती एक होती. तिच्याबरोबरच एक जपानी हाकया व एक यंत्रतज्ज्ञ होता. ती लॉरी सुटसुटीत अंगाची व चांगली दणकट होती. कित्येक वेळां चाकें चिखलांत रुतून तेथल्या तेथेंच फिरूं लागतात, म्हणून त्या रबरी चाकांवर जाड लोखंडी साखळदंडाचे अधूनमधून ४-५ वेढे दिलेले होते. त्यामुळें ती चिखलांत रुतत नसे. जपान्यांची ही युक्ति खरोखरच फार चांगली होती.

पुढें अधिकाधिक अडचणी येऊं लागल्या, तसतसें आम्ही लॉरींतून उतरून पायीं चालावयास सुरुवात केली. समोर पांच-सहा मैलांवर सतांग नदी दिसूं लागली होती. नेताजी, मी व इतर एक-दोन लोक पुढें चालत असूं. इतर लोक कोणी पुढें व कोणी मागें असे चालले होते. पंधरा-वीस मिनिटें अशा रीतीनें चालल्यावर ते दोन जपानी व त्यांच्या मदतीला ठेविलेले आमचे इतर साथीदार आटोकाट प्रयत्न करून, लॉरी काढून आमच्यापर्यंत आणीत व तींत बसून आम्ही थोडें अंतर जात असूं. पुन्हा उतरून आम्हांला सर्वांस ती लॉरी ढकलावी लागे अथवा दगड, लाकडें, इत्यादि शोधून आणून लॉरीच्या खालीं घालावीं लागत. इतक्यांत विमानें येत व लॉरीपासून दूर, एवढासा कां होईना परंतु कांहींतरी आडोसा शोधून जमिनीवर पालथें पडावें लागे. नदी जरी पांच-सहा मैलांवरच होती तरी रस्ता नसल्यामुळें आम्ही भाताच्या शेतांतून नागमोडी वळणें घेऊन जरा कोरडी किंवा टणक जमीन शोधीत नदीच्या समांतर रेषेंतच वाट क्रमीत होतों. मी पूर्वीं त्या वाटेनें आलेलों असल्यामुळें, माझें व नेताजींचें त्या प्रदेशाबद्दल बोलणें चाललें होतें. नदी पार करण्याची काय सोय आहे ? नदीच्या पलीकडे आमच्या विमानविरोधक तुकडीची छावणी किती दूर आहे ? नदी केव्हां पार करावी ? वगैरे आमचें बोलणें चाललें होतें.

चालण्याच्या व केव्हां केव्हां लॉरी ढकलण्याच्या श्रमांमुळें आम्ही सर्वजण घामाघूम झालेलों होतों. लॉरींतून उतरून पायीं चालण्याच्या वेळेस आम्ही त्यांतील सोन्या-चांदीनें व रत्नांनीं भरलेल्या तीन पेट्या बरोबर घेत असूं. त्यांतील एक तर फारच जड असून दोघांनीं उचलून एकाच्या डोक्यावर चढवावी लागे. नदीपासून दोन मैलांवर आलों तेव्हां नेताजी, मी व आणखी दोघेजण लॉरीची वाट पाहात एका वृक्षाखालीं बसलों. आमच्या भोंवतीं

भोंवतीं सर्व बाजूस भाताचीं शेतें होतीं. जुन्या पिकाचे वाढलेले लहान लहान खुंट सर्वत्र दृष्टीस पडत होते. थोड्या वेळानें लॉरी आली. तींत बसून आम्ही एका लहान खेड्याच्या रोखानें जाण्यास सुरुवात केली. या खेड्यापासून दोन फर्लांगपयत सतांग नदीचें विस्तीर्ण पात्र होतें. या नदीवरचा भरभक्कम पूल हवाई हल्ल्यानें केव्हांच कोसळला होता. या पुलावरूनच पूर्वी आगगाड्यांची व इतर वाहतूक चालत असे. या पुलाच्या रोखानें जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला, वेळू, गवत इत्यादि सांठविण्याकरतां एक उंच छत असलेली झोपडी व एक आडोसा तयार करण्यांत आलेला होता. यांत आम्ही आमची लॉरी उभी केली व जरूर तें सामान ( कपडे, डाळ, तांदूळ, मसाला इ० ) घेऊन रस्त्याच्या पलीकडे जवळच असलेल्या खेड्यांत आम्हीं प्रवेश केला. तेथें समोरच १५-२० झोपड्या होत्या. कांहीं झोपड्यांत जपानी सैनिकांनीं येऊन तळ दिलेला होता. आम्हीही एका झोपडींत तळ दिला. झांशी-राणी पथकाच्या तीन मुली, आम्ही चार-पांच अधिकारी, दोन जपानी व नेताजी एवढीच मंडळी या झोपडींत होतों.

वाटेंत, येतांना ज्या ठिकाणीं एका नाल्याच्या पार होण्याकरतां आम्ही दगड टाकून रस्ता तयार केला, त्या ठिकाणीं एक अत्यंत कृश झालेला, मळके, फाटके, खाकी कपडे घातलेला जपानी सैनिक एका पानावर भात घेऊन खात बसलेला होता. त्याच्या सर्वांगावर फोड उठले होते. तशा त्या स्थितींत त्याची बंदुक वगैरे सामानही दरोडेखोरांनीं पळविलें होतें. पीछेहाट करणाऱ्या एका जपानी तुकडीबरोबर तो जात असतांना, अशा असाहाय्य स्थितींत तो या ठिकाणीं मागें राहिला होता. त्याच्या शुश्रुषेची व खाण्यापिण्याची कांहीं सोय नव्हती. जाणाऱ्या येणाऱ्यांसच दया येऊन त्यांनीं कांहीं तयार खाद्य दिलें तर त्याचा निर्वाह व्हावयाचा; परंतु तशाही स्थितींत शरिरांत प्राण असेपर्यंत आपल्या दोन हातांनीं व कृश आणि जर्जर शरिरानें रस्ता तयार करण्याचें जेवढें काम त्याच्याकडून होण्यासारखें होतें, तेवढें तो करीत असे ! इतकी असाहाय्य स्थिति झालेली असतांनासुद्धां त्यानें कोणाजवळही तोंड वेंगाडलें नाहीं किंवा देशकार्य करण्याचेंही सोडलें नाहीं ! आपल्या कार्याला, आपल्या राष्ट्राला किंवा संवगड्यांना दोष देत तो बसला नाहीं ! इंग्रज-अमेरिकन आदि पाश्चात्त्य राष्ट्रांच्या टपालखात्याचें व वैद्यकखात्याचें जें अवास्तव स्तोम माजविलेलें असतें, तसें जपानी सैन्यांत नसतें. उलट या दोन खात्यांना, जवळ जवळ काटच मारलेला असतो. जपान्यांची एकसुद्धां अँम्बुलन्स आमच्या पाहण्यांत कधीं आली नाहीं. पीछेहाट करणाऱ्या तुकड्यांबरोबर खाकेखालीं कुबड्या घेऊन त्यांच्या आधारावर लंगडत लंगडत चाललेले, हातापायांस, डोक्यांस गंभीर स्वरूपाच्या जखमा झालेले कित्येक सैनिक अन्नपाण्याची व शुश्रुषेची कांहीं एक व्यवस्था नसतांना धिम्मे धिम्मे चालले होते.

त्यांना कांहींच वाहन नव्हतें व कसल्याही प्रकारची सोय नव्हती. तशा स्थितींतही त्यांची शिस्त कायम होती. येणाऱ्या जाणाऱ्या अधिकाऱ्यांस सलाम करण्यास ते चुकत नसत. कसल्याही प्रकारची कुरकूर, चडफड, भांडणें, मारामाऱ्या, शिव्यागाळी अथवा अन्य प्रकारचें गैरशिस्त वर्तन त्यांनीं कधींच केलें नाहीं ! अमक्या एका ठिकाणापर्यंत पोंचण्याचें उद्दिष्ट साध्य होणार नसलें, तरी प्राण असेपर्यंत त्या रोखानें आपलें कर्तव्य पूर्णपणें बजावावयाचें व शेवटीं नाइलाजच झाला म्हणजे आनंदानें प्राण सोडावयाचा, अशा प्रकारचें शिस्तपालन जपान्यांनीं अगदीं पराकोटीला पोंचविलें होतें. हिंदी लोकांनीं हा गुण त्यांच्यापासून उचलण्यासारखा आहे. जो फौजेंत शिरला त्यानें सतींचें वाण घ्यावयाचें, कसल्याही मदतीची अपेक्षा करावयाची नाहीं हें त्यांच्या हाडींमांसीं खिळलेलें असे.

सतांग नदीच्या अलीकडच्या झोपडींत आल्याबरोबर थोडी विश्रांति घेऊन प्रत्येकजण प्रातर्विधि, स्नानादि उद्योगाला लागला. तेथें कांहीं विहिरी होत्या, त्यांवर कांहींनीं स्नान सुरू केलें. हिंवतापाच्या आजारानें घाम येऊन कपडे घाण झाल्यामुळें व निघाल्यापासून स्नानही न झाल्यामुळें नदींत मनमुराद पोहावें या उद्देशानें मी निघालों. माझ्याबरोबर प्रथम एक-दोघेजण 'येणार येणार' म्हणत होते, परंतु त्यांनींही इतकें लांब जाण्याचा कंटाळा केला व मीसुद्धां नदीवर न जातां तेथेंच विहिरीवर स्नान करावें असें ते म्हणूं लागले. पोहण्याची फार हौस व कपडे धुण्यास हवें असलेलें मुबलक पाणी अशा दोन्ही कारणांमुळें मी नदीवर जाण्याचाच बेत कायम केला. आमच्या झोपडीच्या मागें नदीचें विस्तीर्ण पात्र होतें. मध्यान्हीची वेळ होती. मी वाट चालूं लागलों. सगळीकडे मोकळें मैदान होतें. पण वाटेंत चिखल, गटाराचा गाळ अशा अनपेक्षित अडचणी येऊं लागल्या. नदीचें पात्र वाटलें तितकें जवळ नव्हतें. नदीच्या जितकें जवळ जावें तितकी जमीन जास्त ओली, भुसभुशीत, चिखलाची अशी होऊं लागली. मी चिखलांत असतांनाच एकदम दोन विमानें घोंघावत येऊन वर घिरट्या घालूं लागलीं. तशा त्या चिखलांत कपडे टाकावयाची किंवा जमिनीवर आडवे पडण्याची मुळींच सोय नव्हती. नदीच्या पलीकडे टेकाडांवर असलेल्या आमच्या विमानविरोधक तोफांच्या तुकडीवरच त्या दोन विमानांचा मुख्य रोख होता. त्या स्थानाजवळ येतांच घोंघावत वेगानें खालीं झेंप घ्यावयाची व स्फोटगोल आणि मशीनगन्सच्या गोळ्यांचा मारा करीत पुढें निघून जावयाचें, पुन्हा एक चक्कर घेऊन पुन्हा त्या स्थानावर येऊन मारा करावयाचा, असा दारूगोळा संपेपर्यंत त्यांचा क्रम चालला होता. आकाशांत एकाच ठिकाणावर स्थिर राहणें अजून विमानांस शक्य नसल्यामुळें त्यांस दर वेळेस चक्कर मारून पुन्हा त्या ठिकाणावर यावें लागे. त्यांच्या चक्राच्या घेरांत मी येत होतों. या वेळेस कोणत्या जागेचा आश्रय करणें योग्य होईल म्हणून मी सभोंवार नजर टाकली. माझ्या मागें सुमारें ५० गजांवर एक मोठा ओढा

पडलेला होता. नदीपासून लांब का होईना, परंतु कपडे ठेवावयालाही तीच जागा योग्य म्हणून मीं त्या ठिकाणीं गेलों. विमानें अगदीं डोक्यावर आलीं होतीं. मी त्या ओढ्याच्या खालच्या खांचेंत जमिनीलगत ताठ पालथा निजलों. कपडे त्या ओढ्यावर न ठेवतां खालीं ठेवले. सुमारें अर्ध्या तासानें विमानें गेलीं. मी पुन्हा नदीवर गेलों व या प्रकरणाची पुनरावृत्ति नको म्हणून शक्य तितक्या लवकर स्नान आटोपण्याचा निश्चय केला.

पात्राच्या मधोमध पाणी स्वच्छ हिरवें दिसत होतें; परंतु तीराच्या बाजूला पाणी गढूळ होतें. पाण्याला ओढही भलतीच होती. पात्र विस्तीर्ण असल्यामुळें पात्राच्या मध्यभागीं जाणें इष्ट नव्हतें. शिवाय पाण्यांत पदार्पण केल्यापासून पाण्यांतील लहान लहान जंतू अथवा जळवांसारखे लहान मासे पायाला सारखे चावूं लागले. पाण्यांत उभें राहाणेंही अशक्य झालें. तेवढ्यांत लहान सापासारखा एक कांटेरी प्राणी 'डुबुक्' करीत माझ्याजवळून कोलांटी खात गेला. हें प्रकरण कांहीं वेगळेंच दिसतें असा विचार मनांत येऊन मी तसाच तेथून निघालों. हिंदुस्थानांतील नद्यांप्रमाणें मात्र ब्रह्मदेशांतील नद्यांची मजा नाहीं, हें मला त्या दिवशीं कळून आलें. नदीच्या मार्गे आमच्या झोपडीच्या वाटेवर नदीपासून सुमारें १००-१५० गजांवर नदीच्या पात्रास समांतर असा स्वच्छ पाण्याचा एक प्रवाह होता. बहुतेक नदीचाच तो एक फाटा असावा. त्याच्याखालीं धड ना रेती व धड ना माती अशा अर्धवट स्थितींतील गाळ होता. त्यांत पाऊलभरच पाणी होतें. त्यांत पाऊल टाकतों तों पुन्हा त्यांतही जळवांसारखे बारीक मासे चावूं लागले. शेवटीं मी पाण्यांतून पाय काढला. तेथेंच कांठाशीं दोन होड्या पडलेल्या होत्या, त्यांवर मी कपडे ठेवले व आतां तांब्यानें स्नान करूं लागणार, इतक्यांत...कड्ड्ड्...ठक्क ठक्क...ठक्क ट्ट्ट्...इत्यादि ध्वनी सुरू झाले! आमच्या मागच्या बाजूस सुमारें ४-५ मैलांवर विमानें हल्ला करीत होतीं. थोड्या वेळानें तींच विमानें आम्ही तळ दिला होता त्या खेड्यावर येऊन, झेंप घेऊन चौफेर गोळ्या झाडून गेलीं. माझ्या मनांत विचार आला, "आमच्यापैकीं कोणी जखमी तर झालें नसेलना?" त्या भागीं पीछेहाट करणाऱ्या निरनिराळ्या तुकड्यांतील सैनिकांची एवढी वस्ती होती, परंतु दिवसा शत्रूचीं विमानें येत म्हणून सर्वजण झोपड्यांत किंवा झाडाखालीं बसून असत. त्या वेळीं तो प्रदेश निर्जन असल्यासारखा होऊन एवढीशीही हालचाल तेथें दिसत नसे. जणूं काय त्या प्रदेशांतील सर्व सृष्टि एकदम स्तब्ध होई. विमानें गेलीं कीं खेड्यांतल्या खेड्यांत, स्वयंपाक करणें अथवा आन्हिक आटोपणें एवढ्याकरतां हालचाली होतील तेवढ्याच; इतर सगळे लोक रात्रीच्या प्रवासाकरतां किंवा इतर कार्याकरतां, दिवसभर स्वस्थ विश्रांति घेत पडून राहात. मी स्नान करून व कपडे धुवून परत आलों. नेताजी वामकुक्षी करून नुकतेच उठले होते. आमच्या बरोबरच्या तिघां मुलींनीं भात, भाजी,

मुगाचें वरण व कैऱ्यांची चटणी केली होती. लहान लहान ताटल्यांत या तिन्ही-चारी वस्तू एकावर एक वाढून प्रत्येकास देण्यांत आल्या.

नेताजींच्या पुढ्यांत त्यांची ताटली एका मुलीनें आणून ठेवली. त्या तिघींस व पर्यायानें आम्हां सर्वांस उद्देशून नेताजी हंसत म्हणाले, " मुलींनीं यापुढें चुलीपुढें आयुष्य काढूं नये असा मी प्रयत्न करीत आहें, तरी शेवटीं स्वयंपाक यांच्या बोकांडीं बसतोच म्हणावयाचा ! " दुपारचें व सायंकाळचें मिळून आम्ही दुपारीं ३ वाजतां एकदांच जेवलों. सूर्यास्त झाल्याबरोबर जिकडे तिकडे सैनिकच सैनिक दिसूं लागले. नदीच्या पार जाण्याकरतां एकच मोटारबोट होती. या मोटारबोटीस एक मोठा तराफा जाड दोरानें बांधून त्यांतून हजारों सैनिकांना पलीकडे वाहून नेलें जात असे. याच्यावर लॉऱ्या चढवून पलीकडे नेतां येत असत. मेळ्यासारखी जिकडे तिकडे एकच गर्दी झालेली होती. आम्ही उतरलों त्या खेड्याच्या मागें दोन मैलांवरील एका खेड्यांत जनरल भोसले, त्यांच्या तुकडीसह उतरले होते, असें त्यांच्या तुकडींतून आलेल्या एका माणसानें आम्हांला येऊन सांगितलें. त्यांच्या व आमच्या तुकडीमध्यें पुढच्या कार्यक्रमाबद्दल जासुदांकरवीं निरोप जाणें येणें सुरू होतें. सतांग नदीच्या पलीकडे साध्या तराफ्यावर मोटारी, लॉऱ्या इत्यादि चढवून पार नेणें शक्य नव्हतें. कारण ही नदी खोल व रुंद तर होतीच, परंतु शिवाय तिच्या पाण्याला ओढही फार होती. सतांग नदीशीं मोटारगाड्यांची व लॉऱ्यांची एकच रांग लागलेली होती. हजारों सैनिकही पार जाण्याकरतां तीरावर इतस्ततः पसरले होते. जनरल इसोडा ( आमच्याबरोबरचे जपानी अधिकारी ) यांनीं आपल्या दुभाष्यास पाठवून तेथील जपानी अधिकाऱ्यांस आमच्या तुकडीला पार करण्याची व्यवस्था करावयास सांगितलें. ती जवळ जवळ सर्व रात्र आम्ही या गडबडींत त्या झोपडींतच काढली. ब्रम्ही सैनिकांनीं हल्ला करूं नये म्हणून आमची लॉरी होती त्या ठिकाणीं पहाऱ्यास एक शिपाई ठेवून त्याच्यावर माझी देखरेख होती. पहाटे ३ वाजतां आम्हाला ' निघावें ' असा निरोप आला. लॉऱ्या येण्याचा कांहींच संभव दिसेना, म्हणून आम्ही आपापलें सामान पाठीवर घेतलें व निघालों. मोटारबोटीच्या धक्क्याचें ठिकाण सुमारें १॥ मैल दूर होतें. त्या मार्गावर सैनिकांची नुसती रीघ लागली होती. वाटेंत अनेक लॉऱ्या व मोटारी उभ्या असून त्यांच्यावर त्या त्या तुकडीचे सैनिक बसले होते. आजूबाजूला पहारेकरी फिरत होते. आम्ही धक्क्यावर पोंचलों, तेव्हां आमच्या ५-२५ मंडळींकरतां थोडी जागा ठेवलेली होती. हजारों सैनिकांनीं तो तराफा भरून गेला होता. आम्ही जाऊन चढल्यावर मोटारबोट निघाली. कांठावर अजून कित्येक सैनिक उभे होते. १५ मिनिटांत आम्ही पार झालों. लगेच आम्ही वाट चालूं लागलों. तेथून सुमारें सात मैलांवर आमच्या विमानविरोधक तोफखान्याच्या तुकडीची छावणी होती. सामान पाठीवर घेऊन पहाटे ४ ते ६ वाजेपर्यंत आम्ही हें अंतर चालून गेलों. सर्वांस थकवा आलेला

होता. ज्या ठिकाणीं आम्ही आलों होतों, तें फारच निसर्गरम्य स्थान होतें. लाल मातीच्या टेकड्या, त्यावर निरनिराळ्या वृक्षांचें व झुडपांचें रान व त्या वृक्षांवर वेलींच्या जाळ्या यामुळें आम्हांस एकाद्या नैसर्गिक मंडपांत आल्याचा भास होत होता. आंत एक मजबूत भिंतीचा बंगला होता. त्याच्यावर मात्र मधोमध उंच व बाजूस निमुळतें असें एक पत्र्याचें छप्पर होतें. याला तीन-चार भल्या-मोठ्या लाकडी खांबांचा आधार होता. या छावणीच्या आवारांत ज्या बाजूनें शिरत असत तेथेंच एक विहीर होती. वर वर्णन केलेल्या बंगल्यांत एका बाजूला त्या छावणीचें कोठारगृह होतें. या बंगल्यास खोल्या नसून एकच मोठा दिवाणखाना होता. याच्या आसपास कांहीं अंतरावर टेकड्यांच्या कडेला एक-दोन झोपड्या होत्या. हवाई हल्ल्यापासून संरक्षण व्हावें म्हणून टेकड्यांच्या कडेस भुयारें खणलेलीं होतीं. यांत आठ-दहा माणसें बसूं शकत. बंगल्यासमोर सपाट असें एक चौकोनी आंगण तयार करण्यांत आलें होतें. नेताजी येत आहेत अशी बातमी पोंचल्यामुळें तुकडीचा मुख्य अधिकारी आपल्या दुय्यम अधिकाऱ्यांसह धक्क्यावर हजर होता. या अंगणांत एक फौजी मेणकापडी जाजम आंथरलें होतें. नेताजी त्यावर येऊन बसले. त्यांच्याबरोबर चालत आलेले आम्ही ५-२५ लोकही त्या जाजमावर त्यांच्या आसपास बसलों. आमच्या सामानाचाच आम्ही तक्क्या केला. झुंजुमुंजू दिसूं लागलें होतें. दंव पडत होतें. त्या तुकडीच्या मुख्य अधिकाऱ्याशीं व त्याच्या सहकाऱ्यांशीं नेताजींचा विचारविनिमय चालू होता. आसपास बसलेले, चालून आलेले लोक —कोणी डुलक्यां देऊं लागले होते, तर कोणी पार ताणून दिली होती—निद्रेच्या अनेक अवस्थांत होते. तुकडीच्या एकंदर समाचाराबद्दल नेताजींचें व त्या अधिकाऱ्यांचें तास-दोन तास बोलणें झालें. त्या तुकडीचे बरेच लोक हिंवतापानें नेहमीं आजारी पडत. त्यांस कोयनेलचा पुरवठा जवळ जवळ होतच नसे म्हटलें तरी चालेल. त्यांच्यावर दोन-तीन भयानक विमान हल्ले झाले नाहींत असा एकही दिवस सहसा जात नसे.

चांगलें उजाडलें. त्यांच्या वाटाघाटी संपल्या. नेताजींनीं व त्या अधिकाऱ्यांनीं आलेल्या सर्व मंडळींस झाडाखालीं अथवा एकाद्या झोपडींत प्रत्येकानें आपलें बस्तान बसवावें असें सांगितलें. भुयारानजीकच्या एका झोपडींत नेताजींची व्यवस्था करण्यांत आली. बाकीच्यांनीं आसपास झाडांखालीं किंवा झोपड्यांत तळ दिला. मी समोरील मोठ्या दिवाणखान्यांत जाऊन माझी पथारी पसरली. माझें सामान म्हणजे एक फौजी मेणकापड, एक पासोडी, २-४ कपडे व महत्त्वाच्या सरकारी कागदपत्रांचें एक पुडकें, एवढें होतें. पथारी पसरल्यावर मी प्रातर्विधि उरकून आलों. खालच्या विहिरीवर उघडे जपानी, तांदूळ धुण्यांत गुंतले होते. त्या सैनिकांनीं तेथें चिक्कार गर्दी उडवून दिलेली होती. माझ्या मनांत सहज विचार आला, “ एकाद्या टेहळणी करणाऱ्या विमानानें सैनिकांचा येथें एवढा तांडा

बघितला, तर दुपारीं ते हमखास या ठिकाणावर हल्ला करतील." ८ वाजण्याच्या सुमारास मी पथारीवर पसरलों. झोंप येतच नव्हती, परंतु विश्रांतीची जरूर होती. सुमारें तीन तास मी तसा पडून होतों. अधूनमधून त्या तुकडींतील एक-दोन सैनिक आंत येऊन तांदूळ, तेल, साखर इत्यादि घेऊन जात. ११ वाजतां मी उठलों. मला विशेष भूक नव्हतीच, परंतु प्रवासांतील श्रमास आधार म्हणून कसेबसे चार घांस खावे असा मी निश्चय केला. हिंदी स्वातंत्र्य-सरकाराच्या दरबारीं असलेले जपानी वकील श्री. हाचिया हेही त्याच आवारांत उतरले होते. त्यांच्या सन्मानार्थ त्या दिवशीं खेड्यांतून मिळेल तसें दूध मागवून व तोफखाना तुकडीच्या कोठारांतील साखर घेऊन भाताची खीर करण्यांत आली होती. थोडी खीर खाऊन मी माझ्या पथारीकडे जातां जातां मनांत विचार केला कीं, आतां दुपारभर विश्रांति घेऊन, सायंकाळच्या प्रवासाकरतां तयार व्हावें; परंतु तेथें येऊन पाहतों तों एक तरुण पोरगेलासा अधिकारी माझ्या पथारीवर येऊन पहुडला होता. मला बघून तो म्हणाला, "ओकसाहेब, मला माफ करा हं! मी तुमच्या पथारीवर पडलोंय् म्हणून!" मी त्यास म्हटलें, "कांहीं हरकत नाहीं. तुमच्या बाजूला पथारीच्या कडेला असलेल्या थोड्याशा जागेंत मी पडतों. त्याच्या खांद्याला खांदा लावून मी पुलीकडच्या अरुंद जागेवर कसेंबसें आंग टेंकलें. माझ्या पथारीवर येऊन निजलेल्या अधिकाऱ्याच्या एका बाजूला मी व दुसऱ्या बाजूस स्वतःची पथारी पसरून श्री. समशेरसिंग पहुडले होते. या दोघांच्या आपापसांत कांहींतरी गप्पा चालल्या होत्या. त्या दिवाणखान्याच्या एका कोपऱ्यांत फळीचा एक पलंग होता. त्यावर श्री. थिवी निजले होते.

दुपारीं १॥ चा सुमार झाला. विमानांची घरघर ऐकूं येऊं लागली. आम्हांला कल्पना नसतां एकाएकीं आम्ही निजलों होतों त्या दिवाणखान्याच्या छतावरून विमानें जोरांत झेंप घेऊन, चौफेर मशीनगन्सच्या गोळ्यांचा व स्फोट गोलांचा वर्षाव करूं लागलीं. हातांत घेऊन फेकावयाचे लहान स्फोटगोल विमानांतून येत होते. झेंप घेत तीं विमानें अगदीं छपराजवळ येऊन घोंघावत पलीकडे निघून जात, तेव्हां त्यांचा तो कर्णभेदक सूर यमाची ललकारी असल्याचाच भास होई. विमानांचे पंखे वेगांत भ्रमण करीत छताच्या अगदीं जवळून जात त्या वेळेस आमच्या दिवाणखान्याच्या छतावरील पत्रे त्या कृत्रिम झंझावातानें धड् धड् धड् धड् हालूं लागत. सभोंवार स्फोटगोल फुटून फाड्...फाड्...कडाड् ...कडाड् असे ध्वनी होऊं लागले. दर स्फोटागणीक जमिनीच्या हादऱ्यानं आमच्या दिवाणखान्याचा डोलारा हालूं लागे. भिंतींतील विटा, चुन्याचे तुकडे, खांबांच्या झिलप्या, सांदीकोंपऱ्यांतील कचरा इत्यादि सर्व आमच्या अंगावर पडत होते. अशाच एका धक्क्यानें त्या भल्या मोठ्या खांबासकट तें छप्पर आमच्या डोक्यावर कोसळणार अशीं चिन्हें आम्हांला दिसूं लागलीं. आंत पडल्या पडल्या भयभीत अंतःकरणानें आम्ही ते सर्व सूर आणि ध्वनी ऐकत होतों. माझ्या

शेजारीं गप्पा मारीत पडलेल्या गृहस्थांच्या गप्पा थांबल्या होत्या व आमचें सर्वांचें लक्ष आढ्याकडे लागलें होतें. एक विमान घोंघावत, भरारी मारीत, चौफेर हल्ला करीत पुढें निघून जावयाचें; त्याच्या मागोमाग दुसरें यावयाचें व तेंही तसेंच मशीनगनच्या गोळ्यांचा व स्फोटगोळांचा वर्षाव करीत पुढें निघून जावयाचें. विमानहल्ला सुरू होतांच आमच्या दिवाणखान्यांतून एक-दोघेजण बाहेर निघून गेले. आम्हांलाही तेथून बाहेर पडून भुयारांत निघून जाण्याचा, बाहेर पडवींत बसलेल्या कांहीं लोकांनीं सल्ला दिला. परंतु विमानहल्ला एकदां सुरू झाल्यावर धांवपळ करणें मूर्खपणाचें होतें. त्या आवारांत धांवपळ झालेली वैमानिकांच्या नजरेस आली असती तर तेथें सैनिक आहेत असें त्यांच्या सहज लक्षांत आलें असतें. एक-दोघांच्या घाबरगुंडीमुळें व धांवपळीमुळें सर्वांचे जीव धोक्यांत पडतात. त्यापेक्षां एकाद्या व्यक्तीचें नुकसान झालें तरी हरकत नाहीं, परंतु आतां हालचाल करण्यांत अर्थ नाहीं, असें मी माझ्या मनाशीं ठरविलें व माझ्या शेजारच्या दोन गृहस्थांसही तसेंच सांगितलें. आम्ही तिघेच तेथें राहिलों. वर छतावर होणाऱ्या आवाजावरून सहा विमानांची ही टोळी आहे, एवढें आम्हांला कळलें. सकाळीं विहिरीवर इकडेतिकडे निष्काळजीपणें संचार करणाऱ्या जपानी सैनिकांमुळें त्यांना सुगावा लागला म्हणून किंवा कसेंही असो परंतु आमच्या छावणीवरच विमानांचा रोख होता हें स्पष्ट दिसत होतें. विमानें भरारी मारून पुढें गेलीं कीं, पुन्हा चक्कर मारून मागच्या बाजूस येऊन दुसरी फेर झडेपर्यंत २॥ मिनिटांचा अवधि जाई.

आमचें नशीब म्हणूनच त्या दिवशीं वैमानिकांजवळ नेहमींचे बॉंबगोळे नसून साधे, हातानें फेकावयाचे मोठ्या आकाराचे स्फोटगोल होते. एवढ्याशा त्या गोळ्यांनींच जर आमचा दिवाणखाना हादरून त्याच्या आंतील बाजूस भिंतीच्या विटा व खांबांचे कपटे पडूं लागले तर त्याच्या शतपट मोठ्या (किंवा संहारक शक्तीच्या) बॉंबगोळ्यानें तर आमचा दिवाणखाना हमखास उध्वस्त झाला असता. तशा परिस्थितींत आम्हां तिघांचा चुराडाच झाला असता. मशीनगनच्या गोळ्याही पत्रे भेदून, आंत आमच्या आसपास पडूं लागल्या. एक विमान आलें. त्यानें झेप घेतली. ट् ट् ट् ट्...फाड् फाड् ...कडाड् कडाड् असा मशीगनच्या गोळ्यांचा व स्फोटगोलांचा आवाज झाला. एकदम आम्हीं पहुडलों होतों त्या जागीं फाड् असा आवाज झाला. आमच्या खालीं जें लाकडी तळ होतें त्यावर निमिषमात्रच एक निळी ज्योत चमकून लुप्त झाली. त्याच वेळेस माझ्या पथारीच्या मध्यभागीं निजलेल्या गृहस्थानें "ओ" असा उद्गार काढीत, एकदम अंतःस्फूर्तीनेंच कीं काय दोन्ही हात आपल्या डाव्या मांडीशीं नेऊन स्वतःची डावी मांडी घट्ट धरली. काय झालें व कसें झालें हें क्षणभर आमच्यापैकीं कोणास कांहींच समजलें नाहीं. ती गोळी इतक्या वेगानें आली कीं, वरून येतांना ती आम्हांला दिसलीच नाहीं. जणूं काय लाकडी तळाच्या खालूनच एक लहा-

नशी निळी ज्योत एकाएकीं वर येऊन चमकली असा मला भास झाला! विमानें पुढें निघून गेल्यावर २॥ मिनिटांचा जेव्हां अवसर मिळाला, त्या वेळेस, माझा साथीदार उठून बसला. मांडीशीं ज्या ठिकाणीं त्यानें हातांनीं घट्ट धरलें होतें, त्या ठिकाणीं त्यानें वांकून पाहिलें. काय झालें आहे याचा त्याला कांहींच बोध झाला नव्हता. त्यानें खाकी अर्धी विजार परिधान केलेली होती. तिच्या डाव्या बाहींत बघतो तों एक मशीनगनची गोळी पडलेली. तेव्हां मात्र त्याला कांहींसा उलगडा झाला. त्याचा धीर थोडासा खचला. जणूं काय एकादा विंचूच अशा ठिकाणीं लपलेला असावा, अशा घाबऱ्या व अधीर आणि थरथरत्या हातांनीं त्यानें ती गोळी चटकन् बाहेर झटकून टाकली. त्याच्या मांडींतून ती गोळी, एका बाजूनें शिरून दुसऱ्या बाजूनें बाहेर आलेली होती. ती इतक्या वेगांत बाहेर आली कीं, ती शिरली त्या वेळेस त्यास कांहींच कल्पना झाली नाहीं. आतां त्या जखमेंतून रक्त स्रवूं लागून त्याला ओलें ओलेंही लागूं लागलें होतें. त्याचा धीर खचलासें दिसूं लागलें. आम्ही श्री. समशेरसिंग यांस डॉक्टर मेनन् यांना बोलावून आणण्यास सांगितलें. श्री. समशेर-सिंग बाहेर गेले. इतक्यांत विमानें परत आलीं व हवाई हल्ला पुन्हां सुरू झाला. आतां दुपारचा सुमार झालेला होता. सायंकाळपर्यंत असें चाललें तर मात्र कठीण आहे असें माझ्या मनांत आलें. या इमारतींत आतां आम्ही दोघेच राहिलों होतों. माझ्या साथीदाराला मी धीर देत होतों. तो अधून मधून "डॉक्टर... डॉक्टर" अशी हांक मारावयाचा. त्यानें ज्या ठिकाणीं मांडी घट्ट धरून ठेवलेली होती, त्या ठिकाणीं त्यानें मला ती घट्ट धरून ठेवण्यास सांगितलें. त्यानें आपले दोन्ही हात काढून घेतले व मी माझ्या हातानें तो भाग घट्ट धरून ठेवला. त्याच्या वेदना दरक्षणीं वाढत होत्या. तरी अजून तीव्र झालेल्या नव्हत्या. परंतु त्यानें कांहींसा ठाव सोडलेला होता. इकडे विमानांचा तो भयंकर हल्ला चालूच होता. त्याची मांडी घट्ट धरून ठेवण्या-करतां म्हणून मी उठून बसलों होतों. आजूबाजूला गोळ्या आंत येऊन पडत होत्या. त्या गृहस्थाला गोळी लागल्यानंतर दीड तासानें हवाई हल्ला थांबला. एकामागून एक भरारी मारीत व दारूगोळा वर्षावित विमानें जीं गेलीं तीं पुन्हा परतून आलींच नाहींत. २॥ मिनिटांचा अवसर निघून गेला, पांच मिनिटें झालीं. विमानें परतून आलींच नाहींत, तेव्हां सर्व लोक बाहेर आले. श्री. समशेरसिंग परत आले. "डॉक्टर कोठें आहेत?" असें त्या जखमी इसमानें त्यांस विचारलें. "तिकडेच चला...तिकडे आहेत" असें म्हणत श्री. समशेरसिंग यांनीं एक हात त्याच्या गुडघ्याखालीं व एक मानेखालीं घालून, तो "अरे......अरे" म्हणत आहे, तेवढ्यांत त्यास उचलून नेलें. टेकड्यांच्या बाजूस असलेल्या एका खोल भुयारांत एक बाक होतें त्यावर त्यांस निजविलें. तेथें डॉक्टर मेनन् यांनीं तशा परिस्थितींत शक्य ते उपचार करून ती जखम बांधली.

माझी पथारी रक्तानें माखली. मांडींतून हाड भेदून बाहेर पडलेली व पुढचें टोंक वांकडें झालेली ती दीड इंची गोळीही त्यावर पडली होती ! हवाई हल्ला झाला त्या वेळीं इतरांस भुयारांत जावयास सांगून नेताजी स्वतः आपल्या झोपडींत बसून काम करण्यांत दंग झालेले होते. इतर कांहीं सहकाऱ्यांनीं त्यांसही भुयारांत चलण्याची विनंति केली, तेव्हां ते म्हणाले, " तुम्ही कांहीं काळजी करूं नका; मला मारूं शकणाऱ्या विमानाचा शोध इंग्रज व अमेरिकन या दोघांसही लागलेला नाहीं ! " सहकाऱ्यांच्या आग्रहास्तव थोड्या वेळानें नेताजी भुयारांत जाऊन बसले. हवाई हल्ला थांबल्यावर त्यांनीं जातीनें सर्वांची चौकशी केली. आमच्या छावणींत त्या हवाई हल्ल्यांत एकच ( माझ्या शेजारीं निजलेला ) मनुष्य जखमी झालेला होता. प्रवासाच्या अडीअडचणींमुळें ती जखम दिवसें-दिवस बरी होण्याच्या ऐवजीं जास्त चिघळत चालली. त्यांत पू झाला. आम्ही आमच्या त्या तरुण साथीदारास कसेंबसें मोलमीनपर्यंत आणलें व नंतर मोलमीनच्या सरकारी दवाखान्यांत ठेवलें. तेथें त्याचा पाय कापावा लागला. तरी बिघडलेलें रक्त कंबरेच्यावर शरिरांत भिनलें होतें व पुढें त्यांतच तो मरण पावला. नेताजी बँकॉक येथें असतांना त्यांनीं तें दुःखद वर्तमान ऐकलें, तेव्हां ते फार हळहळले. मलाही अत्यंत वाईट वाटलें. माझ्या पथारीवर त्यास काळानेंच माझा जीव वांचविण्यासाठीं निजविलें, असें म्हटलें पाहिजे !

हवाई हल्ला थांबला त्या वेळीं दुपारीं ३॥ चा सुमार झालेला होता. आमच्या छावणीच्या पिछाडीस सुमारें एक मैलावर सतांग नदी वळसा घेऊन आलेली होती. तिच्या कांठीं हवाई हल्ल्यापासून बचाव होण्याकरतां उंच उंच टेकड्यांच्या पायथ्याशीं आंतल्या बाजूस ३०-४० माणसें सहज बसूं शकतील अशीं विस्तीर्ण भुयारें होतीं. माझी पासोडी व इतर कपडे रक्तानें माखल्यामुळें मी ते धुऊन वाळत घातले. इकडे नेताजींनीं सर्वांस त्या भुयारांत जावयास सांगितलें. मी कपडे धुऊन आल्यावर त्यांनीं मला प्रश्न केला, " तुम्ही नाहीं गेलांत ? " मी विचारलें " कुठें ? " ते म्हणाले, " येथून सुमारें एका मैलावर खोल आणि विस्तीर्ण भुयारें आहेत, त्या ठिकाणीं सर्वांस मी पाठविलें आहे. " त्यांनीं एका शिपायास माझें मार्गदर्शन करण्यास सांगितलें. त्या भुयारांकडे जातांना वाटेंत ज्या झोपड्या लागल्या, त्यांत जपानी वकील श्री. हाचिया व त्यांच्या सहकऱ्यांचा तळ होता. टेकड्यांवरील वनराजींतून चढ-उतार करीत मी त्या भुयारांशीं जाऊन पोचलों. पुन्हा एक दोन, एक-दोन विमानें येऊन तीं हल्ला करूं लागलीं होतीं. एका उंच टेकडीच्या पायथ्याशीं तें भुयार खोदलें होतें. आंत ३०-४० माणसांस उत्तम प्रकारें बसतां येण्यासारखी जागा होती. मात्र आंत त्या बाजूस उकाडा होत होता. आजूबाजूस दुसरीं एक-दोन लहान मोठीं भुयारें होतीं. मी तेथें जाऊन अर्धा-एक तास झाला असेल नसेल तोंच एक शिपाई धांवत धांवत आला व म्हणाला, " तुम्हांला नेताजींनीं आत्तां बोलाविलें

आहे." मला तर आश्चर्य वाटलेंच, परंतु माझ्याबरोबरच्या इतर मंडळींसही आश्चर्य वाटलें. मी त्या शिपायाबरोबर परत येऊं लागलों, तेव्हां तो म्हणाला, "आत्तां घडलेला एक चमत्कारिक प्रसंग तुम्हांला कळला कीं नाहीं?" मी म्हटलें, "छे...नाहीं बुवा! काय झालें?" तो सांगूं लागला, "साहेब, आत्तां एक जपानी नदी पार करून आला. त्यानें कॉलरचा पांढरा सदरा व एक लांब विजार घातलेली होती. आपल्या तोफखान्याच्या तुकडीच्या तोफा रोंवल्या आहेत त्या ठिकाणीं तो गेला व तेथें पहाऱ्यावर असलेल्या आपल्या सैनिकांस विचारूं लागला, 'नेताजी कोठें आहेत?' घाईघाईत तो हा प्रश्न विचारीत होता. त्याच्या एकंदर हालचालींवरून तो इंग्रज किंवा अमेरिकन हेर असावा, असें आपल्या सैनिकांस वाटलें. ते त्यास पकडूं लागले तों तो इसम त्यांस गुंगारा देऊं लागला. तेव्हां आपल्या सैनिकांनीं त्याच्यामागें धांवत जाऊन त्याच्यावर सारखे तरवारीचे घाव घालण्यास सुरुवात केली. त्याला अनेक ठिकाणीं फारच गंभीर स्वरूपाच्या जखमा झाल्या आहेत. तो मनुष्य जपानीच होता. श्री. हाचिया या जपानी वकिलांच्या मदतनिसांपैकीं तो एक इसम आहे." त्याचें सांगणें पुरें होतें न होतें, तोंच मी पूर्वस्थळीं येऊन पोंचलों. तेथें नेताजी एका झाडाखालीं उभे होते. त्यांच्यासमोर एका शिबिकेवर तो जखमी जपानी इसम बसला होता. अनेक ठिकाणीं त्याला घाव बसले होते. त्याचीं बोटें नुसतीं ठेचल्यासारखीं झालीं होतीं. शरिराचा कोणता ना कोणता तरी भाग दुखविल्याशिवाय त्याचे कपडे काढणेंही अशक्य झालें होतें! तशाही स्थितींत तो नेताजींशीं किती शांतपणें बोलत होता! डॉक्टर मेनन् त्यास उपचार करूं लागले, तेव्हां तो त्यांस म्हणाला, "कृपा करून अफूचा अर्क माझ्या अंगांत टोंचून मला मारून टाका. मला आतां जगण्याची इच्छा नाहीं व मी जगणेंही शक्य नाहीं. मला इतक्या ठिकाणीं जखमा झालेल्या आहेत कीं, मी खडखडीत बरा होणें अशक्य आहे..." नेताजींनीं या प्रकरणाची योग्य ती चवकशी केली. चवकशी चालू असेपर्यंत वार करणारे दोघे इसम स्वातंत्र्यसैन्याच्या फौजी पोलीसांच्या अटकेंत होते. चौकशीअंतीं असें दिसून आलें कीं, त्या दोघां शिपायांचा गैरसमज झाला. त्यास मारण्यांत त्यांचा कोणत्याही प्रकारचा वाईट हेतु नव्हता. म्हणून त्या दोघांस सोडून देण्यांत आलें. अज्ञानामुळेंच त्यांचा गैरसमज झाला. वास्तविक कोठल्याही सुशिक्षित माणसास तो जपानी इसम इंग्रज किंवा अमेरिकन लोकांच्या सारखा दिसला नसता. ते दिवस मात्र असे होते कीं, प्रसिद्ध व्यक्तींच्या हालचालीं-बद्दल कोणी नवखा माणूस तपास करूं लागला कीं त्याचा संशय यावयाचाच!

तें प्रकरण तेवढ्यापुरतें निकालांत निघाल्यानंतर नेताजी माझ्याकडे वळून म्हणाले, "आज रात्रीं झांशी-राणी पथकाची एक तुकडी नदी पार करून या बाजूस येणार आहे. सुमोरें २ वाजतां ती या बाजूला पोंचेल. या मुक्कामीं आपणास कदाचित् दोन-तीन दिवस राहावें लागेल. परंतु आजच्या

हल्ल्यावरून हा तळ सुरक्षित दिसत नाहीं. येथें सर्वांस राहाणेंही शक्य नाहीं. येथें दोन-तीन दिवस जर राहावें लागलें तर त्या मुलींची राहण्याची सोय व्हावयास पाहिजे. येथून सुमारें सहा मैलांवर एक खेडें आहे. तेथील स्वातंत्र्यसंघाचे चालक येथें आलेच आहेत..." असें म्हणत नेताजींनीं त्यांची व माझी ओळख करून दिली. नंतर ते मला उद्देशून पुढें म्हणाले, " तुम्ही आणि लेफ्टनंट डे, दोघेही यांच्याबरोबर जा. लेफ्टनंट डे यांस मी त्या पथकाच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करावयास सांगितली आहे. तुम्ही मात्र तेथें जाऊन त्या गांवाच्या आसपास एकादें सुरक्षित आणि योग्य स्थळ शोधून त्या ठिकाणीं त्या पथकास राहाण्यापुरती एक बराक, न्हाणीघर, शौचकूप, स्वयंपाकघर इत्यादि रात्रीं २ वाजेपर्यंत तयार करून ठेवा. ती त्यांची छावणी तेथें असेपर्यंत त्या छावणीचे मुख्य अधिकारी या नात्यानें सर्व अधिकार मी तुमच्याकडे देत आहें. आज रात्रीचें त्या तुकडीचें जेवण आम्ही येथें तयार करून रात्रीं २-२॥ वाजेपर्यंत तेथें पाठविण्याची व्यवस्था करूं. उद्यां मध्यान्हीच्या वेळेपासूनची त्यांच्या जेवणखाण्याची व्यवस्था तुम्हीच करावयाची आहे. त्या कामाकरतां लेफ्टनंट डे यांस मी तुमच्या हाताखालीं देत आहें. बराकी वगैरे बांधण्याकरतां तट्ट्या, खिळे, कुदळी, फावडीं वगैरे सामान ह्या संघचालकांकडून तुम्हांला मिळेल व तेथें जवळच आपल्या शरीररक्षक तुकडीचा तळ आहे त्यांच्यांतील जरूर तेवढीं माणसें, तयार होणाऱ्या छावणीभोंवतालच्या पहाऱ्याकरतां व बराकी इत्यादि उभारण्याकरतां घ्या. " एवढें झाल्यावर मी, ते त्या खेड्याचे संघचालक आणि लेफ्टनंट डे असे तिघे निघालों. मी व डे अशा दोघांनींही आपापलीं गाठोडीं डोक्यावर घेतलीं होतीं.

आदल्या रात्रीचें जागरण, पहांटे नदीपासून छावणीपर्यंत मारलेली मजल, दुपारभरच्या हवाई हल्ल्यामुळें विश्रांतीचा अभाव, कपडे धुणें वगैरे गोष्टींमुळें मी फारच थकलों होतों. तरी नेताजींनीं सांगितलेल्या कामगिरीवर निघण्यांत मला आनंदच वाटत होता. वाटेंत जो जपानी भेटेल त्याच्याशीं ते संघचालक चार-दोन मिनिटें तरी गप्पा मारीत हटकून उभे राहात. या प्रदेशांतील जपानी अधिकाऱ्यांत आपलें किती वजन आहे, ब्रम्ही लोकांवर आपला कसा दरारा आहे ह्याचें वर्णन त्या सद्गृहस्थांनीं एकसारखें सुरू ठेवलें व जणूं काय आपल्या विधानांची सत्यता पटवावयास ते समोरून येणाऱ्या प्रत्येक गृहस्थाशीं बोलत उभे राहात. मी व डे दोघेही अगदीं कंटाळून गेलों. बोचकीं डोक्यावर घेऊन ताटकळत उभे राहात, जागरणें सहन करून विश्रांतीशिवाय मजलावर मजला मारून, आमच्या शरिरास काय वेदना होत असतील, याची त्या बिचाऱ्यांस काय कल्पना ! आम्ही मनांत त्यांच्याविरुद्ध फार जळफळलों, परंतु करतां काय त्याच्याकडूनच आम्हांला बरेंचसें काम करून घ्यावयाचें होतें. म्हणून आम्ही त्यांच्याच कलानें घेण्याचें ठरविलें. माझ्यापुढें तर मला कामाचा

डोंगरच दिसत होता. नवख्या ठिकाणीं योग्य स्थळ शोधण्यापासून, सामान व माणसें जमविण्यापासून, तों एक सुसज्ज छावणी तयार करण्यापर्यंतचें काम अवघ्या ४-५ तासांत करावयाचें कसें ? हेंच एक मला मोठें कोडें पडलें होतें. आणि हें कामसुद्धां अगदीं नेमकें अशा दिवशीं अंगावर आलेलें होतें कीं, ज्या दिवशीं मला थकवा फारच जाणवत होता. तरी, काम होत नाहीं असें म्हणणें लाजिरवाणें होतें. त्या गृहस्थाचें खेडें जसजसें जवळ येऊं लागलें, तसतसा त्याच्या ओळखीच्या लोकांशीं बोलण्यासाठीं तो पंधरा-पंधरा, वीस-वीस मिनिटें थबकूं लागला. त्याच्या देवघेवीचे धागेदोरे इतके दूरवर पसरले होते कीं, वाटेंत भेटणाऱ्या प्रत्येक स्त्रीशीं अथवा पुरुषाशीं बोलण्यासारखें त्याजपाशीं कांहीं नि कांहीं होतेंच. सतांग नदीला येऊन मिळणाऱ्या एका लहान नदीवर, एक इतका किडमिडा पूल होता कीं, त्यावरून जातांना सर्कसच करावी लागे ! शेवटीं ८-८॥ चे सुमारास, आम्ही त्याच्या झोपडीवजा घरांत पोंचलों. आजूबाजूला सुतारांच्या किंवा तत्सम इतर खेडेगांवी कामगारांच्या झोपड्या होत्या. त्याच्या घरीं जाऊन बोचकें ठेवून आम्ही खुर्चीवर बसलों, तेव्हां एकदम ताटकळलेल्या शरिरास इतकें बरें वाटलें कीं, येथून आतां मुळींच हालूं नये, असा एक विचार मनांत क्षणमात्रच चमकला. परंतु त्या विचाराला थारा कोण देणार ? आम्ही पुढच्या तयारीला लागलों. त्याच्याकडे काय काय सामान आहे, याचा जेव्हां आम्ही आढावा घेऊं लागलों, तेव्हां आम्हांला असें दिसून आलें कीं, त्यानें नेताजींजवळ सर्व जय्यत तयारी असल्याबद्दल जेवढ्या गप्पा मारल्या तेवढ्या कांहीं खऱ्या नव्हत्या. जें विचारावें तें, " उद्यां तुम्हांला देण्याची व्यवस्था करीन " असें तो म्हणूं लागला. आम्ही म्हटलें, " उद्यां दिवसा उजेडीं तर आम्ही कोठूनही तें सामान मिळवूं, परंतु आज रात्रीची काय वाट ? "

शेवटीं त्याच्याजवळून कांहीं तट्टे, खिळे, कुदळी, फावडीं, पहारी इत्यादि सामान मिळवून, तें वेगळें काढून ठेवून आम्ही त्याच्या एक दोन माणसांस घेऊन निघालों. एकाच्या हातांत एक कंदील होता. शरीररक्षक दलाच्या छावणींत जाऊन मी त्या तुकडीच्या अधिकाऱ्यांकडून पहाऱ्यासाठीं वीस सैनिक तयार ठेवण्यासाठीं सांगून दुसरे वीस, छावणीच्या बांधकामासाठीं म्हणून माझ्याबरोबर घेतले. संघचालकांच्या दोघां माणसांनीं मला दोन-तीन ठिकांणें दाखविलीं, त्यांपैकीं गांवापासून सुमारें एक मैलावर असलेलें स्थळ मी निश्चित केलें. येथें एक झोपडी होती, व जवळच एक विहीर होती चार-पांच तासांत लाकडी चौथरा तयार करून त्याच्या आजूबाजूस तट्टया लावून एक न्हाणीघर तयार झालें. त्याचप्रमाणें ३-४ शौचकूपही तयार करण्यांत आले. एका झाडाखालीं तट्टयांचें एक छप्पर तयार करून स्वयंपाकाची जागा केली. असलेल्या झोपडीस लागून आवतीभोंवतीं लाकडी चौथऱ्यावर तट्टया लावून आणखी दालनें तयार करण्यांत आलीं. खिळे संपले, तेव्हां वेतांच्या सालपटांचाच आम्ही दोरी-

प्रमाणें उपयोग केला. धांवपळ करतां करतां माझी कंबर मोडते आहे कीं काय, असें मला वाटूं लागलें. रात्रीं २। च्या सुमाराला ४५ स्त्री-सैनिकांची ती तुकडी आली. तेवढ्यांत नेताजींचा तळ होता, त्या ठिकाणाहून एका बालडींत भात व एका पातेल्यांत मुगाचें वरण तयार करून चार सैनिक तें घेऊन आले. कंदील एकच असल्यामुळें इकडून तिकडून कशातरी दोन-चार मेणबत्त्या मिळविल्या. सर्वांचीं जेवणें बाहेर अर्धवट चांदण्यांत व अर्धवट अंधारांत उरकण्यांत आलीं. तें न्हाणीघर बघून त्या पथकाच्या मुख्य स्त्री-अधिकारी मला म्हणाल्या, " असें न्हाणीघर तर रंगूनच्या आमच्या पक्क्या छावणींत सुद्धां नव्हतें. तुम्ही हें एवढें काम अवघ्या चार-पांच तासांत कसें उरकलें याचें आश्चर्य वाटतें. "

३ वाजण्याच्या सुमारास सर्व काम संपलें. मी एका झाडाखालची जागा साफसूफ करून पथारी पसरली. पुढची मजल मारण्याच्या अगोदर या गांवीं दोन-तीन दिवस विश्रांति घेतां आली तर फार उत्तम असें मला वाटत होतें. इतक्यांत, " आत्तांचे आत्तां येथून कूच करावयाचें आहे, तेव्हां सर्वजणांनीं ताबडतोब इकडे निघून यावें " असा निरोप आला ! एवढा खटाटोप केला तो सर्व व्यर्थ गेला एवढेंच नव्हे, तर आतां यापुढें विश्रांतीशिवाय चालणें कितपत शक्य आहे, याची मला शंका वाटूं लागली. तरी विचार करण्यास वेळच नव्हता. माझ्याजवळ असलेलें बोचकें उचलून डोक्यावर घेऊन चालणें तर अगदींच अशक्य असें मला स्पष्ट दिसूं लागलें होतें; म्हणून मी त्यांतलें एक कांबळें काढून तें एका सैनिकास देऊन टाकलें होतें. आमच्या बरोबर असे कित्येक सैनिक होते कीं, ज्यांच्याजवळ कांहीं सामान नव्हतें. कोणाकोणाचें सामान वाटेंत हवाई हल्ल्यामुळें जळून गेलें होतें, तर कांहींचें नदीपलीकडील लॉऱ्यांत राहिलें होतें. लॉऱ्या व मोटारी आम्ही नदीपलीकडे सोडून आलों त्या वेळेस प्रत्येक गाडीबरोबर त्या त्या गाडीचा ड्रायव्हर व इतर माणसें होतीं. सोय होईल त्याप्रमाणें आपापल्या गाड्यांस नदीच्या पार करवून आम्हांला वाटेंत गांठावें, असें त्यांस सांगण्यांत आलें होतें. असो. कांबळें दिल्यावर, सामान हलकें करण्याच्या उद्देशानें माझ्याजवळील महत्त्वाच्या कागदपत्रांचें पुडकें मी तेथें बसून जाळलें. त्यांत नेताजींच्या सहीचीं व त्यांनीं स्वतः लिहिलेलीं अशीं अनेक पत्रें होतीं. तीं जाळतांना मला अत्यंत वाईट वाटलें ! परंतु यापुढें मीच कोठें घेरी येऊन पडलों अथवा सामान जंगलांत फेकून द्यावें लागलें तर उगीच महत्त्वाचे कागदपत्र दुसऱ्याच्या हातांत पडण्याचा संभव, म्हणून केवळ कर्तव्य या दृष्टीनें मी ते जाळून टाकले. आम्ही सर्वजण निघालों. वाटेंत आम्हांला श्री. जगन्नाथराव भोसले व इतर लोकही भेटले. नेताजींचा तळ होता त्या ठिकाणीं आम्ही जाऊन बघतों तों ते इतर मंडळींसह पुढें निघाले होते. त्यांच्या मागोमाग आम्हीं निघालों. पांच-सहा मैल चालून गेल्यावर पहांटे ५ वाजतां आम्हीं उघड्या जागेंतच रस्त्याच्या बाजूला तळ दिला. दोन तास आम्ही तेथेंच निजलों. वरून

दंव पडत होतें. थंडी होती तरी हिंवतापानें मी घामाघूम होत होतों. ७ वाजतां उठून आम्ही वाट चालूं लागलों. ऊन वाढूं लागलें. चटके बसूं लागले. आम्ही अकरा मैल चालून गेलों. अकरा वाजले. वाटेंत खावयास कांहीं नव्हतें. आम्हांला भूक तर फार लागली होती. डॉक्टर बाम व मी बरोबर चाललों होतों. आमच्या मागून एका अधिकाऱ्याचा एक नोकर, त्या अधिकाऱ्याचें सामान डोक्यावर घेऊन चालला होता. त्याच्या हातांत एक थर्मास फ्लास्क् होतें. त्यांत साखर ठेविलेली होती. त्याला थांबवून त्याच्यासह आम्ही तिघांनीं साखरेच्या फक्क्या मारल्या! पुढें गेल्यावर रस्त्याच्या डाव्या बाजूच्या जंगलांत नेताजींनीं तळ दिला असल्याचें कळलें. आम्ही सर्वजण तेथें गेलों. मधोमध खोलगट जागा असून त्यांतून एक बारीकसा झरा वाहात होता. दोन्ही बाजूंच्या उतरंडीवर झाडाझुडु-पांच्या व वेलींच्या जाळीखालीं आम्ही तळ दिलेला होता. मला सडकून ताप भरला होता व कानशिलें कढत झालीं होतीं. अंगाचा दाह होत होता. दुपारीं मी व डॉक्टर बाम यांनीं आटीव दुधाचा एक डबा फोडून फस्त केला. सायं-काळीं ५ वाजतां डाळ-भात शिजून तयार झाला. जेवण वगैरे उरकून आम्ही ७ वाजतां अंधार पडल्यावर पुन्हां सर्वजण पायीं निघालों. आतां सर्व मोटार-गाड्या, लॉऱ्या इत्यादि मार्गेच राहिल्या होत्या. त्या त्या गाडीबरोबर असलेलीं माणसें सोडल्यास आम्ही आतां सर्वजण पूर्वीप्रमाणें पुन्हां एकत्र झालों होतों. नेताजी, जनरल भोसले व मी असे आम्ही तिघे रांगेच्या पुढें असूं. आमच्या-मागें आमच्याबरोबरचे सर्व अधिकारी व सैनिक लांबच लांब रांगेंत चालत येत होते. जपानी सैनिकांचीही अखंड रीघ लागलेली होती. मोटारी, लॉऱ्या व बैल-गाड्या यांतूनही त्यांचे सैनिक भराभर मागून येऊन पुढें जात होते. नेताजींच्या पायाला जोडा लागून अनेक ठिकाणीं फोड आले होते. परंतु ते तसेच चालत. रात्रीच्या या मजलींत सुमारें तासभर चालल्यावर सर्वांस १० मिनिटांची विश्रांति देण्यांत येई. त्या वेळेस सर्वजण रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या मोकळ्या जागेंत बसून विश्रांति घेत. दोन्ही बाजूला झाडेंझुडुपें, अंधार व रस्त्यावरील सैनिकांची रीघ यामुळें कोणी मागें राहिल्यास तें कळण्याचा कांहींच मार्ग नव्हता. दोन-तीन तास चालणें झालें म्हणजे १५ मिनिटांची विश्रांति देण्यांत येत असे. वर उल्लेखिलेल्या रात्रीं सुमारें १२ वाजतां आम्ही बारा-तेरा मैलांची मजल मारल्यावर १५ मिनिटांची विश्रांति देण्यांत आली. रस्त्याच्या कडेला एका झुडुपाखालीं मी माझें बोचकें ठेवलें. श्रमामुळें माझे डोळे आपोआप मिटले आणि मला झोंप लागली. झोंप उडाल्यावर मी बघतों, तों घड्याळांत दीड वाजला. मी उठून आजूबाजूस पाहिलें. कोणीच नव्हतें. मला एकदम स्मरण झालें. १५ मिनिटांचा अवसर दिला असतांना मी दीड तास खुशाल झोंपून राहिलों! रस्त्यावर एक चिटपाखरूंसुद्धां नव्हतें. मी लगेच बोचकें उचलून चालूं लागलों. सर्व मंडळी सुमारें चार मैल अंतर तोडून गेली असावी असा मी अंदाज केला. मी भराभर

प्रमाणें उपयोग केला. धांवपळ करतां करतां माझी कंबर मोडते आहे कीं काय, असें मला वाटूं लागलें. रात्रीं २। च्या सुमाराला ४५ स्त्री-सैनिकांची ती तुकडी आली. तेवढ्यांत नेताजींचा तळ होता, त्या ठिकाणाहून एका बालडींत भात व एका पातेल्यांत मुगाचें वरण तयार करून चार सैनिक तें घेऊन आले. कंदील एकच असल्यामुळें इकडून तिकडून कशातरी दोन-चार मेणबत्त्या मिळविल्या. सर्वांचीं जेवणें बाहेर अर्धवट चांदण्यांत व अर्धवट अंधारांत उरकण्यांत आलीं. तें न्हाणीघर बघून त्या पथकाच्या मुख्य स्त्री-अधिकारी मला म्हणाल्या, " असें न्हाणीघर तर रंगूनच्या आमच्या पक्क्या छावणींत सुद्धां नव्हतें. तुम्ही हें एवढें काम अवघ्या चार-पांच तासांत कसें उरकलें याचें आश्चर्य वाटतें. "

३ वाजण्याच्या सुमारास सर्व काम संपलें. मी एका झाडाखालची जागा साफसूफ करून पथारी पसरली. पुढची मजल मारण्याच्या अगोदर या गांवीं दोन-तीन दिवस विश्रांति घेतां आली तर फार उत्तम असें मला वाटत होतें. इतक्यांत, " आत्तांचे आत्तां येथून कूच करावयाचें आहे, तेव्हां सर्वजणांनीं ताबडतोब इकडे निघून यावें " असा निरोप आला ! एवढा खटाटोप केला तो सर्व व्यर्थ गेला एवढेंच नव्हे, तर आतां यापुढें विश्रांतीशिवाय चालणें कितपत शक्य आहे, याची मला शंका वाटूं लागली. तरी विचार करण्यास वेळच नव्हता. माझ्याजवळ असलेलें बोचकें उचलून डोक्यावर घेऊन चालणें तर अगदींच अशक्य असें मला स्पष्ट दिसूं लागलें होतें; म्हणून मी त्यांतलें एक कांबळें काढून तें एका सैनिकास देऊन टाकलें होतें. आमच्या बरोबर असे कित्येक सैनिक होते कीं, ज्यांच्याजवळ कांहीं सामान नव्हतें. कोणाकोणाचें सामान वाटेंत हवाई हल्ल्यामुळें जळून गेलें होतें, तर कांहींचें नदीपलीकडील लॉऱ्यांत राहिलें होतें. लॉऱ्या व मोटारी आम्ही नदीपलीकडे सोडून आलों त्या वेळेस प्रत्येक गाडीबरोबर त्या त्या गाडीचा ड्रायव्हर व इतर माणसें होतीं. सोय होईल त्याप्रमाणें आपापल्या गाड्यांस नदीच्या पार करवून आम्हांला वाटेंत गांठावें, असें त्यांस सांगण्यांत आलें होतें. असो. कांबळें दिल्यावर, सामान हलकें करण्याच्या उद्देशानें माझ्याजवळील महत्त्वाच्या कागदपत्रांचें पुडकें मी तेथें बसून जाळलें. त्यांत नेताजींच्या सहीचीं व त्यांनीं स्वतः लिहिलेलीं अशीं अनेक पत्रें होतीं. तीं जाळतांना मला अत्यंत वाईट वाटलें ! परंतु यापुढें मीच कोठें घेरी येऊन पडलों अथवा सामान जंगलांत फेकून द्यावें लागलें तर उगीच महत्त्वाचे कागदपत्र दुसऱ्याच्या हातांत पडण्याचा संभव, म्हणून केवळ कर्तव्य या दृष्टीनें मी ते जाळून टाकले. आम्ही सर्वजण निघालों. वाटेंत आम्हांला श्री. जगन्नाथराव भोसले व इतर लोकही भेटले. नेताजींचा तळ होता त्या ठिकाणीं आम्ही जाऊन बघतों तों ते इतर मंडळींसह पुढें निघाले होते. त्यांच्या मागोमाग आम्हीं निघालों. पांच-सहा मैल चालून गेल्यावर पहांटे ५ वाजतां आम्हीं उघड्या जागेंतच रस्त्याच्या बाजूला तळ दिला. दोन तास आम्ही तेथेंच निजलों. वरून

दंव पडत होतें. थंडी होती तरी हिंवतापानें मी घामाघूम होत होतों. ७ वाजतां उठून आम्ही वाट चालूं लागलों. ऊन वाढूं लागलें. चटके बसूं लागले. आम्ही अकरा मैल चालून गेलों. अकरा वाजले. वाटेंत खावयास कांहीं नव्हतें. आम्हांला भूक तर फार लागली होती. डॉक्टर बाम व मी बरोबर चाललों होतों. आमच्या मागून एका अधिकाऱ्याचा एक नोकर, त्या अधिकाऱ्याचें सामान डोक्यावर घेऊन चालला होता. त्याच्या हातांत एक थर्मास फ्लास्क् होतें. त्यांत साखर ठेविलेली होती. त्याला थांबवून त्याच्यासह आम्ही तिघांनीं साखरेच्या फक्या मारल्या ! पुढें गेल्यावर रस्त्याच्या डाव्या बाजूच्या जंगलांत नेताजींनीं तळ दिला असल्याचें कळलें. आम्ही सर्वजण तेथें गेलों. मधोमध खोलगट जागा असून त्यांतून एक बारीकसा झरा वाहात होता. दोन्ही बाजूंच्या उतरंडीवर झाडाझुडुपांच्या व वेलींच्या जाळीखालीं आम्ही तळ दिलेला होता. मला सडकून ताप भरला होता व कानशिलें कढत झालीं होतीं. अंगाचा दाह होत होता. दुपारीं मी व डॉक्टर बाम यांनीं आटीव दुधाचा एक डबा फोडून फस्त केला. सायंकाळीं ५ वाजतां डाळ-भात शिजून तयार झाला. जेवण वगैरे उरकून आम्ही ७ वाजतां अंधार पडल्यावर पुन्हां सर्वजण पायीं निघालों. आतां सर्व मोटारगाड्या, लॉऱ्या इत्यादि मागेंच राहिल्या होत्या. त्या त्या गाडीबरोबर असलेलीं माणसें सोडल्यास आम्ही आतां सर्वजण पूर्वीप्रमाणें पुन्हां एकत्र झालों होतों. नेताजी, जनरल भोसले व मी असे आम्ही तिघे रांगेच्या पुढें असूं. आमच्यामागें आमच्याबरोबरचे सर्व अधिकारी व सैनिक लांबच लांब रांगेंत चालत येत होते. जपानी सैनिकांचीही अखंड रीघ लागलेली होती. मोटारी, लॉऱ्या व बैलगाड्या यांतूनही त्यांचे सैनिक भराभर मागून येऊन पुढें जात होते. नेताजींच्या पायाला जोडा लागून अनेक ठिकाणीं फोड आले होते. परंतु ते तसेच चालत. रात्रीच्या या मजलींत सुमारें तासभर चालल्यावर सर्वांस १० मिनिटांची विश्रांति देण्यांत येई. त्या वेळेस सर्वजण रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या मोकळ्या जागेंत बसून विश्रांति घेत. दोन्ही बाजूला झाडेंझुडुपें, अंधार व रस्त्यावरील सैनिकांची रीघ यामुळें कोणी मागें राहिल्यास तें कळण्याचा कांहींच मार्ग नव्हता. दोन-तीन तास चालणें झालें म्हणजे १५ मिनिटांची विश्रांति देण्यांत येत असे. वर उल्लेखिलेल्या रात्रीं सुमारें १२ वाजतां आम्ही बारा-तेरा मैलांची मजल मारल्यावर १५ मिनिटांची विश्रांति देण्यांत आली. रस्त्याच्या कडेला एका झुडुपाखालीं मी माझें बोचकें ठेवलें. श्रमामुळें माझे डोळे आपोआप मिटले आणि मला झोंप लागली. झोंप उडाल्यावर मी बघतों, तों घड्याळांत दीड वाजला. मी उठून आजूबाजूस पाहिलें. कोणीच नव्हतें. मला एकदम स्मरण झालें. १५ मिनिटांचा अवसर दिला असतांना मी दीड तास खुशाल झोंपून राहिलों ! रस्त्यावर एक चिटपाखरूंसुद्धां नव्हतें. मी लगेच बोचकें उचलून चालूं लागलों. सर्व मंडळी सुमारें चार मैल अंतर तोडून गेली असावी असा मी अंदाज केला. मी भराभर

पावलें टाकावयास सुरुवात केली. एक शंका माझ्या मनांत डोकावून गेली. मी विरुद्ध दिशेला तर चाललों नाहीं ना ? कारण झोपेंतून जागें झाल्यावरही झोपेची धुंदी डोळ्यावर असली तर तसें होणें शक्य आहे. अनेक खुणांवरून मी योग्य त्या दिशेनेंच जात आहें, अशी मनाची खात्री करून घेतली. सुमारें तासभर चालून गेल्यावर आमच्याबरोबरचे सर्व सैनिक रस्त्याच्या दोन्ही कडेला झोंपलेले दिसले. तेथें इतरांबरोबर मीही उरलेल्या वेळांत थोडी झोंप घेतली. पहांटे ४ वाजतां उठून आम्ही पुन्हा चालूं लागलों. ६ वाजतां एका खेड्यांत आम्ही तळ दिला. तेथें शहाळू, कच्चे फणस, दूध इत्यादि घेऊन आम्ही त्यांचा स्वयंपाकांत उपयोग केला. या खेड्यांत डॉक्टर मेनन् यांनीं मला हिंवतापावरचें पहिलें इंजेक्शन दिलें. येथून सायंकाळीं कूच करण्याच्या वेळेस आमच्या तीन लॉऱ्या व तीन मोटारगाड्या आलेल्या होत्या. येथून पुन्हा तुकड्या पाडण्यांत आल्या. अर्धीअधिक माणसें मोटारगाड्या व लॉऱ्यांत बसून पुढें गेलीं. बाकीचीं पायीं चालूं लागली. नेताजी पायीं चालणाऱ्यांत होते. मी पहिल्या ( मोटारींतून जाणाऱ्या ) तुकडींत होतों. मार्ताबान या ठिकाणीं पोंचेपर्यंत आम्हांस वाटेंत एक-दोन मुक्काम करावे लागले. एका रात्रीं आम्हीं लॉऱ्यांतून वाट क्रमीत असतांना वाटेनें जाणाऱ्या बैलगाड्यांत आम्हांला हिंदी माणसांचा आवाज ऐकूं आला. ते हिंदी स्वातंत्र्यसंघाचे कांहीं लोक होते. वाटेंत कांहीं खेड्यांतून मुक्काम करतांना त्यांनीं खेडुतांच्या बैलगाड्या ठरविलेल्या होत्या. मार्ताबानला पहांटे पोहोंचल्यावर आम्ही सायंकाळपर्यंत तेथेंच एका खेड्यांत वस्ती केली. दहा-पंधरा झोपड्यांचेंच तें खेडें होतें. तेथें गाई-म्हशी बऱ्याच होत्या. समोर पिळलेलें धारोष्ण दूध त्या दिवशीं ब्रह्मदेशांत आम्हाला प्रथमच मिळालें. कोठल्याही खेड्यांत मुक्काम करावयाचा असला म्हणजे आम्ही तेथील गरीब लोकांशीं हसून, अभिवादन करून व त्यांच्या भाषेंत मोडकें तोडकें बोलून व त्यांची मर्जी संपादन करून निरनिराळ्या झोपड्यांत पथाऱ्या पसरून देत असूं. आमचीं शस्त्रास्त्रें, आमचा खाकी पोषाख वगैरे पाहून ते खेडूत तरी नाहीं म्हणणार कसे ? वाघ म्हटलें तरी खाणार व वाघोबा म्हटलें तरी खाणार अशी त्यांची स्थिति होऊन जाई. ते आनंदानें आमच्याशीं सहकार्य करीत. भांडींकुंडीं, लांकडें इत्यादि लागलें तरी ते पुरवीत. त्यांच्या मदतीनें भाजीपाला, दूध, शहाळू, अंडीं, कोंबड्या इत्यादींही आम्हांस मिळणें शक्य होई. संध्याकाळीं निघतांना, पैसे अथवा कपडे देऊन आम्ही त्यांची चांगली संभावना करीत असूं.

मार्ताबानहून आम्ही त्याच दिवशीं रात्रीं एका मोठ्या मोटारबोटींत बसून निघालों व मोलमीनला अर्ध्या-पाऊण तासांत पोचलों. तेथें ' जियाभाई ' नांवाचा माझा एक गुजराथी स्नेही होता. येतांना मी जेव्हां त्यामार्गें रंगूनला गेलों होतों, त्या वेळेस त्याची व माझी प्रथम ओळख झाली. मी त्याची व डॉक्टर बाम यांची ओळख करून दिली. श्री. जियाभाई हे एका धनाढ्य गुजराथी

व्यापाऱ्याचे कारकून या नात्यानें त्यांच्या गैरहजेरींत तेथील सर्व व्यापार तेच बघत असत. त्यांनीं आमचें चांगलें आदरातिथ्य केलें. इतर सर्व मंडळींनीं तेथील डोंगराच्या पलीकडे असलेल्या एका तामीळ चेट्टी मंदिरांत तळ दिलेला होता. मी व डॉक्टर बाम मात्र बहुतेक वेळ जियाभाईच्या बंगल्यांतच घालवीत असूं. आम्ही येथें आलों त्याच्या दुसऱ्याच दिवशीं दुपारीं एकाएकीं १७-१८ (बी २९ ) विमानें आकाशांत घिरट्या घालूं लागलीं ! वीज कडाडून जवळ-पासच कोठेंतरी पडावी अशा तऱ्हेनें, "कड्ड्ड्ड्...फाड् फाड् " असा आवाज होऊन धरती हादरली. आम्ही दुसऱ्या मजल्यावर होतों ते खालच्या मजल्यावर आलों. वरच्या मजल्याचें तळ लाकडी व छप्पर पत्र्याचें होतें. त्या बंगल्याच्या आवारांत एकच खंदक खणलेला होता. त्यांत पांच सहा लोक जाऊन बसल्या-मुळें त्यांत मुळींच जागा उरली नव्हती. शिवाय वरच्या बाजूस त्याच्यावर थोड्याशा लाकडांशिवाय इतर कसलेंही आच्छादन नव्हतें. चौफेर बॉंब व मशीनगनच्या गोळ्यांचा वर्षाव सुरू होता. तळमजल्याच्या मोठ्या दालनांत एका खांबास टेकून, मी पाय आवरून, गुडघे छातीशीं घेऊन बसलों होतों. मशीनगनची एक गोळी पत्र्याचें छत भेदून वरच्या मजल्याचा तळ भेदून माझ्यापासून अवघ्या ६ इंचावर पडून थोड्या वेळ गरगर फिरली व थांबली ! मी बसलों होतों ती जमीन विटांची केलेली असल्यामुळें व आधींच दोन छतें भेदून ती गोळी आल्यामुळें, जमिनींत त्या गोळीला शिरकाव करून घेणें शक्य झालें नाहीं. येथें पुन्हा मी अगदीं थोडक्यांत बचावलों ! त्या वेळेस मांडी घालून जर मी बसलेला असतों तर मला ती गोळी लागली असती.

मोलमीनहून पुढें बँकॉकपर्यंत आगगाडीचा प्रवास असल्यामुळें माल-गाडीचे एक-एक, दोन–दोन डबे जसे आमच्या वांट्यास येतील तसतशा तुकड्या करून येथून कूच करणें आम्हांला भाग होतें. या जंगलांतील नव्या लोहमार्गानें मी पूर्वीं प्रवास केलेला असल्यामुळें नेताजींनीं मला या मार्गाची, त्यांतील सोईची व गैरसोईची सर्व माहिती विचारली व ती मी त्यांस दिली. पहिल्या तुकडींत जनरल जगन्नाथराव भोसले, मी, श्री. अय्यर, श्री. दास इत्यादि मंडळी निघालों. आम्ही एकंदर २५-३० जण होतों. आमच्यानंतर मोलमीनहून एक-दोन तुकड्या निघाल्या. सर्वांत शेवटल्या तुकडींत नेताजी स्वतः निघाले. प्रत्येक मालगाडीच्या डब्यांत आम्ही ३०-३५ जण असल्यामुळें खच्चून गर्दी असे. रात्रीं ७-८ जणच कसेबसे पाय पसरून झोंप घेऊं शकत. त्यांतसुद्धां मालगाडीच्या डब्यांचा खडखडाट व घाईघाईंत तयार केलेल्या लोहमार्गाचे धक्के, यामुळें झोंप येणें कधीं कधीं अशक्य होई. रात्रीं प्रवास करावयाचा व दिवसा नजीकच्या खेड्यांत तळ द्यावयाचा, असा आमचा क्रम चालला होता. येथील खेड्यांत आम्हांला आंबे व केळीं मिळत. वाटेंत एके ठिकाणीं पुढची गाडी मिळाली नाहीं म्हणून आम्हांला ३६ तास

मुक्काम करावा लागला. मागील एक-दोन तुकड्या तेथें येऊन आम्हांला मिळाल्या. या खेपेस या बाजूचे बहुतेक सर्व पूल तयार झालेले असल्यामुळें रात्रीं आम्हांला कोठेंच उतरावें लागलें नाहीं. पूल तयार करण्याचें काम ज्या जपानी फौजी खात्याकडे असे, त्या खात्याचे सैनिक व मजूर रात्रभर या नद्यांपाशीं, दुसरे एक दोन राखीव पूल तयार करण्याच्या खटाटोपांत असलेले दिसून येत.

आपल्या नेहमींच्या रस्त्यावर चालणाऱ्या लॉऱ्यांचीं रबरी चाकें काढून त्याला आगगाडीचीं चाकें लावून त्या रूळावरून चालविण्याची सोय जपान्यांच्या लॉऱ्यांस असे. याला मागच्या बाजूस एक आकडा लावलेला असून त्यायोगें आगगाडीचा एकाद् दुसरा डबाही त्यास जोडतां येत असे. सयामच्या हद्दींत शिरून आम्ही जेव्हां बँकॉकच्याजवळ येऊन पोंचलों तेव्हां मात्र नेताजी वर वर्णिलेल्या एका खास मोटार-ट्रॉलीनें आम्हां सर्वांच्याआधीं बँकॉक येथें १३ मे १९४५ रोजीं पोंचले. आम्ही १५ मे रोजीं पोंचलों. २४ एप्रिल १९४५ पासून तीन आठवडे रानांवनांतील प्रवासांत काढल्यामुळें आम्ही आंतरराष्ट्रीय घडामोडींच्या बातमीस अगदीं पारखे झालेले होतों. मे महिन्याच्या २ तारखेस पेगू शहरावर इंग्रजांनीं ताबा मिळविला. ३ तारखेस रंगूनही त्यांच्या हातांत पडलें. ७ तारखेस जर्मनीसारख्या बलाढ्य राष्ट्राचा अंत झाला. एवढ्या महत्त्वाच्या घडामोडी या दरम्यानच्या काळांत घडल्या.

याच सुमारास हिंदुस्थानांत नेताजींच्या मातुश्री वारल्याचें वृत्त जपानी अधिकाऱ्यांना नभोवाणीद्वारें कळलें. नेताजी बँकॉक येथें आले त्या वेळीं त्यांस त्यांनीं तें वृत्त कळविलें. तें ऐकून नेताजींस फारच वाईट वाटलें. "माझ्या आईच्या निधनापूर्वी तिला भेटण्याची माझी फार इच्छा होती" असें ते म्हणाले. बँकॉक शहरांत 'बनकपी' नांवाचा एक विभाग आहे. येथें अनेक धनाढ्य लोकांचे प्रशस्त बंगले आहेत. त्यांपैकीं 'श्री. मेहतानी' नामक एका श्रीमंत सिंधी व्यापाऱ्यानें आपला स्वतःचा बंगला नेताजींच्या वास्तव्याकरतां मोकळा करून दिला. येथील स्वातंत्र्यसंघानें इतर अधिकाऱ्यांकरतां व सैनिकांकरतां आणखी सात-आठ-दहा बंगले भाड्यानें घेऊन ठेवले होते. यांत सर्वांची व्यवस्था करण्यांत आली. सिंगापुरांतील स्वातंत्र्य-चळवळींतील सर्व अधिकाऱ्यांस नेताजींच्या सुरक्षिततेबद्दल फार काळजी उत्पन्न झाली होती. रंगून शहर इंग्रजांच्या हातीं पडलें, हें त्यांनीं ऐकलें होतें; परंतु नेताजी रंगूनमध्येंच राहिले किंवा काय याची त्यांस कांहींच माहिती मिळेना. त्यांनीं दोन-तीन अधिकारी तातडीनें बँकॉकमार्गें ब्रह्मदेशाकडे जाण्यास म्हणून पाठविले. ते बँकॉक येथें येऊन पोंचण्याच्या एक-दोन दिवस अगोदरच आम्ही तेथें येऊन पोंचलों होतों. म्हणून त्यांस पुढें ब्रह्मदेशाकडे जाण्याचें कारणच उरलें नाहीं. रंगून शहर पडण्याच्या अगोदर नेताजी

तेथून निसटून पुन्हा आपल्यांत आल्याबद्दल दूरपूर्वेतील सर्व हिंदी लोकांस अत्यानंद झाला. उरलेल्या स्वातंत्र्य-सैन्याची पुन्हा जुळवाजुळव करण्यास नेताजींनीं मलाया व सिंगापूरमधील स्वातंत्र्यसंघाच्या व सैन्याच्या मुख्य मुख्य अधिकाऱ्यांस पाचारण केलें. ते आल्यावर त्यांच्याशीं विचारविनिमय सुरू झाला. ब्रह्मदेशाच्या रानांवनांतील आघाडीवरून पूर्वेकडे कूच करून स्वातंत्र्यसैन्याच्या कांहीं तुकड्या उत्तर सयाममध्यें येण्याचा संभव होता. त्या थकून भागून येतील, त्यांच्याजवळची धान्यसामुग्री संपुष्टांत आलेली असेल, म्हणून बँकॉक येथील स्वातंत्र्यसंघांतील कार्यकर्त्यांच्या चार-पांच तुकड्या सयामच्या उत्तर सरहद्दीवरील मुख्य मुख्य ठिकाणीं पाठविण्यांत आल्या. ब्रह्मदेशांतून सयाममध्यें हिंदी स्वातंत्र्यसैन्याचा वा संघाचा कोणी मनुष्य आल्यास त्याला वाहनाची, व इतर गोष्टींची सर्व मदत करून बँकॉककडे पाठवून देण्याचें काम या तुकड्यांकडे होतें. हिकारी कीकान खात्याचा एक जपानी सैनिक अशाच आडवाटेनें ब्रह्मदेशांतून उत्तर सयाममध्यें व नंतर बँकॉक येथें येऊन पोंचला. तो म्हणाला, " डॉक्टर लक्ष्मी या एका जपानी तुकडीबरोबर आहेत. त्या तुकडीचे सर्व लोक व डॉक्टर लक्ष्मी हीं लॉऱ्यांत बसून ब्रह्मदेशांतून निघून उत्तर सयाममार्गें येथें येण्याच्या तयारींत असलेलीं मी पाहिलीं. " ही बातमी कांनीं आल्यामुळें डॉक्टर लक्ष्मी या बँकॉकमध्यें आज येऊन पोंचतात कीं उद्यां अशी आम्ही सर्वजण त्यांची वाट पाहात असूं. परंतु त्या ब्रह्मदेशांतून निसटूं शकण्याच्या अगोदरच इंग्रजांच्या हातांत सांपडल्या ! मात्र हिंदी स्वातंत्र्यसैन्याचें एक रेजिमेंट आम्ही बँकॉक येथें पोंचल्यावर सुमारें १५ दिवसांनीं ब्रह्मदेशाच्या आघाडीवरून, इंग्रजांच्या कचाट्यांतून निसटून सयाममध्यें येऊन पोंचलें. त्याच रेजिमेंटबरोबर नागपूरचे ' डॉक्टर चेंडके ' होते. या खडतर प्रवासाच्या वेळीं ते विषमज्वरानें आजारी असल्यामुळें फारच अशक्त झालेले होते. शत्रूच्या वेढ्यांतून, दारूगोळ्याच्या वर्षावांतून त्यांस खांद्यावर घेऊन त्यांच्या तुकडींतील सैनिक निघाले. मोलमीन येथें आणून त्यांस तेथील रुग्णालयांत ठेवण्यांत आलें. तेथें हळूहळू त्यांची प्रकृति सुधारली.

———

## आघात ! : २६

बँकॉकमध्यें, झांशी-राणी पथकाची एक छावणी, स्वातंत्र्यसैन्याचें एक रुग्णालय, ब्रम्हदेशांतून आलेलें एक रेजिमेंट, ब्रह्मदेशांतून पछेहाट करून आलेल्या विमानविरोधक तोफखान्याच्या दोन तुकड्या असे स्वातंत्र्यसैन्याचे सुमारें दोन हजार सैनिक होते. झांशी-राणी पथकाच्या आजारी असलेल्या तीन-चार मुली सोडून, इतर सर्व बँकॉकमध्यें आल्यावर १५-२० दिवसांनीं आगगाडीनें सिंगापूरकडे रवाना झाल्या. २१ मे रोजीं स्वातंत्र्य-सरकार स्थापनेचा दिवस होता. त्या दिवशीं बँकॉकमध्यें हिंदी लोकांच्या जाहीर सभेंत नेताजींचें फारच स्फूर्तिदायक व्याख्यान झालें. ते म्हणाले, " जर्मनीचा पराजय झालेला असला तरी त्यामुळें आपण निराश होण्याचें कांहींच कारण नाहीं. उद्यां जपानही हरला आणि आपल्याला कोणीच साहाय्यकर्ता उरला नाहीं, म्हणून आपण स्वातंत्र्यप्राप्तीचे प्रयत्न सोडून द्यावे, हें म्हणणें बरोबर नाहीं. उलट बाहेरची मदत ज्या प्रमाणांत कमी होत जाईल, त्या प्रमाणांत आपले प्रयत्न जास्त तीव्र झाले पाहिजेत. आपलें ध्येय उच्च आहे. तें साध्य होईपर्यंत आपल्याला प्रयत्न करावयाचा आहे. आम्ही हरलेलों नाहीं. दुसऱ्याचें कांहीं लुबाडण्याच्या प्रयत्नांत आम्हांला अपयश आलें तर त्याला पराजय म्हणतां येईल; परंतु आमचेंच स्वातंत्र्य जेथें आम्हांला परत मिळवावयाचें आहे, तेथें आम्ही पराजय मानणें शक्यच नाहीं. "

सयामच्या मंत्र्यांशीं नेताजींचे संबंध चांगले होते. सयाममध्यें आल्यावर त्यांच्या सरकारी गांठीभेटी झाल्या. यापूर्वी १९४३ सालीं नेताजी सयाम सरकाराचे खास पाहुणे म्हणून कांहीं दिवस बँकॉकमध्यें राहिलेले होते. या प्रसंगीं बँकॉकमध्यें आल्याबरोबर त्यांनीं स्वातंत्र्य-सरकाराच्या, संघाच्या व सैन्याच्या मध्यवर्ती कचेऱ्यांची जुळणी करण्यास सुरुवात केली. बँकॉकला एक-दोन दिवसाआड हवाई हल्ले होऊं लागले होते. आम्ही बँकॉकमध्यें येऊन पोंचण्याच्या अगोदर कांहीं महिने बँकॉकचें विद्युत्-उत्पादनकेंद्र हवाई हल्ल्यानें उध्वस्त झाल्यामुळें तेथील नभोवाणीकेंद्र बंद पडलें होतें. तें जर चालू असतें तर येथून नेताजींनीं भारतांतील हिंदी लोकांस उद्देशून भाषण केलें असतें; परंतु तशी कांहीं सोय नव्हती. जून महिन्याच्या मध्याच्या सुमारास व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल व महात्मा गांधी यांच्यांतील सिमला येथील वाटाघाटींत तडजोड होईल अशी शक्यता दिसूं लागली. ' हिंदी लोकांत व इंग्रजांत कसल्याच प्रकारची तडजोड यापुढें होऊं

नये. आतां शेवटचा एकच उपाय म्हणजे उघड उघड युद्ध पुकारून त्यांस हिंदुस्थानांतून हुसकून लावण्याचा.' असें नेताजींचें ठाम मत होतें. कसल्याही प्रकारची तडजोड मान्य करूं नका, असा महात्मा गांधींस व हिंदी जनतेस इषारा देण्याकरतां म्हणून त्यांना हिंदी नभोवाणीकेंद्रावरून भाषण करावयाचें होतें. बँकॉकचें नभोवाणीकेंद्र बंदच होतें, रंगून हातचें गेलें होतें; उरतां उरलीं दोनच. एक सायगांवचें व दुसरें सिंगापूरचें. ' या दोहोंपैकीं ज्या ठिकाणीं उद्यांच्या उद्यां विमानानें जाण्याची सोय होत असेल, त्या ठिकाणीं मला माझ्या पांच-सहा सह-कार्‍यांसह जावयाचें आहे ' असें नेताजींनीं जपान्यांस १६ जून १९४५ रोजीं सांगितलें. दुसरे दिवशीं सकाळीं ९ वाजतां त्यांनीं विमानानें सिंगापुराकडे प्रयाण केलें. तेथून त्यांनीं त्याच दिवशीं रात्रीं महात्मा गांधी, इतर नेते व हिंदी जनता यांस उद्देशून भाषण केलें. त्यांत ते म्हणाले, "...आम्ही इकडे स्वातंत्र्याचा लढा लढत असतांना तुम्ही तिकडे इंग्रजांशीं तडजोड करणें म्हणजे आम्हांला तोंडघशीं पाडून तुम्ही स्वतः तोंडघशीं पडल्यासारखें होणार आहे. आमच्यांत हिंमत आहे. स्वातंत्र्य मिळेपर्यंत आम्ही झुंजत राहूं. अर्थात् तुम्ही सर्वांनीं यापुढें तडजोडीचा विचार सोडून देऊन आमच्या प्रयत्नांशीं कोणत्या रीतीनें सहकार्य करूं शकाल त्याचा विचार करा..." यानंतरही याच प्रकारचीं अनेक भाषणें त्यांनीं केलीं.

सिंगापुरास नेताजींनीं, उरलेल्या नंबर ३ डिव्हिजनचें व नंबर ४ डिव्हिजन तयार करण्याचें काम बघण्यास सुरुवात केली. परंतु सध्यांचा आपला प्रयत्न यशस्वी होणार नाहीं, जपान लवकरच हरणार, हें त्यांस स्पष्ट दिसूं लागलें होतें. ब्रह्म-देशांतून सयाममध्यें आल्यावरच त्यांनीं, (हा प्रयत्न अयशस्वी झाला तर) दुसरा कोणता मार्ग शक्य आहे, या दृष्टीनें विचार करण्यास सुरुवात केली होती. ' वेळ पडल्यास त्यांस मांचूरिया किंवा तत्सम अन्य देशांत जावें लागेल; अर्थात् त्याज-बरोबर त्रिखंडींतही जाण्यास कोण कोण तयार आहेत ? ' अशा प्रकारचा सूर त्यांच्या निकटच्या कार्यकर्त्यांत स्पष्ट उमटूं लागला होता. मी, जनरल जगन्नाथराव भोसले यांस सांगितलें होतें कीं, नेताजींनीं हा प्रश्न त्यांच्याजवळ काढल्यास त्यांनीं माझें नांव नेताजींस सुचवावें. मी नेताजींच्याबरोबर वाटेल तेथें जाण्यास तयार होतों. जनरल भोसल्यांनींही माझें नांव सुचविण्याचें आनंदानें कबूल केलें.

१९४५चा ऑगस्ट महिना सुरू झाला, तेव्हां जपानची अंतर्गत परि-स्थिति अत्यंत शोचनीय झालेली होती. रोज हवाई हल्ले होऊन जपानचीं शहरें उध्वस्त होऊं लागलीं. जर्मनीनें शोधून काढलेल्या व अमेरिकेनें पूर्णतेस नेलेल्या ' ॲटम बॉंब 'सारख्या भयंकर अस्त्राचा प्रयोग प्रथम जपानवरच करण्यांत आला! या एक बॉंबनें एक सबंध शहर उध्वस्त होऊन मृत्यूची संख्या पाऊण लाखापर्यंत पोंचली. त्या बॉंबच्या ठिकर्‍या उडाल्यावर त्याच्या अणूरेणूचाही स्पर्श ज्याला झाला, त्याच्या रक्तांत विष भिनून त्याचें शरीर काळेंनिळें पडूं लागलें! त्याच्यावर

उपाय म्हणून इंजेक्शन द्यावयास सुई भोसकावी, तों तेथेंच फोड होऊन ती जखम जास्त चिघळत जाई. त्या प्रदेशांत सत्तर-पाऊणशें वर्षें एक गवताची काडीही उगवणार नाहीं, इतका तो प्रदेश बेचिराख व नापीक होईल असा तर्क शास्त्रज्ञांनीं व्यक्त केला. या ॲटम बॉंबमध्यें असे कांहीं विलक्षण किरण असतात कीं जे त्या बॉंबचा स्फोट झाल्यावर, त्या स्थळीं वातावरणांत बरेच दिवस टिकून राहातात; त्यामुळें बॉंबच्या स्फोटाच्या वेळेस तेथील सर्व सामान्य जनतेच्या हालचाली व इतर वस्तूंचे ठसे यांचें छायाचित्र त्या ठिकाणीं जसेंच्या तसें उमटलेलें दिसत असे. पुन्हा अशाच प्रकारचा दुसरा एक बॉंब जपानवर टाकण्यांत आला. त्यानेंही तसेंच घोर परिणाम घडून आले. शिवाय आणखी १५-१६ तरी तसल्या प्रकारचे बॉंब तयार असल्याचें अमेरिकेनें घोषित केलें ! आधींच अन्नटंचाईमुळें जपान्यांची उपासमार होऊं लागलेली होती. शस्त्रास्त्रें, मनुष्यबळ, आरमार व हवाई दल हीं सुद्धां दिवसेंदिवस कमी होऊं लागलीं. त्यांत आणखी या ॲटम बॉंबच्या अमानुष संहाराची भर पडली. याच कोष्टकानें संहार होऊं लागला तर जपानी वंश आणि त्याची भूमि हीं दोन्ही नष्ट होण्यास वेळ लागणार नाहीं, असें जपानी मुत्सद्यांस स्पष्ट दिसूं लागलें. इकडे रशियानेंही जपानविरुद्ध युद्ध पुकारून मांचूरियावर हल्ला केला. मोडकळीस येत चाललेल्या जपानवर यामुळें प्राणांतिक आघात झाला. एरवीं रशियानें जपानविरुद्ध युद्ध पुकारलें नसतें. कारण पॅसिफिक महासागरांत, अमेरिकेला शह म्हणून जपानला जिवंत ठेवणेंच रशियास सर्व दृष्टीनें इष्ट होतें. परंतु जपान आतां हरणार असें स्पष्ट दिसूं लागल्यावर आपण जर स्वस्थ राहिलों तर ब्रिटिश आणि अमेरिकन फौजा या प्रदेशांत येतील व आपलें बस्तान बसवितील; त्यापेक्षां जपानचें निमित्त करून आपण या प्रदेशांत खुशाल हातपाय पसरावे असें ठरवून रशियानें जपानविरुद्ध युद्धाची घोषणा केली ! रशियानें युद्धघोषणा केल्यावर रशियाच्या अपेक्षेबाहेर अवघ्या २-३ दिवसांत जपान शरण आल्यामुळें राशियाला आपलें सैन्य दूरवर पसरविण्यास अवसर मिळाला नाहीं. म्हणून जपानची शरणगति घोषित झाल्यावर सुद्धां, ‘ या जपान्यांचा काय नेम सांगावा ’ या निमित्तानें रशियानें चीन, मंगोलिया व मांचूरियाचा अवाढव्य प्रदेश हस्तगत केला ! म्हणून त्यांनीं १२ ऑगस्ट रोजीं बिनतारी यंत्रानें चर्चिल, स्टॅलिन व ट्रुमन या तिघांची पॉट्सडॅम् मुक्कामीं खलबतें चालू असतांना त्यांस, आपण शरण येण्यास तयार असल्याचें सांगितलें. त्यांनीं घातलेल्या सर्व अटी मान्य करून १४ ऑगस्ट १९४५ रोजीं जपाननें त्यांस शरण आल्याचें कळविलें व अशा रीतीनें हें जागतिक युद्ध संपलें !

या दिवसांत हिंदी लोकांचा जोम आणि उत्साह कायम ठेवण्याकरतां म्हणून सिंगापुरांतील झांशी-राणी पथकाच्या नाट्यमंडळातर्फें नेताजींनीं, प्रस्तुत ग्रंथकर्त्यांच्या ‘ झांशीची राणी ’ या नाटकाचे बरेच प्रयोग पुन्हा करवून घेतले

कांहीं प्रयोग स्वातंत्र्य-सैन्याच्या सैनिकांकरतां म्हणून करण्यांत आले व कांहीं सिंगापुरांतील हिंदी जनतेकरतां झाले. १५ ऑगस्ट १९४५ रोजीं या नाटकांचा सिंगापुरांतील शेवटला प्रयोग सेलेतार लष्करी शिक्षणकेंद्रांत सर्व स्वातंत्र्य-सैनिकांसाठीं करण्यांत आला. यापूर्वींच बिघडत चाललेल्या परिस्थितीमुळें झांशी-राणी पथकाच्या सर्व स्त्री-सैनिकांस दोन-दोन, तीन-तीन महिन्यांची रजा देऊन त्यांस त्यांच्या त्यांच्या घरीं पाठविण्यांत आलेलें होतें. रंगूनमधून पीछेहाट करून झांशी-राणी पथकाच्या ज्या स्त्री-सैनिक बँकॉकमध्यें आल्या त्या सिंगापुरास परत जाण्याच्या अगोदर आठ-दहा दिवस, रोज दुपारीं नेताजी स्वतः एक तासभर त्याच्यापुढें 'राजकारण व स्त्रियांचें कार्य' या विषयावर व्याख्यान देत. जागतिक युद्ध संपलें व या सैनिकांस आपापल्या घरीं जावें लागलें तरी त्यांस देशकार्य करणें कसें शक्य आहे, तें त्यांनीं त्या भाषणांतून समजावून दिलें.

जपानच्या शरणागतीचें वृत्त नेताजींस सिंगापूर मुक्कामींच कळलें. त्यांच्या पुढच्या कार्याची रूपरेषा त्यांनीं मनांत अगोदरच ठरविलेली होती. १६ ऑगस्ट १९४५ रोजीं सकाळीं नेताजी सिंगापुराहून विमानानें निघाले व दुपारीं ४ वाजण्याच्या सुमारास बँकॉक येथें येऊन पोंचले. त्यानंतर कांहीं वरिष्ठ जपानी अधिकाऱ्यांच्या बरोबर नेताजींनीं सुमारें दीड तास वाटाघाटी केल्या. स्वातंत्र्य-सैन्याचे कांहीं प्रमुख अधिकारीही या प्रसंगीं हजर होते. त्या वाटाघाटी संपल्यावर त्यांनीं स्वातंत्र्यसैन्याच्या ( बँकॉकमधलि ) रुग्णालयास व सैनिकांच्या दोन तीन छावण्यांस भेट दिली. जपान शरण येऊन जागतिक युद्ध बंद झालें होतें तरी जपाननें जिंकलेल्या प्रदेशांतून जपानी सैन्याचें ठाणें कायम होतें. ॲटम बॉंब व त्यामुळें झालेली जपानची दुर्धर परिस्थिति यामुळें त्यांनीं बिनतारी यंत्रानें आपली शरणागती परस्पर, इंग्रज व अमेरिकन अधिकाऱ्यांस कळविली होती. त्यांनीं जिंकलेल्या प्रदेशांतून हातघाईच्या लढाईनें कांहीं त्यांचें उच्चाटन झालेलें नव्हतें. दूरपूर्वेंतील सर्व देशांपैकीं फक्त फिलीपीन्स व ब्रम्हदेश येथेंच इंग्रज आणि अमेरिकन सैन्य होतें. सिंगापूर, मलाया, सयाम, इंडोचायना, चीन, कोरिया, टायवान हा प्रदेश अजून जपान्यांच्या ताब्यांतच होता. युद्ध थांबल्यावर १०-१५ दिवसांनीं अगदीं घाबरत घाबरत व पूर्ण सुरक्षिततेबद्दल जपान्यांकडून पुन्हा पुन्हा आश्वासनें घेत इंग्रज व अमेरिकन सैन्यें या प्रदेशांत उतरलीं ! जपानी सैनिक कसा असतो याची त्यांस युद्धआघाडीवर पूर्ण कल्पना होती. अर्थात् तो शरण आल्याचें घोषित झालें तरी त्यांचा त्या गोष्टीवर विश्वास बसेना व कांहीं दगा-फटका होणार अशी त्यांची मनोदेवता त्यांस सांगत होती ! सिंगापूरसारख्या ठिकाणीं जेथें साम्राज्य-सेना उतरवावयाची होती, तेथें इंग्रज अधिकाऱ्यांनीं हिंदी तुकड्या आधीं उतरविल्या. कारण जपान्यांच्या मनांत खरोखरच कांहीं काळें-बेरें असलें तर हिंदी सैनिक पुढें असलेले बरे ! वास्तविक विजय झाला म्हणजे मिशांवर ताव देत मिरवणूक काढून विजयोत्सव करण्यास इंग्रज ( गोरी ) सेना

उपाय म्हणून इंजेक्शन द्यावयास सुई भोसकावी, तों तेथेंच फोड होऊन ती जखम जास्त चिघळत जाई. त्या प्रदेशांत सत्तर-पाऊणशें वर्षे एक गवताची काडीही उगवणार नाहीं, इतका तो प्रदेश बेचिराख व नापीक होईल असा तर्क शास्त्रज्ञांनीं व्यक्त केला. या ॲटम बाँबमध्यें असे कांहीं विलक्षण किरण असतात कीं जे त्या बाँबचा स्फोट झाल्यावर, त्या स्थळीं वातावरणांत बरेच दिवस टिकून राहातात; त्यामुळें बाँबच्या स्फोटाच्या वेळेस तेथील सर्व सामान्य जनतेच्या हालचाली व इतर वस्तूंचे ठसे यांचें छायाचित्र त्या ठिकाणीं जसेंच्या तसें उमटलेलें दिसत असे. पुन्हा अशाच प्रकारचा दुसरा एक बाँब जपानवर टाकण्यांत आला. त्यानेंही तसेंच घोर परिणाम घडून आले. शिवाय आणखी १५-१६ तरी तसल्या प्रकारचे बाँब तयार असल्याचें अमेरिकेनें घोषित केलें ! आधींच अन्नटंचाईमुळें जपान्यांची उपासमार होऊं लागलेली होती. शस्त्रास्त्रें, मनुष्यबळ, आरमार व हवाई दल हीं सुद्धां दिवसेंदिवस कमी होऊं लागलीं. त्यांत आणखी या ॲटम बाँबच्या अमानुष संहाराची भर पडली. याच कोष्टकानें संहार होऊं लागला तर जपानी वंश आणि त्याची भूमि हीं दोन्ही नष्ट होण्यास वेळ लागणार नाहीं, असें जपानी मुत्सद्यांस स्पष्ट दिसूं लागलें. इकडे रशियानेंही जपानविरुद्ध युद्ध पुकारून मांचूरियावर हल्ला केला. मोडकळीस येत चाललेल्या जपानवर यामुळें प्राणांतिक आघात झाला. एरवीं रशियानें जपानविरुद्ध युद्ध पुकारलें नसतें. कारण पॅसिफिक महासागरांत, अमेरिकेला शह म्हणून जपानला जिवंत ठेवणेंच रशियास सर्व दृष्टीनें इष्ट होतें. परंतु जपान आतां हरणार असें स्पष्ट दिसूं लागल्यावर आपण जर स्वस्थ राहिलों तर ब्रिटिश आणि अमेरिकन फौजा या प्रदेशांत येतील व आपलें बस्तान बसवितील; त्यापेक्षां जपानचें निमित्त करून आपण या प्रदेशांत खुशाल हातपाय पसरावे असें ठरवून रशियानें जपानविरुद्ध युद्धाची घोषणा केली ! रशियानें युद्धघोषणा केल्यावर रशियाच्या अपेक्षेबाहेर अवघ्या २-३ दिवसांत जपान शरण आल्यामुळें रशियाला आपलें सैन्य दूरवर पसरविण्यास अवसर मिळाला नाहीं. म्हणून जपानची शरणगति घोषित झाल्यावर सुद्धां, ‘ या जपान्यांचा काय नेम सांगावा ’ या निमित्तानें रशियानें चीन, मंगोलिया व मांचूरियाचा अवाढव्य प्रदेश हस्तगत केला ! म्हणून त्यांनीं १२ ऑगस्ट रोजीं बिनतारी यंत्रानें चर्चिल, स्टॅलिन व ट्रुमन या तिघांची पॉटस्डॅम् मुक्कामीं खलबतें चालू असतांना त्यांस, आपण शरण येण्यास तयार असल्याचें सांगितलें. त्यांनीं घातलेल्या सर्व अटी मान्य करून १४ ऑगस्ट १९४५ रोजीं जपाननें त्यांस शरण आल्याचें कळविलें व अशा रीतीनें हें जागतिक युद्ध संपलें !

या दिवसांत हिंदी लोकांचा जोम आणि उत्साह कायम ठेवण्याकरतां म्हणून सिंगापुरांतील झांशी-राणी पथकाच्या नाट्यमंडळातर्फे नेताजींनीं, प्रस्तुत ग्रंथकर्त्यांच्या ‘ झांशीची राणी ’ या नाटकाचे बरेच प्रयोग पुन्हा करवून घेतले

कांहीं प्रयोग स्वातंत्र्य-सैन्याच्या सैनिकांकरतां म्हणून करण्यांत आले व कांहीं सिंगापुरांतील हिंदी जनतेकरतां झाले. १५ ऑगस्ट १९४५ रोजीं या नाटकाचा सिंगापुरांतील शेवटला प्रयोग सेलेतार लष्करी शिक्षणकेंद्रांत सर्व स्वातंत्र्य-सैनिकांसाठीं करण्यांत आला. यापूर्वींच बिघडत चाललेल्या परिस्थितीमुळें झांशी-राणी पथकाच्या सर्व स्त्री-सैनिकांस दोन-दोन, तीन-तीन महिन्यांची रजा देऊन त्यांस त्यांच्या त्यांच्या घरीं पाठविण्यांत आलेलें होतें. रंगूनमधून पीछेहाट करून झांशी-राणी पथकाच्या ज्या स्त्री-सैनिक बँकॉकमध्यें आल्या त्या सिंगापुरास परत जाण्याच्या अगोदर आठ-दहा दिवस, रोज दुपारीं नेताजी स्वतः एक तासभर त्याच्यापुढें 'राजकारण व स्त्रियांचें कार्य' या विषयावर व्याख्यान देत. जागतिक युद्ध संपलें व या सैनिकांस आपापल्या घरीं जावें लागलें तरी त्यांस देशकार्य करणें कसें शक्य आहे, तें त्यांनीं त्या भाषणांतून समजावून दिलें.

जपानच्या शरणागतीचें वृत्त नेताजींस सिंगापूर मुक्कामींच कळलें. त्यांच्या पुढच्या कार्याची रूपरेषा त्यांनीं मनांत अगोदरच ठरविलेली होती. १६ ऑगस्ट १९४५ रोजीं सकाळीं नेताजी सिंगापुराहून विमानानें निघाले व दुपारीं ४ वाजण्याच्या सुमारास बँकॉक येथें येऊन पोंचले. त्यानंतर कांहीं वरिष्ठ जपानी अधिकाऱ्यांच्या बरोबर नेताजींनीं सुमारें दीड तास वाटाघाटी केल्या. स्वातंत्र्य-सैन्याचे कांहीं प्रमुख अधिकारीही या प्रसंगीं हजर होते. त्या वाटाघाटी संपल्यावर त्यांनीं स्वातंत्र्यसैन्याच्या ( बँकॉकमधील ) रुग्णालयास व सैनिकांच्या दोन तीन छावण्यांस भेट दिली. जपान शरण येऊन जागतिक युद्ध बंद झालें होतें तरी जपाननें जिंकलेल्या प्रदेशांतून जपानी सैन्याचें ठाणें कायम होतें. ॲटम बाँब व त्यामुळें झालेली जपानची दुर्धर परिस्थिति यामुळें त्यांनीं बिनतारी यंत्रानें आपली शरणागती परस्पर, इंग्रज व अमेरिकन अधिकाऱ्यांस कळविली होती. त्यांनीं जिंकलेल्या प्रदेशांतून हातघाईच्या लढाईनें कांहीं त्यांचें उच्चाटन झालेलें नव्हतें. दूरपूर्वेंतील सर्व देशांपैकीं फक्त फिलीपीन्स व ब्रम्हदेश येथेंच इंग्रज आणि अमेरिकन सैन्य होतें. सिंगापूर, मलाया, सयाम, इंडोचायना, चीन, कोरिया, टायवान हा प्रदेश अजून जपान्यांच्या ताब्यांतच होता. युद्ध थांबल्यावर १०-१५ दिवसांनीं अगदीं घाबरत घाबरत व पूर्ण सुरक्षिततेबद्दल जपान्यांकडून पुन्हा पुन्हा आश्वासनें घेत इंग्रज व अमेरिकन सैन्यें या प्रदेशांत उतरलीं ! जपानी सैनिक कसा असतो याची त्यांस युद्धआघाडीवर पूर्ण कल्पना होती. अर्थात् तो शरण आल्याचें घोषित झालें तरी त्यांचा त्या गोष्टीवर विश्वास बसेना व कांहीं दगा-फटका होणार अशी त्यांची मनोदेवता त्यांस सांगत होती ! सिंगापूरसारख्या ठिकाणीं जेथें साम्राज्य सेना उतरवावयाची होती, तेथें इंग्रज अधिकाऱ्यांनीं हिंदी तुकड्या आधीं उतरविल्या. कारण जपान्यांच्या मनांत खरोखरच कांहीं काळें-बेरें असलें तर हिंदी सैनिक पुढें असलेले बरे ! वास्तविक विजय झाला म्हणजे मिशांवर ताव देत मिरवणूक काढून विजयोत्सव करण्यास इंग्रज ( गोरी ) सेना

सर्वांत पुढें व रणांगणांत शत्रूवर तुटून पडावयाचें असलें म्हणजे हिंदी सेना आधीं, असें इंग्रजांचें नेहमींचेंच धोरण असे. त्याप्रमाणेंच जपानी मोकळे असतांना सिंगापूरांत उतरण्याची त्यांची छाती होईना म्हणून त्यांनीं हिंदी तुकड्यांस अगोदर उतरविलें.

जागतिक युद्ध संपल्याचें घोषित झाल्यापासून तों प्रत्यक्ष इंग्रज सैन्य उतरेपर्यंत जपानी सेनेस व स्वातंत्र्यसेनेस आपली आवराआवर करण्यास १५-२० दिवस सर्व प्रकारची मोकळीक होती. अर्थात् जागतिक युद्ध संपल्यावरही नेताजींस सिंगापुराहून बँकॉककडे व नंतर टोकिओच्या रोखानें जाणें कसें शक्य झालें याबद्दल आश्चर्य वाटावयास नको. १६ ऑगस्ट १९४५ रोजीं रात्रभर त्यांनीं स्वातंत्र्यसैन्याच्या अधिकाऱ्यांशीं वाटाघाटी केल्या. ते म्हणाले, “ जागतिक परिस्थितीमुळें कांहीं काळ आपल्याला शस्त्र खालीं ठेवावें लागलें, तरी आपला लढा संपला असें मात्र समजूं नका. आपला स्वातंत्र्यसंग्राम चालूच आहे. स्वातंत्र्य परत मिळेपर्यंत इंग्रजांविरुद्ध असलेला आपला लढा कधींही थांबणार नाहीं.” हे त्यांचे अखेरचे शब्द होते. १७ ऑगस्ट १९४५ रोजीं पहांटे ४ वाजतां नेताजी बँकॉक विमानतळावरून आपल्या इतर साथीदारासह निघाले. ते स्वतः, हबिबुर रहिमान, एक जपानी जनरल व इतर दोन-तीन जपानी अधिकारी असे एका विमानांत होते. दुसऱ्या विमानांत स्वातंत्र्यसैन्याचे कांहीं अधिकारी व एक-दोन जपानी अधिकारी होते. हीं दोन्हीं विमानें बरोबर प्रवास करीत, सायगांव-मार्गें टायवान ( फॉर्मोसा ) बेटावर गेलीं. तेथून पुढें टोकिओस जाण्याचा त्यांचा बेत होता. परंतु दुपारीं २॥ चे सुमारास फॉर्मोसा बेटावरून उड्डाण करून दोन-तीन मिनिटें होतात न होतात तोंच नेताजींच्या विमानाचा एक पंखा तुटून खालीं पडला व त्यामुळें विमानाचा तोल सुटून विमान खालीं आदळलें. विमानाच्या वेगामुळें तें आदळून हवाई मैदानावर फरफटलें. विमानांतील पेट्रोलची टाकी फुटून दुर्दैवानें जळतें पेट्रोल नेताजींच्या अंगावर फेकलें गेलें. त्यांच्या डोक्यास व खांद्यास गंभीर स्वरूपाच्या जखमा झाल्या. अंगास चिकटून बसणारा खाकी फौजी पोषाख असल्यामुळें तो चटकन् काढतां आला नाहीं. नेताजींचें सर्वांग भाजलें. त्यांस लगेच रुग्णालयांत नेण्यांत आलें. परंतु १८ ऑगस्ट रोजीं सायंकालीं ७ वाजण्याच्या सुमारास अत्यंत शोकजनक परिस्थितींत ‘नेताजी सुभाषचंद्र बोस’ यांचें देहावसान झालें ! कर्नल हबिबुर रहीमान व त्यांचे इतर साथीदार हे शेवट-पर्यंत नेताजींच्या बरोबर असल्यामुळें इतर सबळ पुराव्याच्या अभावीं नेताजींच्या देहावसानाचें हेंच वृत्त खरें मानलें पाहिजे. नेताजी खरोखरच हयात असले तर ज्या स्वातंत्र्यसैनिकांस दोन वर्षेपर्यंत त्यांचा निकट सहवास घडला त्यांच्याहून अधिक आनंद कोणास होणार ! परंतु कर्नल हबिबुर रहमान हे जेव्हां प्रत्यक्ष घडलेली व डोळ्यांनीं पाहिलेली एकीगत म्हणून त्या नेताजींच्या निधनाचें वृत्त सांगतात, तेव्हां दुर्दैवानें ती गोष्ट खरी आहे असें मानावें लागतें. तरी आज हिंदु-

स्थानांत या प्रश्नाला जें महत्त्व प्राप्त झालें आहे, त्या दृष्टीनें केवळ एक तिऱ्हाईत या नात्यानें आजपर्यंत उपलब्ध झालेल्या सर्व माहितीच्या साहाय्यानें आपण या प्रश्नाचा साधकबाधक रीतीनें सविस्तर विचार करूं.

जपानी वृत्तसंस्थेप्रमाणें हा अपघात १८ ऑगस्ट १९४५ रोजीं दोन प्रहरीं झाला व नेताजींचें देहावसान त्याच दिवशीं सायंकाळीं झालें. परंतु ही बातमी टोकिओ रेडिओनें २३ ऑगस्ट १९४५ रोजीं कां जाहीर केली ? नेताजींनीं जर खरोखरच देशांतर केलें असलें तर इंग्रज व अमेरिकन इत्यादींनीं त्यांच्या मागावर जाऊं नये म्हणून हा पांच दिवसांचा अवधी मुद्दाम जाऊं दिला असावा. ते सुरक्षित स्थळीं पोंचल्याचें वृत्त कानीं आल्यावर, आतां तशी घोषणा करावयास हरकत नाहीं, असें सर्वानुमतें ठरणें शक्य आहे. इंग्रज व अमेरिकन अधिकारी जपानमध्यें येण्याच्या अगोदर अशी घोषणा केली गेली नसती, तर त्यांनीं आल्याबरोबर ताबडतोब श्री. सुभाषचंद्रांबद्दल चौकशी केली असती. अर्थात् नेताजींस सुरक्षित स्थळीं पोंचण्यास पुरेसा अवसर तर मिळावा, परंतु टोकिओ रेडिओवर पाश्चात्त्य अधिकाऱ्यांना ताबा मिळावयाच्या आंत त्यांच्या निधनाची बातमी जगभर प्रसृत व्हावी, अशा दृष्टीनें १८ ऑगस्टला टायवान येथें त्यांचें निधन झालें, असें २३ तारखेस घोषित करण्यांत आलें असावें. एरवीं पांच दिवस पुढें ढकलण्यासारखी ही बातमी क्षुल्लक नव्हती. टायवान हें असें ठिकाण आहे कीं, तेथें हिंदी लोक फारसे नसल्यामुळें तेथेंच नेताजींना मरण आलें असें सांगितलें म्हणजे ही बातमी खरी किंवा खोटी याचा शोध करण्यास पाश्चात्त्य अधिकाऱ्यांस कांहीं पुरावा मिळूं नये, हाही उद्देश असूं शकतो. ज्या अपघातानें नेताजी व इतर जपानी अधिकारी तात्काळ मरण पावले त्यांतून कर्नल हबिबुर रहिमान हे कसे वांचले ? त्यांच्या उजव्या हाताच्या तळव्याची मागची बाजू किंचित् भाजल्यासारखी दिसते एवढेंच. त्यांच्या शरिरांत कायम विकृति कांहींच झालेली नाहीं. अपघाताच्या वेळीं नेताजींच्या हातांत जें घड्याळ होतें, त्यालाही बंद पडण्यापलीकडे इतर दुखापत बाहेरून तरी मुळींच झालेली दिसत नाहीं. तें अगदीं जसेंच्या तसें आहे. एकाद्या उडत्या विमानांतून अथवा उंच ठिकाणावरून तें मुद्दाम खालीं भिरकावून देऊन बंद पाडलें गेल्याचा संभव आहे. जागतिक युद्ध संपल्यावर स्वतंत्र ब्रह्मदेशाचे अधिपति डॉक्टर बा मॉ यांच्याबद्दल जपान्यांनीं असें सांगितलें कीं, " ते बँकॉकहून टोकिओस जात असतांना वाटेंतच त्यांचें विमान बेपत्ता झालें. अर्थात् त्यांच्याबद्दलची आशा सोडून देणेंच इष्ट आहे. " नॅन-किंग येथील राष्ट्रीय चिनी सरकाराच्या अध्यक्षांबद्दल टोकिओ रेडिओनें सांगितलें कीं, " ते जपानमध्यें आत्महत्या करून ग्रारले. " आज वरील दोन्ही व्यक्ती हयात आहेत ! चुंगकिंग सरकाराच्या अधिकाऱ्यांनीं तर नॅनकिंग सरकाराच्या या वरिष्ठांस जपानांतून धरून नेऊन चीनमध्यें त्यांच्यावर खटला भरण्यास

सुरुवात केली. वरील दोन खोट्या बातम्यांप्रमाणें नेताजींबद्दलची टोकिओ-रेडिओची बातमी खोटी असणें संभवतें. नेताजींस विमान अपघात झाला, तेव्हां त्या आदळलेल्या विमानाचें छायाचित्र आज उपलब्ध आहे. तसेंच नेताजींचें शव त्यांच्या निधनानंतर ज्या पेटींत ठेवलें असें सांगतात, त्या पेटीचें व त्यांची रक्षा ज्या पेटींत आहे असें सांगतात त्या पेटीचें अशीं आणखी दोन छायाचित्रें उपलब्ध आहेत. परंतु नेताजींच्या अंत्यदर्शनाचें छायाचित्र एकही नाहीं ! नुसतें नाटक करावयाचें झालें तरी, किंवा खरोखरच तसें घडलें असलें तरी त्यांच्या अंत्यदर्शनाचें छायाचित्र घेणें जरूर होतें. युद्ध संपल्यावर, कांहीं दिवसांनीं एक अज्ञात इसम बँकॉक येथील स्वातंत्र्यसंघाच्या कचेरींत आला व तेथील कांहीं अधिकाऱ्यांस सांगूं लागला, " मी स्वातंत्र्यसैन्यांत होतों. आत्तांच मी एका ठिकाणाहून आलों. तेथें नेताजी सुरक्षित आहेत व १४ ऑक्टोबर १९४५ रोजीं ते ( सध्यां आहेत त्या ठिकाणांहून हालतील व ) दुसऱ्या एका स्थळीं जातील. " या इसमास तेथील लोकांनीं वेड्यांत काढलें व त्याच्या म्हणण्याकडे त्या वेळेस विशेष लक्ष दिलें नाहीं. नेताजी रंगूनहून बँकॉक येथें आले त्याच वेळीं असें बोललें जात होतें कीं, जपानचा पराभव झाला तर नेताजींस स्वतःच्या बचावाकरतां म्हणून नव्हे ( नेताजींनीं स्वतःच्या सुरक्षिततेबद्दल कधींच चिंता बाळगिली नाहीं ) तर हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्याकरतां दुसरीकडून उठाव करण्यास देशांतर करावें लागेल. वर उल्लेखिलेल्या सर्व गोष्टी नेताजी सुभाषचंद्र बोस हयात आहेत अशा तर्कास पुष्टिकारकच आहेत.

उलट, ते आज हयात नाहींत, याला प्रत्यक्ष पुरावा म्हणजे कर्नल हबिबुर रहिमान यांची साक्ष. जागतिक युद्ध थांबल्याबरोबर नेताजी वारले अशी बातमी येणें यांत कांहीं तरी गोम असली पाहिजे, असें कित्येकांस वाटतें. परंतु संकटें आलीं म्हणजे तीं सर्व बाजूंनीं एकदम येतात हा आपला नित्याचा अनुभव आहे. इटालीचा पराजय आणि मुसोलिनीचा मृत्यु, जर्मनीचा पराभव आणि हिटलरचा अंत, हें जर खरें तर स्वातंत्र्य-सरकारावर अरिष्ट आल्याबरोबर त्या सरकाराच्या तेजस्वी संस्थापकाचा शेवट होणें ही ईश्वराच्या अगाध लीलेंतील अगदींच अशक्य कोटींतील गोष्ट असली पाहिजे, असें हमखास म्हणतां येत नाहीं. वर दिलेल्या साधकबाधक गोष्टींवरून प्रत्येकानें स्वतःपुरता काय तो निष्कर्ष काढावा.

या प्रश्नाच्या गुंतागुंतीचा उलगडा करतांना आणखीही अनेक लहान सुटीं टोकें सांपडतात व तीं ओढण्याचा मोह होतो. परंतु अशानें उलगडा होण्याच्या ऐवजीं अधिकच गुंतागुंत होऊन भलत्या ठिकाणीं गांठ बसण्याचा संभव असल्यामुळें आपण हा मोह आवरून तीं टोकें न ताणणें हें अंतिम ध्येयाच्या दृष्टीनें श्रेयस्कर ठरणार आहे.

नेताजी हयात असले तर ते हिंदुस्थान स्वतंत्र होईपर्यंत कोठेंतरी दडून असतील असें समजणाऱ्यांना नेताजी ही कशा प्रकारची व्यक्ती आहे याची यत्किंचितही कल्पना नाहीं असेंच म्हटलें पाहिजे. नेताजी सुभाषचंद्र बोस हे जीव बचावण्यासाठीं अथवा योग्य कालाची वाट पाहात, स्वस्थ बसणारे गृहस्थ नव्हेत. माझ्या त्यांच्या दोन वर्षांच्या निकटच्या परिचयामुळें मी असें छातीठोकपणें सांगूं शकतों कीं, त्यांच्या आयुष्याचा प्रत्येक क्षण ते स्वातंत्र्यकार्यांत खर्च करीत असतात. ते एक निढावलेले कर्मयोगी, स्थितप्रज्ञ अथवा प्रयत्नवादी आहेत. स्वातंत्र्यकार्यास्तव ते रात्रीची झोंपसुद्धां कधीं घेत नाहींत हें आपण यापूर्वीं पाहिलेंच आहे. सध्यांच्या मध्यवर्ती काँग्रेस सरकारानें त्यांच्यावरील निर्बंध काढून घेतले तरी नेताजी कां येत नाहींत? असा कित्येकजण प्रश्न करतात. परंतु सरकारी निर्बंध किंवा परवानगी यांचा विचार त्यांच्या मनास शिवतही नाहीं. प्रत्यक्ष रक्त सांडल्याशिवाय आणि उघड युद्ध पुकारल्याशिवाय केवळ परकी सत्तेशीं कधीं सहकार तर कधीं असहकार करून स्वातंत्र्य कधींच मिळणें शक्य नाहीं, अशी त्यांची खात्री झालेली आहे. आज जर हिंदी जनतेनें परकी सत्तेविरुद्ध युद्ध पुकारलें तर या लढ्याचें मार्गदर्शन करण्यास सुभाषचंद्र असतील तेथून मोठ्या आनंदानें धांवत येतील. परंतु कांहीं अंशीं आपल्याच कांहीं व्यक्तींच्या आडकांठीमुळें व कांहीं अंशीं परकी सत्तेमुळें सध्यां तरी कांहीं काल हें शक्य नाहीं. असें त्यांस वाटेपर्यंत ते बाहेरूनच कांहीं करण्याचा यत्न करीत, प्रत्येक क्षण देशसेवेंतच वेचीत असतील अशी सर्व हिंदी बांधवांनीं खात्री बाळगावी. अर्थांतच ते हयात असले तरची ही सर्व गोष्ट आहे!

नेताजी हयात असले तर त्यांस मात्र या गोष्टीचा होत असलेला उहापोह मुळींच खपणार नाहीं. ते नेहमीं म्हणत कीं, "हिंदी लोकांस एकादी गोष्ट गुप्त राखतां येत नाहीं, ही हिंदी लोकांची फार वाईट खोड आहे. विनाकारण एकाद्या गोष्टीची चर्चा करणें, आपला कांहीं एक संबंध नसलेल्या गोष्टींबद्दल रिकाम्या चौकशा करणें, अघळपघळ बोलणें, आपला बडेजाव मिरविण्याकरतां गुप्त गोष्टींचा स्फोट करणें, हीं हिंदी लोकांची वृत्ति केव्हां बदलेल ती बदलो, परंतु आज तरी ते या बाबतींत समाजाच्या किंवा राष्ट्राच्या जबाबदार व्यक्ती या नात्यानें वागत नाहींत. ही खोड आपण आपल्यांतून जितक्या लवकर घालवूं तितकें चांगलें." ते हिंदुस्थानांतून कसे निसटले? हा प्रश्न जेव्हां अनेकांनीं त्यांस विचारला, तेव्हां त्यावर त्यांचें एक ठरलेलें उत्तर असे, "हिंदुस्थान स्वतंत्र झाल्याशिवाय मी त्या गोष्टीची वाच्यता करणार नाहीं; कारण एकतर मला मदत करणाऱ्या व्यक्तींस त्रास होऊं नये व शिवाय इतरांस त्या मार्गाचा अवलंब करावा लागला तर तो मार्ग इंग्रजांना बंद करतां येऊं नये." हा प्रश्न त्यांस कोणीही विचारला म्हणजे नेताजींस हिंदी लोकांच्या नसत्या चौकस वृत्तीबद्दल कींव येई व रागही येई.

तिकडे मे महिन्याच्या सुरुवातीस रंगून इंग्रजांच्या हातांत पडलें तरी उत्तर ब्रह्मदेशांतील रानांवनांत स्वातंत्र्यसैन्याचा व जपानी सैनिकांचा प्रतिकार चालूच होता. मे महिन्याच्या १४ तारखेस सकाळीं १० वाजतां श्री. शहानवाजझ यांच्या तुकडींतील कांहीं सैनिक व अधिकारी साम्राज्य-सेनेच्या ताब्यांत सांपडले. उरलेल्या सैनिकांसह रानोमाळ हिंडतां हिंडतां व अनेक गोळीबारांतून वांचून श्री. शहानवाझ हे त्याच महिन्याच्या १७ तारखेस श्री. धीलन व ८० सैनिक यांच्या-सह शत्रूच्या ताब्यांत सांपडले. श्री. सहगल यांच्या तुकडीचीही तीच गत झाली.

सिंगापूर बँकॉक व रंगून येथें अनुक्रमें जनरल झमान क्यानी, जनरल जगन्नाथराव भोसले व जनरल लोकनाथन् यांच्या अधिपत्याखालीं त्या त्या ठिकाणचें स्वातंत्र्यसैन्य होतें. इंग्रजांचें हिंदुस्थानावरचें आधिपत्य आम्ही मानीत नाहीं, अर्थात् आम्ही आपण होऊन त्यांच्या हातीं कधींच पडणार नाहीं, असें ज्यांस वाटत होतें व ज्यांस परदेशांत स्वतंत्रपणें राहणें शक्य होतें, ते आपल्या छावण्यांतून निघून गेले. मात्र असे लोक फार थोडे होते. पैशाचें पाठबळ, स्थानिक लोकांच्या ओळखी, तद्देशीय भाषांची ओळख, सर्वसामान्य जागतिक परिस्थितीचें ज्ञान, परदेशांत काळ कंठण्याची तयारी इत्यादि गोष्टी ज्यांस अनुकूल होत्या ते नागरीक बनून बाहेर राहिले व इतर सर्व आपापल्या छावण्यांत राहिले. इंग्रज अधिकाऱ्यांनीं त्या त्या प्रदेशाचा ताबा घेतला. तेव्हां स्वातंत्र्य सैन्याचीं हत्यारें काढून घेऊन त्यांच्या छावण्यावर त्यांनीं आपले पहारेकरी बसविले

———

## हिकारी कीकान : २७

'हिकारी' याचा अर्थ प्रकाश व 'कीकान' या शब्दाचा अर्थ एंजिन असा आहे. परंतु या शब्दार्थाचा व त्या खात्याच्या विशिष्ट कामाचा अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं, असें जपानी अधिकारी म्हणत. या खात्यास हें नांव पडण्याचें कारण काय, हें कळण्यास कांहीं मार्ग नाहीं असेंही ते सांगत. परकी लोकांवर नजर ठेवणें व जिंकलेल्या परकी लोकांस आपल्या युद्धकार्यास जुंपणें हीं दोन मुख्य कामें या खात्याकडे असत. हिंदी स्वातंत्र्य-चळवळ, हा आपल्या हातचा मळ अथवा आपल्या हातांतलें एक बाहुलें, अशा प्रकारचेंच वर्तन या खात्याचे अधिकारी कित्येक वेळां ठेवीत. यामुळें स्वातंत्र्य-चळवळीचें व पर्यायानें जपानी राष्ट्राचेंही फार नुकसान झालें. या खात्यानें, निदान नेताजी आल्यावर तरी सचोटीचें वर्तन ठेविलें असतें, तर तें हिंदी व जपानी अशा दोघांसही उपकारकच ठरलें असतें. या खात्यानें स्वातंत्र्य-चळवळीबाबत जें धोरण स्वीकारलें होतें, तें जपानी मंत्रिमंडळाच्या आज्ञेनें अंगिकारिलें असेल किंवा मंत्रिमंडळास आज्ञानांत ठेवून स्वतःच स्वातंत्र्य-चळवळीबद्दल चढेलपणाचें धोरण ठेवण्याचें ठरविलें असेल. परंतु जपानी मंत्रिमंडळाच्या आज्ञेनें या खात्यानें हिंदी स्वातंत्र्य-चळवळीबाबत आपमतलबी धोरण आंखलें असेल हेंच जास्त संभवतें. कारण इंग्लंड व अमेरिका यांस त्राहि भगवान् करून सोडणाऱ्या एका बलाढ्य व पाताळयंत्री राष्ट्राच्या मंत्रिमंडळास त्याचेच एक यःकश्चित् खातें अज्ञानांत ठेवूं शकेल हें विश्वासार्ह वाटत नाहीं. कसेंही कां असेना परंतु जपानची स्वार्थी वृत्ति त्यास शेवटीं हितावह ठरली नाहीं. जगांतील प्रत्येक राष्ट्रानें वैभवाच्या शिखरावर चढावें; परंतु आपल्या मित्रराष्ट्रास आपल्या हातचें बाहुलें समजणें, त्या राष्ट्राच्या अंतिम हिताबद्दल मनांत सद्हेतु न बाळगणें व त्यास शक्य ती सर्व मदत न करणें, हें नैतिकदृष्ट्या निंद्य असून परिणामीं हानिकारकच ठरतें.

हिंदी स्वातंत्र्य-चळवळीच्या संबंधांतील सर्वाधिकार हिकारी कीकान या खात्याकडे दिलेले होते. जपानी मंत्रिमंडळानें या चळवळीशीं आपला प्रत्यक्ष संबंध ठेवलेला नव्हता. ब्रह्मदेश, मलाया, फिलीपीन्स इत्यादि देशांत स्वातंत्र्य-सरकाराच्या, सैन्याच्या किंवा संघाच्या कांहीं तारा व इतर टपाल पाठवावयाचें झाल्यास, तें हिकारी कीकान खात्यातर्फेंच पाठवावें लागत असे. जपानी पुरवठा-खात्याशीं वाटाघाटी करावयाचा प्रसंग आला ( असा, प्रसंग क्वचित् यावयाचा ) तरी हिकारी कीकान खात्याचाच दुभाष्या घ्यावा लागे. आमचा हिंदुस्थानी दुभाष्या

त्यांस चालत नसे. हिकारी कीकान खात्याच्या ( इंग्रजी न जाणणाऱ्या ) वरिष्ठ अधिकाऱ्यांशीं बोलावयाचें झालें तरी हीच तऱ्हा. स्वातंत्र्यसैन्याकरतां कपडे, धान्य, भाजी, शस्त्रास्त्रें, इतर युद्धसामुग्री हें कांहींही पाहिजे असलें, तरी हिकारी कीकानकडेच मागणी करावी लागे. विमानें, आगगाड्या इत्यादि वाहनांत जागा पाहिजे असली, तर याच खात्यातर्फे ती सोय होऊं शकत असे. सयाम वगैरे-सारख्या इतर राष्ट्रांशीं संबंध ठेवावयाचा असला, तरी हें खातें मध्यें आहेच. एवंच, हिंदी स्वातंत्र्य-चळवळींतील अधिकाऱ्यांचा बाहेरील जगाशीं जेवढा म्हणून संबंध यावयाचा, तो सर्व या खात्यातर्फेच. प्रत्येक गोष्टींत स्वातंत्र्य-चळवळ हिकारी कीकानवर अवलंबून आहे, या भावनेनें हिकारी कीकानचे सर्व अधिकारी चढेल बनले होते. प्रत्येक गोष्ट त्यांच्याचतर्फे मागावी लागत असल्यामुळें, हिंदी लोक फार ' मागरे ' असतात , त्यांस चैन करावयास पाहिजे, अशा प्रकारची त्यांच्याबद्दल हिकारी कीकानच्या अधिकाऱ्यांची तुच्छतादर्शक वृत्ति बनत चालली. सर्व मागण्या त्यांच्याच मध्यस्थीनें पूर्ण व्हाव्या अशी व्यवस्था असल्या-मुळें, आपल्याशिवाय या चळवळीचें पान हालूं शकत नाहीं, अशी त्यांची आढ्यतेखोर वृत्ति होत चालली. अनेक मागण्या त्या एकाच खात्याकडे गेल्या-मुळें दर वेळेस बऱ्याचशा मागण्या पुऱ्या करावयाच्या शिल्लक उरत. त्या लवकर पूर्ण व्हाव्यात म्हणून त्यांजकडे सारखें टुमणें लावावें लागे. निरनिराळ्या जपानी खात्यांशीं वाटाघाटी करून आमच्या सर्व मागण्या पूर्ण करून देणें, एवढेंच मध्यस्थीचें काम वास्तविक हिकारी कीकानकडे असे; परंतु आपल्याला दर वेळेस हिंदी स्वातंत्र्य-चळवळीकरतां इतर जपानी खात्यांकडे तोंड वेंगाडावें लागतें, ही भावना त्यांस दिवसेंदिवस कष्टदायक होऊन, तेच आमच्या माग-ण्यांत कपात करूं लागले. प्रत्यक्ष पुरवठा-खात्याची कपात यावयाची ती वेगळीच, परंतु या केवळ मध्यस्थी-खात्यानें कपात करण्यास सुरुवात केली. एखादे वेळेस जपानी पुरवठा-खात्याशीं प्रत्यक्ष वाटाघाटीचा संबंध आणून आम्ही आमची मूळची मागणी त्यांच्यापुढें ठेवली व हिकारी कीकानविरुद्ध कांहीं सांगितलें, तर हिकारी कीकानचा दुभाष्या व पुरवठा-खात्याचा वरिष्ठ अधिकारी आपापसांत कुजबुज करून शेवटीं आमच्याविरुद्धच त्या गोष्टीचा निकाल करीत. जपानी म्हटला कीं तो तिऱ्हाइतापेक्षां आपल्याच माणसाचें ऐकणार; मग आपल्या माणसाचें म्हणणें चूक का असेना! धान्य-पुरवठाखातें, युद्धसामुग्री-पुरवठाखातें, वाहतुकखातें इत्यादि अनेक जपानी खात्यांशीं हिंदी स्वातंत्र्य-चळवळींतील अधिकाऱ्यांचा परस्पर संबंध असता, तर दोन वर्षांच्या या चळवळींत त्या त्या खात्याकडे पांच-सहा वेळेपेक्षां अधिक वेळां मागणीं करण्याचा प्रसंग कधींच आला नसता. त्या त्या खात्यांनींही आमच्या मागण्या आनंदानें पूर्ण केल्या असत्या. मधल्या मध्यें मागण्यांत कपात करणारें किंवा कलागती लावणारें हिकारी कीकानसारखें खातें नसतें तर आमचा मार्ग अधिक सुलभ झाला असता.

स्वतःच्या लक्षावधी सैनिकांच्या मागण्या पूर्ण करणाऱ्या त्या त्या जपानी खात्यास आमच्या चाळीस-पन्नास हजार सैनिकांच्या मागण्या पूर्ण करणें मुळींच जड गेलें नसतें. सर्व मागण्या विभागून अनेक खात्यांकडे वेगवेगळ्या गेल्यामुळें हिकारी कीकानसारखा त्यांस जाच वाटला नसता व हिंदी अधिकाऱ्यांस सारखा हात पसरण्यापलीकडे दुसरा कांहीं उद्योग नसतो, अशी त्यांची कुत्सित भावनाही झाली नसती.

दुर्दैवानें हिकारी कीकानच्या नेहमींच्या ठराविक मध्यस्थीनें, 'आपणच हिंदी स्वातंत्र्य-चळवळीबाबत एकमेव शक्ती आहोंत; आपण सांगूं तसेंच त्या चळवळीच्या अधिकाऱ्यांस वागावें लागेल' अशी त्यांची हुकूमशाही वृत्ति शेवटपर्यंत कायम होती. आमचें म्हणणें इतर खात्यांपुढें ठेवतांना, 'हे हिंदी लोक नेहमीं मागतच असतात, परंतु आम्हीच जपानी राष्ट्राचें हित डोळ्यापुढें ठेवून त्यांच्या मागण्यांत आवश्यक ती कपात करून तुमच्यापुढें ठेवीत आहोंत' असें त्यांस नेहमीं भासवून, ते त्या त्या जपानी खात्याकडून व मंत्रिमंडळाकडून शाबासकी मिळवीत. इकडे ते हिंदी अधिकाऱ्यांस असें सांगत कीं, 'तुमची मागणी वाजवीपेक्षां मोठी असूनसुद्धां आम्ही पुरवठा-खात्याच्या अधिकाऱ्यांशीं भांडून ती पूर्ण करवून घेतली.' अशा तऱ्हेनें कांहीं काम करून दाखविण्याच्या ऐवजीं दोन्हीकडे आपली प्रौढी व टेंभा मिरविण्याकडेच दिवसेंदिवस त्यांची प्रवृत्ति दिसूं लागली. जपानी मंत्रिमंडळास व इतर खात्यांच्या अधिकाऱ्यांस हिकारी कीकानचे अधिकारी असें भासवीत असत कीं, 'पहा, तुम्हांला कमींत कमी खर्च किंवा त्रास सोसावयास लावून आम्ही हिंदी स्वातंत्र्य-चळवळ कशी विनबोभाट चालवीत आहोंत.' जपानी मंत्रिमंडळाकडून व इतर खात्यांकडून त्यांस धन्यवाद मिळाले असोत किंवा नसोत, परंतु त्यांनीं हिंदी लोकांची सहानुभूती मात्र सर्वस्वीं गमाविली.

कचित् एकादें काम आम्ही एकाद्या जपानी खात्याशीं परस्पर संबंध ठेवून करवून घेतलें, अशी कुणकुण हिकारी कीकानाला लागली, तर ते ताबडतोब त्या खात्याकडे आपला मनुष्य पाठवून असें कळवीत असत कीं, 'हिंदी अधिकाऱ्यांशीं परस्पर संबंध ठेवूं नये. त्यांच्याबद्दलची सर्व माहिती आम्हांला अगोदर विचारावी. आम्ही त्यांचा स्वभाव पूर्णपणें जाणतों. ते वाटेल तशा भरमसाट मागण्या करितात. त्यांना इतकें सामान देणें योग्य नाहीं.' अशा तऱ्हेचें वाटेल तें सांगून ते हिंदी लोकांबद्दल त्यांचें मन पूर्ण कलुषित करीत असत. एवंच, स्वातंत्र्य-चळवळीची जेथें तेथें अडवणूक करून ते सर्व बाबतींत मुखत्यार बनलेले होते.

हिंदी स्वातंत्र्य-सरकाराच्या जेथें जेथें मुख्य कचेऱ्या होत्या, त्या त्या ठिकाणीं हिकारी कीकानच्याही मुख्य कचेऱ्या होत्या. परंतु शिवाय जागोजाग पसरलेल्या स्वातंत्र्यसंघाच्या कचेऱ्यांस व स्वातंत्र्यसैन्याच्या तुकड्यांस सर्व बाब-

तींत मदत करण्यास म्हणून, स्थलकालाप्रमाणें हिकारी कीकानचे पांच-पांच, सहा सहा लोक जोडलेले असत. परदेशीं टपाल पाठविणें, विमानें, आगगाड्या इत्यादि वाहतुकीचीं साधनें जरूर तर्शीं उपलब्ध करून देणें, कांहीं बाबतींत स्थानिक जपानी अधिकाऱ्यांची मदत लागल्यास त्यांच्याशीं वाटाघाटी करून त्यांच्याकडून ती मदत घेणें, अशा प्रकारचें काम हिकारी कीकानच्या लहान लहान तुकड्यां-कडे असे. फौजी आगगाड्या इतर प्रवाश्यांच्या गाड्यांप्रमाणें आगाऊ तयार केलेल्या विशिष्ट वेळापत्रकाप्रमाणें निघत नसत. जरूर असेल त्याप्रमाणें कमीजास्त डबे व एक किंवा दोन एंजिनें लावून गाड्या सोडल्या जात. कारण कांहीं कांहीं दिवशीं फार मोठमोठ्या तुकड्या जावयाच्या असत, तर कधीं कधीं इकडून तिकडे बदली होणारीं थोडीशींच माणसें जावयाचीं असत. एवढ्याकरतां प्रत्येक खात्या-कडून फौजी रेल्वेअधिकाऱ्यांस असें कळविलें जाई कीं, 'साधारण अमक्या तार-खेच्या आंत आमचीं इतकीं इतकीं माणसें अथवा अमुक अमुक संख्येच्या इतक्या तुकड्या एका विविक्षित स्थळीं जावयाच्या आहेत; तरी त्या अनुरोधानें, तुमच्या गाड्यांत जागा असेल त्याप्रमाणें आम्हांस कळवावें.' सैनिकांची संख्या, दर्जा, कामाची निकड, जाण्याचें ठिकाण ही सर्व माहिती फौजी रेल्वेखात्यास पुरविली जाई. सर्वसाधारण, 'अगदीं निकडीचें काम', 'घाईचें काम' व 'सामान्य प्रतीचें, सावकाश झालें तरी चालण्यासारखें' असे तीन प्रकारचे कामाबद्दलचे शेरे असतात. फौजी रेल्वेअधिकाऱ्यांस निरनिराळ्या अधिकाऱ्यांकडून सैनिकांच्या वाहतुकीसाठीं वेळोवेळीं जी माहिती पुरविली जाई, त्यावर वरील तिन्हींपैकीं एक शेरा असे. डबे व एंजिनें उपलब्ध असतील त्याप्रमाणें निकडीच्या कामास प्राधान्य देऊन फौजी रेल्वेअधिकारी निरनिराळ्या खात्यांकडून आलेल्या मागण्यांचा संकलित विचार करून सर्वांच्या जाण्याची सोय करीत. कोणत्याही खात्यातर्फे कांहीं सैनिकांची बदली व्हावयाची असली, अथवा त्यांना आपल्या तुकड्या इतरत्र पाठवावयाच्या असल्या कीं, लगेच एक माहितीपत्रक तयार करून त्याच्यावर वरीलप्रमाणें कोणता तरी शेरा मारून तें रेल्वेअधिकाऱ्यांकडे पाठविण्यांत येई. अशा तऱ्हेचीं पत्रकें जरुरीप्रमाणें त्या त्या दिवशीं रवाना केलीं जात. रेल्वेअधिकारीही, रोज येऊन पडणारीं हीं पत्रकें पडताळून पाहून त्यांची योग्य ती व्यवस्था लावीत. अशा तऱ्हेनें आम्हांला जेव्हां जेव्हां आमचीं कमी-अधिक माणसें अन्यत्र पाठवावीं लागत, तेव्हां आम्ही हीं माहितीपत्रकें तयार करून तीं हिकारी कीकानकडे पाठवीत असूं किंवा प्रत्यक्ष देत असूं. कारण त्यांचे व आमचे अधिकारी बहुधा रोज भेटत असत. हीं माहितीपत्रकें घेऊन त्यांच्या जपानी भाषेंत दोन प्रती तयार करून हिकारी कीकान खातें एक प्रत स्वतःकडे ठेवी व दुसरी (जपानी फौजी) रेल्वे-खात्याकडे पाठवी. पुढें सोईप्रमाणें रेल्वेखात्याकडून हिकारी कीकानला त्यासंबंधींची व्यवस्था कळे. एकाद्या तुकडीबरोबर तोफा, मोटारी, धान्यसामुग्री, शस्त्रास्त्रें अथवा कपड्यालत्त्याच्या पेट्या इत्यादि जावयाचें असल्यास अथवा अशा प्रकारचें

सामान नुसतेंच एका ठिकाणांहून दुसऱ्या ठिकाणीं पाठवावयाचें झाल्यास, सामानाचें मोजमाप, वजन वगैरे माहिती पुरविणारें एक माहितीपत्रक तयार करण्यांत येई व त्याचीही रेल्वेखात्याकडून व्यवस्था होत असे.

अशा तऱ्हेनें कोणत्याही खात्याकडून कांहींही काम करून घ्यावयाचें झाल्यास हिकारी कीकानच्या मध्यस्तीनेंच तें करून घ्यावें लागत असल्यामुळें त्या खात्याचे अधिकारी क्वचित् उद्धट, आढ्यताखोर व लांगूलचालनप्रिय दिसून येत. स्वातंत्र्यसैन्याला माल पुरवितां पुरवितां ते बरेचसे पैसे व माल स्वतःच्या खाजगी उपयोगाकरतां ठेवून घेत. अशींही कांहीं उदाहरणें घडलीं. इतर जपानी अधिकाऱ्यांशीं किंवा आपापसांत, त्यांचीं हिंदी अधिकाऱ्यांविरुद्ध काय काय कारस्थानें चालत हें कळण्यास, जपान्यांची जगाविराहित असलेली भावलिपी, त्यांची भाषा, त्यांचे सांकेतिक शब्द, गौप्यरक्षणाची संवय, कांहींही झालें तरी परकीयांपेक्षां स्वजनांचेंच ऐकणें, केवढीही लालूच दाखविली तरी फितुरी न करणें, परकीयांचे हस्तक न बनणें, अशा अनेक अडचणी होत्या. प्राण गेला तरी एकही जपानी तिऱ्हाइतासमोर स्वजनांची किंवा स्वराष्ट्राची नालस्ती करणार नाहीं! सायगांवला असतांना आम्ही एकदां रेडिओ ऐकत बसलों होतों. हिकारी कीकानचाही एक अधिकारी तेथें होता. दिल्लीहून सायंकाळीं जपानी भाषेंत जो कार्यक्रम चालत असे, तो लावून मी त्या हिकारी कीकानच्या एका अधिकाऱ्यास म्हटलें, "हा काय म्हणतोय त्याचा अर्थ मला सांग पाहूं." तेव्हां त्या गृहस्थानें शेवटपर्यंत उडवाउडवीचीं उत्तरें दिलीं पण त्याचा अर्थ कांहीं सांगितला नाहीं! कांहीं दिवसांनीं हाच प्रयोग त्याच्या एका सहकाऱ्याच्या बाबतींत आम्ही केला, तरी तीच गत!

सर्व परकीयांबद्दल आत्यंतिक अविश्वास दर्शवून, त्यांच्या सर्व हालचालींवर बारीक नजर ठेवावयाची हा एक जपान्यांचा स्वभावविशेष झालेला आहे. या स्वभावास अनुसरून स्वातंत्र्य-चळवळींतील वरपासून खालपर्यंत यच्चयावत् सर्व अधिकाऱ्यांवर पाळत ठेवणें, हें एक हिकारी कीकानचें मुख्य अंग होतें. जर्मन लोकांबद्दलसुद्धां प्रत्येक जपानी म्हणत असे कीं, त्यांची व आमची मैत्री ही खरी मैत्री नव्हे. ही केवळ वरपांगी व राजकीय मैत्री आहे. आमच्याबद्दलही त्यांचें तेंच मत होतें. आमच्याजवळ त्यांनीं तें तसें बोलून दाखविणें अर्थातच शक्य नव्हतें; परंतु त्यांच्या वर्तनावरून तें स्पष्ट दिसत असे.

स्वातंत्र्यसैन्याची वाढ पन्नास हजारांपर्यंत होऊं द्यावी असा जरी टोकिओमध्यें उभयपक्षीं करार झाला होता, तरी दर वेळेस हिकारी कीकानचे लोक त्यांत कांहीं ना कांहीं खोडा घालीत. सिंगापुरांतील हिंदी स्वातंत्र्यसंघानें रिक्रूट भरतीकरतां म्हणून जेव्हां 'आझाद हिंद' या वर्तमानपत्रांत जाहिरात दिली, तेव्हां त्या कचेरीस जोडलेला हिकारी कीकानचा अधिकारी, संघाच्या कार्यकर्त्यांस म्हणाला कीं, "तुम्ही जर तुमच्या सैन्यवाढीकरतां हिंदी नाग-

रिकांचा सैन्यांत भरणा करूं लागलांत, तर जपानी अधिकाऱ्यांस निरनिराळ्या कामाकरतां हवे असलेले मजूर व मनुष्यबळ कसें मिळेल ? अर्थात् तुम्ही तुमची जाहिरात काढून घ्यावी." या गोष्टीवर पुष्कळ रण माजलें. शेवटीं हिकारी कीकानच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांस असा स्पष्ट सवाल विचारण्यांत आला कीं, "आम्ही निदान पन्नास हजारांपर्यंत तरी आमच्या सैन्याची वाढ करूं शकतों, असें एकदां ठरल्यावर तुमची दर वेळेस मध्यें मध्यें ही लुडबुड कशाला ?" त्या वेळेस ते म्हणत कीं, "आमचें काम काय आणि तुमचें काम काय ? ह्या वेगवेगळ्या गोष्टी थोड्याच आहेत ? आमचा जय होणें यांतच तुमचा जय आहे. आम्ही तुम्ही एकच आहोंत. अर्थात् आमची सोयही तुम्ही पाहावी." ही लाघवी भाषा मान्य न करून त्यांच्या सर्वोच्च अधिकाऱ्याच्या कानीं ही गोष्ट घातली कीं, तोही हें प्रकरण विकोपास जाऊं नये म्हणून धूर्तपणें म्हणे, "छे हो, तुम्ही त्या आमच्या यःकश्चित् अधिकाऱ्याकडे काय लक्ष देतां ! तो लहान आणि अननुभवी आहे. या बाबतींत तो जरा कच्चा आहे. कोणाशीं कसें वागावें हें त्यास समजत नाहीं. त्याचें मत म्हणजे काय हिकारी कीकानचें अधिकृत म्हणणें थोडेंच आहे. त्यानें आपलें स्वतःचें एक मत म्हणून तसें सांगितलें..." अशा तऱ्हेचें ढोंग ते अधिकारी करीत असत. तरी तो सर्वोच्च अधिकारीही "तुम्ही जाहिरात द्या, कांहीं हरकत नाहीं" असें स्पष्टपणें कधींच म्हणत नसे. "आपण या गोष्टीवर बोलून आपआपसांत काय तें ठरवूं" अशा तऱ्हेचें मोघम बोलून ठेवून, "तोंवर तरी कृपा करून जाहिरात देऊं नका" अशा प्रकारची त्याची विनंति ठरलेलीच !

आपण एकाद्या लहान मुलाची समजूत घालण्याकरतां ज्याप्रमाणें तिसऱ्याच एकाबास लटकें रागें भरतों, त्याच्याकडे पाहून डोळे मिचकावितों, अगदीं त्याच पद्धतीचें हिकारी कीकानचें वर्तन असे ! त्यांस असें वाटे कीं, आपण फार धूर्त असून हिंदी लोकांस हातोहात चकवीत आहोंत. पण हिंदी लोकही कांहीं खुळे नव्हते. जपान्यांच्या हातीं सत्ता आहे, अर्थात् त्यांच्या हातून काम करून घ्यावयाचें असल्यास त्यांस खूष करून, वेळेस वाटेल तें सोंग करण्यास कांहीं हरकत नाहीं, अशा तऱ्हेचें 'चोरावर मोर' पद्धतीचें वर्तन हिंदी लोकांचें होतें. वर उल्लेखिलेल्या प्रसंगीं अर्थातच रिक्रूटभरतीसाठीं जाहिरात देण्यांत आलीच, परंतु उभयपक्षांतील वाटाघाटींत बरेच दिवस गेले व विनाकारण डोक्यास त्रास झाला. तेवढ्यांत तिकडे जपानी अधिकाऱ्यांची सक्तीची मजूरभरती चालूच होती. कधीं कधीं ते म्हणत कीं, "तुम्ही स्वातंत्र्यसैन्याची वाढ करावी– जरूर करावी–आम्ही तरी काय हेंच म्हणतों; परंतु हें तत्त्व जरी अगदीं तर्कशुद्ध असलें तरी तें प्रत्यक्षांत उतरविण्यांत बऱ्याच अडचणी आहेत." हीच अडचण जेव्हां रंगूनमध्यें नेताजींस जाणवूं लागली, तेव्हां नोव्हेंबर १९४४ च्या एका पत्रांत जनरल जगन्नाथराव भोसले यांस उद्देशून

त्यांनीं लिहिलें, " मला असें मोठ्या दुःखानें म्हणावें लागत आहे कीं, स्वातंत्र्य-सैन्याची पन्नास हजारांपर्यंत वाढ होऊं देण्याचें स्वतःचें वचन, हिकारी कीकानचे अधिकारी आतां नाकबूल करीत आहेत. ... "

जपानी अधिकाऱ्यांचें व सैनिकांचें वैशिष्ट्य हें होतें कीं, एकाद्या यंत्रांतून तयार करून काढल्याप्रमाणें सर्व अधिकारी व सैनिक अगदीं एका सांच्याचे होते. डोळे मिटून कोणताही जपानी अधिकारी उचलावा व त्याच्या स्वभावावरून इतर सर्व अधिकाऱ्यांचा स्वभाव ओळखावा ! स्वदेशाकरतां प्राण अर्पण करण्याची तयारी, कामाचा विलक्षण उरक, सर्व बाबतींत कमालीची गुप्तता, परकीयांबद्दल कमालीचा अविश्वास हे त्यांचे स्वभावविशेष होते. हे स्वभावविशेष हिकारी कीकानच्या सर्व अधिकाऱ्यांत अगदीं पूर्णतेनें वसत होते. मित्रराष्ट्रांबद्दल जपान्यांना वाटणारा अविश्वास तिरस्करणीय होता. पूर्वीं एकदां सांगितल्याप्रमाणें, स्वातंत्र्यसैन्याच्या तुकड्यांस मलायांतून ब्रह्मदेशाकडे कूच करतांना कांहीं ठिकाणीं वाहनांची सोय होईपर्यंत मुक्काम करावा लागे. सयाममधील ' चुम्फोन ' हें अशाच प्रकारचें एक मुक्कामाचें ठिकाण होतें. येथें एका तुकडीला महिना-दीड महिना तळ देऊन राहावें लागलें. या तुकडीचा मुख्य अधिकारी लेफ्टनंट कर्नलच्या दर्जाचा होता. त्यास मदत करण्याकरतां म्हणून हिकारी कीकानचा एक लेफ्टनंट व त्याचे दोन-चार सहकारी या तुकडीबरोबर होते. एके दिवशीं तो जपानी लेफ्टनंट हिंदी मुख्य अधिकाऱ्यास सांगूं लागला, " जपान्यांचें व सयामी लोकांचें वितुष्ट आहे. तें केव्हां विकोपास जाईल याचा नेम नाहीं; तरी तुम्हीही तुमची तुकडी आमच्या बाजूनें लढण्याकरतां जय्यत तयार ठेवावी... " हिंदी अधिकाऱ्यानें त्यांस स्पष्ट सांगितलें, " नेताजींकडून आम्हांला आज्ञा होईपर्यंत आम्ही कोणाविरुद्ध लढणार नाहीं. विशेषतः सयामशीं तर आमचें कांहींच भांडण नाहीं. ते लोक चांगले आहेत. आमच्याशीं ते चांगले वागतात. तुमचें वाकडें आलें तर तुम्ही वाटल्यास लढा, परंतु आम्ही कांहीं तुम्हांस मदत करणार नाहीं. आम्ही तटस्थ राहूं. "

एके प्रसंगीं चुम्फोनमध्यें असलेल्या हिंदी तुकडीच्या या अधिकाऱ्यानें तेथील सयामी बड्या लाटास सहभोजनाचें आमंत्रण दिलें. सहभोजनाची जी वेळ ठरविण्यांत आली होती, त्याच्या अर्धा-पाऊण तास अगोदर हिकारी कीकानचा अधिकारी येऊन चिकित्सा करूं लागला कीं, " तुम्ही सयामी अधिकाऱ्यांशीं किंवा इतर लोकांशीं संबंध कां ठेवतां ? त्यांच्याकडून कांहीं काम करून घेण्याकरतां त्यांच्याशीं संबंध ठेवावाच लागला, तर तुम्ही तें परस्पर न करितां आम्हांला सांगावें. आम्ही त्यांच्याशीं बोलणें करूं. या बड्या लाटास आमंत्रण देण्यांत तुमचा काय हेतु आहे ? शक्य असल्यास हा सहभोजनाचा कार्यक्रम रद्द करा ... " —अशा तऱ्हेची हिकारी कीकानच्या अधिकाऱ्यांची लुडबूड सारखी चालू असे.

चुम्फोनचीच गोष्ट. तेथें असलेल्या एका जपानी खात्यास कांहीं कामाकरतां मजूर पाहिजे होते; म्हणून हिकारी कीकानचा हा अधिकारी या हिंदी तुकडींतील लोक मागूं लागला. त्यावर त्या हिंदी अधिकाऱ्यानें स्पष्ट सांगितलें कीं, आमचे सैनिक तुमची मजुरी करण्याकरतां येथें आलेले नाहींत. या प्रकरणावरून थोडीशी बाचाबाची झाली, तेव्हां हिंदी अधिकाऱ्यानें त्यास बजावलें, "हें पहा, माझ्याजवळ दीड-दोन हजार लोक आज तयार आहेत. तुम्ही जर कांहीं गडबड केलीत, तर माझ्या एका शब्दासरशीं माझे लोक तुमच्या लोकांवर तुटून पडतील. तुम्ही कोठल्या घमेंडींत आहांत ?" असें खडसावल्यावर मात्र तो अधिकारी वरमला. अशा तऱ्हेचीं हिकारी कीकानच्या अधिकाऱ्यांशीं स्वातंत्र्य-सरकाराच्या, संघाच्या व सैन्याच्या अधिकाऱ्यांचीं नेहमीं भांडणें होत. मतभेदाचे अनेक प्रसंग येत.

हिंदी अधिकाऱ्यांचा जपानी मंत्रिमंडळाशीं व इतर मुख्य मुख्य जपानीखात्याशीं परस्परसंबंध असता तर फारच उत्तम झालें असतें, ही गोष्ट नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या लक्षांत आली नव्हती असें नाहीं. परंतु हिकारी कीकान खात्यास अजिबात उडवून लावणें हें त्यांस शक्य नव्हतें. हिंदी स्वातंत्र्य-चळवळीस मदत करण्यांत जपानचा स्वार्थी हेतूच जास्त स्पष्ट होत होता. या विधानास पुष्टिकारक अशीं पुढच्या प्रकरणांत जीं अनेक प्रमाणें मी देणार आहें, त्यांत हिकारी कीकानसारख्या खात्याकडे स्वातंत्र्य चळवळीबाबतचे सर्वाधिकार सोपविणें व स्वातंत्र्य-चळवळींतील अधिकाऱ्यांचा जपानी मंत्रिमंडळाशीं आणि इतर खात्यांशीं प्रत्यक्ष संबंध येऊं न देणें, हें एक प्रमुख प्रमाण म्हणतां येईल. एकाद्या मित्रराष्ट्राप्रमाणें हिंदी चळवळीस मदत करण्याचें जर जपानी मंत्रिमंडळाच्या मनांत खरोखर असतें, तर त्यांनीं त्याच्याकरतां निराळें असें एक विशिष्ट खातें न ठेवितां, हिंदी स्वातंत्र्य-सरकाराचा व आपला इतर बरोबरीच्या राष्ट्रांप्रमाणें परस्परसंबंध ठेविला असता. हिकारी कीकान खात्यास जपानी मंत्रिमंडळाकडून असाच आदेश होता कीं, "स्वातंत्र्य-चळवळीचा सर्व खेळ चालविणें हें आम्हीं तुमच्यावर सोपविलें आहे. कोणीकडूनही आपल्या युद्धकार्यास हिंदी लोकांची जास्तींत जास्त मदत होईल तेवढें करा. त्यांचा बोजा आपल्यावर विशेष पडूं नये व त्यांस बलवान् होऊं देतां कामा नये. नाहींतर ते आपल्यालाच डोईजड व्हावयाचे. शेवटपर्यंत ते आपल्या कह्यांत व आपल्यावर अवलंबून राहिले पाहिजेत. आम्ही अधूनमधून त्यांचें थोडें ऐकल्यासारखें करूं, परंतु शेवटीं पुन्हा तुमच्याकडेच सर्व सोपवूं. हिंदी स्वातंत्र्य-चळवळीबाबत व एकंदरीनें आपल्या सर्व मित्रराष्ट्रांबद्दल जपान्यांचें असें अविश्वासात्मक व दुटप्पी धोरण असल्यामुळें त्यांचा व त्यांच्याबरोबर इतर सर्वांचाच घात झाला!

व्यक्तीव्यक्तींच्या मैत्रीप्रमाणें आंतरराष्ट्रीय मैत्रीसुद्धां फसवेगिरीवर कधींच टिकून राहूं शकत नाहीं. एकमेकांबद्दल आदर व प्रेम हीं उभयतांच्या मनांत वसत असलीं, तरच त्यामुळें परस्परांचा फायदा होतो. निदान दोघांपैकीं

एकतरी पक्का चिकटून राहणारा मित्र पाहिजे. जपानच्या हडेलहप्पी वर्तनामुळें, जपानशीं वरपांगीं मैत्री ठेवणाऱ्या राष्ट्रांस जपानच्या विजयासंबंधीं तेवढीशी आस्था नव्हतीच. त्याच्याशीं एकही राष्ट्र खरें सहकार्य करीत नव्हतें. सयामनें नुसतें नांवापुरतें इंग्रज व अमेरिकन यांच्याविरुद्ध युद्ध पुकारलें होतें. परंतु एकही शिपाई कधीं सयामच्या बाहेर पाठविला नाहीं. ब्रम्हदेशाचे सैनिक तर चिडून जाऊन स्वतःच्या जिवाची पर्वा न करितां जपान्यांच्या अंमलांतच त्यांच्या-विरुद्ध लढूं लागले.

शेवटीं शेवटीं नेताजींच्या आग्रहामुळें जपाननें श्री. हाचिया यांस जरी स्वातंत्र्य-सरकाराच्या दरबारीं जपानचा वकील म्हणून नेमलें, तरी त्याच्या नेमणुकीमुळें त्यांच्या वर्तनांत यत्किंचितही फरक झाला नाहीं. हिकारी कीकानचा अधिकार कायमच राहिला. मार्गांत असलेल्या अशा अनेक अडचणी दरक्षणीं जाणवत असूनसुद्धां नेताजी हे स्वध्येयरत असल्यामुळें मुळींच डगमगले नाहींत; यांतच त्यांची खरी मुत्सद्देगिरी दिसून येते. दुसरा एकादा मनुष्य त्यांच्या जागीं असता तर त्यानें वैतागून हें कार्य केव्हांच सोडून दिलें असतें. फार कशाला, श्री. मोहनसिंगांचें उदाहरण आपल्या डोळ्यासमोर आहेच! ‘ यांतून जेवढें निष्पन्न होत असेल, तेवढेंच आपल्या पदरांत पाडून घ्या ’ असें नेताजींचें धोरण होतें. दूरपूर्वेंतील हिंदी स्वातंत्र्य-चळवळीशीं या जपानी खात्याचा निकटचा संबंध असल्यामुळें या चळवळीची पूर्ण कल्पना येण्यास हिकारी कीकानची माहिती असणें जरूर आहे. या खात्याची माहिती दिल्याशिवाय दूरपूर्वेंतील या हिंदी स्वातंत्र्य-चळवळीचा इतिहास परिपूर्ण होत नाहीं, सबब हें प्रकरण खर्चीं घालावें लागलें.

---

## उपसंहार : २८

या प्रकरणांत उरलेल्या अनेक प्रश्नांचा थोडक्यांत विचार करण्याचें योजिलें आहे. ही स्वातंत्र्य-चळवळ यशस्वी न होण्याचीं कारणें काय, त्याचा आपण प्रथम विचार करूं. कोणतेंही सैन्य विजयी व्हावयास सर्व सैनिकांत ध्येयनिष्ठपणें लढण्याची तयारी लागते. हिंदी स्वातंत्र्यसैन्याची अशा प्रकारची तयारी होती याबद्दल शंका नाहीं. विजयास आवश्यक अशी दुसरी गोष्ट म्हणजे पुरेसें मनुष्यबळ व यंत्रसामुग्री. हिंदी स्वातंत्र्यसैन्याची संख्या चाळीस हजारच होती. वाहनाचीं साधनें, विमानदल, नौकादल, रणगाडे, पुरेशा तोफा, जरूर तेवढा कपडालत्ता ही आवश्यक युद्धसामुग्री स्वातंत्र्यसैन्याजवळ नव्हती. या युद्धसामुग्रीकरतां त्यास जपान्यांवर अवलंबून राहावें लागलें. फार काय, अन्नधान्याच्या पुरवठ्याचें कामसुद्धां जपान्यांकडेच होतें. सैन्यास अत्यावश्यक अशा गोष्टी निदान युद्धआघाडीवर तरी ज्याच्या त्याच्या स्वतंत्र असल्याशिवाय कसा अनावस्था प्रसंग ओढवतो, हें आपण इंफाळच्या लढ्याच्या संबंधांत पाहिलेंच आहे. जपान्यांची युद्धसामुग्री तुटपुंजी होती. तेवढ्यावरही एकट्या इंग्रजांना ते पुरून उरत. तशा तुटपुंज्या युद्धसामुग्रीच्या साहाय्यानेंच त्यांनीं हिंदुस्थान-ब्रह्मदेश या सरहद्दीवर कित्येकपट अधिक असलेल्या व सर्व दृष्टींनीं सुसज्ज अशा साम्राज्यसेनेस 'दे माय धरणी ठाय' करून सोडलें. परंतु इंग्रजांच्या मदतीस जेव्हां अमेरिकेचीं हजारों विमानें ब्रह्मदेश-सरहद्दीवर आलीं, रणगाडे व इतर अभेद्य चिलखताची अपार युद्धसामुग्री जेव्हां आली, पॅसिफिक महासागरांतही जेव्हां अमेरिकेचें अजस्र हवाई व आरमारी काफिले येऊं लागले, तेव्हां मात्र जपानवर आभाळ फाटल्याप्रमाणें होऊन त्यांस हें सावरूं कां तें सावरूं, असें होऊन गेलें. अर्थात् तुटपुंजी युद्धसामुग्री हें एक पराभवाचें मोठें कारण होय.

तुटपुंज्या सामुग्रीचे परिणाम वरवर दिसतात त्यापेक्षां फार दूरगामी होते. उदाहरणार्थ, विमानांच्या पंख्यांच्या खालच्या बाजूस हिंदी तिरंगी निशाण रंगवून अशा विमानांच्या झुंडीच्या झुंडी रोज हिंदुस्थानांतील इंग्रजांच्या हवाई तळावर हवाई हल्ले करण्याकरतां येत्या, तर हिंदी लोकांच्या मनावर त्याचा विलक्षण परिणाम होऊन ते आपण होऊनच इंग्रजांविरुद्ध उठले असते. दूरपूर्वेतील हिंदी स्वातंत्र्य-चळवळीबद्दल इंग्रजांनीं हिंदी लोकांस अज्ञानांत ठेविलेलें होतें. या चळवळीबाबत कसल्याही प्रकारची माहिती एतद्देशीय वर्तमानपत्रांतून छापण्यास

इंग्रजांनीं बंदी केली होती. यास शह देण्याकरतां म्हणून दूरपूर्वेतील अनेक ठिकाणीं रोज वर्तमानपत्रें छापून तीं हवाई हल्ला करावयास जाणाऱ्या विमानांच्या साहाय्यानें हिंदुस्थानांतील प्रमुख ठिकाणीं टाकावयास पाहिजे होतीं. युद्धाच्या आघाडीवर, हिंदुस्थान-ब्रह्मदेश-सरहद्दीच्या दऱ्याखोऱ्यांत, साम्राज्य-सेनेंतील हिंदी सैनिकांस आमच्या चळवळीची पूर्ण कल्पना करून देण्यास मोठमोठ्या दूरध्वनिक्षेपकांची जरूर होती. यांतून सरहद्दीवरील सर्व गिरिकंदरांत नेताजींचा स्फूर्तिदायक स्वातंत्र्यसंदेश घुमवितां आला असता. परंतु हें सर्व करण्यास कांहींच सामुग्री नव्हती. इंग्रजांच्या बाजूस हिंदुस्थान, चीन, अमेरिका, आफ्रिका, कॅनडा व ऑस्ट्रेलिया इतक्या अवाढव्य देशांचें मनुष्यबळ व आवश्यक तो कच्चा माल असतांनासुद्धां हिंदुस्थानांत सर्वसामान्य जनतेची अन्नान्न दशा झाली, कागदाची व कापडाची टंचाई तीव्रतेनें जाणवूं लागली, सरकारी कचेऱ्यांतून टांचण्यांच्या ऐवजीं बाभळीचे काटे विकत घेऊन वापरावे लागले! जपान तर बोलून चालून गरीब देश. त्यानें जिंकलेले प्रदेशही गरीब, मागासलेले. तेथें कशी परिस्थिति असेल याची ज्यानें त्यानें कल्पनाच केलेली बरी.

तथापि शक्य होती तेवढीही मदत जपाननें केली नाहीं. हिंदी स्वातंत्र्य-चळवळीस मदत करण्यांत जपानचा शुद्ध हेतु असता, तर आज या इतिहासास निराळेंच वळण लागलें असतें. आपण मदत करून हिंदुस्थानाचें हित व्हावें, तो स्वतंत्र व्हावा असें जपान्यांस खरोखरच वाटत असतें व त्या दृष्टीनें त्यांनीं तन-मन-धनानें स्वातंत्र्यसैन्यास मदत केली असती, तर होती तेवढी सामुग्री आसाम आणि बंगाल हे दोन प्रांत जिंकण्यास पुरे होती. एवढा प्रदेश स्वातंत्र्यसैन्याच्या ताब्यांत आल्यावर, इतर प्रांतांतील हिंदी लोकांस श्री. सुभाषचंद्र बोस व त्यांची स्वातंत्र्य-चळवळ यांविषयीं खात्री पटून, 'बंगाल व आसाम प्रांत स्वतंत्र झाले, अर्थात् आपणही स्वातंत्र्य मिळवावें' या ईर्षेनें त्यांनीं स्वयंस्फूर्तीनें इंग्रजांच्या विरुद्ध युद्ध पुकारून त्यांस पराभूत केलें असतें. निदान एवढें खरें कीं, बंगाल व आसाममधील हिंदी लोकांचें अवाढव्य स्वातंत्र्यसैन्य उभें करून त्यायोगें हिंदुस्थान स्वतंत्र करितां आला असता. आत्यंतिक स्वार्थानें व संशयी वृत्तीनें जपाननें 'ना तुला ना मला, घाल कुत्र्याला' अशी स्थिति करून घेतली.

आमच्यांतही कांहीं कमी दोष नव्हते. नेताजींच्या तोडीचा व त्यांच्या इतकी कळकळ व जाज्वल्य देशभक्ति असणारा आमच्याकडे दुसरा एकही मनुष्य नव्हता. देशभक्तीच्या सुद्धां अनेक पायऱ्या असतात. नेताजींसारखी रात्रंदिवस स्वातंत्र्याची ज्याला तळमळ लागलेली असते तो सर्वोच्च देशभक्त म्हणतां येईल. अशा व्यक्तीस दुसरें कांहींही व्यवधान नसतें. कसल्याही खडतर परिस्थितींत त्याला टाका किंवा अगदीं चैनींत वा सुखांत ठेवा, त्याच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या प्रयत्नांत कधींही खंड पडणार नाहीं. स्वतःच्या समजुतीप्रमाणें यथाशक्ति त्याचे प्रयत्न सतत चालू राहतील. देशभक्तीची दुसरी पायरी म्हणजे नेत्याच्या

दिव्य उदाहरणानें प्रेरित होऊन सर्वस्वाचा त्याग करण्याची व नेता सांगेल त्याप्रमाणें एकनिष्ठपणें कार्य करून देशाकरतां प्राणार्पण करण्याची तयारी असणें. हे लोक नेता असेल तोंपर्यंत व तो सांगेल त्याप्रमाणें वाटेल तें कार्य करण्यास तयार होतात. आपल्या सर्वस्वावर पाणी सोडून, रिक्रूट म्हणून भरती होऊन हिंदुस्थान-ब्रह्मदेश सरहद्दीवर अथवा अन्यत्र, कर्तव्य समजून स्वातंत्र्ययुद्धांत प्राणार्पण करणारे असे लोक या कक्षेंत येतील. गुप्त कार्य करण्याकरतां म्हणून हिंदुस्थानांत पाठविलेल्या बऱ्याच लोकांस इंग्रजांनीं फांशीं दिलें, तरी त्यांनीं त्यांजपाशीं आपल्या जीवाची याचना केली नाहीं किंवा शरण जाण्याची गोष्टही काढली नाहीं. दूरपूर्वेंत स्थायिक झालेले ( यांतील बहुतेक सर्व तामीळ अथवा मलबारी होते ) व पराक्रमाचीं कृत्यें करून मृत्यूस कवटाळणारे वीर या दुसऱ्या पायरीचे देशभक्त होत. 'आपण सैन्यांत आहोंतच, अर्थात् इंग्रजांच्या बाजूनें लढण्यापेक्षां स्वदेशाकरतां लढणें केव्हांही चांगलें. आपण नेताजींना स्वामिनिष्ठ राहूं. भ्याडपणें इंग्रजांस जाऊन मिळणार नाहीं अथवा फितुरीही करणार नाहीं, अशा निश्चयानें व निर्मल हेतूनें युद्धबंद्यांतून स्वातंत्र्यसैन्यांत सामील होऊन धारातीर्थीं पतन पावलेले वीर हे देशभक्तीच्या तिसऱ्या श्रेणींत मोडतात. ' आपण आपला उद्योगधंदा अथवा स्वार्थ कांहीं सोडणार नाहीं, परंतु आपला व्यवसाय सांभाळून पैशानें अथवा शारिरीक मेहनतीनें जेवढें कांहीं देशकार्य, फूल नाहीं फुलाची पाकळी, करितां येणें शक्य असेल, तेवढें मात्र आनंदानें, सचोटीनें, उत्साहानें व कसोशीनें करूं,' अशा विचाराचे लोक हे चवथ्या कोटींतले. यांत फौजी व बिनफौजी कार्यकर्त्यांचा आणि यथाशक्ति द्रव्यदान करणाऱ्या लोकांचा अंतर्भाव होतो. कोणाच्या अध्यांत नाहींत मध्यांत नाहींत, अधिकारी सांगतील तितकें काम करतील व मागतील तितके पैसे बिनबोभाट देतील; मात्र एरवीं स्वतः होऊन कांहीं देणार नाहींत किंवा करणार नाहींत. सदिच्छा व्यक्त करण्यापलीकडे स्वतः होऊन कांहीं न करणारे हे लोक शेवटल्या पायरीचे देशभक्त होत. याशिवाय, स्वातंत्र्यचळवळ यशस्वी होऊं नये असें मनांतून चिंतिणारे, त्यांत अडथळे आणणारे, किंवा पैसा, मानमरातब इत्यादींसाठीं स्वातंत्र्य-चळवळींत भाग घेणारे, जपान्यांचे हस्तक म्हणून काम करणारे, अशा प्रकारचे अधम लोकही कांहीं थोडे थोडके नव्हते. दूरपूर्वेंत स्वातंत्र्य-चळवळ फार जोरांत झाली व तेथें नेताजी सुभाषचंद्र बोस होते म्हणून दूरपूर्वेंतलि सर्वच हिंदी लोक देशभक्त होते असें समजणें चुकीचें होईल. हिंदुस्थान बरींच वर्षें पारतंत्र्यांत पिचल्यामुळें हिंदी लोकांचा सर्वांगीण अधःपात झालेला आहे. वर वर्णिल्याप्रमाणें अगदीं पहिल्या प्रतीचा देशभक्त प्रत्येक पिढींत एकाद दुसराच आढळतो. दुसऱ्या प्रतीचे लोक थोडे थोडके आढळतील व त्या प्रमाणांत पुढील सर्व वर्गांचे अधिकाधिक आढळतील. परंतु सर्वसामान्य हिंदी लोक हे शेवटल्या दोन वर्गांतच मोडतील.

जपान व जर्मनीसारख्या तेजस्वी स्वतंत्र राष्ट्रांतील सर्वसामान्य जनता ही सर्व-साधारणपणें दुसऱ्या वर्गात मोडते. हिंदी जनतेला ती पायरी गांठावयाची आहे, हें प्रत्येकानें लक्षांत ठेवावें. याकरतां प्रत्येक व्यक्तीनें दर क्षणीं आपली जबाबदारी ओळखून वागलें पाहिजे. स्वतःच्या आढ्यतेच्या भरीस पडून कामाची नासाडी करणारे, जपान्यांचे हस्तक बनून, त्यांस बित्तंबातमी पुरविणारे, वाईट हेतूनें स्वातंत्र्य-चळवळींत शिरणारे असे लोकही दूरपूर्वेंत कांहीं कमी नव्हते. अर्थात् आमच्या दोषांमुळेंही स्वातंत्र्य-चळवळीची कांहीं थोडी थोडकी नासाडी झाली नाहीं, हें यापूर्वींच्या निरनिराळ्या प्रकरणांतून प्रसंगाप्रसंगानें ठिकठिकाणीं थोडेंबहुत दाखवून दिलेंच आहे.

दूरपूर्वेंतील हिंदी स्वातंत्र्य-चळवळ अयशस्वी होण्याचीं जीं मुख्य कारणें वर देण्यांत आलेलीं आहेत, त्यांपैकीं जपान्यांचा मतलबी हेतु व त्यांची नाममात्र मदत असें एक जें सांगण्यांत आलेलें आहे, त्याच्या पुराव्यादाखल अनेक उदाहरणें सांगतां येतील. १७ फेब्रुवारी १९४२ रोजीं 'फॅरर पार्क' (सिंगापूर) मध्यें सर्व (५१,०००) हिंदी युद्धबंद्यांस राष्ट्रीय भाषणाच्या द्वारें जो स्वातंत्र्योपदेश करण्यांत आला, त्याचा परिणाम म्हणून सर्व युद्धबंद्यांनीं मोठमोठ्यानें जयघोष करून स्वातंत्र्यासाठीं लढण्याची तयारी दाखविली. असें असूनसुद्धां त्यांस निरनिराळ्या बंदीछावण्यांत बंदी म्हणून ठेवण्यांत आलें. पुढें अनेक पक्षोपपक्ष, वादविवाद, मतभेद इत्यादि होण्यास वाव मिळाला. फॅरर पार्क मैदानावर सर्वांची तयारी पाहून, त्या गोष्टीचा निष्कारण काथ्याकूट होण्यास अवसर न देतां, जणूं काय कांहींच झालें नाहीं, अशा तऱ्हेनें सर्वांची स्वातंत्र्यसेना उभी करण्यांत आली असती, तर पुढें जे अनेक प्रकार झाले व शेवटीं ५२,००० युद्धबंद्यांपैकीं केवळ २०,००० स्वातंत्र्यसेनेंत सामील झाले, तें सर्व टळलें असतें. यानंतरसुद्धां निरनिराळ्या बंदीछावण्यांतून स्वातंत्र्यसैन्यांत सामील होण्याकरतां याद्यांवर याद्या पाठविल्या जात असतांना, त्या सर्वांना बंदीछावणींतून काढून त्यांची स्वातंत्र्यसेना उभारण्यांत आली नाहीं. हिंदुस्थानांत गुप्त काम करण्यास, नभोवाणीकेंद्रावर काम करण्यास किंवा दुभाष्ये, कारकून अशा प्रकारच्या कामाकरतां जपान्यांस जे दहा-पांच लोक अधूनमधून लागत तेवढे मात्र ते नेमके; विलंब न लावतां ताबडतोब घेऊन जात. यावरून एवढें स्पष्ट दिसतें कीं, प्रचार मात्र हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्याच्या नांवानें करावयाचा व फक्त आपलें काम साधण्यापुरते लोक घ्यावयाचे, हें सुरुवातीपासून त्यांचें धोरण होतें.

कॅप्टन मोहनसिंग हे स्वातंत्र्यसेनेचे सर्वाधिकारी व श्री. राघवन्, गोहो, मेनन् इत्यादि, हिंदी लोकांचे मुलकी बाबतींतील सर्वाधिकारी असें जपान्यांनीं मान्य केलेलें होतें. तरी यांपैकीं कोणाचीही परवानगी न घेतां पेनांगच्या गुप्त-कार्यशालेंतील तयार झालेले विद्यार्थी त्यांनीं हिंदुस्थानांत कार्य करण्याकरतां

पाठवून दिले. ‘ हिंदी स्वातंत्र्यसैन्यास आम्ही हिंदुस्थान-ब्रह्मदेश या आघाडीवर लढण्याकरतां म्हणून घेऊन जातों ’ असें जपानी अधिकाऱ्यांनीं श्री. मोहनसिंग यांस २९ नोव्हेंबर, १९४२ रोजीं सांगितलें व ६ डिसेंबर रोजीं त्या सर्वांस नेण्यास जहाज आल्याचेंही कळविलें. यापूर्वीं त्यांनीं ८०० माणसांची एक तुकडी आघाडीवर पाठविलेलीच होती. अशा तऱ्हेनें हिंदी स्वातंत्र्य-चळवळीच्या अधिकाऱ्यांस धाब्यावर बसवून त्यांनीं कार्यसाधूपणाची वृत्ति ठेविली.

कॅप्टन मोहनसिंग इत्यादींनीं राजीनामा दिल्यावर श्री. रासबिहारी बोस, यांनीं इतर सहकाऱ्यांच्या साहाय्यानें नवीन राजवट सुरू केली. यापुढें असला प्रकार होऊं नये, एकाच विशिष्ट हिंदी संघटनेचें महत्त्व वाढूं नये, एवढ्याकरतां जपान्यांनीं एक ‘ युवकसंघ ’ स्थापन केला व त्याचेंच स्तोम माजविलें. आपले हस्तकच त्यांनीं नेमले. यामुळें जपान्यांच्या एकाद्या सूचनेस श्री. रासबिहारी बोस यांच्या संघटनेनें विरोध केला तर ती सूचना युवकसंघाकडून मान्य करवून घेतली म्हणजे झालें, असा जपान्यांचा डाव होता. म्हणूनच ‘ युवक संघ ’ हीच सर्व हिंदी लोकांची प्रातिनिधिक संस्था आहे, असा डांगोरा पिटण्यास त्यांनीं सुरुवात केली व त्याबरोबरच श्री. रासबिहारी बोस यांच्या कार्यकर्त्यांची अप्रतिष्ठा केली. एकूण सर्व परकीयांची एकच तऱ्हा !

हिकारी कीकाननेंही स्वातंत्र्य-चळवळींत खोडें घालण्याचा कसा प्रयत्न केला व सर्व कार्यकर्त्यांवर कशी पाळत ठेविली हें आपण मागील प्रकरणीं बघितलेंच आहे. जपाननें हिंदी स्वातंत्र्य-सरकाराशीं स्वतःचाही प्रत्यक्ष संबंध ठेविला नाहीं व इतर राष्ट्रांचाही तसा येऊं दिला नाहीं. हिंदी स्वातंत्र्यसेनेची वाढ होऊं दिली तर ती आपल्याला डोईजड होईल या भीतीनें त्यांना पछाडलें होतें, म्हणून त्यांनीं पन्नास हजारांपर्यंतच्या वाढीचें तत्त्व मान्य करून तेंही प्रत्यक्षांत उतरूं दिलें नाहीं. युद्धबंद्यांतले अनेक सैनिक स्वातंत्र्यसेनेंत येऊं इच्छित असतांनासुद्धां त्यांस येऊं दिलें नाहीं.

जागोजागच्या नभोवाणी केंद्रावरील हिंदी ( म्हणजे हिंदुस्थानाबद्दलच्या ) कार्यक्रमांवर त्यांनीं व्यर्थ नियंत्रण ठेविलें. प्रचारतंत्रांत हिंदी लोकांस जरूर तें स्वातंत्र्य ठेविलें नाहीं. हिंदी चळवळीस जरूर तें सामान पुरविण्यांतही जपान्यांनीं फाजील काटकसर दाखविली. खरोखरीच कांहीं काम व्हावें हा त्यांचा हेतु असता तर त्यांनीं असें केलें नसतें. परंतु हिंदी लोकांची सहानुभूती व मदत आपल्या उपयोगी पडावी, यापलीकडे या चळवळीला विशेष महत्त्व देण्याचें त्यांच्या मनांतही नव्हतें.

दोन उदाहरणें तर अशीं घडलीं कीं, त्यामुळें आंतरराष्ट्रीय राजकारणांत ‘ मधु तिष्ठति जिव्हाग्रे, हृदये तु हलाहलम् ’ या तत्त्वाचा सर्रास अंमल कसा असतो, हें स्पष्ट झालें. १९४४ ची गोष्ट. फकीरस्वामी नांवाचा सिंगापुरांतील एक तामीळ रहिवासी जपान्यांच्या पोलीसखात्यांत नोकरीस होता. एके दिवशीं एका

राष्ट्रीय दिनानिमित्त सिंगापुरांतील सर्व हिंदी नागरिकांनीं आपापल्या घरापुढें तिरंगी निशाणें लाविलीं. तो जपान्यांचा प्रांत असल्यामुळें त्यांच्या व आमच्या राष्ट्रीय दिनाच्या दिवशीं हिंदी नागरिकांनीं जपानी निशाण व तिरंगी ध्वज दोन्हीं उभारावयाचीं, अशी पद्धत रूढ झालेली होती. वर उल्लेखिलेल्या दिवशीं दुपारीं २ वाजण्याच्या सुमारास हा फकीरस्वामी सिंगापूरच्या मार्केट रस्त्यावर नेताजींच्या व स्वातंत्र्य-सरकाराच्या विरुद्ध अद्वातद्वा बरळत सुटला. कांहीं हिंदी नागरिकांस केव्हां धाकदपटशा दाखवून तर केव्हां मनधरणी करून त्यानें तिरंगी निशाणें खालीं उतरविण्यास सांगितलीं. "हें निशाण खरें नव्हे, जपानचेंच निशाण तेवढें उभारणें योग्य" अशा प्रकारची त्याची आरडाओरड चालली होती. या प्रकारानें प्रक्षोभित होऊन सिंगापुरांतील स्वातंत्र्यसंघाच्या अत्युच्च मध्यवर्ती कचेरीकडे, फकीरस्वामीविरुद्ध तक्रार गुदरणारे असे दोघांचे अर्ज आले. एका अर्जावर बारा हिंदी नागरिकांच्या सह्या होत्या व दुसरा अर्ज एका हिंदी नागरिकानें व्यक्तिशः केलेला होता. त्या अर्जांची दखल घेऊन फकीरस्वामीस संघाच्या कचेरींत आणण्यांत आलें. तेथेंही तो उद्दामपणें वागून उर्मटपणाचीं उत्तरें देऊं लागला, तेव्हां त्यास फाड्फाड् थोबाडांत मारून भर उन्हांत दिवसभर एका खांबाला दोरीनें आवळण्यांत आलें. तरी त्या निगरगट्ट माणसानें क्षमेची याचना केली नाहीं. दुसरे दिवशीं त्याला मुक्त केल्यावर त्यानें दारू पिऊन त्यांपैकीं एका अर्जदाराच्या दुकानांत प्रवेश केला. तेथेंही स्वातंत्र्य-चळवळीविषयीं वाटेल ते अपशब्द काढून त्यानें त्या अर्जदारास धाकदपटशा दाखविण्यास व मारहाण करण्यास सुरुवात केली. "मी स्वातंत्र्य-चळवळीविरुद्ध वाटेल तें म्हणेन, मला अडथळा करण्याची कोणाची छाती आहे ?" अशा तऱ्हेचे उद्गारही तो काढीत असे. दुसऱ्या दिवशीं पुन्हा संघाच्या कचेरींत आणून त्यास आदल्या दिवसाप्रमाणेंच शिक्षा करण्यांत आली. हें प्रकरण नंतर हिकारी कीकानला कळविण्यांत आलें. फकीरस्वामी जपान्यांच्या पोलीसखात्यांत आहे असें म्हणतांच मनांतल्या मनांत तेही काय तें समजलेच. परंतु वरवर उसनें अवसान आणून ते म्हणाले, "हो...हो तर, अशा माणसाला चांगलीच अद्दल घडविली पाहिजे ! ...तुमचें म्हणणें अगदीं बरोबर आहे." तात्पर्य, वेळेला तेवढीं आश्वासनें द्यावयाचीं, उसनें अवसान आणावयाचें व मग कामांत दिरंगाई करून तें प्रकरण शिळें झालें कीं, "आतां काय जाऊं द्या झालं ! द्या सोडून...काय मागच्या गोष्टी घेऊन बसलांत उगीच !" अशा तऱ्हेची वृत्ति धारण करावयाची हें हिकारी कीकानचें नेहमींचें ठरलेलें होतें. या वेळेसही त्यांनीं हेंच केलें. तें प्रकरण जपानी पोलीसखात्याकडे गेलें, परंतु वरिष्ठ जपानी अधिकाऱ्यांचा फकीरस्वामीच्या या कृत्यास पाठिंबा आहे, असें पाहतांच त्यांनीं तेवढी गोष्ट लपवून ठेवून, अनेक कारणें सांगून कामांत दिरंगाई केली व शेवटीं सांगितलें कीं, "फकीरस्वामीनें केलेली गोष्ट निंद्य आहे खरी, पण तो पोलीसखात्यांतील असल्यामुळें आपणास

त्याला सहजासहजीं अटक करितां येत नाहीं. पोलीसखात्याचे वरिष्ठ अधिकारी म्हणतात कीं, या माणसास अटक केली तर त्यांचें काम तर अडेलच व शिवाय त्यांच्या खात्याची इभ्रत जाईल..." आहे कीं नाहीं थेट इंग्रजी नक्कल!

थोडे दिवसांनीं दुसरा एक प्रकार घडला.प्रत्येक बंदीछावणींतून रोज सकाळीं अनेक ठिकाणीं काम करण्यास, जपानी अधिकारी हिंदी युद्धबंद्यांना लॉऱ्यांतून घेऊन जात. अशी एक लॉरी एके दिवशीं सिंगापुरांतील भररस्त्यावरून जात असतां झांशी-राणी पथकाच्या छावणीपासून कांहीं अंतरावर थांबली. त्यांतून एक हिंदी युद्धबंदी उतरला व ती लॉरी पुढें निघून गेली. झांशी-राणी पथकाच्या छावणीपुढें स्त्री-सैनिकांचाच पहारा असे. समोरच्या बाजूस मात्र स्वातंत्र्यसैन्याचा एक फौजी पोलीस दिवसभर पहाऱ्यावर असे. हा युद्धबंदी ( याचें नांव अल्लाबक्ष किंवा असेंच कांहींतरी होतें, असें नंतर कळलें. ) त्या छावणीसमोरून जातां जातां पहाऱ्यावरील स्त्री-सैनिकेच्या पुढें धरलेल्या बंदुकीस अगदीं खेटून पुढें गेला. तिनें डाव्या हातानें त्याला दूर ढकलून, " दिसत नाहीं का ? " असें रागानें विचारलें. त्याला तेंच पाहिजे होतें. तो तें न ऐकलेंसें करून, " क्याय आहे ? काय आहे ? " असें म्हणत बाचाबाची किंवा लघळपणा करावयास पुन्हा जवळ आला. तें पाहून समोरील फौजी शिपाई धांवत तेथें आला व त्यानें त्या युद्धबंद्यास चांगलेंच बदडलें.

वर वर्णिलेले हे दोन प्रकार जपान्यांच्या प्रोत्साहनाशिवाय घडणें शक्यच नव्हतें. अर्थात् त्यांस हिंदी हस्तक मिळत हें आपलें दुर्दैव ! त्यांत आपलाच दोष आहे. जपानमध्यें देशविघातक असा एकही तद्देशीय इसम मिळणें शक्य नाहीं.

वर जपान्यांचे जे कांहीं दोष सांगितले आहेत, त्यावरून जपानी हे इंग्रज व अमेरिकनांपेक्षांही वाईट, असा ग्रह करून घेणें चुकीचें होईल. त्यांचे दोष हे कांहीं जगाविरहित नव्हते. मऊ दिसलें कीं कोपरानें खणावयाचें, हें धोरण कोणतीही परकी सत्ता ठेवील त्यांत कांहींच नवल नाहीं. जपान्यांचे बरेचसे गूण अनुकरण करण्यासारखे आहेत हें यापूर्वीच्या विवेचनांत प्रसंगाप्रसंगानें उल्लेखिलें आहे. त्याचा पुनरुच्चार करण्याचें कारण नाहीं. परंतु त्याशिवाय आणखी कांहीं गूण येथें सांगावेसे वाटतात. प्रत्येक जपानी सैनिक देशकार्य करण्यास घराबाहेर पडतांना आपल्या मातेस असें सांगून निघतो कीं, " यापुढें तुझी व माझी भेट पुन्हा ' यासुकूनी ' मंदिरांतच होईल." धारातीर्थीं पतन पावलेल्यांच्या रक्षा जतन करून त्या मोठ्या समारंभानें ' यासुकूनी ' मंदिरांत पोंचवितात. ( जपानी लोक आपल्यासारखे दहन-पद्धतीचाच अवलंब करितात. ) अर्थात् यावरून " मी तुला जिवंतपणीं भेटणार नाहीं. देशाकरतां मी आनंदानें मरेन." असेंच पर्यायानें प्रत्येक जपानी शिपाई आपल्या मातेस सांगुन निघतो. तो मलमपट्टीची अगर

कुटुंबाकडील हालहवालीची कधीं आशाच ठेवीत नाहीं किंवा त्याच्या खुशालीचें वर्तमानही त्यांना कोणी कळवीत नाहीं. इतर कोणताही पाश त्यास नसतो. फक्त देशासाठीं सर्वस्वाचा त्याग एवढेंच त्याचें ध्येय असतें.

शत्रूचा कैदी होण्यासारखें लाजिरवाणें दुसरें कांहीं नाहीं, अशी प्रत्येक जपानी सैनिकाची ठाम समजूत करून दिलेली असते. शत्रूच्या ताब्यांत कैदी म्हणून जीवन कंठून, कोणीच जपानी शिपाई स्वगृहीं अथवा समाजांत तोंड दाखवूं शकत नाहीं. त्यास आत्महत्त्याच करावी लागते. विशेषतः जपानी फौजी अधिकाऱ्यानें रणांगणांत शत्रूचा कैदी होऊंच नये असा दंडक असतो. दुसरें कांहींच करितां आलें नाहीं, तर शत्रूच्या ताब्यांत पडण्याच्या अगोदर आत्महत्त्या करून प्राण देण्याची त्यांची प्रथा आहे. जपानी अधिकाऱ्याजवळ अशा वेळेस आत्महत्त्या करण्यास कांहीं शस्त्र नसलें, तर जीभ तोंडांतल्या तोंडांत एका बाजूस वळवून दोन्ही दंतपंक्तींच्या मधोमध घ्यावी व ती कडकडून चावून तिचा मोठा तुकडा पाडावा म्हणजे भयंकर रक्तस्राव होऊन प्राण सोडतां येतो—असा निःशस्त्र स्थितींत आत्महत्त्या करण्याचा शेवटचा उपाय म्हणून त्यांस अवगत असतो !

एरवीं आत्महत्त्या करावयाची तीसुद्धां भ्याडाप्रमाणें सुखासुखीं अथवा चटकन् प्राण जाईल, अशा उपायानें करावयाची नसून त्याचीही एक विशिष्ट रीत आणि संस्कार वर्णिलेला आहे. हाराकिरीनेंच ( म्हणजे पोट कापून मरण पत्करणें ) आत्महत्त्येचें पुण्य पदरीं पडतें; नाहींतर आत्महत्त्या हें पाप ठरतें, असें सर्व जपानी लोक समजतात. खंजीर घेऊन डाव्या बाजूनें उजव्या कुशीपर्यंत पोटास एक खोल आडवा चिरा द्यावयाचा व तेथून लगेच खालीं एक उभा चिरा द्यावयाचा; यानंतर स्वहस्तानें उदरांतील कोथळा बाहेर काढावयाचा; मरतांना अत्यंत सुखासमाधानानें, शांत चित्तवृत्तीनें, डोळ्यांत अश्रूंची चमक-सुद्धां दिसूं न देतां, कोणाबद्दलही राग-द्वेष मनांत न बाळगतां आत्मशुद्धीकरतां मरणें, असा त्यांचा आत्महत्त्याविधि असतो !

पाश्चात्त्य लोकांप्रमाणें जपान्यांत वर्णद्वेष मुळींच नाहीं. अमुक एक इसम काळा अथवा गोरा म्हणून ते त्यास तुच्छ लेखणार नाहींत. अर्थात् गोऱ्या लोकांनीं आजपर्यंत सर्व एशिआटिक लोकांशीं जी वागणूक ठेविली, त्याचें उट्टें काढावयास व पाश्चात्त्यांस धडा शिकविण्याकरतां म्हणून त्यांनीं गोऱ्या लोकांस कडक शासन केलें. पण तेंसुद्धां कायमचा द्वेष म्हणून नव्हे, तर पापक्षालनाची शिक्षा म्हणून. मात्र, आळशी, भ्याड, अस्वच्छ, गुलामी वृत्तीचा, लेचापेचा, गबाळ्या, स्वदेशशत्रु असा माणूस बघितला कीं, जपान्यांच्या तळपायाची आग मस्तकास पोंचावयाचीच. मग तो जपानी असो अथवा भिन्नवर्णी असो; ते त्यास तितकेंच कडक शासन केल्याविना राहात नसत.

जपानी सैनिक हा स्वतःस देशाचा भाडोत्री सैनिक असें कधींच समजत नाहीं. सयाम व जपानमध्यें एकमेकांच्या चलनासंबंधीं कांहीं वितुष्ट आल्यामुळें मे महिनाअखेर जपान्यांस सयामकडून आवश्यक तितकें सयामी चलन मिळालें नाहीं. सयाम हें स्वतंत्र राष्ट्र असल्यामुळें तेथें जपानी नोटा चालत नसत. तेथील जपानी सैनिकांससुद्धां सयामी चलनांतच पगार द्यावा लागे. एवढ्याकरतां दर सहा महिन्यांनीं जपान, सयामकडून कांहींएक विशिष्ट रक्कम उसनी घेत असे. कापड वगैरे देऊन या रकमेची फेड केली जाई. मे महिनाअखेर जरूर ते पैसे न मिळाल्यामुळें जपानी सैनिकांस जून व जुलै (१९४५) असा दोन महिन्यांचा पगार मिळाला नाहीं. एकाही सैनिकानें कधींही विचारलें नाहीं कीं, आमचा पगार अजून कां दिला नाहीं? (पगार मिळाला नाहीं म्हणून काम बंद करण्याचें तर दूरच राहो.) 'आपण एकाच राष्ट्रकुटुंबाचे घटक आहोंत, आपल्याला पगार मिळालाच पाहिजे असें नाहीं. आपल्याला हातखर्चास्तव पैसे देणें आपल्या राष्ट्रपित्यास परवडत नसेल म्हणूनच तो दिला नसेल. सवड झाली नाहीं तर राष्ट्र तरी कोठून देणार? बरेंच झालें! आपल्याला आपल्या राष्ट्राबद्दल खरी कळकळ आहे कीं नाहीं ह्याची परीक्षा देतां आली. राष्ट्राकरतां आणखी स्वार्थत्याग करण्याची संधी आयतीच चालून आली, त्यांत वाईट काय झालें?' अशीच प्रत्येक जपान्याची भावना असते; मग तो सैनिक असो अथवा साधा नागरीक असो.

पाश्चात्त्य राष्ट्रांचें असें एक फौजी तत्त्व आहे कीं, फौजेचा जामानिमा अगदीं अद्यावत् पद्धतीचा असला तरच ती उत्तम प्रकारें लढून यश संपादन करूं शकेल. जपान्यांचें तत्त्व अगदीं विरुद्ध प्रकारचें आहे. त्यांच्या मतें बाह्य उपाधींवर खऱ्या सैनिकाचा भर असतांच उपयोगी नाहीं. जितकें बाह्य संरक्षण अथवा जामानिमा अधिक, तितका तो सैनिक भ्याड व परावलंबी होईल. वीरवृत्ति हीच महत्त्वाची असून, वीरानें निधड्या छातीनेंच लढलें पाहिजे. अगदीं साध्या पद्धतीचाच सैनिक वीरश्रीनें लढूं शकतो. बचावाचीं कृत्रिम व खर्चिक साधनें सैन्यांत शिरलीं तर सैनिक भ्याड बनलाच म्हणून समजा. दुसरी एक लक्षांत घेण्यासारखी गोष्ट अशी कीं, इंग्रजांच्या लष्करी शाळांतून सैनिकांस शिक्षण देतांना प्रत्येक उदाहरणांत स्वतःचें सैन्य जास्त आहे असें गृहीत धरतात. याच्या उलट जपानी सैनिकांस रणांगणावरील अथवा दऱ्याखोऱ्यांतील युद्धतंत्राविषयीं उदाहरणें देतांना जीं उदाहरणें देतात, त्यांत शत्रु बलवान् आहे, संख्या व युद्धसामुग्री या दोन्हीं दृष्टींनीं शत्रूची ताकद आपल्या दसपट आहे, अर्थात् अशा वेळेस काय करावयाचें हें त्यांस शिकविलें जातें! इंग्रज लष्करी शिक्षक लष्करी शाळेंतील विद्यार्थ्यांस शिकवितांना फळ्यावर लुटुपुटीच्या लढाईचें चित्र काढून, शत्रु अगदीं यःकश्चित् आहे हें गृहीत धरून फळ्यावर विजयध्वज उभारतात! परंतु प्रत्यक्ष रणांगणांत पाहावें तों अजस्र सैन्य व

भरमसाट युद्धसामुग्री असूनही ते नेहमीं हरल्याचें आपण पाहातों. वर उल्लेखिलेलीं जपान्यांचीं दोन तत्त्वें हीं त्यांच्या वीरवृत्तीचींच निदर्शक आहेत. म्हणूनच एक जपानी सैनिक दहांना भारी असतो.

जपानी लोक क्रूर असतात, असा पाश्चात्त्य लोकांनीं डांगोरा पिटलेला आहे. परंतु समतोल बुद्धीनें या गोष्टीचा विचार केला तर एशिआटिक लोकांच्याविरुद्ध चाललेल्या पाश्चात्त्यांच्या प्रचारतंत्रांतील हें एक नवीन सोंग आहे असेंच म्हणावें लागेल. हिंदुस्थानांत ज्याप्रमाणें एकाद्या इंग्रजाचा खून झाला तर, " हीच का तुमची अहिंसा ? " असा एकच गिला इंग्रजांनीं करावा, उलट कोणास कांहींही उपद्रव न देणाऱ्या अशा निःशस्त्र लोकांच्या मिरवणुकीवर गोळीबार करून त्यांत हजारों लोक मेले व लाखों जखमी झाले तरी सुव्यवस्थेच्या नांवाखालीं तें दडपलें जावें, त्यांतीलच वरील प्रकार आहे ! जपानी लोकांनीं कांहीं अनन्वित कृत्यें केलीं; नाहींत असें नाहीं. परंतु तीं कां व कशीं केलीं हें पाहिल्याशिवाय ते खरोखर क्रूर आहेत असें म्हणणें धाष्टर्याचें होईल. खुनी मनुष्य खून करतो व न्यायाधीश त्या गुन्हेगाराचा वध करवितो, म्हणून दोघेही सारखेच खुनी कीं काय ? उलट योग्य न्याय दिल्याबद्दल आपण न्यायाधिशाची वाहवाच करतों. चुकीच्या पुराव्यानें एकादे वेळेस निरपराध माणूसही फांशीं गेला तर न्यायाधिशास मनुष्यवधाचा दोष लागत नाहीं. परंतु तोच न्यायाधीश जर कायद्याची लटपट करून आपल्या खुनी भावास गुन्हा माफ करील व स्वतःशीं वैर ठेवणाऱ्या शेजाऱ्यावर खुनाचा आरोप सिद्ध होत नसला तरी त्यास सुळावर चढवील तर त्या न्यायाधिशास मात्र मनुष्यवधाचा दोष लागेल. जपान्यांनीं ( विशेषतः ' केम्पेथाई ' नामक त्यांच्या फौजी पोलीसखात्यानें ) लोकांचा छळ केला असेल, परंतु तो केवळ भिन्नवर्णीय लोकांस छळावें किंवा भिन्नवर्णीय लोकांच्या प्राणांची आपल्याला काय पर्वा ? अशा हेतूनें केला नसून, ते लोक आणीबाणीच्या प्रसंगीं आपल्या युद्धकार्यांत अडथळे आणतात, इंग्रजांचे हेर म्हणून वावरतात, अशी त्यांची ठाम समजूत ( कांहीं बाबतींत चुकीचीही असूं शकेल ) झाल्यावर, त्यांच्या राष्ट्रघातकी प्रयत्नांस आळा घालण्याकरतां म्हणून. खुद्द जपानी माणसानें असला कांहीं गुन्हा केला तर त्याला याहून जास्त कडक शासन होतें. कां ? तर– ' तूं जपानी असतांना तुझ्या हातून असें वर्तन कां घडावें ? तूंच असें वागूं लागलास तर परकी लोकांनीं काय करावें ? ' – म्हणून. एवंच, आपपर भेद त्यांच्यांत नाहीं. त्यांच्या एकाद्या सैनिकानें एवढीशी जरी गैरशिस्त दाखविली तरी त्यास छावणीच्या मध्यभागीं उन्हांत एका खांबाला बांधून उभें करितात व त्या छावणींतील प्रत्येकानें ओळीनें उभें राहून एकामागून एक या गुन्हेगार सैनिकास दोन्ही हातांनीं जोरानें दोन्हीकडून एकसारख्या फडाफड मुस्कटांत मारीत पुढें निघून जावयाचें, लाथाही मारावयाच्या अशी त्यांची प्रथा असते ! गुन्ह्याचा पूर्ण तपास लावण्याच्या अगोदर ही अगदीं साधी शिक्षा

असें ते या प्रकारास समजतात. यानंतर रीतसर चौकशी होऊन मग जी शिक्षा भोगावी लागते ती निराळीच. ती तर याहूनही भयंकर असते. आपपरभाव मनांत न ठेवितां ते सर्वांवर सारखेंच शस्त्र धरतात. गुन्हेगार माणसानें एवढ्या शिक्षेनंतर सूडबुद्धी बाळगावयाची नसून पश्चात्तापाची भावना मनांत रुजवावयाची असते, ( मग त्यास विनाकारण शिक्षा कां झाली असेना ! ) असें शिक्षण प्रत्येक सैनिकास असतें. अर्थात् जपानी हे क्रूर आहेत हें विधान बरोबर नाहीं.

इंग्रजांचें याच्या अगदीं उलट आहे. १८'१७ सालींच नव्हे तर नंदकुमाराला फांशी दिल्यापासून त्यांनीं आजपर्यंत जीं अनान्वित कृत्यें चालविलीं आहेत, तीं केवळ वर्णद्वेषानेंच; हिंदी लोकांच्या जीविताची आपल्याला काय किंमत ? अशा भावनेनेंच. खुद्द त्यांच्या देशांत असले प्रकार ते करीत नाहींत. हिंदुस्थानांत त्यांच्या लोकांस तर मोकळें रानच असतें; काय वाटेल तें करावें. असला पंक्तिप्रपंच म्हणजेच खरोखर छळ. सर्वांस सारखीच कडक शिस्त म्हणजे कांहीं छळ नव्हे.

यानंतरचा एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे दूरपूर्वेतील स्वातंत्र्य-चळवळींत हिंदु-मुसलमान हा वाद कसा उत्पन्न झाला नाहीं ? हिंदुस्थानांत तो कसा उत्पन्न होतो ? हिंदुस्थानांत हिंदु-मुसलमान, उच्चवर्णी हिंदु व इतर असा जो वाद उत्पन्न होतो तो बव्हंशीं इंग्रजांसारख्या परकी सत्तेच्याच कारस्थानामुळें. याचे पुरावे वर्तमानपत्रकारांनीं कांहीं थोडे थोडके प्रसिद्ध केले नाहींत. दास्यांत माणसाचें इतकें अधःपतन होतें कीं, तो क्षणिक सुखाच्या लालुचीनें वाटेल त्याचा, स्वदेशाचाही घात करण्यास उद्युक्त होतो. इंग्रज हे आपल्या देशांत सत्ताधीश असल्यामुळें त्यांना पैसा, अधिकार, मानमरातब अशा अनेक लालुची दाखवून त्यांचे हस्तक तयार करितां येतात. आपल्याला शिकावयाचें तें हेंच कीं, आपलें आपल्या बांधवांशीं अगदीं सात-जन्मींचें वैर कां असेना, परंतु कांहींही झालें तरी इंग्रजांच्या आहारीं जाऊन, त्यांच्या चिथावणीनें ते हिंदुस्थानांत असेपर्यंत आम्ही एकमेकांच्या उरावर बसणार नाहीं. दोघेही शत्रूच असले तरी त्यांत उजवा-डावा कळण्याइतकें तारतम्यज्ञान प्रत्येकास पाहिजे. दूरपूर्वेंत हिंदु-मुसलमान हा प्रश्न अजिबात उद्भवला नाहीं. असें म्हणणें चुकीचें होईल, कारण आमच्या हाडींमासीं खिळलेल्या किंवा खिळविलेल्या घातक वृत्ति अशा एकाएकीं जाणें शक्य नाहीं. त्याला योग्य प्रकारचें राष्ट्रीय शिक्षण अनेक वर्षें दिलें पाहिजे, म्हणजे ही वृत्ति बदलेल. परंतु दूरपूर्वेंत या वृत्तीला कसा आळा घालण्यांत आला, या प्रश्नाला कसा काट मारण्यांत आला तें पाहणें मार्गदर्शक ठरेल.

राष्ट्रीय दिनांच्या दिवशीं कांहीं मुसलमानांनीं तिरंगी ध्वज न उभारतां, हिरवीं निशाणें उभारणें, लष्करी छावण्यांत कधीं काळीं बकरे अथवा कोंबड्या मिळाल्या तर त्या एका झटक्यासरशीं कापावयाच्या कीं हालहाल करून माराव-

याच्या हा वाद उत्पन्न करणें इत्यादि प्रकार कधीं कधीं होतच असत. उदाहरणार्थ, सयाममधील चोलबुरी लष्करी शिक्षणकेंद्रांत ८००-९०० हिंदु रिक्रूट असत. छावणींतील अधिकारी वर्गांत २-३ मुसलमान असत. तेवढ्यांत (वर उल्लेखिलेला) हलाल–झटका वाद उत्पन्न व्हावयाचा. शेवटीं ४ बकरे व १० कोंबड्या असल्यास निम्मीं हलाल पद्धतीनें मारावींत व निम्मीं झटका पद्धतीनें मारावींत, एकत्र शिजवावींत आणि खावयाचें असेल त्यानें खावें, नसेल खावयाचें त्यानें खुशाल खाऊं नये अशी तोड काढण्यांत येई ! गाय व डुकर अशा दोन्हीं प्राण्यांचें मांस छावणींत आणूं नये असा दंडक घालण्यांत आला. वास्तविक कसें कापावयाचें ही क्षुल्लक बाब होती. हिंदी लोकांची ही बालिश चिकित्सा, त्यासाठीं धुसफुस आणि मारामारी पाहून परकी लोक हंसत. यांत एवढें भांडण्यासारखें काय आहे हेंच जपान्यांस कळत नसे ! तिरंगी ध्वजाच्या ऐवजीं हिरवें निशाण उभारण्याबद्दल गुन्हेगारांस आणि त्या समाजांतील प्रतिष्ठित व्यक्तींस स्वातंत्र्य-संघाच्या कचेरींत बोलावून आणून कधीं गोड बोलून, तर कधीं रागें भरून या प्रकारास आळा घालण्यांत आला. लष्करांत शिस्तीच्या दंडकाखालीं कांहीं गैरप्रकार होणें शक्यच नव्हतें. वंदेमातरम् पद कांहीं मुसलमानांस अप्रिय म्हणून सोडून देण्यांत येऊन त्याच्याऐवजीं –

शुभ-सुख-चैनकी बरखा बरसे भारत-भाग्य है जागा
पंजाब, सिंध, गुजराथ, मराठा, द्राविड, उत्कल, बंगा,
चंचल सागर, विंध्य, हिमालय, नीला यमुना, गंगा,
तेरे नित गुण गाये, तुझसे जीवन पाये,
सबतन पाये आशा—सूरज बनकर जगपर चमके
भारत नाम सुभागा–जय हो–जय हो–जय हो–जय जय
जय जय हो–भारत नाम सुभागा ॥
सुबह सवेरे पंख पखेरू तेरेही गुण गाये
बासभरी भरपूर हवाएँ जीवनमे रुत लाये
सब मिलकर हिंद पुकारे–जय आझाद हिंदके नारे
प्यारा देश हमारा—सूरज बनकर - - - ॥
सबके दिलमे प्रीत बसाये तेरी मीठी वाणी
हर सूबेके रेहनेवाले हर मजहब के प्रानी
सब भेद और फरक मिटाके–सब गोदमे तेरी आके
गूंजें प्रेमकी माला— सूरज बनकर - - - ॥

—हें पद स्वातंत्र्य-सरकाराचें राष्ट्रगीत करण्यांत आलेलें होतें. कै. रवींद्रनाथ ठाकूर यांच्या 'जन गण मन...'या बंगाली पदाचें हें ओबडधोबड भाषांतर आहे.

स्वातंत्र्य-सरकाराच्या स्थापनेच्या दिवशीं जी शपथ तयार करण्यांत आली होती. तीसुद्धां मुद्दाम, "मैं खुदाका नाम लेकर ये पवित्र कसम उठाता हूँ..." अशा प्रकारची करण्यांत आली होती. एवंच, कधीं सामोपचारानें व गोडीगुलाबीनें, कधीं रागें भरून, तडजोड करून, ( स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर आपो-आपच सुधारणा होईल अशा विचारानें ) अशा अनेक मार्गांनीं ह्या प्रश्नांस काट दिलेला होता.

नेताजींचें कार्य आज पूर्ण झालेलें नाहीं. हा इतिहास वाचून नेताजींबद्दल किंवा त्यांच्या सहकाऱ्यांबद्दल नुसता आदर वाटून उपयोग नाहीं. नेताजींचें कार्य पूर्ण करण्यास हिंदी माणसानें कंबर कसली तरच त्यांच्या कार्याचा व चळवळीचा इतिहास वाचल्याचा उपयोग. "इंग्रजांचें हिंदुस्थानांतून उच्चाटन झालेलें नाहीं. याचें कारण, आपण स्वातंत्र्याची किंमत चुकविली नाहीं...प्रत्येक वस्तूला मोल असतें...स्वातंत्र्याचें मोल आपण पुरेपूर दिलें नाहीं..." असें नेताजी नेहमीं म्हणत. नेताजी सुभाषचंद्र बोस, महात्मा गांधी, पंडित नेहरू आदि थोर देशभक्त स्वातंत्र्याचें पक्व फळ तोडून आपल्या हातांत देतील असें समजणें चुकीचें होईल. या थोर व्यक्तींचीं चित्रें आपल्या घरांत टांगणें, त्यांस वंदन करणें, त्यांच्या व्याख्यानास जाणें किंवा वर्तमानपत्रांतून त्यांचे लेख वाचणें ही देशभक्ति नव्हे! आपल्या थोर नेत्यांचे आपण अनुयायी आहोंत हें तेव्हांच खरें ठरेल कीं, जेव्हां त्यांच्यांतील समर्थनीय असा एक एक गुण आत्मसात करून आम्ही तो आचरणांत आणूं. राष्ट्रांतील बहुसंख्य व्यक्तींच्या अंगीं राष्ट्रीयत्व बाणल्याशिवाय स्वातंत्र्य मिळणें शक्य नाहीं. या ग्रंथांत प्रसंगाप्रसंगानें दाखविलेले राष्ट्रीय वृत्तीस विघातक असे दोष आपल्यांतून काढून टाकून, परक्यांचे गुण तेवढे प्रत्येकानें घ्यावे. आपण निश्चय केला तर, रोजच्या व्यवहारांत आपला काम-धंदा सांभाळून बरेचसें राष्ट्रकार्य करितां येण्यासारखें आहे. पहिली अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे क्षणोक्षणीं आपल्या मनास टोचणी लागून आठवण राहिली पाहिजे कीं, आपण आपल्या राष्ट्राचे एक जबाबदार घटक आहोंत. जी गोष्ट गुप्त राखावयास हवी असेल तिचा खल न करणें, स्वदेशी वस्तू वापरणें, मुलांबाळांस कावळ्या-चिमणीच्या गोष्टी सांगण्याच्या ऐवजीं इतिहासांतील स्फूर्तिदायक गोष्टी सांगणें, रोमरोमांत भरलेल्या गुलामी वृत्तीचें उच्चाटन करून परकीय भाषा, परकीय पोषाख, परकीय शिष्टाचार यांचा पूर्ण त्याग करून प्रत्येक लहानसहान गोष्टींत राष्ट्रीय वृत्ति अंगीं बाणविणें, सार्वजनिक व्यवहारांत एक पोषाख, एक भाषा, एक आचार पाळणें इत्यादि गोष्टींमुळें देखील कल्पनेबाहेर राष्ट्रकार्य होईल. कोट्यवधि लोकांचे सर्व व्यवहार एकसारखे चालले आहेत अशी डोळे मिटून क्षणभरच कल्पना करा! यामुळें संघटना व संघशक्ति बेसुमार वाढेल. राष्ट्रकार्यार्थ

मराठी ग्रंथ सं... ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ... दि: ...
क्रमांक ... नोंः दिः ...




सिंगापुरांतील स्मृति-स्तम्भ

REFBK-0006897

आपला जोम, बुद्धी व उत्साह खर्च करणें, पुढची पिढी जोमदार व स्वाभिमानी कशी बनेल याकडे लक्ष देणें, असें पुष्कळसें प्राथमिक कार्य सर्वांना करतां येण्यासारखें आहे. या गोष्टी करण्यास इंग्रजही आम्हांला बंदी करूं शकत नाहींत. येथें खरी चूक आमची आहे.

'दूरपूर्वेंत एवढी स्वातंत्र्य-चळवळ झाली, परंतु त्या वेळेस आम्हांला इकडे त्याबद्दल कांहींच कसें कळलें नाहीं?' असा प्रश्न कित्येकजण करतात. हेच लोक असेंही म्हणतात कीं, 'आम्ही सिंगापूर व सायगांव नभोवाणी केंद्रा-वरील कार्यक्रम रोज ऐकत असूं.' यावरून आमच्या रोमरोमांत गुलामी वृत्ति कशी भरली आहे हें स्पष्ट दिसतें. स्वातंत्र्य-चळवळीचें वृत्त सतत २-३ वर्षें ऐकूनही तें आपल्या इतर बांधवांस कळविण्याचें तर दूरच राहो, परंतु या लोकांचा स्वतःच्या कानांनीं ऐकलेल्या माहितीवर जर विश्वास बसला नाहीं तर त्याला कोण काय करणार? एवढें कार्य हिंदी लोकांच्या हातून होऊं शकेल ही कल्पनासुद्धां आम्हाला करितां येत नाहीं! इतके आम्ही नेभळे बनलों आहोंत. आम्हीच आमचे शत्रू आहोंत.

**उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।**
**आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥**

या भगवदुक्तीची क्षणोक्षणीं आठवण ठेवून आम्ही वागत नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें राष्ट्रानें आत्मशुद्धी करण्याचा प्रयत्न केला तर नेताजी सुभाष-चंद्र बोस यांचें 'जय हिंद' हें ब्रीदवाक्य खरें ठरण्यास विलंब लागणार नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 27332 वि. [illegible]
क्रमांक ६७२ नों. दि. [illegible]

*अर्धविराम!*

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६८७

## दोन्ही दृष्टींनीं !

— संदर्भग्रंथ म्हणून उपयुक्त
— शालेय विद्यार्थ्यांना आवश्यक

# प्राचीन भारत

लेखक : व. द. ताम्बे, एम्. ए., बी. टी.
अध्यापक, विद्यामंदिर ( हायस्कूल ), नारायणगांव.
मा. गो. काटदरे, बी. ए. ( ऑन्. ), बी. टी.
अध्यापक, नू. म. वि. हायस्कूल, पुणें.

"... 'इतिहास हें राष्ट्रधन आहे' हा विचार क्षणहि दृष्टि-आड न होऊं देतां हा ग्रंथ लिहिलेला आहे हा याचा विशेष होय."

— ( डॉ. ) पु. ग. सहस्रबुद्धे,
प्राध्यापक, स. प. महाविद्यालय, पुणें.

"श्री. काटदरे व श्री. तांबे यांनीं लिहिलेलें "प्राचीन भारत" शालोपयोगी इतिहासवाङ्मयांत महत्त्वाची भर घालील यांत संशय नाहीं. ज्यांना बहुश्रुत व्हावयाचें आहे अशा सर्वसाधारण वाचकांनांहि त्याचा चांगला उपयोग होईल. सर्व विषयांचें विवेचन स्वयंपूर्ण आहे. त्यामुळें कोणतेंहि प्रकरण कोठेंहि वाचण्यास सुरवात केली तरी मनोरंजन झाल्याशिवाय राहणार नाहीं. त्याचप्रमाणें विवेचन शास्त्रशुद्ध असल्यामुळें वाचकांचा देशाभिमान डोळस होईल."

— ( प्राचार्य ) रा. प. सबनीस, ३-१०-४६

पृष्ठसंख्या ३३६ : मूल्य पांच रुपये

मङगल साहित्य प्रकाशन, पुणें ४

## जनमताच्या कसोटीवर

" सध्यांच्या परिस्थितींत हिंदपुत्रांना अशा शिकवणुकीची फार गरज आहे. अशा प्रकारचें राष्ट्रीय नि तेजस्वी वाङ्मय-प्रकाशनाचें कार्य हातीं घेतल्याबद्दल श्री. अमरेंद्र गाडगीळ हेहि अभिनंदनास पात्र आहेत. "

—**ज्ञानप्रकाश**, पुणें, ४-११-४५

" लोक-जागृतीला व लोक-शिक्षणाला मदत करील अशाच प्रकारचें स्फूर्तिदायी वाङ्मय प्रकाशित करण्याचा उपक्रम 'मंगल साहित्य प्रकाशना'नें चालविलेला आहे, तो अभिनंदनीय आहे....समाजांत सार्वजनिक दृष्टिकोन यावा आणि त्याची युयुत्सा जागृत व्हावी असा त्याचा उद्देश दिसतो. विवेक, पुरोगामिता, क्रांतिप्रवणता, ध्येयनिष्ठा या गुणांची उपासना करणारें हें वाङ्मय आहे. "

—**नवशक्ति**, मुंबई, ११-६-४६

" चालू मराठी साहित्यांतील महत्त्वपूर्ण घडामोडी न्याहाळणारास '[illegible]ल साहित्य ही एक विचारणीय नि अनुपेक्षणीय गोष्ट आहे' असें [illegible]ळल्यावांचून राहणार नाहीं. "

—**विक्रम**, सांगली, १८-८-४६

" लहान-थोर विद्यार्थ्यांच्या हातीं देण्यास हीं पुस्तकें सर्वथैव योग्य आहेत. "

—**रामदास आणि रामदासी**, धुळें, १२-६-४६

" मङ्गल साहित्य प्रकाशन संस्थेचीं प्रकाशनें नेहमींच विचारांना वळण देणारीं आणि लोकशिक्षणास अत्यंत उपयुक्त अशीं असतात. "

—**तरुण भारत**, बेळगांव, ९-७-४६

" मङ्गल साहित्यास सनातन सत्याची पार्श्वभूमि असलेला एक प्रेरक दृष्टिकोण आहे. जें लोकांच्या चटावलेल्या रुचीस आवडतें तें देण्यासाठीं " मङ्गल साहित्या " चा जन्म नाहीं, तर जें लोकांस पथ्यकर आहे, व म्हणून आवडावयास पाहिजे, तें देण्यासाठीं मङ्गल साहित्याचा अवतार आहे."

—**आदेश**, नागपूर, १३-७-४६

" उनका ( संचालक का ) उद्देश्य इस साहित्य के प्रकाशन में भारतीय संस्कृति का पुनरुत्थान, प्रसाद और उसके सच्चे स्वरूप का निरूपण है। "

—**वीर अर्जुन**, दिल्ली, १२-८-४६

---

**मङ्गल साहित्य प्रकाशन, पुणें ४**

# रा ष्ट्री य वा ङ्म या चा प्र भा वी प्र वा ह

**अखण्ड भारतच कां ?**
'हेमाग्रज' : २॥ रु.

**प्रवासी राम**
अमरेन्द्र : २ रु.

**राष्ट्रसेवकाची शिदोरी**
सं. अमरेन्द्र नि गोपाल १। रु.

**अज्ञाताचीं वचनें ( भाग १ ला )**
अज्ञात : १। रु.

**हिंदूंचा धर्मग्रंथ**
मोहन करन्दीकर : ६ आ.

**आमचे राष्ट्रगुरु ( दु. आ. )**
गो. नी. दाण्डेकर : १० आ.

**दीक्षा**
कवि यतीश : १॥ रु.

**मङ्गल साहित्य ( सं. २००२ )**
सं. अमरेन्द्र गाडगीळ : ३ रु.

**प्राचीन भारत**
ब. द. ताम्बे; मा. मो. काटदरे ५ रु.

**प्रेरणा**
बलवन्त वष्ट : १॥ रु.

**हिंदुस्थानाचें दुसरें स्वातंत्र्ययुद्ध**
पु. ना. ओक : ७ रु.

**क्रांतिवीर बाबाराव सावरकर**
द. न. गोखले : ६ रु.

**गुरु गोविंदसिंह**
बलवन्त वष्ट : आगामी

**आईची देणगी ( भागशः १२ )**
गो. नी. दाण्डेकर : प्र. १२ आ.

**शीखांच्या इतिहास-कथा**
बलवन्त वष्ट : (क्रमशः) प्र. ८ आ.

**त्यागवीर खण्डोबल्लाळ**
ना. ह. पालकर : १२ आ.

**गोपाळांचा मेळा (भागशः २)**
गो. नी. दाण्डेकर : प्र. ८ [illegible]

**दशदिशा ( क्रमशः ? )**
मा. गो. काटदरे : प्र. ४ [illegible]

**माणिक-मोतीं ( क्रमशः [illegible]**
पं. महादेवशास्त्री जोशी : प्र. ६ [illegible]

**भारतांतील क्रांतिकारक लढाया**
(क्रमशः)
मा. गो. काटदरे : प्र. ४ आ.

**पंचतंत्र-कथा ( भागशः )**
पं. महादेवशास्त्री जोशी : प्र. [illegible] आ.

**महाराष्ट्राच्या कर्तृत्वशालिनी**
( भागशः )
बा. अ. देसाई : पहिला भाग १॥ रु.
पुढील प्रत्येक चरित्र : प्र. ४ आ.

**भारतीय ( क्रमशः )**
सं. अमरेन्द्र गाडगीळ : वार्षिक ५ रु.

## मङ्गल साहित्य प्रकाशन, पुणें ४